
प्राथमिक शिक्षण


ग्रं. सं. ठाणे
निवेदित
८८०८५




2c-330

121FBK-000568

ग्रं. शां. मोरे



प्राथमिक शिक्षण



लेखक

शंकर शांताराम मोरे, बी. ए., एल्.एल्. बी.

अध्यक्ष, पुणें जिल्हा लोकलबोर्ड,

फेलो, मुंबई विश्वविद्यालय



REFBK-005568

किंमत सव्वा दोन रुपये.

प्रकाशक
शंकर शांताराम मोरे,
२७९ भांबुर्डा, पुणें ५.

* * *

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

* * *

मुद्रक
प्र. भा. काळे,
प्रतिभा प्रेस, ३३५ शनवार, पुणें २.

ना. बाळासाहेब खेर, मुंबई सरकारचे पंतप्रधान व शिक्षणमंत्री

यांचे

प्रारंभीचे चार शब्द.

श्रीयुत मोरे यांच्या प्राथमिक शिक्षण या सुंदर ग्रंथासाठीं प्रारंभीचे चार शब्द लिहून द्यावे अशी विनंती मला करण्यांत आली. शिक्षणक्रमाची पुनर्घटना करण्याची जबाबदारी माझ्यावर असल्यामुळें त्यांचा ग्रंथ मी उत्सुकतेनें वाचून पाहिला. वेदकालापासून सुरू करून गेल्या कायदेमंडळांतील अंदाजपत्रक सादर करीपर्यंत झालेल्या सर्व घडामोडींचा इतिहास ५१६ पानांत आणणें किती अवघड आहे हें कोणासहि सांगण्याची आवश्यकता नाहीं; पण रा. मोरे यांनीं हें कार्य फार सुंदर साधलें आहे. केलेल्या विधानांना ठिकठिकाणीं आधार उध्दृत केले आहेत. पान ३९ वर लहान मुलांच्या कलाप्रमाणें खेळत खेळत प्राथमिक शिक्षणच नव्हे, परंतु अंकगणित, वास्तुशास्त्र इत्यादि विषयांचें ज्ञान देणें कसें शक्य आहे हें दाखवून दिलें आहे. त्यावरून वर्धा परिषदेंत झालेली योजना सकृद्दर्शनीं भासते तितकी त्याज्य नाहीं, हें कोणासहि पटण्यासारखें आहे. त्याचप्रमाणें संस्कृत विद्येच्या बाबतींत योग्य नियम करून तिचा प्रसार करण्यासाठीं मुसलमानी अमलांत कसा प्रयत्न होत असे हें ऐन-इ-अकबरी मधील उताऱ्यावरून कळून येतें. त्यांतील खालील वाक्य विचार करण्यासारखें आहे, तें असें. "संस्कृत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनीं व्याकरण, न्याय, वेदांत व पातंजली यांचा अभ्यास केला पाहिजे. प्रचलित कालास आवश्यक असलेल्या कोणत्याहि गोष्टीकडे कोणत्याहि विद्यार्थ्याला दुर्लक्ष करूं देतां कामा नये."

या ग्रंथांत रा. मोरे यांनीं ग्रंथाच्या विषयाबद्दल भरपूर माहिती गोळा केली आहे. थोड्याच दिवसांखालीं A Survey of Mass-Education in India हा लहानसा इंग्रजी ग्रंथ माझ्या पाहाण्यांत आला. तो इस्माइल

कॉलेजचे अरबी भाषेचे अध्यापक श्रीयुत दाऊदपोटा M. A, P. H. D. यांनीं लिहिला आहे व त्यांत प्राथमिक शिक्षणाचा थोडासा इतिहास त्यांनीं दिला आहे. श्रीयुत मोरे यांनीं या विषयाचा सांगोपांग अभ्यास करून सविस्तर चर्चा केली आहे. सक्तीचें व मोफत शिक्षण, शाळागृहें व शिक्षणसाहित्य, अभ्यासक्रम, धंदेशिक्षण व क्रमिक पुस्तकें, शिक्षणकारभार व हुकमत या प्रकरणांत अत्यंत उपयुक्त सूचना केल्या आहेत. स्कूलबोर्डाच्या कारभारांतील वशिलेबाजीचा सुळसुळाट हा मुख्य दोष श्रीयुत मोरे यांनीं प्रांजलपणें कबूल केला आहे. प्रौढांचें शिक्षण हा आजपर्यंत कोणीहि लक्ष न दिलेला विषय ग्रंथकर्त्यानें विचारांत घेऊन मार्मिक सूचना केल्या आहेत. ग्रंथाच्या शेवटीं सूचनांचा सारांश एका परिशिष्टांत दिला आहे, त्यावरून ग्रंथकर्त्याचे विचार सूत्ररूपानें कळणें फार सोपें जातें. "बहुजनसमाजाच्या शिक्षणाचा भूतकालांतील आढावा घेतांना कांहीं वर्गाबद्दल कडक भाषा वापरावी लागली आहे, परंतु ती वापरण्यांत कोणालाहि दुखविण्याचा इरादा नाहीं. भूतकालाच्या अनुभवाचा तारा भविष्यकालीं योग्य मार्ग दाखविण्यास उपयोगी पडत असतो." असें उपसंहारांत लिहून एकाददुसऱ्या कठोर शब्दामुळें कांहीं लोकांच्या मनाला यातना झाल्या असल्यास त्याबद्दल क्षमा मागितली आहे आणि या सर्वांग सुंदर ग्रंथांत जो एक दोषाचा वास येऊं पहात होता तोहि श्रीयुत मोरे यांनीं आपल्या दिलदार आर्यवृत्तीनें घालवून टाकला आहे.

मुंबई,
२३।११।३७.

वा. गं. खेर.

निवेदन.

—×—

मी प्रथम १९३१ सालीं पुणें जिल्हा शाळा-बोर्डात मागासलेल्या वर्गांचा प्रतिनिधी म्हणून निवडून आलों. शाळाबोर्डाचा सभासद या नात्यानें मला खेड्यांतील प्राथमिक शिक्षणाच्या स्थितीचें अवलोकन करण्याची पहिली संधी मिळाली. त्यानंतर १९३५ सालीं मला पुणें जिल्हा बोर्डाच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला व त्या हुद्याचें काम करतांना मला प्राथमिक शिक्षणाविषयींच्या अनेक महत्त्वाच्या व जिव्हाळ्याच्या प्रश्नांचा साहजिकच विचार करावा लागला. १९३१ सालापासून आतांपर्यंत मला जो अनुभव आला त्याच अनुभवाच्या पायावर या पुस्तकाची उभारणी केली आहे.

१९३५ च्या सुधारणेच्या कायद्याप्रमाणें १ एप्रिल १९३७ पासून नवीन राजवटीस सुरवात झाली व त्यामुळें जिकडे तिकडे विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या प्रचलित पद्धतींत आग्रमूलाग्र फरक करण्याबद्दल चर्चा ऐकूं येऊं लागली. या चर्चेला आपणहि शक्य तों हातभार लावावा या इच्छेमुळेंच हें पुस्तक जन्माला आलें आहे.

प्राथमिक शिक्षणाबद्दल हल्लीं अनेक तज्ज्ञ मंडळी विचार करीत आहेत. माझ्यापासून या विषयासंबंधींची तज्ज्ञता फार दूर उभी आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे. सुरवंटाचें जिणें कांहीं काळ कंठल्याखेरीज फूल पांखरूं होत नाहीं असा निसर्गाचा नियम आहे; त्याचप्रमाणें कांहीं काल शिक्षकाचें काम केल्याशिवाय कोणीहि शिक्षणतज्ज्ञ होत नाहीं असा सरकारी नियम आहे. मी आतांपर्यंत कधींच शिक्षकाचें काम केलें नाहीं. नाहीं म्हणायास पक्षकाराला जबान्या कर्‍या द्याव्यात हें शिकविणें प्रत्येक वकिलाला भाग पडतें, परंतु फिर्यादी कैफियती लिहिल्यामुळें त्याला जसें 'साहित्यिक' होतां येणार नाहीं त्याचप्रमाणें जबान्या पढविण्यामुळेंहि त्याला शिक्षक या अभिधानावर हक्क सांगतां येणार नाहीं. प्राथमिक शिक्षणासारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयासंबंधीं सामान्य विगर तज्ज्ञ-माणसाला काय वाटतें हें अधिकाऱ्यांपुढें यावें याच हेतूनें हें पुस्तक

लिहिण्याचें धाडस केलें आहे. अधिकारी मंडळींना या पुस्तकांत कांहीं नवीन दिसणार नाहीं; परंतु शिक्षणाविषयीं आस्था बाळगणाऱ्या इतर सामान्य माणसांना जरी या पुस्तकाचा थोडाफार उपयोग झाला, तरी मी स्वतःला धन्य समजेन. देशांतील प्रत्येक साक्षर–निरक्षर माणसाला शिक्षण विषयक आपल्या वैयक्तिक जबाबदारीची जाणीव झाल्यावांचून कोणत्याहि लोकनियुक्त सरकारालाहि, तशी उत्कट इच्छा असतांहि, शिक्षणप्रसाराच्या बाबतींत विशेष पुढें पाऊल टाकतां येणार नाहीं; आणि म्हणूनच हें पुस्तक सर्वांना समजेल अशा साध्या–मातृ–भाषेंत लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. तो कितपत यशस्वी झाला आहे हें ठरविणें वाचकांचा अधिकार आहे.

हें पुस्तक लिहिण्यास गेल्या मे अखेर सुरवात केली. इतर व्यवसाय संभाळून जो वेळ मिळाला त्यांत अत्यंत घाईनें तें लिहावें लागलें. त्यामुळें कांहीं ठळक दोष पुस्तकांत राहिले आहेत. त्याचप्रमाणें छापण्याच्या कामींहि गर्दी करावी लागल्यामुळें कांहीं मुद्रण-दोषहि राहिलेले आहेत. त्याबद्दल वाचकांनीं क्षमा करावी येवढीच विनंती आहे

या पुस्तकांतील बहुतेक प्रत्येक विधानास आधार देण्याचा प्रयत्न केला आहे. कै. लाला लजपतराय यांनीं 'दुःखी हिंदुस्थान' (Unhappy India) या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत 'पुस्तकांतील विधानांबद्दल आधार देण्याचें काम अतिशय किचकट व जिकीरीचें असतें' असें म्हटलें आहे. त्या कथनाची सत्यता हें पुस्तक लिहितांना अनुभवानें मला पटली आहे. हे आधार देतांना कांहीं चुका झाल्या असल्यास त्याबद्दलहि वाचकांनीं क्षमा करावी.

या पुस्तकाचा संसार थाटतांना ज्या ग्रंथांची गरज पडली ती गरज उसनवारी करूनच भागवावी लागली. श्री. शंकर बळवंत चव्हाण, म्यु. मेंबर, प्रो. एम्. आर्. परांजपे, श्री. शिवाजी मराठा हायस्कूलचे चालक यांनीं आपलें संग्रहांतील अनेक दुर्मिळ पुस्तकें मला उपयोगासाठीं दिली, याबद्दल त्यांचा मी फार आभारी आहें. त्याचप्रमाणें जिल्हा लोकल बोर्डानें अलीकडे जो छोटासा पुस्तकसंग्रह तयार केला आहे त्याचाहि मला फार उपयोग झाला आहे, हें येथें नमूद करणें जरूर आहे.

मुख्य प्रधान व शिक्षण मंत्री ना. बाळासाहेब खेर यांनीं त्यांच्या मार्गे अनेक

महत्त्वाच्या प्रश्नांची जबाबदारीची निकड असतांहि 'प्रारंभीचे चार शब्द' लिहून दिले याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

पुस्तकाचीं हस्तालिखितें व कच्चीं मुद्रितें तपासण्याच्या कामीं श्री. दादासाहेब बोरवणकर, माजी सुपरवायझर पुणें जि. स्कूल बोर्ड व पुणें ट्रेनिंग कॉलेजच्या प्रॅक्टिसिंगस्कूलमधील सुप्रसिद्ध शिक्षकद्वय श्री. जोगल व पेणकर यांनीं आपलेपणानें जी बहुमोल मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडे आहेत.

सूचि तयार करण्याची जबाबदारी पत्करून पुस्तकाची उपयुक्तता वाढविण्यास मदत केल्याबद्दल माझे व्यवसाय बंधु श्री. लक्ष्मण दत्तात्रय जोशी, वकील यांचाहि मी फार आभारी आहें

अतिशय अल्पकालांत चांगलें छपाईचें काम करून दिल्याबद्दल 'प्रतिभा' छापखान्याचे चालक यांचे आभार मानणें जरूर आहे.

मला १९२१ सालीं शाळाबोर्डांत व १९३५ सालीं जिल्हाबोर्डांत व त्यानंतर अध्यक्षपदावर ज्या मतदारांनीं व सभासदांनीं निवडून दिलें व माझ्या निवडणुकीसाठीं अनेक स्नेह्यांनीं जी निरपेक्ष मदत केली त्यांचेहि या ठिकाणीं आभार मानणें माझें कर्तव्य आहे. माझे पुस्तक त्यांच्याच सहाय्याचें फळ आहे, असें कृतज्ञतापूर्वक सांगावयास हरकत नाहीं.

२७९ भांबुर्डा, पुणें ५
फुले पुण्यतिथि
ता. २७।११।३७

शं. शां. मोरे.

संदर्भ ग्रंथ व त्यांचे संक्षेप.

१. The Vicissitudes of Aryan Civilisation in India. By M. M. Kunte, B. A. कुंटे.

२. A History of Education in Ancient India. By N. N. Mujumdar. मुजुमदार.

३. Selections From Educational Records, Part I By H. Sharp. E. R. I.

४. Selections from Educational Records, Part II By J. A. Richie. E. R. II.

५. Report of the Indian Educational Commission, 1882. हंटर क. रि.

६. Quinquennial Report of Public Instruction in the Bombay Presidency 1917–1922. मुं पं. रि. १७-२२.

७. Quinquennial Report of Public Instruction in the Bombay Presidency 1922–27. मुं. पं. रि. २२–२७.

८. Quinquennial Report of Public Instruction in the Bombay Presidency 1927–32, मुं. पं रि. २७–३२.

९. Report of the Royal Commission on Agriculture in India, 1928. शेतकी क रि.

१०. Interim Report of the Indian Statutory Commission, 1929. हारट्रॉग क. रि.

११. Indian Statutory Commission, Vol. I 1930. सायमन क. रि.

१२. Report of the (chandavarkar) committee appointed to consider the Question of...Free and compulsory Primary Education 1922 चंदावरकर. क रि.

१३. Education in India in 1930–31.

१४. Report on Public Instruction in the Bombay Presidency 1935–36 मुं. शि. रि. ३५–३६

१५ Report of the committee on Primary and secondary Education, 1929. हेस्केथ क. रि.

१६. Report of the Reorganisation committee, 1932.
पुनर्घटना क. रि.

१७. Progress of Education in India.1927–32 By sir G. Anderson
अंडरसन रि.

१८. Report on Vocational Education in India. By A. Abott and S. H. Wood. 1937. अॅबॉट वुड. रि.

२०. Primary Education Act. प्रा. शि. का.

२१. Rules regarding Primary Education. 1924. प्रा शि.नि.संग्रह

२२. Code for Primary School teachers and training Institutions, 1931.

२३. Proceedings of the Conference held at Poona on the 10 th and 11 th July 1937, to discuss the Bombay Ministerial Programme.

२४. The Board of Education, By Sir. Lewis. A Selby Bigge Bt. B. of E.

२५. Report of the Departmental Committee on the Training of Teachers for Public Elementary Schools 1925. T. of T.

२६. Report of the Departmental Committee on the Training of Rural Teachers.

२७. Rural School Teachers in the United States of America. Occasional Reports No. 11. Burea of Education in India. O. R. No 11.

२८. Education Act (England) 1921.

२९. Rural Education, By Ashley and Byles. R. E.

३०. Books in Public Elementary Schools, Report of the Consultative Committee, Board of Education 1928.

३१. Report of the Committee on Education and Industry (England and Wales) 1928. मालवम क. रि.

३२. Education in 1930, Report of the Board of Education 1931.

३३. The Health of the School Child 1930. Annual Report of the Chief Medical Officer of the Board of Education for the year 1930. Health.

३४. The Primary School, Report of the consultative committee. 1931. P. S.

३५. Four months in Europe. 1934. By G. H. Desai. देसाई.

३६. Public Education in the united states By cubberley. Cubberley

३७. Report of the consultative committee on Attendance compulsory or otherwise at continuation schools 1909. ऑकलंड क. रि.

३८. Writings and speeches of the Hon. G. V. Joshi. जोशी

३९, Speeches of the Hon. G. K. Gokhale गोखले.

४०. Reconstructing India. By sir M. Visvesvaraya.

४१. Modern India, Edited By sir John Cumming. 1931.

४२. The Education of India, By Arthur Mayhew मेहयू

४३. The Modern Indian peasant. By prof. Ranga.

४४. Health and Physical Education for schools in India. By Andrew. J. Danielson. 1934.

४५. The Reconstruction of the Curriculum of the Elementary Schools of India, By T. N. Jacob. T. N. Jacob.

४६ श्रीमन्महाभारताचा उपसंहार. ले. चिं. वि. वैद्य. वैद्य

४७ पेशवे कालीन महाराष्ट्र. ले. वा. कृ. भावे. पे. म.

४८ मुसलमानी रियासत. ले. सरदेसाई. मु. रि.

४९ मराठी रियासत पूर्वार्ध. ले. सरदेसाई. म. रि.

५० गांवगाडा. ले. त्रिं. ना. आत्रे. गांवगाडा.

५१ कै. रमाबाई रानडे यांच्या आठवणी. आठवणी.

५२. Census of India 1931 Vol. I By J. H. Hutton. Census Rept. 1931


अनुक्रमणिका

भाग पहिला.

प्रकरण	विषय		पृष्ठ
१	वर्ण व्यवस्थेचीं स्थित्यंतरें	... ...	१–३१
२	पूर्वकालीन शिक्षण–पद्धति	... ...	३२–७३
३	अर्वाचीन काल	... ...	७४–१२५
४	स्त्री–शिक्षण	... ...	१२६–१४३
५	शिक्षणप्रसार	... ...	१४४–१७२
६	सक्तीचें व मोफत शिक्षण	... ...	१७३–१८६
७	शिक्षण व खर्च	... ...	१८७–२३०

भाग दुसरा.

१	विद्यार्थी	... ...	२३३–२७३
२	शिक्षक	... ...	२७४–३६१
३	तपासणी	... ...	३६२–३७९
४	शाळागृहें व शिक्षणसाहित्य	... ...	३८०–४११
५	अभ्यासक्रम, धंदेशिक्षण व क्रमिक पुस्तकें	...	४१२–४४८
६	प्रौढांचें शिक्षण	... ...	४४९–४५८
७	मदतीच्या शाळा	... ...	४५९–४६६
८	शिक्षणकारभार व हुकमत	... ...	४६७–५०३
९	उपसंहार	...	५०४–५०६
	परिशिष्ट, सूचनांचा सारांश	... ...	५०७–५१६
	सूचि	... ...	१–१६



अर्पण-पत्रिका

हजारों वर्षे विद्येस मुकलेल्या, सर्व जगास अन्नवस्त्र पुरवीत
असतांहि स्वतः अर्ध नग्नावस्थेंत व अर्धपोटी रहाणाऱ्या,
गुलामगिरीची पद्धत नष्ट झाली असतांहि अहोरात्र
गुलामाप्रमाणें राबणाऱ्या, कष्टानें व काळजीनें
पिचून निघालेल्या, देशाचा खरा आधार
असतांहि सर्वांच्या उपेक्षेस पात्र झालेल्या,
हजारों खेडचापाडचांतून अथांग
पसरलेल्या

बहुजन समाजाला

हें 'पहिलें पुस्तक' अत्यंत
आदरपूर्वक अर्पण
करीत आहें.

लेखक.

.....But to keep the people weak and ignorant that they may be submissive is a policy which the Government decidedly rejects. The aim is to raise the character, to strengthen the understanding, to purify the heart; and whatever therefore can extend the knowledge of the people, whatever can give them a greater conception of the true relation of things, whatever can add to their power over the gifts of nature or better inform them of the rights and duties of their fellow men, whatever can excite invention and invigorate the judgment, whatever can enrich the imagination and sharpen the wit, whatever can rouse to steady exertion and bind to honest purposes; whatever fits man to hear and improve his lot, to render his neighbour happy, and his country prosperous; whatever in short tends to make men wiser and better and happier here and hereafter— all are desired to the given, in due season, to the people of India.

17th July 1823.

H. MACKENZIE
Member, the General Committee
of Public Instruction.
Educational Records I p. 58.

I am a firm believer in the principle of free and compulsory Primary Education for India. I also hold that we shall realize this only by teaching the children a useful vocation and utilizing it as a means for cultivating their mental, physical and spiritual faculties.

MAHATMA GANDHI.
Harijan, 9–10–37, p. 292.

प्राथमिक शिक्षण

भाग पहिला

अ. निंबाळ.....

प्राथमिक शिक्षण

प्रकरण पहिलें
वर्णव्यवस्थेचीं स्थित्यंतरें
ग्रा. क. ५५६८.....
७८९३

The warriors, idle, luxurious, ostentatious and credulous, succumbed to the power of the priests who were exalted to the dignity of a sacred fire, and who were to be propitiated as such... When political questions were discussed, and settled, the clergy derived secular advantages and fortified their position. The brave and capricious warriors were set aside.....The arrogance of the Brahmanas, their exclusiveness, their contempt of the Kshatriyas and Vaishyas, and their pretentions to be gods themselves, led, in process of time, to a rupture between the Kshatriyas and Brahmanas.

The Vicissitudes of Aryan Civilization
in India, p. 232–233.

The Hindu system itself offers the peculiarity that the small Brahmin, or priestly caste jealously guarded for itself that knowledge of philosophy, literature, rhetoric, grammar, and, above all religion, which is the result of two thousand and more years of civilization; the vaidyas or doctors, had some kind of higher learning; the trading classes had no doubt an efficient training in commercial arithmetic; the vast majority of the population remained untaught.

Sir P. HARTOG,
Modern India, p. 120.

प्राथमिक शिक्षण

प्रत्येक व्यक्तीला मिळणाऱ्या शिक्षणाचें स्वरूप, त्या व्यक्तीच्या अंगच्या गुणावगुणाप्रमाणें त्याच्या भोंवतालची परिस्थिति (Environment) यावरही अवलंबून असतें. त्या परिस्थितींत जसजसा फरक होत जाईल, तसतसा त्या व्यक्तीला मिळणाऱ्या शिक्षणाच्या स्वरूपांतही बदल होतो. हा नियम जसा व्यक्तीला लागू आहे तसाच तो समाजालाही लागू आहे. समाजाच्या इतिहासाशीं शिक्षणपद्धतीचा इतिहास अविभाज्यपणें निगडित असतो आणि म्हणूनच प्राचीनकाळीं या देशांत प्रथम शिक्षणाची कोणती विशेष पद्धत अस्तित्वांत आली; त्यानंतर देशांतील सामाजिक, धार्मिक, राजकीय घडामोडीमुळें त्या पद्धतींत कसा इष्टानिष्ट फेरबदल होत गेला व अखेर ब्रिटिशांचा अंमल सुरू होण्यापूर्वी कोणत्या स्थितींत ती जीव धरून राहिली होती, याचें विहंगमदृष्ट्या केलेलें अवलोकनहि उद्‌बोधक व तसेंच मनोरंजक झाल्यावांचून रहाणार नाहीं. नदी ज्या क्षेत्रांतून वहात जाईल त्या क्षेत्रांतील सपाटीचा अगर डोंगराळपणाचा जसा तिच्या ओघावर परिणाम होतो तसाच निरनिराळ्या कालांतील अनेक घडामोडींचा समाजाच्या रहाणी–वागणुकीवर परिणाम झाल्यावांचून रहात नाहीं; व समाजाच्या रहाणी–वागणुकींत फेरबदल झाला कीं त्याचा त्या समाजांतील रूढ अशा अनेक संस्कारांवरही परिणाम होऊन, त्यांचेंहि स्वरूप पालटूं लागतें. आज हिंदुस्थानांतील वरिष्ठ जातींची शिक्षणाविषयीची तीव्र लालसा व बहुजनसमाजांत दिसून येणारी खेदकारक उदासीनता यांचीं पाळेंमुळें, बारकाईनें पाहिलीं तर, थेट प्राचीन-काळापर्यंत गेलेलीं दिसून येतील; आणि म्हणूनच हल्लींच्या शिक्षणपद्धतीच्या अभ्यासकास, पळत्या पावलानें का होईना पण, प्राचीन समाजरचनेचें व वेळोवेळीं त्यांत झालेल्या फेरबदलाचें अवलोकन करणें अत्यंत जरूर आहे. किंबहुना या सामाजिक स्थित्यंतराचें अवलोकन केल्यावांचून त्याच्या शिक्षण-विषयक कल्पनांत वेळोवेळीं झालेला कमीअधिक महत्त्वाचा फरक कां व कसा झाला हें आपल्याला साकल्यानें उमगणें शक्य नाहीं.

आमच्या देशांतील सामाजिक स्थित्यंतरें धर्मकल्पनांच्या आंदोलनामुळें घडून आलीं. त्यामुळें शिक्षणपद्धतीच्या अभ्यासकास, समाजव्यवस्थेबरोबर धर्मविषयक घडामोडीचेंही बारकाईनें अवलोकन करणें अत्यंत आवश्यक आहे. इतकेंच नव्हे तर या देशांतील धर्मासंबंधीच्या आंदोलनांचा अभ्यास करण्या-वांचून गत्यंतरच नाहीं. कारण प्राचीन आर्यांच्या आचारविचारांतील प्रत्येक

लहान मोठी बाब धर्माच्या बैठकीवर आधारलेली असे. धर्माच्या पार्श्वभूमीवरच त्यांच्या जीवनार्चा सर्व चित्रें रेखाटण्यांत आलीं होतीं आणि त्यामुळें शिक्षण घेणें किंवा विद्या संपादन करणें हें देखील एक धार्मिक कर्मच समजलें जात असे. याप्रमाणें आपल्या प्राचीन शिक्षणाच्या पद्धतीचा उगमच धर्मापोटीं झाला असल्यामुळें धार्मिक व पर्यायानें सामाजिक उलाढालींचा अभ्यास करणें अपरिहार्य आहे.

या दृष्टीनें विचार करतांना आपणांस हिंदुस्थानांतील ऐतिहासिक कालाचे तीन विभाग करतां येतील. पहिल्या भागास आपण 'प्राचीन काल' असें म्हणूं. हा काल ख्रिस्तीशकापूर्वी २००० वर्षांपूर्वी सुरू होऊन तो ख्रिस्ती शकानंतर सातव्या शतकाच्या मध्याचे सुमारास संपतो. दुसऱ्या विभागास 'मध्यकाल' असें म्हणूं. या भागांत हर्ष राजाच्या अस्तापासून (सन ६४७) ते ब्रिटिश सत्तेच्या उदयापर्यंतच्या कालाचा समावेश होतो. अर्वाचीन काल हा तिसरा विभाग होय. या विभागांत ब्रिटिश सत्तेच्या उगमापासून तों आजतागायतच्या कालाचा अंतर्भाव होतो.

१ प्राचीन काल.

या कालांतील परिस्थितीचा विचार करतांना कै० कुंटे यांनीं आपल्या "आर्यांच्या संस्कृतीचीं स्थित्यंतरें" या लोकमान्य ग्रंथांत तीन पोटविभाग पाडले असून त्या तीन विभागांना त्यांनीं 'युद्धकाल', 'वैभवकाल' व 'आचार्यकाल' अशीं नांवें दिलीं आहेत. या तिन्ही कालांत आर्यांच्या सामाजिक रहाणींत व धार्मिक कल्पनांत महत्त्वाचे व दूरपरिणामी फेरबदल झाले आणि आज हिंदुस्थानांत दिसणाऱ्या व देशाचे प्रगतीस जोराचा पायबंद घालणाऱ्या जातिभेदाचा पाया घातला गेला, हें चातुर्वर्ण्यांतील प्रत्येक घटकाच्या प्रथमच्या रहाणीचा व त्याच्या सामाजिक दर्जांत होत गेलेल्या नंतरच्या स्थित्यंतराचा जो इतिहास दिला आहे, त्यावरून दिसून येईल.

आर्य लोकांनीं पेशावरच्या मार्गानें या देशांत प्रवेश केला, त्या वेळीं त्यांच्यांत दोनच वर्ण होते. ते म्हणजे क्षत्रिय व ब्राह्मण. ते पंजाबांत आल्या. नंतर वैश्यवर्ण उत्पन्न झाला. या आर्य लोकांनीं हिंदुस्थानांत येतांना आपल्याबरोबर आपले गुलाम व इतर कनिष्ठ प्रतीचे नोकरही आणले होते. या गुलामांच्या व कनिष्ठ दर्जाच्या नोकरांचा एक निराळाच वर्ण समजण्यांत

येत असे, व या वर्गांतच या देशांतील अनार्य जातींचा समावेश करण्यांत येऊन त्यांचा शूद्र असा नवीन वर्ग तयार करण्यांत आला. आरंभीं आर्यांची समाजरचना अगदीं साधी व सुटसुटीत अशी होती. आर्यांमधील हे तीन वर्ण पेशापरत्वें पडलेले होते. लढणारे ते क्षत्रिय, यज्ञयागाचे वेळीं पौरोहित्य करणारे ते ब्राह्मण व शेती किंवा व्यापार-उदीम करणारे ते वैश्य; परंतु या तिन्ही वर्णांतील लोकांना आपला धंदा बदलून एका वर्णांतून दुसऱ्या वर्णांत जावयास मुळींच प्रत्यवाय नव्हता. परंतु ही समाजास्थिति पुढें कशी बदलली हें, प्रत्येक वर्गाच्या सामाजिक दर्ज्यांत व धार्मिक कल्पनांत कसें स्थित्यंतर होत गेलें, याचें पुढील वर्णन वाचून लक्षांत येईल.

क्षत्रिय:—प्रथम भारत देशांत प्रवेश केल्यानंतर आर्य लोकांनीं, या देशांतील पुरातन रहिवाशी, पण आर्यांच्या रहाणीशीं व संस्कृतीशीं तुलना केल्यानंतर रानटी वाटणाऱ्या, अनार्य लोकांशीं झगडण्यास सुरवात केली व हलके हलके त्यांनीं अनार्य लोकांना पराभूत करून सतलज नदीकांठचा अत्यंत सुपीक असा पंजाब वगैरे भाग काबीज करून त्या ठिकाणीं आपल्या वसाहती स्थापन केल्या. या युद्धकालांत साहजिकच लढवय्ये लोकांना व युद्धकलेला अग्रपूजेचा मान होता. या कालांत आर्य लोकांना अनार्य लोकांवर चढाई करून त्यांच्या ताब्यांतील मुलूख पादाक्रांत करावयाचा असल्यामुळें, शूर व युद्धकलाकोविद अशा आर्य पुरुषांच्या कर्तबगारीला चांगला वाव मिळाला. "आर्य लोकांच्या निरनिराळ्या टोळ्या आपापल्या नेत्याच्या नेतृत्वाखालीं स्वतंत्र निशाणें घेऊन आपापल्या पूर्वजांच्या पराक्रमाचीं कवनें गात व शंख वाजवीत, शत्रूंवर चाल करून जात असत. प्रत्येक टोळीचे नायक गोचर्मानें मढविलेल्या रथावर आरूढ होत असत. कांहींच्या जवळ धनुष्यबाण व कांहींच्याजवळ भाले असत. पायदळ व घोडदळ असे सैन्यांत दोन विभाग असत. अनेक वेळ नेते एखाद्या **शहरावर हल्ला** करून व तेथील प्रत्येक रहिवाशाची कत्तल करून, तें शहर काबीज करीत. याप्रमाणें प्रत्येक घुरीण क्षत्रिय स्वतांसाठीं राज्य संपादन करीत असे."*

हे क्षत्रिय, अनेक वेळ अनार्य लोकांनीं चांगलाच हात दाखविल्यामुळें, अगदीं गलितधैर्य होत असत. त्यावेळीं त्यांच्याजवळ असलेले भाट अगर

---

* कुंटे पान. ११९.

चारण तेजस्वी काव्यरचना करून त्यांना त्यांच्या पूर्वजांच्या पराक्रमाची स्फूर्तिदायक आठवण करून देऊन, त्यांची निस्तेज होऊं पहाणारी पराक्रमाची ज्योत पुन्हां प्रज्वलित करीत असत.

आर्य क्षत्रियांनीं याप्रमाणें पराक्रम करून हलकें हलकें अनेक राज्यें प्रस्थापित केलीं. पंजाब, सिंध व हिमालयाच्या पायथ्याजवळच्या कांहीं मुलुखावर आर्य लोकांचा अम्मल सुरू होऊन,, आस्तेकदम त्यांनीं गंगायमुनांच्या दुआबांतील प्रांतहि आपले हाताखालीं आणला. जिंकलेल्या या सुपीक प्रांतांपासून आर्य क्षत्रियांना मुबलक संपति मिळूं लागली व याप्रमाणें त्यांच्या आयुष्यांतील युद्धकाल संपून वैभवकालास सुरवात झाली.

क्षत्रियांची रहाणी:—प्रथम क्षत्रियांची रहाणी अगदीं साधी होती. परंतु लढाईंत फत्ते होऊन त्यांना जसजसा अधिकाधिक मुलूख व द्रव्यनिधी मिळूं लागला तसतसा त्यांच्या मूळच्या साध्या रहाणींत फेरबदल होऊं लागला. निरनिराळीं लहान लहान राज्यें प्रस्थापित होतांच वैभवदर्शक दरबार (courts) अस्तित्वांत येऊं लागले व राजेलोकांभोंवतीं सरदार-मानकऱ्यांचे घोळके जमूं लागले. आपल्याला डौलदार व सुंदर प्रासाद, मुबलक गुरें, छोटासा जनानखाना, बरेचसे अनुयायी, पुष्कळसे नोकरचाकर असावेत व चमचमीत यांत्रिक मेजवानीच्या भिषानें आपलें वजन व सामाजिक दर्जाचें प्रदर्शन करण्याची प्रत्येक संस्थानिकाची (Patriarch) महत्त्वाकांक्षा असे. त्याला आपल्या कुटुंबांतील मुख्य कर्ता पुरुष समजण्यांत येत असे व त्याच्याशीं त्याचीं मुलें व नातवंडें मोठ्या अदबीनें वागत असत. आपल्या अनुयायांच्या मदतीनें तो नेहमीं स्वतःचा सामाजिक दर्जा, जरूर पडल्यास लढून, सांभाळण्याचा प्रयत्न करीत असे. चांगली प्रकृति, संरक्षक चिलखत आणि सुखसोयींनीं पूर्ण असें निवासस्थान या तीन गोष्टी आपणांस प्राप्त व्हाव्यात, अशी तो नेहमीं प्रार्थना करीत असे. त्याचा पोषाख रणझुंझारास शोभेसा असे. त्याच्या अंगावर नेहमीं चिलखत व बरोबर भाला, नाहींतर तलवार असे. तो गळ्यांत अलंकार व कानांत कुंडलें (Ear-rings) घाली. लढाईंत मरण आल्यास मोक्ष मिळतो, अशी त्याची समजूत असल्यामुळें 'वीरवृत्तीनें रहाणें हा आपला धर्म आहे' असें त्यास वाटे. त्याचीं मुलें आज्ञाधारकपणें वागून त्याला स्वतःच्या अधिकाधिक उत्कर्ष करून घेण्याच्या योजनेला सहायक होऊन, ऐहिक सुखाच्या साधनांत भर घालण्याच्या कामीं

मदत करीत व त्यामुळें 'आपणास कणखर व जोरदार संतती व्हावी,' अशी तो प्रार्थना करीत असे. तो कधीं कधीं आपले प्रासादांत बसून न्यायदानाचें कामही करीत असे. आपल्या अनेक पत्नींशीं तो स्त्रीदाक्षिण्याच्या पोटीं जन्माला येऊन वाढीस लागणाऱ्या अद्भुतरम्य (Romantic) प्रेमानें वागत असे. क्षत्रिय स्त्रिया या याज्ञिक मेजवानीचे वेळीं भाग घेत असत. त्यांच्यापैकीं कांहीं आमरण कुमारी रहात. बाकीच्या स्त्रिया स्वयंवरास योग्य असें प्रौढवय झाल्यानंतर विवाहित होत असत.

क्षत्रियांच्या वाड्यांतून त्यांच्यां दातृत्वावर पूर्णपणें अवलंबून असणारे पुरोहित नेहमीं वास करून रहात असत; व ते आपल्या यजमानास त्याचे नित्यनैमित्तिक यज्ञकर्मांत सहाय्य करीत. गायक स्तोत्रें म्हणत व जरूर पडल्यास नवीन स्तोत्रेंही रचीत. या स्तोत्रांना 'ब्राह्मण' म्हणत.

स्त्रियाहि ऐषआरामांत रहात असत. हत्ती शिकविलेले असत व घोड्यांना अनेक प्रकारें शृंगारीत असत. निरनिराळ्या कारागिरांकडून चैनीच्या अनेक चिजा तयार करून घेण्यात येत असत. स्वतंत्र संस्थानांचे व मोठ्या जमिनींचे मालक असलेलीं अशीं अनेक सरदारी घराणीं, एखाद्या धुरीणाचे नेतृत्वाखालीं, एका संघांत सामील होत. निरनिराळे सरदार नवीन मुलूख जिंकीत व आपली मिळकत वाढवीत. श्रमवृत्तीला मान असे. साहसवृत्तीचें कोडकौतुक करण्यांत येत असे. त्यामुळें जिकडेतिकडे आर्यांच्या सत्तेची वाढ होऊन एतद्देशीय मूळ रहिवाशी (अनार्य) दुबळे झाले व अखेर जिंकले गेले.

क्षत्रियांचा सामाजिक दर्जा:—जोंपर्यंत आर्यक्षत्रियांना येथील मूळच्या रहिवाशांशीं झगडावयाचें होतें, तोंपर्यंत त्यांच्या आंगचे सद्गुण साहजिकच जागृतावस्थेंत होते. या युद्धकालांत वीरांना पहिला मान असे व पुरोहितवर्ग हा त्यांचा आश्रित व दुय्यम दर्जाचा समजला जात असे. परंतु हळूहळू वाढत्या दिग्विजयाबरोबर शत्रु अधिकाधिक कमजोर होत जाऊन लढण्याचे प्रसंग कमी येऊं लागले. जिंकलेल्या मुलखापासून विपुल धनदौलत मिळूं लागल्यामुळें क्षत्रियांचें वैभव वाढूं लागलें व त्यांच्या 'वैभवकालास' सुरवात झाली. वाढत्या धनदौलतीमुळें सुखलोलुपता व चैनीची आसक्ति उत्पन्न झाली. चैन वाढल्याबरोबर आळशीपणा उत्पन्न होऊन विद्याव्यासंग लोपला व त्यामुळें कर्तबगारी व धमक नाहींशी झाली. संपत्ति मिळावी, अशी अहर्निश मनांत इच्छा; पण अंगांत कर्तबगारी न राहिल्यामुळें, 'यज्ञ-

याग केल्यास परमेश्वर प्रसन्न होऊन आपली मनकामना पुरी होईल' अशी भोळी समजूत पुरोहितवर्गानें करून दिल्यामुळें यज्ञाचे अनेक प्रकार जन्मास आले. यज्ञसंस्थेवरील आंधळी श्रद्धा वाढल्याबरोबर पुरोहितवर्ग बलवान् होऊं लागला व अखेर "धार्मिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या क्षत्रियांनीं ब्राह्मणांपेक्षां आपण कमी दर्जाचे आहोंत हें निमूटपणें मान्य केलें."§

क्षत्रियांच्या मानेवर 'वैभवकालांत' बसलेलें हे ब्राह्मण-वर्चस्वाचें जूं झुगारून देण्याचा त्यांनीं पुढें अनेकवार प्रयत्न केला, त्याचें योग्य वर्णन पुढें दिलें आहे.

ब्राह्मण:—हिंदुस्थानांत आर्य लोकांनीं प्रवेश केला, त्या वेळीं आर्यांची समाजरचना अतिशय साधी व सुटसुटीत होती, हें वर लिहिलें आहेच. भारतवर्षांत प्रवेश करण्यापूर्वीच आर्य लोकांमध्यें यज्ञ ही संस्था जन्मास आलेली होती. परंतु हिंदुस्थानांत आल्यानंतर, आर्यांच्या वैभवांत कल्पनातीत वाढ झाल्याबरोबर, यज्ञसंस्थेंतील पूर्वीचा साधेपणा नाहींसा होऊन त्यांतील धार्मिकतेचें प्रमाणहि कमी कमी होऊन ती संस्था अतिशय गुंतागुंतीची व आर्यक्षत्रियांच्या वैभवाचें प्रदर्शन करण्याचें एक साधन बनली. या यज्ञयागाचे वेळीं जे पुरोहितपणा करीत त्यांचा ब्राह्मणवर्ग झाला. हा वर्ग प्रथम क्षत्रियांचा आश्रित म्हणून गणला जात असल्यामुळें, त्यांचा दर्जा क्षत्रियांपेक्षां खालचा समजला जात असे. तत्त्वतः या पुरोहितवर्गास राजे व सरदार मान देत; या वर्गाचें म्हणणें मान्य करीत; त्यांच्या इच्छा पुरवीत व घरगुती धार्मिक समारंभांचे बाबतींत अगर नैमित्तिक यज्ञांचे बाबतींत त्यांचे सल्ल्याप्रमाणेंच वागत. परंतु त्यांना राजकीय बाबतींत अगर देशांतील राज्यकारभाराचे बाबतींत मुळींच कांहीं महत्त्व नव्हतें. फक्त धार्मिक बाबतींतच त्यांना महत्त्व असे. त्यामुळें त्यांचा दर्जा प्रत्यक्ष सेनानायकापेक्षां अगर राज्यकारभार करणारापेक्षां कमी प्रतीचा असे.

या वर्गाला स्वतांचा जमीनजुमला व इतर मिळकतीहि असत व कांहीं मोठ्या वैभवानें रहात. त्यांना स्वतांचे अनेक नोकरचाकर व इतर आश्रित

---

§ Religiously and therefore socially, the warriors or Kshatriyas permitted themselves to be reckoned as inferior to the Brahmanas or the clergy. कुंटे पा.२२७.

असत व त्यांना आपल्या राजघराण्यांतील यजमानाकडून अनेक गाई, गुलाम व इतर विपुल संपत्ती मिळत असे. पुरोहित राजदरबारला जात असत व राजाचे जनानखान्यांतहि त्यांचा प्रवेश असे. दररोज परमेश्वराची आराधना करण्यासाठीं व पवित्र अग्नीला आहुती द्यावयाची असल्यामुळें पुरोहिताच्या मदतीवांचून वजनदार सरदारांचें पुढें पाऊलच पडत नसे !

ही स्थिति युद्धकालांतील झाली, परंतु युद्धकाल संपल्यानंतर आर्य क्षत्रियांच्या दिग्विजयामुळें वैभवकालास सुरवात झाली व त्या कालांत क्षत्रिय आळशी व ख्यालीखुशालीचे गुलाम बनल्यामुळें त्यांच्या अंगांतील आरंभीची जागरूकता व विद्येची अभिरूची लोपून आंधळी श्रद्धा जन्माला आली. प्राप्त झालेलें वैभव टिकविण्यासाठीं व आपल्या अनेक मनकामना पुऱ्या करण्यासाठीं क्षत्रिय यज्ञयागाच्या जाळ्यांत गुरफटून जाऊं लागले. त्यामुळें साहजिकच पुरोहितवर्गानें, नाना तऱ्हेच्या इच्छा पुऱ्या करणारे नाना तऱ्हेचे यज्ञाचे प्रकार शोधून काढले व त्यामुळें क्षत्रियांवरील त्यांचें वजन मनस्वी वाढलें. ऋत्विजाधीन यज्ञ व यज्ञाधीन यजमान असें स्पष्टपणें सांगण्यांत येऊं लागलें. 'यज्ञामध्यें दैवी सामर्थ्य आहे' अशी लोकांची सार्वत्रिक समजूत करण्यांत आलो.'† 'मंत्राचे जोरावर पुरोहित यज्ञ करणारासाठीं वाटेल तें घडवून आणूं शकतो' यावर लोकांचा विश्वास बसूं लागला. 'मंत्र हे वज्र असून त्यानें शत्रूंचा निःपात करतां येतो व या मंत्ररूपी शास्त्राचा पुरोहितावेरीज इतरांना उपयोग करतां येत नाहीं' अशी लोकांना दहशत घालण्यांत आली. 'मंत्रामुळें वाटेल तीं इच्छा सफल होते, आयुष्य वाढलें जातें, हरवलेल्या वस्तू सांपडतात; लढाईंत यश लाभतें, वैभव पायाशीं लोळण घेतें' असें गोड आश्वासन देऊन आशाळभूत लोक पुरे बंदे बनविले !'†

याप्रमाणें यज्ञयागामुळें पुरोहितवर्गाला मोठेपणा प्राप्त झाला व मग पुरोहितवर्गानेंही आपल्या हिताचा मार्ग ओळखून यज्ञयागाचें फाजील स्तोम माजविलें. क्षत्रियांना व इतर लोकांना पुरोहिताच्या अनुशासनापासून होणाऱ्या घोर परिणामाची कल्पना न झाल्यामुळें, ते ब्राह्मणी धर्माचे गुलाम बनले आणि पुरोहितवर्गाची पूर्ण हुकमत त्यांच्यावर चालूं झाली. यावेळीं पुरोहितवर्गानें इतर वर्गांचे पाठीवर टेवलेलें आपलें धार्मिक वर्चस्वाचें खोगीर त्यांना,

† कंटे पा. २०४

अनेक प्रयत्न केले असतांही अखेरपर्यंत दूर झुगारून देतां आलें नाहीं. युद्धकालीं लढवय्ये या नात्यानें क्षत्रियांना प्राप्त झालेला अव्वल दर्जा, वैभवकालीच्या त्यांच्या गाफिलपणामुळें व धर्मभोळेपणामुळें, पुरोहितवर्गानें पटकावेल्यामुळें ते दुय्यम दर्जाचे अधिकारी बनले. धर्मकारणाप्रमाणें राजकारणाचीं सर्व सूत्रें ब्राह्मणवर्गाचे हातांत जाऊन 'ते म्हणतील तो कायदा व सांगतील ती पूर्व' असा दंडक सगळीकडे जारी झाला.

'ब्राह्मण हे दान घेण्यास उत्सुक, सोम पिण्यासाठीं तृपित, अन्नाचे भुकेले, व लहरीप्रमाणें सगळीकडे भटकणारे' असे ऐतरेय ब्राह्मणांत त्यांचें वर्णन केलेलें आढळतें.§ पशुयज्ञाचे मुख्य पुरोहित या नात्यानें यज्ञबलीचें मांस खाण्याचा त्यांचा पहिला अधिकार असे. पाणिनीच्या वेळेस मांस खाणें सार्वत्रिक असे. यज्ञकार्याशिवाय कोणी अतिथि आल्यास त्याच्या सत्कारासाठींही गाय मारीत असत. कात्यायनाचे वेळीं कोणत्या प्राण्याचें मांस खाणें चांगलें, यावद्दल उहापोह करण्यांत येत असे. मांसमिश्रित भात ज्याला मुसलमान 'पुलाव' म्हणतात तो, त्यावेळींहि विशेष आवडीचा पदार्थ होता. कुत्र्याचे मांसाचाहि उल्लेख आढळतो. विश्वामित्रानें कुत्र्याची तंगडी खाल्ली हें तर महशूर आहेच. उडदाची डाळ निषिद्ध मानली होती. त्यावेळीं ब्राह्मण मांस खात व उडदाची डाळ अखाद्य समजत. आज ब्राह्मणांत त्याच्या उलट प्रकार आहे.† बुद्धधर्माचे उपदेशापासून ब्राह्मणांचें मांस खाणें सुटून ते अहिंसावादी बनले.

वैश्य:—आर्यांच्या वर्णव्यवस्थेंतील तिसरा महत्वाचा घटक म्हणजे वैश्य. " ऋग्वेदकालीं प्राचीन आर्य हिंदुस्थानांत येण्याच्या वेळीं त्यांच्यांत दोन जाती (ब्राह्मण व क्षत्रिय) उत्पन्न झाल्या होत्या. परंतु अद्याप त्यांच्यांत कडक निर्बंध झाले नव्हते. जेव्हां ते पंजाबांत आले आणि त्यांनीं तेथें वस्ती केली त्या वेळेस साहजिकच तिसरा वर्ग उत्पन्न झाला. देशामध्यें शेतकीचा धंदा मुख्य असून त्याकडे पुष्कळ लोक लागले. हे लोक एकाच जागीं बसले किंवा वसाहत करून राहिले म्हणून त्यास **विश अथवा वैश्य म्हणजे सामान्य लोक** म्हणूं लागले.‡

हा समाज शेती व व्यापारधंदा करून. आपला योगक्षेम चालवीत असे.

---

§ कुंटे पा. २०१ † कुंटे पा. ३५८–३५९. ‡ वैद्य पा. २४८.

प्राथमिक शिक्षण

व्यापारी, जल अगर भूमीमार्गानें प्रवास करून व्यापार करीत. नद्यांच्यामुळें देशांतले देशांत प्रवास करण्याचें जें साधन उपलब्ध झालें त्याचाहि उपयोग करण्यांत येत असे. लोखंडाचा उपयोग करण्यांत येत असल्यामुळें लोहारकामाचा धंदा करण्यांत येत असे. पुरातनकाळीं मोठमोठीं जंगलें असल्यामुळें सुतारांस लांकडें मुबलक मिळत होतीं. कापूस पेरण्यांत येत असे व मेंढ्यांवरील लोंकरही जमा करण्यांत येत असे. सुंदर ललनांच्या उपयोगासाठीं तलम कापड विणण्यांत येत असे. नौका तयार करण्यासाठीं अप्रतिम कसब लागत असे व तें कसब व्यक्त करून त्याहि तयार करण्यांत येत. करारासंबंधीं कायद्याचीहि बरीच वाढ झाली होती. कधीं कधीं जबर व्याजहि आकारण्यांत येत असें. हिंदुस्थानांत प्रवेश केल्यानंतर कांहीं काल हा वर्ग निरनिराळे धंदे करून सुखानें रहात असे

यज्ञसंस्थेची जिकडेतिकडे चलती सुरू झाली व त्यानंतर, क्षात्रियांचें अनुकरण करून, हा वर्गही निरनिराळे यज्ञयाग करण्याचे नादीं लागला. 'यज्ञ हें सर्व मनकामना पूर्ण करण्याचें रामबाण साधन आहे' अशी सर्व लोकांची समजूत झाल्यानंतर, क्षत्रियांच्या खालोखाल धनदौलतीचें आगर बनलेला हा वर्गही यज्ञसंस्थेचा उपासक बनल्यास नवल नाहीं !

आरंभींच्या कालांत याप्रमाणें वैश्यवर्गाची चांगली स्थिति होती. हे मूळचे आर्यच पण व्यापारी पेशा पत्करल्यामुळें त्यांस वैश्य समजण्यांत येऊं लागले. परंतु पुढें पुढें ब्राह्मणाला क्षत्रियता दाखविण्याची अगर क्षत्रियाला ब्राह्मणत्व संपादन करण्याची सवलत कांहीं काळ राहिली होती तरी; 'वैश्य' ही एक शूद्राच्या वरच्या दर्जाची जातच बनली गेली. कारण 'कोणाहि वैश्यानें,' शूद्राप्रमाणें ब्राह्मण अगर क्षत्रिय यांच्या बरोबर समानत्व मिळविण्याची महत्त्वाकांक्षा धरण्याचा प्रयत्न केला नाहीं.† सामाजिकदृष्ट्या हा कमीपणा आल्यानंतर नवीन राजवटींत वैश्यांचें आर्थिक नुकसान होण्यासहि सुरवात झाली. त्यांना दुसऱ्यांच्या उपभोगासाठीं परक्या राजांना कर द्यावे लागत व राजाच्या लहरीप्रमाणें त्यांच्यावर जुल्महि होऊं लागला.‡

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, शेती करून व व्यापारधंदा करून पैसे मिळविण्याचें ध्येय या वर्गानें ठेवल्यामुळें व सामाजिक दर्जा राखण्यासाठीं

---

† कुंटे पा. १९८. ‡ कुंटे प. २०२.

झगडण्याची त्यांची तयारी नसल्यामुळें, या वर्गाला बदलत्या समाजरचनेमध्यें थोडया खालच्या पायरीवर जाऊन बसावें लागलें.

शूद्रः—हिंदुस्थानांत प्रवेश करतेवेळीं आर्य लोकांनीं आपलेबरोबर गुलाम व कनिष्ठ दर्जाचे नोकर-चाकर आणले होते व हे गुलाम व नोकर आणि या देशांतील मूळचे अनार्य लोक मिळून असा एक शूद्र वर्ग तयार करण्यांत आला, हें मागें सांगितलें आहेच. आर्यांनीं बरोबर आणलेले गुलाम व नोकर यांची संख्या अतिशय अल्प असल्यामुळें शूद्रवर्गांत अतिशय मोठा भरणा येथील अनार्य लोकांचाच होता. येथील मूळच्या रहिवाश्यांत दास्य व दस्यू या नांवानें ओळखले जाणारे अनार्य प्रमूख होते व आर्य क्षत्रियांना प्रथम यांच्याशींच निकराचा झगडा करावा लागला. आर्य लोक युद्धकलावेत्ते असल्यामुळें व्यवस्थितपणें मोहीम कशी करावी व उपलब्ध साधनांचा हेतुसिद्धीसाठीं कसा उपयोग करावा, यांचें त्यांना चांगलें ज्ञान होतें. लढाईकरतां त्यांना निरनिराळ्या शस्त्रांचा उपयोग करतां येत होता व निरनिराळीं युद्धयंत्रें ते शोधूनही काढीत असत. एखाद्या मोहिमेची बिनतोड आखणी कशी करावी व केलेल्या आखणीप्रमाणें एकदम अविलंबें वार कसा उडवून द्यावा, यांत ते तरबेज होते. आर्यवीरांमध्यें शिस्त असे व आपल्या नेत्याच्या पुढारीपणाखालीं ते व्यवस्थितपणें चाल करून जात.

आर्यांना विरोध करणाऱ्या, दास आणि दस्यू या अनार्यांची स्थिति याचे अगदीं उलट ! ते खेड्यांतून जमाव करून रहात; परंतु त्या जमावाला सामाजिक संघटनेचा मुळींच गंध नसे. त्यांच्याजवळ चांगलीं शस्त्रें नव्हतीं व पद्धतशीरपणें विरुद्ध पक्षावर मात करणाऱ्या युद्धकलेचीही त्यांची तोंडओळख नव्हती. व्यवस्थित पूर्वयोजना न करतां, मनांत आलें कीं एकदम बेफामपणें हल्ला करावा व मार खाल्ला कीं सैरावैरा पळावें अगर शरण जावें, ही त्यांचीं लढण्याची पद्धत ! यामुळें सहाजिकच नेहमीं पराजयच त्यांच्या वांट्याला येत असे. आर्यांच्या गाई पळवून व इतर अनेक मार्गांनीं ते कधीं कधीं त्यांस सतावून सोडीत, नाहीं असें नाहीं. कधीं कधीं दास आणि दस्यू या लोकांनीं केवळ अधिक संख्येच्या जोरावर केलेल्या पराभवानें आर्य नाउमेद होत, हीहि गोष्ट खरी आहे. परंतु असे प्रसग फारच क्वचित् येत असत. अखेर अनेक शतकें चाललेल्या या झगड्यांत आर्य लोकांचा विजय होऊन या अनार्य लोकांना 'जित' बनावें लागलें.

या जिंकलेल्या अनार्य लोकांचा मुख्यतः शूद्रवर्ग निर्माण झाला. जित अशा अनार्यांनीं त्यांच्यावर लादण्यांत आलेला सेवाधर्म निमूटपणें पाळण्यास सुरवात केली. प्रथम कांहीं काल त्यांचे अतिशय हाल झाले. 'शूद्रांनीं' इतर वर्गांची सेवा करावी, मालकांच्या लहरीप्रमाणें मार खावा व हद्दपारीही सोसावी. मालकास वाटल्यास शूद्र जातीच्या गुलामास ठार मारण्याचाहि त्यास अधिकार असे.§ शूद्र हा स्वतंत्र वर्ग समजण्यांत येत असे. त्यांचा आर्य या सदरांत मुळींच समावेश होत नसे. जेत्यांना विजयाच्या उन्मादानें स्वतांविषयीं अभिमान अगर गर्व वाटूं लागतो. 'आपणांत कांहींतरी वैशिष्ट्य आहे, आपण परमेश्वराचे विशेष आवडते आहोंत' असा त्यांना अहंकार वाटूं लागतो व या अहंकाराच्यामुळें जितांविषयीं त्यांना तीव्र तुच्छता वाटूं लागते. या तुच्छतेचें रूपांतर जितांना कमी लेखण्यांत होतें व अखेर अखेर जितांना शक्य तितक्या दूर अंतरावर ठेवून त्यांना उघड उघड कमीपणानें वागविणें, जेत्यांच्या नित्याच्या सरावाचें होऊन बसलें. या वृत्तीमुळेंच हिंदुस्थानांत प्रथम शूद्रवर्ग निर्माण झाला. हिंदुस्थानांतील इंग्रज लोकहि, जेत्यांना शोभेशा चढेलपणानें व तुटकपणानें जित अशा हिंदी लोकांशीं अजूनही वागत नाहींत का ? श्रेष्ठकनिष्ठपणाची ही भावना, अशा तऱ्हेनें विजयामुळें जन्माला येऊन तिनें अखेर, आर्यांच्यामध्यें एकमेकांला कमीजास्त लेखण्याला सुरवात करून प्रथम वर्गभेद व नंतर जातिभेद जन्माला आणला व आर्यांच्या ऱ्हासाचा पाया घातला.

शूद्रांचा उत्कर्ष:—हलके हलके शूद्र या वर्गाच्या स्थितींत व सामाजिक दर्जांत फरक पडूं लागला. कांहीं कालानंतर शूद्रांचा आर्यांमध्यें समावेश करण्यासंबंधीं घोषणा जाहीर करण्यांत आल्या.† परंतु त्यांना आर्यांच्या संघांत सर्वांत कनिष्ठ असें स्थान देण्यांत आलें. लायक शूद्रांना स्वातंत्र्य देण्यांत येऊन त्यांना समाजांत मान्यतेचा दर्जाही देण्यांत येऊं लागला. व हलके हलके रामायण, महाभारतकालांत शूद्र व आर्य यांचे मिश्रविवाहहि होऊं लागले. सत्यवति-शंतनु, भीम-हिडिंबा, अर्जुन-उलुपी, ही अशा मिश्रविवाहाचीं ठळक उदाहरणें आहेत. महर्षि व्यास व तत्त्वज्ञानी विदुर हेही आर्यशूद्र संबंधांपासून जन्माला आले. आर्य व शूद्र गणले गेलेले मूळचे अनार्य यांच्यामधील मिश्रविवाहाला कोणीही कमी लेखीत नसे. प्रथम शूद्रांना यज्ञकार्यांत मुळींच भाग

§ कुंटे पा. १९०. † कुंटे पा. २०२.

घेण्याची परवानगी नसे. 'यज्ञधेनूची त्यांनीं धार काढूं नये' असा प्रथम निर्बंध होता. परंतु पुढें त्यांना यज्ञ करण्याचीही परवानगी देण्यांत आली.* इतकेंच नव्हे तर एका काळीं गांवांत रहाण्यासही ज्यांना प्रत्यवाय असे अशा शूद्रांनाही प्रसिद्ध व्याकरणकार पाणिनीच्या वेळीं ब्राह्मणांकडूनही नमस्कार स्वीकारण्याचा हक्क प्राप्त झाला.†

या अनार्य अगर शुद्र म्हणून समजल्या जाणाऱ्या वर्गांच्या वाढत्या सामाजिक दर्जाबरोबर त्यांच्यांत संघटना व संघशक्ति अधिकाधिक उत्पन्न होऊं लागली. **बुद्धकालापूर्वी** त्यांच्या या संघटनेमुळें त्यांना संघ या नावांनें संबोधण्यांत येऊं लागलें. ब्राह्मणवर्गाकडून घरीं झालेल्या मानहानीमुळें व आपसांतील यादवीमुळें वैतागून क्षत्रियांनीं उत्तरेकडील मुलूख सोडून दक्षिणेकडील मुलुखांवर मोहीम काढली. त्या मोहिमेंत त्यांनीं मूळच्या अनार्य रहिवाशांना सैन्यांत सामील करून त्यांना लष्करी शिक्षण दिलें व मोकळेपणानें त्यांच्याशीं सहकार्य केलें. रामानें मारुती वगैरेसारख्या अनार्यांच्या मदतीनें रावणाचा पराभव केला. क्षत्रियांस संपत्ति मिळून त्यांच्या दाक्षिणेंत वसाहती स्थापन झाल्या. या दक्षिणेकडील मोहिमेंत संघानें म्हणजे कनिष्ठ वर्गानें क्षत्रियांच्या बरोबर जाऊन त्यांना बहुमोल मदत केल्यामुळें त्यांचा दर्जा वाढला व त्यांची संपत्ती वाढली. घरीं दारिद्र्यामुळें उपासमार सोसणाऱ्या खालच्या वर्गांना परमुलुखांतील मोहिम नेहमीं फायदेशीर होत असे. संघांतील जे लोक रामाबरोबर गेले ते संपन्न, बलवान व सुविद्य होऊन परत आले. या त्यांच्या भरभराटीला महाभारतकालांतील क्षत्रियांच्या आपापसांतील यादवीमुळें अधिकाधिक भरती आली. या खालच्या वर्गांना आतां शूद्र न म्हणतां **शेतकरी** असें पेशावाचक नांव देण्यांत आलें.§

जातीभेदाचा पाया:—या वरील विवेचनावरून समाजाची घडी वेळोवेळीं कशी बदलत गेली, याची कल्पना येईल. भारतवर्षांत प्रवेश करून आर्य पंजाबप्रांतांत वस्ती करून राहिले त्या वेळीं आर्य लोकांतील वर्गभेद हे कर्मविभागाच्या तत्त्वावर आधारलेले होते. ज्या मानानें कामगिरी त्या मानानें महत्त्व; परंतु जन्मतः सर्व समान दर्जाचे. विद्या, वीर्य व वैश्यपण कोणालाहि संपादन करण्यास जन्मामुळें अडचण पडत नसे. ज्याच्या अंगीं ज्या पेशास

---

* कुंटे पा. २५३–२५४. † कुंटे पा. ३५०. § १ कुंटे पा. २५१.

साजेसे गुण तो पेशा पत्करण्याचा त्यास पूर्ण मुभा ! या समाजरचनेमुळें आर्य लोकांत विलक्षण कर्तृत्व उत्पन्न झालें व प्रत्येकाला आपण एकाच विराट-देहाचे महत्त्वाचे घटक आहोंत, अशी जाणीव असल्यामुळें अभेद्य अशी जूट उत्पन्न होऊन त्यांना मूळच्या रहिवाशांवर अल्प काळांत मात करतां येऊन जिकडे तिकडे विजयाचे झेंडे फडकवतां आले.

परंतु ही अशी स्थिति फार काळ टिकली नाहीं. यज्ञयागाचें बरेंच स्तोम माजलें व त्यामुळें, यज्ञयागाच्या वाङ्मयाच्या वाढीमुळें, पंडिक असा पुरोहित-वर्ग निर्माण झाला. त्याचप्रमाणें युद्धशास्त्रांतहि वाढ झाल्यामुळें लढाऊ लोकांचा असा एक खास गट तयार झाला. पुरोहिताच्या पोटीं जन्माला आलेला मुलगा बापाचा धंदा पुढें चालवूं लागला व क्षत्रियाचे पोटीं जन्माला आलेला मुलगा लढणें हा आपला धर्म मानूं लागला. याप्रमाणें अंगचे गुण पाहून पेशा पत्करण्याची पूर्वीची रीत आस्ते आस्ते नाहींशी होऊन, जन्मावरून मनुष्याचा प्रथम धंदा व नंतर वर्ग ठरूं लागला. व अशा तऱ्हेनें जन्मावर अवलंबून असलेल्या जातिभेदाचा नकळत का होईना, पण पाया घातला गेला. माणसांप्रमाणें देवांतहि जातीभेद उत्पन्न झाला.§ याप्रमाणें जन्मानें वर्ग ठरूं लागले तरीहि ही नवीन रचना प्रथम लवचीक अशी होती; म्हणजे एका वर्गांत जन्माला आलेल्या माणसाला दुसऱ्या वर्गाचे विशेष गुण संपादन केले तर त्या वर्गांत शिरकाव मिळण्यास अडचण पडत नसे. त्याचप्रमाणें निरनिराळ्या वर्गांत विवाह सर्रहा होत असल्यामुळें त्या समाजरचनेलाहि जातीभेदाचें अद्याप अनिष्ट वळण मिळालें नव्हतें.†

ही अशी परिस्थितीही फार दिवस नांदू शकली नाहीं. इतर वर्गांचा हलकें हलकें विद्याव्यासंग सुटलेमुळें वेदविद्याप्रवीण अशा पुरोहितवर्गाला वर्ण-वर्चस्वाची हाव सुटली व श्रेष्ठकनिष्ठ भावनांचें वीष आर्यसमाजाच्या विराट शरीरांत जिकडे तिकडे भिनून विकृति उत्पन्न झाली. आपल्या वर्गाचें वैशिष्ट्य राखण्यासाठीं सर्व सूत्रें हातीं असणाऱ्या पुरोहितवर्गांनीं, स्वतःच्या रक्षणाच्या व वर्धनाचें स्वार्थी हेतूनें, मतलबी धर्मवचनांची रचना करून आपले केसांसही धक्का न लागावा म्हणून पापपुण्याची कल्पना जन्माला घातली. धर्मवचनांना जन्म देऊनच पुरोहितवर्ग राहिला नाहीं; क्षत्रियांच्या धर्मभोळेपणामुळें हातीं

§ कुंटे पा. १८४–१८५. † मुजुमदार पा. २७–२८

आलेल्या राजकीय सत्तेचा उपयोग करून स्वार्थी हेतूनें जन्माला आलेल्या धर्मवचनांना कायद्याचें रुप देऊन त्यांची सक्तीनें अंमलबजावणी केली. पुरोहितवर्ग आपणांस श्रेष्ठ म्हणून मिरवूं लागतांच वरिष्ठांचें भल्याबुऱ्याचें अनुकरण करणारे, खालच्या वर्गांतील लोकहि आपल्या खालच्या समाजाला तुच्छ लेखूं लागले व अशा तऱ्हेनें एकजीवानें राहणाऱ्या आर्यांतील श्रमविभागाच्या तत्त्वावर पडलेले वर्ग अनिष्ट अशा अभेद्य जातीभेदाचे जनक ठरून त्या समाजाचे अनेक तुकडे पडले.

पुरोहितवर्गांनीं प्रस्थापित केलेल्या या वर्गावर्चस्वाविरुद्ध खुद्द क्षत्रियांनीं व इतर अनेक वर्गांनीं अनेकवार जोराचीं बंडें पुकारलीं. "क्षत्रिय लोकांना आपल्या ब्राह्मण सल्लागाराची हुकमत पसंत पडेनाशीं झाली. कारण कारस्थानी पुरोहितांच्या हातांत खरी सत्ता आहे व आपण त्यांच्या हातचें हत्यार आहोंत, हें त्यांनीं ओळखलें. आपल्या लोभापासून अगर रोषानंतर कांहींच भलाबुरा परिणाम होत नसल्यामुळें आपल्या प्रजेवर आपला बोज राहिला नाहीं, पुरोहितांचे प्रासाद हे सर्व सत्तेचीं केंद्रस्थानें झालीं आहेत व ब्राह्मणांच्या केसालाही धक्का लावण्याची सोय राहिली नाहीं याची त्यांना जाणीव झाली. क्षत्रियांच्या सहनशक्तीची परमावधि झाली. जमदग्नि नांवाच्या एक लोकविश्रुत ब्राह्मणाची एका क्षत्रिय युवकानें प्रथम मानहानी करून नंतर त्याच प्राणहि घेतला. त्या युवकाला अनेक क्षत्रियानीं सहानुभूतिपूर्वक पाठिंबा दिला व अनेक राजवाड्यांतून पुरोहितांचा उघड रीतीनें अपमानही करण्यांत आला.'[1]

यज्ञसंस्थेमुळें पुरोहितवर्ग मनांतून इतर वर्गांना तुच्छ लेखूं लागला अशा समजुतीनें ब्राह्मणवर्चस्व विरोधकांनीं या यज्ञसंस्थेवरच प्रथम जोराचा हल्ला चढविला. ऋग्संहिता व यजुसंहितांतील मंत्रांतून यज्ञयागास विरोधक अशा तऱ्हेचा अर्थ काढण्यांत येऊं लागला, व या यज्ञविरोधी मंडळीच्या प्रयत्नानें **अरण्यकांचें** समतेचा पुरस्कार करणारें तत्वज्ञान जन्माला आलें. अरण्यकानीं घातलेल्या ब्राह्मणधर्मविरोधाच्या पायावरच पुढें महात्मा बुद्धानें समतेच्या सौंदर्यानें नटलेली बुद्धधर्माची इमारत उभारली. बुद्धधर्माप्रमाणें जैनधर्म, शीखधर्म, लिंगायतधर्म व शेवटीं भागवतधर्म ही ब्राह्मणधर्मांच्या वर्चस्वाला पायबंद घालण्यासाठीं अब्राम्हण वर्गांनीं केलेलीं लहानमोठीं बंडेंच होत, हें धर्माचा इतिहास जाणणारास सांगण्याची आवश्यकता नाहीं.

---

१ कुंटे पा. २५०.

आपले वर्चस्वाविरुद्ध बंडावा करणारांना ब्राह्मणवर्गानें कांहीं काल मुळींच दाद दिली नाहीं. ब्राह्मणवर्गानें कांहीं प्रसंगीं तर आपलें वर्चस्व राखून, बंडखोर वर्गांचा व विशेषतः क्षत्रियांचा बीमोड करण्यासाठीं हातीं शस्त्र धरण्यासही कमी केलें नाहीं.* परशुरामानें क्षत्रियांच्या विरुद्ध चालविलेली मोहीम ही याच लढ्याची दर्शक आहे. पुरोहितवर्गप्रणीत धर्मशास्त्रास धाब्यावर बसवून 'वेन' नांवाच्या राजानें राज्य करण्यास सुरवात करतांच ऋषींनीं त्यास मारून टाकले व पृथु नांवाच्या आपल्या हस्तकास त्याच्या गादीवर बसवून त्याच्याकडून 'ब्राह्मणांस शिक्षा करणार नाहीं आणि वर्णसंकर होऊं देणार नाहीं असें अभिवचन घेतलें.'§ लोकशाहीविरुद्ध बागणाऱ्या पहिल्या जॉर्जचा लोकांनीं वध केला. पुरोहितवर्गाविरुद्ध बागणाऱ्या वेन राजाला बलिष्ठ पुरोहितांनीं (ऋषींनीं) मारून टाकलें, यावरून त्यावेळीं पुरोहितवर्गाचें वर्चस्व कोणत्या थराला गेलें होतें याची कल्पना येते. आश्रित म्हणून प्रथम राहून नंतर यजमानाच्या भाबडेपणाचा फायदा घेऊन त्याच्या डोक्यावरून आपल्या वर्चस्वाचे मिरे वाटण्याची वृत्ती फार सनातन आहे. छत्रपतीचे आश्रित म्हणून राहिलेल्या पेशव्यांनींही आपल्या पूर्वकालीन पूर्वजांचा कित्ता गिरवून छत्रपतिनांच आपल्या ताटाखालचें मांजर बनविलें. हिंदुस्थानांत प्रथम व्यापारी म्हणून येऊन व येथील राजांच्या रक्षणाखालीं आश्रित म्हणून राहून युरोपियन लोकांनींहीं तोच कित्ता गिरवून आपली आर्यवंशापासून झालेली उत्पत्ती योग्य तऱ्हेनें सिद्ध करून दाखविली. इतिहासाची पुनरावृत्ती होते ती ही अशी !

एकजीवानें राहणारे दोन बलिष्ठ वर्गच आपसांत झगडूं लागले म्हणजे त्यांच्या जुलुमाखालीं भरडल्या गेलेल्या दलित-वर्गाचा आपोआप फायदा होतो. ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यामध्यें वर्गवर्चस्वासंबंधीं लढा सुरू झाल्याबरोबर हे दोन्ही वर्ग वैश्य व शूद्र लोकांनीं आपले बाजूला यावें, म्हणून त्यांना अनेक सवलतींची लालूच दाखवूं लागले. यामुळें शूद्र-वर्गाचा फार फायदा होऊन आस्ते आस्ते त्यांना समाजांत मान्यतेचें स्थान प्राप्त झालें. हें स्थान प्राप्त करून घेतांना त्यांना स्वतांलाहि वरिष्ठ वर्गाशीं झगडा करावा लागला. परंतु त्यांचा अधिक फायदा वरीष्ठ वर्गांतील आपसांतील यादवीमुळेंच झाला, ही गोष्ट नमूद करणें अत्यंत जरूर आहे. दुसऱ्यावर जुलूम करणारा वर्गच

* कुंटे पा. २५०. § वैद्य पा. ४३९.

संकटांत सांपडल्याशिवाय तो ज्यांच्यावर जुल्म करतो त्या वर्गाचा फायदा होण्याचा मोका येत नाहीं, हेंच खरें आहे. मुसलमानांच्या धार्मिक झगड्यामुळें व परकीय सत्तेशीं होत असलेल्या राजकीय झगड्यामुळें आजहि हिंदु समाजांतील वरिष्ठ जाती अस्पृश्यांच्या गाऱ्हाण्यांकडे सहानुभूतीनें पाहूं लागल्या आहेत! युरोपांतील राजकारणाच्या वातावरणांत युद्धाबाबत होणाऱ्या फेरबदलाच्या तालावर इंग्रज लोकांचा, हिंदी लोकांच्या स्वातंत्र्याविषयक आकांक्षाविषयीं दृष्टिकोन बदलत असतो, हा नेहमींचा अनुभव नाहीं का?

ब्राह्मणधर्माचा ऱ्हास:—क्षत्रियांनीं व इतर वर्गांनीं अनेक शतकें ब्राह्मणवर्चस्वाविरुद्ध जी चळवळ केली त्या चळवळीचा परिणाम होऊन अखेर गौतम बुद्धाचे नेतृत्वाखालीं बुद्धधर्माची स्थापना झाली व त्या धर्माचा राजापासून रंकापर्यंत सर्व समाजांत अतिशय झपाट्यानें प्रसार झाला. बुद्धधर्म हा सामान्य लोकांचा धर्म होऊन त्यांच्या उत्कर्षाचा, उद्धाराचा मुख्य आधार बनला. ब्राह्मणधर्मामुळें दलित बनलेल्या सामान्य जनतेंत या नवीन धर्मामुळें, नवीन चैतन्याची अभूतपूर्व अशी लाट उसळली व या लाटेच्या जोरदार तडाख्यामुळें ब्राह्मणधर्माची कांहीं काळ पिछेहाट झाली. अनेक ब्राह्मणांनीं गौतम बुद्धाला मान देऊन बुद्ध धर्माचा स्वीकार केला. यज्ञयाग व प्राणिहिंसा बंद पडून कांहीं काल ब्राह्मणधर्म अस्तप्राय झाला. बुद्ध—भिक्षूंच्या विहारांचीं द्वारें मोकळीं टाकण्यांत येऊन त्यांतून सामान्य जनतेला, त्यांच्या नेहमींच्या प्राकृत भाषेंत, ज्ञानामृत पाजण्यांत येऊं लागलें. बुद्ध धर्माच्या काळांत हिंदुस्थानचें वैभव कळसास पोंचून बुद्धधर्मानें हिंदुस्थानच्या मर्यादा ओलांडून परदेशांतहि प्रवेश केला.

२ वर्ग व विद्या.

आतांपर्यंत आम्हीं, प्राचीन अगर मध्यकालांतील हिंदुधर्मांतील ब्राह्मण, क्षत्रिय वगैरे चतुर्वर्णांच्या सामाजिक दर्जांत कशा तऱ्हेचे फेरबदल होत गेले, याचें सविस्तर वर्णन केलें. त्या वेळीं त्यांच्या शिक्षणविषयक कल्पनांचा त्यांच्यांतील शिक्षणाच्या प्रसाराचा अगर अभावाचा आम्हीं मुळींच उल्लेख केला नाहीं. या प्रकरणांत आम्ही आर्यांच्या शिक्षणविषयक कल्पनांचा व निरनिराळ्या वर्गांतील शिक्षणासंबंधीं अनुकूलप्रतिकूल वृत्तीचा विचार करण्याचें योजिलें आहे.

यज्ञ व वेद:——आर्यांनीं भारतवर्षांत प्रवेश केला त्याच वेळीं त्यांच्यांत यज्ञसंस्था अस्तित्वांत आली होती. तो काल आर्यांच्या बौद्धिक बाल्याचा असल्यामुळें प्रत्येक निसर्गाच्या हालचालीला ते चमत्कार समजत व कौतुकानें त्याचें वर्णन करीत; सूर्य, अग्नि यांना देव समजून त्यांची काव्यमय स्तोत्रांत स्तुति व आराधना करीत व त्यांना प्रसन्न करून त्यांच्याकडून त्या कालच्या परिस्थितीप्रमाणें, गरजाप्रमाणें, निरनिराळ्या तऱ्हेच्या गोष्टींची मागणी करीत. यज्ञ हे देवतांना प्रसन्न करण्याचें मुख्य साधन समजलें जाई. या यज्ञाचे वेळीं देवतांविषयीं निरनिराळीं स्तुतिपूर्ण स्तोत्रें म्हणण्यांत येत असत.

हलके हलके निरनिराळ्या देवतांचे निरनिराळ्या प्रकारचे यज्ञ जन्माला आले. त्याचप्रमाणें निरनिराळ्या मनकामना पुऱ्या करण्यासाठीं निरनिराळे यज्ञाचे प्रकार अस्तित्वांत आले. या निरनिराळ्या यज्ञांत म्हणावयाचे मंत्रही निरनिराळे बनले. प्रथम हे यज्ञ करणाऱ्या लोकांचा विशिष्ट वर्ग नव्हता. यज्ञाच्या-वेळीं म्हणावयाचे मंत्रही ब्राह्मणांप्रमाणें क्षत्रियांनीं रचले होते. आद्य ऋषि हे यज्ञयागाचे वेळीं मंत्र म्हणत व प्रसंग पडल्यास हातीं शस्त्र अगर नांगरही धरीत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे यज्ञसंस्थेच्या प्रारंभकाळीं सर्व आर्य एकवर्णी होते.

वाडवडिलांकडून जिभेवर नाचत आलेल्या मंत्रांचें अगर स्तोत्रांचें पठण करणें व नवीन स्तोत्रांची रचना करून त्यांच्यांत भर घालणें, हें प्रत्येक ऋषि आपलें आद्य कर्तव्य समजत असे. लिहिण्याच्या कलेचा जन्म झालेला नसल्या-मुळें जुन्या पिढीनें नवीन पिढीला पाठ करण्यास शिकविणें क्रमप्राप्त झालें. याप्रमाणें अध्यापन व अध्ययन जन्माला आलें व शिक्षणपद्धतीचा पाया घातला गेला. या आरंभींच्या स्तोत्रांना अगर मंत्रांना 'वेद' ही संज्ञा मिळून ते त्या वेळच्या शिक्षणक्रमाचे मुख्य आधारविषय बनले.

चार वर्ण व वेदाध्ययन:——चार वर्ण हे प्रथम व्यवसायभिन्नत्वामुळें कसे झाले, हें मागें सांगितलें आहेच. हे चार वर्ण पेशापरत्वें निर्माण झाल्या-नंतर कांहीं काल त्रैवर्णिकांना वेदांचें अध्ययन करण्याचें स्वातंत्र्य होतें. प्रत्येक वर्णाचा मुख्य व्यवसाय ठरला, तरी पहिल्या तिन्ही वर्णांतील लोकांना इतर वर्णांच्या व्यवसायांत पारंगतता मिळविण्यास मुळींच प्रत्यवाय नव्हता. "पूर्व-काळीं क्षत्रिय वेदाध्ययन चांगलें करीत व होमहवनहि स्वतः समजून करीत असें मानण्यास हरकत नाहीं. वेदपारंगत व यजनशील अशा क्षत्रिय राजांचीं

पुष्कळ वर्णनें महाभारतांत आहेत. पूर्व काळीं ब्राह्मणांची व क्षत्रियांची वेदाध्ययनांत बरोबरी असे, हें ब्राह्मणांतील व उपनिषदांतील अनेक वर्णनांवरून दिसतें." † ब्राह्मणांप्रमाणें क्षत्रियहि वेदविद्येंत पारंगत होते व क्षत्रियांप्रमाणें ब्राह्मणहि युद्धकलानिपुण होते. द्रोणासारख्या ब्राह्मणाकडून क्षत्रिय राजे युद्धकलेचें शिक्षण घेत असत, तर अजातशत्रु, जनक, जाबालीसारख्या क्षत्रियांकडून ब्रह्मज्ञान संपादन करण्यासाठीं अनेक ब्राह्मणांची गर्दी लोटत असे. ब्राह्मणानें फक्त पढावें व क्षत्रियानें फक्त लढावें, अशी वर्णभेदसूचक रूढि नंतर जन्माला आली. वैश्यदेखील मोठ्या हौसेनें वेदविद्येचा अभ्यास करीत असत. श्रीमंत व्यापारी आपले मुलांना वेदांचा व कायद्याचा अभ्यास करण्यासाठीं ब्राह्मण गुरूकडे पाठवीत असत. निगरोधजातकामध्यें राजगृहाच्या एका शेटीयानें आपल्या दोन मुलांस तक्षशिलेच्या नामांकित विश्वविद्यालयांतील एका गुरूकडे पाठविल्याचा उल्लेख§ आहे. यावरून प्राचीन काळच्या वैश्यांना वेदांचा व कायद्यांचा अभ्यास करून त्या काळच्या आध्यात्मिक चळवळींत भाग घेण्याची मुभा होती हें सिद्ध होतें.

परंतु क्षत्रिय व वैश्य यांना असलेली वेदाच्या अध्ययनाची मोकळीक फार काल टिकली नाहीं. यज्ञयागाच्या प्रकारांत बरीच वाढ झाली व वेदाचा विस्तार होऊन त्यांतही ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद असे तीन प्रकार झाले. त्यामुळें यज्ञयागाच्या वेळीं पुरोहितपणा करणारा स्वतंत्र वर्ग निर्माण होऊन, बापाची वृत्ति मुलानें पुढें चालवावी, अशी रूढि पडूं लागली. लढण्याच्या कलेचाही विस्तार होऊन शस्त्रकलेप्रमाणें अस्त्रकलाही जन्माला आली व त्यामुळें क्षत्रियांना युद्धकलेच्या अभ्यासासच वेळ पुरेनासा झाला. वाढत्या वैभवामुळें क्षत्रियांत ख्यालीखुशाली वाढल्यामुळें वेदविद्येचा अभ्यास करण्याचें कष्टसाध्य काम त्यांनीं आपल्या पुरोहितवर्गाकडे सोंपवून दिलें. वेदवाङ्मयांत चांगलीच भर पडल्यामुळें वैश्यांना आपला उदीमधंदा संभाळून वेदांचा अभ्यास करणें बुद्धीच्या अटोक्यापलीकडचें वाटून त्यांनींही तो नाद सोडून दिला. हलके हलके वेदविद्या व क्षत्रिय आणि वैश्य यांच्यांत अधिकाधिक अंतर पडूं लागलें, व वेदांचा अभ्यास पुरोहितवर्गाचीच मक्तेदारी बनली. आपल्या वाढत्या वैभवाचें व अलोट धनसंपत्तीचें प्रदर्शन करण्यास यज्ञयाग हें

† वैद्य पा. २७४.

§ Fergusson College Magazine. 1 July 1934. P. 18.

चांगलें साधन आहे असें प्रथम क्षत्रियांना वाटूं लागल्यामुळें व नंतर धर्मभोळेपणामुळें अनेक नित्य आणि नैमित्तिक यज्ञ ते करूं लागले व त्यामुळें पुरोहितपणाच्या धंद्यास चांगलीच चलती मिळाली व किफायत चांगली होऊं लागली. त्यामुळें वेदविद्येचा अभ्यास करण्यास चांगलेंच उत्तेजन मिळूं लागलें.

अज्ञान आणि धर्मभोळेपणा यांचा फार जिव्हाळ्याचा संबंध असून त्यांच्यामध्यें कारणकार्यभाव आहे. वेदांचा अभ्यास सुटल्यामुळें क्षत्रिय-वैश्यांत, बुद्धीला मालिन्य येऊन अज्ञान वाढत गेलें व त्यामुळें धर्मभोळेपणा वाढून यज्ञसंस्थेची व पर्यायानें पुरोहितवर्गाची त्यांचे मनांवर जबरदस्त पकड बसली गेली. धनवान् क्षत्रिय–वैश्यांचें अज्ञान व तज्जन्य धर्मभोळेपणा हे पुरोहितवर्गाच्या भरभराटीचें भांडवल बनल्यामुळें त्यांनीं अनेक सूत्रांची रचना करून 'वेदविद्येचा अभ्यास करणें हे ब्राह्मणांचें कर्म, लढणें हें क्षत्रियांचें कर्म; व्यापार हें वैश्यांचें कर्म, व त्रैवर्णिकांची निमूटपणें सेवा करणें हें शूद्रांचें कर्म'§ अशी सर्व लोकांची समजूत करून दिली. "प्रत्येक वर्गाचा स्वभावविशेष पाहून आखून दिलेलें कर्म करणाराला पाप लागत नाहीं," अशी सार्वत्रिक समजूत झाली, व "आपल्या वर्गाच्या धर्माप्रमाणें वागत असतांना मरण आलेलें उत्तम, दुसऱ्याचा धर्म भयावह" असें लोकांना सांगण्यांत आलें व याप्रमाणें न वागेल त्याला पापाची भीति घालण्यांत आली.

या सर्व शिकवणीचा व्हावयाचा तो परिणाम होऊन क्षत्रिय व वैश्य हे "वेदाचा अभ्यास करणें हें आपलें काम नाहीं, वेदविद्येचा अभ्यास करणें ब्राह्मणांचा धर्म आहे, लढणें व व्यापार करणें हा अनुक्रमें आपला धर्म असून त्याप्रमाणें वागण्यांतच आपल्याला पुण्यप्राप्ति आहे, दुसऱ्याचा धर्म चांगला असला तरी तो आपल्याला नको" या अनिष्ट व शिक्षणविरोधी कल्पनांच्या पुरे आहारीं गेले, व त्यामुळें दिवसेंदिवस ते अधिकाधिक अज्ञानतमांत गुरफटले जाऊन विद्यासंपन्न अशा विप्रांच्या हातांत धर्माप्रमाणें राजकारणाची व ऐहिक सत्तेचीं सूत्रें गेलीं आणि क्षत्रिय व वैश्य हे त्यांच्या हातचीं कळसूत्री बाहुलीं बनलीं.

ब्राह्मणांनीं वेदविद्या संपादन करावी व क्षत्रियांनीं क्षात्रविद्या संपादन करावी, हें वर्गीकरण प्रथम अहेतुकपणें जन्माला आलें; परंतु क्षत्रियांचा

§ मुजुमदार पा. ३०

विद्याव्यासंग सुटल्यामुळें तें ब्राह्मणवर्गावर अधिकाधिक अवलंबून राहूं लागले. त्यामुळें ब्राह्मणांचें अधिकारक्षेत्र, धर्माच्या मर्यादा सोडून राजकीय बाबीपर्यंत विस्तृत होऊं लागलें. क्षत्रियवर्गाचें अज्ञान आपल्या फायद्याचें आहे, हें पुरोहित-वर्गानें पटकन ओळखलें. अधिकारलालसा हीसुद्धां एक तऱ्हेची मदिराच आहे. जों जों अधिकार मनुष्याच्या हातांत येतो तों तों अधिक अधिकाराची वाढती हांव सुटूं लागते व ही हांव पुरी करण्यासाठीं, दारू मिळविण्याची धडपड करणाऱ्या मुरलेल्या मद्यप्याप्रमाणें, मनुष्य वाम-मार्गाचाही अवलंब करण्यास कचरत नाहीं. पुरोहित-वर्गाच्या हातांत क्षत्रिय-वर्गाच्या अज्ञानामुळें राजकीय सत्ता येतांच ही सत्ता कायम टिकविण्या-साठीं, तिचा पाया जो क्षत्रियांचा अडाणीपणा, तो कायम करण्याकडे धर्माचार्यांनीं आपल्या प्रयत्नाचा रोख वळविला व नाना तऱ्हेचे नियम जन्माला आणून व त्या मतलबी नियमांना धर्माचा मारक मुलामा देऊन, क्षत्रियवर्ग शिक्षण घेण्याचा व वेदविद्येचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करणार नाहीं, अशी मोर्चेबंदी केली. जबरदस्त अशा वरिष्ठ वर्गाच्या क्षत्रियांचीच अशी गत केल्यानंतर वैश्यांची काय स्थिति झाली, हें सांगण्याची काय जरूरी आहे? वनराज सिंहास साखळदंड लावणाराला, घोड्यास लगाम घालायला काय वेळ लागणार?

क्षत्रियवैश्यांचा विद्याव्यासंग सुटल्यामुळें त्यांच्या बुद्धीचा तजेला साह-जिकच कमी कमी होत चालला व उलट पुरोहितवर्गाची बुद्धि नित्याच्या वेदविद्येच्या अध्ययनामुळें अधिकाधिक तेजस्वी व प्रभावी होत गेली. आरंभीं समान बौद्धिक दर्जाच्या या वर्गांत कांहीं कालानें बुद्धीच्या बाब-तींत श्रेष्ठकनिष्ठपणा सहाजिकपणें उत्पन्न झाला. एकाद्या अवयवाचा कांहीं काल उपयोग केला गेला नाहीं, तर तो भाग अनुपयोगामुळें निरुपयोगी होतो, हा नियम बुद्धीलाहि लागू आहे. ज्ञान हें बुद्धीचें अन्न आहे. तें बुद्धीला जिवंत ठेवणारें अन्नच तिला कैक शतकें मिळूं न दिल्यामुळें क्षत्रिय-वैश्यांची बुद्धि मृतप्राय झाली तर काय आश्चर्य? तरवारीला रोज घासून पुसून ठेविली तर तिची धार कायम राहील, नव्हे वाढेल; परंतु तरवारीवर चांगला गंजच चढूं दिल्यानंतर तिचें तेज कसें दिसणार? या बुद्धिमांद्यामुळें क्षत्रियवैश्यांचा विशेषतः क्षत्रियांचा, इतर वर्गाच्या मदतीनें पुरोहितवर्चस्वा-विरुद्ध अनेकवार बंडाचे झेंडे उभारले असतांहि, तेजस्वी बुद्धीच्या कारस्थान-

पट्टु वरिष्ठ वर्गापुढें निभाव लागला नाहीं. हिंदी लोकांच्या हातचें शस्त्र काढून घेणाऱ्या ब्रिटिश सत्ताधिकाऱ्यांचा व क्षत्रियवैश्यांच्या हातांतील विद्या काढून घेणाऱ्या प्राचीन धर्मगुरूंचा, आपलें वर्चस्व निर्विघ्नपणें राखणें, हा एकच समान हेतु होता, असें म्हणणें खोटें आहे का ?

शूद्रवर्ग कसा निर्माण झाला याचें वर्णन केलें आहेच. त्रैवर्णिकांच्या संख्येच्या मानानें हा वर्ग संख्येनें फारच मोठा होता. प्रथम सर्व आर्यच शेतकी करीत असत; परंतु हलके हलके पुरोहितपणांत ब्राह्मणांना, राज्य संपादण्यांत व मुलखगिरी करण्यांत क्षत्रियांना व व्यापारउदीम करण्यांत वैश्यांना संपत्ति मुबलक मिळूं लागल्यामुळें, त्यांचा शेतीचा व्यवसाय सुटून तो व्यवसाय श्रमजीवी शूद्रांच्या गळ्यांत पडला. कांहीं शूद्रांनीं वरील तिन्ही वर्णांची एकनिष्ठपणें सेवा करावी व बाकीच्यांनीं शेती करून सर्व वर्गांस पुरेल इतकें धान्य, कापूस वगैरे पैदा करावें, हा शूद्रांचा धर्मच झाला. शूद्रांतील बहुसंख्यांक समाज हा वैश्याप्रमाणेंच कृषिकर्म करून रहात असे; आणि म्हणूनच शूद्रांचा पुढें कांहीं कालानें दर्जा वाढल्यानंतर पाणिनीनें त्यांना शूद्र न म्हणतां 'कृषक' या नांवानें संबोधलें आहे.

प्रथम या वर्गाला शिक्षण अतिशय दुर्लभ असें. सर्व काळ वरिष्ठवर्गांची पडेल ती हीन दर्जाची नोकरी बजावण्यांत त्यांचें आयुष्य जात असे. यज्ञयागाचे बाबतींत त्याला कांहींच अधिकार नसल्यामुळें यज्ञसंस्थेशीं पूर्णपणें संबंधीत असलेली वेदविद्या त्याला कोठून लाभणार ? शूद्रांना वेदविद्येचा अधिकारच नव्हता; परंतु कांहीं शूद्र लोकांनीं ही विद्याही संपादन करून पुरोहितवर्गावर विद्वत्तेनें मात केली. कवश-अहलुशा या शूद्रानें आपल्या विद्वत्तेच्या जोरावर ब्राह्मणांना लज्जेनें मान खालीं घालावयास लावून यज्ञकर्माचा अधिकार मिळविला. परंतु अशीं उदाहरणें अपवादात्मकच असें म्हणावयास हरकत नाहीं.

कवशअहलुशाचे कालानंतर शूद्रांना संस्कृतविद्येचा व वेदांचा अभ्यास करण्याची चुकून माकून आलेली संधीहि नाहींशी झाली. महाभारतकालीं वर्णव्यवस्था अबाधितपणें राखण्यासाठीं व वर्णसंकर टाळण्यासाठीं दोन नियमांची कडकपणें अम्मलबजावणी करण्यांत येऊं लागली. कोणत्याही वर्गानें जातीच्या बाहेर लग्न करावयाचें नाहीं हा पहिला नियम. परंतु या नियमानें वरील वर्णानें खालच्या वर्णांतील स्त्री करण्यास हरकत नाहीं, अशी सवलत

दिली होती. दुसरा नियम जातीच्या बाहेर धंदा करावयाचा नाहीं, असा होता. या नियमाप्रमाणें ब्राह्मणांचीं जीं अनेक कर्में होतीं त्यांत पठणपाठण करणें याला प्रमुख स्थान मिळालें होतें. क्षत्रिय व वैश्य यांनाही अध्ययन करण्याची मोकळीक होती. परतु " शूद्रास फक्त तिन्ही वर्णांची शुश्रूषा हेंच काम होतें. त्यांस अध्ययन, यजन व प्रतिग्रह बंद होते."§ शूद्रांनीं वेदाविद्येचें अध्ययन केल्यास त्याबद्दल त्यांना कडक शासन करण्यांत येऊं लागलें. शंबूक नांवाच्या शूद्रानें वेदविद्येचा अभ्यास केल्यामुळें ब्राह्मणाचा मुलगा मेला व त्या विप्रपुत्राच्या मृत्यूबद्दल वेदविद्येचा अभ्यास करणाऱ्या शंबूकाला रामाच्या हातून देहान्त शासन करण्यांत आलें. या प्रमाणें शूद्रवर्गाला सक्तीनें शिक्षणबंदी करण्यांत आली. चंद्रगुप्ताच्या कालांत तर नन्दातं क्षत्रियकुलं अशा सूत्रांच्या--पुरोहितवर्गाच्या फर्मानाच्या-जोरावर क्षत्रिय व वैश्यवर्गाचें आर्यत्वही नाकबूल करण्यांत येऊन त्यांना शूद्र वर्णांत ढकलण्यांत आलें, व विद्येची व त्यांची कायमची ताटातूट करण्यांत आली.

३—बहुजन समाजाला शिक्षण देण्याचे प्राचीन व मध्यकालीन प्रयत्न.

याप्रमाणें क्षत्रिय—वैश्य—शूद्रादि बहुजन—समाजाला धार्मिक व राजकीय सत्तेच्या जोरावर वेदविद्येपासून शक्य तितकें दूर ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न केला तरी, या वर्गांतील कांहीं जाणत्या लोकांनीं या शिक्षणविरोधी धार्मिक जुलुमाविरुद्ध अनेक वेळ जोराची चळवळ केली. मुख्यतः यज्ञसंस्थेमुळें ते विद्येला पारखे झाले होते. कारण 'यज्ञयागांत भाग घेण्याचा ज्यांना अधिकार त्यांनींच वेदविद्या संपादन करावी व यज्ञयागांत भाग घेणाऱ्या पुरोहितवर्गाखेरीज इतरांना अधिकार नाहीं,' असें पुढें ठरविण्यांत आल्यामुळें पर्यायानें पुरोहितवर्गाखेरीज इतरांनीं वेदविद्येचा अभ्यास करूं नये, अशी अनुज्ञा जन्माला आली. त्यामुळें बहुजनसमाजाच्या हक्कांविषयीं झगडणाऱ्या जाणत्या पुढाऱ्यांनीं प्रथम यज्ञसंस्थेवरच हल्ला चढवून ऋग्वेद व यजुर्वेद यांतील ऋचांचा निराळा अर्थ करून 'वेदांत यज्ञाला जागा नाहीं' हें त्यांनीं सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. अशा तऱ्हेचें मत प्रतिपादन करणाऱ्यांतच आरण्यक

§ वैद्य पा. २७०

तत्त्वज्ञानाचे अनुयायी असलेल्या श्रमणांचा मुख्य वर्ग होता. या वर्गाच्या चळवळीमुळें आपलें आसन डळमळीत होईल, या भीतीनें पुरोहितवर्गानें या वर्गाचा अतिशय छळ केला. हे श्रमण तपसाधन करून अतिशय विरागी वृत्तीनें रहात. त्यांनीं मूर्तीपूजेवर व यज्ञसंस्थेवर जोरानें आघात केला. याच वर्गाचें नेतृत्व पुढें महात्मा गौतमबुद्धाकडे जाऊन श्रमणांचे बुद्धभिक्षु बनले.

बुद्धधर्माचा उगम ब्राह्मणधर्माला विरोध करण्यासाठीं झाला, हें मागें सांगितलें आहेच. बहुजनसमाजाला शहाणें केल्यावांचून त्यांच्या मनावरील ब्राह्मणधर्माची पापपुण्याच्या खोट्या भीतीमुळें जबरदस्त बसलेली पकड ढिली होणार नाहीं, हें बुद्धधर्मीयांनीं प्रथम ओळखून बहुजनसमाजांत शिक्षणाचा प्रसार करण्याचा जोरानें प्रयत्न केला. बुद्धभिक्षूंच्या हजारों मठांतून आजपर्यंत विद्येचा गंध नसलेल्या वर्गांना व जातींना शिक्षणामृत पाजण्यासाठीं ज्ञानसत्रें सुरू करण्यांत आलीं. पंडित-पुरोहितवर्गानें दुर्बोध व कठीण केलेल्या आर्यांच्या संस्कृत भाषेचा त्यांनीं त्याग करून, सामान्य लोकांना परिचित असलेल्या प्राकृत भाषांच्या द्वारें अनेक तऱ्हेच्या वाङ्मयाची बहुमोल निर्मिति करून त्यांनीं, 'ज्ञानप्राप्ति बहुजनसमाजाच्या मुलभतेनें आटोक्यांत येईल,' अशी अनुकूल परिस्थिति निर्माण केली. याप्रमाणें बुद्धधर्म प्रस्थापित झाल्यानंतर, ज्या वेळीं राजे बुद्धभिक्षूंना प्रसन्न करून त्यांच्या आशीर्वादाची याचना करू लागले त्या वेळीं, प्राकृत भाषेची संस्कृत भाषेवर व अनार्यांची आर्यांचेवर वरचढ झाली;† व सामान्य जनांसाठीं तयार केलेलें वाङ्मय ललितविस्तारा-सारख्या सर्वमान्य ग्रंथांतून संग्रहित करण्यांत येऊं लागलें. बहुजनसमाजाला सुशिक्षित करण्यासाठीं बुद्धधर्मीय राजांनीं नलंद-तक्षशिलासारख्या ठिकाणीं उच्च विद्यादानाचीं विद्यागृहें सुरू केलीं. बुद्धधर्माला राजाश्रय व लोकाश्रय मिळून त्याचा जिकडे तिकडे जोरानें बोलबाला झाला व कांहीं काळ ब्राह्मण-

परंतु बहुजनसमाजाची धार्मिक दास्यांतून मुक्तता करून त्यांच्या मनाचा शिक्षणाच्या द्वारें विकास करणारा हा धर्म हलके हलके कमजोर होऊं लागला, व लवकरच ब्राह्मणधर्मानें पुन्हां डोकें वर करून त्यानें, पूर्वीचे धार्मिक निर्बंध कांहीं कमी जास्त फेरबदलानें पुन्हां अमलांत आणण्यास सुरवात केली.

† कुंटे १. पा. ४४२.

जातिभेदाचें पुन्हां बंड माजलें व बहुजनसमाज पुन्हां अज्ञानगर्तेंत लोटला गेला. इतरांना अप्राप्य अशी संस्कृत विद्या पुन्हां अधिक तेजानें चमकूं लागली. बुद्धधर्मानें टवटवीत केलेली बहुजनसमाजांतील, ज्ञानलालसेची लता पुन्हां वठून गेली व 'शिक्षण घेणें हें ब्राह्मणांचें काम आहे, आपण आपल्या जातीला धर्मानें आंखून दिलेला मार्गच चोखाळणें श्रेयस्कर आहे,' ही पूर्वीची घातुक वृत्ति फोफावून लोक मानसिक गुलामगिरींतच आपला खडतर जीवनक्रम चालवूं लागले.

ही दुःखदायक स्थिति पाहून बहुजनसमाजाच्या कैवाऱ्यांनीं ब्राह्मणधर्मा-विरुद्ध पुन्हां लहानमोठीं बंडें करून सामान्य लोकांना प्राकृत भाषेंतून शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. गुरु नानकानें, चैतन्यस्वामीनें, बसवाण्णानें व जैनांनीं प्राकृत भाषांतून पुन्हां वाङ्मय तयार करून तें बहुजनसमाजाच्या हातीं देण्याचा प्रयत्न केला. बुद्धधर्माच्या जनकाप्रमाणे या धर्मप्रसारकांनींसुद्धां बहुजन-समाजाला ज्ञान झाल्यावांचून, ते साक्षर–सुशिक्षित झाल्यावांचून, पुरोहित-वर्गाच्या मगरमिठींतून सुटणार नाहींत, हें ओळखून जनतेला साक्षर कर-ण्याचा प्रयत्न केला. मनुष्याला शिक्षण मिळाल्यावांचून तो विचार करूं शकत नाहीं व तो विचार करूं लागल्याशिवाय कृत्रिम उपायानें त्याच्यावर लादलेलें वर्चस्व तो दूर झुगारूं शकत नाहीं. युरोपांत देखील एके काळीं बहुजन-समाजाच्या अडाणीपणामुळें धर्मभोळेपणावर जगणारी पोपशाही अगर भिक्षुक-शाही सर्वसत्ताधीश झाली. परंतु लॅटीनमधील बायबल इंग्रजींत करून प्रॉटेस्टंट धर्मसुधारकांनीं लोकांत शिक्षणजागृती करतांच पोपशाहीच्या धार्मिक सुलतान-शाहीला जोराचा पायबंद बसला. तीच घटना हिंदुस्थानांत होऊन अनेक धर्मसुधारकांनीं नवीन धर्मांची स्थापना करून व प्राकृत भाषांतून लोकांना शिक्षण देऊन ब्राह्मणधर्माला विरोधाची खीळ घातली.

महाराष्ट्रांत भागवत धर्माचा उदय:––महाराष्ट्रांतही अशाच तऱ्हेची पुरोहितधर्मविरोधाची चळवळ जोरानें सुरू झाली. धर्माचीं सर्व सूत्रें एका विशिष्ट वर्गाच्या मूठभर लोकांच्या हातांत होतीं व त्यांनीं आपले ग्रंथ सामान्य जनांना अवगत नसलेल्या संस्कृत भाषेमध्यें करून ठेवलेले असल्या-मुळें सामान्य लोकांचीही धार्मिक बाबतींत मोठी उपासमार होत असे. अखेर महाराष्ट्रांतही विरोधाची लाट उसळून संस्कृत ग्रंथांतील ज्ञानभांडार मराठी भाषेंत उतरविण्यास सुरवात झाली. बुद्धधर्माचा प्रसार एका काळीं महाराष्ट्रांत

झालेला होता. तो धर्म अस्तंगत झाला तरी त्याच्या शिकवणुकीचीं कांहीं बीजें तशींच महाराष्ट्रीय भूमींत शिल्लक राहिलीं होतीं. त्यांना अनुकूल काल प्राप्त होतांच, भागवत धर्माच्या रूपानें नवीन अंकूर फुटले व त्या नाजूक अंकुराची हलक्या हातानें निगा राखून व त्यांना भगवद्भक्तिपूर्ण वाङ्मयाचें पाणी घालून त्यांचे वाढीस संतमंडळींनीं बहुमोल मदत केली.

मुख्यतः "ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ व तुकाराम हे व त्यांचे अनेक अनुयायी यांनीं महाराष्ट्रांत भगवद्भक्तीचें संवर्धन करून समाजांतील सर्व वर्गांची धर्मतृष्णा भागविली. संतांच्या या भक्तिमार्गानें सनातन धर्माची बरीच पिछेहाट झाली आणि तीनशें वर्षांच्या मुसलमान अमदानींत सनातन धर्माला पुष्कळच जाच सोसावा लागला. भक्तिमार्गाच्या पुरस्कर्त्यांनाही मुसलमानांचा जाच झाला, नाहीं असें नाहीं. परंतु बहुजनसमूह त्या मार्गाचा असल्यामुळें मुसलमानांचे त्यांजपुढें कांहीं चाललें नाहीं. उलटपक्षीं, दामाजी वगैरे अनेक भक्तमंडळींनीं आपल्या भक्तीचा प्रभाव मुसलमानांस दाखवून त्यांना आपले भजनीं लावले, आणि इतिहास, पुराणें आणि दुसरे धर्मग्रंथ मराठी भाषेंत आणून संस्कृतांतील ज्ञानभांडार सर्व लोकांस सुलभ करून दिलें."§

संत व संस्कृत पंडित यांचा विरोधः—"संतमंडळींतील कित्येक विद्वान् पुरुष संस्कृतांतील ज्ञानभांडार सर्व लोकांच्या उपयोगासाठीं मराठी भाषेंत आणीत असतांना इकडे संस्कृतज्ञ कर्मठ उपाध्यायवर्ग जपजाप्य, व्रतें, अनुष्ठानें, प्रायश्चित्तें, दानें इत्यादि प्रकार वाढविण्याचा जबरदस्त उद्योग करीत होता. ह्या वर्गाचा पहिला पुरस्कर्ता हेमाद्रि होय. हेमाद्रीनें हे सर्व धार्मिक प्रकार पुराणांतून व लोकाचारांतून एकत्र जमवून चतुर्वर्ग-चिंतामणि हा ग्रंथ तयार केला. त्याप्रमाणें अनेक निबंधकार व धर्मशास्त्रकार झाले. त्यांनीं नवीन संस्कृत ग्रंथ लिहून पूर्वीचे निर्जीव होत चाललेले यज्ञयागादि धर्माचरणाचे प्रवाह पुन्हा ताजे केले." तेराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत संत व कवि वगैरे मराठी ग्रंथकार सुमारें १००० झाले असावेत आणि त्याच कालांत संस्कृत ग्रंथकारहि तितकेच झाले, असा अंदाज भा. इ. संशोधकांनीं केला आहे. ह्यावरून असें निष्पन्न होतें कीं, एका बाजूनें संत मंडळी कर्मठपणा नाहींसा करण्याचा प्रयत्न करीत होती, तर दुसऱ्या बाजूनें उपा-

§ म. रि. पा. ६६

ध्याय वर्गाचे पंडित, प्रत्येक धार्मिकव्रत किंवा कर्म व त्याची फलप्राप्ति मोठ्या गौरवानें प्रतिपादित होते. दोन पक्षांचे हे दोन उद्योगप्रवाह आपल्या धर्मांत एकसारखे अनादिकालापासून आतांपर्यंत अव्याहत चालू आहेत. या दोन प्रवाहांची एकवाक्यता कधींच झाली नाहीं. पैठणास विद्वत्ता व पंढरपुरास साधुत्व गाजत होतें. पैठण, नेवासें हा भाग कर्मठ पंडितांचा तट, तर आळंदी, पंढरपूर संतांचें आदिस्थान. एकानें संस्कृत ग्रंथ देशी भाषेंत आणावे, तर दुसऱ्यानें आपलीं धर्मकृत्यें संस्कृत भाषेंत गोवून तीं चिरंतन करण्याचा प्रयत्न करावा. 'संस्कृत भाषा जगास कळेना, म्हणून नारायणास दया आली' असे कळकळीचे उद्गार नामदेवानें काढिले, तर हेमाद्रि स्वभाषेंतले आचार चतुर्वर्ग-चिंतामणीच्या किल्ल्यांत कोंडून ठेवितो. गौतमबुद्धानें व ज्ञानदेवानें संस्कृतांतलें ज्ञान मुद्दाम पाली व मराठी भाषेंत आणिलें, तर हेमाद्रि, नारायणभट्ट यांनीं देशी भाषेंत असलेलें ज्ञान मुद्दाम संस्कृत भाषेंत अडकवून ठेविलें. या दोघांच्या उद्योगाची मर्यादा कधींच ठरलेली नव्हती, म्हणून समजून वा न समजून, नीति व आचार, भगवद्भक्ति व धर्मकृत्यें ह्यांची आपल्या राष्ट्रांत ताटातूट झाली अनेक साधुसंतांचा छळ झाला. त्यांत धर्म व व्यवहार यांचा हा विरोध स्पष्ट दिसून येतो. हा छळ कर्मठांनीं केला आहे. विचारवंतास निष्कारण छळ खपत नाहीं. अशा छळाबद्दल त्यांच्या मनांत तिरस्कार उत्पन्न होतो. हेंच सुधारणेचें बीज आहे. केवळ संन्याशाची प्रजा एवढ्याचमुळें ज्ञानेश्वराच्या बुद्धिमान कुटुंबाचा समाजाकडून छळ झाला. त्याबरोबर आपल्या धर्मस्थितीबद्दल त्यांच्या मनांत लख्ख प्रकाश पडला. त्यांस कर्मठपणाचा वीट आला. ईश्वर-भक्ति त्यांच्या मनांत बाणली. ढोंगी समाजाची त्यांस कींव उत्पन्न झाली. समाजाला सन्मार्ग दाखविण्याची जबरदस्त प्रेरणा त्यांच्या ठिकाणीं उद्भवली. केवळ आपल्या स्वतांचा उद्धार होऊन भागणार नाहीं, अखिल जनतेचा उद्धार हेंच आपलें कर्तव्य, हेंच आपलें जीवितसाफल्य, अशा स्फूर्तीनें अज्ञजनांस उद्धरण्यासाठीं त्यांना समजेल अशा प्रचलित भाषेंत ज्ञानदेवानें आपलें व्याख्यान प्रगट केलें. ह्याच उच्च भावनेच्या जोरावर नामदेव–तुकारामांनीं परमार्थ साधिला. त्याच भावनेनें महार, चांभार वगैरे सर्व जातींचे संत परमेश्वराचे भक्त होऊन सर्व जातींत वंद्य झाले. उपदेशाप्रमाणें चालणें हे त्यांच्या जीविताचें रहस्य होतें. धर्माचरण व व्यवहार हे त्यांना सर्वथैव अभिन्न होते. " युरोपांतहि ल्यूथर, लॅटिमर, रिड्ले,

ब्रूनी यांनीं केवळ सत्याकरितां अतोनात छळ सहन केला. विचारास खरें वाटलें तेंच त्यांनीं प्रतिपादलें. समाजाची पर्वा केली नाहीं. कॉन्शन्सकरितां त्यांनीं आपले प्राणहि खर्चिले."†

" नवीन धर्म निघाल्यावरोबर जुन्या धर्माच्या अभिमान्यांस मोठी धास्ती पडून ते जोरानें पुराणधर्माचा कैवार घेऊं लागत. तसाच प्रकार भाषेचाहि झाला आहे. प्राकृतांत किंवा मराठींत ग्रंथरचना होऊं लागली आहे, असें दिसतांच पुराणमतवादी पंडितांस धास्ती पडून ते पुन्हां संस्कृत ग्रंथ लिहून जुने विचार कायम राखीत. सर्व प्रकारचें ज्ञान सर्व वर्गांस सारखें प्राप्त व्हावें, सर्व लहानथोर स्त्रीपुरुषांनीं संतपदास चढावें, असा संतांचा हव्यास होता; तर त्याच्या उलट समाजांतील पूर्वीपासून चालत आलेले उच्च नीच भेद व आचार-कायम रहावे, असा उद्योग पंडितवर्गाचा होता."* "पंडितवर्गाची संस्कृत भाषा व जनसमूहाची देशी भाषा ह्यांचा झगडा गौतम बुद्धाच्या कालापासून चालू आहे. एका वर्गाचा प्रयत्न पुराणपरंपरा कायम ठेवण्याकडे व जातिबंधनें सुटूं न देतां, धर्मकृत्यांचा अधिकार आपल्या हातांत ठेवण्याकडे होता, तर दुसऱ्या वर्गाचा प्रयत्न सर्व जनसमूहास सज्ञान करण्याचा, जातिनिर्बंध नाहींसे करून सर्वांस एका नियमाखालीं आणण्याचा होता. दडपून टाकलेल्या हीनवर्गाची उन्नती करण्याचा हा प्रयत्न विसाव्या शतकांतील नसून अनादि आहे."† या प्रयत्नांत ब्राह्मण-ब्राह्मणेतर अशा दोन्ही समाजाचे नेते भाग घेत असत हें नमूद करणें जरूर आहे. बहुजनसमाजाच्या मनाला बंदिवान बनविणाऱ्या व कर्तृत्वाच्यां हालचालीस प्रतिबंधक ठरलेल्या पुरोहितप्रणित व्रतवैकल्यप्रधान पुराणधर्माच्या बेडया तोडण्याचा अनादिकालापासून ते एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत ज्या अनेक लोकांनीं प्रयत्न केला, त्यांत महात्मा गौतम, गुरु नानक, नामदेव, तुकाराम, राजा राममोहनराय, महात्मा फुले, राजर्षि छत्रपति शाहू-महाराजांसारख्या अनेक ब्राह्मणेतरांप्रमाणें, लिंगायत धर्माचा संस्थापक बसव, ज्ञानदेव, एकनाथ, वामनपंडित, रामदास, रानडे, गोखले, व आगरकरांसारखे ब्राह्मणहि होते हें लक्षांत ठेवणें जरूर आहे.

पुरातन धर्मविरोधी चळवळीपासून फायदे:—पुराणधर्माच्या निमित्तानें पंडितवर्गानें बाकीच्या समाजाला आपल्या हातांतील निर्बुद्ध बाहुलीं

---

† म. रि. पा. ७१-७२ *म. रि. पा. ९५ † म. रि. पा. १००

बनविलीं; परंतु या त्यांच्या कृतीमुळें, त्यांचा स्वतांचा कांहीं काल स्वार्थ साधला तरी देशाच्या दृष्टीनें अपरिमित नुकसान झालें. पुरातन धर्मामुळें लोक मानसिक गुलामगिरींत वाढूं लागले तरी त्यांना गुलामगिरीची चीड येईनाशी झाली. लोकांत अज्ञान मनस्वीं वाढल्यामुळें त्यांच्यांत देशहिताची व देशाविषयीं आपलेपणा राखून देशाचें स्वातंत्र्य राखण्यासाठीं झगडण्याची वृत्ति मुळींच निपजली नाहीं व त्यामुळें, हिंदुस्थानांतील संपत्तीमुळें या देशावर वरचेवर बाहेरच्या लढाऊ लोकांच्या टोळधाडी येऊं लागल्या व ते प्राणांचें व वित्ताचें हरण करूं लागले तरी, त्यांना कोणी जोराचा विरोध करूं शकला नाहीं. खावें, प्यावें, व्रतवैकल्यें करावीं यापलीकडे लोक मुळींच पहात नसत. देशावर राज्य कोणाचें आहे याचा विचार करण्याइतकें तरी त्यांना ज्ञान कोठें होतें ? मालक बदलला तरी बैलांच्या नित्य व्यवहारांत कोठें फरक पडतो ? यादवांच्या राज्यांत लोक सुखवस्तु व ऐदी बनले. हेमाद्रीचा चतुर्वर्ग-चिंतामणि हा ग्रंथ तपासून पाहिला असतां वर्षाच्या ३६५ दिवसांत एकंदर दोन हजार व्रतें व जपजाप्यविधि सांगितले आहेत. म्हणजे दर दिवसास दहा पांच कृत्यें ठरलेलीं होतीं. कोणत्या देवाचीं कोणतीं व्रतें करावीं, त्या व्रताला कोणतीं पक्वान्नें करावीं, किती ब्राह्मणांचें भोजन घालावें इत्यादि बाबतींचा निर्णय शास्त्रांतील उतारे देऊन हेमाद्रीनें मोठ्या गंभीरपणें केला आहे. समाजांत पक्वान्नांचा व ब्राह्मणभोजनांचा सपाटा चालू होता आणि मर्दुमकीचे व यातायातीचे लष्करी वगैरे उद्योग करण्यास त्यांना फुरसत नव्हती. असें " व्रतैकदृष्टि व सुखपरायण लोक ऐदी बनले असतां त्यांस साहसी, निग्रही व काटक मुसलमानांनीं तेव्हांच जिंकलें. " †

बुद्धधर्माच्या चळवळीमुळें खालच्या लोकांत अभूतपूर्व जागृति होऊन देशाची जिकडे तिकडे भरभराट झाली. परंतु बुद्धधर्माचे ऱ्हासाबरोबर पुरोहितवर्गाचें वर्चस्व व तज्जन्य बहुजन समाजांतील अज्ञान पुन्हां वाढूं लागलें व त्यामुळें या अचेतन जनतेवर मुसलमानांच्या स्वाऱ्यांस सुरवात झाली आणि नेटक विरोधाच्या अभावी मुसलमानी सत्ता सगळीकडे प्रस्थापित झाली. अडाणी शेतकरी सावकाराच्या तावडींतून व अडाणी शेतकऱ्यांनीं भरलेला देश परचक्राचे तावडींतून, स्वतांचा बचाव करण्यास असमर्थ असतो. ज्ञान ही एक मोठी प्रभावशाली शक्ति आहे. ज्ञानी मनुष्य स्वतांच्या व पर्यायानें देशाच्या स्वातंत्र्यासाठीं

---

† राजवाडे खंड ८ प्रस्तावना.

झगडण्यास तयार असतो. शिकलेला मनुष्य कमी शिकलेल्या मनुष्यावर तावडतोव मात करूं शकतो. याच नियमाप्रमाणें, शिकलेलें राष्ट्र अडाणी राष्ट्राला जिंकल्यावांचून रहात नाहीं. युरोपांतील राष्ट्रें रानटी स्थितींत होतीं तेव्हां मुसलमानांनींही त्यांच्यावर विजय मिळविले होते. परंतु ख्रिस्ती जनतेला ज्ञानप्राप्ति होतांच त्यांनीं मुसलमानांना मागें हटविण्यास कमी केलें नाहीं. मराठे अडाणी, अशिक्षित होते तेव्हां मुसलमानांनीं त्यांच्यावर आपलें वर्चस्वाचें खोगीर चढविलें; परंतु संतांच्या शिकवणीमुळें त्यांना ज्ञानप्राप्ति होऊन जागृती येतांच परधर्मीयांची पिछेहाट होऊन मराठी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोविली गेली. " या संतांच्या उद्योगाचा देशास फायदा झाला. राष्ट्रोन्नतीचें एक अंग त्यांनीं तयार केलें. त्यांच्या उद्योगानें जातिद्वेष कमी झाला. स्त्रीशूद्रांसहीं ब्राह्मणांच्या बरोबरीनें ज्ञान मिळविण्याची सवड झाली. राष्ट्र परोपकारशील, सहनशील, एकजुटीनें काम करण्यास तयार असें बनत चाललें. जपजाप्य, यज्ञयाग, योगाभ्यास इत्यादि कृत्यांकडे लोकांच्या कालाचा व शक्तीचा अपव्यय होत असे, तो बंद झाला. त्यांच्या अंगीं स्वाभिमानाचें वारें वास करूं लागलें. ते आपल्या कंबरा बांधून स्वत्व रक्षण करण्यास उद्युक्त झाले. ब्राह्मण शूद्राचे खांद्यास खांदा लावून उद्योग करूं लागले व अखेर स्वराज्याचा पाया घातला गेला. " *

इंग्रजांचें ज्ञान मराठ्यांचे ज्ञानापेक्षां अधिक; त्यांच्यांत विद्येचा प्रसार अधिक आणि त्यामुळेंच पुरातन धर्माच्या पकडींत सांपडलेल्या अशिक्षित अगर कमी शिक्षित मराठ्यांना, तमाशाच्या नाचरंगांत दंग होणाऱ्या पेशव्यांना, त्यांना सहज जिंकता आलें. अबिसीनिया इटलीला हां हां म्हणतां जिंकता आला तोहि ज्ञानाच्या जोरावरच !

या वरील विवेचनावरून शिक्षणाचा व देशाच्या स्वातंत्र्याचा किती जिव्हाळ्याचा संबंध आहे, हेंहि दिसून येईल. प्रकाशापुढें अंधार टिकत नाहीं त्याचप्रमाणें शिक्षणप्रसारापुढें परतंत्रतादि मागें हटल्यावांचून रहात नाहीं. ब्रिटिश सत्तेच्या हातांतून हिंदुस्थानाला जे कांहीं थोडे फार अधिकार मिळाले, तेहि स्वातंत्र्याची कल्पना आलेल्या सुशिक्षित लोकांच्या चळवळीमुळेंच ! या राष्ट्रीय चळवळीचा जोर लोकांतील शिक्षणाच्या प्रसारावरोवर अधिकाधिक वाढत आहे, हें सांगण्याची जरूरी आहे का ?

---

* म. रि. पा. १०३

बुद्धधर्मापूर्वीच्या काळीं कांहीं विशिष्ट वर्गालाच संस्कृत विद्येचें शिक्षण देण्यांत येत असे. बुद्धधर्मानें संस्कृतांतील ज्ञान पालीसारख्या प्राकृत भाषेंत आणून शिक्षणाचा प्रसार खालच्या वर्गांत करण्याचा बहुमोल प्रयत्न केला. त्यानंतर शीख, लिंगायत, महानुभाव, जैन वगैरे धर्मपंथांनीं प्राकृत भाषेच्या द्वारें खालच्या वर्गांतील लोकांना ज्ञान देण्याचें कार्य केलें. संस्कृत भाषेंतील ज्ञानावर मराठी साज चढवून तुळशीदास, मिराबाई व महाराष्ट्रांतील संत-कवींनीं बहुजन समाजास ज्ञानलालसा उत्पन्न करून त्यांना शिक्षणाची गोडी लाविली. पूर्वीं संस्कृत विद्येच्या अध्ययनासाठीं गुरुगृहीं पाठशाळा असत. प्राकृत भाषेच्या उत्कर्षाबरोबर त्या शिकविण्यासाठीं बुद्धभिक्षूंनीं व मराठी भाषेच्या उद्धारानंतर ती शिकविण्यासाठीं त्या त्या पंतोजींनीं गांवोंगांवीं शाळा काढून शिक्षण-प्रसाराला जोराची चालना दिली. त्याचा विचार पुढील प्रकरणांत केला आहे.

प्रकरण दुसरें

पूर्वकालीन शिक्षण-पद्धति

१ प्राचीन काल

प्राचीन कालीं 'वेदांचा अभ्यास करणें' किंवा स्थूलमानानें बोलावयाचें म्हणजे 'विद्या संपादन करणें' ही एक धार्मिक बाबच समजण्यांत येत असे. प्रथम वेदांचें अध्ययन ही एक विशिष्ट वर्गाची हक्काची बाब झाली नव्हती. परंतु पुढें पुढें इतर वर्गांचा हा हक्क हलके हलके हिरावून घेण्यांत येऊन ब्राह्मणवर्गाच्याच विशेष अधिकाराची ती गोष्ट झाली, हें आपण मागील प्रकरणांत पाहिलें आहेच. "गुरुगृहीं राहून ब्रह्मचर्याश्रमांत विद्या संपादन करण्याचें काम बहुधा पूर्वकाळीं ब्राह्मण विद्यार्थी करीत असें महाभारतांतील व उपनिषदांतील अनेक वर्णनांवरून दिसतें. क्षत्रियांचीं किंवा वैश्यांचीं मुलें विद्याभ्यास करण्यास गुरुगृहीं जात असत किंवा नाहीं याचा चांगला पुरावा महाभारतांत मिळत नाहीं." § या प्रकरणांत अध्ययनाचा हेतु व पद्धति, अध्ययनाचे निरनिराळे विषय वगैरे बाबींचें थोडे तपशीलवार वर्णन करावयाचें ठरविलें आहे.

शिक्षणाचे हेतु व ध्येय:—पूर्वीच्या धार्मिक समजुतीप्रमाणें प्रत्येक मनुष्य ऋणकरी या नात्यानें जन्माला येत असे. त्याच्यावर तीन तऱ्हेचीं ऋणें फेडण्याची जबाबदारी असे. पहिलें ऋण प्राचीन काळच्या धर्मसंस्थापक ऋषींचें, दुसरें देवांचें व तिसरें मातापित्यांचें. वेदांचें काळजीपूर्वक अध्ययन करून मनुष्य पहिले ऋणांतून मुक्त होत असे. दुसरें, गृहस्थाश्रमी या नात्यानें यज्ञयाग करून फेडावयाचें. तिसरें, श्राद्ध पक्ष करून व प्रजोत्पत्ति करून फेडावयाचें. या तीन ऋणांची जबाबदारी प्रत्येक मनुष्यावर टाकण्यांत, त्याचेवर स्वतांच्या समाजाचे बाबतींत ऐहिक व परमेश्वराचे बाबतींत पारमार्थिक जबाबदारी आहे, याची त्याला जाणीव करून देऊन ही सर्व जबाबदारी योग्य तऱ्हेनें पार पाडण्यासाठीं लागणारें सामर्थ्य अथवा लायकी त्याचे ठिकाणीं उत्पन्न करा-

§ वैद्य, पान २८९.

वयाची, हा हेतु असे. हाच हेतु साध्य होण्यासाठीं प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यांचे चार विभाग करून जन्मापासून मरेपर्यंत या चार विभागांत—आश्रमांत—त्याला निरनिराळीं कर्तव्यें पार पाडावीं लागत असत. त्यांपैकीं आपल्या विषयाच्या दृष्टीनें प्रथमाश्रम म्हणजे ब्रह्मचर्याश्रम अधिक महत्त्वाचा आहे.

या प्रथमाश्रमांत प्रत्येक मनुष्याला पुढील आश्रमाची जबाबदारी सहज व यशस्वी तऱ्हेनें पार पाडतां येईल, अशी विद्या संपादन करावी लागत असे.* त्याच्या मनाचा योग्य तऱ्हेनें विकास होईल अशीच विद्या त्याला देण्यांत येत असे. मनाला प्रगल्भता देणारी विद्या संपादन केल्यानंतर गृहस्थाश्रमाचा स्वीकार करून तो वंशवृद्धि करून व इतर ऐहिक जबाबदाऱ्या पत्करून, समाजाविषयीचें आपलें कर्तव्य करीत असे व पूर्वाश्रमीं शिकलेली विद्या प्रत्यक्ष आचरणांत आणून तिला व्यवहाराची मुरड देत असे. तिसऱ्या आश्रमांत तो अंतर्मुख होऊन आपला व परमेश्वर यांचा काय संबंध आहे, आपण कोठून व कां आलों अशा गंभीर तात्त्विक विचारांच्या चिंतनांत मग्न होऊन विश्वाचें कोडें सोडविण्याचा प्रयत्न करीत असे; व अखेर सर्व उपभोगांचा त्याग करून आपल्या आध्यात्मिक मोक्षासाठीं संन्यासाश्रम घेऊन परलोकगमनाची तयारी करी. याप्रमाणें ब्रह्मचर्याश्रमांत त्यानें संपादन केलेली विद्या त्याच्या भावी आयुष्याचा पाया असे; व या विद्येमुळें त्याच्या व्यक्तित्वाचा विकास व प्रगति होण्यास पूर्ण वाव मिळत असे.§ वस्तुतः समाज व विश्व या बाबतींत आत्मज्ञान करून देण्याचा हिंदुशिक्षणपद्धतीच्या जनकाचा हेतु होता.† मनोनिग्रह व आत्मविकास हे या पद्धतीचें ध्येय होतें.¶

विद्यार्थी:—जन्मापासून पांच वर्षांच्या आंत क्रीडाकाल समजण्यांत येत असे. पांच वर्षांनंतर किंवा निदान आठव्या वर्षापासून म्हणजे उपनयनविधीनंतर अध्ययनकालास सुरवात होई. आठवें, अकरावें व बारावें वर्ष हे अनुक्रमें ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्यांचे बाबतींत विद्यारंभाचे काल साधारणपणें समजण्यांत येत.‡ या नूतन छात्राला गुरुगृहीं त्याचे देखरेखीसाठीं पाठविण्यांत येत असे. त्या ठिकाणीं एका वेदाचा अभ्यास करावयाचा असल्यास १२ वर्षें, दोन

---

*मुजुमदार, पा. ६४. §मुजुमदार, पा. ५८. † मुजुमदार, पा. ५९.
¶ मुजुमदार, पा. ६४. ‡मनु० २–३६.

वेदांचा अभ्यास करावयाचा असल्यास २४ वर्षें, तीन वेदांच्या अभ्यासासाठीं ३६ वर्षें व चारी वेद अवगत करावयाचे असल्यास ४८ वर्षें रहावें लागे. गुरुगृहीं त्याच्या मनाचा विकास होई व पुढील आयुष्याची जबाबदारी शारीरिक व बौद्धिकदृष्ट्या योग्य तऱ्हेनें त्यास संभाळतां येईल अशा तऱ्हेचें शिक्षण देण्यांत येत असे. गुरुगृहीं विद्यार्थ्यानें कसें वागावें याबद्दल अनेक नियम करण्यांत आले होते. प्रत्येक छात्राला सूर्योदयापूर्वी उठून स्नानोत्तर एखाद्या पवित्र व शांत ठिकाणीं बसून, एकाग्र चित्तानें गायत्री मंत्राचा जप करावा लागे. नंतर त्याला पवित्र अग्नीसाठीं समिधा गोळा कराव्या लागत. नंतर माधुकरीसाठीं बाहेर जावें लागे. शिवाय त्यास गुरु सांगतील तीं इतरहि कामें करावीं लागत असत. "गुरुगृहीं काम करणें हें सर्वच विद्यार्थ्यांस जरूर होतें, आणि त्याप्रमाणें कृष्णादिकांनीं सुद्धां काम केल्याचें हरिवंशांत वर्णन आहे. अशा रीतीनें शारीरिक काम करणारा विद्यार्थी शरीरानें सुदृढ होई हा एक मोठा फायदाच होता. तथापि कांहीं गुरु शिष्यांस अतिशय त्रास देत असावेत. कारण आदिपर्व अध्याय ३ यांत धौम्य ऋषि वेद शिष्याला नांगरासुद्धां लावीत, असें वर्णन आहे."॥ त्यानें साधे कपडे वापरणें व मद्य, मांस, अत्तरें व इतर मादक पेयें वगैरे उत्तेजक पदार्थांवर बहिष्कार घालून साधा व मित आहार ठेवणें, 'ब्रह्मचर्य'-पालनाच्या दृष्टीनें आवश्यक असे. त्याला द्यूत खेळण्याची, किरकोळ कलह करण्याची, लोकांची निंदा करण्याची, खोटें बोलण्याची, व स्त्रियांशीं सलगी करण्याची सक्त मनाई असे. याप्रमाणें कडक व कठोर शिस्तीप्रमाणें वागून मनावर दाब ठेवून त्याला गुरुगृहीं काल कंठावा लागत असे. याप्रमाणें वागून विद्यार्जन पुरें झाल्यानंतर घरीं येऊन तो विवाहित होत असे व मग त्याच्या गृहस्थाश्रमास सुरवात होत असे. गुरुगृहाहून आपल्या घरीं जाण्याच्या विधीस समावर्तन हें नांव होतें.

गुरु:—अनेक विद्यार्थ्यांना आपले घरीं ठेऊन विद्यादानाचें पवित्र कार्य करणारे गुरु, साध्या व शुद्ध आचाराचे व उच्च विचारसरणीचे असत. गांवापासून दूर अशा नदीकाठीं राहून ते त्या पवित्र वातावरणांत अध्यापनाचें कार्य, कोणत्याही मोबदल्याची आशा न करतां करीत असत. प्रत्येक विद्यार्थी विद्या पुरी करून घरीं जातांना गुरुदक्षिणा म्हणून आपल्या मगदुराप्रमाणें जे

॥ वैद्य पान ३०१

देईल तें संतोषित मनानें घेऊन त्याला मंगल आशीर्वादपूर्वक निरोप देत असत. राजापासून रंकापर्यंत सर्व लोक त्यांना मोठा मान देऊन आदरानें वागवीत. हे गुरु बहुतेक ब्राह्मणवर्गाचे असत. अध्यापन व अध्ययन हीं ब्राह्मणांच्या आद्य कर्तव्यांपैकीं व अधिकारांपैकीं होतीं. "'साधारणपणें प्रत्येक ब्राह्मणाचें घर ही शिकण्याची शाळा असे.'§ गुरुगृहीं जाऊन शिकण्याचा साधारण नियम असे; परंतु क्वचित् गुरुहि विद्यार्थ्यांच्या घरीं जाऊन रहात असत. 'जेथें कौरव-पांडवांसारखे अनेक विद्यार्थी एकाच ठिकाणीं असत, तेथें सर्वांस गुरुगृहीं न पाठवतां, स्वतंत्र एखादा शिकविणारा ठेवण्याचा संप्रदाय असावा. या कारणानें द्रोणाची योजना गुरुस्थानीं हस्तिनापुरांत केल्याचें वर्णन आहे.'† हा प्रकार अतिशय श्रीमंत व राजपुत्र अशा लोकांसाठींच होता.

"गुरूवांचून विद्या शिकण्याचा पूर्वकाळीं सांप्रदाय नसावा. निदान वेद-विद्या तरी गुरूवांचून शिकूं नये असा लोकांचा समज होता. वनपर्वांत (अ. १३८) यवक्रितानें गुरूवांचून वेदांचें अध्ययन केलें म्हणून त्यास अतिशय दुःख भोगावें लागलें, असें वर्णन आहे. यावरून वेदांचीं त्यावेळीं पुस्तकेंही असावीं असें अनुमान होतें. कारण गुरूवांचून वेद शिकणें तो पुस्तकावरूनच शिकणें शक्य आहे. सर्वच विद्या गुरूपासून शिकली असतां फलद्रूप होते, असा समज पूर्वकाळीं होता; आणि वेदविद्या तर गुरूपासूनच शिकली पाहिजे असा नियम होता. कारण वेदांचा नीट शुद्ध उच्चार होणें हें पुस्तकावरून संभवनीय नाहीं; कांहींतरी गुरुमुख पाहिजे हें जरूर आहे."* "प्राचीन किंवा अर्वाचीन काळीं पाश्चात्य आर्य देशांतही गुरुगृहीं जाऊन राहून तेथेंच विद्यार्जन करण्याची पद्धति दिसते आणि तिचींच रूपांतरें होऊन तेथील हल्लींचीं बोर्डिंग स्कुलें उत्पन्न झालीं आहेत. विद्यार्जन करीत असतां शारीरिक श्रम करावे लागत, गुरुगृहीं नियमानें रहावें लागे आणि सर्व प्रकारचें कडकडीत व्रतपालन करणें जरूर असल्यानें व अन्नपान वगैरे सात्त्विक व बेताचें असल्यानें बुद्धि तीव्र व शरिरें निकोप होत, असें मानण्यास हरकत नाहीं. एकाच गुरूपाशीं अनेक विद्यार्थी राहूं शकणें प्राचीन काळीं शक्य नव्हतें. त्यामुळें शेंकडों मुलें बोर्डिंगांत राहिल्यानें जे दोष उत्पन्न होतात ते पूर्वीं होत नसत, असें म्हटलें पाहिजे. एका गुरूच्या गृहीं बहुधा चार-पांच विद्यार्थी असत. यांपेक्षां जास्त विद्यार्थी नसावेत असा अंदाज होतो. कारण, सामान्यतः

§ वैद्य पा. २९९ † वैद्य पा. ३०५ * वैद्य पा. ३०३

गुरूच्या गृहीं राहण्याची जास्त सोय नसावी. शिवाय गुरुपत्नीलाही अनेक विद्यार्थ्यांच्या भोजनाची उठाठेव होणें शक्य नाहीं. प्रत्येक विद्वान् ब्राह्मणास अध्यापनाचा अधिकार असल्यानें अशा शाळा अनेक असाव्यात आणि त्यामुळेंच सर्वांच्या शिक्षणाची सोय शक्य होती असें वाटतें."§

याप्रमाणें कांहीं थोडे विद्यार्थीच कमींत कमी एक तपाचा काल गुरुगृहीं त्याच्या पवित्र व शुद्ध आचरणपूर्ण अशा सान्निध्यांत घालवीत असल्यामुळें गुरूच्या उदात्त राहणी-चागणीचा त्यांच्या मनावर साहजिकच चांगला व टिकाऊ परिणाम होत असे. वसतिगृहयुक्त विद्यालयाचा (Residential Schools) पुरस्कार ज्या तत्त्वासाठीं आधुनिक शिक्षण-तज्ज्ञ करीत आहेत, तें तत्त्व प्राचीन आर्यांनीं प्रत्यक्ष सत्यसृष्टींत उतरविलें होतें व त्याच पायावर त्या काळचीं शिक्षणमंदिरें उभारलीं होतीं, हें लक्षांत ठेवणें जरूर आहे.*

सक्तीचें व मोफत शिक्षण:—ज्या ज्या वर्गांना विद्यार्जन करण्याची धर्मशास्त्राप्रमाणें मुभा होती त्यांच्यापैकीं प्रत्येकानें शिकलेंच पाहिजे, असाही नियम वर्णव्यवथेंत होता. "हल्लीं आपण सक्तीच्या शिक्षणाचा प्रश्न सोडवीत आहोंत. पण प्राचीन काळीं हा प्रश्न वर्णव्यवस्थेनेंच सोडविला होता. प्रत्येक ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यानें शिकलेंच पाहिजे असा प्राचीन नियम होता. गुरूच्या घरीं जाऊन प्रत्येक त्रैवर्णिकाच्या मुलानें शिकावें अशी सक्ती असून त्यासाठीं उपनयन हा संस्कार धर्मांत घातलेला त्या वेळीं अमलांत होता. त्याप्रमाणें प्रत्येक मुलास गुरुगृहीं शिकण्यास जाऊन कांहीं काळपर्यंत रहावें लागत असे."† प्रत्येक मुलास गुरुगृहीं राहून शिक्षण घेण्याची प्राचीन काळीं सक्ती होती. शिक्षण न घेणाऱ्या मुलांना शिक्षाहि धर्मानियमानेंच सांगितली असे, हें खालील श्लोकावरून दिसून येईल.

योऽनंधीत्य द्विजो वेदानन्यत्र कुरुते श्रमम् ।
सजीवन्नेव शूद्रत्वमाशु गच्छति सान्वयः ॥ मनु० २–६८

विशेषतः ब्राह्मणांना वेदाध्ययन करण्याची कडक सक्ती असे. "वेदाध्ययन न करणारे व **अग्न्याधान** न करणारे ब्राह्मण शूद्रतुल्य असल्यामुळें, धर्म-

---

§ वैद्य पा. ३०२–३०३ * मुजुमदार पा. ८१–८२ † वैद्य पा. २९९

निष्ठ राजानें त्यांजकडून कर घ्यावा व वेठीचीं कामें करवावीं. यावरून स्वकर्मनिष्ठ ब्राह्मणांना कर माफ होते व वेठही माफ होती असें दिसतें."§

अगदीं प्राचीन काळीं ब्राह्मणांप्रमाणें क्षत्रिय व वैश्य यांच्यावर जरी या सक्तीची अम्मलबजावणी होती तरी पुढें पुढें त्यांचे बाबतींतील सक्तीचीं बंधनें ढिलीं पडलीं व हलके हलके ब्राह्मणांचें वर्णवर्चस्व सुरू होऊन त्याविरुद्ध बंड करणाऱ्या क्षत्रियवैश्यादि वर्गांत व ब्राह्मणांत झगडा सुरू होऊन, ब्राह्मण वर्गानें या दोन वर्गांचें द्विजत्वच नाकबूल करण्यास सुरवात केली व त्यामुळें 'नंदान्तं क्षत्रियकुलम्' व 'कलाबाद्यन्तयोः स्थितिः' अशा तऱ्हेचीं धर्मवचनें जन्माला आलीं. अध्यापकांत व अभ्यासकांतच वाद उत्पन्न झाल्यानंतर अभ्यासकांच्या शिक्षणाचे बारा वाजले यांत काय आश्चर्य आहे !

शिक्षणाची जशी सक्ती होती तसें तें मोफतही मिळत असे. गुरुगृहीं राहणाऱ्या छात्रास गुरु मोफत शिक्षण देत. येवढेंच नव्हे तर त्यांच्या भोजनाचीहि सोय करीत. भोजनाची सोय न झाल्यास विद्यार्थ्यास भिक्षा मागावी लागे. शिक्षण मात्र फुकट मिळत असे. विद्यार्जन पुरें झाल्यावर गुरूस शक्तीप्रमाणें दक्षिणा कांहीं द्यावी लागे. नाहीं असें नाहीं. परंतु "ही दक्षिणा सामान्यतः दोन गाई अशीच मानलेली होती. तीहि अत्यंत कठीण होती असें नाहीं. कित्येक गुरुदक्षिणा न घेतांहि नुसतें पोंचली म्हणून शिष्यास घरीं जाण्यास परवानगी देत."* मोफत मिळणाऱ्या शिक्षणाचा व भोजनाचा मोबदला गुरुगृहीं पडेल तें काम करून द्यावा लागे. याप्रमाणें कांहीं आर्थिक मोबदला न घेतां विद्यादान करणाऱ्या गुरुंच्या योगक्षेमाची काळजी सरकार व समाज करीत असे. " शिक्षण देण्याचें कर्तव्य राजाचें आहे असेंही जरी त्या वेळीं मानीत होते, तरी ते स्वतंत्र सरकारी शाळा काढून नव्हे, तर ब्राह्मणांचा चरितार्थ चालवून. ब्राह्मणांचा चरितार्थ चालविणें हें समाजाचें कर्तव्य होतें आणि अशा कर्तव्य बजावण्याच्या दृष्टीनें दान घेण्याचा अधिकार ब्राह्मणांना ठेवला होता हें खरें आहे; तथापि जेथें अशानेंही ब्राह्मणांचा चरितार्थ चालत नसे तेथें राजानें चालविला पाहिजे असा नियम होता."† "मात्र ही गोष्ट अध्यापनाचें स्वकर्म करणाऱ्या ब्राह्मणांनाच लागू होती, इतरांना नव्हती. इतर ब्राह्मण ' ब्राह्मणक ' असून त्यांस राजानें शूद्रवत् वागवावें, असे महाभारतांत सांगितलें आहे. "‡

---

§वैद्य पा. २७२ *वैद्य पा. ३०२ †वैद्य पा. २९८-९९ ‡वैद्य पा. २९९

प्राथमिक शिक्षण– संस्कृत विद्येच्या स्वतंत्र अशा प्राथमिक शाळा नव्हत्याच. उपनयन संस्कार झाल्यानंतर त्रैवर्णिकाला गुरुगृहीं जावें लागत असे व तेथेंच त्याचा श्रीगणपासून उच्च शिक्षणापर्यंतचा सर्व शिक्षणक्रम पार पडत असे. त्या काळीं प्राथमिक, दुय्यम व उच्च असें आजच्यासारखें वर्गीकरण केलेलें नव्हतें व त्यामुळें प्राथमिक शिक्षणाची प्राचीन काळीं काय पद्धत होती, याबद्दल आपणांस विशेष माहिती मिळत नाहीं.

बुद्धपूर्व काळांतील प्राथमिक शिक्षणाबद्दलची विशेष अधिकारयुक्त माहिती मिळाली नाहीं तरी ललितविस्तारावरून बुद्धाचे काळीं (खिस्तीशकापूर्वी सहावें शतक) प्राथमिक शिक्षण होतें, असें दिसून येतें. कारण त्यांत बुद्ध हे लिहिणें व हिशेब ठेवणें वगैरे शिकवण्यासाठीं एका लिहिण्याचे शाळेंत (Writing School) गेल्याचा उल्लेख आहे.* यावरून लिहिणें, वाचणें व अंकगणित शिकविण्याच्या त्या वेळीं शाळा होत्या असें दिसतें. "प्राथमिक शिक्षणाच्या शाळा साधारणपणें मोकळ्या हवेंत झाडांखालीं भरत व वाईट हवेच्याहि वस्तींत छपराच्या घरांत भरत असत." बौद्ध धर्माच्या काळांत प्रत्येक बौद्ध-भिक्षू सामान्य जनांना लिहिणें, वाचणें व अंकगणित शिकविण्याची खटपट करीत व त्यांचे मठांतून त्यासाठीं विद्यार्थी जमून शाळा भरत.

शिकविण्याची पद्धत:––"प्राथमिक शाळा अशा पूर्वी विशेष नसल्या तरी लहान मुलांना शिकाविण्याची विशेष पद्धत अस्तित्वांत आलेली होती. धुळाक्षरें शिकविण्याची हल्लींची विशेष पद्धत त्या वेळींहि माहीत होती, हें नमूद करण्यासारखें आहे. कारण त्या वेळींही शिक्षक एखादें वाक्य घेऊन त्यावरून मग मुलांना मुळाक्षरें शिकवीत असे"* एखादे प्रश्नांतील निरनिराळे शब्द प्रथम गुरु उच्चारीत असे व त्याप्रमाणें विद्यार्थी म्हणत असें. जरूर तर शिक्षक त्यांचा अर्थहि सांगत असत. नंतर विद्यार्थ्यांना तो प्रश्न म्हणावा लागे व नंतर प्रत्येक अक्षराचा योग्य स्वरांत उच्चार करून पाट करण्यास सुरवात होत असें.

लहान मुलांना चटकदार व सहज समजतील अशा गोष्टी सांगून त्यांच्या मनावर नीतितत्त्वें बिंबविण्यांत येत असत व याच हेतूनें पंचतंत्र व हितोपदेश यांमधील गोष्टींची रचना करण्यांत आली होती.

---

* मुजुमदार पा. ६७

लहान मुलांच्या कलाप्रमाणें वेऊन खेळत खेळत त्यांना शिकाविण्यांत येत असे, हें विष्णुशर्म्याच्या पुढील गोष्टीवरून ध्यानीं येईल. पंचतंत्राच्या काळीं विष्णुशर्मा या पंडितास राजपुत्रांना शिकविण्यासाठीं ठेवण्यांत आलें होतें. राजपुत्रांच्या लहरीप्रमाणें, त्यांना न दुखवितां वागण्याशिवाय त्यांच्या गुरूला गत्यंतर नव्हतें. त्याचप्रमाणें आपल्या शिष्यांची विद्येंत प्रगतीहि राजाला दाखविणें जरूर होतें. या दोन्ही कांहींशा विरोधी गोष्टी साधण्यासाठीं या पंडितानें तोड काढली. राजपुत्रांना खबुतरांचा फार शोक होता. तेव्हां खबुतरें उडविणें, त्यांना चारा घालणें व त्यांच्या घरट्यांत त्यांची योग्य ती निगा करण्यापलीकडे दुसरें कांहीं करावयाचें नाहीं, असें त्यांनीं आपल्या थोर शिष्यांना सांगून टाकलें. राजपुत्रांना साहजिकच हें ऐकून फार आनंद झाला. खबुतरांची संख्या वाढविण्यांत येतांच राजपुत्रांना त्या प्रत्येकाला कांहीं तरी नांव ठेवून त्यांची वरचेवर गणति करावी लागे. नांवाच्या ऐवजीं प्रत्येक कबुतराला ओळखतां यावें म्हणून विष्णुशर्म्यानें प्रत्येक कबुतराच्या पंखावर तांबड्या रंगानें क, ख, ग अशीं वर्णाक्षरें लिहिलीं. त्यामुळें राजपुत्रांना अक्षरओळख होऊन निरनिराळ्या अक्षरांचे शब्द व शब्दांचीं वाक्यें त्यांना बनवितां येऊं लागलीं. पक्ष्यांची गणति करण्याच्या नादानें त्यांची अंकांशीं तोंडओळख होऊन अंकगणिताचा पाया घातला गेला. जवळच्या दोन किंवा तीन खुराडयांतील मिळून एकंदर खबुतरें किती झालीं व इतकीं खबुतरें बाहेर उड्डून गेलीं तेव्हां खुराडयांत किती राहिलीं, असे प्रश्न त्यांना विचारून बेरीज–वजाबाकी त्यांना शिकविण्यांत आली. निरनिराळ्या खुराडयांची रचना कशी करावी हें सांगण्याच्या निमित्तानें त्यांचा वास्तुशास्त्राशीं परिचय करून देण्यांत आला, व पंचतंत्रांतील लहान पण गमतीच्या गोष्टी सांगून नीतिशास्त्र व राज्यशास्त्राचीं तत्त्वेंहि त्यांच्या मनावर ठसविण्यांत आलीं. आजच्या आपल्या नमुनेदार शिक्षणपद्धतींत मुरलेल्या शिक्षकांसहि विष्णुशर्म्यापासून शिकण्यासारखें पुष्कळ आहे, असें म्हणणें बावरें होईल का ?

दुय्यम व उच्च शिक्षण:—आपल्या या विषयाचा विचार करतांना दुय्यम व उच्च शिक्षणाची काय स्थिति होती, याचा विचार करणें प्रस्तुत होणार नाहीं. सबब त्याचा अतिशय थोडक्यांत परामर्ष घेऊं. प्राचीन काळीं उच्च शिक्षणाचीहि चांगली तरतूद करण्यांत आली होती. गुरुकुलीं उच्च तऱ्हेचें

शिक्षण देण्यांत येत असे. त्याचप्रमाणें विदेह, काशी, कुरु व पांचाल अशा राजांच्या दरबारींहि उच्च शिक्षणाच्या शाळा भरविण्यांत येत असत.

या शिक्षणसंस्थांतून व्यावहारिक व धार्मिक असे दोन्ही तऱ्हेचे विषय शिकवीत असत. प्राथमिक अवस्थेंत मुलांना धर्मगुरु—ज्याला शिक्षागुरु म्हणत—तोच दोन्ही तऱ्हेच्या विषयांची तोंडओळख करून देई. परंतु पुढें पुढें धार्मिक व व्यावहारिक शिक्षणाचें विशेष प्रकार अस्तित्वांत आले. शिकविण्याच्या विषयांत वेद, इतिहास, पुराणें, व्याकरण, यज्ञनियम, आकडेशास्त्र, शकुनशास्त्र, तर्कशास्त्र वगैरे विविध शास्त्रांचा समावेश करण्यांत आला होता. वैदिक वाङ्मयाचा विशेष विस्तार झाला नव्हता, त्या काळीं 'वैदिक शाळाच' फक्त असत. परंतु वेदांच्या अंगोपांगांचा अधिक विस्तार जेव्हां होत गेला, तेव्हां शास्त्रीय शाळा (Special Schools of Sciences) अस्तित्वांत येऊन पुढें पुढें वैदिक शाळाच मागें पडूं लागल्या. शिक्षण देण्याच्या महत्त्वाच्या संस्था म्हणजे परिषदा अगर ब्राह्मणी विद्यालयें हीं असत. या संस्था युरोपांतील (Residential) विश्वविद्यालयांच्या तोडीच्या असत. या परिषदा प्रथम तीन ब्राह्मण चालवीत.§ परंतु पुढें ही संस्था वाढल्यामुळें वेदान्त, तत्त्वज्ञान व कायदा या विषयांत पारंगत असे निदान एकवीस ब्राह्मण तरी परिषदेंत असणें जरूर आहे, असें ठरविण्यांत आलें. या संस्था मानवी वस्तीपासून फार दूर अशा ठिकाणीं प्रस्थापित केलेल्या असत. या संस्थांना राजेमहाराजे व शिक्षणप्रेमी धार्मिक लोकांकडून मोठमोठ्या देणग्या मिळत व यांतून विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाप्रमाणें मोफत भोजनहि देण्यांत येत असे.* या प्राचीन काळांत, बुद्धकालांत व त्यानंतरहि निरनिराळ्या ठिकाणीं अनेक विश्वविद्यालयें स्थापन करण्यांत आलेलीं होतीं.

शिक्षणाचे प्रकार:—प्राचीन काळीं समाजांतील निरनिराळ्या वर्गांस आपल्या आनुवंशिक धंद्यांच्या बाबतींत निरनिराळ्या तऱ्हेचें शिक्षण देण्यांत येत असे व या दृष्टीनें पूर्वी धंदेशिक्षणाची सोय होती, असें मानण्यास हरकत नाहीं. प्रत्येक मुलगा आपल्या वडिलांचा धंदाच पुढें चालविणार असल्यामुळें, साहजिकच वडिलांच्या देखरेखीखालीं अनायासें प्रत्यक्ष पाहून त्याला प्रात्यक्षिक स्वरूपाचें ज्ञान प्राप्त होत असे; परंतु पुढील शिक्षणासाठीं विशेष गुरूंची सोय करावी लागे.

§ मुजुमदार, पा. ७१. * मुजुमदार, पान ७२.

धार्मिक शिक्षणः—पूर्वीचे काळीं बहुतेक शिक्षण धार्मिक स्वरूपाचें असे व त्याचा उपयोग विशेषतः ब्राह्मणवर्गास होत असे. या शिक्षण-क्रमांत वेद, उपनिषदें, धर्मशास्त्र, यज्ञकर्म वगैरे बाबींचा मुख्यतः समावेश करण्यांत येत असे.

लष्करी शिक्षणः—हें विशेषतः क्षत्रियांकरितां असे. क्षत्रिय आपल्या मुलांसाठीं चांगले गुरु ठेवून त्यांच्याकडून त्यांना लष्करी शिक्षण देत. कौरव-पांडवांना हें शिक्षण देण्यासाठीं प्रथम कृपाचार्यांची योजना केली होती, व पुढें द्रोणाचार्यांची नेमणूक करण्यांत आली होती. क्षत्रियांना घोड्यावर बसणें, गदायुद्धाचे प्रकार, धनुर्विद्या, अस्त्रविद्या, चक्रव्यूह वगैरे अनेक युद्धोपयोगी बाबी अतिशय कसोशीनें शिकविण्यांत येत असत.§ त्याच-प्रमाणें क्षत्रिय तरुण प्रसंगीं देहकष्ट सोसूनही विद्या पूर्णत्वें हस्तगत कर-ण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करीत, हें परशुरामाचें शिष्यत्व पत्करणाऱ्या कर्णाच्या उदाहरणावरून दिसून येतें. क्षत्रियांना धनुर्विद्या, राजनीति अथवा दण्डनीति शिकविणारे नोकर लोकही राज्यांत असावे असा अंदाज दिसतो. त्यांचा मुख्य उपयोग राजपुत्र व योद्धे यांस धनुर्विद्या शिकविण्याचा असे. सभापर्वांतील कच्चिदध्यायांत पुढील प्रश्न नारदानें विचारला आहे—

> कच्चित् कारणिका धर्मे सर्वे शास्त्रेषु कोविदाः ।
> कारयन्ति कुमारांश्च योधमुख्यांश्च सर्वशः ॥

यांतील कारणिक शब्द विशेष अर्थी आहे आणि तो सरकारी शिक्षक या नात्यानें येथें उपयोजिला आहे. कारयन्ति याचाही अर्थ शिक्षयन्ति असा टीकाकारानें केला आहे. अर्थात् योद्ध्याचें शिक्षण चांगलें होण्यासाठीं सर-कारी शिक्षक ठेविले जात असले पाहिजेत.'' *

व्यापारी शिक्षणः—वर उल्लेख केलेल्या कारणिक वैश्यांनाहि वार्ताशास्त्राचें किंवा शिल्पाचें ज्ञान देत असत. बुद्धवाङ्मयांत व्यापारी शिक्षणाविषयीं उपयुक्त चर्चा केलेली आढळून येते. हुंडणावळ (Money-changing) हिशोबशास्त्र (Science of accountancy) व पत्रव्यवहार कला वगैरे व्यापारी शिक्षणाच्या तीन महत्त्वाच्या अंगांबद्दल विनय नांवाच्या ग्रंथांत उल्लेख आहे. रूपम् या शब्दानें हुंडणावळीचें शास्त्र दर्शित करण्यात येतें.

---

§ वैद्य पा. ३०७. * वैद्य गा. ३०६.

पूर्वीच्या काळीं निरनिराळ्या राज्यांचीं स्वतंत्र व निरनिराळीं नाणीं असल्यामुळें हुंडणावळीसंबंधीं माहिती व्यापारांत पडणाऱ्या प्रत्येकाला आवश्यक असे. हिशोब शास्त्राचा निर्देश 'गणनम्' या शब्दानें करण्यांत येई. पत्रव्यवहाराच्या कलेचा उल्लेख 'लेखम्' या शब्दानें करण्यांत येई. प्रत्येक व्यापाऱ्याला हिशेब टेवण्याच्या पद्धतीचें व व्यापारी पत्रव्यवहाराच्या रीतीचें ज्ञान असणें जरूर असे; व हें शिक्षण त्यांना त्या वेळच्या व्यापारगृहां-(Trading houses) मधून देण्यांत येई. हल्लींच्या काळच्याप्रमाणें व्यापारी शिक्षणाच्या स्वतंत्र शाळा त्यावेळीं नव्हत्या.‡

शारीरिक शिक्षण:—योध्यांना युद्धकलेचा महत्त्वाचा भाग म्हणून शारीरिक शिक्षण देण्यांत येत असे. या वेळीं मल्लविद्येचा बराच उत्कर्ष झाला होता, व त्या विद्येचे धडेहि देण्यांत येत असत असें रामायण, महाभारत वगैरे ग्रंथांवरून दिसून येतें. रामायणकाळीं मारुती व महाभारतकालीं भीम हे प्रसिद्ध मल्लच होते, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ब्रह्मचर्याश्रमांत गुरुगृहीं राहून विद्यार्जन करणाऱ्या त्रैवर्णिक शिष्यांच्या शरीरप्रकृतीकडे विशेष लक्ष पुरविण्यांत येत असे. दररोज सूर्यास नमस्कार घालावे लागत असल्यामुळें व गुरुगृहीं शेती, लाकडें फोडणें वगैरेसारखीं कष्टाचीं कामें करावीं लागत असल्यामुळें, विद्यार्थ्यांची प्रकृति निकोप व सतेज राहात असे. दूधतुपासारखे सात्त्विक पण पौष्टिक पदार्थहि त्यावेळीं मुबलक मिळत असल्यामुळें विद्यार्थ्यांची प्रकृती चांगली राहिल्यास नवल नाहीं. चांगलें शरीर राखणें ही एक धर्माचीच बाब समजण्यांत येत असे, हें 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्' वगैरे वचनांवरून दिसून येतें. मृगयेच्या हौसेमुळेंहि शरिरावर इष्ट असा परिणाम होत असे यांत शंका नाहीं.

शिष्यवृत्त्या व परीक्षा:—पूर्वीच्या काळीं हल्लींच्याप्रमाणें एकंदर शिक्षणक्रमाची इयत्तावर विभागणी केलेली नव्हती व त्यामुळें प्रत्येक इयत्ता झाल्यानंतर आजच्याप्रमाणें परीक्षाहि नसत. परंतु विद्यार्थ्यांची तयारी किती आहे हें शिक्षकच पहात व त्यांचें समाधान झाल्यानंतर पुढील अभ्यासास सुरवात होई. एकंदर अभ्यासक्रम पुरा झाल्यानंतर, ब्राह्मणाला यज्ञयागाचें ऋत्विज्य करण्याची परवानगी मिळण्यापूर्वी विद्वान् पुरोहितांच्या परिषदेंत त्याची परीक्षा घेण्यांत येत असे व त्याची योग्य तयारी झाली

‡Fergusson College Magazine, July 1934, P.17–18

असल्यास त्यास मान्यतापत्र (Diploma) देण्यांत येई व जरूर तेवढें ज्ञान त्यांनीं पैदा केलें नाहीं, असें आढळून आल्यास त्याला नागवा बनण्याची शिक्षा देण्यांत येत असे. राजाकडून विद्वान् ब्राह्मणांना दक्षिणा देण्यांत येत असत. परंतु त्या देण्यापूर्वी प्रत्येक ब्राह्मणाचें शिक्षण कितपत झालें आहे, हें पहाण्यासाठीं निरनिराळ्या विषयांत परीक्षा घेण्यांत येई, व ज्याच्या त्याच्या विद्वत्तेप्रमाणें दक्षिणेचें प्रमाण ठरविलें जाई. हल्लीं जसें शिक्षण अजमावण्यासाठीं पदव्या देण्यांत येतात, त्याप्रमाणें पूर्वीहि एक वेदाचा अभ्यास करणारांस एकवेदी, दोन किंवा अधिक वेदांचा अभ्यास करणारांस द्विवेदी, त्रिवेदी, चतुर्वेदी यांप्रमाणें संबोधण्यांत येई. दशग्रंथी ही एक पदवीच होती असें म्हणण्यास हरकत नाहीं.

ब्राह्मणांस विद्यार्जन करण्यास उत्तेजन मिळावें म्हणून राजाकडून अगर धनिक-वर्गांतून जी दक्षिणा मिळत असे त्या दक्षिणेस शिष्यवृत्ति, म्हणावयास हरकत नाहीं. कांहीं शिक्षण झालें कीं राजाकडे जावें, राज–दरबारच्या विद्वान् मंडळीकडे परीक्षा देऊन मिळविलेल्या विद्येच्या मानानें दक्षिणा घ्यावी; * मग पुढील अभ्यासक्रम करावा, अशी त्या वेळची पद्धत होती. त्या पद्धतींत व हल्लींच्या गरीब विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्तींत अतिशय साम्य आहे. आजहि निरनिराळ्या इयत्तेंत कमीजास्त रकमेची शिष्यवृत्ति मिळते व ती घेणारा विद्यार्थी दर परीक्षेंत पास झाला तरच त्याची शिष्यवृत्ति पुढें चालू रहाते. "दक्षिणा अथवा स्कॉलरशिप घेऊन सर्व विद्यांच्या शिक्षणास राजा-कडून प्राचीनकाळीं प्रोत्साहन मिळत असे हें निर्विवाद होय."† पूर्वी पेशवाईंत व हल्लीं कित्येक संस्थानांत विद्वान् ब्राह्मणांस नुसती विद्वत्तेबद्दल दक्षिणा देण्याचा जो सांप्रदाय होता व आहे, तो याप्रमाणें प्राचीनकाळापासून होता असें दिसतें. विद्येस उत्तेजन देण्याची ही एक युक्ति प्राचीनकाळची आहे; ती त्या काळच्या परिस्थितींत योग्य होती.

ही दक्षिणा फक्त ब्राह्मणांनाच देण्यांत येत असे. "कारण दक्षिणा घेणें हें ब्राह्मणांचें कर्तव्य होतें व त्यासाठीं त्यानें विद्या शिकविण्याचें व शिकण्याचें काम पत्करलें होतें."§

फी:—हल्लीं जशी मासिक फी घेण्याची पद्धत आहे तशी पूर्वी नव्हती.

---

*कुंटे पा. ११९ † वैद्य पा. ३०८ § वैद्य पा. ३०८

शिक्षण मोफत देण्यांत येत असे; परंतु विद्यार्जन पुरें झाल्यानंतर गुरु-दक्षिणेच्या रूपानें गुरूला कांहींतरी मोबदला देण्याची पद्धत होती. ही दक्षिणा साधारणपणें दोन गाई अशीच मानली होती. ह्याचा उल्लेख मागेंआला आहे. दक्षिणा काय द्यावी हें विद्यार्थ्याच्या इच्छेवर व त्याच्या सांपत्तिक स्थितीवर अवलंबून असे. निग्रोध जातकांत राजगृह¶ येथील एका व्यापाऱ्याच्या दोन मुलांना, तक्षिला येथील विश्वविद्यालयांत विद्या शिकविणाऱ्या गुरूला २००० पण (चांदीचें नाणें) गुरुदक्षिणा म्हणून दिल्याचा उल्लेख आहे.

विद्यार्थी व शिक्षा:—विद्यार्थ्यांना वागविण्याची शिस्त फार सौम्य असे. मनुस्मृति भाग २ मधील नं. १५९ च्या श्लोकांत "गुरूनें विद्यार्थ्यास त्याचे हितासाठीं कोणत्याही प्रकारच्या शिक्षेनें पीडा न देतां गोड व सौम्य शब्दांचा उपयोग करून शिकवावें" असें सांगितलें आहे. परंतु विद्यार्थ्यानें कांहीं गंभीर गुन्हा किंवा आगळीक केली तर त्याला पाठीवर दोरीनें अगर छडीनें मारण्यांत येत असे. उत्तमांगावर कधींही मारीत नसत. दुसरीकडे मारणारास चोरीचें पाप लागे.†

राजे व शिक्षण:—प्रजेपैकीं त्रैवार्णिकांना "शिक्षण देण्याचें कर्तव्य राजाचें आहे असें जरी त्यावेळीं मानीत होते, तरी ते स्वतंत्र शाळा काढून नव्हे तर ब्राह्मणांचा चरितार्थ चालवून. कारण ब्राह्मणांनीं अध्ययन व अध्यापन करण्याची जबाबदारी पत्करली होती. सर्व विद्या शिकण्यास उत्तेजन देण्याचें काम राजाचें आहे, असा समज पूर्वकाळीं होता व हें उत्तेजन ब्राह्मणाची निरनिराळ्या विषयांत परीक्षा घेऊन त्याला दक्षिणा देऊन करण्यांत येत असे. अशा रीतीनें प्रजेच्या शिक्षणाचा योग्य बंदोबस्त राजाकडून होत असे."§

याप्रमाणें प्राचीन काळीं कोणत्या तऱ्हेची शिक्षणपद्धती अस्तित्वांत होती, ती प्रत्यक्ष अमलांत कशा तऱ्हेनें येत असे, शिक्षणाचे विषय व साधनें काय होतीं वगैरे माहिती वर दिली आहे. ही माहिती देतांना स्त्री-शिक्षणाचा मुळींच उल्लेख केला नाहीं. कारण स्त्रीशिक्षणासंबंधीं स्वतंत्र प्रकरण लिहिलें आहे.

मध्यकाल.

मध्यकालांत मुसलमानांचाही अंमल हिंदुस्थानावर असल्यामुळें, या कालां-

¶ Fergusson College Magazine, July 1934, p. 18.

† मुजुमदार पा. ७८ § वैद्य पा. ३०९.

तील शिक्षणाचा विचार करतांना, त्यांच्या पद्धतीचाहि आपणास विचार करणें जरूर आहे.

मुसलमानांचें शिक्षणः—मुसलमान हिंदुस्थानांत येण्यापूर्वी त्यांच्यांत शिक्षणाचा प्रसार झाला होता, असें म्हणावयास हरकत नाहीं. "जगाच्या संस्कृतींत अरबांनीं मोठीच भर घातली आहे. प्राचीन काळच्या प्राच्य सुधारणेंत जेवढें म्हणून चांगलें होतें तेवढें सर्व ग्रहण करून, आणि त्यांत स्वतांची पुष्कळ भर घालून, त्यांनीं तो भाग खिस्ती युरोपास दिला. आशिया-मायनर व स्पेन या दोन देशांत तर मुसलमानांनीं हरएक विषयांत जें प्रावीण्य संपादन केलें तसलें पृथ्वीवर त्यांपूर्वी कोणींच संपादिलें नव्हतें. पण अरबांनीं स्वतां निर्माण केलेला विषय म्हणजे मुसलमानी कायदा होय. अरब जेथें जेथें गेले, तेथें तेथें त्यांनीं व्यापारास नवीन स्वरूप व उत्तेजन दिलें. अरेबियन नाईट्स् ह्या पुस्तकांत अरबांच्या व्यापारी उद्योगाचें प्रतिबिंब पडलेलें आहे.

"वाङ्मयांत अरबांनीं फार चांगलें काम केलेलें आहे. कादंबरीचें रचनाचातुर्य त्यांनीं इराणी लोकांपासून घेतलें. अरेबियन नाईट्स्मध्यें अरबांच्या रहाणीचें व बगदादच्या दरबारचें उत्कृष्ट चित्र वठविलें असून, त्या पुस्तकानें एकंदर पृथ्वीवरील अमोल व अजरामर ग्रंथांत मोठीच भर घातली आहे. अरबांच्या कवित्वशक्तीचाहि चांगलाच विकास झाला होता.

"अरब विद्वानांनीं सृष्टिशास्त्रांतसुद्धां पुष्कळ उद्योग केले. दूरदूरचे प्रदेश जिंकण्याच्या व व्यापार वाढविण्याच्या नादांत त्यांना भूगोलशास्त्राचा अभ्यास करावा लागला. खगोल, भूमिति, अंकगणित, बीजगणित, वैद्यक, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र वगैरे अनेक विषयांत पुरातन आर्यांचे व ग्रीक लोकांचे शोध स्वतां शिकून त्यांनीं आपल्या बुद्धिसामर्थ्यानें त्या त्या विषयांची नवीन रचना केली; तिजवरच अर्वाचीन युरोपियन सुधारणेचा पाया रचलेला आहे. वैद्यक विषयास शास्त्राचें स्वरूप अरबांनीं आणिलें. गणितांतील दशांशपद्धति मूळ अरबांनीं शोधून काढिली, त्यामुळें पुढील शास्त्रज्ञांचें काम फार सुकर झालें.

"अशा प्रकारचे उद्योग करून मोठमोठ्या पाठशाळा व पुस्तकालयें अरबांनीं निर्माण केलीं. युरोपांतील खिस्ती राष्ट्रें निद्रावस्थेंत घोरत पडलीं असतां,

बगदाद, कैरो व कोर्डोश येथील विद्यालयें सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांस ज्ञानामृत पाजून ज्ञानवृद्धि करीत होतीं."*

याप्रमाणें विद्याव्यासंगी मुसलमानांनीं हिंदुस्थानांत प्रवेश केल्यानंतर विद्येला बरेंच उत्तेजन दिलें असल्यास नवल कसलें? हिंदुस्थानावर ज्या अनेक मुसलमान घराण्यांनीं राज्यें केलीं त्यांपैकीं अनेक पुरुष शिकलेले व प्रगल्भ विद्यामिरुचीचे होते, असें म्हणावयास हरकत नाहीं. हिंदुस्थानावर अकरा स्वाऱ्या करून, शेवटीं सोमनाथाची मूर्ति फोडून बुत्‌शिकन (मूर्ति फोडणारा) अशी किर्ती मिळविणारा महमद गजनवी हा विद्येचा मोठा भोक्ता होता. मोठमोठ्या स्वाऱ्या संपवून परत आल्यावर तो आपल्यासभोंवतीं कवि व विद्वान् मंडळी जमवून त्यांच्या समागमांत कालक्रमणा करी. गुलाम वंशाचा मूळपुरुष ऐबक ऊर्फ कुत्ब-उद्दीन यालाहि एका श्रीमान गृहस्थानें गुलाम म्हणून विकत घेतल्यानंतर विद्या शिकविली व पुढें याच विद्येच्या व युद्धचातुर्याच्या जोरावर त्याला राज्य मिळवून स्वतंत्र सुलतान होतां आलें. शूद्रांना म्हणजे त्रैवर्णिकांच्या सेवकांना अध्ययनाची बंदी करून सक्तीनें अज्ञानांत ठेवणारा हिंदुधर्म व गुलामालाही पात्रता असल्यास विद्या संपादन करून गुलामाचा सुलतान होण्याची संधि देणारा इस्लामधर्म यांतील तात्त्विक फरक या उदाहरणानें उत्तम रीतीनें स्पष्ट होत आहे. खालच्या वर्गांनाही समतेच्या तत्त्वांवर बरोबरीच्या नात्यानें वागविण्याच्या मुसलमानी धर्माच्या या उदार धोरणामुळेंच मुसलमानी अम्मल या देशांत सुरू होतांच "जे खालच्या जातींचे लोक हजारों वर्षें वरच्यांचें दास्य करून एक प्रकारच्या गुलामगिरींत खितपत पडले होते, त्यांस मुसलमानी धर्म स्वीकारल्यामुळें आपल्या स्थितींत एकदम मोठा फरक झालेला दिसून आला. त्यांची परदास्यांतून एकदम सुटका होऊन ते मुसलमान राज्यकर्त्यांचे बरोबरीच्या नात्यानें जातभाई बनले. त्यांस ऐहिक संपत्ति प्राप्त झाली. हजारों वर्षांचें त्यांचें नष्टचर्य संपल्यासारखें झालें. त्यांचा नांवलौकिक व मानमरातब कल्पनातीत वाढला."† व त्यामुळें लाखों लोक मुसलमान होऊन त्यांनीं मुसलमानांच्या सत्तेचा प्रसार होण्यासाठीं जिवाचें रान करून हिंदु राज्यांचीं पाळेंमुळें खणून काढून हिंदुधर्माचा पुरा सूड घेतला. असो.

---

*मु. रि. पा. ३२-३३ †मु. रि. ३८२

गुलामवंशांतील नासिरुद्दीन महंमद हा सुलतानहि चांगला शिकलेला होता. तो कुराणाच्या नकला करून त्या विकीत असे व त्या पैशावर आपला निर्वाह करी.तो राज्याच्या कराच्या रूपानें आलेल्या पैशास हात लावीत नसे. नासिरुद्दिनचा वजीर बलबन् हाच पुढें सुलतान झाला. तो पूर्वीचा गुलाम होता व असें असतांहि त्याला वजीर व नंतर सुलतान होतां आलें. त्याजकडून मुसलमानी विद्येस चांगलें उत्तेजन मिळत असल्यामुळें, मोठमोठे विद्वान् पंडित त्याच्या दरबारीं असत.

तुघ्लक घराण्यांतील सुलतान महंमद हा "चांगला शिकलेला होता. तत्कालीन शास्त्र-कला त्यास चांगल्या अवगत होत्या. फारशी कविता त्यास फारच आवडत असे. तो उत्तम लेखक व उत्तम वक्ता होता. गणितांत त्याची गति उत्कृष्ट होती. वैद्यक, तर्क व न्यायशास्त्रें त्यास चांगलीं येत असून, त्या वेळचे मोठमोठे विद्वान्सुद्धां त्याजबरोबर वादविवाद करण्यास कचरत असत. त्याचें हस्ताक्षर उत्कृष्ट असून... अरबी भाषाहि त्यास येत असे."§ फिरोज तुघ्लक यासहि चांगलें शिक्षण देण्यांत आलें होतें.

"मोंगल बादशहांस विद्यावंतांचा मोठा नाद व अभिमान होता हें तर सुप्रसिद्धच आहे. त्यांच्या पदरीं अनेक विद्वान् मौलवी, पंडित, कवि, हकीम व तत्त्वज्ञानी होऊन गेले. बाबर बादशहा स्वतः मोठा विद्वान् होता. त्यास अरबी, फारशी, तुर्की व हिंदी ह्या भाषा चांगल्या अवगत होत्या. 'वाकियाती बाबरी' नांवाचें त्याचें आत्मचरित्र व कित्येक कविता सुप्रसिद्ध आहेत. स्वतां लिहिलेली कुराणाची एक प्रत त्यानें मक्केस पाठविली. शिवाय कायदे, साहित्य इत्यादि विषयांवर त्याचे ग्रंथ आहेत. बादशहा हुमायून गणित व इतर शास्त्रांत पारंगत होता. त्यास ज्योतिषाचा मोठा नाद असे. फारशी व तुर्की भाषा त्यास चांगल्या येत होत्या. तो कवितेचा भोक्ता असून अनेक कवींस त्याचा आश्रय असे. हुमायुनाचा भाऊ कामरान ह्याची गणना थोर कवींत होत असे. अल्लाउद्दीन खिलजीप्रमाणें अकबर हा मात्र निरक्षरच होता. हुमायून यानें त्यास शिकविण्यासाठीं चार निरनिराळे शिक्षक ठेविले होते; परंतु बाळपण त्यानें खेळण्यांत घालविल्यामुळें तो अखेरपर्यंत विद्येवांचून पण बहुश्रुत असा राहिला.

---

§ मु. रि. १५३

"जहांगीर शिकलेला असून मोठा रसिक होता. त्यास तुर्की भाषा चांगली येत असे. शहाजहान शिकलेला होता. कित्येक प्रसंगीं त्याचे हुकूम स्वतां लिहिलेले असत. जहांगीरच्यापेक्षां शहाजहानचें हस्ताक्षर सुंदर होतें. शहाजहानचा मुलगा दारा चांगलाच विद्वान् होता. हिंदूंच्या तत्त्वज्ञानाचा त्यानें उत्कृष्ट अभ्यास करून, अकबराप्रमाणेंच दोन धर्मांची सांगड घालण्यासाठीं त्यानें अनेक ग्रंथ रचिले. त्यानें उपनिषदांचें फारशींत भाषांतर करून साधूंचीं चरित्रें व ग्रंथ लिहिले.

"तथापि सर्वांत विद्वान् पुरुष म्हणजे औरंगजेब होय. स्वधर्माचा त्याचा अभ्यास उत्कृष्ट होता. फतवा-इ-अलमगिरी म्हणून मुसलमानी कायद्याचा उत्तम ग्रंथ औरंगजेबानें लिहिलेला आहे. औरंगजेबास कुराण तोंडपाठ येत असे, आणि त्याचा अर्थ चांगला कळत होता. त्याचें हस्ताक्षर सुंदर होतें. त्यास कवितेची मात्र आवड नव्हती. मुसलमानी धर्मशास्त्रांतील त्याची विद्वत्ता अप्रतिम होती असें मोठमोठया विद्वानांनीं म्हटलें आहे. औरंगजेबाचा मुलगा बहादूरशहा हा अरबी व फारशी जाणत असे. शेवटचा बादशहा दुर्दैवी शहाआलम हा विद्वान् व रसिक होता. दुसरा अकबर (१८०६-३७) व शेवटचा बहादूरशहा हे उर्दू व फारशी भाषांत कविता करीत."*

या वरील माहितीवरून मुसलमानी राजे यांना विद्येची आवड किती होती याची चांगली कल्पना येते. स्वतः राजाच विद्वान् व विद्याप्रेमी असल्यानंतर त्यानें प्रजेच्या शिक्षणाची आस्थापूर्वक कळकळ केल्यास कसलें आश्चर्य? मुसलमानांनीं घातलेल्या अनेक पाठशाळा देशांत असत; परंतु त्यांत अरबी व फारशी भाषा मात्र शिकवीत, म्हणून सामान्य रयतलोकांस प्रथम प्रथम त्यांचा उपयोग होत नसे. शिवाय कित्येक धर्मपुस्तकांपलीकडे त्यांत कांहींच शिक्षण होत नसे. मुसलमानी सुलतान व बादशहा सीरिया, अरबस्तान, इराण इत्यादि देशांतून अनेक पंडित आणवून त्यांस आश्रय देत. त्यामुळें विद्येच्या प्रचारास चांगलें उत्तेजन मिळत असे. मुसलमानांच्या प्राथमिक शाळा बहुतेक सर्व ठिकाणीं होत्या तेथें कुराण, स्थलमानाप्रमाणें फारशी, अरबी, उर्दू वगैरे भाषा व हिशेबापुरतें गणित इतके विषय शिकवीत; व त्यामुळें सामान्य जनांसहि शिक्षण घेण्याची उत्तम संधि मिळत असे. "अकबर वगैरे मुसलमान बादशहांनीं स्वजातीय विद्या देण्याकरितां मोठमोठया ठिकाणी

* मु. रि. ७४९-५१.

सार्वजनिक विद्यालयें स्थापिलीं होतीं. त्यांत आरबी, फारशी वगैरे भाषा व दुसरे कित्येक विषय शिकविले जात असत.§ चांगलें शिकून विद्वान् झाला तर राजाश्रय मिळण्याची संधि असल्यामुळें, मुसलमानी धर्माच्या सामान्य जनांपैकीं अनेक बुद्धिवान् तरुण मोठ्या हौसेनें व उमेदीनें विद्यार्जन करीत व त्यामुळें मुसलमानी धर्मांतील बहुजन समाजांत विद्याप्रसारास चांगलीच चालना मिळत असे. ह्या इच्छेच्या जोडीला "आपणांस कुराण वाचतां यावें," अशी प्रत्येक मुसलमानाला धार्मिक ळतळम वाटत असल्यामुळें साक्षरताप्रसार फार झपाट्यानें होत असे. "निरनिराळ्या ग्रंथांच्या नकला करून ज्ञानाचा फैलाव करण्याची बुद्धि मुसलमानांत होती तितकी हिंदूंत नव्हती. हिंदू लोक आपलें विशिष्ट ज्ञान बाहेर फोडण्यास बहुधा नाखूष असत."§ मुसलमानांच्या या पाठशाळा बहुतेक ठिकठिकाणच्या मशिदींत भरत असत, व या शाळांस मद्रासा असें म्हणत व त्यांना भरपूर सरकारी मदत मिळत असे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे 'मुसलमानांच्या अमदानींत मशीद ही इतर मुसलमानी देशांप्रमाणें शिक्षणाचें व वाङ्मयात्मक चळवळीचें केंद्र बनली.'*

मुसलमानी शाळेंतील शिक्षणाचे विषय व पद्धति:—मुसलमानी प्राथमिक शाळांतून कुराण, फारशी, अरबी, उर्दू भाषा व गणित शिकवीत याचा उल्लेख वर केलाच आहे. याशिवाय आणखी कोणते विषय शिकवीत व कोणत्या पद्धतीनें शिकवीत याबद्दल आईन-इ-अकबरी मधील खालील उतारा उद्बोधक होईल.

"प्रत्येक देशांत व विशेषतः हिंदुस्थानांतील मुलाला अनेक वर्णें स्वर व व्यंजनें शिकविणाऱ्या शाळेंत ठेवण्यांत येतें. त्यांना अनेक पुस्तकें वाचाव-

---

§ मु. रि. पा. ४८५.

§ मु. रि. पा. ७६५. The muslim (educational system) differs essentially from the Hindu system by its democratic character. It is the duty of every boy to recite from the Koran even though he may not understand it.

Sir P. Hortog, Modern India, p. 121.

* हंटर क. रि. पा. ८.

यास लावण्यांत त्यांच्या आयुष्याचा बराचसा भाग व्यर्थ खर्च होतो. म्हणून बादशहा असा हुकूम करीत कीं; शाळेंतील प्रत्येक विद्यार्थ्यास वर्णाक्षरें व त्यांचे निरनिराळे प्रकार लिहिण्यास शिकविण्यांत यावे. त्याला प्रत्येक अक्षराचा आकार व नांव येणें जरूर आहे व हें त्याला दोन दिवसांत शिकवितां येईल. नंतर मुलाला जोडाक्षरें लिहिण्यास शिकवून तीं घटविण्यासाठीं एक आठवडा खर्च करण्यांत यावा. मग कांहीं गद्य व पद्य त्याच्याकडून पाठ करून घेण्यांत यावें. नीतिपर वचनें किंवा ईशस्तुतीपर कवनें त्यानें तोंड-पाठ करावींत. प्रत्येक गोष्टीचा अर्थ विद्यार्थी स्वतांच समजून घेण्यास शिकेल याबद्दल दक्षता बाळगावी. परंतु शिक्षकानें जरूर तेथें मदत करण्यास हरकत नाहीं. नंतर त्याला एकादा श्लोकार्ध अगर श्लोक रचण्याची संवय लावून लवकरच त्यांत त्याची द्रुत गती होईल असें पहावें. ललितकलांकडे शिक्षकानें विशेष लक्ष पुरवावें. याप्रमाणें अक्षरओळख, शब्दार्थबोध, श्लोकार्ध अगर कविता रचणें अशा क्रमाच्या पद्धतीनें शिक्षण दिल्यास, आज ज्या गोष्टी समजण्यास इतरांस कैक वर्षें लागतील त्या गोष्टी तो एक महिन्यांत किंवा एक दिवसांत शिकून लोकांना आश्चर्यचकित केल्यावांचून रहाणार नाहीं. प्रत्येक मुलानें नीतितत्त्व, अंकगणित, शेतकी, महत्त्वमापन, भूमिति, ज्योतिष, मुखलक्षणावरून स्वभाव ओळखण्याचें शास्त्र, घरगुती बाबी, राज्यकारभार, वैद्यक, तर्कशास्त्र वगैरे शास्त्रें व इतिहासविषयक पुस्तकें वाचून हलके हलके हे विषय अवगत करून घेतले पाहिजेत.

संस्कृत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनीं व्याकरण, न्याय, वेदान्त व पातंजली यांचा अभ्यास केला पाहिजे. प्रचलित कालास आवश्यक असलेल्या कोणत्याहि गोष्टीकडे कोणत्याहि विद्यार्थ्याला दुर्लक्ष करूं देतां कामा नये.

या नियमांमुळें शाळांवर नवीन प्रकाश पडून मद्रासावर उज्ज्वल तेज फाकल्यावांचून रहाणार नाहीं."

या डायऱ्यांवरून प्रत्यक्ष बादशहा मुसलमानी व संस्कृत विद्येच्या बाबतींत योग्य नियम करून त्यांच्या प्रसाराच्या कामीं जातीनें किती लक्ष घालीत होते, हें स्पष्ट होत आहे. अकबर स्वतां निर्विद्य असला तरी त्याला विद्येचें महत्त्व चांगलेंच पटलेलें असल्यामुळें, त्यानें विद्येच्या प्रसारासाठीं आस्थापूर्वक केलेल्या प्रयत्नांवर या उताऱ्यावरून चांगलाच प्रकाश पडतो यांत शंका नाहीं. त्याच-प्रमाणें प्रत्येक विद्यार्थ्याला धार्मिक, नीतिविषयक व व्यवहारोपयोगी असें

तिन्ही प्रकारचें शिक्षण मिळेल, अशी दक्षता बाळगण्यांत येत होती, हेंहि या उताऱ्यावरून सिद्ध होत आहे. वरील उताऱ्यांत व्यक्त होत असलेल्या शिक्षण-विषयक ध्येयांत व तें साधण्यासाठीं अवलंबिलेल्या पद्धतींत व आमच्या आज-च्या ध्येयांत व शिक्षणपद्धतींत विशेष महत्त्वाचा फरक नाहीं, हेंही लक्षांत ठेवणें जरूर आहे. एतद्देशीय मुसलमानी शिक्षणाच्या बाबतींत एज्युकेशन कमिशन १८८२च्या रिपोर्टांत पा. ५७ वर खालील अभिप्राय व्यक्त करण्यांत आला आहे. "मुसलमानी शाळांमध्यें व्यावहारिक शिक्षणाकडे फार थोडें लक्ष दिलें जात असे. ते कुराणाचें शिक्षण देत परंतु अंकगणिताकडे दुर्लक्ष करीत असत. हिंदु शाळांपेक्षां या शाळांतील धार्मिक स्वरूप सर्वांत अधिक दृष्टोत्पत्तीस येत असलें तरी हिंदू विद्यालयांतून अध्यापक व अभ्यासक यांच्यांत दिसणारा पितृपुत्रभाव या शाळांतून कमी दृग्गोचर होतो."

हिंदूंचें शिक्षण:—प्राचीनकालीन हिंदूंच्या शिक्षणाची स्थिति काय होती याचा मागें विचार केलाच आहे. या प्रकरणांत आतां मध्यकालांतील हिंदूंच्या शिक्षणाची काय अवस्था होती यांचें अवलोकन करावयाचें आहे.

मध्यकालांतील शिक्षणप्रसाराचा विचार करतांना संस्कृत व प्राकृत अशा दोन्ही भाषांचा स्वतंत्र विचार करणें जरूर आहे. ब्राह्मणधर्माची पुन्हां घडी नीट बसल्यानंतर बुद्धधर्माचे ऐन अमदानींत मागें पडलेली संस्कृत भाषा पुन्हां पुढें सरसावली; परंतु तिला पूर्वीचें मानाचें स्थान कांहीं मिळालें नाहीं. कारण प्रत्येक प्रांतांत स्थानिक प्राकृत भाषेलाहि पूर्वीपेक्षां अधिक महत्त्व मिळूं लागलें व त्यामुळें त्या भाषांची शब्दसंपत्ति वाढून त्यांना बाळसेदार व ठस-ठशीत स्वरूप येऊ लागलें होतें. मराठी प्रांतांचा विचार केला तर मराठी भाषा संस्कृतपेक्षां वरचढ दर्जानें जरी नसली तरी बरोबरीच्या नात्यानें वागूं लागली होती. पंडित व शास्त्री यांच्या मान्यतेसाठीं हपापलेले विद्वान् नवीन ग्रंथरचना संस्कृतभाषेंत करीत व सामान्य जनाची ज्ञानक्षुधा शांत करण्याच्या पवित्र हेतूनें प्रेरीत झालेले ज्ञानेश्वरासारखे महात्मे ज्ञानामृताची वाटी मराठी भाषेच्या ताटीं ठेवूं लागले होते. ज्ञानेश्वराच्या पूर्वीच मराठी भाषेचा उत्कर्ष झाला होता. " मराठी भाषा पांच–सातशें वर्षें कमावली गेल्यावर तीत ज्ञानेश्वरी-सारखा प्रगल्भ ग्रंथ निर्माण झाला. ज्ञानेश्वराच्या अगोदर निवृत्ति, मुकुंदराज, सहदेव भाडळी यांनीं मराठींत ग्रंथरचना केलेली आहे व त्या ग्रंथरचनेनें कमावलेल्या मराठींत ज्ञानेश्वर लिहितो. चांगल्या अभिजात व उमद्या मराठींत

ज्ञानेश्वर वक्तृत्व करतो तेव्हां ज्ञानेश्वरकालीन मराठी भाषा बाल्यावस्थेंत खचित नव्हती."* रावबहादूर गोविंदराव सरदेसाई यांच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे "ज्ञानेश्वरांच्या वेळीं मराठी भाषा बाल्यावस्थेंत नसून प्रौढ होती."§ यावरून त्याकाळीं लोक संस्कृत भाषेप्रमाणें मराठी भाषेचेंहि अध्ययन व अध्यापन करीत होते.

संस्कृत भाषेचें अध्ययन:— संस्कृत भाषा शिकविण्यासाठीं पाठशाळा व काशी, पैठण वगैरेसारख्या ठिकाणीं विद्यालयें होतीं. त्या ठिकाणीं वेदपठण व इतर धर्मशास्त्रांचा अभ्यास करण्यांत येत असे. संस्कृत विद्येंत ब्राह्मणांचीं शेकडों घराणीं पिढीजात विद्वान् असून आपआपल्या विषयांत पारंगत होतीं. परंतु ही संस्कृतमधील विद्या ब्राह्मणेतरांना मिळणें शक्य नव्हतें. पूर्वीचे कालीं त्रैवर्णिकांना वेदांचें अध्ययन करण्याची परवानगी असे. परंतु नंदाचे कालानंतर क्षत्रिय व वैश्य या वर्गांचें अस्तित्वच अमान्य करण्यांत येऊन 'ब्राह्मण नाहीं तो शुद्र' अशी शूद्राची व्याख्या झाल्यामुळें इतरांना संस्कृत विद्येची बंदीच झाली. धर्मरक्षणाचें पवित्र कार्य करून पुरोहितांची शेंडी राखणाऱ्या शिवाजी राजांनाही येथील पुरोहित क्षत्रिय म्हणावयास तयार नव्हते. या गोष्टीवरून त्यांच्या कृतघ्नपणाप्रमाणें कर्मठपणा कोणत्या थराला पोहचला होता, याची कल्पना येते. तुकारामासारख्या शुद्ध आचाराच्या, पवित्र विचाराच्या 'जयाची वदे पूर्ण वेदान्तवाणी' अशा महासाधूचीहि जेथें 'शूद्र कवि' म्हणून हेटाळणी करण्यांत आली तेथें इतरेजनांचा पाड काय ?† पेशवाईत 'परभु व सोनार हेही शूद्र आहेत. त्यांना वैदिक संस्कारांचा हक्क नाहीं.' असे अनेक निर्णय देण्यांत आले होते. अर्थात या पाठशाळांतून अगर विद्यालयांतून 'ब्राह्मणाशिवाय इतरांना संस्कृत विद्येचा गंधहि मिळणें शक्य नव्हतें.'§ या

---

* म. रि. पा. ८८ वर उध्दृत केलेल राजवाडे यांचे उद्गार.

§ म. रि. पा. ८८.

† Amongst the Hindus, higher Sanskrit education was regarded in theory as the right and duty of the twice-born castes. In practice the pupils as well as the teachers belong almost exclusively to the Brahmin caste. हंटर व. रि पा. ५८

§ "The higher schools are closed against all but Brahmins." हंटर क. रि. पा. ५७.

चावर्तीत आल्बेरुनी नांवाच्या प्रवाशानें सन १०४० च्या सुमारास हिंदुलोकां-विषयीं काढलेले, खालील उद्गार लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. "हिंदूंच्या स्वभावांतील कित्येक ठळक गोष्टी उघड उघड दिसून येतात. मूर्खपणाला औषध नाहीं, हेंच खरें. हिंदू लोकांना वाटतें, आपल्या देशासारखा देश नाहीं, आपल्या राष्ट्रासारखें राष्ट्र नाहीं, आपल्या राजांसारखे राजे नाहींत, आपल्या धर्मासारखा धर्म नाहीं, आणि आपल्या विद्येसारखी विद्या नाहीं. ते उद्दाम, गर्विष्ठ आणि मंद आहेत. आपली विद्या दुसऱ्यास देण्यास ते अतिशय नाखूष असतास. परक्यास तर काय पण आपसांत सुद्धां एक जातीचा गृहस्थ आपली विद्या दुसऱ्या जातीस देत नाहीं. त्यांना वाटतें, सगळ्या पृथ्वीवर देश काय तो आपला एकच आहे, दुसरे देशच नाहींत; आणि आपल्या विद्या दुसऱ्या कोणास यावयाच्याही नाहींत. मुसलमानांच्या देशांत एकादी विद्या आहे किंवा तिकडे कोणी विद्वान् गृहस्थ आहेत, असें सांगितलें तर तें त्यास खरेंसुद्धां वाटत नाहीं. ते जर प्रवास वगैरे करून दुसऱ्या लोकांशीं मिसळतील तर त्यांचे असे मिथ्याग्रह आपोआप दूर होतील. त्यांचे पूर्वज कसेही असले तरी दुराग्रही व संकुचित मताचे नव्हते. हिंदुस्थानांत येऊन तेथील विद्या मिळवून घेण्यास मला किती प्रयास पडले तें माझे मलाच ठाऊक. हिंदूंच्या सर्व विद्यांचा आज भयंकर गोंधळ झालेला आहे. कशास कांहीं ठिकाण नाहीं. उत्कृष्ट विद्या, अज्ञानी व मूर्ख लोकांच्या हातीं पडून त्यांचें मातेरें झाल्यामुळें, चांगलें कोणतें, वाईट कोणतें ह्याचा उलगडाच करतां येत नाहीं. उत्कृष्ट रत्नें उकिरड्यांत मिसळून जावीं तशांतला प्रकार झाला आहे."*

आल्बेरुनीच्या या चरचरीत वर्णनावरून त्या काळच्या विद्याविषयक स्थितीची चांगली कल्पना येते. सर्व संस्कृत विद्या एका जातीच्या हातांत असल्यामुळें व कर्मठपणाच्या आहारीं जाऊन त्या विद्येच्या वाऱ्यासही इतर वर्गांस ते उभे करण्यास तयार नसल्यामुळें "सामान्य जनसमूहाची शारीरिक व मानसिक स्थिति अतिशय शोचनीय होती," असें त्यानें लिहिलें आहे. "नैतिक आणि धार्मिक बाबतींत देखील सर्व तऱ्हेनें गांजलेले, अनाथ आणि पतित, सामाजिक, धार्मिक आणि राजकीय बाबींमध्यें विभागलेले, धड विचार देखील न करतां येणारे, व्यसनांनीं शरीरें कमकुवत करून घेतलेले आणि महमद गजनीच्या

*मु. रि. पा. ३९७

बरोबर दरवर्षी चाल करून येणाऱ्या मुसलमानांपुढें शिस्तीच्या अभावीं रजःकणाप्रमाणें उडून जाणारे कळपचे कळप,"* असें त्यानें हिंदुलोकांचें वर्णन केलें आहे. ही केविलवाणी परिस्थिती निर्माण होण्यास सामान्य जनसमूहामधील शिक्षणाचा पूर्ण अभाव हेंच कारण होय. सामान्य लोकशिक्षणाबद्दल पुढें विस्तृत विचार केला आहेच !

मुसलमानांच्या अमदानींत ' विशेषतः विद्याविषयक बाबतींत हिंदूंस पूर्ण स्वतंत्रता होती. ' आणि ठिकठिकाणच्या पाठशाळा व विद्यापीठें संस्कृत विद्यादानाचें काम उत्तम तऱ्हेनें करीत होतीं. " ब्राह्मणांस वेद, काव्य, न्याय, व्याकरण, मिमांसा इत्यादि शिकविण्याकरितां सरकारच्या आश्रयानें वेदशाळा व संस्कृत पाठशाळा चालविण्याचा रिवाज सर्व जुन्या हिंदुराजांचा होता. एकाद्या प्रसिद्ध देवस्थानास लागून वेदशाळा अगर संस्कृत पाठशाळा ठेवावी. त्यावर गुरूजी नेमून त्याला वर्षासन द्यावें व पाठशाळेंत शिकणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांच्या उदरनिर्वाहार्थ अन्नछत्र घालावें ही जुनी विद्योत्तेजनाची राजेलोकांची रीत असून अद्यापिही ती कांहीं लहान मोठ्या हिंदु संस्थानांतून आढळते. त्या योगानें जुनी विद्या जीव धरून राहते यांत शंका नाहीं. "$ या शिक्षणसंस्थांना मुसलमानांचा राजाश्रय मात्र फार मिळत नसे. लोक खाजगी खर्चानें त्या चालवीत असत. त्यामुळें त्यांची संख्या दिवसेदिवस कमी होत होती. हिंदुस्थानांत संस्कृत विद्येचा उत्कर्ष होता त्या वळीं युरोप अज्ञानांधकारांत चाचपडत होतें. परंतु सोळाव्या शतकाच्या सुमारास म्हणजे मोंगल बादशाहीच्या स्थापनेच्या सुमारास युरोपमध्यें विलक्षण शिक्षणजागृति झाली व त्यामुळें " युरोपांत अज्ञानांधकाराचा झपाट्यानें नाश होत चालला होता, पूर्वेकडे हिंदुस्थानांत नवीन ज्ञानवृद्धि तर दूरच, पण असलेली सुधारणा व ज्ञान ह्यांचा तितक्याच झपाट्यानें ऱ्हास होत चालला होता. संस्कृत भाषेचा अभ्यास उत्तरोत्तर नष्ट होत चालल्यामुळें, तींतील ज्ञानभांडाराचा लाभ बहुतेकांस दुर्मिळ झाला. "†

संस्कृत विद्येच्या अध्ययनाला शिवाजी महाराजांनीं अतिशय मदत केली. या विद्येच्या उत्तेजनार्थ त्यांनीं दक्षिणेची पद्धत अस्तित्वांत आणली. " दक्षिणा म्हणून जी संस्था पुढें पेशवाईच्या वेळेस प्रसिद्धीस आली तिचा जनक

---

*मु. रि. पा. ३९८ $ वे. म. ९१-९२ † मु. रि. ४०६

शिवाजी होय. परीक्षा घेऊन द्रव्यद्वारां पंडितांस बक्षिसें देणें हें या संस्थेचें काम होतें."¶

शिवाजी महाराजानंतर संस्कृत विद्येच्या अध्ययनास चालना देणारी दक्षिणेची पद्धत कांहीं काल बंद पडली; परंतु पुढें ती सेनापति दाभाडे यांनीं पुन्हां सुरूं केली. " श्रावणमासांत ब्राह्मणांस दक्षिणा वांटून त्या योगानें प्राचीन विद्येच्या प्रसारास उत्तेजन देण्याचा प्रयत्न सेनापति दाभाडे यांनीं पूर्वी सुरू केला होता. तो पहिल्या बाजीरावापासून पुण्यास चालू झाला व पेशवाईअखेरपर्यंत टिकला. दक्षिणेच्या आशेनें तरुण लोक विद्या शिकूं लागल्यामुळें जुन्या पाठशाळा भरभराटीस आल्या व नव्या पाठशाळा स्थापण्यास विद्वानांस उत्तेजन मिळालें. पेशव्यांचा कित्ता इतर मराठे सरदारांनींहि उचलला व अशा रीतीनें मराठी साम्राज्यांत विद्यावृद्धि झाली व प्राचीन विद्येच्या वठत चाललेल्या वृक्षाला सर्वत्र नूतन पालवी फुटली. "§ " ब्राह्मणांची पात्रापात्रता ठरविण्याकरितां त्यांची परीक्षा शास्त्री, पंडित व वैदिक यांजकडून घेण्यांत येई व ते ठरवितील त्या प्रमाणांत दक्षिणा वांटली जाई. "*

पुण्याहून दक्षिणेच्या फुटकळ रकमा घेऊन जे विद्वान् ब्राह्मण परत आपआपल्या गांवीं जात त्यांपैकीं, बहुतेकजण आपल्यापाशीं चार दोन शिष्य बाळगून त्यांजकडून वेदशास्त्रांचें अध्ययन करवीत आणि कित्येकजण संघानें पाठशाळा व वेदशाळाहि चालवीत.

ब्राह्मणांतील सामान्य माणसांचीं मुलें वेदशाळा अगर पाठशाळा यांत जाऊन तेथें वेदविद्येचें अध्ययन करीत. परंतु ब्राह्मणांत जे श्रीमंत सरदार असत ते आपल्या मुलांस ब्रह्मकर्म वगैरे शिकविण्यासाठीं घरींच पंडित, शास्त्री ठेवीत. पेशव्यापैकीं अनेक पुरुषांना संस्कृत भाषा शिकविण्यासाठीं विद्वान् पंडित ठेवलेले होते.†

संस्कृत विद्येचें देण्यांत येणारें हें शिक्षण मुख्यतः धार्मिक स्वरूपाचेंच असे. व्यवहारोपयोगी गोष्टींचा त्यांत पूर्ण अभावच असे.

मराठी भाषेचें अध्ययन :—ज्ञानेश्वरांच्या पूर्वी मराठी भाषा चांगलीच प्रौढावस्थेंत पोंचल्याचें मागें सांगितलें आहेच. ही मराठी भाषा शिकविण्यासाठींही ठिकठिकाणीं पाठशाळा असत. मुसलमानांचे अमदानींत या पाठ-

---

¶ मु. रि. ४८२ § पे. म. ९२ * पे. म. ९३ † प म. प्र. ६ पहा

शाळांनाही मदत मिळत नसे. मराठी शिक्षणाचा विचार करतांना आपणास बड्या लोकांचें अगर विशिष्ट वर्गांचें शिक्षण व सामान्य समाजाचें शिक्षण, असा स्वतंत्र विचार करणें जरूर आहे.

श्रीमंत वर्गाचें शिक्षण :—श्रीमंत या सदरांत सरदार, जहागिरदार वगैरे बड्या लोकांचा समावेश होतो. " केवळ किरकोळ स्वाराला व शिपाई गड्याला पुस्तकी शिक्षणाची तितकी गरज वाटत नसली तरी मुत्सद्दी व सरदार यांना त्याचें महत्त्व कळून ते आपल्या मुलांस सदर शिक्षण दिल्यावांचून रहात नसत. मुत्सद्दी वर्गांत मुख्यत: ब्राह्मण व तत्सम पांढरपेशे असत आणि सरदारांत ब्राह्मण, मराठे हे उभयतां बरोबरीनें चमकत; पण मराठा सरदार अक्षरओळखीपेक्षां अधिक ज्ञान मिळविण्याच्या खटपटींत पडत नसावा. तथापि ब्राह्मण सरदाराचें तसें नसे. तो परिस्थित्यनुरूप सरदार बनला असला तरी मूळचा जातीनें ब्राह्मण म्हणून ब्राह्मण या नात्यानें त्याला ज्या धर्मज्ञानाची व ब्रह्मकर्माची जरूरी तें सर्व ग्रंथांतून लिहून ठेवलेलें असल्याकारणानें त्याला लिहिण्यावाचण्यास शिकणें अपरिहार्य होतें. त्यांतील कित्येक ब्राह्मण बहुश्रुत किंबहुना विद्वान् गणले जाण्याच्याहि योग्यतेचे असत. "¶ " पेशवे घराण्यांतील बाजीराव, नानासाहेब, रघुनाथराव, माधवराव, इत्यादि पुरुष कालमानाप्रमाणें बरेच विद्वान् व बहुश्रुत होते. बाजीराव व नानासाहेब हे चांगले संस्कृतज्ञ असून महाभारत व रामायण या ग्रंथांतील स्फूर्तिदायक व राजनीतिविषयक भाग त्यांनीं वाचला होता. नानासाहेबांचा महाभारताप्रमाणें पंचतंत्र, हितोपदेश, चाणक्यनीति, रघुवंश इत्यादिकांचा अभ्यास झाला होता."८

ब्राह्मणांप्रमाणें लिहिणें, वाचणें शिकलेल्या मराठा सरदारांचींही अनेक नांवें देणें शक्य आहे. " प्रत्यक्ष शिवाजीघराण्यासंबंधानें पाहतां बाबाजी, मालोजी, विठोजी, शहाजी, जिजाबाई, राजाराम, शाहू, दुसरा शिवाजी, तंजावरचा शाहू व प्रतापसिंह या सर्वांचीं हस्ताक्षरें उपलब्ध आहेत. प्रत्यक्ष शिवाजीचें ' बहुत काय लिहिणें सूज्ञ असा ' अशा मजकुराचें हस्ताक्षर अनेक पत्रांच्या शेवटीं सांपडलेलें आहे. तंजावरचे शाहू व प्रतापसिंह तर संस्कृतहि चांगलें जाणत होतें.

" दादाजी कोंडदेवानें शिवाजीला लिहिण्यावाचण्याला शिकविलें असे बहुतेक बखरकारांचे उल्लेख आहेत. गायन, वादन, पुराणवाचन, संस्कृत,

¶ पे. म. ५९ ८ पे. म. ७४

धर्मशास्त्र, राजनीति हे विषय शिवाजीला शिकविलेले होते. त्यांची विस्तृत वर्णने बखरींतून आहेत. शिवाजीच्या वेळच्या पुष्कळ मराठे सरदारांना लिहितांवाचतां येत होते."† " पेशवेकालीन मराठे मंडळींत मल्हारराव होळकर, तुकोजीराव होळकर, कान्होजीराव आंग्रे, त्रिंबकराव दाभाडे, खंडेराव दाभाडे, राणोजी, दत्ताजी, जनकोजी व महादजी शिंदे, खंडोजीराव माणकर, धार-संस्थान-संस्थापक उदाजीराव पवार, अप्पाजीराव पाटणकरप्रभृति पुरुष साक्षर होते. "‡

मुत्सद्दी व सरदार किंवा जे समाजांतील मातब्बर, प्रतिष्ठित व संपन्न गृहस्थ असत ते आपल्या मुलांना गांवठी शाळेंत न पाठवितां पदरीं मनुष्यास बाळगून त्याचेमार्फत शिक्षण देत. शहाजीनें शिवाजीमहाराजांना शिक्षण देण्यासाठीं मुद्दाम दादाजी कोंडदेवाची योजना केली होती, ही गोष्ट महशूरच आहे. पेशव्यांपैकीं सर्व पुरुषांसही खास शिक्षक नेमून शिक्षण देण्याची तजवीज करण्यांत आली होती. बाजीरावाचा मस्तानीपासून झालेला मुलगा समशेर बहादूर यानें आपला मुलगा अलिबहादूर याच्या शिक्षणाकडे अगदीं लहानपणापासून लक्ष पुरविलेलें दिसतें. " समशेरबहादुरानें यमाजीपंत नामक एक शिक्षक त्याजकरितां ठेवून त्याला दरसाल ५०० रुपयांची नक्त तैनात व १०० आख कापड, याप्रमाणें नेमणूक केली होती. "* " सवाई माधवराव यांना भूगोल शिकविण्यासाठीं डॉक्टर फिंडले या नांवाच्या इंग्रज गृहस्थाची नेमणूक केली होती. "§

सामान्य वर्गाचें शिक्षणः—सामान्य वर्गांत ब्राह्मण, कायस्थ व इतर सर्व जाती येतात. या सामान्य वर्गांपैकीं ब्राह्मण वर्गाचें शिक्षण थोडेंफार होतच असे. कारण अध्ययन करणें हें आपलें धार्मिक कर्तव्य आहे अशी त्यांची समजूत असे. परंतु "सामान्य जनांच्या शिक्षणाच्या सोयी परिमितच" असल्यामुळें " ब्राह्मणांतहि जे अगदींच गरीब त्यांपैकीं पुष्कळांना अक्षरशत्रू रहाण्याची पाळी येत असे. खेड्यापाड्यांतून रहाणाऱ्या ब्राह्मणांना मराठी लिहितांवाचतां आलें व हिशेब ठिशोबाचें ज्ञान आलें म्हणजे डोक्यावरून पाणी गेलें; तथापि सरकारी नोकरींतले पण वरच्या दर्जास न पोचलेले असे ब्राह्मण कामगार आपल्या मुलांना मराठीबरोबर संस्कृत भाषेचें ज्ञान मिळवून दिल्यावांचून रहात नसले पाहिजेत असें वाटतें. "§

† म. रि. १६३. ‡ पे. म. ९०. *पे. म. ८२. § पे. म. ८५. § प. म. ८९

कायस्थांपैकीं " चिटणीस वगैरे घराण्यांचा लिहिण्याचा धंदा असल्यामुळें त्यास लिहिणें वाचणें चांगलें येत असे. पण त्या विषयांस सोडून इतर विषयांचा अभ्यास फारसा झालेला नसे. जो तो आपले धंद्यापुरतें पाही. पुराणिकांस व वैदिकांस वाचतां येई खरें, पण लिहिण्याच्या नांवानें सहीसुद्धां करितां येत असे कीं नाहीं याची वानवाच आहे. "* " ब्राह्मणांखेरीज इतर कित्येक जातींना म्हणजे वाणी, उदमी, सोनार, शिंपी इत्यादिकांना आपआपला व्यवहार पहाण्यासाठीं व पारमार्थिक उन्नतीसाठीं पुस्तकी शिक्षणाचें अगत्य बाळगावें लागत होत. "†

याप्रमाणें त्या काळीं व्यवहार-शिक्षण " ब्राह्मण, प्रभू, वाणीउदमी व मराठे या सर्व जातींतील लोक कमी अधिक प्रमाणांत घेत असत. तरी पण त्यांतहि ब्राह्मण व तत्सम जातींच्या मुलांचा भरणा मोठा असून उच्च घराण्यांतील मराठ्यांशिवाय इतर जातींच्या मुलांचें प्रमाण कमी असे. "¶ सामान्य वर्गांतील मराठा वगैरे इतर जातींतही अनेक लोक त्या काळीं शिकून चांगले कवि वगैरे झालेले होते. शिवाजीच्या पूर्वीच्या काळीं नामदेव व त्याच्या घरांतील बहुतेक सर्व मंडळी अभंगरचना करीत. त्याचप्रमाणें गोरा कुंभार, नरहरी सोनार, चोखामेळा वगैरे संतही भगवद्भक्तीपर काव्यरचना करीत. शिवाजीच्या कालांतहि तुकाराम महाराज हे चांगले लिहिणारे होते. त्याच कालांतील कान्होबा, संताजी जगनाडा तेली, नावजी माळी, जिवाजी कासार हेहि लिहिणारे होते. " कारण त्यांनीं स्वहस्तानें लिहिलेले तुकारामाचे अभंग आज त्यांच्या वंशजांजवळ आहेत. कित्येक मानभावपंथी मराठे कवि व नामांकित ग्रंथकर्ते होते. सिद्धान्तबोधाचा कर्ता शहामुनि मराठा होता. "‡

पेशवे कालांतहि अनेक मराठे व तत्सम जातींचे लोक शिकून काव्यरचना करीत. होनाजी बाळ, सगनभाऊ वगैरे शाहिरी कवि प्रसिद्धच आहेत.

तथापि एकंदरीनें पहातां, ब्राह्मण व प्रभू वगैरे पुढारलेल्या वर्गांतच खरा शिक्षणाचा प्रसार होता. मराठा व इतर शेतकीवर उपजीविका करणाऱ्या बहुसंख्यांक वर्गांत शिक्षणाचा पूर्ण अभाव होता. बिगरशेती करणाऱ्या इतर ब्राह्मणेतर जातींतही वाणीउदमी वगैरे व्यापार धंदा करणारे लोक कामापुरतें लिहिणें, वाचणें व हिशेब वगैरे शिकत. बाकी सगळीकडे पूर्ण अंधार

---

* म. रि. ४८३ † पे. म. ५९ ¶ पे. म. ७३. ‡ म. रि. १६३.

होता, असें म्हणावयास हरकत नाहीं. ब्राह्मणेतर वर्गांत याप्रमाणें पुस्तकी शिक्षणाचा प्रसार जरी अतिशय अल्प प्रमाणांत होता, तरी त्यांना थोडें फार ज्ञान देण्याचें कार्य संत मंडळींनीं व कीर्तनकार यांनीं केलें होतें. खालचे सर्व वर्ग भागवत धर्माचे अनुयायी होते व त्यामुळें नामदेव, एकनाथ, तुकाराम-सारख्या जातिवंत संतांच्या कथाकीर्तनाला त्यांच्या झुंडीच्या झुंडी लोटत. साहजिकच या कथाकीर्तनाच्या द्वारें त्यांना पुराणें वगैरेमधील कथांची माहिती मिळून इतरहि व्यवहारोपयोगी ज्ञान मिळत असे. ज्ञानेश्वरी, नामदेव तुकारामांचे अभंग आपणांस वाचतां यावे या धार्मिक कल्पनेनेंहि अनेक लोक वाचावयास शिकले यांत कांहीं शंका नाहीं व अशा तऱ्हेनें अप्रत्यक्षपणें का होईना पण संतमंडळींनीं साक्षरताप्रसाराच्या कार्यांत बहुमोल मदत केली.

शिक्षणाचे विषय :—" व्यवहार-शिक्षणांत अक्षर, उजळणी, हिशेब यांवर मुख्य भर दिला जाई. त्याकरितां व इतर ज्ञानाकरितां किल्ले, संसार-चोपडी, गणित, मराठ्यांच्या व मुसलमानांच्या बखरी, रामरक्षादि स्तोत्रें, जमाखर्चाची पद्धति, भूभापन, पत्रें लिहिण्याचे मायने, लिखितें, मराठी कविता इत्यादिकांचा अभ्यासांत समावेश होत असे." (राजवाडे प्रस्तावना). "ज्याची जशी योग्यता, जरूरी व परिस्थिति त्याप्रमाणें त्याच्या शिक्षणांत कमी अधिक विषयांचा अंतर्भाव करण्यांत येई व त्यास कमी अधिक अध्यापक ठेवण्यांत येत. सवाई माधवरावास शिकवावयाच्या विषयांत मराठी व संस्कृत या दोन भाषाच होत्या. फार्सी भाषा नव्हती व इंग्रज लोकांचा रोजचा संबंध जडला तरी इंग्रजी भाषाहि त्यास शिकविण्याची नानास गरज भासूं लागली नव्हती. कारण मुसलमानी अगर इंग्रजी दरबाराशीं कांहीं राजकीय पत्रव्यवहार अगर वाटाघाट करावयाची झाल्यास दुभाषामार्फत तें काम होत असे. परंतु विंचूर-करांची जहागीर उत्तर हिंदुस्थानांत व त्यांचें राजकारण मुसलमानी दरबारशीं याकरितां त्यास फार्सी भाषा शिकविण्याची व्यवस्था नानांनीं केली," इंग्रजांच्या सहवासामुळें, नानाच्या शिक्षणाविषयक कल्पनांत महत्त्वाचा बदल होऊन त्यांनीं सवाई माधवराव यांना भूगोल शिकविण्याची व्यवस्था केली. याचा उल्लेख मागें आला आहे. मुत्सद्दी व राजकारणी पुरुषांना राज्यनीतीचेंहि शिक्षण देण्यांत येत असे. शिवाजी महाराजांना व पेशवे घराण्यांतील बहुतेक पुरुषांना तें देण्यांत आलें होतें.§ माधवराव पेशवे यांची आजी गोपिकाबाई

× मु. रि. पा. ६४१ § पे. म. ७४-७५

प्राथमिक शिक्षण

इनें माधवरावांस उद्देशून १७८३ च्या जानेवारींत लिहिलेल्या एका पत्रांतील उतारा खालीं दिला आहे. त्यावरून राजपुत्रास कोणते विषय शिकवीत यांवर चांगला प्रकाश पडतो. "त्यानें प्रातःकाळीं लिहिण्यास बसावें. कित्ता वळवावा, मग वाचावे. भारतांतील कांहीं गोष्टी माहीत असाव्या. जेवतांना विचार करून बोलावें व समयोचित भाषण करावें. राजसूययज्ञांतील कथेच्या अधारें बोलावें. विराटपर्वाचें चिंतन करावें, वृद्धांच्या व शहाण्यांच्या तोंडून दिल्लीचा व शिवाजीचा इतिहास समजून घ्यावा, आपला बाप व पूर्वज यांची हकीकत कारभाऱ्यांच्या तोंडून ऐकावी. चित्रें व नकाशे पहाण्याची काळजी घ्यावी व त्यांचे ज्ञान सूज्ञांपासून मिळवावें. हें भोजनोत्तर करावें. दोन प्रहरीं हस्ताक्षर वगैरेच्या अभ्यासास सुरवात करावी. आपण कसें लिहितों हें पहाण्यास दोन समवयस्क व कुलीन सोबती असावे. नंतर अंकगणित म्हणजे करदान, वस्तान, गुणाकार, भागाकार शिकावा. गुरुजनांनीं प्रसंगाविशेषीं त्यांची काउनघाडणीहि करावी. परंतु हें सर्व अभ्यासाच्या खोलींतच करावें. इतरत्र सर्वांनीं पेशव्याशीं अदबीनेंच वागावें. या वयांत त्यानें फक्त तिरंदाजी शिकावी व घोडयावर बसण्यास शिकावें. सायंसंध्येनंतर संस्कृत श्लोक म्हणावे. पुरुषसूक्त व पवमान यांचा भाग म्हणावा, पण तो इतरांबरोबर म्हणावा."§ आजच्या शिक्षणांत शारीरिक कसरतीचे खेळ महत्त्वाचे मानले जातात, तसें त्या वेळीं राजकारणी पुरुषांच्या शिक्षणांत बुद्धिबळाचे खेळास महत्त्व असे. " सवाई माधवरावाला नियमानें बुद्धिबळाचा खेळ ' बुद्धीची कसरत व विचारशक्ति ' वाढविण्याच्या इराद्यानें खेळावा लागे. नीतिशिक्षण मिळण्याकरितां गोष्टी श्रवण करण्याची सोय माधवरावाकरितां उत्तम केली होती."*

शिक्षणसाहित्य:—कोणत्याहि विद्येच्या प्रसारास योग्य अशा पुस्तकांची अत्यंत जरूरी असते. परंतु मराठशाहीच्या अमदानींत " मुद्रणकला माहीत नसल्यामुळें पुस्तक ही चीज फार मौल्यवान व दुर्मिळ होती. पुस्तके सामान्यतः शास्त्री, पंडित, पुराणिक, वैदिक, विद्वान जोशी यांजपाशीं असत. त्यांच्या खालोखाल घरंदाज गृहस्थांपाशीं सांपडत."† व्यावहारिक शिक्षणाच्या दृष्टीनें योग्य अशा पुस्तकांची फार मोठी उणीव होती. "नानासहि माधवरावाच्या शिक्षणाची योजना ठरवितांना निरनिराळ्या विषयांवरील पुस्तकांची उणीव भासली.

§ पे. म. ८५-८६ * पे. म. ८५ † पे. म. ९९

जो कांहीं ग्रंथसंग्रह उपलब्ध होता तो संस्कृतांत. मराठींत जी ग्रंथरचना झाली होती ती संस्कृतमधील पौराणिक ग्रंथांच्या पद्यात्मक भाषांतराची अगर रूपांतराची. ओव्या, अभंग इत्यादिकांची रचना स्वतंत्र असे. परंतु तीहि आध्यात्मिक विषयांवरचीच असल्यानें तिचा व्यावहारिक शिक्षणाच्या दृष्टीनें ताद्दश उपयोग नव्हता. संस्कृत भाषेंत साहित्य, संगीत, वेदान्त, न्याय, मीमांसा, व्याकरण, वैद्यक. इत्यादि विषयांवरची ग्रंथरचना पुष्कळ होती. परंतु त्यांचे विषय प्रायः व्यावहारिक विषयांत येत नसल्यानें ज्यांना राज्यकर्तें, मुत्सद्दी, मंत्री, वकील, कारकून या नात्याचा व्यवहार करावयाचा, त्यांची गरज सदर विषयांच्या अभ्यासानें भागण्यासारखी नव्हती. याकरितां क्रमिक–वाचन पुस्तकें तसेच इतिहास, भूगोल, गणित, मराठीचें व्याकरण, भौतिक शास्त्रें, भाषाशास्त्र इत्यादि विषयांवरील पुस्तकांची मराठी भाषेंत रचना हें काम फार निकडीचें असून तें नानासारख्या अधिकारसंपन्न पुरुषांसच सवाई माधवरावाच्या निमित्तानें साधावयाचें." §

या धोरणाप्रमाणें नाना फडणवीस यांनीं सवाई माधवराव यांच्या शिक्षणोपयोगी अशीं अनेक पुस्तकें तयार करून घेतलीं. माधवराव यांस पेशवे घराण्याची माहिती मिळून अभिमान वाटेल राज्यकर्ता या नात्यानें जरूर असल्यामुळें नानांनीं त्यांजकरितां पेशव्यांची बखर मुद्दाम लिहविली. तिच्यांत सन १७८२ पर्यंतची म्हणजे सवाई माधवरावापर्यंतची सर्व हकीकत आली आहे. दुसरा ग्रंथ 'नारायण-व्यवहार-शिक्षा' या नांवाचा. हा ग्रंथ शिक्षात्मक आहे. शास्त्रात्मक नाहीं. त्यांत व्यवहारोपयोगी, अनुभवजन्य हितोपदेश सांगितला आहे. त्याचप्रमाणें पेशव्यास बोधपर, मनोरंजक व पौराणिक गोष्टी वाचावयास सांपडाव्या व त्यास मोडी वाचनाचाहि सराव व्हावा म्हणून त्यांनीं (नानांनीं) मुद्दाम भारत व भागवत यांच्या सारांशरूपानें मराठींत बखरी लिहविल्या. आणि वेताळपंचविशी व शुकबहात्तरीप्रमाणें सात्रिकाशतक नामक चमत्कारिक गोष्टींचा ग्रंथ रचविला.†

वाचनासाठीं पुस्तकांप्रमाणें हस्तलिखितांचाहि उपयोग करण्यांत येत असे. विशेषतः निरनिराळ्या वळणांचें मोडी अक्षर सफाईनें वाचण्याची संवय होण्यासाठीं विद्यार्थ्यांना लिखितें वाचावयास देत व तशा तऱ्हेच्या निरनिराळ्या वळणांच्या व सुबोधदुर्बोध लिखितांचा संग्रहही करण्यांत येत असे.

§ पे. म. ८३ † पे. म. ८३–८४.

नारायणराव पेशव्यानें गंगापुरास असतांना सन १७६५ मध्यें नानास एक पत्र लिहून "लिखितें वाचावयाकरितां थोर थोर शेपन्नास पावेतों जरूर" पाठविण्यास सांगितलें. (पे. द. ३२.)

रामायण, महाभारत या ग्रंथांचाही शिकविण्याच्या कामीं उपयोग करण्यांत येत असे.* शिवाजीमहाराजांच्या शिक्षणांत या ग्रंथांतील गोष्टींनाच विशेष प्राधान्य होतें. या दोन ग्रंथांतील गोष्टींप्रमाणें पंचतंत्र, हितोपदेश यांमधील गोष्टींचाहि शिक्षणाच्या कामीं उपयोग करण्यांत येत असे.

शाळेंत प्रवेश झाल्याबरोबर मुलांना प्रथम जमिनीवर वाळू पसरून त्यावर बोटानें अक्षरें काढावयास लावीत. हीं अक्षरें सहज काढावयाची संवय झाल्यानंतर मुलांना लेखन शिकविण्यासाठीं धूळपाट्या व कागद यांचा उपयोग करण्यांत येत असे. आजच्याप्रमाणें पाट्या व पेन्सिली त्यावेळीं नव्हत्या. एकाद्या एक फूट रुंद व तीन फूट लांब अशा गुळगुळीत फळीच्या तुकड्यावर वस्त्रगाळ केलेली कोळशाची पूड पसरून त्या फळीवर काडीनें अक्षरें घटवीत व आंकडे मांडून अंकगणित करण्यांत येई. लिहिण्याचे बाबतींत बरीच प्रगति झाल्यानंतर मग अक्षर वळणदार करण्यासाठीं कागदावर पुस्त्या काढून घेत. प्रत्येक मुलाचें अक्षर चांगलें वळणदार करण्यासाठीं अतिशय मेहेनत घेण्यांत येत असे. मागें उद्धृत केलेल्या गोपिकाबाईच्या पत्रांत 'दोन प्रहरीं हस्ताक्षर वगैरेच्या अभ्यासास सुरुवात करावी' वगैरे उपदेश केलेला आहेच. हें अक्षर वळणदार होण्यासाठीं कित्तेहि देण्यांत येत असत. सन १७८१ मध्यें त्रिवलकरी कित्ता सर्वमान्य झाला असल्याचा दाखला सांपडतो. (ऐ. ले. सं. भा. ७ वा पे. म. ८०.)

अक्षरें कागदावर घटविण्यासाठीं बोरूच्या लेखण्यांचा उपयोग करण्यांत येत असे. चांगली लेखणी केलेली असल्यावांचून चांगलें अक्षर येणें शक्य नसल्यामुळें, चांगली लेखणी करतां येणें ही एक कलाच समजली जात असे. एकाची लेखणी दुसऱ्यास चालत नसे. "ज्यांच्या अक्षराचें वळण एक त्यांच्याच लेखण्या परस्परांस चालावयाच्या. म्हणून नारायणरावास लेखण्याहि गंगापुरास असतां पुण्याहूनच मागविणें भाग पडे."§ ह्या लेखण्यांचीं टोकें मोडूं नयेत म्हणून त्या नळकांड्यांत ठेवीत असत.

---

*E. R. I. P. ८७. § पे. म. ८०

लेखनासाठीं शाई विशिष्ट प्रकारें करावी लागे. "आधीं धान्याचे शिरें बनवावे व गोडया तेलाच्या समईचें काजळ धरून तें त्यांत घोटावें तेव्हां शाई तयार व्हावी. इतक्या मेहनतीचें हें काम सहजासहजीं कोठेंहि व केव्हांहि होण्यासार नें नसल्यामुळें शाईचा धंदा करणारे रक्तवान असत. गांवांतल्या गांवांत असो पण परगांवीं अशी शाई पाठविणें फारच अवघड. जे लोक स्वारीवर असत त्यांचे शाईवांचून नडे, तेव्हां ते आपणांस लागणारी शाई पुण्यासारख्या ठिकाणीं मुजरद स्वार पाठवून त्याजमार्फत "§ चंबू भरून आणवीत.

टिपकागदाचें काम बारीक रेतीस करावे लागें. अजूनहि व्यापारी लोक रेतीचाच उपयोग करतात हें अनेकांनीं पाहिलें असेल.

चांगल्या अक्षराला फार किंमत असे. " मुलांची हुषारी त्यांच्या अक्षरांवरून ठरावी. नवरा मुलगा कोणी पहावयास गेलें तर त्याचें हस्ताक्षर ते मुद्दाम मागवून घेत. कारण कारकुनाच्या उदयाची बरीचशी भिस्त त्याच्या अक्षरावरच. कोणाचाहि अनुकूल ग्रह अक्षर पाहूनच व्हावयाचा. त्या काळीं हल्लींप्रमाणें परीक्षा नव्हत्या व त्या परीक्षांवर पगाराची इयत्ता व बढती ही अवलंबून नव्हती. कारकून टाकाचा धड व हिशेबाचा पक्का असला म्हणजे केवळ अंगच्या हुषारीनें व व्यवहारज्ञानानें कारभाऱ्याच्या हुद्यापर्यंत चढावयाचा. नाना फडणीस, सखाराम बापू या मुत्सद्यांचा उत्कर्ष अशा रीतीनें झाला."* पेशवे कुलांतील अनेक पुरुषांच्या हस्तक्षराला चांगलें वळण लागावें म्हणून विशेष काळजी घेतलेली दिसून येते.

शिक्षणविषयक साहित्यांत आजच्याप्रमाणें त्या वेळीं 'कित्ते व नकाशे' यांचा समावेश झालेला होता; परंतु त्यांचा उपयोग श्रीमंतासांठींच असे. छापण्याची कला नसल्यामुळें कित्ते व नकाशे सामान्य माणसास मिळणें महाकठीण होतें.

शिक्षणाचें वयः—" शिक्षण लष्करी असो किंवा व्यावहारिक असो, तें एकाच वयात देण्याची पद्धत होती. इतकेंच काय पण याच शिक्षणाबरोबर सुखवस्तु ब्राह्मणांच्या मुलांस दुपारीं भोजनोत्तर घरच्या भटजीपाशीं बसून ब्रह्मकर्माचेहि पाठ घ्यावे लागत. किंबहुना असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, मुलगा ५ । ६ वर्षांचा होतांच त्याला बाळबोध-मोडी लेखन-

§ पे. म. ८० * पे. म. ७९

वाचन, उजळणी, हिशेब इत्यादिकांचे धडे क्रमानें देत असतांच त्याच्या व्रत-बंधाची वेळ यावी. ती आल्यावर स्नानानंतर व भोजनोत्तरहि त्यानें गुरूजीपाशीं बसून संध्या, पुरुषसूक्त, सौर, रामरक्षा, त्रिसुपर्ण,पूजा, रूपावली, समासचक्र शिकावें, आणि बाकीच्या वेळांत सकाळीं व तिसरे प्रहरीं आपला पंतोजीजवळचा अभ्यास करावा. या शिक्षणक्रमांत वाढत वाढत मुलगा दहाव्या वर्षाच्या घराला आला म्हणजे त्याला तालमींत घालावें व पुढें हळू हळू लष्करी शिक्षणांत तरबेज बनवावें. अशा रीतीनें वयाची पंधरा सतरा वर्षें झाल्यावर मुलगा कर्ता व प्रौढ समजला जाऊन तो कुटुंबाचा भार उचल-ण्यास व संसार चालविण्यास समर्थ ठरत असे."* हा विद्येचा भाग ब्राह्म-णांतील सरदार घराण्यांतील मुलांच्या बाबतींतील आहे, हें स्पष्ट सांगण्याची जरूरी नाहीं. मराठे सरदारांचीं मुलें शिकलीं तर थोडें लिहिणें-वाचणें व कांहीं हिशेब. त्यांच्या आयुष्यांत इतक्या रेखीव मार्गानें अभ्यास होणेंच कठीण.

सामान्य वर्गाच्या अभ्यासक्रमाविषयीं माहिती उपलब्ध नाहीं; परंतु आत्मसंरक्षणाची जबाबदारी त्याला शक्य तितक्या लवकर त्या धामधुमीच्या काळांत पत्करावी लागत असे, यांत कांहीं शंका नाहीं. मुलांमुलींचीं लग्नें बालपणांत होत असल्यामुळें, बहुतेक १५–१६ वर्षांपासूनच तो संसाराला लागत असे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

गांवठी शाळा:—श्रीमंत सरदार मंडळी आपल्या मुलांना घरीं खाजगी अध्यापक ठेवीत, हे मागें सांगितलें आहे. त्यांनाहि आपल्या मुलांचा अभ्यास उत्साहानें चालू रहाण्यासाठीं त्याजबरोबर कोणी चढाओढ करणारीं इतर मुलें भेटलीं तर तीं हवीच असल्यानें त्याच्या घरगुती शिक्षणाचा फायदा इत-रांनाहि सहजच मिळत असे.§ परंतु या लक्ष्मीपुत्रांखेरीज मोठ्या गांवांत शिक्षणाविषयीं ज्यांना थोडें प्रेम आहे, अशा जातींचीं म्हणजे वाणी-उदमी, सोनार-शिंपी यांचीं शिकाऊ मुलें पांचपंचवीस असावयाचींच. ही सार्वत्रिक गरज भागविण्याजोगा एकादा माणूस गांवांत असे व तो पंतोजीपणा करून त्यावर आपला प्रपंच चालवी. अशा पंतोजीनें चालविलेल्या गांवठी शाळां-मधून या शिक्षणाभिरुची असलेल्या सामान्य वर्गाच्या मुलांचें शिक्षण होत असे. या गांवठी शाळा मुसलमानांच्या अमदानींत प्रतिकूल परिस्थितीशीं

* पे. म. ५९–६०. § पे. म. ५९.

झगड्न राहिल्या. शिवाजी महाराजांच्या काळांही त्या अबाधितपणें आपलें कार्य करीत होत्या व पेशव्यांच्या अमदानींतहि पूर्वीच्याच गतीनें व पूर्वीच्याच पद्धतींनें वाटचाल करून विद्यादान यथाशक्ति करीत होत्या. येवढेंच नव्हे तर मराठशाहीची इतिश्री होऊन ब्रिटिशांचा अम्मल सुरू झाल्यानंतरहि या गांवठी शाळा पुराणपद्धतीनें, मर्यादित क्षेत्रांतील, शिक्षणप्रसाराचें काम अव्याहतपणें करीत होत्या. या गांवठी शाळांतील पंतोजी कोणत्या रंगरूपाचे होते, त्यांच्या शिक्षणाचा दर्जा काय होता, अध्यापनाची पद्धति कशी होती व या शिक्षकांचा योगक्षेम कसा चालत होता, याचें वर्णन येथें करण्याचें योजिलें आहे.

शिक्षकः——गांवठी शाळांत पंतोजीपणा करणारा इसम गांवांतील जोशीपणा करणारांपैकीं बहुतेक असावयाचा. त्याचें स्वतांचें शिक्षण साधारणपणें तुटपुंजें झालेलें असे. अनेक वेळ विद्यार्थ्यांना शिकविण्यासारखें ज्यांच्याजवळ कांहीं नाहीं असे गृहस्थ शिक्षकाचें काम करतांना दिसत.† अशा शिक्षकांपेक्षां अधिक विद्वान् ब्राह्मण गांवांत अनेक असले म्हणजे साहजिकच शिक्षकाविषयीं गांवातील लोकांना मुळींच आदर वाटत नसे. या गांवठी शाळेंतील शिक्षक पूर्वपरंपरेला धरून, त्यांना ज्या पद्धतीनें विद्या प्राप्त झाली त्याच पद्धतीनें, मुलांना शिकविण्याचें कार्य करीत. मुलांच्या मनाच्या योग्य तऱ्हेनें विकास कोणत्या तऱ्हेनें होईल, असा विचारहि त्यांच्या मनास शिवत नसे.

वेतनः——चांगले विद्वान् अगर पढिक शिक्षक गांवठी शाळेला न लाभण्याचें महत्त्वाचें कारण म्हणजे तुटपुंजें वेतन हें होय. गांवठी शाळेंतील मुलें बहुतेक गरीब स्थितींतील असल्यामुळें व त्यांची संख्याहि कमी असल्याकारणानें शिक्षकांस मिळणारा मोबदला फारच अल्प असे. प्रत्येक विद्यार्थी दरमहा चार ते सहा आणे किंवा आठ आणे फी देत असे व याप्रमाणें शिक्षकास दरमहा सहा अगर सात रुपयांपेक्षां अधिक वेतन मिळत नसे व त्यामुळें अधिक लायकीच्या लोकांना या धंद्यांत पडावेसें वाटत नसे. शिक्षकवर्गाच्या सर्वसाधारण अज्ञानामुळेंहि अधिक मुलें शाळेंत येत नसत असें म्हणावयास हरकत नाहीं. परंतु शिक्षणाची निकृष्टावस्था असण्याचें मुख्य कारण म्हणजे मागणी

† E. R. I. 147.

कमी असल्यामुळें व लोकांच्या गरिबीमुळें शिक्षणाला मुळींच उत्तेजन मिळत नसे.* शिक्षणाला वेतन कधीं रोख रूपानें मिळत असे, तर कांहीं विद्यार्थी धान्य अगर कापडचोपड या रूपानेंहि देत असत. आपल्या जातीच्या कांहीं विद्यार्थ्यांकडून भोजनाचे रूपानेंहि शिकवणीचा मोबदला मिळत असे. कांहीं शाळांना सरकारकडूनहि नक्त नेमणूक अगर धारामाफ जमीन मिळत असे. एकंदरींत गांवठी शाळांवरील शिक्षकांचा योग्य तऱ्हेनें उदरनिर्वाह होण्यास मुळींच कांहीं अडचण नसे.

शिक्षण—अशा शाळांतून विद्यार्थ्यांना लिहिणें, वाचणें, अंकगणित व हिशेब वगैरेचें शिक्षण मिळत असे. या शिक्षणामुळें गांवांतील जमीनदार, तलाठी व दुकानदार यांच्या गरजा भागत असत. शिक्षणाची पद्धत अगदींच पुरातन प्रकारची असे. त्या शिक्षणाचें नीतिशिक्षण हें एक अंग समजलें जात नसे हा एक त्यांत दुःखप्रद दोष असे व हा दोष असण्याचें कारण शिक्षकांनाच योग्य तें नीतिशिक्षण मिळालेलें नसें. एकंदरींत त्या वेळची ही शिक्षणपद्धति दुबळीच व परिणामशून्य स्वरूपाची होती असें दिसतें.§

शाळेंतील अंतर्व्यवस्था:—गांवठी शाळांतील अंतर्व्यवस्थेसंबंधीं व शिकविण्याच्या पद्धतीसंबंधीं बल्लारीचा कलेक्टर कॅंबेल यानें ता. १७-८-१८२३ रोजीं पाठविलेल्या पत्रांतील खालील उतारा महत्त्वाचा आहे.

"हिंदु तरुणांचें शिक्षण, ते पांच वर्षांचे झाल्यानंतर साधारणपणें सुरू होतें. तें वय पूर्ण झाल्यानंतर, ज्या शाळेंत त्या मुलास पाठवावयाचें असतें त्या शाळेंतील शिक्षकांस व विद्यार्थ्यांस त्या मुलाच्या घरीं बोलविण्यांत येतें. गणेशमूर्तीच्या भोंवतीं सर्व एका वर्तुळांत बसतात व ज्या मुलास नवीन शाळेंत घालावयाचें त्यास मूर्तीसमोर बसविण्यांत येतें. शिक्षक त्या मुलाशेजारीं बसून, धूप वगैरे जाळल्यानंतर व नैवेद्य दाखविल्यानंतर त्यास गणेशास उद्देशून ज्ञानप्राप्तीस्तव एक प्रार्थना म्हणावयास लावतो. नंतर तांदूळ पसरून त्यावर त्या मुलाचा हात धरून त्याच्या बोटानें 'श्रीगणेशा' असें देवाचें नांव काढण्यांत येतें व मग गुरूला दक्षिणा देऊन त्याला रजा देण्यांत येते. दुसऱ्या दिवसापासून त्या मुलाच्या शिक्षणकार्यास सुरवात होते.

---

* E. R. I. P. 73 § E R. I. P. 28, 25

"कांहीं मुलें शाळेंत फक्त पांच वर्षें रहातात व त्यानंतर पालकांना गरिबीमुळें किंवा इतर कांहीं परिस्थितीमुळें मुलांना शाळेतून काढून घेणें भाग पडतें. त्यामुळें त्या मुलांना तुटपुंजें शिक्षणच मिळतें. पालक आपल्या मुलाच्या शिक्षणासंबंधीं आस्था बाळगतात व ज्यांना आर्थिक दृष्ट्या शक्य आहे, अशा पालकांचीं मुलें चवदा अगर पंधरा वर्षांचे होईपर्यंत शाळेंत जातात.

"तुरळक अपवादानें व अल्पशा फेरानें सर्व शाळांतील दररोजचा कार्यक्रम जवळ जवळ एकाच ठशाचा असतो. शाळा साधारणपणें सकाळीं ६ वाजतां उघडण्यांत येते. शाळेंत पहिल्या येणाऱ्या मुलाच्या हातावर मानचिन्ह म्हणून विद्यादेवी सरस्वतीचें नांव काढण्यांत येतें; दुसऱ्या येणाऱ्या मुलाच्या हातावर तो स्तुतीस अगर शिक्षेस पात्र नाहीं, अशाबद्दलची खूण करण्यांत येते. जो मुलगा तिसरा येईल त्याला हलके एक छडी मारण्यांत येते. चवथ्यास दोन छड्या व याप्रमाणें प्रत्येक पुढील नंबरास एक अधिक याप्रमाणें छड्या देण्यांत येतात. गांवठी शाळेंतील ही पद्धत व शिक्षा देण्याची रीत फार कडक स्वरूपाची वाटते. आळशी विद्यार्थ्यांस चोप देण्यांत येतो किंवा त्यांना पट्टईला हात बांधून टांगून घोडी देण्यांत येते किंवा आंगठे धरावयास अगर उठाबशा काढावयास लावतात. ही शिक्षा दुःखदायक असली तरी शरीरसामर्थ्यास पोषक-स्वरूपाची आहे.

"सर्व मुलें जमल्यानंतर त्यांच्या संख्येप्रमाणें व शिक्षणांतील कमीजास्त प्रगतीप्रमाणें वर्गवारी करण्यांत येते. खालच्या वर्गांतील मुलें उपगुरूंच्या देखरेखीखालीं असतात. वर्गावर देखरेख करीत असतांना शिक्षकाचें सर्व वर्गावर लक्ष असतें. शाळेंत सामान्यतः चार वर्ग असतात व विद्यार्थी आपल्या मगदुराप्रमाणें व शिक्षणांत प्रगति होईल त्याप्रमाणें खालच्या वर्गांतून वरच्या वर्गांत जातो. शाळेंत प्रवेश केल्यानंतर अक्षरओळख करून घेणें हें विद्यार्थ्यांचें पहिलें काम व ती ओळख तो युरोपियन राष्ट्राप्रमाणें अक्षरें उच्चारून न घेतां आपल्या बोटानें जमिनीवरील वाळूंत तीं अक्षरें काढावयास शिकून करून घेतो. याप्रमाणें वाळूवर बोटानें अक्षरें काढण्यांत तरबेज झाल्यानंतर त्याला ताडपत्रावर लोहशलाकेनें अगर कागदावर बोरूनें लिहिण्याचा हक्क प्राप्त होतो.

"पूर्ण अक्षरओळख झाल्यानंतर सामासिक व स्वरव्यंजनांच्या संयोगानें होणारे शब्द लिहिण्यास आणि शब्दावयव व नंतर माणसांचीं. गांवांचीं व

प्राण्यांचीं नांवें जुळविण्यास शिकविण्यांत येतें व अखेर अंकगणितांतील खुणा पटविण्यांत येतात. नंतर लहान लहान रकमांच्या बेरजा, वजाबाक्या, गुणाकार भागाकार वगैरे शिकविण्यांत येतात. आंकड्याचे अपूर्णांक शिकविण्याचें काम अतिशय काळजीपूर्वक करण्यात येतें, व या सर्व गोष्टी मुलांच्या चांगल्या लक्षांत रहाव्या म्हणून त्या सर्वांना उभे करून उपगुरूच्याप्रमाणें प्रत्येक मुलाला परोचा म्हणावयास लावण्यांत येतें.

"गांवठी शाळांतील दुसरें शिक्षण म्हणजे मुलांना शिक्षकानें अनेक ठिकाणांहून संग्रहित केलेल्या हस्ताक्षरांचे निरनिराळे नमुने देऊन ते वाचावयास लावतात. पत्रें लिहिण्यास, करारनाम्याचे मसुदे करण्यास, काल्पित व पौराणिक गोष्टी वाचण्यास शिकवितात. तसेंच शब्दोच्चार स्पष्ट होण्याचे हेतूनें व कोणतेंहि लिखाण तावडतोब व बरोबर वाचतां यावें, या इराद्यानें कविताहि पाठ करून घेण्यांत येतात.

"सर्व शाळांतून विशेष व सरसकट महाभारत, रामायण व भागवत या तीन ग्रंथांचा उपयोग करण्यांत येतो व तसेंच गोष्टींसाठीं पंचतंत्राचा उपयोग करण्यांत येतो."

याच बाबतींत सन १८८२ सालीं हंटर कमिशनच्या मुंबई प्रांतिक कमिटीच्या रिपोर्टांतील पा. ७३ वर दिलेलें पुढील वर्णनहि वाचण्यासारखें आहे.

"हिंदू गांवठी शाळेंतील दैनंदिन कार्यक्रमहि सर्व इलाखाभर बहुतेक एकाच नमुन्याचा असतो. बहुशः ब्राह्मण जातीचा व शाळेंत येणाऱ्या मुलाच्या घरीं जोशीपणाचें काम करणारा पंतोजी दररोज सकाळीं ६ वा. गांवभर हिंडून मुलें गोळा करतो. या कामांत बराच वेळ जातो. एकादे ठिकाणीं शाळेंत येण्याबद्दल मुलाचें मन वळवावें लागतें; दुसरें घरीं मुलाच्या उनाडपणाबद्दल पालकांना पंताजीला काहीं सूचना कराव्या लागतात; तिसरे घरीं तेथल्या तेथें मुलांना शासन करण्याबद्दल सांगण्यांत येतें. याप्रमाणें पुरेशीं मुलें जमल्यानंतर त्यांना शाळेंत नेण्यांत येतें. प्रथम अर्धा तास एकादी भूपाळी, सूर्य, सरस्वति, गणपति अगर इतर देवतांची स्तुतीपर कवन अगर स्तोत्र म्हणण्यांत येतें. नंतर मुलांच्या मनगटांना व बोटांना सवय व्हावी म्हणून व अक्षराचें वळण कळावें म्हणून त्यांना फिऱ्यावरील अक्षरांवरून कोरडी लेखणी फिरविण्याचा अभ्यास करावा लागतो. याप्रमाणें अक्षरें गिरवणें संपल्यानंतर मुलें पुस्त्या काढण्यास सुरुवात करतात. इतका वेळ फक्त पहाण्याचें काम करणारीं

लहान मुलें गुरुपुत्राच्या अगर वरच्या वर्गांतील विद्यार्थ्यांच्या, शिकविण्यासाठीं ताब्यांत देण्यांत येतात. शिक्षक ज्येष्ठ मुलांपैकीं एखाद्या दुसऱ्या मुलाच्या अगर ठराविक कालांत ज्याचें शिक्षण करण्याचें कबूल केलें आहे अशा विद्यार्थ्याच्या शिक्षणाकडेच साधारपणें लक्ष देतो. सर्व मुलांना एखाद्या लहान खोलींत अगर ओटीवर बसविण्यांत येतें व एकाच वेळीं अनेक मुलांच्या वाचण्यामुळें व ओरडण्यामुळें जो कल्ला उसळत असतो, त्याचें वर्णनहि करतां येत नाहीं."

अन्योन्य अध्यापनः—या गांवठी शाळांतून खालच्या वर्गांतील विद्येंत मागासलेल्या विद्यार्थ्यांना वरच्या वर्गांतील अगर शिक्षणांत पुढारलेल्या मुलांमार्फत शिकविण्याची फार प्राचीन काळापासून चालत आलेली एक पद्धत सुरू होती. या पद्धतीला इंग्रजी शिक्षणतज्ज्ञांनीं अन्योन्य-अध्यापनपद्धति (Mutual instruction) असें नांव दिलें आहे. या पद्धतीच्या चांगुलपणाबद्दल अनेक इंग्रज अधिकाऱ्यांनीं प्रशंसेचे उद्‌गार काढले आहेत.¶ येवढेंच नव्हे तर बेल नांवाचे एक गृहस्थ मद्रासमध्यें १७८९ पासून १७९६ पर्यंत वास्तव्य करून असतांना त्यांनीं या पद्धतीचें अवलोकन करून, इंग्लंडमध्यें गेल्यावर त्यांनीं तिकडेहि या पद्धतीचा अवलंब करावा म्हणून जोराचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन इंग्लंडमध्यें शिक्षणप्रसाराच्या कामीं या पद्धतीचा कांहीं काल उपयोगहि करण्यांत आला. कोणतीहि पद्धत अमलांत आणल्यानंतर तिच्यापासून होणाऱ्या बऱ्या वाईट परिणामांचें चिकित्सकदृष्ट्या अवलोकन करणें हा इंग्रज लोकांचा स्वभावविशेष आहे. 'बाबावाक्यं प्रमाणम्' म्हणून आंधळेपणानें ते कोणत्याहि परंपरेला चिकटून रहात नाहींत व म्हणूनच त्यांचें पाऊल प्रगतिपथावर जलदगतीनें पडत असतें. हिंदुस्थानांत स्मृति-कालापासून रूढ असलेल्या या अन्योन्य-अध्यापनपद्धतीचें अनुभवाच्या कसोटीवर परीक्षण केल्यानंतर, त्या पद्धतीमुळें घोर परिणाम उद्‌भवतात, असें दिसून आल्यामुळें अधिकारीरीत्या सन १८३९ मध्यें ती त्याज्य ठरविण्यांत आली, व त्यानंतर बहुतेक शिक्षणतज्ज्ञांनीं त्या पद्धतीचा निषेधच केला.

¶ See A. D. Cambell, Collector of Bellary's letter dated I7-8-1823 (E. R. I. 67) and also despatch of Directors of the East India Co. d/ 3 rd June 1814 (E. R. I. P. 23).

बाजार-शाळा:—गांवठी शाळांचें वर्णन करतांना अनेक प्रांतांतून चालू असलेल्या बाजारशाळांचा स्वतंत्र निर्देश करणें जरूर आहे. गांवांतील व्यापारी व उदमी यांना धंद्याच्या दृष्टीनें विशेष तऱ्हेच्या शिक्षणाची जरूरी असे. इतर गांवठी शाळांतून सर्वच जातींचीं मुलें असल्यामुळें व्यापाऱ्यांना अवश्य वाटणाऱ्या शिक्षणाची खास व्यवस्था त्या शाळांतून होणें शक्य नसे, म्हणून उदम्यांच्या धंदेविषयक शिक्षणाची स्वतंत्र सोय मोठ्या गांवांत बाजार-शाळा काढून करण्यांत येत असे. या शाळांत जमाखर्च, आंकडे व हुंड्या तयार करणें, खातेवह्या लिहिणें व तोंडचे हिशेब शिकवीत असत. या बाजार-शाळा वस्तुतः व्यापारीशाळा असत व या शाळांतील शिक्षकांना रोख रक-मांच्या रूपानें व ठराविक वेळांत विशिष्ट शिक्षण पुरें करून देण्याच्या करारानें वेतन देण्यांत येत असे. पालकांचा पगारी नोकर असल्यामुळें त्याच्याविषयीं संस्कृत शाळांतील पंडिताला किंवा गावठी प्राथमिक शाळांतील गुरूला ज्या आदरानें वागविण्यांत येत असे, तो आदर दर्शविण्यांत येत नसे.†

शिक्षणप्रसार:—देशांतील शाळांचा व त्यांतील मुलांच्या खानेसुमारी-वरून विद्येचा प्रसार किती झाला आहे, हें पहाण्याची कल्पना मुसलमानी अगर हिंदु राज्यकर्त्यांना कधींच सुचली नाहीं व त्यामुळें ब्रिटिश सत्तेचा हिंदुस्थानांत आरंभ होईपर्यंत, कोणत्या काळांत शिक्षणाचा प्रसार किती झाला वगैरे अजमावण्यास मुळींच कांहीं साधनें उपलब्ध नाहींत. विद्यादानाचें कार्य खाजगी शिक्षक व गांवठी शाळांतील शिक्षक असे दोघेहि करीत होते, हें आपण पाहिलें आहेच. परंतु खाजगी शिक्षक ठेऊन आपल्या मुलांना शिक्षण देण्याची ज्यांची ऐपत आहे असे लोक केव्हांहि अतिशय थोडेच असणार. त्यामुळें अध्यापनाच्या कामाची मोठी व खरी जबाबदारी गांवठी शाळांवरच पडत असे व देशांतील साक्षर लोकांची संख्या मुख्यत्वें त्यांच्याच प्रयत्नाचें फळ असे, यांत कांहीं शंका नाहीं.

ब्रिटिश अंमल सुरू झाल्यानंतर म्हणजे सन १८२० पासून १८३० पर्यंत या गांवठी शाळांची स्थिति, त्यांतील शिकविण्याच्या पद्धतीचें परीक्षण व या शाळांतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचो शिरगणती इंग्रज अधिकाऱ्यांनीं वेळोवेळीं केली असून त्यांनीं गोळा केलेली माहिती अतिशय महत्त्वाची व अनेक गोष्टींवर

---

† हंटर क. रि. पा. ७३

झगझगीत प्रकाश पाडणारी आहे. त्या माहितीच्या आधारें पेशवाईच्या अस्ताच्या सुमारास देशांत विशेषतः महाराष्ट्रांत शिक्षणाचा प्रसार किती झाला होता हें पहाण्याचें योजिलें आहे. येथील राज्यकारभाराचीं सूत्रें इंग्रज लोकांनीं हातांत घेतलीं त्या वेळीं या देशांत शिक्षणाची कोठपर्यंत मजल गेली होती हें निश्चितपूर्वक पाहिल्यानंतर, ब्रिटिशांच्या सुमारें दिडशें वर्षांच्या अमदानींत किती भर पडली हें तुलनात्मक दृष्टीनें नक्की ठरविणें सुलभ होणार आहे. मूळची शिल्लक किती आहे याची मोजदाद केल्यावांचून नवीन अमदानींत ती वाढली का घटली हें कसें ठरवितां येणार? या दृष्टीनें पेशवाईच्या अखेरीस किंवा अधिक स्पष्ट बोलावयाचें म्हणजे ब्रिटिशांच्या अमदानीच्या आरंभीं स्थानिक लोकांच्या परंपरागत चालत आलेल्या शिक्षणपद्धतीमुळें साक्षरतेची चाल कोठपर्यंत गेली होती हें पहाणें अत्यंत जरूर आहे.

मद्रास इलाख्यांत सन १८२२ सालीं १२४९८ गांवठी शाळा होत्या आणि बंगालमध्यें १८३५ सालीं केलेल्या पहाणीप्रमाणें १००२४० शाळा होत्या. मि. फिशर यांनीं १८२७ मध्यें प्रसिद्ध केलेल्या टांचणाप्रमाणें मद्रास-मध्यें १२८५०९४१ लोकसंख्येपैकीं १८८६५० विद्यार्थी शाळेंत शिकत होते; म्हणजे देशांतील ६७ माणसांना एक विद्यार्थी हें प्रमाण पडतें. ही मद्रासमधील शिक्षणाची पहाणी त्या प्रांताचे गव्हर्नर सर थॉमस मन्रो यांच्या हुकुमावरून करण्यांत आली होती. मिळालेल्या माहितीवरून १८२६ सालीं लिहितांना पूर्वीच्या काळीं शिक्षणाची स्थिति अधिक चांगली होती हें त्यांनीं कबूल केलें होतें व पहाणीच्या वेळीं शिक्षणाची स्थिति खालावण्याचें इतर कांहीं कारण नसून, "लढाईंमुळें व इतर कांहीं कारणानुळें लोकवस्ती फिरती रहात असल्याकारणानें एका ठिकाणच्या शाळा कमी होऊन दुसऱ्या ठिकाणीं त्या सुरू होत असत" हें खरें कारण आहे असें स्पष्ट म्हटलें आहे. मुली जवळ जवळ मुळींच शाळेंत जात नसत व पुष्कळशीं मुलें खाजगी तऱ्हेनें शिकत असत. या दोन्ही गोष्टी लक्षांत घेऊन शाळेंत जाण्याला लायक वय झालेल्या पुरुषांच्या लोकसंख्येच्या $\frac{1}{3}$ किंवा $\frac{1}{4}$ इतकीं मुलें शाळेंत जात असावींत असा त्यांनीं अजमास केला होता. येवढेंच नव्हे, तर आपल्या लिखाणाच्या (Minute) तिसऱ्या प्याऱ्यामध्यें "शिक्षणाची खालावलेली स्थिति असली तरी शाळेंत जाणाऱ्या मुलांचें प्रमाण, युरोपमधील बहुतेक देशांतील कांहीं

१८२५ च्या सुमारास मुंबई प्रांतांतील शिक्षणासंबंधीं स्थितिनिदर्शक तक्ता नं. १.

जिल्हा	खेडीं	शाळा असलेलीं खेडीं	शाळा	विद्यार्थी	शिक्षकाची फी वगैरे
अहमदाबाद	९२८	४९	८४*	२६५१	कधीं कधीं फी व कधीं कधीं भोजन.
दक्षिण कोंकण	२२४०	६५	८६	१५००	दरमहा रु. ४ वेतन व भोजन.
खेडा जिल्हा	५७९	...	१३९	...	भोजन व कांहीं विशेषप्रसंगीं—मुलगा शाळा सोडतेवेळीं—रु. ५ ची देणगी
खेडा सदर स्टेशन	...	...	२	२३०	
उत्तर कोंकण	...	...	९	७८०	पालकांकडून निरनिराळा मुशाहिरा.
सुरत जिल्हा	६५५	शेंक. २१ गांवांना शाळा	१३९	३००	जेवण, रोख रक्कम, जमीन.
सुरत शहर	१४२ शिक्षक	...	...	...	दरसाल सुमारें रु. ६० चें धान्य व पैशाच्या रूपानें.
भडोच जिल्हा	३९६	...	९८	...	ठराविक वेतन किंवा मुलांच्या ठराविक प्रगतीप्रमाणें धान्य व द्रव्य.
,, शहर	...	...	१६	३७३	धान्य, दरमहा अल्प फी व मुलांच्या प्रगतीप्रमाणें फी.
खानदेश	२७३८	६८	१८९	२०२२	सरासरीनें दर शाळेस दरसाल रु. ३६ पर्यंत.
पुणें शहर	...	...	२२२	...	
,, जिल्हा	८८०	...	१४९	२४४५	प्रत्येक विद्यार्थ्यामागें द. सा. रु. ३ ते ६ पर्यंत.
अहमदनगर	५६३५	..	१६१	...	दर शिक्षकास सरासरीनें दरमहा रु. ३
धारवाड	१४४१	...	१५०	२३५१	दर शिक्षकास सरासरीनें दरमहा रु. ४ पगार.

* २१ शाळा खुद्द अहमदाबादमध्यें व ६३ शाळा खेड्यांमध्यें

थोडया काळापूर्वी दिसून येणाऱ्या प्रमाणापेक्षां अधिक आहे.,"§ असें निस्संदिग्धपणें नमूद केलें आहे.

बंगालमधील परिस्थिति अतिशय वाईट होती, हें मि. ॲडम यांनीं व्यक्त केलेल्या अभिप्रायावरून म्हणावयास हरकत नाहीं.

मुंबई इलाख्याचे गव्हर्नर यांनींहि सन १८२५ सालीं निरनिराळ्या जिल्ह्यांतील शिक्षणविषयक स्थितीबद्दल खालच्या अधिकाऱ्यांकडून माहिती मागविली. त्या माहितीवरून तयार केलेला तक्ता मागील पानावर दिला आहे. सदर तक्त्याच्या शेवटच्या सदरांत शाळाशिक्षकाला कोणत्या स्वरूपानें मोबदला मिळत असे हेंहि दाखविलें आहे. ती माहितीहि अनेकांना महत्त्वाची वाटेल यांत कांहीं शंका नाहीं. या तक्त्यावरून लोकसंख्येचें विद्यार्थ्यांशीं प्रमाण १३१ ला १ याप्रमाणें पडतें.

निरनिराळ्या वर्गांतील शिकलेल्या लोकांच्या प्रमाणाविषयीं सर थॉमस मन्रोनें पुढीलप्रमाणें लिहिलें आहे. " निरनिराळ्या वर्गांतील शिकलेल्या माणसांचें प्रमाण निरनिराळें आहे. कांहीं वर्गांतील सर्वच माणसें शिकलेलीं आहेत तर कांहींत तें शेंकडा १ सुद्धां पडत नाहीं." ‡ सर मन्रोचें वरील वर्णन मद्रास-मधील शिक्षणविषयक स्थितीबद्दल असलें तरी तें सर्व प्रांतांनाहि बहुतेक तंतोतंत लागू पडण्यासारखें आहे.

---

§ E. R. I. P.47. ‡ E. R. I. P.73

प्रकरण तिसरें

अर्वाचीनकाल

" Education in India under the British Government was fisrt ignored, then violently and successfully opposed, then conducted on a system now universally admitted to be erroneous and finally placed on its present footing."

ARTHUR HOWELL

(Education in British India).

The Energy of Government was required....for techanical and village schools and was wasted on the production of graduates.

ARTHUR MAY HEW

The Education of India, p. 76.

ईस्ट इंडिया कंपनी प्रथम व्यापार करण्यासाठीं हिंदुस्थानांत आली असली तरी लवकरच इंग्रज व्यापाऱ्यांना तराजू टाकून तलवार हातीं घ्यावी लागली. हिंदुस्थानांतील नाना धर्म, नाना जाती, अंतःकलह, राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा अभाव वगैरे परकीयांना अनुकूल अशा कारण समुच्चयांमुळें हलके हलके निरनिराळे प्रांत त्यांच्या सत्तेखालीं जावयास लागून थोडक्याच काळांत मोंगलशाही व हिंदुपदपातशाही पूर्णपणें नामशेष झाल्या. परसाचे एकादे कोपऱ्यांत टीचभर आळ्यांत टाकलेल्या चार बियांना पोषक परिस्थितीचा पाठिंबा मिळतांच अंकूर फुटून त्यांनीं थोडयाच वेळांत त्या परसांतील सर्व मांडव पार झाकून टाकावा, अशीच गत ब्रिटिश सत्तेच्या झपाटयानें झालेल्या वाढीबाबत झाली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सन १६०८ सालीं चार दोन व्यापारी मोंगल बादशहा जहांगीरकडून परवानगी मिळवून हिंदुस्थानांतील एका शहरांत येऊन वखार घालतात काय व सन १६०८ मधील या चारदोन व्यापाऱ्यांचे वंशज हिंदुस्थानचे सत्ताधीश होतात काय ! कल्पित कादंबरीपेक्षांही अधिक अद्भुत, आश्चर्यकारक घटना इतिहासानें करून दाखविली यांत कांहीं शंका नाहीं.

ब्रिटिश सत्ता या देशांत प्रस्थापित व्हावयास लागल्यापासून ते आजतागायतच्या सुमारें दीडशें वर्षांच्या काळांत इंग्रज राज्यकर्त्यांचें शिक्षण-विषयक धोरण काय होतें, त्यांत वेळोवेळीं कमीजास्त फेरबदल कसे झाले, व या काळांत शिक्षणाचें पाऊल किती पुढें पडलें, याचा विचार करणें जरूर आहे. हा विचार करतांना विवेचनाच्या सोयीच्या दृष्टीनें व शिक्षणविषयक धोरणाला वेळोवेळीं जें विशिष्ट वळण लागलें त्याचे अनुरोधानें आपणांस या कालाचे चार खंड पाडतां येतात. सन १६५९ पासून १८५४ अखेर पहिलाखंड, सन १८५४ ते १८८३ दुसरा खंड, सन १८८३ ते १९२२ तिसरा खंड, व सन १९२२ पासून ते १९३७ चतुर्थ खंड, अशा या प्रत्येक खंडांतील शिक्षण-विषयक घडामोडीचा क्रमवार विचार करूं.

१६५९ ते १८५४.

या कालांतील शिक्षणाच्या इतिहासाचा विचार करतांना बिगर सरकारी प्रयत्न व सरकारी प्रयत्न अशा भिन्न भिन्न शीर्षकानें आपणांस विचार करावा लागेल. आपल्या ताब्यांत आलेल्या प्रांतांतील शिक्षणविषयक परिस्थितीची पाहाणी करून त्यांना थोड्याफार प्रमाणांत मदत करण्याचें पवित्र कार्य प्रथम इंग्रज लोकांपैकीं कांहीं व्यक्तींनींच केलें. आरंभींच्या काळीं प्रजेच्या शिक्षणाची जबाबदारी आपल्यावर आहे, अशी जाणीवच सरकारला नसल्यामुळें शिक्षणाच्या बाबतींत सरकारी प्रयत्नच कांहीं झाले नाहींत यांत मुळींच आश्चर्य नाहीं. सरकारला आपल्या कर्तव्याची जाणीव कधीं व कशी झाली याचा विस्तारपूर्वक उल्लेख कथनाचे ओघांत पुढें येईलच. तूर्त बिगर सरकारी प्रयत्न काय झाले तेच पाहूं.

बिगर सरकारी प्रयत्नः—या देशांतील शिक्षणाचें पाऊल पुढें पडण्यास ज्या अनेक पाश्चिमात्य लोकांचे प्रयत्न कारणीभूत झाले आहेत, त्यांत ख्रिस्ती मिशनऱ्यांचा प्रामुख्यानें कृतज्ञतापूर्वक निर्देश करणें जरूर आहे. कंपनीच्या चालकांनीं (Directors) सन १६५९ च्या खलित्यांत या देशांत हरप्रयत्नानें ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याविषयींची आपली कळकळीची इच्छा प्रकट केल्यावरून त्यांच्या जहाजांतून तो हेतू साध्य होण्यासाठीं, मिशनरी लोकांनाहीं या देशांत येण्याची परवानगी असे. मिशनऱ्यांच्या बाबत एक स्वातंत्र्य कलम सन १६९८ च्या कंपनीच्या सनदे (charter)मध्यें समाविष्ट कर-

ण्यांत आलें होतें. याप्रमाणें या देशांत प्रथम धर्मप्रसाराच्या कामासाठीं आलेल्या मिशनरी मंडळींनी देशांतील लांबलांबच्या गांवांतून जाऊन त्या ठिकाणीं, लोकांना शिकविण्यासाठीं शाळा सुरू केल्या. या शाळांतून लोकांना साक्षर करण्यासाठीं स्थानिक भाषेंतून शिक्षण देण्यांत येत असें. एतद्देशीय गांवठी शाळांतून साधारणपणें वरीष्ठ वर्गांच्याच मुलांना शिक्षण मिळत असें. परंतु मिशनरी शाळांतून निकृष्ट वर्गांतील अज्ञानाविरुद्ध मोहीम सुरू करण्यांत आली. कारण, धर्मप्रसार हें मुख्य ध्येय असल्यामुळें शिक्षणप्रसाराच्या द्वारें खालच्या वर्गांना स्वतःच्या पशूपेक्षांही हीन अशा सामाजिक दर्जाची जाणीव करून देऊन, आपल्या धर्मांत ओढण्याचा मिशनरी लोकांचा मनांतील हेतु होता व तो हेतु थोडाफार सिद्धही झाला. कारण ख्रिस्ती धर्माचा अंगिकार करणारे पहिले लोक खालच्या वर्गांतीलच होते, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

या मिशनरी लोकांनीं एतद्देशीय लोकांच्या भाषा शिकून, बायबलचीं स्थानिक भाषांतून भाषांतरें व इतरही पुस्तकें तयार करून, शिक्षण प्रसाराच्या कार्यास फार जोरानें चालना दिली. त्यांनीं चिकाटीनें प्रयत्न करून ठिकठिकाणीं शाळा काढल्या. मद्रास इलाख्यांतील शिक्षणप्रसारार्थ शाळा सुरू करण्याचे कामीं रे. स्वार्ट्झ (Swartz) याचे प्रयत्न विशेष स्मरणीय आहेत. स्वतः प्रयत्न करून न थांबतां त्यानें, तंजावरच्या व इतर दोन संस्थानांच्या अधिपतींच्याकडे जाऊन व त्यांचीं मनें वळवून त्यांच्या राजधानीच्या गांवीं इंग्रजी शिक्षणाच्या शाळा त्यांच्या मदतीनें सुरु करविल्या. मद्रासमध्यें युरेजियन लोकांच्या शिक्षणासाठीं कैक वर्षें अनेक शाळा होत्या. त्यांपैकीं १७८६ सालीं ...मिलिटरी आर्फनेज आसेलम...या नांवानें प्रसिद्ध असलेल्या संस्थेंत, डॉ. बेलनें प्रथम अनुसरलेली गांवठी शाळांतील परस्पर अध्ययन (mutual instruction) ची पद्धती आमलांत आणण्यांत आली होती. या संस्थेंत कांहीं देशी लोकांनाही शिक्षण देण्यांत येत असें. सन १७९० सालीं ... ख्रिस्ती ज्ञानाच्या उत्तेजनासाठीं,...खटपट करणाऱ्या सोसायटीनें तंजावर येथें देशी लोकांना शिक्षण देण्यासाठीं शाळा काढली. मद्रास सरकारनें या शाळेला व रे. स्वार्ट्झ यांनीं काढलेल्या दुसऱ्या एकदोन शाळांना आर्थिक मदत केली. सन १८३४ मध्यें अमेरिकन बोर्डाच्या मिशनरी लोकांनीं मदुरा जिल्ह्यांत प्राथमिक शिक्षणासाठीं अनेक शाळा काढून मदुरा येथें इंग्रजी शिकविण्याची एक शाळाही सन १८३५ नंतर अनेक वर्षें चालविली. सन १८३७ सालीं दक्षिण हिंदु-

स्थांनांतील स्कॉटिश मिशनचे पाहिले मिशनरी मि. ॲंडरसन यांनीं मद्रासमध्यें एक शिक्षणसंस्था काढली. सदर संस्थेचा उद्देश पाश्चिमात्य पद्धतीचें शिक्षण देशी लोकांना इंग्रजी भाषेंतून देणें हा होता. या संस्थेला आरंभापासून चांगला लोकाश्रय मिळाल्यामुळें लवकरच या संस्थेच्या अनेक शाखा निरनिराळ्या ठिकाणीं काढण्यांत आल्या. स्कॉटिश चर्चचें अनुकरण इतर मिशनरी संस्थानीं लवकरच करून १८४१ सालीं चर्च मिशनरी सोसायटीनें मच्छली पट्टण येथें आपलें कॉलेज सुरू केलें व जेसुइट फादर्सनीं आपलें कॉलेज १८४६ सालीं नागापट्टम येथें स्थापन केलें. या प्रत्येक संस्थावर अवलंबून असलेल्या पुष्कळ प्राथमिक शाळांही असत. चर्च मिशनरी आणि प्रोपोगेशन सोसायटयांचा शिक्षणकार्याचा झपाट्यानें तिनेव्हेली व तंजावर प्रांतांत प्रसार झाला. सन १८५४ मध्यें केलेल्या पहाणीप्रमाणें मिशनरी संस्थांनीं चालविलेल्या प्राथमिक शाळांतून सुमारें ३०००० मुलें शिक्षण घेत होतीं व त्यांपैकीं सुमारें ३००० मुलांना इंग्रजी मधून प्रगमनशील शिक्षणाचीं स्थूल तत्त्वें शिकविण्यांत येत होतीं.

बंगालमध्येंही मार्शमन वगैरे मिशनऱ्यांनीं अनेक शाळा चालूं केल्या होत्या. 'मेरीज चिनसुरा शाळा' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या शाळांची संख्या बंगालमध्यें सन १८१६ चे सुमारास, तीसपर्यंत गेली होती व त्यांतून सुमारें २००० विद्यार्थी शिक्षण घेत होते.§

मुंबई प्रांतांत सुद्धां अनेक मिशनरी शाळा ज्ञानदानाचें पवित्र कार्य करीत होत्या. वेस्टर्न इंडियामध्यें पोर्तुगीज लोकांची सत्ता असतांना त्यांच्यांतील धर्मोपदेशकांनीं शिक्षण देण्याची पूर्णपणें संघटित अशी व्यवस्था केली होती व तिची वाढही मराठ्यांनीं त्यांना हुसकून लावीपर्यंत होत होती. फ्रॅन्सिकन व जेसुइट लोकांनीं स्थापन केलेली अनाथगृहें व कॉलेजेस् १७५० च्या पूर्वी बंद करण्यांत आलीं. परंतु पोर्तुगीज प्रांतांतील पाद्री (Parish) शाळा, पोर्च्युगीज सत्ता नाहींशी झाली तरी पुढें तग धरून तशाच राहिल्या.

महाराष्ट्राच्या राजधानींत ब्रिटिश सत्ता आसनस्थ झाल्यानंतर मिशनरी चळवळीची एकच लाट उसळली. अमेरिका, इंग्लंड, आयर्लंड, स्कॉटलंड या देशांच्या धार्मिक संस्थांनीं नवीन झालेल्या प्रांतांत शाळा उघडण्यासाठीं एकमेकांशीं चुरशीची स्पर्धाच चालू केली. सन १८१४ मध्यें अमेरिकन मिशननें मुंबई येथें मुलांसाठीं शाळा उघडली व सन १८२४ मध्यें वेस्टर्न इंडियामधील

§ E. R. I. P. 45

पहिली मुलींची शाळा सुरू केली. याच संस्थेनें अहमदनगर जिल्ह्यांत विशेष यशस्वी प्रयत्न करून अनेक शाळा उघडल्या व त्यांपैकीं कांहीं अजूनही चालूं आहेत. स्कॉटिश चर्चनें डॉ. वुइल्सन यांचे नेतृत्वाखालीं मुख्यतः मुंबई व कोंकण प्रांतांत शाळा स्थापन केल्या. लंडन मिशनरी सोसायटीनें सुरत व गुजराथचा इतर भाग आपल्या कार्यासाठीं पसंत केला. यापेक्षां चर्च मिशनरी सोसायटीनें अधिक व्यापक प्रमाणावर कार्य करण्यास सुरूवात केली. राबर्ट मनी याचे स्मरणार्थ मुंबई येथें स्थापन केलेल्या मध्यवर्ती अँग्लो–व्हर्नाक्युलर शाळेखेरीज या सोसायटीचे मिशनरी, पुणें व नाशिक जिल्ह्यांत, ठाणा व वसई येथें, इतकेंच नव्हे तर, दूरच्या सिंध प्रांतांतही, शिक्षण प्रसाराचें कार्य करण्यांत गुंतले होते. आयरिश प्रेसबिटेरियन मिशनरी सोसायटीनें काठेवाडांतील देशी संस्थांनांत शाळा स्थापन करून लंडन मिशनरी सोसायटीच्या गुजराथ मधील शाळांचाही पुढें ताबा घेतला " याप्रमाणें मुंबई इलाख्याच्या प्रत्येक प्रांतांत पाद्री लोकांचे अचाट उद्योग सुरू होते. नुसत्या प्राथमिक शिक्षणाकडेंच लक्ष देऊन ते थांबले नाहींत. तर मुलांप्रमाणें मुलींच्या शाळांचाही त्यांच्या कार्यामध्यें समावेश करण्यांत आला होता."‡

सन १६५९ मध्यें कंपनीच्या डायरेक्टर्सनीं जरी धर्म प्रसाराचे बाबतींतील आपली तीव्र कळकळ व्यक्त केली तरी पुढें पुढें, या धोरणांत बदल होत जाऊन प्लासीची लढाई होऊन अधिक मुलुख आपल्या अमलांत येतांच, धर्मप्रसाराच्या चळवळीकडे कंपनीचे अधिकारी भीतियुक्त नजरेनें पाहूं लागले. व अखेर ता. ७ फेब्रुवारी १८०८ च्या खलित्यांत डायरेक्टर्सनीं धार्मिक बाबीबद्दलची आपली पूर्ण तटस्थ वृत्ती जाहीर करून ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराच्या प्रयत्नास आपला पाठिंबा देण्याचें साफ नाकारलें. कंपनीच्या धर्मविषयक धोरणांत याप्रमाणें महत्वाचा फरक झाला तरी ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीं शिक्षणप्रसाराचें कार्य तसेंच अव्याहतपणें चालू ठेवून, स्वतांच्या हिमतीवर व सरकारच्या थोड्या मदतीनें शिक्षणविषयक भरीव कामगिरी करून दाखविली. त्यांच्या या उदात्त कार्याबद्दल हिंदुस्थान त्यांचा सदैव ऋणी राहील यांत मुळींच शंका नाहीं.

मिशनरी लोकांच्या शिक्षण प्रसाराच्या कार्याला साह्य करण्यासाठीं त्यांच्या

---

‡ हंटर क. रि. पा. १२

व इतर लोकांच्या प्रयत्नानें अनेक संस्थांही अस्तित्वांत आल्या होत्या. सन १७८९ मध्यें 'कलकत्ता फ्री स्कूल सोसायटी' अस्तित्वांत आली. त्या नंतर 'कलकत्ता स्कूल बुक सोसायटी' व 'दी कलकत्ता स्कूल सोसायटी' या अनुक्रमें १८१७ व १८१९ सालीं जन्माला आल्या. व्यवहारोपयोगी प्राथमिक शिक्षणाचा प्रसार व सर्व देशभर देशी शाळांच्या स्थापना,हे या सोसायटयांच्या स्थापनेचे हेतू होते. सन १८१५ मध्यें मुंबई येथें नागरिकांची सभा होऊन गरीब लोकांच्या शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठीं एक संस्था स्थापन करण्यांत आली व देणगीच्या रूपानें रु. २०००चा निधी तयार करण्यांत आला. सदर संस्थेस कंपनीच्या डायरेक्टर्सनीं दरमहा रु. ५०० प्रमाणें मदत दिली व त्या संस्थेमार्फत खिस्ती व इतर लोकांच्या शिक्षणासाठीं शाळा काढण्यांत आल्या. नंतर 'दी बॉंबे नेटिव्ह स्कूल बुक अँड स्कूल सोसायटी' ही काढण्यांत आली.

या शिक्षण प्रसाराचे कामीं अधिकारी अगर बिगर अधिकारी अशा गृहस्थांनीं आपल्या खाजगी नात्यानें केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख करणेंही जरूर आहे. अशा व्यक्तींत कॅप्टन डोव्हटन, जनरल क्लाड मार्टिन, डेव्हिड हेअर या इंग्रज लोकांप्रमाणें राजा राममोहन रॉय सारखे देशी गृहस्थही प्रमुखपणें दिसून येतात. त्याचप्रमाणें कांहीं मोठे अधिकारीही आढळून येतात. सन १७८१ सालीं ग. ज. वॉरन हेस्टिंग्ज यानें कांहीं वजनदार मुसलमानांच्या शिष्टमंडळाच्या विनंतीस मान देऊन 'कलकत्ता मद्रासा' या नांवाची संस्था अरेबिक व पर्शियन भाषेचें शिक्षण देण्यासाठीं स्थापन केली. ही संस्था स्थापन करण्याच्या मुळाशीं त्या काळींही 'हिंदू लोकांनीं बव्हंशानें पटकावलेल्या राज्यांतील जबाबदारीच्या व भरपूर वेतनाच्या अधिकाराच्या जागासाठीं मुसलमान सद्-गृहस्थांच्या मुलांना लायक बनविणें' हा एक हेतू होताच. या संस्थेच्या पहिल्या दोन वर्षांचा खर्च गव्हर्नर जनरल यांनीं आपल्या खाजगी पैशांतून चालविला; परंतु ते पैसे त्याला पुढें देण्यांत येऊन ती संस्था सरकारचे सुपुर्द करण्यांत आली. सन १७९२ सालीं बनारस येथील रेसिडेंट जोनाथन डंकन यानें 'बनारस संस्कृत कॉलेज'ची मुहूर्तमेढ रोविली. सन १८२१ सालीं त्या-वेळीं डेक्कन कमिशनरच्या हुद्यावर असलेल्या मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन् यानें पुणें येथें पेशव्यांच्या दक्षिणेच्या पैशावर चालणारें संस्कृत कॉलेज जन्माला आणलें. दिल्ली प्रांतांत फ्रेजर या नांवाच्या एक गृहस्थानें "जमिनदार अगर

शेतकरी यांच्या मुलांना प्रर्शियन भाषा लिहितां वाचतां यावी म्हणून दरमहा दोनशें रुपयांप्रमाणें स्वतः खर्च करून अनेक शाळा स्थापन केल्या. "‡

कंपनी सरकार व शिक्षण—— ईस्ट इंडिया कंपनी ही व्यापारासाठीं मुख्यतः अस्तित्वांत आली होती. परंतु येथील विशिष्ट परिस्थितीमुळें त्या कंपनीला, एतद्देशीय लोकांच्या मदतीनेंच, निरनिराळा मुलूख पादाक्रांत करून त्यांतील राज्यकारभाराची जोखिमदारी अंगावर घ्यावी लागली. व्यापारासाठीं—अर्थ संपादनासाठीं—जन्माला आलेल्या या कंपनीचें, राज्यकारभाराची जबाबदारी अंगावर पडल्यावरहि, द्रव्यार्जन हेंच ध्येय राहिल्यास काय आश्चर्य? आपल्या हाताखालीं आलेल्या मुलखांतील प्रजेची सर्वांगीण, निदान शैक्षणिक, प्रगति घडवून आणण्याची आपल्यावर सत्ताधीश या नात्यानें जबाबदारी आहे, या गोष्टीची कंपनीच्या प्रमुख सूत्रधारांना प्रथम कांहीं काल कल्पनाहि नव्हती. आणि यांत त्यांचाही कांही दोष नव्हता. कारण 'प्रजेचें शिक्षण हें राज्यकर्त्यांच्या अनेक जिव्हाळ्याच्या कर्तव्यांपैकीं एक महत्त्वाचें कर्तव्य आहे' या अधुनिक कल्पनेचा खुद्द इंग्लंडमध्येंही जन्म झाला नव्हता. त्या देशांतही शिक्षणप्रसाराच्या कार्याचा सगळा भार धर्मोपदेशकांनींच पत्करला होता व राज्यकारभार करणारांनीं शिक्षण प्रसाराचे बाबतींत कांहीं हात हलविले तर त्याबद्दल उलट वैषम्य वाटण्यांत येत असें.*

याप्रमाणें इंग्लंडमध्येंच स्थिति असल्यामुळें कंपनीच्या अधिकाऱ्यांनीं व्यक्तिशः जरी शिक्षण प्रसारार्थ कांहीं प्रयत्न केले असले तरी कंपनी सरकार स्वतः कांहीं करावयास तयार नव्हते. आरंभीं तर ही शिक्षणाची बाब कंपनीनें हातीं घ्यावी, या कल्पनेलाहि जोरानें विरोध करण्यांत येत असे. परंतु कांहीं शिक्षणप्रेमी गृहस्थांच्या चिकाटीच्या प्रयत्नांना थोडें यश येऊन, कंपनीसरकारावरही थोडीफार जबाबदारी आहे, या कल्पनेच्या उदयाला सुरुवात होऊन तिला पोषक असें मत इंग्लंड व हिंदुस्थान अशा दोन्ही देशांत व्यक्त करण्यांत येऊं लागलें.

कंपनी सरकारला या बाबतींतील आपल्या कर्तव्याची जाणीव करून देण्याचे कामीं अहर्निश प्रयत्न करणाऱ्या महापुरुषांत मि. चार्लस ग्रॅट व महात्मा विल्बरफोर्स यांचें स्थान प्रमुख व अढळ आहे. चार्लस ग्रॅट हा प्रथम

‡ E. R. I 7 * B. E. p 4

कंपनी सरकारचा नोकर म्हणून हिंदुस्थानांत आला होता. परंतु नंतर तो वाढत वाढत कंपनीचा सूत्रधार झाला व अखेर पार्लमेंटचा सभासद होण्याचाही त्याला मान मिळाला. त्यानें सन १७९२ मध्यें स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिलेल्या परिस्थितीच्या आधारें एतद्देशीय लोकांच्या समाजस्थितीविषयीं निरीक्षणात्मक ग्रंथ‡ लिहून हिंदुस्थानांतील लोकांच्या व विशेषतः बंगाली लोकांच्या हीन दीन स्थितीचें वर्णन केलें व या स्थितीचें कारण लोकांचें अज्ञान आहे अशी घोषणा करून त्यावर शिक्षणाचा रामबाण उपाय सुचविला. "चुकणाऱ्या हिंदूंच्या सुखाचा नाश करून त्यांची स्थिती सुधारणेच्या प्रत्येक बाबीला पायबंद घालणाऱ्या सामाजिक बेबंदशाहीवर त्यांना आपली विद्या व ज्ञान देणें हाच बिनतोड उपाय आहे"...असें त्यानें प्रतिपादून..." तमोनाशाला प्रकाशप्रवेश हा एकच उपाय आहे" असें असंदिग्ध भाषेंत सांगितलें. मि. ग्रँट यानेंच शिक्षणाचें माध्यम इंग्रजी भाषा असावी कां स्थानिक भाषा असावी, हा वादग्रस्त प्रश्न प्रथम उपस्थित केला. त्यानें स्वतः इंग्रजी भाषेची तरफदारी करून मेकाले साहेबांचें अरुणाचें काम केलें. त्याचप्रमाणें भौतिक शास्त्राच्या, कृषीविषयक यंत्रकलेच्या व शेती सुधारण्याच्या पद्धतीच्या शिक्षणदृष्ट्या असलेल्या महत्त्वावर त्यानें विशेष भर दिला.

कंपनीला दिलेली सनद फक्त वीस वर्षांचे मुदतीकरतांच देण्यांत येत असल्यामुळें, नवीन मुदतीसाठीं सनद देण्याचा प्रश्न पार्लमेंटपुढें दर वीस वर्षांनीं यावा लागे. त्याप्रमाणें हा प्रश्न १७९२-९३ सालीं पार्लमेंटपुढें विचारासाठीं असतांनाच मि. ग्रँट याच्या प्रोत्साहनानें गुलामगिरीविरुद्ध निकराची मोहीम करणारा दयात्मा विल्बरफोर्स यानें, हिंदुस्थानांतील कंपनीच्या प्रजेच्या शिक्षणाची व्यवस्था करण्याचा प्रश्न धसास लावला व हिंदुस्थानांत शिक्षणप्रसाराचें कार्य करण्यासाठीं शिक्षक पाठविण्याविषयीं मागणी केली. नवीन सनद देण्यासंबंधींचें बिल पार्लमेंटपुढें आलें त्यांत, हिंदुस्तानांत धर्मोपदेशक व शिक्षक पाठविण्याला उत्तेजन देण्याबाबत स्पष्ट निर्देश करणारें कलम घालण्याचाही त्यानें कसून प्रयत्न केला. परंतु त्याला विरोधी पक्षानें

‡ "Observations on the state of society among the Asiatic subjects of G. Britain, particularly with reference to morals and on the means of improving it."

हरकत घेतली. या विरोधी पक्षांचें म्हणणें कीं " बहुतेक लोकांप्रमाणें हिंदू लोकांचीही धर्माबाबत य नीतिविषयक पद्धति चांगली असून त्यांना धर्मांतर करावयास सांगणें किंवा त्यांना अधिक अगर हल्लीं उपलब्ध असलेल्या शिक्षणापेक्षां निराळ्या प्रकारचें शिक्षण देण्याचा प्रयत्न करणें वेडेपणाचें होईल."

अखेर विरोधी पक्षाचा जय होऊन कंपनीच्या सनदेंत कोणत्याही शिक्षण-विषयक जबाबदारीस मान्यता देणारें कलम समाविष्ट होऊ शकलें नाहीं. परंतु पार्लमेंटनें " न्याय्य विवेकपूर्ण साधनांनीं हिंदुस्थानांतील ब्रिटिश प्रांतीय रहिवाशांचें हित व सुखसंवर्धन करणें, हें ब्रिटिश कायदेमंडळाचें खास व निश्चित असें कर्तव्यकर्म असून या हेतुसिद्धीसाठीं त्यांची, व्यवहारोपयोगी ज्ञानाप्रमाणें धार्मिक व नैतिक बाबींतही आस्तेकदम प्रगती होईल, अशा उपायांचा अवलंब करणें जरूर आहे " असा ठराव पास करून वुइलबर-फोर्सचीही समजूत काढण्याचा प्रयत्न केला.

मि. ग्रँट यानें आपला ग्रंथ पार्लमेंटला १७९७ सालीं विचारासाठीं सादर केला. त्यानंतर गव्हर्नर जनरल लॉर्ड मिंटो यानेंहि ता. ६ मार्च १८११ रोजीं हिंदुस्थानांतिल शिक्षणविषयक परिस्थितीवर प्रकाश पाडणारें पत्रक (minute) तयार करून कंपनीच्या सूत्रधार-मंडळाकडे योग्य त्या विचारासाठीं रवाना केलें. सदर पत्रकांत हिंदुस्थानांतील विद्येच्या ऱ्हासासंबंधींच मुख्यतः चर्चा करण्यांत येऊन " हिंदुस्थानांतिल शास्त्रें व वाङ्मय यांचा वाढत्या प्रमाणावर क्षय होत आहे, हें विधान साधार आहे व शपथेवर खोटा जवाब देण्याचे व बनावट कागद तयार करण्याचे गुन्हे हिंदु-मुसलमानांकडून विशेष प्रमाणांत होतात. याचें कारण त्यांच्यांतील धर्म व नीतिविषयक तत्त्वाच्या योग्य शिकवणुकीचा अभाव "‡ असा अभिप्राय व्यक्त करण्यांत आला.

यानंतर पार्लमेंटानें हिंदुस्थानांतील शिक्षणासंबंधीं विचार करण्यासाठीं एक कमेटी नेमली. कमेटीपुढें हिंदुस्थानांतील शिक्षणप्रसाराला व धर्मोपदेशकांच्या प्रयत्नाला विरोध करण्यांत आला, तरी ग्रँट, विलबरफोर्स, मिंटो वगैरे शिक्षणानुकूल मंडळींच्या प्रयत्नाच्या वाऱ्यानें, इंग्लंडमधील अधिकाऱ्यांचे आकाशांतील विरोधाचे ढग कमी होऊं लागल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं व

‡ E. R. I 17

वुइलबरफोर्सचा ठराव पार्लमेंटमध्यें पुन्हा पसार करण्यांत आला. या ठरावामुळें व लोकमतांत, चिकाटीच्या प्रयत्नानें मध्यंतरीं परिवर्तन झाल्यामुळें, सन १८१३ सालीं कंपनीला नवी सनद देतांना ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदेंच्या कायद्यांत ४३ वें कलम घालण्यांत आलें. या कलमाप्रमाणें "व्यवहारोपयोगी ज्ञानाचा फैलाव करण्यासाठीं अगर धार्मिक व नैतिक सुधारणा घडवून आणण्यासाठीं हिंदुस्थानांत जाण्याची इच्छा करणारानें, जाण्याची परवानगी मागण्यासाठीं, कंपनीच्या सूत्रधारांकडे (Directors) अर्ज करावा. असा अर्ज आल्यावर कंपनीच्या मुख्यानीं त्याप्रमाणें परवानगी द्यावी, किंवा परवानगी नाकारल्यास तो अर्ज नियामक मंडळाकडे (Board of control) अखेर निकालासाठीं पाठवावा. याप्रमाणें हिंदुस्थानांत आलेल्या लोकांचें योग्य संरक्षण कंपनीनें करावें," अशी कंपनीवर जवाबदारी टाकण्यांत आली. एवढेंच नव्हे तर सदर कलमानें गव्हर्नर जनरलला दरसाल निदान एक लाख रुपये शिक्षण कार्यकारितां खर्च करण्यास सांगण्याचा अधिकार देण्यांत आला आणि म्हणूनच सदर कलमाला "सार्वजनिक उत्पन्नांत हिस्सा मागण्याचा शिक्षणाचा हक्क आहे, या तत्वाला मिळालेली पहिली कायदेशीर मान्यता" असें संबोधण्यांत येत असतें.*

याप्रमाणें पार्लमेंटनेंच कंपनी सरकारची शिक्षणविषयक जवाबदारी असंदिग्ध भाषेंत मान्य केल्यामुळें, कंपनीचे अधिकाऱ्यांसही त्या बाबतींत अधिक लक्ष घालणें आवश्यक झालें, व त्याप्रमाणें सन १८१४ सालीं कंपनीच्या सूत्रधारमंडळानें आपला शिक्षणविषयक पहिला खलिता हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांकडे पाठविला. 'राजा बोले व दळ हाले' असें म्हणतात तें खरें आहे. पार्लमेंटनें कंपनीवर जवाबदारी टाकतांच कंपनीच्या सूत्रचालकांनीं अविलंबें आपल्या अधिकाऱ्यांस, योग्य ती तजवीज करण्याचे हुकूम सोडले व त्या हुकुमाचे 'शब्दासरशी हिंदुस्थानांतील लहानमोठीं अधिकार चक्रें फिरावयास लागून एतद्देशीय शिक्षणविषयक परिस्थिती काय आहे,' याची जोराची पहाणी सुरू होऊन, निरनिराळ्या योजनाही तयार होऊं लागल्या. मि. ॲडम यानें बंगालमधील देशी शिक्षणसंस्थांची पहाणी केली. मद्रासचे गव्हर्नर सर थॉमस मनरो यानें स्थानिक अधिकाऱ्यांचे रिपोर्ट मागवून मद्रासमधील स्थितीसंबंधीं आपलें टांचण तयार केलें. १८२५ मध्यें मुंबईच्या

* E. R. I 18

गव्हर्नरनेंही निरनिराळ्या जिल्ह्यांच्या कलेक्टरांकडून माहिती मागवून गांवठी शाळांची व त्यांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची खानेसुमारी करण्याचा प्रयत्न केला. पब्लिक इन्स्ट्रक्शन कमेटी (बंगाल) नें विस्तृत प्रश्नपत्रिका तयार करून आपल्या अधिकाऱ्यांकडून तपशीलवार माहिती मागविली. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कंपनीवर पार्लमेंटनें १८१३ च्या कायद्यानें शिक्षणाबाबतची जबाबदारी टाकल्यानंतर पुढील दहा वर्षांचा काळ, निरनिराळ्या प्रांतांतील शिक्षणसंस्था, विद्यार्थी वगैरेंसंबंधीं माहिती गोळा करण्यांत गेला, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सन १८२२–२३ पर्यंत कंपनीच्या अधिकाऱ्यांना विशेष कांहीं करतां आलें नाहीं, याचें आणखी एक कारण होतें. सन १८१८ मध्यें पेशवाई नष्ट होऊन बराच मोठा मुलुख कंपनी सरकारच्या ताब्यांत आला. या नवीन मिळालेल्या मुलुखाची योग्य ती व्यवस्था करण्यांत व ठिकठिकाणीं उद्भवणारीं पुंड, पेंढारी, पाळेगार यांचीं बंडें मोडून देशांत शांतता प्रस्थापित करण्यांतच सगळा वेळ गेल्यामुळें शिक्षणप्रसाराचें, त्यावेळच्या कल्पनेप्रमाणें, फावल्या वेळांत करावयाच्या कमी दर्जाच्या कार्याकडे लक्ष कोण देणार? त्यामुळें सन १८१३ नंतरची सुमारें दहा वर्षांत माहिती गोळा करणें व कायद्याप्रमाणें खर्च करणें आवश्यक असलेल्या रकमेंतून निरनिराळ्या शिक्षणप्रसाराचें कार्य करणाऱ्या संस्थांना मदत करणें, याशिवाय कोणतेंच महत्त्वाचें कार्य झालें नाहीं.

हिंदुस्थानांतील शिक्षणाच्या दृष्टीनें १८२३ साल बरेंच महत्त्वाचें आहे. थोडीशी शांतता देशांत प्रस्थापित होतांच कंपनीच्या अधिकाऱ्यांना शिक्षणाच्या कार्याकडे अधिक लक्ष देण्यास सवड मिळाली व मिळालेल्या सवडीचा त्यांनीं शक्य तितका अधिक उपयोग करून घेतला. त्या वर्षीं शिक्षणाप्रीत्यर्थ मदतीदाखल खर्ची पडणाऱ्या रकमेंत एकदम ७२०८ पौंडांपासून २१८८४ पौंडांपर्यंत, म्हणजे तिपटीनें, वाढ झाली व त्याच्या पुढच्या वर्षीं ही रक्कम ६६५६३ पौंडांपर्यंत चढली. याच वर्षीं निरनिराळ्या प्रांतांतील शिक्षणाच्या स्थितीची पहाणी करण्याचें कामास जोरानें चालना देण्यांत आली. त्याच वर्षीं बंगालमधील निरनिराळ्या प्रांतांत सार्वजनिक शिक्षणाची स्थिति काय आहे व त्या शिक्षणाला उत्तेजन देणाऱ्या सार्वजनिक संस्थांची हालहवाल काय आहे हें अजमावण्यासाठीं, तसेंच एतद्देशीय लोकांना चांगलें

शिक्षण देण्यासंबंधीं व त्यांच्यामध्यें व्यवहारोपयोगी शिक्षणाचा फैलाव करून त्याच्या नैतिक वर्तनांत इष्ट सुधारणा घडवून आणण्यासाठीं, योग्य त्या योजनांचा विचार करून त्या सरकारकडे सादर करण्याच्या हेतूनें बंगाल-सरकारनें आपल्या ता. १७-७-१८२३ च्या ठरावानें 'जनरल कमेटी ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन' हिची स्थापना केली. या कमेटीचे पहिले अध्यक्ष ना. जे. एच. हेरिंग्टन हे होते व कमेटीच्या सभासदांची एकंदर संख्या दहा होती. या सभासदांत प्राच्य विद्येचा पुरस्कार करणारे, मॅकालेसाहेबाचे कट्टे विरोधक, मि. एच. टी. प्रिन्सेप हेही एक होते, हें पुढें जीं अनेक वादविवादाचीं वादळें झालीं तीं समजण्याच्या दृष्टीनें, लक्षांत ठेवणें जरूर आहे.

मुंबई प्रांतांत जरी १८२३ मध्यें अगर त्या सुमारास एखादी सरकारतर्फे कमेटी किंवा बोर्ड नेमण्यांत आलें नाहीं तरी, तशा कमेटीची अगर बोर्डाची उणीव १८२२ सालीं उत्पन्न झालेल्या "दी नेटिव्ह स्कूल बुक अँड स्कूल सोसायटीनें" भरून काढली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. या सोसायटीच्या कार्याचें महत्त्व ओळखून त्यावेळीं 'मिस्टर' असलेले मौंट स्टुअर्ट एलफिन्स्टन हे त्या सोसायटीचे अध्यक्ष झाले. या सोसायटीनें एकंदर कार्यक्षेत्राची पहाणी करून उपलब्ध साधनांची मोजदाद केली. सोसायटीमार्फत अधिक चांगलीं पुस्तकें पुरविण्याची व्यवस्था करण्यांत आली. तसेंच निरनिराळ्या जिल्ह्यांच्या गरजा काय आहेत हें ठरविण्यांत आलें. सोसायटीचें पुढील धोरण ठरविण्यांत येऊन सरकारकडून मदत मिळविण्यांत आली. मि. एल्फिन्स्टन् यानीं सोसायटीच्या अहवालावर आपलें स्वतंत्र टिपण (Minute) लिहून सोसायटीचें व्यापक ध्येय विशद केलें व तिच्या यशाच्या कारणांचा खुलासा केला. सदर सोसायटीनें मुंबईच नव्हे तर सिंध वगळून बाकी तिन्ही भागांत शिक्षणाची संघटना व प्रसार करण्याचें कार्य केलें. सोसायटीचे अध्यक्ष मि. एल्फिन्स्टन् यांनीं देशी लोकांत इतकी लोकप्रियता मिळविली कीं, ते १८२७ ला सेवानिवृत्त झाल्यानंतर लोकांनीं त्यांचे स्मरणार्थ रु. ४५००० चा फंड गोळा करून, त्यांपैकीं कांहीं रकमेंतून मुंबई येथील प्रेसिडेन्सी कॉलेज, त्यांचें नांव देऊन स्थापन केलें. सन १८३२ सालीं या सोसायटीनें गुजराथमधील जिल्हा शाळां-(District Schools) शीं असलेला आपला संबंध सोडला व त्या शाळा मुलकी अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं चालविण्यांत येऊं लागल्या; परंतु हा बदल

प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराला बाधकच ठरला. त्यामुळें अखेर १८४०साली 'बोर्ड आफ एज्युकेशन 'ची स्थापना करण्यांत आली. या बोर्डाच्या सभासदांची संख्या सहा ठरविण्यांत येऊन त्यांपैकीं तीन सरकारनें नेमले व तीन नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीनें नेमले.

सन १८५४-'५५ सालीं 'डिपार्टमेंट ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन' हें जन्माला येईपर्यंत, मुंबई प्रांतांतील शिक्षणाचा कारभार याच 'बोर्ड ऑफ एजुकेशन'-च्या मार्गदर्शकत्वाखालीं चालला होता. या बोर्डाला जें यश आलें त्याला, पाद्रीमंडळीनें शिक्षणाला दिलेली जोराची चालना, हें एक कारण असून दुसरें कारण वेस्टर्न इंडियामधील गांवठी शिक्षणपद्धतीचें दारिद्र्य हें होय. मुलकी अधिकाऱ्यांना या शाळा चांगल्या तऱ्हेनें चालविण्याचें कामीं अपयश आल्या-मुळें व शिक्षणाची मागणी वाढत्या प्रमाणांवर असल्या कारणानें सरकारी शाळा काढून त्या चालविण्यासाठीं एकादी नियामक मध्यवर्ती संस्था अस-ण्याची तीव्र जरूरी वाटूं लागली व त्यामुळेंच बोर्ड जन्माला आलें. सन १८४० पासून सन १८५५पर्यंतचा शिक्षणाचा इतिहास म्हणजे या बोर्डाच्या कार्याचा व स्वतंत्रपणें काम करणाऱ्या मिशनरी लोकांच्या कामाचा अहवाल आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. या बोर्डानें दरसाल प्रसिद्ध केलेल्या अहवाला-वरून त्याच्या धोरणाचा चोखपणा व त्याचीं शिक्षणविषयक दूरदर्शी मतें, यांची चांगली कल्पना येते. बोर्डानें नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या व सर-कारी देशी भाषेच्या सर्व शाळा आपल्या ताब्यांत घेतल्या. त्याचप्रमाणें बोर्डानें सर्व इंग्रजी शाळा, सन १८२१ मध्यें स्थापन झालेलें पूना संस्कृत कॉलेज, नॉर्मल क्लासेस व एल्फिन्स्टन कॉलेज हींही आपल्या चालकत्वाखालीं घेतलीं. बोर्डानें एकंदर इलाख्याची शिक्षणाच्या दृष्टीनें तीन भागांत विभागणी करून प्रत्येक भाग युरोपियन इन्स्पेक्टरच्या देखरेखीखालीं दिला, स्कूल कमेटीची स्थापना केली, शिष्यवृत्त्या निर्माण केल्या व लोकांनीं एकंदर खर्चाचा कांहीं ठराविक अंश दिला तर दोन हजार वस्तीच्या प्रत्येक खेडेगांवांत शाळा सुरू करण्याचें आश्वासन दिलें. त्याचप्रमाणें बोर्डानें गांवठी शाळांच्या स्थितीविषयीं चौकशी केली व सन १८४२ सालीं 'एकंदर १:२० गांवठी शाळा असून त्यांत ३०००० पेक्षां अधिक विद्यार्थी शिकत असल्याची' माहिती काढली. सन १८४३ सालीं सर अर्स्कीन पेरी हे या बोर्डाचे अध्यक्ष झाले, व ते सन १८५२ पर्यंत अध्यक्ष राहिले. सर पेरी हे इंग्रजी शिक्षणाचे कट्टे पुरस्कर्ते

होते व त्यांनीं त्या वाचतांत केलेल्या कडव्या चळवळीचा पुढें उल्लेख आला आहेच. सर साहेबांच्या अमदानींत उच्च शिक्षणाची बराच चलती झाली, व ठिकठिकाणीं इंग्रजीच्या शाळा उघडल्या येवढेंच येथें सांगणें जरूर आहे.

सरसाहेबांच्या अमदानींत गांवठी शाळांस मुळींच मदत करण्यांत आली नव्हती; परंतु सरसाहेब कार्यनिवृत्त होतांच प्राथमिक शिक्षणास अनुकूल असें वातावरण पुन्हा निर्माण झालें. गांवठी शाळांस प्रथमच लहान प्रमाणावर मदत देण्यांत आली. खालच्या दर्जाच्या सरकारी नोकरींतील जागा चढाओढीनें भरण्याचें ठरलें व शिक्षणासाठीं करण्यांत येणाऱ्या सरकारी मदतीचा आंकडा २५००० पर्यंत फुगला. गांवच्या लोकांनीं शिक्षकांच्या पगाराची अर्धी रक्कम व शाळेला जागा व पुस्तकें देण्याचें कबूल केलें, तर कोणत्याही गांवांत शाळा सुरू करण्याचें बोर्डानें जाहीर केलें. तावडतोब पस्तीस खेड्यांनीं या अटी मान्य करून अर्ज केले व त्यांपैकीं पंचवीस गांवांना शाळा देण्यांत आल्या. सन १८५४ मध्यें इलाख्याच्या एका भागांतून ८४ अर्ज आले. इंग्रजी व देशी भाषांच्या शाळांची संख्या वाढूं लागली. व सिंधसाठींही थोडीफार तरतूद करण्यांत येऊं लागली. याच सालांत अहमदनगर येथें हिंदुसमाजांतील अगदीं खालच्या वर्गांतील लोकांसाठीं एक शाळा उघडण्यांत आली. अशाच तऱ्हेची शाळा पुणें येथें कांहीं वर्षांमागें महात्मा फुले यांनीं उघडली होती. त्याचप्रमाणें अशा कांहीं शाळा स्कॉटिश मिशननेंही सुरत येथें १८५३ सालीं चालू केल्या होत्या. सुमारें २२ सार्वजनिक ग्रंथालयांनाही बोर्डानें मदत करून मुंबई व पुणें येथील ग्रंथसंग्रहांसाठीं प्राथमिक क्रमिक पुस्तकांच्या सुमारें ४५००० प्रती छापून काढल्या.

मद्रास सरकारही शिक्षणासाठीं योग्य ते प्रयत्न करीत होतेंच. मद्रास सरकारनें सन १८२६ सालीं 'बोर्ड ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनची' स्थापना केली. सदर बोर्डानें नेटिव्हांसाठीं सुमारें शंभर शाळां खेड्यापाड्यांतून स्थापन केल्या व शिक्षकांना शिक्षण देण्यासाठीं मद्रास येथें एक मध्यवर्ती विद्यालय सुरू केलें.

बंगाल, मुंबई व मद्रास या प्रांतांतील शिक्षणाच्या प्रगतीची जी वर माहिती दिली आहे त्यावरून सरकारी धोरणाची दिशा काय होती, याची कल्पना येईल. इतर प्रांतांतही याच धोरणार किंचित् फरक करून, सरकारतर्फे कार्य करण्यांत येत होतें. स्थूलमानानें सगळीकडे एकच धोरण होतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. धोरण एकच असल्यामुळें शिक्षणाची होणारी

हालचालही बहुतेक एकाच गतीनें होत होती. यापेक्षां इतर प्रांतांबद्दल अधिक माहिती स्थलसंकोचामुळें देणें शक्य नाहीं. निरनिराळ्या प्रांतांत झालेली प्रगति पहातां एकंदरींत हंटर कमिशननें म्हटल्याप्रमाणें † "१८५४ चा खलिता प्रसिद्ध होईपर्यंत शिक्षणाचा योग्य पाया घालण्यांत आला होता" असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं.

मतामतांचा गलबला:—हिंदी लोकांना शिक्षण देणें हें कंपनी सरकारचें १८१३ च्या ॲक्टाप्रमाणें कर्तव्य ठरल्यानंतर कंपनीच्या अधिकाऱ्यांमध्यें तीव्र स्वरूपाचे मतभेद होऊन वादाचीं अनेक रणें माजलीं. या मतभेदांचे प्रश्न साधारणपणें चार होते. १ कोणतें शिक्षण द्यावें, २ कोणत्या भाषेंतून द्यावें, ३ कोणास द्यावें, व ४ कसें द्यावें? हे वाद अनेक वर्षें चालले होते. त्यांचा या ठिकाणीं संक्षेपानें परामर्श घेणें जरूर आहे. कारण या प्रश्नांना वेळोवेळीं मिळालेल्या निर्णयात्मक उत्तरांनीं हिंदुस्थानांतील शिक्षणपद्धतीला विशिष्ट वळणाची मुरड घातली आहे व त्यामुळें या मतभेदांचें वास्तविक स्वरूप काय होतें व अखेर निर्णय काय झाला हें समजल्यावांचून आजच्या शिक्षणपद्धतीचें सर्वांगीण आकलन करणें शक्य होणार नाहीं.

कोणतें शिक्षण द्यावें:—शिक्षण द्यावें हें जरी कायद्यानें ठरलें तरी कोणतें शिक्षण द्यावें हें संदिग्ध राहिल्यामुळें कंपनीच्या अधिकाऱ्यांत, पौर्वात्य विद्येचे व पाश्चिमात्य विद्येचे पुरस्कर्ते, असे दोन तट पडले. ईस्ट इंडिया कंपनीचा अम्मल ज्या वेळीं सुरू झाला त्यावेळीं ठिकठिकाणीं संस्कृत पाठशाळा व मुसलमानी मद्रासा होत्या, हें मागें सांगितलें आहेच. कंपनीनें या पौर्वात्य विद्येच्या केंद्रांना पूर्वीच्या सरकारच्या ज्या देणग्या व वर्षासनें होतीं तीं तशींच चालू ठेवलीं, येवढेंच नव्हे तर कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या मनांत विद्येला उत्तेजन देण्याची प्रथम कल्पना येतांच त्यांनीं संस्कृत व अरबी–पर्शियन या भाषांतून दिल्या जाणाऱ्या पौर्वात्य ज्ञानाच्या प्रसाराला प्रोत्साहन दिलें. वारन हेस्टिंग्ज यानें कलकत्त्याला 'मद्रासा' काढून मुसलमानी विद्येला हात दिला. तर जोनाथन डंकन यानें बनारसला संस्कृत कॉलेज काढून संस्कृत विद्येला आश्रय दिला. सन १८२१ सालीं पुणें येथें स्थापन करण्यांत आलेलें कॉलेजही संस्कृत विद्येच्या उत्तेजनार्थच काढण्यांत आलें.

---

† P. 11.

परंतु कंपनी सरकारनें दरसाल शिक्षणाच्या उत्तेजनार्थ कमींत कमी एक लाख रुपये खर्च करावयाचें ठरल्यानंतर वादाला सुरुवात झाली. कंपनी सरकारचे नोकर म्हणून येथें आलेल्या सर वुइल्यम जोन्स, मि. कोलब्रुक यांसारख्या इंग्रजांनीं, संस्कृत पंडितांच्या मदतीनें संस्कृत भाषेचा अभ्यास करून, संस्कृत साहित्याच्या सरोवरांत मनसोक्त अवगाहन करण्यास सुरुवात केली होती. त्यांचाच कित्ता मि. वुइलसन्, प्रिन्सेप वगैरे विद्वानांनीं गिरवून पौर्वात्य विद्येशीं आपला चांगलाच परिचय करून घेतला होता. त्यामुळें या विद्वान् मंडळींना हिंदूंच्या विद्येविषयीं व त्यांच्यांतिल आध्यात्मिक व तत्त्वज्ञान-विषयक ज्ञानभांडाराविषयीं सहाजिकच आदरपूर्ण अभिमान वाटूं लागला होता. अशा स्थितींत कंपनीवर शिक्षणाची जबाबदारी टाकण्यांत आल्यानंतर, एतद्देशीय लोकांना कोणतें शिक्षण द्यावें, हा प्रश्न विचारास पुढें येतांच, या मंडळींनीं पौर्वात्य ज्ञानाची कड धरून "एतद्देशीय लोकांची विद्या अतिशय प्रगल्भ स्वरूपाची आहे, त्यांना पाश्चिमात्य ज्ञानाची कांहीं जरूरी नाहीं. पौर्वात्य विद्येचाच अधिक विकास करण्याचें सरकारनें धोरण ठरवून मंजूर केलेली रक्कम त्याप्रीत्यर्थ खर्च करावी," असें प्रतिपादन करण्यास सुरुवात केली.

या पक्षाचे विरुद्ध पाश्चिमात्य शिक्षणाच्या अभिमान्यांचा दुसरा वर्ग होता. या वर्गांत इंग्रज लोकांप्रमाणें हिंदू लोकही प्रामुख्यानें झळकत होते. या देशांतील शिक्षणाच्या प्रसाराचें कार्य पाद्री लोकांनीच आपले अंगावर घेतलें, हें आपण पाहिलें आहेच. शिक्षणप्रसाराचें कार्य हातीं घेतांना ख्रिस्तीधर्माचा प्रसार करण्याचा, निदान त्या धर्मप्रसारासाठीं अनुकूल-सहानुभूतीचें—वातावरण निर्माण करण्याचा त्यांच्या मनांत हेतु होता. येथील लोकांना पाश्चिमात्य विद्या शिकविली म्हणजे आपला हा हेतु सिद्धीस जाईल, अशी त्यांची व त्यांच्या मदतनिसांची समजूत होती. लार्ड मॉयरा (Moira) यांनीं आपल्या २ आक्टोबर १८१५ च्या टिपणांत (Minute) पुढीलप्रमाणें धर्मप्रसारकांस सल्ला दिला. "या साम्राज्यांतील अफाट जनते-मध्यें खऱ्या धर्माच्या (ख्रिस्तीधर्माच्या) अमोलिक प्रकाशाचा प्रवेश व्हावा, असें इच्छिणारांस असें विश्वासपूर्वक सांगतां येईल कीं, लोकांना आपण सांगूं ते समजण्याची पात्रता उत्पन्न केल्यावांचून आपला हेतु सिद्धीला जाण्याची आशा नाहीं. उदयोन्मुख पिढीला योग्य शिक्षण देऊन त्यांच्या मनाचीं कवाडें उघडा. पालकांच्या धर्मभोळेपणाला विरोधक अशीं तत्त्वें एकदम शिकवून

त्यांचा विरोध उत्पन्न न करतां, मुलाचे मनांत ख्रिस्तीधर्मतत्त्वांविषयीं आदर उत्पन्न करा. त्यांना विचारशक्तीचा उपयोग करण्यास येऊं लागल्यानंतर व नेकी सचोटीच्या योग्य कल्पना आल्यानंतर विचारशक्तीस न पटणाऱ्या, सचोटीच्या कल्पनेशीं न जमणाऱ्या मतांचा त्याग करून ते आपल्या इप्सित मार्गावर खात्रीने आल्यावांचून राहणार नाहींत."* सन १८३६ सालींही मेकॉलेसाहेबांनीं पुढीलप्रमाणें आपलें मत दिलें... "ज्याला इंग्रजी शिक्षण मिळालें आहे अशा कोणाही हिंदूची आपल्या धर्मावर मनापासून श्रद्धा रहात नाहीं. आमच्या शिक्षणविषयक धोरणाची अम्मलबजावणी झाली तर पुढील वीस वर्षांत बंगालमधील शिष्टसमाजांतील कोणीही मनुष्य मूर्तिपूजक रहाणार नाहीं, असा माझा ठाम समज आहे. आणि हें, आपल्या धर्माचा उपदेश न करतां, त्यांच्या धार्मिक स्वातंत्र्यांत किंचितही ढवळाढवळ न करतां, केवळ ज्ञानप्राप्ति व विचारशक्ति यांच्या स्वाभाविक व्यापारामुळें घडून येईल."†

याप्रमाणें ख्रिस्तीधर्माचा हिंदुस्थानांतील जनतेंत जास्त प्रसार व्हावा, अशी इच्छा मनांत धरणारे पाद्री व इतर इंग्रज अधिकारी पाश्चिमात्य शिक्षणाची तळी उचलून धरीत होते. प्रथम मिशनरी लोकांची हिंदुस्थानांत येणारी संख्या मर्यादित असे; कारण त्यांना परवाना घेतल्यावांचून हिंदुस्थानांत येतां येत नसे. परंतु पुढें ही परवान्याची अट रद्द होतांच पाद्री लोकांचा जोराचा लोंढाच अप्रतिहतपणें, हिंदुस्थानांत धर्मांतर घडवून आणण्याच्या हेतूनें, लोटल्यामुळें पाश्चिमात्य शिक्षणाच्या पुरस्कर्त्यांची बाजू जोरदार होऊन, या पाद्री मंडळींच्या प्रयत्नानें हिंदू लोकांत पाश्चिमात्य विद्येचा फैलाव होण्यास जोराचा पाठिंबा मिळाला.

पाश्चिमात्य विद्येचा पुरस्कार करणारांमध्यें कांहीं प्रमुख जाणते हिंदू लोकही होते. राजा राममोहन राय, द्वारकानाथ टागोरासारखी मंडळी संस्कृत विद्येच्या विरुद्ध होती. हिंदुस्थानांतील अनिष्ट चाली व वेडगळ समजुती या हिंदूधर्मामुळें उत्पन्न झाल्या असून त्या धर्माला पोषक असें पौर्वात्य शिक्षण देण्यानें लोकांत धार्मिक खुळेपणा वाढून त्या ज्ञानापासून प्रत्यक्ष व्यवहारांत जनतेला कांहींच उपयोग होणार नाहीं, असें या मंडळींचें मत होतें. आपल्या तारीख २-२-१८३५ च्या मिनिटांत पौर्वात्यविद्येच्या पुरस्कर्त्यांवर जोराचा

---

* E. R. I. 25.　† Trevelyan's 'Macaulay' I, 455

हल्ला चढवितांना मेकॉलेसाहेबांनीं पाश्चात्य विद्येचेही उपहासात्मक वर्णन केलें आहे. त्याबद्दल मेकॉलेसाहेबांवर दातओठ खाणारांनीं, तारीख ११ डिसेंबर १८२३ रोजी राजा राममोहन यांनीं नेक नामदार बुईल्यम् पिट यांना सादर केलेला अर्ज वाचणें जरूर आहे. सदर अर्जांत संस्कृत भाषेच्या दुर्बोधपणाचा उल्लेख करून ही भाषा ज्ञानप्रसाराचे बाबतींत अनेक शतकें धोंड होऊन बसली आहे, असें स्पष्ट मत देऊन वेदान्त, न्यायशास्त्र वगैरेंची योग्य शब्दांत उपहासानें संभावना केली आहे; व या ज्ञानापासून मनाचा विकास होतो असें म्हटलें तरी व्यवहारज्ञानाला त्याचा मुळींच कांहीं उपयोग नाहीं असें प्रतिपादून संस्कृत कॉलेजच्या स्थापनेला दणकेबाज विरोध केला आहे. याच अर्जांत राजा राममोहन राय यांनीं "पाश्चिमात्य राष्ट्रांनीं पूर्णावस्थेस नेलेलीं व ज्याच्यामुळें त्यांना जगांतील इतर लोकांपेक्षां अधिक वरचा दर्जा प्राप्त झाला आहे अशीं गणित, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, शरीररचनाशास्त्र व इतर उपयोगी शास्त्रें हिंदी जनतेला शिकविण्यांत यावींत," * अशी कळकळीची मागणीही केली आहे.

राजा राममोहन राय वगैरे पुढारी नुसत्या विनंत्या करून समाधान मानणारे नव्हते. सन १८१७ सालीं त्यांनीं डेव्हिड हेअर या नांवाच्या इंग्रज गृहस्थाच्या नेतृत्वाखालीं कलकत्त्यास एक विद्यालय स्थापन केलें. सदर विद्यालयाच्या स्थापनेंत इंग्रजीमधून शिक्षण देऊन हिंदूंच्या जीवनांतील संतापजनक चालींचें उच्चाटन करण्याचा प्रधान हेतु होता. पाद्री लोकांचा पाश्चिमात्य शिक्षणावर स्वताच्या धर्मप्रसाराच्या दृष्टीनें भर होता तर, राजा राममोहन राय वगैरे हिंदू पुढाऱ्यांची त्याच शिक्षणावर भिस्त, स्वतःच्या धर्मसुधारणेच्या दृष्टीनें होती. सतीची अमानुष चाल हिंदू धर्माचें अंग समजण्यांत येत असे. त्याचप्रमाणें ठगगिरीही धार्मिक भावनेच्या पोटींच जन्माला आली होती. नवरा मेल्यानंतर सती जाणें हा जसा प्रत्येक स्त्रीला धर्म वाटत असे त्याचप्रमाणें कांहीं जातींना 'ठगगिरी करणें, व्यभिचार करणें हा आपला परंपरागत धर्मच आहे, याप्रमाणें आपण वागलें नाहीं तर पाप लागेल,' असें प्रामाणिकपणानें वाटत असे. पाश्चिमात्य शिक्षणाचा नांगर हिंदी जनतेच्या मनोभूमिकेवर चालू केला तर रूढिजन्य खुळ्या कल्पनांचीं कांटेरीं

---

* E. R. I. 99.

झुडुपें पार मुळांपासून उखडलीं जातील, असें त्या काळच्या धर्मसुधारकांना वाटत असे व म्हणूनच ते पाश्चिमात्य शिक्षणाचे चाहते बनले.

पाश्चिमात्य शिक्षणाच्या पाठीराख्यांना आणखी एका घटनेमुळें फार मदत झाली. १८३३ सालीं नवीन कल्पनांनीं भारलेल्या सुधारलेल्या कॉमन्स सभेपुढें कंपनीच्या सनदेच्या नूतनदानाचा प्रश्न आल्यानंतर त्यांनीं "कोणाही हिंदी माणसाला, त्याचा धर्म, जन्मस्थान, वंश, वर्ण वगैरे कारणांमुळें कंपनीच्या अधिकाराखालील कोणतीही जागा, अधिकार अगर नोकरी मिळण्यास प्रत्यवाय राहाणार नाहीं," हें तत्व मान्य केलें. सदर प्रश्नाच्या चर्चेच्या वेळीं, देशी लोकांची जबाबदारीच्या जागेवर वाढत्या प्रमाणांत नेमणूक करण्यांत यावी, हें स्पष्ट करण्यांत आलें. हिंदी लोकांनीं आपल्या देशाच्या राज्यकारभारांत अधिक भाग घ्यावा या हेतूवरोवर, राज्यकारभार कमी खर्चाचा व काटकसरीचा करावा, हा उद्देशही हें तत्त्व मान्य करण्याच्या मुळाशीं होता. हेतु कोणताही असला तरी या तत्त्वाच्या मान्यतेमुळें व पुढें लवकरच दरबारी भाषा पर्शियन होती ती कमी होऊन त्या ठिकाणीं इंग्रजीची स्थापना झाल्यामुळें देशी लोकांना राज्यकर्त्यांची भाषा शिकणें आवश्यक वाटूं लागले व ती शिकल्यानंतर नोकरी मिळण्याची खात्री वाटतांच वरच्या वर्गांतील लोकांच्या झुंडीच्या झुंडी पाश्चिमात्य विद्या शिकविणाऱ्या विद्यालयांच्या दिशेनें धावूं लागल्या. कंपनीचे नोकर तयार करण्याप्रमाणेंच हिंदुस्थानांतील भौतिक साधनसंपत्तीची वाढ करण्याचे हेतूनेंही पाश्चिमात्य-शिक्षणाचीच आवश्यकता वाटूं लागली.

पौर्वात्य व पाश्चिमात्य विद्येचा पुरस्कार करणारे लोक त्या त्या विद्येचा पुरस्कार कोणत्या कारणांमुळें करीत होते याचें वर दिग्दर्शन केलें. प्रत्येक पक्ष कोणत्याही कल्पनांनीं प्रेरित झाला असला तरी, या दोन पक्षांमधील लढा कांहीं काळ फारच निकराचा झाला, यांत कांहीं संदेह नाहीं. या लढ्याच्या आरंभीं प्रथम पौर्वात्य विद्येच्या पाठिराख्यांचा पक्ष बलवान् होता; परंतु हलके हलके त्यांचें पारडें हलकें होऊं लागलें. १८२० चे सुमारास कंपनीचे सूत्रधारही या पक्षाचे विरुद्ध होऊं लागले. लोकांना कोणतेंही उपयोगी शिक्षण द्यावें, असें त्यांनीं सुचविलें होतें. परंतु आपले १८-२-१८२४ च्या खलित्यांत पौर्वात्य कवितेवर जो अधिक भर देण्यांत येत, असें त्याबद्दल नापसंती व्यक्त करून, "ती कविता उपयोगी नाहीं आणि हिंदू व मुसलमान वाङ्मयांत

उपयोगी असें संबोधण्यासारखें फारच थोडे आहे" असा आपला संशयही व्यक्त केला. या नंतर कांहीं काळ असाच झगडण्यांत गेला. या वादांतील खरे प्रतिस्पर्धी मि. प्रिन्सेप व मेकॉलेसाहेब ठरून त्यांनीं एकमेकांवर दणकेबाज टीकेप्रतिटीकेचे वार करून एकमेकाला घायाळ करण्याचा प्रयत्न केला. परंतु अखेर मेकॉले साहेबानीं पाश्चिमात्य शिक्षणाची आपल्या ओजस्वी व सफाईदार भाषेंत केलेली तरफदारी प्रभावी ठरून, सतीची चाल बंद करून लाखों स्त्रियांचे प्राण वाचविणाऱ्या, व वाटसरांची फसवणूक करून त्यांचे प्राण व वित्त हरण करणाऱ्या ठगांचें उच्चाटन करणाऱ्या लॉर्ड बेंटिंक साहेबांनीं, गव्हर्नर जनरल या नात्यानें, तारीख ७-३-१८३५ च्या ठरावानें पाश्चिमात्य शिक्षणाच्या बाजूनें कौल दिला. सदर ठरावांतील महत्त्वाचा भाग खालीं उद्धृत केला आहे.

एकंदर दोन्ही पक्षांच्या म्हणण्याचा काळजीपूर्वक विचार करून गव्हर्नर जनरल साहेबांचें असें मत आहे कीं—

"पहिलें...युरोपियन वाङ्मय व शास्त्रें यांचा हिंदी जनतेंत प्रसार करणें हें श्रेष्ठ ध्येय ब्रिटिश सरकारचें असणें जरूर असून, शिक्षणाप्रीत्यर्थ खर्ची पडणारें द्रव्य इंग्रजी शिक्षणासाठीं खर्च केल्यानें सदुपयोगीं व्यय केल्यासारखें होणार आहे."

"कमेटीजवळ जो पैसा शिल्लक राहील त्या पैशाचा यापुढें इंग्रजी भाषेतून देशी लोकांना इंग्लिश वाङ्मयाचे व शास्त्रांचें ज्ञान देण्यासाठीं खर्च करावा व हा हेतु साधण्यासाठीं कमेटीनें अविलंबें एखादी योजना सरकारला सादर करावी."[1]

याच ठरावानें पौर्वात्य विद्येच्या शाळा अगर कॉलेजांमध्यें शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्त्या बंद करण्यांत येऊन प्राच्य ग्रंथांच्या मुद्रणासाठीं होणारा खर्च करण्याची मनाई करण्यांत आली.

यानंतर कांहीं वर्षांनीं प्राच्य विद्येच्या पुरस्कर्त्यांनीं हा ठराव रद्द करून पौर्वात्य विद्येस अनुकूल असा सरकारी धोरणांत बदल घडवून आणण्याचा अनेकवार प्रयत्न केला; परंतु सरकारकडून त्यांना मुळींच उत्तेजन मिळालें नाहीं. अखेर सन १८३९ सालीं लॉर्ड ऑकलंड यांनीं एक मिनिट लिहून या

---

[1] हंटर क. रि. ९

वादाचा कायम निकाल लावला. लॉर्ड आकलंडच्या मिनिटाप्रमाणें "युरोपियन वाङ्मय, तत्त्वज्ञान आणि शास्त्रें यांच्या उच्च शिक्षणासाठीं इंग्रजी भाषेचा माध्यम (Medium) म्हणून उपयोग करावा व चालूं असलेल्या पौर्वात्य विद्येच्या संस्था पूर्ण कार्यक्षम अशा रीतीनें जिवंत ठेवून त्यांना इंग्रजी संस्थांतून विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या मदतीप्रमाणेंच मदत करण्यांत यावी. इंग्रजी भाषेप्रमाणें देशी भाषेंतूनही शिक्षण देण्याची तजवीज करण्यांत येऊन, आपणांस कोणत्या भाषेंतून शिक्षण घ्यावयाचें हें ठरविण्याचें स्वातंत्र्य विद्यार्थ्यांनाच देण्यांत यावें" असें धोरण आखण्यांत आलें व याप्रमाणें पौर्वात्य विरुद्ध पाश्चिमात्य या अनेक वर्षें चाललेल्या कज्जाचा निकाल कांहींसा तडजोडीच्या धोरणावर करण्यांत आला.

कोणत्या भाषेंतून शिक्षण द्यावें:—हिंदुस्थानांतील अफाट जनसमुदायाला पौर्वात्य विद्या शिकवावी का पाश्चिमात्य विद्या शिकवावी, या लढ्याप्रमाणें हिंदी लोकांना जी विद्या शिकवावयाची ती कोणत्या भाषेंतून, म्हणजे "इंग्रजी भाषेंतून शिकवावी कीं देशी भाषांतून शिकवावी," हा तंटा बरींच वर्षें माजून राहिला. हिंदी जनतेला जें शिक्षण द्यावयाचें तें इंग्रजी भाषेंतून द्यावें असें प्रथम प्रतिपादन, सर चार्ल्स ग्रँट यानें १७९२ सालीं हिंदुस्थानांतील शिक्षणविषयक परिस्थितीच्या अवलोकनात्मक ग्रंथांत केलें होतें. परंतु त्या वेळीं त्या वादाला मुळींच जोर आला नाहीं. कारण त्यानंतर बरींच वर्षें हिंदुस्थानांतील प्रजेच्या शिक्षणाची आपल्यावर जबाबदारी आहे याची कंपनी सरकारलाच मुळीं दरखलगिरी नव्हती. परंतु सन १८१३ सालीं ही जबाबदारी पार्लमेंटनें कंपनीवर टाकल्यानंतर कंपनीला शिक्षणप्रसाराच्या कार्याकडे लक्ष देणें जरूर पडून त्या बाबतींत निश्चित धोरण ठरवितांना अनेक वाद साहजिकच उत्पन्न होऊं लागले. सर चार्लस ग्रँट यांच्यानंतर १८२४ सालीं इंग्रजी भाषेंतूनच शिक्षण द्यावें या धोरणाचा पुन्हां पुरस्कार वार्डन या नांवाच्या गृहस्थानें केला. सदरचे गृहस्थ हे सरकारच्या अधिकारी—मंडळाचे सदस्य होते. त्यांच्या या म्हणण्यावर मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनसाहेबांनीं त्यावेळींच खरपूस टीका केली व "देशी लोकांतील सर्व वर्गांतील लोकांना इंग्रजी भाषा येईपर्यंत त्यांच्यांत करतां येण्यासारखी प्रत्यक्ष सुधारणा तहकूब करावी हा मि. वार्डन यांच्या योजनेंतील मोठा दोष आहे. इंग्रजी भाषेच्या प्रसारार्थ प्रत्येक साधनाचा उपयोग करावा अशी माझीही इच्छा आहे; परंतु ती सार्व-

त्रिक भाषा कधींकाळीं होईल, अशी मला मुळींच आशा नाहीं. समाजाच्या सर्व वर्गांतून ज्ञानप्रसाराचें साधन होण्यासाठीं इंग्रजी भाषेचें लोकांना ज्ञान होईल अशी इच्छा असणें योग्य असलें तरी तसा कोणीही खात्रीनें अंदाज करूं नये,"* असें आपलें स्पष्ट मत देऊन देशी भाषेची तरफदारी केली.

या वादाला विशेष निकराचें स्वरूप सर इर्स्किन पेरी हे बोर्ड ऑफ एज्युकेशनचे सन १८४४ मध्यें अध्यक्ष झाल्यानंतर आलें. त्यांनीं सदर बोर्डाचे अध्यक्ष झाल्यानंतर लवकरच 'लोकांना देशी भाषेंतून शिक्षण न देतां इंग्रजी भाषेंतूनच शिक्षण द्यावें,' असें मत प्रदर्शित करण्यास जोरानें सुरुवात केली. त्यांना बोर्डांतील मि. इस्कॉब, डॉ. मॅक्लॅनन या सभासदांनीं पाठिंबा दिला. परंतु देशी भाषेचा कड कर्नल जर्व्हिस यांनीं घेतला व त्यांना बोर्डांतील जगन्नाथ शंकरशेट, फ्रामजी कोयाजी, महंमद इब्राहीम मक्वा या देशी सभासदांनीं, तडफदार मतपत्रिका § लिहून दुजोरा दिला. अखेर हा प्रश्न गव्हर्नरसाहेबांच्यापुढें जाऊन मुंबईसरकारनें बोर्ड ऑफ एज्युकेशनला तारीख ५-४-१८४८ रोजीं विस्तृत पत्र लिहून पेरीसाहेबांना चांगलीच समज दिली. सदर पत्रांतील महत्त्वाचा उतारा देणें जरूर आहे. "आतांपर्यंत इंग्रजी भाषेच्या शिक्षणाकडेच अधिक लक्ष पुरविण्यांत आल्याचें दिसत असून देशी भाषेंतून करावयाचें ज्ञानप्रसाराचें कार्य दुय्यम दर्जाचें समजण्यांत आल्याचें नजरेस येत आहे;परंतु आपल्या शिक्षणाचा टिकाऊ अगर परिणामकारक ठसा देशी लोकांच्या मनांवर सामान्यतः उठवावयाचा असेल किंवा अधिक चांगले, अधिक विद्वान् किंवा अधिक उपयोगी लोक निर्माण करावयाचे असतील, तर गव्हर्नर साहेबांच्या खालीपूर्वक मताप्रमाणें योग्य ज्ञानाचा बहुजनांत फैलाव करण्याचें, देशी भाषा याच साधन बनणें जरूर आहे आणि म्हणून देशी भाषा माध्यम असलेल्या जिल्हा शाळांची व ग्रामशाळांची कार्यक्षमता वाढविण्यासाठीं अधिक प्रयत्न करणें जरूर आहे, असें गव्हर्नर साहेबांचें मत आहे." देशी भाषांतून योग्य तऱ्हेचें वाङ्मय व पुस्तकें नसल्यामुळें देशी भाषा शिक्षण देण्याच्या दृष्टीनें त्याज्य आहेत. या इंग्रजी भाषाभिमान्यांकडून पुढें येणाऱ्या तक्रारीलाही सदर पत्रांत योग्य उत्तर दिलें आहे. "देशी भाषेंत पुस्तकें नसलीं तर इंग्रजी भाषेंतून देशी भाषांत भाषांतरें करून ही उणीव दूर करतां येईल, असें सुचवून योग्य तऱ्हेचीं पुस्तकें लागतील तितकीं पुर-

* E. R. 11, 20 § E. R. 11, 16

विण्याची जबाबदारी सरकारावर आहे व त्या प्रमाणें सरकार जरूर ती तजवीज करण्यास तयार आहे."* असेंही सदर पत्रांत आश्वासन देण्यांत आलें. मुंबई सरकारनें जो हा प्रतिकूल निर्णय दिला त्यावरून चिडून सर पेरीसाहेबांनीं ता. १२-४-१८४८ रोजीं बोर्डाचे अध्यक्षपदाचा राजिनामा देण्याची धमकी देऊन विस्तृत असें एक पत्रक (Minute) सरकारकडे पाठविलें, परंतु त्याचा कांहीं परिणाम न झाल्यामुळें अखेर सरसाहेबांनीं आपला राजिनामा पाठविला व त्यानंतर सन १८५४ च्या सुप्रसिद्ध खलित्याच्या कलम १३ मध्यें या बाबतींत कंपनी सरकारनें आपलें धोरण पुढीलप्रमाणें जाहीर केलें. " देशी भाषांच्या ऐवजीं इंग्रजी भाषेची योजना करणें हा आमचा हेतु नाहीं अगर तशी आमची इच्छाही नाहीं. जनतेतील बहुसंख्यांक समाजाला ज्या भाषा फक्त अवगत आहेत त्या भाषांच्या उपयोगाचें महत्त्व आम्हांला माहीत आहे. पर्शियन भाषा कमी करून तिच्याऐवजीं न्यायदानाचे कामीं व सरकार व प्रजा यांच्या परस्पर व्यवहारासाठीं इंग्रजी भाषेची योजना न करतां देशी भाषांची योजना करण्यांत आलेली असल्यामुळें, कोणत्याहि शिक्षणक्रमांत या भाषांच्या विशेष अभ्यासाला उत्तेजन देऊन, ज्यांना आपल्या कांहीं परिस्थितीमुळें वरच्या दर्जाचें शिक्षण दुर्लभ आहे आणि ज्यांना परकी भाषेच्या अडचणींतून मार्ग काढतां येणार नाहीं, अशा बहुजन समाजाला युरोपियन ज्ञानाची ओळख मात्र देशी भाषांतून करून देणें अपरिहार्य आहे×." श्रेष्ठतम अधिकाऱ्यांच्या या स्पष्टीकरणाच्या जलसिंचनानें त्या वेळीं या वादाचे निखारे पूर्णपणें विझले गेले.

कोणास शिक्षण द्यावें— हिंदी प्रजेला शिक्षण द्यावयाचें ठरल्यानंतर तें प्रथम 'वरिष्ठ वर्गांच्या लोकांना द्यावयाचें का खालच्या बहुजनसमाजाला द्यावयाचें' याच्याबद्दल वाद सुरू होऊन निरनिराळ्या लोकांनीं एक किंवा दुसरी बाजू पत्करून आपल्या मताच्या समर्थनार्थ विविध कारणें दर्शविण्यास सुरुवात केली. सामान्य जनांच्या शिक्षणाची अंतःकरणाच्या तळमळीनें बाजू मांडणारा म्हणून मि. डब्ल्यु. फ्रेजर या इंग्रज गृहस्थाचें नांव चिरस्मरणीय राहील. मि. फ्रेजर यानें बंगालच्या चीफ सेक्रेटरीला तारीख २५।९।१८२३ रोजीं लिहिलेलें पत्र फार महत्त्वाचें आहे. सदर पत्रांत मि. फ्रेजर यांनीं "लोकांच्या अनैतिक वर्तनामुळें व अज्ञानामुळें, त्यांच्या शेती व जनावरें याविषयींच्या

* E. R. II 20 × E. R. II, 307

उपयुक्त ज्ञानावद्दल दिसून येणाऱ्या उपेक्षेमुळें या देशांत योग्य तऱ्हेचा राज्यकारभार करण्याच्या मार्गांत अडचणी उत्पन्न होत असून, शेतकरी वर्गाच्या मुलांपैकीं कांहींना योग्य तऱ्हेचें ज्ञान व माहिती देऊन त्यांच्यांत ज्ञानलालसा उत्पन्न करण्याची योजना आंखल्यावांचून गत्यंतर नाहीं" असें सरकारच्या निदर्शनास आणलें. फ्रेजरसाहेब हा 'आधीं केलें मग सांगितलें' अशा मताचा होता. त्यानें वर उल्लेख केलेलें पत्र सरकारला पाठविण्यापूर्वी स्वतःच्या खर्चानें सन १८१४ मध्यें शेतकऱ्यांचीं १५ मुलें घेऊन त्यांनाा लिहिण्यावाचण्यास शिकविण्यास सुरुवात केली होती. सन १८१६ मध्यें प्रत्येकीं २० मुलांच्या अशा दोन शाळा त्यांनीं चालू केल्या व १८२० मध्यें तिसरी सुरू केली व १८२३ सालीं आणखी एक शाळा उघडली. सदरच्या ह्या शाळा "मुख्यतः शेतकरी वर्गाचे मुलांसाठीं असून त्यांना लिहितां वाचतां आलें म्हणजे त्यांना ब्रिटिशांच्या न्याय व मुलकी पद्धतीविषयीं माहिती होऊन त्यांचा फैलाव बहुजन समाजांत व्हावा" अशा उद्देशानें काढण्यांत आल्या होत्या. "शहरांतून शाळा काढणें हें तुलनात्मक दृष्टीनें विचार केला तर कमी महत्त्वाचें आहे. शहरांत राहणाऱ्या वर्गांतील बहुसंख्यांक मुलांना त्यांचे पालकच शिक्षण देत असतात. खरें पहातां खेड्यतून वंशपरंपरागत मालकी हक्कानें जमिनी उपभोगणाऱ्या शेतकरी वर्गाच्या मुलांना, बहुजन समाजाला, शिक्षणाची खरी जरूरी असून त्यामुळें त्यांचा फायदा होईल," असें म्हणून फ्रेजर साहेबांनीं आपल्या पत्रांत शेतकरी वर्गाच्या शिक्षणाची एक योजना सरकारपुढें मांडून त्यांच्याकडे मदतीची याचना केली.

फ्रेजरसाहेबांची योजना सरकारनें जनरल कमिटी ऑफ् पब्लिक इन्स्ट्रक्शनकडे विचारासाठीं पाठविली. सदर कमेटीनें तारीख २९।११।१८२३ रोजीं फ्रेजर साहेबांना मदत देण्याचें नाकारून ती नाकारण्याचें कारण म्हणून "सरकारजवळ मर्यादित प्रमाणांत असलेल्या पैशाचा व्यय, हिंदी समाजांतील अधिक शिष्ट व विशेषतः शिकणें हा ज्यांचा पेशा आहे अशा वर्गाच्या शिक्षण–सुधारणेप्रीत्यर्थ होणें योग्य आहे,¶" असें कळविण्यांत आलें. कमिटीचें हें असें मत होण्यास कमिटीच्या सभासदांपैकीं मि. होल्ट मॅकेन्झी यांची

¶ E. R. I. 15.

ता. १७।७।१८२३ ची पत्रिका (Note) विशेष कारण झाली असें म्हटल्यास अयोग्य होणार नाहीं. सदरची पत्रिका विस्तारपूर्वक लिहिली असून, त्यांत हिंदुस्थानच्या लोकांना कोणतें शिक्षण देणें जरूर आहे, व त्या शिक्षणाचा त्यांच्या दैनंदिन जीवनावर कसा दूरगामी परिणाम होईल याचें भडक वर्णन केलें आहे. प्रस्तुत विवेचनाच्या दृष्टीनें येवढेंच सांगावयाचें कीं मॅकेन्झी साहेबांनीं "निदान हल्लींच्या परिस्थितींत बहुजन समाजाच्या शिक्षणाची सोय करणें अगदीं अशक्य आहे." असा आपला असंदिग्ध अभिप्राय देऊन "जे पुढें स्वतःच शिक्षक होतील त्यांच्याच शिक्षणाकडे व उपयुक्त पुस्तकांचीं भाषांतरें तयार करण्याकडे आणि तीं प्रसिद्ध करण्याकडे सरकारनें लक्ष द्यावें व या गोष्टी साध्य झाल्यानंतर प्राथमिक शाळा स्थापन करून त्यांना मदत करण्यापेक्षां, ज्यांना आपण सुशिक्षित व वजनदार म्हणूं अशा वर्गाच्या शिक्षणासाठीं उच्च विद्यालयें (Colleges) काढून त्यांना मदत करणें हें सरकारचें पहिलें काम असावें" § असा त्यांनीं सरकारला सल्ला दिला.

खालच्या वर्गांच्या प्राथमिक शिक्षणाचीही विशेष सोय न करतां वरिष्ठ वर्गाच्या उच्च शिक्षणाची अधिक आस्थापूर्वक सोय करण्यांत यावी असें सुचविण्याचीं कारणेंही मॅकेन्झी साहेबांनीं दिलीं आहेत. त्यांपैकीं महत्त्वाचें कारण म्हणजे " बाहेरून आलेली विद्या वरचे अगर शिकलेल्या वर्गाकडून खालच्या वर्गांकडे झिरपत जाणें, हा सर्व देशांत स्वाभाविक नियम असल्याचें दिसतें. आपला मालक ज्या विद्येकडे द्वेषाच्या अगर तिरस्काराच्या नजरेनें पाहातो त्या विद्येला नोकर महत्त्व देईल, अशी आपल्याला खात्रीनें अपेक्षा करतां येणार नाहीं."‡

बंगालमधील अधिकाऱ्यांप्रमाणें मद्रासमधील अधिकारीही वरिष्ठ वर्गाच्याच उच्च शिक्षणाची अधिकाधिक तरफदारी करूं लागले. सर थॉमस मन्रो यांनीं सामान्य वर्गाच्या शिक्षणासाठीं सन १८२८ सालच्या सुमारास केलेली एक योजना सन १८३६ च्या सुमारास रद्द करण्यांत आली. लॉर्ड एल्फिन्स्टन यांनीं १२-१२-१८३९ च्या आपल्या पत्रिके (minute) मध्यें "मद्रासमध्यें सार्वत्रिक शिक्षणाची केलेली योजना निराशाजनक ठरल्यामुळें अखेर रद्द करावी लागली" असें स्पष्ट म्हणून त्यांनींही "नवीन प्रकाशकिरणाला प्रथम पर्वतमाथ्याला स्पर्श केल्यावांचून सपाट अगर सखोल भागाला उजळ करतां

---

§ E. R. I. 59 ‡ E. R. I. 60

येत नाहीं "असे कांहींसे काव्यपूर्ण उद्गार काढून वरिष्ठ वर्गाच्या शिक्षणावरच भर दिला.

मुंबई प्रांतांतही तसाच प्रकार झाला. मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनीं गरिबांच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारवर आहे असें ॲडॅम स्मिथ या राजशास्त्रावरील प्रसिद्ध ग्रंथकाराचा आधार घेऊन सन १८२४ मध्यें प्रतिपादून बहुजनसमाजाची तरफदारी केली. परंतु बोर्ड आफ एज्युकेशनचे सर पेरी हे अध्यक्ष झाल्यावरोबर त्यांनीं बहुजनसमाजाच्या शिक्षणाकडे पूर्ण दुर्लक्ष करून वरिष्ठ वर्गाच्या उच्च शिक्षणाप्रीत्यर्थच आपलें शक्तिसर्वस्व खर्च केलें. जी रक्कम (grant) खर्चून " बहुजन समाजावर कांहीं दृश्य परिणाम होणार नाहीं ती रक्कम कांहीं थोड्या लोकांच्या उच्च शिक्षणासाठीं खर्च करणेंच अधिक श्रेयकर "असें त्यांचें मत होतें.×

हिंदुस्थानांतील इंग्रज लोकांच्या या वरिष्ठ वर्गाच्या उच्च शिक्षणाच्या तरफदारीचे पडसाद कंपनीचे चालकांचे खलित्यांतून देखील उठूं लागले. सर थॉमस मन्रोची बहुजन समाजाच्या शिक्षणाची योजना कंपनीच्या चालकांनीं ता. १६–४–१८२८ च्या खलित्यानें मान्य केली; परंतु त्यांनीं ता. २९–९–१८३० च्या खलित्यांत "सदर योजनेनें उच्च शिक्षणाची कांहीं तरतूद केली नाहीं " अशी तक्रार केली. सदर खलित्यांत कंपनीचे चालक लिहितात, "ज्यांना सवड आहे व ज्यांचे आपल्या देशबांधवांवर नैसर्गिक वजन आहे, अशा वरिष्ठ वर्गाच्या शिक्षणांत ज्या सुधारणा होतील, त्या सुधारणांमुळेंच लोकांचा नैतिक व बौद्धिक दर्जा वाढविण्यास परिणामकारक मदत होईल. प्रत्यक्ष बहुजन समाजाला शिकविण्यापेक्षां या वरिष्ठ लोकांच्या कल्पनांत व भावनांत मोठा व अधिक हितकारक असा फरक घडवून आणतां येईल. "‡

याप्रमाणें वरच्या वर्गाच्या उच्च शिक्षणावर भर देण्याचीं कारणें होतीं. प्रथम बहुजन समाजाला साक्षर करण्याच्या ईर्षेनें पुढें आलेल्या इंग्रज लोकांनीं एकदम माघार कां खाल्ली ? पहिलें कारण असें कीं, लोकांच्या शिक्षणाच्या कामासाठीं सरकारकडून मंजूर होणारी रक्कम फारच अपुरी असें; प्रामाणिकपणें बहुजन समाजाला शिक्षण देण्याची उत्कृष्ट इच्छा असणारालाही त्या तुटपुंज्या रकमेंत विशेष कांहीं साधतां आलें नसतें. डोंगर फोडण्याची महत्त्वा-

× हंटर. क. रि ९० ‡ E. R. I. 51.

कांक्षा बाळगणाऱ्याच्या हातांत त्या कामासाठीं कोणा एखादा खिळा दिला तर त्यानें हताश होऊन वसण्यापलीकडे दुसरें काय करावें ? दुसरें कारण असें कीं, बहुजन समाजांत साक्षरतेचा प्रसार करण्याच्या मार्गांत अडचणी अनेक व साधनें फार कमी, जवळ जवळ नाहींतच. स्वतः लोक गरिबीमुळें, हजारों वर्षांच्या धार्मिक कल्पनांमुळें, शिक्षण घेण्यास नाखूष व त्यांना शिक्षण देण्यासाठीं लायक शिक्षकांचा पूर्ण अभाव. याच्या उलट सरकारी नोकऱ्या मिळूं लागतांच वरिष्ठ वर्गाची उच्च शिक्षणाबद्दल वाढती मागणी ! त्यामुळें साहाजिकच मागणी पुरी करण्याकडे अधिकाऱ्याची प्रवृत्ति होऊन " प्राथमिक शिक्षणाप्रीत्यर्थ व्यर्थ व्यय करून शिक्षणासाठीं मिळणारी रक्कम संपविण्यापेक्षां वरिष्ठ वर्गाच्या शिक्षणासाठीं ती खर्च करणें अधिक चांगलें "‡ असें कंपनीचे चालकच म्हणूं लागले. या विचारसरणीचा परिपाक ' झिरपणी तत्त्वा '-(filtration theory) च्या जन्मांत झाला. १८२३ सालीं मॅकेन्झी साहेबांनीं प्रथम ती मांडली. १८३५ सालीं मेकॉले साहेबांनीं तिला ठाक-ठीक स्वरूप दिलें व आपल्या २४-११-१८३९ च्या पत्रिकेंत " ज्यांना उच्च विद्येसाठीं फुरसद आहे अशांना आपल्या अधिकारांत असलेलें पूर्ण शिक्षण देणें आपला प्रधान हेतु आहे " असें म्हणून लॉर्ड ऑकलंडसाहेबांनीं तिच्यावर मान्यतेचे अलंकार चढविले. या मोठमोठ्या लोकांनीं केलेल्या अद-मासाप्रमाणें लाखो रुपये खर्च करून वरिष्ठ वर्गांना दिलेलें पूर्णतेचें उच्च शिक्षण खालच्या वर्गाकडे झिरपत गेलें कीं नाहीं हें आपण योग्य स्थळीं पाहूंच; परंतु बहुजन समाजाला मिळावयाच्या प्राथमिक शिक्षणाला जोराची कोपर-खळी बसून मूठभर वरिष्ठ वर्गाच्या लोकांना उच्च शिक्षण मिळण्याची सोय झाली, हें मात्र खरें !

' उच्च शिक्षणाविरुद्ध प्राथमिक शिक्षण ' या कलहांत मुंबई इलाख्यांतील बोर्ड ऑफ एज्युकेशनचे अध्यक्ष यांनीं उच्च शिक्षणाची बाजू घेतली याचा उल्लेख मागें आला आहेच. ते बोर्डाचे अध्यक्ष असतांना त्यांनीं प्राथमिक शिक्षणाला पोटभर कोंडाही न देतां, वरिष्ठ शिक्षणाला—इंग्रजी शिक्षणाला—भरपूर मदतीचे मांडे चारण्यास सुरुवात केली. त्यांनीं जरी हें धोरण आखलें तरी प्राथमिक शिक्षणाचा कडक कैवार घेणारे कांहीं महाभाग निघालेच. मूठभर लोकांना चांगलें शिक्षण देण्याबरोबर बहुजन समाजालाही

‡ E. R. I. 52.

मराठी १०१ दि. नं. ५५६८

त्यांच्या धंद्याला पोषक असें संसारोपयोगी शिक्षण देण्यानेंच देशाची खरी प्रगति होईल, हें जोरानें प्रतिपादण्यास त्यांनीं सुरवात केली. सरकारी यांनीं आपल्या शिक्षणाच्या योजनेंत वरिष्ठ दर्जाचें इंग्रजी शिक्षण व कनिष्ठ दर्जाचें देशी भाषांचें शिक्षण, असें वर्गीकरण केलें होतें. पहिल्या प्रतीचें शिक्षण हें वरिष्ठ वर्गाकरितां व दुसऱ्या प्रतीचें शिक्षण हें सामान्य लोकांकरितां असे; परंतु त्यांचा खऱ्या सहानुभूतीचा ओघ पहिल्या तऱ्हेच्या इंग्रजी शिक्षणाकडे असल्यामुळें, देशी भाषेंतून दिल्या जाणाऱ्या प्राथमिक शिक्षणाचे अंकूर वाळूं लागून थोड्याच दिवसांत करपूर गळून पडूं लागले; व याचें उदाहरण म्हणजे पुरंदर तालुक्यांत शेतकऱ्यांच्या शिक्षणासाठीं सुरू करण्यांत आलेल्या शाळा बोर्डानें बंद केल्या हें होय. प्रयोगादाखल सुरू केलेल्या या शाळा कां बंद कराव्या लागल्या यांचीं कारणें बोर्डानें आपल्या १८४६ सालच्या रिपोर्टांत दिलीं आहेत; त्याबद्दल खालील उतारा त्या वेळच्या धोरणावर प्रकाश पाडण्याच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे.

" सरकारी शिक्षणप्रसाराच्या कोणत्याही व्यापक व विस्तृत योजनेंत शहरांप्रमाणें खेड्यांनाही एखादी प्राथमिक शाळा असण्याचा हक्क आहे, यांत कांहीं शंका नाहीं. हल्लीं मुंबई प्रांतांत लोकसंख्येच्या तत्त्वावर केलेल्या यांत्रिक स्वरूपाच्या व्यवस्थेप्रमाणें अल्प साधनांना विस्तृत अशा क्षेत्रावर ओढून ताणून पसरण्यांत आलें आहे. मुंबई इलाख्यांत लाखों लोकांना शिक्षण देण्याच्या दृष्टीनें आपलीं साधनें किती मर्यादित आहेत, हें बोर्डानें सांगण्याची जरूरी नाहीं. परंतु बोर्डाच्या जवळ अक्षय साधनसंपत्ति आहे असें मानलें तरी हल्लीं जबाबदारी सांभाळण्यास लायक अशा शिक्षकांच्या दुष्काळामुळें खेड्यांतील शाळांची योग्य व्यवस्था अमलांत आणणें अशक्य आहे. अशा स्थितींत पुरंदरमधील शाळांसाठीं प्रयोगादाखल आम्ही करीत असलेला दरमहा रु. ३५० चा खर्च, ही व्यर्थ उधळपट्टी आहे असें वाटल्यावरून व हीच रक्कम कांहीं थोडया शाळांसाठीं अधिक चांगल्याप्रकारें खर्च करतां येण्यासारखी असल्यामुळें बोर्डानें पुरंदर येथील शाळा बंद करून जिल्ह्यांत एकदां बंद केलेल्या शाळा पुन्हां चालू न करण्याचें व हल्लीं चालूं असलेल्या शाळा बंद करण्याची संधि आली तर त्या बंद करण्याचें धोरण निश्चित केलें."§

सर पेरी साहेबांच्या मार्गदर्शकत्वाखालीं बोर्डानें आखलेलें हें धोरण मुंबई

---

§ E. R. II 147.

सरकारला प्राथमिक शिक्षणाच्या पुरस्कर्त्यांच्या प्रयत्नामुळें मुळींच पसंत पडलें नाहीं. मुंबई कायदे-कौन्सिलचे सभासद (१८४७-५७) ना. सर जॉन वुलोबी यांनीं बोर्डाचें सन १८४७-४८च्या अहवालाबद्दल ता. १२-१-१८५०च्या पत्रिकेंत चर्चा करतांना पुढील उद्गार काढले—" सरकारच्या मतें हल्लीं वाजवीपेक्षां जास्त लक्ष इंग्रजी शिक्षणाकडे पुरविण्यांत येत असून, देशी भाषेंतील शिक्षणाकडे कमी लक्ष देण्यांत येत आहे. तसेंच शिक्षणाच्या या दोन शाखांमध्यें शिक्षणाकरितां मंजूर केलेली रक्कम विषम प्रमाणांत वाटण्यांत येत आहे. " सरकारच्या या कानपिचकीमुळें बोर्डाच्या धोरणावर इष्ट असा परिणाम होऊन सन १८५१ ते ५३ सालांत बोर्डानें सातारा, सोलापूर, खानदेश व काठेवाड या मागासलेल्या जिल्ह्यांतून शाळा उघडण्याचा प्रयत्न केला. सरकारनेंही सन १८५४ च्या मे व आक्टोबरमध्यें अशीं दोन पत्रकें प्रसिद्ध करून, कोणत्या अटींवर लोकांना शाळा स्थापन करून त्यांना मदत देण्यांत येईल, हें जाहीर केलें.

मुंबई सरकारप्रमाणें कंपनीच्या चालकांच्या दृष्टिकोनांतही महत्त्वाचा फरक घडून आला. आपल्या ता. ३।९।१८२७ च्या व २८।९।१८३० च्या खलित्यांत वरिष्ठ वर्गाच्या उच्च शिक्षणाची, शिक्षणाप्रीत्यर्थ मंजूर झालेल्या पैशांतून, अधिक सोय करण्याबद्दल आग्रह धरणाऱ्या चालकांनीं आपल्या १८५४ च्या खलित्यांत अगदींच निराळ्या धोरणाची मांडणी केली. हा खलिता अतिशय महत्त्वाचा असून त्याला हिंदुस्तानांतील शिक्षणाचा ' मॅग्नाचार्टा ' असें संबोधण्यांत येतें. या खलित्यांतील कांहीं भाग पुढें देण्यांत आला आहे; त्यावरून त्याच्या महत्त्वाची थोडीफार कल्पना येईल.

२. "महत्त्वाच्या अनेक विषयांपैकीं शिक्षणाइतका आमचें लक्ष वेधण्याचा दुसऱ्या विषयास अधिकार नाहीं. इंग्लंड देशाशीं संबंध आल्यामुळें, परमेश्वरकृपेनें उपयुक्त विज्ञानाच्या सार्वत्रिक फैलावापासून जे नैतिक व भौतिक फायदे होतात, ते फायदे हिंदुस्थानांतील रयतेच्या शक्यतों पदरांत टाकण्याचें साधन होणें, हें आमचें कर्तव्य आहे. देशी लोकांमध्यें अनेक शतकें रूढ असलेल्या, निकृष्टावस्थेस पोहोंचविणाऱ्या, अनेक चालीच नव्हे, तर भयंकर स्वरूपाचे गुन्हे करण्याच्या प्रवृत्तीही, कैक ठिकाणीं ब्रिटिश वजनामुळें मुळापासून उखडल्या गेल्या असल्या तरी, या प्रयत्नांमुळें दिसूं लागलेलीं चांगलीं फळें कायम टिकण्याच्या दृष्टीनें देशी लोकांच्या मनांत त्यांच्याविषयीं सहानुभूतीचा ओलावा

निर्माण होणें आवश्यक असून तो ओलावा शिक्षणाच्या प्रगतीमुळेंच उत्पन्न होणार आहे.

"४. (युरोपियन ज्ञानामुळें) हिंदुस्थानांतील देशी लोकांना मजुरी (labour) व भांडवल यांच्या उपयोगापासून होणारे आश्चर्यकारक परिणाम समजतील. आमच्याप्रमाणें आपल्या देशाच्या अफाट साधनसंपत्तीची वाढ करण्यास ते प्रवृत्त होतील, त्यांच्या प्रयत्नाला योग्य दिशा मिळून हलके हलके पण खात्रीपूर्वक, संपत्ति व व्यापाराच्या बलवर्धक वाढीपासून होणारे सर्व फायदे त्यांना प्राप्त होतील व त्याच वेळीं आम्हालाही कारखान्यांसाठीं लागणाऱ्या व आमच्या लोकांपैकीं सर्व वर्गांच्या नित्याच्या उपयोगाच्या अनेक जिनसा मिळून ब्रिटिश प्रयत्नानें पैदा होणाऱ्या वस्तूंसाठीं अक्षय मागणी सुरू होईल.

"सुधारलेले हुन्नर, शास्त्रें, तत्त्वज्ञान व युरोपियन वाङ्मय, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे युरोपियन ज्ञानाचा फैलाव करणें हें आमचें ध्येय आहे, हें स्पष्टपणें आम्हांला जाहीर करणें जरूर आहे.

"३९. या उच्चशिक्षणाच्या संस्थांकडेच आतांपर्यंत मुख्यतः सरकारकडून लक्ष देण्यांत आलें असून, शिक्षणासाठीं खर्च होणाऱ्या रकमेचा बव्हंश त्याचेसाठींच खर्च झाला आहे.

"४०. ज्यांना शिकविलें असतां, त्यांच्या बाकीच्या देशबांधवांवर सावकाशपणें परिणाम होऊन अंतीं सर्व देशाचा शिक्षणविषयक दर्जा वाढेल, अशा वरिष्ठ वर्गाच्या लोकांना उदार (liberal) युरोपियन शिक्षण मिळेल, असे प्रयत्न करणें योग्यच आहे व म्हणून आतांपर्यंत त्या दिशेनें जे प्रयत्न करण्यांत आले, त्यांना आम्ही कमी लेखीत नाहीं. परंतु हे वरचे वर्ग आपल्या शिक्षणासाठीं येणाऱ्या खर्चापैकीं बराच भाग झेपण्यास समर्थ व तयार आहेत.

"४०. सबब आम्ही आतां अधिक महत्त्वाच्या व आतांपर्यंत उपेक्षिलेल्या बाबीकडे म्हणजे आमच्या मदतीवांचून आपल्या स्वतःच्या प्रयत्नानें, ज्याला शिक्षण म्हणतां येईल असें शिक्षण घेण्यास असमर्थ असलेल्या हिंदुस्थानांतील बहुजन समाजाला रोजच्या जीवनाला शोभेसें उपयुक्त व व्यवहारी शिक्षण कसें देतां येईल या प्रश्नाकडे लक्ष वळविणें जरूर आहे व सरकारचे भविष्यकालीन प्रयत्न या हेतुसिद्धीसाठीं होणें अगत्याचें असून, त्याकरितां आम्ही खर्चाच्या रकमेंत अधिक वाढ करण्यास तयार आहोंत.

"४६. गांवटी शाळा बहुजन समाजाला योग्य प्राथमिक शिक्षण देतील

अशा कार्यक्षम होणें जरूर आहे. या शाळांतील हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना वरील शिक्षणासाठीं शिष्यवृत्त्या देऊन उत्तेजन देणें जरूर आहे."

याच खलित्यांत कंपनीच्या चालकांनीं शहरांतीलच नव्हे तर, शहरांपासून दूरच्या खेड्यांतील लोक चांगलें शिक्षण घेण्यासाठीं उत्सुक असल्याचें कबूल केलें असून या लोकांना शिक्षण योग्य तऱ्हेनें देण्यासाठीं गांवठी शाळांना मदती-दाखल देणगी (grant-in-aid) देण्याच्या पद्धतीचा पुरस्कार केला.

या खलित्यांत सुचविल्याप्रमाणें १८५५ सालीं 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' रद्द करून मुंबई प्रांतिक सरकारनें शिक्षणाचें खातें सुरू करून त्यावर 'डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन' या हुद्याचा अधिकारी नेमला व प्राथमिक शिक्षणाची वाढ करून त्याला योग्य वळण लावण्याची त्याच्यावर जबाबदारी टाकण्यांत आली.

सन १८४० सालापासून १८५५ सालीं बोर्ड रद्द होईपर्यंतच्या पंधरा वर्षांच्या कालांतील बोर्डाच्या कारभाराचें सार काढावयाचें म्हटल्यास, देशी विरुद्ध इंग्रजी या झगड्यांत बोर्डानें इंग्रजी भाषेची तरफदारी करून देशी भाषांची पूर्ण उपेक्षा केली. प्राथमिक शिक्षणाविरुद्ध उच्च शिक्षण या लढ्यांत उच्च शिक्षणाची बाजू उचलून धरून सरकारकडून मिळणाऱ्या द्रव्यापैकीं बव्हंश त्याच्या वाढीसाठीं खर्च केला व प्राथमिक शिक्षणाची पुरी हेळसांड केली. वरिष्ठ वर्गांचें शिक्षण का खालच्या वर्गांचें शिक्षण या प्रश्नाचें उत्तर 'वरिष्ठ वर्गांचें शिक्षण' असें देऊन बहुजन समाजाला पूर्वापारपासून पसरलेल्या अज्ञानांधकारांत तसेंच चांचपडत ठेविलें. शहर विरुद्ध खेडें या वादांत शहराच्या बतीचा निकाल देऊन खेडेगांवांना नवीन शाळा सुरू करण्याच्या ऐवजीं असलेल्या शाळा बंद करून कमालीची बेफिकिरी दाखविली. एकंदरींत बोर्डाची पहिल्या दहा वर्षांची अमदानी सामान्य जनांच्या शिक्षणाच्या प्रगतीच्या दृष्टीनें अतिशय प्रतिगामी स्वरूपाची व पूर्ण निराशाजनक झाली यांत शंका नाहीं. बोर्डाच्या आयुष्याच्या उत्तरार्धांत बोर्डाच्या धोरणांत फरक पडला व त्यामुळें ठिकठिकाणीं देशी भाषेच्या शाळा उत्पन्न झाल्या व गांवठी शाळांनाही तपासणी करून उत्तेजन देण्यांत येऊं लागलें. बोर्डाच्या अखेरच्या दिवसांत लोकांच्या मदतीवर अवलंबून असलेल्या पण सरकारच्या देखरेखीखालीं चाललेल्या प्राथमिक शाळांची पद्धत सुरू करण्यांत आली; याच पद्धतीपासून लोकल फंडावर चालणाऱ्या शाळांचे मोड फोफावले असें म्हणण्यास हरकत नाहीं.

१८५४-१८८३.

इ. स. १८५४ पर्यंत शिक्षणाची वाटचाल कशा प्रकारें होत होती, हें आपण पाहिलें आहे. निरनिराळ्या प्रांतांतून स्थानिक अधिकारी, एज्युकेशन बोर्ड्स व एज्युकेशन कमिटी यांच्या मताप्रमाणें व त्यांच्या कार्य करण्याच्या मगदुराप्रमाणें कमीजास्त प्रमाणांत व भिन्न स्वरूपांत शिक्षणप्रसाराचें कार्य चाललें होतें. अखेर या सर्व प्रयत्नांचें निरीक्षण करून सर्व प्रांतांनीं एकाच तालावर पाऊल टाकणें जरूर वाटल्यावरून व निरनिराळ्या प्रांतांत अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर जी वादाची रणधुमाळी माजून राहिली होती, ती मिटविण्याच्या हेतूनेंहि कंपनीच्या चालकांनीं आपला सन १८५४ सालचा अतिशय महत्त्वाचा खलिता तयार केला आणि हिंदुस्थानांतील शिक्षणविषयक प्रयत्नाला जोराची चालना देऊन त्या प्रयत्नाला एकरूपता आणली.

१८५४ च्या खलित्यांत सरकारनें हिंदुस्थानांतील सर्व रयतेच्या शिक्षणाचीं जबाबदारी पत्करून, तें सरकारच्या कर्तव्यांपैकीं एक महत्त्वाचें कर्तव्य आहे, या तत्त्वाला मान्यता दिली. १८५४ च्या खलित्यानंतर लवकरच हिंदुस्थानांत प्रचंड बंडाची वावटळ उठली व त्याचा परिणाम कंपनी सरकारच्या अधिकाराचा शेवट होण्यांत होऊन हिंदुस्थानाचीं राज्यसूत्रें विलायत सरकारच्या—बादशहाच्या—हातांत गेलीं. हा अधिकारांत बदल झाला तरी शिक्षणविषयक आपल्या धोरणांत बदल झाला नाहीं हें दर्शविण्यासाठीं विलायत सरकारनें ७—४—१८५९ च्या खलित्यानें १८५४ च्या खलित्यांत मांडण्यांत आलेल्या तत्त्वांना व धोरणाला मान्यता दिली.

१८५४ च्या खलित्यांतील कांहीं महत्त्वाचा भाग आपण पाहिला आहेच. या खलित्यानें इंग्रजी व देशी भाषांतील शिक्षणाची सुधारणा व विशेष विस्तार करण्याकडे प्रांतिक सरकारचें खास लक्ष वेधून, हें ध्येय साध्य करण्यासाठीं साधन म्हणून पुढील सात महत्त्वाच्या गोष्टी करण्याबद्दल शिफारस केली. १ शिक्षणाच्या व्यवस्थेसाठीं स्वतंत्र खात्याची स्थापना करणें. २ इलाख्याच्या राजधानीच्या गांवीं विश्वविद्यालयाची स्थापना करणें. ३ सर्व तऱ्हेच्या शाळांसाठीं शिक्षकांना शिक्षण देण्यासाठीं संस्था अस्तित्वांत आणणें. ४ चालू असलेलीं कॉलेजें व उच्च शिक्षणाच्या शाळा तशाच चालवून शक्य असेल तेथें त्यांच्या संख्येंत भर घालणें. ५ नवीन मिड्ल स्कूल्सची योजना करणें. ६

प्राथमिक शिक्षण देण्यासाठीं एतद्देशीय अगर इतर देशी भाषांतील शाळांकडे वाढतें लक्ष देणें, व ७ मदतीच्या पद्धतीचा नवीन अवलंब करणें. या सात बाबींपैकीं नं. २, ४, ५ या आपल्या प्रस्तुत विषयाच्या दृष्टीनें गैरलागू असल्यामुळें, त्यांचा आपल्याला विचार करण्याचें कारण नाहीं.

या खलित्याप्रमाणें मुंबई प्रांतांत १८५५ च्या मे महिन्यांत नवीन खातें काढण्यांत येऊन त्या खात्याचे मुख्य म्हणून डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन या हुद्याच्या अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत आली. सदर डायरेक्टरच्या हाताखालीं इन्स्पेक्टर, डेप्युटी व असिस्टंट इन्स्पेक्टर या हुद्याचे निरनिराळे अनेक अधिकारी नेमण्यांत आले. हें खातें सुरू झाल्यानंतर लवकरच त्यांनीं इलाख्याची कामाच्या दृष्टीनें विभागणी करून देशांतील सर्व शिक्षणसंस्थांवर नियंत्रण चालविण्यास सुरवात केली. या खात्यानें १८८२ पर्यंत प्राथमिक शिक्षण सुधारण्यासाठीं व प्रसारासाठीं काय काय प्रयत्न केले याची संक्षेपानें पहाणी करावयाची आहे.

प्राथमिक शिक्षणाची सोय—प्राथमिक शिक्षण देण्याची या खात्याला दोन प्रकारें सोय करतां येणें शक्य होतें. एक मार्ग म्हणजे ज्या हजारों गांवठी शाळा लोकांना जुन्या पद्धतीनें शिक्षण देण्याचें परंपरागत कार्य करीत होत्या, त्यांना आर्थिक मदत करून व त्यांच्या शिक्षणपद्धतींत सुधारणा घडवून आणून त्यांना कार्यक्षम बनविणें व दुसरा मार्ग, नवीन सुधारलेल्या कल्पनेप्रमाणें कार्य करणाऱ्या सरकारी मदतीवर सर्वस्वीं चालणाऱ्या खात्यांच्या शाळा सुरू करणें. बंगाल व मद्रासमध्यें प्रामुख्यानें गांवठी शाळांना मदत करण्याचें व ज्या ठिकाणीं गांवठी शाळा नाहींत त्या ठिकाणीं निरुपाय म्हणून सरकारी शाळा काढण्याचें धोरण तेथील शिक्षणखात्यानें अंगीकारलें. या धोरणामुळें गांवठी शाळांची झपाट्यानें प्रगति होऊन आर्थिक मदतीच्या आशेनें गांवठी शाळांच्या चालकांनीं खात्याला पसंत पडेल अशा तऱ्हेनें शिकविण्याच्या पद्धतींत व शिकविण्याच्या विषयांत फेरबदल केले व त्यामुळें शिक्षणाच्या प्रसारास चांगली मदत झाली.

परंतु मुंबई इलाख्यांतील शिक्षणखात्यानें या धोरणाच्या विरुद्ध कार्यक्रम आंखला. गांवठी शाळांना विशेष आर्थिक मदत करून त्यांच्या कार्यपद्धतींत इष्ट सुधारणा घडवून आणण्याच्या नादीं फारसें न लागतां आपल्या मताप्रमाणें

त्यांनीं सरकारी नवीन शाळाच काढण्यास सुरुवात केली. सन १८८२ सालीं हंटर कमिशनपुढें आलेल्या माहितीप्रमाणें सरकारी मुलांच्या शाळा १६३० होत्या व फक्त ७३ गांवठी संस्थांस सरकारी मदत मिळत होती. परंतु त्या वेळीं एकंदर गांवठी शाळा ३९५४ असून त्यांमधून एकंदर ७८२०५ मुलें शिक्षण घेत होतीं.× यावरून गांवठी शाळांच्या बाबतींत मुंबईप्रांतांतील शिक्षणखात्याचें धोरण काय होतें, याची कल्पना येते. गांवठी शाळांच्या बाबतींत सरकारी खात्याचें असें धोरण असावयास थोडें कारणहि होतें. ब्रिटिश सत्ता प्रस्थापित होण्यापूर्वी देशांतील गडबडीच्या व दंगलीच्या परिस्थितीमुळें या इलाख्यांत फारशा गांवठी शाळा स्थापन झाल्या नव्हत्या व ज्या होत्या त्यांत बंगालमधील शाळांप्रमाणें संसारोपयोगी शिक्षण न देतां धार्मिक स्वरूपाचें शिक्षण देण्यांत येत असे. त्यामुळें रयतेला प्राथमिक शिक्षण देण्याचें आपलें व्रत सरकारनें जाहीर केल्यानंतर त्याच्या पालनासाठीं नवीन शाळा सुरू करणें क्रमप्राप्तच झालें. सन १८४० सालीं स्थापन झालेल्या बोर्ड ऑफ एज्युकेशननेंहि सन १८४२ व १८४७ सालीं या गांवठी शाळांना थोडी फार आर्थिक मदत देण्याचा विचार केला; परंतु तो त्यांना सोडून द्यावा लागला. बोर्डानें जमविलेल्या माहितीप्रमाणें सन १८४७ सालीं जरी एकंदर १७५१ गांवठी शाळा या प्रांतांत होत्या, तरी शेंकडा ९० गांवांना शाळा नव्हत्या! सन १८५२ सालीं या शाळांपैकीं कांहींना अल्पशी आर्थिक मदत देण्याची पद्धति सुरू करण्यांत आली होती.

परंतु सरकारी शाळांशीं तुलना केल्यानंतर या गांवठी शाळांची नालायकी उठावदारपणें लोकांच्या नजरेला येऊं लागल्यामुळें, साहजिकच त्यांचा ओढा सरकारी शाळांकडे जाऊन गांवठी शाळांना आपले दरवाजे बंद करण्याचा प्रसंग येई व त्यामुळें गांवठी शाळांना मदत करण्याच्या इच्छेनें अनेकवार त्यांच्यासंबंधीं संपूर्ण माहिती गोळा केली असतांहि, सरकारी खात्याला आपल्या शाळा ठिकठिकाणीं सुरू कराव्या लागत. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धामुळें मुंबई प्रांतांत कापसाची लागवड वाढून चांगले भाव आल्यामुळें शेतकऱ्यांना मुबलक पैसा मिळाला; त्यामुळें व त्यांना शिक्षणाचें थोडेसें महत्त्व समजावयास लागल्याकारणानें लोकलफंडवर सरकारच्या देखरेखीखालीं चालण्याऱ्या शाळांना फार मागणी वाढली. शाळा उघडली कीं त्यांत पुरेशीं मुलें

× हंटर क. रि. ६७.

जमत. या वाढत्या मागणीमुळें साहजिकपणें या शाळांमधील शिक्षणाचा दर्जा वाढला जाऊन त्यांचें स्वरूप सुधारलें व त्यामुळें त्यांच्याशीं तुलना केल्यानंतर जुन्या पद्धतीवर चालविण्यांत येणाऱ्या गांवठी शाळा अधिकच फिक्या पडल्या.

या सरकारी शाळांची लोकप्रियता वाढण्यास आणखी एक कारण झालें. शिक्षणासाठीं लोकांकडून घेण्यांत आलेला कर (Rates) पहिलीं पांच वर्षें ऐच्छिक तत्त्वावर घेण्यांत येत असे. या कराच्या खुषीच्या वसुलीमुळें शिक्षणासाठीं चांगला निधी जमला व त्यामुळें सरकारी अगर सेस शाळांवर देखदेखीच्या कामीं लोकल बोर्ड्स् लक्ष घालूं लागलीं. स्थानिक कमिट्यांनीं या शाळा सुधारण्याचा चंग बांधल्यामुळें या शाळांविषयीं लोकांना अधिक आपलेपणा वाटूं लागून, त्या अधिक प्रिय झाल्या. या वाढत्या लोकप्रियतेमुळें व सुधारणेमुळें गांवठी शाळा अधिकच मागें पडल्या. लोकल-फंड शाळांच्या वाढत्या लोकप्रियतेमुळें वर्गांत हजेरी वाढूं लागली व त्यामुळें त्यांचा खर्च कमी येऊं लागला. त्यांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक चांगलें व अधिक स्वस्त असें शिक्षण मिळूं लागलें आणि त्यांच्यामधील व गांवठी शाळांमधील अंतर साहजिकपणें उत्तरोत्तर अधिकाधिक वाढूं लागलें.

शिक्षणखात्यानें सरकारी शाळा काढल्या तरी कांहीं गांवठी शाळांना थोडी मदतहि करण्यांत येत असे व कांहीं गांवठी शाळांना आर्थिक मदत न करतां त्यांची खात्याकडून फक्त तपासणी करण्यांत येत असे. याप्रमाणें सन १८५४ ते १८८२ पर्यंतच्या कालांत प्राथमिक शिक्षणाची सोय सरकारी शाळा, मदतीच्या गांवठी शाळा व विनमदतीच्या पण सरकारकडून तपासल्या जाणाऱ्या शाळा अशा तीन प्रकारच्या शाळांतून होत असे. सरकारी शाळा या सदरांत म्युनिसिपल व लोकल बोर्डांच्याहि शाळांचा समावेश करण्यांत येत असे. सन १८८२ च्या हंटर कमिशनच्या माहितीप्रमाणें त्या वेळीं हिंदुस्थानांतील प्राथमिक शिक्षणाच्या शाळांपैकीं शेंकडा १६ शाळा सरकारी, शेंकडा ६९ शाळा मदतीच्या व शेंकडा १४ विनमदतीच्या पण सरकारी तपासणीच्या होत्या. त्या कमिशननें आपल्या रिपोर्टाच्या पान ८२ वर दिलेल्या तक्त्यावरून कांहीं प्रांतांबद्दल खालीं माहिती दिली आहे. त्यावरून प्रत्येक प्रांतांत या तीन तऱ्हेच्या शाळांचे कमीजास्त प्रमाण कसें होतें, याची चांगली कल्पना येते व प्रत्येक प्रांतांतील शिक्षणखात्याच्या धोरणाचा वारा कोणत्या दिशेनें वहात होता, याचा निश्चित अदमास करतां येतो.

सरकारी व मदतीच्या शाळांचें प्रमाण दाखविणारा तक्ता नं. २

प्रांत	सरकारी शाळा शेंकडा प्रमाण	मदतीच्या शाळा शेंकडा प्रमाण	विनमदतीच्या पण तपासणीच्या शाळा शेकडा प्रमाण
मद्रास	८·७	५१·२	४०·१
मुंबई	७१·४	३·६	२५
बंगाल	·०५	९१·५	८·४५
वायव्य सरहद्दप्रांत	९५·१	४·२	·७
पंजाब	८४·८	१५·२	०
मध्यप्रांत	६६·३	२७·३	६·४
आसाम	०·५	९३	६·५
कूर्ग	९५	५	०

सन १८५४ च्या खलित्यांत गांवठी शाळांना मदत करून व सरकारी शाळा काढून प्रांतांतील शिक्षणाची सोय करण्याबद्दल सूचना केली होती व ती सूचना करतांना प्रत्येक प्रांताला कोणत्या मार्गाचा अवलंब करावा याबद्दल स्वातंत्र्यहि देण्यांत आलें होतें. त्याप्रमाणें आपल्या स्थानिक परिस्थितीचा विचार करून निरनिराळ्या प्रांतांनीं वर तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणें प्राथमिक शिक्षणाची साय कला होती.

खर्चाची सोय:—खात्यानें प्राथमिक शिक्षणाची काय सोय केली होती हें पाहिल्यानंतर, ही सोय करण्यासाठीं जो पैसा लागणार त्याची काय तरतूद करण्यांत आली होती, हें पहाणेंहि अगत्याचें आहे. सन १८६२ सालीं म्युनिसिपल पैसे शिक्षणासाठीं खर्च करण्याला कायद्यानें मोकळीक देण्यांत आली. १८५९ पूर्वी शाळांना मदत देण्यांत येत असे, परंतु कोणत्याहि शाळेला स्थानिक लोकांनी टराविक प्रमाणांत मदत केल्यावांचून ती शाळा सरकारी मदतीला पात्र होत नसे. यामुळें सरकारी अधिकाऱ्यांना लोकांकडून ही मदत वसूल करण्याचें काम करावें लागे व ही मदत करण्याचें लोकांच्या इच्छेवर सोंपविण्यांत आलेलें असल्यामुळें, लोकांच्या मनांत, सरकारी अधिकारी हे वसुलाचे काम करूं लागल्यानंतर, सरकारविषयीं एकप्रकारची अप्रीति वाढण्याचा

संभव होता व ती भीति १८५९ च्या खलित्यामध्यें व्यक्त करण्यांत येऊन या ऐच्छिक तत्त्वावर मदत करण्याच्या ऐवजीं प्राथमिक शिक्षणाची तरतूद करण्यासाठीं एखादा कर बसविण्याची तोड सरकारच्या विचाराकरितां सुचविण्यांत आली होती.

या सूचनेप्रमाणें १८६३ सालीं लोकांवर शिक्षणाच्या खर्चाच्या सोयीसाठीं साऱ्याच्या एक रुपयास एक आणा यापमाणें कर बसविण्यास सरकारनें मंजुरी दिली. परंतु तो देणें हें पहिलीं पांच वर्षें लोकांच्या इच्छेवरच अवलंबून ठेवण्यांत आलें. या कराच्या उत्पन्नापैकीं एकतृतीयांश रक्कम प्राथमिक शिक्षणासाठीं खर्च करून बाकीची रक्कम स्थानिक लोकोपयोगी कामासाठीं खर्च करण्याचें ठरविण्यांत आलें. शिक्षणाच्या वाढत्या लोकप्रियतेमुळें लोकांनीं हा कर खुषीनें भरल्याकारणानें पहिल्या वर्षींच २८०००० रुपये उत्पन्न आलें. या रकमेच्या आधारावर १८६५ सालीं शाळांची संख्या ९२६ पर्यंत वाढविण्यांत येऊन त्यांत ११७२९ मुलें शिकूं लागलीं. या कराला सिंधमध्यें नं. ८ च्या कायद्यानें १८६५ सालीं व बाकीच्या भागांत नं. ३ च्या ॲक्टनें १८६९ सालीं कायद्याची मान्यता देण्यांत आली. त्यानंतर शिक्षणाप्रीत्यर्थ खर्च होणारा या कराचा अंश म्हणजे एकतृतीयांश रक्कम स्थानिक कमिटयांच्या नेतृत्वाखालीं, साधारणपणें ज्या तालुक्यांत जी रक्कम वसूल होईल ती त्याच तालुक्यांत खर्च करण्याच्या तत्त्वावर, खर्चिली जाऊं लागली. सरकारहि प्रांतिक उत्पन्नांतून शहरांतील शिक्षणाकरितां उदारपणें खर्च करून या कमिटयांकडून खर्च होणाऱ्या स्थानिक उत्पन्नांत शक्य ती भर घालीत असे. या कराच्या उत्पन्नामुळें मुंबई प्रांतांतील शाळा इंग्लंडमधील शाळांपेक्षां कमी प्रमाणांत सरकारवर अवलंबून राहूं लागल्या. इंग्लंडमध्यें स्थानिक कराच्या उत्पन्नापेक्षां सरकार अधिक रक्कम आपल्या खजिन्यांतून खर्च करतें. परंतु मुंबई सरकारकडून मदतीदाखल देण्यांत येणारी ठराविक रक्कम स्थानिक करांच्या उत्पन्नाच्या एकतृतीयांश इतकी असे.§

मुंबई प्रांतांत कर वसूल करण्याची योजना लवकर करण्यांत आली व मद्रासमध्यें ती योजना लवकर न करण्यांत आल्यामुळें शिक्षणाच्या दृष्टीनें मुंबई प्रांत मद्रास प्रांताच्या पुढें सरकला. सन १८७१ मध्यें मुंबई प्रांतांत

---

§ हंटर क. रि. ९१.

२७३८ इतक्या शाळांमधून १५९६२८ मुलें प्राथमिक शिक्षण घेत होतीं; तर मद्रासमध्यें फक्त ८९७०२ मुलेंच शिकत होतीं. परंतु लवकरच पुढें मद्रास प्रांतानें गांवठी शाळांना मदत करण्याच्या तत्त्वाचा पुरस्कार करून गांवठी शाळांकडे पूर्ण कानाडोळा करणाऱ्या मुंबई प्रांतापुढें मजल मारली; व सन १८८२ सालच्या आरंभीं, १८७१ सालीं मुंबई प्रांतांत जीं मुलें शिकत होतीं त्यांची दुपटीनें वाढ होऊन, त्यांचा आकडा ३३२६८८ पर्यंत गेला. तर, मद्रासमध्यें १८७१ सालच्या विद्यार्थ्यांच्या संख्येंत चौपटीनें भर पडून ती ३६०६४३ पर्यंत फुगली. मुंबईमधील या वाढलेल्या संख्येपैकीं शेंकडा ७३ मुलें सरकारी शाळांतून शिकत होतीं तर मद्रासमध्यें शेंकडा ८७ मुलें मदतीच्या गांवठी शाळांतून शिक्षण घेत होतीं. × असो.

याप्रमाणें कर बसविण्यांत येऊन शिक्षणांत वाढ झाली तरी त्यांत दोष दिसून येऊं लागला. लोकलफंड हा खेडुतांकडून वसूल करण्यांत येत असे. म्युनिसिपालिट्यांत कायद्यानें आपल्या उत्पन्नांतून या शिक्षणाप्रीत्यर्थ रक्कम खर्च करण्याची मोकळीक देण्यांत आली, तरी त्याप्रमाणें विशेष कोणीं तरतूद केली नाहीं. याचा परिणाम असा झाला कीं, **खेडेगांवांतून वसूल होणारी रक्कम शहरांतील लोकांच्या शिक्षणासाठींच खर्च पडूं लागली.** हें असें होणारें याचें भाकीत सन १८७० सालींच त्या वेळचे डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन मि. पील यांनीं केलें होतें व **शहरांतील लोकांवरही शिक्षणासाठीं कर बसवावा,** म्हणून सूचना केली होती. परंतु सरकारनें प्रांतीवरील कर व परवानाकर (Licence Tax) लोकांवर बसविले असल्यामुळें पीलसाहेबांची सूचना अग्राह्य ठरविली व खेडुतांचे पैसे शहरांवर खर्च करण्याची अन्याय्य पद्धत तशीच राहून त्या बाबतींत हंटर कमिशनपुढें अनेक लोकांनीं तक्रारी केल्या व त्या तक्रारींची सत्यता कमिशननेंहि कबूल केली. §

इतर सुधारणा—याच काळांत सरकारनें खाजगी शाळांना मदत करण्याच्या पद्धतीला नियमबद्ध करुन ती अमलांत आणली. या मदतीचा व तिच्यापासून झालेल्या फायद्यातोट्याचा आढावा पुढें स्वतंत्रपणें घेण्यांत आलेला असल्यामुळें, या ठिकाणीं वर केलेल्या निर्देशापेक्षां जास्त वर्णन करण्याची आवश्यकता नाहीं.

× हंटर क. रि. ९२ § हंटर क. रि. १५८

शिक्षकांचें शिक्षण—खाजगी व सरकारी शाळांतून जे शिक्षक नेमण्यांत येत असत, त्यांना आपल्या धंद्यांत कार्यक्षम होण्याच्या दृष्टीनें मुळींच शिक्षण मिळत नसे. लायक शिक्षकांच्या अभावाबद्दल पूर्वीपासूनच अनेक लोकांनीं ओरड केला होती. १८५४ व १८५९ च्या खलित्यांतहि या उणिवेचा स्पष्ट निर्देश करून शिक्षकांना शिक्षण देऊन लायक करण्यासाठीं नॉर्मल स्कूल्स ठिकठिकाणीं स्थापन करण्याची सूचना करण्यांत आली होती. त्याप्रमाणें बंगालमध्यें सर्कल स्कूल व नार्मल स्कूल स्थापन करून खेड्यांतील शिक्षणाचा दर्जा सुधारलेल्या अध्यापनपद्धतीनें वाढविण्याचा प्रयत्न करण्यांत आला. सर जॉर्ज कँबेल यांनीं १८७२ सालीं तयार केलेल्या योजनेंतहि "खेड्यांतील शाळांवर नवीन नेमण्यांत येणाऱ्या शिक्षकांना जिल्ह्याच्या किंवा भागाच्या मुख्य ठिकाणीं शिक्षणाच्या वर्गांत (Training classes) कांहीं महिने ठेवण्याबद्दल विशेष भर देण्यांत आला. सन १८७२–७३ सालीं बंगालमध्यें निरनिराळ्या २६ शिक्षकांच्या शाळा (Normal Schools) होत्या. सन १८७४ सालीं नॉर्मल स्कूलच्या विस्ताराची योजना अमलांत आली. त्या योजनेप्रमाणें वरिष्ठ दर्जाचे प्राथमिक शिक्षक तयार करण्यासाठीं प्रत्येक भागाच्या मुख्य ठिकाणीं पहिल्या प्रतीचें नॉर्मल स्कूल व खेड्यांतील शाळांवरील शिक्षकांसाठीं जिल्ह्याच्या ठिकाणीं खालच्या प्रतीची शाळा स्थापन करण्याचें ठरलें व त्याप्रमाणें पहिल्या प्रतीचीं ९ नॉर्मल स्कूल्स, दुसऱ्या प्रतीच्या २२ शाळा व तिसऱ्या प्रतीच्या १५ शाळा मिळून एकंदर रु. १६४००० खर्च करून स्थापनेच्या योजनेस मंजुरी देण्यांत आली. या बाबतींत विस्तारपूर्वक माहिती पुढें दिली आहेच.

मुंबई प्रांतांत सन १८८१–८२ सालीं पुरुष-शिक्षकांसाठीं एकंदर ७ शाळा होत्या. त्यांपैकीं ४ सरकारी होत्या. २ संस्थानांत होत्या व एक खाजगी देखरेखीखालीं चालली होती. या सर्व संस्थांमधून एकंदर ४८० शिक्षक-विद्यार्थी होते व त्यांपैकीं सन १८८१ सालीं १४१ उत्तीर्ण झाले. सन १८७१ ते १८८१ या दहा वर्षांत एकंदर १७१८ शिक्षक पास झाले. १८८१–८२ सालीं सेस शाळांमधून एकंदर ९३१४ शिक्षक होते. त्यांपैकीं ४५६५ शिक्षक मुख्याध्यापक अगर स्वतंत्र शिक्षक होते. त्यांच्यापैकीं २०७७ किंवा शेंकडा ४५·४५ शिक्षक कॉलेजचें प्रशस्तीपत्र मिळालेले होते. २६८३ शिक्षक दुय्यम किंवा मदतनीस (Assistant) शिक्षक म्हणून काम करीत होते. त्यांपैकीं ३७४ किंवा शेंकडा १४ शिक्षक प्रमाणलेख (Certificate)

मिळालेले असे होते आणि २०६६ छात्रशिक्षक (pupil teachers) होते. बिगरशिक्षित (untrained) अशा २४८८ शिक्षकांपैकीं १३७१ शिक्षकांना दरमहा दहापेक्षां कमी पगार असे. त्यांची नेमणूक भागशाळांवर किंवा लहान खेड्यांतील शाळांवर करण्यांत येत असे. या शिक्षकांची प्राथमिक शिक्षणांतील अखेरची परीक्षा पास झालेली असल्यामुळें ते लहान शाळांतील आपली जबाबदारी संभाळण्यास पूर्ण लायक असत व अशा लहान शाळांना शिक्षित (Trained) शिक्षकाची काटकसरीच्या दृष्टीनेंहि जरूरी नाहीं असें ठरविण्यांत आलें होतें.

शिक्षणक्रमांची विभागणी व परीक्षा:—हिंदुस्थान सरकारनें आपल्या ठराव नं. १-२-१६ ता. ६-१-१८७९नें प्राथमिक शिक्षणाचे खालचें प्राथमिक (Lower primary) व वरचें प्राथमिक (upper primary) असे दोन भाग पाडून खालचा प्राथमिक अभ्यासक्रम पुरा होऊन त्यांत सरकारी परीक्षा पास झाल्यानंतर मुलाचा वरच्या प्राथमिक शाखेंत प्रवेश होत असे. वरचा प्राथमिक अभ्यासक्रम तीन वर्षांचा असे व त्याच्या शेवटीं पुन्हां परीक्षा पास झाल्यानंतर दुय्यम शिक्षणाला सुरवात होई. या निरनिराळ्या शिक्षणक्रमांत कोणते कोणते विषय शिकविले जावेत याबद्दलहि सदर ठरावांत खुलासा करण्यांत आला होता.

या ठरावाविरुद्ध मुंबई व बंगाल प्रांतांनीं आपलें म्हणणें हिंदुस्थान सरकारपुढें मांडल्याकारणानें या ठरावांत स्थानिक परिस्थितीप्रमाणें कमीजास्त फरक करण्याची सवलत देण्यांत आली.

एज्युकेशन कमिशन:— १८५४ च्या खलित्यांत सुचविल्याप्रमाणें निरनिराळ्या प्रांतांत शिक्षणाचें स्वतंत्र खातें निर्माण करून त्यावर प्रत्येक प्रांतानें 'डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन' या हुद्याच्या अधिकाऱ्याची नेमणूक केली व या खात्याच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं सन १८८१ अखेर हिंदुस्थानांतील रयतेपैकीं कांहीं लोकांना शिक्षण देण्याचें कार्य करण्यांत आलें. हें कार्य कसें झालें, त्यांत दोष राहिले किंवा नाहींत, शिक्षणाची प्रगति आणखी जास्त जोरानें कशी होईल वगैरे बाबींचा विचार करण्याची सरकारला जरूरी भासूं लागली. भूतकालाचा आढावा घेतल्यावांचून आपले दोष नाहींसे करून भविष्यकालीं अधिक वेगानें पुढें पाऊल टाकतां येत नाहीं. हें तत्त्व मनांत धरून, केलेल्या

कामाचें परीक्षण करून भविष्यकालाला मार्गदर्शक होणाऱ्या सूचना करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें ता. ३–२–१८८२ च्या ठरावानें वीस सभासदांचें ना. हंटर यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिशन नेमलें. ब्रह्मदेश व आसाम अशा दोन प्रांतांखेरीज बाकीच्या सर्व प्रांतांतील प्रतिनिधींची या कमिशनवर सभासद म्हणून नेमणूक करण्यांत आली होती. प्रांताप्रमाणें शिक्षणविषयांत आस्थापूर्वक लक्ष घालणाऱ्या सर्व जाती व वर्ग यांचेहि प्रतिनिधी कमिशनवर रहातील, अशीहि काळजी घेण्यांत आली होती.

कंपनीच्या चालकाचा १८५४ चा प्रसिद्ध खलिता हाच सरकारी शिक्षणविषयक धोरणाचा मुख्य आधार आहे हें या ठरावांत स्पष्ट करून त्या खलित्यांत विशद केल्याप्रमाणें शिक्षणाची प्रगति किती झाली आहे याची पहाणी करून १८५४ नंतर उभारण्यांत आलेली शिक्षणाची इमारत मूळच्या पायास शोभेशी आहे का नाहीं हें पहाण्याची व त्या खलित्यांतील धोरणास पोषक अशा सूचना करण्याची जबाबदारी कमिशनवर टाकण्यांत आली.

कमिशनच्या विचारासाठीं जे अनेक प्रश्न सदर ठरावांत नमूद करण्यांत आले, त्यांतील प्राथमिक शिक्षणाबद्दलचें कलम ८ महत्त्वाचें वाटल्यावरून खालीं उद्धृत केलें आहे.

" सरकार प्राथमिक शिक्षणाला मोठें महत्त्व देत आहें ही गोष्ट कमिशननें विशेष लक्षांत ठेवावी, अशी ना. गव्हर्नर जनरलसाहेबांची इच्छा आहे. प्राथमिक शिक्षणाचा विस्तार करणें हा १८५४च्या खलित्याच्या प्रधान हेतूंपैकीं एक हेतु होता. ज्याला शिक्षण हें अभिधान शोभेल असें शिक्षण दुसऱ्याच्या मदतीवांचून घेण्यास असमर्थ असलेल्या हिंदुस्थानांतील बहुजनसमाजाला आयुष्यांतील प्रत्येक अवस्थेला शोभेसें, उपयुक्त व व्यवहारी शिक्षण कसें देतां येईल, या प्रश्नाकडे सदर खलित्यांत मुद्दाम लक्ष वेधून ' सरकारचे प्रत्यक्ष प्रयत्न यापुढ या दिशेनें विशेष होणें जरूर आहे ' अशी इच्छा त्यांत प्रदर्शित केली होती. याप्रमाणें आरंभींच ही गोष्ट हिंदुस्थानांतील राज्यकारभार करणाऱ्यांच्या प्रामुख्यानें नजरेला आणली असतांहि अनेक कारणामुळें प्राथमिक शिक्षणापेक्षां मध्यम व उच्च शिक्षणाचीच हल्लीं अधिक प्रगति झाली आहे. मध्यम व उच्च शिक्षणांत होणारी प्रगति खुंटविणें हें सरकारच्या धोरणाशीं विसंगत आहे. परंतु लोकशिक्षणाच्या सर्व शाखांची शक्यतों समान व हल्लींपेक्षां अधिक गतीनें प्रगति होणें जरूर आहे, असें सरकारचें मत आहे आणि म्हणून कमि-

शनच्या चौकशीचें, हिंदुस्थानांतील हल्लींची प्राथमिक शिक्षणाची स्थिति व त्याची सुधारणा व प्रगति होण्याचे उपाय, हें मुख्य ध्येय असणें जरूर आहे."

प्राथमिक शिक्षणाच्या विस्ताराची तरतूद करतांना "आर्थिक कारणामुळें सरकारच्या कार्यशक्तीवर घालण्यांत आलेली बंधनेंहि" कमिशननें लक्षांत ठेवणें जरूर आहे, अशी कलम १५ मध्यें सरकारनें त्यास इशारतहि देऊन ठेवली.

या कमिशनच्या बैठकीला आरंभ ता. १०-२-१८८२ रोजीं कलकत्ता येथें होऊन ती ३१ मार्चपर्यंत चालली होती. या बैठकींत निरनिराळ्या प्रांतांत शिक्षणाची काय स्थिति आहे हें अजमावण्यासाठीं एक योजना तयार करण्यांत आली. या योजनेनें निरनिराळ्या प्रांतांतील प्रतिनिधींची प्रांतिक पोटकमिटी नेमण्यांत आली व या प्रांतिक कमिट्यांनीं आपआपल्या प्रांतांत पहाणी करून, शिक्षणाच्या स्थितीबद्दल अहवाल तयार करावा व हे सर्व अहवाल तयार झाल्यानंतर मुख्य कमिशननें त्यांचा विचार करून आपला अहवाल तयार करावा असें ठरलें; व त्याप्रमाणें सर्व प्रांतिक कमिट्यांचे अहवाल आल्यानंतर त्यांचा व इतर साक्षीपुराव्यांचा विचार करून कमिशननें एकंदर २२२ सूचना केल्या. त्यांपैकीं १८० एकमतानें पास झाल्या व ४२ बहुमतानें पास झाल्या.

या कमिशनच्या सूचनांची अम्मलबजावणी कशी करण्यांत आली, याचा विचार पुढील कालखंडांत करूं.

सन १८८२ ते १९२२.

सर चार्लस वुडच्या १८५४ च्या खलित्यांत प्रजेला द्यावयाच्या शिक्षणाबद्दल जें ध्येय दर्शविण्यांत आलें होतें त्याकडे कोणत्या मार्गानें व कसें जावयाचें हेंहि सदर खलित्यांत दिग्दर्शित करण्यांत आलें होतें. १८५४ नंतर या देशांतील सरकारी अधिकारी त्या खलित्यांत आंखून दिलेल्या वाटेनेंच साधारणपणें प्रवास करीत होते. कांहीं मार्ग चालून गेल्यानंतर मागें पाहून आपण किती चालून आलों व पुढचा मार्ग चालून जातांना आपणास आपली गति वाढवावी लागेल का कमी करावी लागेल, याचा विचार प्रत्येक मुशाफर करीत असतो; त्याप्रमाणें १८५४ ते १८८१ पर्यंत शिक्षणाच्या झालेल्या प्रगतीचा हंटर-कमिशननें आढावा घेऊन १८५४ च्या खलित्यांत दर्शविण्यांत आलेल्या धोरणाला पोषक होणाऱ्या आपल्या सूचना केल्या. या कमिशननें केलेल्या सूच-

नांचा सरकारनें विचार करून १८८४ सालीं बहुतेक सर्व सूचनांना मान्यता देणारा आपला विस्तृत ठराव प्रसिद्ध केला. या ठरावांत बहुजन समाजाचें प्राथमिक शिक्षण, त्याचा विस्तार व सुधारणा यांसाठीं सरकारला, आजपर्यंत केले त्यांपेक्षां अधिक प्रमाणांत नेटाचे प्रयत्न करावे लागतील, असें स्पस्ष्टपणें म्हटलें आहे. प्राथमिक शिक्षणाबाबत व शाळांना द्यावयाच्या मदतीबाबत हंटर-कमिशननें ज्या सूचना केल्या, त्या सूचनांचा सरकारच्या कारभारावर फार दूर-गामी परिणाम झाला. प्राथमिक शिक्षण लोकल बोर्ड व म्युनिसिपालिट्या यांच्या ताब्यांत देण्याबद्दल कमिशननें एक सूचना केली होती. तिचा इष्ट तो परिणाम होऊन ग. ज. लॉर्ड रिपनसाहेब यांच्या अमदानींत निरनिराळ्या स्थानिक स्वराज्यासंबंधीं कायदे सन १८८३ ते १८८५ पर्यंत पसार करण्यांत आले. मुंबई इलाख्यासाठीं लोकल बोर्ड ॲक्ट नं १, १८८४ सालीं पास करण्यांत आला.

सन १८९० सालीं स्टेट सेक्रेटरी यांनीं उच्च शिक्षणासंबंधीं सरकारचें नियंत्रण, मार्गदर्शकत्व, व साहाय्य हीं पूर्वीप्रमाणें पुढेंहि चालू ठेवण्याची आवश्यकता हिंदुस्थान सरकारचे नजरेला आणली. सन १९०१ सालीं प्रसिद्ध लार्ड कर्झनसाहेब यांनीं एक शिक्षण-परिषद भरविली व त्यानंतर लव-करच उच्च शिक्षणाचा विचार करण्यासाठीं हिंदी विश्वविद्यालय-कमिशन-(Indian Universities' Commission) ची नेमणूक केली. त्या कमिशनच्या अहवाल सरकारला सादर करण्यांत आल्यानंतर सरकारनें आपलें शिक्षणाविषयक धोरण जाहीर करणारा ठराव १९०४ सालीं केला व त्यानंतर हिंदुस्थानांतील विश्वविद्यालयासंबंधीं कायदा त्याच सालीं पास करण्यांत आला.

सन १९०४ च्या सरकारी ठरावांत अनेक प्रश्नांचा उहापोह करण्यांत आला होता. हंटर–कमिशननें आपल्या अहवालांत सर्व प्रकारच्या शिक्षणाची जबाबदारी उत्तरोत्तर सरकारनें स्थानिक संस्थांवर सोपवावी, अशी महत्त्वाची सूचना केली होती. या सूचनेला १९०४ च्या सरकारी ठरावांत पाठिंबा देतांना, कांहीं संरक्षक बंधनें असण्याबद्दलहि तरफदारी केली. हॉरटॉग कमिटीच्या अहवालांत उद्धृत केलेला सन १९०४ च्या ठरावांतील खालील उतारा वाच-नीय आहे.

"प्राथमिक, दुय्यम व उच्च (कॉलेजांतील) शिक्षणाची उत्तरोत्तर अधिक

जबाबदारी खाजगी प्रयत्नावर सोपवावी व क्रमाक्रमानें सरकारनें त्याच्याशीं स्पर्धा करण्याचें सोडून द्यावें, अशी १८८३ च्या एज्युकेशन कमिशननें शिफारस केली होती व ती शिफारस साधारणपणें अमलांतहि आणण्यांत आली. परंतु या धोरणाचा स्वीकार करतांना शिक्षणाच्या प्रत्येक शाखेबाबत खाजगी प्रयत्नांना योग्य दिशा दाखविण्यासाठीं व शिक्षणाचा उच्च दर्जा राखण्यासाठीं शिक्षणाच्या प्रत्येक शाखेबाबत कांहीं संस्था चालविणें जरूर आहे, या तत्त्वाच्या आत्यंतिक महत्त्वाची हिंदुस्थान सरकारला जाणीव आहे. प्रत्यक्ष व्यवस्थेच्या जबाबदारींतून माघार घेतांना सार्वजनिक शिक्षण-संस्थांवरील आपलें नियंत्रण कार्यक्षम तपासणीच्या रूपानें हातीं ठेवणें अत्यंत जरूर आहे."

या ठरावानेंहि हंटर-कमिशनप्रमाणें प्राथमिक शिक्षणाच्या महत्त्वाचे पोवाडे गायले, इतकेंच नव्हे, तर या महत्त्वाच्या शिक्षणाकडे आतांपर्यंत कोणीं पुरें लक्ष व सार्वजनिक फंडांतील त्याच्या वाट्याचा पुरा हिस्सा दिला नाहीं अशी कबुलीहि देऊन टाकली, व "प्रांतिक उत्पन्नावर प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाचा मुख्य बोजा समजण्यांत यावा" अशी शिफारस केली. त्याचप्रमाणें स्थानिक-संस्थांचीं अंदाजपत्रकें पब्लिक इन्स्ट्रक्शनच्या डायरेक्टरमार्फत मंजुरीपूर्वी सादर करण्यांत येत जावी व खेडेगांवांतील शाळांतील शिक्षणक्रम शेतकरी वर्गाच्या गरजांस साजेसा आखण्यांत यावा, अशाही सूचना या ठरावांत करण्यांत आल्या.

सन १९१० सालीं, शिक्षणाची बाब आपणास फार महत्त्वाची वाटते हें दर्शविण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें शिक्षणखातें स्वतंत्र केलें व त्यावर ना. बटलर यांची नेमणूक केली. हें खातें स्वतंत्र होण्यापूर्वी तें होम डिपार्टमेंटमध्यें समाविष्ट झालें होतें; परंतु तें स्वतंत्र करण्यांत आल्यानंतर शिक्षणाच्या प्रश्नाला पूर्वीपेक्षां अधिक जोराची चालना मिळाली.

ता. १८।३।१९१० रोजीं ना. गोखले यांनीं दिल्ली कायदेमंडळांत "प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करण्याच्या दृष्टीनें सुरवात करणें आवश्यक असून त्या बाबतींत निश्चित योजना करण्यासाठीं सरकारी व बिनसरकारी सभासदांचें असें एक मिश्र कमिशन लवकर नेमण्यांत यावें अशी या कायदेमंडळाची शिफारस आहे" अशा अर्थाचा ठराव मांडला व ता मांडतांना सरकारला अनेक विधायक सूचनाहि केल्या. त्या महत्त्वाच्या सूचना खालीं दिल्या आहेत.

(१) इंग्लंडमधील १८७० च्या कायद्यासारखा स्थानिक संस्थांना (Local Bodies) आपल्या कार्यक्षेत्रांत शिक्षण सक्तीचें करण्याचा अधिकार देणारा कायदा पास करणें.

(२) शिक्षणाबाबत सक्तीचें तत्त्व मुलींना लागू न करतां फक्त मुलांनाच लागू करण्यांत यावें.

(३) जपानप्रमाणें मुलांना सहा व दहा वर्षांच्या दरम्यानच्या काळांतच सक्ती करण्यांत यावी.

(४) ज्या ठिकाणीं पुरुषांच्या लोकसंख्येच्या शेंकडा ३३ लोक शाळेंत जात आहेत अशा ठिकाणींच सक्तीच्या तत्त्वाची अम्मलबजावणी करण्यांत यावी.

(५) ज्या ठिकाणी सक्ती करण्यांत येईल त्या ठिकाणीं शिक्षण मोफत देण्यांत यावें. कारण तसें केलें नाहीं तर गरीब लोकांवर जुलूम होईल; निदान दरमहा २५ रुपयांपेक्षां कमी ज्यांचें उत्पन्न आहे, अशा लोकांच्या मुलांना तें मोफत देण्यांत यावें.

(६) या शिक्षणासाठीं येणारा जादा खर्च सरकार व स्थानिक संस्था यांनीं २ : १ या प्रमाणांत वाटून घ्यावा.

(७) होम डिपार्टमेंटमध्यें शिक्षणाप्रीत्यर्थ स्वतंत्र सेक्रेटरी असावा व कांहीं कालानें प्रधान-मंडळांत (Executive Council) शिक्षणाची बाब ज्याच्या ताब्यांत आहे असा स्वतंत्र मंत्रि असावा.

(८) शिक्षणाची केवळ प्रांतिक बाब न राहतां मध्यवर्ति सरकार व प्रांतिक सरकार अशा दोघांच्याहि कार्यक्षेत्रांत तिचा समावेश व्हावा. कारण प्रांतिक सरकारजवळ पैशाचा तुटवडा असल्यामुळें व हिंदुस्थान सरकारजवळ भरपूर पैसे असल्यामुळें, शिक्षणाच्या प्रगतीच्या दृष्टीनें दोन्ही खजिन्यांवर त्याच्या खर्चाची जबाबदारी असावी.

(९) दरसाल शिक्षणाची प्रगति दाखविणारें पत्रक सरकारामार्फत प्रसिद्ध करण्यांत यावें.

या विधायक व व्यवहारी सूचनांबाबत सहानुभूतीनें विचार करण्याचें सरकारनें आश्वासन दिल्यामुळें ना. गोखले यांनीं आपला ठराव परत घेतला. सहानुभूतीचें आश्वासन दिलें, तरी सरकारनें त्या सालीं फक्त सूचना नं. ७ तेवढी मंजूर करून शिक्षणाचें खातें स्वतंत्र केलें त्याचा उल्लेख वर केला आहेच.

एक वर्ष गेलें तरी सरकारनें या जिव्हाळ्याच्या प्रश्नाबाबत कांहीं केलें नाहीं असें पाहून ना. गोखले यांनीं ता. १६-३-१९११ सालीं प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराची योग्य व्यवस्था करण्यासाठीं मोफत व सक्तीच्या 'प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याचा मसुदा' कायदेमंडळापुढें मांडला; व तो मांडतांना अत्यंत कळकळीचें व माहितीपूर्ण असें ओजस्वी भाषण केलें. सदरच्या कायद्याचा मसुदा मांडण्यांत आल्यानंतर लोकमत अजमावण्यासाठीं तो प्रसिद्ध करण्यांत येऊन निरनिराळ्या प्रातिनिधिक संस्थांकडे व लोकप्रतिनिधींकडे अभिप्रायासाठीं पाठविण्यांत आला.

यानंतर पांचवे जॉर्ज बादशहांच्या राज्यारोहणानिमित्त १९११-१२ सालीं दिल्लीमध्यें मोठा दरबार झाला. त्या दरबारांत बादशहांच्या इच्छेप्रमाणें हिंदुस्थान सरकारच्या तिजोरींतून शिक्षणासाठीं दरसाल ५० लाखांची देणगी जाहीर करण्यांत आली, व त्यानंतर खुद्द बादशहांनीं १९१२ च्या जानेवारींत कलकत्ता विश्वविद्यालयाच्या मानपत्रास उत्तर देतांना खालील महत्त्वपूर्ण उद्गार काढले.

"सर्व देशभर शाळा व कॉलेजें यांचें जाळें पसरलें जाऊन शेतकींत, उद्योगधंद्यांत व जीवनांतील इतर व्यवसायांत टिकाव धरू शकतील असे राजनिष्ठ, साहसी व उपयोगी नागरीक निर्माण व्हावेत अशी आमची इच्छा आहे. ज्ञानप्रसारानें व ज्ञानप्रसारामुळें उत्पन्न होणाऱ्या विचारांच्या, सुखाच्या व आरोग्याच्या उच्च दर्जाच्या कल्पनांनीं, आमच्या प्रत्येक हिंदी प्रजाजनाचें गृहजीवन तेजस्वी होऊन सौख्यप्रद व्हावें अशीहि आमची इच्छा आहे. आमची ही इच्छा शिक्षणामुळें फलप्रद होणार असून हिंदुस्थानांतील शिक्षणाचा प्रश्न हा नेहमीं आम्हांला जिव्हाळ्याचा वाटेल."*

ता. १८-३-१९१२ रोजीं ना. गोखले यांच्या सक्तीच्या शिक्षणासंबंधीच्या कायद्याचा मसुदा पुन्हां चर्चेसाठीं निघाला व त्याला सरकारकडून विरोध झाल्यामुळें तो फेटाळून लावण्यांत आला.

१९१३ सालीं सरकारनें आपलें शिक्षणविषयक धोरण पुन्हा जाहीर करणारा एक ठराव प्रसिद्ध केला. त्या ठरावांतील प्राथमिक शिक्षणाच्या दृष्टीनें महत्त्वाच्या असलेल्या सूचनांचा व घोषणांचा संक्षेपानें खालीं उल्लेख केला आहे.

---

* हार्टॉग क. रि. १५

१. आर्थिक व कारभारासंबंधीं (administrative) अनेक अडचणींमुळें सक्तीच्या शिक्षणाच्या तत्त्वाचा अवलंब करण्याचें सरकारनें स्पष्टपणें नाकबूल केलें. परंतु ऐच्छिक तत्त्वावर प्राथमिक शिक्षणाचा प्रसार व त्याची सुधारणा करण्यासाठीं सरकारची सर्व शक्ति व उपलब्ध असलेल्या द्रव्याचा बव्हंश केंद्रीभूत करण्याची आवश्यकता मान्य केली.

२. सरकारनें आरोग्यासंबंधीं शिक्षण देण्याचा व मुलांची वैद्यकीय तपासणी करण्यासंबंधीं तरफदारी केली.

३. सरकारनें प्राथमिक शिक्षक ज्यामध्यें तयार होतील अशा प्राथमिक शिक्षणोत्तर शिक्षण देणाऱ्या देशी भाषांतील मध्यम (Middle) शाळांची संख्या वाढविण्यावर व त्यांची सुधारणा घडवून आणण्यावर भर दिला.

४. प्राथमिक व दुय्यम शाळांतील शिक्षकांच्या शिक्षणाची अधिक व चांगली सोय करण्याची जरूरी प्रतिपादन केली.

५. सरकारी नोकरींतील शिक्षकांचे पगार व इतर सवलती (Prospects) वाढविण्याची आवश्यकता असल्याचें दिद्दर्शित केलें.

६. त्या ठरावांत "स्त्रियांच्या शिक्षणाची संघटना अद्याप व्हावयाची आहे" असें कबूल करून मुलींच्या शाळांतील शिक्षकिणींची संख्या वाढविण्याच्या आवश्यकतेवर जोर दिला.

या १९१३ सालच्या ठरावानें प्रांतिक शिक्षणाच्या कार्याला थोडा जोर मिळाला परंतु शिक्षणाची संकल्पित सुधारणा घडवून आणणें, महायुद्ध सुरू झाल्यामुळें, लांबणीवर पडलें.

१९१७ सालीं म्युनिसिपालिट्यांना सक्तीच्या शिक्षणाची सोय करण्याची परवानगी देणारा, 'पटेल ॲक्ट' या नांवानें महशूर असलेला कायदा पसार झाला. या कायद्याच्या वेळीं पुणें येथें अनुकूल प्रतिकूल चळवळींची उठलेली प्रचंड वावटळ पुण्यांतील अनेक लोकांच्या अजूनहि स्मरणांत आहेच. १९२० च्या नं. १५ च्या कायद्यानें मुंबई म्युनिसिपालिटीलाहि सक्तीच्या व मोफत शिक्षणाची सोय करण्याचा स्वतंत्ररीत्या अधिकार देण्यांत आला.

महायुद्धामुळें शिक्षणाच्या प्रगतींत अडथळे उत्पन्न झाले तरी, राजकीय हक्काच्या दृष्टीनें युद्धापासून फायदा झाला, असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण त्यामुळें हिंदुस्थानला राज्यकारभारांत जादा अधिकार देण्याची विलायत सर-

कारला आवश्यकता वाटून जबाबदारीच्या राज्यपद्धतीचें तत्त्व उत्तरोत्तर अधिक अमलांत येण्याच्या हेतूनें (With a view to the progressive realisation of responsible Government in British India) मांटेग्यू-चेम्स्फर्ड सुधारणांचा कायदा होऊन 'वसाहतीच्या स्वराज्याचा' पहिला हप्ता १९१९ सालीं हिंदुस्थानास देण्यांत आला. या कायद्यानें शिक्षणाची बाब सोपीव होऊन कौन्सिलांतील लोकप्रतिनिधींतून नेमण्यांत येणाऱ्या दिवाणाच्या हातीं ती सुपूर्द करण्यांत आली.

नवीन कायद्याप्रमाणें अस्तित्वांत आलेल्या कायदेमंडळांतील निरनिराळ्या प्रांतांत प्राथमिक शिक्षणाचे कायदे पास करून, त्याच्या प्रसाराला अधिक प्रमाणांत चालना देण्याचा प्रयत्न करण्यांत आला. मुंबई कायदेमंडळानें १९२१ च्या जुलै महिन्यांत सर ना. चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखालीं दोन अधिकारी व आठ बिगर-अधिकारी अशा सभासदांची एक कमिटी नेमून मोफत व सक्तीच्या शिक्षणाबाबत योग्य त्या सूचना करण्याची तिच्यावर जबाबदारी सोपविली. या कमिटीनें ता. १५ मे १९२२ रोजीं आपला विस्तृत अहवाल मुंबई सरकारला सादर केला व तो जूनमध्यें प्रसिद्ध करण्यांत आला. चंदावरकर कमिटीच्या सूचनेप्रमाणें १९२३ सालीं प्राथमिक शिक्षणाचा कायदा पसार झाला. १९१९ चा सुधारणेचा कायदा पास झाल्यानंतर निरनिराळ्या प्रांतांतील कायदेमंडळानें मुंबई प्रांतापेक्षां प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत आघाडी मारली आहे हें दिसून येईल.*

या सर्व कायद्यांची आखणी स्थूलतः एका नमुन्याची आहे. प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं खास बोलाविलेल्या सभेंत दोन तृतीयांश इतक्या बहुमतानें लोकल बोर्डानें आपल्या अधिकार-

---

* Madras:– Elementary Education Act, 1920.
Bombay:– Primary Education Act, 1923.
Bengal:– Primary Education Act, 1919.
Primary Education (Amendment Act), 1921.
U. P. :– Primary Education Act, 1919.
Punjab:– Primary Education Act, 1919.
Bihar & Orissa:– Primary Education Act, 1919.
Central Provinces:– Primary Education Act, 1920.

क्षेत्रांत सक्तीच्या तत्त्वाचा अम्मल करण्याचें ठरविल्यास त्याप्रमाणें योजना तयार करून सरकारकडे पसंतीसाठीं पाठवावी. मात्र सरकारच्या योग्य आर्थिक मदतीनें लोकल बोर्डाला अमलांत आणतां येईल अशी ती योजना असावी. साधारणतः सक्तीच्या तत्त्वाची मर्यादा सहा ते दहा वर्षांपर्यंत असते; परंतु ही मर्यादा वाढवितां येण्याची तरतूद करण्यांत आली आहे. या सर्व कायद्यांत सक्तीच्या तत्त्वाबद्दल विशिष्ट वर्ग अगर जाती वळगण्याची सोय करण्यांत आली असून, शारीरिक व्यंगासाठीं माफी देण्याची सवलतहि देण्यांत आली आहे. शाळेसाठीं आपल्या घरापासून एक मैल चालून जाण्याची मर्यादा घालण्यांत आली आहे. शाळेस जाण्यालायक मुलांना नोकरीस ठेवण्याची या सर्व कायद्यांतून मनाई करण्यांत आली असून, हजेरीच्या हुकमाची अमान्यता करणारास थोड्या दंडाची शिक्षा ठेवली आहे. या सर्व कायद्यांत, सरकारनें मान्यता दिल्यास, सक्तीचें शिक्षण मोफतहि असेल अशी तरतूद करण्यांत आली आहे. याप्रमाणें या सर्व कायद्यांचा थोडक्यांत इत्यर्थ आहे. या कायद्यांप्रमाणें मुंबई-प्रांतांत किती स्थानिक संस्थांनीं(Local Bodies)सक्तीच्या तत्त्वाची आपापल्या क्षेत्रांत जारी केली, हें पुढें पाहूं.

सन १९२३–३७

मुंबई प्रांतांतील प्राथमिक शिक्षणाच्या इतिहासांत १९२३ हें साल फार महत्त्वाचें आहे. या सालीं प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास होऊन शिक्षणाच्या कारभारावरील खरी हुकमत स्थानिक संस्थांच्या हातीं देण्यांत आली. मांटेग्यू चेम्स्फर्ड सुधारणेमुळें शिक्षणखातें हें सोपीव होऊन त्याचीं सर्व सूत्रें लोकांनीं निवडून दिलेल्या दिवाणाच्या हातांत आलीं. त्याचप्रमाणें प्रत्येक स्थानिक संस्थेच्या कार्यक्षेत्रांतील शिक्षणाच्या प्रसाराची खरी जबाबदारी त्या स्थानिक संस्थेवर टाकण्यांत आली.

सन १८५४ पासून १९२३ सालचा कायदा पास होईपर्यंत शिक्षणतज्ज्ञांचें शिक्षणावरील हुकमतीबाबत एक विशिष्ट धोरण होतें; " शिक्षणाबाबत विशेष जबाबदारी लोकांवर टाकणें जरूर आहे. लोकांच्या हातांत जबाबदारीचे लगाम दिल्यावांचून शिक्षणप्रसाराला खरी चालना मिळणार नाहीं, स्कूल बोर्डांना यापुढें अधिकाधिक सत्ता दिल्यावांचून तीं कार्यक्षम होणार नाहींत व लोकांनाहि स्थानिक स्वराज्याची गाडी कशी चालवावी याचें शिक्षण

मिळणार नाहीं" अशा तऱ्हेचें हें मत प्रतिपादन करण्यांत येत असे. लो. सेसवर चालणाऱ्या शाळांच्या बाबतींत देखरेखसिंबंधीं लोकलबोर्डांना व स्थानिक कमिट्यांना जे अधिकार दिले होते, त्या अधिकारामुळें लोक या शाळांच्या कारभारांत लक्ष घालूं लागले व त्यामुळें त्यांची लोकप्रियता वाढली, व त्यामुळें 'स्थानिक लोकांना अधिकार देण्यांत यावा' या मताला चांगलाच पाठिंबा मिळाला. इंटर-कमिशनच्या वेळेपासून अनेक वेळ या मताचें जोरानें प्रतिपादन करण्यांत आल्यामुळें १९२३ सालचा प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास करून या मताला मूर्तस्वरूप देण्यांत आलें.

कायद्यानें लोकांच्या हातांत देखरेखीची अधिक जबाबदारीची सत्ता देण्यांत आली तरी, शिक्षणाच्या प्रसाराला लागणारी पैशाची मदत करणें सरकारच्या हातींच राहिलें. सरकारनें प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराला अवश्य असलेला पैसा स्थानिक संस्थांना पुरविण्यावरच त्या शिक्षणाचा खरा प्रसार होणें अवलंबून होतें. शिक्षणखातें सोपीव झालें तरी तिजोरीचें खातें राखीवच राहिलें. प्राथमिक शिक्षणाची कामधेनु लोकांच्या मागणीला मान देऊन सरकारनें आपल्या गोठ्यांतून काढून लोकांच्या स्वाधीन केली खरी, परंतु त्या कामधेनूला लागणारी चुणी, फोल व कडबा आपल्याच कोठींत ठेवून दिली. नुसता गोठा बदलण्यानें गाईच्या दुधांत वाढ होत नाहीं. तिला चांगलें आंबोण मिळालें, तरच तिचें दूध वाढून तें अधिक सकस होईल.. प्राथमिक शिक्षणाला पैसा देण्याच्या बाबतींत १९२३ नंतर उत्तरोत्तर सरकारचें धोरण अधिकाधिक कजुषपणाचें होऊं लागलें. १९२३ च्या पूर्वी शिक्षणाची जबाबदारी सरकारवर होती व त्यामुळें त्यांना ती जबाबदारी पार पाडण्यासाठीं द्रव्याची सोय करावीच लागे. परंतु हें खातें सोपीव होतांच नोकरशाहीला आपल्या गळ्यांतील घोरपड गेल्यासारखें वाटूं लागून 'लोक जाणे व शिक्षणमंत्री जाणे' अशा बेफिकीर वृत्तीनें ते वागूं लागले. पोलीस, मुलकी वगैरे इतर सर्व खात्यांची खाशी मंडळी पोटभर जेवून गेल्यानंतर भांड्यांत जें कांहीं शिल्लक अन्न राहील तें शिक्षणखात्याच्या मोलकरणीच्या स्वाधीन करण्यांत येऊं लागलें व त्यामुळें त्या खात्याच्या उपासमारीला सुरवात झाली. प्राथमिक शिक्षणाचीं सूत्रें लोकांच्या हातांत दिल्यानंतर त्यांनींहि नवीन हुरूपानें सक्तीच्या शिक्षणाच्या योजना करण्यास सुरवात करून, सरकारच्या मंजुरीसाठीं पाठविण्याचा धूमधडाका उडविला. परंतु या सर्व योजना आर्थिक अड-

चर्णाच्या ऐसपैस सबबीवर सरकारनें तशाच धूळखात टाकून दिल्या. हतकेंच नव्हे तर ऐच्छिक तत्त्वावर स्थानिक संस्थांकडून जी शिक्षणाची वाढ होत होती, त्या वाढीच्या कामींहि सरकारनें १९३१ पासून पुढें शेंकडा २० प्रमाणें व त्यानंतर कमीजास्त प्रमाणानें मदतीच्या रकमेंत कपात करून अडथळे आणले. १९२३ सालीं चंदावरकर–कमिटीनें दहा वर्षांत शिक्षण मोफत व सक्तीचें सर्वत्र होईल अशी योजना आखली असतांहि, सरकारनें त्या योजनेला मूर्त स्वरूप देण्याच्या ऐवजीं प्राथमिक शिक्षणाच्या ऐच्छिक वाढीलाच कपात करून आळा घातला.

याच कालखंडांत शिक्षण हें सरकारनें अतिशय महागाईचें करून ठेवलें व त्यामुळें प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराच्या कामीं अडथळे उत्पन्न झाले. याच कालविभागांत शिक्षकांच्या पगारांत भरमसाट वाढ करण्यांत आली. सुर्वे-कमिटीच्या सूचनेप्रमाणें हजेरी अलाउन्सची खैरात करण्यांत आली. १९१७ सालीं दर मुलामागें दरसाल रु. ९–१०–२ खर्च येत होता तो या कालांत रु. १८ पर्यंत म्हणजे पूर्वीच्या खर्चाच्या दुप्पट झाला.


प्राथमिक व दुय्यम शिक्षणाच्या पद्धतीचा विचार करून सूचना करण्यासाठीं १९२९ सालीं मि. हेस्केथ यांच्या अध्यक्षतेखालीं सरकारनें एक कमिटी नेमली. या कमिटीनें कांहीं शिफारशीहि केल्या. १९२८ सालीं खेडेगांवांतील शिक्षणाची शेतकी कमिशननें पहाणी करून कांहीं दोष दाखविले व विधायक सूचनाहि केल्या. त्याचप्रमाणें सायमन-कमिशनच्या मदतीसाठीं नेमलेल्या हार-टॉग कमिशननेंहि हिंदुस्थानांतील शिक्षणपद्धतीची बारकाईनें पहाणी करून अनेक सूचना केल्या. १९३२ सालीं पुनर्घटना–कमेटीनेंहि शिक्षणावरील खर्च कमी करण्याच्या दृष्टीनें अनेक सूचना केल्या.

याप्रमाणें शिक्षणाची अनेक वेळ पहाणी करण्यांत येऊन विविध दोष दाखविले असतांहि व हे दोष घालविण्यासाठीं अनेक विधायक व उपयुक्त अशा सूचनाहि करण्यांत आल्या असतांहि आमचा प्राथमिक शिक्षणाचा गाडा अद्याप पूर्वीच्या चकारीनेंच खडखडत चालला आहे.

वास्तविकपणें प्राथमिक शिक्षणांत जे हल्लीं दोष दिसतात, त्यांतील अनेक दोषांचें खापर सरकारच्याच माथीं फोडतां येईल. सरकारनें पैशाच्या बाबतींत कुंजुषपणा दाखवून सक्तीच्या शिक्षणाच्या योजना मंजूर न केल्यामुळें हल्लीं दिसणारे अनेक दोष राहिले. परंतु सरकारी अधिकारी या दोषांचें खापर

स्थानिक संस्थांच्या डोक्यांवर निष्कारण फोडीत आहेत. स्थानिक संस्थांच्या नालायकीचा डांगोरा पिटून त्यांच्या हातांत दिलेली सत्ता परत काढून घेण्याचा कावा, कांहीं अधिकाराला भुकेलेले अधिकारी, करीत आहेत. पूर्वी प्राथमिक शिक्षणाचीं सूत्रें स्थानिक संस्थांच्या हातीं द्यावीं म्हणून शिफारस करणारे अधिकारी व शिक्षणतज्ज्ञ, हीं सूत्रें परत सरकारनें आपल्या हातांत घ्यावींत अशा उलट्या पुच्छगामी स्वरूपाच्या सूचना करूं लागले आहेत व नुकत्याच पुणें येथें झालेल्या कायदेमंडळाच्या अधिवेशनांत कॉंग्रेसपक्षाच्या दिवाणांनीं प्राथमिक शिक्षणविषयक आपलें धोरण जाहीर करतांना 'स्थानिक संस्थांच्या हातांतील सत्ता काढून घेऊन आम्हीं सुधारणा करणार आहोंत' अशा आशयाची घोषणाहि केली आहे. हल्लीं आपल्या प्राथमिक शिक्षणाच्या कारभारांत कार्यक्षमतेचा अभाव, लांचलुचपत, वशिलेबाजी वगैरे जे अनेक दोष दिसत आहेत, त्यांबद्दल कोण जबाबदार आहे व हे दोष घालविण्यासाठीं कोणते उपाय योजावेत, याबद्दल पुढें ठिकठिकाणीं चर्चा केली आहे.

प्राथमिक शिक्षणाचा आतांपर्यंतचा इतिहास दिला. १८१३ सालीं प्रथम सरकारनें आपल्यावर शिक्षणाची जबाबदारी घेतली. ही जबाबदारी अंगावर घेऊन सुमारें १२५ वर्षें झालीं. या कालांत शिक्षणाचें पाऊल पुढें किती पडलें हें पहाणें जरूर आहे व ही पहाणी पुढें स्वतंत्र प्रकरणांत केली आहे.



प्रकरण चौथें

स्त्री–शिक्षण

It is not merely that an illiterate female population cripples a nation by the comparative immobilization of a half of its intellectual resources, the whole texture and strength of the national life are largely dependent on the contribution which women make to it, and in existing circumstances this is perhaps even more true of India than of many other countries. No one with any knowledge of India would be disposed to underrate the power which its women wield within the confines of the household. The danger is that, unless that influence is illuminated with knowledge or some idea about the Value of knowledge, its weight may be lost against the forces of progress. The resistance offered to new ideas by the uneducated orthodox women is proverbial. Alike for the training and instruction of the young and for the readjustment of the Indian social system, the Indian woman is, we believe, pivotal.

Simon Commission Report,
I. P. 392.

मागील प्रकरणांत पुरुषांच्या शिक्षणाचें ऐतिहासिक अवलोकन केलें. आतां या प्रकरणांत स्त्रियांच्या शिक्षणाची प्राचीन काळीं काय स्थिति होती, त्यानंतरच्या कालांत त्या स्थितींत कसा कमीजास्त फरक पडत गेला व ब्रिटिश अमलापासून स्त्रियांच्या शैक्षणिक जीवनावर काय परिणाम झाला वगैरे प्रश्नांचा

प्राचीन काल

प्राचीन कालीं स्त्रियांची स्थिति अतिशय चांगली होती, असें म्हणावयास हरकत नाहीं. प्राचीन आर्य स्त्रियांना समतेच्या तत्त्वावर वागवीत, असें म्हटल्यास अयोग्य होणार नाहीं. पुरुषांमध्यें बहुपत्निकत्वाची चाल जरी आली

तरी पुरुषांनींही स्त्रियांना बहुपतित्वाची, उदार मनानें, समतेच्या तत्त्वावर सवलत दिल्याचें द्रौपदीच्या उदाहरणावरून दाखविण्यास हरकत नाहीं.

बालविवाहाची चाल त्यावेळीं मुळींच जन्मास आलेली नव्हती. मुलींची लग्नें त्या प्रौढ झाल्यानंतर होत असत व स्वयंवराच्या पद्धतीवरून, आपणांस योग्य तो वर पसंत करण्याची मुलींना पूर्ण सुभा होती, असा निष्कर्ष काढण्यास भरपूर जागा आहे. येवढेंच नव्हें तर पति फार काळ परागंदा झाल्यास स्त्रियांना पुनर्विवाह करतां येत असे, हें दमयंतीनें नळाला शोधून काढण्याच्या इराद्यानें, पुन्हा स्वयंवर सुरू केलें त्यावरून म्हणतां येईल.

पडद्याची चालही प्राचीन कालीं नव्हती. ऋग्वेद अगर रामायण, महाभारत यांत पडद्याच्या चालीबद्दल कोठें उदाहरण आलेलें नाहीं. परंतु बुद्धाचे वेळीं बुरखा घेण्याची पद्धत जन्माला आलेली होती, असें ललितविस्तारावरून दिसतें. परंतु ती फार कडकपणें कोणी पाळीत नसे.§ संस्कृत वाङ्मय किंवा इतिहास पाहिला असतां पडद्याची चाल आर्यहिंदूंत मुळींच रुढ नव्हती, असें दिसून येईल. मुसलमानांबरोबर पडद्याच्या चालीनें प्रथम हिंदुस्थानांत प्रवेश केला. वरिष्ट वर्गांतील कांहीं लोकांनीं आपल्या ललनांच्या रक्षणासाठीं व कांहींनीं राज्यकर्त्यांचें अंधानुकरण करण्याच्या बुद्धीनें या चालीला उचलून धरल्यामुळें, ही चाल लवकरच हिंदुस्थानचे भूमीवर दृढमूल झाली.

प्राचीन काळच्या या समतेच्या दर्जामुळें स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीनें विद्यार्जन करण्याचें पूर्ण स्वातंत्र्य होतें. विश्ववरा, गार्गी, सती मैत्रेयी ह्यांसारख्या अनेक विदुषी त्या काळांत होऊन गेल्या. अनेक स्त्रियांनीं स्तोत्रें रचून वैदिक वाङ्मयांत भर टाकली होती. याज्ञवल्क्य-मैत्रेयीसंवाद हा स्त्रियांच्या त्या काळच्या उच्च कोटीच्या बौद्धिक उन्नतीचा उत्कृष्ट नमुना आहे. मदन पंडिताच्या विद्यासंपन्न सार्थनामा सरस्वती नांवाच्या पत्नीबरोबर वेदान्त विषयावर वादविवाद करण्यासाठीं श्रीमत् आद्य शंकराचार्यांना काळजी पूर्वक पूर्व तयारी करावी लागली. यावरून प्राचीन काळच्या स्त्रियांचें शिक्षण किती परा कोटीला पोहोचलें होतें याची चांगली कल्पना येते. "महाभारत काळीं उच्च वर्णांतील स्त्रियांना शिक्षण देण्याची वहिवाट होती असें निस्संशय

---

§ मुजुमदार १०-११.

दिसतें. त्या स्त्रियांस लिहितां वाचतां येत असावें. हें शिक्षण उच्च दर्जाचेंही होतें. द्रौपदीचें वर्णन पंडिता असें केलेलें आढळेल.

प्रिया च दर्शनीया च पंडिता च पतिव्रता ।

वन. अ २७."*

त्या कालच्या स्त्रिया तत्कालिन बौद्धिक जीवनांत प्रत्यक्ष भाग घेत व "तात्विक वादाच्या गूढ चर्चेंत मोठ्या हौसेनें सामील होऊन आपल्या सखोल व उदात्त विचार–सरणीनें पुरुषांना आश्चर्यचकित करून सोडीत."† ललित-विस्तारांतील कांहीं भागांवरून बुद्धाचे कांळींही स्त्रियांना लिहिणें, कविता करणें व शास्त्रप्राविण्य अवगत होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं.§ वात्सायनाच्या कामसूत्रांतही चौसष्ट कला स्त्रिया शिकण्यास योग्य आहेत, अशी शिफारस केली आहे व एकंदर स्त्रियांच्या त्या काळच्या अतिशय मानाच्या दर्जाविषयीं निर्देश केला आहे.

"हें शिक्षण कोठें देत असत हा एक महत्वाचा प्रश्न आहे. स्त्रियांच्या शाळा नव्हत्या हें तर निर्विवाद आहे. अशा शाळांचें कोठेंच वर्णन नाहीं. द्रौपदीनें जें भाषण युधिष्ठिराशीं केलें आहे तें खरोखर पंडित स्त्रीस साजेल असेंच आहे. तें शिकण्यांस ती कोठें शाळेंत गेली होती, असें वर्णन नाहीं. किंबहुना ही गोष्ट 'मी पित्याच्याजवळ असतांना एका ऋषीपासून ऐकली' असें म्हटलें आहे. अर्थात् स्त्रियांना शिक्षण आपल्या घरींच मिळत असे. म्हणजे पित्यापासून, भावापासून किंवा येणाऱ्या वृद्ध सन्मान्य लोकांपासून त्यांस मिळत असावें. स्त्रियांना वेदांचें शिक्षण देत नसत असा अंदाज आहे. कारण त्यांस वेदग्रहणार्थ उपनयनादि संस्कार असल्याचें कोठेंच वर्णन नाहीं. 'पुरा कल्पेतु नारीणां मौजीबंन्धनामप्यते' असें मनूचें एक वचन प्रसिद्ध आहे. पण हा प्रकार भारतीय काळांत चालू असल्याचें महाभारतांत कोठें वर्णन नाही. त्यांचें शिक्षण म्हणजे साधारण लिहिणेंवाचणें व धार्मिक गोष्टी व विचार सांगणें किंवा कांहीं पाठ म्हणून घेणें एवढेंच असावें. स्त्रिया सहधर्मचारिणी म्हणजे नवऱ्याबरोवर वैदिक क्रियांच्या अधिकारी होत्या, परंतु

---

* वैद्य पान ३१०.

† Weber–the History of Indian Literature P. 22.

§ मुजुमदार पा. १३.

वेदविद्या शिकलेल्या नव्हत्या. त्यांनीं वैदिक क्रिया स्वतंत्रपणें केल्याचें महाभारतांत वर्णन नाहीं.

" साधारण लिहिणेंवाचणें व धर्म यांचें शिक्षण दिलें जात असून क्षत्रिय स्त्रियांना ललित कलांचेंही शिक्षण महाभारत काळीं देत असत, ही गोष्ट विराटपर्वांतील हकीकतीवरून दिसते. विराटकन्या उत्तरा हिला गीत, नृत्य व वादित्र शिकविण्याकरितां बृहन्नडेस ठविलें होतें. या वर्णनावरून प्राचीन काळीं क्षत्रियस्त्रियांस गीत–नृत्य शिकवीत असत असें दिसतें. हल्लीं गीत नृत्य स्त्रियांस शिकविणें निंद्य मानलें जातें; परंतु महाभारतकालीं तें क्षत्रियकन्यांस शिकवीत असत. तें शिकविण्यासाठीं विराटाच्या राजवाडयांत निराळी नृत्यशाळाही बांधली होती असें वर्णन आहे. नृत्य शिकविण्यासाठीं विस्तीर्ण जागा पाहिजे, हें उघड आहे. तेव्हां असें शिक्षण देणें श्रीमंत लोकांसच शक्य होतें. हें शिक्षण कुमारिकांना देत असत आणि त्यांच्या विशेष गुणांपैकीं लग्नाच्या वेळीं हाहीं एक गुण मान्य केला जात असावा. उत्तरेबरोबर राजवाडयांतील व बाहेरील बऱ्याच कुमारिका शिकत होत्या असें वर्णन आहे. स्त्रियांना कुमारी दशेंतच शिक्षण देणें योग्य आहे व स्त्रियांना कुमारी दशेंतच शिक्षण देण्याचा सांप्रदाय त्यावेळीं असला पाहिजे.लग्न झाल्यानंतर त्या संसारांत तावडतोब पडत. तेव्हां शिक्षणाचा काळ कुमारीदशेंतच होता. स्त्रियांना ब्रह्मचर्याश्रम नव्हता आणि गुरुगृहीं वासही नव्हता; पण त्यांचें शिक्षण पित्याच्या गृहीं शिक्षकांकडून होत असे व हें मुख्यतः ललितकलांचें असे. त्यांत नृत्य, गीत, वादित्र हे विषय विशेषतः क्षत्रिय-कन्यकांचे असत.

"नृत्य-गीत शिकविण्यास बृहन्नडेला विराटानें ठेविलें यावरून स्त्रियांना म्हणजे मुलींना हे विषय शिकविण्यास पुरुष ठेवीत नसत, असा अंदाज होतो. बृहन्नडेला शिक्षण देण्याला ठेविलें हेंही आश्चर्य करण्यासारखें आहे. कारण हिजडे लोक सर्वतोपरी व्यवहारांत त्याज्य आहेत असें मत नेहमीं असलेलें दिसतें. बृहन्नडा हा पुरुष नसून क्लीब आहे अशीही परीक्षा विराटानें केल्याचें वर्णन आहे. या वर्णनांत महाभारतकालीं मुलींना नृत्य शिकविण्यासाठीं क्लीबांचीच योजना करीत असें प्रथम दिसतें; परंतु कालिदासाच्या मालविकाग्निमित्र नाटकावरून तसेंही दिसत नाहीं. मालविकेस नृत्य शिकविणारे दोघे आचार्य गणदास व हरदास हे क्लीब होते असें वर्णन नाहीं, तेव्हां हें एक गूढच आहे.

स्त्रियांस नृत्य शिकविण्यास किंवा गाणें शिकविण्यास स्त्रियांचा उपयोग कोटेंच करीत नाहींत हेंही एक दुसरें गूढ आहे. पाश्चात्य देशांतही स्त्रियांस नृत्यगीत शिकविलें जातें, पण शिकविणारे पुरुषच असतात. कुमारिकांना नृत्य-गायनादि कला शिकविण्यास पोक्त वयाचे पुरुषशिक्षकच सामान्यत: टेवीत असावेत असें दिसतें. असो. असें शिक्षण सामान्य स्त्रियांना देणें शक्य नाहीं हें उघड आंहे. स्त्रियांना पुरुषांप्रमाणें शिक्षण अवश्य आहे असा कटाक्ष नव्हता. पुरुषांना ज्याप्रमाणें गुरुगृहीं जाऊन शिकलेंच पाहिजे असा नियम होता, त्याप्रमाणें स्त्रियासंबंधानें नियम नव्हता. त्यामुळें सामान्य स्थितींतील स्त्रिया एकंदरीनें अशिक्षित असाव्या असें दिसतें. ब्राह्मण-क्षत्रियांच्या मुली सहज मिळणाऱ्या शिक्षणानें अधिक सुशिक्षित असाव्या. मात्र क्षत्रियांच्या मुलींस ललितकला शिकविण्यास त्यांच्या घरीं शिक्षक ठेवीत असत. याप्रमाणें .महाभारतकालीं स्त्री-शिक्षणाची परिस्थिति होती असें आपल्यास एकपरीनें म्हणतां येईल."×

प्राचीन कालीं स्त्रियांना पतीची सहधर्मचारिणी म्हणून त्यांच्या दर्जास योग्य अशा मानानें व आदरानें वागवीत. पृथ्वीवरील पूर्वकालीन कोणत्याही राष्ट्रांत स्त्रियांना, हिंदुस्थानांत जो मान देण्यांत येत होता, तितका मान मिळाला नाहीं.+ परंतु हलके हलके पुरुषवर्गाच्या स्वार्थीपणानें डोकें वर करण्यास सुरुवात केल्यामुळें प्रथम स्त्रियांचा वेदविद्याग्रहणाचा हक्क हिरावून घेण्यांत आला. नंतर स्वयंवराच्या पद्धतीचा लोप झाला व स्त्री ही पुरुषाची दावणीची गाय बनून ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ' अशा तऱ्हेची स्त्रीजातीला गुलामगिरींत पचविणारीं स्मृतिवचनें जन्माला आलीं व शेवटीं बालविवाहाची चाल रूढ होऊन व पत्नीवरील पतीची निरंकुश सत्ता मान्य करण्यांत येऊन, त्यांच्या दुःस्थितीचा सतीच्या चालींत कडेलोट झाला. अर्थात् समाजांतील या खालावलेल्या दर्जाचा, त्यांच्या शिक्षणावरही अनिष्ट परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. स्त्रियांचें पूर्वीच्या काळचें संस्कृत भाषेवरील प्रभुत्व कमी होऊन इतर अशिक्षित वर्गाप्रमाणें राजघराण्यांतील अगर वरिष्ठ वर्गाच्या स्त्रियाही प्राकृत भाषा बोलूं लागल्या. ही गोष्ट नाटकांतून त्यांच्या तोंडीं घातलेल्या प्राकृत भाषेवरून सिद्ध होते.

× वैद्य ३१०-१२. + मुजुमदार पा. १२.

मध्यकाल

या कालांतील स्त्री-शिक्षणाचा विचार करतांना हिंदू स्त्रियांचें शिक्षण व मुसलमान स्त्रियांचें शिक्षण असें आपणांस पृथक्‌पणें विवेचन करणें जरूर पडेल. कारण या कालांत मुसलमान लोकांनीं भारतभूवर आक्रमण करण्यास सुरुवात करून त्यांच्यांतील निरनिराळ्या वंशांनीं कमीजास्त प्रमाणांत येथें राज्यवैभव भोगलें व त्यामुळें त्यांच्या राहणीचा, धर्माचा व संस्कृतीचा हिंदु लोकांवर अनेक तऱ्हेनें परिणाम झाला; व त्याचप्रमाणें हिंदूंच्या अनेक चालिरीतीही मुसलमानांनीं उचलून आपल्या मूळच्या रहाणीला मुरड घातली.

हिंदुस्त्रियांचें शिक्षण:— या काळांत भारतभूमिप्रमाणें हिंदु स्त्रियांचें स्वातंत्र्यही नाहींसें होऊन भारतभूमीप्रमाणें स्त्रियाहि पूर्णपणें परावलंबी व परस्वाधीन बनल्या. याच काळांत त्या अनेक रूढीबंधनांनीं पुऱ्या जखडल्या जाऊन त्या पुरुषांच्या गुलाम बनल्या. स्त्रियांना शिक्षणाची जरूरी नाहीं, नव्हे स्त्रियांनीं शिक्षण घेणें अधर्म्य आहे, या अनिष्ट कल्पनेचा उदय होऊन, त्यांची बौद्धिक वाढ सक्तीनें खुंटविण्यांत आली. मुसलमानांच्या पडद्याकडे पाहून हिंदुस्त्रियांच्या भोंवतींही पडद्याची अभेद तटबंदी उभी करण्यांत येऊन, त्यांच्या हालचालींस पूर्ण 'पायबंद घालण्यांत आला. नवऱ्याच्या हयातींत चूलघराच्या चार भिंतीआड कैदखान्यांचीं आजन्म शिक्षा भोगण्याची व नवरा डोळ्यांदेखत दिवंगत झाल्यास सती जाऊन मृत्यूची सजा सोसावयाची, असा कायदा जारी झाला.

या अशा परिस्थितीमुळें या कालांत स्त्रियांच्या शिक्षणाकडे पूर्णपणें दुर्लक्ष करण्यांत आलें, असें म्हणावयास हरकत नाहीं. वरिष्ठ वर्गांतील स्त्रियांना व मराठ्यांतील सरदार-घराण्यांतील स्त्रियांना मिळालें तर थोडें शिक्षण घरीं शिक्षक ठेवून देण्यांत येत असे; परंतु बाकीच्या शेंकडा ९९ स्त्रियांना शिक्षणाचा मुळींच गंध नसे. कथापुराणांच्या श्रवणाच्या द्वारें त्यांना "रामायण-महाभारतांत वर्णन केलेल्या अनेक घडामोडींची माहिती मिळत असे, परंतु लिहिणेंवाचणें मुळींच येत नसे.

साक्षर असणाऱ्या स्त्रियांत वरिष्ठ वर्गाच्या म्हणजे ब्राह्मण जातीच्या व मराठ्यांतील सरदार घराण्यांतील स्त्रियांचाच अधिक भरणा असे. अशा शिकलेल्या स्त्रियांच्या नांवांचा निर्देश करतां येण्यासारखा आहे.

ज्ञानेश्वराची बहीण मुक्ताबाई ही शिकलेली होती. कारण तिनें अभंग-रचना उत्तम केली आहे. मुक्ताबाईच्या नंतरच्या काळांत सोळाव्या-सतराव्या शतकांपर्यंत शिकलेल्या स्त्रियांचीं नांवें उपलब्ध नाहींत. नाहीं म्हणावयास नामदेवाची जनी हिचें नांव देतां येण्यासारखें आहे. परंतु ती मुक्ताबाईची समकालीनच होती. मिराबाईचें नांवही देतां येण्यासारखें आहे. मुक्ताबाई, जनाबाई व मिराबाई या सर्व संतमालिकेंतील आहेत. त्यांच्याप्रमाणें त्या-काळीं इतरही अनेक स्त्रिया, कवित्व करण्यासारख्या नसल्या तरी पोथ्या-पुराणें वाचण्याइतक्या साक्षर असाव्यात असा तर्क केल्यास तो फारसा चुकीचा ठरणार नाहीं.

राजकारणी पुरुषांच्या अनेक स्त्रिया शिकलेल्या होत्या. शिवाजीची आई जिजाबाई, करवीरकर संभाजीची बायको जिजाबाई (मृ. १७७२), राजा-रामाची बायको ताराबाई, अहल्याबाई होळकर, या सर्व§ लिहिणाऱ्या होत्या. त्याचप्रमाणें येसूबाई डफळे, याही शिकलेल्या होत्या. त्यांच्यावर जत संस्था-नचा कारभार पहाण्याचा प्रसंग आलेला होता.*

"पेशवे व इतर ब्राह्मण सरदार यांच्या स्त्रिया बहुतकरून साक्षर असत. त्यांतील बऱ्याचजणींना पोथ्या वाचण्याचें व पत्र लिहिण्याचेंही ज्ञान होतें. विधवा स्त्रियांना रिकामा वेळ घालविण्याकरितां व सुवासिनींना आपल्या पतींना राज्यकारभारांत हातभार लावण्याकरितां इतक्या भाषाज्ञानाची आवश्य-कता वाटत असावी. ब्राह्मण सरदारांच्या भार्या मूळ गरीब घराण्यांतील असल्यामुळें, त्यांना माहेरीं कोणीं लिहिणें वाचणें शिकविलें नसल्यास लग्न होऊन सासरीं आल्यावर सासरच्या मंडळींकडून त्यांना अक्षरओळख करून दिली जाणें स्वाभाविक होय. साक्षर ब्राह्मण स्त्रियांचीं कांहीं नांवें पुढील-प्रमाणें—१. राधाबाई, (बाळाजी विश्वनाथाची भार्या), २. काशीबाई, (पहिल्या बाजीरावाची पत्नी), ३. सगुणाबाई (बाजिरावाचा पुत्र जनार्दनपंत याची पत्नी), ४. आनंदीबाई, (राघोबादादाची पत्नी), ५. भिऊबाई (बाळाजी विश्वनाथाची कन्या व बापूजी नाईक बारामतीकर यांचे बंधु आबाजीपंत यांची पत्नी), ६. गंगाबाई (सवाई माधवरावाची आई), ७. भवानीबाई (चिमणाजी शंकर सचीव— शके १७२०-४९-यांची पत्नी), व ८. अनुबाई घोरपडे (व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर

§ म. रि. १६४-६५. * पे. म. ९०.

यांची पत्नी). या स्त्रियांपैकीं जनार्दनपंतांची पत्नी सगुणाबाई हिला लिहितां वाचतां चांगलें येत असून तिचा ग्रंथसंग्रहही बराच होता. आनंदीबाईचें लेखनवाचन सर्वश्रुत आहे. अनुबाई व गंगाबाई या राज्यकारभार पहात होत्या, तेव्हां त्यांची गति पुष्कळच झाली असली पाहिजे."‡ याच यादींत नानासाहेब पेशवे यांची पत्नी गोपिकाबाई हिचें नांवही देणें जरूर आहे. तिनें सवाई माधवरावास उद्देशून लिहिलेलें पत्र मागें दिलें आहे, त्यावरून त्या बाईच्या शिक्षणविषयक धोरणाचीही चांगली कल्पना येते.

हिंदुस्त्रियांत वर उल्लेख केल्यासारख्या शिकलेल्या स्त्रिया ह्या अपवादभूतच होत्या असें म्हणावयास हरकत नाहीं. ज्या ठिकाणीं पुरुषांच्या शिक्षणाचीच विशेष आस्था नव्हती, त्या ठिकाणीं स्त्रिया निरक्षर राहिल्या यांत आश्चर्य कसलें ?

मुसलमान स्त्रियांचें शिक्षण:––मुसलमान स्त्रियांना कुराण वाचण्याची धार्मिकदृष्ट्या आवश्यकता वाटत असल्यामुळें त्यांच्यामध्यें लिहिण्यावाचण्यास-निदान वाचण्यास–शिकणाऱ्या सामान्य वर्गांतील स्त्रियांचें प्रमाण हिंदु स्त्रियांच्या प्रमाणापेक्षां केव्हांही अधिकच असे. बादशहाच्या " जनानखान्यांतल्या बहुतेक स्त्रिया कर्तृत्ववान् होत्या. राजपुत्रांचें संगोपन व घरचे सर्व व्यवहार स्त्रियांच्या हातांत असत. बहुतेक स्त्रिया शिकलेल्या व विद्वान् असत. आठ वर्षांचें वय झाल्याबरोबर प्रत्येक राजपुत्रास व राजकन्येस शिकविण्यासाठीं पृथक् शिक्षक ठेविलेले असत. स्त्रीशिक्षक इराणी असत. कित्येक स्त्रिया कवित्व वगैरे करीत व उत्तम लेखक असत. आग्र्याच्या किल्ल्यांत जहानआराचा एक मोठा पुस्तकसंग्रह होता. झेबुन्निसा ही कवयित्री म्हणून प्रसिद्ध आहे. जनान-खान्यांतील वृत्तांत लिहिण्यास स्त्रीलेखक व पुस्तक वाचण्यास स्त्री-वाचक असत."*

मध्यकालांतील हिंदुमुसलमानांच्या स्त्रियांच्या स्थितीविषयीं तुलनात्मक विचार करतां पडद्याची पद्धत दोन्ही स्त्रियांना सामान्यपणें लागू असली, तरी इतर बाबींत मुसलमान स्त्रियांची स्थितीच हिंदु स्त्रियांच्या स्थितीपेक्षां अनेक पटीनें चांगली होती. हिंदू स्त्रियांची बालपणींच लग्नें होत असत, तर मुसलमान स्त्रियांचीं प्रौढपणींच लग्नें होत. मुसलमान समाजांतील सामान्य

‡ पे. म. ९१. * मु. रि, पा. ७५१

दर्जाच्या स्त्रियांना हिंदु समाजांतील तत्सम दर्जाच्या स्त्रियांपेक्षां अधिक शिक्षणाच्या सवलती असत. मुसलमानी स्त्रियांना नवरा वारल्यानंतर पुनर्विवाह करून 'नवी विटी नवें राज्य' या तत्त्वावर पुन्हा नवा संसार मांडता येत असे, तर हिंदु स्त्रियांना सती जावयास भाग पाडून त्यांच्या जीवनाला पूर्ण विराम देण्यांत येत असे, आणि एखादी विधवा सती गेली नाहीं व ती वरिष्ठ वर्गांतील असली तर तिला वपनाच्या रूपानें विद्रूप करून, मरणापेक्षां जगणें अधिक तापदायक करण्यांत येत असे; आणि हें सर्व धर्माच्या नांवावर होत असे. आपल्या समाजांतील विधवा स्त्रियांचें वपन करणें हें आपलें धार्मिक कर्तव्यच नव्हे तर, आपला ब्राह्मण म्हणून एकप्रकारचा श्रेष्ठत्वदर्शक असा एक हक्क आहे, व इतर वर्गांच्या लोकांनीं ही चाल आपल्या वर्गांत रूढ करून वरिष्ठ वर्गांच्या हक्कावर आक्रमण करूं नये, अशी पेशवाईच्या कालांतही समजूत होती. त्या कालांत प्रभुजातीप्रमाणें सोनारही वैदिक पद्धतीवर आपला हक्क सांगून, ब्राह्मण वर्गाच्या आपण बरोबरीचे आहोंत, असें दाखविण्याचा प्रयत्न करीत, व त्याप्रमाणें स्वतःच्या नांवापुढें जोशी, शास्त्री अशींही नांवें लावीत व 'उपाध्यायाचें काम करीत' अशा पुण्यांतील एक दोन सोनारांचें प्रकरण हक्कावावत निर्णयाकरितां अय्याशास्त्री यांजकडे गेलें असतां, त्यांनीं "सोनार यांनीं दुहेरी धोतरें नेसावी, पाट लावावा, त्यांच्या विधवांनीं केस काढूं नयेत असा निकाल दिला."* केस काढणें व पाट न लावणें हें ब्राह्मण स्त्रियांचे वर्गश्रेष्ठत्वदर्शक असे विशेष हक्क. त्या हक्कावर इतर वर्गांतील स्त्रियांनीं आपला अधिकार सांगून ब्राह्मण जातीची कां बरोबरी करावी? जातीजातींच्या हक्कांचें भांडण किती हास्यास्पद स्थितीला पोहोंचलें होतें व स्त्रियांच्या दर्जाबद्दल वरिष्ठ वर्गाच्या पुरुषांची काय विचारसरणी होती याची चांगली कल्पना येते.

या विचारसरणीमुळें व धर्माविपर्यांच्या वेडगळ कल्पनांमुळें स्त्रियांना शिक्षण देणेंच अधार्मिक स्वरूपाचें आहे अशी सामान्य जनसमुदायाची समजूत होऊन, त्यांच्या मनःप्रदेशावर ज्ञानकिरणांचा शिरकावही होणें अशक्य झालें. वर वर्णन केल्याप्रमाणें मुसलमान स्त्रिया अधिक भाग्यवान होत्या यांत मात्र शंका नाहीं.

---

*पे. म. २४८

ब्रिटिश अमलानंतर

पश्चिमात्य लोकांचा हिंदुस्थानांत प्रवेश झाल्यानंतर पुरुषांच्या शिक्षणाप्रमाणें स्त्रियांच्या शिक्षणासाठींही प्रथम खरे प्रयत्न पाद्री लोकांनीं केले. त्याचप्रमाणें कांहीं बिगरसरकारी संस्थांनींही केले. ब्रिटिशांचा अम्मल सुरू झाल्यानंतर राज्यकर्त्यांनीं मुलांच्या शिक्षणाच्या प्रसाराचें कार्य हातांत घेऊन त्याला उत्तेजन देण्याचा प्रयत्न केला खरा, परंतु स्त्री-शिक्षणाकडे त्यांनीं सन १८५४ पर्यंत पूर्ण दुर्लक्षच केलें. ब्रिटिश अम्मल सुरू झाल्यानंतर स्त्रीशिक्षणासाठीं कोणीं काय केलें हें आतां पाहूं.

बिगरसरकारी प्रयत्नः––बिगरसरकारी व्यक्ति किंवा संस्था यांनीं स्त्री-शिक्षणासाठीं जे बहुमोल प्रयत्न केले त्यांत पाद्री लोकांच्या प्रयत्नाला प्राधान्य देणें जरूर आहे. ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या ज्या निरानिराळ्या संस्था होत्या त्यांनीं स्त्रीशिक्षणाच्या बाबतींतही पुढाकार घेऊन हिंदी जनतेच्या विरोधाच्या खडकावर स्त्रीशिक्षणाचें बीं परण्याचा प्रयत्न केला व अनेक प्रसंगीं प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊन यानीं त्या बीजाला अंकूर फोडण्याचें कष्टसाध्य कार्य केलें. या ख्रिस्ती संस्थांनींच मुंबई, बंगाल व मद्रास या तीन इलाख्यांत प्रथम स्त्रीशिक्षणाच्या कामीं सुरुवात केली. आरंभीं त्यांनीं ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करणाऱ्या देशी लोकांच्या मुलींना शिक्षण देण्यासाठीं शाळा उघडल्या, परंतु हळकेहळके मिळणाऱ्या यशामुळें उमेद वाढून त्यांनीं इतर धर्मांच्या मुलींनाही शिक्षण देण्याचा उपक्रम सुरू केला.

मुंबई—मुंबई प्रांतांत १८२४ सालीं पहिली शाळा अमेरिकन मिशनमार्फत सुरू करण्यांत आली. दोन वर्षांत त्यांच्या शाळांची संख्या ९ पर्यंत वाढून, त्या शाळांतून ३४० मुली शिक्षण घेऊं लागल्या. १८२९ सालीं मुलींची संख्या ४०० पर्यंत वाढली. त्या ४०० विद्यार्थिनींपैकीं १२२ मुलींना लिहिणेंवाचणें व थोडें शिवणकाम येत होतें. या शाळांपैकीं भायखळा येथील शाळेला जोडून एक मुलींसाठीं वसतिगृहही अनेक दिवस उत्तम तऱ्हेनें चालविण्यांत आलें. सन १८३१ सालीं याच सोसायटीनें अहमदनगरला मुलींच्या दोन शाळा सुरू केल्या व नंतर एक वसतिगृहही चालूं केलें. 'चर्च मिशनरी सोसायटी' नांवाच्या दुसऱ्या संस्थेनेंही १८२६ सालीं हिंदी मुलींच्यासाठीं आपली पहिली शाळा सुरू केली; व पुढील दहा

वर्षांत मुलांमुलींकरितां स्वतंत्र शाळा ठाणा, वसई व नाशीक येथें सुरू केल्या. स्कॉटिश मिशनरी सोसायटीनेंही स्थापन केलेल्या शाळेंत १८२७ सालीं २०० मुली होत्या व १८४० सालांत सदर सोसायटीनें पुण्यांत हिंदु समाजांतील वरिष्ठ जातींच्या मुलींसाठीं पांच शाळा चालू केल्या. सन १८२९ सालीं डॉ. बुइल्सन व त्यांचें कुटुंब यांनीं मुंबई शहरांत देशी लोकांच्या मुलींसाठीं सहा शाळा सुरू केल्या व लवकरच त्यांतील मुलींची संख्या २०० पर्यंत वाढली.

सन १८२३ पासून १८५१ पर्यंत स्त्रीशिक्षणाचें कार्य मुख्यतः निरनिराळ्या ख्रिस्ती संस्थांच्या पाद्री लोकांच्या हातूनच होत होतें असें म्हणावयास हरकत नाहीं. परंतु १८५१ च्या सुमारास या प्रांतांतील देशी लोकांनीं या प्रश्नाकडे आपलें लक्ष देण्यास सुरुवात केली.¶ 'दी स्टूडंट्स् लिटररी व सायंटिफिक सोसायटी' या नांवाच्या संस्थेनें मुलींच्या शिक्षणासाठीं अनेक शाळा अस्तित्वांत आणल्या. ही संस्था एल्फिन्स्टन कॉलेजांतील प्रो. पेटन यांच्या प्रयत्नानें स्थापन करण्यांत आली होती. या संस्थेनें मुंबई शहरांत ९ प्राथमिक शाळा चालविल्या व त्यांत १८५१ च्या अखेरीस ६५० मुली शिक्षण घेत असत. पारशी लोकांनीं व गुजराथच्या वणिक् मंडळीनें या चळवळींत आस्थापूर्वक लक्ष घातलें. सन १८५१ सालीं मि. मगनभाई खेमचंद या नांवाच्या गृहस्थानें अहमदाबाद येथें मुलींच्या दोन शाळा स्थापन करण्यासाठीं २०००० रु. ची देणगी दिली. याच वर्षी महात्मा फुले यांनीं पुण्यांत पहिली मुलींची शाळा स्थापन केली व या शाळेचा अनेक वर्षें चांगला लौकीकही होता.§ या शाळेला त्यावेळचे ज्युडीशियल कमिशनर ना. वारडेन यांनीं १८५१ सालीं भेट दिली. त्यावेळीं महात्मा फुले यांचें कुटुंब शिक्षकिणीचें काम करीत होतें. या शाळेबद्दल गौरवपर उद्गार ना. वारडेन यांनीं ता. ३-४-१८५४ सालीं केलेल्या आपल्या भाषणांत काढून, या संस्थेंत कसें शिक्षण देण्यांत येत असे व खुद्द शिक्षकीण, साहेबबहादुरांच्या पुढें यावयास कशी लाजत होती, यांचें वर्णन दिलें आहे.×

सन १८५४ मध्यें मुंबई शहरांत मुलींच्या एकंदर आठ शाळा चालू होत्या. त्यांपैकीं तीन मराठी, एक गुजराथी व चार पारशी मुलींच्या शाळा होत्या. या सर्व शाळांतील मुलींची संख्या ५०० होती. मुंबई शहराबाहेरील

¶ हंटर क. रि. पा. ५२३. § हंटर क. रि. पा. १४ × E. R. II P. 51.

मुलुखांत किती शाळा होत्या याची माहिती त्यावेळीं विशेष उपलब्ध नसली, तरी पुणें व अहमदाबाद येथें कांहीं शाळा होत्या. ना. वार्डेन यांच्या अंदाजाप्रमाणें† १८५४ सालीं शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक सोळा मुलांस एक मुलगी याप्रमाणें स्त्रीशिक्षणाचें प्रमाण होतें. १८५४ च्या खलित्यांत ६५ मुलींच्या शाळा असल्याचें व त्यांत ३५०० मुली शिक्षण घेतल्याचें दर्शविण्यांत आलें आहे. याशिवाय सुमारें ५९३ मुली मुलांच्या शाळांमधून शिकत असल्याचेंही नमूद करण्यांत आलें आहे.

१८५४ सालीं सरकारी धोरणांत बदल झाल्यानंतर मुलींच्या शिक्षणासाठीं शाळा काढणाऱ्या शिक्षकास मदत देण्यांत येऊं लागल्यामुळें स्त्री–शिक्षणाचें पाऊल अधिक जोरानें पुढें पडूं लागलें.

बंगाल:—मुंबई प्रांताप्रमाणें बंगालमध्येंही स्त्रीशिक्षणाचें कार्य प्रथम पाद्री लोकांनींच हातांत घेतलें, असें म्हणावयास हरकत नाहीं. पाद्री लोकांच्या खालोखाल त्या प्रांतांतील स्त्रीशिक्षणाच्या प्रसारास मि. ड्रिंकवॉटर बेथून या नांवाच्या इंग्रज अधिकाऱ्याच्या प्रयत्नानें मदत झाली आहे, असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. मि. बेथून हे बंगाल कौन्सिलमध्यें कायदा-सदस्य (Legal Member) होते व ते शिक्षणाच्या चळवळींत नेहमीं झीज सोसून लक्ष घालीत असत. त्यांनीं कलकत्ता येथें सन १८४९ सालीं मुलींना शिक्षण देण्यासाठीं हिंदू मुलींची शाळा (Hindu female School) या नांवानें एक संस्था काढली व कांहीं वर्षें ती आपल्या पदरखर्चानें चालविली. ही संस्था स्थापन करण्याच्या व पुढें चालविण्याच्या कामीं कलकत्ता येथील कांहीं बंगाली पुढाऱ्यांनींही, लोकांचा जाच व छळ सोसून, मदत केली. मुकर्जी नांवाच्या एका स्त्रीशिक्षणप्रेमी जमीनदार गृहस्थानें बेथून साहेबांना त्यांच्या शाळेच्या उपयोगासाठीं सुमारें दहा हजार रुपये किंमतीची जमीन दिली. या शाळेंत प्रथम २३ मुली होत्या व बेथून साहेबांच्या हयातींत तेच या शाळेचा सर्व खर्च चालवीत. परंतु १८५१ सालीं बेथून साहेब वारले व त्यांनीं कलकत्ता येथील आपल्या जमिनी व इतर मिळकती मृत्युपत्रानें या शाळेला कायम बक्षीस देऊन टाकल्या. हा परोपकारी महात्मा दिवंगत झाल्यानंतर त्यावेळचे गव्हर्नर जनरल यांनीं ती संस्था आपल्या नेतृत्वाखालीं घेऊन तिला आपल्या खाजगी पैशांतून दरसाल ८००० प्रमाणें पांच वर्षें मदत केली व त्यानंतर ती सरकारच्या

† E. R. II, P. 51

ताब्यांत देण्यांत आली. या संस्थेनें बंगालमधील स्त्रीशिक्षणाच्या प्रगतीस बहुमोलाची मदत केली हें कोणासही कृतज्ञतापूर्वक कबूल करावें लागेल. १८५४ च्या खलित्यांत बंगालमध्यें उपलब्ध माहितीप्रमाणें ६८६९ मुली २८८ शाळांमधून शिक्षण घेत असल्याचें नमूद केलें आहे.

मद्रास:—मुंबई व बंगाल प्रांतांप्रमाणें मद्रासमध्यें स्त्री-शिक्षणाची मुहूर्तमेढ पाद्री लोकांनीं रोवली. इंग्लंडच्या चर्चच्या सोसायटीनें तिनेव्हेली येथें मुलींसाठीं प्रथम बोर्डिंग-स्कूल्स काढलीं. परंतु त्या शाळांतून मुख्यतः ख्रिस्ती धर्म स्वीकारणाऱ्या मुलींचाच विशेष भरणा असे. हिंदू मुलींना प्रत्यक्षपणें शिक्षण देण्यासाठीं पहिली शाळा १८४१ सालीं स्कॉटिश मिशनमार्फत काढण्यांत आली. या शाळेला अनेक आपत्तींशीं झगडावें लागलें. १८४३ सालीं फक्त ९ विद्यार्थिनीच या शाळेंत नियमीतपणें हजर असत. सन १८४५ सालीं अंशतः देशी लोकांच्या देखरेखीखालीं चालणारी शाळा मद्रास शहरांत सुरू करण्यांत आली, व त्यानंतर आणखी कांहीं शाळा उघडण्यांत आल्या. मद्रास शहराच्या बाहेरील बहुतेच शाळा मुख्यतः पाद्री लोकांच्याच होत्या. १८५४ मध्यें पाद्री लोकांच्या शाळांमधून एकंदर ७००० मुली शिक्षण घेत होत्या.

मुंबई, बंगाल व मद्रास प्रांतांप्रमाणें इतर प्रांतांतही मुलींच्या शिक्षणाप्रीत्यर्थ पाद्री लोकांनीं व कांहीं बिगरसरकारी लोकांनींच प्रयत्न केले असें स्थूलमानानें म्हणतां येईल. इतर प्रांतांतील स्त्री-शिक्षणाच्या प्रगतीचा इतिहास स्थलसंकोचास्तव देतां येणें शक्य नाहीं.

लोकविरोध:—मिशनरी व इतर मंडळींनीं मुलींना साक्षर करण्यासाठीं जे प्रयत्न केले त्या प्रयत्नांला देशी लोकांनीं चांगलाच विरोध केला. या विरोधाला अनेक कारणें होतीं. प्रथम मुलींना शिक्षणाची मुळींच जरुरी नाहीं, त्या शिकल्या तर धर्माचीं बंधनें सैल होऊन जिकडे तिकडे अनाचार माजेल, अशी अनेक लोकांची समजूत असल्यामुळें, त्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न करणाराला कडक विरोध करणें आपलें आद्य कर्तव्यच आहे, असें अनेक लोकांना वाटत होतें. दुसरें कारण म्हणजे स्त्रीशिक्षणाची चळवळ विशेषतः 'आकाशांतील बापाचा' आदेश सांगून धर्मांतराचा उपदेश करणाऱ्या पाद्री लोकांच्या हातांत होती, हें होय. स्त्रियांनीं शिकणेंच ज्यांना अनर्थाचें लक्षण वाटे, त्यांना पाद्री लोकांची स्त्री-शिक्षणाची चळवळ म्हणजे धर्मान्त-

राच्या ग्रंथाची प्रस्तावनाच वाटे. आपल्या बायकामुलींना शिकण्याच्या निमित्तानें प्रथम शाळेंत नेऊन नंतर 'देवळांत' खेचण्यासाठीं हे पाद्री सर्व खटपट करीत आहेत, अशी कैक लोकांची समजूत होती व त्यामुळें पुष्कळ लोक प्रत्यक्ष विरोध करावयास जरी पुढें सरसावले नाहींत तरी आपल्या बायकामुलींना शाळेंत पाठविण्यास मुळींच तयार नसत.

'स्त्री म्हणजे पायांतील वहाण, ती पायांतच नेहमीं ठेवली पाहिजे,' अशाही मताचे कांहीं पुरुष होतेच. स्त्रियांना अडाणी ठेवल्यावांचून त्या आपल्या पूर्ण कह्यांत राहाणार नाहींत, असेंही पुष्कळ लोकांना वाटत असें. १८५३ सालीं पार्लमेंटरी कमिटीपुढें हिंदुस्थानांतील शिक्षणाच्या परिस्थितीबद्दल जो पुरावा घेण्यांत आला, त्यावेळीं कमिटीनें सर ट्रेव्हिलीन या विद्वान् व शिक्षणाच्या चळवळीचा पुरस्कार करणाऱ्या गृहस्थांना विचारलेला प्रश्न व त्यांनीं दिलेलें उत्तर महत्त्वाचें आहे.

प्रश्न—स्त्री-शिक्षणाबाबत हिंदू लोकांच्या मनांत वसत असलेली शत्रुत्वाची भावना, ही त्यांच्यांतील विशिष्ट वाङ्मयामुळें निर्माण झाली आहे, किंवा 'स्त्रियांनीं' नेहमीं गौणस्थितींतच राहिलें पाहिजे या सार्वत्रिक दिसून येणाऱ्या कल्पनेमुळें जन्माला आली आहे? याबाबत आपलें काय मत आहे?

उत्तर—माझ्या मतें त्यांच्या विरोधाचें आद्य व मुख्य कारण म्हणजे 'स्त्रियांना पूर्णपणें ताब्यांत ठेवण्यासाठीं त्यांना अडाणी ठेवणें जरूर आहे' ही कल्पना आहे.§

सर ट्रेव्हिलीन यांनीं दिलेल्या कारणांत पुष्कळ तथ्य होतें. सर साहेबांनीं सन १८५३ सालीं दिलेले हें कारण एकोणिसाव्या शतकाच्या जवळ जवळ अखेरीस कै. न्या. मू. रानडे यांच्या कुटुंबालाही जाचक झाल्यावांचून राहिलें नाहीं. त्यांच्या शिक्षणालाही "बायकांना शिकविलें म्हणजे त्या उध्दट होतात, त्यांच्या डोळ्यांत पाणी राहात नाहीं"* असें म्हणून विरोध करण्यांत आला होता. "बायका शिकल्या म्हणजे दांडग्या, बेपर्वा व मर्यादारहित" होतात हा स्त्री-शिक्षणाविरुद्ध नेहमींचा मामुली आक्षेप असे.†

कारण कोणतेंही असलें तरी स्त्रीशिक्षणाविरुद्ध असलेल्या लोकांनीं स्त्रीशिक्षणाचा अंकुर विरोधाच्या जहरी नखांनीं मुळांतच खुडून टाकण्याचा

§ E. R. II, P. 33. * आठवणी, पा. ९२. † आठवणी पा. १०२.

प्रयत्नमात्र शिकस्तीचा केला. पाद्री लोकांच्या प्रयत्नांत धर्मान्तराच्या हेतूचा वास आल्यामुळें लोक विरोध करतात म्हणून मि. बेथून यांनीं धर्मशिक्षणाची बाब पूर्णपणें वगळून आपली शाळा काढली; परंतु त्यांनाही विरोधकांनीं सतावण्यास कमी केलें नाहीं. "माझ्या देशी मित्रांनीं माझ्या शाळेला मदत करूं नये म्हणून त्यांना बुजगावण्यासाठीं प्रत्येक प्रकारच्या त्रासदायक व जाचक उपायांची योजना करण्यांत आली व त्यांत त्यांना इतकें यश आलें कीं, एकदां तर पटावरील मुलींची संख्या ७ पर्यंत घसरून ३ किंवा ४ मुलींपेक्षां अधिक मुली शाळेंत हजर नसत."§ असें त्यांनीं लिहिलें आहे. मुंबई प्रांतांत व विशेषतः पुणें शहरांत महात्मा फुले यांनाही अनेक प्रकारें त्रास देण्यांत आला. शिकविण्याचें कार्य करणाऱ्या सौ. फुले यांचा व त्यांच्या शाळेंत जाणाऱ्या मुलींचा अनेक गुंडांमार्फत क्षोभजनक उपमर्द करविण्यांत आला. विरोधकांचा ताप नको म्हणून एका लहान घरांत भरलेली महात्मा फुले यांची शाळा पाहून "ज्यू लोकांच्या भीतीनें दारें बंद करून एकत्र जमणाऱ्या आद्य ख्रिश्चन लोकांच्या बैठकीची आपणांस आठवण झाली" असे मार्मिक उद्गार ना. वार्डन यांनीं १८५४ मध्यें काढले आहेत. विरोधाला न जुमानतां शिक्षण घेण्याची चिकाटी दाखविणाऱ्या स्त्रियांना बाहेरच्या गुंडांचाच नव्हे, तर घरांतील वडीलधाऱ्या स्त्रियांचा कसा जाच सहन करावा लागे व त्या जाचामुळें "मरण बरें पण शिक्षण नको" असें म्हणण्याचा कसा प्रसंग येई, याचे कै. श्रीमती रमाबाई रानडे यांनीं आपल्या रसाळ आठवणींत उत्कृष्ट वर्णन केलें आहे.†

सरकारी धोरण:—१८५४ चा खलिता बाहेर पडण्यापूर्वी स्त्रीशिक्षण हें शिक्षण-विषयक सरकारी जबाबदारीचें एक उपांग आहे असें मुळींच समजण्यांत येत नसे. मुलांना शिक्षण देण्याचें आपलें कर्तव्य आहे, याची सरकारला जाणीव झाल्यानंतरही कैक वर्षें सरकारनें स्त्रीशिक्षणाकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. स्त्रीशिक्षणाची निगा व वाढ करण्याचें महत्त्वाचें कार्य कांहीं व्यक्ति व संस्था यांच्या तुटपुज्या प्रयत्नावर सोपविण्यांत आलें होतें. सरकारच्या या उपेक्षेच्या धोरणामुळें एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत कंपनीच्या सूत्रधारकांकडून जे खलिते आले किंवा त्यांना जे अहवाल सादर करण्यांत आले, त्यांत देशी मुलींच्या अगर स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल शब्दही आपणांस आढळून येत नाहीं.‡

§ E. R. II, P. 53 † आठवणी पा. ८८-९२, ‡ E. R. II, P. 32.

सरकारच्या अनास्थेचें कारण अगदीं उघड होतें. हिंदी लोकांच्या धर्माच्या बाबतींत कोणत्याही तऱ्हेची ढवळाढवळ न करितां पूर्ण तटस्थ वृत्तीनें वागण्याचें सरकारनें आपलें धोरण प्रथम ७।१।१८०८ चे खलित्यांत जाहीर केलें होतें. स्त्रियांना किंवा मुलींना शिक्षण देणें हें रूढीविरुद्ध अतएव अधार्मिकपणाचें आहे, असें हिंदी लोकांना वाटत असतांना आपण त्या शिक्षणाला उत्तेजन दिल्यास त्यामुळें सरकार आपले धर्मांत ढवळाढवळ करतें असें हिंदी प्रजेला वाटेल, असा इंग्लंड व हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांचा समज होता § व या त्यांच्या मतामुळेंच १८२५ सालीं 'कलकत्ता लेडीज स्कूल्स फॉर नेटिव्ह गर्लस्' (Calcutta Ladies schools for Native Girls) या संस्थेला एक हजार रुपयांची मदत देण्याचेंही नाकारण्यांत आलें. बेथूनसाहेबांनीं कलकत्ता येथें मुलींची शाळा स्वतःच्या व्यक्तिगत जबाबदारीवर काढली, याचेंही हेंच कारण होतें. स्त्रीशिक्षणाविषयीं बेथूनसाहेबांना अतिशय कळकळ वाटत होती व त्याप्रीत्यर्थ आपण कांहींतरी करणें जरूर आहे, अशी त्यांना सारखी तळमळही लागली होती. परंतु 'कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे प्रेसिडेंट' या नात्यानें आपण एखादी शाळा बोर्डामार्फत काढल्यास व त्यापासून पुढें कांहीं दुष्परिणाम झाल्यास लोकांचें सरकारविषयीं मत कलुषित होईल; त्यापेक्षां आपण आपल्या स्वतःच्या खिशाला खार लावून खाजगी नात्यानें शाळा काढल्यास भल्याबुऱ्याची जबाबदारी आपल्या एकट्याच्याच माथीं येईल, याच विचारानें सरकारचा संबंध न आणतां खाजगी शाळा काढण्यास त्यांना प्रवृत्त केलें, व ही आपली विचारसरणी त्यांनीं गव्हर्नर जनरल डलहौसी यांना पाठविलेल्या ता. २९-३-१८५० च्या पत्रांत स्पष्टपणें व्यक्त केली

बेथून साहेबांनीं वर उल्लेख केलेलें पत्र गव्हर्नर जनरलला पाठवून त्यांत तीन मागण्या केल्या. एक, आपली शाळा यापुढें सरकारी संस्था म्हणून चालविण्यांत यावी. दुसरी, आपल्या शाळेला महाराणी व्हिक्टोरिया यांचें नांव देण्याची परवानगी मिळावी व तिसरी, सरकारनें स्त्रीशिक्षणाची जबाबदारी पत्करून आपल्या जिल्हाअधिकाऱ्यांना स्त्रीशिक्षणाच्या प्रचारासाठीं शाळा स्थापन करण्याचे प्रयत्न करण्यास सांगण्यांत यावें. परंतु या तिन्ही मागण्यांना वाटाण्याच्या अक्षता मिळाल्या. त्या वेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी यांनीं बेथून साहेबांच्या पत्रावर अनुकूल अभिप्राय दिला. परंतु कौन्सिल ऑफ

§ E. R. II, P. 32.

एज्युकेशनच्या सर जे. एच्. लिटलरसारख्या सभासदांनीं त्याला जोराचा विरोध केला. सदरप्रमाणें विरोध करतांना " स्त्री शिक्षणाची योजना निःसंशय अप्रिय असून हिंदू असो अगर मुसलमान असो प्रत्येकजण त्या योजनेकडे भीतिपूर्ण नजरेनें पहात आहे " असें कारण देऊन देशी लोक, स्त्रीशिक्षणाकडे ' तो सरकारचा धर्मान्तराचाच प्रयत्न आहे' अशा संशयित नजरेनें पहात असल्यामुळें, सरकारच्या या धोरणानें तटस्थपणाच्या धोरणाला बाध येणार आहे, असाही उघड इशारा दिला.‡

कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या इतर सभासदांनीं, गुळमुळींत कां होईना पण आपले अभिप्राय थोडेसे अनुकूलच दिले. हिंदुस्थान सरकारनें अधिक धैर्य दाखवून " स्त्रीशिक्षणावर देखरेख करून त्याच्या प्रसारासाठीं योग्य प्रयत्न करणाऱ्या देशी लोकांना मदत करणें हें कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या कर्तव्यांपैकीं एक कर्तव्य आहे असें त्यानें यापुढें समजावें," असें स्पष्टपणें नमूद केलें. परंतु अखेर कंपनींच्या सूत्रधारकांनीं आपल्या ता. ४-९-१८५० च्या खलित्यांत आस्ते कदम व सावधगिरीनें पुढें पाऊल टाकण्याचा सल्ला देऊन, बेथून साहेबांच्या उत्साहावर विरजण घातलें व महाराणी व्हिक्टोरिया यांचें त्या संस्थेस नांव देण्यास परवानगी नाकारली.†

बेथूनसाहेब व त्यांच्या मताचे इतर स्त्रीशिक्षणाचे कैवारी यांचे चिकाटीचे प्रयत्न अखेर थोडेफार यशस्वी झाले. कांहीं देशी लोक पाश्चिमात्य शिक्षण घेऊन पुढें येतांच त्यांनींही स्त्रीशिक्षणाची जोराची कड घेतल्यानुळें, अतिशय अल्पप्रमाणावर पण निश्चित असा लोकमतांत फरक दिसूं लागला. लोकांचा विरोध थोडा सौम्य होतांच सरकारचे धोरणांतही फरक झाला व अखेर १८५४ च्या खलित्यांत " स्त्रीशिक्षणाची जबाबदारी सरकारवर असल्याचें " कबूल करण्यांत आलें. स्त्रीशिक्षणाच्या इतिहासांत १८५४ हें साल अतिशय महत्त्वाचें आहे. त्या सालच्या आपल्या सुप्रसिद्ध खलित्यांत स्त्रीशिक्षणाची आपल्यावरील जबाबदारी मान्य करून स्त्रियांचा बौद्धिक गुलामगिरीचा विनाशकाल जवळ आल्याचें जाहीर करण्यांत आलें.

सन १८५४ नंतर स्त्रीशिक्षणाच्या इतिहासांत नमूद करण्यासारख्या फारच थोड्या गोष्टी झाल्या. सन १८८२ सालीं हंटर कमिशनची नेमणूक करतांना सरकारनें आपल्या ठरावाच्या २० व्या कलमांत " महत्त्वाच्या

---

‡ E. R. II, P. 53. † E. R. II, P. 60.

आणि अवघड अशा स्त्रीशिक्षणाच्या प्रश्नांचा विचार करून देशांतील परिस्थितीप्रमाणें त्याला उत्तेजन देऊन विस्तारासाठीं काय उपाय करावे" हें सुचविण्याबद्दल मुद्दाम सांगितलें व स्त्रीशिक्षणाच्या निरनिराळ्या अंगोपांगांचा तपशीलवार विचार करून कमिशननेंही महत्त्वाच्या सूचना केल्या. या कमिशननें केलेल्या सूचना अमलांत आणण्यांत आल्या नाहींत. सरकारच्या आर्थिक अडचणीमुळें जेथें मुलांच्या शिक्षणाची पुरी तरतूद करतां आली नाहीं, तेथें लोकमताच्या विरोधाचा विषय बनलेल्या स्त्रीशिक्षणासारख्या बाबीला अधिक पैसा कोठून येणार?

सन १९११-१२ सालीं नामदार गोखले यांनीं दिल्ली कायदेमंडळांत प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याबद्दल ठराव मांडले. परंतु त्या ठरावाच्या कक्षेंतून मुलींचें शिक्षण, लोकांच्या विरोधास मान लववून, गळण्यांत आलें. सन १९१७ सालीं पटेल बिलामध्यें मात्र स्त्रीशिक्षणाचा सक्तीच्या अम्मलबजावणींत समावेश करण्यांत आला. परंतु त्या बिलाच्या वेळींही मुलींच्यावर शिक्षणाबाबत सक्ती करण्याच्या तत्त्वाला पुण्यांतील व इतरत्र कांहीं लोकांनीं जोराचा विरोध केलाच.

स्त्रियांची चळवळ संघटित होऊं लागल्यानें स्त्रियांनीं ठिकठिकाणीं सभा, परिषदा भरवून मुलींच्या शिक्षणाला जोराचा पाठिंबा देण्यास सुरुवात केल्यामुळें, स्त्री-शिक्षणाचें चक्र अधिक जोरानें फिरूं लागलें. मॉंटेग्यू-चेल्म्सफर्ड सुधारणेनंतर शिक्षणखातें प्रत्येक प्रांतांत सोपविं झाल्यामुळें जे प्राथमिक शिक्षणाचे कायदे निरनिराळ्या प्रांतांत झाले, त्या कायद्यांमुळें मुलांमुलींच्या शिक्षणाचा एकच दर्जा ठरून, या दोन्ही शिक्षणास कमीजास्त महत्त्व देण्याची वृत्ति लोपूं लागली. यानंतर १९२७ सालीं नेमण्यांत आलेल्या हारटॉग कमिशननेंही मुलींच्या शिक्षणाची काळजीपूर्वक पहाणी करून प्रगति किती झाली आहे, याचा आढावा घेऊन मुलींच्या शिक्षणाच्या मार्गांतील अनेक अडचणींचा विचार केला.

इंग्रजांच्या अमदानींत आतांपर्यंत स्त्रीशिक्षणाचा प्रसार किती झाला, स्त्रियांच्या शिक्षणाच्या संस्थांच्या संख्येंत वाढ काय प्रमाणांत झाली, स्त्रीशिक्षणाच्या प्रसारासाठीं काय करणें अत्यंत जरूर आहे वगैरे अनेक प्रश्नांसंबंधीं माहिती पुढें योग्य स्थळीं देण्यांत आली आहे.

प्रकरण पांचवें

शिक्षण–प्रसार

When the late Prince Albert Victor, the grandson of Queen Empress Victoria, visited the country in the eighties, a triumphal arch erected by the lively-witted people of the city of Poona, greeted him in these words:—

"Tell Grand ma we are a happy nation
But ninteen crores are without education."

India to this day continues to be the land of unlettered people.

Sir. M. Visvesvaraya.
Reconstructing India, 256.

आपण आर्यांच्या प्रवेशापासून तों थेट आजच्या कालापर्यंत आपल्या या देशांत वेळोवेळीं कोणत्या शिक्षणपद्धति रूढ होत्या, त्यांचें अवलोकन केलें. आतां त्या पद्धतींपासून बहुजन समाजाला शिक्षण प्राप्त होण्यास काय मदत झाली; त्याच्या जीवनाविषयींच्या कल्पनांत काय बदल झाला व त्यामुळें देशाचें पाऊल प्रगतिपथावर पडण्यास मदत झाली कीं नाहीं, आणि ती झाली असल्यास कितपत झाली, याचा एथें थोडक्यांत विचार करण्याचें योजिलें आहे.

१. **प्राचीन विद्या व बहुजन समाज**–प्राचीन युगाच्या आरंभकालीं जरी समतेचें साम्राज्य असलें, तरी त्यानंतरच्या कालांत देशांतील धार्मिक सत्ता पुरोहितवर्गाच्या हातांत गेली. या वर्गानें आपलें वर्चस्व यावच्चंद्रदिवाकरौ टिकविण्याची हाव धरून सर्व ज्ञानभांडार आपल्या वर्गाच्याच हातांत ठेविलें व त्या ज्ञानभांडाराच्या बाजूला इतर वर्गांनीं चुकूनही फिरकूं नये म्हणून अनेक तऱ्हेच्या निर्बंधाचे रखवालदार त्याच्याभोंवतीं पहाऱ्यासाठीं ठेविले. "अध्ययन व अध्यापन हीं कामें ब्राह्मणवर्गाचीं आहेत, इतर वर्गांनीं आपआपलींच कर्में करीत असावीं, खालच्या वर्गांनीं वरच्या वर्गांचीं धर्मप्रणित कर्में करूं नयेत व केल्यास त्याबद्दल इहलोकीं शासन व मरणानंतर नरकलोकीं

अतिशय हालअपेष्टा सहन कराव्या लागतील" अशी भडक वर्णनपूर्वक दहशत घातली गेल्यामुळें पुरोहितवर्गाचा स्वार्थी हेतु साध्य होऊन इतर वर्ग विद्येचें नांवही घेण्यास कचरूं लागले.

ह्या सर्व धार्मिक सुलतानशाहीचा परिणाम व्हावयाचा तोच होऊन, देशांतील बहुसंख्य समाज म्हणजे एक मोठी आंधळ्यांची माळ होऊन, तो पुरोहित-वर्ग नेईल तिकडे जाऊं लागला. त्याचा स्वाभिमान गेला, त्याची विचारशक्ति अस्तप्राय झाली व इहलोकीं कर्तबगारी करण्याची त्याची ईर्षा नाहींशी होऊन तो पूर्ण दैववादी बनला. चांगल्या स्थितीबद्दल त्याला आनंद वाटेनासा झाला, वाईट स्थितीबद्दल त्याला दुःख वाटेनासें झालें, म्हणजेच तो पूर्ण निर्विकार बनला ! धार्मिक गुलामगिरीच्या बीजापोटीं राजकीय गुलामगिरीचे अंकूर फुटून लवकरच पारतंत्र्याच्या विषारी वेलानें सारा देश व्यापून टाकला. तरीही बहुजन समाज पुरोहितवर्गाच्या नेतृत्वाखालीं परलोकींच्या सुखाच्या अपेक्षेनें नानातऱ्हेचीं व्रतेवैकल्यें करण्यांतच चूर राहिला!

याप्रमाणें बहुजनसमाज शिक्षणाला मुकला व शिक्षण घेणें हें एका विशिष्ट वर्गाचेंच धार्मिक कर्तव्य बनलें. या शिक्षणाचें स्वरूप तरी काय होतें ? शिक्षण घेणें धार्मिक कर्तव्यच झाल्यामुळें ब्राह्मणवर्गांतील प्रत्येक पुरुष तें घेऊं लागला ही गोष्ट खरी आहे. परंतु या शिक्षणाला पुढें पुढें निर्जीव कवाइतीचें स्वरूप प्राप्त झालें. या शिक्षणामुळें मनुष्याचें मन विशाल होण्याच्या ऐवजीं तें आकुंचित होऊं लागलें. या शिक्षणामुळें मनुष्य आपल्या पायापुरताच विचार करूं लागला. या शिक्षणामुळें सुखलालसा मारली जाऊन इहलोकीं संन्यस्त वृत्तीनें राहून मरणोत्तर स्वर्गप्राप्ति होईल ह्या आशेवर मनुष्य जगूं लागला. ही वृत्ति वाढल्यामुळें आधिभौतिक शास्त्रें रोडावून आध्यात्मिक वाङ्मयाचीच बेसुमार वाढ झाली. रणयज्ञासाठीं लागणारें साहित्य निर्माण करण्याच्या ऐवजीं धार्मिक यज्ञासाठीं कोणतें साहित्य लागेल याचीच चर्चा आपले शिक्षित लोक करूं लागले. परमुलूख काबीज करण्याचा विचार करण्याऐवजीं स्वर्गाचा ताबा घेण्यासाठीं पुरोहितवर्गाच्या नेतृत्वाखालीं सारे लोक जमूं लागले. वैतरणी ओलांडून पलीकडे कसें जावें याचा विचार न करितां समुद्र ओलांडून पलीकडील देशांत कसें जावें याचा विचार आमच्या शास्त्रीपंडितांनीं करून जहाजांचा शोध लाविला असता, तर देशाचा अधिक फायदा झाला असता.

"नैनं छिंदन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ॥" असें आत्म्याचें वर्णन करण्यांत काळ न घालवितां, या वर्णनाप्रमाणें ज्यांच्यावर शस्त्राचा किंवा अग्नीचा परिणाम होणार नाहीं, असें एकादें चिलखत शोधून काढलें असतें, तर आज आम्ही परदास्यांत खितपत पडलों नसतों. सप्तस्वर्ग आणि सप्त-पाताळ यांच्या काल्पनिक वर्णनासाठीं भारेच्या भारे खरडण्याच्या ऐवजीं त्यांनीं प्रत्यक्ष इतर देशांत जाऊन, त्या देशांचें वर्णन लिहून ठेविलें असतें, तर आम्ही 'आल्बेरुणीनें' म्हटल्याप्रमाणें कूपमंडूक वृत्तीचे बनलों नसतों. यज्ञधूमाच्या ऐवजीं विषारी धूर काढला असता; समिधा कोणत्या लाकडाच्या असाव्या, याच्या चर्चेऐवजीं संगिनी कोणत्या धातूच्या असाव्या, याची वाटाघाट केली असती; भूतकालीं झालेल्या युद्धांचीं काल्पनिक वर्णनें करण्यांत वेळ घालविण्याऐवजीं भविष्यकाळच्या युद्धांची तयारी करण्यांत आपलें बुद्धि-सर्वस्व खर्च केलें असतें, तर हिंदुस्थानचाच नव्हे तर जगाचा नकाशा निरा-ळ्याच रंगांत रंगला गेला असता.

आमची प्राचीनविद्या ऐहिक सुखाला कमी लेखून पारलौकिक सुखासाठीं मनुष्यास अधिक उत्सुक करणारी होती. पूर्वीच्या पंडितांना पैशाप्रमाणें विद्येची देवघेव केल्यानें तिची वृद्धि होते, याची कल्पना नव्हती. आपला पैसा दुसऱ्यास न देतां पुरून ठेवावा, आपली विद्या दुसऱ्यास न देतां आपल्या जवळच जतन करून ठेवावी, ही वृत्तीच आमच्या देशास फार घातक झाली. याच अनुदार वृत्तीमुळें अनेक अजब गुणकारी वनस्पतींचीं औषधें माहीत असलेले लोक तीं दुसऱ्यांस सांगण्यास नाखूष असत. या वृत्तीमुळें त्यांच्या मरणानंतर आपण त्या औषधांसही मुकलों आहोंत.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे वर्णव्यवस्थेमुळें विद्यासंपादन करण्याची बहुजनसमाजास बंदी करण्यांत आली व त्यामुळें सर्व देश म्हणजे एक आंध-ळ्यांचें राज्य बनलें. जी विद्या होती, ती धार्मिक स्वरूपाची, परंपरेच्या चाकोरींतून जाणारी व व्यवहारोपयोगी ज्ञानाला पूर्णपणें तुच्छ लेखणारी अशी होती. त्यामुळें आमच्या शिकलेल्या लोकांत शोधकता जन्मासच आली नाहीं. पुरोहितवर्गाच्या मतलबी शिकवणीमुळें लोक दैववादी बनले.† परकीय लोक हिंदु-स्तानवर स्वाऱ्या करून देश लुटून नेऊं लागले, तरी त्यांच्या यशाच्या व आपल्या पराजयाच्या कारणांची मीमांसा करून उपाययोजनेसाठीं आपल्या

† The reconstruction of the curriculum P. 13.

बुद्धीचा उपयोग न करितां, आमचे पंडित 'आम्ही कोठून आलों व कोठें जाणार?' या आध्यत्मिक वादाची मीमांसा करण्यांतच गर्क राहिले.

मुसलमानी धर्मानें कुराण वाचण्याची सक्ती करून प्रत्येक माणसाला शिकण्याची अप्रत्यक्ष सक्ती केली. ख्रिस्ती धर्मानें बायबल वाचण्याची व शीखधर्मानें ग्रंथसाहेब वाचण्याची आवश्यकता लोकांना पटवून, त्यांना शिकण्यास उद्युक्त केलें. या धर्मांनीं–विशेषतः ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीं–बहुजन-समाजाला साक्षर करण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन, ती चांगल्या तऱ्हेनें पार पाडली. बुद्ध व भागवत धर्मांनीं ज्ञानाचा ओघ समाजांतील अगदीं खालच्या थरापर्यंत पोंचविण्याचा प्रयत्न केला. ख्रिस्ती धर्मोपदेशकांप्रमाणें बुद्धभिक्षूंनींहि लोकांना शिकविण्याचे शिकस्तीचे प्रयत्न केले व त्यामुळेंच ब्रिटिश अंमल सुरू होण्यापूर्वी ब्रह्मदेशांतील प्रत्येक स्त्रीपुरुष साक्षर असल्याचें दिसून आलें. ‡ ह्या धर्माच्या या विशाल धोरणामुळें तद्धर्मीयांचें, जगाच्या पाठीवर आज कोठेंना कोटें स्वतंत्र राज्य असूनही त्या लोकांत बरेंच चैतन्य जीव धरून राहिलें आहे.

परंतु आमच्या हिंदुधर्माच्या संकुचित व बहुजनविरोधी धोरणामुळें, आम्ही विस्कळित, निस्तेज व दुबळे बनलों आहोंत. § पुरोहितवर्गानें स्वतःच्या हिताकडेच अदूर दृष्टीनें न पहातां, राष्ट्राच्या कल्याणाकडे नजर ठेवून सर्व लोकांना व्यवहारोपयोगी विद्या दिली असती तर आज हिंदुधर्माचा बुद्ध धर्मा-प्रमाणें किंवा मुसलमान धर्माप्रमाणें इतर देशांत—खंडांत—फैलाव झालेला दिसला असता. देशाचा खरा भार सोसणाऱ्या बहुजन समाजाचा मुळींच विचार न करितां, मूठभर लोकांची प्रलयकालपर्यंत चैन कशी चालेल, याचाच आमच्या धर्ममार्तंडांनीं विचार केला. सृष्टीचा भार वाहाणाऱ्या शेषाला अनंत युगें उपाशी ठेवून सृष्टीच्या पाठीवर एका कोपऱ्यांत असलेल्या वर्णवर्चस्वाच्या वारुळांत वास करणाऱ्या नागाला शिक्षणाचें दूध पाजण्यांतच आमच्या धर्मानें आपली इतिकर्तव्यता मानली. देशासाठीं, राज्यासाठीं व स्वातंत्र्यासाठीं समाजांतील अगदीं खालच्या वर्गांतील लोकांनाहि प्रसन्न व कार्यक्षम ठेवावें लागतें. सेनापतीनें स्वःच्या पोटाचा विचार करून भागत नाहीं. त्याला सैनिकांनाहि योग्य व पौष्टिक अन्नाचा पुरवठा करवा लागतोच. सेनापतीप्रमाणें शिपायालाहि लष्करी शिक्षणाची जरूर असते. सेनापति पुष्कळ बलवान् व लष्करी

‡ हंटर क. रि. ५५ §गांवगाडा पा. २२८–५७.

ज्ञानात तज्ज्ञ असला, आणि त्याची सेना जर खाण्यावांचून मेटाकुटीस आलेली किंवा कवाईत न शिकलेली असली, तर त्याचा स्वतःचाहि नाश होण्यास वेळ लागत नाहीं. स्वाराला स्वतःच्या जिवासाठीं घोड्याच्या पायाला ठोकलेल्या नालांच्या खिळ्याकडेहि लक्ष पुरवावें लागतें; नाहींतर ऐन वेळीं घोडा ठोकरून स्वार खालीं येतो! आमच्या प्राचीन विद्वानांनीं बहुजन समाजाची काळजी केली नाहीं, त्यास योग्य शिक्षण दिलें नाहीं, त्याचा स्वाभिमान जागृत करण्याऐवजीं तो मारला व त्यामुळें देशाला अखेर पारतंत्र्य प्राप्त झालें. आमच्या हल्लींच्या पंडितांनींतरी यापुढें बहुजनसमाजाकडे दुर्लक्ष करूं नये.

२. बहुजनसमाजांतील विद्येचा प्रसार—इंग्रज लोकांचा हिंदुस्थानांतील जनतेशीं संबंध आल्यानंतर व विशेषतः त्यांची राजसत्ता आपल्या देशांत भरभक्कम पायावर प्रस्थापित झाल्यानंतर, त्यांच्या शिक्षणविषयक कल्पनांचा आपल्यावरहि परिणाम झाला. धर्मप्रधान विद्या मागें पडून व्यवहारोपयोगी ज्ञानाचा फैलाव–प्रसार–करणें हें शिक्षणाचें ध्येय ठरलें व या ध्येयाप्रमाणें शिक्षणक्रम आंखण्यांत येऊन सर्व जनतेला शिकविण्याचे प्रयत्नहि करण्यांत आले.

इ. स. १८१८ सालीं मुंबई प्रांतांतील मराठी सत्तेचा सूर्य पूर्णपणें मावळून इंग्रजशाहीला सुरवात झाली. त्यानंतर एल्फिन्स्टनसाहेबांनीं या प्रांतांतील प्रजेला शिक्षण देण्याची तजवीज करण्यास सुरवात केली. म्हणजे सुमारें इ. स. १८२० सालापासून या इलाख्यांतील प्रजेला शिक्षण देण्याचे सरकारी प्रयत्न सुरू झाले, असें स्थूलमानानें म्हणावयास हरकत नाहीं. हे प्रयत्न सुरू झाल्यास आज सुमारें ११७ वर्षें झालीं. ह्या ११७ वर्षांत आपल्या जनतेचें साक्षरतेचें पाऊल किती पुढें पडलें हें पाहणें अगत्याचें आहे. हें पहाण्यासाठीं सरकारी अहवालावरून तयार केलेले कांहीं तक्ते पुढें दिले आहेत. हे तक्ते तयार करतांना इ. स. १८८१–८२ पासून पुढचींच माहिती घेतली आहे. इ. स. १८८१ च्या पूर्वी शिक्षणाचा प्रसार करण्यांत आला; परंतु त्याबद्दलची विश्वसनीय माहिती उपलब्ध नसल्यामुळें व इ. स. १८८१–८२ सालाच्या पुढचेच आंकडे पद्धतशीरपणें प्रसिद्ध करण्यांत आलेले असल्यामुळें, पुढें दिलेल्या तक्त्यांत इ. स. १८८१–८२ नंतरचे परिस्थितिनिदर्शक आंकडे दिले आहेत.

तक्ता नं. ३—शिक्षणसंस्था व त्यांत शिकणाऱ्या मुलांमुलींची संख्या दर्शविणारा–(यांत शिकण्यालायक मुलें एकंदर लोकसंख्येंत शें. १५ मानलीं आहेत).

साल	लोकसंख्या	सर्व शिक्षण-संस्था	शिक्षण घेणारीं मुलें	शाळेंत जाण्यालायक मुलांपैकीं शिकणाऱ्या मुलांचे शेकडा प्रमाण	शिकणाऱ्या मुलांचे एकंदर लोकसंख्येशीं शेकडा प्रमाण
१८८२	१६४६०६६८	७२१७	३४०४९०	१३·८	१·९
१९२२	१९३५८३७१	१४९००	९५८३९२	३३	५
१९३२	२१८०३३८८	१७१५९	१३३२६९३	४०·७५	६·११
१९३६	,,	१७३१४	१४७६४०४	४५·१	६·७७

या तक्त्यांत एकंदर सर्व प्रकारच्या शिक्षणसंस्था दिल्या आहेत. इ. स. १८८१ पासून १९३६ पर्यंत संस्थांच्या संख्येंत व या संस्थांतून शिक्षण घेणाऱ्या मुलांच्या––लोकसंख्येशीं–प्रमाणांत कोणत्या गतीनें वाढ होत गेली, याची वाचकांना कल्पना येईल.

वरील तक्त्यांत १८८१–८२, १९२२, १९३२ व १९३६ या सालचे शिकणाऱ्या मुलांमुलींचे, लोकसंख्येशीं प्रमाण दाखविणारे आंकडे दिले आहेत; परंतु या प्रमाणांत होणारा फरक किती गोगलगाईच्या गतीनें होत आहे, याची कल्पना यावी म्हणून खालीं स्वतंत्र तक्ता दिला आहे.

तक्ता नं. ४

साल	लोकसंख्या	शाळेंत जाणाऱ्या मुलांचें, लोकसंख्येशीं शेंकडा प्रमाण
	[ब्रिटिश जिल्हे व देशी संस्थानें मिळून]	
१८७६–७७	२३८७६६२६	१·४
१८८१–८२	२३१८९६२१	१·९
१९०१–०२	२५४७१३६८	२·५
१९०६–०७	,,	२·८
१९११–१२	२७०८७७९५	३·४
१९१६–१७	,,	३·८
१९२१–२२	२६७६०५८२	४·६
	[ब्रिटिश जिल्हे फक्त]	
१९११–१२	१९६८३२४९	३·६
१९१६–१७	,,	४
१९२१–२२	१९३५८३७१	५
१९२६–२७	,,	५·९५
१९३१–३२	२१८०३३८८	६·११
१९३६	,,	६·७७

आपण या प्रांतांत एकंदर शिक्षणसंस्था किती होत्या व त्यांत शिक्षण किती मुलें घेत होतीं हें पाहिलें आहे; परंतु आपल्या प्रस्तुत विषयाच्या दृष्टीनें प्राथमिक शिक्षणाच्या शाळांचें महत्त्व असल्यामुळें, पुढील तक्त्यांत प्राथमिक शाळांची संख्या व त्या कोणीं चालविल्या, वगैरेबद्दल माहिती दिली आहे.

तक्ता नं० ५

साल	शाळांची संख्या					मुलांची संख्या				
	१८८२	१९२२	१९२७	१९३२	१९३६	१८८२	१९२२	१९२७	१९३२	१९३६
१ सरकारी शाळा	३८११	३४	३४	३४	३४	२४३९५९	४९३५	४८३२	४४४१	४७४६
२ लो. बो „		८४६७	९६०८	१०२८४	१०२६८		४८९६६०	५९२९६९	६७१७७९	७१२६१०
३ म्युन्सि „		१२५१	१५६६	१७०४	१७८७		१६६३४१	२५०१६६	३०८२२२	३५७०३१
४ मदतीच्या „	१९६	२५८५	२५२८	२६२६	२६४५	१३९०२	१२४५१४	१३१२५२	१५२४५४	१६२४७३
५ विनमदती „	१३११	७१	९९	१७९	२१८	७४८२७	४९८३	५५०७	६९१२	११५२
एकूण	५३३८	१२४०८	१३८३५	१४८२७	१४९५२	३३२६८८	७९०४३३	९८४७२६	११४३८०८	१२४८०१२

या तक्त्यांतील आंकडे पाहातां, १९२२ मध्यें बोर्डाच्या ज्या शाळा होत्या, त्यांची १९३६ पर्यंत शें. १२१·२ वाढ झाली, व मुलांच्या संख्येंत शें. १४५·५ नें वाढ झाली. याच्या उलट म्युनिसिपालिटीच्या १९२२ मध्यें ज्या शाळा होत्या, त्यांची १९३६ पर्यंतची वाढ शें. १४५·५ नें होऊन मुलांची वाढ शें. २१४·६ नें झाली. म्युनिसिपल शाळांमधील मुलांची संख्या जास्त वाढण्याचें कारण म्हणजे अनेक म्युनिसिपल हद्दींत मोफत व सक्तीचें तत्त्व लागू करण्यांत आलें हें होय. या सक्तीच्या तत्त्वाची जितक्या कसोशीनें अंमलबजावणी करावयास पाहिजे, तितकी केली नसतांहि मुलांची संख्या केवळ १४ वर्षांच्या काळांत दुपटीपेक्षां अधिक वाढली, हें लक्षांत ठेवणें अगत्याचें आहे.

मदतीच्या शाळांची संख्या कशी वाढत गेली व विनमदतीच्या शाळांची संख्या कशी रोडावत गेली हेंहि लक्षांत ठेवणें जरूर आहे.

वरील तक्त्यांतील माहिती मुलांमुलींची एकत्र दिली आहे. त्यांत निवळ शिकणाऱ्या मुलांचें प्रमाण पाहून देशांतील खऱ्या परिस्थितीची कोणालाच कल्पना येणार नाहीं. आपल्या बहुजन समाजांत शिक्षणाचें बीं किती रुजलें गेलें आहे व शिक्षणासाठीं ज्या शाळा उघडल्या आहेत, त्यांचा खरा फायदा कोणाला मिळत आहे, हें पाहण्यासाठीं आपणांस आणखी थोडें खोल पाण्यांत शिरून पाहाणी करावी लागेल. ही पाहाणी करतांना पुढील प्रश्न आपणांपुढें विचारासाठीं येतील.—

(अ) शाळेंत जाणाऱ्या मुलांमध्यें मुलगे किती आहेत व मुली किती आहेत ?

(ब) शाळेंत जाणाऱ्या मुलांमुलींमध्यें निरनिराळ्या जातींच्या मुलांमुलींचें काय प्रमाण पडतें ?

(क) शहरांतील शिक्षणाची व खेड्यांतील शिक्षणाची काय स्थिति आहे ?

या प्रश्नांचा आतां आपण क्रमवार विचार करूं—

(अ) देशांतील स्त्री–पुरुषांमधील शिक्षणप्रसाराची पाहाणी करतांना पुरुषांमध्यें शिक्षणाचा प्रसार, स्त्रियांच्या मानानें फारच जास्त असून स्त्रियांचें शिक्षण अतिशयच मागासलेलें आहे, याची चांगलीच कल्पना येते. वाचकांना स्त्रीपुरुषांच्या शिक्षणप्रसारांत किती अंतर पडलें आहे, याची कल्पना यावी म्हणून खालीं पुरुष व स्त्रिया यांच्या शिक्षणपरिस्थितीचे निदर्शक दोन निरनिराळे तक्ते (नं. ६ व ७ हे) दिले आहेत.—

तक्ता नं. ६

साल	पुरुषांची संख्या	एकंदर शाळा	शिक्षण घेणारे मुलगे	शिक्षण घेणाऱ्या मुलांचें (boys) पुरुषांच्या संख्येशीं शें. प्रमाण	शिक्षण घेणाऱ्या मुलांचें (boys) शाळेंत जाण्या-लायक मुलांशीं शें. प्रमाण	प्राथमिक शाळा	प्राथमिक शाळेंतील मुलगे	प्राथमिक शाळेंतील (boys) मुलांचें पुरु-षांच्या संख्येशीं शें. प्रमाण	प्राथ० शाळेंतील मुलांचें (boys) शाळेंत जाण्या-लायक मुलांशीं शें. प्रमाण
१८८२	८५००२८१	७२१७	३१८११४	३·७	२४·९६	५०१२	३०८५३३	३·६	२४·२
						¶ १११७०	६३७४२३		
१९२२	१०१८३०२० !	१३१७५	७७११२७	७·५	४५·१	¶ १३६४	§४७१६९	६·७	४४·८
						१२५३४	६८४५२९		
		१४०४०	११०९२६५						
१९३२	११४७२८८४	‡ ११५१	† ३०३८४	९·०७	६४·४	१३०९५	९७४७९२	८·५	५६·६
		१५१९१	११३९६४९						
		१४११६	१२०८९१४						
१९३६	,,	‡ ११०४	† ३९७०	९·८	७०.२	१३१३८	१०५२३८७	९·२	६१·२
		१५२२०	१२४८६८४						

! यांत खाजगी शाळांचा समावेश होतो.
¶ खाजगी शाळा.
§ खाजगी शाळांतील मुलें.
‡ सरकारी मान्यता नसलेल्या शाळा.
† सरकारमान्यता नसलेल्या शाळांतील मुलें.

तक्ता नं० ७

साल	स्त्रियांची संख्या	एकंदर शाळा	शिक्षण घेणाऱ्या मुली	शिक्षण घेणाऱ्या मुलींचें स्त्री-संख्येशीं शें. प्रमाण	शिक्षण घेणाऱ्या मुलींशीं जाण्यालायक मुलींचें शें. प्रमाण	प्राथमिक शाळा	प्राथमिक शाळेंतील मुलींची संख्या	प्राथ० शाळेंतील मुलींचें स्त्रीसंख्येशीं शें. प्रमाण	प्राथमिक शाळेंतील मुलींचें शाळेंत जाण्यालायक मुलींशीं शें. प्रमाण
१८८२	७९६०३८७	३४३	२६७६६	·३३	२·२४	३२६	१९८५१ ४२९६	·३	२
							२४१५५		
						१४५२	१६१०८५		
१९२२	९१७५३५१		१७२५	१८७२६५	२	१३·६	१३९	१·९	१२·५
							११६०९		
						१५९१	१७२६९४		
			१८८९	१८९३५८					
१९३२	१०३३०५०४	}	७९	३६८६	१·८	१२·५	१७३२		
			१९६८	१९३०४४					
			१९८१	२२१५५१					
१९३६	,,	}	११३	६१६९	२·२	१४·७	१७९७	१·९	१२·६
			२०९४	२२७७२०					

या दोन तक्त्यांतील आंकडे स्वतःच, एकंदर परिस्थितीविषयीं स्पष्ट कल्पना आणून देण्याचें कार्य इतकें चोख रीतीनें बजावीत आहेत कीं, त्याबद्दल आणखी खुलासा करण्याची मुळींच जरूर नाहीं.

या दोन तक्त्यांत व पान वर १४९ दिलेल्या तक्त्यांत शिक्षण घेणाऱ्या मुलांमुलींचें शाळेंत जाण्यालायक मुलांमुलींशीं शेंकडा प्रमाण काय पडतें, हें दाखविणारे आंकडे दिले आहेत. एकंदर लोकसंख्येंत शाळेंत जाण्यालायक मुलगेमुली किती प्रमाणांत असतात, हेंहि आपण पाहाणें जरूर आहे. कारण, या प्रमाणाची कल्पना आल्यावांचून वर दिलेलें प्रमाण समाधानकारक आहे किंवा नाहीं, याचा आपणांस नीट बोध होणार नाहीं.

कोणता मुलगा किंवा मुलगी शाळेंत जाण्यालायक समजावयाची? आपल्याकडे पांचवें वर्ष पुरें झाल्यानंतर मुलांमुलींस शाळेंत दाखल करून घेण्यांत येतें, व त्यानें निदान ५ वर्षें शाळेंत असावें अशी, टिकाऊ साक्षरतेच्या दृष्टीनें, आपली अपेक्षा असते. म्हणजे उमर वर्षें ५ पासून १० वर्षांच्या अखेर ज्यांचें वय आहे, अशीं मुलें शाळेंत जाण्यालायक धरलीं जातात. या अशा मुलांमुलींचें प्रमाण एकंदर लोकसंख्येंत काय पडतें? हंटर–कमिशननें एकंदर लोकसंख्येशीं अशा शाळेंत जाण्यालायक मुलांमुलींचें प्रमाण शेंकडा १५ धरलें आहे.× शेतकी–कमिशननेंहि हें प्रमाण हंटरकमिशनप्रमाणेंच धरलें आहे.* याच्या उलट हार्टाग–कमिशननें हें प्रमाण शेंकडा १४ धरलें आहे. आम्हीं हें प्रमाण शेंकडा १५ धरून वरील तक्त्यांत निरनिराळे आंकडे दिले आहेत.

आपणांकडे शिक्षण घेणाऱ्या मुलांमुलींचें, एकंदर शाळेंत जाण्यास लायक असणाऱ्या मुलांमुलींशीं, प्रमाण काय पडतें हें आपण पाहिलें आहेच. आतां इंग्लंड व वेल्समध्यें हेंच प्रमाण काय पडतें, तें पाहूं.

३१ मार्च १९३० रोजीं पांच वर्षें पूर्ण झालेलीं व दहा वर्षांपर्यंतचीं मुलें इंग्लंड व वेल्समध्यें एकंदर ३४९३०९० होतीं व त्यांपैकीं ३१९७८४६ इतकीं मुलें शाळेंत शिक्षण घेणारीं होतीं. म्हणजे शाळेंत जाण्यालायक मुलांपैकीं जवळजवळ शेंकडा ९२ मुलें शाळेंत शिक्षण घेत होतीं. तिकडे सक्तीचें तत्त्व लागू असल्यामुळें हा फरक पडला आहे.‡

---

‡ Education in 1930 p. 108. × पा. २८ * पा. ५१८.

तक्ता नं० ८

अनुक्रम नंबर	जात किंवा धर्म	पुरुष संख्या		वर्गाच्या पुरुषसंख्येचें एकंदर पुरुषसंख्येशीं शें. प्रमाण		शाळेंत शिक्षण घेणाऱ्या मुलांचें त्या वर्गाच्या पुरुषसंख्येशीं शें. प्रमाण		
		१९२१	१९३१	१९२१	१९३१	१९२२	१९२७	१९३२
१	हिंदी खिश्चन	१२१३६२	१४९३१५	१·३	१·३	१२·२	१३·६	१२·७
२	हिंदू—							
	(१) पुढारलेले	१०४४०५१	†९७३३८८	१०·२५	८·५	‡१६·२	१६·७	१७·२
	(२) मध्यम	४७१३१७५	५६०३८४८	४६·४	४८·९		८·४	८·१
	(३) मागासलेले	२०९२४३४	२०३०४३६	२०·६	१७·७	§६·५	५·३	६·१
३	मुसलमान	२०८३६५३	२४४७४४७	२०·५	२१·३	६	७·१	७·५
४	पारशी	४२७४९	४६१६६	·४५	·४	८·७	९·१	७·५
५	इतर	४११५१	†२२२८४	·५	१·९	२·२	४·५	†९·४

(†) १९२१ पेक्षां १९३१ सालीं पुढारलेल्या हिंदूंची संख्या कमी झाली असून, १९३१ मध्यें 'इतर' सदराखालीं वाढण्याचें कारण, जैन लोकांची मोजणी पुढारलेले हिंदु म्हणून १९३१मध्यें न करतां, 'इतर' म्हणून केली आहे. (‡) १९२२मधील प्रमाण हें निव्वळ ब्राह्मण मुलांचें आहे. (§) १९२२मध्यें सर्व ब्राह्मणेतर हिंदूंचें दाखविलें आहे. 'ब्राह्मणेतर' या सदरांत प्रभु, वाणी, जैन इ० पुढारलेल्या जातींचा समावेश केल्यामुळें शिक्षणाचें प्रमाण वाढलें. मागासलेल्या वर्गांचें स्वतंत्र वर्गीकरण न केल्यामुळें त्यांचें निराळें प्रमाण देतां येत नाहीं. G. R. 1917–1932 P. 53.

मागील तक्त्यांत एकंदर सर्व जाती एकत्र गणून आंकडे दिले आहेत. त्या आंकड्यांमुळें मुंबई इलाख्यांतील सर्व समाजांतील शाळेंत जाणाऱ्या मुलांमुलींचें, त्या त्या समाजाच्या, जातीच्या किंवा धर्माच्या लोकसंख्येशीं सारखेंच प्रमाण असावें, अशीं जर कोणाची कल्पना झाली असेल तर ती चुकीची आहे, हें त्या तक्त्यावरून वाचकांच्या लक्ष्यांत येईल.

या तक्त्यांत मुलांच्या शाळेंत निरनिराळ्या वर्गांचे किती मुलगे व त्यांचें त्या त्या वर्गाच्या पुरुषांच्या संख्येशीं काय प्रमाण पडतें हें दाखविलें आहे. खालीं दिलेल्या तक्त्यांत निरनिराळ्या वर्गांतील मुलांमुलींचें प्रमाण दाखविलें आहे—

निरनिराळ्या जातींचें प्राथमिक शाळांतील मुलामुलींचें प्रमाण दाखविणारा तक्ता नं. ९ §

धर्म व जाती	प्राथ. शाळांतील मुलांची (Boys) संख्या	शाळेंतील मुलांची संख्या प्रति १०० पुरुष हिंदु	प्रा. शाळांतील मुलांची संख्या	मुलांच्या जाती-मुलांची संख्या प्रति १०० पुरुष हिंदु	प्रा. शाळेंतील एकंदर मुलां-मुलींची संख्या	मुलां-मुलींच्या जाती-संख्या प्रति १०० पुरुष हिंदु	प्रा. शा. जा. लो. प.
हिंदी खिस्ती	१५४४२	१०·३	८६८०	७·०	२४११२	८·८	
हिंदु—							
(१) पुढारलेले	१४७२६३	१५·१	८४१४१	१०·०	२३१४०४	१२·७	
(२) मध्यम वर्गांचे	४१९७८४	७·५	८४९८०	२·६	५०४७६४	४·७	
(३) मागासलेलें	७११९१३	५·५	१९०३९	१·०	१३०९५२	३·३	
मुसलमान	१६५७०८	६·८	५२५४५	२·७	२१८२५३	४·९	
पारशी	३१२०	६·८	३७३२	८·७	६८५२	७·७	
इतर	१८२५३	८·२	९२०८	५·०	२७४६१	६·७	

§ मु. री. १९३५–३२ पा. ९२

या तक्त्यांत मुलांचें जें शेंकडा प्रमाण दाखविलें आहे, तें प्रमाण व प्रथम दिलेल्या तक्त्यांतील प्रमाण यांत थोडा फरक आहे. पहिल्या तक्त्यांत मुलांच्या शाळेंतील विद्यार्थ्यांचें पुरुषांच्या संख्येशीं प्रमाण दाखविलें आहे. मुलांच्या शाळेंत मुलीहि असल्यामुळें त्यांचाहि मुलांच्या शाळेंतील विद्यार्थ्यांच्या संख्येंत समावेश झाल्याकारणानें त्या तक्त्यांतील प्रमाण साहजिकच वाढलें. उलट, आतां वर दिलेल्या तक्त्यांत मुलांचे व मुलींचे आंकडे स्वतंत्रपणें दिल्यामुळें, तें प्रमाण कमी पडलें आहे.

या तक्त्यांतील आकडयांची तुलना केल्यानंतर पुढारलेल्या हिंदूंच्या शिकणाऱ्या मुलींचें त्या वर्गाच्या स्त्रियांशीं पडणारें शेंकडा प्रमाण, इतर वर्गांच्या मुलांच्या प्रमाणापेक्षां कितीतरी अधिक आहे, हें दिसून येतें. त्याचप्रमाणें पडद्याच्या चालीमुळें मुसलमानांतील स्त्रियांचें शिक्षण, अतिशय मागासलेलें असतांही, त्याचें प्रमाण, हिंदूंमधील मध्यम व मागासलेल्या वर्गांतील स्त्रियांच्या शिक्षणापेक्षां जवळ जवळ दुपटीनें अधिक आहे !

सरकारनें मध्यम वर्गांत ज्या जातींचा समावेश केला आहे, त्या जातींपैकीं शिंपी वगैरे व्यापारी जाती मुख्यतः शहरांत राहणाऱ्या असल्यामुळें त्यांच्यांतील मुलींचें शिक्षण, शेतकीसाठीं खेडयांतून राहाणाऱ्या मराठा, माळी, कुणबी वगैरे वर्गांतील मुलींच्या शिक्षणापेक्षां अधिक प्रमाणावर असणें साहजिकच आहे. खेडयांतील शेतकी करणाऱ्या वर्गांचेच आंकडे जर काढले तर, आपणास याहीपेक्षां अधिक शोचनीय स्थिति दिसून येईल.

(क)—शहरांतील व खेड्यांतील शिक्षणप्रसाराचे आंकडे पाहिले तर त्यांतही आपणांस जमीन अस्मानाचें अंतर दिसून येईल ! शहरांतील पालक स्वतः शिकलेले, निदान शिक्षणाविषयीं आस्था बाळगणारे असतात, त्यांना सुलभतेनें आपल्या मुलांना शिक्षण देण्याची साधनें मुबलक उपलब्ध असतात, व त्यामुळें त्यांचीं मुलें केव्हांही अधिक प्रमाणावर शाळेंत जातात. परंतु १९३१ च्या खानेसुमारीच्या§ अहवालाप्रमाणें देशांतील लोकसंख्येंपैकीं शहरांत फक्त शें. ११ लोक राहातात व खेड्यांतच शें. ८९ लोक राहातात. म्हणजे आपल्या देशांत खरी लोकवस्ती खेड्यांतच आहे. खुद्द मुंबई इलाख्यांत शें. २२·६ लोक शहरांत राहाणारे असून बाकीचे खेड्यांत राहाणारे

§ Census Rep. 1931, P. 46.

आहेत.‡ या खेड्यांतील लोकांपैकीं दर हजारीं ३३लोक ५००० पेक्षां जास्त लोकसंख्येच्या गांवीं राहातात; १८९ लोक २००० ते ५००० पर्यंतच्या लोकसंख्येच्या गांवीं राहातात; ५६१ लोक ५०० ते २००० पर्यंतच्या लोक संख्येच्या गांवीं राहातात; व २१७ लोक ५०० पेक्षां कमी लोकसंख्येंच्या गांवीं राहातात.†

याप्रमाणें खरा बहुजनसमाज खेड्यांत राहात असतांही शेंकडों खेड्यांच्या वांट्याला अद्यापि शाळांच आलेल्या नाहींत, हें खालील तक्त्यावरून दिसून येईल—

शाळा असलेल्या व नसलेल्या गांवांची संख्या दाखविणारा तक्ता नं. १०¶

भाग	शाळा असलेलीं गांवें व खेड्यांची संख्या	शाळेवांचून असलेल्या निरनिराळ्या लोकसंख्येच्या खेड्यांची संख्या					
		२००० ते ५००० लोकसंख्येचीं गांवें		५०० ते २००० लोकसंख्येचीं गांवें		५०० लोकांपेक्षां कमी लोकसंख्येचीं गांवें	
		शेंकडा प्रमाण	संख्या	शेंकडा प्रमाण	संख्या	शेंकडा प्रमाण	संख्या
मुंबई—भाग	१७६६	१५२	७०४	७८१	२६७८	४३१५	
मध्य ,,	३४५४	४६	४०६	१२४८	२३८९	४०८८	
उत्तर ,,	१६३९	३१	३१२	१६९	११५६	१६६८	
दक्षिण ,,	१९२४	२५	३१०	२६४	२२१५	२८१४	
सिंध ,,	१९७४	६	६३	१८७	२९६१	३२१७	
	१०७५७	२५९	१७९५	२६४९	११३९९	१६१०२	

‡ आपल्या देशांतील शहरांत व खेडयांत राहाणाऱ्या लोकांच्या प्रमाणाची इतर देशांशीं तुलना करतांना शहरीं लोकसंख्या फ्रान्समध्यें शें. ४९, उत्तर आयर्लंडमध्यें शें. ५०·८, कॅनडामध्यें शें. ५३·७, अमेरिकेंत शेंकडा ५६·२ आणि इंग्लंड व वेल्समध्यें शें. ८० असल्याचें आढळून येतें. Census Rept. P. 46.

† Census Rept. P. 60. ¶ मु. शि. रि. १९३५–३६ पा. ४४.

१९२२ सालीं ११·१ चौरस मैलांस एक शाळा होती, ती १९३६ सालीं ९·४ चौ. मैलांस एक शाळा पडूं लागली. १९१६-१७ सालीं २·७ शहरें व खेडयांना एक शाळा होती. १९२२ सालीं २·७ शहरें व खेडयांना एक शाळा पडूं लागली, व १९३६ सालीं प्रत्येक २ शहरें व खेडयांना एक शाळा असल्याचें दिसून आलें.

हारटॉग–कमिटीनें आपल्या अहवालांत (पान ५२) इतर प्रांतांत या बाबतींत काय स्थिति आहे हें दाखविणारा तक्ता दिला आहे. वाचकांच्या माहितीसाठीं ती पुढें दिला आहे—

सरासरी किती क्षेत्रास एक प्राथमिक शाळा पडते हें दाखविणारा

तक्ता नं. ११

प्रांत	चौ. मैल	प्रांत	चौ. मैल
मद्रास ...	३·०७	ब्रह्मदेश ...	५९·७०
मुंबई ...	१०·०५	बिहार–ओरिसा...	३·०३
बंगाल ...	२·०१	मध्यप्रांत ...	२३·८४
सं. प्रांत ...	५·६५	आसाम ...	१२·१०
पंजाब ...	१६·८९	ब्रि. इंडिया ...	६·७३

पंजाबमध्यें (Middle Vernacular) माध्यमिक देशी भाषांच्या शाळांची संख्या मोठी असून त्यांतही प्राथमिक शिक्षण दिलें जातें. परंतु ती जमेंत न धरल्यामुळें पंजाबचें क्षेत्र आपणांस जास्त वाटतें. ब्रह्मदेशांत सरकारनें मंजूर किंवा मान्य न केलेल्या प्राथमिक शाळांची संख्या, सरकारमान्य प्राथमिक शाळांच्या संख्येपेक्षां चौपटीहूनही अधिक आहे ! परंतु त्यांचा विचार न करतां फक्त सरकार मान्य शाळांचेंच प्रमाण दिलें आहे. वास्तविक पाहातां ब्रह्मदेशांतील साक्षरलोकांचें प्रमाण सर्व प्रांतांत अधिक आहे. तसेंच ब्रह्मदेश, मध्यप्रांत व आसाम या प्रांतांत तुरळक वस्तीचीं मोठमोठीं जंगलेंही अधिक असल्यामुळें, त्या त्या प्रांतांचें प्रत्येक शाळेस पडणारें क्षेत्र वाढलेलें दिसतें.ऽ

ऽ हारटॉग क. रि. ५२.

या एकंदर माहितीवरून खेडयांतील लोकांसाठीं शाळांची जरूर ती तजवीज करण्यांत आलेली नाहीं व त्यामुळें त्यांच्यामध्यें शिक्षणाचा प्रसार फार अल्प प्रमाणावर झालेला दिसून येतो.

ता. २१।५।१८४० ला कॅप्टन कॅंडी यांनीं मुंबईच्या बोर्ड ऑफ एज्युकेशनला आपला अहवाल सादर करतांना, "प्रत्येक खेडयाला एक देशभाषेची शाळा झाल्याशिवाय राष्ट्रीय शिक्षणाचा योग्य प्रसार झाला आहे असें म्हणतां येणार नाहीं,"† असें म्हटलें आहे. कॅंडी साहेबांच्या पूर्वी एल्फिन्स्टन साहेबांनींही प्रत्येक गांवाला शाळा काढण्यासाठीं पगाराऐवजीं इनाम जमीन देऊन पाटील, कुलकर्णी यांच्याप्रमाणें वतनदार शिक्षकांचा वर्ग निर्माण करण्याचा विचार केला होता. तो त्यांचा बेत त्यांना पुढें सोडून द्यावा लागला. वर निर्देश केलेला कॅंडी साहेबांचा रिपोर्ट होऊन एक शतक पुरें होण्याची वेळ आली, तरी अद्यापि २६८५९ गांवांपैकीं १६१०२ गांवांना शाळा नाहीं ! ही स्थिति कधीं बदलणार हें एक परमेश्वरच जाणे !

खेडयांतील लोक धार्मिक, सामाजिक व आर्थिक कारणांमुळें शिक्षण घ्यावयास प्रतिकूल आहेत. त्यांत शाळेच्या उणिवेची भर पडल्यानंतर शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या अतिशय रोडावलेली दिसली तर आश्चर्य कसलें ? मुलांच्या शिक्षणाचाच शिमगा झाल्यानंतर मुलींच्या शिक्षणाचा विचार कशाला ?

साक्षरतेची वाढ––शाळेंत जाणाऱ्या मुलांमुलींची संख्या पाहून हीं सर्व मुलेंमुली साक्षर होतात असें कांहीं वाचकांना वाटण्याचा संभव आहे; परंतु अशी समज झाल्यास ती चुकीचीच ठरणार आहे. प्राथमिक शाळेंत जाणारीं मुलें सर्वच साक्षर होतात असें नाहीं. आपल्या इकडे मुलाला वर्ष दोन वर्षें शाळेंत ठेवून त्याला मध्येंच शाळेंतून काढून घेऊन इतर कामधंद्याला लावणारे पालक फार आहेत. यामुळें अनेक मुलें व मुलीं साक्षरता प्राप्त होण्याच्या पूर्वीच शाळा सोडतात व त्यांच्यासाठीं खर्चीं पडलेले लाखों रुपये पाण्यांत जातात. हे असे किती पैसे व्यर्थ जातात याचा 'शिक्षण व खर्च' या प्रकरणांत सविस्तर विचार केला आहे.

कोणाला साक्षर म्हणावें याची सरकारन, खानेसुमारीच्या वेळीं उपयोगीं

† "The national education of India cannot be said to be on a suitable basis till there is a vernacular school in every village." E. R. II, p. 152.

पडावी म्हणून, व्याख्या केली आहे. ज्याला एकादें पत्र लिहितां येतें व त्या पत्राला आलेलें उत्तर वाचतां येतें तो मनुष्य साक्षर समजला जातो. या व्याख्येप्रमाणें १९२१ च्या खानेसुमारीच्या रिपोर्टांत सर्व हिंदुस्तानांतील साक्षरतेचें प्रमाण एकंदर लोकसंख्येशीं शें. ७·५ इतकें होतें. तें प्रमाण १९३१ च्या खानेसुमारीच्या वेळीं शें. ८ पर्यंत चढल्याचें दिसून आलें.‡

निरनिराळ्या प्रांतांचें साक्षरतेचें प्रमाण दाखविणारा तक्ता नं. १२

प्रांत किंवा संस्थान वगैरे.	५ वर्षांवरील वयाच्या दर हजार लोकांत साक्षरांची संख्या	प्रांत किंवा संस्थान वगैरे.	५ वर्षांवरील वयाच्या दर हजार लोकांत साक्षरांची संख्या
ब्रह्मदेश	३६८	मुंबई संस्थानें ...	७१
कोचीन	३३७	मध्यप्रांत	६६
त्रावणकोर	२८९	पंजाब	६३
बडोदा	२०९	आसाम संस्थानें ...	६१
एडन	१८२	बंगाल संस्थानें ...	६१
कूर्ग	१७६	सं. प्रांत	५५
अंदमान व निकोबार...	१७०	बलुचिस्तान	५४
दिल्ली	१६३	बिहार–ओरिसा ...	५३
अजमीर–मेवाड ...	१२५	हैदराबाद	५०
पश्चिम हिंदुस्थान संस्थानें	१२५	वायव्य स. प्रांत ...	४९
मद्रास संस्थानें (कोचीन व त्रावणकोर वगळून)	१२१	सं. प्रांत संस्थानें ...	४९
		ग्वाल्हेर	४७
बंगाल	११२	राजपुताना	४३
मुंबई (एडन धरून)..	१०८	पंजाब संस्थानें ...	४२
मद्रास	१०८	जम्मू व काश्मीर ...	४०
म्हैसूर	१०६	बिहार–ओरिसा संस्थानें	३९
आसाम	९३	मध्यप्रांत	३५

‡ Census Rept; (1931,) P. 324.

एकंदर ब्रिटिश हिंदुस्तानांतील साक्षरतेचें प्रमाण शें. ८ असलें तरी निर-निराळ्या प्रांतांत हें प्रमाण कमी जास्त आहे, हें पान १६२ वर दिलेल्या निरनिराळ्या प्रांतांच्या आंकड्यांवरून लक्ष्यांत येईल.

या यादींत मुंबई प्रांत १३ वा आहे. परंतु मुंबई प्रांताच्या या आंक-डयांत एडनमधील साक्षर लोकांचा समावेश केल्यामुळेंच, मुंबई प्रांताचा १३ वा अनुक्रमांक आला. एडनचा स्वतंत्रपणें या यादींत ५ वा नंबर आला आहे. एडनमधील साक्षर लोक वगळून फक्त मुंबई प्रांताच्या साक्षर लोकांचा आंकडा काढला, तर मुंबई प्रांताला या यादींत फार खालीं घसरावें लागेल यांत शंका नाहीं.

हिंदुस्तानांतील भिन्न भिन्न प्रांतांचें साक्षरतेचें प्रमाण जसें भिन्न भिन्न आहे, तसेंच एकाच प्रांतांत शहरांतील साक्षरतेच्या प्रमाणांत कसें अंतर दिसून येतें, हें पुढील कांहीं आकडयांवरून लक्षांत येईल.*

तक्ता नं. १३

शहर	दर हजारीं साक्षरांची संख्या	
	पुरुष	स्त्रिया
मुंबई	२९१	१५३
पुणें	४०८	१४९
सोलापूर	२५४	४८
बडोदा	४९६	१८४

मुंबई व सोलापूर येथें गिरणींतील मजुरांची संख्या मोठी असल्यामुळें, तेथील साक्षर लोकांचें प्रमाण पुण्यापेक्षां कमी आहे. पुणें हें शिक्षणाचें केंद्र असल्यामुळें पुण्यांतील साक्षर लोकांचें प्रमाण अभिमानास्पद वाटतें. परंतु बडो-द्याचें आंकडे पाहिल्यानंतर महाराष्ट्रांतील या शिक्षणाच्या केन्द्रालाही लाजेनें मान खालीं घालावी लागते ! खेडयांतील साक्षर लोकांचें स्वतंत्र आकडे उप-

* Census Rept. (1931) P. 50.

लब्ध नाहींत. परंतु मागें जे कांहीं तक्ते दिले आहेत त्यांवरून खेडयांतील साक्षरांची कल्पना करतां येणें शक्य आहे. चीन जपानमधील वसक्या नाकाच्या लोकांशीं उठावदार नाकाच्या लोकांचें जें प्रमाण, पाश्चिमात्य देशांत मांसाहारी लोकांशीं शाकाहारी लोकांचें जें प्रमाण, शेतकरी समाजांत कर्जबाजारी लोकांशीं धनिक माणसांचें जें प्रमाण तेंच आपल्या प्रांतांत शहरांतील साक्षरतेच्या प्रमाणाशीं खेडयांतील साक्षरतेचें प्रमाण आहे, असें तुलनात्मक पद्धतीनें म्हणावयास हरकत नाहीं.

त्याचप्रमाणें मुंबई प्रांतांतील निरनिराळ्या जातींत, मातृभाषेंत व इंग्रजी भाषेंत साक्षर असलेल्या लोकांचें प्रमाणही कसें कमी जास्ती आहे, हें पुढील आंकडयांवरून दिसून येईल.†

निरनिराळ्या जातींत मातृभाषेंतील व इंग्रजी भाषेंतील साक्षर लोकांचें प्रमाण दाखविणारा तक्ता. नं. १४

जात	दर हजारीं साक्षरांची संख्या				दर दहा हजारीं इंग्रजी भाषेंतील साक्षरांची संख्या			
	१९३१		१९२१		१९३१		१९२१	
	पुरु.	स्त्रि.	पुरु.	स्त्रि.	पुरु.	स्त्रि.	पुरु.	स्त्रि.
ब्राह्मण	७८८	२३१	६५२	१४४	२५०७	२२१	१६१२	७२
लोहान (Lohana)	४७०	७४	३४३	७७	७९०	२५	४४३	६१
लिंगायत	२९३	२०	२३१	१५	१३६	१	६९	१
मराठा	२२३	२८	५८	३	१४८	२	२०	१
आग्री	९८	३	४१	३	१४	१	९	...
महार, धेड	६३	५	२३	१	२८	१	१३	१
भारवाड (Bharwad)	२५	२	१०	१	३	...	२	...
भिल्ल	१०	...	४	...	१	...	.....	...

† Census Rept. (1931) P. 343.

शिक्षण प्रसाराच्या मार्गांतील अडचणी— निरनिराळे आंकडे देऊन शिक्षणाचा फायदा निरनिराळ्या वर्गांचे व भिन्न भिन्न ठिकाणचे लोक किती घेत आहेत व साक्षरतेचा प्रसार किती झाला आहे, हें आपण पाहिलें. या आंकडयांवरून कांहीं वर्गांत शिक्षणाचें प्रमाण किती अल्प आहे, हेंही आपण पाहिलें. खेडयांत अद्यापही अज्ञानाचें–निरक्षरतेचें–पूर्ण साम्राज्य चालू आहे, हेंही आपणास दिसून आलें. इंग्रजांचें राज्य सुरू होऊन सुमारें १५० वर्षें झालीं असतांही साक्षरतेचें प्रमाण कां वाढलें नाहीं, त्याचा आपण थोडक्यांत विचार करूं.

(१) ज्याला बहुजनसमाज (Masses) म्हणतात, त्या बहुजनसमाजाला खरोखर साक्षर करण्याच्या हेतूनें अद्यापि कोणीं प्रयत्नच केले नाहींत. हा बहुजनसमाज शेतकरी पेशाचा व ग्रामवासी आहे. या बहुजनसमाजाला शिक्षण देण्याचे बेत प्रथम जरी कंपनीच्या अधिकाऱ्यांनीं कांहीं केले, तरी या अफाट समाजाकडे पाहून, पैशासाठीं हिंदुस्थानांत आलेल्या कंपनीच्या सूत्रधारांनीं आपला हात आखडता घेतला व पुढारलेल्या वरिष्ठ वर्गांचीच तरफदारी करण्यांत येऊं लागली. बंगालमध्यें होल्ट मॅकेंझी, मद्रासमध्यें लॉर्ड एल्फिन्स्टन व मुंबईमध्यें सर पेरी या अधिकाऱ्यांनीं बहुजनसमाजाच्या शिक्षणाला स्पष्टपणें विरोध केला. बहुजनसमाजाला साक्षर करण्याची जबाबदारी सफाईनें अंगाबाहेर टाकतां यावी, म्हणून झिरपणीच्या (Filtration) तत्त्वाची मॅकेंझी, मेकॉले यांनीं टिमकी वाजविली !

मॅकेंझी, मेकॉले यांचें धोरण, या नाहीं त्या सबबीच्या नांवावर अद्यापही चालविण्यांत येत आहे. एकंदर मुत्सद्दीपणाच्या व राज्यकारभाराच्या बाबतींत संस्थानिक म्हणजे अगदीं 'टाकाऊ' ठरविले असतांही बडोदा, कोचीन, त्रावणकोर या संस्थानांच्या अधिपतींनीं शिक्षणप्रसाराचे कामीं ब्रिटिश प्रांतांना लाजविलें आहे, यांत शंका नाहीं ! बहुजनसमाजाच्या शिक्षणाचा प्रश्न सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न इंग्रज अधिकारी किंवा पुढारलेल्या वर्गाचे स्थानिक पुढारी या दोघांनाच करतां येणें शक्य होतें. कारण, या दोघांनाच शिक्षणाचें महत्त्व पटलेलें होतें व बहुजनसमाजाला शिक्षणामृत पाजण्याचें साधनसाहित्य थोड्याफार प्रमाणांत या दोंघांजवळच होतें व आहे.

या दोन वर्गांपैकीं परकीय लोक बहुजन समाजाला साक्षर करतील अशी अपेक्षा करणें चुकीचेंच आहे. गुलामगिरींतील देशाचा बहुजनसमाज साक्षर

झाला कीं त्याला आपल्या स्वातंत्र्याच्या जन्मसिद्ध हक्काची जाणीव होऊन, तो आपल्या पारतंत्र्याच्या शृंखला ताडकन तोडल्यावाचून राहात नाहीं, अशी इतिहासाची ग्वाही आहे. बहुजनसमाजाला हालवून जागें केल्यावर आपलें कसें होईल या विचारानेंच परकीय राज्यकर्त्यांनीं त्या वर्गाच्या शिक्षणाकडे जाणून बुजून कानाडोळा केला. स्वातंत्र्याचे मोठे उपासक म्हणविणाऱ्या इंग्लंड देशांत १८७० सालीं सक्तीच्या शिक्षणाची अंमल बजावणी होते; १८८० सालीं एक पाऊल पुढें जाऊन त्या तत्त्वाची अधिक कडक अंमल-बजावणी करण्यांत येते,—परंतु, 'तेंच तत्त्व हिंदुस्थानांत लागू करा' म्हणून १८८२ सालीं हंटर-कमिशनपुढें महात्मा फुले यांनीं, व सक्तीचें तत्त्व इतर देशांत यशस्वी झाल्याचें दिसून आल्यानंतर १९१०-१२ सालीं ना. गोखल्यांनीं कळवळून मागणी केली असतांही ऐच्छिक तत्त्वावर शिक्षण-प्रसार करण्याची, इतर कोणत्याही स्वतंत्र देशांत ऐकूं न आलेली भाषा बोलण्यांत येते, याचा अर्थ काय? इंग्रजांसारख्या कल्पक व चिकाटीच्या राज्यकर्त्यांनीं मनांत आणलें असतें तर हिंदुस्थानांतील बहुजनसमाज मागेंच जपानी लोकांप्रमाणें साक्षर झाला असता; परंतु मग १९३७ सालापर्यंत 'बहुजनसमाज अडाणी आहे, त्याच्या हिताची जबाबदारी आमच्यावर आहे,' अशा ऐसपैस सबबीवर स्वातंत्र्याचे हक्क देण्याचें लांबणीवर कसें टाकतां आलें असतें? पिंजऱ्यांत पकडलेल्या सिंहाला पिंजऱ्याचे गज तोड-ण्याचें सामर्थ्य येईल असा पौष्टिक खुराक देण्याचा आत्मघातकीपणा, त्याच्या जिवावर पोट भरणारा कोणता सर्कसवाला करील?†

† "The enlightened Public, apathatic or definitely unprogressive upto the '80', has found since then the admittedly deplorable statistics a useful stick with which to beat the Government. And the Government, in so far as many years back it originated and defended the filtration theory, must be held to deserve the beating. For by so doing it encouraged the separation of mass from class, town from country, western from eastern modes of thought and life, to which India, left to herself has been, always prone. It established the idea, that education is a luxury, an investment perhaps also for the thrifty, but an investment in which

(पुढील पानावर पहा)

परकीय सत्ताधीशांकडून नसली तरी सुशिक्षित पुढारलेल्या वर्गांकडून बहुः जनसमाजाला साक्षर करण्याची अपेक्षा करणें वावगें होणार नाहीं; परंतु मॅकेंझी, मेकॉले यांनीं केलेली ही अपेक्षाही फोल ठरली! झिरपणीच्या तत्त्वाचा... कां बोजवारा उडाला व वरिष्ठ वर्गांच्या माथ्यावर शिक्षणाचा मुसळधार पाऊस पडला असतांही, या पावसाचा अल्पांशही झिरपून खालच्या थराकडे कां गेला नाहीं, हें पाहाणें अगत्याचें आहे.

वरिष्ठ जातींमध्यें जो शिक्षणाचा फैलाव आपणांस दिसतो, त्याचें श्रेय सर्वस्वीं इंग्रज अधिकाऱ्यांना देणें बरोबर होणार नाहीं. ब्रिटिश सत्तेचा उदय होण्यापूर्वीं हजारों वर्षें हिंदुस्थानांतील कांहीं जातींतील पुरुषवर्ग, पौर्वात्य विद्येंत पारंगत होताच. आमच्याकडील 'टोल,' 'पाठशाळा', 'परिषदा' मधून पुढारलेल्या ब्राह्मण जातीचे लोक शिक्षण घेत होते, हें आपण मागें पाहिलें आहेच. ब्रिटिश प्रयत्नानें फक्त शिक्षणाचें स्वरूप बदललें. प्राच्य विद्येच्या ऐवजीं पाश्चिमात्य विद्या आली हा एवढाच फरक झाला. बाराबंदीच्या ऐवजीं कोट आला व पागोट्याच्या ऐवजीं साहेबी टोपी आली; परंतु हजारों वर्षें वर्णभेदामुळें शिक्षणास मुकलेला बहुजनसमाज पूर्वींप्रमाणेंच निर्विद्य राहिला. एका प्रकारचे कपडे घालणाराला दुसरे अधिक चांगले कपडे मिळाले; परंतु पूर्वींपासून कपड्यावांचून नागडे-उघडे हिंडणारे बहुजनसमाजांतील वर्ग ब्रिटिश आमदानीच्या दीड शतकानंतरही तसेच उघडे बोडके राहिले!

पुढारलेल्या सुशिक्षित जातींनीं किंवा वर्गांनीं या अज्ञानाच्या थंडी-वाऱ्यांत, शिक्षणाच्या कुडत्यावांचून कुडकुडत हिंडणाऱ्या लोकांना आपलें एकादें जुनेरही कां दिलें नाहीं याचा विचार करतांना, पुढारलेल्या सुशिक्षित वर्गांतील लोकांचे आपणांस दोन पोटवर्ग करतां येतील. एक सुशिक्षित कर्मठ लोकांचा व दुसरा बिगरकर्मठांचा, पण स्वतःच्या हितासाठीं धडपडणाऱ्या लोकांचा.

(मागील पानावरून चालू)

priviliged classes will receive most assistance from the state. It obscured the truth that the 'education of the peoples of India' means nothing if it does not mean the cultural instinct and the raising of the material level of all classes of those people."

Mayhew. p. 95.

कर्मठमताचा सुशिक्षित मनुष्य अजूनही पूर्वीच्या काळच्या चातुर्वर्ण्यात्मक समाजरचनेचा पुरस्कार करतो व त्यामुळें बहुजनसमाज या सदराखालीं पडणाऱ्या, 'शूद्रांनी शिक्षण घेणें म्हणजे धर्मावर घाला घालणें' असें त्या कर्मठ मताच्या सुशिक्षित मनुष्यास आजही वाटतें. या वर्गांतील एकादा मनुष्य पोटासाठीं शिक्षकाच्या धंद्यांत पडल्यानंतरहि तो खेडेगांवांतील इतर वर्गियांना शिक्षण घेण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो व त्यांच्या शिक्षणाकडे जाणून बुजून कानाडोळा करतो.

स्वत:च्या हितासाठीं खपणाऱ्या वरीष्ठ वर्गीय सुशिक्षितांना देशाच्या कल्याणापेक्षां स्वत:चें कल्याण फार जिव्हाळ्याचें व निकडीचें वाटतें. या वर्गांत कांहीं नोकरीवाले आहेत. त्यांना 'इतर वर्गांचे लोक शिकले तर आपल्या हातीं असलेल्या नोकऱ्यांचा वांटा मागतील,' अशी नेहमीं भीति वाटते. कांहीं लोक सावकार आहेत त्यांना, बहुजन समाजाच्या अडाणीपणामुळें त्याला वाटेल तसें लुबाडतां येतें. तेच लोक साक्षर झाले, कीं या अशा सावकारीला पायबंद बसून आपलें नुकसान होईल असें त्यांना वाटतें. 'देश जाणें व त्याचें स्वातंत्र्य जाणें; आपला स्वत:चा धंदा चांगला चालल्यानंतर देशाचें कांहीं झालें तरी हरकत नाहीं,' या विचारसरणीचा हा वर्ग आहे. यामुळें हा वर्ग बहुजनसमाज साक्षर होण्याच्या विरुद्ध आहे. तसा त्यानें उघड विरोध बोलून दाखविला नाहीं, तरी त्याच्या प्रयत्नांचा रोखमात्र तसाच असतो.

परदेशांतून आलेल्या पाहुण्याप्रमाणें या कांहीं देशांतील लोकांनाही बहुजन समाजाच्या अडाणीपणावर आपली चैन चालवावयाची आहे. देशाला नाडण्याचे कामीं परकीयांना मदत करतांना आपलाही शक्य तो फायदा कां करून घेऊं नये ? दोन दिवस सरकारी कामासाठीं आलेल्या रावसाहेब मामलेदारांचें तट्टू, स्वत:च्या शेताची राखण करण्यास असमर्थ असलेल्या आंधळ्याच्या शेतांत चरतांना पाहून, गांवच्या पाटलानेंहि आपली गाय त्यांत नेऊन कां सोडूं नये?

झालें तें गेलें ! यापुढें तरी पुढारलेल्या वर्गांतील, अशा पायापुरतें पाहणाऱ्या लोकांनीं, देशाच्या हितासाठीं, गुलामगिरीच्या साखळ्या तोडण्यासाठीं, बहुजन समाजाला साक्षर करण्यासाठीं श्रमाचा व पैशाचा पुरवठा करणें जरूर आहे. देशाच्या उपयोगासाठीं सोन्याचीं अंडीं घालणाऱ्या बहुजनसमाजरूपी

कोंबडचिे, आपल्या स्वतःच्या कुटुंबासाठीं, कबाब बनाविण्याची स्वार्थी इच्छा त्यांनीं सोडून द्यावी !

(२) बहुजन समाजाच्या शिक्षणाची जी थोडी सोय करण्यांत आली व ज्या कांहीं अल्प प्रमाणावर सवलती देण्यांत आल्या, त्यांचाही फायदा बहुजन समाजाला मिळाला नाहीं, घेतां आला नाहीं. असें होण्याचीं अनेक कारणें झालीं.

इतर वर्गांना शिक्षणाची जरूरी नाहीं, या प्राचीन काळच्या विषारी धार्मिक कल्पनांचा अंमल अद्यापही बहुजनसमाजाच्या मनावरून उतरलेला नाहीं. अजूनही 'शिकणें बामणाचें काम आहे' असा मंत्र आमचा शेतकरी वर्ग घोकीत आहेच.* फार दिवसांची संवय झाल्यानंतर कैद्यालाही बेडीची अडचण वाटत नाहीं; उलट ती नसली तर त्याला चुकल्यासारखें वाटतें ! अमेरिकेंत गुलामगिरीच्या पद्धतीचा अंत करण्यांत आला, त्यावेळीं अनेक गुलामांना स्वातंत्र्य देण्यांत आलें. गुलामगिरी ज्यांच्या आंगीं पूर्णपणें भिनली होती, अशा गुलामांना मुक्त होतांना दुःखानें भडभडून आलें ! आजही हरिजनांपैकीं एकाद्या माणसाला आपल्या बैठकीवर चावडीवर बोलाविलें तर 'नग, नग,' म्हणून तोही मागें सरूं लागतो. चावडीवर मांडी घालून बसणें हें स्पृश्यांचें काम असून, लांब अंतरावर उन्हांत उभें राहाणें हें आपलें काम आहे असें त्यास वाटतें. पूर्वीचे काळीं 'शिकणें हें आमचें काम आहे, तुमचें नाहीं' अशी दरडावून सोडलेल्या फर्मानाची जरब मनावर बसल्यामुळें आजहि बहुजन समाजांतील मनुष्य 'आम्हांला शिकून काय करावयाचें' असें म्हणून पोराला शाळेंत धाडण्याऐवजीं गुरांमागें पाठवितो.

ही धर्मानें उत्पन्न केलेली समजूत आमच्या शिक्षण-प्रसाराच्या कामीं आडवी येत आहे. त्याचप्रमाणें दारिद्र्यहीपण एक अडचण आहेच. इतरही अनेक अडचणी आहेत. त्यामुळें मिळालेल्या सोयीसवलतीचा फायदाही आमच्या बहुजनसमाजाला आपल्या पदरांत पाडून घेतां येत नाहीं.

या झाल्या सर्वसाधारण अडचणी. स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतींत या सामान्य अडचणींच्या बरोबर कांहीं विशेष अडचणीही आहेत. या विशेष अडचणींपैकीं पालकांचा कर्मठपणा ही एक मोठी अडचण आहे. एका काळीं सुशिक्षित व पुढारलेल्या वर्गांतील लोकही आपल्या मुलींस शिक्षण देण्याच्या

* गांवगाडा पा. २३५-३६

विरुद्ध होते, याचा मागें उल्लेख केला आहेच. सुशिक्षित वर्गांतील स्त्रीशिक्षण-विरोधी कर्मठपणा आतां नाहींसा झाल्यामुळें तो शहरांतून हद्दपार होऊन होऊन आतां फक्त खेड्यांत दबा धरून बसला आहे. मुलांना शाळेंत पाठविण्यास तयार होणारा पालक मुलींना शाळेंत पाठविण्यास नाखुष असतो. 'मुलींना शिकवून तिला काय नोकरी करावयाची आहे?' असे प्रश्नही अनेक ठिकाणीं विचारण्यांत येतात.

दुसरी अडचण पडद्याची. विशेषतः मुसलमान, मराठे वगैरे मंडळींत पडद्याची किंवा गोषाची चाल असल्यामुळें, हे वर्ग स्त्रियांच्या शिक्षणाला प्रतिकूलता दाखवितात. तुर्कस्तानांत मुसलमानांचें राज्य आहे व तेथें पडद्याच्या पद्धतीचें उच्चाटन केलें असतांही एथील मुसलमान समाज मात्र या अमानुष चालीला कां चिकटून बसला आहे, हें एक कोडेंच आहे! मराठा वगैरे मंडळींतील गोषाही ह्या पडद्याचें धाकटें भावंडच आहे. मराठा मंडळींनीं वेळींच सावध होऊन या चालीला पायबंद घालून आपल्या मुलींना शिकविलें नाहीं, तर अस्पृश्यादि सर्व समाज शिकून पुढें गेल्यानंतर आपले हाल कुत्राही खाणार नाहीं, हें लक्षांत ठेवावें. नुसत्या शिवाजी, तानाजीच्या नांवावर मिशांना पिळ भरीत गांवांतून हिंडण्याचे दिवस गेले आहेत, हें या वर्गानें विसरूं नये.

तिसरी अडचण म्हणजे बालविवाहाची. या बाबतींत सरकारनें शारदा-कायदा या नांवाचा कायदा केला आहे परंतु त्याचें पदोपदीं उल्लंघन होत आहे.

बालविवाहाची ही चाल अनेक जातींत आहे. १९३१ च्या खानेसुमारीच्या रिपोर्टांत १५ वर्षें वयाच्या आंतील विवाहित स्त्रीपुरुषांची संख्या निरनिराळ्या वर्गांत किती आहे, हें दाखविणारे आंकडे दिले आहेत. त्यांपैकीं कांहीं महत्वाचे आकडे पान १७१ तक्ता नं. १५ वर उद्धृत केले आहेत—*

* Census Rept (1931) P. 222.

तक्ता नं० १५

वर्ग	एक हजार विवाहित लोकांतील १५ वर्षांचे आंतील संख्या	
	पुरुष	स्त्रिया
हिंदु	७३०१	१६४०१
जैन	३२०५	१०८०३
मुसलमान	५९०४	१७४०३
शीख	२६०२	७४०६
खिस्ती	१५०४	४३०३

तक्ता नं० १६

जात	एक हजार स्त्रियांत ६ वर्षांचे आंतील विवाहित किंवा विधवा स्त्रिया
तंटी (Tanti)	२५०१
कुणबी	२७०५
मराठा	१५०७
यादव	१२०६
महार	११०९
कोमटी	११०६
चांभार	१००३
तेली	९०१
मोमीन	९०१
दर्जी	८०९
धोबी	८०६
लिंगायत	७०३
कुंभार	७०१
ब्राह्मण	३०५

हिंदूंमध्यें निरनिराळ्या जातींतीतही बालविवाहाचें निरनिराळें प्रमाण आहे; हें पान १७१ तक्ता नं. १६ च्या आंकडयांवरून दिसून येईल. §

यावरून विशेषतः खेडयांत राहाणाऱ्या समाजांत, बालविवाहाची चाल किती जास्त प्रमाणांत रूढ आहे, हें दिसून येईल. या बालविवाहाच्या चालीमुळें इतर अनेक प्रकारच्या तोट्याप्रमाणें शिक्षणाचे प्रगतीचे कामीं अडथळे उत्पन्न होत आहेत, हा एक मोठा तोटा आहे. ही अडचण नाहींशी करण्यासाठीं शारदाकायद्याची कडक अंमलबजावणी होणें अत्यंत जरूर आहे, व त्यासाठीं बालविवाहाबद्दल पोलिसांनाही खटले करतां येतील, असें कॉग्निझेबल गुन्ह्याचें स्वरूप देण्यांत यावें.

ज्या जातीमध्यें शिक्षणाचा प्रसार जास्त झाला आहे व ज्या जातींतील स्त्रिया इतर जातींतील पुरुषांपेक्षां अधिक प्रमाणांत शिकल्यामुळें बालविवाह जवळ जवळ पूर्ण नाहींसा झाला आहे, अशा जातींतील कांहीं पुढारी कर्मठपणाच्या नांवावर शारदाकायद्याविरुद्ध चळवळ करीत आहेत! ही चळवळ प्रामाणिकपणाची आहे असें मानिलें, तरी या चळवळीमुळें इतर मागासलेल्या वर्गांचीच हानि होणार आहे. तरी निदान मागासलेल्या जातींचा स्पष्ट निर्देश करून त्यांच्या बाबतींत शारदा कायद्याची अधिक कसोशीनें अंमलबजावणी होईल अशी कायद्यांत दुरुस्ती करावी म्हणजे या जातींचें शैक्षणिक, आर्थिक व शारीरिक कल्याण केल्याचें पुण्य पदरीं पडेल आणि एकंदर देशाच्या उद्धारास अधिक जोराची चालना मिळेल.

बहुजनसमाजांत शिक्षणाचा प्रसार किती झाला आहे, याची पाहाणी केली, व शिक्षण प्रसाराच्या मार्गांतील अडचणी काय आहेत हेंही पाहिलें. या सर्व शोचनीय परिस्थितीवर सक्तीच्या व मोफत शिक्षणाशिवाय दुसरें औषध नाहीं! तरी त्याचा पुढील प्रकरणांत विचार करूं.

---

§ Census Rept, (1931) P. 225.

प्रकरण सहावें

सक्तीचें व मोफत शिक्षण

Now the only way that the world has discovered to secure universal education in a country has been by making it compulsory and free. This is the only method that the world has found to be successful and so far there is no other method in the field.

—G. K. Gokhale, Speeches P. 388.

I think that this question of compulsory and free primary education is now in this country the question of questions. The well-being of millions upon millions of children who are waiting to be brought under the humanising influence of education depends upon it. The increased effeciency of the individual, the higher general level of intelligence, the stiffening of the moral back bone of large sections of the community, none of these things can come without sueh education. In fact, the whole of our future as a nation inextricably bound up with it.

—G. K. Gokhale, Speeches P. 604.

देशांतील प्रत्येक मनुष्य सुशिक्षित-साक्षर-होणें अत्यंत जरूर आहे. प्रत्येक निरक्षर-अशिक्षित-मनुष्य म्हणजे देशाच्या प्रगतिपथावरील धोंड आहे. आमच्या देशांतील बहुजन समाज अशिक्षित असल्यामुळें आमच्या पुढील रस्ता खाच-खळग्यांनीं व ओबडधोबड दगडगोट्यांनीं पूर्णपणें भरून गेलेला आहे. या रस्त्यावरून चालतांना, हरघडी खळग्यांत बेसावधपणें पाय पडून मुरगळण्याची किंवा ठेचाळून पडण्याची भीति सतत पुढें उभी असते. ज्या देशांतील सर्व लोक शिकलेले आहेत तो देश सुगंधानें दरवळलेल्या, नयनमनोहर फुलांनीं बहारलेल्या व पौष्टिक फळांनीं लवलेल्या बागेसारखा असून, निरक्षर लोकांनीं गजबजलेला देश म्हणजे कांट्याकुट्यांनीं भरलेल्या, श्वापदांच्या आरोळ्यांनीं कर्कशलेल्या व रानटी झाडांझुडपांनीं निबिडलेल्या घनघोर जंगलासारखा आहे.

बहुजनसमाजाच्या साक्षरतेनें व्यक्तीच्या सुधारणेला व देशाच्या राजकारणाला उत्कृष्ट मदत होते.

शिक्षण व व्यक्तिसुधारणा:—आमच्या हल्लींच्या बहुजनसमाजांतील निरक्षर मनुष्याकडे पाहिलें, तर तो मनुष्य नसून एक जंगली जनावर आहे, असें कांहीं लोकांना वाटूं लागतें. त्याला स्वच्छतेची कल्पना नसते, तो कोठेंहि घाण करावयास कचरत नाहीं, त्याला कोणीहि फसवूं शकतो, गोफण हातीं धरतां न आल्यामुळें, थोट्या माणसाच्या शेतांतील कणसांवर ज्याप्रमाणें चिवळ नांवाच्या पांखरांचा थवाचाथवा जमून तो शेत पार खाऊन फन्ना करतो, त्याचप्रमाणें निरक्षर माणसाचे वित्तावर सावकार–भिकार, दलाल–कलाल तुटून पडून त्याला धुवून मोकळे करतात.

त्याच माणसाला शिक्षण दिलें तर एकदम चमत्कार झाल्यासारखें त्याचें रूप पालटतें. तो स्वतः स्वच्छतेनें राहून आपल्या मुलांमाणसांना व घराला स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करतो; त्याला स्वतःचें नफानुकसान समजूं लागतें; तो स्वतः हिशेबी बनतो.

मनुष्य शिकल्यानें त्याची कार्यक्षमता वाढून, त्याची अर्थोत्पादनाची शक्ति वाढते. शिकलेला मनुष्य शेतकरी असला, तर तो चांगला शेतकरी बनतो. शेतकरी मनुष्य सुतारकी, लोहारकी चांगली करतो. साक्षर मनुष्य मजुरीहि चांगली करतो. मनगटाला मेंदूची जोड मिळाली, तर कोणतेंहि कष्टाचें काम कमी श्रमांत अधिक चांगल्याप्रकारें करतां येतें. इंग्लंडमध्यें जी उद्योगधंद्यांची वाढ झाली ती प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारामुळेंच. त्यावेळीं प्राथमिक शिक्षण घेतलेला मनुष्य निरक्षर मनुष्यापेक्षां अधिक व चांगलें काम करतो, असा अनुभव आल्यामुळें प्राथमिक शिक्षणाला जोराचा पाठिंबा मिळाला. प्राथमिक शिक्षणाचा जोराचा प्रसार होतांच उद्योगधंद्यांना ऊर्जितावस्था येऊं लागली. त्यामुळें भरपूर फायदा होऊन मालकांप्रमाणें मजुरांचीहि आर्थिक स्थिति सुधारली; त्यांचें जीवन अधिक सुखांत जाऊं लागलें व त्याचा परिणाम देशाचे प्रगतींत झाला.

आपल्या देशांतील गिरण्यांतही साक्षर मजूर निरक्षर मजुरापेक्षां अधिक व जास्त सफाईदार काम करतो, असा अनुभव आहे. जपानमध्येंहि लोक शिकल्यामुळेंच, त्या ठिकाणीं तयार होणारा माल कमी खर्चांत अधिक चांगला होतो व त्यामुळें तो जगाच्या बाजारपेठेंत स्वस्त विकतां येतो.

शिक्षणामुळें मनुष्याची राहाणी आरोग्यदृष्ट्या सुधारते व त्याची कार्यक्षमता वाढल्यानें कमी श्रमांत अधिक द्रव्य संपादन करून तो आपली आर्थिक स्थिति सुधारूं शकतो. या दोन फायद्यांप्रमाणें त्याची नीतिमत्ताहि सुधारते यांत शंका नाहीं. शिकलेला मनुष्य मुलीचे पैसे घेऊन, तिला वाटेल त्याच्या गळ्यांत बांधण्यास तयार होणार नाहीं. तो बालविवाहाचे तोटे ओळखून, खुळ्या कल्पनेला बळी पडणाऱ्या निरक्षर माणसाप्रमाणें मुलीची बालवयांत 'हाडें भाजणार' नाहीं. तो शक्यतों मादक द्रव्याला हात लावणार नाहीं. अधिक परिणामकारक व खरी मद्यपानबंदी सक्तीपेक्षां शिक्षणानेंच लवकर होईल. शिक्षणाच्या प्रसारामुळें, व्यसनांप्रमाणें गुन्ह्यांचें प्रमाणहि कमी कमी होत जातें. शाळा उघडल्यानें गुत्ते व कैदखाने यांतील गर्दी कमी कमी होत जाते. गुन्ह्यांची संख्या कमी झाली कीं, सरकारचा कोर्टासाठीं, कैदखान्यासाठीं होणारा खर्च कमी होऊन, लोकांवरील करांचा बोजा कमी होतो, किंवा राष्ट्रपोषक व सुखसंवर्धक बाबींवर खर्च करण्यास अधिक पैसा मिळून, प्रत्येक व्यक्तीच्या सुधारणेस अधिक मदत मिळते.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे शिक्षणानें मनुष्य आरोग्यदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या व नैतिकदृष्ट्या सुधारतो. त्याचें जीवन अधिक सुखांत जातें. त्याचा संसार अधिक सुखमय होतो. नाना आपत्तींनीं गांजलेला व शिक्षणाचे अभावीं त्यांना तोंड देण्यास असमर्थ ठरल्यामुळें गांगरलेला निरक्षर मनुष्य, जगाकडे व जीवनाकडे हताश नजरेनें पाहात असतो. परंतु शिक्षणाची वल्ली मिळालेला मनुष्य आरोग्याच्या उल्हासानें, आत्मविश्वासाच्या आल्हादानें, सुखप्राप्तीच्या आनंदानें, आशेनें भरलेल्या डोळ्यांनीं जगाकडे पाहूं लागतो. जगाकडे बघावयाच्या ह्या भिन्न दृष्टिकोणांत जमीनअस्मानाची तफावत आहे.

व्यक्तीची याप्रमाणें सर्वांगीण सुधारणा झाली कीं, त्याचा फायदा होतो. प्रत्येक दुवा कणखर झाल्यानंतर सांखळीहि अधिक बळकट बनते.

शिक्षण व राजकारण:—व्यक्तीचें खाजगी जीवन अधिक चांगलें करण्याच्या दृष्टीनें, त्यास साक्षर करण्याची आवश्यकता किती आहे, हें आपण पाहिलें; आतां आमच्या राजकारणाच्या दृष्टीनेंहि प्रत्येक मनुष्य साक्षर असणें कसें जरूर आहे तें पाहूं. पूर्वीच्या काळीं बहुजनसमाज निरक्षर व अजागृत असा होता व त्यामुळेंच आमच्या स्वातंत्र्याचा लोप होऊन आम्ही गुलामगिरींत सांपडलों, हें मागें सांगितलें आहेच. आतां वर्तमानकाळाच्या व

भविष्यकाळाच्या दृष्टीनें विचार केल्यानंतर बहुजनसमाजाला साक्षर केल्या-वांचून आमचा नवीन तऱ्हेचा लोकमतानुवर्ति राज्यपद्धतीचा गाडा नीट चालणार नाहीं, हें विचारी माणसाला ताबडतोब पटतें.

पाश्चिमात्य देशांत प्रजासत्ताक राज्यपद्धति विशेष यशस्वी होण्याचें कारण, तेथील शिक्षणाचा प्रसार हेंच होय. लोकसत्ताकराज्यपद्धति यशस्वी होण्या-साठीं देशांतील प्रत्येक मनुष्याला स्वत:च्या हक्काची, नागरिक या नात्यानें जबाबदारीची, जाणीव असणें जरूर आहे. प्रत्येक मतदारानें आपलें मतदान विचार करून दिलें, तर चांगले लोक कायदेमंडळांत निवडून जातील व चांगले लोक निवडून गेले तर देशाचा कारभार चांगला होऊन, 'राज्य-लोकासाठीं आहे,' हें तत्त्व प्रत्यक्ष व्यवहारांत उतरूं शकेल. म्हणजे लोक-सत्ताक राज्यपद्धतीचें यश मतदारांच्या वैयक्तिक लायकीवर, विचारक्षमतेवर अवलंबून आहे. म्हणूनच मतदार चांगला होण्यासाठीं व त्याला मिळालेल्या हक्काचा चांगला उपयोग होण्यासाठीं, त्याला साक्षर करणें जरूर आहे. अमेरिकेंतहि प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा उदय झाल्यानंतर व मत-दानाचा हक्क, श्रीमंताप्रमाणें गरिबाला, मालकाप्रमाणें मजुराला, किंबहुना देशांतील सर्व वर्गांच्या लोकांना देण्यांत आल्यानंतर, त्या प्रत्येक मतदाराला योग्य तऱ्हेचें शिक्षण देण्याची आत्यंतिक आवश्यकता तेथील विचारी पुरु-षांच्या लक्षांत आली,† व त्या दृष्टीनें त्यांनीं जोराचे प्रयत्न करण्यास सुरवात केली. १८२५ सालीं 'इलिआनीस (Iliionis) संस्थानच्या पहिल्या शिक्षण विषयक कायद्याच्या प्रास्ताविक भागाचा उतारा खालीं दिला आहे.

"To enjoy our rights and eiberties, we must understand them ; their security and protection ought to be the first object of a free people ; and it is a well established fact that no nation has ever continued long in the enjoyment of civil and political freedom, which was not both virtuous and enlightened ; and be-lieving that the advancement of literature has always been and ever will be the means of developing more fully the rights of man, that the mind of every citizen in a republic is the common pro-perty of society and constitutes the basis of its strength and happine:s, it is therefore considered the peculiar duty of a free

† Cubberley. P. III.

government, like ours, to encourage and extent the improvement and cultivation of the intellectual energies of the whole."

त्याचप्रमाणें नऊ वर्षें न्यूयार्कचे गव्हर्नर असलेले 'डी वुइट क्लिंटन' (De Witt Clinton) यांनीं १८२६ सालीं कायदेमंडळास पाठविलेल्या संदेशांत खालील महत्त्वाचे विचार प्रकट केले आहेत.

"The first duty of government and the surest evidence of a good government, is the encouragement of education. A general diffusion of knowledge is a precursor and protector of republican institutions, and in it we must confide as the conservative power that will watch over liberties and guard them against fraud, intrigue, corruption, and violence. I consider the system of our common schools, as the palladium of our freedom, for no reasonable apprehension can be entertained of its subversion as long as the great body of the people are enlightened by education."

१८२७ सालीं पाठविलेल्या संदेशांत गव्हर्नर क्लिंटन यांनीं पुढील उद्गार काढले होते.

"The great bulwork of republican government is the cultivation of education, for the right of suffarage cannot be exercised in a salutary manner without intelligence."

गव्हर्नर क्लिंटनप्रमाणें पेन्सिल्व्हानियाच्या कायदेमंडळांत १८३४ च्या मोफत शाळांच्या कायद्याच्या (Free School Law of 1834) चर्चेच्या वेळीं थेडियस स्टेव्हेन्स या अमेरिकन पुढाऱ्यानें पुढील उद्गार काढले.

"If an elective republic is to endure for any length of time, every elector must have sufficient information not only to accumulate wealth and take care of his pecuniary concerns, but to direct wisely the legislature, the ambassadors, and the Executive of the nation—for some part of all these things, some agency in approving or disproving of them, falls to every freeman. If then the permanency of our Government depends upon such knowledge, it is the duty of Government to see that the means of information

be diffused to every citizen. This is sufficient answer to those who deem education a private and not a public duty."

डॅनिअर वेब्स्टर या नांवाच्या दुसऱ्या एका अमेरिकन पुढाऱ्यानें १८३७ मध्यें पुढील विचार व्यक्त केले.

"Education, to accomplish the ends of good government, should be universally diffused. Open the doors of the school-houses to all the children in the land. Let no man have the excuse of poverty for not educating his offspring. Place the means of education within his reach...on the diffusion of education among the people rests the preservation and perpetuation of our free institutions."

पाश्चिमात्य देशांत प्रजासत्ताक राज्यपद्धति जरी होती, तरी त्या देशांतून अनेक जाती, अनेक धर्म नसल्यामुळें तेथील राज्यकारभाराचीं सूत्रें हातीं असलेल्या पुढाऱ्यांचें कार्य सुलभ होतें. आपल्या देशांत अनेक जातींमुळें व अनेक धर्मामुळें राज्ययंत्र चालविणें अतिशय अवघड झालें आहे. परंतु राजकारणांतील ही गुंतागुंतहि शिक्षणप्रसारामुळें कमी होईल यांत कांहीं शंका नाहीं.

आज निरनिराळ्या धर्मांचे लोक एकमेकांशीं झगडत आहेत व एकमेकांचे रक्तांत हात माखून हिंडत आहेत. या धर्मांच्या झगडयांचें सूक्ष्म निरीक्षण केलें, तर झगडणाऱ्या प्रत्येक धर्मांतील बहुजनसमाज हा निरक्षर असून स्वार्थसाधु पुढारी आपापल्या निरक्षर अनुयायांना वाटेल त्या खोट्या गोष्टी सांगून परधर्मीयांचे विरुद्ध चेतवीत आहेत, असें दिसून येईल. देशांत धार्मिक लढे असल्यावांचून आपलें पुढारीपण टिकणार नाहीं, आपणांस महत्त्व प्राप्त होणार नाहीं, ह्या आपमतलबी बुद्धीनेंच अनेक दंगे घडवून आणलेले दिसून येतात. या पुढाऱ्यांच्या अशा कृष्णकारस्थानाला आळा घालावयाचा असेल, तर त्यांच्या अनुयायांना साक्षर करा. आपले पुढारी थापा मारतात, असें दिसून आलें म्हणजे त्यांच्या चिथावणीनें परधर्मीय गोरगरिबांवर हल्ला चढविणारे हे लोक, आपल्या थापेबाज स्वार्थी पुढाऱ्यांचीच उचलबांगडी करून तंट्याचें विषारी मूळच नाहींसें करतील. शिकलेला हिंदु व शिकलेला मुसलमान एकमेकांवर सुरे उपसून गेल्याचें कोणी पाहिलें आहे का ?

हिंदुधर्मांतील अनेक जातींमधील आज दिसणारे लढेहि शिक्षणाच्या प्रसारानेंच नाहींसे होतील. बौद्धिकदृष्ट्या सर्व जाती समान दर्जाच्या झाल्यानंतर

दुसऱ्या जातीच्या भावडेपणाचा व अडाणीपणाचा अन्याय्य फायदा घेण्याचा प्रश्नच उद्भवूं शकणार नाहीं व मग जातीय भावना नाहींशी होऊन आर्थिक भेदावरच पक्षरचना व्हावयास सुरवात होईल. युरोपच्या राजकारणाकडे पाहिल्यानंतर ज्या राष्ट्रांची युद्धसामुग्रीची चांगलीच सिद्धता आहे अशीं राष्ट्रेंच एकमेकांशीं सलोख्यानें व ममतेनें वागूं लागतात. शिक्षणाचें शस्त्र सर्वांच्याच हातांत असल्यानंतर सुशिक्षित जाती अशिक्षित जातींना नाडतील, अशी आज अनुभवानें वाटणारी भीति नाहींशी होऊन, मग समाजाचें अधिक टिकाऊ अशा आर्थिक पायावर संघटन होऊं लागेल.

कोणत्याही दृष्टीनें विचार केला तरी बहुजनसमाजाला साक्षर करण्याचें महत्त्व मनाला पटल्यावांचून राहात नाहीं. आमच्या धार्मिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय अशा सर्व प्रकारच्या रोगांवर शिक्षण हेंच एक रामबाण औषध आहे. या औषधानें प्रत्येक व्यक्तीचा फायदा होईल. व्यक्तीच्या फायद्यानें समाजाचें हित होईल. समाजाचें हित झाल्यानें राष्ट्र अधिक तेजस्वी व बलवान झाल्यावांचून राहाणार नाहीं. राष्ट्र तेजस्वी व बलसंपन्न झाल्यानंतर त्याला पारतंत्र्यांत कोण ठेवूं शकेल ?

शिक्षण ऐच्छिक का सक्तीचें ?— बहुजनसमाजाला शिक्षण देण्याची जरूरी सर्वांनाच पटलेली आहे; परंतु तें कोणत्या मार्गानें द्यावयाचें, याच बाबतींत थोडाफार मतभेद दिसून येतो. कांहीं लोकांचें मत असें आहे कीं, "शिक्षण हें ऐच्छिक तत्त्वावरच द्यावें, लोकांना शिक्षणाचें महत्त्व पटवून, ते शिक्षण घेण्यास उत्सुक होतील असा प्रयत्न करावा. शिक्षण घेण्यासाठीं आवश्यक असलेल्या सर्व साधनांचा, सर्व जातींना व वर्गांना सहज प्राप्त होईल असा पुरवठा प्रथम करणें जरूर असून, ही अट पुरी होईपर्यंत सक्तीच्या तत्त्वाचा विचारहि करूं नये. याप्रमाणें शैक्षणिक साधनांचा पुरवठा करण्याची तरतूद करण्याच्या आधीं सक्तीचें तत्त्व लागू करणें समर्थनीय होणार नाहीं. ऐच्छिक तत्त्वावर प्रसार करण्यास जागा राहिली नाहीं, असें दिसून आलें, तरच मग सक्तीचें तत्त्व लागू करण्यांत यावें." हें मत गेल्या पिढींतील सुप्रसिद्ध विद्वान् व आंकडेशास्त्रपंडित कै० रावबहादूर जोशी* यांनीं १८९३ च्या जानेवारी महिन्यांत व्यक्त केलें. १९१०–११ सालीं

---

* जोशी १०३६

कै० नामदार गोखलें, यांनीं सक्तीच्या शिक्षणाबद्दल वरिष्ठ कायदेमंडळांत जोराची मागणी केली, त्या वेळींहि सरकारकडून अशाच स्वरूपाचें उत्तर देण्यांत आलें व अद्यापहि सक्तीच्या शिक्षणाचें तत्त्व कायद्यानें मान्य करण्यांत आलें असलें तरी मुंबई प्रांतांत बहुतेक ठिकाणीं ऐच्छिक तत्त्वावरच शिक्षण-प्रसाराचें कार्य चालू आहे.

याचे उलट " आपले देशांत शिक्षण सक्तीचें व मोफत करण्यांत यावें " अशी कांहीं लोकांची मागणी आहे. हंटर कमिशनपुढें ही मागणी प्रथम कै० महात्मा फुले यांनीं केली. त्यानंतर १९१०–११ सालीं ना० गोखले यांनीं केली. त्यानंतर १९१७ सालीं कै० विट्ठलभाई पटेल यांनीं म्युनिसिपालिटीच्या हद्दींत सक्तीचें तत्त्व लागू करतां यावें म्हणून एक कायदा पास करून घेतला. १९१९ च्या सुधारणा कायद्यानंतर १९२१ सालीं चंदावरकर कमिटी या प्रश्नाच्या विचारासाठीं नेमण्यांत आली, व दहा वर्षांत मुंबई प्रांतांत सर्वत्र सक्तीचें शिक्षण करण्याबद्दल एक योजना या कमिटीनें तयार केली. त्या योजनेप्रमाणें १९२३ चा प्राथमिक शिक्षणाचा कायदा मंजूर करण्यांत आला. त्या कायद्याच्या प्रस्तावनेंतील खालील भाग फार महत्त्वाचा आहे——

" Where as it is the declared policy of the Government that universal free and compulsory education for boys and girls should be reached by a definite programme of progressive expansion and whereas it is expedient to provide for a progressive development and expansion of primary education as to reach that goal on lines recommended by the Compulsory Education Committee of 1922 appointed by the Government."

यावरून १९२३ चा कायदा पास करण्याच्या मुळाशीं कोणता हेतु होता हें दिसून येईल.

हा कायदा पास झाल्यानंतर तत्त्वतः कै० महात्मा फुले व ना० गोखले यांच्या मागणीचा विजय झाला असें म्हणावयास हरकत नाहीं; परंतु व्यवहारतः कै० रा. ब. जोशी यांच्या मताचाच अंमल राहिला. कारण सरकारच्या आर्थिक अडचणीमुळें स्थानिक संस्थांनीं सादर केलेल्या सक्तीच्या शिक्षण-योजनेस सरकारनें मंजुरी देण्याचें नाकारलें व १९३५–३६ अखेर फक्त

दहा म्युनिसिपालिट्यांनी व दोन लोकलबोर्डांनीं अंशतः आपल्या हद्दींत हें तत्त्व लागू केल्याचें सरकारी अहवालावरून दिसून येतें.†

चंदावरकर कमिटीनें सुचविलेल्या योजनेप्रमाणें जर प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराचा कार्यक्रम अमलांत आला असता तर १० वर्षांत शाळेंत जाण्यास लायक अशा वयाच्या मुलांपैकीं शें. ८० मुलें शाळेंत जातांना आढळलीं असतीं. चंदावरकर कमिटीची योजना तशीच धूळ खात पडल्यामुळें ती योजना सुचवून १६ वर्षें लोटलीं तरी वस्तुतः सक्तीचें तत्त्व अमलांत आलें नाहीं !

'ऐच्छिक तत्त्वावर शिक्षणाचा प्रसार करा' असें मत प्रतिपादन करणारास आम्ही असें विचारूं कीं, या ऐच्छिक तत्त्वावर शिक्षणाचा प्रसार बहुजन समाजांत होऊन जेथें प्रत्येक मनुष्य साक्षर झाला आहे असा एक तरी देश आपणास दाखवितां येईल काय ? आपण प्रत्येक वेळीं पाश्चिमात्य देशांचें उदाहरण घेऊन त्यांचें अनुकरण करतों, फार काय, आपण ज्या स्वराज्याची मागणी करीत आहोंत, त्या स्वराज्याची राज्य-घटनाही पाश्चिमात्य देशांतील प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या पावलावर पाऊल टाकून चालणारी आहे. इतर सर्व बाबतींत पाश्चिमात्य राष्ट्रांचा कित्ता गिरवावयाचा, मग याच बाबतींत अळंटळं कां ?

पाश्चिमात्य राष्ट्रांकडे पाहिलें तर त्या सर्व देशांत शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार सक्तीच्या तत्त्वाची अंमलबजावणी करूनच करण्यांत आला. प्रथम जर्मनीनें एकोणिसाव्या शतकाच्या आरंभींच सक्तीचें तत्त्व अमलांत आणिलें. १८३० सालीं स्वातंत्र्य प्राप्त होतांच इटलीनें १८३१ सालीं या तत्त्वाचा अवलंब केला. पोर्टुगालनें १८४४ सालीं तें लागू केलें. डेन्मार्क, ऑस्ट्रिया-हंगेरी, स्वीडन आणि नॉर्वे, स्विट्झर्लंड या देशांनींही लवकरच जर्मनीचें अनुकरण केलें. इंग्लंडनें १८७० सालीं, फ्रान्सनें १८८१ सालीं व स्पेननें १८८५ सालीं हें सक्तीचें तत्त्व अंगीकारिलें. रशियांतही याच तत्त्वाची अंमलबजावणी करून सगळी प्रजा साक्षर करण्यांत आली आहे.

या युरोपखंडांतील राष्ट्रांप्रमाणें अमेरिकेंतही हें तत्त्व लागू करण्यांत आलें आहे. अमेरिकाखंडांतील अगदी लहानसहान अशा संस्थानांतूनही या तत्त्वावरच शिक्षणाचा प्रसार करण्यांत येत आहे.

---

† मुंबई शि. रि. १९३५-३६ पा. ५७

आशिया खंडांतही जपाननें १८७२ सालीं हें तत्त्व लागू केलें. हिंदुस्तानांत बडोदा सरकारनें प्रथम आपल्या अमरेली तालुक्यांत या तत्त्वाचा १५ वर्षें प्रयोग करून समाधानकारक अनुभव आल्यानंतर १९०९ चे सुमारास तें तत्त्व सर्व संस्थानास लागू केलें.

ऐच्छिक तत्त्वावर हिंदुस्थानांत शिक्षणाचा प्रसार करण्यांत आल्यामुळें अतिशय अल्प प्रमाणावर प्रगति होत आहे. या खुषीच्या तत्त्वामुळें लोक वाटेल त्यावेळीं मुलें शाळेंतून काढून घेतात व त्यामुळें त्या मुलांसाठीं खर्च केलेले लाखो रुपये व्यर्थ जातात आणि साक्षरता–प्रसाराच्या कामांत अडथळे उत्पन्न होतात. हा व्यर्थ खर्च किती होतो याचा विचार पुढें आम्हीं सविस्तर केला आहे.

या ऐच्छिक पद्धतीचा मुख्य व अतिशय महत्त्वाचा दोष म्हणजे या तत्त्वामुळें बहुजनसमाजांत शिक्षणाचा प्रसार फारच मंदगतीनें होतो, हा होय. आपल्या प्रांतापुरतेंच आंकडे मागें दिले आहेत. ब्रिटिश लोकांनीं शिक्षणाचीं सूत्रें हातीं घेण्यापूर्वीं या प्रांतांतहि पुष्कळ गांवठी शाळा होत्या व त्या शाळांमधून शिक्षण देण्याचें कार्य करण्यांत येत असे; परंतु ती गोष्ट जमेंत धरली नाहीं व ब्रिटिश लोकांनींच आम्हांस शिकविण्यास सुरवात केली असें मानलें तरी गेल्या दीडदोनशें वर्षांच्या शिक्षणविषयक प्रयत्नानंतरहि आज एकंदर लोकसंख्येपैकीं शें. ६.७७ मुलेंच शाळेंत शिक्षण घेत आहेत. हें प्रमाण सर्व प्रकारच्या म्हणजे उच्च, दुय्यम व प्राथमिक शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांचें आहे, हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांचें लोकसंख्येशीं प्रमाण शेंकडा ६·७७ पेक्षां कमीच पडतें.

आपल्या देशांत प्राथमिक शाळेंत जाण्यासारखीं मुलें लोकसंख्येच्या शें० १५ प्रमाणांत असतात असें मानल्यानंतर निदान तीं शें० १५ मुलें शाळेंत जाऊं लागल्यानंतर शिक्षण सार्वत्रिक झालें असें म्हणतां येईल. पुढारलेल्या वर्गांतील शाळेंत जाणाऱ्या मुलांचें त्या वर्गाच्या पुरुषांच्या संख्येशीं प्रमाण १७.२ इतकें १९३२ सालीं असल्याचें पाहिलें आहे. इतर वर्गांत हें शिक्षणाचें प्रमाण पुढारलेल्या वर्गाच्या इतकें यावयास ऐच्छिक तत्त्वावर शिक्षणाचा प्रसार करीत राहिल्यास आणखी १५० वर्षेंतरी पुरा पडतील काय?

सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार सक्तीचें तत्त्व लागू केल्याशिवाय झपाट्यानें होणें शक्य नाहीं. सन १८७२ सालीं जपानच्या बादशहानें आपल्या जाहीर-

नाम्यांत "ज्यांत निरक्षर कुटुंब आहे असें खेडें दिसणार नाहीं किंवा ज्यांत निरक्षर मनुष्य आहे असें कुटुंब दिसणार नाहीं इतका शिक्षणाचा प्रसार यापुढें करण्याचा बेत आहे" अशी घोषणा केली. त्या सालीं शाळेंत जाण्यासारख्या मुलांपैकीं फक्त शें० २८ मुलेंच शाळेंत जात होतीं; परंतु बादशहांच्या घोषणेनंतर सक्तीच्या तत्त्वाची अंमलबजावणी होतांच शाळेंत जाण्यासारख्या वयांची सर्वच मुलें शाळेंत जाऊन शिक्षण घेऊं लागलीं. १८७० सालीं इंग्लंडमध्यें प्रथम सक्तीचें तत्त्व सुरू केलें, त्या वेळीं शाळेंत जाण्यालायक अशा वयाच्या मुलांपैकीं शें० ४३ मुलेंच शाळेंत जात होतीं. दहा वर्षांच्या काळांत हीं सर्व मुलें शाळेंत दाखल होऊन शिक्षण घेऊं लागलीं. बडोद्यामध्यें १९०९ सालीं सक्तीचें तत्त्व सर्व राज्यास लागू करण्यांत आलें, आणि १९३१ सालीं बडोदा शहरांतील साक्षर स्त्रीपुरुषांचें प्रमाण पुण्यापेक्षां जास्त झाल्याचें आपणांस दिसून आलें. सक्तीच्या शिक्षणाचें तत्त्व परिसासारखें आहे. त्याचा स्पर्श होतांच निरक्षरतेच्या लोखंडाचें साक्षरतेच्या सोन्यांत रूपांतर होतें! मग आपल्या देशांतच हा परीस निरक्षर बहुजन समाजापासून कां दूर ठेवण्यांत येत आहे?

सक्तीचें शिक्षण व सरकार—स्वातंत्र्याचा उपभोग घेणाऱ्या सर्व देशांत सक्तीच्या तत्त्वाची अंमलबजावणी करून तेथील लोकहितदक्ष सरकारांनीं प्रजासत्ताक राज्यपद्धति खंबीर पायावर अधिष्ठित केली. आमच्याकडे आतांपर्यंत नोकरशाहीची सुलतानशाही असल्यामुळें तिनें या तत्त्वाची अंमलबजावणी होऊं दिली नाहीं; परंतु आतां सरकार लोकांचें झालें आहे. कांहीं निर्बंधांच्या दोऱ्या अद्यापि आमच्या देशाच्या दंडाला दिसत असल्या, तरी आम्हांस शिक्षणाला सक्तीचें तत्व लागू करतां येण्याइतकें स्वातंत्र्य खास आहे. निदान ज्या ठिकाणीं राष्ट्रीय सभेच्या हातांत राज्यकारभाराचीं सूत्रें आहेत, त्या प्रांतांत तरी हें तत्त्व तावडतोब लागू करणें अत्यंत जरूर आहे. १९१० च्या डिसेंबर महिन्यांत अलाहाबाद येथील आपल्या अधिवेशनांत 'शिक्षण सक्तीचें व मोफत करण्यांत यावें अशा' मागणीचा ठराव राष्ट्रीयसभेनें पास केला होता. आतां राष्ट्रीय सभा कांहीं प्रांतांत 'सरकार' झाली असल्यामुळें १९१० च्या ठरावाची, निवडणुकींत दिलेल्या आश्वासनांची, पूर्तता करणें राष्ट्रीय सभेच्या सरकारचें आद्यकर्तव्य आहे. खुषीच्या तत्त्वावर मद्यपानबंदी होणार नाहीं म्हणून त्या बाबतींत कायद्यानें सक्ती करून हें व्यसन तीन वर्षांत हद्दपार करण्याचा

राष्ट्रीय सभेनें संकल्प केलेला आहे. मद्यपानबंदीपेक्षां शिक्षणप्रसार करणें कितीतरी पटीनें अधिक महत्वाचें आहे. मद्यपानबंदीसाठीं कायद्याची मदत घेतांना त्याबरोबर शिक्षणप्रसारासाठींही कायद्याची मदत घेऊन राष्ट्रीयसभासरकारनें पांच वर्षांत निरक्षरता हद्दपार करण्याचा संकल्प करावा, अशी आमची कळकळीची विनंति आहे. मद्यपानप्रसार व शिक्षणबंदी हें पूर्वीच्या नोकरशाहीच्या राजवटींत घोरण होतें—आतां या नवीन राजवटींत—आमच्या राष्ट्रीयसभासरकारच्या अमदानींत—मद्यपानबंदी व शिक्षणप्रसार हें ध्येय कायद्याच्या मदतीनें, नुकसानीचा किंवा खर्चाचा विचार न करतां, कसोशीनें अमलांत येणें अत्यंत जरूर आहे.

स्त्रियांचें शिक्षण व सक्ति—सक्तीचें तत्त्व अमलांत आणतांना त्या तत्त्वाच्या कक्षेंत स्त्रियांच्या शिक्षणाचाही समावेश करण्यांत यावा. लोकविरोधाचा विचार करून रा० व० जोशांनीं* सक्तीचें तत्त्व मुलींच्या शिक्षणाला लागू करणें व्यवहार्य होणार नाहीं, असें मत व्यक्त केलें. कै. नामदार गोखले यांनींही लोकविरोधाच्या बुजगावण्याला विचकून आपल्या सूचनांतून स्त्रियांचें शिक्षण वगळलें. नंतर पटेल बिलाच्या वेळींही 'स्त्रियांच्या शिक्षणाला हें तत्व लागू करण्यांत येऊं नये' असें म्हणणारे सनातनी निघालेच. आजही या प्रश्नाला विरोध करणारे अनेक लोक या दुर्दैवी देशांत निघाल्यावांचून राहणार नाहींत. १९२३ च्या कायद्यानें स्त्रियांच्या बाबतींत सक्तीचें तत्व लागू करण्याच्या तत्वास मान्यता देण्यांत आली आहे. तरी त्या मान्यतेची व्यवहारांत अमलबजावणी करण्याच्या कामीं मुळींच कसूर करण्यांत येऊं नये.

देशाच्या प्रगतीच्या दृष्टीनें स्त्रिया साक्षर होणें अत्यंत अगत्याचें आहे. हिंदी स्त्रियांच्या शिक्षणाचें महत्व किती आहे त्याचें वर्णन अनेक कमिशनांच्या अहवालांत करण्यांत आलें आहे. या बाबतींत हारटॉग कमिटीचे खालील उद्गार वाचनीय आहेत —

"The importance of the education of girls and women in India at the present moment cannot be overrated. It affects vitally the range and effeciency of all education. The education of the girl is the education of the mother and through her of her children. Many of our witnesses have emphasised the dominating in-

* जोशी १०३७

fluence of the woman in the Indian household and especially in the training of her children. 'A literate woman' says one of our witnesses, very justly, 'is a far better and surer guarantee of the education of the coming generation than a literate man. An illiterate woman on the contrary is in her own time very often the cause of the stagnation not only of the generation that is slowly growing up but of the generation which is in the prime of life as well.—

"The social position of the Indian woman needs to be strengthened; for in every country as power passes more and more from the hands of the few into the hands of the many, more and more is the Steadying influence of woman needed as the guardian of family life not only inside but outside the family circle. In all matters of educational and social reform, the counsel and active work of women are essential both in administration and in public life."†

कर्मठ मताच्या लोकांच्या गोंगाटाला भिऊन स्त्रीशिक्षणाचा प्रश्न दिरंगाईवर टाकणें देशास घातक ठरणार आहे. साक्षर स्त्री घरांत जितकी सर्वप्रकारची सुधारणा करूं शकेल, तितकी सुधारणा केवळ पंचवीस पुरुष शिकवून होणार नाहीं. साक्षर माता मुलांना लहानपणीं जें शिक्षण देऊं शकेल, त्यांच्या स्वभावाला जें वळण लावूं शकेल, तेंच शिक्षण व तेंच वळण अखेरपर्यंत टिकून देशाच्या उपयोगीं पडेल. रोमन राज्य वैभवशिखरावर असतांना प्रत्येक घरांतील सुशिक्षित जननीच आपल्या मुलांना शिक्षणाचे पहिले धडे देत असे. बालवयांत मुलांना शिकविण्यासाठीं शिक्षिका नेमावी हें तत्त्व आमच्याकडे व्यवहारांत आणतां येत नाहीं. याचें कारण शिकलेल्या स्त्रियांचा अभाव हेंच होय. स्त्रियांना सक्तीनें शिक्षण दिल्यास अल्प काळांत शिक्षणाचा फैलाव होऊन त्याचा चांगला परिणाम जिकडे तिकडे दिसूं लागेल.

इतर कांहीं अडचणींमुळें मुलांच्या शिक्षणाला सक्तीचें तत्त्व लागू करतां येत नसेल, तर निदान मुलींच्या व विशेषतः खेडयांतील मुलींच्या शिक्षणाला हें तत्व प्रथम व तावडतोब लागू करण्यांत यावें. या तत्वाच्या खेडयांत केलेल्या अंमलबजावणीमुळें दहा वर्षांच्या काळांत खेडयांतील लोकांची राहणी,

† हारटॉग, पा. १५०–५१.

वाणी, स्वच्छता व आरोग्य सुधारलेलें दिसून येईल. माता साक्षर असली कीं मुलाला शिक्षणाचें बाळकडू मिळेल. चिमणी आपल्या पिलास उडण्यास शिकविते त्याप्रमाणें साक्षर माता आपल्या मुलास लिहिण्यावाचण्यास शिकवून, शाळेंतील शिक्षणासाठीं उत्तम पाया घालून ठेविते व मग मुलाची शिक्षणांत प्रगति व्हावयास मुळींच वेळ लागत नाहीं. अशा साक्षर माता खेड्यांत तयार करण्यानेंच खरा व टिकाऊ ग्रामोद्धार होणार आहे. चांगल्या पिकाची अपेक्षा करतांना जमिनीची उत्तम मशागत करावी लागते, जिजाबाईसारखी जाणती माता असली तरच स्वराज्य संस्थापक जन्माला येऊं शकतो !

सक्तीच्या शिक्षणाच्या मार्गांतील अडचणी--शिक्षण सक्तीचें व मोफत करण्याची आवश्यकता अनेक लोक कबूल करतात, परंतु अनेक अडचणींची यादी पुढें करून 'या तत्वाची अंमलबजावणी कां करतां येत नाहीं' यांचीं कारणें देतात. कोणतीही चांगली गोष्ट करावयाची म्हटली म्हणजे लहान-मोठ्या अनेक अडचणी वाटेंत येऊन उभ्या राहणारच ! वाटेंत आलेल्या अडचणींचा विंध्य पर्वत अगस्ती ऋषीच्या सामर्थ्यानें ओलांडून जाण्यांतच माणासाचीं खरी कर्तबगारी आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांनीं किंवा जपाननें या सक्तीच्या तत्वाची अमलबजावणी केली त्या वेळीं त्यांनाही या सर्व अडचणींना तोंड द्यावें लागलेंच ना ? दूरचें कशाला ? बडोद्याच्या सुविद्य अधिपतींनीं आपल्या संस्थानांत, सर्व अडचणींवर मात करून सक्तीच्या तत्वाचा अवलंब केला नाहीं का ? प्रांताच्या मानानें अत्यंत लहान अशा संस्थानिकाला जी गोष्ट पाव शतकाच्या पूर्वीच साध्य करतां आली, ती गोष्ट एका लोकनियुक्त सरकारला, सर्वत्र जागृति झालेल्या काळांत, कां साध्य करतां येऊं नये ?

सक्तीचें व मोफत शिक्षण तावडतोब सुरू करण्याच्या मार्गांत मुख्य आर्थिक अडचण आहे. या अडचणीचा विचार करतांना शिक्षणाप्रीत्यर्थ आतांपर्यंत कोणत्या धोरणानें व किती प्रमाणांत खर्च करण्यांत आला, हें पाहणें जरूर आहे. पुढील प्रकरणांत या सर्व बाबींचा विचार करून प्राथमिक शिक्षण, महात्मा गांधी म्हणतात त्याप्रमाणें, स्वयंपोशी (Self Supporting) होऊं शकेल किंवा नाहीं याचा उहापोह करून शिक्षणासाठीं लागणारा पैसा कसा उभा करावा याबद्दल सूचना केल्या आहेत.

प्रकरण सातवें.

शिक्षण व खर्च

Education from pubilc money should in the first instance be for a masses rather than for the privileged few. With the bulk of our masses illiterate and unskilled it is extravagant to contribute towards university education out of public funds."

B. Kumarappa.

Harijan, 7th August 1937, P, 206.

The political training of the masses has hardly begun. In times of economic distress they are clay in the hands of astute politicians and at other times they are stubborn rock. A population that is mainly, and as regards its women almost wholly illiterate cannot provide an electorate in the western sense. No politicians has yet faced resolutely the financial sacrifice that the establishment of literacy would involve.

Arthur Mayhew.

The Education of India, p. 141.

देशांतील मुलांना शिक्षण द्यावयाचें म्हणजे त्याला खर्च हा येणारच ! या खर्चाची सोय प्रथम झाल्यावांचून कोणतीहि शिक्षणपद्धति तग धरूं शकणार नाहीं. पैसा हा शिक्षणाचाहि प्राणवायु आहे. तो भरपूर मिळाला, तर शिक्षणाची जीवन-क्रिया योग्य प्रकारें चालेल. तो पुरेसा नाहीं मिळाला कीं शिक्षणाचा कोंडमारा होऊन जीव गुदमरल्यावांचून रहाणार नाहीं. पूर्वीपासून तों आजतागायत निरनिराळ्या कालांत शिक्षणाप्रीत्यर्थ येणाऱ्या खर्चाचा भार कोण कोण सोसत असत, हें आतां पाहूं.

पूर्वी शिक्षणाच्या खर्चाची सोय काय होती हें आपण मागें पाहिलें आहेच. प्रत्येक ब्राह्मणाचें-विद्वान ब्राह्मणाचें-घर ही एक शाळाच असे. त्यावेळीं निराळ्या शाळागृहांची जरूरी नसे. शिक्षणाचें साहित्य घेण्याचा प्रश्नच नसे, पुस्तकेंहि

जन्माला आलीं नव्हतीं त्यामुळें गुरूनें तोंडानें शिकवावें व विद्यार्थ्यानें तीं विद्या कानानें ग्रहण करून, स्मरणाच्या करंडकांत जतन करून ठेवावी, असा त्या वेळचा शिरस्ता होता. यामुळें गुरूच्या योगक्षेमाचीच विशेष काळजी करावी लागे. परंतु ही बाबहि फार खर्चाची नसे. प्राचीन कालच्या गुरूची रहाणी अतिशयच साधेपणाची असे व त्या साध्या रहाणीच्या अत्यल्प गरजा दानशूर लोकांच्या दातृत्वानें सहज भागत असत. ब्राह्मण गुरूंना दान घेण्याची मुभा असे व त्यामुळें त्यांना पोटाची कधींच विवंचना पडत नसे. त्यांचा आश्रमहि जवळ जवळ जंगलांतच असे, त्यामुळें कंदमुळांवरहि त्यांना पोट भागवितां येत असे. वेळोवेळीं या गुरूंचा परामर्श राजेलोकहि घेत व त्यामुळें आपल्या विद्यार्थ्यांकडून, कोणत्याही मोबदल्याची आशा न करितां मिळेल त्यावर समाधानवृत्तीनें राहून व शिष्यांच्या भोजनाचीहि आपल्या घरींच सोय करून 'अध्ययन हें एक धार्मिक कृत्य आहे,' अशा उदात्त भावनेनें प्रेरित होऊन त्या काळचे गुरु शिक्षणप्रसाराचें पवित्र कार्य करीत असत. सारांश, त्या काळच्या शिक्षणाचा खर्च अतिशय कमी असे व त्याचा भार लोक व राजा सहन करीत.

आरंभींच्या कालाचा हा विचार झाला. त्यानंतरच्या कालांतहि शिक्षणाच्या खर्चाची जबाबदारी देशांतील श्रीमंत लोकांप्रमाणें राज्यकर्त्यांवरहि असे. अर्थात् या वेळींही शिक्षण ही फार खर्चाची बाब नव्हती. मुसलमान बादशहा मशिदींतून भरणाऱ्या शाळांना व हिंदुराजे पाठशाळांना उदार हातानें मदत करीत असत. इतकेंच नव्हे तर गांवच्या शिक्षणाची तर्तूद, जमिनीच्या उत्पन्नावर निश्चित प्रमाणांत भार टाकून व शिक्षकाला कांहीं वर्षासनें देऊन, करण्यांत येत असे.*

ब्रिटिश लोकांनीं या देशांत येऊन राज्यस्थापनेस आरंभ केल्यानंतर त्यांनीं शिक्षणप्रसारासाठीं काय प्रयत्न केले, याचें विस्तृत वर्णन मागें केलेंच आहे. कंपनी सरकारनें शिक्षणाला पहिली आर्थिक मदत, वॉरन हेस्टिंग्ज यांनीं कलकत्ता येथें सुरू केलेली 'मद्रासा' १७८३ च्या सुमारास आपल्या ताब्यांत घेऊन केली. दुसरी मदत १६।२।१७८७ सालीं तंजावर वगैरे ठिकाणीं तीन इंग्रजी शिकण्याच्या शाळा, रे० स्वार्झ यांच्या प्रयत्नानें सुरू करण्यांत

* जून १८१४ मधील इं. इं. कंपनीच्या चालकांचा खलिता.

आल्या होत्या. त्यांना प्रत्येकीं २५० पागोडा याप्रमाणें देऊन करण्यांत आली. त्यानंतर १७९२सालीं कायम धाऱ्याची (Permanent Settlement) पद्धत सुरू केल्यामुळें 'जो जादा साऱ्याचा वसूल येईल त्याचा विनियोग कसा करावा' म्हणून गव्हर्नर जनरल अर्ल ऑफ कॉर्नवॉलीस, यानीं बनारस येथील रेसिडेंट कर्नल डंकन यांना विचारणा केली. त्या विचारणेला उत्तर म्हणून कर्नल डंकन यांनीं १-१-१७९२ रोजीं पत्र लिहून, 'बनारस येथें संस्कृत विद्येच्या वाढीसाठीं कॉलेज स्थापन करण्याची' सूचना केली व पुढें सरकारी खर्चानें तें कॉलेज चालूं झालें. सन १८१३ सालीं कंपनीला सनद देतांना गव्हर्नर जनरलला दरसाल निदान लाख रुपये शिक्षणाप्रीत्यर्थ खर्च करण्याचा कायद्यानें अधिकार देण्यांत आला व त्याप्रमाणें शिक्षणाच्या खर्चाची सरकारी तिजोरीवरील जबाबदारी असंदिग्धपणें मान्य करण्यांत आली. सन १८१३ पासून १८३० पर्यंत बंगाल, मद्रास व मुंबई या प्रांतांत एकंदर सरकारतर्फे वाढत्या प्रमाणांत रक्कम खर्च करण्यांत आली. सरकारला पहिल्याप्रथम शिक्षण-प्रसार हें आपलें महत्त्वाचें कार्य वाटत होतें व त्यामुळें आरंभींच्या उत्साहाच्या भरांत तें सढळ हातानें खर्च करीत होतें हें खालीं १८१३सालचे खर्चाचे आंकडे व १८३० चे खर्चाचे आंकडे दिले आहेत, त्यांवरून दिसून येईल.

साल	बंगाल पौंड	मद्रास	मुंबई	एकंदर
१८१३	४,२०७	४८०	४४२	५,१२९
१८३०	२८७२८	२९४६	१२६३६	४४३३०

या आंकडयांवरून पहातां सुमारें १७ वर्षांत खर्चाची वाढ बंगालमध्यें ६॥ पटीनें, मद्रासमध्यें ६ पटीनें, मुंबईमध्यें २८॥ पटीनें व एकंदर ८॥ पटीनें झाल्याचें दिसून येतें. बंगालमध्यें पहिल्यापासून १८३० पर्यंत इतर सर्व प्रांतांपेक्षां अधिक खर्च होत होता. १८१३ सालीं सर्वांत कमी खर्च मुंबई प्रांतांत झाला, तर १८३० सालीं सर्वांत कमी खर्च मद्रासमध्यें झाला; परंतु १८४५ सालीं बंगालमध्यें व मुंबईमध्यें शिक्षणाप्रीत्यर्थ खर्च झालेल्या रकमांचे आंकडे उपलब्ध आहेत, त्या आंकडयांची १८३० च्या आकडयांशीं तुलना खालील तक्त्यांत करतां येईल. दर पौंडास पंधरा रुपये प्रमाणें १८३० च्या पौंडांची रक्कम रुपयांत करून खालीं दिली आहे—

साल	बंगाल	मुंबई
१८३०	४३०८६०	१८९५४०
१८४५	४७७५९३	१६८२२६

या आकड्यांवरून बंगालमधील रक्कम रु. ४६७३३ नें वाढली आहे तर मुंबई प्रांतांतील रक्कम रु. २१३१४ नें कमी झाली आहे.

धोरणांत बदल:—वर जे आंकडे दिले आहेत ते एकंदर शिक्षणासाठीं होणाऱ्या खर्चाचे आंकडे होत. प्रथम प्राथमिक शिक्षणावर विशेष भर होता; परंतु हलके हलके वरिष्ठ वर्गाच्या उच्च शिक्षणाकडेच अधिक लक्ष पुरविण्यांत कसें येऊं लागलें, याचा उल्लेख मागें केला आहेच. हें धोरणांत बदल करण्याचें मुख्य कारण आर्थिक अडचण हें देण्यांत आलें. बहुजन समाजाला प्राथमिक शिक्षण देणें खर्चाच्या दृष्टीनें सरकारच्या आवांक्याबाहेरचें आहे, असें १८२७ सालापासूनच म्हणण्यांत येऊं लागलें. ता. ३–९–१८२७ च्या कंपनीच्या सूत्रधारकांच्या खलित्यांत प्रथम खर्चाच्या साधनांची सबब पुढें करण्यांत आली.§ मेकॉले साहेबांनीं आपल्या ता. २-२-१८३५ च्या पत्रकांत 'आमच्याजवळील खर्चाच्या मर्यादित साधनामुळें बहुजन समाजाला शिक्षण देणें अशक्य आहे' ही गोष्ट प्रामुख्यानें पुढें मांडली व वरील वर्गाच्या उच्च शिक्षणाची जोरानें तरफदारी केली.* थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे खर्चाच्या अडचणीची सबब, जी आजहि आम्हांस नेहमीं ऐकावयास मिळते, ती ११० वर्षांपूर्वी जन्माला आली. ही सबब कधीं संपणार हें एक परमेश्वर जाणे !

लोकलफंड प्रथम लोकांच्या खुषीनें व नंतर कायद्याच्या सक्तीनें कसा वसूल करण्यांत येऊं लागला, याचा उल्लेख मागें केला आहेच. लोकल-फंडाची योजना अंमलांत आल्यानंतर प्राथमिक शाळांचा खर्च कांहीं आपल्या लोकल-फंडाच्या उत्पन्नांतून व कांहीं सरकारी मदतीच्या पैशांतून जिल्हा–कमिट्या भागवूं लागल्या. लोकल-फंडाच्या तिसऱ्या हिश्याइतकी रक्कम सरकार प्रांतिक तिजोरींतून देत असे. शहरांतील शिक्षणासाठीं सरकार प्रथम अधिक उदारपणें खर्च करी व तो खर्च शिक्षणासाठीं मंजूर केलेल्या रकमेंतून जी बाकी राहील त्यांतून खेड्यांडील प्राथमिक शिक्षणासाठीं लोकलफंड-कमिट्यांना जितकी मदत करतां येईल तितकी मदत करीत असे.

या व्यवस्थेचा परिणाम असा झाला कीं, प्रजेच्या शिक्षणाची अधिक

---

§ E. R. I. 52. * E. R. I. 116.

जबाबदारी प्रजेनें दिलेल्या करावरच पडूं लागली. याच वेळीं इंग्लंडमध्यें प्रजेच्या शिक्षणासाठी जो खर्च येत असे, त्याच्या निम्यापेक्षां अधिक भार सरकार सोशीत असे व बाकीचा भार रयतेकडून वसूल होणाऱ्या करांवर (rates) पडत असे.‡ इंग्लंड व हिंदुस्तान यांमधील या सरकारी धोरणांतील हा फरक लक्षांत ठेवणें जरुर आहे. इंग्लंडमधील प्रजा हिंदुस्थानांतील प्रजेपेक्षां कितीतरी अधिक पटीनें श्रीमंत असतां त्या प्रजेवर विशेष भार न टाकतां, खरा बोजा सरकार पत्करीत असे व उलट हिंदुस्थानांतील दरिद्रि लोकांना आपल्या शिक्षणासाठीं अर्धपोटीं राहूनहि लोकल फंडाची भरपाई करावी लागत असे. इंग्लंड व हिंदुस्थानमधील धोरणाचा फरक शिक्षण सक्तीचें करण्याच्या बाबतींतहि दिसून आला. इंग्लंडमध्यें १८७० मध्यें प्राथमिक शिक्षक सक्तीचें झालें व आमच्याकडे अद्यापहि त्या तत्वाची. मजल चर्चेच्या मुक्कामा पलीकडे गेली नाहीं.

सन १८१३, १८३० व १८४५ सालचें सरकारी खर्चाचे आंकडे दिले आहेत, परंतु त्यांत प्राथमिक शिक्षणासाठीं किती खर्च झाला व इतर शिक्षणासाठीं किती खर्च झाला याची फोड नाहीं. सन १८६० नंतर प्राथमिक शिक्षण व इतर प्रकारच्या शिक्षणांत फरक करण्यांत येऊं लागला. लोकल फंड प्राथमिक शिक्षणासाठींच असल्यामुळें त्या शिक्षणाला अधिक उत्तेजन व अधिक महत्व मिळूं लागलें. हिंदुस्थान सरकारच्या ठराव नं. ६३ ता. ११ फेब्रुवारी १८७१ मधील खालील भाग फार महत्त्वाचा आहे–

" ३ जे स्वतःस मदत करण्यास पूर्ण असमर्थ आहेत, अशांच्या शिक्षणासाठीं पैसे देणें हें आद्य कर्तव्य असून, सरकारच्या तिजोरीवर बहुजनसमाजाच्या शिक्षणाचा पहिला हक्क आहे असें भारतमंत्रीं (Secretary of State) यांनीं अनेक वेळां जाहीर केलें आहे. हिंदुस्थान सरकारची या धोरणाप्रमाणें वागण्याची इच्छा आहे. परंतु मदती(Grant in aid)च्या नियमाची प्रत्यक्ष अंमल बजावणी करणें अतिशय गैरसोयीचें असल्यामुळें साधारण उत्पन्नांतून (General revenues) मदतीदाखल रकमा क्वचित् मंजूर करण्यांत येतात. प्राथमिक शाळांच्या योगक्षेमासाठीं लागणारें द्रव्य स्थानिक प्रयत्नानें व स्थानिक करांतून मिळालें पाहिजे अशी आपली असलेली अपेक्षाहि अनेकवार बोलून दाखविण्यांत आली आहे.

---

‡ हंटर क. रि. ९१

"४. हे दोन्ही हुकूम परस्परविरोधी वाटण्याचा संभव आहे परंतु ते तसे नाहींत. खरें पहातां प्राथमिक शिक्षणाला, सरकारी खजिन्यांतून व स्थानिक करांचे उत्पन्नांतून मदत मिळणें जरूर आहे. सरकारी खजिन्यांतून प्राथमिक शाळांना मदत नाकारावयाची, असें हिंदुस्थानसरकारचें मुळींच धोरण नाहीं. परंतु सरकारी उत्पन्नांतून जी रक्कम देण्यांत येईल त्या रकमेंत या कार्याची पूर्ण गरज भागणें शक्य नसल्यामुळें बहुजन समाजावर शिक्षणाचा परिणाम घडवून आणणेसाठीं, स्थानिक कर वसूल करणें जरूर आहे. यामुळें इतर गरजा भागवून शक्य तितक्या सढळ हातानें,स्थानिक प्रयत्नानें वसूल होणाऱ्या रकमेंत, भर घालण्याची सरकारवरील जबाबदारी कमी होत नाहीं. प्रत्येक जिल्ह्यांत स्थानिक लोकांनीं उभ्या केलेल्या रकमेच्या विशेष प्रमाणांत मध्यवर्ति तिजोरींतून मिळणारी रक्कम वांटून देणें हे खरें धोरण राहील.

"५. निरनिराळ्या प्रांतिक कारभारांत प्राथमिक शिक्षणाला देण्यांत येणारी रक्कम अल्प असून प्रांतिकसरकार तीहि कमी करतील असें वाटत नाहीं. उलट, इतर खात्यांत काटकसर करून अगर शिक्षणाचे इतर शाखांतल्या बचतीमधून ही रक्कम वाढविण्याची त्यांना पूर्ण मुभा आहे. स्थानिक किंवा म्युनिसिपल करांच्या मुख्यत: मदतीवर चालणाऱ्या शाळांना, प्रांतिक मदतीच्या रकमेंतून, मदतीदाखल रकमा मंजूर करण्यासहि कांहीं हरकत नाहीं."

प्राथमिक शिक्षणासाठीं लागणारें द्रव्य कसें व कोणत्या मार्गानें प्राप्त करून घ्यावें हा प्रश्न विचारासाठीं १८८२ सालीं हंटर कमिशन पुढें निघाला होता. त्या चर्चेच्या वेळीं 'लोकल फंडाचें उत्पन्न प्राथमिक शिक्षणाप्रमाणें दुय्यम शिक्षणासाठींहि खर्च करण्यास हरकत नाहीं' असें एक मत प्रतिपादन करण्यांत आलें. असें मत प्रतिपादन करतांना दोन कारणें पुढें करण्यांत आलीं होतीं. पहिलें कारण असें देण्यांत आलें कीं, लोकल–फंडाचें उत्पन्न श्रीमंत, पण संख्येनें कमी अशा एका वर्गाकडूनहि मिळत असून, या वर्गाचें समाधान नुसत्या प्राथमिक शिक्षणानें होणें शक्य नाहीं. या वर्गाकडून जो लोकल–फंड देण्यांत येतो तो फक्त प्राथमिक शिक्षणासाठीं खर्च करणें म्हणजे या वर्गाचें नुकसान करणें आहे; कारण या वर्गाला दुय्यम शिक्षणासाठीं स्वत:च्या खिशाला आणखी खार लावून द्यावा लागेल. दुसरें कारण असें देण्यांत आलें कीं, १८५४ व १८५९ च्या खलित्यांत बहुजन समाजाचें शिक्षण या सदराखालीं सर्व प्रकारच्या शिक्षणाचा समावेश करण्यांत आला

असल्यामुळें, प्राथमिक व दुय्यम शिक्षणाच्या शाळांप्रीत्यर्थ स्थानिक कर खर्च करणें योग्य आहे.

कांहीं मंडळीनीं याच्या उलट मत मांडलें. त्यांचें म्हणणें कीं, लोकल-फंडाचें उत्पन्न प्राथमिक शिक्षणासाठींच खर्च करणें जरूर आहे. भारतमंत्र्याच्या नुकत्याच निघालेल्या खलित्याच्या आधारें, त्याचप्रमाणें १८७० सालीं लॉर्ड मेयो यांनीं अनुसरलेल्या धोरणाप्रमाणें, व १२-१२-१८७१च्या हिंदुस्थान सरकारच्या हुकुमावर भर देऊन, या मतांचे पुरस्कर्ते 'बहुजनसमाजाचें शिक्षण यांत दुय्यम शिक्षणाचा समावेश होत नाहीं' असें प्रतिपादूं लागले.

या लोकलफंडाच्या विनियोगाप्रमाणें प्रांतिक सरकारच्या मदतीसंबंधानेंहि वाद उत्पन्न झाला. दुय्यम शिक्षणाचे पुरस्कर्ते म्हणूं लागले कीं, "स्थानिक कराचें उत्पन्न सर्वस्वीं प्राथमिक शिक्षणासाठीं द्यावयाचें तर प्रांतिक सरकारनें आपल्या पैशांतून प्राथमिक शिक्षणाला मदत न करतां दुय्यम शिक्षणालाच सर्वस्वीं मदत करावी, कारण दुय्यम शिक्षण हेंहि प्राथमिक शिक्षणाइतकेंच महत्वाचें आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें प्राथमिक शिक्षणाचा सर्व भार स्थानिक करांच्या उत्पन्नावर व दुय्यम शिक्षणाचा भार प्रांतिक सरकारावर असावा. प्राथमिक शिक्षणाची तरफदारी करणारांनीं याला उत्तर दिलें कीं, "जे स्वतःसाठीं कांहीं करण्यास तयार आहेत, अशांनाच मदत करण्यास सरकार बांधलें गेलें आहे." या दोन्ही मुद्यांवरील वादांत प्राथमिक शिक्षणाच्या पक्षाची सरशी होऊन कमिशननें "एकंदर शिक्षणक्रमांतील प्राथमिक शिक्षणाच्या बाबींचाच शिक्षणाप्रीत्यर्थ असलेल्या स्थानिक कराच्या उत्पन्नावर पूर्ण हक्क असून प्रांतिक उत्पन्नावरहि मोठा हक्क आहे, असें जाहीर करण्यांत यावें, अशी शिफारस केली."*

याप्रमाणें प्राथमिक शिक्षणाच्या बाजूची शिफारस करून प्राथमिक शिक्षणाच्या खर्चासाठीं उपयोगीं पडणारें द्रव्य, इतर खात्यांनीं आपल्या घशांत घालूं नये म्हणून "शहर व खेड्यांकरतां स्वतंत्र निधि म्हणून कायद्यानें अस्तित्वांत आणावे व या निधींत कोणत्या उत्पन्नाच्या बाबी समाविष्ट केल्या जाणार, हेंहि निश्चित करावें" अशी या कमिशननें शिफारस केली. कमिशनच्या शिफा-

* हंटर क. रि. १२८

रद्दीप्रमाणें म्युनिसिपल शाळांच्या निधीमध्यें खालील उत्पन्नाच्या बाबींचा समावेश होतो—

(१) म्यु. च्या उत्पन्नांतील, प्रांतिक सरकार ठरवील, तो भाग.
(२) म्यु. स्कूल फंडावर पूर्णपणें चाललेल्या शाळांतील फीचें उत्पन्न.
(३) लोकल फंडांतून म्यु. फंडास करण्यांत आलेली मदत.
(४) प्रांतिक तिजोरींतून मिळालेली मदत.
(५) शिक्षणाच्या उत्तेजनासाठीं म्युनिसिपालिट्यांच्या स्वाधीन करण्यांत येणारी रक्कम.
(६) मागील सालची खर्ची न पडलेली म्युनिसिपल स्कूल–फंडाची शिल्लक.

लोकलबोर्ड स्कूल–फंडांत खालील बाबींचा समावेश होईल—

(१) प्रांतिक सरकार किमान प्रमाण ठरवील त्यापेक्षां कमी नाहीं इतका साधारण स्थानिक उत्पन्नाचा भाग.
(२) लोकलबोर्ड-फंडावर पूर्णपणें चाललेल्या शाळांतील फीचें उत्पन्न.
(३) म्यु. फंडांतून लो. बो. फंडास करण्यांत आलेली मदत.
(४) प्रांतिक तिजोरींतून मिळालेली मदत.
(५) शिक्षणाच्या उत्तेजनासाठीं लोकलबोर्डाच्या स्वाधीन करण्यांत आलेली रक्कम.
(६) मागील सालची लो. बो. फंडाची खर्च न झालेली शिल्लक.

याप्रमाणें वर्णन केलेल्या म्युनिसिपल व लोकलबोर्ड फंडांना स्थायिकत्व देण्यासाठीं सरकारनें जरुर ते कायदेहि पास करावे, अशीहि कमिशननें शिफारस केली.§

या कमिशनच्या सूचनेप्रमाणें सरकारनें जरूर ते कायदे पास केले. त्या कायद्यांचें विशेष वर्णन "शिक्षणकारभार व त्यावरील हुकमत" या प्रकरणांत दिलें आहे. सन १८८२ च्या सुमारापासून ते १९२३ पर्यंत याप्रमाणेंच एकंदर खर्चाची तजवीज होती, असें स्थूलमानानें बोलावयास प्रत्यवाय नाहीं. १९२३ सालीं प्राथमिक शिक्षणाचा कायदा झाल्यानंतर, पूर्वीच्या "म्युनिसिपल स्कूल-फंड व लोकल बोर्ड स्कूल-फंड" या दोन नांवांच्या ऐवजीं "प्राथमिक

§ हंटर क. रि. १६३.

शिक्षण-फंड " (Primary Education Fund) असें एकच नांव देण्यांत आलें.¶ प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाची तजवीज १९२३ च्या कायद्यानें काय केली आहे तें पाहूं.

प्राथमिक शिक्षण नियम नं. १४१ (२) प्रमाणें प्राथमिक शिक्षण फंडांत खालील उत्पन्नाच्या बाबी सामील कारण्यांत आल्या आहेत—

(अ) स्थानिक संस्था जिल्हा–बोर्ड असेल तर शिक्षणविषयक स्थानिक-निधि (Educational Local Fund) ची, व स्थानिक संस्था म्युनिसिपालिटी असली तर शाळानिधि (School Fund) ची १९२३ चा कायदा अमलांत येण्याच्या वेळेस असलेली शिल्लक.

(ब) स्थानिक संस्थांकडून प्राथमिक शिक्षणासाठीं मिळणारी मदत.

(क) प्राथमिक शिक्षणासाठीं सरकारकडून मिळावयाची मदत.

(ड) बिगरस्थानिक संस्था (Non-Local Authority) म्युनिसिपालिट्यांकडून जिल्हाबोर्डास मिळावयाच्या हिश्याची रक्कम.

(इ) प्राथमिक शाळांतून फीबद्दल म्हणून वसूल झालेली रक्कम.

(फ) प्राथमिक शिक्षणासाठीं वेळोवेळीं मिळतील त्या इतर रकमा.

आतां या वरील सहा बाबींपैकीं 'ब', 'क' व 'ड' या बाबींच्या तपशिलाचा विचार करूं.

स्थानिक संस्थांवरील जबाबदारी:—१९२३ च्या लोकलबोर्ड कायद्याच्या कलम ७५ मध्यें बोर्डाच्या उत्पन्नाच्या बाबींची यादी देण्यांत आली आहे. या कलमाच्या 'ब' पोट-कलमांत वसूल करण्याचा खर्च वजा जातां मुंबई लोकलफंड कायद्या-—(१८६९) प्रमाणें सेसच्या निव्वळ उत्पन्नाचा उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणें लोकल–बोर्ड–कायदा ९३ क प्रमाणें सरकारला लोकलबोर्डाच्या ठरावान्वयें हा सेस कमाल दर रुपयामागें दोन आण्यांपर्यंत वाढवितां येतो. या वाढविलेल्या सेसचें उत्पन्न व पाणीपट्टीवरील कलम ९५ प्रमाणें बसविलेल्या सेसचें उत्पन्न हें बोर्डाच्या मालकीचें आहे. याप्रमाणें पोट-कलम 'ब' 'व' 'क' मध्यें जीं उत्पन्नाचीं सदरें दर्शविलीं आहेत, त्या उत्पन्नापैकीं $\frac{1}{3}$ रक्कम प्राथमिक शिक्षणासाठीं देण्याची लो. बो. कायदा कलम ८० प्रमाणें बोर्डावर जबाबदारी आहे.

¶ प्राथ. शि. नि. १४१.

म्युनिसिपालिटीच्या हद्दींत लोकल फंड नाहीं किंवा पाणीपट्टीवरील सेसहि नाहीं; त्यामुळें अमुक एका कराच्या उत्पन्नांतूनच कांहीं विशेष अंशानें प्राथमिक शिक्षणासाठीं रक्कम वेगळी काढण्याची म्युनिसिपल कायद्यांत कोठेंहि योजना करण्यांत आलेली नाहीं. परंतु म्युनिसिपालिट्यांच्या एकंदर उत्पन्नांतून आपल्या हिश्याच्या खर्चाची सोय करण्याची त्यांच्यावर जबाबदारी आहे. डेटम लाईनपेक्षां जो जादा सरकारमान्य असा खर्च होईल त्याचा $\frac{1}{3}$ हिस्सा आपल्या शाळा स्वतः न चालविणाऱ्या म्युनिसिपालिट्यांना जिल्हा बोर्डाला द्यावा लागतो. परंतु आपल्या हद्दींतील शाळा स्वतः चालविणाऱ्या म्युनिसिपालिट्यांना त्या खर्चापैकीं निम्मा खर्च सोसावा लागतो.

सरकारी मदतः—प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याप्रमाणें सरकारनें द्यावयाच्या मदतीचें प्रमाण निश्चित करण्यांत आलेलें आहे. १९२३ चा कायदा अमलांत येण्याचे वेळीं कोणत्याहि स्थानिकसंस्थेला सरकारकडून जी रक्कम मदतीदाखल मिळावयाची, ती सर्व रक्कम १९२३ च्या कायद्यानंतरहि त्या त्या स्थानिकसंस्थेस देण्याची सरकारनें जबाबदारी पत्करलेली आहे. या रकमेला "डेटम लाईन ग्रँट" असें म्हणतात. या रकमेपेक्षां सरकारनें मंजूर केलेला जो अधिक खर्च प्राथमिक शिक्षणासाठीं होतो, त्यापैकीं स्थानिकसंस्था ही म्युनिसिपालिटी असल्यास निम्मा हिस्सा व स्थानिक संस्था जिल्हाबोर्ड असल्यास $\frac{2}{3}$ रक्कम सरकार देतें. परंतु हा हिस्सा स्थानिक संस्थेनें जो खर्चाचा अंदाज केला असेल, त्याच्या अनुक्रमें $\frac{1}{2}$ किंवा $\frac{2}{3}$ प्रमाणापेक्षां अधिक होतां कामा नये. डेटम लाईन ग्रँटच्या रकमेंत, स्थानिकसंस्था त्या पैशाचा दुरुपयोग करीत असेल किंवा दुसऱ्याच कामाकरितां खर्च करीत असेल व त्याबद्दल सरकारनें जाब विचारला असतांहि समाधानकारक जाब मिळाला नाहीं तर, योग्य वाटेल त्या प्रमाणांत ग्रँट कमी करण्याचा सरकारला अधिकार आहे *

सरकारकडून डेटम लाईनपेक्षां अधिक हिस्सेवारीनें जी मदत करण्यांत येते, त्या मदतीची रक्कम आकारतांना कांहीं विशिष्ट बाबींवर झालेला खर्च विचारांत घेण्यांत येतो. त्या विशिष्ट बाबींचा उल्लेख नियम ११२ मध्यें केलेला आहे, त्यांतील प्रमुख गोष्टींचा खालीं निर्देश केला आहे.

---

* प्रा. शि. का. क. १३.

(अ) कायम व हंगामी नोकर वर्गांचा पगार आणि त्यांचें पेन्शन व प्रॉव्हिडंठ फंड.

(ब) शाळा व कचेरीसाठीं भाड्यानें घेतलेल्या जागांचें भाडें, द्यावे लागणारे कर, शंभर रुपयांपेक्षां कमी असा खास दुरुस्तीचा खर्च व चालू दुरुस्तीचा खर्च.

(क) लाकडीसामान, पुस्तकें व शिक्षणसाहित्य, यांतच गरीब विद्यार्थ्यांस द्यावयाच्या बक्षिसांचा व पाट्या-पेन्सिलींच्या खर्चाचा समावेश होतो. मात्र हा खर्च दर शाळेमागें, शाळा स्थापन झालेल्या वर्षी रु. ५ पेक्षां व त्यानंतर दरसाल रु. १ पेक्षां अधिक असतां कामा नये.

(इ) शाळांस देण्यांत येणाऱ्या सादीलचा खर्च.

(ई) प्राथमिक शाळेंतील शिष्यवृत्त्या व ट्रेनिंग किंवा इतर सरकारमान्य संस्थेंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा पगार (Stipend) .

(फ) प्रवासखर्च.

(ग) स्टेशनरीसाठीं, टपालासाठीं, छपाईसाठीं येणारा व इतर कचेरीचा खर्च.

(ह) मान्य केलेल्या शाळांना दिलेली मदतीची रक्कम.

(आय्) सरकारमंजूर असेल तो इतर योग्य खर्च.

हा झाला सालोसालच्या (Recurring) खर्चाचा प्रश्न. परंतु कांहीं वेळेला नैमित्तिक (Non-recurring) खर्चहि करावा लागतो. त्या बाबतींत सरकार कोणत्या बाबीबद्दल खर्च देईल व काय प्रमाणांत देईल याचा उल्लेख नियम ११४ मध्यें केला आहे. त्या नियमाप्रमाणें शाळागृह विकत घेण्यासाठीं किंवा त्याच्या शंभर रुपयांपेक्षां अधिक रकमेच्या खास दुरुस्तीसाठीं, शाळाग्राहकरितां जागा विकत घेण्यासाठीं, नियम ११२क मध्यें दर्शविलेल्यापेक्षां अधिक रकमेचें लाकडी सामान, शिक्षणसाहित्य व पुस्तकें विकत घेण्यासाठीं वगैरे जो खर्च येईल, त्या खर्चाच्या $\frac{1}{2}$ व $\frac{1}{3}$ इतकी रक्कम अनुक्रमें म्युनिसिपालिटी व लोकलबोर्डास देण्यांत येईल. मात्र हा खर्च या बाबी सक्तीच्या शिक्षणाच्या योजनेच्या संबंधीं नसतील त्यावेळीं त्यांच्यावर झालेल्या खर्चाचा हिस्सा देणें सरकारच्या आर्थिक स्थितीवर अवलंबून राहील. म्हणजे सक्तीच्या शिक्षणाची योजना अमलांत येत असतांना वर कलम ११४

प्रमाणें आपल्या हिश्याची रक्कम देण्याला सरकार बांधलें गेलें आहे. इतर वेळीं तें तसें बांधलें गेलें नाहीं.

जिल्हाबोर्ड व बिगरस्थानिक संस्था (म्युनिसिपालिट्या):—ज्या म्युनिसिपालिट्यांना शाळा चालविण्याचा अधिकार नाहीं त्यांना बिगरस्थानिक-संस्था, (Non Local Authority) म्युनिसिपालिट्या असें म्हणतात. या म्युनिसिपालिटींच्या क्षेत्रांतील शाळा त्या म्युनिसिपालिट्या ज्या जिल्ह्यांत असतील त्या जिल्ह्याच्या बोर्डामार्फत चालविण्यांत येतात.* या म्युनिसिपालिट्यांच्या हद्दींत ज्या शाळा जिल्हाबोर्डामार्फत चालविण्यांत येतात त्याबद्दल जो कारभाराचा खर्च येईल त्याचा $\frac{1}{3}$ हिस्सा या म्युनिसिपालिट्यांनीं द्यावयाचा असतो. या $\frac{1}{3}$ हिश्याची आकारणी नियम ११९ मध्यें सांगितल्याप्रमाणें करावयाची असते. या नियमाप्रमाणें दर विद्यार्थ्यामागें येणाऱ्या सालोसालच्या खर्चाचा आंकडा प्रथम निश्चित करावा लागतो. हा सरासरी खर्चाचा आंकडा काढतांना व्यवस्थेसाठीं किंवा देखरेख वगैरेसाठीं येणारा खर्चहि विचारांत घ्यावा लागतो. या सरासरी खर्चाच्या आंकड्याला त्या सालीं म्युनिसिपल हद्दींतील मुलांच्या संख्येनें गुणून जो आकडा येईल त्याचा $\frac{1}{3}$ हिस्सा, व त्यांत म्युनिसिपल हद्दींतील शाळांना मदत म्हणून यावयाच्या अंदाजी रकमेचा $\frac{1}{3}$ हिस्सा मिळवून जी रक्कम होते, तेवढी रक्कम म्युनिसिपालिट्यांना जिल्हाबोर्डाला द्यावी लागते.

परंतु हा अंदाजी खर्च असतो. सालअखेरीस एकंदर प्रत्यक्ष खर्च किती झाला व प्रत्यक्ष मुलें शाळेंत किती होतीं हें पाहून म्युनिसिपालिटयांच्या प्रत्यक्ष हिश्याची रक्कम किती हें काढतात व अंदाजानें म्युनिसिपालिटयांकडून घेतलेल्या रकमेपेक्षां प्रत्यक्ष सालअखेर घेतलेल्या हिश्याची रक्कम कमी निघाली तर जो फरक निघेल, तो पुढील सालची अंदाजी रक्कम ठरविल्यानंतर त्या रकमेंतून कमी करण्यांत येतो.

म्युनिसिपालिटीच्या हिश्याची अंदाजी रक्कम जिल्हाबोर्डांना दोन सारख्या सहामाही हप्त्यानें द्यावी लागते. पहिला हप्ता १० एप्रिलच्या आंत द्यावा लागतो व दुसरा हप्ता १० आक्टोबरच्या आंत द्यावा लागतो. हप्ता वेळेवर

---

* प्रा. शि. नि. ११७

न आल्यास त्या रकमेवर दरसाल दर शेंकडा रु. ७॥ पेक्षां कमी नाहीं व रु. १० पेक्षां जास्त नाहीं अशा दरानें दंडादाखल व्याज अधिक मागतां येतें.

नियम १२०–१२१ प्रमाणें सरकार, आर्थिक परिस्थिति बरी असली तर सालोसालचा नाहीं–नैमित्तिक–(non recurring)–अशा खर्चाबद्दलहि म्युनिसिपालिट्यांकरितां कांहीं मदत देऊं शकतें; व मग अशी सरकारकडून आलेली रक्कम वजा करितां बाकीची होणारी रक्कम म्युनिसिपालिटयांना द्यावी लागते.

हिंदुस्थानांत व विशेषतः मुंबई प्रांतांत प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाच्या बोजाची कशी विभागणी व तर्तूद केली आहे याचें वर वर्णन दिलें आहे. आतां या पद्धतीशीं तुलना करण्यासाठीं इंग्लंडमध्यें याच बाबतींत कोणती पद्धत पूर्वी होती व हल्लीं आहे हें पाहूं.

इंग्लंडमधील खर्चाची जबाबदारी—सन १८३३ पूर्वी इंग्लंडमधील शिक्षणाची सर्व जबाबदारी निरनिराळ्या ख्रिस्तीधर्माच्या पंथांनीं पत्करिलेली होती. लोकांना शिक्षण देणें हें एक धर्माचें अंग आहे असें ख्रिस्तिधर्माचार्यांना वाटत असल्यामुळें या बाबतींत सर्वतोपरी जबाबदारी अंगीकारून शक्य तितक्या अधिक लोकांना, आपल्या धर्मपंथाच्या कल्पनेप्रमाणें, ते शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत असत. अर्थात् या धर्म-पंथांनीं चालविलेल्या शिक्षण-संस्थांमधून धार्मिक शिक्षणावर बराच भर देण्यांत येत असे व हें धार्मिक शिक्षण, ती संस्था ज्या पंथामार्फत चालविण्यात येत असे, त्या पंथाच्या धार्मिक कल्पनांप्रमाणें देण्यांत येत असल्यामुळें, जो मनुष्य ज्या धर्मपंथाचा असे, त्याच धर्मपंथाच्या संस्थांत तो स्वतः शिक्षण घेई किंवा आपलीं मुलें पाठवी. १८३३ पूर्वी अशा तऱ्हेनें शिक्षण देण्याच्या चालू कार्यांत सरकार कोणत्याहि तऱ्हेनें भाग घेत नसे. कारण, शिक्षण देण्याचें कार्य सरकारच्या कर्तव्यांपैकीं एक कर्तव्य आहे, या आजकाल सर्वमान्य झालेल्या कल्पनेचा त्यावेळीं उगमच झाला नव्हता.

सन १८३३ सालीं पार्लमेंटनें २०००० पौंडांची रक्कम गरीब वर्गांतील मुलांच्या शिक्षणाला मदत करण्यासाठीं मंजूर केली. त्यावेळीं सरकारचें शिक्षणावर देखरेख करणारें खातेंच नव्हतें. त्यामुळें १८३३ ते १८३९ पर्यंत ही दरसाल मंजूर होणारी रक्कम फडणवीस (Treasury) खात्यामार्फतच अदा करण्यांत आली. सार्वजनिक शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठीं पार्लमेंट

ज्या रकमा मंजूर करील त्या रकमांच्या विनियोगावर देखरेख करण्यासाठीं म्हणून सन १८३९ सालीं प्रीव्ही कौन्सिलची एक कमिटी नेमण्यांत आली. या कमिटीचा जन्मच मोठ्या वादळांत झाला. या कमिटीकडे देखरेखी-(Superintendence) चें जें काम सोपविण्यांत आलें त्यामुळेंच सरकारचा धार्मिक पंथाच्या शिक्षणकार्यांत ढवळाढवळ करण्याचा इरादा, आहे असा संशय येऊन वादाची रणधुमाळी माजली. प्रसिद्ध पुढारी डिझरायली यांनीं या सरकारच्या हेतूला जोराचा विरोध केला.*

या सर्व वादाचा परिणाम असा झाला कीं, या कमिटीचे देखरेखीचे अधिकार १८७० पर्यंत अतिशय मर्यादित अशा स्वरूपाचे राहिले. १८७० सालीं सक्तीच्या शिक्षणाचें तत्त्व सरकारनें मान्य केल्यामुळें त्या शिक्षणाची विशेष जबाबदारी सरकारवरच येऊन पडली व त्यामुळें सरकारच्या शिक्षण-खात्याप्रमाणें असणाऱ्या या कमिटीला अधिक अधिकार प्राप्त झाले. सन १८७० पर्यंत सरकार, वेळोवेळीं पार्लमेंट ज्या रकमा मंजूर करीत त्या रकमा, शिक्षणप्रसाराचें कार्य करणाऱ्या खाजगी संस्थांना, वांटण्यापलीकडे दुसरें कार्य करीत नसे. या रकमा कशा व कोणत्या अटीवर वांटावयाच्या हें ठरविण्याचा अधिकार या सरकारी शिक्षणखात्याला असल्यामुळें, साहाजिकच या खात्याचें वजन वाढण्यास मदत झाली; परंतु १८७० च्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यानेंच या खात्याला प्राथमिक शिक्षणाच्या सुधारणेसाठीं व विस्तारासाठीं प्रत्यक्ष कार्य करण्याचा अधिकार प्राप्त झाला. १८७० पर्यंत शिक्षण ही एक राष्ट्रहिताची बाब आहे असें समजण्यांत येत नसे. १८७० पूर्वीं सरकारचें शिक्षणाशीं काय नातें होतें याचें त्यावेळचे फडणवीस (Chancellor of Exchequer) मि. लोव यांनीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे. "ज्याला 'सार्वजनिक शिक्षण' म्हणतां येईल असें शिक्षण हल्लीं नाहीं. लोकांना शिक्षण देण्याच्या कार्यांत लक्ष घालणाऱ्या कांहीं खाजगी संस्थांच्या प्रयत्नालाच हल्लीं सार्वजनिक शिक्षण (Public Education) असें म्हणण्यांत येत आहे. आम्ही नेटकपणानें पुढारीपण स्वीकारण्याच्या ऐवजीं मित्रेपणानें अनुयायित्व पत्करलें आहे. आम्हाला (सरकारला) ज्या ठिकाणीं पैशाची अतिशय जरुरी आहे अशा ठिकाणीं मदत करतां येत नाहीं आणि

---

* B. E. 3-4.

राष्ट्राचें शिक्षण हा राष्ट्रीय प्रश्न आहे, अशा रितीनें आम्हाला विचारही करतां येत नाहीं."‡

१८७० च्या कायद्यानें सरकारच्या खात्याला अनेक हक्क प्राप्त झाले. सदर कायद्यानें मदतीच्या विशेष अटी ठरविल्या. गेलीं चाळीस वर्षें इमारती-साठीं देण्यांत येणारी मदत बंद केली, योग्य तऱ्हेच्या शिक्षणासाठीं मदत देण्यावर भर दिला आणि दरिद्री भागासाठीं खास मदत देण्याची तर्तूद केली. पूर्वीं नुसत्या ठरावानें जी मदत करण्यांत येत असे त्या मदतीला या १८७० च्या कायद्यानें कायद्याच्या चौकटींत बसविलें.

१८८८ मध्यें मध्यवर्ती सरकारनें स्थानिक संस्थांना उत्पन्नाच्या कांहीं बाबी (Taxes) तोडून दिल्या. पूर्वीं नुसती मदतीची रक्कम स्थानिक संस्थांना मिळत असे व त्यांचें स्थानिककरांचें उत्पन्नहि त्यांना मिळत असे. या दोन उत्पन्नाच्या बाबींत, १८८८ सालीं सरकारनें कांहीं करांचें उत्पन्नच त्यांना बहाल केल्यामुळें, भर पडून त्यांची सांपत्तिक स्थिति चांगलीच सुधारली.

१८३३ पासून ते थेट १९१८ पर्यंत सरकारकडून शिक्षणासाठीं ज्या मदतीच्या रकमा मिळत असत त्या कांहीं विशेष बाबींसाठीं म्हणून मिळत असत; उदाहरणार्थ, शाळागृहें, ट्रेनिंग कॉलेजेस, लाकडी सामान व शिक्षणसाहित्य, पुस्तकें व नकाशे, छात्रशिक्षक (Pupil teachers) सर्टिफिकेटेड शिक्षक, नियमित हजरी, कांहीं विशेष विषयांत प्राविण्य, फी माफ करणें वगैरे अनेक बाबींचा नामनिर्देश करून त्या बाबींसाठीं म्हणून उत्तेजनार्थ स्वतंत्र मदत करण्यांत येत असे. अशा एकंदर ५७ मदतीच्या बाबी होत्या; त्यांपैकीं १७ प्राथमिक शिक्षणासाठीं व ४० उच्च शिक्षणाप्रीत्यर्थ होत्या. परंतु या सर्व स्वतंत्र देणग्यांचें १९१८ सालीं एकीकरण करण्यांत येऊन प्राथमिक शिक्षणासाठीं व उच्च शिक्षणासाठीं अशा ठोकळ एकवट देणग्या देण्यांत येऊं लागल्या.

आरंभीं या मदतीचें प्रमाण निश्चित असें ठरलें नव्हतें. साधारणपणें सरकारनें निम्मी रक्कम द्यावी व स्थानिक उत्पन्नांतून निम्मी रक्कम खर्च करण्यांत यावी असें धोरण असे; परंतु या धोरणाप्रमाणें बिनचूक वागण्यांत येई असें नव्हतें. १८६४ सालीं ट्रेनिंग कॉलेजें चालविण्यासाठीं सरकारकडून

‡ B. E. 7–8.

एकंदर खर्चाच्या ७५ टक्के मदत झाली व १९०२ सालीं ऐच्छिक तत्त्वावर निघालेल्या प्राथमिक शाळांच्या एकंदर खर्चापैकीं शेंकडा ७८ खर्च सरकारकडून देण्यांत आला.¶

१८९७ सालीं "स्थानिक करा–" बाबत विचार करण्यासाठीं एक "रॉयल कमिशन" नेमण्यांत आलें. त्या कमिशननें १९०१ पर्यंत काम करून आपल्या शिफारशी प्रसिद्ध केल्या. कमिशनमधील सभासदांचें मतैक्य न झाल्यामुळें बहुमत-वाल्यांच्या व अल्पमत-वाल्यांच्या अशा भिन्न शिफारशी करण्यांत आल्या. बहुमतवाल्या पक्षानें 'स्थानिक संस्थांना कांहीं करांचें उत्पन्न तोडून (Assigned) दिलें नंतर मध्यवर्ति सरकारनें अधिक मदत करण्याची जरूरी नाहीं' असें मत मांडलें. उलट, अल्पमतवाल्या पक्षानें 'कांहीं करांचें उत्पन्न तोडून दिलें तरी काटकसर (economy), कार्यक्षमता (efficeency) व एकरूपता (uniformity) संपादण्यासाठीं मदतीची आवश्यकता' व्यक्त केली. या दोन्ही पक्षानें 'शिक्षणाची बाब राष्ट्रीय महत्त्वाची आहे' हें मात्र एकमतानें मान्य केलें.

सन १९११ सालीं सरकारनें पुन्हां एक खात्याची कमिटी (departmental committee) स्थानिक करांच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं नेमली. १९०२ चा कायदा अमलांत आल्यानंतर जी नवीन परिस्थिति जन्माला आली होती व जे कांहीं नवीन प्रश्न या बदललेल्या परिस्थितीमुळें अस्तित्वांत आले होते, त्यांचा साकल्यानें विचार करून शिक्षणाच्यासाठीं करावयाच्या आर्थिक योजनेसंबंधीं कमिटीनें अनेक उपयुक्त सूचना केल्या. १८९७-१९०१ च्या कमिशनप्रमाणें या कमिटीनेंहि 'एकवट मदतीच्या रकमा (block grants) देण्यांत याव्यात व कंगाल भाग व श्रीमंत भाग असा फरक करून कंगाल भागाला अधिक सढळ हातानें मदत करण्यांत यावी' अशा महत्त्वाच्या शिफारशी केल्या. त्याचप्रमाणें ज्या स्थानिक खर्चाला मदत करण्यासाठीं सरकारी मदत देण्यांत येते, त्या स्थानिक खर्चाच्या वाढीबरोबर आपोआप सरकारी मदतीचें प्रमाणहि वाढत जाईल अशीहि तर्तूद करण्यांत यावी, अशी सूचना केली.

सन १९१४ ते १९१८ सालापर्यंत सत्तारूढ असलेल्या पक्षानें १९११ च्या कमिटीच्या सूचनांप्रमाणें धोरण ठेवलें; परंतु १९२० नंतरच्या आर्थिक

¶ B. E. 85.

मंदीमुळें सरकारचें काटकसरीचें धोरण सुरू झालें; त्यामुळें सरकारनें एकंदर खर्चाच्या विशिष्ट प्रमाणांत मदत देण्याचें धोरण चालू ठेवलें तरी, एकंदर खर्चावर नियंत्रण ठेवून तो खर्चाचा आंकडा, सरकारला झेपेल येवढीच मदत देतां येईल, अशा मर्यादेंत ठेवण्याचा उपक्रम सुरू केला, त्यामुळें खर्चाचा आंकडा बराच खालीं आला. आर्थिक परिस्थितींत वेळोवेळीं फेर बदल होत गेला, त्याप्रमाणें सरकारचें धोरणांतहि कमी जास्त बदल झाला. कांहीं काल 'ठराविक रकमा' (Fixed Grants) देण्याच्या धोरणाचाहि आर्थिक टंचाईमुळें पुरस्कार करण्यांत आला; परंतु अखेर सरकारनें "शिक्षणाची बाब नेहमीं वाढणारी असल्यामुळें अमर्याद खर्चाची जबाबदारी जरी पत्करली नाहीं तरी अगदीं ठराविक किंवा मोजकी रक्कम देण्याचें धोरण स्वीकारूनहि भागणार नाहीं, उलट, खर्चाच्या आंकडयाशीं विशेष कांहीं प्रमाणांत मदत करण्याचें धोरणच ठेवणें शिक्षणाच्या वाढीस पोषक आहे" हें तत्त्व मान्य केलें व त्याच तत्त्वाप्रमाणें हल्लीं मदत करण्यांत येत असते. ‡ प्रत्येक भागाचा आर्थिक मगदूर व गरज पाहून हें मदतीचें प्रमाण ठरविण्यांत येतें. १९२४-२५ सालीं कांहीं भागांत शेंकडा ४९ मदत दिली तर कांहीं भागांत खर्चाच्या शेंकडा ७० मदत देण्यांत आली. एकंदर सरासरी सरकारी मदत शेंकडा ५६·६ इतकी होती. ¶

ही जी कांहींशा विस्तारानें माहिती दिली आहे त्यावरून इंग्लंडमध्यें सरकारचे व स्थानिक संस्थांचे शिक्षणाच्या बाबतींत कसे संबंध होते व आहेत याची थोडीफार कल्पना येईल.त्या परिस्थितीचा व मुंबई प्रांतांतील सरकारच्या मदतीचें प्रमाण पाहिल्यावर विलायत सरकारपेक्षां मुंबई सरकार, मदतीचें प्रमाण ठरविण्याच्या बाबतींत अधिक उदार आहे, असें कांहीं वाचकांना वाटण्याचा संभव आहे; परंतु त्यांनीं कांहीं महत्त्वाच्या गोष्टी लक्षांत ठेवणें जरूर आहे. पहिली गोष्ट अशी कीं, इंग्लंडमधील लोक सरासरीनें हिंदुस्थानांतील माणसापेक्षां कितीतरी अधिक पटीनें श्रीमंत आहेत. इंग्लंडमधील प्रत्येक माणसाच्या वार्षिक उत्पन्नाची सरासरी ६७० रुपये पडते तर हिंदुस्थानांतील माणसाचें दरसालचें उत्पन्न ५४ रु. पडतें.* लोक साधारण सुस्थितींत असल्यामुळें अनेक लोक आपल्या मुलांच्या शिक्षणाचा सोय करूं शकतात व त्यामुळें स्थानिक संस्थेवर खर्चाचा भार कमी पडतो. याच्या उलट, हिंदुस्थानांतील

‡ B. E. 113-14 ¶ B. E. 119 *Harijan. 21-8-37.

गरीब लोकांची—दररोजच्या ओबडधोबड अन्नास महाग असलेल्या कंगाल लोकांची-संख्या फारच मोठी असल्यामुळें अशा लोकांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय करणाऱ्या स्थानिक संस्थेला पाट्यापेन्सिली देण्यापासून तयारी करावी लागते व त्यामुळें इकडे स्थानिक संस्थांना दर मुलामागें अधिक खर्च येतो. दुसरी गोष्ट अशी कीं, तिकडील स्थानिक संस्थांना उत्पन्नाचे जे झरे दिले आहेत ते चांगले भरपूर प्रवाहानें वहाणारे आहेत. उलट, सरकारनें आमच्या स्थानिक संस्थाच्या गोठ्यांत जवळ जवळ भाकड म्हणतां येतील अशा उत्पन्नाच्या बाबीरूपी गाई बांधल्या आहेत. तिकडील स्थानिक संस्थांना स्वतःचेंच चांगलें उत्पन्न असल्यामुळें सरकारची कमी मदत झाली तरी त्यांची तारांबळ उडत नाहीं. आमच्याकडे स्थानिक संस्थांचें उत्पन्नच तुटपुंजें असल्यामुळें सरकारच्या मदतीवांचून त्यांचें पाऊल पुढें पडणें शक्य नाहीं. आमच्या स्थानिक संस्थांच्या उत्पन्नाच्या बाबी कशा भाकड स्वरूपाच्या आहेत हें कै. नामदार गोखले यांनीं दिल्ली कायदे-मंडळांत त्या बाबत ता. १३—३—१९१२ रोजीं एक महत्त्वाचा ठराव मांडून व त्यावर माहितीनें भरलेलें वक्तृत्वपूर्ण भाषण करून सरकारच्या स्पष्टपणें निदर्शनास आणलें आहे. † कै. ना. गोखले यांनीं १९१२ सालीं जी परिस्थिती वर्णन केली ती आजहि तंतोतंत तशीच आहे. या परिस्थितीमुळें इकडील स्थानिक संस्थांना सरकारच्या तोंडाकडे मदतीसाठीं, आशाळभूत नजरेनें पहाण्यावांचून गत्यंतरच नाहीं.

प्राथमिक शिक्षणासाठीं खर्च पडणारा पैसा कोठून येतो हें आपण पाहिलेंच आहेच. सरकारी मदत, स्थानिक संस्थाचें स्वतःचें उत्पन्न व फी वगैरेमुळें येणारें उत्पन्न, असें विशेषतः तीन महत्त्वाच्या झऱ्यांतून प्राथमिक शिक्षणाला आर्थिक जीवन मिळतें याचा उल्लेख मागें आला आहेच. आतां या तीन सदरांतून वेळोवेळीं मुंबई प्रांतांत किती व काय प्रमाणांत खर्च झाला तें पाहूं:- हंटरकमिशननें १८८२ सालीं किती खर्च झाला याचे आंकडे दिले आहेत. त्याचप्रमाणें १९२२ सालीं जुनी राज्यघटना संपुष्टांत येऊन मॉंटेग्यू—चेम्सफोर्ड—प्रणीत सुधारणा सुरू झाल्या म्हणून त्या सालचे आंकडे पाहूं. त्यानंतर १९३२ सालचे आंकडेहि घेऊं. १८८२ च्या आंकड्यांशीं तुलनेसाठीं १९३५-३६ चे म्हणजे अर्ध शतकानंतरचे आंकडे फार उपयोगीं पडतील.

---

† गोखले पा. ५६८—८५.

प्राथमिक शिक्षणासाठीं निरनिराळ्या तिजोरींतून होणारा एकंदर खर्च—तक्ता नं० १८

	१८७०-७१ रु.	१८८१-८२ रु.	१९१६-१७ रु.	शें. खर्च	१९२१-२२ रु.	शें. खर्च	१९२९-३० रु.	शें. खर्च	१९३५-३६ रु.	शें. खर्च
सरकारी तिजोरींतून	२३३५११	३४१७३८	३३५७१८२	५२·९	९८२२३७८	६५·७	१२६११४३०	६२·६	११०११५६	५३·१
लोकल फंडांतून	६८२७११	७८७१३२	६४८६१३	१०·२	५८२०१२	३·९	५४३०१५५	२६·३	६५९४०२८	३२·३
म्युनि. फंडांतून			११५२२४०	१८·१	२७६४९६४	१८·५				
फीचे उत्पन्नांतून	२१५०५	१९४४८१	४७३१४४	७·५	५१७३८१	३·५	४९६०४३	२·५	७६१३४८	३·७
हुनर उत्पन्नांतून	१७०१०१	४५१२९४	७१६४१०	११·३	१२६६११२	८·४	१६१४६७९	८·०	२०६४५१६	१०·१
	१२१७८७६	१७७८६४५	६३४७१८९	१००	१४९५२८४७	१००	२०१५२३०७	१००	२०४३९०८८	१००

या तक्त्यावरून एक गोष्ट प्रामुख्यानें दिसून येते. या एकंदर खर्चापैकीं १९२१–२२ व १९२९–३० सालीं सरकारनें अनुक्रमें शेंकडा ६५·७ व ६२·६ इतका खर्च आपल्या स्वतःच्या खजिन्यांतून केला होता, परंतु हें सरकारी मदतीचें प्रमाण १९३५–३६ सालीं ५३·९ पर्यंत खालीं घसरलें. उलट, १९२९–३० पेक्षां स्थानिक संस्थांच्या हिश्याचें प्रमाण शें. ५·४ नें वाढलें. म्हणजे प्रांतिक-शिक्षण खातें लोकनियुक्त दिवाणांचे हातीं दिल्यानंतर सरकारनें आपल्या मदतीच्या प्रमाणांत वाढ करण्याऐवजीं तें कमी कमी करीत १९३५–३६ चें प्रमाण १९१६–१७च्या प्रमाणाच्या जोडीस नेऊन ठेविलें. हें मदतीचें प्रमाण कमी होण्याचें कारण म्हणजे सरकारनें, आर्थिक अडचणीच्या सबबीवर, स्थानिक संस्थांस द्यावयाच्या रकमेंत १९३२–३३ सालापासून निरनिराळ्या प्रमाणांत कपात करावयास सुरवात केली हें होय.¶ दुबळ्या माणसाला पौष्टिक द्रव्यें असलेला अधिक खुराक देण्याऐवजीं, उलट, त्याचें मीठ तोडण्यासारखाच नाहीं का हा प्रकार?

प्राथमिक-शिक्षणाप्रमाणें सरकार दुय्यम व उच्च शिक्षणासाठींही आपल्या गंगाजळींतून द्रव्य खर्च करतें. निरनिराळ्या प्रकारच्या शिक्षणासाठीं सरकारनें कोणत्या प्रमाणांत खर्च केला आहे, हें पुढील पानावरील तक्त्यावरून दिसून येईल.

¶ निरनिराळ्या सालीं सरकारन खालील प्रमाणात कपात केली आहे.

साल	कपात
१९३२–३३	१९½
१९३३–३४	१२
१९३४–३५	१२
१९३५–३६	८
१९३६–३७	८

} या कपातीमुळें एकट्या पुणें जिल्हास्कूलबोर्डाचें एकंदर रु. ३३०२८० नुकसान झालें!

तक्ता नं० १९

साल	१८८१–८२ खर्च रु.	शें. खर्च	१९२१–२२ खर्च रु.	शें. खर्च	१९२६–२७ खर्च रु.	शें. खर्च	१९३१–३२ खर्च रु.	शें. खर्च	१९३५–३६ खर्च रु.	शें. खर्च
उच्च शिक्षण	९०५६७	९·७६	११७०४५३	६·९	१२६०६७०	६·३	१२४४२५५	६·६	१०४४४५९	५·९
दुय्यम शिक्षण	१८३३६७	१९·७५	१९२९७७७	११·३	२२६९५५४	११·५	२२५३७६३	११·९	२२५७६५०	१२·७
प्राथमिक शिक्षण	२७४१४६	२९·५३	९८२२३७८	५७·८	१२१५९८३९	६१·४	११८१७३०८	६२·३	११०१९१५६	६२·१
धंदेशिक्षण वगैरे	६०४४५	६·५१	१४८६०७५	८·८	१२५७८११	६ ४	१०९३६५१	५·८	१०७६३३४	६·१
तपासणी वगैरे	३१९८१३	३४·४५	१४६५८८०	८ ६	२८५२४०७	१४·४	२५४८४२१	१३·४	२३४४३३६	१३ २
एकंदर	९२८३३८	१००	१६९८८२५९	‡	१९८००२८१	१००	१८९५७३६८	१००	१७७४१९३५	१००

‡ मुं. पं. रि. (१९१७–२२) पा. ५५.

या तक्त्यांत जो सरकारचा एकंदर खर्च दाखविला आहे, त्याचा खरा फायदा शहरांतील लोकांना होतो का खेडयांतील लोकांना होतो याचा विचार केला तर या पैशांपैकीं निदान निम्यापेक्षां अधिक रक्कम शहरांतील लोकांच्या उपयोगीं पडत आहे, असें म्हणावें लागेल. १९३५-३६ चेच आंकडे घेतले तरी उच्च व दुय्यम शिक्षणाप्रीत्यर्थ एकंदर शेंकडा १८·६ हा खर्च पूर्णपणें शहरांतील लोकांसाठींच झाला आहे. धंदे-शिक्षणासाठीं ६·१ इतका खर्च झाला. त्यापैकीं खेडयांत प्राथमिक शिक्षकांना ट्रेनिंग देण्यासाठीं शेंकडा १ इतका झालेला खर्च कमी केल्यास बाकी ५·१% खर्च शहरासाठींच झाला. त्याचप्रमाणें तपासणीसाठीं १३·२% खर्चापैकीं खेड्यांतील प्राथमिक शाळांसाठीं जी तपासणी झाली त्याबद्दल ३·२% इतका खर्च वगळल्यानंतर बाकी १०% खर्च शहरांच्या नांवेंच मांडावा लागेल व बाकी जो प्रत्यक्ष प्राथमिक शाळांसाठीं खर्च आला त्यापैकीं म्युनिसिपल हद्दींतील प्राथमिक शाळांतील मुलांच्यासाठीं शेंकडा १७ खर्च आला आहे. म्हणजे एकंदर सरकारी खर्चापैकीं ५०% इतका खर्च शहरांसाठीं होऊन बाकी सुमारें ५०% खर्च खेड्यांच्या कारणीं लागला म्हणजे एकंदर लोकसंख्येपैकीं शहरांत २२ टक्के प्रमाणांत राहणाऱ्या लोकांसाठीं सरकारनें शेंकडा ५०† खर्च केला व खेड्यांत राहणाऱ्या शेंकडा ७८ लोकांसाठींहि तेवढाच खर्च केला शहरांना शिक्षणाची मेदवृद्धि झाली असून खेड्यांतील लोकांत शिक्षणाचा क्षयच दिसून येतो. तरीहि शहरांतील लोकांनाच बदामाची खीर देण्यांत येत असून, खेडयांतील लोकांना हुलग्याचें माडगेंच फक्त देण्यांत येत आहे. शहरांतील अल्पसंख्यांक लोकांच्या सुखसोईसाठीं खेडयांतील बहुसंख्यांक व प्रांतिक तिजोरींत कर देऊन खरी भर घालणाऱ्या लोकांची ही उपासमार कधीं थांबणार? आपल्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी शहरांतील अधिक संपन्न लोकांच्या खिशावरच टाकून सरकारी पैशाचा विनियोग फक्त खेडुतांच्या शिक्षणासाठीं करण्याची आवश्यकता तरी सरकारला कधीं

---

† "Of the total expenditure on education in British India only 30% represents expenditure on education in rural areas, while the rural population is about ten times as large as the urban according to the Census of 1931."

B. Kumarappa,
Harijan 7th August 1937, P. 205

पटणार ? इंग्लंडमधील लोकांना पाव लोणी देण्यासाठीं हिंदुस्तानची उपासमार करण्यांत येते व शहरांतील लोकांच्या पुरणपोळीसाठीं खेड्यांतील लोकांना भाकरीलाहि महाग करण्यांत येते. या दोन्ही गोष्टी कधीं बंद होणार हें परमेश्वर तरी सांगूं शकेल का ?

प्राथमिक शिक्षणासाठीं जो खर्च करण्यांत येत आहे, त्या खर्चाचा पुरा उपभोग आमच्या लोकांना होत नाहीं, याला दोन कारणें आहेत. एक आमचें शिक्षण फार महागाईचें झालें आहे व दुसरें या खर्चांत पुष्कळ पैसा व्यर्थ खर्च केला जातो. या दोन्ही कारणांचा क्रमानें विचार करूं.

(१) **महाग शिक्षण**—आपल्या प्रांतांतील शिक्षण फार महाग झालें आहे, ही गोष्ट पुनर्घटना कमेटीनें कबूल केली आहे.§ मुलांच्या प्राथमिक शाळांपैकीं प्रत्येक विद्यार्थ्यांस शिकविण्यासाठीं दरसाल किती खर्च येतो हें खालीं दाखविलें आहे.

तक्ता नं. २०

	१८८१–८२		१९१६–१७		१९२१–२२		१९३१–३२	
	रु.	आ. पै.	रु.	आ. पै.	रु.	आ. पै.	रु.	आ. पै.
सरकारी शाळा			१७	९ ८	३४		३०	४ ०
लोकल बोर्ड	४	७ ०	८	४ ९	१७	१ ७	१५	११ ०
म्युनिसिपालिटी			१२	०	२५	११ २	२४	९ ०
मदतीच्या शाळा	६	० ३	९	६ ५	१३	६ ५	१६	४ ०
विनमदतीच्या ,,	४	६ ७	१३	१ ७	१७	४ ९	१२	१५ ०

या तक्त्यावरून सरकारी, बोर्डाच्या, म्युनिसिपालिटीच्या वगैरे शाळांसाठीं किती खर्च येतो याची वाचकांना कल्पना येईल.

या खालीं १८८१–८२ सालापासून ते थेट १९३५–३६ पर्यंत प्रत्येक मुलासाठीं सरासरीनें दरसाल येणारा खर्च कसा वाढत गेला आहे हें दाखविणारा तक्ता पुढील पानावर दिला आहे.

§ चा. १२९ " Primary education in Bombay is more costly than in any other part of India "

तक्ता नं. २१

साल.	रु. आ. पै.
१८८१–८२	४–१५–३
१९०६– ७	७–११–१
१९११–१२	८– ६–५
१९१६–१७	९–१०–२
१९२१–२२	१९– ०–०
१९२६–२७	२०– ०–०
१९३१–३२	१७–१३–०
१९३५–३६	१८–१५–०

या तक्त्यावरून शिक्षणाच्या खर्चांत अतिशय वाढ १९२०च्या नंतर झाली आहे, हें दिसून येईल. ही वाढ होण्याचें मुख्य कारण म्हणजे शिक्षकांना केलेली पगारवाढ हें होय. १९१६–१७ सालीं प्रत्येक मुलामागें जो खर्च येत असे, त्याच्या जवळजवळ दुपटीनें खर्च १९२०–२१ नंतर येऊं लागला. म्हणजे प्राथमिक शिक्षणासाठीं होणाऱ्या एकंदर खर्चाची रक्कम दुपटीनें वाढली;तरी मुलांच्या संख्येंत त्या मानानें वाढ झाली नाहीं, हें खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

तक्ता नं. २२

	१९१६–१७	१९३५–१९३६	शेंकडा वाढ
मुलांची संख्या.	६५२६१८	१२४८०१२	१९१·२
खर्च केलेली रक्कम रु.	६३४७५८९	२०४३९०८८	३२१·९

शिक्षकांच्या पगारवाढीप्रमाणें 'शाळांसाठीं इमारती कशा असाव्यात' या बाबतींत खात्यानें जे नियम केले आहेत त्यामुळेंही खर्च वाढला आहे. हेंही नमूद करणें जरूर आहे. आपल्या प्रांतांतील शिक्षणाचा खर्च इतर प्रांतांपेक्षां किती जास्त आहे हें दाखविण्यासाठीं खालीं निरनिराळ्या प्रांतांच्या खर्चाचे आंकडे दिले आहेत.—**तक्ता नं. २३**

प्रांत	१८८१ ते १८८२	१९२९ ते १९३०	प्रांत	१८८१ ते १८८२	१९२९ ते १९३०
मुंबई	४–१५–३	१८-११-०	ब्रि० ओरिसा		७–१–०
मद्रास	४–१२–१	८–६–०	मध्यप्रांत–		
बंगाल	३– २–३	४–४–०	व वऱ्हाड	२–१०–१	११-१५-०
संयुक्त प्रांत		८–९–०	आसाम	२– ३–४	५–६–०
पंजाब	७– १–५	११–९–०	वायव्य–		
ब्रह्मदेश		११-१२·०	स. प्रांत		१३–६–०

या तक्त्यावरून १८८१–८२ सालीं निरनिराळ्या प्रांतांत सरासरी खर्चाचें प्रमाण काय होतें व १९२९–३० सालीं तें काय झालें याची वाचकांना कल्पना येईल. इतका खर्च करूनही साक्षरता टिकाऊ झाली नाहीं! असें कां तें आतां पाहूं.

(२) व्यर्थव्यय (Wastage)—प्राथमिक शिक्षण निदान मराठी चवथी इयत्ता पुरी होईपर्यंत घेतलें तर तें शिक्षण घेणाराची साक्षरता टिकते. चार इयत्तांपर्यंत शिक्षण न घेतां मध्येंच शिक्षण सोडून जाणारा मुलगा पुन्हा थोड्याच दिवसांत शिकलेली बहुतेक विद्या विसरून, पूर्ववत् सहीचा मालक रहातो. इंग्लंडमध्यें कांहीं ठराविक शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांची शिकलेली विद्या नाहींशी होऊं नये, म्हणून पुढील शिक्षणाचे वर्ग (Continuation Classes) चालविण्यांत येतात. परंतु आमच्याकडे जेथें ठराविक शिक्षणच प्रत्येक मुलानें घेण्याची तरतूद करण्यांत आलेली नाहीं, तेथें अशा वर्गांचें नांव तरी कोठून ऐकूं येणार!

बालवर्गांत घातलेल्या मुलांपैकीं बरींच मुलें निरनिराळ्या कारणांसाठीं चवथी इयत्ता पुरी करण्याच्या अगोदरच शाळा सोडून गेल्यामुळें, साक्षरता टिकण्याच्या दृष्टीनें जसें नुकसान होतें, तसेंच पैशाच्या दृष्टीनेंही फार नुकसान होतें. प्राथमिक शाळांमधील प्रत्येक मुलाला दरसाल किती खर्च येतो हें आपण पाहिलें आहेच. जितकीं मुलें मध्येंच शाळा सोडून जातात त्या प्रत्येक मुलासाठीं खर्च केलेला पैसा व्यर्थच जातो. कारण टिकाऊ साक्षरता येण्यासाठीं जें द्रव्य खर्च करण्यांत येतें तें, मध्येंच शाळा सोडून जाणारा मुलगा थोड्याच वेळांत निरक्षरांत जमा होऊन फुकट खर्च करण्यांत आलें, असें होतें. रोग्याला मोलाचें औषध देण्यांत यावें, कांहीं काल त्यानें औषध घेतल्यानंतर थोडा गुणही दिसावा, आणखी कांहीं दिवस औषध घेतल्यानंतर प्रकृती साफ बरी होईल, अशी इष्टमित्रांना खात्रीही वाटावयास लागावी आणि त्या रोग्यानें एकदम मध्येंच औषध घेण्याचें बंद करून कुपथ्य करावें म्हणजे त्याची प्रकृती पुन्हा मूळपदावर येऊन औषधासाठीं केलेला सर्व खर्च फुकट जातो; तसेंच आमच्या प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत होत आहे. व्यर्थ व्यय (wastage) हा आमच्या शिक्षणपद्धतीला झालेला जबरदस्त रोग आहे. या रोगाचें भयंकर स्वरूप लक्षांत येण्यासाठीं खालीं कांहीं महत्त्वाचे आंकडे दिले आहेत.

१९२२ ते १९२७ पर्यंतच्या पांच वर्षांत मुलांच्या गळतीचें प्रमाण दाखविणारा तक्ता नं० २४

प्रांत		वर्गांतील मुलांची संख्या					मुलांचें शेंकडा प्रमाण			कोणाचें
		वर्ग १ ला १९२२–२३	वर्ग २ रा १९२३–२४	वर्ग ३ रा १९२४-२५	वर्ग ४ था १९२५-२६	वर्ग ५ वा १९२६-२७	१९२२–२३ ला वर्ग २ रा	१९२५–२५ वर्ग ४ था	१९२६–२७ वर्ग ५ वा	
मद्रास	मुलें	७६५७७२	३४४१७२	२४३८८८	१९६७०२	८४८३०	१००	२६	११	मुलांचें
	मुली	११६६१५	३७७२५	२६०९१	१८४०२	१००७५	,,	१६	९	मुलींचें
मुंबई	मुलें	२५२२७४	३४५१३	१२१६०७	१०२५०६	९०६३८	१००	४१	३६	मुलांचें
	मुली	४८०८९	२५३८३	१८८१६	१४७२८	११२४१	,,	३१	२३	मुलींचें
बंगाल	मुलें	७६९०८०	२७७२३५	१६७९१२	८७११६	५६६६४	१००	११	७	मुलांचें
	मुली	१९५५३४	५१६७५	१६६५३	४२३९	२०१४	,,	२	१	मुलींचें
संयुक्तप्रांत	मुलें	४९८०९४	१४९८०७	१०८९५१	८८२१८	६९१८९	१००	१८	१५	मुलांचें
	मुली	४२७०५	९०७८	५६८६	३२७५	२४२८	,,	८	६	मुलींचें

पंजाब	मुलें	२७७१२०	९८१९४	७८५१७	६७९६८	४९४१६	१००	२५	१८	मुलांचें
	मुली	३६४८८	१००७५	७९३३	५७५२	४२०३	,,	१६	१२	मुलींचें
ब्रह्मदेश	मुलें	१४६८५२	३८२५६	३०१९७	२४९५३	१२८९१	१००	१७	९	मुलांचें
	मुली	२२९३४	१३५४६	४६०८	४१६१	१५७०	,,	१८	७	मुलींचें
बिहार—ओरिसा	मुलें	३५११९४	१४५७५०	५६०३२	३६४८६	३१४९१	१००	१४	९	मुलांचें
	मुली	४०६४६	१०५५१	५१२८	१०९१	७९९	,,	३	२	मुलींचें
मध्यप्रांत	मुलें	१०२८५२	५७४५८	४८५९३	४६७००	१५८५४	१००	४६	१६	मुलांचें
	मुली	९४५२	५०२२	३०४१	२१७४	६१९	,,	२३	७	मुलींचें
आसाम	मुलें	११९०७८	२९८६२	२७५३८	१९८७४	७६४४	१००	१७	६	मुलांचें
	मुली	१०२५८	१७४५	११९९	९१३	४१९	,,	९	४	मुलींचें
ब्रि. हिंदु०	मुलें	३४५३०४६	१२१८७५८	८९७५१२	६५५१०१	३९३४६५	१००	१९	११	मुलांचें
	मुली	५३३८७८	१६१२२८	८६८४६	५५७९४	३३५८८	,,	१०	६	मुलींचें

१९२७ ते ३२ पर्यंतच्या पांच वर्षांत मुलांच्या गळतीचें प्रमाण दाखविणारा तक्ता नं० २५

प्रांत		वर्गांतील मुलांची संख्या					मुलांचें शेंकडा प्रमाण		
		वर्ग १ ला १९२७–२८	वर्ग २ रा १९२८–२९	वर्ग ३ रा १९२९–३०	वर्ग ४ था १९३०-३१	वर्ग ५ वा १९३१-३२	वर्ग १ ला १९२७–२८	वर्ग ४ था १९३०–३२	वर्ग ५ वा १९३१–३२
मद्रास	मुलें	९०२८३२	३८४६८९	२८८६८५	२३६७७५	१००२५६	१००	२६	११
	मुली	११६६१५	३५७२५	२६०९१	१८४०२	१००७५	,,	१६	९
मुंबई	मुलें	२७२१८३	१४५२७७	१३१७४७	१०८६८४	९७७७६	१००	४०	३६
	मुली	४८०८९	२५३८३	१८८१६	१४७२८	११२४१	,,	३१	२३
बंगाल	मुलें	८८५८०७	३४१७८६	२४६७५४	१३०३९३	९४६५५	१००	१५	११
	मुली	१९५५३४	५१६७५	१६६५३	४२३९	२०१४	,,	२	१
संयुक्तप्रांत	मुलें	५३७७३२	२४७३१०	१६४४२७	१२१६८९	८७२१४	१००	२३	१६
	मुली	४२७०५	९०७८	५६८६	३२७५	२४२८	,,	८	६

पंजाब	मुलें	३९८३६३	२०२६१८	११५८०४	९६०७३	६७९४२	१००	२४	१७
	मुली	३६४८८	१००७५	७९३३	५७५२	४२०३	,,	१६	१२
ब्रह्मदेश	मुलें	१०२६७१	४१९६३	३४२६८	२७६३३	१२७४३	१००	२७	१२
	मुली	२२९३४	१३५४६	४६०८	४१६१	१५७०	,,	१८	७
बि.-ओरिसा	मुलें	५२६०४३	१७९३२५	१२२२५०	४९६८०	४०१४१	१००	९	८
	मुली	४०६४६	१०५५१	५१२८	१०९१	७९९	,,	३	२
मध्यप्रांत	मुलें	१३०७७४	७१५५२	६३४१२	५८१२८	१५८५५	१००	४४	१२
	मुली	९५५२	५०२२	३०४१	२१७४	६१९	,,	२३	७
आसाम	मुलें	१६११६३	३०५१२	२७६१७	३२९०३	२९१०८	१००	२५	२२
	मुली	१०२५८	१७४५	११९९	९१३	४१९	,,	९	४
ब्रि. हिंदु.	मुलें	४१९१०९१	१५७२६५५	११७०१४९	८७७६३३	५५७६९६	१००	२१	१३
	मुली	५३३८७८	१६१२२८	८६८४६	५५७९४	३३५८८	,,	१०	६

या दहा वर्षांच्या आंकड्यांवरून आपणांला काय दिसून येतें? १९२२ सालीं एकंदर ब्रि० हिंदुस्तानांतील प्राथमिक शाळांच्या पहिल्या वर्गांत मुलगे व मुली मिळून एकंदर ३९८६९२४ विद्यार्थी होते व त्यांपैकीं १९२६–१९२७ सालीं फक्त ४२७०५३ विद्यार्थींच चवथी इयत्ता पुरी करून वरच्या वर्गांत गेले. म्हणजे ३५५९८७१ विद्यार्थी मध्येंच गळाले. "या सालांत साधारणपणें दर विद्यार्थ्यामागें सरासरीनें रु. ८ खर्च आला. या सरासरी खर्चाच्या अकांड्यांप्रमाणें दुसऱ्या वर्गांत गेलेल्या विद्यार्थ्यांसाठीं १९२२-२३ सालीं रु.२·९१ कोटी रुपये खर्च झाले. १९२३-२४ सालांत तिसऱ्या वर्गांत गेलेल्या विद्यार्थ्यांसाठीं ०·४० कोटी रुपये खर्च झाले. १९२४–२५ सालीं तिसऱ्या वर्गांतून चवथ्या वर्गांत गेलेल्या विद्यार्थ्यांसाठीं ०·२९ कोटी रुपये खर्च झाले. याप्रमाणें व्यर्थ खर्ची पडलेली रक्कम रु.३·६० कोटी होत आहे. या चार वर्षांचें एकंदर नुकसान अंदाजानें सुमारें १४·४ कोटी रुपये झालें असून ही रक्कम म्हणजे १९२२–२३ ते १९२५–२६ या सालांत प्राथमिक शिक्षणासाठीं एकंदर खर्च झालेल्या रकमेच्या शेंकडा ६० प्रमाणांत होत आहे." †

१९२७–२८ सालीं ब्रि. हिंदुस्तानच्या पहिल्या वर्गांत दाखल झालेल्या मुलांमुलींची संख्या ४७२४९६९ होती, म्हणजे १९२२-२३ पेक्षां ही संख्या ७३८०४५ नें वाढली. याचा अर्थ पालकांत अधिक शिक्षणाविषयक जागृती होऊन त्यांनीं आपलीं मुलें शाळेंत आणून घातलीं. परंतु या संख्येबरोबर गळतीच्या मुलांचीही संख्या अधिक वाढली. १९३१-३२ सालीं चवथी इयत्ता पुरी करणाऱ्या मुलांमुलींची संख्या ५११२८४ होती, म्हणजे ४१३३६८५ विद्यार्थी मध्येंच गळाले! या गळतीची संख्या १९२६-२७ पेक्षां ५७३८१४ नें अधिक आहे. १९३०-३१ सालीं ब्रिटिश हिंदुस्तानांत दरमुलामागें रु. ८-६-६ व दर मुलीमागें रु. १०-९-८ प्राथमिक शिक्षणाप्रीत्यर्थ खर्च आला होता.§ या आंकड्यांच्या आधारें १९२७-२८ ते १९३१-३२ पर्यंतच्या पांच वर्षांच्या कालांत सरासरीनें दरमुलामागें रु. ८ व मुलीमागें रु. १० प्रमाणें दरसालचा खर्च आला होता असें मानावयास हरकत नाहीं. या पांच वर्षांच्या कालांत गळतीची संख्या वाढल्याबरोबर व्यर्थ खर्चाचा आकडाही वाढणें अपरिहार्य आहे.

---

† हारटॉग क. रि. ४८ § Education in India. 1930-31, p. 55.

१९२२-२३ ते १९३१-३२ पर्यंतच्या दहा वर्षांच्या काळांत गळालेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येवरून व्यर्थ खर्च होणाऱ्या रकमेचे आकडे वर दिले आहेत. त्यावरून प्रत्यक्ष फुकट खर्च झालेल्या रकमेची खरी कल्पना येणार नाहीं. कारण एक गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे. पहिल्या वर्गांत दाखल झालेला विद्यार्थी एकाच वर्षांत शाळा सोडून गेल्यास, एकाच वर्षी आलेला खर्च व्यर्थ जातो; परंतु तोच विद्यार्थी दोन तीन वर्षें शाळेंत राहून मग मध्येंच शाळा सोडून गेल्यास, त्याच्या प्रीत्यर्थ खर्च पडलेल्या रकमेचा आंकडाहि वाढतो. हा वाढलेला खर्च व तपासणी वगैरेवर होणारा खर्च जमेंत धरून व्यर्थ होणाऱ्या खर्चाच्या रकमेचा निश्चित आकडा एकाद्या आकडेपंडितानें काढला तर त्यामुळें खरोखर, व्यर्थ खर्ची पडणाऱ्या रकमेच्या प्रचंडपणाची चांगलीच कल्पना येईल. आणखी एक गोष्ट या ठिकाणीं लक्षांत घेणें जरूर आहे कीं, गळतीचे जेवढे आंकडे दिले आहेत ते शहाराप्रमाणें खेडयांतील शाळांचेही एकत्रिक करून दिले आहेत. शहरांतील व खेडयांतील शाळांतील गळतीचें आंकडे पृथक्पणें पाहिलें तर खेडयांतील शाळांमधून गळतीचें प्रमाण वरच्या आंकडयापेक्षां किती तरी अधिक येईल; म्हणजे ज्यांना शिक्षणाची खरी जरूरी त्या खेडयांतूनच हा रोग वाढत्या प्रमाणांत दिसून येतो.*

आपल्या इकडील प्राथमिक शिक्षणांत हा जो व्यर्थ व्यय होतो, तो आतांपर्यंत कोणाच्या लक्षांत आला नाहीं का? या प्रश्नाला अनेक लोकांनीं आतांपर्यंत हा दोष दाखविला आहे, असें उत्तर देणें जरूर आहे. हंटर-कमिशननें आपल्या अहवालाच्या पा. ११७ वर "खालच्या वर्गांतून वरच्या वर्गांत जातांना परीक्षा पास होणारांची संख्या कशी सपाट्यानें घटते हें नमूद करणें महत्त्वाचें आहे. निरनिराळ्या प्रांतांत हें प्रमाण निरनिराळें असलें तरी एकंदर हिंदुस्तानांत प्राथमिक शाळांतील मुलांपैकीं, पूर्ण प्राथमिक शिक्षण मिळण्यापूर्वी शाळा सोडणाऱ्या मुलांची संख्या मोठी आहे," असा आपला स्पष्ट अभिप्राय दिला आहे.

हंटर-कमिशनच्या नंतर हिंदुस्तान व प्रांतिक सरकार यांच्या वार्षिक व पंचवार्षिक अहवालांत वेळोवेळीं या दोषाचा निर्देश करण्यांत आला आहेच. अगदीं अलीकडे मध्यप्रांतांतील शिक्षणखात्याचे माजी डायरेक्टर, सर आर्थर मेह्यू यांनीं आपल्या पुस्तकांत शिक्षणाच्या ऐच्छिक तत्त्वावरील प्रसाराच्या धोरणा-

---

* हेस्केथ क. रि. १७.

मुळें होणाऱ्या निष्फळ व निष्परिणामी (Wasteful and ineffective) खर्चाकडे लक्ष वेधलें.× त्यानंतर शेतकी कमिशननेंही आपल्या अहवालांत हल्लींच्या परिस्थितींत प्राथमिक शिक्षणाप्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चापैकीं मोठा अंश व्यर्थ जात आहे अशी तक्रार केली.* हारटॉग कमेटीनेंही या फुकट होणाऱ्या खर्चाच्या बाबतींत आंकडे देऊन सरकारच्या डोळ्यांत अंजन घालण्याचा प्रयत्न केला. या कमिटीचे पुढील उद्गार विशेष नमूद करण्यासारखे आहेत.

"Throughout the education system there is waste and ineffectiveness. In the primary system which, from our point of view should be designed to produce literacy and the capacity to exercise an intelligent vote the waste is appalling.....the vast increase in numbers in schools has produced no commensurate increase in literacy, for only a small portion of those in primary stages reach class IV in which the attainment of literacy may be expected."‡

या अभिप्रायाच्या आधारावर सायमन कमिशननेंही आपल्या अहवालाचे भाग १ पान ३८५ वर १९२२ ते १९२७ पर्यंतच्या गळतीबाबत चर्चा करतांना खालील उद्गार काढले आहेत.

"We are inevitably drawn to the conclusion that the efforts of the past few years have resulted in much less real advance towards the attainment of the goal of a literate population in British India than the gross total of numbers under instructions might suggest and that if these efforts are continued on the same lines they afford little promise for the future."

खालच्या वर्गांतून वरच्या वर्गांत जाणाऱ्या मुलांच्या संख्येंत जो प्रचंड ऱ्हास होतो, त्याची हारटॉग कमिटीनें (पान ४७) दोन कारणें दिलीं आहेत. "एक कारण म्हणजे मुलें मध्येंच शाळा सोडून जातात हें होय व दुसरें कारण मुलांना एका वर्षापेक्षां अधिक काळ एकाच वर्गांत ठेवण्यांत येतें. (Stagnation) हें होय. मृत्यु, आजारीपणासारख्या नैसर्गिक कारणांमुळें मुलांच्या संख्येंत जी घट होते ती घट वर नमूद केलेल्या कारणांमुळें होणाऱ्या भयंकर ऱ्हासापेक्षां किती तरी प्रमाणांत अल्प असते." हारटॉग कमिटीनें दिलेल्या या

× मेहयू पा. २२३. * पा. ५२०-२१. ‡ पा. ३४६.

दोन कारणांमुळें मुलांची संख्या एका वर्गांतून दुसऱ्या वर्गांत जातांना वाढत्या प्रमाणांत घटत जाते व त्यामुळें त्यांच्यासाठीं केलेला सर्व खर्च पाण्यांत जातो. शाळांमधून मुलें मध्येंच जीं काढून घेण्यांत येतात, त्यांच्या मुळाशीं अंशतः पालकांची आर्थिक अडचण, हें कारण असूं शकेल. मुलगा थोडा मोठा होऊन शेतांत किंवा घरीं कामास मदत करण्यासारखा झाला कीं, गरीब स्थितींतील पालक, त्या मुलानें शिक्षण घ्यावें अशी बलवत्तर इच्छा असतांही, कामासाठीं म्हणून त्या मुलाला घरीं ठेवून घेतात. अशा मुलाच्या बाबतींत आर्थिक अडचण हें कारण असलें तरी मध्येंच शाळा सोडून जाणाऱ्या मुलांची एकंदर प्रचंड संख्या–विशेषतः खेड्यांतील संख्या–पाहिली म्हणजे "या शाळांतून मुलें काढून घेण्याच्या सांथीच्या मुळाशीं महत्त्वाचें कारण पालकांचें अज्ञान व उदासीनता (apathy) आहे," असा हारटॉग कमिटीनें दिलेला अभिप्रायच खरा वाटूं लागतो.

मुलें अनेक वर्षें एकाच वर्गांत कुचंबून (Stagnate) पडतात. त्याचें कारण परिणामशून्य अशी शिकविण्याची पद्धत ही होय. एकशिक्षकी शाळा बहुसंख्य असून त्या बहुतेक बिगरशिक्षित (untrained) शिक्षकांच्या ताब्यांत आहेत. त्यामुळें व शिकविल्या जाणाऱ्या विषयांचा मुलांच्या नित्याच्या जीवनाशीं विशेष संबंध नसल्यामुळें, मुलांच्या नैसर्गिक ग्रहणशक्तीला क्वचित् जागा होते व त्यामुळें त्यालाही शिक्षणाविषयीं जो आपलेपणाचा जिव्हाळा वाटावयास पाहिजे तो वाटत नाहीं. साहाजिकच त्याला शिकणें म्हणजे जुलमाचा राम राम वाटावयास लागतो. अशा स्थितींत त्यांची प्रगति कशी होणार ?

आपल्या या देशांत लोकांच्या सार्वत्रिक दारिद्र्यामुळें सरकारचें उत्पन्न कमी, सरकारचें जें एकंदर उत्पन्न त्यांतून शिक्षणखात्यावर जो खर्च करण्यांत येतो, तो शक्य तितका कमी व अशा तऱ्हेनें शिक्षणासाठीं जो खर्च येतो, त्यांतील प्राथमिक शिक्षणाच्या वांट्याला जी रक्कम येते त्या रकमेंतील शेंकडा ६० इतकी रकम व्यर्थ जाते. अशा स्थितींत देशांतील साक्षरतेच्या प्रमाणांत कसा फरक पडणार ? मूळचें भांडवलच कमी असल्यानंतर त्या भांडवलांतील प्रत्येक पैसा योग्य तऱ्हेनें खर्च करून, त्याचा शक्य तो अधिक मोबदला पदरीं पडेल, अशी खबरदारी घेणें प्रत्येक व्यवहारी मनुष्याचें आद्य कर्तव्य असतें. परंतु आमच्याकडील गेल्या निदान अर्धशतकाचा शिक्षणविषयक कारभार पाहिला तर

त्यांत व्यवहारी दक्षतेचा पूर्ण अभावच दिसून येतो. अर्धपोटीं राहणाऱ्या लोकांच्या पोटाला आणखी चिमटा घेऊन वसूल केलेल्या पैशाची उधळपट्टी डोळ्यांदेखत होत असतांना व ही उधळपट्टी अनेक वेळा दाखविण्यांत आली असतांही आमच्या लठ्ठ पगाराच्या परदेशी व देशी शिक्षण-तज्ज्ञाधिकाऱ्यांनीं च राज्यकर्त्यांनीं ही उधळपट्टी थांबविण्यासाठीं काय उपाययोजना केली ? अर्धशतकापेक्षांही अधिक कालांत गरीब जनतेचे जे कोट्यवधि रुपये हकनाक मातींत गेले, त्याची कोणावर जबाबदारी आहे ? हे कोट्यवधि रुपये निष्कारण खर्च करण्यासाठीं मोठ्या पगाराचे शेंकडों-नव्हे हजारों-अधिकारी आम्हांस पोसावे लागले, हें नमूद करण्यासारखें आहे. रक्तक्षय झालेल्या माणसाला जखम होऊन त्यांतून रक्ताची धार लागावी व ती थांबविण्यासाठीं आणलेल्या धन्वंतऱ्यानें ती थांबविण्याचा कांहींच इलाज न करतां, ती तशीच सतत वाहूं द्यावी व उलट जबरदस्त फीची रक्कम खिशांत घालून चालू लागावें, अशीच स्थिति आमच्या शिक्षण-कारभाराची झाली आहे, असें म्हटल्यास चुकीचें होईल का ?

व्यर्थव्यय कमी करण्यासाठीं उपाय—

(१) हा व्यर्थ होणारा खर्च वाचविण्यास एकच उपाय होता व तो शिक्षण सक्तीचें करणें हा होय.[1] १९१२ सालीं कै० ना० गोखले यांच्या ठरावाप्रमाणें जर सक्तीच्या शिक्षणाचीअंमल बजावणी हिंदुस्तानांत झाली असती, तर आतांपर्यंत गेलेला पैसा सत्कारणीं खर्चीं पडून साक्षरतेचें प्रमाण चांगलें वाढलें असतें. मुख्यतः आर्थिक अडचणीच्या सबबीवर शिक्षणास सक्तीचें तत्त्व लागू करण्याची टाळाटाळ सरकारनें आतांपर्यंत केली यांत कांहीं शंका नाहीं. अधिक पैसे खर्च करावयाचे नाहींत, म्हणून जे पैसे खर्च केले त्यांपैकीं निम्यापेक्षां अधिक भाग दरवर्षीं फुकट जात आहे, हें सरकारला दिसत असतांही, त्याकडे दुर्लक्ष करणें त्यांना भाग पडलें. छपराचा खर्च झेपत नाहीं म्हणून पाया आणि त्यावर उभ्या भिंती बांधूनच जर एखादा मनुष्य स्वस्थ बसला, तर त्याला वेड्यांच्या इस्पितळांत ताबडतोब पाठविण्यांत येईल. सरकारनें याच वेडगळ धोरणावर काटकसर केली असें आतांपर्यंतचा इतिहास पहाणारांस मोठ्या कष्टानें म्हणावें लागेल. कोठूनही पैसे आणून छप्पर घालणें हें

---

[1] हेस्केथ क. रि. १७ व मेहयू २३५.

जसें घर बांधणाराचें कर्तव्य आहे, तसेंच प्राथमिक-शिक्षण-प्रसाराचें कर्तव्य अंगीकारल्यानंतर प्रत्येक माणसाला टिकाऊ साक्षरता देण्यासाठीं जरूर ती रक्कम उभी करणें सरकारचेंही कर्तव्य आहे. छप्पर न घातल्यामुळें पायाकरितां आणि भिंतीकरितां खर्च केलेला पैसा जसा व्यर्थ जातो, तसाच सक्तीचें तत्त्व लागू न केल्यामुळें पुष्कळसा पैसा पाण्यांत जातो.

प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करण्याच्या कामीं मोठी अडचण पैशाची येणार आहे, हें निश्चित आहे. त्याचप्रमाणें हें शिक्षण एकदम सक्तीचें सर्वत्र केल्यानंतर तें देण्यासाठीं एकदम शिक्षित शिक्षक कोठून आणावयाचे हा दुसरा प्रश्न आहे. हल्लींचे मुख्य मंत्री ना० खेर यांनीं ही दुसरी अडचण, प्रांतिक कायदेमंडळाच्या गेल्या बैठकींत खा० व० हाजी यांनीं प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करण्याबद्दल जी सूचना आणली होती, त्या सूचनेवरील चर्चेच्या वेळीं ता. २०।९।३७ रोजीं उत्तर देतांना बोलून दाखविली.

या मुख्य अडचणी दूर कशा करण्यात याचा खालीं विचार केला आहे:—

(१) शिक्षण मोफत आणि सक्तीचें सर्व इलाख्यांत करण्यांत यावें. खर्चाच्या अडचणीमुळें तें सर्वत्र मोफत व सक्तीचें करणें शक्य नसल्यास ते तत्त्व प्रथम खेड्यांत व विशेषतः लहान खेड्यांत लागू करण्यांत यावें. आतांपर्यंत प्रत्येक चांगली गोष्ट प्रथम शहरांतील लोकांच्या वांट्याला द्यावयाची ही जी प्रथा पडली आहे, ती प्रथा मोडून शिक्षण सक्तीचें करण्याचा प्रयोग खेड्यांतच आधीं करावा. कारण, अज्ञानाचा रोग खरा तेथेंच बळावला असून औषध प्रथम त्यांनाच देणें अत्यंत जरूर आहे.§ शहरांत सक्ती नसली तरी तेथील साक्षरतेचें पाऊल आपोआप जलद गतीनें पुढें पडल्यावांचून रहाणार नाहीं.

सक्तीचें तत्त्व खेड्यांत अमलांत आणा असा आग्रह धरण्याचें आणखी एक कारण आहे. खेड्यांत शिक्षण देणें हें शहरांतील शिक्षणापेक्षां अधिक स्वस्त आहे. म्युनिसिपल हद्दींतील मुलाला दरसाल रु. २१-२-० व मुलीला

---

§ "The Government will have to consider schemes to spread education in rural areas. At present 3·7 percent of the rural population have the opportunity of attending educational institutions in rural areas. Cities and large towns are crowded with schools, while by comparison, villages go with very few."

B. Kumarappa, Harijan, 7th Aug. 1937, p. 205.

रु. २३–५–० खर्च येतो, तर बोर्डाच्या हद्दींतील खेडयांतील मुलामागें दरसाल सरासरीनें मुलाला रु. १४-१-० व मुलीला रु. १४-१२-० खर्च येतो.§ यामुळें सक्तीचें तत्त्व खेडयांना लागूं करण्यानें दर मुलामागें सरासरीनें कमी खर्च येईल.

(२) प्रत्येक मुलाच्या मागें सरासरीनें दरसाल जो खर्च हल्लीं येत आहे, तो कमी करणें अत्यंत आवश्यक आहे. हा खर्च कमी करून १९१६–१७ सालीं जितका खर्च येत होता, तितका झाला तरी हल्लीं जी रक्कम खर्च पडते, त्या रकमेंत हल्लीं मुलें शिकत आहेत त्याच्या दुप्पट मुलें शिकलीं जातील. या बाबतींत इतर प्रांतांच्या आंकडयांकडेही आपण लक्ष देणें अत्यंत जरूर आहे.

हा खर्च कमी करण्यासाठीं खालील गोष्टी करणें अत्यंत अगत्याचें आहे.–

(अ) शिक्षणखात्यांतील अधिकाऱ्यांचे व शिक्षकांचे पगार कमी करणें. या बाबतींत सविस्तर विचार पुढें ' शिक्षक ' प्रकरणांत केला आहे.

(ब) शाळेच्या इमारतींसाठीं किंवा दुरुस्तीसाठीं खात्यानें खर्च करणें बंद करावें. इमारतींच्या बाबतींतील नियम थोडे शिथिल करून गांवांतल्या गांवांत जी त्यांतल्या त्यांत बरी इमारत मिळेल ती घेण्याचें धोरण ठेवणें जरूर आहे. याच कामासाठीं सार्वजनिक देवळें व धर्मशाळा यांचा उपयोग केल्यानें हा खर्च फार कमी होईल. लढाईच्या दिवसांत लष्करासाठीं ज्याप्रमाणें वाटेल ती इमारत खालीं करून मागण्याचा लष्करी अधिकाऱ्यांना अधिकार देण्यांत येतो, त्याचप्रयाणें सक्तीचें तत्त्व लागू केल्यानंतर निदान पहिलीं पांच वर्षें गांवांतील चांगली इमारत मालकाकडून कायद्यानें घेण्याचा शिक्षणखात्याला अधिकार देण्यासही हरकत नाहीं. परचक्राप्रमाणें अज्ञानाचें संकट निवारण्यासाठीं कांहीं लोकांची गैरसोय होणें अपरिहार्य आहे.

(क) शाळेच्या इमारतींची दुरुस्ती शाळाखात्यानें न करतां गांवकऱ्यांवर सोंपवावी.†

(ड) पगारी शिक्षक एकदम न नेमतां कांहीं ठिकाणीं निर्वेतन किंवा अल्प वेतनावर शिक्षण–प्रसाराच्यासाठीं स्वयंस्फूर्तीनें काम करणारे स्वयंसेवक किंवा सेविका यांचा उपयोग करून घ्यावा. या बाबतींत प्रो. के. टी. शहा यांनीं

---

§ मुं. शि. रि. १९३५–३६ पुरवणी पा. २१३.

† या बाबतींत अधिक विवेचन 'शाळागृहें व शिक्षणसाहित्य' या प्रकरणांत केलें आहे.

प्रत्येक मॅट्रिक पास झालेल्या मुलावर खेड्यांत जाऊन शिक्षणप्रसाराचें काम करण्याविषयीं सक्ती करण्यांत यावी, असें सुचविलें आहे.† मॅट्रिकप्रमाणें व्ह. फा. झालेल्या मुलांनींही निदान दोन वर्षें शिक्षणप्रसाराचें कार्य करावें, असा सक्तीचा नियम करण्यास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें प्रत्येक सुशिक्षित पेन्शनर माणसावर ही जबाबदारी टाकण्यास हरकत नाहीं. याप्रमाणें निर्वेतन किंवा अल्प वेतनावर काम करणारीं माणसें मिळाल्यास शिक्षणाचें कार्य अधिक झपाट्यानें व कमी खर्चांत झाल्यावांचून राहणार नाहीं.

या लोकांना शिक्षणाचें तंत्र माहीत नसल्यामुळें त्यांच्या हातून शिकविण्याचें काम शास्त्रोक्तपद्धतीप्रमाणें होणार नाहीं, असा एक आक्षेप येण्याचा संभव आहे. परंतु या बुद्धिमान् व अधिक शिकलेल्या लोकांना कांहीं थोडे दिवस शिक्षणशास्त्राचे कांहीं पाठ देवविल्यास त्यांना शिक्षणप्रसाराचें कार्य अधिक चांगलें करतां येईल व हा आक्षेपही दूर होईल.

(इ) बालवर्गाच्या शिक्षणाचे तास कमी करून एकाच शिक्षकाला निरनिराळे वर्ग दुबार-पद्धती-(shift-system)नें शिकविण्यास सांगण्यांत यावें.

(फ) पन्नास वर्षें ज्यांच्या वयाला झालीं आहेत अशा शिक्षकांना सेवानिवृत्त करण्यांत यावें; म्हणजे त्यांच्या मोठ्या पगारांतून बचत होईल.

(३) शहरांतील शिक्षणाप्रीत्यर्थ सरकारचा होणारा सर्व खर्च बंद करून सर्व पैसे खेड्यांतील शिक्षणासाठीं खर्च करण्यांत यावेत. गेलीं दीडशें वर्षें जो कांहीं खर्च झाला त्याचा फायदा फक्त शहरांनींच मिळविला आहे व त्यामुळें खेड्यांत व शहरांत दिवसेंदिवस अधिक अंतर पडत आहे. " १९३२-३३ सालीं शहरांतील मुलांच्या शिक्षणासाठीं शहरांतील लोकसंख्येपैकीं दर माणशी ७ आणेप्रमाणें खर्च केले गेले व खेड्यांतील शिक्षणासाठीं दर माणशी फक्त ७ पै खर्च करण्यांत आल्या व करांचा बोजा मात्र खेड्यांतील लोकांनीं सोसला. खेड्यांतील लोकांकडून घेतलेल्या करांचा उपयोग स्वतःच्या शिक्षणाचा भार झेपण्यास समर्थ असलेल्या शहरांतील वरिष्ठ व मध्यम वर्गाच्या शिक्षणासाठीं करण्यांत येत आहे."* सर्वांच्या शिक्षणास पुरेल इतका पैसा सरकारजवळ असल्यास तो सर्वांसाठीं खर्च करावयास हरकत नाहीं. परंतु जेथें द्रव्य अपुरें आहे तेथें, तें ज्यांच्या खिशांतून येतें व जे स्वतः खर्च करून शिक्षण घेण्यास

---

† Harijan, 31 July 1937. * मेहयू २३८. (B. Kumarappa; Harijan, 7th August 1937, p. 205)

असमर्थ आहेत, अशा खेडुतांच्या शिक्षणासाठींच खर्च करणें योग्य वन्यायाचें आहे. गेलीं दीडशें वर्षें फायदा घेतलेल्या शहरांतील वरिष्ठ वर्गांनीं आतां देशाच्या अंतिम कल्याणाचा दूरदृष्टीनें विचार करून स्वयंस्फूर्तीनें सरकारी पैशावर पाणी सोडून आपल्या मुलांच्या शिक्षणासाठीं स्वत:च्याच खिशांत हात घालावा.

शहरांतील शिक्षणाची सोय लावण्यासाठीं सरकारनें शहरांतील घरपट्टी व पाणीपट्टीच्या प्रत्येक रुपयामागें एक आणा प्रमाणें कर बसाविण्यास हरकत नाहीं. खेड्यांतील लोकांना लोकलबोर्डकायदा कलम ९३ व ९५ प्रमाणें जमीनीच्या व पाण्याच्या पट्टीवर हा कर द्यावा लागतोच. मग शहरांतील लोकांस हा कर देण्यास काय हरकत आहे ?

(४) खेडयांतील शाळांमध्यें उद्योगधंद्याची जोड देऊन दर मुलामागें कांहीं उत्पन्न काढतां येईल अशी महात्मा गांधींची कल्पना आहे व या कल्पनेस मूर्त स्वरूप देणें अत्यंत जरूर आहे. या बाबतींत अधिक विचार पुढें केला आहेच. येथें तूर्त एवढेंच म्हणूं कीं, या तऱ्हेनें जें उत्पन्न होईल त्या उत्पन्नांतून शिक्षणाप्रीत्यर्थ येणारा बराच खर्च खात्रीनें भागवितां येईल.

(५) काटकसर करून खर्च कमी केला व शाळेंतील मुलांना कांहीं उद्योग-धंदे शिकवून, त्यांपासून कांहीं उत्पन्न काढलें, तरी सरकारला थोडातरी खर्च येणारच. या खर्चाची सोय सरकारनें कोठून करावयाची ? महात्मा गांधींनीं मद्यपानबंदी तीन वर्षांत करण्याचा कार्यक्रम आंखल्यामुळें, तीन कोटींचें उत्पन्न सरकारच्या हातून जाणार असून, त्यामुळें शिक्षणासाठीं कोठून पैसे आणावे हा सरकारला खरोखरच पेंच पडणार आहे. सरकारला उत्पन्नाचे नवीन झरे शोधून काढावे लागतील.

चंदावरकर कमेटीनें १९२१ सालीं सक्तीच्या शिक्षणाची योजना आंखतांना सरकारला खालील नवीन उत्पन्नाच्या बाबी सुचविल्या होत्या--

(१) वारसा-हक्कावर कर.
(२) रजिस्ट्रेशनच्या फींत वाढ.
(३) नाटकगृहें, सिनेमा, घोडयांच्या शर्यती वगैरे करमणुकीच्या साधनांवरील कर.
(४) इनामदार व जहागीरदार यांच्यावर कर.
(५) देवस्थानावर कर.
(६) रोख्या बाजार-(Stock exchange) वर कर.

(७) फॅक्टरींतील मुलांच्या शिक्षणासाठी उद्योगधंद्यांवर कर.
(८) प्राप्तीवरील कर व सुपरटॅक्स यांवर सरचार्ज.
(९) दर रुपयास दीड आणा ते दोन आण्यांपर्यंत ठराविक प्रमाणांत वाढणारा लोकल-फंड सेस.
(१०) ५०० ते १९९९ या दरम्यानच्या विगरशेतकी उत्पान्नावर कर.

यांपैकीं पूर्वीच्या सरकारनें बाब नं. २, ३ चा थोडा फार उपयोग केला आहेच. बाकीच्या सूचनांचा चालू सरकार अवश्य विचार करील यांत कांहीं शंका नांहीं.

याशिवाय खालील उत्पन्नाच्या बाबींबद्दल सरकारनें विचार करण्यास हरकत नाहीं--

(अ) सरकारनें प्रत्येक लग्न किंवा पाट-पुनर्विवाह रजिस्टर करण्याविषयीं कायदा करावा व तें रजिस्टर करतांना कांहीं ठराविक फी घेण्यांत यावी. रजिस्टर करण्यासाठीं जो एकंदर खर्च येईल तो वजा जातां बाकी राहिलेल्या रकमेचा विनियोग शिक्षणासाठीं करावा. शारदा कायद्याचें उल्लंघन करून लग्न लावणाराकडून जादा फी घेण्यांत यावी व नवरी किंवा नवरा जितका वयानें लहान असेल तितकी फी अधिक घेण्यांत यावी; म्हणजे बालविवाहाला आळा बसून, शारदा कायद्याचें उल्लंघन होणें कमी पडेल. या करांचा बोजा लोकांना विशेष जाणवणार नाहीं. शेंकडों रुपये ताशे, वाजंत्री वगैरेसारख्या निष्फळ गोष्टींप्रीत्यर्थ खर्च करणाराकडून थोडे पैसे शिक्षणासाठी घेतले तर कोटें बिघडणार आहे ? सरकारनें असें रजिस्टर ठेवल्यामुळें कोर्ट-कचेरींतील वारसाहक्काच्या कज्जांनाही आळा बसेल.

(ब) सावकारांना दारूल्याची (Licence) अट घालून हा दारूला दरसाल देण्यांत यावा व त्यासाठीं फी आकारण्यांत यावी व या फीचा उपयोग शिक्षणाप्रीत्यर्थ करावा.

(क) शहरांतील व खेड्यांतील अनेक व्यापारी, शेतकऱ्यांचा माल आल्यानंतर त्याच्या विक्रीच्या पैशांतून धर्मादाय कापून घेतात. हा धर्मादाय त्यांना घेण्याचा हक्क नसतो. तरी अशी कोणी धर्मादाय म्हणून रक्कम कापून घेतल्यास ती सरकारनें घेऊन शिक्षणासाठीं खर्च करावी.

(ड) यात्रेच्या ठिकाणीं जो हल्लीं यात्राकर आहे तो निदान दीडपट करून ही वाढ शिक्षणासाठीं द्यावी.

(इ) देवस्थानांची नोंद करून त्यांचें उत्पन्नावर कांहीं कर बसवावा व तेंही उत्पन्न शिक्षणाच्या कामीं उपयोगीं आणावें.

(६) जीं इनाम गांवें आहेत तेथील शिक्षणाची जबाबदारी इनामदारांवर टाकावी.

(७) धनिक लोकांच्या धार्मिक वृत्तीचा ओढा शिक्षणाच्या दिशेनें वळवावा.

(८) खेड्यांतील शिक्षणासाठीं जो पैसा लागेल, तो खेड्यांतील लोकांवर अधिक कराचा भार न टाकतां, जमा करावा, अशी आमची सूचना आहे. परंतु वरील सर्व उत्पन्नाच्या बाबींपासून मिळणारें उत्पन्न घटूं लागलें व त्यामुळें सक्तीच्या तत्त्वाची अंमलबजावणी करणें जर लांबणीवर पडणार असेल तर आम्ही असें म्हणूं कीं, 'शेतकऱ्यांवरही वाटेल तितका कर बसवा परंतु शिक्षण सक्तीचें करा.' शेतकरी साक्षर झाले तर उतारे देणारा तलाठी, अतिक्रमणाचें नांव पुढें करून चरणारा सर्कल इन्स्पेक्टर, सरबराईला सोकावलेला अधिकारी, गांवांतील सावकार वगैरे शेंकडों जळवा जें रक्त शोषण करीत आहेत तें तरी थांबेल आणि मग आज शिक्षणासाठीं द्याव्या लागणाऱ्या कराचा त्याला बोजा वाटणार नाहीं. हजारों वर्षें झालेला निरक्षरतेचा नारू, वाटेल तो उपाय करा, पण तो कायमचा नाहींसा करा. या नारूनें शेतकरी-समाज कायमचा जायबंदी होऊन पडला आहे. या नारूचा नाश करण्यासाठीं करांची तुंबडी लावली तरी हरकत नाहीं. तुंबडी लावतेवेळीं थोड्या वेदना होतील खऱ्या, परंतु रोगाचा तरी पुरा नायनाट होईल.

(९) शिक्षणाच्या खर्चांत काटकसर करावी व शिक्षणाप्रीत्यर्थ नवीन उत्पन्नाच्या बाबी शोधून काढून द्रव्य जमवावें, अशी सूचना केली, तरीहि प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करण्यास पैशाचा तुटवडा पडूं लागला तर काय करावें ? मद्यपानबंदीची चळवळ तहकूब करून त्याचें उत्पन्न शिक्षण प्रसारासाठीं खर्च करावें, अशी आमची सूचना आहे. महात्मा गांधींनीं मद्यमानबंदीच्या कार्यासाठीं कसोशीनें प्रयत्न चालविले आहेत. मद्यपानामुळें देशाचा नैतिक अधःपात होत आहे हें कोण कबूल करणार नाहीं ? परंतु मद्यपानबंदी केल्यामुळें खेडयांत प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करण्याच्या मार्गांत जर अडथळे उत्पन्न होणार असतील, तर नाइलाजानें 'मद्यपानबंदीचा अवलंबही कांहीं काल तहकूब करा,' अशी आम्ही विनंती करूं.

मद्यपानबंदी व शिक्षणप्रसार या दोन बाबींत शिक्षणप्रसारालाच आमच्या

मतें अधिक महत्त्व आहे. शिक्षणप्रसाराचें क्षेत्र जसें जसें वाढत जाईल तसें तसें मद्यपानाच्या प्रसाराचें क्षेत्रही कमी कमी होत जाईल. सरकारनें शिक्षण-प्रसाराच्या कार्याला महत्त्व दिल्यानें प्रत्येक खेडुतांचा फायदा होतो; परंतु मद्य-पानबंदीमुळें फक्त जे व्यसनी लोक आहेत त्याचाच फायदा होईल.

मद्यपानबंदीच्या चळवळीनें खेड्यापेक्षां शहरांतील लोकांचाच फायदा आहे. ज्यांना व्यसनी म्हणतां येईल अशा लोकांचें खेड्यांतील प्रमाण फारच अल्प आहे. क्वचित् दारू पिणारांची संख्याहि खेड्यांत फारच कमी आहे. ज्या मोठ्या खेड्यांत दारुविक्रीचीं दुकानें आहेत तीं बंद केल्यास खेड्यांतील हें व्यसन बरेंच कमी पडेल. दारू पिण्याचें व्यसन खरोखर शहरांतील मजूर वगैरे वर्गांत फैलावलें असून, खेड्यांतील लोकांपेक्षां उत्पन्न बरें अस-ल्यामुळें व दारूचें दुकान जवळच असल्यामुळें, हा वर्ग मंदिरेचा दास बनला आहे. यामुळें मद्यपानबंदीचा प्रश्न हा खेड्यांच्यापेक्षां शहरांनाच अधिक जिव्हाळ्याचा आहे. वरील गोष्ट हरिजनपत्राच्या ता. ११ सप्टेंबर १९३७ च्या अंकांत १९३५-३६ च्या अबकारी खात्याचे सरकारी अहवालांतील आंकडे देऊन सिद्ध करण्यांत आली आहे.

असें जर आहे तर मग हा शहरांतील प्रश्न सोडविण्यासाठीं खेड्यांतील जनतेच्या शिक्षणाचा प्रश्न लांबणीवर कां टाकावा, हा प्रश्न पुढें येतो. आतांपर्यंत निरनिराळ्या कारणांनीं शहरांनीं खेड्यांतील शैक्षणिक प्रगतीच्या मार्गांत अडचणी उत्पन्न केल्या आहेत. इतके दिवस वरिष्ठ—बुद्धिजीवि—वर्गांच्या हितासाठीं खेड्यांची प्रगति खुंटली. आतां शहरांतील कनिष्ठ दर्जाच्या श्रमजीवि वर्गा-साठीं खेड्यांतील शिक्षणाचा मार्ग रोंखण्यांत येत आहे. वर्ग कोणताही असला तरी शहरें हीं खेड्यांच्या मार्गांतील धोंड झाल्यावांचून अद्यापही रहात नाहींत, असें दुःखानें म्हणावें लागतें.

राष्ट्रीय सभेनें शेतकऱ्यांना शिक्षण सक्तीचें व मोफत करण्याचें आश्वासन दिलें आहे. या आश्वासनावर भरंवसा ठेवून शेतकऱ्यांनींही जिवाचें रान करून राष्ट्रीय सभेला हुकमी बहुमत मिळवून दिलें आहे. राष्ट्रीय सभेच्या परीक्षेची ही वेळ आहे. हजारों वर्षें शिक्षणाला मुकलेला, हजारों लोकांकडून नाडलेला, अर्धपोटीं रहाणारा, रंजलेला, गांजलेला शेतकरीवर्ग प्राथमिक शिक्ष-णाची मोठ्या आशेनें याचना करीत आहे. आतां तरी त्याच्या अंगावर लटक्या सबबीचे साप सोडून त्याचा आशाभंग करूं नका, येवढीच राष्ट्रीय

सभेच्या स्वार्थत्यागी चालकांना विनंती आहे. राष्ट्रीय सभेच्या हातूनही जर शिक्षण सक्तीचें व मोफत झालें नाहीं तर मग शेतकऱ्याला आशेला कोणतें स्थान उरतें ? मद्यपानबंदीसाठीं जसा तीन वर्षांचा कार्यक्रम आंखला आहे, तसा प्राथमिक शिक्षणाचा पांच वर्षांचा कार्यक्रम निश्चित करा व या पांच वर्षांच्या कालांत प्रत्येक सुशिक्षित माणसानें, प्रत्येक श्रीमंत माणसानें, जातिभेद, मतभेद बाजूला ठेवून आपली सर्व शक्ती एकवटून प्रत्येक निरक्षर मनुष्य साक्षर करण्याची प्रतिज्ञा करावी. शेतकरी समाजाला साक्षर करणें, सामर्थ्यवान् करणें, सुखी करणें, हाच राष्ट्रोद्धाराचा, स्वातंत्र्याचा–पूर्णस्वातंत्र्यप्राप्तीचा–खरा मार्ग आहे.

(२) यदाकदाचित् देशाच्या दुर्दैवानें प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करणें सरकारला शक्य न झाल्यास हल्लीं होत, आहे या खर्चांतील व्यर्थ व्ययाचे प्रमाण कमी करून टिकाऊ साक्षरता निर्माण करण्यासाठीं काय करावे हा प्रश्नहि विचारांत घेणें जरूर आहे. या प्रश्नाचा आतां आपण विचार करूं.

सर्वत्र सक्तीचें तत्त्व लागू न करतां आल्यास निदान खेड्यांत तरी तें तत्त्व लागू करा म्हणून मागें सुचविलें आहेच. सर्व मुलांना सक्तीच्या अमलाखालीं आणतां आलें नाहीं, तर निदान मुलींना तरी हें तत्त्व लावा असेंही सुचविले आहे. सक्तीच्या तत्त्वाचा हा विशेष मर्यादित उपयोग झाला; व्यर्थ खर्च होणारी रक्कम सत्कारणीं लावण्यासाठीं या सक्तीच्या तत्त्वाचा निराळ्या प्रकारेंही आपणास उपयोग करतां येईल.

मुलांना शाळेंत घातल्यानंतर त्यांचा शिक्षणक्रम पुरा होण्यापूर्वीच पालक वाटेल तेव्हां मुलांना शाळेंतून काढतात व त्यामुळें त्यांच्यासाठीं खर्च झालेला पैसा व्यर्थ जातो, हें आपण पाहिलें आहेच. पालकांच्या या घातक स्वातंत्र्याला आळा घालून, त्यांनीं मुलाला किंवा मुलीला शाळेंत घातल्यानंतर त्यांचा ठराविक शिक्षणक्रम पुरा होईपर्यंत त्या मुलांना शाळेंतून काढून घेण्याची बंदी करण्यांत यावी, व योग्य कारणाशिवांचून मुलें काढून घेतल्यास, त्यांना कडक शासन करण्यांत यावें. याप्रमाणें उपाययोजना केल्यास पहिल्या वर्गांत दाखल झालेल्या मुलांपैकीं निदान शेंकडा ८० मुलें तरी चवथी इयत्ता पुरी होईपर्यंत शाळेंत रहातील व त्यामुळें जो पैसा हल्लीं व्यर्थ खर्च होतो, त्याचा पुरा मोबदला मिळून टिकाऊ साक्षरता प्रसृत होईल.

या योजनेमुळें आणखीही एक फायदा होईल. आज सरासरी हजिरी कांहीं

विशिष्ट मर्यादेखालीं गेल्यानंतर तेथील शाळा बंद करून दुसरीकडे वर्ग करण्याचा जो वरच्यावर प्रसंग येतो तो येणार नाहीं व प्रत्येक एक शिक्षकी शाळेला भरपूर मुलें मिळून त्या शाळांची आजच्या हाजिरीच्या बाबतींतील शोचनीय स्थिति थोडी कमी होईल.

ही सूचना पुणें जिल्हा बोर्डामार्फत आम्हीं शिक्षण-खात्याकडे पाठविली असतां, त्या खात्यानें ती फेटाळून लावली, ही मोठी दुःखाची गोष्ट आहे !

(३) मध्येंच मुलांना शाळेंतून काढून नेणाऱ्या पालकांना आपलीं मुलें कांहीं किमान साक्षरता प्राप्त होईपर्यंत शाळेंत ठेवण्यास कोणत्या उपायानें प्रवृत्त करावें याचा शेतकी कमिशननेंही विचार करून, त्या बाबतींत दोन उपाय सुचविलेले आहेत.

(अ) प्रत्येक पालकाकडून, तो मुलगा शाळेंत घालावयास येईल त्यावेळीं 'मध्येंच मुलाला शाळेंतून काढणार नाहीं' अशी कबुली घेऊन, याप्रमाणें तो वागण्यासाठीं त्याच्याकडून हमी म्हणून कांहीं ठराविक रक्कम खात्याकडे ठेवण्यांत यावी. कबूल केल्याप्रमाणें तो पालक वागला तर त्याचा मुलगा किमान अभ्यासक्रम संपवून शाळेंतून बाहेर पडतांच ही रक्कम त्या पालकाला परत देण्यांत यावी. परंतु या कराराप्रमाणें पालक वागला नाहीं व करार मोडण्यास त्यास योग्य कारण दाखवितां आलें नाहीं, तर हमीदाखल ठेवलेल्या रकमेंतून कांहीं किंवा सर्व रक्कम जप्त करण्यांत यावी.

हा उपाय शिक्षणप्रसारास पोषक होण्याऐवजीं मारकच होईल. कारण खेडयांतील गोरगरिबांना, ही ठेव किंवा जामिनादाखल रक्कम, ठेवावयास मिळणार कोठून ? त्यांना ही रक्कम भरतां आली नाहीं म्हणजे त्यांचा मुलगा शाळेंत दाखल करून घेतला जाणार नाहीं व बापाच्या गरिबीमुळें मुलाला अज्ञानाची जन्मठेप शिक्षा भोगावी लागणार आणि आज जीं मुलें शाळेंत दिसत आहेत तींही कमी होणार. हा उपाय गरिबांनाच खरा जाचक होणार असून, या देशांत गरिबांचीच मोठी संख्या असल्यामुळें, त्याची अंमलबजावणी करणें योग्य व हिताचें होणार नाहीं.

(ब) ठराविक काल मुलगा शाळेंत ठेवल्यानंतर त्या मुलाच्या पालकाला कांहीं रक्कम बोनस म्हणून देण्यांत यावी व मध्यंतरींच मुलगा शाळेंतून काढून घेणाऱ्या पालकाच्या बोनस-रकमेंत कमीजास्त प्रमाणांत कपात करण्यांत यावी.

ही बोनस देण्याची व्यवस्था करण्यासाठीं या अटीवर मुलांच्या पालकांच्या सहकारी पतपेढ्या काढण्यांत याव्यात.

ही सूचना शेतकी-कमिशननें पंजाबमध्यें अशा स्वरूपाच्या कांहीं सोसायट्या स्थापन झाल्या आहेत त्या पाहून केली. परंतु सहकारी चळवळीचा अनेक कारणांमुळें निदान या प्रांतांत पुरा बोजवारा उडाला आहे. ही गोष्ट लक्षांत घेतल्यानंतर ह्या सूचनेचाही तादृश फायदा होणार नाहीं, असें निश्चितपणें वाटूं लागतें.

बहुजनसमाजांत शिक्षणाचा खरा प्रसार करण्यास सक्तीच्या व मोफत शिक्षणावांचून दुसरा उपायच नाहीं. तरी सरकारनें आतां, इतर उपायांच्या तात्त्विक चर्चेचा निरस काथ्याकूट करीत न बसतां, मागें सुचविल्याप्रमाणें पांच किंवा दहा वर्षांचा कार्यक्रम आंखून जनतेला साक्षर करण्याच्या पवित्र व राष्ट्राच्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाच्या कार्यास धडाडीनें सुरवात करावी. या कामीं सरकारला अंतःकरणपूर्वक मदत करण्यासाठीं, देशांतील सुशिक्षित व श्रीमंत वर्गाचें कांहीं काल तरी सहाय्य खात्रीनें मिळेल. ना. गोखले यांनीं म्हटल्याप्रमाणें रयतेच्या हिताची सरकारला मनापासून तळमळ आहे, हें शिक्षणाच्या बाबतींत सरकारचें जें धोरण रहाणार आहे त्यावरूनच सिद्ध हाणार आहे.†

'नेटिव्ह स्कूल बुक ॲन्ड स्कूल सोसायटी' या नांवाच्या संस्थेनें शिक्षणाची पाहाणी करण्यासाठीं १८२४ सालीं एक कमिटी नेमली होती. त्या कमिटीनें आपल्या अहवालांत 'पुस्तकें, सोपी व परिणामकारक शिक्षणाची पद्धति, शिक्षक व द्रव्य' अशा चार मुख्य उणीवा असल्याचें निदर्शनास आणलें.§ सदरचा अहवाल सादर करून सुमारें ११३ वर्षें लोटलीं तरी अजूनहि त्याच अडचणी आपल्या प्राथमिक शिक्षणाचा मार्ग पूर्वीच्याच चिवटपणानें रोखून धरीत आहेत. या अडचणींचें पूर्ण निर्मूलन कधीं होणार हें कोणता ज्योतिषी हमखास सांगू शकेल?

---

†"I think it is not unfair to say that an important test of the solicitude of a Government for the true well-being of its people is the extent to which and the manner in which, it seeks to discharge its duty in the matter of mass education."

§ E. R. I. 191.

प्राथमिक शिक्षण

भाग दुसरा

प्रकरण पहिलें

विद्यार्थी

—✣—

No true estimate can be formed of the value of elementary education without some knowledge of the children's previous upbringing, of their parents' occupations and mental calibre, of the general home conditions.

—Rural Education, p. 100.

Full physical health, all are agreed, depends upon the provisions of six fundamental needs summed up under the headings of suitable food, fresh air, sunlight, warmth, exercise, rest and cleanliness. The fact that these fundamentals may be found in scant measures only in the home life of many children provides an additional reason for securing that the child shall receive them at school.

—The Health of the School Child (1930), p. 8.

कोणत्याही शिक्षणव्यवस्थेंत मुलें व शिक्षक हेच दोन महत्त्वाचे दुवे आहेत. देशांतील मुलांना शिकविणें, सुशिक्षित करणें हें शिक्षणाचें ध्येय असल्यामुळें, या ध्येयाचा मुख्य आधार किंवा प्राण म्हणजे मुलें आहेत. परंतु ध्येयसिद्धीची खरी जबाबदारी शिक्षकांवर पडणारी असल्यामुळें, त्यांच्या कार्यक्षमतेवर व कर्तव्यतत्परतेवर ध्येयपूर्ति पूर्णपणें अवलंबून आहे व त्यामुळें त्यालाही मुलांच्या बरोबरीच्या नात्यानें महत्त्व आहे. सोनें आणि सोनार किंवा शिळा आणि शिल्पकार यांचा जो अन्योन्य संबंध तोच मुलें आणि शिक्षक यांचा संबंध. सोनें बावन कशी आहे परंतु सोनार जर बिनकसबी मिळाला तर त्या सोन्याची माती होते. उलट, सोनार पुष्कळ कलावंत आहे परंतु सोनें जर हिणकस असलें तर त्याच्या कलेचा काय उपयोग ? तसेंच शिळा–शिल्पकार यांचें आहे. शिळा चांगली, घडण्यास लायक व शिल्पकार अत्यंत हुषार असा योग जमला तर सुंदर मूर्ति निर्माण होऊन पहाणारांचें अंतःकरण प्रसन्न होईल.

मुलें व शिक्षक यांच्या चांगुलपणावरच प्रत्येक शिक्षणपद्धतीचें यश अवलंबून आहे. मुलें हुषार व शिक्षकही आपल्या कामांत जसा पाहिजे तसा मिळाला तर इतर अनेक अडचणी असतांही व शिक्षणसाहित्याची कमतरता असतांही विद्यार्थी चांगले निपजतील; परंतु या दोघांपैकीं, दोघांत किंवा कोणातरी एकांत कांहीं उणीव आढळली तर इतर सर्व साधनांची अनुकूलता असतांही योग्य फळ मिळण्याच्या बाबतींत आपली निराशाच होईल.

या प्रकरणांत आमचीं मुलें कशीं आहेत तें पाहूं. व त्यांच्या गरजांचा विचार करूं.

मुलांच्या शिक्षणाचा विचार करतांना आपण एक महत्त्वाचें तत्त्व नेहमीं डोळ्यांपुढें ठेवणें जरूर आहे. कोणताही मुलगा ज्या मातापित्यांच्या पोटीं जन्मला असेल, त्यांच्या स्थितीचा व तो ज्या परिस्थितींत वाढत असेल किंवा वाढला असेल, त्या परिस्थितीचा त्याच्या शरिरावर, मनावर व बुद्धीवर दूरगामी परिणाम झाल्यावांचून राहत नाहीं. हे परिणाम चांगले असले तर शिक्षणास पोषक होतात व वाईट असले तर शिक्षणास मारक होतात. त्यामुळें मुलांच्या पालकांच्या स्थितीचा व मुलांच्या सभोंवतींच्या परिस्थितीचा प्रथम विचार करणें अपरिहार्य आहे. या दृष्टीनें आपल्या देशांतल्या मुलांचा विचार करतांना प्रथम शहरांतील मुलें व खेड्यांतील मुलें असें वर्गीकरण करणें जरूर आहे.

शहरांतील मुलें--शहरांतील मुलांमध्यें त्यांच्या पालकांच्या सांपत्तिक स्थितीच्या दृष्टीनें विचार केल्यास खालील वर्गांचीं मुलें दिसून येतात—

अ. श्रीमंत माणसांचीं मुलें.

ब. मध्यम वर्गांचीं मुलें.

क. कनिष्ठ किंवा मजूर वर्गांचीं मुलें.

या तिन्ही वर्गांच्या मुलांपैकीं श्रीमंत व मध्यम वर्गांतील मुलांचे बहुतेक पालक सुशिक्षित, निदान शिक्षणाविषयीं आस्था बाळगणारे असतात. ज्यांना आपण पांढरपेशा वर्ग म्हणतों अशा वर्गांचाच श्रीमंत व मध्यम या दोन वर्गांत मुख्यतः भरणा झालेला असतो. यामुळें ते बहुतेक किंवा शेंकडा ८० लोक स्वतः शिकलेले असतात असें म्हटल्यास चुकीचें होणार नाहीं. या दोन वर्गांतील मुलांना शिकलेल्या पालकांचा जन्मतः झालेला लाभ फार महत्त्वाचा आहे. एक तर आनुवंशिक संस्कारामुळें पालकांच्या शिक्षणाचा त्यांच्या बुद्धी-

वर निसर्गतःच थोडासा परिणाम झालेला असतो. दुसरें, पालक शिकलेले असल्यामुळें घरीं एकप्रकारच्या शिक्षणानें दरवळलेलें वातावरण तयार झालेलें असतें व त्याचाही या मुलांच्या मनावर शिक्षणास अनुकूल असा परिणाम होतो व मुलगा लहानपणापासून शिक्षणोत्सुक बनावयास लागतो.

पालक शिकलेले, तसेंच सांपत्तिक दृष्ट्याही बरे असल्यामुळें त्यांच्या मुलांना पुस्तकें व इतर शिक्षणसाहित्य मुबलक मिळतें. जरूर पडली तर खास शिक्षणाच्या रूपानें शिक्षकाची मदत मिळते. कपडे चांगले मिळून स्वच्छतेच्या राहणीचें वाळकडूच मिळालेलें असतें व खाण्यास पोष्टिक अन्न मिळाल्यामुळें, शरीराप्रमाणें बुद्धींतही कसदारपणा उत्पन्न झालेला असतो.

अर्थात् अशीं मुलें हीं भरपूर खत मिळालेल्या सुपीक जमिनीच्या तुकडयासारखीं असतात, असें म्हटल्यास अतिशयोक्तीचें होणार नाहीं. सर्व गोष्टींची अनुकूलता असल्यामुळें या मुलांत शिक्षणाचें बीज लवकर रुजतें व थोडयाच अवकाशांत भरदार रीतीनें फोफावतें. या मुलांना घरीं किंवा शाळेंत शिक्षकही अधिक शिकलेले व कार्यक्षम असे प्राप्त झालेले असल्यामुळें दुधांत साखर पडल्यासारखें होतें. यामुळेंच देशांतील शिक्षितांच्या खानेसुमारींत या वर्गांतील शेंकडा ९० लोक साक्षर किंवा शिकलेले आढळून येतात.

शहरांतील कनिष्ठ वर्गांत मोलमजुरी किंवा इतर कांबाडकष्ट करणाऱ्या लोकांचा मुख्यतः भरणा असतो व हे लोक मूळचे खेडयांतील पण पोट भरण्यासाठीं म्हणून शहरांत आलेले असतात. त्यामुळें पुढें खेडयांतील लोकांचें जें वर्णन केलें आहे तें यांनाहि लागू आहे. परंतु खेडयांतील लोकांपेक्षां एक दोन गोष्टी यांना अधिक अनुकूल असतात, असें बारकाईनें पहातां दिसून येतें. एक शहरांतील एकंदर शिक्षणानुकूल वातावरणाचा इष्ट असा परिणाम यांच्या मनावरहि, कांहीं दिवसांच्या शहरांतील वास्तव्यानें होतो. इतर मुलांना शाळेंत जातांना पाहून यांना आपल्या मुलाला शाळेंत पाठवावें, असें सहज वाटूं लागतें व शाळेंत जाणाऱ्या मुलांच्या सोबतीमुळें यांचा मुलगाहि, विशेष आढेवेढे न घेतां शाळेंत जाऊं लागतो. दुसरी गोष्ट अशी कीं, शहरांत ठिकठिकाणीं शाळा असल्यामुळें मुलाला शाळेंत पाठविण्याचा विचार डोक्यांत आला कीं, शाळा नजीक उपलब्ध असते. कांहीं शहरांतून आतां सक्तीचें तत्त्व लागू करण्यांत आलेलें असल्यामुळें, या वर्गांतील मुलेंहि शाळेंत, पालकांची इच्छा असो वा नसो, ओढलीं जातात व त्यामुळें या वर्गांच्या मुलांनाहि आतां

शिक्षण मिळूं लागलें आहे. अर्थात् या वर्गांचीं मुलें पालकांच्या आर्थिक परिस्थितीमुळें व इतर कारणांमुळें पहिल्या दोन वर्गांच्या मुलांशीं बौद्धिक चढाओढ करण्याच्या स्थितींत नसतात, हें स्पष्टच आहे. शहरांत पैशानेंच सगळ्या गोष्टी प्राप्त होणाऱ्या असल्यामुळें, कनिष्ठ वर्गांतील पालकाचा मुलगा बुद्धिवान् असला तरी, त्याला खाजगी शिकवणीचा योग येण्याचा संभव नसल्यामुळें, शिक्षकालाहि त्याच्याकडे जितकें लक्ष द्यावयास पाहिजे तितकें द्यावें असें वाटत नाहीं. या नियमास कांहीं शिक्षक अपवाद आहेत, हेंहि येथें नमूद करणें जरूर आहे.

खेड्यांतील मुलें––पालकांच्या धंद्यावरून गांवांतील मुलांचे तीन वर्ग करतां येतात.

अ. बिगरशेतकरी वर्गांचीं मुलें.

ब. शेतकरी वर्गांचीं मुलें.

क. अस्पृश्य वर्गांचीं मुलें.

अ.–या वर्गांत गांवांतील वाणी, व्यापारी, ग्रामजोशी वगैरे लोकांचीं मुलें येतात. या वर्गांचे पालक साधारणपणें शहरांतील मध्यम वर्गाच्या तोडीचे असतात असें म्हणावयास हरकत नाहीं. शहरांतील मध्यम वर्गाप्रमाणें यांची सांपत्तिक स्थिति बरी असते व या वर्गांतील पालकांना आपल्या मुलांनीं शिकावें अशी इच्छा असते. त्यामुळें खेड्यांतील व विशेषतः तालुक्याच्या मोठ्या गांवीं या वर्गांतील बहुतेक सर्व मुलें स्वतांच्या इच्छेनेंच शाळेंत जातांना दिसून येतात. या मुलांचे कपडे चांगले व स्वच्छ असतात. त्यांना शिक्षणसाहित्याची वाण पडत नाहीं व खाण्यापिण्याचीही ददात नसल्यामुळें, गुटगुटीत शरीरांवरून व गुलगुलीत गालांवरून या वर्गांतील मुलांना अचूक निवडून काढतां येतें. व्यापारी पेशांतील मंडळी थोडी फार शिकलेली असल्यामुळें मुलांना घरींहि शिक्षणानुकूल वातावरणांतच रहातां येतें. पूर्वीचा इतिहास पहातांना या वर्गांतील मुलें ब्रिटिश सत्तेचा उदय होण्यापूर्वीहि गांवटी शाळेंतून व बाजारशाळांतून लिहिणेंवाचणें व हिशेबटिशेब शिकत असत असें आढळून येतें.

ब.–खेड्यांत खरा बहुसंख्यात्मक वर्ग म्हणजे शेतकऱ्यांचा. या वर्गांतील पालक आज हजारों वर्षें स्वतः अज्ञानांत वाढलेले, परिस्थितीनें पीडलेले व सावकार–सोट्यांकडून नाडलेले असे आहेत. शिक्षणाचा पिढ्यानुपिढ्यांत गंध

नसल्यामुळें यांना शिक्षणाचें महत्त्व समजणें मुष्कील ! धार्मिक समजुतींच्या मनावरील अभावितपणें असलेल्या दडपणामुळें ' शिक्षण घेणें हें आपलें काम नाहीं, तें काम वामगांचें आहे ' अशी या वर्गाची टाम समजूत झालेली. या दोन्ही कारणांमुळें शेतकरीवर्गातील कैक पालकांना गांवांत नवीन शाळा उघडली तरी ती आपल्या उपयोगासाठीं आहे असें वाटत नाहीं. गांवांत कोंडवाडा नसला तर या वर्गातील गांवकऱ्यांना आपली मोठी गैरसोय झाली असें वाटतें; कोंडवाडा आपल्या गांवांत असावा अशी तळमळ लागते. परंतु गांवांत शाळा नसली तरी त्याबद्दल खेद वाटत नाहीं व शाळा आल्यानंतर आनंद त्यांच्या मनाला शिवत नाहीं. या वर्गातील शेतकरी खाऊन पिऊन सुखी असले तरी मुलांना शाळेंत घालण्याची कल्पनाहि त्यांच्या मनाला शिवत नाहीं. मुलगा पांच वर्षांचा झाला कीं, त्याला शाळेंत घालण्याचा शहरांतील पालक विचार करीत असतांना, हे पालक मुलाच्या लग्नाचा विचार करूं लागतात ! शहरांतील पालक मुलासाठीं पाटी घरांत आणतात त्या वेळीं खेड्यांतील पालक आपल्या मुलाचीं ' हाडें भाजून ' नागवी हिंडणारीं सून घरांत घेऊन येतात. कोणीहि सही मागितली कीं कोऱ्या कागदावर किंवा प्रॉमिसरी, कर्जरोख्यांवर, मागचा पुढचा विचार न करतां हे आपली सहीची निशाणी म्हणून डाव्या हाताचा आंगठा करतात.

शेतकरी वर्गांत दुसराहि एक पोटवर्ग आहे. हा म्हणजे अगदीं थोडी जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांचा किंवा स्वतःची जमीन नसलेल्या शेतकीवरील मजुरांचा. या वर्गाचे घरांत नेहमीं मूर्तिमंत दारिद्र्यच कायम वस्ती करून राहिलेलें असतें. ज्या दिवसांत जें धान्य पिकेल तें खाऊन हा वर्ग दिवस कंठीत असतो. बाजरी पिकली तर बाजरी खाऊन, रताळ्यागाजरांच्या दिवसांत रताळींगाजरें व वटाट्याच्या हंगामांत बटाटेच उकडून त्यांवर हा आपला जीव जगवीत असतो. मुलगा ५।६ वर्षांचा झाला कीं तो स्वतांचें एखादें दुसरें जनावर गाय किंवा म्हैस असेल त्याच्यामागें चाललाच. तो आणखी थोडा मोठा झाला का, त्याला स्वतांच्या हाताखालीं शेतीवर काम करण्यासाठीं किंवा दुसऱ्या शेतकऱ्याच्या घरीं सालाच्या बोलीनें मजुरीसाठीं नोकरीस ठेवण्यांत येतें. रोज दुपारची भ्रांत असलेल्या मनुष्याला स्वतांचा मुलगा शाळेंत अडकवून ठेवून कसें भागणार ! गवतांतला 'ग' गिरवीत बसणाऱ्या मुलांपेक्षां 'गवत' काढावयास गेलेला मुलगा त्यांना अधिक उपयोगाचा

नाहीं का ? कोणती नदी कोणत्या डोंगरांतून निघून कोणत्या समुद्राला मिळते हें घोकण्यांत दिवस घालविण्यापेक्षां मोटेचें पाणी पिकाला भरणारा मुलगा अधिक चांगला. कोणत्या देशांत काय धान्य होतें याची पुस्तकी यादी तोंडपाठ करीत बसण्यापेक्षां आपल्या कोणत्या पट्टींत काय पेरावें याचा विचार करणारा मुलगा, या शेतकऱ्यांच्या अधिक कामाचा. अनेक वेळां मुलांच्या पोटांत अन्न भरण्याची भेसूर विवंचना पडली असतांना, मुलांच्या डोक्यांत ज्ञान सांठविण्याचा कोण विचार करणार ? अंगावर बोटभर धड कपडा नसतांना विद्येच्या व्यासंगानें मनाला सुसंस्कृत करण्याची गोष्ट या पालकांना कोण पटवून सांगणार ? शहरांतील पालकांचे डोळे मुलांच्या परीक्षेच्या निकालाकडे लागले असतांना, हे पालक पावसाची मार्गप्रतीक्षा करीत आकाशाकडे डोळे लावून बसतात. मुलांचे कच्चे विषय चांगले करण्यासाठीं शहरांतील पालक परीक्षेच्या पूर्वी जादा शिक्षक शिकवणीसाठीं ठेवीत असतांना, कर्ची ताल पक्की करण्यासाठीं जादा मजूर लावण्याची भाषा शेतकरी बोलत असतो. शेतकऱ्यांच्या जगांत मुलांच्या शिक्षणापेक्षां जनावरांच्या चरण्याला जास्त महत्त्व आहे. मुलाच्या मनापेक्षां मळ्याचीच जास्त मशागत करण्यांत येते. याचें कारण धार्मिक असो किंवा आर्थिक असो अगर अज्ञान असो; खेडयांतील शेतकरीवर्गाला आपलीं मुलें शाळेंत घालण्याची तळमळ अद्याप वाटावी तशी वाटत नाहीं हें खरें. या कारणांच्या जोडीला अलीकडे आणखी एक विशेष मारक असें कारण झालें आहे. शिकलेला मुलगा शेतीला कुचकामाचा ठरतो अशी लोकांची समजूत झाल्यामुळें, मुलांना शाळेंत पाठवून त्यांचें शेतीच्या दृष्टीनें अकल्याण करावें असें अनेक पालकांना वाटत नाहीं.

तथापि हल्लीं पुष्कळ शेतकरी वर्गांतील लोकांची, शिक्षणप्रसाराच्या झालेल्या चळवळीमुळें, मुलांना शाळेंत पाठविण्यापुरती मनाची तयारी झाली आहे ही गोष्ट खरी आहे. हे लोक गांवास शाळा नसली तर ती मिळावी म्हणून अर्ज पाठवून किंवा बोर्डाच्या अधिकाऱ्यांस किंवा सभासदांस भेटून खटपटहि करितात व गांवास शाळा असली तर त्या शाळेंत आपल्या मुलांना पाठवितात. परंतु अशा लोकांची संख्या एकंदर शेतकरीवर्गाच्या संख्येशीं तुलना केल्यानंतर अतिशय अल्प आहे. कांहीं शेतकरी मुलांना शाळेंत पाठवितात परंतु तें त्यांना शिक्षणाचें महत्त्व पटतें म्हणून नव्हे, तर लहान मुलगा घरीं ठेवला तर दंगा करतो म्हणून! शेतीवर उपयोगीं पडण्यासारखा किंवा गुरांच्या मागें

जाण्यासारखा तो झाला कीं, ते त्याला ताबडतोब काढून घेतात व त्यामुळें त्या मुलाचाहि कांहीं फायदा न होतां त्याच्या शिक्षणासाठीं खर्चीं पडलेले पैसे व्यर्थ जातात, व अशीं मुलें काढून घेतल्यामुळें हजेरी किमान मर्यादेच्या खालीं गेली कीं, शाळाच खात्यामार्फत बंद करण्यांत येऊन, शिक्षणप्रेमी पालकांच्या मुलांचेंहि शिक्षण बंद पडतें.

शिक्षणासंबंधीं शेतकरी वर्गांत अनेक कारणांमुळें पूर्ण उदासीनता आहे. त्या उदासीनतेचें दाट धुकें शाळेंसभोंवतीं पसरल्यासारखें दिसत असतें व त्यामुळें खेड्यांतील शाळेंत पाऊल टाकणारास कोठेंहि आशेचा किरण दिसत नाहीं. अशा या प्रतिकूल परिस्थितींतहि ज्या शेतकऱ्यांचीं मुलें शाळेंत येतात, त्यांची काय स्थिति असणार हेंहि पहाणें जरूर आहे.

या शेतकरी वर्गांतील मुलांची रहाणी साधारणपणें अस्वच्छपणाची व आरोग्यास विघातक अशी असते. या मुलांच्या मातापित्यांनाच किंवा घरांतील इतर मंडळीनाच स्वच्छता काय आहे याची जाणीव नसते, तेथें मुलांना कोठून कल्पना येणार? त्यांची कोण काळजी घेणार? पुष्कळशा मुलांना खरूज, नायटे, गजकर्ण वगैरे त्वचेचे रोग झालेलें असतात व ज्यांना शाळेंत येण्यापूर्वी कांहीं रोग नसतात त्यांना शाळेंत आल्यानंतर, ह्या रोगी मुलांच्या संसर्गानें, ते रोग जडतात. मुलांच्या डोक्यांत खवडे व मुलींच्या केसांत उवा नसल्या तर आश्चर्य! पालकांनाहि जेथें शौच्यास पाणी नेण्याची आवश्यकता वाटत नाहीं तेथें मुलांच्या शारीरिक स्वच्छतेची न कल्पना केलेलीच बरी! सर्दी झाली असल्यास मुलांच्या वहाणाऱ्या नाकाच्या सफाईची जबाबदारी आळीपाळीनें डाव्या किंवा उजव्या बाहीकडेच सोपविण्यांत येत असल्यामुळें, या मुलांच्या बाह्या पाहिल्यास त्यावर पांढरी चकाकी नेहमीं दिसून येते. तंबाखू खाऊन कोठेंहि पिचकारी मारणाऱ्या पालकांचीं हीं मुलें कोठेंहि थुंकण्यास किंवा खाकरा टाकण्यास कचरत नाहींत. त्यामुळें त्यांच्या स्वतांच्या शरीरांप्रमाणें किंवा अंगावरील कपड्यांप्रमाणें त्यांच्या आजूबाजूलाही थोडीफार घाण दिसल्यावांचून रहात नाहीं.

या मुलांच्या अंगांवरचे कपडेहि जाडेभरडे, कळकटलेले, फाटलेले किंवा ठिगळांचे असे असतात. ज्यांना दुपारची वेळ भागविणें प्रयासाचें होतें, त्यांना चांगले छानछोकीचे कपडे कोठून मिळणार? दोन सदरे वर्षांतून मिळाले तर मिळणार त्यामुळें एकच कपडा न धुतां अंगावर अनेक

दिवस राहिल्याकारणानें तो गलिच्छ व घाणेरडा होणें साहजिकच आहे. त्यांच्या कपडयांवर निरनिराळ्या पदार्थांच्या अनेक डागांप्रमाणें उवाहि पडलेल्या दिसून येतात. थोडे कपडे असले तरी स्वच्छतेनें मनुष्याला रहातां येतें, परंतु मुलांच्या कपडयांची स्वच्छता आई-बापांनींच राखावयाची. ज्यांना स्वच्छतेचें महत्त्व मुळींच जाणवलें नाहीं असे आईबाप जेथें स्वतःच्या डोक्यांतील किंवा कपडयांवरील उवा फावल्या वेळांत मारीत बसतात तेथें त्यांच्याकडून मुलांचे कपडे स्वच्छ ठेवण्याची खबरदारी कशी घेतली जाणार ? कांहीं गांवांत पिण्यास पाणीहि पुरेसें मिळत नाहीं, त्या ठिकाणी कपडयांसाठीं व स्नानासाठीं कोण पाणी खर्च करणार ? रोज कपडा धुतला कीं फाटतो, या कंगालीपणाच्या पोटीं जन्माला आलेल्या कल्पनेमुळें कपडा टिकविण्यासाठीं तो न धुणेंच श्रेयस्कर वाटतें व त्यामुळें मुलांच्या कपडयांना क्वचित् पाणी लागतें.

शेतकऱ्यांचीं घरें कशीं असतात याचें वर्णन शाळागृहें व शिक्षणसाहित्य या प्रकरणांत केलें आहे. त्या घरांची रचना, आंतील व्यवस्था, उजेड-प्रकाशाचा अभाव व स्वयंपाकघरांस लागून असलेला गुरांचा गोठा, यामुळें त्यांत राहणाऱ्या माणसांच्या आरोग्याला खग्रास ग्रहणच लागल्यासारखें होतें.

या एकंदर परिस्थितीमुळें शेतकरीवर्गाचीं शाळेंत येणारीं मुलें नेहमीं रोगी व निस्तेज दिसतात. त्यांतहि या मुलांना खावयास मिळणारें अन्न अगदींच निकस व तेंहि अपुरें असें असल्यामुळें, त्यांच्या अंगांत रोगप्रतिकारशक्ती मुळींच नसते असें म्हणावयास हरकत नाहीं व पाणीहि घाणेरडें पिण्यांत आल्यामुळें त्यांच्या शरिरांत अनेक रोगांचें कायमचें निवासस्थान होण्यास विलंब लागत नाहीं.

खेडयांतील या अनेक कारणांमुळें रोगांना मोकळें मैदान मिळून त्यांच्या चौफेर चालीला पायबंद घालण्यासाठीं लागणारी वैद्यकीय मदत मिळणें मात्र अतिशय कठीण. गांवांत रोगाचें निदान करणारा कोणी भेटणार नाहीं व रोगाचें निदान झालें तर औषध मिळणार नाहीं. नेहमीं तापानें व नारूनें शेंकडो लोक कायमचे अंथरुणावर पडून राहिले असतांहि त्यांना तापावर 'कोयनेल' किंवा नारूवर अचूक गुणकारी औषध मिळण्याची मारामार पडते व त्यामुळें अंगाराधुपारा करून किंवा रानपाल्याच्या देशी औषधावर वेळ मारून न्यावी लागते.

या वर्णनावरून शेतकरीवर्गाचीं मुलें जीं शाळेंत येतात त्यांचें स्वरूप कसें असतें याची कल्पना शहरांतील वाचकांनाहि करतां येईल. फाटके व घाणेरडे

कपडे घातलेला, रोगानें व उपासमारीनें फिकट बनलेला, हडकुळा व घरच्या आडाणी माणसांच्या सहवासानें अतिशय अशुद्ध अशी भाषा बोलणारा मुलगा शेतकरी वर्गातील आहे, हें एखादा आंधळाहि सांगूं शकेल. अशा मुलाला उपजत कितीहि उत्तम दर्जाची बुद्धिमत्ता प्राप्त झालेली असली तरी या प्रतिकूल परिस्थितीच्या भयंकर ओझ्याखालीं तिचा लोप व्हावयास कितीसा वेळ लागणार ? अशा तऱ्हेच्या मुलांनीं भरलेल्या वर्गांतील मुलांना शिक्षण देऊन त्यांना साक्षर करण्याची उमेद कोणत्या शिक्षकाच्या अंगीं तग धरून राहील ? व हीं खेडयांतील मुलें शहरांतील मुलांशीं शिकण्याचे कामांत कशी स्पर्धा करूं शकणार? शहरांतील मुलाला सगळ्या सोयीमुळें शिक्षण घेणें सुलभ जातें तर खेडयांतील मुलांच्या मार्गांत अनेक अडचणी जन्मापासून चिवटपणानें उभ्या असतात ! दोघांनाहि जन्मतः सारख्या दर्जाची बुद्धिमत्ता प्राप्त झालेली असली तरी शहरांतील मुलगा अनुकूल परिस्थितीच्या लाटेवर पुढें निघून जातो व दुसरा प्रतिकूल परिस्थितीच्या खडकावर आपटला गेल्यामुळें चक्काचूर होतो.

या परिस्थितीमुळें शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्नच अतिशय विकट झाला असून, या विकट प्रश्नाकडे अद्याप कोणी सहानुभूतीनें पाहिलें नाहीं, हें शेतकऱ्यांचें व देशाचें दुर्दैव होय !! शहरांतील मुलांना जें शिक्षण योग्य ठरेल तेंच शिक्षण खेडयांतील मुलांनाहि, त्यांच्या भिन्न परिस्थितीचा विचार न करतां, देण्यांत येत आहे. खेडयांतील मुलांच्या गैरसोयी कमी करण्याचें धोरण न आखतां किंवा तसा कांहीं प्रयत्न न करतां, शहरांतील मुलांच्या सोयी वाढविण्यासाठींच सर्व प्रयत्न चाललेले दिसत आहेत. ज्याच्या अंगावर मुळींच कपडा नाहीं व जो थंडीनें गारठून मरण्याच्या बेतांला आला आहे, अशा अभाग्याच्या अंगावर हातभर जाडेंभरडें वस्त्र टाकण्याचा कोणीच विचार करीत नाहीं. उलट, टुमदार हवेलीच्या उबेंत बसून अंगभर कपडे पेहरणाराच्या अंगावर तलम कापड किंवा अधिक गरम कापड कसें चढवितां येईल, याचीच प्रत्येकजण काळजी करीत आहे. शहरांत दिवाळीची रोषणाई चालली असून खेडयांत शिमग्याची होळी भडकलेली आहे. शहरांतील आराम थोडी कमी करून खेडयांतील होळी विझविण्याची आम्हांस बुद्धि होईल तोच सुदिन.

क. अस्पृश्यवर्गांचीं मुलें:—खेडयांतील समाजाचा हा, आर्थिक व सामाजिक दृष्टया, अगदीं खालचा असा तिसरा थर आहे. शेतकरी वर्गाचें जें वर्णन केलें

तेंच वर्णन या वर्गालाहि लागू असून, उलट त्या वर्णनांत आणखी भर घालावी लागेल. अज्ञान, गरीबी या दोन आपत्तींच्या जोडीला अस्पृश्यतेची सर्वांत मोठी अशी घोरपड या वर्गाच्या गळ्यांत हजारों वर्षें बांधण्यांत आली असून, त्यामुळें समोर पाणी दिसलें तरी पिता येत नाहीं, शाळा दिसली तरी आंत जातां येत नाहीं व निवाऱ्याची मोकळी जागा दिसली तरी वसतां येत नाहीं, अशी केविलवाणी स्थिति या वर्गाची झाली आहे. या वर्गाच्या शिक्षणासाठीं व अस्पृश्यतेच्या निवारणाचे खास प्रयत्न अलीकडे करण्यांत येत आहेत, ही त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट आहे.

वरील वर्णन वाचून शहर व खेडीं यांत दिसणारी ही सामाजिक व आर्थिक तफावत आपल्याकडेच आहे असें कांहीं वाचकांना वाटण्याचा संभव आहे. परंतु इंग्लंड किंवा अमेरिका यासारख्या सर्वतोपरी सुधारलेल्या देशांतहि शहरांतील लोक व खेडयांतील लोक यांच्यामध्यें शिक्षणाविषयींच्या भिन्न परिस्थितींचें अस्तित्व आपणांस दिसून येतें.

इंग्लंडमधील ऑक्सफर्डशायर येथील लोक मुख्यतः शेतकीवर उपजीविका करणारे आहेत. तेथील शिक्षणाची ऑक्सफर्ड नॅशनल एज्युकेशन असोसिएशन व होरेस प्लंकेट फौंडेशन या संस्थांमार्फत १९२० सालीं पहाणी करण्यांत आली व त्या पहाणीचा अहवाल ग्रामशिक्षण (Rural Education) या नांवानें १९२३ सालीं प्रसिद्ध करण्यांत आला. त्या पुस्तकाच्या पांचव्या प्रकरणांत केलेलें तिकडील खेडयांतील स्थितीचें वर्णन व आपल्याकडील खेडयांतील स्थितीचें केलेलें वर्णन यांत पुष्कळच साम्य असल्याचें दिसून येईल.‡ तिकडील खेडयांतील पालकहि वाईट व गलिच्छ घरांतून दाटीवाटीनें रहातात. त्यांनाहि स्वच्छतेची असावी तशी कल्पना नाहीं. त्यांच्या मुलांनाहि चांगले व स्वच्छ कपडे मिळणें अवघड असतें. ते पालकहि आपल्या मुलांच्या शिक्षणाविषयीं पूर्ण उदासीन आहेत, असें दिसून येईल. "तिकडील पालकांनाहि स्वतःच्या अज्ञानामुळें आपल्या मुलांच्या भविष्यकालीन खऱ्या कल्याणाची कल्पना नसते. कारण त्यांना स्वतःलाच त्याची जाणीव झालेली

---

‡ Wretched hovels which ought to be condemned at once. p. 104. The Majority of teachers recognise that ignorance, poverty and bad housing rather than conscious hostility are the causes of the parents' apathy. p. 104.

नसते. '' तिकडील लोकांनाहि चांगलें पाणी मिळत नाहीं. त्यांना पावसाच्या पाण्यावर अवलंबून रहावें लागतें व तें पाणी संपल्यास मैल मैल लांबीवरून पाणी आणावें लागतें. सर्वसाधारणपणें विहारीचा पाण्यासाठीं उपयोग करण्याचा तिकडेही प्रघात असून, या विहिरींतील पाणी पुष्कळ वेळां आटतें किंवा खराब होतें.§

ऑक्स्फर्डशायरमधील शाळेंत जाणाऱ्या मुलांपैकीं '' $\frac{2}{3}$ मुलें शेतींतील मजुरांचीं आहेत. शेतींतील मजूर सर्वांत अतिशय मागासलेले असून गेलीं तीस वर्षें मोफत शिक्षण असूनही, त्यामुळें शेंकडों वर्षांच्या जुलुमाचे व दारिद्र्याचे परिणाम नाहींसे झालेले नाहींत. कैक पिढ्यांच्या परावलंबीपणामुळें त्यांना नैतिक दुर्बलता प्राप्त झाली आहे व आपल्या धंद्यांत कधीं कधीं प्रगति होण्याची आशा नाहींशी झाल्यामुळें, या शेतीवरील कामकऱ्यांत गैरहिशेबीपणा व बेपर्वा वृत्ति वाढली आहे.'' ‡

''मनुष्याच्या आरोग्यावर व शरिरावर परिणाम करणाऱ्या कारणांमुळें बौद्धिक प्रगतिवरही अपायकारक परिणाम होतोच. फाजील श्रम, जास्त माणसांनीं भरलेल्या व कोंदट खोलींत निद्रा व पौष्टिक अन्नाचा अभाव या मुख्य कारणांच्या सामुदायिक परिणामानें खेडयांतील मुलांत बुद्धिमांद्य निर्माण झालें आहे. घरगुती अडचणींमुळें व पुस्तकांच्या अभावामुळें प्रगतीची पिछेहाट होऊन, त्यामुळें शेतीप्रधान भागांतील मुलांना कांहीं गोष्टी समजण्यास, शहरांतील मुलांपेक्षां निस्संशय अधिक विलंब लागतो.'' †

इंग्लंडप्रमाणें अमेरिकेमध्येंही शहरांतील व खेडयांतील परिस्थितींत भिन्नता उत्पन्न झाली आहे. शहरांतील लोक अधिक शिकलेले, अधिक सुखी, अधिक सुधारलेले असून खेडयांतील लोक कमी शिकलेले, अनेक गैरसोयींनीं वेढलेले, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेले असे आहेत.¶

---

§ P. 105. ‡ P. 103. † P. 110–111.

¶ About half the population of America live in small rural communities whose main vocational concern is agriculture or closely associated with agriculture and whose manner of living is modified by the main concern. And those people, as evidenced by a commission appointed by Mr. Roozewelt to investigate the

(पुढील पानावर पहा)

उपाय-योजना—शहरें व खेडीं यांच्यामधील ही जमीन-अस्मानाची तफावत पाहिल्यानंतर खेडेगांवांतील शेतकरी वर्गाच्या मुलांच्या शिक्षणाची मांडणी कोणत्या तत्त्वावर करावी व त्यांच्या मार्गांतील अडचणी शक्य तितक्या कमी करण्यासाठीं काय करावें हा प्रश्न पुढें येतो. या प्रश्नाचा विचार करतांना खालील गोष्टी अमलांत आणणें अत्यंत जरूर आहे, असें आम्हांस वाटत.

अ–प्रथम पालकांनाच स्वच्छतेचें व शिक्षणाचें महत्त्व पटवून देऊन त्यांना स्वच्छतेनें रहावयास लावणें.

ब–मुलांनाहि स्वच्छतेनें रहावयास शिकविणें व त्यांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना वैद्यकीय मदत देणें.

क–मुलांना पौष्टिक अन्न मिळण्याची तरतूद करणें.

ड–पालकांना आवडेल व मुलांना ज्यांत गोडी लागेल व जो मुलांना त्यांच्या पुढील आयुष्यांत उपयोगीं पडेल असा स्वतंत्र शिक्षणक्रम आंखणें.

ई–खेडयांतील जीवनाशीं समरस झालेले व सहानुभूतिपूर्वक चिकाटीनें खेडयांतील मुलांसाठीं काम करणारे शिक्षक व प्रचारक नेमणें.

फ–शेतकरी वर्गांतील शिकलेल्या मुलांना अधिकाधिक नोकऱ्या देणें.

यांपैकीं अ, ड, ई. या सूचनांचा विचार पुढें अनुक्रमें 'प्रौढांचें शिक्षण' 'अभ्यासक्रम व क्रमिक पुस्तकें' व 'शिक्षकांचें शिक्षण' या प्रकरणांत विस्तारानें केला आहे. येथे ब. क व फ या सूचनांचाच तपशीलवार विचार करण्याचें योजिलें आहे.

१. **मुलांना स्वच्छतेनें रहाण्याचें शिक्षण देणें:**—जीं मुलें शाळेंत येतात त्यांचें हातपाय घाणीनें भरलेले असतात. दांत कळकटलेले असतात किंवा डोळे चिपडानें भरलेले असतात. अशा मुलांना शाळेंत आल्याबरोबर त्यांचे हातपाय, दांत, डोळे धुवावयास लावणें अत्यंत जरूर आहे व यासाठीं शाळेंत एका खोलींत पाण्याची, साबणाची, दंतमंजनाची सोय करावी व तोंड पुसण्यास रुमालहि ठेवावे. इंग्लंडमध्यें अशा तऱ्हेची सोय करण्यांत येते. या खोलींत एक आरसाहि ठेवण्यांत यावा म्हणजे मुलांना हातपाय वगैरे

causes of preference of urban life, compare unfavourable with the town dwellers as regards 'economic conditions, communications, social attractions, health conditions and the provision of education.' O. R. No. 11, P. 28.

धुण्यापूर्वी आपण कसें होतों व नंतर कसे दिसतों हें पहातां येईल व हलके हलके अस्वच्छता व स्वच्छता यांतील महत्त्वाचा फरक त्यांच्या मनावर बिंबला जाईल.

त्याचप्रमाणे प्रत्येक शाळेंतील मुलांना मोरींत लघुशंकेसाठीं व पायखान्यांत मलविसर्जनासाठीं जाण्याची सक्ती करण्यांत यावी व त्यासाठीं प्रत्येक शाळेच्या आवारांत जरूर तितक्या मोऱ्या व पायखाने करण्याची तजवीज करण्यांत यावी. प्रा. शि. नि. नं. ६३ प्रमाणें जरूर तितक्या मुताऱ्या व शौचकूप बांधण्याची बोर्डानें जबाबदारी पत्करलेली आहेच. मुलें शौच्यास जातांना पाणी नेतात किंवा नाहीं याकडेहि लक्ष ठेवणें जरूर आहे.

अनेक मुलांचे कपडे घाणेरडे असतात. त्या मुलांच्या पालकांना सांगून त्या मुलांचे कपडे वरचेवर स्वच्छ केले जातील, अशी व्यवस्था करण्यांत यावी, ही सूचना करतांना अनेक पालक मास्तरच्या सांगण्याकडे मुळींच लक्ष देणार नाहींत. याची आम्हांला जाणीव आहे. परंतु यदाकदाचित् शिक्षण सक्तीचें झाल्यास आपले-कडील कायद्यांतहि, इंग्लंडमधील एज्युकेशन ॲक्ट १९२१च्या कलम ८७च्या नमुन्यावर एखादें कलम घालण्यांत यावें. एज्युकेशन ॲक्ट १९२१ च्या या कलमाप्रमाणें स्थानिक शिक्षणसंस्थेला आपल्या वैद्यकीय अधिकाऱ्याला, खात्यामार्फत चाललेल्या एखाद्या प्राथमिक शाळेंतील विद्यार्थ्यांची तपासणी करण्यास सांगतां येतें. अशी तपासणी केल्यानंतर त्या मुलांचे अंगावर किंवा कपडयावर कांहीं कृमी दिसून आल्यास किंवा त्याचें अंग अगर कपडे अति-शय गलिच्छ (Foul or filthy) अवस्थेत असलेले दिसले तर स्थानिक संस्थेला, त्या मुलाच्या पालकाला त्या मुलाचे अंग किंवा वस्त्रें २४ तासांत योग्य प्रकारें स्वच्छ करण्याबद्दल ताकीद देतां येते. ही ताकीद देतांना त्या मुलाला कसें स्वच्छ करावें हेंहि कळविण्यांत येतें. याप्रमाणें ताकीद दिल्यानंतर त्या मनुष्यानें जरूर ती व्यवस्था केली नाहीं तर खात्याच्या वैद्यकीय अधिकाऱ्याला किंवा दुसऱ्या अधिकृत इसमाला त्या मुलाला शाळेंतून काढून दुसऱ्या ठिकाणीं नेऊन योग्य त्या साधनांचा उपयोग करून स्वच्छ करतां येतें. याप्रमाणें एक वेळ स्वच्छ केलेल्या मुलाचें अंग किंवा कपडे पुन्हां त्याच्या पालकानें गलिच्छ होऊं दिले, तर त्याला दहा शिलिंगांपेक्षां अधिक नाहीं इतका दंड करतां येतो. मुलांप्रमाणें मुलींच्या बाबतींत जरूर ती स्वच्छतेची व्यवस्था स्त्रियांकडून कर-विण्यांत येते. लहान मुलांना स्वच्छतेनें रहाण्याचें हें शिक्षण देतांना वर्गावरील

शिक्षकांस विशेष लक्ष द्यावें लागेल व त्यांनीं याप्रमाणें चिकाटीनें प्रयत्न केल्यास मुलांच्या वागणुकींत फेरबदल झाल्याचें खात्रीनें दिसून येईल. शाळेची तपासणी करणारांनीं शाळेंतील मुलांच्या अभ्यासाप्रमाणें मुलांच्या शारीरिक स्वच्छतेकडेहि लक्ष देऊन त्याचा शेरेबुकांत उल्लेख करावा. " प्रत्यक्ष आपले हात, पाय, दांत, तोंड धुवावयास लावून व वर्ग आणि वर्गातींल कपाटें वगैरे जिनसा साफ ठेवण्याचें मुलांना वळण लावून त्यांना स्वच्छतेनें रहाण्याची जी संवय होईल ती महत्त्वाची असून, ही संवय निव्वळ तोंडी आरोग्यशास्त्रा-विषयींच्या शिकवणुकीनें होणार नाहीं. " ‡

२. वैद्यकीय तपासणी व मदतः—आमच्या मुलांना त्वचेचे, दांतांचे किंवा डोळ्याचे अनेक रोग असतात. कांहीं रोग स्पष्टपणें दिसतात, परंतु कांहीं रोग, विगरवैद्यकीय माणसाला ओळखतां येणार नाहींत, अशा अव-स्थेत असतात; व त्यामुळें त्या रोगांनीं पछाडलेल्या मुलांप्रमाणें त्यांच्या सहवासांत फिरणाऱ्या इतर मुलांनाहि संसर्गानें बाधा होते. यासाठीं प्रत्येक मुलाची वैद्यकीय तपासणी नियमानें होणें अत्यंत जरूर आहे. या अशा तपा-सणीचे तीन प्रकारचे उद्देश आहेत.

" १. जी शिक्षणाची तरतूद करण्यांत आली आहे त्याचा प्रत्येक मुलाला पूर्ण फायदा घेतां यावा म्हणून, तावडतोब उपाययोजना करतां येईल असा मुलांच्या शरिरांत किंवा मनांत कांहीं दोष आहे कीं काय हें पहाणें.

२. असा कांहीं दोष दिसून आल्यास तो तावडतोब नाहींसा करण्यासाठीं उपाययोजना करणें.

३. त्या मुलाला आरोग्याच्या मार्गाला लावून तो शरीरानें व मनानें पूर्णपणें निरोगी, सशक्त, कार्यक्षम व सुखी कामकरी होईल असें पहाणें."$

हे उद्देश साध्य होण्यासाठीं इंग्लंडच्या एज्युकेशन ॲक्ट—(१९२१)च्या कलम ८० प्रमाणें आरोग्य—खात्याच्या दिवाणाच्या मंजुरीनें प्राथमिक शाळां-तील मुलांची वैद्यकीय तपासणी करण्याची तजवीज करण्याची जबाबदारी स्थानिक-शिक्षणसंस्थेवर टाकण्यांत आली आहे. या जबाबदारीप्रमाणें प्राथमिक शाळांतील मुलांची तपासणी साधारणपणें ते शाळेंत दाखल झाल्यानंतर

‡ The Health of the School Child, p. 9. $ Health–P. 10.

एकदां, मध्यंतरीं एक वेळ व शाळा सोडण्याच्या वेळीं एकदां अशी एकंदर तीन वेळ करण्यांत येते.

या तपासणीच्या कामासाठीं स्कूल मेडिकल ऑफिसर व असिस्टंट स्कूल मेडिकल ऑफिसर, स्पेशालिस्ट मेडिकल ऑफिसर, स्कूल डेन्टिस्ट व स्कूल नर्सेस अशा प्रकारचे अधिकारी व नोकरवर्ग नेमण्यांत येतात.

हा अधिकारीवर्ग आपलें तपासणीचें कार्य शिक्षकांच्या सहकार्यानें करतो. या तपासणीच्या वेळीं मुलाचा पालक, विशेषतः आई, हजर राहील अशी खबरदारी घेण्यांत येते. पालकांच्या समक्ष मुलाची तपासणी केल्यानंतर, त्याला किंवा त्या मुलाची आई हजर असल्यास तिला त्या मुलांत काय कमी-जास्त आहे हें सांगण्यांत येतें व दिसलेले दोष घालविण्यासाठीं काय उपाय करावेत याबद्दल सूचनाहि करण्यांत येतात. डोळ्यांबद्दल किंवा दांतांबद्दल औषधोपचार जरूर तेव्हां मोफतहि करण्यांत येतो.¶ एज्युकेशन ॲक्टच्या कलम ८१ प्रमाणें वैद्यकीय मदतीबद्दल जो वाजवी खर्च आला असेल तेवढी रक्कम त्या विद्यार्थ्याच्या पालकाकडून वसूल करण्यांत येते. परंतु पालक गरीब स्थितींतील असल्यास त्याच्या मुलास केलेल्या औषधोपचाराच्या खर्चाचा कांहीं अंश किंवा वेळीं सर्वच माफ करण्यांत येतो.†

मेडिकल ऑफिसरप्रमाणें हेल्थ व्हिजिटरहि नेमण्यांत आलेले असतात व हे हेल्थ व्हिजिटर प्रत्येक शाळेला दर महिन्याला भेट देऊन शिक्षकाच्या माहितीप्रमाणें एखादें मूल अस्वच्छ असलें किंवा एकाद्या मुलांत कांहीं शारीरिक दोष निर्माण झाला असल्यास त्याची तपासणी करतात. हेल्थ व्हिजिटरनें तशी शिफारस केल्यास या मुलास स्कूल मेडिकल ऑफिसर स्वतः तपासतो व औषधोपचार करतो. त्याचप्रमाणें, स्कूल मेडिकल ऑफिसरनें ज्या मुलांत कांहीं दोष दाखविला असेल त्या मुलाच्या पालकानें, मेडिकल ऑफिसरनें सांगितल्याप्रमाणें योग्य ती तजवीज केली का नाहीं, हें पहाण्याचें कामहि हेल्थ व्हिजिटरला करावें लागतें.

इंग्लंडमध्यें ही जी वैद्यकीय तपासणीची योजना करण्यांत आली आहे, त्यामुळें मुलांतील स्वच्छतेचें प्रमाण फार वाढलें आहे. पालकांनाहि ही योजना आवडली असून, आपल्या मुलांना डोळ्यांचे किंवा दांतांचे औषधोपचार करण्यांत आल्याबद्दल ते कृतज्ञता व्यक्त करतात. कांहीं मुलांना चष्मे मिळाल्या-

¶ R. E. P. 108. † Health, P. 14.

मुळें त्यांचाहि फार फायदा झाला आहे.§ कांहीं ठिकाणीं पालक मेडिकल ऑफिसरनें दिलेल्या सूचनांप्रमाणें वागतात व कांहीं मुळींच वागत नाहींत,‡ असेंही आढळतें !

एकंदरींनें या योजनेमुळें इंग्लंडमधील, विशेषतः खेडेगांवांतील मुलांच्या आरोग्याची चांगलीच वाढ झाली आहे, असाच सर्वांचा एकमताचा अभिप्राय आहे.

आपल्या प्रांतांत कॉलेजमधील व दुय्यम शाळांतील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे; पण ज्यांना अशा तपासणीची खरी जरूरी असून ज्यांना तिच्यामुळें खरा फायदा होणार आहे, त्या खेडेगांवांतील मुलांसाठीं मुळींच योजना करण्यांत आलेली नाहीं, ही मोठी खेदाची गोष्ट आहे ! शहरांतील मुलांच्या आरोग्याची काळजी त्यांच्या पालकांकडूनच बरीच घेतली जाते व त्यांना शहरांत वाटेल त्या वेळेस उत्तम प्रकारची वैद्यकीय मदतहि मिळूं शकते. परंतु अशाच वर्गांसाठीं वैद्यकीय तपासणीची तरतूद करण्यांत येत असून, ज्यांना मुळींच कांहीं वैद्यकीय मदत मिळण्याचें साधन नाहीं व जे हजारों रोगांनीं ग्रस्त झालेले आहेत, त्यांच्यासाठीं कोणतीच योजना नाहीं याला काय म्हणावें ? ज्याला पुरणपोळी मिळत आहे त्याच्यासाठीं तुपाची योजना करण्याची काळजी वाहून, ज्यांना ओली कोरडी भाकरी मिळत नाहीं त्यांच्याकडे ढुंकूनहि पहावयाचें नाहीं, हा कोठला न्याय ? इंग्लंडच्या नमुन्यावर आमच्या खेडयांतील शाळांसाठींहि वैद्यकीय तपासणी करण्याची योजना सरकार कधीं करणार ?

२. **मुलांचा मधला फराळ:**—पुष्कळ गांवांत शाळेची वेळ दुपारीं ११॥ ते ५ अशी असते. ज्या ठिकाणीं शाळा दुबार भरतात म्हणजे सकाळीं व दुपारीं अशा भरतात त्या ठिकाणीं, मधल्या वेळेंत मुलांना घरीं जाऊन जेवून येतां येतें. परंतु ज्या ठिकाणीं शाळेची सुरवातीची वेळ ११॥ वा. ची असते त्या ठिकाणीं मुलांना सुमारें २ किंवा २—३० वाजतां मधली सुटी फराळाकरितां मिळते. मोठ्या शाळेंत कांहीं मुलें लांबून म्हणजे मैल दोन मैल अंतरावरून आलेलीं असतात. कांहीं ठिकाणीं मुलें गांवचींच असलीं तरी त्यांची वसती गांवापासून दूर अशा पडळींवर असते. अशा लांबून येणाऱ्या मुलांना दुपारच्या सुटींत घरीं जाऊन कांहीं खाऊन येणें शक्य नसतें.

§ R. E. P. 109. ‡ R E. P. 143.

साडेअकरा वाजतां शाळा असली तरी मुलें साधारणपणें दहा वाजतांच जेवतात. खेडेगांवच्या मुलांचें बहुतेक जेवण ताजी किंवा शिळी भाकरी व तिच्या बरोबर कांहीं कालवण किंवा मिरची अगर कांदा ! फारच थोडया मुलांना भात मिळतो. शेतकरी वर्गांतील सुस्थितींतील माणसाच्या घरींहि सणावाराशिवाय भात दिसत नाहीं व हा सणाला होणारा भातहि जाड तांदुळाचा. ज्यांच्या घरीं बारीक तांदूळ होतात, तो शेतकरीहि ते तांदूळ बाजाराला पाठवून कण्यांवर आपला प्रपंच भागवितो. घरीं कांहींहि पिकलें तरी चांगला माल बाजारांत जातो व गाळगळाठा शेतकऱ्यांच्या पोरांच्या वांट्याला येतो. त्यामुळें दररोज शाळेंत जातांना मुलांच्या वांट्याला भाकरी व चटणीशिवाय दुसरें कांहीं येत नाहीं.

दहा वाजतां जेवून बाहेर पडलेला मुलगा मैल किंवा दोन मैल अंतर चालून शाळेंत जातो व तेथेंहि शाळा प्रत्यक्ष उघडेपर्यंत इतर मुलांबरोबर खेळतो व त्यानंतर दोन अडीच तास वर्गांत शिक्षण घेतो. त्यामुळें मधल्या सुटीच्या सुमारास त्याच्या पोटांत आग भडकणें अगदीं सहाजीक आहे. अशा मुलांना व खऱ्या निकोप व उत्साही खेळकर मुलांना दुपारच्या सुटींत फराळाची-कांहींतरी खाण्याची—तीव्र आवश्यकता वाटूं लागते.

परगांवचीं किंवा लांबून येणारीं मुलें आपल्या बरोबर कांहीं ओली कोरडी भाकरी मिळेल ती मधल्या सुटींत खाण्यासाठीं घेऊन येतात. गांवांतील मुलां-पैकींहि कांहीं मुलें दुपारच्या सुटींत खाण्यासाठीं बरोबर कांहीं घेऊन येतात व घर नजीक असल्यास घरीं जाऊन येतात.

परंतु पुष्कळशा मुलांना या दुपारच्या वेळीं शिळे व थंडगार झालेले जिन्नस खावे लागतात व कांहीं मुलांना तेही पुरेसे मिळत नाहींत व कांहीं गरीब मुलांना तर इतरांच्या तोंडाकडे पहातच बसावें लागतें. शिळे व थंड-गार पदार्थ खाल्ल्यामुळें मुलांच्या प्रकृतीवर परिणाम होतो. त्याचप्रमाणें अनेक मुलांना गरिबीमुळें दांताला दांत लावून बसावें लागल्यामुळें, त्यांच्या मनाला असंतुष्ट रहावें लागतें व याचा परिणाम त्यांच्या शरीरावर दिसूं लागतो.

खेड्यांतील शाळांतील मुलांची प्रकृति चांगली रहावी, त्यांच्या शरिरांत निकोपता वाढून त्यांचें शरीर कणखर बनावें असें वाटत असेल, तर त्यांची नुसती वैद्यकीय तपासणी करून व शरीर व्याधींचें माहेरघर बनलें आहे असें

सांगून भागणार नाहीं. त्यांच्या दुपारच्या फराळाची आरोग्यास पोषक अशी आम्हीं कांहींतरी तजवीज करणें जरूर आहे.

या बाबतींत इंग्लंडमध्यें काय व्यवस्था आहे, हें पाहूं व मग आपल्याकडे काय करतां येईल याचा विचार करूं.

एज्युकेशन ॲक्ट–(१९२१) च्या कलम ८२ प्रमाणें प्राथमिक शाळेंत शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठीं शाळेच्या दिवशीं किंवा इतर वेळीं योग्य वाटेल ती व्यवस्था करण्याचा अधिकार, स्थानिक शिक्षण-संस्थांना देण्यांस आला आहे. अशी व्यवस्था प्रत्येक स्थानिक शिक्षणसंस्थेनें केलीच पाहिजे अशी कायद्याची सक्ती नाहीं; पण याप्रमाणें व्यवस्था करण्याचें एखाद्या स्थानिक शिक्षणसंस्थेनें ठरविल्यास मुलांना अन्न पुरविण्याच्या कामीं मदत करण्यासाठीं त्यांना स्थानिक लोकांच्या कमिट्या नेमतां येतात. या कमिट्यांना **स्कूल कॅन्टीन** कमिटी असें म्हणतात व या कमिटीस आपलें कार्य करण्यासाठीं जरूर लागेल ती जागा, इमारत, सामान, किंवा नोकरचाकर स्थानिक शिक्षणसंस्थेला पुरवितां येतात. कलम ८३ प्रमाणें प्रत्येक मुलासांठीं अन्न पुरविण्याकरितां जो खर्च आला असेल, तो स्थानिक शिक्षणसंस्थेच्या आकारणीप्रमाणें त्या मुलाच्या पालकाच्या नांवें मांडण्यांत येतो व ती रक्कम त्याच्याकडून मागण्यांत येते; व त्यानें ती न दिल्यास व तो खरोखरच गरीब असून ती रक्कम देण्यास असमर्थ आहे असें स्थानिक शिक्षणसंस्थेची खात्री न झाल्यास, त्याच्याकडून ती सक्तीनें वसूल करण्यांत येते. अशा तऱ्हेनें वसूल झालेल्या रकमा कॅन्टीन कमिटीकडे देण्यांत येतात व त्यांतूनच त्यांचा खर्च भागविण्यांत येतो.

कलम ८४ प्रमाणें प्राथमिक शाळेंत शिक्षण घेणारीं कांहीं मुलें अन्नाच्या अभावीं शिक्षणाचा पुरा फायदा घेण्यास असमर्थ आहेत असें स्थानिक–शिक्षण–संस्थेनें ठरविल्यास व इतर पैशांतून त्यांच्या अन्नाचा खर्च भागविणें शक्य नाहीं असें तिचें मत झाल्यास, स्थानिक कराच्या उत्पन्नांतून असें अन्न पुरविण्यासाठीं जरूर तो खर्च करण्याचा अधिकार देण्यांत आला आहे.

परंतु याप्रमाणें व्यवस्था करण्याची सक्तीची जबाबदारी प्रत्येक स्थानिक शिक्षणसंस्थेवर कायद्यानें टाकण्यांत आलेली नसून, ही व्यवस्था करणें त्यांच्या इच्छेवर सोंपविण्यांत आलें आहे. त्यामुळें कांहीं ठिकाणीं ही व्यवस्था करण्यांत आल्याचें व कांहीं ठिकाणीं ती मुळींच नसल्याचें दिसून येतें.

ज्या ठिकाणीं ही व्यवस्था करण्यांत आली आहे त्यांपैकीं कांहीं ठिकाणीं मधल्या वेळच्या फराळाचीच तरतूद करण्यांत आली, तर कांहीं ठिकाणीं—मोकळ्या हवेंतील शाळेंत—मुलांना दिवसांतून तीन वेळ खाण्यास देण्यांत येतें. सकाळीं न्याहारी, दुपारीं जेवण व पांच वाजतां चहा याप्रमाणें मुलांना पुरविण्यांत येतें.§ इंग्रज लोकांचा चहा आपल्यासारखा नुसता चहा नसतो. त्यांच्या चहाबरोबर इतर पदार्थहि खाण्यास असतात. मुलांच्या पालकांना त्यांच्या शक्तीप्रमाणें या खर्चासाठीं मदत करावी लागते व अशा मदतीची रक्कम दर आठवड्यास ३ शिलिंग ४ पेन्सपेक्षां जास्त नसते.¶

ज्या कांहीं स्थानिक शिक्षणसंस्थांनीं अद्यापही सोय केलेली नाहीं, त्या ठिकाणीं तशी सोय केली नाहीं म्हणून पालकांची ओरड ऐकूं येते. निदान मुलें जें फराळाचें साहित्य घरून घेऊन येतील तें एकत्र बसून खाण्यासाठीं त्यांना चांगली जागा शाळेंत पुरविण्यांत यावी, अशीही मागणी करण्यांत येत आहे. *

"ज्या शाळेंतून अशी कांहीं व्यवस्था करण्यांत आलेली नाहीं, त्या शाळेंतील मुख्य शिक्षक कधीं कधीं मुलाच्या खर्चापुरती रक्कम घेऊन दुपारीं कोको पुरवितात; त्याचप्रमाणें मुलांनीं घरून आणलेले पदार्थ गरम करण्यासाठीं शाळेंत शेगडीची व्यवस्था करून ठेवण्यांत येत असते.

मधल्या फराळाच्या वेळीं मुलांच्यावर देखरेख करणें शिक्षकाच्या वृत्तीवरच अवलंबून असतें. कांहीं ठिकाणीं शिक्षक हे देखरेखीचें काम करीत नाहींत, त्यावेळीं मुलें आपल्या मनाप्रमाणें वागतात. थंडीच्या दिवसांत शाळेंतील शेगडीभोंवतीं ते फराळासाठीं बसतात. उन्हाळ्यांत बाहेर उघड्यावर बसतात. एक शिक्षक, मुलांवर देखरेख करण्यासाठीं आपला फराळहि मुलांबरोबरच घेतो. फराळापूर्वी सगळ्या मुलांना हात, पाय, तोंड स्वच्छ धुण्यास सांगण्यांत येतें."

मुलांच्या खाण्याची सोय करण्याची जबाबदारी स्थानिक-शिक्षण-संस्थांच्या इच्छेवर सोंपविण्यांत आलेली असली, तरी अनेक स्थानिक-शिक्षण-संस्थांनीं तशी सोय केली आहे. १९२० सालीं ३१७ स्थानिक शिक्षणसंस्थांपैकीं १५३ संस्थांनीं ही सोय केली होती व त्यांच्यामार्फत २८५००० मुलांना ४ कोटीपेक्षां अधिक जेवणें देण्यांत आलीं; व यांपैकीं निम्मी दुग्धभोजनें (milk-meals) होतीं.†

§ देसाई २६२. ¶ देसाई २६३. * R. E. 134. † Health, p. 42

इंग्लंडमधील ही व्यवस्था पाहिल्यानंतर आपणांस इकडे काय करतां येईल हें पहाणें जरूर आहे. मुलांना मधल्या सुटींत खावयास देणे, त्यांच्या वाढीला मदत करण्याच्या दृष्टीनें अत्यंत इष्ट आहे. परंतु दारिद्र्यानें ग्रासलेल्या या आपल्या देशांत इंग्लंडमधील मुलांप्रमाणें लोणी, अंडीं असलें कसदार अन्न आपणांस कसें पुरवितां येणार ? इंग्लंडमध्यें दर आठवड्यास शेतीवरील मजुरास ४२ ते ४७ शिलिंग (म्हणजे ४॥ ते ५ रुपये दररोज) मिळाले तरी तो गरीब-अत्यंत गरीब-समजला जातो.¶ आमच्याकडे ४ ते ६ आण्यांपलीकडे दररोजची मजुरी जात नाहीं. अशा या कंगाल देशांत इंग्लंडचा कित्ता आम्हांला कसा गिरवतां येणार ?

कसदार अन्न जरी आम्हास देतां आलें नाहीं तरी आमचे शेतकरी घरीं जी भाजीभाकरी खातो तीच आम्हास शाळेंत तयार करून देतां येईल का ? आमच्या मतें तसें करण्यास हरकत नाहीं. प्रत्येक पालकाकडून कांहीं ठराविक प्रमाणांत धान्य किंवा पीठ घेण्यांत यावें व इतर पालेभाजी गांवात होत नस-ल्यास निदान झुणक्याचा बेत करावा व सर्व मुलांना दुपारच्या सुटींत एकत्र बसवून शाळेंत तयार केलेली झुणका-भाकर देण्यांत यावी. गरीब लोकांच्या मुलांना हें अन्न अगदीं मोफत देण्यांत यावें.

हें अन्न तयार करण्यासाठीं शाळेंत प्रौढ मुली असल्या तर त्यांचा उपयोग पाळीपाळीनें करण्यांत यावा, म्हणजे त्यांनाहि पाकशास्त्राचें शिक्षण मिळेल. इंग्लंडमध्यें शाळेंत स्वैंपाक शिकविण्याचे जे वर्ग आहेत त्यांचा अशा कामाकरितां उपयोग कैक ठिकाणीं करण्यांत येतो.§ इंग्लंडमध्यें ज्याप्रमाणें कांहीं ठिकाणीं गांवांतील लोकांच्या उत्साही कमिटीकडे ही व्यवस्था सोंपविण्यांत येते, त्याप्रमाणें आमच्याकडेंहि स्थानिक लोकांकडे ही व्यवस्था सोंपविल्यास मुलांच्या आयांपैकीं कांहीं बाया दररोज पाळीपाळीनें हा स्वैंपाक करण्यास खात्रीनें मदत करतील. यदाकदाचित् मोफत स्वैंपाक करण्याची सोय न झाल्यास एखादी अल्प वेतना-वर बाई नोकर म्हणूनहि ठेवावी लागेल व तिचा खर्चहि, पालकांकडून जी वर्गणी मिळेल किंवा सरकार अगर धनिक यांच्याकडून जी मदत मिळेल, त्यांतून भागवितां येईल.

प्रौढ मुलांची एक कमिटी स्थापन करून त्या कमिटीनें वा जेवणावर देख-

¶ R. E. 127. § R. E. 107.

रेग्व करण्याचें काम करावें. इंग्लंडमध्यें हें देखरेखीचें काम गांवांतील स्वयंसेवकांकडे सोंपवितात. मोठ्या मुलांनीं इतर मुलांना पाळीपाळीनें वाढावें म्हणजे तेंहि एक प्रकारचें त्यांना शिक्षण दिल्यासारखें होईल. जेवणासाठीं शाळेच्या इमारतींतच एक स्वतंत्र खोली असावी. उन्हाळ्यांत जेवणाचा कार्यक्रम एखाद्या विशाल झाडाच्या शीतल छायेंत करावा, म्हणजे त्याला वनभोजनाची मजा येईल.

या बाबतींत अडचण खर्चाचीच आहे. त्यासाठीं बऱ्या स्थितींतील पालकांकडून धान्याच्या रूपानें वर्गणी घेण्यांत यावी. या कामासाठीं एक फंड गोळा करण्यांत यावा व या फंडास धनिक मंडळींनीं मदत करावी. विशेषतः राख फासणाऱ्या साधूंना शिरापुरी चारणाऱ्या श्रीमंत मंडळींनीं खेडयांतील मुलांना पोटभर जेवण घालण्यासाठीं, आपल्या धर्मादाय होणाऱ्या पैशाचा कांहीं अंश दिल्यास व या मदतींत सरकारनें कांहीं भर घातल्यास, ही आर्थिक अडचण सहज दूर होईल. इतकेंच नव्हे तर आम्हांला मधल्या वेळीं दूध किंवा निदान भाकरीबरोबर ताक तरी मुलांना खात्रीनें पुरवितां येईल व त्यामुळें मुलांच्या प्रकृतींत फरक पडेल.

या उपक्रमानें मुलांच्या प्रकृतीप्रमाणें त्यांच्या मनावर इष्ट परिणाम झाल्यावांचून रहाणार नाहीं. सर्व वर्गांचीं व सर्व जातींचीं मुलें एकत्र बसून जेवण करूं लागल्यानंतर, त्यांच्या मनांतून आर्थिक मोठेपणाची भावना नाहींशी होऊन, आपण एका घरांतील मुलें आहोंत, ही राष्ट्राच्या दृष्टीनें महत्त्वाची, भावना निर्माण होईल. जातीभेदाचे पुरस्कर्ते प्रथम या उपायास हरकत घेतील, परंतु ही हरकत हलके हलके वितळल्यावांचून रहाणार नाहीं. अस्पृश्यांच्या मुलांना इतर मुलांच्या बरोबर वर्गांत बसूं देण्यासही एक वेळ लोकांची हरकत असे. परंतु हल्लीं ही हरकत पूर्ण लोपल्याचें अनुभवास येत असून, शाळा देवळांत भरत असली तरी देवळांत—निदान सभामंडपांत—अस्पृश्यांना प्रवेश बिनहरकत मिळूं लागला आहे. बालगोपालांच्या मनांत अगदीं बालपणांतच समतेच्या तत्त्वाची ही अशी केलेली पेरणी देशाला फलदायी ठरल्यावांचून रहाणार नाहीं. सरकारनें व स्थानिक संस्थांनीं, विरोधाच्या वादळास न भितां हा उपक्रम सुरू करण्याचें धाडस मात्र केलें पाहिजे.

४. **विद्यार्थ्यांचें वर्गीकरण**:—प्राथमिक शाळेंत येणाऱ्या मुलांचें निराळ्या दृष्टीनें थोडें वर्गीकरण करणेंहि अत्यंत जरूर आहे.

अ.—हें वर्गीकरण वयाच्या दृष्टीनें करतां येईल. हल्लीं आम्ही मुलाला पांचवें वर्ष पुरें झाल्यानंतर शाळेंत दाखल करून घेतों. पांचव्या वर्षापासून ते सातव्या वर्षाअखेरच्या मुलांचा एक वर्ग व त्यानंतरच्या वयाच्या मुलांचा दुसरा वर्ग, असे आम्हीं दोन वर्ग करणें जरूर आहे. पहिल्या वर्गाला आपण बालवर्ग म्हणूं व दुसऱ्या वर्गाला बालकवर्ग असें नांव देऊं. इंग्लंडमध्यें या दोन वर्गाला अनुक्रमें (Infant Classes व Junior Classes) अशीं नांवें देण्यांत आलीं असून या दोन वर्गाला शिकविण्याच्या पद्धतींत व अभ्यासक्रमांत पूर्ण फरक करण्यांत आलेला आहे.[1] याबद्दल विशेष वर्णन पुढें अभ्यासक्रम व क्रमिक पुस्तकें या प्रकरणांत केलें आहे. येथें येवढेंच लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं, दोन्ही वर्गांतील मुलांना एकाच वर्गांत एकाच शिक्षकाकडून व एकाच वेळीं व एकाच पद्धतीनें जें शिकविण्यांत येत आहे, तें अनिष्ट असून त्यामुळें दोन्ही वर्गांतील मुलांची कुंचबणा होऊन शाळेंतील जीवन कंटाळवाणें वाटतें. तरी ही पद्धत शक्य तितक्या लवकर बंद केल्यास मुलांचा अनेक दृष्टीनें फायदा होईल व त्यांना शाळेंत येण्यास अधिक हुरूप वाटेल.

या ठिकाणीं लहान मुलांच्या दृष्टीनें दुसरीहि एक सूचना करावीशी वाटते. लहान मुलांच्या मनाची कळी नवीनपणें उमलूं लागली असतांना त्या कळीची हलक्या हातानें व हलक्या मनानें योग्य काळजी घेण्याचें काम स्त्री शिक्षकाकडे सोपविणें अत्यंत जरूर आहे. लहान मुलांचे वर्ग पाश्चिमात्य देशांत स्त्रीशिक्षकांच्या ताब्यांतच देण्यांत येतात व असले वर्ग पुरुषशिक्षकांच्या ताब्यांत देणें म्हणजे शिक्षणशास्त्राच्या दृष्टीनें महत्पाप करणें, असें तिकडील लोकांना वाटतें. आमच्याकडे सामाजिक व इतर कारणांमुळें शिक्षकिणींचा कसा तुटवडा पडला आहे याची चर्चा दुसरीकडे केली आहेच. ही अडचण दूर होईपर्यंत बालवर्गावर शिक्षण शास्त्राचा व विशेषतः मानसशास्त्राचा अभ्यास केलेले निवडक शिक्षक नेमण्यांत यावे. नुसत्या व्ह. फा. च्या ताब्यांत अशीं मुलें देणें म्हणजे शाळेचें कोंडवाडयांत रूपांतर करण्यासारखें आहे.

ब.—वयाप्रमाणें प्रकृतीच्या कारणामुळेंहि मुलांत दोन गट होऊं शकतात. कांहीं मुलें प्रकृतीनें चांगलीं असतात व त्यांचा एक वर्ग होतो, तर कांहीं मुलें प्रकृतीनें खालावलेलीं व नेहमीं दुर्बल अशीं असतात. या अशा मुलांचा निराळा वर्गच होतो. या दोन्ही वर्गांतील मुलांच्या शिक्षणाची स्वतंत्र व्यवस्था

[1] देसाई २५३.

होणें जरूर आहे. विशेषतः ज्यांची प्रकृति फार ढासळलेली आहे व जे नेहमीं अगदीं अशक्त, निस्तेज दिसतात त्यांच्यावर सशक्त मुलांना झेपेल असा अभ्यासाचा बोजा न टाकतां, उलट त्यांची प्रकृति सुधारेल अशी उपाययोजना करणें जरूर आहे.

मोकळ्या हवेंतील शाळा:—इंग्लंडमध्यें नेहमीं दुबळ्या असणाऱ्या अशा मुलांसाठीं त्यांना अधिक उजेड व हवा मिळावी व जरूर तर सूर्य किरणांचाही फायदा मिळावा म्हणून मोकळ्या पटांगणांत एखादे वृक्षाखालीं सकाळीं व संध्याकाळीं शाळा भरविण्यांत येतात व त्यांना (Open air school) असें म्हणतात. या प्रकारच्या शाळा निघण्याचें कारण असें झालें कीं, वैद्यकीय तपासणी सुरू करण्यांत आल्यानंतर, मुलांना रक्तक्षय व इतर रोग झाल्यामुळें दुर्बलता येऊन, शिक्षणाचा फायदा घेतां येत नाहीं, असें दिसून आलें. अशा मुलांना शाळेच्या चार भिंतींच्या आंत ठेवून त्यांच्यावर अभ्यासाचा बोजा टाकल्यानें त्यांची प्रकृति अधिकच खालीं घसरूं लागे व त्यांना शाळेंतून काढल्यास सर्वच शिक्षणास मुकावें लागे. अखेर त्यांच्या प्रकृतीला फायदा होईल व थोडें शिक्षणहि लाभेल अशी तडजोडीची व्यवस्था म्हणून ही मोकळ्या हवेंतील शाळांची पद्धत जन्माला आली.

या शाळांतून खालील बाबींकडे विशेष लक्ष देण्यांत येतें.

१. मोकळी हवा व उजेड.
२. योग्य आहार.
३. विश्रांती.
४. आरोग्यवर्धक रहाणी.
५. व्यक्तिगत देखरेख.
६. औषधोपचार.
७. खास शिक्षणपद्धति.

या शाळांतील मुलें लांबून येणारीं असल्यास त्यांची ट्रॅम, मोटारगाडी किंवा आगगाडीनें शाळेला येण्याची व्यवस्था करण्यांत येतें व त्या प्रवासाचा ख़र्च स्थानिक शिक्षणसंस्था सोसते. त्याचप्रमाणें या मुलांना विश्रांतीसाठीं लागणारे अंथरूण, पांघरूणहि शाळेमार्फत पुरविण्यांत येतें. त्यांना पौष्टिक अन्नहि देण्यांत येतें. पालकांची आर्थिक स्थिति बरी असली तर त्यांच्याकडून

खर्चाची रक्कम वसूल करण्यांत येते. परंतु तो गरीब स्थितींतील असला तर त्याला त्या खर्चाची माफी देण्यांत येते. मुलांना दिवसांतून सकाळची न्याहारी, दुपारीं जेवण व संध्याकाळीं चहा असें तीन वेळ खाण्यास देण्यांत येतें व याचा खर्च दर आठवड्यास ३ शिलिंग ४ पेन्सपर्यंत सुस्थितींतील पालकांकडून वसूल करण्यांत येतो. ही पालकांकडील मदतीची रक्कम शाळेची व्यवस्थापक कमिटी ठरविते. या कमिटीवरच शाळेची व मुलांची योग्य ती व्यवस्था करण्याची जबाबदारी टाकण्यांत आलेली असते.

या शाळेंतील मुलांची खास वैद्यकीय तपासणी वरचे वर करण्यांत येते व त्यांना खास औषधोपचारहि करण्यांत येतो.† एकंदरींत या शाळांतील दुबळ्या व रोगी मुलांना योग्य ते उपचार करून काटक व उपयोगी स्त्रीपुरुष बनविणें हा या शाळांचा हेतु आहे. (The aim of the open air school is so to train the children that they eventually become hary and handy men and women)*

क. बौद्धिक दृष्ट्याहि मुलांमध्यें वर्ग करतां येतात. कांहीं मुलें हुशार असतात व कांहीं मुलांना साधारण बुद्धीपेक्षांहि कमी बुद्धी असते. या सर्व मुलांना एकत्र शिकविल्यानें हुशार मुलांची व मंदबुद्धीच्या मुलांची अशी दोघांचीहि ओढाताण होते. हुशार मुलांच्या शीघ्रग्राही बुद्धीच्या मानानें शिक्षकानें शिकविण्याचा वेग ठेवल्यास, मंद ग्रहणशक्तीचीं मुलें कोरींच रहातात व त्यांना शिकविण्यासाठीं तीन तीन गोष्ट शिक्षक अनेकवार बोलून सांगू लागला कीं हुषार मुलांची प्रगति खुंटून, अनेकवार समजलेली गोष्टच पुन्हां ऐकण्याचा प्रसंग आल्यामुळें, त्यांना शिक्षणच कंटाळवाणें वाटूं लागतें. ज्याला जलद चालण्याची सवय आहे असा माणूस आपल्या सहजगतीनें अनेक मैल थोड्या वेळांत चालत जातो व त्याला त्यापासून विशेष कांहीं त्रासहि होत नाहीं. परंतु अशा माणसाला एखाद्या मंद चालीच्या स्नेह्याबरोबर गजगतीनें चालावें लागल्यास त्याला थोडें अंतर गेलें न गेलें तोंच थकवा येऊन सांधे दुखूं लागतात.

यासाठीं मंदबुद्धीचा मुलगा हुडकून काढून अशा मुलांचा स्वतंत्र वर्ग करण्यांत यावा व त्यांना शाळेव्यतिरिक्त वेळांत जादा शिक्षण देण्याची तजवीज

† इसाई २६०. * Health 35.

करण्यांत यावी, म्हणजे त्यांचाहि फायदा होऊन हुशार मुलांकडेहि विशेष लक्ष देतां येईल. हल्लीं विशेषतः खेड्यांतील शाळांमध्यें अशी सोय नसल्यामुळें, एकाच वर्गांत अनेक वर्षें राहाणाऱ्या मुलांची संख्या पुष्कळच वाढली असून त्यामुळें कारण नसतां जादा पैसा त्या मुलांप्रीत्यर्थ खर्च होतो व शेवटीं कंटाळून हीं मुलें शाळा सोडूनच घरीं बसलीं म्हणजे त्यांच्यासाठीं खर्चीं पडलेला सगळा पैसा पाण्यांत जातो.

ड.—मुलांच्या अभिरुचीकडे पाहून किंवा त्यांचा विशेष विषयाकडील ओढा पाहून, त्या दृष्टीनेंहि त्यांचें वर्गीकरण होणें जरूर आहे. कांहीं विद्यार्थ्यांना वाङ्मयी शिक्षण आवडतें. कांहीं मुलांची गती धंदेशिक्षणांत जास्त होते. तरी त्या दृष्टीनेंहि त्यांचे भिन्न मार्ग आखणें जरूर आहे. याचा विशेष विचार पुढें केला आहे.

५. शारिरिक शिक्षण :—मुलांना शाळेंत बसण्याची गोडी लागावी व त्यांच्या आरोग्याचेंहि संवर्धन व्हावें यासाठीं काय करावें, याचा आपण विचार केला आहे. याच बाबतींत महत्त्वाच्या एका बाबीची चर्चा केल्यावांचून या प्रश्नाचें विवेचन आपणांस पुरें करतां येणार नाहीं. मुलाच्या अंगांत कांहीं रोग असल्यास तो वैद्यकीय तपासणीनें पाहून त्यावर औषधोपचार झाले म्हणजे मुलाचें शरीर रोगरहित झालें; परंतु त्याच्या शरिराची जोरदारपणें वाढ होण्यासाठीं त्याला भरपूर व कसदार अन्न आणि मोकळ्या हवेंत व्यायामहि मिळणें जरूर आहे.

या दोन गोष्टींपैकीं शहरांतील सुस्थितींतील पालकांच्या मुलांना व खेड्यांतील व्यापारी पेशाच्या मुलांना कसदार अन्न भरपूर मिळतें. परंतु ते वाजवीपेक्षां जास्त मिळाल्यामुळें, किंवा जें खाल्लें तें पचविण्यासाठीं योग्य तो व्यायाम न केल्यामुळें, त्यांना नेहमीं अजीर्ण व तज्जन्य रोग झाल्याचें दिसून येतें. खेड्यांतील शेतकरीपेशाच्या लोकांना व इतर गोरगरीबांना खाण्याला मिळण्याचा प्रश्नच नीट सोडवितां येत नाहीं; त्यामुळें मोकळ्या हवेंतील शारीरिक कष्टाची कामें त्यांनीं कितीहि केलीं तरी योग्यप्रकारचीं पोषक द्रव्यें पुरविणाऱ्या अन्नाच्या अभावीं त्यांची शरिराची वाढ खुंटलेली आपणांस पहावयास मिळते व त्यामुळेंच अशा मुलांना योग्य तें अन्न पुरविण्याची जबाबदारी सरकारनें व देशांतील धनिकांनीं पत्करावी, असें मागें सुचविलें आहे.

शहरांतील व खेडयांतील मुलांना थोडाफार पद्धतशीर रीतीनें दिलेला व्यायाम अत्यंत आवश्यक आहे, याबद्दल कोणाचें दुमत होईल असें वाटत नाहीं. मात्र या व्यायामाचें स्वरूप व प्रमाण शहरांत व खेडयांत निरनिराळें राहूं शकेल.

एका काळीं शाळेंतील व्यायामाकडे पहाण्याची दृष्टी फार निराळी होती. ज्या वेळीं 'मुलांना पुस्तकीशिक्षण देऊन त्यांना परीक्षेसाठीं तयार करणें येवढाच शाळांचा व शिक्षणाचा हेतु आहे' असें शिक्षणतज्ञांना वाटत होतें, त्या वेळीं शाळेंतील व्यायामाकडे पूर्णपणें दुर्लक्ष होणें साहजिकच होतें. त्या वेळीं एखाद्या शाळेंत ठेवलेला कवायतीचा तास म्हणजे मुलांच्या आयुष्यांतील फुकट गेलेला वेळ, असें वाटत होतें. 'शाळेंत खेळणें' असा शब्दप्रयोग 'देवळांत महार' या शब्दप्रयोगाप्रमाणेंच मनाला धक्का देत असे. परंतु हलके हलके हा दृष्टीकोन बदलून 'शाळेंत येणाऱ्या मुलांना मानसिक, बौद्धिक व शारीरिक दृष्टया सामर्थ्यवान् करणें हा शिक्षणाचा प्रधान उद्देश आहे' अशी कल्पना प्रथम पाश्चिमात्य देशांत जन्माला आली आणि कांहीं कालानें या देशांतहि ती प्रसृत होऊं लागली व त्यामुळें दिवसेंदिवस शाळेंतील अभ्यासक्रमांत व्यायामाला अधिकाधिक महत्त्वाचें स्थान देण्यांत येऊं लागलें.

याप्रमाणें व्यायामाचें महत्त्व ओळखलें गेलें तरी तो देण्याची जरूर ती तजवीज अद्यापहि करण्यांत आलेली नाहीं, असें एकंदरींनें म्हणावें लागतें. या बाबतींतहि शहरें खेडयांच्या पुढें आहेत.

मुलांना शारीरिक शिक्षण देण्याचे प्रधान हेतु दोन आहेत. एक मुलांच्या आरोग्याला मदत होऊन त्यांना व्यायाम घेण्याची संवय लागावी व अशा तऱ्हेनें पुढील आयुष्यांतहि आरोग्य टिकविण्याचें एक महत्त्वाचें साधन त्यांना उपलब्ध करणें हा होय. व्यायामामुळें शरीराची प्रतिकारशक्ती वाढते व त्या दृष्टीनें नियमित घेतलेला व्यायाम रोगप्रतिबंधक ठरतो. इतकेंच नव्हें, तर योग्यतऱ्हेनें घेतलेल्या वैयक्तिक व्यायामानें कांहीं रोगांचें निर्मूलनहि होतें. अशा तऱ्हेनें व्यायाम वैद्यकशास्त्राचा महत्त्वाचा मदतनीस होतो. दुसरा हेतु म्हणजे मुलांना सामुदायिक व्यायाम करावयास लावून, त्यांच्यामध्यें शिस्त व एकसूत्रीपणा निर्माण करणें, हा होय. सैन्यांतील शिपायांचा 'मार्च' चालू असतांना त्यांच्या हातापायांच्या सारख्या व रेखीव हालचालीमुळें आपल्या मनाला किती आनंद होतो! सैन्यांतील शिस्तीवर ज्याप्रमाणें रणांगणावरील यश बव्हंशानें

अवलंबून आहे, त्याचप्रमाणें भावी नागरिकांच्या शाळेंतील पटांगणावरील कवायतींतील शिस्तीवर देशाचा उत्कर्ष व अभ्यूदय अवलंबून असतो. शाळेच्या पटांगणावर मिळालेलें शिस्तीचें शिक्षण उतार आयुष्यांतहि उपयोगीं पडून त्यामुळें जे विशेष गुण अंगीं बाणतात ते व्यक्तीप्रमाणें देशालाहि फायदेशीर ठरतात. शाळेच्या पटांगणावर आमचे बाल-गोपाल जमून ते पुढाऱ्यांच्या शब्दोच्चाराबरोबर शरीराची विशेष हालचाल बिनचूकपणें करीत असतांना पाहून कोणाचें अंतःकरण आनंदानें व देशाच्या उज्ज्वल भवितव्याच्या आशेंत भरून येणार नाहीं !†

शहरांत हे दोन हेतु साध्य होण्याच्या दृष्टीनें व्यायामाचें शिक्षण देण्याची योजना करण्यांत आली आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. शहरांतील बहुतेक शेळांना स्वतःची खेळण्याचीं पटांगणें आहेत. स्वतंत्र व्यायामशिक्षक आहेत व देशी परदेशी खेळांचें बहुमोलाचें साहित्यहि आहे व त्यामुळें त्या मुलांना योग्य तें शिक्षण घेण्याची चांगली सोय झाली आहे.

परंतु खेड्यांत या बाबतींत अद्याप अंधारच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. शाळांना स्वतांचीं पटांगणें नाहींत. गांवांतील चव्हाट्याची जागा किंवा गांवाबाहेरील मोकाट माळ म्हणजेच त्यांचें पटांगण. शाळेमार्फत देशी अगर परदेशी खेळांचें साहित्य विशेष पुरविण्यांत येत नाहीं. नाहीं म्हणावयास हल्लीं कांहीं शाळांतून लाठींचे हात व लेजीम शिकविण्यांत येतात. त्याचप्रमाणें क्रिकेट, फूटबॉल किंवा व्हॉलीबॉलसारख्या खेळांचा खेड्यांत चुकूनहि विचार करतां येत नाहीं. कारण खेडयांतील गरिबांना ही सोन्याची सरी कोठून मिळणार ?

फार खर्चाचे खेळ जरी आमच्या खेडयांत आम्हाला सुरू करतां आले नाहींत, तरी व्यायामाचे वर वर्णन केलेले प्रधान हेतु थोड्याफार प्रमाणांत साधतां येतील अशा व्यायामाची आखणी करणें अशक्य नाहीं. मात्र प्रत्येक शाळेस स्वतांचें चांगलें साफ केलेलें पटांगण असणें अत्यंत आवश्यक आहे.

---

† It is an inspiring sight, which auger well for the future of the English people, to see the children of the ordinary elementary school, small or large, urban or rural, lined up in the playground for practising the art of maintaining their bodies and minds in disciplined vigour.

—Health of the school child, 1930, p. 69.

खेडयांत प्रत्येक शाळेला पटांगण नसल्यामुळें, अनेक शाळांना पद्धतशीर व्यायामाचें शिक्षण देण्याचा प्रश्नच विचारांत घेतां येत नाहीं. इंग्लंडमध्येंहि कांहीं ठिकाणीं खेळण्याच्या मैदानाचा प्रश्न अद्याप सोडविण्यांत न आल्यामुळें, तेथील मुलेंहि रस्त्यांतून खेळत असतात.‡ सरकारनें व शाळाखात्यानें हें काम मनावर घेतल्यास हा प्रश्न सुटण्यास वेळ लागणार नाहीं.

याप्रमाणें पटांगणाची तरतूद झाल्यानंतर मुलांच्या व्यायामांत कोणत्या प्रकारच्या व्यायामाची योजना करावी हा दुसरा प्रश्न येतो. खर्चाच्या खेळाचा आम्हांस विचारच करतां येणार नाहीं. मात्र फूटबॉल, हॉकी किंवा व्हॉलीबॉल हे खेळ, क्रिकेट व टेनीसप्रमाणें, फार खर्चाचे नसल्यामुळें त्यांचा, निदान मोठ्या शाळांतून प्रवेश होण्यास हरकत नाहीं. फूटबॉल, हॉकी व व्हॉली बॉलप्रमाणें आमच्या देशी आट्या–पाट्या व खोखो हे खेळ सामुदायिक खेळ या नात्यानें अत्यंत महत्त्वाचे व अतिशय उपयुक्त असे आहेत. मात्र या खेळांत अधिक नियमबद्धता, रेखीवपणा उत्पन्न होणें जरूर आहे. या खेळांचे निरनिराळ्या शाळांतील सामने झाल्यास त्यांच्यांत चांगली सुधारणा होईल.

खेळाप्रमाणें कवायतहि शिकविण्यांत येणें जरूर आहे. या कवायतीसाठीं लेजीम, काठी वगैरे खेळांचाहि उपयोग करण्यांत यावा. कांहीं ठिकाणीं लेजीमचे किंवा काठीचे खेळ फार प्रेक्षणीय होतात हें आम्हीं पाहिलें आहे.

त्याचप्रमाणें बॉयस्काऊट व गर्लगाईड या चळवळीहि, खर्चाच्या बाबी शक्य तितक्या कमी करून, खेडयांतील शाळांमधून जास्त प्रमाणावर सुरू होणें अगत्याचें आहे. कपडे वगैरेसाठीं लागणाऱ्या खर्चापैकीं कांहीं अंश सरकारनें अगर इतर फंडांतून दिल्यास पालकांना व चळवळीलाहि उत्तेजन मिळेल.

सरकारनें किंवा शिक्षणखात्यानें खेडयांतील शाळेला उपयोगी अशा निरनिराळ्या प्रकारच्या व्यायामांची व निरनिराळ्या सांघिक खेळांची वर्णनात्मक माहिती देणारें पुस्तक तयार करून प्रसिद्ध करणें जरूर आहे. इंग्लंडमधील शिक्षणखात्यानें असें वाङ्मय प्रसिद्ध केलें आहे. या पुस्तकांत खेळाचे नियम एकाच प्रकारचे असावेत; म्हणजे निरनिराळ्या शाळांच्या चढाओढी होण्यास अडचण पडणार नाहीं.

‡ R. E. 148–49

शारीरिक शिक्षणाच्या चळवळीचा प्रसार करण्यासाठीं व लोकांत त्याविषयीं आवड उत्पन्न करण्यासाठीं कांहीं प्रयत्न होणें जरूर आहे.

प्रथम निरनिराळ्या खेळांची माहिती देऊन प्रचारकाचें कार्य करणारे कांहीं प्रचारक नेमणें जरूर आहे. इंग्लंडमध्यें निरनिराळ्या स्थानिक शिक्षणसंस्थांनीं याप्रमाणें प्रचारक (Organisers) नेमले आहेत. या प्रचारकांच्या प्रयत्नानें, गांवांतून शेतकरी रिकामे असतात अशा दिवसांत निरनिराळ्या भागांमध्यें सांघिक सामने झाले तर त्यामुळें विद्यार्थ्यांप्रमाणें निरनिराळ्या गांवांतून किंवा भागांतून प्रौढ पालकांतहि खेळाची आवड उत्पन्न होऊन ईर्षेमुळें चढाओढीची वृत्ति निर्माण होईल. अशा खेळांचे समाने मोठ्या गांवच्या उरुसाच्या वेळीं कुस्त्याच्या फडाप्रमाणें भरविल्यासहि फायदा होईल व पैहिलवानी कमी झाल्यामुळें जे खेड्यांतून हगामे रोडावूं लागले आहेत, त्यांना नवीन व चांगलें वळण लागेल.

प्रचारकांप्रमाणें शाळेवरील शिक्षकांपैकीं कांहीं शिक्षकांनाहि शारीरिक शिक्षणाचें महत्त्व पटवून योग्य ते खेळ कसे शिकवावे व कवायत कशी घ्यावी याबद्दल त्यांनाहि माहिती देण्यांत यावी. अशी माहिती घेणें हें शिक्षकाच्या अभ्यासक्रमाचें एक अंगच असावें. हल्लीं ट्रेनिंगसंस्थांमध्यें त्याप्रमाणें शिक्षण देण्याची थोडीफार तजवीजहि करण्यांत आली आहे, हें नमूद करणें जरूर आहे.

६. **सोयीच्या शाळा**–खेडयांतील मुलांना शाळा फार लांब पडणार नाहींत, अशी शाळांचीं जाळीं विणण्यांत येणें फार जरूर आहे. विशेषतः लहान मुलांना शाळेसाठीं फार दूर जावें लागणार नाहीं, अशी तरतूद करण्यांत येणें अगत्याचें आहे. हल्लीं अनेक गांवांत शाळा नाहींत; त्यामुळें त्या गांवांतील मुलांना नजीकच्या गांवाला असलेल्या शाळेंत जावें लागतें. या शाळा कधीं कधीं दोन मैलांपेक्षांहि अधिक अंतरावर असतात व अशा शाळेंत जाण्यासाठीं दररोज जातां येतां चार मैलांचा प्रवास करावा लागतो. विद्येची लालसा कितीहि चिवट असली तरी रोज याप्रमाणें शारीरिक कष्ट करावे लागले कीं कांहीं काळानें कंटाळा येऊन आरंभीं उत्कट असलेली विद्येची आवड रोडवूं लागणें साहजिक आहे.

मुलें दररोजच्या वाटचालीस कंटाळलीं नाहींत तरी इतर कारणांमुळें त्यांना शाळेंत नियमानें जाणें अशक्यप्राय होतें. पावसाळ्यांत सडकेला गुडघाभर

चिखल झाला असतांना, बैलानांहि सडकेनें चालणें कठीण झाल्यानंतर त्याच रस्त्यानें मुलें कसा प्रवास करणार ? हिंवाळ्याच्या कडाक्यानें नेहमीं वाऱ्यांत उभी रहाणारीं झाडेंहि वठूं लागल्यानंतर अंगावरील साध्या पैरणीनें, अंगाला झोंबणाऱ्या गार वाऱ्याला तोंड देण्यासाठीं कोणता मुलगा, खोपटाची ऊब सोडून शाळेसाठीं बाहेर पडणार ? या अशा कांहीं कारणांमुळें परगांवांहून येणारीं मुलें साहजिकच वरच्चेवर गैरहजर रहातात. गैरहजेरीमुळें इतर मुलांचे अभ्यास पुढें जाऊन हीं मुलें अभ्यासांत मागें रहातात व त्यामुळें नाउमेद होऊन अखेर शाळा सोडून बाहेर पडतात.

दूरच्या मुलांना शाळेंत जाण्यासाठीं वाटणारी गैरसोय इंग्लंड किंवा अमेरिकासारख्या देशांतहि जाणवते, नाहीं असें नाहीं. परंतु तिकडे रस्ते चांगले व मोटारगाड्या, ट्रामगाड्या किंवा रेल्वे यांची सोय होत असल्यामुळें, ही गैरसोय कमी कमी होऊं लागली आहे व आहे ही गैरसोयहि ते कमी करण्यासाठीं तिकडे लहान मुलांसाठीं गांवांतच शाळा काढून प्रौढ मुलांसाठीं मध्यवर्ति शाळा काढण्यांत येऊ लागल्या आहेत. त्यांच्याच थोडयाफार अनुकरणानें आपणास खालीलप्रमाणें योजना थोडयाफार फरकानें अमलांत आणणें अशक्य नाहीं.

साधारणपणें चारशें वस्तीच्या गांवाला दोन इयत्तांपर्यंतची एक मराठी शाळा काढण्यांत यावी. या शाळेंत ५ वर्षांपासून ७ वर्षें पुरीं होईपर्यंत मुलांची शिक्षणाची सोय होईल. अशा गांवांत साधारणपणें अर्धा मैल लांबीच्या त्रिज्येमधील गांवें किंवा वस्त्या जोडण्यांत याव्या म्हणजे निदान दोन शिक्षकांच्या शाळेपुरती म्हणजे सुमारें ८० मुलांची भरती होईल. ५०० ते १००० वस्तीच्या गांवाला, त्या गांवच्या मगदुराप्रमाणें, चौथीपर्यंत किंवा पुढील शिक्षण देणाऱ्या मध्यवर्ति शाळा काढण्यांत याव्यात. मात्र कोणत्याहि मुलाला तिसरीपासून पुढचें शिक्षण घेण्यासाठीं एक किंवा दीड मैलापेक्षां अधिक जावें लागणार नाहीं अशी खबरदारी घ्यावी. कांहीं ठिकाणीं याप्रमाणें तंतोतंत सोय न करतां आल्यास, लहान मुलांसाठीं गांवकऱ्यांमार्फत, मोफत किंवा अल्प सरकारी मदतीनें बैलगाडयांची योजना करण्यांत यावी. निदान हिवाळ्यांत व पावसाळ्यांत अशी व्यवस्था होणें जरूर आहे. म्हणजे चालण्याच्या श्रमानें शाळेंत जाऊन झोंप घेणाऱ्या विद्यार्थ्यांचें प्रमाण कमी पडून,

लांबचीं मुलेंहि विद्याग्रहणासाठीं ताजीं व तरतरीत रहातील. ही योजना अमलांत येणें, शिक्षण सक्तीचें करण्यावरच अवलंबून राहील.

७. मुलांना आर्थिक उत्तेजन:—मागें वर्णन केलेल्या सगळ्या सूचना अमलांत आणल्यानंतरहि कांहीं गरीब पालकांच्या मुलांना थोडीफार आर्थिक मदत करणें जरूर पडेल. एका काळीं मुलगा शाळेंत गेल्यामुळें पालकांच्या कामाच्या बाबतींत जें नुकसान होत असे त्याची भरपाई करण्याचीहि सूचना करण्यांत आली होती. परंतु हल्लींच्या काळांत गरीब पालकांना प्रत्यक्ष मदत करतां येणें शक्य नसलें तरी त्यांना अप्रत्यक्ष मदत होऊन, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाला हातभार लागेल अशी व्यवस्था करतां येईल. इतकेंच नव्हे तर त्याप्रमाणें थोडीफार व्यवस्था करण्यांत आलीहि आहे. अप्रत्यक्ष मदतीचे कांहीं प्रकार खालीं दिले आहेत.

(१) **अल्प फी**—हल्लीं प्राथमिक शाळेंतील मुलांकडून फी वसूल करण्यांत येते. १९३५-३६ मध्यें प्राथमिक शाळेंतील मुलांकडून रु. ६४३४७९ म्हणजे त्यांच्या शाळांसाठीं एकंदर आलेल्या खर्चाच्या शेंकडा ३·९ इतकी रक्कम वसूल झाली. या रकमेवरून दर मुलाला दरसाल रु. ९-९-९ प्रमाणें फी पडली. दर मुलाला निरनिराळ्या शाळेंत किती फी द्यावी लागली याची १९३५-३६ ची सरासरी खालीं दिली आहे.

सरकारी शाळा	रु. ०-१२-६
डिस्ट्रिक्ट बोर्ड	रु. १-५-२
म्युनिसिपालिटी	रु. ०-४-६
मदतीच्या	रु. २-८-९
विनमदतीच्या	रु. ३-४-९

सरकारी अधिकाऱ्यांच्या मताप्रमाणें फी देण्यास पालक असमर्थ असल्यामुळें मुलगा शाळेंत पाठविला नाहीं असें होत नाहीं. सर्व मुली, मागासलेल्या वर्गांचीं मुलें व शिक्षकिर्णींचीं मुलें शाळेंत माफी घेण्यांत येतात.

वर जे फीचे निरनिराळ्या शाळेंतील आंकडे दिले आहेत त्यावरून लोकल बोर्डाच्या शाळांपेक्षांहि म्युनिसिपालिट्यांच्या शाळांत फी कमी आहे हें दिसून येईल. वास्तविक पहातां खेडयांतील लोकांना, या आकडयांवरून आपणांस कल्पना येते, त्यापेक्षां शिक्षणासाठीं अधिक मोबदला द्यावा लागतो. कारण

खेड्यांतील सर्व खातेदारांना शिक्षणासाठीं म्हणून लोकल फंड द्यावा लागतो व त्या व्यतिरिक्त फीहि द्यावी लागते. उलट शहरांतील लोकांना शिक्षणासाठीं लोकल फंडासारखा कांहीं करहि द्यावा लागत नाहीं व फीहि कमी पडते. म्हणजे ज्यांना खरी मदत हवी त्या खेड्यांतील लोकांना फीचे बाबतींत सवलत न मिळतां उलट साक्षरतेचा ज्यांच्यांत जास्त प्रसार आहे व खेड्यापेक्षां ज्यांची सांपत्तिक स्थिति अनेक पटीनें बरी आहे त्यांनाच अधिक आर्थिक सवलत देण्यांत आली आहे !

आमच्या मतें खेड्यांतील, विशेषतः शेतकरी वर्गाला शिक्षण मोफत देण्यांत यावें. अनेक शेतकऱ्यांना मुलांच्या फीसाठीं दरमहा द्यावा लागणारा आणा दोन आणेहि देतां येत नाहींत व त्यामुळें शिक्षकाला त्यांच्या मुलांची नांवें काढावीं लागतात किंवा स्वतांच्या खिशांतून अशा मुलांच्या फीची भरपाई करावी लागते. खेड्यांतील मुलांना शिक्षण मोफत देण्यांत यावें, ही मागणी हंटर कमिशनच्या पुढेंहि सन १८८२ सालीं करण्यांत आली होती. परंतु त्या कमिशननें लोकलफंड देणाराकडूनहि फी घेण्यांत यावी व कांहीं ठराविक प्रमाणांत गरीब मुलांना लोकलबोर्डाच्या शाळांतून मोफत घेण्यांत यावें व अधिक गरीब वर्गाच्या उपयोगासाठीं सुरू केलेल्या खास शाळांतून सर्वसाधारण किंवा अधिक प्रमाणांत फीचीं माफी देण्यांत यावी, अशी शिफारस केली.* हंटर कमिशननें ही शिफारस करण्यापूर्वींच सुमारें दोन वर्षें म्हणजे १८८० सालीं इंग्लंडमध्यें प्राथमिक शिक्षण मोफत करण्यांत आलें होतें, ही गोष्टहि हंटर कमिशन विसरलें हें लक्षांत ठेवणें जरूर आहे.

शिक्षण मोफत असलें तर शेतकऱ्यांच्या मुलांची शाळेंत अधिक गर्दी होते हें कॅप्टन कॅंडीसाहेब यांनीं आपल्या ता. २१–५–१८४० च्या रिपोर्टांतच स्पष्ट कबूल केलें आहे. शिक्षण सक्तीचें जेव्हां होईल तेव्हां तें मोफतहि करावें लागेलच. परंतु ऐच्छिक तत्त्वावर शिक्षणप्रसार होण्यासाठींहि निदान खेड्यांत लोकलफंड देणाऱ्या शेतकऱ्यांच्या व इतर गोरगरिबांच्या मुलांना शिक्षण पूर्ण मोफत करण्यांत यावें.

(२) **शिक्षणसाहित्यः**—शिक्षण मोफत करूनहि कांहीं पालकांना आणखी मदत लागेल व ती म्हणजे पाट्यापुस्तकांची. प्रा. शि. नि. नं. ६८ प्रमाणें स्कूलबोर्डांना, ज्या पालकांना खर्च करण्याचें त्राण नाहीं, अशांच्या गरीब

---

* हंटर क. रि. १४१–४२

मुलांसाठीं पाटयापुस्तकें व इतर जिनसा देण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. इंग्लंडसारख्या श्रीमंत देशांतहि याप्रमाणें शिक्षणसाहित्य मोफत वाटण्यांत येतें. आमच्याकडेहि ही वाटणी सढळ हातानें, विशेषतः शिक्षण सक्तीचें केल्यानंतर, करावी लागेल. हल्लीं शिक्षणाच्या चमत्कारिक पद्धतीमुळें प्रत्येक मुलाला वह्या वगैरे जिन्नस व विविध प्रकारचीं पुस्तकें इतकीं लागतात कीं, तीं खरेदी करतां करतां शहरांतील सुशिक्षित पालकहि जेरीस येतात; मग खेडयांतील गरीब लोकांची काय दशा होत असेल याची कल्पनाच करावी. विशेषतः दरसाल नवीन ग्रंथकर्त्यांचीं क्रमिक पुस्तकें शाळेंत सुरू करण्याच्या वशिलेबाजीमुळें, मुलगा एक वर्ष नापास झाला तरी त्याला दुसऱ्या वर्षासाठीं त्याच इयत्तेचीं क्रमिक पुस्तकें नवीन घ्यावीं लागतात. थोरल्या भावाचीं पुस्तकें धाकटया भावास उपयोगीं पडेनाशीं झालीं आहेत व त्यामुळें शिक्षणसाहित्याचा खर्च मनस्वीं वाढला आहे. तरी हा खर्च कमी करून गरीब मुलांना आम्हीं शिक्षणसाहित्य पुरविणें जरूर आहे. क्रमिक पुस्तकांच्या बाबतींत आम्हीं पुढें ज्या सूचना केलेल्या आहेत, त्याप्रमाणें व्यवस्था झाल्यास क्रमिक पुस्तकें अधिक मुलांना कमी खर्चात पुरविणें कठीण जाणार नाहीं.

(३) **शिष्यवृत्त्याः**—योग्य व हुशार मुलांना पुढील शिक्षणक्रम पुरा करण्यासाठीं शिष्यवृत्त्याहि देणें अत्यंत जरूर आहे. प्राथमिक तिसऱ्या किंवा त्याखालील इयत्तांतहि हुषारी दाखविणाऱ्या गरीब विद्यार्थ्यास त्याचा प्राथमिक शाळेंतील शिक्षणक्रम पुरा होईपर्यंत पुरणारी शिष्यवृत्ति मिळाल्यास खेडयांतील गरीब लोकांतील हुषार विद्यार्थ्यांना आपली हुषारी दाखविण्याची उत्कट इच्छा वाटूं लागेल व त्यांच्यांत शिक्षणप्रसाराला मदत होईल. प्राथमिक शिक्षणाच्या अखेरच्या परीक्षेंत चांगलें यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास दुय्यम शाळेंतील शिक्षणक्रम पुरा करतां येईल, अशी शिष्यवृत्ति देण्यांत यावी व याप्रमाणें हुषार विद्यार्थ्यांची निवड करून, त्यांना जास्तींत जास्त शिक्षण घेण्याची संधि देण्यांत यावी.

या शिष्यवृत्त्या कोणत्या रूपानें द्याव्यात हा प्रश्न पुढें येतो. प्रत्यक्ष पैसे दरमहा दिले तर पालकांच्या गरिबीच्या संसारांत ते खर्चीं पडून मुलांची कुचंबणा होते ती होतेच. त्यापेक्षां शिष्यवृत्तीच्या रकमेंतील निम्मी किंवा एक तृतीयांश रक्कम रोख देण्यांत यावी व बाकीच्या रकमेंतून खात्यामार्फत मुलांना फी

किंवा शिक्षणसाहित्य घेऊन देण्यासाठीं विनियोग करण्यांत यावा म्हणजे त्या मुलाची गैरसोय न होतां त्याला मदत मिळूं शकेल.

या शिष्यवृत्त्यांची संख्या खेडेगांवांतील प्राथमिक शाळांतून अधिक प्रमाणांत असावी व प्राथमिक शाळांपासून तो अत्युच्च शिक्षणक्रमापर्यंत या शिष्यवृत्त्यांची एक साखळीच, १८५४ च्या खलित्यांत सुचविल्याप्रमाणें व हंटर कमिशननें शिफारस केल्याप्रमाणें, निर्माण करण्यांत यावी म्हणजे गरीब पण होतकरू विद्यार्थ्याला ही साखळी धरून शिक्षणक्रमाच्या शिडीच्या वरच्या पायरीपर्यंत जातां येईल.

(४) **बक्षिसें**:—शिष्यवृत्त्यांप्रमाणें बक्षिसांचाहि शिक्षणास उत्तेजन मिळण्यासाठीं व गरीब मुलांना मदत करण्यासाठीं उपयोग करतां येईल. हीं बक्षिसें हल्लींहि देण्यांत येतात. परंतु या बक्षिसांची संख्या वाढविण्यांत येणें जरूर आहे. हीं बक्षिसें पुस्तकांच्या किंवा कपड्यांच्या रूपानें देण्यांत यावीं. ज्या मुलाला बक्षिस द्यावयाचें त्याच्या घरच्या स्थितीचा विचार करून तें कोणत्या रूपानें द्यावयाचें हें शिक्षकानें ठरवावें. हल्लीं एखाद्या शाळेंत बक्षिससमारंभाला गेल्यानंतर श्रीमंताच्या मुलीला हलक्या कापडाचा परकर देण्यांत येतो व ज्या मुलीच्या अंगावरील कपड्याच्या चिंध्या झाल्या आहेत अशा मुलीला डोळे फिरणारी बाहुली देण्यांत येते! अशा वेळीं श्रीमंताच्या मुलीला बाहुली व गरिबाच्या मुलीला परकर देणेंच अत्यंत उपयुक्त ठरेल. परंतु हें तारतम्य शिक्षकांनींच दाखविणें जरूर आहे.

या ठिकाणीं एक धोक्याची सूचना देणें जरूर वाटतें. अनेक वेळीं स्कूल बोर्डाचे ऑफिसांतून प्राथमिक शिक्षण कायदा नियम ६८ प्रमाणें वाटण्यासाठीं किंवा बक्षिसें देण्यासाठीं गेलेलीं पुस्तकें, मुलांच्या हातांत न जातां स्कूल बोर्डाला पुस्तकें पुरविणाऱ्या दुकानदारांच्याकडेच परस्पर जातात व पुन्हां दुसऱ्या वर्षीं तींच पुस्तकें स्कूल बोर्डाच्या पदरीं भर किंमतीला बांधण्यांत येतात! तरी अशा दरसाल पाठविण्यांत येणाऱ्या पुस्तकांच्या आंत स्कूलबोर्डाचा शिक्का मारण्यांत यावा व कोणत्या सालांत तें पुस्तक वांटलें याचाहि शिक्का त्या पुस्तकावर मारण्यांत यावा म्हणजे लबाडी करणारास थोडा विचार करावा लागेल.

(५) **नोकरी**:—शिक्षणाला खरें उत्तेजन शिकलेल्या लोकांना नोकरी देण्यानें मिळणार आहे. ज्ञानासाठीं ज्ञान (Knowledge for its own

sake) हें तत्त्व दिसावयास सुंदर असलें तरी तें अद्याप व्यवहाराच्या क्षेत्राबाहेरच राहिलें आहे. 'पोटासाठीं ज्ञान' हें तत्त्व व्यवहारी बुद्धीला पटलें असून शिकणें हें हजारों वर्षें ज्या वर्गाचें कर्तव्य मानण्यांत आलें आहे त्या वर्गांतील लोकांनाहि 'ज्ञानासाठीं ज्ञान' हें तत्त्व अद्याप पचवितां आलें नाहीं, त्या ठिकाणीं तें इतर वर्गांच्या गळीं कसें उतरणार !

ब्रिटिश अम्मल सुरू झाल्यानंतर इंग्रजांनीं आपणांस या देशांतील राज्यकारभाराचा गाडा चालविण्याच्या कामीं उपयोगीं पडणारा नोकरवर्ग तयार करण्यासाठीं म्हणून प्रथम शिक्षण देण्यास सुरवात केली. 'इंग्रजांची ही विद्या परकीयांची आहे, यवनांची आहे' असे म्हणणारे सनातनी धर्ममार्तंड, ती विद्या घेणारास भरपूर पगाराच्या नोकऱ्या मिळतात असें दिसूं लागतांच, आपलीं धर्मविषयक मतें बदलूं लागले व वरिष्ठ वर्गांच्या मुलांच्या झुंडीच्या झुंडी यवनी विद्यांचा स्वाद घेऊं लागल्या. ज्ञानांत भर घालणाऱ्या विद्येपेक्षां खिशांत भर घालणारी विद्याच लोकांना आवडूं लागली. पेशवे शिकलेल्या ब्राह्मणांना दक्षिणा देत. त्यांच्या जागीं आलेलें ब्रिटिश सरकार शिकलेल्या ब्राह्मणांना नोकऱ्या देऊं लागलें व त्यामुळें राजवटी बदलली तरी पुढारलेल्या वर्गाचें आर्थिकदृष्ट्या नुकसान न होतां उलट अधिकच चंगळ झाली. पुढारलेल्या वर्गांत जो गेल्या १००–१२५ वर्षांत विद्येचा फैलाव झाला, त्याच्या मुळाशीं नोकरी मिळण्याची आशा किंवा खात्री होती, हें लक्षांत ठेवणें जरूर आहे.

लोकांना नोकरीचें अमिष दाखविलें म्हणजे ते अधिक प्रमाणांत आपली विद्या ग्रहण करतील हें इंग्रज अधिकाऱ्यानीं फार लवकर ओळखलें. सन १८४४ सालीं लॉर्ड हार्डिंज यांनीं सरकारी नोकऱ्या योग्य शिक्षण घेतलेल्या तरुणास देण्यांत याव्यात, असें एक फर्मान काढलें. खालच्या वर्गांत शिक्षणाचा फैलाव अधिक व्हावा म्हणून कनिष्ठ प्रतीच्या नोकऱ्या देतांनासुद्धां उमेदवारांची शैक्षणिक लायकी विचारांत घेण्यांत येऊन, अडाणी माणसापेक्षां लिहितां वाचतां येणाऱ्या इसमास प्रथम पसंत करण्यांत यावें, असाहि त्यांनीं हुकूम सोडला.

लॉर्ड हार्डिंजच्या हुकुमानंतर सुमारें दहा वर्षांनीं निघालेल्या १८५४ च्या खलित्यांतहि याच गोष्टीवर विशेष भर देण्यांत आला. येवढेंच नव्हे तर वंश-

परंपरा विशेष घराण्यांत चालणाऱ्या वतनदारी नोकरीच्या बाबतींतही कांहीं किमान शैक्षणिक लायकीची अट घालण्यांत यावी असें सुचविण्यांत आलें.†

कनिष्ठ प्रकारच्या व वरिष्ठ नोकरांना शैक्षणिक लायकीची अट ठेवल्यामुळें या जागांचा फायदा पुढारलेल्या वर्गांनाच मिळाला. कारण या वर्गांची मोठी संख्या शहरांत असे, व शहरांत शिक्षणाची सोयहि असे. त्यामुळें या वर्गांतील लोकांना शिक्षण घेणें अतिशय सोपें पडे. त्याचप्रमाणें या वर्गांतील लोक पूर्वीच्या पद्धतीनें शिकलेलेच असल्यामुळें नवीन पद्धतीच्या शिक्षणामुळें होणारे फायदे त्यांनीं ताबडतोब ओळखून त्याप्रमाणें त्यांनीं, आपल्या धार्मिक मताचा पवित्रा बदलून मुलांना संस्कृत शिकण्यासाठीं पाठशाळेंत घालण्याऐवजीं, इंग्रजी शिकण्यासाठीं दुय्यम शाळेंत घालण्यास सुरवात केली. मामलतदारीच्या व इतरहि मोठ्या नोकऱ्या, केवळ दोन तीन इंग्रजी बुकें शिकल्याबरोबर मिळूं लागतांच शिकणाऱ्या लोकांची एकच लाट उसळली.

याप्रमाणें मोठ्या पगाराच्या नोकऱ्या मिळविण्यासाठीं शहरांतील पुढारलेले लोक व खेड्यांतील त्यांचे भाईबंद धडपड करीत असतांना व सरकारी नोकऱ्यांत त्यांचा मोठ्या प्रमाणानें भरणा होत असतांनाहि खेड्यांतील शेतकरी वर्गांचे लोक आंधळ्याच्या माळेप्रमाणें पूर्वीच्याच चकारीनें चालून आपले कष्टाचें-कंगालीचें-जीवन कंठीत होते. राजाचें भांडार लुटण्याची परवानगी मिळाल्यामुळें डोळस लोक लहान मोठ्या थैल्या भरून नेण्याचे गडबडींत असतांना, आंधळ्या माणसाला त्या गडबडीची कल्पना येऊं नये व चाललेल्या गोंधळांत आपण पायाखालीं सांपडून चेंगरू या भीतीनें त्यांनें गांगरून बसल्या ठिकाणींच चिकटून रहावें, अशीच गत या शेतकरी वर्गाची झाली. खेड्यांतील लोकांना शिक्षण घेणें आपलें कर्तव्य आहे असें वाटत नव्हतें व त्यामुळें त्यांना शिक्षणाचें महत्त्व पटलेलें नव्हतें. कांहींना पटलें तरी त्यांच्या गांवांत शाळा नसे व शाळा असली तरी प्राथमिक शिक्षणाचीच असे. "दुय्यम शिक्षणासाठीं या वर्गाला आपलें गांव सोडून शहरांत जाणें शक्य नसे. प्राथमिक शाळेंतच त्याचें शिक्षण पुरें होई" * त्यामुळें हा वर्ग साहजिकच मागें राहिला व नोकरीच्या आशेनें शिकण्यासाठीं चढाओढीनें बाहेर पडलेला, मुख्यतः शहरांत रहाणारा पुढारलेला वर्ग फारच पुढें झटकला.

हें इतकें विवेचन करण्याचें कारण हें कीं, आजहि अज्ञानांधकारांत चाच-

---

† हंटर क. रि. १४४-४५. * हंटर क. रि. १४५

पडणाऱ्या शेतकरी वर्गांत शिक्षणाची आवड निर्माण करावयाची असेल, तर त्यांच्यांतील शिकलेल्या मुलांना प्रथम नोकऱ्या देण्याचें धोरण सरकारनें आखणें जरूर आहे. आपल्यांतील इंग्रजी शिक्षण घेतलेले व व्ह. फा. चीं परिक्षा पास झालेले लोक बेकार हिंडतांना पाहून 'हें शिक्षण नको' अशी त्याची भावना होते व ही भावना हल्लीं वाढत्या प्रमाणावर आहे. खेडयांतील शेतकरी वर्गांतील मुलगा शिकून बेकार राहिला कीं, त्याच्या पालकाचें अनेक दृष्टीनें नुकसान होतें. एक, शेतीच्या कामाला उपयोगीं पडणारा मुलगा शाळेंत गुंतून पडल्यामुळं प्रथम त्याचें नुकसान होतें. दुसरें असें कीं, मुलाच्या शिक्षणासाठीं त्याला कांहीं जादा खर्च, पोटाला चिमटा घेऊन करावा लागतो व अशा तऱ्हेनें शिकलेला मुलगा शेवटीं शेतीच्या धंद्याला नालायक ठरतो. अशा स्थितींत त्या मुलाला लहान मोठी नोकरी मिळाली तर तो शेतकरी थोडा फार बचावतो. परंतु, नोकरी न मिळाल्यामुळें बेकार झालेल्या तरुणाचा शेतकरी पेशांतील बाप किंवा भाऊ 'साफ बुडालो' म्हणून कपाळाला हात लावतो व त्याची केविलवाणी स्थिति पाहून इतर शेतकरी शिक्षणास प्रतिकूल होतात.

या प्रतिकूल भावनेला आळा घालावयाचा असेल तर शेतकरी समाजांतील शिकलेल्या लोकांना नोकऱ्या देतां येतील तितक्या देण्यांत येणें जरूर आहे. खेडयांतील व्ह. फा. परीक्षा पास झालेल्या लोकांना खेडयांतील शिक्षकाची नोकरी आधीं देण्यांत यावी, हें आम्हीं मागेंच सुचविलें असून ती सूचना करण्याचीं साधार कारणेंहि दिलीं आहेत. शिक्षकांप्रमाणेंच गांवकामगार म्हणजे पाटील तलाठ्यांच्या जागांही अशा तरुणांना देण्यांत याव्या. अनेक ठिकाणीं पाटिलकींचें वतन आहे. त्याठिकाणीं वतनदार पाटील अडाणी असला तर त्या घराण्यांतील व्ह. फा. झालेल्या मुलाची त्या जागेवर नेमणूक करण्यांत यावी. वतन ॲक्टप्रमाणें सरकारला ज्यावेळीं पाटील नेमावा लागतो त्यावेळीं सरकारला या धोरणाचा अवलंब करतां येईल.

तलाठ्याच्या जागा शेतकरी वर्गांतील व्ह. फा. किंवा अधिक शिकलेल्या तरुणांसच देण्यांत याव्यात. हल्लीं शहरांतील पुढारलेल्या वर्गांत बेकारी माजल्यामुळें मॅट्रिक किंवा त्याचे वरचीं परिक्षा पास झालेले तरुण तलाठ्याच्या नोकरीसाठीं मिळूं लागले असून त्यांची नेमणूक करण्याची प्रथा पडूं लागली आहे. आमच्या मतें ही प्रथा शेतकरी वर्गाच्या दृष्टीनें घातुक आहे. शहरांत वाढलेल्या तरुणास उच्च रहाणीची संवय असल्यामुळें त्याचा संसार

तलाठ्याच्या जागेस मिळणाऱ्या पगारांत भागत नाहीं व मग तो शेतकरी वर्गास पिळून काढण्यास सुरवात करतो. याचे उलट शेतकरी वर्गांतील तलाठी शेतकऱ्यांशीं अधिक सहानुभूतीनें वागतो असा अनुभव आहे.

त्याचप्रमाणें पोलीस व पट्टेवाल्याच्या जागांसाठीं खेडयांतील शिकलेल्या तरुणांना प्रथम पसंत करण्यांत यावें.

तसेंच शेतकरी वर्गांतील वरिष्ठ दर्जाचें शिक्षण घेतलेल्या तरुणास वरिष्ठ प्रतीच्या सरकारी नोकरीसाठीं आधीं पसंत करण्यांत यावें. सरकारी वरिष्ठ नोकरींतहि शेतकरी वर्गाच्या तरुणांची भरती जास्त प्रमाणांत झाल्यास राज्यकारभाराचा गाडा शेतकरी वर्गाला समाधानकारक चालेल अशी अपेक्षा करावयास हरकत नाहीं.

आमच्या या सूचना वाचून पुढारलेल्या वर्गाचे चहाते कांहीं अडचणी दाखविल्यावांचून खास रहाणार नाहींत. या अडचणी, हरकती कोणत्या पुढें करण्यांत येण्याचा संभव आहे त्यांचा विचार करणें जरूर आहे.

पहिली हरकत अशी येईल कीं, सरकारी नोकरीची कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीनें उमेदवाराची शैक्षणिक लायकीच विचारांत घेण्यांत यावी. तो कोणत्या वर्गांतील आहे याचा विचार न करतां एका जागेसाठीं पुढें आलेल्या दोन उमेदवारांतील अधिक शिक्षण घेतलेला उमेदवारच पसंत करणें योग्य आहे.

वर वर विचार करणाराला शैक्षणिक लायकी व कार्यक्षमता हे शब्द मोह पाडतात व निवड करतांना वरील धोरण ठेवणेंच योग्य आहे असें त्यांस वाटतें. परंतु आमच्या मतें प्रत्येक जागेसाठीं किमान शैक्षणिक लायकीच्या मर्यादा आखल्यानंतर ती किमान लायकी असलेला शेतकरी वर्गांतील तरुण व किमान लायकीपेक्षां अधिक लायकी असलेला पुढारलेल्या बिगर शेतकरी वर्गाचा तरुण यांत निवड करावयाची झाल्यास शेतकरी वर्गांतील तरुणांस प्रथम पसंत करण्यांत यावें. किमान लायकी ठरविल्यानंतर तो लायकी असलेला तरुण कार्यक्षम निघेल असें मानावयास हरकत नाहीं. त्याच्या कार्यक्षमतेचा विचार करूनच ही किमान लायकी ठरविण्यांत यावी. अधिक शिकलेला मनुष्य नेहमींच अधिक लायक असतो असें नाहीं. कमी शिकलेला मनुष्य नोकर या नात्यानें पुष्कळ वेळ अधिक शिकलेल्या दुसऱ्या माणसापेक्षां अधिक कार्यक्षम ठरतो.

शैक्षणिक बाबतींत शेतकरी वर्गांतील तरुणांना पुढारलेल्या वर्गांतील तरुणांशीं चढाओढ करण्यास सांगणेंही अन्यायाचें आहे. शेतकरी वर्गाला योग्य तें शिक्षण देण्याचे प्रामाणिकपणाचे प्रयत्न अद्याप कोणीं केले नाहींत. उलट शिक्षण घेण्याच्या बाबतींत सर्व सोयी-सवलती शहरांतील व विशेषतः पुढारलेल्या वर्गाच्या वांट्याला येऊन सर्व गैरसोयी, अडीअडचणी खेड्यांतील शेतकरी वर्गाच्या वांटणीस आल्या आहेत. ही अशी विषम वांटणी केल्यानंतर त्यामुळें प्राप्त झालेल्या अधिक फायद्याचें निमित्य करून शेतकरी वर्गाच्या नोकरीच्या वांट्यालाही कातर लावणें सरळपणाचें होईल का ? इंडियन मेडिकल सर्व्हिसमध्यें अधिक शैक्षाणिक लायकीचें निमित्य धरून गोऱ्या लोकांची वर्णी लावण्याचा इंग्रज सरकारनें प्रयत्न करतांच, 'आमचा हिंदी मनुष्य नेमणेंच जरूर आहे' अशी ओरड करणाऱ्या लोकांनीं शेतकरी वर्गाला जादा किंवा फाजील शैक्षाणिक लायकीच्या नांवावर खालीं दडपून टाकणें प्रामाणिकपणाचें होईल का ?

दुसरा आक्षेप म्हणजे आमच्या या सूचनेंत वर्गकलहाचीं बीजें भरलीं आहेत असा येईल. वर्गकलह नको असें म्हणणारा मनुष्य नेहमीं दुसऱ्या वर्गावर जगणाऱ्या वर्गांतील असतो. समाजांत एक वर्ग दुसऱ्या वर्गास पिळून काढीत असतो. पिळला जाणारा वर्ग 'मी पिळला जात आहें' असें म्हणूं लागला कीं, पिळणारा वर्ग 'वर्ग कलहाची' ओरड सुरू करून त्या दलित वर्गाला दबवून गप्प बसवितो. शहरांतील पांढरपेशा वर्गाचें हित व खेड्यांतील शेतकरी वर्गाचें हित यांत भिन्नता किंवा परस्पर विरोध आहे, हें अनेक लोकांनीं कबूल केलेलें आहे व त्यामुळेंच महात्मा गांधीसारखे लोकोत्तर पुरुष आतां खेड्यांतील दुःखी जनतेच्या उद्धारासाठीं प्रयत्न करूं लागले आहेत. मजुरांनीं राबावयाचें व गिरणीच्या मालकांनीं चैन करावयाची; त्याचप्रमाणें खेड्यांतील लोकांनीं कष्ट करावयाचे व कर भरावयाचे, आणि शहरांतील लोकांनीं सावकार म्हणून किंवा सरकारी नोकर म्हणून त्या पैशानें आपले खिसे भरावयाचे. या प्रकाराला कोणी आळा घालूं लागला कीं, वर्गकलह माजविण्याचा किंवा जातीनिष्ठतेचा त्याच्यावर आरोप करवायाचा ! अशा तऱ्हेचे आरोप करणारे स्वतांच ' हा इंग्रज, हा हिंदी, हा हिंदु, हा मुसलमान,' असे वर्गभेद माजवितात. त्या वेळीं या त्यांच्या करण्यावर देशभक्तीचा व धर्मभक्तीचा मुलामा मात्र चढविण्यांत येतो. हिंदी लोकांचा पैसा

हिंदी लोकांच्या घरांतच राहिला पाहिजे असें म्हणणें जर चुकीचें नाहीं, तर शेतकऱ्यांचा पैसा शेतकऱ्यांच्या घरांतच राहिला पाहिजे, असें म्हणणें कां चुकीचें आहे ? हिंदुस्थानांतील पैसा विलायतला गेल्यामुळें हिंदुस्थान देश जसा दिवसेंदिवस अधिकाधिक कंगाल होऊं लागला आहे, त्याचप्रमाणें शहरांतील लोकांनीं ग्रामीणांना नागवून खेड्यांतील पैसा शहरांत आणल्यामुळें शहरांत घरांची संख्या व उंची वाढत असून खेड्यांतील नागविल्या जाणाऱ्या लोकांचीं घरें पडून मातीला भिडूं लागलीं आहेत. विलायतला जाणाऱ्या पैशाला ड्रेन (drain) म्हणावयाचें तसें खेड्यांतून शहरांत जो पैसा येत आहे त्याला ड्रेन कां म्हणू नये ? समुद्राच्या पाण्याचे ढग बनतात, त्या ढगाचा पाऊस पडून नदीला पूर येतो व ती नदी समुद्राला परत मिळून समुद्राचें पाणी, जमीन पिकवून, समुद्रांत परत येतें, त्याचप्रमाणें कराच्या व इतर हजारों मार्गांनें सरकारच्या तिजोरीला पूर आणणारा खेड्यांतील पैसा, खेड्यांतील वर्गाच्या मुलांना नोकऱ्या देऊन, थोडा फार तरी खेड्यांत परत जाणें जरूर आहे. असें होत नाहीं तोंपर्यंत खेड्यांचें वाढतें दारिद्र्य मागें हटणार नाहीं.

खेड्यांतील लोकांमधील लायक लोकांना सरकारी नोकरी देण्यांत यावी असें आम्हीं म्हणतों, त्याचे समर्थनार्थ आणखी एक कारण देतां येईल. खेड्यांतील लोकांची आर्थिक हलाखी नाहींशी करण्यास त्यांच्यासाठीं दुय्यम धंदे हुडकण्यासाठीं अनेक अर्थशास्त्रज्ञ डोकें खाजवून राहिले आहेत. खेड्यांतील शिकलेल्या लोकांना सरकारी नोकरी देणें म्हणजे त्यांना एक प्रकारचा दुय्यम धंदा देण्यासारखेंच आहे. एका शेतकऱ्याला एका माणसाच्या श्रमापुरती जमीन असली व त्याला दोन मुलगे असले तर आज ते तिघेहि त्या जमिनीवर काम करतात व त्यामुळें त्यांना कधीं अर्धपोटीं रहावें लागतें. परंतु त्या तिघांपैकीं बापानें कोंबड्या बाळगल्या, शिकलेल्या मुलाला नोकरी मिळाली व न शिकलेला मुलगा शेतीवर राबला तर त्या कुटुंबाची आर्थिक स्थिति सुधारण्यास वेळ लागणार नाहीं. इतर अनेक दुय्यम धंदे करण्याचा शेतकऱ्यांना उपदेश करण्यापूर्वी, सरकारी नोकरीचा या दुय्यम धंद्यांत समावेश करून त्यांचाहि शेतकऱ्यांना अधिकाधिक फायदा मिळणें जरूर आहे. सरकारी नोकरीचें सुखाचें व फायद्याचें साधन बुद्धिजीवि लोकांसाठीं राखून ठेवून, खेड्यांतील श्रमजीवि लोकांना इतर कष्टाचे व कमी किफायतीचे धंदे करावयास सांगणें म्हणजे त्यांची उघडउघड फसवणूक करणें होय. आंधळ्याच्या पदरांत कोंडा

टाकून डोळसांनं पोहे आतांपर्यंत लाटले ते पुष्कळ झाले. आतां देशाचें खरें हित करावयाचें असेल तर देशभक्तीचीं भाषा बोलणाऱ्या डोळसांनीं स्वतां कोंडाचा मांडा करून, पोहे हजारों वर्षें अर्धपोटी राहिलेल्या–मुद्दाम ठेवलेल्या–आंधळयांना द्यावेत.

विद्यार्थ्यांच्या व विशेषतः शेतकरी वर्गाच्या बाबतींत आपण काय करीत आहोंत याची पहाणी करून पुढें काय करावयास पाहिजे याची शक्य तितक्या विस्तारानें चर्चा केली. शेवटीं खालील महत्त्वाचा उतारा देऊन या प्रश्नाची रजा घेणें जरूर आहे.

"Inevitably the standard of living and health varies slightly in different villages.....from various causes, but the great need to-day, as formerly, is for understanding, co-operation and effort between the Government, local educational authorities, medical authorities and voluntary agencies. Only thus can grow the realization in idea and action of the right of every child to equality of opportunity and to a high standard of life and physique. Gradually, through these ideals, will be recognised the fact that physical and psychological causes and effects are inseparable throughout education, and as surely as this fact is grasped will those barriers, which are to-day cast in the way of the children's mental and bodily health, become more easily surmounted, and the high road to moral and physical well-being and a healthy nation of fully developed citizens, be made clear.

Rural Education p. 151-152.

प्रकरण दुसरें

शिक्षक

Valuable as are material provisions for teaching, desirable as it is to have a well-built, fully equipped school, these assets are incomparably inferior in power to the influence of the teacher in a child education. The personal element is always the most patent factor in any system, no where in greater degree than in the School.

Rural Education P. 61.

हल्लीं शिक्षणाचा फार फैलाव झाला व अभिरुची वाढली असें वाटतें, परंतु ती भ्रांति आहे. केवळ सरकारी चाकरीच्या लोभानें आमचे लोक विद्या शिकतात. त्यांना विद्येचें व्यसनच काय पण साधारण आवडही नसते. स्वतः शिक्षकालाच आपल्या कामाची थोरवी वाटत नाहीं ! मग ती इतरांना कशी वाटावी ? उपाय नाहीं म्हणून शिक्षकाचें काम करावयाचें ही जी त्यांची समजूत तींच लोकांची...पण ही स्थिति बदलून शिक्षण चालू असतां शिक्षक जर विद्यार्थ्यांच्या मनांत विद्येची खरी थोरवी भरून देऊन तिच्या अभ्यासानें होणाऱ्या अनिर्वाच्य सुखाची त्यांना चट लावून उत्साह उत्पन्न करतील, तर शिक्षण हें, ठिसूळ न बनतां तलवारीच्या पोलादासारखें कठीण व लखलखीत होऊन, फार दिवस बिन्हाड करून ज्या अरिष्टरूपी राक्षसांनीं या देशास जेरीस आणलें, त्यांचें निर्दाळण करील व तेणेंकरून सुशिक्षित लोक व त्यांचे कारागीर म्हणजे शिक्षक यांचें दिव्य यश भूमंडळावर मिरवेल.

शाळापत्रक जानेवारी इ. स. १८७२.

शिक्षकांसंबंधीं लिहिण्यास सुरुवात करतांना कमीजास्त महत्त्वाचे अनेक प्रश्न मनापुढें येऊन कोणत्या प्रश्नाची प्रथम चर्चा करावी व कोणत्या प्रश्नाची मागाहून वाटाघाट करावी, कोणता प्रश्न शिक्षकाच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे व कोणता प्रश्न शिक्षणपद्धतीच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे, अशा विचारानें मन कांहीं वेळ गडबडून,गोंधळून जातें. स्वतःच्या दृष्टीनें विचार करणारा शिक्षक... पगार, रजा, बदली...यांनाच प्राधान्य देईल. उलट कोणत्या गोष्टींमुळें आपली

शिक्षणपद्धति यशस्वी होईल, असा एकंदर विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीनें विचार करणारा मनुष्य, शिक्षकांच्या अंगीं अवश्यच पाहिजे असलेल्या कांहीं विशेष गुणांना व त्याला शिक्षक या नात्यानें मिळणाऱ्या शिक्षणाला पहिलें महत्त्वाचें स्थान देईल.

अशा दोन निरनिराळ्या दृष्टीनें शिक्षकांच्यासंबंधीं विचारासाठीं पुढें येणाऱ्या प्रश्नांकडे पाहिलें, म्हणजे निरनिराळ्या प्रश्नांना महत्त्व येतें व या चर्चेला कोणत्या क्रमानें सुरुवात करावी, हें कोडें लवकर उलगडत नाहीं. परंतु आमच्या मतें या प्रश्नाकडे शिक्षकाच्या वैयक्तिक हितानहिताच्या आकुंचित दृष्टीनें न पाहातां, राष्ट्राच्या–देशाच्या–व्यापक नजरेनेंच पहाणें अत्यंत जरूर आहे. देशाची सर्वांगीण प्रगति होण्यासाठीं ज्या अनेक साधनांचा आपणांस उपयोग होणार आहे किंवा होत आहे, त्या साधनांपैकींच शिक्षक हाही एक महत्त्वाचा घटक आहे; म्हणून खरें साध्य देशाची प्रगति हें आहे व या साध्याच्या दृष्टीनेंच कोणत्याही प्रश्नाकडे आपण पहाणें जरूर आहे.

या दृष्टीनें विचार करावयाचें ठरविल्यानंतर शिक्षकाचें शिक्षण या प्रश्नाला पहिला मान द्यावा लागतो व त्याच प्रश्नाचा शक्य तितक्या विस्तारानें विचार करण्याचें आम्ही ठरविलें आहे. या प्रश्नाचा विचार झाल्यानंतर शिक्षकाचा पगार वगैरे प्रश्नांचा विचार करण्यांत येईल.

१ शिक्षकाचें शिक्षण

"The importance of Primary Education to this country is so great that we think that Government and the Local Authorities should never rest content until one hundred per cent of the teachers are trained" Report of the Reorganization Committee: Bombay. P. 131.

कोणत्याही शिक्षण पद्धतींत शिक्षक हा फार महत्त्वाचा घटक आहे. विद्यार्थी चांगले मिळाले, पालकही शिक्षणाविषयीं आस्था बाळगणारे असले तरी शिक्षक जर जसा पाहिजे तसा नसला तर विद्यार्थ्यांचें नुकसान झाल्यावांचून राहाणार नाहीं. जमीन चांगली मशागत केलेली आहे, बी-बियाणेंही चांगलें दिलें, परंतु पीक तयार करणारा शेतकरीच आपल्या धंद्यांत पूर्णपणें गैरवाकबगार असला, तर शेतीची परवड झाल्यावांचून कशी रहाणार? बागेची उत्तम स्थिति माळ्याच्या कौशल्यावर अवलंबून असते. शाळा ही जर बाग म्हटली

तर निरनिराळे वर्ग हे वाफे म्हणतां येतील व विद्यार्थी त्या वाफ्यांतील रोपें आहेत. या नाजूक रोपांची योग्य ती निगा राखून त्यांची जोरदारपणें वाढ होईल हें पाहाण्याचें जबाबदारीचें काम शिक्षकरूपी माळ्यावर सोंपविलेलें असतें. कोणत्या रोपांना कोणतें खत मानवतें, तसेंच तें कोणत्या वेळीं किती द्यावयाचें, पाणी कधीं व किती द्यावयाचें, खुरट्टं पाहाणाऱ्या रोपाला नवा जोम काय केलें असतां येईल, वगैरे दरदिवशीं कराव्या लागणाऱ्या, दिसावयास क्षुल्लक पण परिणामीं महत्त्वाच्या अशा अनेक गोष्टींची जर माळ्याला माहिती नसली, तर थोडयाच दिवसांत चांगल्या मळ्याचें ओसाड माळरान बनावयास वेळ लागणार नाहीं, आणि म्हणूनच शिक्षकाला त्याच्या धंद्याला योग्य असें शिक्षण देण्याची आवश्यकता वाटूं लागते. प्रत्येक धंद्याचें तंत्र असतें; त्याचप्रमाणें शिक्षकाच्या धंद्याचेंही तंत्र आहे. म्हणून त्या तंत्राची त्या प्रदेशांत पडणाऱ्या प्रत्येक माणसाला माहिती असणें अत्यंत इष्ट आहे.

कवीप्रमाणें चांगला शिक्षक जन्मावा लागतो, असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे. या म्हणण्यांत सर्वांशीं नसलें तरी बरेंच तथ्य आहे. मनुष्याच्या अंगांत मूळचीच चमक असेल तर दिलेल्या शिक्षणानें त्या चमकीवर अधिक तजेला चढेल. शिक्षकाच्या पेशास अनेक सद्गुण अंगीं असावे लागतात. मुलांच्या मनाची पूर्ण कल्पना, मनाचा समतोलपणा, पालकांशीं गोडीगुलाबीनें वागून त्यांच्या मनांत शिक्षणाविषयीं आस्था उत्पन्न करण्याची हातोटी, कर्तव्यतत्परता वगैरे विविध गुणांचा ज्याच्या ठिकाणीं सुंदर मिलाफ झाला आहे, असाच मनुष्य यशस्वी व नमुनेदार शिक्षक होऊं शकेल. तिरसट व चिडखोर स्वभावाच्या मनुष्याला कितीहि शिक्षण दिलें तरी त्याच्या स्वभावांतील हे दोष कसे नाहींसे होणार ? नासलेल्या दुधांत कितीहि साखर घातली तरी त्याचा नासकेपणा कसा नाहींसा होणार ? स्वतःच्या मुलांसच उठतां लाथ व बसतां बुक्की देणारा मनुष्य इतरांच्या मुलांशीं[1] हसत खेळत त्यांच्या कलानें वागेल, असा चमत्कार कोणत्या शिक्षणाला साधतां येणार आहे ? कितीहि उत्तम शास्त्रीय खत घातलें तरी काळ्या खडकाचें सुपीक जमिनींत कसें रूपांतर होणार ? शिक्षकाला शिक्षण देण्याची कितीही उत्तम योजना असली तरी त्या शिक्षणानें वाढीला लागतील असे गुण त्याच्या अंगीं मूळचेच असणें अत्यंत जरूर आहे. हे गुण मूळचेच असले म्हणजे शिक्षकाच्या पेशाचें विशेष शिक्षण

---

[1] पुनर्घटना क. रि. पा. १३०.

मिळाले नसतांही कांहीं शिक्षक उत्तम शिक्षक ठरूं शकतात, हें प्रत्यक्ष अनुभवानें आम्हांला माहीत आहे. याच्या उलट ट्रेनिंग कॉलेजमधून तिसऱ्या वर्गाचा शिक्षणक्रम चांगल्या प्रकारें पुरा करून आलेले कांहीं शिक्षक पूर्णपणें टाकाऊ असल्याचेंही आम्हांस माहीत आहे. म्हणून शिक्षकाला शिक्षण देण्यापूर्वी त्याच्या अंगीं त्या धंद्यास आवश्यक असणारे गुण बीजरूपानें तरी असणें अतिशय जरूर आहे.

ज्याच्या अंगीं आवश्यक असे गुण बीजरूपानें आहेत अशा माणसाला शिक्षण देऊन अधिक कार्यक्षम बनविणें फार जरूर आहे. चांगलें शिकविणें ही एक कलाच आहे, व "शिकविण्याची ही कला अंशतः जन्मदत्त व अंशतः शिकविण्यानें प्राप्त होणारी आहे."[1] भाकड गाईला चुणी—फोल—पेंडीचा डोंगर चारला तरी तिला दूध फुटणार नाहीं ही गोष्ट खरी आहे; परंतु जी मुळची थोडें दूध देते अशा गाईला भरपूर आंबोण दिलें तर ती अधिक मुबलक व अधिक कसदार दूध देण्याचा पूर्ण संभव आहे. दुभत्या गाईला आंबोण देण्याची जशी जरूरी आहे, तशीच शिक्षकाला त्याच्या पेशास फायदेशीर होईल असें शिक्षण देण्याचीही अत्यंत जरूरी आहे.

शिक्षकाच्या ताब्यांत जीं मुलें आपण देतों त्या मुलांना त्यांनीं काय शिकावें अशी आपली अपेक्षा असते? प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या मुलांना शिक्षकानें लिहिण्यावाचण्यास व कांहीं बेरजा, वजाबाक्या करण्यास शिकविलें म्हणजे आपलें समाधान होईल काय? लिहितां-वाचतां येणें, व हिशेबठिशेब करणें हेंच प्राथमिक शिक्षणाचें ध्येय आहे का? हें ध्येय खास नाहीं, तें ध्येयसिद्धीचें साधन आहे. मग आमचें ध्येय काय आहे? सन १९३२ सालीं मुंबई सरकारनें नेमलेल्या पुनर्घटना कमेटीच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे "आमच्या समजुतीप्रमाणें मोठ्या राष्ट्राच्या जीवनांत आपलें काम कसें उत्तम तऱ्हेनें करावें व आपल्या परीनें देशाच्या आकांक्षा सफल होण्याला सहाय्य कसें करावें हें तरुणांना शिकविणें हें प्राथमिक शिक्षणाचें ध्येय असणें जरूर आहे."[1] थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याला विचारप्रवण करणें हा प्राथमिक शिक्षणाचा उद्देश आहे. लतादिकांना पालवी फोडणाऱ्या वसंत ऋतूप्रमाणें बालबुद्धीचा विकास करून तिला विचाराची पालवी फोडणें, हें शिक्षणाचें कार्य आहे.

---

[1] पुनर्घटना क. रि. पा. १३०.

हें महत्त्वाचें ध्येय शक्य कोटींत आणणाऱ्या शिक्षकाची शैक्षणिक तयारी किती उत्तम दर्जाची असणें जरूर आहे, याचें वर्णन करण्याची जरूरी नाहीं. जरूर ते गुण जन्मतः लाभलेला व अधिक योग्य शिक्षणानें ज्याच्या मूळच्या गुणांत जास्त भर पडली आहे असाच शिक्षक हें कार्य घडवून आणूं शकेल. ज्यांना शिक्षणाचें हें ध्येय पटलेलें आहे त्यांना स्वतः शिक्षकाच्या शिक्षणाचें महत्त्व सांगण्याची जरूरी नाहीं. ज्यांना शिक्षकाच्या शिक्षणाचें महत्त्व समजतें आहे त्यांना त्या शिक्षणाची योग्य तरतूद करण्याच्या जबाबदारीची आपोआपच जाणीव होऊन त्या दिशेनें योग्य ते प्रयत्न केल्यावांचून ते राहणार नाहींत.

शिक्षक-शिक्षणाचा आरंभ व प्रगतिः—हिंदुस्थानांतील प्रजेच्या शिक्षणाचा प्रश्न कंपनी सरकारनें हातीं घेतांच निरनिराळ्या इंग्रज अधिकाऱ्यांनीं शिक्षकांच्या शिक्षणाच्या प्रश्नाचें महत्त्व ओळखून त्याची आवश्यकता प्रतिपादण्यास सुरवात केली. सन १८२५ सालीं मुंबई प्रांताच्या शिक्षणविषयक अहवालासंबंधीं लिहितांना चिटणीस फॅरिश यांनीं खालीलप्रमाणें मत व्यक्त केलें आहे.

" इलाख्यांत शाळा सुरू करण्यास फार विलंब लागत आहे याचें कारण, शाळेच्या शिक्षकाला प्रथम शिक्षण देण्याची आवश्यकता असून, त्या हेतूनें अनेक तरुणांना शिक्षण देण्याचें कार्य सुरू झालें आहे. ज्या ठिकाणीं शाळा नाहीं त्या ठिकाणीं शाळा स्थापन करण्यास सरकारनें मदत करावी असें ठरविल्यास, या शाळांची खरी उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टीनें प्रथम कांहीं तरुणांना गोळा करून त्यांना योग्य पद्धतीनें व योग्य पुस्तकांच्या मदतीनें जरूर तें उपयोगी शिक्षण देऊन, ते शाळेंतील जबाबदारी संभाळण्यास लायक झाल्यानंतर त्यांची शाळेसाठीं निवड करून त्यावर नेमणें जरूर आहे. अशा तऱ्हेच्या शिक्षित शिक्षकांच्या साहाय्यानें सुधारलेली शिक्षणपद्धति रूढ करतां येईल. या चालीनें शिक्षणाचा प्रसार पहिल्या तीन वर्षांत जरी फार झाला नाहीं तरी त्यानंतर त्याचा प्रसार अधिक झपाट्यानें व परिणामकारक रीतीनें झाल्यावांचून राहाणार नाहीं. "

कंपनीच्या सूत्रचालकांनीं बंगाल सरकारला पाठविलेल्या आपल्या ता. ९-३-१८२५ च्या खलित्यांतही कलकत्ता स्कूल सोसायटीच्या 'शिक्षकांना शिक्षण देण्याच्या महत्त्वाच्या योजनेचा' गौरवपर उल्लेख करून, शिक्षकांचें

शिक्षण देऊनच हिंदी जनतेपैकीं कांहीं लोकांना सुधारलेलें शिक्षण देतां येईल, असा आपला अभिप्राय दिला. त्याचप्रमाणें त्यांनीं आपल्या ता. १६-४-१८२८ च्या खलित्यांत सर थॉमस मन्रो यांच्या, मद्रास येथें शिक्षकांच्या शिक्षणासाठीं शाळा काढण्याच्या योजनेची स्तुति केली. सर थॉमस मन्रो यांनींही ' हल्लीं उपलब्ध असलेल्या शिक्षकांपेक्षां अधिक चांगले शिकलेले शिक्षक मिळाल्याखेरीज प्रगति होणें शक्य नाहीं ' असा स्पष्ट अभिप्राय दिला व शिक्षकांना शिकण्यासाठीं स्वतंत्र शाळा काढण्याची कळकळीची शिफारस केली.

मुंबई सरकारनें ता. ५-४-१८४८ सालीं बोर्ड ऑफ एज्युकेशनला जें विस्तृत पत्र पाठविलें, त्यांतही ' अधिक पात्रता असलेला शिक्षकवर्ग शिकवून तयार करणें अतिशय इष्ट आहे' असें म्हटलें व बोर्ड ऑफ् एज्युकेशननें देशी भाषांतील शिक्षकांना शिक्षण देण्यासाठीं नवीन क्लास काढण्याची जी योजना आंखली होती तिचा निर्देश केला. मुंबई प्रांतांत शिक्षकांना शिक्षण देण्याची बोर्ड ऑफ एज्युकेशननें जी योजना केली त्या योजनेप्रमाणें त्यांनीं १८२१ सालीं पुणें येथें काढलेल्या संस्कृत कॉलेजचें शिक्षकांना शिक्षण देण्याऱ्या नॉर्मल क्लास–(Normal class) मध्यें रूपांतर केलें. पुण्याप्रमाणें मुंबईलाही एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें शिक्षकांना शिक्षण देण्यासाठीं नॉर्मल क्लास सुरू करण्यांत आला. त्या वर्गांतील शिक्षकांना एल्फिन्स्टन कॉलेजमधील अध्यापकांनीं शिकविण्याची योजना करण्यांत आली होती. त्या वर्गांत १५ मराठी, १५ गुजराथी व १० कानडी अशा एकंदर ४० विद्यार्थ्यांची तरतूद करण्यांत आली. बोर्ड ऑफ एज्युकेशननें या संस्थेबद्दल १८४५ सालीं विस्तृत असे नियम करून ते प्रसिद्ध केले.§

सन १८५४ चा जो सुप्रसिद्ध खलिता कंपनीच्या चालकांनीं प्रसिद्ध केला त्यांत कलम ६२ मध्यें ' मुलांना शिकविण्यासाठीं योग्य तऱ्हेचें शिक्षण घेतलेले शिक्षक मिळणें ' कसें कठीण आहे याचें वर्णन करून प्रत्येक इलाख्यांत शक्य तितक्या लौकर शिक्षकांना शिक्षण देण्यासाठीं शाळा व वर्ग अस्तित्वांत आणण्यांत यावेत, अशी आपली इच्छा स्पष्टपणें व्यक्त केली. या खलित्यामुळें शिक्षकांच्या शिक्षणाच्या प्रश्नाला जोराची चालना मिळाली.

सन १८५४ च्या खलित्यानंतर भारतमंत्र्यांनीं या प्रश्नासंबंधीं वेळोवेळीं खलिते लिहून हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांना अनेक सूचना केल्या. त्यानंतर

§ E. R. II 158.

सन १८८२ सालच्या हंटरकमिशनच्या विचारासाठीं जे अनेक प्रश्न ठरावांत नमूद करण्यांत आले, त्यांत " निरनिराळ्या प्रांतांत प्राथमिक शिक्षकांना शिक्षण देण्याची जी व्यवस्था करण्यांत आली आहे, तिची काळजीपूर्वक पहाणी करून सदरचें शिक्षण अधिक कार्यक्षम व उपयोगी करण्यासाठीं, " योग्य त्या सूचना करण्यांत याव्यात असें सांगण्यांत आलें व त्याप्रमाणें हंटर-कमिशननें या प्रश्नाची विशेष पहाणी करून सूचनाही केल्या. त्यांपैकीं दोन विशेष महत्त्वाच्या आहेत. पहिली सूचना अशी कीं " प्रत्येक इन्स्पेक्टरच्या अधिकार-क्षेत्रांतील सरकारी अगर मदतीच्या प्राथमिक शाळांच्या गरजा भागतील अशा तऱ्हेनें सरकारी अगर मदतीच्या शिक्षकांच्या शाळांची (Normal schools) विभागणी करण्यांत यावी " व दुसरी सूचना म्हणजे " प्राथमिक शिक्षणासाठीं जी रक्कम प्रांतिक तिजोरींतून मंजूर करण्यांत येईल त्या रकमेवर शिक्षकांच्या शाळांची तरतूद करण्याची पहिली जबाबदारी असावी. "[1]

प्राथमिक शिक्षणाच्या योग्य तऱ्हेच्या प्रसाराला प्राथमिक शिक्षक चांगले शिकलेले असणें आवश्यक असल्यामुळें, त्या बाबतींत हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांनीं जी कळकळ व्यक्त केली ती योग्यच होती असें म्हणावयास हरकत नाहीं. इंग्लंडमध्येंही जेव्हां प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठीं पद्धतशीर प्रयत्न करण्यांत येऊं लागले, त्यावेळीं योग्य तऱ्हेनें शिकलेल्या शिक्षकांचीच प्रथम उणीव भासली व या उणीवेबरोबर शिकविण्याच्या सदोष पद्धतीचें अनिष्ट प्राबल्य दिसून आलें. हे दोन्ही दोष नाहींसे करण्यासाठीं शिक्षकांच्या शाळा काढण्यांत आल्या व प्राथमिक शाळांमध्यें संघटन व शिस्त उत्पन्न करण्यासाठीं व उत्तम शिक्षणपद्धति अमलांत येण्यासाठीं योग्य ती उपाययोजना करण्यांत आली.

सन १८३९ सालीं शिक्षणावर योग्य तऱ्हेचें सरकारी नियंत्रण ठेवून त्याला योग्य वळण देण्यासाठीं कौन्सिल कमेटी (Committee of Council) स्थापन करण्यांत आली. ही कमिटी जन्माला येण्यापूर्वीच शिक्षकांना शिक्षण देण्याची थोडीफार तरतूद करण्यांत आली होती. परंतु ही कमिटी अस्तित्वांत येतांच शिक्षकांच्या शिक्षणाचें महत्त्व ओळखून तिनें शिक्षकांच्या शिक्षणासाठीं सरकारी संस्था काढण्याची पहिली सूचना केली.

[1] हंटर क. रि. १७४-७५

त्याकाळीं शिक्षणप्रसाराचें कार्य खिस्ती धर्मांतील निरनिराळे पंथ करीत असत व त्यांच्या कार्यांत सरकारनें ढवळाढवळ करणें कोणास विशेष पसंत नसे. त्यामुळें कमिटीनें केलेल्या सूचनेवर पार्लमेंटमध्यें वादाचें मोठें वादळ उठून, अखेर कमिटीला आपली सूचना परत घ्यावी लागली. परंतु शिक्षकांच्या शिक्षणासाठीं होणाऱ्या खाजगी प्रयत्नाला उत्तेजन देण्याचें व्रत या कमिटीनें अंगीकारून सन १८६० पर्यंत निरनिराळ्या संस्थांना इमारतीसाठीं म्हणून सुमारें ११८०० पौंडांची मदत केली. कांहीं काळ हा उपक्रमही बंद करण्यांत आला; परंतु तो पुन्हा १९०४-०५ मध्यें सुरू करण्यांत येऊन, लोकल एज्युकेशन ॲथॉरिटीजनीं आपलीं म्हणजे म्युनिसिपल कॉलेजेस शिक्षकांना शिक्षण देण्यासाठीं काढल्यास त्यांना सढळ हातानें मदत करण्यांत येऊं लागली. या मदतीचें प्रमाण कधीं कधीं एकंदर खर्चापैकीं शेंकडा ७५ पर्यंत चढत असे. त्याचप्रमाणें सन १८९० सालीं निरनिराळ्या विश्वविद्यालयांनीं शिक्षकांच्या शिक्षणाचीं जीं स्वतंत्र खातीं सुरू केलीं होतीं त्या खात्यांना, त्यांनीं शिक्षक–विद्यार्थ्यांसाठीं वसतिगृहें स्थापन केलीं, तर मदत करण्यांत येऊ लागला.

सरकारतर्फे याप्रमाणें प्रयत्न करण्यांत आले तरी या शिक्षण देणाऱ्या संस्था खिस्ती धर्मांतील निरनिराळे पंथच चालवीत असत व त्यामुळें या संस्थांतून शिक्षण घेणारा शिक्षक विशिष्ट धर्ममतांचा असावा लागे व त्यामुळें अनेक अडचणी उत्पन्न होत. सन १९०६ सालीं निरनिराळ्या वसतिगृहें जोडलेल्या शिक्षकविद्यार्थी-संस्था (Residential Colleges) मधील एकंदर ५२०१ जागांपैकीं ४१४२ जागा विशिष्ट धर्ममतांच्या उमेदवारांसाठींच राखून ठेवण्यांत आल्या होत्या. हें धर्माचें प्राबल्य सरकारला न आवडून १९०७ सालीं सरकारनें आपले नियम बदलून उमेदवाराच्या धार्मिक मताचा अगर सामाजिक दर्जाचा विचार न करतां, त्याला या संस्थांतून प्रवेश मिळणें जरूर आहे, असा नियम सर्व संस्थांस लागू केला. या नियमामुळें बरीच खळबळ उडाली; परंतु सरकारनें म्युनिसिपल संस्थांना मदत करण्याचें धोरण स्वीकारतांच त्या भराभर अस्तित्वांत येऊं लागल्यामुळें, ही खळबळ कमी कमी होत गेली.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे इंग्लंडमध्येंही शिक्षकांच्या शिक्षणाला योग्य महत्त्व देण्यांत येऊन तरतूद करण्यासाठीं सरकार, लोकल एज्युकेशनल ॲथारिटीज,

निरनिराळे धर्मपंथ व विश्वविद्यालयें आपआपल्या परीनें पराकाष्ठेचे प्रयत्न करीत होते व त्यांच्या प्रयत्नाचें अनुकरण हिंदुस्थानांतील अधिकारी इकडे करूं लागले.

सन १८८१–८२ सालीं शिक्षकांना शिक्षण देणाऱ्या एकंदर संस्था किती होत्या, हें २८३ पानावर तक्ता नं. २६ वरून दिसून येईल.

सदर तक्त्यावरून शिक्षण–संस्थांची संख्या पाहातां, मद्रास प्रांताचा पहिला नंबर असून कूर्ग व आसाम प्रांत व हैद्राबादमध्यें सर्वांत कमी म्हणजे प्रत्येकीं एक याप्रमाणें संस्था आहेत. मुंबई प्रांतापेक्षां मद्रास, बंगाल व वायव्य सरहद्द प्रांत यांत कितीतरी पटीनें अधिक संस्था आहेत. या संस्थांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वांत अधिक बंगाल प्रांतांत असून, सर्वांत कमी कूर्ग प्रांतांत आहे. या विद्यार्थ्यांतील स्त्रियांची संख्या मद्रास प्रांतांत सर्वांत अधिक असून, बंगालमध्यें सर्वांत कमी आहे. आसाम, कूर्ग व हैद्राबाद अ. डिस्ट्रिक्ट यांमध्यें स्त्रियांसाठीं शिक्षणसंस्थाच नसल्यामुळें स्त्रियांची संख्या पूज्यापलीकडे गेलेली नाहीं.

खर्चाचे आंकडे पाहातां शिक्षकांच्या शिक्षणासाठीं बंगाल अधिक खर्च करीत असून सर्वांत कमी खर्च कूर्ग प्रांताचा आहे. मुंबई प्रांतांतील शिक्षण अधिक खर्चाचें असून मद्रासमध्यें प्रत्येक स्त्रीपुरुष विद्यार्थ्यामागें सर्वांत कमी खर्च येत असे.

हे आंकडे १८८१-८२ सालासंबंधींचे आहेत. त्यानंतर अर्ध शतक लोटलें. नंतर म्हणजे १९३२ सालीं काय स्थिति होती हें २८४ पान तक्ता नं. २७ वरून दिसून येईल.

१८८१-८२ सालीं शिक्षकांना शिक्षण देणाऱ्या संस्था दाखविणारा तक्ता नं० २६

प्रांत		शिक्षकांच्या शाळांची संख्या	शाळेंतील विद्यार्थी	प्रत्येक विद्यार्थ्यास येणारा खर्च रु. आ. पै
मद्रास	पुरुष	२८	७७०	८२-१४—१
	स्त्री	४	१५७	१०४—३—६
	एकंदर	३२	९२७	८९-११—१
मुंबई	पुरुष	७	४८०	१३५-१४-११
	स्त्री	२	७३	२९९-१२—३
	एकंदर	९	५५३	१५५—९-११
बंगाल	पुरुष	२०	१००७	९३—०-१०
	स्त्री	२	४१	१९२ - ८—८
	एकंदर	२२	१०४८	९६-१२—६
वा. स. प्रांत व औध	पुरुष	१८	३०६	१२१-१४—२
	स्त्री	३	८९	८२—५—९
	एकंदर	२१	२९५	११३—८—०
पंजाब	पुरुष	४	२२०	११६—८—१
	स्त्री	३	१३८	१६१—३—१
	एकंदर	७	३५८	१४३—१—४
मध्यप्रांत	पुरुष	३	१७१	११५- १४—६
	स्त्री	१	१७	२७०—१—८
	एकंदर	४	१८८	१३१-१०—५
आसाम	पुरुष	९	३३१	६३—९-१०
	स्त्री	०	०	
	एकंदर	९	३३१	६३—९-१०
कूर्ग	पुरुष	१	७	३१५—०—०
	स्त्री	०	०	
	एकंदर	१	७	३१५—०—०
हद्राबाद अ. डि.	पुरुष	१	७९	११९—०—८
	स्त्री	०	०	
	एकंदर	१	७९	११९—०—८
हिंदुस्थान	पुरुष	९१	३३७१	१०४—३—१
	स्त्री	१५	५१५	१४१-१०-१०
	एकंदर	१०६	३८८६	१०९— ६—०

१९३२ मधील शिक्षकांच्या शिक्षणसंस्थांची संख्या दाखविणारा

तक्ता नं. २७

प्रांत		शिक्षकांच्या शाळांची संख्या	शाळेंतील विद्यार्थी	प्रत्येक विद्यार्थ्यास येणारा वार्षिक खर्च रु. आ. पै
मद्रास	पुरुष	८३	१०९८३	१३६–१३– २
	स्त्री	६४	३२३२	२२०–१४–१०
	एकंदर	१४७	१४२१५	
मुंबई	पुरुष	१२	७११	३२९– ९–१०
	स्त्री	२१*	८०३	२९९–१४– ८
	एकंदर	३३	१५१४	
बंगाल	पुरुष	९१	२५८७	१८०– ०– ७
	स्त्री	१०	२३४	३५९– ३– २
	एकंदर	१०१	२८२१	
संयुक्तप्रांत	पुरुष	८३	१६२२	२७८– ६– ९
	स्त्री	४५	४१२	४८६– ७– ६
	एकंदर	१२८	२०३४	
पंजाब	पुरुष	२०	१७४२	१५०–१४– ६
	स्त्री	१८	८५३	१३६– ५– २
	एकंदर	३८	२५९५	
बि.-ओरिसा	पुरुष	८३	१६७६	१८६– ४– ९
	स्त्री	११	२४९	२४०–१२– ९
	एकंदर	९४	१९२५	

* यांत प्राथमिक शिक्षकांसाठीं फक्त १७ संस्था असून त्यांत ५१३ विद्यार्थी शिकत होते. बाकी चार संस्था युरोपियन व दुय्यम शाळांतील शिक्षकांना शिक्षण देण्यासाठीं होत्या. मुं. पं. रि. १९२७–३२, पा. ११७.

प्रांत		शिक्षकांच्या शाळांची संख्या	शाळेंतील विद्यार्थी	प्रत्येक विद्यार्थ्यास येणारा वार्षिक खर्च
				रु. आ. पे
मध्यप्रांत	पुरुष	१०	१०५३	२९६— २— ३
	स्त्री	८	३३७	१९५—१३— ५
	एकंदर	१८	१३९०	
आसाम	पुरुष	६	२११	४३४—१०— ७
	स्त्री	२	२२	१३९— ५—१०
	एकंदर	८	२३३	
नॉर्थचे प्रांत	पुरुष	३	१६३	२५४— ५— ७
	स्त्री	१	४८	३२५— ५— ८
	एकंदर	४	२११	
ब्रिटिश हिंदु०	पुरुष	४२५	२१८२३	१८२— ४—११
	स्त्री	२०९	६९४५	२३२—११—१०
	एकंदर	६३४	२८७६८	

या दोन्ही तक्त्यांतील आकड्यांची तुलना केल्यानंतर ५० वर्षांच्या कालांत झालेले कोणते फेरबदल आपल्याला दिसून येतील ? १८८२ सालीं शिक्षणसंस्थांच्या संख्येच्या दृष्टीनें अग्रेसर असलेल्या मद्रास प्रांतानें आपलें अग्रेसरत्व कायम ठेवल्याचें दिसून येतें. १८८२ सालीं मद्रास प्रांतांत स्त्रीपुरुष शिक्षकांच्या एकंदर ३२ शिक्षणसंस्था होत्या, तर १९३२ सालीं अशा संस्थांची संख्या १४७ वर गेली आहे. म्हणजे अर्धशतकाच्या कालांत या शिक्षणसंस्थांची वाढ साडेचार पटीनें झाली आहे. मुंबईप्रांतांत १८८२ सालीं ९ संस्था होत्या, त्या १९३२ सालीं ३३ पर्यंत वाढल्या; म्हणजे सुमारें साडेतीन पटीनें वाढ झाली. बंगालमध्यें २२ होत्या त्या १९३२ सालीं १०१ म्हणजे जवळजवळ पांच पटीनें वाढ झाली आहे, व मध्यप्रांतांत साडेचार-पटीनें वाढ झालेली आहे. १९३२ सालीं सर्वांत कमी संख्या वायव्य सरहद्द

प्रांताची आहे. संख्येच्या दृष्टीनें पाहातां मद्रास व बंगाल हे बरोबरीचे इलाखे मुंबई इलाख्याचे कितीतरी पटीनें पुढें आहेत. परंतु संयुक्त प्रांत, पंजाब, बिहार-ओरिसा हे प्रांतहि पुढें निघून गेले आहेत. नऊ प्रांतांचे संस्थांच्या आंकडयांवर नंबर लावल्यास १८८२ त मुंबई इलाखा चवथा होता, तो १९३५ सालीं खालीं घसरून सहावा झाला आहे.

या संस्थांतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या दृष्टीनें पहातां १८८२ सालीं बंगाल पुढें होता, त्याला मागें टाकून मद्रासनें पहिला नंबर अतिशय मोठ्या प्रमाणानें पटकाविलेला आहे. मद्रासमधील विद्यार्थ्यांची संख्या ५० वर्षांत १५ पटीपेक्षां अधिक वाढली आहे. मुंबई प्रांतांत २$\frac{3}{4}$ पटीनें वाढली. बंगालमध्यें जवळ जवळ २$\frac{1}{2}$ पटीनें वाढली. पंजाबमध्यें ७$\frac{1}{2}$ पटीनें वाढली. मध्यप्रांतांत ७ पटीनें वाढली. म्हणजे मुंबई प्रांतांतच वाढीचें प्रमाण बंगालपेक्षां फार कमी आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

प्रत्येक विद्यार्थ्यामागें येणाऱ्या वार्षिक खर्चाचे आंकडे पहातां आसाममध्यें पुरुषांचें शिक्षण १९३२ सालीं सर्वांत अधिक खर्चाचें होतें व बंगालमध्यें स्त्रियांचें शिक्षण इतर प्रांतांपेक्षां अधिक खर्चाचें झालें. मद्रासमधील पुरुषांचें शिक्षण सर्व प्रांतांपेक्षां कमी खर्चाचें असून, पंजाबमधील स्त्रियांचें शिक्षण हें इतर प्रांतांपेक्षां कमी खर्चाचें झालें होतें. १८८२ सालांतील व १९३२ सालांतील ब्रिटिश हिंदुस्थानच्या प्रत्येक विद्यार्थ्यासाठीं येणाऱ्या आंकडयांची तुलना करतां खर्चाच्या प्रमाणांत जवळ जवळ दुपटीनें वाढ झाल्याचें दिसून येतें.

आतां १८८२ सालीं व १९३२ सालीं निरनिराळ्या प्रांतांत शिक्षित शिक्षकांचें (trained teachers) बिगर-शिक्षित शिक्षकांशीं (Untrained Teachers) काय प्रमाण होतें तें पुढील पान नं. २८७, तक्ता नं. २८ वर दर्शविलें आहे.

१८८२ व १९३२ मध्यें शिक्षित व बिगरशिक्षित शिक्षकांचें प्रमाण दाखविणारा तक्ता नं० २८

प्रांत	सन	एकंदर शिक्षक	शिक्षित-शिक्षक	शिक्षित शिक्षकांचें एकंदर शिक्षकांशीं शें. प्रमाण
मद्रास	१८८२	आंकडे	उपलब्ध नाहींत	
	१९३२	९६५३४	५७३१२	५९·४
मुंबई	१८८२	७२४८	२४५१	३३·८२
	१९३२	३२४२५	१५१८९	४६·८
बंगाल	१८८२	४६४९९	३३३८	७·२२
	१९३२	७५९५०	२१३३२	२८·१
पंजाब	१८८२	२०४१	५७९	२८·३६
	१९३२	११५२९	८४४९	७३·३
मध्यप्रांत	१८८२	१५२५	११२७	७३·९
	१९३२	१०२१५	५९७६	५८·५
आसाम	१८८२	१३८९	६१३	४८·४५
	१९३२	७२८५	२३०५	३१·६
ब्रि. हिंदुस्थान	१८८२	६६५५२	१२२४३	१८·३९
	१९३२	३१८०१८	१५९८२०	५०·३

सन १८८२ सालचे मद्रासचे आंकडे उपलब्ध नाहींत; परंतु १९३२ चे आकडे पहातां मद्रास या बाबतींतहि मुंबई शहराच्या पुढेंच आहे. १८८२ ते १९३२ च्या पन्नास वर्षांत पंजाबनें आपले शिक्षित-शिक्षकांचें एकंदर शिक्षकांच्या संख्येशीं प्रमाण २८·३६ वरून ७३·३ वर नेऊन कौतुकास्पद कामगिरी केली आहे. तर मध्यप्रांतांतील प्रमाण ७३·९० वरून ५८·२ वर येऊन तेथें पुच्छप्रगति झाली आहे. बंगालचें प्रमाण चौपटीनें वाढलें आहे, तर मुंबई इलाख्यांत प्रमाण नैसर्गिक वाढीमुळें (Natural expansion)

जितकें वाढेल तितकेंच वाढलें आहे. तें वाढविण्यासाठीं विशेष कोणीं प्रयत्न केल्याचें दिसून येत नाहीं. या सहा प्रांतांत पंजाबचा पहिला नंबर असून मुंबईचा चौथा नंबर लागतो; बंगाल जरी मुंबई प्रांतापेक्षां खालीं येत असला तरी त्याला विशेष कारणें आहेत. आरंभापासून गांवटी शाळांना अधिक मदत करण्याचें बंगालमध्यें धोरण ठेवण्यांत आल्यामुळें, सरकारी शाळा बंगालमध्यें विशेष उघडण्यांत आल्या नाहींत व त्यामुळें मदतीच्या शाळांमधील शिक्षित-शिक्षकांची संस्था केव्हांहि कमीच रहाणार. याच्या उलट, मद्रास व विशेषतः मुंबई प्रांतांत मदतीच्या शाळा वाढविण्याच्या ऐवजीं सरकारी शाळा वाढविण्याकडे जास्त ओढा असल्यामुळें, अशा सरकारी शाळांतील शिक्षित-शिक्षकांचें प्रमाण सरकारला सहज वाढवितां आलें. मुंबई प्रांतांतील प्राथमिक शिक्षणासंबंधींच्या नियमावलींतील नियम ५८ प्रमाणें स्थानिक संख्येच्या एकंदर शिक्षकांपैकीं निदान शेंकडा ५० शिक्षक शिक्षित असणें जरूर आहे. परंतु वर दिलेल्या आंकडयांवरून मुंबई प्रांतांत शिक्षित-शिक्षक फक्त शेंकडा ४६·८ इतकेच आहेत; म्हणजे नियमानें घालून दिलेलें अल्प प्रमाणहि १९३२ सालीं आपणांस साध्य करतां आलें नव्हतें हें उघड आहे. १९३५।३६ चा मुंबईचा शिक्षणखात्याचा अहवाल पहातां सिंध-सुद्धां एकंदर मुंबई प्रांतांतील प्राथमिक शिक्षकांची एकंदर संख्या ३२५३१ होती. त्यांपैकीं फक्त १७७८१ हे शिक्षित व बाकीचे १४८५० हे बिगर-शिक्षित शिक्षक होते. म्हणजे एकंदर शिक्षकांपैकीं शेंकडा ५४·७ इतके शिक्षक शिक्षित होते व शेंकडा ४६·३ शिक्षक बिगर-शिक्षित असे होते.

आतां इंग्लंडमध्यें काय परिस्थिति आहे तीं पाहूं. मार्च १९२४ मध्यें इंग्लंड व वेल्समध्यें शाळेचा ठराविक पूर्ण वेळ (Full time) नोकरी करणाऱ्या कायम शिक्षकांची संख्या १६२९५१ इतकी होती. त्यांपैकीं ७२२० शिक्षण–बोर्ड (Educational Boards) नें मान्य न केलेले होते व ३८९० शिक्षक विशेष–विषयांचे (special Subject) शिक्षक होते. बाकी १५९३३१ शिक्षक तीन प्रकारचे होते. १९२५ मधील व १९३० मधील वस्तुस्थितिनिदर्शक तुलनात्मक आंकडे पुढील तक्त्यांत दिले आहेत.

तक्ता नं० २९

साल.		शिक्षित (Certificated)	बिगर-शिक्षित (Uncertificated)	पुरवणी शिक्षक	एकंदर
१९२४	पुरुष	३६९२५	२१८०	...	३९१०५
	स्त्री	७९१७३	३०३४६	१०७०९	१२०२२६
	एकंदर	११६०९८	३२५२४	१०७०९	१५९३३१
	शें. प्र.	७३·०	२०·५	६·५	
१९३०	पुरुष	३९६१८	१९६७	.....	४१५८५
	स्त्री	८४९७९	२९४१८	७४९७	१२१८९४
	एकंदर	१२४५९७	३१३८५	७४९७	१६३४७९
	शें. प्र.	७६·२	१९·२	४·६	

इंग्लंड व वेल्समधील शिक्षकांत शिक्षित-शिक्षकांचें शेंकडा प्रमाण १९१३ सालापासून कोणत्या गतीनें वाढत गेलें हें खालील आंकड्यावरून नीटपणें लक्षांत येईल.

सन	शिक्षित	विनशिक्षित	पुरवणी शिक्षित	एकंदर
१९१३–१४	६६.५	२५.५	८·०	१००
१९२४	७३·०	२०·५	६·५	१००
१९३०	७६·२	१९·२	४·६	१००

या आंकड्यांवरून पहातां इंग्लंडमधील शिक्षित-शिक्षकांचें प्रमाण किती झपाट्यानें वाढत आहे याची चांगली कल्पना येते. वरील दोन्ही तक्त्यांत इंग्लंड व वेल्समधील शिक्षकांसंबंधीं 'बिगर-शिक्षित' हा शब्द वापरला आहे, तो थोडासा निराळ्या अर्थानें वापरला आहे. ज्यांना दाखला (Certificate) मिळालें नाहीं त्यांचा 'बिगरशिक्षित' या सदराखालीं समावेश केला आहे. ते शिक्षक आपल्या इकडील शिक्षक जसे बिगर-शिक्षित आहेत त्या अर्थानें बिगर-शिक्षित (Untrained) आहेत असें मुळींच म्हणतां येणार नाहीं हें, पुढें जी तिकडील शिक्षकांच्या शिक्षणा–(Training) संबंधीं माहिती दिली आहे तीवरून स्पष्ट होईल. हिंदुस्थानांतील प्रांतांपैकीं फक्त पंजाबमधील शिक्षित

शिक्षकांचें प्रमाण इंग्लंडमधील प्रमाणाशीं थोडें जुळणारें आहे. वाकी प्रांतांत उन्हाळाच आहे !

शिक्षित व बिगरशिक्षित शिक्षकांच्या संख्येंत व प्रमाणांत कशी वाढ झाली हें आपण पाहिलें तसें इंग्लंड-वेल्समधील शिक्षकांच्या एकंदर संख्येंत १८७०–७१ ते १९३० पर्यंतच्या ६० वर्षांच्या कालांत किती वाढ झाली हें पहाणेंहि जरूर आहे. सन १८७०-७१ सालीं प्राथमिक शाळांमधून एकंदर १४४४६ शिक्षक होते, तर १९३० सालांत ती संख्या १६३४७९पर्यंत वाढली; म्हणजे साठ वर्षांच्या कालांत ११ पटीपेक्षां अधिक वाढली. हिंदुस्थानांत १८८१-८२ सालापासून १९३२ सालापर्यंतच्या कालांत शिक्षकांची संख्या किती वाढली हें मागें पाहिलें आहेच. त्या आकडयांवरून पहातां इंग्लंडमध्यें ६० वर्षांत शिक्षकांची संख्या ११ पटीपेक्षां अधिक वाढली तर हिंदुस्थानांत ५० वर्षांच्या कालांत (१८८२ ते १९३२) ती संख्या फक्त ४$\frac{3}{4}$ पटानें वाढली. मुंबई प्रांतांत ती फक्त ४$\frac{1}{2}$ पटीनें वाढली. इंग्लंड व हिंदुस्थान यांत वाढीचें प्रमाणांत फरक पडण्याचें कारण इंग्लंडमध्यें १८७० सालींच प्राथमिक शिक्षणाला सक्तीचें तत्त्व लागूं करण्यांत येऊन त्याची अम्मलबजावणीही सुरू करण्यांत आली, तर हिंदुस्थानांत सक्तीचें तत्व स्थूलतः कायद्याच्या पुस्तकापलीकडे गेलें नाहीं, हें होय.

मुंबई प्रांतांतील शिक्षकांचें शिक्षण.—आतांपर्यंत आपण हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतील शिक्षकांच्या शिक्षणाची स्थिति ढोबळमानानें पाहिली. आतां मुंबई प्रांतांपुरताच अधिक विस्तारानें विचार करूं. १८८२ सालीं स्त्रीपुरुष शिक्षकांना शिक्षण देणाऱ्या ९ संस्था होत्या व त्यांत विद्यार्थी व विद्यार्थिनीं मिळून ५५३ ना शिक्षण मिळत होतें, हें आपण पाहिलें आहेच. पुरुषशिक्षकासाठीं ज्या सात संस्था होत्या त्यांपैकीं चार सरकारी, दोन संस्थानांचे हद्दींत व एक खाजगी होती. त्याचप्रमाणें १९३२ सालीं अशा संस्था एकंदर ३३ होत्या व त्यांत १५१४ शिक्षक–शिक्षकिणी शिक्षण घेत होत्या तेंहि आपण पाहिलें आहेच; म्हणजे १८८२ सालापासून १९३२ पर्यंतच्या पन्नास वर्षांत किती प्रगति झाली याची आपणाला कल्पना करतां आली. परंतु १९२२ चे आंकडे हे प्रगतीचे निदर्शक नसून परागतीचे दर्शक आहेत. १९२१–२२ पासून १९३१–३२ पर्यंतच्या दहा वर्षांत आपल्या प्रांताची पुढें चाल होण्याच्याऐवजीं पिछेहाटच झाल्याचें पुढील तक्त्यावरून दिसून येईल.

मुंबई प्रांतांतील १९१६ ते १९३६ पर्यंत शिक्षकांच्या शिक्षण-संस्थेची कमी जास्त संख्या दाखविणारा तक्ता नं० ३०

		सरकारी		बोर्डाच्या		मदतीच्या		विगर मदतीच्या		एकंदर	
		संस्था	विद्यार्थी	संस्था	विद्यार्थी	संस्था	विद्यार्थी	संस्था	विद्यार्थी	संस्था	विद्यार्थी
१९१६–१७	पु. शिक्षक	१०	१२७८	१३	८०	२	७३	..	...	२५	१४३१
	स्त्री-शिक्षक	४	३४२	१	२६	७	१८४	२	१२२	१४	६७४
		१४	१६२०	१४	१०६	९	२५७	२	१२२	२९	२१०५
१९२१–२२	पु. शिक्षक	२१	२०१३	...	...	२	७०	...	...	२३	२०८३
	स्त्री-शिक्षक	४	४०४	१	१८	१२	४६६	...	...	१७	८८८
		२५	२४१७	१	१८	१४	५३६	...	...	३०	२९७१
१९२६–२७	पु. शिक्षक	१२	९३३	१	४	२	६२	...	...	१५	९९९
	स्त्री-शिक्षक	५	२५२	...	...	१०	३५७	...	...	१५	६०९
		१७	११८५	१	४	१२	४१९	...	...	३०	१६०८
१९३१–३२	पु. शिक्षक	९	६०५	१	२७	२	७९	...	...	१२	७११
	स्त्री-शिक्षक	५	१७९	१	३७	१०	४९३	१	४	१७	५१३
		१४	७८४	२	६४	१२	५७२	१	४	२९	१२२४
१९३५–३६	पु. शिक्षक	९	८९१	...	...	२	७३	१	८	१२	९११२
	स्त्री-शिक्षक	५	२७७	१	२३	११	४९९	१	११	१८	८१०
		१४	११६८	१	२३	१३	५७२	२	१९	३०	१७८२

ट्रेनिंग कॉलेजमध्यें प्रवेश—पुरुषशिक्षकांसाठीं असलेल्या शिक्षकसंस्थेमध्यें प्रवेश मिळविण्यासाठीं उमेदवाराची व्ह. फायनलची, मॅट्रिक्युलेशनची अथवा त्या किंवा अधिक दर्जाची परीक्षा पास झालेली असावी लागते. पहिल्या वर्षासाठीं दाखल होणाऱ्या विद्यार्थ्याचें वय, संस्थेच्या वर्षाची पहिली सहामाही ज्या महिन्यांत सुरू होते त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस १६ पेक्षां कमी व २२ पेक्षां जास्त असतां कामा नये. दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षासाठीं वयाची कमाल मर्यादा ३० आहे.

उमेदवारास शारीरिक लायकी–(Physical fitness)चा दाखला हजर करावा लागतो. परंतु स्थानिक संस्थेमध्यें कायम जागेवर नोकरी असलेल्या उमेदवारास हा शारीरिक लायकीचा दाखला आणावा लागत नाहीं. मात्र तो शारीरिकदृष्ट्या पुढील शिक्षण घेण्यास लायक असावा लागतो.

या शिक्षणसंस्थांत दाखल होऊं इच्छिणाऱ्या उमेदवारांची निवड स्थानिक–संस्थाच्या, स्कूल बोर्डाच्या अगर खाजगी संस्थांच्या अधिकाऱ्यांच्या शिफारशी विचारांत घेऊन प्रत्यक्ष भागाचे इन्स्पेक्टर करतात. त्यांच्याकडे निवड करण्यासाठीं स्कूल बोर्डामार्फत, त्या बोर्डाच्या वांट्याला जागा आल्या असतील त्याच्या दुप्पट संख्येइतक्या, उमेदवारांची शिफारस करण्यांत येते व या शिफारस केलेल्या उमेदवारांतून जरूर त्या संख्येइतके उमेदवार निवडण्यांत येतात.

स्त्रीशिक्षकांसाठीं असलेल्या शिक्षणसंस्थेंत मुलींची व्ह. फायनल परीक्षा अगर इंग्रजी (Anglo-Vernacular) शाळेंतील ५ इयत्ता पास झाल्याशिवाय कोणाहि मुलीस प्रवेश मिळत नाहीं. या परीक्षा पास झालेल्या मुलींना पहिल्या वर्गाच्या खालच्या (Junior) वर्गांत दाखल करून घेण्यांत येतें. इंग्रजी शाळेची सहावी इयत्ता पास झालेल्या मुलींना पहिल्या वर्गाच्या वरच्या (Senior) वर्गांत दाखल करून घेतां येतें. मात्र अशा विद्यार्थिनीला नेमलेल्या २५ पाठांऐवजीं ४० पाठ द्यावे लागतात. मॅट्रिक्युलेशन किंवा तत्सम किंवा वरिष्ठ दर्जाच्या परीक्षा पास झालेल्या मुलींस एकदम दुसऱ्या वर्गांत दाखल करून घेतां येतें; परंतु तिला ४० पाठांऐवजीं ६० पाठ द्यावे लागतात.

१६ वर्षांपेक्षां कमी किंवा २५ वर्षांपेक्षां अधिक वयाच्या मुलींना सामान्यतः दाखल करून घेण्यांत येत नाहीं. स्थानिक संस्थेच्या कायम नोकरींत असलेल्या स्त्रियांसाठीं वयाची कमाल मर्यादा ३० आहे.

पुरुष शिक्षकांप्रमाणें स्त्रीशिक्षकांस शारीरिक लायकीबद्दल योग्य त्या वैद्यकीय अधिकाऱ्याचा दाखला आणावा लागतो. नोकरींत असलेल्या स्त्रीशिक्षकांना अशा दाखल्याची जरूरी नाहीं.

इन्स्पेक्टरच्या परवानगीवांचून कोणाहि स्त्रीला या शिक्षणसंस्थांत प्रवेश मिळत नाहीं. कोणाहि विद्यार्थिनीच्या प्रवेशाविषयीच्या लायकीबद्दल इन्स्पेक्टरचा निकाल अखेरचा समजला जातो.

प्रवेश मिळविण्यासाठीं ठराविक नमुन्यांत अर्ज सादर करावा लागतो, व त्या अर्जावर विद्यार्थिनीच्या कायदेशीर पालकाची सही असावी लागते.

स्थानिक संस्थांकडून जीं उमेदवारांचीं नांवें पाठविण्यांत येतात तीं नांवें जातवारीच्या तत्त्वावर पाठविण्यांत येतात. प्रत्येक स्थानिक संस्थेच्या वाट्यास ज्या जागा येतात त्या जागांची निरनिराळ्या जातीसाठीं कशी वांटणी करावी याचें सरकारनें प्रमाण ठरविलें असून तें प्रमाण खालीं दिलें आहे.

मुंबई इलाखा

	मुंबई, मध्य व दक्षिण भाग		उत्तर भाग.
१ पुढारलेले वर्ग	शेंकडा २५		
२ मुसलमान व ख्रिश्चन वगैरे सुद्धां सर्व मध्यम वर्गांतील जाती.	शेंकडा ६० जागा.	शेंकडा ९०	
३ मागासलेले वर्ग.	शेंकडा १५		शेंकडा १०
एकंदर	१००		१००

सिंध प्रांत.

१. हिंदु.	शेंकडा २५
२. मुसलमान.	शेंकडा ७५
एकंदर	१००

शिक्षणाचा तान्हा स्थानिक संस्थांनीं घेण्यापूर्वी डेप्युटी इन्स्पेक्टरच्या शिफारशीनें भागाचे (Divisional) इन्स्पेक्टर उमेदवारांची निवड करीत असत; परंतु हल्लीं स्कूल बोर्डांनीं उमेदवारांची प्राथमिक निवड करावयाची असून त्यांनीं निवडलेल्या उमेदवारांतून इन्स्पेक्टरनें जितक्या जागा तितके उमेदवार प्रत्यक्ष दाखल करून घ्यावयाचे असतात.

हल्लीं जी निवड करण्याची पद्धत अमलांत आहे त्या पद्धतीवद्दल बरीच टीका करण्यांत येत असते. या पद्धतीच्या टीकाकारांकडून जे आक्षेप घेण्यांत येतात त्यांचा थोडक्यांत येथें परामर्ष घेऊं.

पहिला आक्षेप असा, कीं 'लांचखाऊ' सभासदांना ट्रेनिंगसाठीं उमेदवारांची निवड, हें एक पैसे खाण्याचें उत्तम साधन असतें. एखादा सभासद जर खरोखर पैसे खाणारा असला तर ट्रेनिंगसाठीं निवड करण्याच्या अटीवर त्याला पुष्कळ पैसे खिशांत घालतां येतील, त्यांत कांहीं शंका नाहीं. ट्रेनिंगचीं एक, दोन किंवा तीन वर्षें ज्यांचीं पुरीं झालीं आहेत अशा शिक्षकांना जादा पगार मिळण्याची खात्री असल्यामुळें, त्या आशेनें शेकडों शिक्षक ट्रेनिंग कॉलेजसाठीं आपली वर्णी लागावी म्हणून शिकस्तीची धडपड करीत असतात; व हमखास आपलें काम होईल असा त्यांना संभव दिसला तर पैसे सोडण्याचीहि त्यांची तयारी असते. त्यामुळें लांचखाऊ सभासदाला किंवा अधिकाऱ्याला ही मोठी पर्वणीच आल्यासारखें होतें.

हा दोष अजिबात जरी नाहीं तरी पुष्कळ अंशानें नाहींसा करतां येण्यासारखा आहे. पुणें जिल्हा–स्कूलबोर्डांत ज्या पद्धतीनें उमेदवारांची निवड करण्यांत येते त्या पद्धतीचा अवलंब केला तर या पैसे खाण्याच्या वृत्तीला थोडाफार आळा बसून चांगल्या उमेदवारांचीच निवड होण्याचें प्रमाण वाढेल. ट्रेनिंग कॉलेजला जाण्यास उत्सुक असलेल्या पुढारलेल्या, मध्यम वर्गाच्या व मागासलेल्या वर्गाच्या शिक्षकांकडून अर्ज मागविण्यांत येतात व त्याप्रमाणें अर्ज करणाऱ्या शिक्षकांच्या, सरकारी ठरावाप्रमाणें जातवारीच्या तत्त्वावर पुढारलेल्या, मागासलेल्या वर्गाच्या वगैरे गटवार, स्वतंत्र याद्या तयार करून त्या त्या गटांतील शिक्षकांच्या नांवांपुढें त्यांनीं व्ह. फा. परीक्षेंत किंवा त्यानंतरच्या ट्रे. कॉ. च्या परीक्षेंत मिळविलेले गुण मांडण्यांत येतात व तसेंच प्रत्येक शिक्षकाचे निदान तीन वर्षांच्या शाळेंतील कामाबद्दल मिळालेले 'चांगले, बरे, वाईट' वगैरे असतील ते शेरे लिहिण्यांत येतात, याप्रमाणें याद्या तयार केल्यानंतर त्या यादींतील शिक्षकांचा त्यांच्या गुणांचा व मिळालेल्या शेऱ्यांचा विचार करून लायकीच्या दृष्टीनें अनुक्रम लावण्यांत येतो. पुढारलेल्या वर्गाच्या बाब्यास दोन जागा आल्या असल्यास पुढारलेल्या वर्गाच्या शिक्षकांची जी यादी केलेली असते त्या यादींतील लायकीच्या अनुक्रमाप्रमाणें पहिले चार

उमेदवार शिफारशीसाठीं निवडण्यांत येतात. त्याचप्रमाणें मध्यम व इतर वर्गांच्या उमेदवारांची निवड स्कूल बोर्डांकडून करण्यांत येते.

या पद्धतीमुळें लायक लोकांस स्वतांच्या हमखास निवडीबद्दल विश्वास वाटूं लागतो व नालायक लोकांस पैसे देऊन कांहीं उपयोग नाहीं, असें खात्रीपूर्वक वाटूं लागतें व त्यामुळें ते पैसे सोडण्यास तयार होत नाहींत. या याद्या तशाच राखून ठेवण्यांत येत असल्यामुळें, एखादा लायकीच्या दृष्टीनें सरस मनुष्य मागें पडून कमी दर्जाचा मनुष्य निवडला गेल्यास तावडतोब वरिष्ठ बोर्डाकडे (जि. लो. बोर्ड) तक्रार करण्यास अवसर मिळतो व अशी निवड करण्यांत आली असल्यास तिच्याबद्दल स्कूल बोर्डास कारणें देऊन खुलासा करावा लागतो.

दुसरा आक्षेप असा करण्यांत येतो, कीं 'स्थानिक संस्थांच्या हातांत निवड गेल्यापासून शिक्षकांच्या कार्यक्षमतेचा दर्जा कमी झाला असून, हा दोष घालविण्यासाठीं चढाओढीच्या धोरणावर निवड होणें आवश्यक आहे.'‡ पैसे घेऊन किंवा वशिल्यास बळी पडून शिक्षकाची प्रत्यक्ष लायकी न पहातां त्याची निवड केली तर वरच्या आक्षेपास भरपूर जागा मिळणें साहजिक आहे. कांहीं कांहीं स्कूल बोर्डें निवड करतांना वरच्या आक्षेपास आधार किंवा पुरावा मिळेल अशी निवड करतात, हें खरें आहे; परंतु पुणें जिल्हा स्कूल बोर्डाच्या पद्धतीचा अवलंब केल्यास चढाओढीच्या तत्त्वाला मान मिळून खरोखरच लायक लोक निवडले जाण्याचा अधिक संभव आहे. सरकारनें वरच्यासारख्या पद्धतीस नियमाचें रूप दिल्यास हा दोष पुष्कळच कमी होईल.

वेतन:—बोर्ड ऑफ एज्युकेशननें १८४५ सालीं केलेल्या नियमाप्रमाणें शिक्षकांसाठीं असलेल्या संस्थेंत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांस दरमहा जास्तींत जास्त ५ रुपयांपर्यंत वेतन (Stipend) देण्यांत येत असे. परंतु हल्लीं लोकल बोर्डामार्फत (यांत स्थानिक संस्था नसलेल्या म्युनिसिपालिटयांचाहि समावेश होतो) पाठविण्यांत आलेल्या पुरुष उमेदवारास दरमहा रु. १० प्रमाणें व स्त्री-उमेदवारास दरमहा रु. १५ प्रमाणें वेतन देण्यांत येतें. हें वेतन वर्षांतून ११ महिन्यांकरितां देण्यांत येतें. हें वेतन घेणाऱ्या उमेदवारास किंवा उमेदवार कायद्याप्रमाणें अज्ञान असल्यास त्याच्या पालकाला 'ट्रेनिंग संस्थेचे

---

‡ Progress of Education in India, 1927–32, P 154.

नियम पाळण्यासंबंधीं व जितका काल वेतन मिळालें असेल तितका काल स्थानिक संस्थांच्या शाळेंत नोकरी करूं' अशा अर्थाचा करार लिहून द्यावा लागतो.

वसतिगृह:—ट्रेनिंग कॉलेजमध्यें ज्या उमेदवारांची निवड झाली आहे त्यांना सामान्यत: कॉलेजला जोडलेल्या वसतिगृहांत रहावें लागतें. स्त्री-उमेदवारांस मुलें असल्यास किंवा त्यांच्यावर अवलंबून असलेली इतर आश्रित मंडळी असल्यास त्यांना वसतिगृहाच्या बाहेर रहाण्याची परवानगी देण्यांत येते. मात्र आपली रहाण्याची व्यवस्था योग्य तऱ्हेची आहे अशी ट्रेनिंग संस्थेच्या मुख्यांची खात्री पटवावी लागते.

अभ्यासक्रम:—स्त्रीपुरुषशिक्षकांच्या ट्रेनिंग संस्थांतील अभ्यासक्रम एकंदर तीन वर्षांचाच आहे. परंतु पुरुषांच्या ट्रेनिंगसंस्थेंत प्रत्येक वर्षाच्या अखेरीस परीक्षा पास झाल्यास अनुक्रमें पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्गांचा दाखला देण्यांत येतो तर स्त्रियांच्या संस्थेंत पहिल्या वर्गाचा दाखला मिळण्यासाठींच दोन वर्षें अभ्यास करावा लागतो. कारण त्यांच्या पहिल्या वर्षाच्या दाखल्यासाठीं खालचा (Junior) व वरचा (Senior) असे दोन वर्षांचे दोन वर्ग केले आहेत. सन १९२४ पर्यंत पुरुषशिक्षकांसाठीं ट्रेनिंग कॉलेजमध्यें तीन वर्षांचा अभ्यासक्रम असे; परंतु १९२४ सालीं तिसरें वर्ष कमी करण्यांत आलें. प्राचीन भाषा व बीजगणित हे दोन विषय कमी करून बाकीचे सर्व विषय तसेच ठेवण्यांत आले व तीन वर्षांच्या ऐवजीं दोन वर्षांत ते शिकवितां येतील अशी नवीन व्यवस्थामात्र करण्यांत आली. स्त्रियांच्या संस्थेंतही त्यामुळें तिसऱ्या वर्षाचा दाखला देण्याची पद्धत बंद करण्यांत आली; परंतु तीन वर्षांचा अभ्यासक्रम तसाच कायम ठेवून हा अभ्यासक्रम पुरा करणाऱ्या उमेदवारास वर वर्णन केल्याप्रमाणें फक्त दुसऱ्या वर्षाचा दाखला देण्याची तजवीज करण्यांत आली. १९२४ सालीं पुरुषांना दोन वर्षांचा अभ्यासक्रम केला असतांहि स्त्रियांना तीन वर्षांचाच अभ्यासक्रम देण्याचें कारण 'उत्तम अध्यापिका होण्यासाठीं स्त्रियांना पुरुषापेक्षां अधिक काल शिक्षण देणें जरूर आहे असा शिक्षणतज्ज्ञांचा अनुभव'* हें होय. ट्रेनिंगसंस्थेमध्यें विद्यार्थ्यांना शिक्षणशास्त्र, देशी भाषा (Vernacular), गणित, इतिहास, भूगोल, शास्त्रें, ड्रॉइंग, हस्तव्यवसाय, बागाईत व शारीरिक शिक्षण हे विषय मुख्यत: शिकविण्यांत येतात. स्त्रीपुरुषांना किंचित् फरकानें हेच विषय शिकविले जातात असें स्थूलमानानें

* मु. पं. रि. १९२३-२७ पा. १०२.

चोलावयास हरकत नाहीं. स्त्रियांना शिवणकाम किंवा पाकशास्त्रहि शिकविण्यांत येतें. या विषयांचा ठराविक भाग दरवर्षीं शिकविण्यांत येतो. हे सर्व विषय मराठी भाषेंतून शिकविले जातात. फक्त उर्दू शाळांमध्यें ते शिकविण्यासाठीं उर्दू भाषेचा उपयोग केला जातो.

परीक्षा:––प्रत्येक वर्षाची दोन सारख्या भागांत विभागणी करण्यांत आलेली असते. दुसऱ्या भागाच्या अखेरीस त्या त्या वर्षासाठीं इन्स्पेक्टरकडून परीक्षा घेतली जाते. परीक्षेच्या कामासाठीं ट्रेनिंग संस्थांचे मुख्याध्यापक व इन्स्पेक्टर नेमील ते खात्यांतील इतर अधिकारी त्याला मदत करतात. प्रत्येक जिल्ह्यांतील पास झालेल्या विद्यार्थ्यांची व विद्यार्थिनींचीं नांवें गुणानुक्रमें छापून प्रसिद्ध करतात.

ट्रेनिंगसंस्थेमध्यें एक, दोन किंवा तीन वर्षें राहून पूर्ण अभ्यास न करणाऱ्या विद्यार्थ्यांस अनुक्रमें त्या त्या वर्षाच्या दाखल्याच्या परीक्षेस बसूं दिलें जात नाहीं.

परीक्षा पास होण्यासाठीं विद्यार्थ्यांस एकंदर सर्व विषयांच्या गुणांच्या शेंकडा ४० गुण मिळवावे लागतात व शिक्षणशास्त्राखेरीज इतर विषयांस जे गुण ठेवलेले असतात त्या गुणांच्या शेंकडा ३३ गुण प्रत्येक विषयांत मिळवावे लागतात व शिक्षणशास्त्राच्या कांहीं महत्त्वाच्या बाबींसाठीं ठेवलेल्या गुणांच्या शेंकडा ४० गुण मिळवावे लागतात.

याप्रमाणें गुण न मिळालेला विद्यार्थी नापास करण्यांत येतो. मात्र अशा विद्यार्थ्याला इन्स्पेक्टरच्या परवानगीनें पुन्हा परीक्षेस बसण्याची खालील अटींवर परवानगी देण्यांत येते.

(अ) कोणत्याहि विद्यार्थ्यास एकाच परीक्षेस दोन वेळांपेक्षां अधिक वेळ बसूं दिलें जात नाहीं. ज्या वर्षीं विद्यार्थी नापास झाला असेल त्याच्या पुढच्या वर्षींच त्यानें पुन्हां परीक्षेस बसणें जरूर असतें. आजारीपणामुळें किंवा इतर योग्य कारणामुळें त्याला लगेच पुढच्या वर्षी परीक्षेस बसणें अशक्य झाल्यास, त्याला इन्स्पेक्टरच्या परवानगीनें त्याच्या पुढील वर्षी परीक्षेस बसूं दिलें जातें.

(ब) एकंदर सर्व विषयांत मिळालेल्या गुणांची सरासरी शेंकडा ५० पेक्षां अधिक असेल व विद्यार्थी एकाच विषयांत नापास झाला असेल तर

तेवढ्याच विषयासाठीं परीक्षेस बसण्याची सवलत देण्यांत येते, येरव्हीं नापास विद्यार्थ्याला सर्व विषयांच्या परीक्षेस बसावें लागतें.

(क) एखादा विद्यार्थी फक्त हस्तव्यवसायांत पास होऊन इतर सर्व विषयांत नापास झाला असेल तर त्याला पुन्हां परीक्षेस बसतांना हस्तव्यवसायाचे परीक्षेस बसण्याची माफी देण्यांत येते.

वर जी थोडी विस्तृत माहिती दिली आहे त्यावरून आपल्या ट्रेनिंग संस्थांमधील शिक्षणाच्या व्यवस्थेची व दर्जाची कल्पना येईल. या ट्रेनिंग संस्थेमध्यें शिक्षण घेण्यासाठीं जाणारे बहुतेक विद्यार्थी व्ह. फा. ची परीक्षा पास झालेलेच असतात हेंहि विशेष लक्षांत ठेवणें जरूर आहे.

इंग्लंडमधील शिक्षकांच्या शिक्षणाची पद्धतः—आपल्या या पद्धतीचा बरेवाईटपणा पहातांना तुलना करण्यासाठीं इतर देशांत व विशेषतः इंग्लंडमध्यें अमलांत असलेल्या पद्धतीची पहाणी करणें जरूर आहे. प्रथम इंग्लंडमध्यें व वेल्समध्यें शिक्षकांच्या शिक्षणाची काय तरतूद करण्यांत आली आहे हें पाहूं.

इंग्लंडमध्यें दाखला घेतलेले (certificated) आणि दाखला न घेतलेले (uncertificated) असे शिक्षकांचे दोन प्रकार आहेत. दाखला घेण्याचे दोन मार्ग आहेत. ट्रेनिंग कॉलेजमध्यें जाऊन तेथील दोन किंवा अधिक वर्षांचा अभ्यासक्रम पुरा करून जे परीक्षा पास होतात त्यांना दाखला (certificate) देण्यांत येतो. कांहीं शिक्षक कोणत्याही ट्रेनिंग कॉलेजमध्यें न जातां बोर्ड ऑफ एज्युकेशननें शिक्षकाचें काम करण्यासाठीं ठेवलेली परीक्षा पास होतात. ही परीक्षा प्रथम १८४७ सालीं सुरू करण्यांत आली. ज्यांना ट्रेनिंग कॉलेजमध्यें जाणें शक्य नाहीं अशा विद्यार्थी–शिक्षकास (Pupil-teacher) दाखला (certificate) प्राप्त करून घेण्याची संधी मिळावी याच हेतूनें ती परीक्षा प्रथम सुरू करण्यांत आली. परंतु अशी परीक्षा पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना दाखल्याचे शिक्षक असें संबोधण्यांत आलें तरी त्यांना अतिशय लहान शाळेखेरीज इतर शाळांच्या मुख्याध्यापकाच्या जागीं नेमण्यांत येत नाहीं. तशा तऱ्हेची नेमणूक होण्यासाठीं बोर्डानें मान्य केलेला, निदान एक वर्षाचा तरी, अभ्यासक्रम पुरा करावा लागतो. ‡

‡ T. of T. p. 21.

शिक्षकांना त्या धंद्यास उपयुक्त असें शिक्षण देण्याचे इंग्लंडमध्यें अनेक प्रकार आहेत. पाहिला व अनेक वर्षें रूढ असलेला प्रकार म्हणजे विद्यार्थी-शिक्षकाचा (Pupil Teacher); हा प्रकार १८४६ सालीं जन्माला आला. इंग्लंडमध्यें आज प्राथमिक शिक्षणाप्रमाणें दुय्यम शिक्षणाची पद्धतहि राष्ट्रीय शिक्षणाचें महत्त्वाचें व आवश्यक अंग होऊन बसली आहे. परंतु ही दुय्यम शिक्षणाची पद्धत १९०२ सालापासून अस्तित्वांत येऊन त्यानंतर अगदीं अलीकडे प्रगल्भावस्थेस येऊन पोंचली आहे. ही दुय्यम शिक्षणाची कल्पना जन्माला येण्यापूर्वी प्राथमिक शाळेंतील शिक्षण पुरें झाल्यानंतर भावी शिक्षकाला ट्रेनिंग कालेजमध्यें शिरकाव मिळेपर्यंत म्हणजे सुमारें १३ व्या वर्षापासून ते १८ व्या वर्षापर्यंतचा काळ व्यर्थ जात असे व त्यामुळें त्याच्या शिक्षणांत अतिशय कमतरता राहत असे. ही कमतरता नाहींशी करण्यासाठीं म्हणून १८४६ सालीं छात्रशिक्षकांची पद्धत (Pupil Teachership) जन्माला आली. या योजनेप्रमाणें १३ वर्षांपेक्षां कमी वय नाहीं अशीं मुलें, मुली त्यांच्या प्राथमिक शाळांच्या हेडमास्तरच्या हाताखालीं देऊन त्यांच्या देखरेखीखालीं त्या कालांत शिक्षणशास्त्राचें व सर्वसाधारणपणें इतर ज्ञानप्राप्तीचें शिक्षण पुढें चालविण्याची त्यांना संधि मिळत असे. ट्रेनिंग कॉलेजमध्यें प्रवेश मिळण्यासारखें त्यांचें वय होईपर्यंत अशा तऱ्हेनें त्यांचा अभ्यास चालत असे. अशा तऱ्हेनें प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम पुरा करणाऱ्या विद्यार्थ्यांतून हुषार विद्यार्थी शिक्षक होण्यासाठीं निवडून काढून त्यांना छात्र-शिक्षण-पद्धतीच्या मार्गानें शिक्षकांच्या धंद्यांतील प्रास्ताविक शिक्षण देण्यांत येत असे व नंतर त्यांच्यापैकीं कांहींना ट्रेनिंग कॉलेजमध्यें अधिक उच्च शिक्षण देण्यासाठीं दाखल करून घेण्यांत येत असे. १८४६ नंतर सुमारें ५० वर्षें याच पद्धतीनें ट्रेनिंग कॉलेजांना हुषार पण कष्टाळू विद्यार्थ्यांचा पुरवठा करण्यांत येत असे.

या पद्धतींत एक दोष दिसून आला. या पद्धतीनें शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचें सर्वसाधारण शिक्षण (General Education) अतिशय तुटपुंजा स्वरूपाचें आहे, असें दिसूं लागलें. त्यामुळें हा दोष नाहींसा करण्यासाठीं सन १८७० च्या शिक्षण-कायद्यानें जन्माला आणलेल्या स्कूलबोर्डांनीं या विद्यार्थी-शिक्षकांसाठीं स्वतंत्र मध्यवर्ती वर्ग (central classes) शहरांत काढून त्या ठिकाणीं त्यांना सर्वसाधारण शिक्षण अधिक मिळेल अशी तजवीज केली. पुढें याच वर्गांच्या जागीं शिक्षण-केंद्रें (Educational Centres) स्थापन

करण्यांत आलीं. इतकेंच नव्हे तर शिक्षण-खात्यानें विद्यार्थी-शिक्षकाला मान्यता द्यावयाचें वय वाढविण्यास सुरवात केली व विद्यार्थी–शिक्षक या नात्यानें काम करणाऱ्या मुलामुलींना निदान निम्मा काल कोणत्याही तऱ्हेचें विशेष शिक्षण न देतां, त्यांना सर्वसाधारण शिक्षण घेण्याची संधि द्यावी असा नियम केला. १९०२ सालीं शिक्षणखात्यानें विद्यार्थी–शिक्षकाला दुय्यम शिक्षण देण्याविषयीं सूचना केली व हल्लीं हीच सूचना विशेष प्रमाणांत अमलांत आणली जात आहे.

इंग्लंडचे नागरिक (urban) व ग्रामीण (rural) असे दोन भाग समजले जात असून, नागरी भागांत हल्लीं कोणाही मुलाला किंवा मुलीला वयाचीं सोळा वर्षें पुरीं होईपर्यंत, विद्यार्थी–शिक्षक म्हणून मान्यता मिळत नाहीं. सोळा वर्षें पुरीं झाल्यानंतर ट्रेनिंग कॉलेजमध्यें प्रवेश मिळेपर्यंत कमींत कमी दोन वर्षांचा काळ जातो. या दोन वर्षांच्या काळांतील, विद्यार्थी–शिक्षकाचें पहिलें वर्ष साधारण शिक्षणाकरितां उपयोगांत आणण्यांत येतें व दुसरें वर्ष शिक्षण कसें द्यावें या विषयाच्या म्हणजे शिक्षणशास्त्राच्या अध्ययनासाठीं विनियोगिले जातें. याप्रमाणें वयाचीं १७ वर्षें होईपर्यंत भावी शिक्षकाला किंवा शिक्षकिणीला एक वर्ष प्राथमिक व दुय्यम प्रकारचें साधारण शिक्षण व एक वर्ष अध्यापन–शास्त्राचें शिक्षण दिलें जातें.

प्रथम विद्यार्थी–शिक्षकाची पद्धत अमलांत आली त्या वेळीं, विद्यार्थी शिक्षकाला पांच वर्षांचा काल साधारण शिक्षणासाठीं व अध्यापकाचें प्रत्यक्ष ज्ञान संपादनासाठीं खर्च करावा लागे. परंतु शहरांतील शिक्षकासाठीं पांच वर्षांचा अभ्यासक्रम दोन वर्षांवर आला असून, या दोन वर्षांपैकीं एक वर्ष प्राथमिक शिक्षक संपल्यानंतर घेण्यांत येणाऱ्या दुय्यय शिक्षणाच्या अभ्यास-क्रमाच्या कालांतच सामील झालें आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. पूर्वीच्या व हल्लींच्या विद्यार्थी–शिक्षकपद्धतींत फारच थोडें साम्य राहिलें आहे.

परंतु हें झालें शहरासंबंधीं प्रकाराचें वर्णन. खेडुतांच्या भागांतच दुय्यम शिक्षण घेण्याचीं साधनें इतक्या सहजपणानें उपलब्ध नसल्यामुळें, विद्यार्थी-शिक्षकांना शिक्षण देण्याची जी आज पद्धत रूढ आहे, तिचें मूळच्या पद्ध-तीशीं बरेंच साम्य आहे. ग्रामीण भागांत आजहि प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम सुमारें १४ वर्षांपर्यंत पुरा झाल्यानंतर, विद्यार्थी-शिक्षकाला १४ ते १८ वर्षांपर्यंतचा सुमारें चार वर्षांचा काल स्वत: शिकण्यांत व शिकवि-

ण्यांत घालवावा लागतो. अध्यापनाचें हें शिक्षण तो विद्यार्थी ज्या प्राथमिक शाळेंत शिकत असेल त्या शाळेचा हेडमास्तर देतो व कधीं कधीं हें शिक्षण मध्यवर्ति वर्गांतहि देण्यांत येतें.§

वरील विवेचनावरून विद्यार्थी-शिक्षकांना शिक्षण देण्याचे चार प्रकार आहेत १. ग्रामीण विद्यार्थी-शिक्षक. यांचें शिक्षण पूर्वीच्या पद्धतीनेंच होत असतें. २. स्वतंत्र संस्था किंवा केंद्रें यांत वयाच्या १४ व्या वर्षापासून १६ व्या वर्षांपर्यंत शिक्षण घेणारे विद्यार्थी–शिक्षक. ३. प्राथमिक शाळेशीं संलग्न असलेल्या वर्गांतून शिक्षण घेणारे विद्यार्थी-शिक्षक. यांचें अशा वर्गांतून वय १६ ते १८ च्या दरम्यानच्या कालांत शिक्षण होत असतें व ४. दुय्यम शिक्षणाच्या शाळांमधून शिक्षण घेणारे विद्यार्थी–शिक्षक.

प्युपील टीचर (Pupil teacher) व स्टुडंट टीचर (Student teacher) हे शब्द एकाच अर्थानें वापरण्यांत येत नाहींत. १९०२ सालापासून दुय्यम शिक्षणाची तरतूद करण्यांत आली. त्यापूर्वी प्राथमिक-शिक्षण पुरें केलें कीं अध्ययन व अध्यापनाचें कार्य करणारा, प्यूपिल टीचर या सदरांत पडत असे. परंतु हलके हलके एकाच वेळीं अध्ययन व अध्यापन करणें योग्य नाहीं असें वाटूं लागल्यामुळें, साधारण शिक्षण पुरें झाल्यावांचून अध्यापनाचें कार्य विद्यार्थ्याला सांगू नये असें मत प्रभावी बनूं लागलें व त्याचप्रमाणें १९०७ सालीं दुय्यम शाळांमध्यें शिक्षण घेणाऱ्या पण पुढें शिक्षकाच्या धंद्यांत पडूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना, दुय्यम शाळेंतच अधिक शिक्षणासाठीं जादा एक वर्ष राहाण्यासाठीं मदत करण्याचें धोरण आखण्यांत आलें. अशा विद्यार्थ्याला 'बुरसार' असें म्हणत. जादा एक वर्षाचा दुय्यम शाळेंतील शिक्षणक्रम पुरा झाल्यानंतर 'बुरसार' ट्रेनिंग कॉलेजमध्यें एकदम जाई किंवा ट्रेनिंग कॉलेजमध्यें शिरण्यापूर्वी एक वर्ष योग्य देखरेखीखालीं प्राथमिक शाळेंत शिकविण्याचें व मधून मधून दुय्यम शिक्षणाच्या शाळेंत जाऊन आपलें पुढील शिकण्याचें कार्य करी. याप्रमाणें अंशतः शिकविण्याचें कार्य करणाऱ्या बुरसारला (Student teacher) असें म्हणत. हल्लीं पूर्वीच्या अर्थानें बुरसारची पद्धत अमलांत नसली तरी त्या पद्धतीनें 'प्रत्येक प्राथमिक शाळेंतील शिक्षकाचा दुय्यम शाळेंतील अभ्यासक्रम पुरा होणें अत्यंत जरूर आहे व शिक्षणशास्त्राच्या अभ्यासास

§ T. of T. P. 13.

व प्रात्यक्षिकास (Practice) सुरवात होण्यापूर्वी दुय्यम शाळेंतील अभ्यास पूर्ण होणें अगत्याचें आहे' हें सप्रमाण शाबीत केलें आहे.

ट्रेनिंग कॉलेजच्या दारापर्यंत येण्यास तीन मार्ग आहेत—(१) आपलें प्राथमिक शिक्षण पुरें करून मुलगा किंवा मुलगी वयाच्या ११ किंवा १२ व्या वर्षी दुय्यम शाळेंत जाऊन, तेथें १७ किंवा १८ वर्षांपर्यंत राहाते. अशा मुलांनुलींपैकीं, कांहीं वयाच्या १७ व्या वर्षी Student teacher होऊन तें काम एक वर्ष करतात. (२) कांहीं मुलें किंवा मुली वयाच्या १६ व्या वर्षींच प्यूपिल टीचर होतात व मग पुढील दोन वर्षें दुयम शाळेंत किंवा प्यूपिल टीचरच्या केंद्रांत, अध्यापनाचा सराव होण्यासाठीं, अध्यापन व अध्ययन करतात. (३) ग्रामीण भागांतील भावी शिक्षक वयाच्या १४ व्या वर्षापासून १८ व्या वर्षापर्यंतचा काल विशेषत: प्राथमिक शाळेच्या हेडमास्तरच्या देखरेखीखालीं अध्यापनकलेचें तंत्र व प्रत्यक्ष अनुभव घेण्यांत घालवितो.

याप्रमाणें वयाच्या सुमारें १८ वर्षापर्यंत ही भावी शिक्षकांची आपल्या धंद्यासंबंधीं पूर्वतयारी होते. ही पूर्वतयारी संपल्यानंतर वयाच्या १८ व्या वर्षापासून पुन्हा अनेक मार्ग फुटतात. पूर्वतयारी संपल्यानंतर बहुतेक मुलेंमुली शाळेंतील प्रथम परीक्षा (First school examination) पास होतात. ही परीक्षा पास झाल्यानंतर, उमेदवार दाखला मिळविण्यासाठीं कॉलेजमध्यें प्रवेश मिळण्यास पात्र समजले जातात. जे कॉलेजमध्यें एकदम जात नाहींत त्यांना विनदाखल्याचा शिक्षक (Uncertified teacher) म्हणून शिक्षणखातें मान्यता देतें. ट्रेनिंगकॉलेजमध्यें ज्या वेळेला अतिशय गर्दी झालेली असते त्या वेळीं अनेक विद्यार्थ्यांना विनदाखल्याचा शिक्षक बनून प्रत्यक्ष उद्योगास सुरुवात करावी लागते. पुढें कधीं संधी मिळाली तर हे शिक्षकहि ट्रेनिंगकॉलेजमध्यें जाऊन दाखल्याची परीक्षा पास होतात व पुष्कळ ट्रेनिंगकॉलेजमध्यें न शिरतांच विनदाखल्याचे शिक्षक म्हणूनच आमरण रहातात. यांपैकीं कांहीं लोक शिक्षकखात्याची ऑक्टिंग (चालू) शिक्षकासाठीं असलेली परीक्षा पास होतात. या परीक्षेचा मागें उल्लेख केला आहेच.

जे विद्यार्थी ट्रेनिंगकॉलेजमध्यें प्रवेश मिळविण्याइतके सुदैवी असतात, त्यांच्या दृष्टीनें आतां ट्रेनिंगकॉलेजच्या स्थितीविषयीं विचार करूं. शिक्षणक्रमास लागणाऱ्या कालाच्या दृष्टीनें विचार केला तर ट्रेनिंगकॉलेजची दोन गटांत विभागणी करतां येते. दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाचीं कॉलेजें व चार

वर्षांच्या अभ्यासक्रमाचीं कॉलेजें. हीं चार वर्षांच्या अभ्यासक्रमाचीं कॉलेजें स्वतंत्र नसतात. तर तीं निरनिराळ्या विश्वविद्यालयाची अध्यापनकला शिकविण्याचीं स्वतंत्र खातीं (University training department) असतात.

द्विवर्ष-शिक्षण-विद्यालयें:—इंग्लंडमधील शिक्षकांच्या शिक्षणाची जी पद्धत अस्तित्वांत आहे त्या पद्धतीचा, द्विवर्ष-शिक्षण-विद्यालयें, हीं वैशिष्ट्य-दर्शक भाग आहेत असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. यांपैकीं कांहीं विद्यालयें सुमारें एक शतकापूर्वीं स्थापन झालेलीं आहेत. या विद्यालयांचे तीन प्रकार आहेत. कांहीं विद्यालयें खाजगी संस्थांचीं म्हणजे निरनिराळ्या धर्म-पंथांमार्फत चाललेलीं आहेत. कांहीं स्थानिक संस्थांमार्फत चाललेलीं असून, इक्स्टर, करिंगहॅम, रीडिंग व साउथहॅम्प्टन येथील विद्यालयें विश्वविद्यालयांच्या नेतृत्वाखालीं चाललेलीं आहेत. यांपैकीं धर्मपंथांमार्फत चाललेल्या विद्यालयां-तील विद्यार्थ्यांना वसतिगृहांतच रहावें लागतें व त्यांत शिरकाव मिळणारा विद्यार्थी त्या त्या धर्मपंथाचा असावा लागतो. स्थानिक संस्थांमार्फत जीं विद्यालयें चालविण्यांत येतात त्यांत धर्माची कांहीं गुंतागुंत नसून, त्यांतील कांहीं विद्यालयाना वसतिगृहें जोडलीं आहेत व कांहींना नाहींत. विश्व-विद्यालयामार्फत चाललेल्या विद्यालयांना वसतिगृहें नसून, आजूबाजूच्या प्रदेशां-तील विद्यार्थी या संस्थांत शिक्षण घेण्यासाठीं रोज येऊन रोज घरीं जातात. हे किरकोळ फरक वगळले तर या सर्व संस्थांतून एकप्रकारचें शिक्षण दिलें जातें, असें ठोकळमानानें म्हणतां येईल.

विश्वविद्यालयांचीं शिक्षणखातीं:—विश्वविद्यालयामार्फत प्राथमिक शाळें-तील शिक्षकाला शिक्षकाच्या धंद्याचें शिक्षण दिलें जातें. अभ्यासक्रम एकंदर चार वर्षांचा असतो. त्यांपैकीं पहिलीं तीन वर्षें पदवी मिळविण्याच्या दृष्टीनें सर्वसाधारण शिक्षण दिलें जातें व पदवी मिळाल्यानंतर एक वर्ष प्रत्यक्ष अध्यापनकलेचें शिक्षण दिलें जातें. विश्वविद्यालयांनीं प्राथमिक शिक्षकांच्या शिक्षणकार्यांत लक्ष घालण्यास १८९० सालीं प्रथम सुरवात केली व या उपक्रमामुळें इंग्लंडमधील प्राथमिक शिक्षकांची कार्यक्षमता सुधारण्यास फार मदत झाली आहे यांत शंका नाहीं.

हस्तव्यवसाय व घरगुती विषयांचे शिक्षक:—वर जी माहिती दिली आहे ती इतर शिक्षकांच्या शिक्षणाविषयीं. इंग्लंडमध्यें हस्तव्यवसाय (Hands craft) व घरगुती विषयांचे (Domestic subjects) विशेष तज्ज्ञ अशा

शिक्षकांचा एक स्वतंत्र वर्ग असून त्यांच्या शिक्षणासाठीं स्वतंत्र विद्यालयें आहेत.

दोषदर्शन व उपाययोजना:—इंग्लंडमधील पद्धतीचें विस्तारानें अवलोकन केल्यानंतर व त्या पद्धतीची व आपल्याकडील परिस्थितीची तुलना केल्यानंतर, कोणते ठळक दोष दिसतात ते पाहूं व त्यांवर उपाययोजना काय करावी याचीहि शक्य तो चर्चा करूं.

१ पहिला महत्त्वाचा दोष म्हणजे, ज्यांचें सर्वसाधारण शिक्षण तुटपुंजें आहे व ज्यांची अध्यापनशास्त्राशीं मुळीं तोंडओळखहि नाहीं, अशा लोकांवर मुलांना शिकविण्याची आम्ही जबाबदारी टाकली आहे, हा होय. नमुनेदार शिक्षकाच्या अंगीं दोन गुण मुख्यतः असणें जरूर आहे. एक त्याच्याजवळ मुलांना शिकवितां येण्यासारखें ज्ञानभांडार पाहिजे व दुसरें, आपलें ज्ञान बाल-बुद्धीला सहज समजेल अशा तऱ्हेनें शिकविण्याची कला त्याला अवगत असली पाहिजे. या दोन्ही गोष्टी ज्याच्याजवळ नाहींत त्याला शिक्षकाचा धंदा साधणें शक्य नाहीं. त्यांतल्यात्यांत सर्वांत लहान मुलांना—ज्यांची चौकसबुद्धि नुक-तीच जागृत होऊं लागली आहे अशा मुलांना-शिकविणें तर विशेष अवघड; परंतु आमच्या प्राथमिक शाळांची पहाणी केली तर अनेक ठिकाणीं लहान मुलें नुकत्याच व्ह. फा. परीक्षा पास होऊन आलेल्या मुलांच्या ताब्यांत दिलेलीं दिसून येतात. या व्ह. फा. शिक्षकाचें स्वतांचें ज्ञानच अतिशय कमी दर्जाचें असतें, असा आमचा अनुभव आहे. पुणें जिल्हा स्कूल बोर्डांत असतांना कोणाहि शिक्षकाची गांठ पडली कीं त्याला स्वतांलाच काय येतें हें पहाण्या-साठीं, त्याला कांहीं प्रश्न विचारण्याचा लेखकाचा परिपाठ असे. त्या प्रश्नाला जीं उत्तरें मिळत तीं उत्तरें ऐकून त्या शिक्षकाच्या तुटपुंज्या ज्ञानाविषयीं कींव वाटून अशा शिक्षकांच्या ताब्यांत दिलेलीं मुलें शिकलीं तर आश्चर्यच असें हमखास वाटूं लागे.

प्राथमिक शिक्षणाचे सरकारनें १९२५ सालीं जे नियम केले आहेत, त्याप्रमाणें शिक्षकाच्या नोकरीस किमान लायकी म्हणून व्ह. फा. परीक्षा ठेवली आहे. एखाद्या स्थानिक संस्थेस व्ह. फा. पास झालेल्या लोकांचा तुटवडा पडला तर आपद्धर्म म्हणून ही परीक्षा पास न झालेला इसमहि शिक्षक म्हणून नोकरीस ठेवण्याची पळवाट ठेवली आहेच. अशा शिक्षकास बिगरलायक (unqualified) शिक्षक असें संबोधण्यांत येतें. एकंदर शिक्षकांच्या

संख्येच्या शेकडा ५ प्रमाणाइतके पुरुष व शेंकडा १५ पर्यंत स्त्रिया बिगरलायक शिक्षक म्हणून नेमण्याचा अधिकार स्थानिक संस्थांना देण्यांत आला आहे. वर दिलेल्या प्रमाणापेक्षां अधिक बिगरलायक शिक्षक नेमावयाचे झाल्यास सरकारची खास परवानगी घ्यावी लागते.†

एकंदर शिक्षकांत शिक्षित-शिक्षकांचें प्रमाण शेंकडा ५० किंवा सरकार वेळोवेळीं ठरवील तितकें असणें नियमाप्रमाणें जरूर आहे. तसेंच एकंदर शिक्षकांपैकीं शेंकडा १५ पेक्षां कमी नाहीं व शेंकडा ३० पेक्षां अधिक नाहीं इतके शिक्षक दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षाची परीक्षा पास झालेले असणें जरूर आहे.§

या नियमाप्रमाणें निरनिराळ्या शैक्षणिक लायकीचे स्त्री-पुरुष शिक्षक १९३५–३६ सालीं मुंबई प्रांताच्या निरनिराळ्या भागांत किती होते, हें पुढील तक्त्यांत दाखविलें आहे. या तक्त्यांत सिंधसह सर्व मुंबई इलाख्याचे आकडे दिले आहेत. तो तक्ता पहाणाराला मुंबई प्रांतांतील निरनिराळ्या भागांत काय स्थिति आहे याची कल्पना येणार नाहीं. म्हणून निरनिराळ्या भागाबद्दल विशेष माहिती खालीं दिली आहे.

एकंदर पुरुष–शिक्षकांत शिक्षित शिक्षकांचें शेंकडा प्रमाण मुंबई भागांत ५५·५, मध्यभागांत ५१·५, उत्तर भागांत ५१·५, दक्षिण भागांत ६०·७ व सिंधमध्यें ५९·३ इतकें आहे. शिक्षित स्त्री-शिक्षकांचे निरनिराळ्या भागांतील शेंकडा प्रमाण मुंबई भागांत ४७·८, मध्यभागांत ५०·९, उत्तर भागांत ६५·२, दक्षिण भागांत ५९·९ व सिंधमध्यें ४७·९ इतकें आहे.

---

† नि. ५४ (१) § नि. ५८.

तक्ता नं० ३१

		शिक्षित				बिगर-शिक्षित			एकंदर सर्व शिक्षक
		तिसरें वर्ष	दुसरें वर्ष	पहिलें वर्ष	एकंदर	लायक	बिगर-लायक	एकंदर	
मुंबई इलाखा सिंधसह	पु. शिक्षक	२६७९	४४६५	८३२२	१५४६६	१२१५९	६४६	१२८०५	२८२७१
	शें. प्र.	९·५	१५·८	२९·४	५४·७	४३·०	२·३	४५·३	१००
	स्त्री शिक्षक	७०७	६२५	९८३	२३१५	१४५८	४८७	१९४५	४२६०
	शें. प्र.	१६·६	१४·६	२३·१	५४·३	३४·२	११·५	४५·७	१००

या तक्त्यावरून स्त्री-पुरुष शिक्षकांच्या एकंदर ३२५३१संख्येमध्यें शिक्षित शिक्षक १७७८१ म्हणजे शेंकडा ५४·७ इतके होते. विगरशिक्षित(व्ह.फा.) स्त्री-पुरुष शिक्षकांत किमान लायकीची परीक्षा पास न होतां शिक्षकाचें काम करणारे शिक्षकहि बरेच दिसून येतात. त्यांचा स्वतंत्रपणें विचार केला नाहीं तर विगरशिक्षित शिक्षणकांचें शेंकडा प्रमाण ४५·३ इतकें पडतें. या सर्व शिक्षकांचें स्वतःचें शिक्षणच अपुरें झालेलें असल्यामुळें व त्यांना नोकरीस लागण्यापूर्वी शिकविण्याच्या कलेचें मुळींच कांहीं शिक्षण दिलेलें नसल्यामुळें, त्यांच्या हाताखालीं शिकणाऱ्या बालजीवांची शिक्षणाच्या कामीं कशी कुचंबणा होत असेल याची वाचकांनींच कल्पना करावी !

इंग्लंडमध्यें प्रत्येक शिक्षकाला ट्रेनिंग कॉलेजमध्यें जाऊन दाखला जरी मिळवितां आला नाहीं तरी कोणाहि स्त्री-पुरुषाला कांहीं वर्षें शिक्षणशास्त्राचें विशेष शिक्षण घेतल्याशिवांचून शिक्षक म्हणून मान्यता मिळत नाहीं. आमच्याकडे अर्धवट शिकलेल्या माणसाच्या हातांत अध्यापनाचें कार्य देण्यांत आल्यामुळें टिकाऊ साक्षरता पैदा होण्याच्या मार्गांत अडचणी उत्पन्न होत असून, अध्यापकालाच स्वतांचा विषय योग्य प्रकारें शिकविता न आल्यामुळें हजारों मुलांना, त्यांचा कांहीं दोष नसतांहि, नापास व्हावें लागतें व अनेक वर्षें एकाच वर्गांत घालवावीं लागतात. त्यामुळें त्यांच्या महत्त्वाच्या आयुष्याचा व पैशाचा व्यर्थ व्यय होतो. अडाणी सुतार, गवंडी कामावर लावल्यानंतर मालमसाल्याची व्यर्थ खराबी होऊन इमलाहि वेढब व धोक्याचा झाल्यास कसलें आश्चर्य ? सुंदर व टिकाऊ विद्यामंदिरें उभारण्याची महत्त्वाकांक्षा धरण्यापूर्वी कसबी व खरे कलावंत कारागीर प्रथम निर्माण करणें जरूर आहे.

हा दोष नाहींसा करण्यासाठीं शक्य तितक्या लवकर उपाय करणें अत्यंत जरूर आहे. आमच्या मतें सरकारनें खालील गोष्टी करणें इष्ट आहे.

(अ) व्ह. फा. परीक्षा पास न होतां शिक्षक म्हणून नेमण्याची, अल्प प्रमाणांत का असेना जी सवलत आहे ती काढून घेण्यात यावी. स्त्रियांच्या बाबतींत ही सवलत कदाचित् कांहीं दिवस ठेवावी लागली तरी किमान परीक्षा पास न होणाऱ्या स्त्रिया अध्यापिका म्हणून नेमण्यापूर्वी निदान दोन वर्षें एखाद्या मोठ्या शाळेस जोडून त्या ठिकाणीं चांगल्या हेडमास्तरच्या देख-रेखीखालीं तिच्या सर्वसाधारण ज्ञानांत भर टाकील असें व शिक्षणशास्त्राचें शिक्षण तिला देण्यांत यावें.

(ब) व्ह. फा. परीक्षा पास झाला कीं तो शिक्षकाच्या कामास लायक (qualified) अशी जी हल्लीं प्रथा आहे ती बंद करण्यांत यावी. सहाव्या इयत्तेची परीक्षा पास झाल्यानंतर ज्यांना शिक्षकाच्या धंद्यांत पडावयाचें असेल त्यांनीं शाळेच्या मुख्यास तसें कळवावें व अशा भावी शिक्षकांचा सातव्या इयत्तेमध्यें तसा वर्ग करण्यांत यावा व त्यांना शिक्षकाच्या धंद्यांत उपयोगीं पडेल अशा तऱ्हेचें सातव्या इयतेंत शिक्षण देण्याची तरतूद करावी. भावी शिक्षकांच्या सातव्या इयत्तेची, वाटल्यास कांहीं थोडा निराळा अभ्यासक्रम ठेवून, स्वतंत्र परीक्षा घ्यावी. सातव्या इयत्तेस शिक्षणपद्धति हा विषय अभ्यासास घेण्याचा विकल्प (option) ठेवल्यास याप्रमाणें व्यवस्था करणें सोपें होईल.

भावी शिक्षकांची सातवीची परीक्षा झाल्यानंतर सुमारें दोन, तीन किंवा चार वर्षांचा अभ्यासक्रम आखून त्याप्रमाणें त्यांच्या खास शिक्षणाची सोय करण्यांत यावी. हल्लीं ५ वें वर्ष पुरें झाल्यानंतर मुलगा किंवा मुलगी शाळेंत दाखल करून घेतां येते. दर वर्षीं परीक्षा बिनचूक पास होणारा विद्यार्थी १३ व्या वर्षीं व्ह. फा. ची परीक्षा पास होतो. परंतु इतक्या कोवळ्या वयांत त्याच्यावर शिक्षकाची जबाबदारी टाकतां येणें शक्य नसतें. प्रा. शि. नि. ५५ प्रमाणें कोणाहि उमेदवाराचें १६ पेक्षां अधिक व २५ पेक्षां कमी वय असल्याखेरीज त्याची कायम जागेवर नेमणूक करतां येत नाहीं. नियम नं. ५६ प्रमाणें हंगामी नेमलेल्या कोणत्याहि शिक्षकास तीन वर्षांपेक्षां अधिक काल हंगामी जागेवर ठेवतां येत नाहीं. या दोन्ही नियमांचा अर्थ असा कीं, एखाद्या शिक्षकास १३ वर्षें पुरीं झाल्यानंतर हंगामी म्हणून नोकरीस लावून तीन वर्षें पुरीं झाल्यानंतर म्हणजे त्याला वयाचीं १६ वर्षें संपल्यानंतर कायम म्हणून नेमतां येईल.

आमच्या मतें १३ व्या वर्षीं शिक्षक म्हणून नेमण्याची जी ही हल्लींची सवलत आहे ती बंद करण्यांत येणें जरूर आहे. वयाचीं निदान १८ वर्षें त्यानें हंगामी म्हणून नोकरी केल्यानंतर २१ वर्षांची उमर पुरी झाल्यानंतर त्याला, तो प्रत्यक्ष अनुभवानें लायक ठरला, तर कायम करण्यांत यावें. साधारणपणें १८ वें वर्ष पुरें झाल्यानंतर मनुष्याच्या बुद्धींतील अल्हडपणा नाहींसा होऊन त्याच्या बुद्धीला थोडासा पोंच व समतोलपणा येऊं लागतो. कायद्याच्या भाषेंत बोलावयाचें म्हटलें तर १८ वें वर्ष पुरें झाल्यानंतर तो

सज्ञान होतो. तो सज्ञान होण्यापूर्वी त्याच्यावर शिक्षकाची पूर्ण जबाबदारी टाकणें म्हणजे शिक्षणाचें महत्त्व व गांभीर्य न ओळखण्यासारखें आहे.

साधारणपणें दर वर्षी पास होणारा विद्यार्थी १३ व्या वर्षी व्ह. फा. ची परीक्षा पास होईल, हें आपण पाहिलें आहेच. आम्हीं वर केलेली सूचना वाचल्यानंतर १३ ते १८ वर्षेंपर्यंतचा पांच वर्षांचा काल भावी शिक्षकानें कसा घालवावयाचा, असा प्रश्न वाचकांच्या मनांत साहजिकपणें उभा राहील. इंग्लंडमध्येंहि १३ व्या वर्षी प्राथमिक शाळेंतील अभ्यासक्रम पुरा झाल्यानंतर ट्रेनिंग कॉलेजमध्यें प्रवेश मिळण्यासाठीं लागणारें १८ वें वर्ष पुरें होईपर्यंतचा काल कसा घालवावयाचा हा प्रश्न उपस्थित झाला होता व या प्रश्नाचा कांहींसा उलगडा करण्यासाठीं १८४६ सालीं छात्र-शिक्षक (pupil Teacher) ही पद्धत जन्माला आली, हें आपण पाहिलें आहेच. या पद्धतीप्रमाणें १३ ते १८ वयाच्या दरम्यानच्या विद्यार्थ्यांना, एकाद्या लायक मुख्य शिक्षकाच्या देखरेखी-खालीं ठेवून त्यांना, सर्वसाधारण शिक्षण व प्रत्यक्ष अध्यापनशास्त्राचें शिक्षण देण्याची तजवीज करण्यांत आली व पुढें १८७० सालीं अशा विद्यार्थ्यांसाठीं स्वतंत्र वर्ग व केंद्रें सुरू करण्यांत आलीं. आपल्याकडेहि अशाच प्रकारची व्यवस्था करतां येणें शक्य आहे. हल्लींच्या नियमांत तशी थोडी तरतूदहि करण्यांत आली आहे.

प्रा. शि. नियम ६० मध्यें (Student teacher) चा उल्लेख केला आहे. या नियमाप्रमाणें व्ह. फा. किंवा शिक्षकाच्या धंद्यास लायकी देणारी दुसरी एखादी परीक्षा पास झालेल्या उमेदवारास शिक्षक म्हणून शिक्षण देण्याच्या इराद्यानें नेमून खास निवडलेल्या हेडमास्तरच्या देखरेखीखालीं एखाद्या शाळेस त्याला जोडण्याचा स्थानिक संस्थांस अधिकार आहे. अशा तऱ्हेनें नेमलेल्या विद्यार्थ्यांस दररोज चार तास त्या शाळेंत हजर रहावें लागतें व या चार तासांपैकीं दोन तास अध्यापनकलेचें शिक्षण घेण्यांत खर्च करावे लागतात.

अशा तऱ्हेची नेमणूक साधारणपणें एक वर्षासाठीं करावी लागते. परंतु ही मुदत दोन वर्षांपर्यंत वाढवितां येते. या छात्रशिक्षकांना (Student teacher) काय वेतन द्यावयाचें हें स्थानिक संस्था ठरविते. ही अशी केलेली नोकरी हंगामी स्वरूपाची म्हणून समजण्यांत येऊन रजा, पेन्शन किंवा बदली-साठीं ती जमेंत धरली जात नाहीं.

या नियमांत थोडा फरक करून आम्ही वर केलेली सूचना अमलांत आणणें कठीण नाहीं. कमींत कमी दोन वर्षें व जास्तींत जास्त चार वर्षांपर्यंत ही (Student teacherShip) छात्रशिक्षकीची मुदत नियमानें मुक्रर करण्यांत यावी व शिक्षक म्हणून नेमणुकीस व्ह. फा. परीक्षेप्रमाणेंच वर सुचविल्याप्रमाणें छात्रशिक्षक म्हणून घेतलेले शिक्षण आवश्यक असें ठरविण्यांत यावें, म्हणजे चांगल्या दर्जाचे शिक्षक मिळणें सुलभ होईल.

व्ह. फा. परीक्षा पास झालेल्या इसमास प्रत्यक्ष शिकविण्याचा कांहीं दिवसांचा अनुभव असल्यावांचून व अध्यापनशास्त्राशीं त्याचा अल्पसा परिचय झाल्यावांचून तो शिक्षक म्हणून गणला जाऊं नये. हें तत्त्व चंदावरकर कमिटीनें व हेस्केथ कमिटीनें मान्य केलें आहे. चंदावरकर कमिटीनें "शिक्षकाची नोकरी मागण्यास आलेल्या उमेदवारास सहा महिनेपर्यंत लायक हेडमास्तरच्या देखरेखीखालीं मोठ्या शाळेंत ठेवावा व जरूर तर त्याला वेतनही (Stipend) द्यावें. कांहीं वेळ त्यानें चांगल्या शिक्षकाच्या शिकविण्याच्या पद्धतीचें निरीक्षण करावें व कांहीं वेळ स्वतः योग्य देखरेखीखालीं शिकविण्यांत खर्च करावा. त्याला कांहीं (Academic and theoretical) शिक्षण देण्यांत यावें. याप्रमाणें सहा महिन्यांचा अभ्यासक्रम यशस्वीपणें पुरा केल्यावांचून अशा उमेदवारास लायक शिक्षकाचा पगार घेण्याची लायकी प्राप्त झाली असें समजूं नये," अशी शिफारस पान ४७ वर केली आहे. हेस्केथ कमिटीनें याप्रमाणें प्रत्यक्ष शिक्षणाची कालमर्यादा कमींत कमी सहा ते आठ आठवडे सुचविली आहे; (पान ३६). चंदावरकर कमिटीनें सुचविलेली सहा महिन्यांची मुदत हेस्केथ कमिटीनें सहा आठवड्यांवर काय आधारावर आणली याची कारणें दिलीं नाहींत.

आमच्या मतें या दोन्हीं सूचना अपुऱ्या व असमाधानकारक आहेत. १३ व्या वर्षीं व्ह. फा. परीक्षा पास झालेल्या व शिक्षकाच्या धंद्यांत पडूं इच्छिणाऱ्या उमेदवाराला १३ व्या वर्षापासून नोकरी लागेपर्यंत म्हणजे १८ व्या वर्षापर्यंत अंखडितपणें शिक्षण देण्याची तजवीज करणें जरूर आहे व त्या दृष्टीनें आम्हीं वरील सूचना केल्या आहेत.

छात्रशिक्षकांना शिक्षण देण्यासारखे कांहीं लायक हेडमास्तर मुद्दाम निवडून काढावेत व त्यांच्या हाताखालीं असे छात्रशिक्षक देण्यांत यावे. त्याचप्रमाणें त्यांना शिक्षण देण्यासाठीं खास वर्ग (central classes) प्रत्येक

तालुक्यांत सुरू करण्यांत यावे. या वर्गावर अध्यापक वर्ग नेमण्यासाठीं कांहीं खर्च येईल, परंतु तो झालेला खर्च चांगले शिक्षक पैदा झाल्यामुळें, शिक्षणाचा दर्जा वाढून, सत्कारणीं लागला असें होईल. ज्यांची घरची स्थिति अतिशय वाईट आहे व जे होतकरू विद्यार्थी आहेत अशांनाच अल्पसें वेतन देण्यांत यावें. छात्रशिक्षकाला शिक्षकाची नोकरी मिळण्याची शाश्वति असल्यामुळें घरीं बरी स्थिति असलेले विद्यार्थी नोकरीच्या आशेनें पदरखर्चानें शिक्षण घेण्याचाहि संभव आहे व तसें झाल्यास त्यांच्या वेतनाची जी बचत होईल तींतून अध्यापकवर्गासाठीं होणारा खर्च थोडाफार भरून काढतां येणें शक्य आहे.

भावी शिक्षकाचें सर्वसाधारण ज्ञान वाढविणें व त्याला अध्यापनशास्त्र व कला यांचें शिक्षण देणें या दोन गोष्टी साध्य करण्यासाठीं छात्राशिक्षकीच्या कालाचा उपयोग करावयाचा असतो. त्यांना या दोन गोष्टी साध्य होण्यासाठीं चांगल्या हेडमास्तरच्या देखरेखीखालीं एखाद्या प्राथमिक शाळेस जोडणें किंवा शिक्षकांच्या शिक्षणाचे वर्ग किंवा केंद्रें काढून त्या ठिकाणीं त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करणें, हे दोन मार्ग आम्हीं सुचविले आहेत. याचे जोडीला तिसराहि एक मार्ग आपणांस इंग्लंडच्या उदाहरणावरून आखतां येण्यासारखा आहे. हल्लीं मराठी चवथी इयत्तेपर्यंत शिक्षण झाल्यानंतर कांहीं विद्यार्थी व्ह. फा. परीक्षेची तयारी करण्याच्या इराद्यानें मराठी पांचव्या इयत्तेंत जातात. त्यांना दुय्यम भाषा म्हणून इंग्रजी शिकविण्यांत येत नाहीं. नंतर सहाव्या व सातव्या इयत्तेंत त्यांना दुसरे कांहीं भूमिति, जमाखर्च वगैरेसारखे विषय शिकविण्यांत येतात. याच्या उलट, कांहीं विद्यार्थी इंग्रजी शिक्षणासाठीं इंग्रजी शाळेंत जातात व त्यांना तिकडे निराळा अभ्यासक्रम पत्करावा लागतो. या पद्धतीच्या ऐवजीं इंग्रजी भाषा सोडून बाकीच्या विषयांबद्दल व्ह.फा.पर्यंतचा अभ्यासक्रम व इंग्रजी शाळेंतील तिसरीपर्यंतचा अभ्यासक्रम एकच असावा व इंग्रजी चवथीपासून मॅट्रिक्युलेशनपर्यंतचा इंग्रजीखेरीज बाकीच्या विषयांचा अभ्यासक्रम मराठी सातवीच्या अभ्यासक्रमापेक्षां चढत्या पायरीचा असावा; असें झाल्यास प्राथमिक शाळांतील भावी शिक्षकांस १३ व्या वर्षीं व्ह. फा.ची परीक्षा पास झाल्यानंतर आपलें ज्ञान वाढविण्यासाठीं हायस्कूलमध्यें सुमारें १७ व्या वर्षापर्यंत राहतां येईल. त्या ठिकाणीं १७ व्या वर्षापर्यंत राहिल्यानतर इंग्रजी शिकणें, न शिकणें त्यांच्या इच्छेवर सोपविण्यांत यावें. १७ व्या वर्षीं

त्याची तयारी मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांइतकी इंग्रजी भाषेशिवाय इतर विषयांत होईल व उणीव फक्त अध्यापनशास्त्राच्या ज्ञानाचीच राहील. ही उणीव एक वर्ष म्हणजे १८ वें वर्ष पुरें होईतों अध्यापनकलेचें त्याला खास शिक्षण देण्याची तजवीज करून भरून काढतां येईल.

याप्रमाणें छात्रशिक्षकदशेचा काल संपल्यानंतर शिक्षकाच्या धंद्याची जबाबदारी संभाळण्यास तो कांहींसा समर्थ होईल. पाश्चिमात्य देशांतील शिक्षकाच्या धंद्यासाठीं पूर्वतयारी करण्यासाठीं जी काळजी घेण्यांत येते त्यामुळें तिकडच्या शिक्षणाचा दर्जा वाढला आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. याप्रमाणें पूर्वशिक्षण घेतलेल्या उमेदवारास स्वतंत्र शिक्षक म्हणून नेमण्यांत यावें व त्या नात्यानें निदान दोन वर्षें काम समाधानकारकरीतीनें केल्यानंतर तो ट्रेनिंग कॉलेजमध्यें प्रवेश करण्यास पात्र झाला असें समजण्यांत यावें.

२. दुसरा महत्त्वाचा दोष म्हणजे आमच्याकडील ट्रेनिंग संस्थांनातून मिळणारें शिक्षण अपुरें व असमाधानकारक आहे हा होय.$ इंग्लंडमध्यें भावी शिक्षकाचें, तात्त्विक व प्रत्यक्ष अनुभव (theory & practice) यांचें मिळणारें शिक्षण सुमारें वयाच्या १८ व्या वर्षापर्यंत झाल्यानंतर मग कांहीं दिवस शिक्षक म्हणून तो प्रत्यक्ष काम करतो व त्यानंतर ट्रेनिंग कॉलेजमध्यें प्रवेश मिळण्यास पात्र समजला जातो. म्हणजे ट्रेनिंग कॉलेजमध्यें जाईपर्यंत वयाच्या ५ व्या वर्षापासून ते १८ व्या वर्षापर्यंत तो ज्ञानवृद्धीकारक असें शिक्षण अखंडितपणें घेतो. हें शिक्षण याप्रमाणें १२ वर्षें घेतल्यानंतर पुढें ट्रेनिंग कॉलेजमध्यें तो निदान दोन वर्षें प्रत्यक्ष शिक्षणशास्त्राचें अध्ययन करतो. म्हणजे एकंदर १४ वर्षें अध्ययन केल्यानंतर तो खरा शिक्षक समजला जातो. अमेरिकेंतहि १२ वर्षांचा अभ्यासक्रम झाल्यानंतर दोन वर्षांचा अध्यापनशास्त्राचा प्रत्येक शिक्षकाला अभ्यास करावा लागतो *

आपल्याकडे व्ह. फा परीक्षा पास होण्यासाठीं लागणारा ८ वर्षांचा अभ्यास केल्यावर लागलीच ट्रेनिंग कॉलेजमध्यें जाण्याची पात्रता प्राप्त होते

$ If the quality of the candidates applying for selection for training is low, so also is the quality of the training. In most provinces, the period of training is too short, the cirriculum is narrow and the teaching staff is inadequately qualified.

Hartog Committee Rpet., p. 76.

* O. R. No 11, p. 6.

व त्या टिकाणीं जास्तींत जास्त तीन वर्षें अभ्यास करतां येतो. म्हणजे ११ वर्षांच्या अभ्यासाच्या शेवटीं त्याला शिकण्यासारखें कांहीं न राहतां तो शिक्षण-क्रमाच्या दुसऱ्या टोकाला जाऊन पोहचतो. वास्तविक पहातां व्ह. फा. परीक्षा पास होऊन पुढें तीन वर्षें ट्रेनिंग कॉलेजमध्यें जाणाऱ्या विद्यार्थ्याच्या जोडीचा बालवर्गांतील विद्यार्थी इंग्रजी शिकण्यासाठीं हायस्कूलमध्यें गेला तर तो ११ वर्षांत इंग्रजी ६ वी पर्यंत जाऊन पोहोंचेल. इंग्रजी ६ वी पर्यंत अभ्यासक्रम पुरा झालेल्या विद्यार्थ्याला आज नियमानें प्राथमिक शाळेंत नोकरी देतां येणार नाहीं. कारण प्राथमिक शिक्षण होण्यास व्ह. फा. परीक्षा किंवा मॅट्रिकची परीक्षा अशी वैकल्पिक लायकी ठेवण्यांत आली आहे.

वरील विवेचनावरून आजच्या ट्रेनिंग कॉलेजमध्यें जो अभ्यासक्रम ठेव-ण्यांत आला आहे, तो इंग्रजी शाळेंत चवथ्या इयत्तेपासून सहाव्या इयत्तेपर्यंत जो शिकविण्यांत येतो त्याच्या तोडीचाच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. ट्रेनिंगमध्यें अध्यापनशास्त्र व कांहीं हस्तव्यवसाय शिकवितात व हाय-स्कूलमध्यें ते शिकवीत नाहींत येवढांच काय तो फरक. या तुलनात्मक दृष्टीनें विचार केल्यानंतर ट्रेनिंग कॉलेजमधील अभ्यासक्रम अतिशय अपुरा व अस-माधानकारक आहे यांत कांहीं शंका नाहीं.

ट्रेनिंग कॉलेजमधील हें मिळणारें अल्पज्ञानहि शेवटीं घातकच ठरतें असा आमचा अनुभव आहे. तिसऱ्या वर्षाचा अभ्यासक्रम पुरा करणारा विद्यार्थी बौद्धिकवाढीच्या दृष्टीनें विचार करतां, इंग्रजी साहाव्या इयत्तेमधील विद्या-र्थ्याच्या तोडीचा असतांहि तो, ट्रेनिंग देणाऱ्या संस्थेला 'कॉलेज' म्हणतात या गोष्टीमुळें व पुढें शिक्षणक्रम खुंटला असें पाहून, 'आपणास आतां शिकण्यासारखें कांहीं राहिलें नाहीं' या घमेंडीच्या विचारानें हुरळून जातो. आमच्या माहितीचे कांहीं तिसऱ्या वर्षांचें शिक्षण घेतलेले शिक्षक 'आम्ही मराठीचे एम. ए. आहोंत' असें अभिमानपूर्वक सांगत असत !

ट्रेनिंग कॉलेजमध्यें मिळणारें शिक्षण वास्तविक अपुरें व असमाधानकारक असतांहि, तें घेणाऱ्या शिक्षकांची स्वतांच्या लायकीविषयीं अशी शेफारलेली भावना होतांच, त्यांच्या वागणुकींतच कांहींसा चमत्कारिकपणा उत्पन्न होतो. आपल्या बोलण्यानें, रहाण्यानें, वागण्यानें व कपड्यालत्त्यानें आपण इतर शिक्षकांपेक्षां कांहींतरी विशेष आहोंत असें तो दाखविण्याचा अहोरात्र प्रयत्न करीत असतो व त्यामुळें 'इतरांपेक्षां कांहीं निराळा दिसणारा किंवा वाग-

णारा हा शिक्षक नक्की शिक्षित (trained) शिक्षक आहे' असा बिनचूक अदमास नुसत्या पहाण्यानेंच करतां येतो. शिक्षणक्रमाला लागणाऱ्या वर्षांच्या दृष्टीनें विचार करतां आमच्याकडील ट्रेनिंग संस्थांना कॉलेज ही संज्ञा न देतां स्कूल किंवा शाळा ही संज्ञा देणेंच योग्य आहे व त्यांपैकीं कांहींना 'कॉलेज' म्हटलें असलें तरी त्यांत मिळणाऱ्या शिक्षणक्रमाच्या मगदुराकडे पहातां त्या संस्था हायस्कूलच्या तोडीच्याच वास्तविकपणें आहेत व असतात. इंग्लंड किंवा अमेरिकेमध्यें आमच्या ट्रेनिंग संस्थांपेक्षां कितीतरी अधिक पटीनें उच्च दर्जाचा अभ्यासक्रम शिकविणाऱ्या संस्थांनाहि अद्याप स्कूल म्हणतात. मग आमच्याकडेच कॉलेज या संज्ञेचा दुरुपयोग कां? या शब्दाच्या दुरुपयोगामुळें त्यांत शिक्षण घेणारे विद्यार्थी पास होतांच, ते स्वतांला मराठीचे एम्. ए. समजूं लागतात व त्यामुळें आणखी पुढें शिक्षणाचें अमर्याद जग आहे हें विसरून जातात. मॅट्रिक पास होणारे कांहीं विद्यार्थी आपणांस कॉलेजमधील उच्च शिक्षण लाभलें नाहीं म्हणून खाजगी रीतीनें पुस्तकें वाचून, आपल्या ज्ञानांत भर टाकण्याचा प्रयत्न करतांना दिसतील; याच्या उलट, ट्रेनिंग कॉलेजमधून बाहेर पडणारा 'अटकेस झेंडा लावला' या गर्वाच्या भावनेनें इतर कसल्याहि पुस्तकाला हात लावतांना दिसत नाहीं. भांडें भरलें आहे, अशी खोटी कां होईना पण एकदां समजूत झाल्यानंतर मनुष्य नळाकडे कां जाईल?

३ तिसरा महत्त्वाचा दोष म्हणजे ट्रेनिंग संस्थांमधून जें शिक्षण दिलें जातें, त्या बाबतींत दाखविता येईल. शिक्षकाचा धंदा करणाऱ्या उमेदवाराला एक ज्ञानवृद्धीकारक सर्वसाधारण शिक्षण व अध्यापनशास्त्राचें शिक्षण अशा दोन प्रकारच्या शिक्षणाची जरूरी असते, हें आपण मागें पाहिलें आहेच. आपल्याकडील ट्रेनिंग संस्थांचा अभ्यासक्रम बारकाईनें पहाणारास या दोन्ही तऱ्हेच्या शिक्षणाची थोडी थोडी प्रत्येक वर्षाला सोय केलेली दिसून येते. इंग्लंडमध्येंहि एका काली भावी शिक्षकाला या दोन्ही प्रकारचे शिक्षण एकसमयावच्छेदेकरून देण्यांत येत असें. परंतु पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें ही पद्धत सदोष आहे असें तिकडे ठरल्यामुळें, प्रथम सर्वसाधारण ज्ञान वाढविणारें शिक्षण देऊनतें पुरें झाल्यानंतर, मग एक वर्षांत अध्यापनकला शिकविण्याची नवीन पद्धत तिकडे सुरु करण्यांत आली आहे. १९०२ पासून दुय्यम शिक्षणाचा, भावी शिक्षणाच्या ज्ञानवर्धनासाठीं, याचमुळें अधिकाधिक उपयोग करण्यांत येत

असतो. काय शिकवावयाचें याची चांगली कल्पना आल्यानंतर तें कसें शिकवावयाचें हें सांगणें फार सोपें असतें. आमच्याकडील ट्रेनिंग संस्थांतून जे शिक्षणशास्त्राशिवाय अंकगणित, भाषा, इतिहास, भूगोल वगैरे विषय शिकविले जातात तेच विषय दुय्यम शाळांमधून शिकविण्यांत येतात. दुय्यम शिक्षणाच्या शाळा. अलीकडे तालुक्याच्या गांवींहि झालेल्या असल्यामुळें, भावी शिक्षकाला इंग्रजी विषय सोडून इतर विषयाचें शिक्षण घेण्याची त्या दुय्यम शाळांतून सोय केली, तर अनेक मुलांना तें सोयीचें व कमी खर्चाचें होईल व मग वेतना-(Stipend) साठीं खर्ची पडणारी रक्कमहि वांचेल, ट्रेनिंग संस्थांचा फक्त अध्यापनकलेचें शिक्षण देण्यासाठीं उपयोग होऊं लागून त्यामुळें हल्लीपेक्षां अधिक मुलांचा समावेश करतां येईल व एकंदरींत हें शिक्षण अधिक सोयीचें व कमी खर्चाचें व अधिक शास्त्रोक्त असें होईल, अशी आमची समजूत आहे.

४. आणखी एक फार महत्त्वाचा दोष या ठिकाणीं दाखविणें जरूर आहे. हिंदुस्थानांतील एकंदर लोकसंख्येपैकीं शेंकडा ८० लोक खेडयांतून राहणारे असून शेतीवर निर्वाह करणारे आहेत. त्यामुळें शहरांतील लोकांस जें शिक्षण दिलें जातें तेंच शिक्षण खेडूतांस देणें कसें चूक आहे व खेडूतांसाठीं अभ्यासक्रम कसा असावा, हें आम्ही विस्तृतपणें 'अभ्यासक्रम व क्रमिक पुस्तकें' या प्रकरणांत दाखविलें आहे. येथें येवढेंच म्हणावयाचें कीं, शिक्षकाला शिक्षण देतांनाही तो शहरांत काम करणारा आहे कां खेडयांतील शाळेंत काम करणारा आहे, याचा विचार करून या दोन भिन्न क्षेत्रांत, भिन्न परिस्थितींत आजीव काम करणाऱ्या शिक्षकांना त्यांच्या कार्यक्षेत्रास शोभेसें शिक्षण देणें जरूर आहे व या दृष्टीनें भिन्न भिन्न अभ्यासक्रमाची आंखणी करून त्याप्रमाणें शिक्षण देण्याच्या ट्रेनिंग संस्थाहि अस्तित्वांत येणें जरूर आहे.

ट्रेनिंग संस्थेचा शिक्षण देण्यांत काय हेतु असतो ? शिक्षकाचा धंदा करतांना ज्या परिस्थितींत आयुष्य काढावें लागेल त्या परिस्थितीशीं समरस होऊन व त्या परिस्थितीमुळें ज्या अडीअडचणी उत्पन्न होतील त्यांच्यावर मात करून, शिक्षणदानाचें कार्य निरलसपणें करण्यास त्या संस्थेंत शिक्षण घेणाऱ्या प्रत्येकास समर्थ करणें हाच ट्रेनिंग संस्थांचा हेतु नाहीं का ? हा हेतु ग्राह्य मानल्यानंतर शिक्षकांस कोठें काम करावयाचें आहे हें पाहून, त्याच्या कार्यक्षेत्रास योग्य असें शिक्षण देणें, प्रत्येक ट्रेनिंग संस्थेचें कर्तव्य नाहीं का ?

शहरांत शिक्षकाचें काम करणाऱ्या शिक्षकांच्या भोंवतालच्या परिस्थितींत व

खेड्यांत काम करणाऱ्या शिक्षकांच्या भोंवतालच्या परिस्थितींत जमीन-अस्मानाची तफावत असते.

शहरांतील शाळेंत येणाऱ्या मुलांत पुढारलेल्या वर्गाच्या मुलांची बहुसंख्या असल्यामुळें, त्यांच्या पालकांना आपल्या मुलांनीं शिकावें, अशी उत्कट इच्छा असते व त्यामुळें ते शिक्षकाला सर्वतोपरी मदत करून त्याच्याशीं सहकार्यपूर्ण सहानुभूतीनें वागतात. शहरांत शाळेस चांगली हवाशीर व आरोग्यदायक अशी जागा असते. मुलांच्या पालकांनाच स्वच्छतेचें महत्त्व समजलेलें असल्यामुळें व त्यांची सांपत्तिक स्थितीहि साधारणपणें बरी असल्यामुळें, मुलांची रहाणी स्वच्छतेची असते. मुलांच्या घरची स्थिति शिक्षणास पोषक असल्यामुळें व घरीं त्यांच्या अभ्यासाकडे लक्ष पुरविणारी मंडळीहि असल्यामुळें, मुलांची बुद्धी साधारणपणें तल्लख व सुलभग्राही असते. त्याच्या जोडीला शहरांतील शिक्षकांना आधुनिक प्रकारच्या शिक्षणसाहित्याची जोड मिळाल्यामुळें शिक्षण देणें विशेष सोपें होतें.

याच्या अगदीं उलट स्थिती खेडेगांवांतील शाळांमध्यें असल्याचें दिसून येतें. पुष्कळशा शाळा एक शिक्षकी असल्यामुळें त्या मास्तराला बरोबरीच्या सहकाऱ्याची उणीव नेहमीं भासत असते. "त्याला गैरसोयीच्या व अतिशय गर्दीच्या जागेंत काम करावें लागतें. पालकांच्या व शेजाऱ्यांच्या पूर्ण उदासीनतेला त्याला तोंड द्यावें लागतें. कधीं कधीं राजकारणाचें किंवा इतर दडपण त्याच्यावर टाकण्यांत येतें व या दडपणाखालीं नमलें नाहीं, तर नोकरी जाण्याची भीतीहि त्याच्या डोक्यापुढें नाचूं लागते. हेड-मास्तर असलाच तर कदाचित तोहि सहानुभूतीशून्यतेनें वागणारा निघतो. ज्या मुलांना शिकवावयाचें त्या मुलांपैकीं कांहीं उदासीन वृत्तीचीं, कांहीं त्रासदायक व कांहीं रोगामुळें, उपासमारीमुळें किंवा इतर कारणामुळें अनियमितपणें वागणारीं असतात. तपासणी शिक्षकाला विशेष आवडली नाहीं तरी कधीं त्याचें काम पुरें तपासलें जात नाहीं. व क्वचित् तपासलें गेलेंच तर दररोजचें काम त्याच्या हातून चांगल्या प्रकारें पार पडेल असें उत्तेजन त्याला मिळेल, अशा प्रकारें तें तपासलें जात नाहीं. शेवटीं म्हणजे त्याला अपुरा पगार असतो व त्याच्या पेशाला शोभेसा दर्जा त्याला समाजांत मिळत नाहीं."*

शहरांतील शिक्षकाला स्वतांच्या व कुटुंबाच्या दृष्टीनें सर्व सुखसोयी सहज

---

* ॲबट ॲंड वुड, रि. पा. २५.

मिळतात तर कांहीं खेडयांतील शिक्षकांच्या नशिबीं प्रत्यक्ष वनवासच येतो. शहरांतील शिक्षकाला जरूर पडली तर औषध पाण्यासारखें मुबलक मिळतें, तर खेडयांतील शिक्षकाला पाणी औषधासारखें महागाईचें व ठराविक प्रमाणांत घ्यावें लागतें. आपल्या मुलांकडे विशेष लक्ष द्यावें म्हणून शहरांतील शिक्षकाची मनधरणी करण्यासाठीं मुलांचे पालक त्याचे उंबरठे झिजवितात, तर खेडयांतील पालकांनीं आपलीं मुलें शाळेंत घालावींत म्हणून मास्तरलाच त्यांच्याकडे पडळीपडळीवरून खेटे घालावे लागतात. मुलें भरपूर असल्यामुळें शहरांतील शिक्षकाला एकावेळीं एकाच इयत्तेंतील मुलें शिकवावीं लागतात, तर खेडयांतील शिक्षकास एकाच जागेंत बसलेल्या अनेक इयत्तांतील मुलांच्या शिक्षणाकडे एकाच वेळीं लक्ष पुरवावें लागतें.

शहरांतील व खेड्यांतील शिक्षकांच्या परिस्थितींतील फरक निदर्शनास आणावयाचें म्हटल्यास आणखी मोठी यादी सहज करतां येईल. सांगण्याचा मुद्दा हा कीं, शहरांतील लोकांचे व्यवसाय, त्यांच्या गरजा, त्याचें शिक्षणाचें बाबतींत ध्येय हीं व खेड्यांतील लोकांच्या गरजा, त्यांच्या अडचणी व त्यांच्या शिक्षणाचें ध्येय हीं परस्परभिन्न असल्यामुळें, या दोन्ही वर्गांना द्यावयाचें शिक्षण भिन्न स्वरूपाचें असणें अपरिहार्य आहे. शिक्षणाचा प्रकार निराळा झाला कीं अभ्यासक्रमांतहि आमूलाग्र फरक आलाच. अभ्यासक्रमांतील भिन्नत्वामुळें तो शिकविण्याच्या शिक्षणपद्धतींतहि अंतर पडणार व त्यामुळें या भिन्न पद्धतीचा अवलंब करणाऱ्या शिक्षकांचे स्वतंत्र व एकमेकांपासून तुटक असे निराळे गट सहाजिकच होणार. शहरांतील शिक्षणक्रमाप्रमाणें शिक्षण देण्यास लायक असलेले शिक्षक खेड्यांच्या दृष्टीनें निरुपयोगी ठरतील व खेड्यांतील शाळांत लायक ठरलेले शिक्षक शहरांतील शाळांत गांवढळ ठरून थट्टेचे विषय होतील. खेड्यांतील शिक्षकांच्या अंगांत जे विशेष गुण असणें जरूर आहे ते गुण त्यांच्या अंगीं आणण्यासाठीं किंवा मूळचे असल्यास ते वाढविण्यासाठीं स्वतंत्र शिक्षणसंस्था असणें जरूर आहे व या संस्था शहरांत न ठेवतां खेड्यांतच असणें जरूर आहे.

खेडयांतील कृषिप्रधान जीवनाच्या दृष्टीनें त्यांच्या स्वतंत्र गरजांचा विचार न करतां, शहरवासीयांच्या दृष्टीनें आंखलेल्या शिक्षणक्रमाप्रमाणें शहरांतील शिक्षणसंस्थांमध्यें शिक्षण घेतलेले शिक्षक, खेडयांतील शाळेंत काम करण्यास नालायक व निरुपयोगी असतात. शहरांतील रहाणीला चटावलेल्या लोकांना

खेडयाच्या कृषिप्रधान व गैरसोयीच्या वातावरणांत आयुष्य कंटाळवाणें वाटतें. खेडयांतील शाळांत ज्या पद्धतीनें शिकवावयास पाहिजे त्या पद्धतीशीं त्यांचा परिचय नसल्यामुळें, ते शहरी वळणावरच शिकविण्याचा प्रयत्न करतात व त्यामुळें खेडयांच्या दृष्टीनें त्यांचें शिकविणें निरस व कुचकामी ठरतें. हा आपल्या येथेंच अनुभव आहे असें नाहीं, तर अमेरिकेमध्येंहि तेथील लोकांना तोच अनुभव आला आहे. अमेरिकेंतील शिक्षणपद्धतीचा इतिहास देतांना एलवूड पी. कबरले या विद्वान् शिक्षणतज्ज्ञानें खालील उद्गार काढले आहेत. "शहरांत असणाऱ्या नॉर्मल स्कूलमध्यें शहरांतील शिक्षणासाठीं शिकविलेले शिक्षक (खेडयांतील शाळांवर) नेमले आहेत, परंतु ते शहरांतील गरजांचा विचार करून त्या भागेंत शिकवितात व शहरांत नोकरी मिळत असल्यास तावडतोव खेडें सोडतात. खेडयांतील शाळांच्या अभ्यासक्रमांत मामुली स्वरूपाच्या शेतकीचा समावेश करण्यांत आला आहे....परंतु शहरांत शिक्षण घेतलेल्या शिक्षकांना साधारणपणें त्या विषयाच्या बाबतींत काय करावें हेंच समजत नाहीं. याचा परिणाम असा झाला आहे कीं, आमच्या खेडयांतील शाळांत पुस्तकी विद्येचें प्राबल्य वाढलें असून, त्यांतील अभ्यासक्रम शेतकी जीवनाशीं असंबंधित असा झाला आहे व त्याचा परिणाम शेताबाहेरील जीवनावरच होऊं लागला आहे. यामुळें खेडुतांना या शाळांबद्दल मुळींच आस्था व आपलेपणा वाटेनासा झाला आहे. "*

हा महत्त्वाचा दोष नाहींसा करण्यासाठीं दोन गोष्टी करणें जरूर आहे.

अ. शिक्षकांची निवड––खेड्यांतील शाळांवर काम करण्यासाठीं शिक्षकांची किंवा भावी शिक्षकांची निवड करतांना तो खेड्यांतील कायम रहाणारा व खेड्यांतील शाळेंत ज्या शेतकरी वर्गाच्या मुलांची बहुसंख्या असते त्या शेतकरी वर्गांतील आहे, अशी खात्री करूनच त्याची निवड करण्याचें धोरण मान्य करणें जरूर आहे. शेतकरी वर्गांतील, खेडयांत वाढलेल्या लोकांनाच आपल्या मुलांच्या शिक्षणाविषयीं जी आस्था वाटेल ती शहरांतील व बिगर-शेतकरी वर्गांतील लोकांना वाटणें शक्य नाहीं आणि म्हणूनच खेडयांतील लोकांच्या शिक्षणाला खरी चालना द्यावयाची असेल तर शेतकरी वर्गांतील मुलांच्या शिक्षणासाठीं खेडयांत आजन्म रहाणाऱ्या शेतकरी वर्गांतील शिक्षकांचीच योजना करणें अत्यंत जरूर आहे.

---

* पा. ४६६–६७.

शेतकरी वर्गांत जन्मून शिक्षकाचा पेशा पत्करणाऱ्या शिक्षकाला खेड्यांतील अडीअडचणींची, साध्या रहाणीची पूर्ण कल्पना असल्यामुळें, तो गांगरून न जातां आस्थापूर्वक काम करतो व 'शिक्षक आपल्यापैकींच आहे' या भावनेनें शेतकरी वर्गालाहि त्याच्या बोलण्याबद्दल किंवा उपदेशाच्या सांगण्याबद्दल आपलेपणा वाटून, ते शाळेच्या कामांत अधिक लक्ष घालतात किंवा त्याला मदत करण्यास हरहमेश तयार असतात. उलट, शहरांत सर्व आयुष्य घालून केवळ पोटासाठीं नोकरी पत्करून खेड्यांत मास्तर म्हणून गेलेला बिगर शेतकरी वर्गाचा किंवा पुढारलेल्या वर्गाचा शिक्षक, शहरांत न दिसणारा गलिच्छपणा, अडाणीपणा, धर्मभोळेपणा व सर्व सुखसोयींचा पूर्ण अभाव पाहून, थोड्याच दिवसांत पूर्ण नाराज होऊन केवळ पगारासाठीं कसे तरी दिवस कंठू लागतो.* शिक्षकच शाळेसंबंधीं वाढत्या उदासीनतेनें वागूं लागल्यानंतर, इतर लोकांच्या हजारों वर्षांच्या उदासीनतेला कशी भरती येत असेल यांची कल्पना केलेलीच बरी ! खेड्यांतील शाळांमध्यें चैतन्य उत्पन्न करावयाचें असेल व त्या शाळेंतील कामकाजांत भोंवतालच्या कृषीवल जीवनाशीं तन्मय होणारा जिवंतपणा निर्माण करावयाचा असेल, तर त्या शाळांत खेड्यांतील रहाणारा व शेतकरी वर्गाच्या जिव्हाळ्याचा शिक्षकच नेमणें अत्यंत अगत्याचें आहे.

या सूचनेला अनेक शिक्षणतज्ज्ञांचा पूर्ण पाठिंबा आहे. हंटर कमिशन-(१८८२) च्या अहवालांत पान १३२ वर खालील अभिप्राय नमूद केला आहे—

"आमच्या मतें खेड्यांतील शाळेवरील शिक्षक हा बाहेरील परका (Foreigner) मनुष्य असण्यापेक्षां स्थानिक मनुष्य असणें फार इष्ट आहे. हैद्राबाद असाइन्ड डिस्ट्रिक्टमध्यें योग्य अशीं नार्मल स्कूल्स् नसल्यामुळें तेथील खात्याला अनेक वर्षें मुंबईहून शिक्षकांचा पुरवठा करावा लागला. परंतु अशा योजनेंतील दोष सहज दिसण्यासारखे आहेत. खेड्यांतील शाळेसाठीं हरप्रकारें स्थानिक लोकांची सहानुभूति व मदत मिळविणें अगत्याचें असून, खेड्यांतील लोक आपल्या जातीच्या शिक्षकांशीं अधिक तत्परतेनें सहज सहकार्य करतील अशी अपेक्षा करणें रास्त आहे."

---

* ॲचॉट वुड, रि. पा. २४

हंटर कमिशनप्रमाणें चंदावरकर कमिटी-(१९२१)नें आपल्या अहवालांत तोच अभिप्राय दिला आहे. या कमिशनच्या पुढें अनेक साक्षिदारांनीं 'ब्राह्मण जातीचे शिक्षक खेड्यांतील लोकांच्या नित्याच्या हितसंबंधाबाबत तटस्थवृत्तीनें राहून शिकविण्याच्या बाबतींत प्रत्यक्ष (Concrete) गोष्टीपेक्षां त्यांचा तांत्रिक (abstract) गोष्टीकडेच अधिक कल असतो ' अशीं विधानें केलीं आहेत; इतकेंच नव्हे, तर कांहीं साक्षिदारांनीं कांहीं वेळ 'ब्राह्मण शिक्षक शेतकरी वर्गाला शाळेंत मुलें पाठविण्याला उत्तेजन देत नाहीं' अशीहि तक्रार केली.+ ही तक्रार म्हणजे ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाचाच एक द्वेषमूलक भाग आहे असें कांहीं वाचकांना वाटण्याचा संभव आहे, म्हणून या बाबतींत दोन शब्द अधिक लिहिणें जरूर आहे.

अध्ययन व अध्यापन हीं ब्राह्मणांच्या षट्कर्मांपैकीं दोन महत्त्वाचीं कर्तव्यें आहेत हें आपण मागें पाहिलें आहे. सनातनधर्मानें चारी वर्णांना जीं कर्में आखून दिलीं आहेत त्याप्रमाणें प्रत्येक वर्गानें वागावें, अशी अनेक सनातन लोकांची प्रामाणिकपणाची समजूत आहे. खेड्यांतील शेतकरीवर्गाला कुणबी म्हणजे शूद्र समजणारे जे अनेक सनातनी ब्राह्मण आहेत त्यांना शूद्रांनीं शिकणें म्हणजे ब्राह्मणजातीच्या अध्ययनाच्या विशेष व धर्मदत्त हक्कावर आक्रमण करण्यासारखें वाटतें व त्यामुळें, उघड विरोध करतां आला नाहीं तरी मनांतून, शेतकऱ्याच्या म्हणजे शूद्रांच्या शिकण्यास ते प्रतिकूल असतात. कर्नल कॅंडी साहेबानीं १८२० सालीं केलेल्या आपल्या एका अहवालांत 'अनेक ब्राह्मणांनीं, आम्ही शिकण्यास तयार असतां, तुम्हीं शिकणें हें ज्यांचें काम नाहीं अशा शेतकरी वगैरे वर्गाला मुद्दाम शिकविण्याचा कां प्रयत्न करतां ? ' असा खडसून जाब विचारल्याचें स्पष्ट म्हटलें आहे. कर्नल कॅंडीसाहेबांच्या वेळीं, चंदावरकर कमिटीच्या वेळीं असलेल्या ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचा जन्महि झाला नव्हता. कॅंडीसाहेबांना प्रश्न विचारणाऱ्या ब्राह्मणांच्या मनोवृत्तीचा

+ पा. ४४.

I have observed considerable jealousy on the part of Brahmanas of the acquisition of literature by other castes, specially shoodras. It has sometimes been openly expressed by the question to me ' what have they to do with letters ? Let them learn their own work; literature is our department. '

E. R. II. p. 152.

आजच्या कालांतील ब्राह्मण, पोटासाठीं नोकरींत-शिक्षकाच्या नोकरींत-शिरला तरी त्यांचीं धार्मिक मतें त्याच्यावर पगडा बसविल्यावांचून रहात नाहींत. आमच्या अनुभवानेंहि अनेक पुढारलेल्या वर्गाच्या शिक्षकांना खेड्यांतील लोकांच्या शिक्षणाविषयीं मुळींच आस्था व कळकळ वाटत नाहीं व त्यामुळें त्यांच्या देखरेखीखालील शाळेची व एकंदर शिक्षणाची पिछेहाट होते, असें म्हणावयास हरकत नाहीं. ब्राह्मण शिक्षकांच्या हाताखालीं खालावलेली व अगदीं मोडलेली शाळा, त्याला बदलून तेथें शेतकरी वर्गाच्या जातीचा शिक्षक नेमला कीं पुन्हां सुस्थितींत आलेली अनेक वेळां पहावयास मिळते.

चंदावरकर कमिटीपुढें आलेल्या वरील स्वरूपाच्या पुराव्याबद्दल त्या कमेटीनें आपला कांहीं अभिप्राय दिला नाहीं तरी, त्या साक्षीदारांची मागणी मान्य करून 'शेतकरी व तत्सम वर्गांतील व मागासलेल्या वर्गांतील शिक्षकांची अधिकाधिक निवड करण्यास उत्तेजन देणें जरूर आहे' अशी शिफारस करून स्थानिक लोकांची शिक्षक म्हणून निवड करण्यांत यावी असेंहि आपलें मत व्यक्त केलें.

याच बाबतींत मि. मेह्यूसाहेबांचें मतहि लक्षांत घेण्यासारखें आहे; ते म्हणतात:—

"If the teacher is to be recognised as a decorative and useful member of the community, a real part of its economic and cultural life, he ought to be a local man belonging to a caste or class in the traditions and associations that predominate in the area and selected by the community he is to serve. In his education and training care must be taken to keep alive these traditions and to emphasise those features which he can help to develop. This has been lost sight of in the desire to obtain by competitive examination the most intelligent and highly educated candidates for the training schools. There has been a tendency to prefer failed matriculates ready for sake of a living to face work and surroundings with which they are out of sympathy, to less advanced but more appropriate candidates.....No real advance towards popularity is possible till the appropriateness of a teacher to school surroundings and community is made the first consideration". (p. 249–250.)

मि. मेथ्यू साहेब मध्यप्रांतांतील शिक्षणखात्याचे डायरेक्टरच्चे हुद्यावर अनेक वर्षें होते व त्यामुळें हिंदुस्थानांतील परिस्थितीविषयीं त्यांना स्वतांची पूर्ण माहिती असल्याकारणानें, त्यांचें मत अतिशय महत्त्वाचें आहे.

हंटर कमिशाननें केलेल्या सूचनेंतील तत्त्व सरकारनेंहि मागेंच मान्य केलें आहे. हिंदुस्थानच्या १९१३च्या शिक्षणविषयक ठरावांत ज्या अनेक सूचना केल्या आहेत त्यांत "Teachers should be drawn from the same class as the boys whom they will teach. अशी एक सूचना आहे.§ इतकेंच नव्हे तर १९११सालच्या देशी भाषाविषयीच्या प्राथमिक शिक्षणाबाबत काढलेल्या एका पत्रकांत सरकारनें Teachers for the rural schools should be recruited from rural areas अशी हुकुमी स्वरूपाची सूचनाहि खालच्या अधिकाऱ्यांना केली. हारटॉग कमिटीनेंहि निवडीच्या या तत्त्वाला मान्यता दिली.*

हिंदुस्थान सरकारच्या १९२७–३२ च्या पंचवार्षिक अहवालांतहि खेड्यांतील शाळांसाठीं खेड्यांतीलच शिक्षक असण्याचीं अनेक कारणें देऊन आवश्यकता मान्य केली आहे.‡ सरकारनें हें तत्त्व मागेंच मान्य केलें आहे, एवढेंच नव्हे तर शेतकरी व कामकरी वर्गांतील शिक्षकांची ट्रेनिंग संस्थेंत जास्त भरती व्हावी म्हणून ट्रेनिंग कालेजमध्यें कोणत्या वर्गाचे किती प्रमाणांत उमेदवार पाठवावेत हें प्रमाणहि सरकारनें ठरवून दिलें आहे. परंतु या दृष्टीनें विचार केल्यानंतर पुढारलेल्या वर्गाच्या शिक्षकांसाठीं जें प्रमाण ठेवलेलें आहे, तें पुष्कळच कमी होणें अत्यंत जरूर आहे. खेड्यांतील शाळांसाठीं निदान शेंकडा २५ तरी पुढारलेल्या वर्गाचे उमेदवार ट्रेनिंग संस्थेंत पाठविण्याची काय जरुरी आहे याचा आम्हांलातरी उलगडा होत नाहीं.

अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशांतहि 'खेडेगांवच्या शाळेंत स्थानिक मनुष्य नेमला म्हणजे त्या शाळेचा कारभार सुरळीतपणें चालून गांवकरी शाळेच्या बाबतींत अधिक लक्ष घालतात' असा तिकडील शिक्षणसंस्थांची पहाणी करणाऱ्या तज्ज्ञांनीं अभिप्राय दिला आहे.¶

---

§ हारटॉग क. रि. पा. २७४. *हारटॉग क. रि. पा. ७४.

‡ "It is essential, therefore, that the teacher should be of the village and from the village. P. of E. P. 150. ¶ O. R. No. II p. 4.

खेडेगांवच्या शाळेंत शक्य तों स्थानिक मनुष्य नेमण्यांत यावा या सूचने-विषयीं एक आक्षेप घेण्यांत येतो. स्थानिक मनुष्य गांवांतील भांडणतंट्यांत ताबडतोब सामील होऊन गांवांतील दुफळीपैकीं एखादे फळीस मिळतो व त्यामुळें त्याच्या शाळेच्या प्रगतीवर अनिष्ट परिणाम होतो. हा आक्षेप चंदा-वरकर कमिटीपुढेंहि घेण्यांत आला होता.* या आक्षेपांत कांहींसें तथ्य आहे हें कबूल करणें जरूर आहे. परंतु एकंदरींत गांवच्या गांवीं किंवा गांवानजीक काम करणाऱ्या शिक्षकांची एकंदर संख्या व अशा तक्रारीचीं प्रकरणें पाहिलीं म्हणजे गांवच्या उलाढालींत शिरणाऱ्या शिक्षकांचें प्रमाण फारच अल्प अस-ल्याचें दिसून येतें. कधीं कधीं शिक्षक आपल्या फळींत येत नाहीं असें पाहूनच दोन्ही फळ्यांतील गुंडमंडळी त्याच्या विरुद्ध, तो विरुद्ध बाजूला सामील झाल्याबद्दल, तक्रारीची वावटळ उठवितात, असाहि अनुभव येतो.

या आक्षेपांत दर्शविलेल्या दोषाला पायबंद घालतां येणें शक्य आहे. तपासणीची पद्धत जर चांगली असली तर शिक्षकावर थोडा वचक राहील. त्याशिवाय योग्य चौकशी केल्यानंतर शिक्षकाचा गुन्हा दिसून आला तर त्याची ताबडतोब बदली करून व इतरहि त्याला कडक शिक्षा केल्यास अशा उला-ढाली करणाऱ्या शिक्षकांनाहि दरारा वाटूं लागेल व मग या आक्षेपाला विशेष जागा रहाणार नाहीं.

ब. **विशेष शिक्षण**—शिक्षकाची आरंभींची निवड कोणत्या तत्त्वावर करावी यांचें वर विवेचन केलें आहे. निवड केल्यानंतर त्या शिक्षकास ज्या क्षेत्रांत व ज्या लोकांत काम करावयाचें त्या क्षेत्रास व लोकांस अनुकूल असें त्यास शिक्षकाच्या धंद्याचें जरूर तें शिक्षण देणें अगत्याचें आहे. शहरांतील व खेडयांतील परि-स्थिति कशी भिन्न आहे व खेडयांतील या भिन्न परिस्थितींत काम करणाऱ्या शिक्षकांना, शहरांत काम करणाऱ्या शिक्षकांस मिळणाऱ्या शिक्षणापेक्षां, कसें भिन्न प्रकारचें शिक्षण देणें जरूर आहे, याचें मागें विवेचन केलें आहेच. शेतकरी वर्गांसाठीं तयार करावयाच्या शिक्षकाच्या ट्रेनिंग संस्थांमधील अभ्यास क्रम निराळा असणें जरूर आहे; इतकेंच नव्हें तर त्यांना शिक्षण देणाऱ्या या संस्था शहरांत न चालवितां खेडेगांवांतच स्थापन करणें जरूर आहे.

इंग्लंड—वेल्समध्येंहि शहरी शिक्षक (Town Teachers) व ग्रामीण शिक्षक (Country Teachers) असा फरक केला असून खेडयां-

* पा. ४४.

साठीं तयार करण्यांत येणाऱ्या शिक्षकांस खेडयांत उपयोगी असें शिक्षण, विशेषतः ग्रामभागांत (Rural area) स्थापन केलेल्या ट्रेनिंग संस्थांमधून देण्यांत येतें.

इंग्लंडप्रमाणें अमेरिकेंतहि खेडयांतील शिक्षकांचें शिक्षण 'काउंटी ट्रेनिंग स्कूल' मार्फतच देण्यांत येतें. ही शाळा पूर्णपणें खेडेगांवाच्या भागांतच चालविण्यांत येते. शहरांतील शिक्षकांसाठीं शहरांतून नॉर्मल स्कूल्स् स्थापन करण्यांत आलेलीं असून एका काळीं बहुतेक सर्व शिक्षक याच स्कूल्समध्यें शिक्षण घेत असत. परंतु त्या संस्थांतून शहरी नमुन्याचेंच शिक्षण सर्व शिक्षकांना देण्यांत येत असल्यामुळें तें शिक्षण घेतलेले शिक्षक खेडयांतील शाळांच्या कार्यांत निरुपयोगी ठरूं लागले व त्यामुळें अखेर खेडयांतील शिक्षकांसाठीं म्हणून खास 'काउंटी ट्रेनिंग स्कूल्स'हीं स्थापन करण्यांत आलीं.

मुंबई प्रांतांत एकच संस्था या दृष्टीनें चालविण्यांत आली आहे व ती म्हणजे लोणी येथील शेतकी शिक्षणाची शाळा (Rural Training School). बाकी सर्व संस्था ह्या शहरांत वसलेल्या असून त्या संस्थांत शहरांसाठीं व खेडयांसाठीं पुढें काम करूं इच्छिणाऱ्या अशा सर्व शिक्षकांस एकाच नमुन्याचें शिक्षण दिलें जातें. या ट्रेनिंग संस्थांस एक प्रॅक्टिसिंग स्कूलहि जोडण्यांत आलेलें असतें. शिक्षणविषयक मूलतत्त्वांचा अभ्यास झाल्यानंतर विद्यार्थी या प्रॅक्टिसिंग स्कूलमध्यें प्रत्यक्ष शिकविण्याचें काम करतात. नमुन्याचे पाठ देण्यासाठींहि या शाळेचा उपयोग होतो.

खेडयांतील शिक्षकांसाठीं स्वतंत्र ट्रेनिंग संस्था असण्याची आवश्यकता सरकारला पटली आहे. परंतु नेहमींची आर्थिक अडचणीची सबब पुढें करण्यांत येत आहे.*

खेडयांतील शाळांसाठीं नेमण्यांत येणाऱ्या शिक्षकांना या शहरी शाळेंतून देण्यांत येणारें शिक्षण खेडयांतील शिक्षकांच्या दृष्टीनें पूर्ण निरुपयोगी आहे इतकेंच नव्हे तर दुष्परिणामीहि ठरतें. प्रॅक्टिसिंग स्कूलमधील शहरांतील स्वच्छ व चलाख मुलांना पाठ देण्याची सवय झाली असल्यामुळें आपला शिक्षणक्रम संपवून खेडयांतील शाळेवर गेल्यावर तेथील अस्वच्छ रहाणीचीं, अशुद्ध वाणीचीं, ओबडधोबड मुलें पाहातांच शिक्षक अर्धामेलाच होतो ! शहरांतील या ट्रेनिंग संस्थांतून, खेडयांतील शाळेंत पदोपदीं उत्पन्न होणाऱ्या अडचणींची

* मुं. पं. रि. १९२२-२७

कांहींच कल्पना न देण्यांत आल्यामुळें शिक्षक खेडयांतील शाळेंत गेल्यानंतर त्याला आपण अनोळखी व ओंगळ अशा जगांत आलों आहोंत, असें वाटतें व दोन चार वर्षांत त्याची उमेद पार खचून जाते.¶ याचे उलट अमेरिकेच्या काउंटी ट्रेनिंग स्कूलमध्यें खेडयांतील परिस्थितीची शिक्षकाला सोळा आणे कल्पना देण्यांत येते व त्यामुळें तो स्वतंत्रपणें शाळेवर नेमला कीं तेथील परिस्थितीशीं समरस होऊन सुरळीतपणें काम करूं लागतो.§

सांगण्याचा हेतु हा कीं, आमच्याकडेहि अमेरिकेप्रमाणें, खेडेगांवच्या भागांतच सरकारी, बोर्डाची किंवा खाजगी मदतीची ट्रेनिंग संस्था, खास शेतकरी वर्गाच्या शिक्षकांसाठीं निघणें अत्यंत जरूर आहे. तें होईपर्यंत शहरांतील ट्रेनिंग संस्थांमधून ग्रामीण शिक्षणासाठीं स्वतंत्र वर्ग काढण्यांत येऊन त्यांत त्यांना खास शिक्षण देण्याची सोय करण्यांत यावी व या वर्गांतील भावी शिक्षकांना नमुन्याचे पाट देण्यासाठीं नजीकच्या खेडयांतील शाळेंत नेण्यांत यावें. अमेरिकेंतहि शहरांतून वसलेल्या नॉर्मल स्कूलमध्यें ग्रामीण शिक्षकांच्या

¶ ॲचॉट वुड रि. पा. २४

§ हारटॉग कमिटीच्या अहवालांतील पान ७४-७५ वर संयुक्त प्रांतांतील प्राथमिक शिक्षणासंबंधीच्या १९२७ च्या पुरवणी अहवालांतील पान २८ वरील दिलेला खालील उतारा महत्त्वाचा आहे.

"The teacher taught in schools, training classes and normal schools, 'where little that is practical or has any living relationship with village life was formerly admitted, has become an outsider in the village. He is known as 'Munshiji' a man versed in curious learning but unversed in the practical business of the ordinary dweller in the village. The latter is thus led to believe that education is of little value save to those who will later adopt a means of livelihood dependent on their literary ability. ...The task before these Provinces (Bombay and U. P.) is thus threefold.

First to secure that the education in the rural vernacular schools has a closer relationship to the mass of the people.

Second to increase the efficiency of the teachers so that the children shall not be dulled but enlivened in schools, &

Third to ensure that all new teachers appointed shall be good practical educationist interested in rural life and conditions".

शिक्षणासाठीं स्वतंत्र खातीं आहेत. या विषयाचा यापेक्षां अधिक विचार करणें शक्य नाहीं.

५. ट्रेनिंग संस्थांमधून शिक्षक बाहेर पडल्यानंतर तो शिक्षक या नात्यानें जबाबदारी पार पाडण्यास तत्त्वतः समर्थ होतो. परंतु प्रत्यक्ष तसा तो झाला आहे किंवा नाहीं हें आपणाकडे अजमावून पहाण्यांत येत नाहीं. पाश्चिमात्य देशांत मोटारच्या कारखान्यांत मोटारीचे सुटे भाग जोडून मोटार तयार झाली कीं ती चालवून व इतर प्रकारें तपासून पाहून तिच्यांत कांहीं दोष राहिले आहेत किंवा काय, याची तपासणी फार कसोशीनें करतात. कारण, कांहीं तसा दोष राहिला तर पुढें मागें अपघात होऊन जिवाला धोका होण्याचा संभव असतो. हाच न्याय शिक्षकांनाहि कां लागू करूं नये ? ट्रेनिंग संस्थेंत योग्य तऱ्हेचें शिक्षण दिलें तरी शिक्षकाच्या स्वभावांतील दोषामुळें किंवा इतर कांहीं कारणामुळें त्याच्या हातून शिकविण्याचें कार्य यथाशास्त्र पार पडलें कीं नाहीं हें पहावयास नको का ?

इंग्लंडमधील ट्रेनिंग संस्थांमधून बाहेर पडणाऱ्या शिक्षकांच्या बाबतींत हाच प्रश्न उपस्थित करण्यांत आला होता. शिक्षकांच्या शिक्षणाच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं नेमलेल्या कमिटीपुढें अनेक साक्षीदारांनीं सावधगिरीनें वागण्याचा इषारा देऊन 'अशा शिक्षकाला एक वर्ष तरी, सहानुभूतीनें वागणाऱ्या हेडमास्तरच्या देखरेखीखालीं ठेवून शिक्षकाच्या धंद्याची जबाबदारीची कामगिरी करण्यास सांगावें' अशी आग्रहाची सूचना केली.‡

या सूचनेचा विचार करतांना कांहीं व्यवहार्य अडचणीहि कमिटीपुढें दत्त म्हणून उभ्या राहिल्या. पहिली अडचण अशी कीं, "अशा शिक्षकाची 'शिक्षक' म्हणून नेमणूक करण्यांत येणार असल्यामुळें व तो त्या नात्यानें भर पगार घेणार असल्याकारणानें त्याच्यावर देखरेख करण्यासाठीं मुख्य शिक्षक अधिक वेळ खर्च करणार नाहीं."

दुसरी अडचण म्हणजे ज्यांच्याकडे या शिक्षकांच्या नेमणुका करण्याचें काम आहे त्या संस्था (Appointing Bodies). या सर्व गोष्टी जमेंत धरून अशा शिक्षकांची योग्य ठिकाणीं नेमणूक करूं शकतील किंवा नाहीं.

‡ The first year of actual responsible teaching is the most important in the whole of a teacher career. It is here that he may be made or marred, and the influence of the Head Master cannot be overestimated. T. of T. p. 116.

सदर कमिटीनें या दोन्ही अडचणींचा विचार करून या सर्व साक्षीदारांच्या म्हणण्याचा निष्कर्ष काढून 'ट्रेनिंग कॉलेजमधून शिक्षण पुरें करून बाहेर पडणाऱ्या शिक्षकांस त्या ट्रेनिंग संस्थेनें परीक्षा पास झाल्याबद्दल दाखला (Certificate) अगर डिप्लोमा द्यावा; परंतु बोर्ड ऑफ एज्युकेशननें त्या शिक्षकानें निदान एक वर्ष तरी काम करून आपल्या समाधानकारक लायकीबद्दल बोर्डाची योग्य खात्री पटविल्यावांचून दाखल्याचा शिक्षक म्हणून त्याला मान्यता देऊं नये' अशी शिफारस केली. "एक वर्ष काम केल्यानंतर परीक्षकाची खात्री किंवा समाधान न झाल्यास आणखी एक वर्ष काम करून घेण्यांत यावें व त्यानंतरहि एखाद्या वेळेस समाधानकारक काम दिसून न आल्यास आणखी एक वर्ष काम करून घेण्यांत यावें. हा चाचणीच्या कामाचा काल उमेदवारीचा (Probation) काल म्हणून समजण्यांत यावा. या कालांत त्याला तात्पुरता दाखल्याचा शिक्षक म्हणून समजण्यांत यावें व त्याला त्या जागेचा आरंभींचा पगार देण्यांत यावा. त्याच्या एक वर्षाच्या किंवा जरूर पडल्यास दोन किंवा तीन वर्षांच्या उमेदवारीच्या कामाची प्रगति समाधानकारक आहे किंवा नाहीं हें बोर्डानें स्थानिक संस्थांच्या विचारें हेडमास्तर व तपासनीस यांच्यामार्फत अजमावावें. कांहीं ठराविक शाळा निवडून त्याच शाळांमधून सहानुभूतीनें वागवील अशा मुख्य मास्तरांच्या देखरेखीखालीं त्याची योजना करावी व शाळांवरील मुलांच्या संख्येच्या मानानें शिक्षकांची संख्या ठरवितांना अशा शिक्षकांना पूर्ण शिक्षक म्हणून मोजण्यांत यावें," अशा कमेटीनें एकंदर शिफारशी केल्या.

या सूचनांत कमी जास्त फेरबदल करून त्यांचा अवलंब आपणहि करणें फार अगत्याचें आहे. अनेक वेळां वशिल्यानें म्हणा किंवा नजरचुकीनें म्हणा शिक्षकाच्या धंद्यास पूर्ण नालायक लोक या धंद्यांत शिरतात व मग सर्व नियमांचा कडक अंमल संभाळून त्यांना कमी करणें कोणत्याहि शिक्षणसंस्थेला फार कठीण जातें. नोकरींत कायम होण्यापूर्वी अनेक चाळण्या व चांचण्या ठेवल्यानंतर नालायक लोकांचा या नोकरींत शिरकाव होण्याचा संभव कमी होऊन, वशिलेबाजीलाहि ठिकठिकाणीं पायबंद बसल्यावांचून रहाणार नाहीं.

६. **शिक्षकांच्या शिक्षणाची उजळणी:**—याप्रमाणें अनेक तऱ्हेच्या परीक्षांच्या व शिक्षणाच्या निर्बंधांच्या जाळ्यांतून पुढें आलेला शिक्षक आपल्या वयाच्या सुमारें २२ ते २५ वर्षांच्या दरम्यानच्या कालांत स्वतंत्रपणें शिक्षक

म्हणून कामाला लागेल. तो तसा त्या वयांत कामाला लागल्यानंतर सुमारें ३०।३२ वर्षें, म्हणजे ५५ वर्षें पुरीं होईपर्यंत त्याला याच धंद्यांत जोवन कंठावें लागेल, नव्हे लागतें. या कालांत आरंभीं उत्तम तऱ्हेचें शिक्षण घेतलेल्या शिक्षकालाहि त्याच्या मिळविलेल्या ज्ञानाला उजळा देण्यासाठी व त्याच्या मूळच्या ज्ञानांत नवीन भर घालण्यासाठीं जरूर तीं साधनें सहज उपलब्ध होतील, अशी तजवीज करणें आमचें आद्य कर्तव्य आहे.

अशा तऱ्हेच्या साधनांची योजना करण्याची जरूरी दोन कारणांमुळें आवश्यक होऊन बसते. पहिलें कारण असें कीं, प्रत्येक शिक्षणाच्या क्षेत्रांत ज्ञानाची सारखी प्रगति होत असते. त्याचप्रमाणें अध्यापनशास्त्राच्या प्रदेशांतहि नवीन शोध व शिकविण्याच्या पद्धतींत नवीन असे फेरबदल होत असतात. हे नवीन लागणारे शोध किंवा फेरबदल यांची माहिती झाल्यावांचून कोणाहि शिक्षकाला आपल ज्ञान ताजेतवानें ठेवतां येणें शक्य नाहीं.‡

अशी सूचना करण्याचें दुसरेंहि कारण आहे. शिक्षकाकडून मुलांना मिळणारें शिक्षण फुलाच्या गजऱ्याप्रमाणें ताजें टवटवीत असले तरच मुलांच्या मनावर त्याच्या शिक्षणसुगंधाचा आल्हाददायक परिणाम होईल. परंतु बारा महिने त्याच शाळेंत व त्याच मुलांना तेच विषय शिकविण्याचें काम करणाऱ्या शिक्षकाच्या शिकविण्यांत कंटाळवाणा एकरंगीपणा उत्पन्न होणें अपरिहार्य आहे. मग त्याच्या शिकविण्यांतील फुलाचा सुगंध व ताजेपणा नाहींसा होऊन निर्माल्याचा कुजका वास व शिळेपणा येतो. हा दोष नाहींसा करण्यासाठीं त्याच्या अध्यापनकलेच्या ज्ञानांत भर घालणारें वाङ्मय वाचावयास दिलें किंवा चर्चेसाठीं एकत्र जमलेल्या इतर शिक्षकांबरोबर मिसळण्याची संधी दिल्यास त्याच्या जीवनांत नवीन चैतन्याचा शिरकाव होऊन तो कंटाळ्याची कात टाकून ताजातवाना होतो.

मग शिक्षकाच्या ज्ञानास वेळोवेळीं उजळा देऊन त्याच्या ज्ञानांत भर घालणारीं कोणतीं साधनें त्याला आपणांस सहज उपलब्ध करून देतां येतील ?

---

‡" No professional man can afford to be ignorant of the advances which are made in his profession. For the teacher it is especially important that he should be familiar with the latest improvements in technique, and with those additions to knowledge which are constantly being made in the subjects which he has to teach " T. of. T. P. 118-19

(अ) पूर्वज्ञानास उजळा देऊन त्यांत भर घालणारे वर्ग. (Refresher courses):—

हल्लीं उन्हाळ्याच्या सुटींत कांहीं ट्रेनिंग संस्थांमधून अशा तऱ्हेचे वर्ग (Courses) सुरू करण्यांत येत असतात. या वर्गांना त्या संस्थेंतून पास होऊन गेलेल्या शिक्षकांना हजर राहण्याची परवानगी देण्यांत येते. हा उपक्रम अतिशय स्तुत्य आहे यांत कांहीं शंका नाहीं; परंतु तो अपुरा आहे. आमच्या मतें या उपक्रमांत कांहीं सुधारणा होणें इष्ट आहे. एक, हा वर्ग सुट्टीच्या दिवसांत सुमारें दोन किंवा तीन आठवडे असतो; परंतु सर्व विषयांची उजळणी करण्यासाठीं तो फार अपुरा आहे. दुसरें, ११ महिने शिकविण्याचें काम केल्यानंतर पुन्हां कांहीं काल लगेच स्वतां शिकण्याचें काम करण्यानें शिक्षकाच्या बुद्धीला वाजवीपेक्षां अधिक ताण देण्यासारखें आहे. यासाठीं निदान दोन वर्षांनीं, सुट्टीचे दिवस वगळून अभ्यासाचे जे दिवस असतात त्या दिवसांत, चार किंवा सहा आठवडे कांहीं शिक्षकांना पाळीपाळीनें, निदान अर्धपगारी रजा देऊन, अशा वर्गाकरितां पाठविण्यांत यावें; म्हणजे प्रत्येक शिक्षकानें एक सालाला सुट्टींतील दोन आठवड्यांच्या उजळणीच्या वर्गांत व दुसऱ्या सालाला अर्धपगारी रजेवर बिगरसुट्टींतील उजळणीच्या वर्गांत गेलेंच पाहिजे, असा सक्तीचा नियम करण्यांत यावा.

या ठिकाणीं बिगरसुट्टींतील उजळणीचा वर्ग कोणीं चालवावा म्हणून प्रश्न उपस्थित होईल. या प्रश्नाला उत्तर म्हणून मि. वुड* यांनीं प्रत्येक प्रांतांत हे उजळणीचे वर्ग चालविण्यासाठीं जी सूचना केली आहे तिच्याकडे आमच्या वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों. सुरवातीस प्रत्येक प्रांतांत व शक्य असल्यास प्रत्येक प्रांताच्या भागांत किंवा जिल्ह्यांत एक ट्रेनिंग कॉलेजसारखी फक्त उजळणीचा अभ्यासक्रम घेणारी संस्था निघाल्यास प्रत्येक गटास निदान एक महिना याप्रमाणें दरसाल बारा गटांस शिक्षण देतां येईल व ट्रेनिंग कॉलेजमध्यें सुटींतील उजळणीचे वर्ग भरवितां येतील. या योजनेला थोडा जादा खर्च आला तरी शिक्षकार्चा कार्यक्षमता वाढून त्या खर्चाचा मोबदला पदरांत पडल्यावांचून रहाणार नाहीं.

दुसरी सूचना अशी कीं, हल्लीं ट्रेनिंग संस्थेंत शिक्षण घेतलेल्या लोकांच्या ज्ञानासच उजळा देण्याची हल्लीं व्यवस्था करण्यांत आली आहे. परंतु शेंकडा

* अचॉट वुड रि., पा. २७

५० पेक्षां अधिक लोक ट्रेनिंगचें शिक्षण न घेतलेले असतात. त्यांच्या मूळच्याच अपुऱ्या ज्ञानावरील चढलेला गंज काढण्याची काय तजवीज आहे? अशा शिक्षकांसाठीं उजळणीचे वर्ग प्रत्येक स्कूलबोर्डामार्फत, वर्षांतून निदान एक महिना, भरविण्यांत यावेत. यासाठीं निरनिराळ्या तालुक्यांचे गट बनविण्यांत येऊन, त्या त्या तालुक्यांत जाऊन असे वर्ग भरविण्यांत यावे. यासाठीं ॲड्मिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर व सुपरवायझर्स किंवा चांगले अनुभवी, दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षांचें शिक्षण घेतलेले शिक्षक यांची योजना करावी व या उजळणीवर्गांत काय सांगण्यांत येईल याचीहि स्थूल योजना आखून ठाकावी. अशा या वर्गांत येणाऱ्या विद्यार्थ्यांनीं कोणतीं पुस्तकें वाचून यावीं याची सर्वांना अगाऊ समज देण्यांत यावी; म्हणजे शिक्षक कांहीं चांगलीं पुस्तकें वाचून येतील व मुख्यतः त्या पुस्तकांच्या आधारेंच चर्चा करण्यांत येऊन उजळणीवर्ग चालवितां येतील. या वर्गांमुळें पुष्कळ शिक्षकांना फायदा झाल्याचें दिसून येईल. आम्हीं मागें सूचित केलेले शिक्षणाचे वर्ग किंवा केंद्रें अस्तित्वांत आलीं तर त्यांचाहि या कामीं उपयोग होईल.

(ब) शिक्षकांच्या सभा, परिषदा व शिक्षक-सप्ताह:—शिक्षणविषयाचा विचार करण्यासाठीं वेळोवेळीं निश्चित कार्यक्रम आखून ठिकठिकाणच्या केंद्रांतून शिक्षकांच्या एक किंवा दोन दिवस चालणाऱ्या सभा, परिषदा भरविण्यांत याव्यात. त्याचप्रमाणें शिक्षणसप्ताहहि दिवाळीच्या सुटीसारख्या सुटींत भरविण्यांत यावेत. या सभा, परिषदा किंवा सप्ताह यांत निरनिराळ्या शिक्षणविषयांसंबंधीं चर्चा करण्यांत यावी. त्याचप्रमाणें अनुभवी शिक्षकांकडून किंवा इतर तज्ज्ञांकडून नमुन्याचे पाठहि देण्यांत यावेत. अशा सभापरिषदांमध्यें कांहीं वेळ पालकांना किंवा बोर्डाच्या किंवा स्कूलकमिटीच्या सभासदांनाहि पाचारण करून, त्यांच्याशींहि शाळेसंबंधीं अनेक बाबींची चर्चा करण्यांत यावी; म्हणजे गैरसमजाचीं अभ्रें नाहींशी होऊन सलोख्याचें, स्नेहाचें व सहानुभूतीचें वातावरण निर्माण होईल.

या अशा प्रसंगीं जो शिक्षक चांगला पाट देईल किंवा चांगली चर्चा करील त्याला प्रशस्तिपत्रें देण्यांत यावीं. या परिषदा दर वर्षाला प्रत्येक तालुक्यांत भरविण्यांत याव्या. दर दोन वर्षांला जिल्ह्याच्या एका भागांत भरविण्यांत याव्यात व तीन वर्षांनीं एकदा जिल्हा परिषदा म्हणून भरविण्यांत याव्यात.

अशा कार्यासाठीं कांहीं वर्गणी जमविण्यांत यावी व कांहीं खर्च स्थानिक संस्थांनींहि करावा. त्याचप्रमाणें चांगली शाळा ठेवणारास किंवा गांवांत उपयुक्त ग्रामोद्धाराचें किंवा प्रौढशिक्षणाचें कार्य करणाऱ्या शिक्षकांसहि प्रशस्ति-पत्रें देण्यांत यावींत; म्हणजे त्यांनाहि उत्तेजन मिळेल.

(क) **फिरतीं वाचनालयें:**—शिक्षकांना निरनिराळ्या विषयांवरचीं पुस्तकें वाचण्याची सवय लावणें जरूर आहे. हल्लीं फारच थोडे शिक्षक क्रमिक पुस्तकांशिवाय इतर पुस्तकांस हात लावतात व त्यामुळें त्यांची जगाविषयीं-चींच नव्हे तर स्वतांच्या धंद्याशीं निगडित असलेल्या प्रश्नांविषयींची माहिती फारच तुटपुंजी व असमाधानकारक असते. खेडेगांवांत पुस्तकें मिळत नाहींत व शिक्षकांना स्वतांच्या खर्चानें पुस्तकें विकत घेण्याची ऐपत नसते हीं दोन कारणें नेहमीं पुढें येतात.

या दोन्ही अडचणींवर उपाय म्हणून स्थानिक संस्थांनीं फिरतीं वाचनालयें सुरू करणें जरूर आहे. या फिरत्या वाचनालयांत शिक्षकांना उपयोगी असा एक पुस्तकांचा गट असावा व दरशिक्षकानें दरमाही किंवा सहामाही अगर वार्षिक अहवालाच्या वेळीं शाळेसंबंधीं माहिती पाठवितांना फिरत्या वाचनालयांतील किती पुस्तकें वाचलीं याची नांवनिशीवार यादी पाठवावी. शाळा तपासण्यास जाणाऱ्या तपासनीसानें शिक्षकानें वाचलेल्या पुस्तकां-संबंधीं त्याच्याशीं तपासणीच्या वेळीं दोन तास चर्चा करून, त्याबाबत आपला अभिप्रायहि तपासणी-शेऱ्यांत नमूद केल्यास इष्ट असा परिणाम होण्यास विलंब लागणार नाहीं.

(ड) **शिक्षकांसाठीं पाक्षिक किंवा मासिक:**—मुंबई प्रांतांत एकंदर मराठी, गुजराथी व कानडी अशा तीन भाषा आहेत. प्रत्येक भाषा ज्या जिल्ह्यांतून बोलली जाते त्या जिल्ह्यांच्या स्कूल बोर्डांचा एक संघ तयार करून, त्या संघामार्फत एक पाक्षिक किंवा निदान मासिक काढण्यांत यावें. या नियतकालिकांत प्राथमिक शिक्षणाच्या प्रश्नाची चर्चा तज्ज्ञामार्फत करण्यांत यावी. त्याचप्रमाणें निरनिराळ्या शिक्षकांकडूनहि महत्त्वाचें लिखाण आल्यास त्यासहि त्यांत प्रसिद्धि देण्यांत यावी. परदेशांतील व विशेषतः पाश्चिमात्य देशांतील शिक्षणाबाबत करण्यांत आलेल्या सुधारणांचीहि ताजी माहिती देण्यांत यावी व शिक्षकास उपयुक्त अशी इतरहि योग्य ती माहिती देण्यांत यावी. हें नियतकालिक प्रत्येक शिक्षकास देण्यांत यावें. प्रत्येक

शिक्षकाकडून वार्षिक एक रुपया घेऊन बाकी येणारा खर्च स्कूलबोर्डानें करावा. प्रत्येक स्कूलबोर्डासाठीं एक किंवा दोन पानें राखून ठेवण्यांत यावींत व त्या पानांवर प्रत्येक स्कूल बोर्डाच्या आपल्या हद्दींतील सर्व शिक्षकांस उद्देशून काढलेले हुकूम किंवा सूचना छापण्यांत याव्यात; म्हणजे त्यांचा बराच खर्च वाचेल. भोपावार स्कूलबोर्डांचे संघ करून त्यांच्यामार्फत याप्रमाणें नियतकालिक चालविल्यास एकंदर खर्च कमी येऊन निरनिराळ्या बोर्डांचें सहकार्य वाढेल व इतर बोर्डांत काय काय नवीन उपक्रम सुरू करण्यांत येत आहेत, याची सर्व बोर्डांना माहिती मिळेल व सामुदायिक अडचणी सामुदायिक प्रयत्नानें सोडविणें शक्य होईल.

यदाकदाचित् असे संघ करून त्यांमार्फत एखादें नियतकालिक चालविणें शक्य झालें नाहीं, तरी निराश होऊन न बसतां प्रत्येक स्कूल बोर्डानें आपल्या पुरतें एखादें नियतकालिक चालविणें अत्यंत जरूर आहे. अशा नियतकालिकाचा शिक्षकाचें ज्ञान वाढविण्यासाठीं, त्याला लिहिण्याची संवय करण्यासाठीं व जिल्ह्यांतील शिक्षणक्षेत्रांत काय घडामोडी होतील त्याची नोंद करण्यासाठीं व सामुदायिक वटहुकूम (Circulars) सर्व शिक्षकांना कळविण्यासाठीं उपयोग करतां येईल. चांगल्या शिक्षकाचा गौरव व वाईट शिक्षकाला गुन्ह्याबद्दल केलेली शिक्षा, यांना प्रसिद्धि मिळून त्यामुळें चांगल्या शिक्षकांत ईर्षा व वाईट प्रवृत्तीच्या शिक्षकांत भीति उत्पन्न करतां येईल व अशा सर्व गोष्टी साधण्यासाठीं खर्चही फार येणार नाहीं. हल्लीं कांहीं खाजगी मासिकें व ट्रेनिंग संस्थांमार्फत कांहीं नियतकालिकें चालू आहेत. परंतु प्रत्येक शिक्षक तीं वाचीत नसल्यामुळें त्याचा तादृश उपयोग होत नाहीं, असें आलेल्या अनुभवानें म्हणावें लागतें.

२ शिक्षकाची नेमणूक, बढती व शिक्षा

शिक्षकाच्या शिक्षणाच्या प्रश्नाचा विचार केल्यानंतर त्याच्यासंबंधीं इतर प्रश्नांचाही विचार करणें जरूर आहे. शिक्षकाच्या शिक्षणाचा विचार करतांना शिक्षकाची नोकरी मिळण्यासाठीं उमेदवारांत किमान शैक्षणिक लायकी काय असावी लागते हें आपण पाहिलें आहेच. आतां इतर प्रश्नांचा विचार करूं—

नेमणूक—शिक्षकांच्या नेमणुका स्कूलबोर्डाकडून किंवा ॲडमिनिस्ट्रेटिव्ह

ऑफिसर यांजकडून करण्यांत येतात. दुय्यम (Assistant) शिक्षकांना नेमण्याचा अधिकार ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरला देण्यांत आला असून बाकीचे शिक्षक स्कूलबोर्डाला नेमतां येतात.* स्कूलबोर्डाला नियमानें दिलेल्या या अधिकारांत स्थानिक संस्थेला प्राथमिक शिक्षणाचा कायदा कलम २७ (३) खालीं नियम करून फेरबदल करतां येतो. ज्याची नेमणूक करावयाची त्या शिक्षकाचें वय सोळापेक्षां कमी व पंचवीसापेक्षां अधिक असतां कामा नये.

नवीन नेमलेल्या शिक्षकांस प्रथम हंगामी म्हणून नेमण्यांत येतें. कोणत्याही शिक्षकाला शक्य तों जास्तींत जास्त तीन वर्षें हंगामी म्हणून ठेवतां येतें. परंतु कायमच्या जागेंत स्पष्टपणें नेमणूक करण्यांत आल्यावांचून कोणाही शिक्षकास कायम करण्यांत येत नाहीं. एकंदर शिक्षकांच्या संख्येपैकीं साधारणपणें शेंकडा वीसपेक्षां अधिक शिक्षक हंगामी म्हणून ठेवतां येत नाहींत.§

शिक्षकांची नेमणूक करण्याचा अधिकार जो हा स्कूलबोर्डाकडे सोंपविण्यांत आला आहे त्या बाबतींत अनेक प्रकारची टीका ऐकूं येते.

या नेमणुका करतांना वशिलेबाजीला ऊत येऊन लांचलुचपतीचे प्रकार करण्यांत येतात, असा एक महत्त्वाचा आक्षेप ऐकूं येतो. या आक्षेपांत पुष्कळच तथ्य आहे असें दुःखानें कबूल करावें लागतें. या वशिलेबाजीच्या प्रकाराबद्दल 'शिक्षण, कारभार व हुकमत' या प्रकरणांत सविस्तर चर्चा केली आहे; त्यापेक्षां येथें जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं.

" शिक्षक नेमतांना जातवारीच्या तत्त्वावर विचार करण्यांत येतो व उमेदवाराच्या शैक्षणिक लायकीपेक्षां त्याच्या जातीचा विचार करूनच या नेमणुका करण्यांत येतात,"† असा दुसरा आक्षेप आहे. हा आक्षेप विशेषतः पुढारलेल्या वर्गांतील लोकांकडून करण्यांत येतो. या आक्षेपालाही उत्तर मागें दिलें आहेच. शेतकरी वर्गांतील मुलांच्या शिक्षणाचीं सूत्रें त्याच वर्गांत पैदा झालेल्या व खेड्यांतील जीवनाशीं समरस असलेल्या लोकांच्या हातांत असणें अत्यंत जरूर आहे असें आमचें मत आहे. या मताच्या समर्थनार्थ योग्य ते आधार देऊन सविस्तर चर्चाही आम्ही मागें केली आहेच. त्याच मुद्यांचा येथें पुनरुच्चार करण्याचें कारण नाहीं.

---

‡ प्रा. शि. नि. ४१ ब * नि ३४ अ § नि. ५६

† मुं. पं. रि. १९२२–२७, पा. ९१. व १९२७–३२, पा. ११४.

बढती, शिक्षा:——शिक्षकाची नेमणूक झाल्यानंतर त्याचें काम समाधानकारक असलें तर त्याला बढती देण्यांत येते, व त्याचें काम असमाधानकारक असलें तर त्याला कमीजास्त शिक्षा करण्यांत येते. दुय्यम शिक्षकांना बढती देण्याचा किंवा त्यांस शिक्षा देण्याचा अधिकार ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरला देण्यांत आला असून, बाकीच्या शिक्षकांना बढती किंवा शिक्षा देण्याचा अधिकार स्कूलबोर्डाकडे आहे. शिक्षा करतांना त्या शिक्षकाविरुद्ध असलेल्या आरोपांची किंवा तक्रारींची यादी करून त्याला, त्याचें त्याबाबतींत काय म्हणणें आहे तें सांगण्याची, संधि द्यावी लागते,¶ व त्याचा खुलासा समाधानकारक न वाटल्यास त्याच्या गुन्ह्याच्या स्वरूपाप्रमाणें त्याला लहानमोठी शिक्षा करण्यांत येते. बदली करणें, पगारवाढ बंद करणें, त्याचा दर्जा कमी करणें किंवा गुन्हा अतिशय वाईट स्वरुपाचा असल्यास त्याला नोकरींतून कमी करणें याप्रमाणें शिक्षेचे प्रकार असतात.

शिक्षा म्हणून एखाद्या शिक्षकास कमी केल्यास व तो प्रा. शि. कायदा कलम ८ प्रमाणें सरकारकडून बोर्डाच्या अधिकाराखालीं आलेला असल्यास, त्यास आपल्या शिक्षेविरुद्ध सरकारकडे अपील करतां येतें, व तो बोर्डानेंच नेमलेला नोकर असल्यास त्याला स्थानिक संस्थेकडे अपील करतां येतें.

३ शिक्षकाचा योगक्षेम

शिक्षकाचा योगक्षेम चालण्यासाठीं हल्लीं काय व्यवस्था आहे, व यापुढें काय करावयास पाहिजे याचा आतां विचार करू.

पगार:—शिक्षकाला सर्वांत महत्त्वाची वाटणारी बाब म्हणजे पगार व इतर मुशाहिरे वगैरेंची ! प्राथमिक शाळेंतील शिक्षकांसाठीं सरकारनें हल्लीं पगाराचीं दोन स्केल्स् ठरविलेलीं आहेत. १९२३ चे पूर्वी जे शिक्षक कायम नोकरींत होते त्यांना १९२४ सालीं मंजूर केलेल्या स्केलनें पगार देण्यांत येत असून १९२३ नंतर कायम झालेल्या शिक्षकांस १९२९ सालीं सरकारनें मंजूर केलेल्या स्केलनें किंवा सरकारच्या पसंतीनें स्थानिक संस्थांनीं मंजूर केलेल्या दरानें पगार देण्यांत येतो. १९२९ सालानंतर नोकरीस लागलेल्या शिक्षकांसाठीं नवीन कमी पगाराचें स्केल तयार करण्याचा विचार असून

¶ मुं. सि. सर्व्हिस, नि. १६५ अ, Rule 55 of Financial Publication of Government of Bombay, vol. VIII.

अशा शिक्षकांना सरकारच्या हुकमाप्रमाणें कमी दरानें तूर्त पगार देण्यांत येत आहे. ‡

या पगाराच्या स्केलप्रमाणें व्हर्न्याक्युलर फायनल व पहिल्या, दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षाच्या शिक्षकांस निरनिराळ्या दरानें पगार देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

लोकलबोर्डाच्या हद्दींतील शिक्षकांच्या पगाराचें स्केल म्युनिसिपालिटीच्या हद्दींतील शिक्षकांपेक्षां कमी आहे व मुंबई कार्पोरेशननें आपल्या हद्दींत, मुंबईंतील महागाईच्या रहाणीचा विचार करून, जादा दराचे पगार मंजूर केले आहेत.

'आपणांस मिळणारे पगार फार अपुरे आहेत ते वाढविण्यांत यावेत,' अशी शिक्षकवर्गाची तक्रार असून त्यांचे पाठिराखे त्या तक्रारीला दुजोरा देत आहेत. 'साठे–परांजपे योजनेप्रमाणें आपणांस पगार देण्यांत यावा' अशी या शिक्षकवर्गाची मागणी आहे. उलट, 'शिक्षकांना पगार फार आहेत ते कमी करण्यांत यावेत' असेंहि लोक आतां बोलूं लागले आहेत.* या दोन्ही पक्षांच्या म्हणण्याचा आपण विचार करू.

शिक्षकांना हल्लीं मिळणारे पगार जास्त आहेत का कमी आहेत याचा विचार करतांना पूर्वीची स्थिति काय होती हें पाहणेंही अत्यंत जरूर आहे.

बिगरसरकारी शाळेंतील शिक्षकांस वेतन कोणत्या रूपानें मिळत असे तें आपण पाहिलें आहेच.† लोकल फंडावर चालणाऱ्या शाळांतील शिक्षकांस पगार काय मिळत असे याची हंटर कमिशननें पहाणी केली होती. त्या पाहाणीप्रमाणें मुंबई प्रांतांतील 'सेस शाळांतील' एकंदर शिक्षकांपैकीं शेंकडा ५९ लोकांस दरमहा दहा रुपयांपेक्षां जास्त पगार मिळत नसे. शाळेच्या मुख्य शिक्षकास त्या शाळेंत पास होणाऱ्या मुलांच्या संख्येवर व सरासरीनें हजेरीच्या संख्येवर कांहीं विशिष्ट प्रमाणांत जादा रक्कम देण्यांत येत असे व त्यामुळें पगार व ही अशी मिळणारी रक्कम मिळून त्याच्या जागेच्या किमान पगाराच्या दुप्पट रक्कम चांगल्या मोठ्या शाळेंतील शिक्षकांस मिळवितां येत असे. आजच्याप्रमाणें त्या वेळींहि खेड्यांतील शिक्षकांना पोस्टाचें काम करून

---

‡ मु. शि. रि. १९३५-३६, पा. ४९.

* ता. १०।११ जुलै १९३७ रोजीं सर कूपर यांनीं बोलाविलेल्या सभेचा वृत्तान्त, पा. ४१.

† मागें पान ७२.

आपल्या मिळकतींत भर टाकतां येत असे; मुख्य शिक्षकास रुपये ६० पेक्षां अधिक पगार फारच क्वचित् देण्यांत येत असे.

प्रत्येक स्थानिक सस्थेच्या अमलांत देण्यांत येणाऱ्या पगाराचें स्केल घेऊन त्याची तपशीलवार चर्चा करणें शक्य नाहीं. एकंदर मुंबई प्रांताच्या पगाराच्या सरासरीचे आंकडे घेऊनच या ठिकाणीं चर्चा करणें जरूर आहे.

मतकालांत आपल्या प्रांतांतील शिक्षकांना जो पगार मिळत होता, तो हल्लींच्या पगाराशीं तुलना करतां फारच कमी होता हें आपण पाहिलें आहेच. आतां वर्तमानकाळीं शिक्षकांना जो पगार मिळतो, त्याची इतर प्रांतांतील शिक्षकांच्या पगाराशीं तुलना करणें आवश्यक आहे. हारटॉग कमिटीनें आपल्या अहवालाच्या पान ६४ वर निरनिराळ्या प्रांतांतील शिक्षकांना मिळणाऱ्या पगाराची सरासरी दाखविणारा तक्ता दिला आहे, तो या खालीं दिला आहे.

निरनिराळ्या प्रांतांतील पगारांची सरासरी दाखविणारा तक्ता नं. ३२

	रु. आ. पै.		रु. आ. पै.
मद्रास	१५ – ४ – ०	ब्रह्मदेश	३ – ३ – १०
मुंबई	४७ – ० – ०	बिहार-ओरिसा	११ – ५ – ०
बंगाल	८ – ६ – ६	मध्यप्रांत	२४ – ८ – ०
संयुक्तप्रांत	१८ – ८ – ०	आसाम	१४ – ४ – ०
पंजाब	२५ – ८ – ०		

प्रत्येक प्रांतामध्यें परिस्थितींत कांहीं कमीजास्त फेरबदल असून त्याचा या पगाराच्या सरासरीवर परिणाम झाला आहे, असें मानलें तरी हे आंकडे स्थूलमानानें वस्तुस्थितिनिदर्शक आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं.

या तक्त्यावरून इतर प्रांतांपेक्षां मुंबई प्रांतांतील शिक्षकांना किती जास्त पगार मिळत आहे याची कल्पना येईल.

सन १९२४ सालीं शिक्षकांसाठीं पगाराचें स्केल ठरविल्यानंतरहि शिक्षकांनीं व शिक्षकांच्या इतर कैवाऱ्यांनीं शिक्षकांच्या उपासमारीबद्दल ओरड करण्यास सुरवात केली. १९१९ च्या सुधारणांच्या कायद्यामुळें मतदानाचा हक्क विस्तृत झाला व कायदे–मंडळांत लोकप्रतिनिधीसाठीं अनेक जागा निर्माण करण्यांत आल्या. या निवडणुकीचा फायदा घेऊन आपलें महत्त्व वाढविण्यासाठीं सुशिक्षित अशा शिक्षकवर्गानें आपली संघटना केली. या

संघटनेच्या जोरावर त्यांनीं एकमुखानें केलेल्या मागणीला हलके हलके महत्त्व येऊं लागलें.

१९१९ च्या सुधारणेच्या कायद्यानंतर १९२३ सालीं लोकल-बोर्ड कायदा व प्राथमिक शिक्षणाचा कायदा, असे दोन कायदे नवीन कायदे मंडळामार्फत पास करण्यांत आले. या कायद्यांमुळें स्थानिक स्वराज्यांतही निवडणुकीच्या तत्त्वाला महत्त्व देण्यांत आल्याकारणानें संघटित अशा शिक्षकवर्गाला अधिक राजकीय महत्त्व प्राप्त झालें. खेड्यांत पुष्कळ वेळां, सर्वांत अधिक शिकलेला मनुष्य या नात्यानें, शिक्षकाला महत्त्व असतें. त्याचप्रमाणें आपल्या मुलांचा शिक्षक या नात्यानेंहि गरीब व भाबडे पालक शिक्षकाच्या सांगण्याप्रमाणें वागतात. आपल्या हिताचा विचार करून मत कोणाला द्यावें हें ठरविण्याची पात्रता अद्यापहि शेतकरी वर्गाला आली नाहीं, व त्यामुळें त्यांचे हिशेबांत मतदानाचें खरें महत्त्व अद्याप जमा नाहीं. दुसऱ्याला स्वतःच्या खिशांतील विडी देतांना विचार करणारा शेतकरी आपलें 'मत' देतांना मुळींच विचार करीत नाहीं, व त्यामुळें मास्तरनें 'अमक्याला' मत द्या असें सांगितल्यानंतर 'बरं बुवा' असें म्हणून शेतकरी पालक त्याप्रमाणें मत देऊन मोकळा होतो. अद्यापहि ही परिस्थिति अस्तित्वांत आहे. मग मतदान-हक्क-प्राप्तीच्या आरंभींच्या कालांत काय स्थिति असेल त्याची वाचकांनींच कल्पना करावी !

याप्रमाणें या स्थितीचा फायदा शिक्षकवर्गानें स्वतःचें महत्त्व वाढविण्यासाठीं व पर्यायानें आपला स्वार्थ साधण्यासाठीं घेतला. शिक्षकवर्गानें व त्यांच्या मदतीवर निवडून येण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या कैवाऱ्यांनीं 'पगार कमी, पगार कमी' अशी ओरड सुरू करतांच त्यांच्या मतांवर कायदेमंडळांत निवडून गेलेल्या प्रतिनिधीनींहि त्यांच्या ओरडीला दुजोरा देऊन सरकारला हैराण करण्यास सुरवात केली. या सर्व ओरडीचा परिणाम होऊन साठेपराजंपे योजनेचा जन्म झाला. या योजनेप्रमाणें शिक्षकांच्या पगाराची किमान मर्यादा रु. २० व कमाल मर्यादा रु. १०० अशी ठरविण्यांत आली व या योजनेचा पहिला हप्ता म्हणून शिक्षित (Trained) शिक्षकांना त्यांच्या वर्गाच्या किमान दराप्रमाणें १९२१ सालीं पगार देण्यांत आला व बिगर शिक्षित शिक्षकांना खालील दरानें पगार देण्यांत आला.

(१)	व्ह. फा.	परीक्षा पास न झालेले दुय्यम शिक्षक ...	२० रु.
(२)	,,	परीक्षा पास न झालेले मुख्य शिक्षक ...	२५ रु.
(३)	,,	परीक्षा पास झालेले पण बिगर–शिक्षित दुय्यम शिक्षक	२५ रु.
(४)	,,	परीक्षा पास झालेले पण विगर–शिक्षित मुख्य शिक्षक	३० रु.

ही योजना १९२०–२१ सालीं झाली. ती तयार करणारांपैकीं रँगलर परांजपे हे पुढें शिक्षणमंत्री झाले. शिक्षणमंत्री झाल्यानंतर आपल्या योजनेप्रमाणें शिक्षकांना पगार देण्यास सरकारजवळ पैसा नाहीं, हें त्यांना दिसून आलें. कारण, त्यावेळीं नोकरींत असलेल्या लोकांनाच या योजनेप्रमाणें किमान पगार देण्यासाठीं २०·१ लाख रुपये अधिक लागतील, असें दिसून आलें. हे इतके पैसे दरसाल कोठून आणावयाचे ?

सरकारच्या थैलीचा विचार केल्यानंतर आपल्या योजनेची अव्यवहार्यता डॉ. परांजपे यांना दिसून आल्यामुळें, त्यांनीं १९२४ त नवीन स्केल तयार केलें.

याप्रमाणें साटे-परांजपे योजना बाजूला सारली जाऊन त्या ठिकाणीं कमी पगाराचें स्केल करण्यांत आलेलें पाहातांच शिक्षकवर्ग व त्यांचे पुरस्कर्ते यांनीं पुन्हां एकच हाकाटी सुरू केली. याच सुमारास १९२३ च्या लोकल-बोर्डाच्या व प्राथमिक शिक्षण कायद्यामुळें निवडणुकीच्या रणक्षेत्रांत उतरलेल्या लोकांनीं, शिक्षकांची निवडणुकीचे कामीं अत्यंत फलप्रद होणारी सहानुभूति मिळविण्यासाठीं, शिक्षकांच्या सुरांत सूर मिळविला, व या एकमुखी जोरदार चळवळीपासून फायदा होऊन ॲडव्होकेट सुर्वे यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमण्यांत आली. ही कमिटी सुर्वे–कमिटी म्हणून प्रसिद्ध आहे.

या कमिटीच्या शिफारशीप्रमाणें मुख्य शिक्षकांस शाळेंतील मुलांच्या संख्येवर अवलंबून रहाणारा असा पांच रुपयांपासून २५ रुपयांपर्यंत वाढणारा ॲलॉवन्स मंजूर करण्यांत आला. त्याचप्रमाणें मोठ्या शाळेंतील पहिल्या मदतनीस (Assistant) शिक्षकांसहि ॲलॉवन्स देण्याचें ठरविण्यांत आलें. याप्रमाणें हे जादा ॲलॉवन्स देण्याचें कारण म्हणून " या शिक्षकांना जादा

जबाबदारी संभाळावी लागते म्हणून त्यांना जादा वेतन मिळणें जरूर आहे व त्यांच्या विशेष गुणालाहि खास मान्यता मिळणें आवश्यक आहे,"* असें सांगण्यांत आलें. या ॲल्लॉवन्सला 'हजेरी–ॲल्लॉवन्स' म्हणून संबोधण्यांत येतें.

याप्रमाणें हजेरी–ॲल्लॉवन्स सरकारनें मंजूर केला. हा ॲल्लॉवन्स मंजूर करतांनाहि तारीख १।३।२३ ते २८।२।२५ पर्यंत एक दर व तारीख १।३।२५ पासून दुसरे दर ठरविण्यांत आले.

१९२४ सालीं जें पगाराचें स्केल करण्यांत आलें त्याप्रमाणें पगार, ३०।६।२३ रोजीं ज्या शिक्षकांची, लोकल बोर्ड किंवा म्युनिसिपल कायम जागेवर नेमणूक झालेली होती त्यानांच मिळावयाचा होता. त्यानंतर कायम झालेल्या शिक्षकांना लोकल-बोर्ड किंवा म्युनिसिपालिटी, सरकारी मंजुरीनें ठरवील त्या स्केलप्रमाणें पगार मिळेल, असें सांगण्यांत आलें. लोकल-बोर्डांना व म्युनिसिपालिट्यांना पगाराचें स्केल ठरविण्याचा हक्क देतांना त्या स्केलच्या किमान व कमाल पगाराच्या प्राथमिक शिक्षणाचे नियमांत आखून दिलेल्या मर्यादा न ओलांडण्याचें बंधन त्यांच्यावर लादण्यांत आलें, व अखेर सरकारनें १९२९च्या जुलै महिन्यांत ता.३०।६।१९२३ नंतर नेमलेल्या शिक्षकांसाठीं पगाराचें स्वतंत्र स्केल तयार करून लोकल-बोर्डांना व म्युनिसिपालिट्यांना द्यावयाच्या मदतीचा आकडा ठरवितांना या स्केलप्रमाणें आकारणी करण्यांत येईल, असेंहि जाहीर केलें.

वर दिलेल्या माहितीवरून शिक्षकांचे पगारांत कसा व कोणत्या कारणानें फेरबदल होत गेला याची वाचकांना कल्पना येईल.

एकंदर सर्व परिस्थितीचा विचार करून शिक्षकांना वाजवीपेक्षां जास्त पगार देण्यांत आला आहे असें आमचें मत झालें आहे. असें हें मत होण्याचीं कारणें यापुढें थोडक्यांत दिलीं आहेत.

(१) हल्लीं शिक्षकांना जो पगार ठरविण्यांत आला आहे तो त्यांच्या जबाबदारीचा व शैक्षणिक लायकीचा विचार करून ठरविण्याऐवजीं त्यांच्या वाढत्या राजकीय वजनाला बळी पडून ठरविण्यांत आला आहे.

राष्ट्रीय चळवळीच्या वाढत्या जोराला पायबंद घालण्याच्या राजकीय हेतूनें पूर्वीच्या नोकरशाहीनें १९२१च्या असहकारितेच्या चळवळीमुळें

---

* मुं. पं. रि. १९२२–२७, पा. ७९.

बिचकून आपल्या देशी नोकरांना खूष करण्याच्या इराद्यानें इतर सर्व खात्यांतील पगारांत भरमसाट वाढ केली. त्यामुळें इतर खात्यांच्या खर्चाची अत्यंत वाढ होऊन राष्ट्रास उपयोगी खात्यांची उपासमार झाली.

इतर खात्यांतील नोकरांच्या पगारवाढीमुळें शिक्षकवर्गांत स्वतःच्या पगाराबद्दल असंतोष वाटूं लागला व त्यामुळें त्यांनींही आपला पगार वाढवावा म्हणून चळवळ सुरू केली व नवीन राजघटनेमुळें त्यांना राजकीय महत्त्व प्राप्त होऊन त्यांचा हेतु सिद्धीस जाण्यास मदत झाली. प्रांतांच्या एकंदर राज्यकारभारांत इतर खात्यांसाठीं उत्पन्नाचा सर्वांत जास्त हिस्सा खर्ची पडून शिक्षणाप्रीत्यर्थ अल्पशः रक्कम खर्ची घालण्यांत येऊं लागली व या अपुऱ्या रकमेपैकीं सर्वांत अधिक मोठा भाग शिक्षकांच्या पगार वटवड्यांतच नाहींसा होऊन बाकी फार थोडी रक्कम बाकीच्या इतर महत्त्वाच्या बाबींच्या वांट्याला येऊं लागली.

या सर्व गोष्टींचा शिक्षणाच्या प्रगतीवर परिणाम होऊन टाईम स्केलच्या वाढत्या बोजामुळें नवीन शाळा उघडणेंही कठीण पडूं लागलें व त्यामुळें शिक्षकांची आर्थिक स्थिति सुधारली तरी शिक्षणाची प्रगतीच खुंटली.

(२) शिक्षकांचा पगार राजकीय कारणांमुळें ठरविण्याच्या ऐवजीं एकंदर देशाची आर्थिक स्थिति पाहूनच ठरविणें अत्यंत जरूर आहे.

आपल्या देशाचें दरमाणशीं वार्षिक उत्पन्न सुमारें चार पौंड म्हणजे हुंडणावळीच्या हल्लींच्या भावाप्रमाणें रु. ५५ पडतें.§ हा उत्पन्नाचा अंदाज शहरांतील मोठमोठ्या लोकांचें उत्पन्नही जमेंत धरून केला आहे. शहरांतील श्रीमंत लोकांच्या उत्पन्नाचा आंकडा वगळून एकूण खेड्यांतील बहुसंख्यांक शेतकरी वर्गाचें दरमाणशीं वार्षिक उत्पन्न रु. २०·८ पडतें. यांतूनच शेतकरी वर्गाला कर, खंड व जकात भागवून आपला उदरनिर्वाहही करावा लागतो.†

याप्रमाणें शेतकऱ्यांचें वार्षिक उत्पन्न असतांही आपल्या प्रांतांतील शिक्षकाला दरमहाचा सरासरीनें पगार रु. ४७ पडतो. म्हणजे आमच्या प्रत्येक शिक्षकाचें सरासरीनें वार्षिक उत्पन्न रुपये ५६४पडतें. शेतकरी व शिक्षक यांच्या उत्पन्नाच्या आकड्याचा विचार केल्यानंतर शिक्षक शेतकऱ्यापेक्षां आर्थिकदृष्ट्या कितीतरी पटीनें अधिक सुखी असल्याचें दिसून येतें. आमच्या शिक्षकांना

---

§ हरिजन, २१-८-३७ पा. २१८.

† The modern Indian Peasant III, P. 59.

शेतकरीवर्गानें दिलेल्या करांतूनच्च पगार मिळतो. या शेतकऱ्याचें दररोज ७ पै उत्पन्न असून त्यांचा पगार घेणाऱ्या शिक्षकाचा सरासरीनें दररोजचा पगार सुमारें रु. १–९–० पडतो. नवराबायको व तीन मुलें याप्रमाणें एक कुटुंब धरल्यास दरमाणशीं ७ पै प्रमाणें या पांच माणसांचें सरासरीनें दररोजचें उत्पन्न ३५ पै म्हणजे सुमारें ३ आणे पडतें. शिक्षकाचें तेवढ्याच माणसांचें कुटुंब आहे असें मानलें व ही सर्व माणसें पगारावर म्हणजे दररोज पडणाऱ्या रु. १–९–० वर अवलंबून आहेत असें म्हटलें तरी त्या प्रत्येक माणसाला रोज पांच आणे वांट्याला येतात. शेतकरी दररोज दर माणशीं सात पैवर जगतो, व शिक्षकाच्या कुटुंबांतील माणसाला रोज पांच आणे पडले तरी तो 'उपाशी' म्हणून आम्ही ओरड करतों. पगार देणारा मालक चटणीभाकरीला महाग झाला असून नोकर पोळीवर तूप मिळावे म्हणून ओरड करून राहिलेले आहेत ! अपुरी असलेली चटणीभाकर मिळण्यासाठीं खेड्यांतील माणसाला उन्हातान्हांत व थंडीपावसाळ्यांत, गुडघाभर चिखलांत उभें राहून कष्ट करावे लागतात. शिक्षकाला नियमित काल सावलींत बसून नोकरी करावी लागते. कष्ट करूनही शेतकऱ्याला 'पाऊस पडेल का, पीक येईल का,' अशी पोखरून टाकणारी काळजी नेहमीं करावी लागते; व अनेक वेळा त्याच्या हातांत कष्टाचा मोबदलाही मिळत नाहीं. शिक्षकाला इमानानें नोकरी केली न केली तरी नियमित पगार बिनचूक मिळतो.

प्राथमिक शिक्षकाची सर्वांत अधिक अशी शैक्षणिक लायकी म्हणजे ट्रेनिंग कॉलेजच्या तिसऱ्या वर्षाची परीक्षा. परंतु त्याच्या या एकंदर शिक्षणक्रमाला लागणाऱ्या वर्षांचा विचार केल्यानंतर ही लायकी असलेला शिक्षक इंग्रजी सहावीची परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्याच्या दर्जाचा ठरतो. हल्लीं मॅट्रिकची परीक्षा पास झालेल्या लोकांनाही शिक्षकाला मिळणाऱ्या पगाराइतका पगार मिळत नाहीं. मग कमी शैक्षणिक लायकीच्या लोकांच्या बाबतींत ही सढळता कां ?

शेतकऱ्यांच्या कष्टमय जीवनाशीं व सुशिक्षित बेकारांच्या कंगालीच्या आयुष्याशीं तुलना केल्यानंतर प्राथमिक शाळेंतील शिक्षकाला वेतन जास्त मिळत नाहीं असें कोण म्हणूं शकेल ?

(३) मुंबई प्रांतांतील शिक्षकांना पगार वाजवीपेक्षां जास्त मिळत आहे हें दाखविण्यासाठी शेतकऱ्यांच्या स्थितीशीं तुलना केली. त्यावर कोणी म्हणेल कीं

इतर व्यवसायांतील स्थितीशीं तुलना करून शिक्षकाचा पगार ठरविणें बरोबर नाहीं. यावर 'मुंबई प्रांतांतील १९१९ च्या पूर्वी शिक्षकांची स्थिती काय होती व हल्लीं काय आहे याची तुलना करा'असें आम्हीं म्हणूं! हंटरकमिशनच्या वेळेला काय स्थिति होती तें आपण पाहिलें आहे. त्या वेळेपेक्षां किंवा १९१९ च्या पूर्वीच्या कालांतील शिक्षकांपेक्षां आजच्या शिक्षकांना जादा पगार कां असावा हें आम्हांस समजत नाहीं. नित्योपयोगी वस्तूंचे त्या वेळचे भाव व आजचे भाव यांची तुलना केली असतां आजचीच स्थिति बरी असें म्हणतां येईल. मग पगार कां जास्त ? यावर, आजच्या शिक्षकांच्या रहाणीचा दर्जा (Standard of living) वाढला आहे असें कोणी म्हणेल. परंतु या म्हणण्यांत मुळींच अर्थ नाहीं. आणि रहाणीचें मान वाढलें असें मानलें तरी मूळ पाया व मुख्य आधार असा शेतकरी समाज अधिकाधिक खोल खचत असतांना त्याच्यावर जगणाऱ्या वर्गाच्या रहाणीच्या दर्जाचा आम्हीं कां विचार करावा ?

नोकरवर्गाची वाढत्या खर्चाची रहाणी संभाळण्यासाठीं आम्हा त्यांना पगार वाढवावयाचा व त्यासाठीं पैसा गोळा करण्यासाठीं शेतकऱ्यांवर कर्जाचा बोजा वाढवून त्याला जगणेंहि मुष्कील करावयाचें, हा कोठला न्याय ? मांसाहारी माणसाच्या पोटासाठीं कोंबडी व बकरीं मारलीं जातात, त्याचप्रमाणें नोकरपेशाच्या लोकांच्या पोटासाठीं शेतकरी ठार केले जातात, हें आमच्या कधीं लक्ष्यांत येणार ? या वृत्तीला आम्हीं नेटकपणानें कधीं आळा घालणार ?

(४) मुंबई प्रांतांतील शिक्षकांनाच इतर प्रांतांतील शिक्षकांपेक्षां कितीतरी पटीनें अधिक पगार आहे, हें मागें दिलेल्या तक्त्यावरून लक्षांत आलें असेलच. हारटॉग कमिशननें निरनिराळ्या प्रांतांतील शिक्षकांच्या दरमहा पगाराच्या सरासरीचा तुलनात्मक जो तक्ता दिला आहे, त्याबाबत मुंबई सरकारनेंच आपल्या १९२७ ते ३२ च्या शिक्षणविषयक पंचवार्षिक अहवालाच्या पान १०१ वर खालील उद्गार काढले आहेत. " या आंकड्यावरून पाहातां मुंबई प्रांतांतील शिक्षकाला दरमहा सरासरीनें मिळणारा पगार हा मद्रासमधील शिक्षकाच्या दरमहा सरासरी पगाराच्या तिपटीपेक्षां, बंगालमधील शिक्षकाच्या दरमहा सरासरी पगाराच्या सहा पटीपेक्षां व बिहारओरिसामधील शिक्षकाच्या दरमहा सरासरी पगाराच्या चार पटीपेक्षां, अधिक आहे."

इतर प्रांतांतील प्राथमिक शिक्षकापेक्षां आमच्या शिक्षकांच्या गरजा जास्त आहेत का त्याची जबाबदारी जास्त आहे ?

(५) आमच्या शिक्षकांना पगार जास्त दिल्यामुळें प्राथमिक शिक्षणाचें खर्चाचें प्रमाण अतिशय वाढलें असून या वाढत्या खर्चामुळें शिक्षणाला पुढें पाऊल टाकतां येत नाहीं. १९१९ च्या पूर्वी प्रत्येक विद्यार्थ्यामागें जो वार्षिक खर्च येत असे त्याच्या तिपटीनें हल्लींचा खर्च वाढला आहे हें मागें दिलेल्या तक्त्यावरून वाचकांच्या लक्षांत आलें असेलच. त्याचप्रमाणें आपल्या प्रांतांतील विद्यार्थ्यांसाठीं येणारा वार्षिक खर्च इतर प्रांतांतील विद्यार्थ्यांसाठीं येणाऱ्या खर्चापेक्षां अनेक पटीनें जास्त आहे हेंहि दाखविलें आहे. हा जो जबर खर्च वाढला आहे त्याचें मुख्य कारण शिक्षकांना हल्लीं देण्यांत येणारें टाईम-स्केल आहे हें लक्षांत ठेवणें जरूर आहे.* शिक्षणावरील खर्च कमी करून तें बहुजन समाजाला सहज मिळेल अशी व्यवस्था करावयाची असेल तर आमच्या शिक्षकांचे पगार वाढविण्याची भाषा सोडून देशाच्या कल्याणासाठीं ते कमी करणें अत्यंत जरूर आहे. शिक्षकांचे पगार एकंदर परिस्थितीच्या मानानें कमी केल्यावांचून बहुजन समाजाला साक्षर करणें शक्य नाहीं.

हल्लीं शिक्षण फार खर्चाचें झालें आहे त्याबाबतींत दुमत नाहीं व हें शिक्षण स्वस्त करण्याबद्दल मागण्याहि येऊं लागल्या आहेत. परंतु एका तोंडानें शिक्षणावरील खर्च कमी करा असें म्हणून दुसऱ्या तोंडानें शिक्षकवर्गाला खूष करण्यासाठीं त्याचा 'पगार वाढवून आर्थिक स्थिति सुधारा'† अशा परस्पर-विरोधी मागण्या कांहीं लोक करूं लागले म्हणजे हंसावें कीं रडावें हेंच समजत नाहीं. ' बहुजन समाजाला साक्षर करा ' अशी मागणी करणारा मनुष्य, ज्यांच्या पगारवाढीमुळें शिक्षण अत्यंत महाग होऊन बहुजन समाजाला साक्षर करणें कठीण झालें आहे. त्या शिक्षकांना " कमी पगार मिळतो तरी तो वाढवावा ? " अशीही मागणी करूं लागतो‡ त्यावेळीं तो खरा बहुजन समाजाचा कैवारी आहे कीं, निवडणुकीच्या कामीं चोख मदत करणाऱ्या स्वहितदक्ष अशा, शिक्षकवर्गाचा कैवारी आहे हें ओळखणें अवघड होतें. शिक्षणाचा

---

* मुं. पं. रि. २२–२७ पा. ७४. मुं. पं. रि. २७–३२ पा. ९९.

† ता. १२।९।३७ रोजीच्या महाराष्ट्र शिक्षणपरिषदेचे ठराव ज्ञानप्रकाश ता. १४।९।३७

‡ मुंबई कायदेमंडळांतील जम्नादास मेहता यांचें भाषण. Times of India. 15–9–37.

सार्वत्रिक प्रसार करावयाचा असेल तर तें स्वस्त होणें जरूर आहे व शिक्षण स्वस्त करावयासाठीं इतर बाबींवरील खर्चाप्रमाणें शिक्षकाच्या पगाराला कात्री लावल्यावांचून दुसरा मार्गच नाहीं.

(६) टाईम–स्केल सुरू करण्यांत आल्यामुळें शिक्षणाचा दर्जा कमी झाला आहे. १९१९ पूर्वी टाईम-स्केल नव्हतें. निरनिराळ्या पगारांच्या जागा कांहीं ठराविक प्रमाणांत असत व वरच्या दर्जाच्या जागांपैकीं एखादी जागा रिकामी झाल्यानंतर खालच्या पायरीवरचा शिक्षक लायक ठरला तर त्याला वरच्या रिकाम्या झालेल्या जागेवर नेमण्यांत येत असे. ही निवड (Selection) पात्रता पाहून होत असल्यामुळें प्रत्येक शिक्षक मनापासून काम करून आपली पात्रता प्रस्थापित करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असे.

अर्थात् अशी निवड करतांना थोडाफार पक्षपात (Favouritism) ला वाव मिळत असे व निवड करणाराच्या स्वतःच्या अभिप्रायाला फारच महत्त्व येत अस, यांत कांहीं शंका नाहीं. हे दोष घालविण्यासाठीं टाईम-स्केल तयार करण्यांत आलें. परंतु त्यामुळें कालाच्या ओघावरोबर, आपण हातपाय हालविले नाहींत तरी, वढती घेत पुढें जाऊं अशी शिक्षकांना खात्री वाटूं लागली व त्यामुळें त्यांच्यांत वेपर्वाई, शैथिल्य व कामाविषयीं अनास्था उत्पन्न झाली. त्यामुळें कामाचा दर्जा कमी होऊन कार्यक्षमता रोडावली.

टाईमस्केलनें दुसरा एक तोटा झाला. पूर्वीच्या पद्धतीमध्यें निरनिराळ्या पगाराच्या ठराविक जागा असल्यामुळें शिक्षकाच्या पगारासाठीं येणाऱ्या खर्चाचा आकडा निश्चित असे, परंतु टाईमस्केलप्रमाणें सर्वच शिक्षकांच्या वाढत्या वयाबरोवर त्यांच्या पगारांत वाढ होत जाते व त्यामुळें एकंदर खर्चाचा आकडा दरसाल वाढूं लागतो व या वाढत्या खर्चाच्या वोजामुळें शिक्षणाची प्रगतीच खुंटते.

पूर्वीच्या पद्धतींत कांहीं किरकोळ दोष असले तरी दोन्ही पद्धतींतील दोषांचा विचार केल्यानंतर पूर्वीची पद्धतच वरी असें वाटूं लागतें. त्या पद्धतीतील दोष कमी करणाऱ्या उपायांची योजना केल्यास तीच पद्धत आर्थिक दृष्ट्या फायदेशीर होईल असें वाटतें.

(७) हल्लीं सार्धा व्ह. फा. ची परीक्षा पास झालेल्या शिक्षकाला व ट्रेनिंगचें पहिलें, दुसरें व तिसरें वर्ष झालेल्या शिक्षकांना निरनिराळ्या दरानें पगार देण्यांत येतो. हल्लीं लोकलवोर्डमार्फत व म्युनिसिपालिट्यांमार्फत जे

शिक्षक ट्रेनिंग कॉलेजमध्यें जाऊन शिक्षण घेतात त्यांना शिष्यवृत्ति (Stipend) देण्यांत येतें व त्यांचा शिक्षणाचा सर्व खर्च सरकारच सोसतें. अशा स्थितींत या शिक्षकांना जादा पगार कां देण्यांत येतो हें समजत नाहीं. या बाबतींत पुनर्घटना कमिटीनें आपल्या अहवालाच्या पा. १३१-३२ वर काढलेले खालील उद्गार विचारांत घेणें जरूर आहे

"We agree with the view expressed before us by Mr. Grieve that it is not necessary that every teacher who has received a second or third year's training should automatically be entitled to a higher rate of pay. This training has been obtained at no cost to himself and we see no reason why the general taxpayer should be called upon to pay a higher salary than is absolutely necessary to an employee who has received an additional training at his expense. In our opinion only a fixed percentage of second or third year trained teachers should only be entitled to the higher rates on vacancies occuring in these fixed percentages."

पुनर्घटना कमिटीची ही सूचना अमलांत आणली तर आमचा शिक्षणाचा खर्च पुष्कळच कमी होईल यांत कांहीं शंका नाहीं.

हजेरी–अॅलॉवन्स:––पगाराचा विचार केल्यानंतर हजेरी अॅलॉवन्सबद्दलही दोन शब्द लिहिणें जरूर आहे. हा अॅलॉवन्स कसा उत्पन्न झाला याची माहिती मागें दिलीच आहे. या अलावन्सवर प्रतिकूल अशी बरीचशी टीका झाली असून या अॅलॉवन्समुळें शिक्षकांमध्यें एकमेकांविषयीं असूया व द्वेष मात्र पसरला आहे. शाळेंतील हजेरी सर्व शिक्षकांच्या प्रयत्नांमुळें वाढत असतांना फक्त मुख्य मास्तर व मोठ्या शाळेंतील त्याला पहिला मदतनीस यांनाच हा अॅलॉवन्स देणें म्हणजे बाकीच्या शिक्षकांवर एकप्रकारचा अन्यायच करण्यासारखें आहे. सरकारलाहि हा अॅलॉवन्स सुरू केल्याबद्दल पश्चात्ताप झाला असून त्यांनीं ' १९३० चें एक डिसेंबर नंतर हा अॅलॉवन्स रद्द करण्यांस आपली हरकत रहाणार नाहीं ' असें जाहीरही करून टाकलें आहे व या घोषणेचा फायदा घेऊन तीन लोकल बोर्डांनीं व २५ म्युनिसिपल संस्थांनीं तो कायमचा रद्दही केला आहे.

पुणें डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डानें ता. ३०।६।१९२३ नंतर नेमलेल्या शिक्षकांस हा अॅलॉवन्स द्यावयाचा नाहीं असें ठरविलें आहे. आपला हजेरी-

ॲलॉवन्स कमी पडूं नये म्हणून, शाळेंतील हजर मुलांची संख्या रोडावल्या-नंतरही, खोटी हजेरी लिहिण्यासही कांहीं शिक्षक तयार होतात, हा ह्या ॲलॉवन्सचा अतिशय वाईट असा परिणाम झाला आहे. मुलांना नीतीचें शिक्षण देणाऱ्या शिक्षकांसच अनैतिक वर्तन करण्याचा मोह पाडणारा हा ॲलॉवन्स नाहींसा होणें इष्ट आहे.

शिक्षकांचा पगार कमी करण्यांत यावा व त्यांचा हजेरी-ॲलॉवन्सही बंद करण्यांत यावा असें सुचविलेलें पाहून अनेक शिक्षक व त्यांचे कैवारी आमच्या-वर रागानें कडाडतील याची आम्हांस कल्पना आहे. शिक्षकाच्या संसाराचा आम्ही मुळींच विचार केला नाहीं असाही आमच्यावर आरोप करण्यांत येईल.

उत्पन्नाचे इतर झरे:——शिक्षकांचा पगार कमी केला व त्यांना मिळ-णाऱ्या हजेरी-ॲलॉवन्सलाही तिलांजली दिल्यानंतर शिक्षकांची आर्थिक परि-स्थिति सुधारण्यासाठीं दुसरे मार्गच रहात नाहींत, असें नाहीं. हल्लीं कोणते इतर उत्पन्नाचे मार्ग उपलब्ध आहेत हें पाहून नवीन मार्ग कोणते काढतां येतील याचाही विचार करूं.

(१) खाजगी शिकवणी——शिक्षकाला हल्लींही दररोज दोन तास याप्रमाणें खाजगी शिकवणी करतां येते. शहरांत अनेक मुलांचे पालक श्रीमंत असल्या-मुळें शहरांतील बऱ्याच शिक्षकांना खाजगी शिकवणीचें चांगलेंच उत्पन्न झालें आहे. एवढेंच नव्हे तर श्रीमंत पालकांच्या मुलांची शिकवणी मिळावी म्हणून अनेक मुलांच्या शाळेंतील शिक्षणाकडेही जाणूनबुजून दुर्लक्ष्य करण्यांत येतें. अर्थात् त्या मुलांच्या अभ्यासांतील कच्चेपणा वाटून तो प्रगति-पुस्तकावरून पालकाच्या नजरेस येऊं लागला कीं, वर्गावरच्या शिक्षकास त्या मुलाच्या शिकवणीची सुपारी मिळावयास वेळ लागत नाहीं. या खाजगी शिकवणीचें शहरांत फारच बंड माजलें असून अनेक पालक त्यामुळें जेरीला आले आहेत. व त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा खर्च मनस्वी वाढला आहे. अनेक वेळां सर-कारी किंवा खाजगी शाळेंतील शिक्षकाला खाजगी शिकवण्यांची पूर्ण बंदीच करण्यांत यावी, असेंही वाटूं लागतें. शहरांतील ही सांथ तालुक्याच्या गांवीं, तेथून मोठ्या खेडेगांवांत, व आतां बारक्या खेड्यांतूनही फैलावली आहे. अर्थात् मुलांच्या शिक्षणाविषयीं आस्था बाळगणाऱ्या सुस्थितींतील पालकांची संख्या शहराबाहेर कमी असल्यामुळें या सांथीला आपोआप पायबंद बसला

आहे. परंतु जे थोडे पालक चांगल्या स्थितींत आहेत त्यांच्या गबर खिशाला खाजगी शिकवणीची तुंबडी लावण्यांत येते यांत कांहीं शंका नाहीं.

खाजगी शिकवणीची पद्धत बंद केली नाहीं तरी त्या पद्धतीवर काटेकोर निर्बंध लादून ती पालकांना जाचक होणार नाहीं याबद्दल दक्षता बाळगणें जरूर आहे.

(२) हल्लीं शिक्षकांना खेड्यांतील पोस्ट-मास्तरचें काम देण्यांत येतें. त्याच-प्रमाणें गांवांत को-ऑपरेटिव्ह सोसायटी असली तर तिच्या सेक्रेटरीचें काम करण्याची परवानगी देण्यांत येते, व त्यामुळें थोडीशी किफायत कांहीं शिक्षकांना होतेच.

(३) १९२३ च्या खेडेगांवांतील वैद्यकीय मदत (Village aid Scheme) योजनेप्रमाणें कांहीं शिक्षकांना खास शिक्षण देऊन गांवांतील लोकांना किरकोळ स्वरूपाचें 'दवापाणी' देण्याचें काम सांगण्यांत आलें आहे. त्या कामाबद्दल त्याला रु. ५ चें वेतन देण्यांत येतें. या योजनेप्रमाणें काम करणारे कांहीं शिक्षक स्वतःच हलगर्जीपणा दाखवून लोकांच्या मुळींच उपयोगीं पडत नाहींत, व त्यामुळें त्यांच्याकडे जाण्यास लोकही नाखुष असतात. उलट, कांहीं शिक्षक आपण डॉक्टरच आहोंत अशा समजुतीनें वागून लोकां-कडून फीचे पैसे उकळण्याची हांव धरतात. या दोन्ही प्रकाराला आळा बसेल अशी व्यवस्था करून ही पद्धत अधिक प्रमाणावर अमलांत आणण्यास हरकत नाहीं. अशा शिक्षकाला ग्रामपंचायतीच्या मार्फत वेतन देण्याची व्यवस्था केल्यास पंचायतीच्या चालकांची या कामावर देखरेख राहील. त्याच-प्रमाणें कोणाला औषध दिलें व कोणत्या रोगासाठीं दिलें यांची नोंद करण्यास सांगितल्यास या पद्धतीचा अधिक फायदा होतो. पुणें जिल्ह्यांत ही नोंद ठेवाव-यास सांगितल्यापासून फायदा झाल्याचें दिसून आलें आहे. दरमहा या नोंदीचा आढावा बोर्डाकडे पाठविण्याबद्दल शिक्षकांस सक्त सांगण्यांत येतें.

(४) हल्लीं कांहीं गांवांत रात्रींच्या शाळा चालविण्याबद्दलही शिक्षकांस ५ रु. प्रमाणें खास वेतन मिळतें. या रात्रीच्या शाळांबद्दल दुसरीकडे विचार केला आहे.

(५) कांहीं ठिकाणीं ग्रामपंचायती असून त्या पंचायतीच्या सेक्रेटरीचें काम शिक्षकांनाच सांगण्यांत येतें व त्याबद्दल त्याला पंचायतीच्या मगदुरा-प्रमाणें मोबदलाही मिळतोच.

(६) पालकांकडून भेटीच्या रूपानें अनेक शिक्षकांना भाजीपाला, धान्य,

दूध, तूप, किंवा क्वचित् पैसेही मिळतात. अर्थात् ही देणगी मिळणें शिक्षकांच्या वागणुकीवरच अवलंबून असतें. पालकांना आपल्याविषयीं प्रेम व आपलेपणा वाटेल अशा तऱ्हेची शिक्षकाची वागणूक असली तर त्याला या मार्गानें चांगलीच मदत मिळूं शकते. खेडेगांवांतील शेतकरी कितीही खालावले असले तरी ते खुष झाल्यानंतर त्यांच्यासारखा दुसरा दाता नाहीं.

(७) शिक्षकांच्या बायका शिकलेल्या असल्यास तर त्यांना शाळाखात्यांत नोकरी मिळते व मग नवराबायकोच्या दुहेरी उत्पन्नामुळें त्यांच्या संसाराची चांगली गरज भागून त्यांना दोन पैसे शिल्लकहि टाकतां येतात. शिक्षकांचा पगार वाढविण्याऐवजीं त्यांच्या बायका शिकलेल्या असल्या तर त्यांना प्रथम शाळाखात्यांत नोकऱ्या देण्यांत याव्यात; म्हणजे त्यांची आर्थिक सोय होऊन, अध्यापिकांचा जो तुटवडा जाणवत आहे तोही जाणवणार नाहीं. ज्या शिक्षकांच्या बायका कमी शिकलेल्या आहेत, त्यांनीं स्त्रियांना नोकरी मिळण्यास आवश्यक असलेलें शिक्षण घरीं देऊन, त्यांना लायक बनवावें, म्हणजे स्त्रीशिक्षणाचें पाऊलही पुढें पडेल. हंटरकमिशननें अशा अर्थाची मार्गेंच सूचनाही केली होती; परंतु त्या सूचनेचा योग्य विचार कोणींही केला नाहीं.

शिक्षकांच्या बायकांना अध्यापिकेचा धंदा करतां येईल; त्याचप्रमाणें अध्यापिका होण्याइतकी शिक्षणलायकी त्यांच्या ठिकाणीं नसल्यास त्यांना गांवदाईचें शिक्षण देऊन तें काम करूनही कांहीं मिळवितां येईल. तलाठ्यांच्या व शिक्षकांच्या बायकांना दाईचें काम सांगावें--शिकवावें–अशी एक योजना हल्लीं लेडी बुइल्सन मॅटर्निटी असोसिएशनपुढें विचारासाठीं आहे. शिक्षकाला कांहीं आर्थिक मदत देण्याची ही योजना आहे. या योजनेप्रमाणें प्रथमोपचारकांचें काम करणाऱ्या शिक्षकाची पत्नी जर दाई झाली तर त्या दोघांना गांवांतील अगर आजूबाजूच्या खेडुतांच्या उपयोगीं पडतां येऊन अनेक जीव वांचवितां येतील व या परमार्थाबरोबर स्वतःचा स्वार्थही साधतां येईल. शेतकरी बायकांमुलानिशीं शेतांत राबतो तेव्हां त्याला चतकोर भाकरी दिसते. याप्रमाणेंच शिक्षकानें व इतर नोकरपेशांतील माणसांनीं स्वतःच्या कुटुंबासह अर्थसंपादनासाठीं कष्ट करण्याचा उपक्रम करणें जरूर आहे. म्हणजे सर्वांच्या श्रमांचा मेहनताना एकत्र करून आर्थिक अडचण दूर करतां येईल. एकानें राबावयाचें व बाकीच्या मंडळींनीं बसून खावयाचें, ही आमची वागणूक बदलणें अत्यंत जरूर आहे.

४ शिक्षकांवरील जबाबदारी

शिक्षकांवर राष्ट्राच्या प्रगतीच्या दृष्टीनें विविध प्रकारची जबाबदारी आहे. ही सर्व जबाबदारी शिक्षकवर्गाच्या हातून योग्य प्रकारें पार पडली तरच राष्ट्राचा अभ्युदय लवकर होईल व या जडजोखमीच्या जबाबदारीची हलगर्जीपणानें, अनास्थेनें, हेळसांड झाली तर राष्ट्राची पिच्छेहाट होईल. प्रत्येक शिक्षकाला स्वत:च्या पवित्र कर्तव्याची, जबाबदारीची पूर्ण जाणीव असणें अत्यंत जरूर आहे. जबाबदारीची कल्पनाच नसल्यावर तिचें पालन कसें होणार? या अनेक प्रकारच्या जबाबदारीचें स्वरूप काय आहे याचें शक्य तितक्या संक्षेपानें विवेचन करूं.

शिक्षक व शाळा:—प्रत्येक शिक्षकाला स्वत:च्या शाळेविषयीं आपलेपणा व कळकळ वाटली पाहिजे. आपली शाळा नमुनेदार करण्यासाठीं प्रत्येक शिक्षकानें अहर्निश प्रयत्न केल्यावांचून शाळेची सुधारणा होणार नाहीं. शाळेची स्वच्छता राखणें, शाळेंतील शिक्षण–साहित्याची योग्य प्रकारची काळजी घेणें, शाळा वेळेवर उघडणें व वेळेवर बंद करणें, शाळेंत निराळीं चित्रें लावून व सभोंवतीं शक्यतर बाग तयार करून शाळेच्या सौंदर्यांत भर घालून मुलांचें व इतरांचें मनास प्रसन्नता प्राप्त होईल अशी शाळेंत रमणीयता निर्माण करणें, हें शिक्षकांच्या मन:पूर्वक प्रयत्नांवरच अवलंबून राहील. अनेक शिक्षकांना शाळेविषयीं हा आपलेपणा वाटत असून, ते तिची शोभा व उपयुक्तता वाढविण्याचा प्रयत्न करीत असतात हें आम्हांस माहीत आहे. अशा शिक्षकांचें कौतुक करावें तितकें थोडें आहे.

कांहीं शिक्षकांना शाळेविषयीं आपलेपणा किंवा प्रेम वाटत नाहीं व त्यामुळें ते स्वत: शाळेकडे दुर्लक्ष करून शाळेला कोंडवाड्याचें स्वरूप आणतात. शिक्षक स्वत: नियमितपणें वागत नाहीं. विशेषत: हमरस्त्यापासून दूर व अडचणीच्या गांवांतील शाळा वाटेल तेव्हां उघडतात किंवा बंद करतात. कारण तपासनीस येऊन आपला अनियमितपणा उघडकीस येईल, अशी त्यांना धास्ती बाळगण्याचें कारण नसतें. विशेषत: एकशिक्षकी शाळेंतील शिक्षकांना अनियमितपणें व हलगर्जीपणानें वागण्याचा मोह फार अनावर होतो. गांवांतील लोक गरीब व भाबडे असले म्हणजे शिक्षकाची वागण्यांतील कसूर वरिष्ठ अधिकाऱ्याच्या नजरेस येणें फार कठीण होते. दरमहा मिळणारा

पगार हा काम करण्यासाठीं मिळणारा तनखा नसून तो काम न करतां स्वस्थ बसून खाण्याकरितां मिळणारें पेन्शन आहे, अशा वृत्तीनें वागणारे अनेक शिक्षक आढळून येतात व त्यामुळें खात्याचें, शाळेचें, गांवाचें व पर्यायानें देशाचें नुकसान होतें.

शिक्षकांचे परस्परांशीं संबंध––एकशिक्षकी शाळेंत एकतंत्री राज्य असतें. परंतु अनेक-शिक्षकी शाळेंत अनेक शिक्षकांची संयुक्त राजवटी असते. या एका शाळेंत काम करणाऱ्या अनेक शिक्षकांत एक मुख्य शिक्षक असतो व बाकीचे शिक्षक त्याच्या नेतृत्वाखालीं त्याचे मदतनीस म्हणून काम करीत असतात. या सर्व शिक्षकांत एकमेकांविषयीं प्रेम व आदर असणें अत्यंत जरूर आहे. मुख्य शिक्षकानें आपल्या अधिकाराचा कैफ डोक्यावर न होऊं देतां हाताखालच्या शिक्षकांशीं बरोबरीच्या नात्यानें, स्नेहाच्या सलोख्यानें वागणें जरूर आहे. हाताखालच्या शिक्षकांच्या हातून कांहीं चूक झाली असल्यास, त्यांस मिल या नात्यानें ती दाखवावी व तीं पुन्हां न करण्याबद्दल प्रेमळपणाची सूचना द्यावी. हाताखालच्या शिक्षकांना कठोरपणानें हुकूम देण्याची तयारी सहसा न दाखवितां त्यांना आपल्या अधिक अनुभवाचा, ज्ञानाचा फायदा देण्यासाठीं मुख्य शिक्षकानें तयार असावें. उलट मदतनीस शिक्षकांनींही आपल्या मुख्य शिक्षकांशीं आदराची व अदबीची वागणूक ठेवून तो वेळच्या वेळीं सूचना करील त्याप्रमाणें वागण्याचा मनापासून प्रयत्न करावा. शाळा चांगली नमुनेदार झाली तर त्याचें सर्व श्रेय शिक्षकांना मिळेल व वाईट ठरली तर त्याचा दोष सर्व शिक्षकांच्या पदरीं बांधला जाईल, ही सर्वांनीं जाणीव ठेवावी. प्रांताच्या राज्यकारभारांत ज्याप्रमाणें मुख्य मंत्रि व इतर मंत्रि जनतेला संयुक्तपणानें जबाबदार असतात, त्याचप्रमाणें शाळेच्या कारभाराबद्दल मुख्य शिक्षकांसह सर्व शिक्षकमंडळ खात्याला व शेवटीं जनतेला जबाबदार आहे, हें कोणीं विसरतां कामा नये व याप्रमाणें सर्व शिक्षकांची वागणूक झाली तर शाळा भरभराटीस यावयास वेळ लागणार नाहीं.

परंतु एकाच शाळेंत काम करणाऱ्या शिक्षकांमध्यें वर वर्णन केल्याप्रमाणें सात्त्विक सलोख्याचे संबंध क्वचित् दृष्टीस पडतात. कांहीं ठिकाणीं शिक्षकांत दोन तट पडून त्या तटांमध्यें एकमेकांचा पाडाव करण्यासाठीं स्पर्धा लागलेली दिसते. गांवांतील अडाणी लोकांत दुफळी असली तर आपल्या उपदेशानें व आचरणानें त्या दुफळीचा अंत करून गांवांत सलोख्याचें वातावरण ज्यांनीं

निर्माण करावयास पाहिजे ते गांवांतील सर्वांत अधिक शिकलेले, पवित्र कार्य करण्यासाठीं नेमलेले शिक्षकच आपसांत साठमारी करूं लागलेले पाहून गांवावर, शाळेवर व विद्यार्थ्यांवर किती अनिष्ट परिणाम होत असेल याची कल्पना केलेली बरी ! शिक्षकांत तट पडल्यानंतर चहाडखोरांना, लबाडी करणारांना उत्तेजन मिळून कांहीं वेळेला लहान विद्यार्थ्यांनाही बातम्या काढण्याच्या कामावर नेमण्यांत येतें. अशा स्थितींत शाळेचा बोजवारा उडून वरिष्ठ अधिकाऱ्यांना दोन्ही पक्षांकडून येणाऱ्या तक्रारीअर्जांच्या चौकशा करतां करतां नाकीं नव येतात.

कांहीं ठिकाणीं सर्व शिक्षकांत सलोखा असतो, परंतु या सलोख्याचा उपयोग शाळेचा उत्कर्ष करण्याकडे न होतां एकमेकांच्या चुका छपविण्याकडे होतो. तंटे असले कीं दुसऱ्या शिक्षकानें न केलेल्या चुका दाखविण्याचा खटाटोप चालतो; तर लबाडीचा सलोखा असला कीं, केलेल्या चुकांवर पांघरूण घालण्याची हातचलाखी करण्यांत येते. एकमेकां साह्य करूं । अवघे चकवूं बरिष्ठासी ॥ हें या सलोख्याचें ब्रीदवाक्य असतें.

आपसांतील यादवीप्रमाणें असा स्नेहसलोखाही शाळेस घातकच असतो. या दोन्हीं प्रकाराला हद्दपार करून सात्त्विक स्नेहसंबंधाचें उदात्त वातावरण शाळाखात्यांत निर्माण करण्यासाठीं प्रत्येकानें झटलें पाहिजे.

शिक्षक व विद्यार्थी:—शाळेतील विद्यार्थ्यांशी शिक्षकांची वागणूकही सहानुभूतीची, वात्सल्याची असणें जरुर आहे. अनेक शिक्षकांची मुलांशीं वागणूक फारच कडकपणाची असते. आपण शिक्षक आहोंत ही गोष्ट विसरून आपण एकाद्या तुरुंगावरचे अधिकारीच आहोंत व आपल्या वर्गांतील विद्यार्थी अट्टल गुन्हेगार, बेरड आहेत, अशी कल्पना करून हे शिक्षक वागत आहेत असें त्यांची वागणूक पहाणारास वाटूं लागतें. कांहीं शिक्षक मुलांना 'येतां जातां मारण्यांनेंच शिस्त राखली जाते' अशा समजुतीनें वागतात. दगड फोडण्यास बसविलेला वडारी किंवा लोखंड वांकाविण्यासाठीं बसविलेला लोहार जितक्या सहजपणें ठोका टाकतो तितक्याच निर्विकार रीतीनें व सहजपणें हे शिक्षक मुलांच्या पाठीवर, गालांवर किंवा डोक्यांवर गुद्यांचा वर्षाव करतांना दिसतात. कारण नसतांना कठोरपणानें वागविण्यानें किंवा शारीरिक शिक्षा करण्याच्या पद्धतीनें, मुलांच्या मानसिक जगांत किती प्रचंड व अनिष्ट घडामोड होते याची या शिक्षकांना कल्पनाही येत नाहीं.

मुलांचीं फुलांसारखीं मन विकसित करण्यासाठीं, त्यांचीं अधिक वाढ करण्यासाठीं, त्यांच्याशीं आपण हळुवारपणानें वागणें जरूर आहे, याची आमच्या शिक्षकांना कधीं कल्पना येणार? मुलांना दगड समजून छडीच्या छणीनें त्यांना घडविण्याचा पाथरवटी प्रयत्न न करतां, त्यांना नाजुक फुलें समजून अगदीं हलक्या हातानें त्यांचीं सुशिक्षणाच्या सूत्रांत विविध प्रकारची आल्हादायक गुंफण करणारे माळी आमचे शिक्षक कधीं होणार ?

लहान मुलें हजारों खोड्या नेहमींच करणार ! परंतु त्या खोड्यांनीं चिडून न जातां, शिक्षकानें त्या मुलांशीं वात्सल्यपूर्ण अंतःकरणानें वागून त्यांना नीटपणें वागण्यास शिकवणें जरूर आहे. हल्लीं ट्रेनिंग कॉलेजच्या शिक्षणक्रमांत बालकांच्या मानसशास्त्राचाही समावेश करण्यांत आला आहे. परंतु या मानसशास्त्राच्या अध्ययनानें शिक्षकाला मुलाच्या मनाची घडण–रचना-समजली तरी त्याच्या स्वतःच्या स्वभावांत फरक झाल्यावांचून विद्यार्थ्यांशीं त्याची वागणूक जशी हवी तशी होणार नाहीं. शिक्षकानें आपल्या कर्तव्याची तीव्र जाणीव सतत डोळ्यांपुढें ठेऊन व आपल्या प्रयत्नावरच समोरच्या बालगोपालांतून देशासाठीं लढणारे, झगडणारे वीर, मुत्सुद्दी व पुढारी निपजणें अवलंबून आहे, हें लक्षांत घेऊन मुलांशीं आपली वागणूक ठेवणें अत्यंत जरूर आहे.

खेड्यांतील शिक्षकाला मुलांच्या शिक्षणाप्रमाणेंच त्यांच्या स्वच्छतेचीही काळजी घ्यावी लागते. खेड्यांतील पालकांना स्वच्छतेच्या विषयींच्या आपल्या कर्तव्याची जाणीव नसल्यामुळें, तीही जबाबदारी शिक्षकांवरच येऊन पडते. सुधारलेल्या पाश्चिमात्य देशांतील शिक्षकांना जेथें ही जबाबदारी संभाळावी लागते तेथें आमच्या अडाणी, निरक्षर लोकांनीं गजबजलेल्या देशांत शिक्षकांना मुलांच्या स्वच्छतेची जबाबदारी अंगावर घ्यावी लागली तर नवल कसलें ? प्रथम मुलांना स्वच्छतेनें रहाण्याचें शिक्षण देणें कंटाळवाणें वाटेल; परंतु चिकाटी न सोडतां व केवळ शाब्दिक उपदेशावर भर न ठेवतां मुलांकडून दांत, हात धुऊन घेऊन, किंवा वेळेस कपडेही धुऊन घेऊन स्वच्छतेचें तत्त्व त्यांच्या मनावर बिंबवितां येईल. सर्व मुलांना घेऊन आठ दिवसांनीं आपआपले कपडे धुण्याचा एखादा सामुदायिक कार्यक्रम केल्यास स्वच्छतेची शिकवणूक लवकर गळीं उतरेल; व स्वतः शिक्षकच आपले कपडे धूत असलेले पाहून

मुलांनाही स्वतःचे कपडे धुण्याची आवश्यकता पटेल व त्यासाठीं पालकांवर किंवा इतर माणसांवर अवलंबून राहण्याची संवय मोडेल.

शाळेंत ठराविक वेळ मुलांना शिकविलें म्हणजे आपलें काम झालें, अशा हिशोबी वृत्तीनें शिक्षकानें वागल्यास कोणतीही शिक्षणपद्धति अखेर अपयशीच ठरेल. शाळेंतच नव्हे तर शाळेच्या बाहेरही शक्य तितक्या विद्यार्थ्यांत मिसळून व त्यांच्यांशीं खेळीमेळीनें वागून त्यांना कल्पनाही न येऊं देतां, एक प्रकारचें चांगलें शिक्षण देण्याचा शिक्षकानें सतत प्रयत्न करणें जरूर आहे. मुलांच्या घरच्या अडाणीपणामुळें, गरीबीमुळें किंवा पालकांच्या व्यसनी वर्तनामुळें जें सदोष वातावरण निर्माण झालेलें असतें, त्या वातावरणांत मुलगा शक्य तों कमी राहील व त्याचा शाळेच्याही वेळाव्यतिरिक्त वेळ शिक्षकाच्या उदात्त सहवासांत जितका अधिक जाईल, तितकें त्या शिक्षकाचें शिक्षण अधिक व लवकर जास्त प्रमाणांत प्रभावी होईल. शाळेंतच नव्हेतर शाळेबाहेरही विद्यार्थ्यांशीं आपल्या ध्येयास पोषक अशीच वागणूक शिक्षकाची असणें अत्यंत जरूर आहे.

शिक्षक व पालकः—शहरांतील सुशिक्षित पालकही अनेक वेळ आपल्याच व्यवसायांत गुरफटून गेल्यामुळें मुलांच्या शाळेच्या कामांत लक्ष घालीत नाहींत. शहरची ही स्थिति मग खेड्यांतील अडाण्या कावाड्याची गोष्ट बोलावयास नको. पालकानें लक्ष न दिलें तरी शहरांतील शाळेचा कारभार चालू शकतो; परंतु खेडेगांवांत शिक्षकाला पालकांची हरघडी मदत लागते व त्या पालकांनीं शाळेच्या कामाकडे लक्ष दिलें नाहीं तर शाळेच्या कामांत अडचणी उत्पन्न होतात व कदाचित् हजेरी कमी पडून शाळाही बंद पडते. यासाठीं उदासीन पालकांना शाळेच्या कामांत जास्त लक्ष घालण्यास प्रवृत्त करणें, हें खेडेगांवांतील शिक्षकाचें जबाबदारीचें व महत्त्वाचें एक अंग होऊन बसलें आहे. पालकांकडे वरचेवर जाऊन त्यांना शाळेबद्दल माहिती देणें, त्यांना शाळेस भेट देण्याबद्दल विनंति करणें, शाळेंत निरनिराळे करमणुकीचे कार्यक्रम घडवून आणून पालकांना मुलांची प्रगति दाखवून, त्यांच्या मनांत उत्सुकता जागृत करणें व पालक खुष झालेले दिसल्यानंतर शाळेची एखादी गरज दाखवून त्यांच्या दातृत्वाचा ओघ शाळेकडे वळविणें या सर्व गोष्टी खेड्यांतील शिक्षकाला कराव्या लागतात; व या सर्व गोष्टी चांगल्या प्रकारें साधण्यासाठीं

शिक्षकांत चिकाटी व लोकांचा विश्वास बसेल अशा तऱ्हेनें वागण्याची हातोटी असावी लागते.

अमेरिकेंतही ज्या ठिकाणीं किंवा ज्या भागांत शेतकरीवर्गाची वस्ती आहे, त्या भागांत शाळेविषयीं उदासीनता लोकांत दिसून येते व तेथील शिक्षकासही या सर्व गोष्टी कराव्या लागतात; इतकेंच नव्हे तर, या सर्व गोष्टी चांगल्या प्रकारें साधतां याव्यात म्हणून खेड्यांतील शिक्षकांना त्यासाठीं विशेष शिक्षणही देण्यांत येतें. या शिक्षकांना या कामासाठीं सल्लामसलत देण्यासाठीं व शिक्षक पालकांचें अधिकाधिक सहकार्य घडवून आणण्यासाठीं ग्रामीण जीवन-निदर्शक (Country Life Director) या नांवाचे खास अधिकारीही नेमण्यांत येतात; हे अधिकारी नानातऱ्हेची उपाययोजना काढून, पालक शाळेच्या कामांत उत्तरोत्तर जास्त लक्ष घालतील अशी परिस्थिति निर्माण करतात. त्यांच्या कर्तव्यांत करमणुकीच्या कार्यक्रमाचाही समावेश करण्यांत आलेला असतो.†

आमच्या शिक्षकांना ही जबाबदारी चांगल्या प्रकारें पार पाडतां आली तर शाळेच्या अनेक गरजा, देणग्यांच्या रुपानें, गांवांतले गांवांत भागवितां येतील. याप्रमाणें गांवांतील लोकांशीं वागून अनेक शिक्षकांनीं शाळेसाठीं आरसे, खेळण्याचें साहित्य, बाजाची पेटी वगैरे वस्तु मिळविल्याचें आमच्या पहाण्यांत आहे.

गांवांतील लोकांचा लोभ शाळेच्या हितासाठीं मिळवावयाचा, हें शिक्षकानें विसरतां कामा नये. कांहीं शिक्षक हा लोभ स्वतःच्या फायद्यासाठीं किंवा स्वतःची कसूर झांकण्यासाठीं उपयोगांत आणतात. एका शिक्षकानें रात्रीं सुरेल भजन करून दिवसा शाळेंत झोंप घेण्याचा परिपाठ सुरू केला होता. मास्तरच्या भजनावर गांवकरी लोक फारच खूष होते; परंतु शाळेंत झोंप घेत असतांना वरीष्ठ अधिकाऱ्यानें पकडलें, तेव्हां त्याची त्या ठिकाणाहून बदली करण्याचा हुकूम काढण्यांत आला. लोकांवरील वजनाचा उपयोग करून सदर शिक्षकानें बदलीचा हुकूम रद्द करण्याचा प्रयत्न केला. गांवांतील कांहीं पुढारी 'शिक्षक फार चांगला, आमच्या शाळेला त्याचा फार उपयोग होतो,' असें लांगून बदलीचा हुकूम रद्द करण्याबद्दल रदबदली करूं लागले.

† O. R. No II. Chap. III

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे खेडयांतील लोकांना शाळेचें हिताहित कशांत आहे याची कल्पना नसते. प्रथम, ते शाळेकडे ढुंकूनहि पहात नाहींत व पाहूं लागले कीं, शिक्षकाच्या हातचीं बाहुलीं बनतात. तेव्हां त्यांना योग्य मार्ग दाखविण्याची व त्यांचे मनांत शाळेविषयीं आस्था उत्पन्न करून त्या आस्थेचा फायदा शाळेला होईल तितका करून घेण्याची शिक्षकावर जबाबदारी आहे. या दृष्टीनें शिक्षक-पालकांचे संघ अस्तित्वांत येणें जरूर आहे. या संघाच्या वरचेवर बैठकी भरवून शिक्षक-पालकांनीं एकमेकांच्या अडीअडचणी एकमेकांना समजावून सांगाव्यात; म्हणजे एकमेकांना परस्परांची मदत कोठें पाहिजे याची कल्पना येऊन, गैरसमज नाहींसे होतात व स्नेहसंबंध वाढून मनमोकळेपणाच्या सहकार्याची वाट मोकळी होते.

विद्याव्यासंग:—याप्रमाणें अनेक जबाबदाऱ्या संभाळून वागत असतानांही शिक्षकानें स्वत:ची लायकी व कार्यक्षमता वाढविण्याचे दृष्टीनें विद्याव्यासंग अखंडितपणें ठेवला पाहिजे. शिक्षणशास्त्रांत वेळोवेळीं नवीन प्रकार जन्माला येतात. त्याचप्रमाणें जगाच्या ज्ञानभांडारांतही सतत भर पडत असते. शिक्षकानें शिक्षणशास्त्रांत होणाऱ्या प्रगतीचें नेहमीं अवलोकन ठेवून स्वत:चा ज्ञाननिधि वाढविण्यासाठीं वाचन चालू ठेवणें इष्ट आहे. यां वाचनामुळें नवीन कल्पना सुचून स्वत:च्या शिकविण्याच्या पद्धतींत त्याला नवचैतन्य उत्पन्न करतां येईल व त्याचा स्वत:चाही फायदा होऊन खात्याची कार्यक्षमता वृद्धिंगत होईल. त्याला पुस्तकें पुरविण्याची काय व्यवस्था करावी याचा मागें विचार केला आहेच. शिक्षकाला स्वत:ला वाचनाची आवड असली तर त्याचा चांगला परिणाम त्याच्या वर्गांतील विद्यार्थ्यांवरही होऊं शकतो.

शिक्षक-संघ:—शिक्षकांचे संघ अधिक प्रमाणांत स्थापन होणें अत्यंत जरूर आहे. कांहीं जिल्ह्यांतून मागासलेल्या शिक्षकांचे संघ व पुढारलेल्या वर्गाच्या शिक्षकांचे संघ स्थापन झालेले असून कांहीं ठिकाणीं त्यांना बोर्डानें मान्यताही दिली आहे. या संघांमार्फत सभापरिषदा भरविण्यांत येऊन शिक्षकांच्या तक्रारी सामुदायिकपणें पुढें मांडण्यांत येतात. कांहीं ठिकाणीं शिक्षकांच्या संघांना मान्यता देण्यांत आली नसल्यामुळें या संघांमार्फत होणाऱ्या परिषदांना शिक्षकांनीं हजर राहूं नये असे हुकूमही बोर्डामार्फत काढण्यांत येतात.

इंग्लंडमध्यें शिक्षकांच्या अनेक संघ-संस्था आहेत. तिकडे मुख्याध्यापक व मुख्याध्यापिका यांचे स्वतंत्र संघ आहेत. मदतनीस शिक्षकांचे संघ आहेत,

टेक्निकल संस्थांमधील शिक्षकांचे संघ आहेत व खास विषयांच्या शिक्षकांचे संघ आहेत. या सर्व संघांत मोठा संघ १८७० सालीं स्थापन झाला असून तो 'नॅशनल युनियन ऑफ टीचर्स' या नांवानें ओळखला जातो. या संघाचे सन १९३४ सालीं १२००० सभासद होते; व निरनिराळ्या ठिकाणीं ६२१ स्थानिक शाखा होत्या. या संघाचें वार्षिक उत्पन्न ३७००० पौंडांचें असून एकंदर ६७६००० पौंडांचा निधि या संस्थेजवळ होता. या संस्थेमार्फत निराश्रित अर्भकांच्या मदतीसाठीं प्रॉव्हिडंट फंडाच्या योजना चालविण्यांत येत असून, त्यासाठीं लाखो पौंडांचे फंड आहेत. इतकेंच नव्हे तर या संस्थेमार्फत पार्लमेंटच्या निवडणुकींत उमेदवारांना पाठिंबा देण्यांत येतो व एक साप्ताहिकहि प्रसिद्ध करण्यांत येतें. या संस्थेला मतभेदाच्या पायावर विरोध करण्यासाठीं विरोधी संस्थाही काढण्यांत आल्या आहेत.¶

या अशा संस्थेचा उपयोग अनेक दृष्टींनीं होण्यासारखा आहे. या संस्थांमार्फत परिषदा भरवून व विचारविनिमय करून, शिक्षणपद्धतींतील दोष दाखवितां येतील व त्याचप्रमाणें शिक्षकांवर सामुदायिक स्वरूपाचा अन्याय झाल्यास त्याचीहि दाद लावून घेतां येईल. सरकारी शाळांप्रमाणें मदतीच्या शाळा व इतर खाजगी शाळांमधील शिक्षकांचेही असेच संघ असणें अत्यंत जरूर आहे.

५. शिक्षकांच्या अडचणी

शिक्षकांवरील बहुविध प्रकारच्या जबाबदारीचा विचार करतांना, शिक्षकांच्या अडचणींचाही समाजानें विचार करून त्यांच्याशीं सहानुभूतीनें वागून त्यांना हरएकप्रकारें मदत करण्याचें व्रत धरलें पाहिजे. 'शिक्षकांचें शिक्षण' या विभागांत, विवेचनाच्या ओघांत अनेक अडचणींचा उल्लेख केलेला आहेच. विशेषतः खेड्यांतील शिक्षकांच्या अडचणी तर अनेक आहेत. शिक्षक परगांवचा रहाणारा असल्यास, त्याला गांवांत चांगलें घर रहावयास मिळत नाहीं, वैद्यकीय मदत मिळत नाहीं, खावयास योग्य अन्नही मिळत नाहीं, पुरेसें व चांगलें पाणी मिळत नाहीं. पालक पूर्ण उदासीन व बेपर्वाईनें वागणारे भेटतात, शाळेंतील मुलें अतिशय मागासलेलीं व मंद बुद्धीचीं आढळतात, क्वचित् पूर्वीच्या शिक्षकानें चांगलें न शिकविल्यामुळें अभ्यासांत

¶ B. of E. 274–275.

कच्चीं राहिलेलीं मुलें थोड्या वेळांत चांगलीं तयार करण्याची त्याच्यावर जबाबदारी टाकण्यांत येते व ही जबाबदारी पार पाडली नाहीं कीं वरिष्ठांचा वाईट शेरा वांट्याला येतो, सरबराईला सोकावलेला अधिकारी किंवा सभासद बळेच पाहुणा म्हणून येऊन सक्तीनें मेजवानी मागतो व ती दिली नाहीं तर नोकरींत नुकसान करणारा रोष माथ्यावर येतो—अशा अनेक अडचणी, गैरसोयी शिक्षकाचें जिणें कंटाळवाणें, नीरस, दुःखानें किंवा काळजीनें व्याप्त असें करून सोडतात. गांवांत राहून चांगलें काम केलें तरी त्याचें चीज न होतां, वशिले लावण्यांत पटाईत असा कांहीं न करणारा गुंड मास्तर चार अधिकाऱ्यांचे किंवा सभासदांचे उंबरे झिजवून त्यांच्यामार्फत आपलें बढतीचें कार्य साधून पुढें निघून जातो व गाजावाजा न करणारा इमानी पण भिडस्त मास्तर सभासदांकडे, अधिकाऱ्यांकडे खेटे घालीत नाहीं, म्हणून बाजूला रखडत रहातो व अखेर पुरा नाउमेद होऊन कसेबसे दिवस कंठूं लागतो.

शिक्षकांच्या राशीस लागणाऱ्या अनेक अडचणी आहेत, यांत कांहीं शंका नाहीं. त्यांपैकीं कांहीं अडचणींचा मागें ठिकठिकाणीं ऊहापोह केला असून, कांहींचा वर निर्देश केला आहे. आतां एका महत्त्वाच्या बाबीचा खालीं थोडा विस्तारानें उल्लेख करून हें बरेंच लांबलेलें विवेचन संपविणें जरूर आहे.

शिक्षकाची बदली—शिक्षकाची बदली हा विषय अनकूल—प्रतिकूल टीकेचा बराच विषय झाला आहे. इतकेंच नव्हें तर स्कूल बोर्डाच्या नालायकीचें वर्णन करतांना शिक्षकांच्या बदल्यांच्या बाबीचा प्रामुख्यानें उल्लेखहि करण्यांत येतो.* शिक्षणाची सत्ता स्कूल बोर्डाच्या हातीं असली काय किंवा सरकारी अधिकाऱ्यांच्या हातांत असली काय—शिक्षकांच्या बदल्या थोडयाफार केल्यावांचून मुळींच गत्यंतर नाहीं. बदल्या करण्याचीं अनेक कारणें असतात. प्रथम खात्याच्या सोयीसाठीं बदल्या कराव्या लागतात. एखाद्या शाळेंत मुलांची संख्या जास्त वाढली किंवा कमी झाली म्हणजे अधिक शिक्षक त्या शाळेंत नेमावा लागतो किंवा एखादा कमी करावा लागतो. अर्थात् जादा द्यावयाच्या शिक्षकाची दुसरीकडून त्या शाळेंत बदली करावी लागते किंवा कमी करावयाच्या शिक्षकाला दुसरीकडे पाठवावा लागतो. त्याचप्रमाणें एखादा शिक्षक

---

* ना. खेर यांचें महाराष्ट्र प्रा. कॉ. कमेटीच्या सभेमधील भाषण.

नवभारत, ता. १८–९–३७

लांब मुदतीच्या रजेवर गेल्यानंतरही त्याच्या जागीं दुसरा शिक्षक बदली करून आणावा लागतो.

खात्याच्या सोयीप्रमाणें शिक्षकांची सोयहि अनेक वेळ पहावी लागते. शिक्षकांची सोय पहातांना अनेक कारणें पुढें येतात. कोणी म्हणतो, माझा बाप मरावयास टेंकला आहे तरी त्याच्या अखेरच्या वेळीं मला त्याच्याजवळ राहाणें जरूर आहे, तरी माझे गांवीं मला बदला. कोणी म्हणतो, माझ्या मुलांचें इंग्रजी शिक्षण व्हावयाचें आहे, मला तालुक्याच्या गांवीं नेमा. कोणी म्हणतो, मला एथली हवा मानवत नाहीं, तरी माझी येथून बदली करा. कोणी सांगतो कीं, माझ्या बायकोला क्षय झाला आहे व तिला कोरड्या हवेंत ठेवणें जरूर आहे, तरी तशा भागांत मला बदला. कांहीं लोक तर, माझ्या गांवच्या इस्टेटीची व्यवस्था पाहाण्यास कोणी नाहीं व त्यामुळें त्या इस्टेटीचें नुकसान होत आहे तरी मला गांवींच बदला, अशीहि सबब सांगून बदलीची मागणी करतात. अनेक प्रकारच्या सबबी पुढें करून बदली करण्याबद्दल विनंती करण्यांत येते. कांहीं सबबी खऱ्या व गंभीर स्वरूपाच्या असतात व त्यावेळीं बदली करणें जरूर पडतें. कांहीं सबबी खोट्या व फारच हास्यास्पद स्वरूपाच्या असतात व त्या फेटाळून लावाव्या लागतात.

कांहीं वेळ गांवकऱ्यांच्या तक्रारीला मान देऊनहि बदली करावी लागते. एखाद्या गांवातील लोकांचें व शिक्षकाचें पटेनासें होतें व त्यामुळें त्यांचे खटके उडूं लागतात व या खटक्यांचा परिणाम शाळेवर होऊं लागतो; त्यामुळें गांवकरी लोक शिक्षकाची बदली करा, अशी मागणी करतात. गांवकरी व शिक्षक यांच्या बेबनावाला कांहींहि कारण झालेलें असलें व मुख्य चूक कोणाचीहि असली तरी त्याचा विचार न करतां, शिक्षकाला बदलावें लागतें. कारण गांवकऱ्यांच्या इच्छेविरुद्ध एखादा शिक्षक त्याच गांवांत ठेवण्याचा खात्यानें हट्ट केल्यास, त्या शिक्षकालाच कमीजास्त त्रास होण्याचा संभव असतो.

गांवांत दुफळी असली म्हणजे व शिक्षक एका फळीला मिळून वागत असला कीं दुसऱ्या फळीचे लोक त्याच्याबद्दल तक्रार करून बदली होण्याबद्दल विनंती करतात. अशा वेळींही बदली करण्याचा प्रसंग येतो; कारण गांवांतील दोन पक्ष एकमेकांवर फौजदारी खटल्याचे हल्ले चढवितात. शिक्षकालाही कोर्टकचेरीच्या फेऱ्या कराव्या लागतात. शिक्षकानें साक्ष देण्याचें नाकारलें कीं त्यालाच आरोपी करण्यांत येतें व मग शाळेप्रमाणें त्याचेंही नुकसान होतें.

कैक वेळां शिक्षकाची बदली शिक्षेदाखलही करण्यांत येते. कांहीं शिक्षकांचें काम दोनतीन वर्षें सतत कनिष्ठ प्रकारचें लागतें किंवा त्याची वागणूक वरिष्ठांशीं उद्दामपणाची आढळून येतें, किंवा तो एकाद्या अध्यापिकेची खोडी करण्याचाही पाचकळपणा करतो किंवा इतर कांहीं विशेष प्रमाद करतो त्यावेळीं त्याला शिक्षा म्हणून बदली करावी लागते. अशी बदली केल्यानंतर त्याला प्रवासाचा खर्चही देण्यांत येत नाहीं.

आपली बदली करावी म्हणून शिक्षक ज्यांच्या हातांत बदली करण्याचा अधिकार असतो त्यांना निरनिराळ्या प्रकारचे शह लावतो. याबद्दलचें वर्णन दुसरीकडे केलेलें आहेच. एखाद्या शिक्षकाची बदली करावी असें गांवकऱ्यांना वाटूं लागलें म्हणजे तेही बदली करणाऱ्या अधिकाऱ्याला किंवा सभासदांना जीव नकोसा करतात.

स्थानिक संस्थांत काम करणारे सभासद हे निवडून आलेले असल्यामुळें, त्यांना आपणांस निवडून देणाऱ्या मतदारांना खुष करण्याचा नेहमींच प्रयत्न करावा लागतो. लोकसत्ताक राज्यपद्धतीचा हा कांहीं लोकांना गुण वाटतो, तर कांहीं लोकांना दोष वाटतो. आपणांस निवडणुकीच्या कामीं मदत करणारे लोक ज्या मागण्या करतात त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्या पुऱ्या करण्याचें आश्वासन स्वतःची इच्छा नसतांही, अनेक वेळ द्यावें लागतें व दिलेलें आश्वासनही अमलांत आणावें लागतें. जो मनुष्य किंवा पक्ष या धोरणानें वागणार नाहीं त्याला दुसऱ्या निवडणुकींचे वेळीं त्रास झाल्यावांचून रहात नाहीं. अर्थात् या तत्त्वावर वागणाऱ्या मनुष्याच्या हातून कांहीं वेळीं अन्यायही होण्याचा संभव असतो. बहुमतवाला पक्ष अधिकारारूढ झाल्यानंतर अल्पमतवाल्या पक्षावर थोडा फार अन्याय होतोच कीं नाहीं ? राजकीय कारणासाठींही अनेक गोष्टी कराव्या लागतात व त्या करतांनाही कांहीं थोडा फार अन्याय होण्याचा संभव असतोच ! ग्रामपंचायतीपासून तों प्रांताच्या प्रधानमंडळांतील सर्वश्रेष्ठ पुढाऱ्यापर्यंत सर्वांनाच या धोरणानें वागावें लागतें व या धोरणानें वागतांना अनेक वेळीं न्यायान्यायाचा, दुसऱ्या पक्षाच्या सोयीगैरसोयींचा विचारही सोडून द्यावा लागतो.

शिक्षकांच्या बदल्यांच्या मुळाशीं पुष्कळ वेळ मतदारांचें दडपण किंवा राजकारण असतें, हें प्रांजलपणें कबूल करणें जरूर आहे. परंतु दुसरा कांहीं मार्ग नसल्यामुळेंच अनेक गोष्टी कराव्या लागतात.

गैरसोयीच्या ठिकाणीं बदली झाली किंवा मनाप्रमाणें बदली झाली नाहीं कीं कांहीं लोक आरडाओरड करण्यास सुरवात करतात. बदलीमुळें झालेल्या गैरसोयीचें किंवा अन्यायाचें अतिशयोक्तीनें भडक वर्णन करतात. पुण्यांत कांहीं दिवसांपूर्वी कांहीं शिक्षकांची शहराच्या एका पेठेंतील शाळेंतून दुसऱ्या पेठेंतील शाळेंत बदली करतांच त्या शिक्षकांनीं, त्यांच्या चहात्यांनीं व बदली करणाऱ्या सभासदांच्या विरुद्ध पक्षाच्या वर्तमानपत्रांनीं एकच हलकल्लोळ उठविला! कांहीं वेळ विनाकारण बदली जशी होते तसेंच कांहीं वेळीं बदली झाल्यानंतर विनाकारण हाकाटीही करण्यांत येते. बदली करण्याच्यावेळीं, बदली करणारांनीं व बदली झाल्यानंतर त्याबद्दल ओरड करणारांनीं जर थोडा मनाशीं विचार केला तर हल्लीं ओरड ऐकूं येते इतकी ओरड मुळींच ऐकूं येणार नाहीं! परंतु मग राजकारणाचें काय होईल?

स्कूलबोर्डानें बदल्या कोणत्या धोरणावर कराव्यात याविषयीं सरकारनें अनेक हुकूम काढले आहेत. शिक्षकाला सहसा त्याच्या गांवापासून दूर बदलूं नये व वाटेल त्यावेळीं त्याची बदली करून त्याची गैरसोय करूं नये, अशी सरकारकडून बोर्डांना समज देण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें वर्षांतून किती वेळ बदल्या कराव्यात याबद्दलही निर्बंध घालण्यांत आले आहेत. एकाच शिक्षकाची वर्षांतून तीन वेळ, चार वेळ बदली करण्याच्या खोडसाळ वृत्तीला नियमानें बराच पायबंद घालण्यांत आला आहे. बदल्यांच्या सांखळ्या लावतांना बदलीचें कारणही देण्यांत आलें पाहिजे अशी अट घातल्यास अनेक बदल्यांना आळा बसेल. विनाकारण बदली केल्याचें दिसून आल्यास ती बदली करणाऱ्या अधिकाऱ्याकडून किंवा सभासदाकडून नुकसानी घेण्याबद्दलही नियमांत तरतूद करण्यांत यावी; पण ही चौकशी करण्याचें काम सरकारी अधिकाऱ्याच्या हातांत न ठेवतां त्यासाठीं स्कूलबोर्डाचे प्रेसिडेंट व इतर कांहीं सभासदांची कमेटी नेमण्यांत यावी व या कमेटीवर शिक्षकांच्या संस्थांचे अधिकृत प्रतिनिधीही नेमण्यांत यावेत. सरकारनें या बाबतींत स्कूल-बोर्ड, लोकल-बोर्ड, यांचे प्रतिनिधी यांच्याशीं विचारविनिमय करून व शिक्षकांच्या प्रतिनिधींचेंही म्हणणें ऐकून घेऊन नियम करावेत.

बोर्डाचे कांहीं अधिकारी व सभासद बदल्या करतांना कांहीं वेळीं पैसे खाऊन बदल्या करतात, अशीही एक तक्रार ऐकूं येते. या तक्रारींत थोडाफार सत्यांश आहे. परंतु पुष्कळ वेळीं, ही तक्रार खोट्या स्वरूपाचीच असते.

पुष्कळ वेळ सभासदाकडे शिक्षकांतर्फे तरफदारी करावयास जाणारा मनुष्यच त्याच्या नांवावर व त्याला देण्यासाठीं पैसे उकळून स्वतःचे खिशांत टांकतो व सभासंदांशीं असलेल्या मित्रत्वाच्या नात्याच्या, किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें असलेल्या आपल्या वजनाच्या, उपयोगानें बदली करून घेतो!

स्कूल बोर्डाच्या हातची सत्ता काढून घेतल्यानें ही पैसे खाण्याची वृत्ति नष्ट होईल, असें आम्हांस वाटत नाहीं. कोणा सरकारी अधिकाऱ्याच्या हातांत ही सत्ता दिली तरी तोही या लांचखाऊपणाला बळी पडल्यावांचून रहाणार नाहीं. आजही तलाट्याची बदली करावयाची झाल्यास अनेक अधिकारी सरबराईच्या चमचमीतपणाला व पैशांच्या आवाजाला बळीं पडतात. पोलिसखात्यांतही बदलीबद्दल तोच प्रकार आहे असें ऐकूं येतें. इतकेंच नव्हें तर लांच खाण्याबद्दल शिक्षा करण्याचा अधिकार दिलेल्या न्यायखात्यांतही ही ओरड ऐकूं येते. पैसे खाणें व लबाडी करणें हें मनुष्याच्या स्वभावावर अवलंबून असून अधिकाराच्या जागेवर अवलंबून नाहीं. प्रामाणिक मनुष्य कोणत्याही लहानमोठ्या हुद्याचा अधिकारी असला तरी प्रामाणिक राहूं शकतो व लबाड मनुष्य कितीही निर्बंध असले तरी लबाडी करतोच. ही लांच खाण्याची प्रथा कडक नियम करण्यानें व गुन्हेगार सांपडल्यास त्यांस कडक शासन करण्यानेंच, अजीबात नाहींशी झाली नाहीं, तरी पुष्कळ कमी होईल.

हें प्रकरण अंदाजापेक्षां फारच लांबलें यांत कांहीं शंका नाहीं. परंतु कांहीं महत्त्वाच्या बाबींचा शक्य तितक्या विस्तारानें उहापोह करण्याचा लेखणीला सुटलेला मोह आवरणें कठीण झालें. शिक्षकांच्या चांगुलपणावरच शिक्षणपद्धतीचें यश अवलंबून असून, मुलांची नीतिमत्ता सुधारून त्यांना कर्तव्यदक्ष नागरीक बनविणें त्यांच्याच कर्तबगारीवर अवलंबून आहे. ज्या देशांत कार्यक्षम व आपल्या पवित्र कर्तव्याची जाणीव ठेवून वागणारे शिक्षक अधिक असतील त्या देशांतील नागरीक चांगले निपजून त्यांचा उत्कर्ष होईल. शिक्षकांचे अधःपातावरोबर देशाच्याही अधःपात होण्यास वेळ लागणार नाहीं. पूर्वीच्या काळच्या आश्रमवासी गुरुजनांच्या सदाचरणाचा, निरपेक्षतेचा, उदात्त विचारसरणीचा, अखंडित विद्याव्यासंगाचा, व शिष्यांविषयींच्या वात्सल्याचा कित्ता गिरवून आमच्याही शिक्षकवर्गानें वागावें एवढीच आशा प्रदर्शित करून हें प्रकरण पुरें करतों.

प्रकरण तिसरें

तपासणी

An adequate system of inspection will also, for the future, become an essential part of our Educational system.

Despatch of 1854 E. R. II page 369,

The chief duty of an Inspector is to inspect Schools. He must do this sympathetically and tactfully and give advice based on his own knowledge and experience, which will help the teachers to make their schools enlightened and humane institutions... his criticisms should be calculated to encourage and not to intimidate.

Report on Vocational Education in India (1937), P. 30.

Among rural teachers especially what is more needed is encouragement, for they work in isolation from one another, and unless they are deliberately provided with professional help and sympathy in their ordinary daily teaching from someone who makes herself familiar with the problems and difficulties of the rural teachers' life, they are apt to shift their interests to where they are shared by the society around them, outside the schools. For man lives largely as he is understood.

Occasional Reports No. 11, page 53.

पूर्वेतिहासः——पूर्वीच्या काळीं आपणांकडे शाळा होत्या परंतु त्या शाळा पूर्णपणें स्वतंत्र अशा असत व त्या शाळांची वेळोवेळीं तपासणी करण्याची कल्पनाच त्यावेळीं जन्माला आलेली नव्हती. शाळांची कार्यक्षमता वाढण्याच्या दृष्टीनें व सर्व शाळांतील शिक्षणपद्धतींत एकरूपता निर्माण करण्यासाठीं तपासणीची जरूरी आहे ही कल्पना सुमारें १०० वर्षांपूर्वी जन्माला आली. इंग्लंडमध्यें देखील १८३९ सालीं प्रथम सरकारतर्फे 'तपासणी' करण्याच्या हक्काची कायदेशीर घोषणा करण्यांत आली व त्याप्रमाणें पहिले

दोन तपासनीस नेमण्यांत आले. या तपासनिसांवर, सरकारतर्फे ज्या शाळांना आर्थिक मदत करण्यांत येत असे, त्या शाळांची पहाणी करून सरकारकडे आपले अभिप्राय पाठविण्याची जबाबदारी टाकण्यांत आली.

याप्रमाणें तपासनिसांच्या कर्तव्याला मर्यादा घालण्यांत आल्या व त्यांनीं 'शाळेंतील धार्मिक शिक्षणाच्या बाबतींत अगर शाळेंतील शिस्त अगर व्यवस्था या बाबतींत ढवळाढवळ करूं नये किंवा सल्लामसलत देऊं नये अगर सूचनाही करूं नये' असे स्पष्ट निर्बंध लादण्यांत आले, तरी प्राथमिक शिक्षणाच्या शाळा चालविणाऱ्या निरनिराळ्या ख्रिस्तीधर्म पंथाच्या चालकांना हे 'तपासणीस' म्हणजे आपल्या स्वातंत्र्यावरील सरकारचें अतिक्रमणच आहे, असें वाटूं लागलें. सन १८४०मध्यें या धर्मपंथाच्या सल्ल्यानें तपासनीसांची नेमणूक करण्यांत यावी, असा सरकारी हुकूम काढण्यांत आला.

इंग्रज अधिकाऱ्यांनीं हिंदुस्तानांत शिक्षणाचें कार्य आपल्या हातांत घेतल्यानंतर लवकरच या तपासणीचें तत्त्व मान्य करण्यांत येऊन त्याप्रमाणें तपासनीसही नेमण्यांत आले. या तत्त्वाला, विशेषतः मुंबई प्रांतांत फारच लवकर मान्यता देण्यांत आली. प्राथमिक शिक्षणाची 'तपासणी व त्यावर देखरेख करण्याच्या पद्धतीचा मुंबई प्रांतांतील शिक्षण-बोर्डानें आरंभींच अवलंब केल्यामुळें' इतर प्रांतांपेक्षां मुंबई प्रांतांत शाळांसंबंधीं अधिक स्पष्ट कल्पना आम्हांला आली आहे, असा अभिप्राय बोर्डाला आपल्या सन १८४४ च्या अहवालांत नमूद करतां आला.† १८४५ सालीं बोर्डानें जे नियम केले त्यांत या देखरेखीसंबंधींही विस्तृत नियम करण्यांत आले.

या नियमांप्रमाणें मुंबई प्रांताचे चार भाग पाडण्यांत येऊन या प्रत्येक भागावर सुपरिंटेंडेंट (Superintendent) या हुद्याचा एक अधिकारी नेमण्यांत आला व त्याला त्याच्या भागापुरती पूर्ण सत्ता देण्यांत आली. या सुपरिंटेंडेंटच्या हाताखालीं तपासनीस म्हणून अधिकारी नेमण्यांत आले. या सुपरिंटेंडेंटनीं आपल्या भागांतील प्रत्येक शाळेची वर्षांतून एक वेळ परीक्षा घ्यावी व बोर्डानें मंजूर केलेल्या नियमाप्रमाणें परीक्षा घेतल्यानंतर एक महिन्याच्या आंत बोर्डाकडे आपला अभिप्राय पाठवावा, असें त्याच्यावर नियमांचें बंधन घालण्यांत आलें.*

† E. R. II. 146. * E. R. II. 159-60.

१८५४ च्या खलित्यांतही 'यापुढें तपासणीची चोख पद्धत ही आमच्या शिक्षणपद्धतीचें आवश्यक अंग राहील' असें जाहीर करण्यांत आलें व या तपासणीचे व देखरेखीचे मुख्यतः कामासाठीं 'डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन' हुद्याचा अधिकारी नेमून स्वतंत्र खातें सुरू करण्यांत आलें.

१८५४ पासून १९२३ पर्यंत मुंबई प्रांतांतील सरकारतर्फे चालविण्यांत येणाऱ्या प्राथमिक शाळा चालविण्याची जबाबदारी व सर्व शाळांची पहाणी–तपासणी करून त्यांना योग्य तें वळण देण्याची जबाबदारी या खात्याकडे व त्यांतील तपासनीसांकडेच असे, असें स्थूलमानानें म्हणावयास हरकत नाहीं.

१९२३ चा प्राथमिक-शिक्षणाचा कायदा पास झाल्यानंतर बहुतेक प्राथमिक शाळा व त्यावरील हुकमत लोकलबोर्डे किंवा म्युनिसिपालिट्या यांच्याकडे गेली व फक्त पाहाणी–तपासणीचें काम शिक्षणखात्याच्या अधिकाऱ्यांकडे राहिलें. १९२३ च्या कायद्याखालीं जे नियम करण्यांत आले त्या नियमांप्रमाणें स्थानिक संस्थेवरही तपासणी व देखरेख करणारा अधिकारीवर्ग नेमण्याची जबाबदारी टाकण्यांत आली; म्हणजे हल्लीं शिक्षणखात्याचें तपासनीस व स्थानिक संस्थेचे तपासनीस असे दोन प्रकारचे तपासनीस आहेत, हें दिसून येईल.

सरकारी तपासनीस:—प्रत्येक भागाला (division) एक तपासनीस व त्याच्या हाताखालीं सीनिअर असिस्टंट डेप्युटी इन्स्पेक्टर्स असे नेमलेले असून ज्या जिल्ह्यांत स्थानिक संस्थांनीं शिक्षणाचा ताबा घेतला नाहीं, त्या जिल्ह्यांत अजूनही डेप्युटी इन्स्पेक्टर्स काम करीत आहेत. अनेक ठिकाणीं स्थानिक संस्थांनीं शिक्षणाचा ताबा घेतल्यामुळें सरकारनें आपले बरेच अधिकारी कमी केलें असून हल्लीं तपासणीच्या कामावर असलेल्या अधिकाऱ्यांची संख्या पूर्वीच्या त्यांच्या संख्येच्या तिसऱ्या हिश्शायेवढीं आहे. मुलींच्या शाळा तपासण्यासाठीं सरकारनें कांहीं स्त्रियाही या हुद्यावर नेमल्या आहेत.

सरकारी तपासनीसांचें कार्य—हल्लीं बहुतेक शिक्षणसंस्थांनीं आपल्या भागांतील शिक्षणाचा ताबा घेतला असल्यामुळें, प्रत्यक्ष शाळा तपासण्याची पूर्वीप्रमाणें सरकारी तपासनीसांवर जबाबदारी राहिलेली नाहीं. आपल्या भागांतील शाळांची पाहाणी करून सल्ला-मसलत देणें व सूचना–शिफारशी करणें येवढेंच त्यांचें काम राहिलें आहे. शिक्षणाप्रीत्यर्थ सरकारकडून जो पैसा खर्च

होत आहे तो योग्य प्रकारें खर्च केला जातो किंवा त्याचा व्यर्थ उधळपट्टी होत आहे, हें पहाण्याच्या मुख्य हेतनेंच ही तपासणी करण्यांत येत असते.

या हल्लींच्या सरकारी तपासणीच्या पद्धतीवर अनेक वेळां टीका करण्यांत आली असून, टीकाकारांचे मुख्य आक्षेप खालीं सारांशरूपानें दिले आहेत.—

(१) सरकारी तपासनीसांची त्यांच्या कार्यक्षेत्राच्या विस्तृतपणाचा विचार केल्यानंतर संख्या फार अपुरी आहे. प्रत्येक जिल्ह्यांत सुमारें ८०० पासून १००० पर्यंत शाळा असतात व या शाळा तपासण्यासाठीं प्रत्येक जिल्ह्याला सीनियर ॲसिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर या हुद्याचा एकच अधिकारी असतो. शाळा तपासण्याखेरीज त्याला इतरही अनेक कामें करावीं लागतात व या कारणानें त्याच्या हातून तपासणीचें काम चांगलें होत नाहीं व त्यामुळें सरकारचा पैसा योग्य प्रकारें खर्च केला जात आहे व शिक्षण चांगलें आहे, हें त्याला पूर्णपणें पहातां येत नाहीं.§

(२) स्थानिक संस्थांकडून जी तपासणी केली जाते ती जशी असावी तशी नसल्यामुळें पुष्कळ पैसा फुकट जातो. परंतु सरकारतर्फे करण्यांत येणारी तपासणी योग्य प्रकारची व पुरेशी नसल्यामुळें उधळपट्टीला आळा बसत नाहीं; तरी सरकारनें तपासणीच्या बाबीसंबंधीं फेरविचार करून पुनर्घटना करण्यास योग्य असा काल आला आहे.*

(३) सरकारी तपासणीचें दोन दृष्टीनें महत्त्व आहे. या तपासणीच्या मार्फत 'संरक्षक' व 'विधायक' अशीं दोन प्रकारचीं कामें करून घ्यावयाचीं असतात. ज्यावेळीं शिक्षणानभिज्ञ अशा स्थानिक संस्थांच्या हातांत शिक्षणाचीं सूत्रें देऊन त्यांच्यामार्फत शिक्षणाचा झपाट्यानें प्रसार करावयाचा असतो त्यावेळीं स्वतंत्र तपासणीचें 'संरक्षक कार्य' प्रामुख्यानें पुढें येतें. कारण या तपासणीनें सरकारला उधळपट्टीला पायबंद घालून आपल्या द्रव्याचा योग्य उपयोग होईल, अशी तर्तूद करतां येते. हें कार्य करण्यासाठीं सरकारी तपासणीचें साधन नसलें तर सरकारच्या मदतीचे झरे आटून शिक्षणाचा प्रसार रोखला गेल्यावांचून रहाणार नाहीं व या दृष्टीनें सरकारी तपासणी करण्यासाठीं सरकारला स्वतःचे अधिकारी ठेवल्यावांचून निभाव नाहीं व याप्रमाणें द्रव्याचा योग्य विनियोग केल्यानंतर व शिक्षणपद्धति चांगल्या पायांवर अधिष्ठित केली गेल्यानंतर

§ मु. पं. रि. १९२७–३२ पा. ११६ * पुनर्घ. रि. १२८;

तपासणीच्या विधायक कार्याला सुरवात होते व अनेक प्रकारच्या उपयुक्त सूचना देऊन सरकारी तपासणीचें खातें महत्त्वाचें कार्य करूं शकेंत. परंतु तपासणीच्या कार्याचें या दोन्ही अंगांकडे, हिंदुस्थानांत विशेषतः लक्ष पुरविलें जात नाहीं.+

(४) गेल्या वीस वर्षांतील धोरण पाहातां, चलाख बुद्धीचे व शिक्षण-प्रसाराला जोरानें चालना देण्याची ज्यांची इच्छा आहे असे पदवीधर तपासनीस म्हणून नेमण्यांत येतात. परंतु हे नेमलेले तपासनीस, त्यांनीं तपासावयाच्या शाळा ज्या परिस्थितींत व वातावरणांत असतात त्यापेक्षां, भिन्न अशा परिस्थितींत व वातावरणांत वाढलेले असतात. शहरांतील बुद्धिजीवि लोकां-पैकींच ते असल्यामुळें त्यांना औद्योगिक प्रश्नांविषयीं किंवा खेड्यांतील जीवनाविषयीं कांहींच माहिती नसते.†

वरील आक्षेपाला जागा राहूं देणें आमच्या शिक्षणपद्धतीच्या हिताचें व सुधारणेच्या दृष्टीनें इष्ट नाहीं. कारण या वरील आक्षेपांत बरेंच तथ्य आहे, हें कोणालाही कबूल करावें लागेल. हे दाखविलेले दोष नाहींसे करण्यासाठीं पुढीलप्रमाणें व्यवस्था करण्यांत यावी, अशी आमची सूचना आहे.

(१) हल्लीं प्राथमिक-शिक्षणासाठीं व दुय्यम शिक्षणासाठीं असे स्वतंत्र 'तपासनीस' सरकारतर्फे नेमण्यांत येतात. प्राथमिक व दुय्यम असा शिक्षणांत भेद न करतां 'शहरी शिक्षण' व 'खेडुतांचें शिक्षण' असा फरक करण्यांत यावा. शहरांतील लोकांचें जीवन निराळ्या प्रकारचें व त्यांच्या आयुष्यांतील गरजाही निराळ्या ! त्याचप्रमाणें खेडुतांचें–शेतकऱ्यांचें–आयुष्य भिन्न परिस्थितींत जातें व त्यांच्या शेतीच्या दृष्टीनें अडचणीही निराळ्या ! या दोन्ही वर्गाला शिक्षण जें द्यावयाचें तें भिन्न प्रकारचें असणें अत्यंत जरूर आहे. या बाब-तींत विशेष विचार दुसरीकडे केला आहे.

सांगण्याचा मुद्दा हा कीं, शहरी शिक्षण व ग्रामीण शिक्षण असा फरक करण्यांत यावा व या दोन प्रकारच्या शिक्षणाची तपासणी करण्यासाठीं स्वतंत्र तपासनीस असावेत. शहारांतील शिक्षणाची तपासणी करणारास जे गुण व जें शिक्षण अवश्य आहे तेंच गुण व तेंच शिक्षण खेड्यांतील शाळांची तपासणी करणारांस निरुपयोगी ठरतील. खेड्यांतील शाळेंत शिक्षकाचें काम करणारा शिक्षक खेड्यांत जन्मलेला, वाढलेला व खेडयांतील जीवनाविषयीं ज्याच्या

+ हारटॉग क. रि. † मेहयू २५३.

मनांत सहानुभूतिचा व आपलेपणाचा ओलावा आहे असा व त्या दृष्टीनें खास शिक्षण घेतलेला असावा, असें आपण दुसरीकडे पाहिलें आहेच. हाच नियम खेडयांतील शाळांची तपासणी करण्यासाठीं जे तपासनीस निवडावयाचे त्यांना लागू करण्यांत यावा. या बाबतींत मेह्यूसाहेबांनीं आपल्या पुस्तकाचें पान २५२-५३ वर काढलेले खालील उद्गार लक्ष्यांत ठेवणें जरूर आहे.

'A more appropriate type of inspecting officer is required for the popularisation of mass-education. He must be selected with the same care and on the same principles as the teacher. A sympathetic understanding of communal life in the areas under his control is more important than a high standard of general intelligence or educational attainments. The tendency of the last twenty years has been to appoint graduates of keen intelligence and often with a genuine desire to 'push' education. But they have been brought up in the surroundings and associations entirely different from those of the schools they are to serve. They belong to an urban intelligentia which is out of touch with industrial problems or village life. Far more effective work was done by the older type of officer, who had often not advanced beyond the Matriculation standard but understood more clearly the attitude and life of rural and industrial communities."

शेतकरी वर्गाच्या शाळा तपासण्यासाठीं त्यांच्या जीवनाशीं समरस होणारा, त्यांच्या अडचणी ओळखणारा व त्यांच्याच वर्गांपैकीं तपासक असावा, हें तत्त्व अमेरिकन तज्ज्ञांनींही ओळखलें असून या तत्त्वाची त्यांनीं अंमलबजावणीही सुरू केली आहे. फेडरल ब्यूरो ऑफ एज्युकेशन मार्फत काढलेल्या एका पत्रकांत ही गोष्ट पूर्णपणें मान्य केली आहे.§

हल्लीं या तत्त्वावर नेमणुका करण्यांत येत नाहींत व त्यामुळें अनेक अडचणी उत्पन्न होतात. एकतर हे तपासनीस, मेह्यूसाहेबांनीं म्हटल्याप्रमाणें, शहरी छापचे व बिगर–शेतकरी वर्गातले असल्यामुळें शेतकऱ्यांसाठीं असलेल्या शाळांच्या विशेष अडचणींची त्यांना मुळींच कल्पना नसते. शहरांतील प्राथमिक शाळेंतील बहुतेक शिकलेल्या पालकांची सुस्थितींतील व त्यामुळें चलाख

§ O. R. No 11, p. 48

दिसणारीं मुलें पहाणारा मनुष्य त्याच नजरेनें खेडयांतील शाळांत दिसणाऱ्यां मुलांकडे पाहूं लागला म्हणजे त्याला जमीन-अस्मानाची तफावत दिसते. शहरांतील अधिक शिकलेल्या पालकांच्या व शिक्षणसाहित्यांनीं सज्ज असलेल्या शाळांतील चांगल्या मुलांच्या वर्गांतील शिक्षकाची, शिकविण्याची पद्धत पहाणारा हा तपासनीस खेडयांतील शिक्षकाच्या शिकवणीकडे तिरस्काराच्या नजरेनें पाहूं लागतो व शहरांतील शिक्षणांतील उच्च दर्जा खेडेगांवांत दिसत नाहीं, म्हणून 'खेडयांतील शिक्षणाची कार्यक्षमता कमी झाली आहे' अशी ओरड करूं लागतो. शहरांतील श्रीमंतांनीं हौसेनें पाळलेले ऐटबाज घोडे पहाण्यास सरावलेल्या नजरेला, तांदुळाचीं पोतीं वाहून मालकाच्या उत्तम उपयोगीं पडणारीं परंतु दिसावयास मरतुकडीं अशीं मावळी तट्टें कशीं पसंत पडणार?

खेडयांतिल भिन्न परिस्थितीमुळें तेथील शिक्षणाचा प्रकार व दर्जा शहरांतील शिक्षणाच्या प्रकारापेक्षां व दर्जापेक्षां वेगळाच रहाणार, हें हा अधिकारी विसरून, निराळा वाटणारा प्रकार व दर्जा हें खालावलेल्या कार्यक्षमतेचीं लक्षणें समजतो व त्याचें खापर शिक्षक व बोर्डाचे अधिकारी व सभासद यांच्यावर फोडून मोकळा होतो. १९२३ पासून सरकारी अहवालांत खेडयांतील शिक्षणाबद्दल व स्कूलबोर्डाच्या सभासदांबद्दल जे प्रतिकूल उद्गार या तपासनीसांनीं काढलेले दिसून येतात, त्याच्या मुळाशीं हा दोष आहे हें अनेकांच्या लक्ष्यांत येत नाहीं व त्यामुळें तेही या पुराव्यावर विश्वास ठेवून खेडयांतील शिक्षकांवर व बोर्डावर 'नालायकी'चा शिक्का मारून मोकळे होतात.

आम्ही वर सुचविल्याप्रमाणें शहरीं शिक्षणाचे तपासनीस व खेड्यांतील शिक्षणाचे तपासनीस, स्वतंत्रपणें व त्या त्या क्षेत्रांतील लोकांविषयीं जिव्हाळा वाटणाऱ्या वर्गांतून निवडून नेमल्यास हा दोष पुष्कळच कमी होईल.

(२) खेड्यांतील शिक्षणाचे तपासनीस स्वतंत्र असे नेमल्यानंतर त्यांना त्यांच्या कर्तव्याची चांगली कल्पना येण्यासाठीं त्यांना खास शिक्षणही कांहीं दिवस देण्यांत यावें. या शिक्षणाचें स्वरूप खेडयांत काम करणाऱ्या शिक्षकांना जें खास शिक्षण द्यावयाचें त्या प्रकारचे पण अधिक वरच्या दर्जाचें असावें.

(३) या सरकारी तपासनीसांची संख्या फारच कमी आहे तरी ती वाढविण्यांत यावी. हल्लीं सरकारी तपासनीसाला जो पगार देण्यांत येतो तो आमच्या समजुतीनें फारच जास्त आहे. खेडयांतील शाळांसाठीं जे निराळे खास तपासनीस नेमावयाचे त्यांना कमी पगार दिल्यास चालण्यासारखें आहे. त्यामुळें हल्लीं

यणाऱ्या खर्चांतच थोडी भर घातल्यास हल्लीं आहे त्यापेक्षां जास्त तपासनीस सहज नेमतां येतील. प्रत्येक जिल्हा बोर्डाचे क्षेत्रांतील शाळांसाठीं निदान चार तपासनीस नेमले तर ज्यास्त कसोशीनें तपासणी करतां येऊन, त्यामुळें ज्या हेतूनें ही तपासणी ठेवली आहे तो हेतुही सफल होऊन व्यर्थ खर्ची पडणारी रक्कम कमी होऊन कार्यक्षमता वाढविण्यास मदत होईल.

(४) सरकारी तपासनीसांची हल्लीं नेमणूक पूर्णपणें शिक्षणखात्याच्या पगारी मुख्यातर्फे होते. त्याच्याऐवजीं प्रत्येक भागासाठीं ग्रामीण शिक्षणमंडळ (रूरल एज्युकेशन बोर्ड) व शहरी-शिक्षणमंडळ (अर्बन एज्युकेशन बोर्ड) अशीं दोन मंडळें अस्तित्वांत आणून प्राथमिक शिक्षणांतील फेरबदल व तपासनीसांच्या नेमणुका या मंडळाच्या सल्ल्यानें करण्यांत याव्यात.¶ इंग्लंडमध्येंहि १८४० सालीं तपासनीस नेमण्याच्या कामीं निरनिराळ्या शाळा चालविणाऱ्या धर्मपंथांच्या चालकांनाही सल्ला देण्याचा हक्क देण्यांत आला होता हें आपण पाहिलें आहेच.

(५) निरनिराळ्या प्रकारच्या शाळांची तपासणी करण्यासाठीं त्या शाळांत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचें ज्यानें विशेष अध्ययन केलेलें आहे असे खास तपासनीस नेमण्यांत यावे. प्राथमिक शाळांतील शिक्षणक्रमास औद्योगिक शिक्षणाची जोड मिळाल्यानंतर त्या शिक्षणाची तपासणी करण्यासाठीं औद्योगिक विषयांत प्रावीण्य संपादन केलेले निरनिराळे तपासनीस नेमावे लागतील.

(६) मुलींच्या शाळांसाठीं या तपासणीच्या कामावर स्वतंत्र स्त्रियांना नेमणें जरूर आहे. पाश्चिमात्य देशांत पुरुष-शिक्षकांपेक्षां अध्यापिकांची संख्या हल्लीं जास्त झाली आहे. त्यामुळें त्यांच्या कामाची तपासणी करण्यासाठीं स्त्री-तपासनीसच नेमण्यांत येतात. परंतु आमच्याकडे अनेक कारणांमुळें शिक्षकिणीच जेथें मिळत नाहींत तेथें स्त्री-तपासनीस कोठून मिळणार ? परंतु हें ध्येय डोळ्यांपुढें ठेवणें जरूर आहे.

या सूचनांप्रमाणें जर आमच्याकडील हल्लींच्या पद्धतींत थोडा फेरबदल झाला तर 'तपासनीस म्हणजे केवळ दोष पाहाणारे' अशी जी सार्वत्रिक सम-

---

¶ या मंडळाची घटना कशी असावी याची चर्चा 'शिक्षण, कारभार व हुकमत' या प्रकरणांत केली आहे.

जूंत अनुभवामुळें झाली आहे तो नाहींशी होऊन आमच्या तपासनीसालाही हारटॉग कमेटीनें म्हटल्याप्रमाणें युरोपमधील तपासनीसांप्रमाणें 'संरक्षक' (Protective) व 'विधायक' (Constructive) असें दोन्ही प्रकारचें कार्य करतां येईल व इंग्लंडमधील स्थानिक संस्थांप्रमाणें आमच्याकडील स्थानिक संस्थाही या तपासनीसांकडे 'सहानुभूतीचे मार्गदर्शक' या नात्यानें पाहून त्यांच्या सूचनात्मक सल्ल्याची अम्मलबजावणी करण्यासाठीं तत्पर राहातील !

स्थानिक संस्थांचे तपासनीस:—प्राथमिक शिक्षण नियम नंबर ४८ प्रमाणें स्थानिक संस्थांनाही 'तपासनीस' म्हणजे देखरेख करणारा अधिकारी नेमावा लागतो. हा जो अधिकारीवर्ग नेमण्यांत येतो तो ॲड्मिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर याच्या देखरेखीखालीं काम करतो. नियम ४८ (१) प्रमाणें १५० शाळा किंवा ६००० विद्यार्थ्यांस एक याप्रमाणें तपासनीस बोर्डाला नेमावे लागतात. नि. ४८ (२) प्रमाणें स्था. सं. म्युनिसिपालिटीस तपासनीस नेमतां येतात. एखाद्या स्थानिक संस्थेच्या शाळा किंवा विद्यार्थी यापेक्षां कमी असले तर दोन स्थानिक संस्थांना मिळून एक संयुक्त तपासनीस नेमतां येतो. नियम ५० प्रमाणें निरनिराळ्या शैक्षणिक लायकीच्या सुपरवायझरला काय पगार देण्यांत यावा, हें निश्चित करण्यांत आलें असून, नियम नं. ५१ मध्यें सुपरवायझरच्या जागीं कोणत्या शैक्षणिक लायकीचा मनुष्य नेमतां येतो हें दर्शित केलें आहे. या नियमाप्रमाणें शैक्षणिक लायकी नसलेला इसमही त्या जागीं नेमावयाचा असला तर डायरेक्टरसाहेबांच्या खास परवानगीनें त्याची नेमणूक करण्याचीही सवलत देण्यांत आली आहे.

१९२३ च्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यानें स्थानिक संस्थांना हा जो अधिकार देण्यांत आला आहे, तो इंग्लंडमधील उदाहरणाचें अनुकरण करून देण्यांत आला आहे; परंतु गेल्या १५ वर्षांचा या उपक्रमाचा अनुभव पाहून, या प्रकारावद्दल खालील मुख्य आक्षेप घेण्यांत आले आहेत. *

(१) या अधिकाऱ्यांची निवड लायकीच्या तत्त्वावर न करतां राजकारणाच्या तत्त्वावर किंवा जातिनिष्ठतेच्या तत्त्वावरच करण्यांत येते. त्याचप्रमाणें यांच्या बदल्याही कार्यक्षमतेचा किंवा शाळेच्या हिताचा विचार न करतां; तो कोणत्या पक्षाचा याचा विचार करून, करण्यांत येतात. हा आक्षेप सर्वसाधा-

* मुं. शि. रि. १९३५-३६, पा. ५६-५७.

रण सर्वच नोकरवर्गाबद्दल करण्यांत येत असून, तो या अधिकाऱ्यांच्या बाबतींतही लागूं आहे.

(२) दुसरा आक्षेप असा कीं, हे तपासणी करणारे बोर्डाचे अधिकारी, पूर्णपणें बोर्डाच्या दडपणाखालीं असतात व शिक्षणविषयक बाबतींतही त्यांचा कोणी सल्ला विचारीत नाहीं. त्यांनीं केलेल्या सूचना किंवा अहवाल, हे त्यांच्या स्वतःच्या बुद्धीनें व स्वयंप्रेरणेनें केलेले नसतात, व क्वचित् ते तसे असले तरी त्यांच्याकडे पूर्ण दुर्लक्षच करण्यांत येतें.

या दोन्ही आक्षेपांपैकीं पहिला आक्षेप करणारे लोक कांहीं वेळ अतिशयोक्ति करून उगीच भडक चित्र रंगवितात. १९२३ च्या कायद्याप्रमाणें मतदानाचा हक्क विस्तृत झाल्यामुळें, खेड्यांतील जनतेचे प्रतिनिधि अधिक प्रमाणांत या बोर्डांतून निवडून येऊं लागले आहेत. अर्थात् या लोकांच्या हातांत निवड करण्याची सत्ता आल्यानंतर ते शक्यतों आपल्या वर्गांतील, खेड्यांतील लोकांच्या आशा-आकांक्षाविषयीं सहानुभूती बाळगणाऱ्या उमेदवाराला पसंत करतात. अर्थात् ही निवड करतांना नियम ५१ प्रमाणें तो पूर्ण लायक आहे किंवा नाहीं हें पहाण्याची दक्षता बाळगण्यांत येतेच! नियमाचें उल्लंघन न करतां शेतकरीवर्गाच्या प्रतिनिधींनीं आपल्या वर्गांतील उमेदवाराची निवड केली तर कोठें चुकलें? उलट, मेह्यू साहेबांचा जो विस्तृत अभिप्राय दिला आहे, त्याप्रमाणें निवडीचें हेंच तत्त्व योग्य आहे. शहरांतील लोकांकडे ह्या अशा जागांचा असलेला मक्ता कमी झाल्यामुळें, पोट दुखून ही ओरड करण्यांत येत असावी, असें वाटूं लागतें! इंग्लंडमध्येंही एका काळीं प्रत्येक धर्मपंथाचे लोक उमेदवारांची निवड करतांना तो आपल्या धर्मपंथाचा असला तरच त्याची निवड करीत, हेंही आम्ही लक्ष्यांत ठेवणें जरूर आहे.

निवड करतांना राजकारणाला महत्त्व देऊन त्या उमेदवारांच्या लायकीकडे कानाडोळा करण्यांत येतो असा जो आक्षेपाचा भाग आहे, त्या बाबतींत येवढेंच म्हणतां येईल कीं, हा दोष अपरिहार्य आहे. मनुष्याच्या स्वभावांतील कांहीं दोष जसे नाहींसे करतां येणें शक्य नाहीं तसेंच हा दोष पूर्ण नाहींसा करणें शक्य होणें कठीण आहे. अमेरिकेंत आपल्या या तपासनीसासारखा एक अधिकारी नेमण्यांत येतो व त्याला कौन्टी सुपरिंटेंडेंट (County superintendent) असें संबोधण्यांत येतें. या अधिकाऱ्याची निवड लोकांनीं मतें देऊन करावयाची असते. त्या निवडणुकीच्या वेळींही उमेदवारांच्या

व्यक्तिगत लायकीपेक्षां त्याच्या राजकीय मतालाच महत्त्व देण्यांत येतें असा दोष दाखविण्यांत आला आहे.¶

सार्वत्रिक शिक्षणाचा ज्यांना पुष्कळ फायदा झाला असे पाश्चिमात्य लोक जर अजूनही धार्मिक किंवा राजकीय मताला प्राधान्य देऊन उमेदवाराची निवड करतात, तर मग ज्यांना अद्याप शिक्षण मुळींच मिळालें नाहीं, असे खेडेगांवांतील लोकही त्याच भावनेला जर बळी पडले तर दोष कोणाचा ?

दुसरा जो आक्षेप आहे त्यांत मात्र बरेंच तथ्य आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. बोर्डांतील बिगरशिकलेले मागासलेल्या वर्गांचे प्रतिनिधीच नव्हे तर, शिकलेले पुढारी वर्गांतील सभासदही या अधिकाऱ्यावर अनेक वेळ आपल्या वजनाचें दडपण टाकून त्यांच्याकडून आपली एखादी इच्छित गोष्ट करवून घेण्याचा प्रयत्न करतात. अमेरिकेंतही कौन्टी सुपरिन्टेंडेंटला वागणुकीचें स्वातंत्र्य नाहीं हें खालीं दिलेल्या उताऱ्यावरून स्पष्टच आहे.

या प्रकाराला आळा घालण्यासाठीं हे तपासनीस नेमण्याची किंवा त्यांचें नफानुकसान करण्याची सत्ता स्कूल-बोर्ड किंवा स्थानिक संस्था यांच्या हातची काढून घ्यावी, असें कोणी सुचवील. शिक्षकांच्या वरच्यावर बदल्या होतात सबब त्यांच्यावरची स्कूल-बोर्डाची हुकमत कमी करावी असें सुचविणारेहि जेथें कांहीं निघतात तेथें तपासनीसा–(supervisor)च्या बाबतींत वर लिहिल्याप्रमाणें एखादी सूचना पुढें आल्यास काय आश्चर्य ?

ही सूचना करणारांस पहिला हा प्रश्न विचारावा कीं, या अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्याचे, त्यांना बढत्या देण्याचे व त्यांना शासन करण्याचे अधि-

---

¶ The first cause of inefficiency in supervision of teachers is that the county Superintendent in most states is elected by popular vote. This means that "educational qualifications are not required except when the sentiment of the community is so urgent as to influence political parties", for political qualification rather than. competency as teachers or supervisors influenee the election. Nor does an officer dependent on popularity for his continuence in office, venture readily to disturb traditions, educational enterprise may endanger his position.

–O. R. No. 11, page 48.

कार कोणास देणार ? हे अधिकार दुसऱ्या एखाद्या सरकारी अधिकाऱ्याच्या हातांत देणें लोकशाहीच्या तत्त्वाच्या विरुद्ध आहे. इंग्लंडमध्यें हे अधिकार स्थानिक संस्थांच्या स्वाधीनच असून, इंग्लंडच्या पद्धतीचें आम्ही आरंभापासून अनुकरण करीत आलों आहोंत. इंग्लंडमध्यें जर असाच प्रकार असेल तर येथील प्रकाराला कां नांवें ठेवतां ? इंग्लंडमधील लोक अधिक शिकल्यामुळें त्यांच्याकडील या पद्धतींत जर हा दोष राहिला नसेल, तर मग आमच्याकडेहि कांहीं दिवसांनीं हा दोष कमी होईल, अशी आशा बाळगण्यास जागा आहे.

स्कूल-बोर्डाच्या हातची ही सत्ता काढून कोणाच्याहि हातांत दिली, तरी जोंपर्यंत स्कूल-बोर्डामार्फत शिक्षणकारभार होणार आहे व हे अधिकारी बोर्डाचे म्हणून ओळखले जाणार आहेत, तोंपर्यंत त्यांना निदान बोर्डाची बरीवाईट शिफारस तरी लागेल ना ? निदान अनुकूल शिफारस मिळण्यासाठीं तरी हे अधिकारी बोर्डाच्या सभासदाच्या इच्छेप्रमाणें मान तुकविणार नाहींत कशावरून ?

या बाबतींत आम्ही खालीलप्रमाणें दोन उपाय सुचवितों—

(१) मागें सुचविल्याप्रमाणें ग्रामीण शिक्षण मंडळ व शहरी शिक्षण मंडळ स्थापन करावें व सर्व बोर्डांच्या सुपरवायझर्सची एक ग्रेड व म्युनिसिपल हद्दींतील सुपरवायझर्सची एक ग्रेड करून त्यांच्या नेमणुका, बढती, शासन वगैरे बाबी त्या मंडळाकडे सोंपवाव्या. असें झाल्यास दरघडीं या अधिकाऱ्यांना त्रास देणाऱ्या बोर्डाच्या सभासदांची, त्यांच्यावर दडपण टाकण्यासारखी हुकमत रहाणार नाहीं.

(२) स्कूल-बोर्डाच्या शिफारशींचा शक्यतों विचार करून या अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्याची किंवा त्यांना बढती देण्याची किंवा शिक्षा देण्याची जबाबदारी स्थानिक संस्थेवर टाकण्यांत यावी. मात्र कोणाहि इसमाला एकाच वेळीं स्कूल-बोर्ड व स्थानिक संस्था यांचे एकसमयावच्छेदें सभासद होण्याचा प्रतिबंध करण्यांत यावा म्हणजे नेमणुकी वगैरे सत्ता एका संस्थेच्या हातांत राहून काम मात्र दुसऱ्या संस्थेच्या देखरेखीखालीं करावें लागेल व त्यामुळें हल्लीं होत असलेल्या प्रकाराला थोडातरी पायबंद बसेल.

या अधिकाऱ्यांची निवड कोणत्या तत्त्वावर करावी, त्यांना कोणतें विशेष शिक्षण द्यावें याबद्दल निराळें लिहिण्याची जरूरी नाहीं. सरकारी तपासनी-

सांच्या बाबतींत जें लिहिलें आहे तेंच या अधिकाऱ्यांच्या बाबतींतहि तंतोतंत लागूं आहे.

तपासनीसांचें कार्य:—सरकारी तपासनीस अगर स्थानिक संस्थांचे तपासनीस नेमण्याचा खरा हेतु कोणता? त्यांच्या हातून खरें कार्य कोणतें व्हावें, अशी आपली अपेक्षा आहे? या प्रश्नाला उत्तर देतांना कोणी म्हणेल कीं सरकारी तपासनीस, सरकारकडून जें द्रव्य खर्च करण्यांत येतें, तें स्थानिक संस्था उधळून टाकतात किंवा त्यांचा योग्य विनियोग करतात, हें पाहाण्यासाठीं नेमण्यांत येतात;' परंतु हें उत्तर वरवर पाहाणारास बरोबर वाटलें तरी तत्त्वतः चुकीचें आहे.

तपासनीसांचें खरें कार्य, शिक्षकांच्या हातून ज्या चुका होत असतील किंवा त्यांच्या शिकविण्यांत जे दोष आले असतील, ते दोष त्यांना स्नेही या नात्यानें दाखवून त्या चुका सुधारण्यासाठीं किंवा दोष घालविण्यासाठीं उपाययोजना सुचविणें, हें आहे. याप्रमाणें कार्य करणारा तपासनीस शिक्षकाची सुधारणा करतो.

शिक्षकाची सुधारणा झाली कीं त्याच्या शिकविण्याच्या पद्धतीला चांगलें वळण लागतें. शिकविण्याची पद्धत याप्रमाणें सुधारल्यानंतर मुलांना सांगितलेले विषय अधिक समजूं लागतात व याप्रमाणें खर्च होणाऱ्या पैशाचा भरपूर मोबदला मिळूं लागतो; व अशा तऱ्हेनें उधळपट्टीचें किंवा निष्फल खर्चाचें प्रमाण कमी पडतें व तपासनीस नेमण्याचा हेतु सफल होतो.

अनेक शिक्षकांना शिक्षणशास्त्राचें शिक्षण मुळींच मिळालेलें नसतें. कांहींना तें अपुरें मिळालेलें असतें व कांहींना शिक्षण घेऊन फार दिवस झाल्यामुळें ते बहुतेक विसरून गेलेले असतात व त्यामुळें त्यांच्या हातून कळत न कळत अनेक चुका होत असतात. अशा सर्व शिक्षकांना मदत करून सल्लामसलत देणें हें तपासनीसांचें कार्य आहे.

तपासनीसांच्या कार्याकडे या दृष्टीनें पाहणाराला अशा तपासनीसांची खरी जरूरी शहरांपेक्षां खेडयांत जास्त आहे हें दिसून येईल.

"Teachers in rural schools are poorly paid, are constantly changing, are largely untrained and have no system of grading. They are teaching an impossible number of classes, and conducting far too many daily recitations to make even fairly good work

possible. Add to this isolation which makes helpful advice and associations among teachers impossible or merely so and it is difficult to conceive of much improvement in the present conditions without adequate and efficient supervision."

हा उतारा अमेरिकन शिक्षणखात्याच्या एका पत्रकांतील¶ असून अमेरिकेंतील खेडयांतील शिक्षकांविषयीं काढलेले उद्गार आपल्या देशांतील शिक्षणालाहि पूर्णपणें लागूं पडतात. इंग्लंडमध्येंहि हें तत्त्व मान्य करण्यांत आलें आहे.†

आपण 'तपासनीस' आहोंत या भावनेनें किंवा अभिमानानें तादून वागणारा अधिकारी आपल्या खऱ्या कर्तव्याला विसरून, अनेक वेळां शिक्षकांना तुसडेपणानें वागवून त्यांच्याकडे दोषैक दृष्टीनेंच पाहातो व त्यामुळें तपासनीस व शिक्षक यांच्यामध्यें स्नेहभाव निर्माण न होतां, एकतऱ्हेच्या भीतीचा–दऱ्याराचा–अभेद्य पडदा उत्पन्न होतो. देखरेख करणारा (Supervisor) या शब्दानें सुद्धां एकतऱ्हेचा वरिष्ठ दर्जाचा अधिकार प्रतीत केला जातो व त्यामुळें या अधिकाऱ्यांत व शिक्षकांत स्नेहाची सलगी उत्पन्न होणें कठीण जातें. अधिकाऱ्यांच्या या हुद्यामुळें वाईट परिणाम होऊं नये म्हणून अमेरिकेंतील 'न्यू जेरसी' या संस्थानामध्यें या अशा अधिकाऱ्याला मदतगार शिक्षक (Helping teacher) ही संज्ञा देण्यांत आली आहे. या संज्ञेमुळें आपलें खरें कार्य काय आहे याची या अधिकाऱ्याला नेहमीं जाणीव राहून त्याला अधिकाराचा उन्माद चढत नाहीं.

तपासनीस सरकारी असो किंवा स्थानिक संस्थेचा असो, त्याचें कार्य एकाच स्वरूपाचें आहे. बागेंत तण वगैरे वाढूं नये किंवा झाडांना वाईट वळण लागूं नये म्हणून माळी ज्याप्रमाणें वरच्यावर पहाणी करून, तण दिसले कीं, ते उपटून काढतो, कीड लागलेली दिसली तर ती नाहींशी होण्यासाठीं ताबडतोब उपाय–योजना करतो व एखादें झाड वाकलें असलें तर त्याला नीट करून जरूर त्याला काठी (डेंगी) बांधून आधार देतो; त्याचप्रमाणें तपासनीसानें वेळोंवेळीं शाळांना भेट देऊन जे जे दोष दिसतील ते ते दोष नाहींसे करण्यासाठीं उपाययोजना करणें आवश्यक आहे. रोगाच्या आरंभावस्थेंतच उपाययोजना शीघ्रफलदायी होऊन रोग आवांक्याबाहेर जात नाहीं. तपासनिसाच्या जागरूकतेमुळें शिक्षकहि जागरूक रहातो व त्याचा फायदा सर्व शाळांना व पर्यायानें खात्याला मिळतो.

¶ O. R. No. 11, p. 47. † P. S. p. 111.

तपासनीसानें शाळेंत पाऊल टाकल्यानंतर अनेक बाबींची पाहाणी केली पाहिजे. 'शाळा ही मुलांसाठीं असल्यामुळें प्रथम तपासनीसानें त्यांच्याकडे लक्ष देऊन शाळेंतील त्यांचा वेळ कसा जातो हें पहावें. मुलांना जें शिकविण्यांत येत आहे तें त्यांना समजतें किंवा नाहीं व शाळेंत त्यांना वळण कसें लागलें आहे, याचें त्यानें निरीक्षण करावें. त्याचप्रमाणें शाळेमध्यें सुखाचें व समाधानाचें वातावरण आहे किंवा कसें, हें अजमावण्याचा प्रयत्न करून, गांवकऱ्यांच्या गरजांचा विचार करून त्या दृष्टीनें शाळेच्या कार्याचें धोरण आहे किंवा नाहीं हेंहि त्यानें पाहावें. मुलांचा शाळेंतील वेळ आनंदानें जातो का ? शिक्षक कार्यतत्पर व समाधानी आहेत का ? या व अशाच स्वरूपाच्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठीं त्यानें काळजीपूर्वक पहाणी करणें जरूर आहे. तसेंच तपासनीसानें मुलांना बौद्धिक व शारिरीक शिक्षण योग्य प्रकारचें व योग्य प्रमाणांत देण्यांत येतें का व मुलांना समजेल व पचेल असेच विषय त्यांना शिकविण्यांत येत आहेत किंवा काय हेंहि पाहिलें पाहिजे. त्याचप्रमाणें शाळेच्या आटोपशीर जगांतील योग्य ती जबाबदारी मुलांच्यावर टाकण्यांत येते किंवा नाहीं व सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे मुलांना स्वच्छेतेनें राहाण्याचें शिकवून त्याप्रमाणें ते राहातात किंवा नाहीं, याहि गोष्टीकडे तपासनीसानें लक्ष देणें जरूर आहे.

विद्यार्थ्यांप्रमाणें शिक्षकाकडेहि तपासनीसानें लक्ष पुरविणें अत्यंत अगत्याचें आहे. मुख्याध्यापक व इतर शिक्षक यांच्यामध्यें सलोखा आहे किंवा वेबनाव आहे व वेबनाव असल्यास चूक कोणाची आहे हें तपासनीसानें पाहिलें पाहिजे. किरकोळ स्वरूपाचा वाद असल्यास तो नाहींसा करून त्यांच्यामध्यें मतभेदाचा किंवा तंट्याचा आडपडदा राहाणार नाहीं, असे प्रयत्न त्यानें करणें जरूर आहे. त्याचप्रमाणें शिक्षकानें स्वतःची बुद्धि चालवून शिक्षण देण्याच्या पद्धतींत किंवा इतर बाबीसंबंधीं कांहीं नवा उपक्रम केला असल्यास, त्याची सहानुभूतीनें पहाणी करून त्याचा बरेवाईटपणा अजमावला पाहिजे. याप्रमाणें कल्पक शिक्षकांना स्वातंत्र्य दिल्याशिवाय सुधारणा व प्रगति होणार नाहीं व त्यांनाहि शिक्षणाचें कार्य कंटाळवाणें वाटणार नाही. एकंदर शिक्षकवर्गाशीं तपासनीसाची वागणूक सौजन्याची व स्नेहाची असली तर त्यांनाहि त्यांच्याविषयीं विश्वास वाटूं लागेल व मग तो तपासनिसाजवळ आपल्या अडीअडचणी मनमोकळेपणानें सांगून त्यांवर उपाय विचारील. आपल्या धंद्यांत निष्णात असलेला वैद्य ज्याप्रमाणें प्रेमळ वागणुकीनें आपल्या रोग्याचा प्रथम

विश्वास संपादन करून त्याला बोलता करतो व त्याच्याकडून त्याला काय होतें काय नाहीं याची माहिती घेऊन मग रोगाचें निदान करतो व योग्य ती औषध-योजना करतो त्याप्रमाणें तपासनीसानें वागणेंहि जरूर आहे. शिक्षकाच्या पद्धतीत काय दोष आहेत हें हुडकून काढण्यासाठीं, तो शिकवित असतांना वर्गांत बसून त्याच्या शिकविण्याच्या पद्धतीची पहाणी करणें प्रथम जरूर असून ती पहाणी झाल्यानंतर आपण प्रत्यक्ष शिकवून त्या शिक्षकाच्या नजरेस दोष आणला पाहिजे. एक किंवा अनेक शिक्षकांशीं तात्त्विक चर्चा करून त्यांच्या ज्ञानांतहि सहजपणें भर टाकली पाहिजे. मुलें व शिक्षक यांच्याकडे लक्ष देणें व त्यांच्यामध्यें जास्त काय हें पाहाणें हें तपासनीसाचें खरें काम आहे. हें काम झाल्यानंतर शाळेचें दप्तर तपासणें हें दुसरें व गौण अशा प्रकारचें त्याचें कर्तव्य आहे; परंतु अनेक तपासनीस मुलें व शिक्षक यांच्याकडे न पाहातां दप्तर तपासण्यावरच आपला विशेष भर देतात, हें बरोबर नाहीं.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे तपासनीसावर बहुविध प्रकारची जबाबदारी असून, ती जबाबदारी पार पाडण्यासाठीं "तपासनीसाच्या अंगीं शाळेच्या तंत्रावरील प्रभुत्वापेक्षां राजमंत्र्याचें कसब व धर्मोपदेशकाचा उत्साह व चिकाटी असणें जरूर आहे."‡

उपाययोजना:—(१) तपासनीसाकडे हल्लीं जीं इतर कांहीं कामें देण्यांत येतात तीं कमी करण्यांत यावींत, कारण इतर कामांत बराच वेळ गेल्यामुळें त्यांचें जें खरें कार्य आहे त्याकडे दुर्लक्ष होतें.

(२) सरकारी तपासनीस व स्थानिक संस्थांचे तपासनीस यांचीं वरच्यावर संमेलनें होणें व विचारविनिमय होणें अत्यंत जरूर आहे. हे दोन्ही अधिकारी एकमेकांचे पूरक आहेत, अशी दोघांची व विशेषतः सरकारी तपासनीसांची समजूत होणें जरूर आहे. या दोन्ही वर्गांतील अधिकाऱ्यांचीं संमेलनें होऊन विचारविनिमय झाल्यानंतर एकमेकांच्या विचारें शाळाखात्यांतील दोषांना हद्दपार करण्यासाठीं एकादी योजना आंखणें व त्याप्रमाणें काम करणें सुलभ जाणार आहे.

(३) तपासनीसांना हल्लीं जो प्रवासभत्ता मिळतो तो कांहीं ठिकाणीं निश्चित

---

‡ The tact of a diplomatist, combined with the zeal of a missionary, was more wanted for a school inspector than any mastery of school technique! B. of E., page 155.

रकमेच्या रूपानें मिळतो, तर इतर ठिकाणीं प्रवासाच्या मैलांप्रमाणें विशेष दरानें मिळतो. निश्चित भत्ता ठरवितांना तपासनीसाच्या फिरतीला पायबंद बसणार नाहीं हें धोरण ठेवणें अतिशय जरूर आहे. त्याचप्रमाणें दर मैलामागें भत्ता मिळतो असें दिसल्यानंतर उगीच निर्हेतुक फिरणेंहि तपासानीसास योग्य नाहीं. फाजील काटकसरीप्रमाणें उधळपट्टीहि वाईटच ! तरी या बाबतींत खात्यानें व तपासनीसानें योग्य तें धोरण ऐकून एकमेकांची गैरसोय किंवा नुकसान होणार नाहीं असें वागावें.

(४) कांहीं तपासनीस शिक्षकाकडून सरबराईची अपेक्षा करतात ती चूक आहे. अशा तपासनीसानें शिक्षकाच्या पगाराचा विचार मनांत आणून, आपण रक्तक्षय झालेल्या माणसाला तुंबडी लावून अतिशय वाईट प्रकारचा गुन्हा करीत आहोंत, हें लक्ष्यांत ठेवावें. शिक्षकानेंहि मेजवानीनें वरिष्ठाला खूष करण्यापेक्षां आपल्या कामांतील मेहनतीनें खूष करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगावी, म्हणजे त्यांत त्याच्या स्वताच्या शिक्षाप्रमाणें खात्याचाहि फायदा होईल.

(५) तपासनीसांनीं शिक्षकांचीं संमेलनें भरवावीं व त्या ठिकाणीं शिक्षणखात्याविषयीं तात्त्विक व प्रात्यक्षिक अशी त्यांस माहिती द्यावी. त्याचप्रमाणें शिक्षकांमध्यें विद्याव्यासंग उत्पन्न करून, त्यांना नवीन पुस्तकें वाचण्यास सांगून तीं किती वाचलीं याची पुढील भेटींत चांचणी घ्यावी म्हणजे शिक्षकांची व खात्याची सुधारणा होईल.

तपासनीसांच्या कर्तव्याविषयीं शक्य तितकी चर्चा केली व जरूर त्या सूचनांहि केल्या. शेवटीं हारटॉग कमेटीच्या अहवालांतील पान ६८ वरील उतारा खालीं देऊन हें प्रकरण पुरें करितों—

"In view of the conditions prevailing in the schools and the low average qualifications of the teachers—it is of very great importance that the inspecting staff should be strong both in quality and in quantity—if improvement is to be secured and waste reduced. A strong inspecting staff is required if close touch is to be kept with local conditions and requirements and if sound advice is to be available to those whose task it is to frame an economical and well directed plan of improvement and development. It is also required to stimulate among the people a desire to send their children to school and more important still, to keep him at school

for a reasonable period of time, to prepare the way for compulsion, which can be rendered easier by securing the active co-operations of the parties, to see that the teachers do their duty faithfully, regularly and energetically and to check the attendance registers of the pupils, to safeguard the children of the depressed classes and to ensure that they receive fair play; to encourage better methods of school organisations and teaching, both by advice given at the time of inspection.....by the holding of refresher courses and gatherings of teachers. The Inspectors are the eyes and ears of the ministry, the provincial officials and the local authorities and from them only can trustworthy, impartial and first-hand information be obtained as to the work which the schools are doing and the value which being obtained for the expenditure of public money."

प्रकरण चौथें

शाळागृहें व शिक्षणसाहित्य.



It was not many years ago that an outside observer reported that he would not keep his horse in the type of building that was used for elementary schools.

The Education of India, page 257.

भूतकाळीं शाळा कशा असत हें आपण मागील कांहीं प्रकरणांत पाहिलें आहे. आतां या प्रकरणांत आपण वर्तमानकाळीं शाळा कशा आहेत हें पाहूं व भविष्यकाळीं त्यांच्यांत काय सुधारणा करतां येतील, त्याचाहि ओघानें विचार करूं.

हल्लींच्या काळीं बहुतेक प्रत्येक मुलांच्या शिक्षणाचा 'श्रीगणेशा' शाळेंत करण्यांत येतो. कोणत्याहि देशाचा भावी नागरिक चांगला होणें किंवा वाईट होणें हें त्याला शाळेंत जें शिक्षण मिळेल त्यावर बव्हंशीं अवलंबून असल्यामुळें, व्यक्तीप्रमाणें राष्ट्राच्या भावी हिताच्या दृष्टीनें शाळेला फारच मोठें महत्त्व आहे. परंतु त्यांतल्या त्यांत शिक्षणाचा पाया ज्या शाळेंत प्रथम घालण्यास सुरवात होते त्या प्राथमिक शाळेला सर्वांत अधिक महत्त्व आहे.

प्राथमिक शाळांचे निरनिराळ्या दृष्टीनें वर्गीकरण करण्यांत येतें. प्रथम शहरांतील शाळा व खेड्यांतील शाळा असें स्थानपरत्वें वर्गीकरण होईल. दुसरें वर्गीकरण, शाळेंतील शिक्षकांच्या संख्येप्रमाणें एकशिक्षकी शाळा व अनेकशिक्षकी शाळा असें होतें. तिसरा फरक सरकारी व खाजगी शाळा असा होतो. खाजगी शाळांमध्येंहि मदतीच्या व बिनमदतीच्या शाळा असे दोन पोटवर्ग पाडतां येतील. त्याचप्रमाणें धर्माच्या किंवा भाषेच्या तत्त्वांवर शाळांमध्यें चौथा फरक करतां येईल. कांहीं शाळांमध्यें प्रांताची मुख्य भाषा शिकविण्यांत येते व त्या शाळांमधून सर्व जातींचीं व धर्मांचीं मुलें घेण्यांत येतात. अशा शाळांस सर्वसाधारण शाळा असें म्हणतां येईल. कांहीं शाळांमध्यें उर्दू भाषेंतूनच शिक्षण देण्यांत येतें व त्या शाळांमध्यें फक्त मुसलमानी

धर्मांचीं मुलेंच असतात व कांहीं प्राथमिक शाळा युरोपियन व युरेजिअन लोकांसाठीं चालविण्यांत येतात व त्यामध्यें इंग्रजी भाषेंतून शिक्षण देण्यांत येतें. याचप्रमाणें कांहीं ठिकाणीं मुख्य प्रांताची भाषा एक असतांना, कांहीं दुसरी भाषा बोलणाऱ्या अल्पसंख्य लोकांसाठीं त्यांच्या भाषेंत शाळा चालविण्यांत येतात. जसें, मराठी भाषा बोलणाऱ्या प्रांतांत गुजराथी भाषेच्या शाळा व गुजराथी प्रांतांत किंवा कानडी भाषेच्या प्रांतांत मराठी भाषेच्या शाळा. अशा शाळांना व उर्दू भाषेच्या शाळांना आणि युरोपियन लोकांच्या शाळांना खाजगी शाळा असें म्हणतां येईल. कांहीं ठिकाणीं अस्पृश्य समाजासाठीं स्वतंत्र शाळा आहेत व कांहीं ठिकाणीं मुलांमुलींच्या मिश्र व कांहीं ठिकाणीं पृथक् पृथक् अशाहि शाळा आहेत.

शाळा कोणत्याहि प्रकारची असली तरी त्या शाळांच्या बाबतींत कांहीं प्रश्न अगदीं स्वतंत्र स्वरूपाचे असतात. कांहीं अडचणी कमीजास्त प्रमाणांत प्रत्येक शाळेच्या मार्गांत उभ्या असतात. व कांहीं गरजा बहुतेक सर्व शाळांनाच जेरीस आणीत असतात. अशा सामान्य स्वरूपाच्या प्रश्नांचा किंवा गरजांचा विचार यापुढें केला आहे.

१ शाळागृहें

इमारत:—प्रत्येक शाळेच्या दृष्टीनें इमारतीचा प्रश्न फारच महत्त्वाचा आहे. पूर्वीच्या काळीं लहान मुलांच्या आरोग्याचा प्रश्न मुळीं विचारांतच घेतला जात नसे. त्यामुळें त्या प्रश्नाच्या दृष्टीनें शाळेस इमारत असण्याची आवश्यकता लोकांच्या विचारक्षेत्रांतही जन्माला आली नव्हती. अगदीं प्राचीनकाळीं आश्रमवासी गुरू अध्यापनाचें कार्य करीत, त्यावेळीं साहजिकच गुरूंच्या आश्रमांतच विद्यार्थी राहून तेथेंच विद्याग्रहण करीत. परंतु त्यानंतरच्या कालांत, म्हणजे गांवठी शाळांच्या काळांत, जेथें चार मुलें बसावयास जागा सांपडेल तेथें ती भरविण्यांत येत असे. हंटरकमिशनच्या माहितीप्रमाणें "कांहीं शाळा खाजगी घरांत भरत तर कांहीं देवळांत भरत. कांहीं भाडयाच्या घरांत भरत तर कांहीं भाडें माफ (Rent-free) अशा घरांत भरत. कधीं शाळा अगदीं मोकळ्यावर म्हणजे झाडाखालीं भरत तर कधीं शाळा दिवसा दिवा लावल्यावांचून दिसणार नाहीं, अशा काळोखाच्या खोलींत भरत. रात्रीं गुरांसाठीं उपयोगी येणाऱ्या जागेचा कधीं कधीं दिवसा शाळेसाठीं उपयोग कर-

ण्यांत येत असे. तपासणी करणारासहि नेहमीं झाडाखालीं बसूनच तपासणी करण्याचा प्रसंग येई. "*

लोकल बोर्डानें व म्युनिसिपालिट्यांनीं शाळा चालविण्याची जबाबदारी पत्करल्यापासून या स्थितींत थोडा फार फरक पडूं लागला व शाळांसाठीं चांगल्या जागा पैदा करण्याकडे शाळाचालकांचें लक्ष वेधलें जाऊं लागलें. "शाळेची इमारत गांवांतील सर्व घरांपेक्षां उत्तम असणें जरूर आहे. ती सोयिस्कर व टिकाऊ असली पाहिजे. अशा तऱ्हेनें सर्व सामानानें युक्त अशी इमारत गांवकऱ्यांना व त्यांच्या मुलांना एक प्रकारचें शिक्षणच असून ती अनेक पिढ्या टिकली पाहिजे "‡ असेंहि मत व्यक्त करण्यांत येऊं लागलें.

हंटरकमिशाननें केलेल्या तपासणीप्रमाणें १८८२ च्या सुमारास सरकारी शाळांना बहुतेक चांगल्या जागा असत व या शाळांना चांगल्या जागा पुरविण्याच्या कामीं विशेषतः मुंबई प्रांतांत विशेष लक्ष पुरविण्यांत येत असे. खेडेगांवांतील मदतीच्या शाळांची जागेच्या बाबतींत अतिशयच शोचनीय अवस्था असे. गोठ्यांचा किंवा घरांच्या कोपऱ्यांचा पुष्कळ ठिकाणीं शाळेसाठीं उपयोग करण्यांत येत असे व कांहीं शाळा तर झाडाखालींच भरविण्यांत येत असत. अर्थात् अशा शाळा पावसाळ्यांत चार महिने बंद असत. या सर्व परिस्थितीचा विचार करून "प्राथमिक शाळांच्या इमारती व त्यांतील लाकडी सामान अतिशय साधें व कमी खर्चाचें असावें," अशी कमिशननें शिफारस केली व मुंबई प्रांतांत इमारतीसाठीं जो अवास्तव प्रमाणांत फार खर्च करण्यांत येत असे तो कमी करण्यांत यावा, अशीहि सूचना केली.§

हंटरकमिशाननें सूचना केल्यानंतरहि अनेक वर्षें किंवा अद्यापहि आमच्या शाळांस चांगल्या जागा मिळण्याचा प्रश्न समाधानकारकरीतीनें सुटला नाहीं असेंच म्हणावें लागतें. १९३५–३६ च्या मुंबई सरकारच्या शिक्षणविषयक अहवालांत पान ४६ वर खालील माहिती देण्यांत आली आहे.

"लोकलबोर्डाच्या एकंदर १०२६८ शाळांपैकीं २८५९ म्हणजे शेंकडा २७·८ शाळांना स्वतांच्या इमारती आहेत. ५६० म्हणजे शेंकडा ५·५ शाळा अंशतः बोर्डाच्या व अंशतः भाड्याच्या जागेंत भरतात. २२०४ म्हणजे शेंकडा

---

* हंटर क. रि. पा. ११५. ‡ हंटर क. रि. ११७.

§ हंटर क. रि. पा. ११६.

२१·५ शाळांसाठीं भाड्यानें जागा घेण्यांत आल्या आहेत आणि ४६४५ म्हणजे शेंकडा ४५·२ शाळांस भाडें नाहीं (Rent free) अशा इमारतींत भरविण्यांत येतात. या विनभाड्याच्या इमारतींत चावड्या, धर्मशाळा किंवा शाळांसाठीं कुचकामी असलेल्या खाजगी जागा यांचा समावेश होतो." ही माहिती देतांना मुंबई सरकारनें खालील उद्‌गार काढले आहेत ते लक्षांत ठेवणें जरूर आहे.

"The question of housing primary schools remains as difficult as ever. There has been no appreciable improvement in the accomodation provided for Primary Schools." याच पानावर दक्षिण भागाच्या ऐज्युकेशनल इन्स्पेक्टरच्या अहवालांतील दिलेला उतारा महत्त्वाचा असल्यामुळें तो खालीं दिला आहे.

"It is rather tiresome to have to repeat year after year the same old story of unsatisfactory buildings. But the fact is still there that many of our Primary School--buildings are unfit for use by children, In an age when even criminals are well-housed and well looked after and when institutions for delinquents are no longer treated as juvenile jails, but as reformatory schools, we still come across buildings in which it will be a social crime to house even delinquents. Many a building suffers too much of the sun, rain and wind while not a few have rooms where the sun's rays rarely penetrate and where air-condition is almost entirely absent. These are not conditions that will help to improve the none too good health of the village and lower people."

शाळांसाठीं लागणाऱ्या इमारतींच्या बाबतींत चालू स्थितीचा विचार करतांना, आपणांस शहरांतील शाळा व खेड्यांतील शाळा असा फरक करणें अत्यंत जरूर आहे.

शहरांतील शाळागृहें:—शहरांतील शाळांसाठीं चांगल्या हवाशीर व आरोग्यवर्धक जागा मिळविणें फारसें अवघड नाहीं. एक तर शहरांतील लोकांची साधारण रहाणीच बरीच वरच्या दर्जाची असल्यामुळें शहरांत बांधण्यांत येणाऱ्या इमारती सर्व सुखसोयींचा विचार करूनच बांधलेल्या असतात. त्यामुळें शहरांतील शाळेसाठीं लागणारी इमारत : या शाळेच्या खास मालकीची

नसलो तरी मोठी व प्रशस्त मिळणें शक्य असतें. आपली इमारत शहरांतील म्युनिसिपालिटीनें शाळेसाठीं भाडयानें घ्यावी, अशी अनेक घरमालक खटपट करीत असतात व शक्य त्या सोयी करून देण्यासही तयार असतात. संस्थेकडून भाडें नियमानें मिळण्याची खात्री असल्यामुळें, घरमालकच शिक्षणसंस्थेची मिनतवारी करीत असतात. म्युनिसिपालिट्यांप्रमाणें खाजगी शाळांनाहि चांगल्या जागा मिळणें कठीण जात नाहीं. परंतु कोटें कोटें शाळेची जागा बरी मिळाली तरी आजूबाजूची वस्ती ज्यास्त गर्दीची किंवा गलिच्छ असल्याचा संभव असतो व त्याचा मुलांच्या आरोग्यावर साहजिकच प्रतिकूल परिणाम होतो.

खेडयांतील शाळागृहें:—आरोग्यशास्त्रप्रवीणांच्या अपेक्षेप्रमाणें योग्य अशीं घरें शाळेसाठीं मिळणें जेथें शहरांत अवघड जातें, तेथें खेडेंगांवांत काय होत असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. खेडयांत बरेचसे लोक दरिद्री व कंगाल. कांहीं श्रीमंत असले तरी त्यांना आरोग्यदृष्टया कसें वागावें याची मुळींच कल्पना नाहीं. त्यामुळें खेडयांतील शेंकडा नव्वद घरें बैठीं, मातींत बांधलेलीं, जाळया खिडक्यांचा पूर्ण अभाव, अशी असतात ! एकंदर घराची रचना पहातांच वाऱ्याची झुळूक किंवा प्रकाशाचा किरण चुकूनहि आंत शिरणार नाहीं, याबद्दल मुद्दाम खबरदारी घेतली आहे असें वाटूं लागतें.

अशा गांवांत शाळा काढावयाची म्हणजे अशाच घरांतून एखाद्या घराची निवड करण्याचा प्रसंग येतो. 'उडदामाजी काळें गोरें, काय निवडावें निवडणारें !' अशा घरांची डोळेझांक करून निवड केल्यानंतर मुलांच्या आरोग्याचा विचार करून काय उपयोग ? आमच्या प्राथमिक शाळांसाठीं वापरण्यांत येणाऱ्या इमारती पाहून एका परदेशीं गृहस्थानें " अशा जागेंत मी आपला घोडासुद्धां बांधण्यास तयार होणार नाहीं. " असें कांहीं वर्षांमागें उद्‌गार काढले. या परदेशी प्रवाशाचा घोडा आमच्या लाखो मुलांमुलींपेक्षां अधिक भाग्यवान् होता असें कोणास वाटल्यास चूक होईल काय ?

पुष्कळशा खेडेगांवांत शाळेच्या वांट्याला स्वतंत्र घरहि येत नाहीं. शाळेला घर देण्यास अनेक लोक नाखूष असतात. भाडें देण्यास बोर्ड तयार झालें तरी लोक आडवून कांहीं तरी भरमसाट भाडयाची मागणी करतात. कोणालाच शाळेविषयीं आपलेपणा वाटत नाहीं. मग अंग मोडून व गैरसोय सोसून शाळेची सोय कोण पहाणार ?

बोर्डाच्या शाळेची ही शोचनीय स्थिति, मग गांवांतील लोकांच्या मेहेरवानगीवरच्च केवळ चाललेल्या खाजगी शाळांची गत काय असेल ? हंटर कमिशननें खाजगी शाळांच्या जागेसंबंधीच्या स्थितीचें जें वर्णन दिलें आहे, तें आजच्या स्थितीसहि पूर्णपणें लागू आहे. मेहयूसाहेबांच्या खालील वर्णनांत व हंटर कमिशनच्या वर्णनांत काहीं फरक आहे का ? मेहयूसाहेब म्हणतात,

Many of the schools under private Indian management are still held on verandahs or in temple or mosque precincts where sound instruction is impossible or, worse still, in miserable rooms and hovels where hygiene is disregarded and light and air left out of account.§

उपाय-योजना:—खेडेगांवांतील शाळागृहांची स्थिति वाईट आहे हें सांगण्यास, दिले आहेत यांपेक्षां आणखी उताऱ्यांची जरूरी नाहीं. रोग आहे तो सर्वांनाच पटल्यासारखा आहे. परंतु त्या रोगावर औषध काय हा तातडीचा प्रश्न आहे. हंटर कमिशनच्या कालापासून तों १९३५-३६चा मुंबई सरकारचा शिक्षणविषयक अहवाल प्रसिद्ध होईपर्यंत म्हणजे सुमारें ५५-५६ वर्षांचा काल या प्रश्नाच्या चर्चेंत गेला असून, अजूनहि खेडेगांवांतील लाखों मुलें आरोग्यास विघातक अशा शाळागृहांत बसूनच 'श्री' पासून ते व्ह. फा. पर्यंतचें शिक्षण घेत आहेत. ही परिस्थिति काय केलें असतां बदलेल याचाच आतां विचार करूं.

(अ) नवीन इमारत:—ज्या ज्या गांवाला शाळा आहे त्या त्या गांवाला शाळेस सोयीस्कर अशी नवीन इमारत बांधण्याची योजना असणें अत्यंत जरूर आहे. ही अशी योजना आखतांना पैशाची काय तरतूद करणार ? आमच्यामतें अशा कामासाठीं सरकार, स्थानिक संस्था, धनिक लोक व गांवकरी अशा चौघांचें सहकार्य होणें अत्यंत जरूर आहे. या चौघांपैकीं प्रत्येकानें काय जबाबदारी पत्करणें जरूर आहे हें पाहूं.

सरकार:—नवीन इमारत बांधण्यास, इमारत विकत घेण्यास, असलेली इमारत मोठी करण्यास किंवा पाडून पुन्हां बांधण्यास, त्याचप्रमाणें इमारतीच्या दुरुस्तीसाठीं ५०० रुपयांपेक्षां अधिक खर्च येत असल्यास तो किंवा ज्या दुरुस्त्या-

§ पा. २५७

मुळें इमारतीची किंमत वाढेल अशा दुरुस्त्या करण्यास, किंवा इमारतीसाठीं जागा विकत घेण्याकरितां जो खर्च येईल त्यास कांहीं ठराविक प्रमाणांत मदत करण्याची हल्लींच्या कायद्याप्रमाणें सरकारनें जबाबदारी पत्करली आहे. अशा खर्चाचा जिल्हा बोर्डाच्या बाबतींत $\frac{2}{3}$ हिस्सा व म्युनिसिपालिटयांच्या बाबतींत $\frac{1}{3}$ हिस्सा, आपली आर्थिक स्थिति बरी असेल तर, देण्याचें सरकारनें कबूल केलें आहे.*

सरकारनें ही जबाबदारी पत्करली असली तरी अलीकडे 'आर्थिक परिस्थिति समाधानकारक नाहीं' या सबबीवर ही मदत क्वचित् देण्यांत येते. पण एखाद्या स्थानिक शिक्षणसंस्थेनें एखादें शाळागृह बांधल्यास सरकार आपल्या हिश्याची रक्कम न देतां, त्या इमारतीचें भाडें आकारून तें, सालोसाल्ची मदतीची रक्कम ठरविण्यासाठीं जी एकंदर खर्चाची मोजणी करण्यांस येते त्यांत मिळविण्यासाठीं मान्यता देतें.

उलट, सरकारनें जरी आपल्या हिश्याची रक्कम दिली तरी बोर्डास किंवा म्युनिसिपालिटयांस आपल्या हिश्याची रक्कम उभी करणें कठिण जातें व त्यामुळें त्यांना अशा योजना हातांत घेणें शक्य होत नाहीं.

अशा स्थितींत हंटरकमिशननें सुचविल्याप्रमाणें सरकारनें साध्या व कमी खर्चाच्या इमारतीचे नमुने करणें जरूर आहे. या इमारती दगडांच्या बांधावयाच्या किंवा विटांच्या बांधावयाच्या हें ठरविणें स्थानिक संस्था व गांवकरी यांच्यावर सोंपविण्यांत यावें. ज्या भागांत दगड स्वस्त व मुबलक मिळत असेल, त्या ठिकाणीं इमारती कमी खर्चाच्या दृष्टीनें दगडाच्या बांधण्यांत येतील. ज्या ठिकाणीं दगड मुळींच किंवा बांधकामास योग्य असा मिळत नाहीं, अशा ठिकाणीं लोक विटांच्याहि इमारती बांधतील.

इमारतीचे नमुने ठरवितांना त्यांत निरनिराळ्या सोयी घ्घणें जरूर आहे. त्यांत कोणत्या सोयी पहाव्या याचा पुढें विचार केला आहे. आमच्या मतें सरकारनें अधिक प्रमाणांत शाळागृहांस मदत करण्याचें धोरण आखणें जरूर आहे. त्याचप्रमाणें शक्य असल्यास सरकारनें आर्थिक मदतीच्याबरोबर जवळ मिळण्यासारखा दगड व इमारती लाकूड वगैरे मालहि मोफत द्यावा.

लो. बोर्ड व म्युनिसिपालिट्या—म्युनिसिपालिट्यांची आर्थिक स्थिति बोर्डाच्या स्थितीपेक्षां पुष्कळच चांगली असते. दुसरें असें कीं, म्युनिसिपालि-

---

* प्रा. शि. नि. ११४ व ११५ १२० ब्रिडिंग ग्रँड नियम ६.

ह्यांच्यां त्या मानानें गरजाहि कमी आहेत; कारण त्यांनीं स्वतांच्या शाळा बांधल्या नाहींत तरी भागतें. त्यांना चांगल्या जागा भाडयानें मिळूं शकतात. परंतु बोर्डांच्या शाळांना चांगल्या जागा मिळणें फारच कठीण असतें. नवीन शाळा बांधावयाचें त्यांच्या मनांत असलें तरी पैशाच्या अभावीं त्यांना मनांतला विचार मनांतच ठेवावा लागतो ! लोकांवर कर बसवून पैसे गोळा करणेंहि शक्य नसतें. अशा परिस्थितींत शाळांची व मुलांची मात्र व्यर्थ कुचंबणा होते. तरी ह्या पुढें स्थानिक संस्था म्हणजे लोकलबोर्डें यांवरील, इमारतीसाठीं ठराविक हिश्याची रक्कम देण्याची जबाबदारी कमी करण्यांत यावी. सरकारनें, धनिकांनीं किंवा गांवच्या लोकांनीं शाळागृह बांधून दिल्यास त्या ठिकाणीं शाळा चालविण्याची मात्र बोर्डावर जबाबदारी असावी.

धनिक लोकः—देशांतील श्रीमंत मंडळींनीं शाळागृहांना मदत करण्याच्या कामीं आपल्या पैशाचा थोडाफार उपयोग करणें जरूर आहे. इंग्लंड–अमेरिकासारख्या देशांत एका काळीं शाळागृह बांधण्याची जबाबदारी सर्वस्वीं श्रीमंत लोकांनींच पत्करलेली होती, हें लक्ष्यांत ठेवणें अत्यंत जरूर आहे. सन १८३३ पूर्वी प्राथमिक शिक्षण देणें हें ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या धार्मिक कर्तव्यांपैकीं एक कर्तव्य समजण्यांत येत असल्यामुळें, ठिकठिकाणीं शाळा सुरू करून त्यांच्यासाठीं इमारती बांधणें हें धर्मोपदेशकांकडेच असे व त्यांना श्रीमंत लोक हजारों पौंडांच्या देणग्याहि देत असत. त्या देशांत नेहमीं थंडीचें मान अतिशय असल्यामुळें आपल्यासारख्या त्यांना मोकळ्या जागेंत किंवा अगदीं उघड्यावर शाळा भरविणें शक्य नसे. साहजिकच प्रत्येक शाळेस शक्यतों चर्चशेजारीं स्वतंत्र इमारत बांधून देण्यांत येत असे. इंग्लंडमधील अशा शाळांसाठीं इमारत बांधण्याकरितां मदत म्हणून प्रथम १८३३ सालीं सरकारनें रक्कम मंजूर केली. अद्यापहि धर्मोपदेशकांमार्फत चालविण्यांत येणाऱ्या शाळांच्या दुरुस्तीची जबाबदारी त्यांच्या चालकांवर असून, त्यासाठीं श्रीमंत लोक सढळ हातानें मदत करीत असतात.

आमच्या श्रीमंत लोकांनीं देवळें बांधण्यासाठीं मदत करण्याच्याऐवजीं, शाळांसाठीं मदत करण्याचें व्रत अंगीकारल्यास प्रत्येक शाळेस स्वतःची इमारत मिळण्यास वेळ लागणार नाहीं. परंतु आमच्या धर्मावर श्रद्धा ठेवणारांची अद्यापहि 'शाळांस मदत करणें हें एक धार्मिक कृत्यच आहे' अशी समजूत झाली नाहीं, हें दुर्दैव आहे. तेव्हां या नवीन युगांत आमच्या धार्मिक सम-

जुलीला नवीन वळण देऊन लोकांच्या दृष्टीनें उपयुक्त गोष्टी करणें हेंच खरें धर्माचरण होय, अशी समजूत होणें अत्यंत जरूर आहे.

या बाबतींत गुजराथी धनिकांनीं घालून दिलेला धडा इतरांनींहि गिरविणें जरूर आहे. शेठ मंगलदास-गिरधरदास यांनीं स्वस्त इमारतींची योजना आखली असून त्या योजनेमार्फत इमारती बांधण्याचें काम सुरू झालें आहे. रा. ब. गिरधरलाल उत्तमराम यांनींहि अशाच कामासाठीं मोठी देणगी दिली आहे. सर्वांत मोठी व नमुनेदार योजना म्हणजे 'सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास व्हिलेज बिल्डिंग स्कीम' ही असून, या योजनेप्रमाणें सुरत जिल्ह्यांत एकंदर ९० इमारती साडेचार लक्ष रुपये खर्च करून बांधण्यांत आल्या आहेत. १९३५-३६ मध्यें या योजनेमार्फत नवीन १२ इमारती पुऱ्या करण्यांत आल्या. या योजनेप्रमाणें ज्या गांवांत इमारत करावयाची त्या गांवांतील लोकांनीं इमारत बांधण्यासाठीं मजुरांची व माल वहाण्यासाठीं गाडयांची मदत करावयाची असून, दर विद्यार्थ्यामागें रु. ३० प्रमाणें बाकीचा खर्च सर पुरुषोत्तमदास हे देतात.*

याच बाबतींत रँ. परांजपे यांनीं रत्नागिरी जिल्ह्यांतील आपल्या मुर्डी गांवासाठीं केलेली योजनाहि नांव घेण्यासारखी आहे. प्रत्येक श्रीमंत माणसानें आपल्या गांवापुरती जरी अशी योजना केली, तरी हा विकट प्रश्न सहज सुटण्यासारखा आहे. रावसाहेब, रावबहादूर या पदव्यांकरतां उत्सुक असलेल्या लोकांची पदवीसाठीं शिफारस करतांना त्यांनीं किती खेड्यांना शाळागृहें बांधून दिलीं आहेत हें पहाण्याची जर अधिकाऱ्यांकडून प्रथा पाडण्यांत आली तर एकही गांव शाळागृहावांचून रहाणार नाहीं, असा आमचा अदमास आहे.

गांवकरी लोक:—आपल्या गांवांतील शाळांसाठीं शाळागृह पुरविण्याची खरी जबाबदारी गांवकऱ्यांनींच पत्करणें जरूर आहे. या कामीं सर्व गांवकऱ्यांनीं आपआपल्या परीनें अंगमेहनत करण्याचें कबूल केल्यास, त्या गांवांतील मुलांस लागणारें शाळागृह तयार होण्यास वेळ लागणार नाहीं. पुष्कळशा गांवांत दगड चांगला व मुबलक मिळतो. त्याचप्रमाणें गांवठी लाकूडही मिळण्याचा संभव असतो. तेव्हां आपल्या गांवांत मिळणारा दगड व लांकूड घेऊन गांवांतील सुतार-गवंडयांच्या मदतीनें, बोर्ड शाळेची गरज पाहून ठरवील त्या नमुन्याचें, शाळागृह बांधणें गांवकऱ्यांना कठीण जाणार नाहीं. अशा कामासाठीं जो पैसा

* मुं. शि. रि. (१९३५-३६), पा. ४७

लागेल त्यापैकीं कांहीं सरकारनें द्यावा व बाकीचा गांवकऱ्यांनीं थोडी वर्गणी करावी. 'गांवकऱ्यांनीं वर्गणी करावी' असें आम्ही सुचवितांच अनेक लोक कंगाल शेतकऱ्यांचा कैवार घेऊन आमच्यावर तुटून पडतील याची आम्हांला जाणीव आहे. असें असूनहि आम्ही आमची सूचना करूं इच्छितों. शेतकरी गरीब आहेत ही गोष्ट कोणास कबूल नाहीं ? परंतु गांवकऱ्यांनीं जरूर ती अंगमेहनत केली, मुख्यतः लागणारा दगड व लाकूड माल गांवांतल्या गांवांत तयार झाला व सरकारनेंहि थोडी मदत केली मग शेतकऱ्यांना खर्च करावी लागेल अशी किती रक्कम राहील ? आणि थोडी जास्त रक्कम लागली तरी गांवकऱ्यांनीं ती नको का गोळा करावयास ? आजहि इतर कामासाठीं नाहीं वर्गणी होत ? गांवांतल्या उरुसासाठीं शेंकडों रुपये वर्गणी गोळा करून त्यापैकीं बराच मोठा भाग दारू व तमाशासाठीं खर्च होतो. गांवांत वलूची लोकांची किंवा इतर भिकारांची टोळी आली कीं वर्गणी होतेच. मोठ्या अधिकाऱ्याच्या सरबराईसाठींहि अनेक लोकांना चट्टा बसतोच. अनेक गांवांनीं देवीचें किंवा इतर देवाचें देऊळ बांधण्यासाठीं हजारों रुपयांची वर्गणी गोळा करून तिचा फडशा पाडला आहे, हें आम्हाला माहीत आहे. मग शेतकऱ्यांनीं आपल्या मुलांच्या शिक्षणासाठीं थोडी झीज सोसली तर काय बिघडलें ? सरकार किंवा बोर्ड जी मदत करील ती रक्कमहि शेतकऱ्यांच्या खिशांतूनच येणार ना ? सरकार किंवा बोर्ड दहा गांवांकडून कर घेणार व एका गांवांत खर्च करणार. परंतु आमच्या सूचनेप्रमाणें व्यवस्था केल्यास ज्या गांवचे श्रम व द्रव्य हें त्याच गांवाला खर्चीं पडतील व उपयोगी ठरतील. वर्गणी करतांना जे प्रत्यक्ष कामावर येणार नाहींत त्यांच्याकडून जास्त वर्गणी घ्यावी. ही वर्गणी धान्यरूपानें गोळा करावी व जें धान्य गोळा होईल तें बाजारभावानें विकून त्याचे टक्के करावे म्हणजे कोणासच मदत करणें जाचक होणार नाहीं.

'गांव करील तें राव करणार नाहीं' अशी एक म्हण आहे. गांवानें मनांत घेतल्यास काय होणार नाहीं ? मात्र मनांत घेणेंच फार कठीण आहे. आमच्या गांवकऱ्यांनीं फक्त कर द्यावेत व मग त्यांनीं स्वस्थ बसावें, ही राज्यकारभाराची पद्धतच फार चुकीची आहे. कर दिल्यानंतर 'सरकार शाळा बांधील, सरकार विहीर खणील' असा जप करीत बसण्याची संवय लोकांना लागली आहे. त्यापेक्षां आहे या करांपैकीं कांहीं कर कमी करून 'लोकांनींच फुरसतीच्या दिवसांत आपल्या गांवचे रस्ते करावे, शाळागृहें बांधावीं किंवा त्यांची

दुरुस्ती करावी, विहिरींतील गाळ काढावा, व इतर गांवाच्या हिताची शारीरिक श्रमाचीं कामें करावीं' असा प्रघात पाडल्यास लोकांत संघशक्ति निर्माण होऊन ते अधिक स्वावलंबी होतील व रिकाम्या वेळीं गांवचे पारावर बसून चकाट्या पिटण्यांत व नसत्या कुरापती-कलागती काढून कोर्ट-कचेरी करण्याला जो वेळेचा व पैशाचा व्यर्थ व्यय होतो तोहि बंद पडेल. कर कांहीं कमी केल्यानंतरहि जें उत्पन्न येईल त्यांतून सरकारनें लोकांना उत्तेजन देण्यासाठीं थोडी फार आर्थिक मदत मात्र करावी. पंचायतींना प्रत्येकावर कर बसविण्यास न लावतां लोकांकडूनच अशा तऱ्हेचीं कामें करून घेण्याचा अधिकार देण्यांत यावा व जे प्रत्यक्ष कामावर येणार नाहींत, त्यांच्यावरच कांहीं ठराविक प्रमाणांत कर बसविण्याचा अधिकार असावा म्हणजे खऱ्या श्रमजीवि लोकांना कष्ट करूनच गांवच्या ऋणांतून मुक्त होण्याची सवलत मिळेल.

गांवांतील काम गांवकऱ्यांमार्फत करून घेण्याच्या पद्धतीमुळें आणखी एक फायदा होईल. हल्लीं स्कूल बोर्डाची रु. ५०च्या वरचीं कामें जिल्हा बोर्डाच्या इंजिनियरमार्फत करविण्यांत येतात. परंतु ही पद्धत फारच खर्चाची आहे. या पद्धतीनें इमारतीचें काम फारच महाग पडतें. चंदावरकर कमिटीनें दर मुलामागें नवीन तऱ्हेच्या इमारतीसाठीं ७५ ते १२५ रुपयांपर्यंत खर्च येतो असें म्हटलें आहे व हा अवाढव्य खर्च कोणालाही न झेपण्यासारखा असल्यामुळें, त्या कमिटीला शाळांसाठीं धर्मशाळा, देऊळ, भाड्याचीं घरें किंवा गांवकऱ्यांनीं बांधलेले स्वस्त इमले यांतच शाळा भरविण्याची सूचना करावी लागली.*

गांवकऱ्यांवर सोपविल्यानंतर काम स्वस्त पडतें व चांगलें टिकाऊ होतें, हा आमचा अनुभव आहे. आपलें स्वताचें काम म्हणून लोक आस्थापूर्वक करतात. उलट, बोर्डाच्या मार्फत कंत्राट दिल्यानंतर मक्तेदार हजार लटपटीनें पैसे पदरांत पाडून घेतो व कामहि कच्चें व तखलादू रहातें.

एकंदरींत गांवच्या शाळागृहाची जबाबदारी गांवच्या लोकांवरच टाकणें अनेक दृष्टीनें सोयीस्कर व इष्ट आहे. चंदावरकर कमिटीनेंहि अशाच स्वरूपाची शिफारस पान ३० वर केली असून, मि. मेह्यू यांनींहि तशीच सूचना केली आहे.†

(ब) **शाळांच्या गरजा व इमारतींचे नमुने**—ज्या ज्या गांवांत शाळांना स्वतांच्या जागा नाहींत तेथें नवीन इमारती बांधण्याचें मान्य केल्यानंतर या

---

* पान ३०. † पा. २५७.

इमारती बांधतांना कोणत्या गरजांचा मुख्यतः विचार करणें जरूर आहे, हें पाहिलें पाहिजे.

प्रथम शाळागृह बांधण्यासाठीं जागा शोधून काढतांना खबरदारी घेणें जरूर आहे. जागा मोकळी व भरपूर प्रकाश मिळेल अशी असावी. त्याच-प्रमाणें ही जागा गांवाबाहेर पण गांवानजीक असावी म्हणजे गांवांतील घाणीचा किंवा गोंगाटाचा त्रास न होतां, लहान मुलांनाहि लांब वाटणार नाहीं. ही जागा शाळागृहास पुरून त्याला जोडून खेळण्याचें मैदान (Play-ground) बनवितां येईल एवढी मोठी असावी. पुष्कळशा गांवांजवळ माळरान असतें त्यापैकीं सोयीची जागा घेतल्यास सर्व सोयी करतां येतील. सखोल व शेतजमिनीचें मैदान शाळेच्या दृष्टीनें वाईट असून, लांब पडली तरी टणक व उंचावर असलेली जागा पसंत करावी म्हणजे पाणी मुरून दलदलीचा किंवा मलेरियाचा त्रास न होतां, भरपूर हवा व उजेड प्राप्त होईल. अशी जागा सरकारी असल्यास ती सरकारनें गांवाला मोफत द्यावी व खाजगी असल्यास त्यानें ॲक्वायर करून मिळवून द्यावी.

याप्रमाणें जागा निवडल्यानंतर त्या ठिकाणीं इमारत बांधण्याचा प्रश्न पुढें येतो. इमारतीचा आकार शाळेंतील मुलांच्या संख्येवर अवलंबून राहील. गांवांतील लोकसंख्येपैकीं शेंकडा पंधरा इतके शाळेंत जाणाऱ्या (वय ५ ते १० पर्यंतच्या) मुलांचें प्रमाण असतें. गांवाखेरीज शेजारच्या लहान गांवांतील कांहीं मुलें आपल्या शाळेंत येण्याचाहि संभव असतोच. म्हणजे गांवांतील लोक-संख्येच्या शेंकडा १६–१७ पर्यंत शाळेंत जाणाऱ्या मुलांची संख्या राहील असें म्हणावयास हरकत नाहीं व त्या मानानें शाळेच्या इमारतीचें प्रमाण ठरविण्यांत यावें. हें प्रमाण ठरवितांना वाढत्या लोकसंख्येचा विचार केल्यास, मुलांचें प्रमाण शेकडा २० धरावें लागेल व त्या मानानें इमारतीचा आकार धरावा लागेल.

सरकारनें यासाठीं एकशिक्षकी शाळेप्रमाणें अनेकशिक्षकी व अनेक इयत्तांच्या मोठ्या शाळांच्या इमारतींचे नमुने तयार करावे. एकशिक्षकी शाळेला एकच प्रशस्त हॉल लागतो परंतु अनेकशिक्षकी शाळांसाठीं दोन, तीन, चार, पांच, सहा खोल्या–(Class-rooms) पर्यंतहि इमारतींत तरतूद करावी लागेल. इंग्लंडमध्येंहि एकवर्गी, दोनवर्गी, तीनवर्गी अशा शाळांचें वर्गीकरण केलें आहे. याप्रमाणें शाळेच्या लहानमोठेपणावर त्या शाळेच्या

इमारतींत निरनिराळ्या वर्ग-खोल्या (Class-rooms) किती असाव्यात हें अवलंबून राहील.

या खोल्यांखेरीज कांहीं जादा खोल्याहि शाळेस असण्याची जरूरी असते. शिक्षकास कागदपत्र ठेवण्यासाठीं किंवा मधल्या सुटीच्या वेळीं बसण्यासाठीं एक बारकी खोली असावी. त्या खोलीला शिक्षकाची कचेरी किंवा विश्रांतीची जागा म्हणतां येईल. मोठ्या शाळेंतील सर्व शिक्षकांना या खोलीचा उपयोग करतां येईल.

शिक्षकाच्या खोलीप्रमाणें वाचनालयासाठींहि खोली असावी व या वाचनालयाचा गांवांतील लोकांसहि शाळेची वेळ सोडून इतर वेळीं उपयोग करण्याची परवानगी असावी.

परगांवाहून येणाऱ्या मुलांना फराळाला बसण्यासाठींहि एक खोली असावी. इंग्लंडमध्यें मुलांना कपडे व बूट सुकविण्यासाठींहि एक खोली असते. आपल्याकडे पाऊस कमी असल्यामुळें, तशी खोली नसली तरी चालेल; मात्र ज्या भागांत पाऊस पडतो व कांहीं दिवस सुटीचे गेले तरी पावसाळ्याच्या बाकीच्या दिवसांत कपडे भिजल्यावांचून शाळेंत येतां येत नाहीं, त्या शाळेंत अशी खोली असणें जरूर आहे. भिजलेले कपडे तसेच अंगावर ठेवल्यास पुढें मुलांस संधिवात होण्याचा संभव असतो.* इंग्लंडमधील शाळागृहांना वैद्यकीय तपासणीसाठीं एक स्वतंत्र खोली असावी व एक मोठें सभागृह असावें, अशीहि शिफारस करण्यांत आली आहे. अमेरिकेमध्यें व इंग्लंड-मध्येंहि कांहीं शाळांना सभागृहें जोडण्यांत आलेलीं आहेत.

मुलांची वैद्यकीय तपासणी करावयाचें ठरविल्यानंतर त्यासाठीं स्वतंत्र खोली असणें अत्यंत जरूर आहे. तसेंच शाळेस जोडून असलेल्या खेळण्याच्या मैदानावर योग्य ठिकाणीं देशी पद्धतीची तालीमहि असणें जरूर आहे.

गांवांतील लोकांनीं शाळेच्या चळवळींत भाग घ्यावा असें वाटत असेल, तर शाळेंतील मुलांचे नेहमीं समारंभ करणें आवश्यक आहे व अशा समारंभांस गांवांतील लोकांना आमंत्रण देण्यांत यावें. त्या समारंभासाठीं सभागृहाचा चांगला उपयोग होतो. गांवांतील लोकांची एखादी सभा किंवा समारंभ असला तरी त्यासाठींहि या सभागृहाचा उपयोग करतां येईल. इंग्लंड व अमेरिकेंमध्यें शाळेच्या सभागृहांत रोज गांवांतील मंडळी जमून स्वतांची

---

* P. S. p. 117.

करमणूक करून घेतात व गांवाचे समारंभ त्याच सभागृहांत करण्यांत येतात. आपल्याकडेहि लोकशिक्षणासाठीं ग्रामोद्योगाचें केंद्र म्हणून या सभागृहाचा उपयोग करतां येईल. या सभागृहांत लोकांना शिक्षण देण्यासाठीं फोनो, रेडिओ, किंवा म्याजिक लॅन्टर्नचे प्रयोग करतां येतील. गांवांत पंचायत असल्यास तिच्या सभासाठींहि या सभागृहाचा उपयोग करतां येईल; परंतु असलें सभागृह मोठ्या शाळेलाच जोडून बांधतां येईल. या शाळेसाठीं होणाऱ्या सर्व इमारती शक्यतों एकमजली असाव्यात. दोन मजली केल्यास जिना चांगला प्रशस्त असावा व लहान मुलांचे वर्ग तळमजल्यावरच ठेवण्यांत यावेत.

या सर्व इमारतींच्या जोडीला शिक्षकांसाठीं वसतिगृहें बांधतां आलीं तर दुधांत साखर पडल्यासारखें होईल. बाहेरगांवच्या शिक्षकांस गांवांत चांगली जागा रहाण्यास मिळत नाहीं ही नेहमींचीच तक्रार आहे. तं शिक्षकांस रहाण्यास जागा बांधल्यास ही तक्रार नाहींशी होऊन थोडें भाडेंही मिळण्याचा संभव आहे.

मुलांच्यासाठीं पाण्याची चांगली सोय होणेंहि अत्यंत जरूर आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत तहान लागली असतां मुलांना जवळपास पाणी मिळण्याची कांहींच सोय नसते, हा आमचा अनुभव आहे. इंग्लंड व अमेरिका या देशांत मुलांना चांगलें, ताजें व स्वच्छ पाणी पुरविण्याकडे विशेष लक्ष देतात. पाणी चांगलें पुरविण्यांत न आल्यामुळें, तहानेच्या सपाट्यांत मुलें कुटलेंही घाणेरडें पाणी पितात व मग नाना रोगांचें माहेरघर बनतात. ‡

शाळेच्या या सर्व इमारती बांधतांना त्यांत हवा व उजेड भरपूर येईल एवढी खबरदारी घेण्यांत यावी. दगडी इमारत बांधावयाची किंवा विटांची बांधावयाची हें गांवकऱ्यांवर सोपविण्यांत यावें. इमारतीचा नमुना गांवकऱ्यांच्या विचारानें शाळेच्या गरजेचा विचार करून बोर्डानें ठरवावा व त्या कामावर बोर्डाच्या ओव्हरसिअरनें देखरेख करावी. चिखलांत इमारत बांधली तरी हरकत नाहीं. शाळागृहाची दर्शनी बाजू भपक्याची न करतां साधी

---

† One of the essential contributions to the happiness and welfare of a rural school master is the provision of a suitable house.
—Rural Education, page 48.

‡ Few schools have water on the premises. Often it has to be carried from a neighbouring cottage where the occupant is good-natured enough to supply it. —Rural Education, p. 49–50.

असावी. भपक्यापेक्षां साधेपणांतील सौंदर्यच मनाला खरा आल्हाद देते. बाहेर साधेपणा पण आंत सर्व सोयी अशी इमारत उत्तम. इंग्लंडमध्यें एकेकाळीं इमारतीच्या आंतील सोयीकडे न बघतां, शाळेची इमारत बाहेरून भडक दिसेल अशी बांधण्यांत येत असे. परंतु त्यामुळें शाळांना गैरसोय होऊं लागल्यानें त्या इमारतींत आंतील सोयी करून घेण्यासाठीं पैसा खर्च करून दुरुस्त्या कराव्या लागल्या व त्या दुरुस्त्यांमुळें बाहेरच्या भपक्यांतही पूर्ण बिघाड झाला. शिक्षण सक्तीचें झाल्यानंतर, शाळा बंद पडून इमारत फुकट गेली असें आजच्याप्रमाणें म्हणण्याचा प्रसंग येणार नाहीं. पाण्याची सोय असल्यास शाळेच्या सभोंवतीं टुमदार बागहि करण्यांत यावी. सभोंवतीं टुमदार बाग, मध्यें साध्या व हवेशीर इमारती व पाठीमागें खेळाचें विस्तृत मैदान अशी एकंदर मांडणी पाहून मुलांच्या मनाला शाळेंत शिरतांच प्रसन्नता प्राप्त झाल्यावांचून रहाणार नाहीं. समाधी लावण्यासाठीं जागा पहातांना ज्या ठिकाणीं मन प्रसन्न होईल अशी जागा पहावी असा योगशास्त्राचा नियम आहे. शिक्षणासाठीं सुद्धा मुलांचीं मनें प्रसन्न होतील अशी जागा असणें, अत्यंत जरूर आहे. वरील सूचनांप्रमाणें एखाद्या गांवाला व्यवस्था करतां आली तर ती नमुनेदार शाळा होईल यांत कांहीं शंका नाहीं.

(क) कांहीं शाळांस धर्मशाळांच्या किंवा खास बांधलेल्या इमारती आहेत. अर्थात् अशा शाळांना नवीन इमारती बांधण्याची जरूरी नाहीं. मग या जुन्या इमारतींना शाळेच्या दृष्टीनें योग्य स्वरूप देण्यासाठीं, कांहीं दुरुस्ती करावी लागेल तीहि बोर्डाच्या ओव्हरसीअरच्या सल्ल्यानें गांवकऱ्यांकडून करून घेण्यांत यावी. शाळांच्या जागेसंबंधीं प्रश्नाचा विचार करतांना आणखी एक सूचना करावीशी वाटते. अनेक गांवांत बोर्डाच्या मालकीच्या ऐसपैस अशा धर्मशाळा बांधलेल्या आहेत. ज्या वेळीं पायानें किंवा बैलगाडयांतून लोक मुशाफरी करीत असत, त्या वेळीं साहजिकच ठिकठिकाणीं त्यांच्या सोयीसाठीं धर्मशाळांची आवश्यकता असे. परंतु आतां आगगाडीनें किंवा मोटारगाड्यांनीं प्रवास होत असल्यामुळें, अशा अनेक गांवीं धर्मशाळांचा पूर्वीचा उपयोग राहिला नाहीं. परंतु बोर्डाकडून दरसाल त्यांच्या डागडुगीचा खर्च मात्र करण्यांत येतो व क्वचित् एखादा बैरागी आला तर त्यांत उतरतो. या अशा धर्मशाळांचा उपयोग अनेक ठिकाणीं शाळागृहांसाठीं करण्यास कांहीं हरकत नाहीं. कांहीं ठिकाणीं तसा उपयोग करण्यांतहि येत असतो. परंतु

बऱ्याच ठिकाणीं धर्मशाळा तशाच पडून आहेत. त्या शाळेसाठीं दिल्यास सरकारणीं लागतील. मात्र त्यांत शाळेच्या दृष्टीनें जरूर ते फेरबदल करावे लागतील. हे फेरबदल वर सुचविल्याप्रमाणें गांवकऱ्यांच्या मदतीनें करून घेणें अवघड पडणार नाहीं.

पुष्कळशा गांवांत शाळा देवळांत भरविण्यांत येते. परंतु अस्पृश्य व इतर धर्मांच्या मुलांना स्पृश्य हिंदूंच्या बरोबरीनें बसवून देण्यास गांवकरी लेखी संमति देत असतील तरच बोर्डाची शाळा देवळांत भरण्यास परवानगी देण्यांत यावी. बोर्डानें या बाबतींत थोडें कणखरपणाचें धोरण ठेविल्यास, शाळेची ज्यांना खरी गरज आहे, असे गांवकरी अस्पृश्यांच्या मुलांस इतर मुलांबरोबर बसण्यास विशेष हरकत करीत नाहींत. शाळेच्या निमित्तानें स्पृश्यास्पृश्य भेद नाहींसे होऊन अस्पृश्यांच्या मुलांस, देवळाच्या गाभाऱ्यांत जातां आलें नाहीं, परंतु सभामंडपांत प्रवेश मिळाला, तरी देशाच्या दृष्टीनें पाऊल पुष्कळ पुढें पडेल असें समाधान मानण्यास मुळींच हरकत नाहीं. मात्र एरव्हीं देवळांत शाळा भरण्यास परवानगी देऊं नये हेंच चांगलें.

(ड) शाळेसाठीं जेथें बोर्डाच्या मालकीची किंवा सरकारी जागा नाहीं, त्या ठिकाणीं शाळागृह मुख्यतः गांवकऱ्यांच्या प्रयत्नानें नवीन बांधून घ्यावें अशी वर सूचना केली आहे. ही सूचना अमलांत आणणें कांहीं कारणामुळें शक्य झालें नाहीं, तर काय करावें याचाहि विकल्पानें विचार करणें जरूर आहे. अशा ठिकाणीं शाळेसाठीं भाड्यानें जागा घ्यावी लागते व सरकार हा भाड्याचा खर्च मान्य करून त्यावर आपल्या हिश्याची भॅट देतें. परंतु पुष्कळ ठिकाणीं भाड्यानें देखील चांगली जागा मिळत नाहीं व शाळा मोठी असली तर दोन किंवा अधिक इमारतीहि भाड्यानें घ्याव्या लागतात व या इमारती एकमेकींपासून लांब असल्या तर मुख्य मास्तरला इतर शिक्षकांच्या कामावर देखरेख करणें अशक्य होतें. आपल्या जागेशिवाय गांवांत शाळेला भाड्यानें घेतां येण्यासारखी दुसरी जागा नाहीं, ही जाणीव कांहीं घरमालकांना झाली, तर ते भरमसाट भाडें मागण्यास लागतात व भाड्यासाठीं शाळा बंद करणें योग्य नसल्यामुळें बोर्डाला तें द्यावें लागतें.

हल्लीं अनेक श्रीमंत लोकांच्या जवळचा पैसा, बँकांनीं व्याजाचे दर कमी केल्यामुळें व तो दुसरीकडे फायदेशीरपणें गुंतविणें शक्य नसल्यामुळें, तसाच पडून आहे. अशा कांहीं श्रीमंत लोकांनीं एखादी सामुदायिक भांडवलाची

कंपनी काढल्यास, त्या कंपनीला बोर्ड सांगेल त्या ठिकाणीं शाळागृह बांधून देतां येईल व बोर्डाकडून भाड्याच्या रूपानें, त्यांना बँकेकडून व्याजाच्या रूपानें मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षां अधिक, निदान तितकें उत्पन्न भाडें म्हणून खात्रीनें मिळेल. या योजनेंत स्वार्थ साधून शिक्षणास मदत करण्याचा परमार्थहि साधेल व बोर्डाचीहि कांहीं गैरसोय राहणार नाहीं. कधीं काळीं बोर्डास किंवा वाटल्यास गांवकऱ्यांना पंचामार्फत योग्य किंमत करून, ती इमारत विकत घेण्याचीहि सवलत असावी किंवा बोर्डाकडून भाड्याची आकारणी करतांना, रकमेवरील व्याजाप्रमाणें मुद्दल रकमेचाहि कांहीं ठराविक प्रमाणांत समावेश करण्यांत आल्यास कांहीं ठराविक कालानंतर कंपनीच्या मूळ मुदलाची व्याजासुद्धां भरपाई करून ती मिळकत गांवकऱ्यांच्या किंवा बोर्डाच्या मालकीची होईल, अशी भाडें–खरेदी (Hire purchase) सारखी एखादी सवलतहि ठेवणें शक्य होईल.

श्रीमंत लोकांनीं याप्रमाणें कंपनी काढावी किंवा सरकारनें कमी व्याजानें कर्ज काढून याप्रमाणें योजना आखावी.

शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचें केल्यानंतर शाळागृहाचा प्रश्न हल्लीं आहे यापेक्षां अधिक मोठा व अधिक बिकट होणार आहे, त्यावेळीं वरील सूचनांचा विचार करण्यावांचून दुसरा मार्गच रहाणार नाहीं.

(इ) शाळागृह झाल्यानंतर तें नेहमीं दुरुस्त व स्वच्छ ठेवण्याचा प्रश्न पुढें येतो. हल्लीं बोर्डामार्फत वर्षांतून दोन वेळां (उन्हाळी व पावसाळी) दुरुस्त्या करण्यांत येतात. सरकारनें मध्यंतरीं बोर्डाच्या मदतीच्या रकमेला कपात लावल्यामुळें हल्लीं वर्षांतून एक वेळच दुरुस्ती करण्यांत येते.

पन्नास रुपयांच्या आंतील दुरुस्ती हेडमास्तरमार्फत करविण्यांत येते व त्यावरच्या रकमेची दुरुस्ती बोर्डाचे इंजिनियर यांच्यामार्फत करून घेण्यांत येते. बोर्डामार्फत होणारी ही दुरुस्तीची रक्कम प्रत्यक्ष खर्च पडणाऱ्या रकमेपेक्षां निदान दुपटीनें ज्यास्त आकारण्यांत आलेली असते, असा आमच्या अनुभव आहे. म्हणजे एक रुपयाच्या कामासाठीं बोर्डाचे दोन किंवा तीन रुपये खर्च पडून बाकीचे रुपये मध्यस्थाच्या खिशांत जाऊन, केलेलें काम मात्र आठ आणे किंमतीचें पदरांत पडतें. या एकंदर प्रकारानें शिक्षणखात्याचा खर्च आवाच्या सव्वा वाढून लोकांना शिक्षण फारच महाग पडतें. या जादा खर्चाची जबाबदारी शेवटीं कर भरणाऱ्या गांवकऱ्यांवरच येऊन पडते.

इतक्या आडवळणानें येणारी जबाबदारी गांवकऱ्यांनीं प्रत्यक्षपणेंच कां पत्करूं नये ? गांवांतील इतर घरांबरोबर दरसाल शाळेची शेकारणी करणें त्यांना अशक्य आहे काय ? आपल्या घराच्या उभ्या भिंती दरसाल दोन वेळां सारवणारांना शाळेच्या भिंतींना चुन्याचा हात मारणें त्रासाचें होणार आहे कां ? गांवांतील सुतारानें एक दिवस खर्च केला तर, शाळागृहाचीं खीळखिळीं झालेलीं दारेंकवाडें दुरुस्त होतील. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे गांवकऱ्यांच्यावर ही वार्षिक दुरुस्तीची जबाबदारी टाकल्यास चांगलें काम विनखर्ची मिळेल. गांवांतील लोकांना एखाद्या गरिबाला सामुदायिकरीत्या मदत करण्याची संवय असतेच. एखाद्या विधवेच्या घरीं लहान पोरवडा असला तर गांवांतील सर्व लोक एक दिवस नांगर नेऊन तिचें वावर नांगरून देतात व योग्य वेळीं पेरणीहि करून देतात. मग याच तत्त्वावर शाळेसाठीं त्यांना काम नाहीं का करतां येणार ?

ही झाली दुरूस्तीची बाब. परंतु नित्याचीं कांहीं कामें ' स्वच्छतेसाठीं ' करावीं लागतात त्याचें काय ? शाळा किंवा तिच्या भोवतालचें आवार दररोज झाडावें लागतें. त्याचप्रमाणें आठवड्यांतून निदान एक वेळ जमिनी सारवून घ्याव्या लागतात. या खर्चासाठीं ' सादील ' म्हणून रक्कम दरशाळेप्रीत्यर्थ मंजूर करून मास्तरजवळ देण्यांत येते. या रकमेपैकीं कांहीं रक्कम मास्तर स्वतांच्या खिशांत घालतात, अशा अनेक ठिकाणांहून तक्रारी नेहमीं ऐकूं येतात.

अनेक शाळांमधून हीं कामें करण्यासाठीं बाया ठेविलेल्या असतात. इंग्लंडमध्येंहि प्रत्येक शाळेची ही स्वच्छता राखण्यासाठीं व शाळेच्या इतर सामानाची व्यवस्था पहाण्यासाठीं कायम नोकर(Care-taker) ठेवलेले असतात. परंतु तिकडेहि या नोकरांकडून अनेक वेळां हें काम वेळेवर न झाल्यामुळें, तें मुख्य शिक्षकाला करवून घ्यावें लागतें.

आमच्या मतें ही झाडलोटीचीं किंवा सारवण्याचीं कामें शाळेंतील प्रौढ मुलांकडून करून घेण्यांत यावींत. आमच्या मुलांना हल्लीं जें शिक्षण मिळत आहे, त्यामुळें त्यांना शारीरिक श्रमाचीं कामें करणें कमीपणाचें वाटूं लागलें आहे. शहरांतील मुलांना मंडईतून भाजीची झोळी हातांत घेऊन येण्याची आतां लाज वाटूं लागली आहे ! खेडयांतील मुलांनाहि, कांहीं शिक्षण घेतल्यानंतर, वाडवडील जीं कष्टाचीं कामें करतात तीं कामें करण्याचा तिटकारा वाटूं

लागला आहे ! ही वृत्ति मोठी घातक आहे. ती नाहींशी करण्यासाठीं शाळेंतच त्यांच्याकडून ही अशीं कामें करून घेण्यांत आलीं पाहिजेत. शहरांत ही सूचना जरी ग्राह्य वाटली नाहीं तरी खेडयांतील शाळेंत सरसकट याप्रमाणें क्रम सुरू केल्यास मुलांना निराळें व इष्ट असें वळण मिळून बोर्डाचीहि बचत होईल.

गांवांतील बऱ्या स्थितींत असलेल्या पालकांकडून या सूचनेला हरकत येण्याचा संभव आहे. मुलांना शाळेंत घालतांना जो अर्ज करावा लागतो, त्या अर्जावरच "शाळेंतील कामें नियमाप्रमाणें करण्यास माझी हरकत नाहीं" अशा अर्थाचें एक कलम घालण्यांत यावें. ज्याची हरकत असेल त्याच्याकडून मुलासाठीं दरमहा आणा दोन आणे घेण्यांत यावे व तसा नियम करावा. ज्यांना आपला मोठेपणा शाळेंतहि दाखवावयाचा आहे, त्यांना त्याबद्दल थोडी किंमत पडणें जरूर आहे. गरीब लोक पैसे देण्यापेक्षां 'आपल्या मुलांनीं शाळेंत मास्तर सांगतील तें शाळेचें काम करावें' असें खुषीनें लिहून देतील.

या योजनेमुळें 'मी मोठ्याचा, तो गरीबाचा' ही घातुक भावना ज्या विद्यार्थ्यांच्या मनांत आहे ती नाहींशी होईल. गांवाच्या पाटलाचा मुलगा आणि येसकराचा मुलगा जोडीनें शाळा झाडूं लागल्यानंतर, श्रेष्ठकनिष्ठपणाची भावना लोपल्यावांचून कशी राहील ? गांवांतील ग्रामजोश्यांचा मुलगा व मांगाचा मुलगा जोडीनें शाळेच्या बागेला पाणी घालूं लागल्यानंतर, वर्णवर्चस्वाची अपमानकारक कल्पना कशी डोकेंवर करणार ? श्रम करणारे सर्व एका वर्गाचे, एका जातीचे, एका राष्ट्राचे ही भावना ज्या वेळीं आमच्यांतील प्रत्येक मुलाच्या मनावर बिंबली जाईल त्याच वेळीं देशाचा खरा उद्धार होईल. या उपक्रमामुळें प्रथम कांहीं लोकांना वाईट वाटेल, परंतु परिणामीं त्यांचा फायदाच होईल. मामलेदाराचे घरचे गोठे वेळप्रसंगीं झाडणाऱ्या एकाद्या पाटलाला आपला मुलगा शाळा झाडूं लागल्याबरोबर कमीपणा कां वाटावा ? घरीं लोण्याचा गोळा खाऊन तो न पचल्यामुळें आजारी पडणाऱ्या गुजराच्या मुलानें शेणाचा गोळा घेऊन शाळा सारवून काढली तर आयता व्यायाम होऊन लोण्याचा गोळा पचण्याची विनखर्ची सोय होईल. शाळेंत कष्टाचीं कामें करण्याची संवय लागल्यानंतर श्रीमंत लोकांना श्रमजीवि लोकांच्यां दुःखाची अनुभवानें कल्पना येऊन त्यांच्याविषयीं आपलेपणा वाटूं लागेल, हाही कांहीं लहान फायदा नाहीं. त्याचप्रमाणें आज कांहीं शिक्षक हीं कामें गरिबांच्या मुलांकडून करून घेऊन सादीलची रक्कम खिशांत घालतात, त्यांना

या पद्धतीमुळें सर्वांकडून उघडपणें काम करून घेतां येईल व अशा तऱ्हेनें सादीलची रक्कमच जिरविण्याचा अप्रामाणिकपणा त्यांना करावयास लावणारें एक मोहाचें कारणहि नाहींसें होईल. म्हणजे मुलांच्या मनोवृत्तीप्रमाणें कांहीं शिक्षकांची नीतिमत्ताहि सुधारण्यास या उपायानें मदत होईल.

हीं कामें करून घेतांना शिक्षकानें स्वतः देखरेख करावी व मुलांच्या कामांतहि खेळीमेळीनें सहभागी व्हावें म्हणजे त्यांच्या व मुलांच्यामधील भीतीचा पडदा नाहींसा झाल्यावांचून रहाणार नाहीं. **शाळागृह हें आपलेंच घर आहे अशी शिक्षकाची, पालकाची व विद्यार्थ्यांची भावना होणें शाळेच्या यशाच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे.**

अशा तऱ्हेनें काम करून जी सादीलची रक्कम शिल्लक राहील, तिचा उपयोग शाळेसाठीं एखादी उपयुक्त वस्तु, विशेषतः खेळण्याची वस्तु, घेण्या-साठीं करण्यांत यावा, म्हणजे आपल्या शारीरिक श्रमाचें फल नेहमीं मुलांच्या डोळ्यांपुढें राहून त्यांचा काम करण्याचा उत्साह द्विगुणित होईल.

२ शिक्षणसाहित्य.

शाळेच्या इमारतीचा विचार केल्यानंतर त्या शाळेंत जें शिक्षण देण्यांत येतें, त्यासाठीं लागणाऱ्या शिक्षणसाहित्याचा विचार करणें ओघानेंच येतें. पूर्वीच्या काळच्या शिक्षणपद्धतींत 'मुलांना मन असतें व तें मन कांहीं ठराविक मार्गानें व नैसर्गिक नियमाप्रमाणें विकसित होत असतें,' ही जाणीवच मुळीं शिक्षकाला झालेली नव्हती. 'छडी लागे छम् छम् विद्या येई घम् घम्' या सूक्ताला वेदवचनाचा मान देऊन मुलांना छडीच्या जोरावर कवाईतीप्रमाणें कांहीं ठराविक गोष्टी घोकावयास लावण्याकडे सर्व शिक्षकांचा ओढा असे.

परंतु पाश्चिमात्य देशांत पेस्टोलोझीच्या प्रयत्नामुळें एक शिक्षणाची नवीन पद्धत जन्माला आली. या पद्धतीनें मुलांच्या मनाचें अस्तित्व मान्य करून, त्यांच्या मनाच्या वाढीचें निरीक्षण करून त्या विकासाच्या अनुरोधानें व विकासाला पोषक होईल अशी शिक्षण देण्याची नवीन पद्धत सुरू केली आहे. पेस्टोलोझीनंतर त्याचा शिष्य फ्रेडरिच फ्रोबेल (Friedrich Froebel) या जर्मन गृहस्थानें बालोद्यान (Kinder garten) पद्धति जन्माला आणली. याच पद्धतींत थोडा फेरबदल करून मॅडम मारिआ

मान्टेसरी यांनीं 'मांटेसरी' या नांवानें ओळखली जाणारी नवीन पद्धत सुरू केली.§

या सर्व पद्धतींबाबत विशेष चर्चा प्रस्तुत ठिकाणीं करणें शक्य नाहीं. तूर्त येवढेंच सांगावयाचें कीं, या सर्व पद्धतीमुळें शिक्षणसाहित्याला फारच महत्त्व प्राप्त झालें असून, या पद्धतींच्या यशाचें बरेचसें श्रेय शिक्षणसाहित्याला आहे. आपल्याकडील शाळांना जें शिक्षणसाहित्य देण्यांत येतें, तें इंग्लंडमधील शाळांशीं तुलना करतां अगदींच कमी प्रतीचें व जुजवी स्वरूपाचें असतें, असें म्हणावयास हरकत नाहीं.

लाकडी सामान:—प्रत्येक शाळेला शिक्षणसाहित्य म्हणून कांहीं लाकडी सामान लागतें. आपल्याकडे महत्त्वाचें लाकडी सामान म्हणजे एखादें कपाट, फळा, टेबल, खुर्ची व लाकडी गोट्यांची चौकट. यांपैकीं कपाट हें शाळेचे कागदपत्र ठेवण्यासाठीं व टेबलखुर्ची ही शिक्षकास बसण्यासाठीं. मोठ्या कपाटाचा मान मिळालाच तर मोठ्या शाळेला मिळतो; बाकीच्या शाळांच्या वांट्याला बहुतेक लहान कपाट किंवा एखादी लहान-मोटी पेटीच येते. प्रत्येक शाळेला एक कपाटच देण्याचा प्रघात असावा. शाळेची इमारत मालकीची असल्यास त्या शाळेच्या भिंतींतच कपाट पाडून घेण्यांत यावें, म्हणजे मोडतोड होण्याची भीती नाहींशी होऊन कपाटामुळें शाळेची जागा अडण्याचा संभवहि कमी होईल. लहान शाळेस लहान कपाट देण्यांत यावें, पेटी मात्र देऊं नये; कारण पेटी ही अतिशय गैरसोयीची असते. कपाटांत निरनिराळे कप्पे असल्यामुळें त्या कप्यांत निरनिराळ्या जिनसा ठेवण्यांत येतात व एखादी जिन्नसच पाहिजे तेव्हां बाकीच्या वस्तुस न हालवितां काढतां येते. परंतु पेटीमध्यें सर्व जिनसा एकावर एक ठेवाव्या लागतात व त्यामुळें अगदीं खालीं ठेवलेली वस्तु किंवा पुस्तक पाहिजे असल्यास, वरच्या सर्व जिनसा काढून पुन्हा आंत ठेवाव्या लागतात व त्यांतच वेळ जाऊन प्रत्येक खेपेस कारण नसतां हाताळल्यामुळें, त्या इतर जिनसांहि खराब होतात.

प्रत्येक शाळेंत एक बारकासा पुस्तकसंग्रह ठेवण्याचें ठरविस्यास शाळांना कपाटेंच पुरवावीं लागतील.

कपाटानंतर महत्त्वाच्या वस्तु म्हणजे टेबल व खुर्ची. यांचा उपयोग शिक्षकाला बसण्यासाठीं असला तरी एखादा सन्मान्य पाहुणा शाळेंत आल्यास

§ Cubberley, p. 261-328.

निदान लहान शाळेंत तरी त्याचा सन्मान करण्यासाठीं खुर्ची त्याला द्यावी लागते व शिक्षकास उभें रहावें लागतें. शक्य असल्यास ज्या शाळेंत खुर्ची नसेल तेथें एखादें स्टूल जादा देतां आल्यास पहावें. परंतु प्रत्येक शाळेस एक स्टूल म्हटलें तरी त्यामुळें खर्चांत वाढ होणार असल्यामुळें, प्रत्येक बोर्डाला स्वतांची आर्थिक परिस्थिति पाहूनच या सूचनेचा विचार करावा लागेल.

अनेक शाळांना भेट दिल्यानंतर टेबल व खुर्च्या नादुरुस्त अवस्थेंत दिसून येतात. कधीं कधीं तर नवीन सामान पुरविल्यानंतर चारसहा महिन्यांतच टेबलाचा पाय व खुर्चीचा हात निकामी किंवा जायबंदी झालेला दिसून येतो. आमच्या अनेक शिक्षकांना खुर्चीवर कसें बसावें हें सुद्धां अजून नीट समजलें नाहीं, असें दुःखानें म्हणावें लागतें. कांहीं शिक्षक तर टेबल–खुर्चीचा दुपारी वामकुक्षी करण्यासाठीं पलंगासारखा उपयोग करतात व झोपेंत भलत्याच ठिकाणीं भार टाकून टेबल–खुर्ची लवकर खिळखिळी होण्यास मदत करतात. कांहीं ठिकाणीं शाळा चांगल्या रस्त्यापासून दूर असल्यामुळें लाकडी सामान स्कूल बोर्डाच्या कचेरींतून शाळेपर्यंत आदळत आपटत जातें व त्यामुळें प्रवासानें त्याचें अंग सडकून निघतें.

कारण कांहीं असलें तरी शिक्षकानें गांवांतील सुताराची मदत वेळाच घेऊन या सामानाकडे लक्ष पुरविल्यास लाकडी सामानाचीहि भारी जबर नासधूस वांचेल यांत कांहीं शंका नाहीं.

फळा प्रत्येक शाळेला बहुतेक असतोच. परंतु वय झालें म्हणजे काळे केस पांढरे होतात तसा फळाहि काळ्याचा पांढरा होतो व त्यामुळें तो वृद्धावस्थेंत असूनहि निरुपयोगी ठरतो. या फळ्याला वरचेवर काळा रंग देण्याची दक्षता कांहीं शिक्षक पाळतात. परंतु कांहीं पोक्त शिक्षक स्वतांच्या पांढऱ्या होणाऱ्या केसाला दर आठवड्याला कलप देऊन काळे करण्याची विनचूक खबरदारी घेत असतांनाहि, फटफटीत झालेल्या विचाऱ्या फळ्याकडे ढुंकूनहि पहात नाहींत.

वृद्धत्वामुळें जशा चेहेऱ्यावर सुरकुत्या पडतात तशा जुन्या फळ्यावर चिरा दिसूं लागतात. पांढरा दिसणारा किंवा चिरांच्या सुरकुत्यामुळें वृद्ध झालेला फळा तावडतोब दुरुस्त करण्याचें धोरण ठेवणें जरूर आहे. कारण पाटीवांचून जसें मुलांचें चालणार नाहीं तसें चांगल्या फळ्यावांचून शिक्षकांस मुलांना कांहीं विषय चांगले शिकवितां येणार नाहींत. फळा रंगविण्याचे

कांहीं स्वस्त व टिकाऊ रंग निघाले आहेत ते शिक्षकांना पुरविण्याची बोर्डानें खबरदारी घ्यावी व त्यांचा उपयोग वेळच्यावेळीं केला जातो का नाहीं हें पहाण्याची दक्षता शाळा तपासणारांनीं ठेवावी. ज्या शाळांना फळा नाहीं किंवा ज्यांचा फळा पूर्णपणें निकामी झाला आहे, त्यांना वेळच्यावेळीं फळा पुरविण्याबाबत बोर्डानें जागरूक राहिलें पाहिजे. परंतु बोर्डाकडे मागणी केल्याखेरीज बोर्डाला जागरूकता दाखवितां येणार नाहीं हेंहि तितकेंच खरें आहे.

गोट्यांची चौकट मुलांना अंक शिकविण्यासाठीं किंवा साध्या बेरजा वजाबाक्या शिकविण्यासाठीं उपयोगीं आणली जाते. त्या चौकटी सर्व शाळांना मिळतातच असें नाहीं. ज्या शिक्षकाला ही चौकट मिळालेली नाहीं तो खडे किंवा काड्या गोळा करून तिची उणीव भरून काढतो. इतर कांहीं नाहीं तरी ही साधी वस्तू तरी प्रत्येक शाळेला मिळणें जरूर आहे.

शिक्षकाला बसण्यासाठीं टेबल–खुर्ची देण्यांत येते; परंतु विद्यार्थ्यांसाठीं काय सोय असते हें पाहूं. लागल्यास साधारणपणें शहरांतील शाळांमधून मुलांसाठीं खुर्चीस जोडलेलीं मेजें किंवा निदान बाक यांची तरतूद केलेली दिसते. इंग्लंड किंवा अमेरिकासारख्या देशांत प्राथमिक शाळांतील मुलांसाठींहि बसण्यास खुर्चीस जोडलेली मेजे आवश्यकपणें ठेवलेलीं असतात. इतकेंच नव्हे; तर मुलांच्या प्रकृतीच्या दृष्टीनें व सोयीच्या दृष्टीनें कोणत्या घाटाची किंवा प्रकाराची खुर्ची, मेजें असावीं याचें संशोधन करून त्याप्रमाणें आधुनिक सामान मिळावें म्हणून त्या देशांत सारखी मागणी चालू असते. आपल्या खेड्यांतील शाळांमध्यें मुलांस जमिनीवरच बसविण्यांत येतें. कांहीं मुलें आपलें बस्कर घरून रोज बरोबर घेऊन येतात किंवा कांहीं थोड्या शाळांत दोन्ही भिंतीला लागून तरटाच्या पट्ट्या पसरलेल्या असतात. पण सर्वसाधारण अशी कांहींच व्यवस्था नसते. कांहीं भाड्यानें घेतलेल्या इमारतीमध्यें जमिनीला ओल असली म्हणजे ५, ६ तास त्या जमिनीवर बसण्याऱ्या मुलांच्या प्रकृतीला अपाय झाल्यावांचून कसा रहाणार ? म्हणजे विद्या घेण्यासाठीं शाळेंत आलेलीं मुलें विद्येऐवजीं रोगच घेऊन बाहेर पडतात. इतर अनेक बाबींप्रमाणें या बाबतींतहि शहरांतील मुलें अतिशय भाग्यवान् आहेत यांत कांहीं संशय नाहीं.

यावर या परिस्थितींत सुधारणा करण्यासाठीं काय उपाय करावा हा प्रश्न पुढें येतो. आम्हीं दुसरीकडे प्राथमिक शाळांनाहि उद्योगधंद्याची जोड देण्यांत यावी याविषयीं विस्तारपूर्वक चर्चा केली आहे. प्रौढ मुलांना सुतारकीचा

घंदा शिकवावा अशी आम्हीं सूचना केली आहे. ठिकठिकाणीं हा धंदा मुलांना शिकविण्याची सोय करण्यांत आली तर खेडेगांवांतील शाळांना लागणारें लाकडी सामान सुबक नसेल तरी टिकाऊ व भक्कम असें या मुलांच्या कडून तज्ज्ञ सुतारकी शिक्षकांच्या देखरेखीखालीं तयार करून योग्य किंमतीला आजूबाजूच्या शाळांना पुरवितां येईल. आज बोर्डाला लागणारें लाकडी सामान शहरांत टेंडरें मागवून कांहीं फर्निचरवाल्यांकडून घेण्यांत येतें. या दुकानदारांचें फायद्याकडे लक्ष असल्यामुळें अधिक फायदा शिल्लक रहावा म्हणून क्वचित् एखाद्या अधिकाऱ्याची किंवा सभासदाची मूठ दाबून, टाकाऊ माल बोर्डाच्या गळ्यांत बांधण्याचा तो प्रयत्न करतो व असा माल शहरांतून खेडयांत मुक्कामीं जाईपर्यंत खिळखिळा होऊन लागलीच दुरुस्तीसाठीं तयार होतो. म्हणजे पैशापरीं पैसा जाऊन वाईट माल पदरीं पडतो.

ठिकठिकाणीं मोठ्या शाळेंतून सुतारकीच्या वर्गाची जोड दिल्यास व नजीकच्या फॉरेस्टांतील माल सरकारनें सवलतीनें दिल्यास मुलांना एक धंदा शिकविल्यासारखें होऊन तो माल बोर्डाला चांगला व योग्य किंमतींत, कोणालाहि लबाडी करण्याची संधी न देतां, विकत घेतां येईल. म्हणजे हे सुतारकीचें खातें बिनखर्ची चालवितां येईल व आज शहरांतून वहातुकीसाठीं जो जबर खर्च पडतो त्यांतहि बचत होईल. आपल्या मुलांनीं माल तयार केल्यानंतर खेड्यांतील मुलांनाहि बाक किंवा निदान पाट पुरविणें, तसेंच इतर आणखी वस्तु पुरविणें; कठीण जाणार नाहीं.

२ नकाशें, चित्रें, घड्याळें वगैरेः—प्रत्येक शाळेस एक घड्याळ असणें जरूर आहे. शहरांतील शाळेंत घड्याळ चांगल्या स्थितींत असतेंही. परंतु खेड्यांतील शाळेंत आधीं पुष्कळ ठिकाणीं घडयाळ नसतेंच व एखाद्या शाळेंत दिसलेंच तर बहुतेक बिघडलेलें असतें. बैठ्या पण खादाड माणसाच्या पोटाप्रमाणें खेडयांतील शाळेंतील घडयाळहि नेहमीं बिघडलेलें असणार, असा सिद्धांत मांडावयास कांहीं हरकत नाहीं. एखाद्या शाळेला दिलेलें घडयाळ कदाचित् चालू असलेलें सांपडलें, तर तें शाळेंत न दिसतां शिक्षकांच्या घरीं पहावयास मिळणार! शाळेच्या मालकीचें घडयाळ घरीं बिघडलें कीं मग तें शाळेंत येऊन बसतें असा अनेक ठिकाणीं अनुभव येतो. घडयाळाची स्थिति ही अशी असल्यामुळें वेळापत्रकाप्रमाणें क्वचितच अभ्यास चाललेला दिसतो. आपण शाळेला विशेषतः खेड्यांतील, अकल्पित भेट दिल्यानंतर वेळापत्रकावर इतिहासाचा

तास असतांना मुलें इतिहासांतील लढाईंचीं वर्णनें वाचण्याऐवजीं, शाळेच्या बाहेर आपसांत लढाई करतांना दिसतात, व शिक्षक टेबलावर पाय पसरून इतिहासांतील लढाईंतील तोफांऐवजीं, स्वतांच्या घोरण्याच्या गडगडाटानें शाळा दुमदुमून सोडीत असलेले दिसतात. मास्तरांना प्रयासानें जागें करून असें कां विचारलें असतां मधली सुट्टी म्हणून खुलासा करतात व मधले सुट्टीला वेळापत्रकाप्रमाणें अवकाश आहे, असें आपण आपल्या घड्याळाकडे पाहून सांगितलें असतां 'आमचें घड्याळ बिघडलें आहे म्हणून आदमासानें वागावें लागतें' अशी सबब सांगून निर्दोष मुद्रेनें उलट आपल्याकडेंच पाहूं लागतात. परंतु घड्याळ बिघडल्यामुळें सुट्टीच्या वेळीं शिक्षण देतांना कोणत्याही शाळेंत आम्हांस तरी शिक्षक आढळण्यांत आला नाहीं.

आमच्या मतें प्रत्येक शिक्षकाला दुसरें कांहींहि नसलें तरी घड्याळाची साधी दुरुस्ती करण्याचें शिक्षण देणें जरूर आहे. ट्रेनिंग संस्थेमध्येंच असें शिक्षण देण्याची सोय करण्यांत यावी. कारकुनाला जसें 'टायपिंग येतें' म्हणून दाखला आणावा लागतो तसें शिक्षकाची नोकरी मागण्यास आलेल्या उमेदवारानें 'घड्याळ दुरुस्ती करतां येतें' असें सर्टिफिकेट आणावें असा नियमच करावा, म्हणजे अदमासानें अभ्यासाच्या तासापेक्षां सुटीचा तासच जो वाटतो तो वाटणार नाहीं !

घड्याळाप्रमाणें शाळांना नकाशे पुरविणेंहि जरूर आहे. कांहीं शाळांचे नकाशे इतके जुने झाले आहेत कीं, त्या नकाशांवरील रंग उडून आंतील कापड दिसूं लागल्यामुळें एखादे धरणीकंपामुळें देशाचा तो भाग कोठें उडून गेला कीं काय असा संशय येतो ! टिकटिकाणीं त्या नकाशाला सुरकुत्या पडल्यामुळें हिमालयाच्या माथ्यावरील चांगली अर्धा इंच रुंदीची ती सुरकुती पाहून हिमालयाच्या माथ्यावर चांगली रुंद सडक केली असल्याचा भास होतो. तरी शिक्षकांनीं नकाशे चांगल्या स्थितींत ठेवणें जरूर आहे व शिक्षकांनीं शक्य ती काळजी घेऊनहि कालाच्या तडाख्यानें नकाशा जीर्ण झाला कीं, त्या शाळेला नवीन नकाशा देण्याची बोर्डानें तत्परता दाखविणें जरूर आहे. या बाबतींतहि शहरांतील शाळांची बरी स्थिति असून खेड्यांतील शाळांतील नकाशाच्या दुःखद स्थितीचें वर्णन करावें तेवढें थोडें आहे.

नकाशाप्रमाणें निरनिराळ्या प्रकारच्या चित्रांनाहि नवीन अध्यापनाच्या पद्धतीमुळें फार महत्त्व प्राप्त झालें आहे. मुलांना गोष्टी सांगण्यासाठीं, अक्षर

ओळख करून देण्यासाठीं किंवा कांहीं इतर विषय शिकवितांनाहि, निरनिराळ्या प्राण्यांच्या किंवा पदार्थांच्या चित्रांची मदत घेण्यांत येते. लहान मुलांच्या कानांजवळ त्यांना दुर्बोध अशा शब्दांची कटकट केल्यास त्यांना विशेष उमज पडत नाहीं. परंतु त्यांच्या डोळ्यांपुढें निरनिराळ्या प्रसंगांचीं चित्रें धरल्यास त्यांना विषयाची समज पडून स्मरणहि चांगलें रहातें.§ परंतु खेडयांतील शाळांना ही चित्रेंही पुरविणें अशक्य होतें, त्यामुळें मुलांची व शिक्षकांची फार कुचंबणा होते. एखादा शिक्षक चित्रकला शिकलेला असला व थोडा मेहनती असला तर स्वतांच जरूर तीं चित्रें तयार करतो. परंतु असे शिक्षक विशेषतः बिगर-शिक्षितांमध्यें, फारच थोडे असतात.

याला उपाय म्हणजे खात्यानेंच कांहीं चित्रें तयार करून शक्य तितके कमी किंमतींत बोर्डांना पुरविणें जरूर आहे. त्याचप्रमाणें आपल्या शाळेंत स्वतःच चित्रें काढून लावणाऱ्या शिक्षकांचा बोर्डानें गौरव केला पाहिजे. शाबासकीचा एक शब्दच कांहीं वेळीं आश्चर्यकारक चमत्कार घडवून आणूं शकतो. बोर्ड गौरव करतें असें समजल्यानंतर इतर शिक्षकांनाहि ईर्षा प्राप्त होईल व त्यामुळें आमच्या खेडयांतील शिक्षणाची स्थिति सुधारेल.

शिक्षण साहित्यांत बाजाची पेटी व तबला यांचाहि समावेश करणें अत्यंत जरूर आहे. हल्लीं कवायतहि पेटीच्या साथीनें करण्याची पद्धत रूढ आहे. पेटीच्या सुरामुळें मुलांचें मन अधिक एकाग्र होऊन त्यांची कवायतहि चांगली बठते असा अनुभव आहे. त्याचप्रमाणें मुलांना गायनाची गोडी लागून त्यांना गाण्याचें शिक्षण देण्यासहि पेटी तबल्याची जोड असावी लागते. बोर्डामार्फत अशा वस्तु अद्याप पुरविण्यांत येत नाहींत. इंग्लंडमध्यें साधारणपणें प्रत्येक शाळेला पियानो असतोच असें म्हणतां येईल. आपल्या बोर्डांना अशा महागाईच्या वस्तु पुरविणें आणखी कांहीं काळ शक्य होणार नाहीं.

---

§ Pictorial illustration is so necessary in the case of young children to ensure any clear mental conception of many of the terms with which they will meet in the course of their lessons; that equipment for the purpose should be regarded as essential in the primary school. This equipment should include not only a supply of pictures for use in demonstration to a whole class, but a liberal supply of smaller pictures for group or individual use.

P. S. p. 120

त्यासाठीं गांवांतील श्रीमंत गृहस्थांच्या दातृत्वावरच अवलंबून रहावें लागलें व शिक्षक जर लोकांशीं सलोख्यानें वागणारा असला तर तो इतर अनेक उपयुक्त वस्तु गांवकऱ्याकडून मिळवूं शकतो, असा आमचा अनुभव आहे.

पेटी तबल्याप्रमाणें फोनोहि पण शिक्षणाच्याकामीं उपयुक्त आहे. § इंग्लंडमध्यें तर प्रत्येक शाळेला म्याजिक लँटर्न असावा व त्याच्या उपयोगासाठीं एखाद्या वर्गांत कायमची व्यवस्था करण्यांत यावी, अशी सूचना करण्यांत येऊं लागली आहे इतकेंच नव्हे, तर प्राथमिक शिक्षणाच्या कामीं चलत्‌चित्रपट व रेडिओ यांचाहि मोठ्या प्रमाणावर, मुलांत शिक्षणाची आवड उत्पन्न करण्यासाठीं उपयोग करण्यांत यावा, अशी सूचना करण्यांत आली आहे.†

वर वर्णन केलेल्या वस्तु या सामुदायिक उपयोगाच्या झाल्या. परंतु कांहीं गरीब विद्यार्थ्यांना पाट्या किंवा पुस्तकें घेण्याचेंहि त्राण नसतें, त्यांना त्या जिनसा पुरविणें जरूर आहे. प्रा. शि. नि. नं. ६८ प्रमाणें स्कूल-बोर्डावर ही जबाबदारी टाकण्यांत आली आहे. परंतु आर्थिक अडचणीमुळें ती जबाबदारी बोर्डाला योग्य तऱ्हेनें पार पाडतां येत नाहीं. तरी ही व्यवस्था योग्य प्रकारें करण्यासाठीं सरकारनें पैशाची तरतूद करणें जरूर आहे.

३. **पुस्तकालयें**:—शिक्षणसाहित्यांतच पुस्तकालयांनाहि महत्त्वाचें स्थान देणें जरूर आहे. मुलांना शाळेंत असतांनाच वाचनाची गोडी लागणें अत्यंत जरूर आहे.‡

नुसत्या क्रमिक पुस्तकांचाच अभ्यास परिक्षेच्या दृष्टीनें केला म्हणजे आपलें काम झालें अशा संकुचित वृत्तीनें मुलें वागूं लागलीं, तर त्यांना शाळेंत मिळणारें शिक्षण हें परिणामी कुचकामी व अयशस्वी ठरल्यावांचून रहाणार नाहीं. शाळेंतील शिक्षणाचा उपयोग हा प्रत्येक मुलाला ज्ञानमंदिराकडे जाणाऱ्या वाटेवर नेऊन सोडण्यापुरता असून, त्या वाटेवर त्याला नेऊन पोहोंचविण्या-

§ The piano has long been regarded as an essential part of the school equipment and to this may be added the gramophone. P. School, p. 121.

† P. school., P. 121.

‡ Of equal educational value are the school libraries which help to create a taste for reading and assist the pupils in acquiring a good deal of general information.

Bombay Report, 1535–36, P. 521.

पुरतें मार्गदर्शक करणें हेंच शिक्षकाचें कर्तव्य आहे. त्या रस्त्याला लागल्यानंतर पुढची वाटचाल स्वतः जिज्ञासूलाच स्वतःच्या हिंमतीवर करावयाची असून ग्रंथकार हेच त्याला पुढील मार्गांतील खाचाखोंचा दाखवून सरस्वतीच्या मंदिराकडे पोहचण्यास मदत करणारे स्नेही आहेत. वाचनाची गोडी लावल्यानंतर या ग्रंथकारमित्रांची ओळख त्यांच्या ग्रंथवाचनानें होते व मग अशी ओळखींची संख्या वाढूं लागल्याबरोबर पुढील प्रवास सुखकर होतो.

मुलांना वाचनाची गोडी लावण्यासाठीं प्रत्येक शाळेंत कांहीं शालोपयोगी व प्रौढ मुलांच्या उपयोगाचीं पुस्तकें असणें जरूर आहे. सर्वच पुस्तकें प्रत्येक शाळेला देतां येणें शक्य नाहीं. कांहीं पुस्तकें फिरतींहि ठेवावीं लागतील.†

पुस्तकसंग्रहाच्या बाबतींत पुन्हां खेड्यांतील शाळेंत व शहरांतील शाळेंत आपणांस फरक दिसून येईल. शहरांतील शाळेंत साधारणपणें वाचनाभिरुची वाढविण्यास पुस्तकसंग्रह असलेला आपणांस दिसून येतो. खेड्यांतील बहुसंख्यांक शाळांत अशा संग्रहाचा आपणांस अभाव दिसून येतो. हंटरकमिशननें आपल्या अहवालांत पान ११७ वर बहुतेक शाळांत पुस्तकालय असल्याबद्दल उल्लेख केला आहे. परंतु आजची स्थिति इतकीं समाधानकारक नाहीं, हें येथें कबूल करणें जरूर आहे. या स्थितीचें कारण काय ?

मुंबई सरकारच्या १९३५-३६ च्या अहवालांत पान ५२ वर 'स्थानिक संस्थांना शाळेंतील पुस्तकालयाची खरी किंमत पूर्णपणें समजली नाहीं' असें म्हटलें आहे. परंतु आमच्या मतें हें कारण सर्वस्वीं बरोबर नाहीं. पुष्कळशा स्थानिक संस्थांना पुस्तकालयाचें शैक्षणिक महत्त्व चांगलें पटलें आहे; परंतु त्यांना या बाबतींत विशेष कांहीं करतां येत नाहीं. याची मुख्यतः दोन कारणें आहेत.

पहिलें कारण असें कीं, खेड्यांतील मुलांना ज्या पुस्तकांच्या वाचनापासून गोडी लागेल व बौद्धिकदृष्ट्या फायदा होईल, अशीं सर्वसाधारण माहितीचीं पुस्तकें असावीं तसलीं मुळींच उपलब्ध नाहींत. जीं पुस्तकें दररोज प्रसिद्ध होत आहेत तीं शहरांतील जीवनावर आधारलेलीं व शहरी लोकांच्या अभिरुचीस साजेशीं असतात. खेड्यांतील जगच निराळें असल्यामुळें त्या जगांतील लोकांना या पुस्तकांतील विचाराची पार्श्वभूमी व विवेचनाचा रोख पूर्णपणें

† Nearly every school is supplied with a library of some sort consisting of a set of class books and books of reference."

अज्ञात स्वरूपाचा व बिनओळखीचा वाटतो व त्यामुळें त्यांना अशीं पुस्तकें वाचाविशीं वाटत नाहींत. शहरांतील लोकांना खेडयांतील जीवनाचें चित्र जसें नीरस व कंटाळवाणें वाटेल किंवा वाटतें, तसेंच शहरी जीवनाची भडक वर्णनें खेडयांतील लोकांच्या बुद्धीला पचत नाहींत. तसेंच आमच्याकडे बाल-वाङ्मय अद्याप जसें निघावें तसें निघत नाहीं. खेडयांतील बालकांना त्यांच्या परिचयाच्या गोष्टींच्या उदाहरणांनीं सजविलेलें वाङ्मय तर अद्यापहि निघूं लागलें नाहीं, त्यामुळें एखाद्या स्थानिक संस्थेनें खेडयांतील शाळांच्या पुस्तका-लयांत शहरी-वळणाचीं पुस्तकें भरलीं, तरी त्यांकडे खेडयांतील मुलें आक-र्षिलीं जात नाहींत.

ही परिस्थिति बदलण्यासाठीं खेडयांतील रहाणीची, व वागणीची ज्यांना कल्पना आहे अशा लोकांनीं ग्रामीण वाङ्मय निर्माण करणें जरूर आहे. हें खेडयांना रुचणारें, पचणारें व मानवणारें अन्न तयार झाल्यावांचून त्यांची बौद्धिक उपासमार थांबणार नाहीं.

प्राथमिक शाळांच्या पुस्तकालयासाठीं योग्य पुस्तकें आहेत तीं किंवा मुद्दाम तयार केलीं तरी तीं घेण्यासाठीं, लागणाऱ्या द्रव्याबद्दल काय तजवीज करावी ही दुसरी अडचण आहे. प्रा. शि. नि. ६७ मध्यें शिक्षकांसाठीं व विद्यार्थ्यांसाठीं पुस्तकालयाची तजवीज करण्याबद्दल स्थानिक संस्थांवर जबाबदारी टाकतांना ही अडचण ओळखून सावधगिरीची भाषा वापरली. द्रव्याची अनुकूलता असेल तर अशीं पुस्तकालयें सुरू करावींत, असें सदर नियमांत म्हटलें आहे. परंतु हा 'जर' 'तर' अतिशय महत्त्वाचा व अनुल्लंघनीय आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. प्राथमिक शिक्षकांचे पगार जास्त आहेत हें मागें दाखविलें आहे. स्थानिक संस्थांच्या उत्पन्नापैकीं बराच मोठा भाग पगाराच्या बटव-ड्यांत सपून इतर उपयुक्त बाबींची उपासमार होते. जादा पगार देऊन शिक्ष-काच्या शरीराला जगविण्याच्या अन्नाची सोय केली, परंतु त्याच्या मनाला पौष्टिक अन्न देण्याची कोणी फिकीर करीत नाहीं. पुस्तकालयाचें महत्त्व पटलें तरी अडचणीमुळें स्थानिक संस्थांना या बाबतींत विशेष कांहीं करतां येत नाहीं.

ही अडचण नाहींशी करण्यासाठीं दोन मार्ग आहेत. एक, बोर्डानें काट-कसर करून या कामासाठीं कांहीं पैसा उभा करणें. शिक्षकांचे पगार मागें सुचविल्याप्रमाणें कमी केल्यास त्यांच्या शरीराप्रमाणें मनालाहि जीवनद्रव्यें पुर-विता येतील. इतर बाबींतहि शक्य तितकी काटकसर करणें अत्यंत जरूर आहे.

दुसरा मार्ग म्हणजे, बोर्डास बाहेरून या कामीं मदत मिळणें जरूर आहे. ही मदत सरकारकडून अधिक प्रमाणांत देण्यांत यावी. त्याचप्रमाणें शाळांच्या ज्या सहकारी संस्था असतील त्या संस्थांच्या फायद्यांतूनहि या कामास मदत करतां येईल. खानदेशामध्यें या मदतीवर व इतर खाजगी वर्गणीवर सुमारें ६० पुस्तकालयें प्राथमिक शाळांस जोडण्यांत आलीं आहेत. शाळेंतील सहकारी सोसायटीप्रमाणें गांवांत पतपेढी असल्यास त्या पेढीलाहि सहकारी सोसायटीच्या कायद्याप्रमाणें, झालेल्या फायद्यांतून गांवच्या शाळेंतील पुस्तकालयाला मदत करतां येईल. त्याचप्रमाणें कांहीं श्रीमंत लोकांनींहि अशा कार्याला मदत करणें जरूर आहे. खेडेगांवच्या शाळांना इमारती बांधण्यासाठीं सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास यांनीं ज्याप्रमाणें योजना आखली आहे, त्याचप्रमाणें सुरत जिल्ह्यांतील या शाळांना पुस्तकालयें देण्यासाठींहि सरसाहेबांनीं स्तुत्य योजना आखली असून, या योजनेमार्फत सुमारें १५० सर पी. टी. बालपुस्तकालयें अस्तित्वांत आलीं आहेत. या एकंदर पुस्तकालयामध्यें ३२७१० पुस्तकें असून लो. बो. शाळांमधील सुमारें २१३७५ विद्यार्थ्यांना त्यांचा उपयोग होऊं शकेल.* प्रत्येक जिल्ह्यासाठीं अशा योजना तयार करणारे सर पुरुषोत्तम निपजणें जरूर आहे.

पुस्तकसंग्रहासाठीं पैशाची सोय झाल्यानंतर पुस्तकसंग्रहाची कल्पना मूर्त स्वरूपांत आणतांना कोणत्या मुख्य गोष्टी विचारांत घेणें जरूर आहे हें पाहूं.

एक, प्राथमिक शाळांत जे विषय शिकविले जातात त्या विषयांसंबंधीं साधारण विस्तृत प्रमाणांत माहिती देणारीं व क्रमिक पुस्तकांना पूरक होतील अशीं पुस्तकें मिळविणें योग्य होईल. अशा पुस्तकांची वरच्यावर यादी तयार करण्यांत येऊन ती खात्यामार्फत प्रसिद्ध करावी म्हणजे पुस्तकांची निवड करणें सोपें जाईल.

दुसरें असें कीं, प्राथमिक शाळांतील या पुस्तकसंग्रहाचा एकंदर व्याप योग्य प्रमाणांत मांडण्यांत येऊन, मोठ्या शाळेप्रमाणें लहान शाळांनाहि एकच-प्रमाण लागू करण्यांत यावें.§ या पुस्तकांत क्रमिक विषयाला संबंधित अशा पुस्तकांच्या बरोबर लहान मुलांना पटकन आवडतील अशा गोष्टींच्या पुस्तकांचाही समावेश करण्यांत यावा.

हा पुस्तकसंग्रह हेडमास्तरांच्या किंवा त्यांच्या सल्ल्यानें दुसऱ्या कोणातरी

---

* मुं. शि. रि. (१९३५-३६) पा. ५२ § P. school P. 119.

शिक्षकाच्या ताब्यांत ठेवण्यांत यावा. त्याचप्रमाणें शाळा मोठी असल्यास प्रत्येक वर्गाच्या मगदुराप्रमाणें योग्य त्या पुस्तकांची इयत्तावार वांटणी पृथक्पणें करणें किंवा सर्व पुस्तकें एका गटानेंच ठेवणें हें शाळेंतील मुख्य शिक्षकानें ठरवावें. तज्ज्ञाच्या मतें मोठ्या शाळेंत शाळेचा एकच पुस्तकसंग्रह असण्यापेक्षां प्रत्येक वर्गाचा किंवा इयत्तेचा स्वतंत्र पुस्तकसंग्रह असणेंच युक्त आहे.‡

निरनिराळ्या वर्गांसाठीं ज्याप्रमाणें स्वतंत्र पुस्तकसंग्रह असणें जरूर आहे, त्याचप्रमाणें शिक्षकासाठींहि निरनिराळ्या विषयांवरील, अध्यापनशास्त्रासंबंधीं पुस्तकांचा व संदर्भग्रंथांचा संग्रह असणें जरूर आहे. या बाबतींत विशेष विचार शिक्षकांचें शिक्षण या प्रकरणांत केला आहेच.

विद्यार्थ्यांसाठीं योग्य त्या पुस्तकांचा संग्रह तयार केल्यानंतर विद्यार्थ्यांना तो वाचण्यास उद्युक्त करणें थोडेसें अवघड आहे. हल्लींसुद्धां ज्या शाळांतून पुस्तकें आहेत त्या पुस्तकांवरील धूळहि वर्षांतून एकदांहि झाडली जात नाहीं व शेवटीं तीं पुस्तकें कसरीच्या भक्षस्थानीं पडतात! आमच्या मतें प्रत्येक वर्गावरील शिक्षकानें आपल्या वर्गांतील मुलांना पुस्तकालयांतील पुस्तकें वाचण्यास प्रवृत्त केलें पाहिजे व त्यानें पुस्तक वाचल्याबद्दल त्याची चाचणी घेऊन खात्री करून घेतली पाहिजे. प्रत्येक वर्गांतील मुलांमध्यें बाहेरील पुस्तकें वाचण्यासंबंधीं चढाओढ लावण्यासाठीं वर्षांतून जो ज्यास्त पुस्तकें वाचील त्याला एक किंवा दोन रुपये किंमतीचीं बक्षिसेंहि लावलीं पाहिजेत. मात्र चढाओढींत भाग घेणारांनीं वाचलेल्या पुस्तकाचें नांव व त्याचा सारांश सुमारें २०० ओळींत एका स्वतंत्र वहींत लिहून ठेवण्याविषयीं सक्तीचा नियम करावा, म्हणजे मुलांना वाचण्याप्रमाणें लिहिण्याचीहि संवय होईल. पुस्तक वाचण्यास नेल्याबद्दल एक स्वतंत्र रजिस्टरहि ठेवण्यांत यावें म्हणजे किती मुलांनीं किती पुस्तकांचा उपयोग केला व कोणतीं पुस्तकें विशेष वाचलीं जातात याबद्दल निश्चित माहिती उपलब्ध होईल.

---

‡ Our witnesses were, on the whole, of the opinion that in Primary Schools Class Libraries were preferable to School Libraries. There is force in the argument that the Class Teacher will know the needs of the pupils better than any one else and that it is possible to use their knowledge to greater advantage when an adequate collection of books is available in the Class room, rather than in a general school library.

—Primary School, p. 120.

प्रेक्षणीय स्थळें पहाणें व इतर दौरे:—विद्यार्थ्यांस चार भिंतींच्या आंत बसवूनच शिक्षण द्यावें असें नाहीं. उलट, दररोज एकाच ठिकाणीं बसून एकाच सुरांत दिलेलें शिक्षण अखेर कंटाळवाणें ठरून मुलांचीं मनें खिडकींतून दिसणाऱ्या बाहेरच्या जगाकडे धांव घेण्यासाठीं उत्सुकतेनें आपले चिमकुले पंख फडफडवूं लागतात. मुलांच्या मनाची शाळेच्या बाहेरच्या जगाकडे, निसर्गाकडे वाढणारी ओढ ओळखून त्यांना कधीं कधीं शिक्षकानें बाहेर निसर्गावलोकन करण्यासाठीं किंवा आजूबाजूची ऐतिहासिक किंवा भौगोलिक महत्त्वाचीं स्थळें पहाण्यास नेणें जरूर आहे. निसर्गाचें प्रत्यक्ष अवलोकन करतांना किंवा ऐतिहासिक अगर भौगोलिक महत्त्वाचीं स्थळें पहातांना शिक्षकाला त्यांना निरनिराळ्या निसर्गाच्या नियमांची, इतिहासाची किंवा भूगोलासंबंधीं माहिती सहजपणें देतां येईल व हें असें दिलेलें शिक्षण चिरपरिणामी झाल्यावांचून रहाणार नाहीं. घागरींतलें भरून ठेवलेलें पाणी रोज पितांना आपणास संवयीमुळें कांहीं विशेष वाटत नाहीं. परंतु एखाद्या दिवशीं रानांत फिरावयास गेल्यानंतर वाकडयातिकडया उडया मारीत व आनंदी खळखळीनें रान घुमवून सोडणाऱ्या निर्झराचें पाणी पितांना कल्पनातीत आनंद वाटतो, मन उल्हसित होतें. त्याचप्रमाणें शाळेंतील रोजच्या शिक्षणापेक्षां रानांत फिरावयास जातांना शिक्षकानें दिलेली माहिती नावीन्यामुळें मनावर ताबडतोब बिंबते. शहरांतील शाळांमधून किंवा विद्यालयांतून असे फिरते कार्यक्रम नेहमीं ठरविण्यांत येतात तसेंच खेडयांतील प्राथमिक शाळांतूनहि होणें अत्यंत जरूर आहे. याप्रीत्यर्थ थोडा खर्च पालकानें करून थोडा खर्च बोर्डानें किंवा सरकारनें करावयासहि हरकत नाहीं. नजीकचें स्थळ पहाण्याचा कार्यक्रम आखल्यास विशेष खर्चहि येणार नाहीं. अशा तऱ्हेच्या कार्यक्रमामुळें मुलांच्या शिक्षणाला अतिशय मदत होते व त्यांची निरीक्षणशक्ती जागृत होऊन चौकसबुद्धी वाढते, असा इंग्लंडमधील शिक्षणतज्ज्ञांनीं आपला अभिप्राय दिला आहे. §

५. खेळण्याचें मैदान:—शिक्षणसाहित्यांत किंवा शिक्षण देण्याच्या साधनांत खेळण्याच्या मैदानाचा व खेळण्याच्या साधनांचा समावेश करणें जरूर आहे. परंतु त्याचा मुलांचें शारीरिक शिक्षण या विषयाच्या वेळीं विचार केला आहेच.

§ P. school, p. 122.

प्रकरण पांचवें

अभ्यासक्रम, धंदेशिक्षण व क्रमिक पुस्तकें

What subjects should be taught in elementary schools is a question constantly disputed even by experts. The principle is generally accepted that the chief aim of education is so to develope a child's faculties that he may become a self dependent individual and a useful member of society.

—Rural Education, p. 77.

Before there can be a rational curriculum...we must determine the relative values of knowledges...To prepare us for complete living is the function which education has to discharge and the only rational mode of judging of an educational course is to judge in what degree it discharges such function.

—Herbert Spencer,
Education, p. 9–10.

या प्रकरणांत विचारासाठीं घेतलेले विषय इतके महत्त्वाचे आहेत कीं, त्या प्रत्येकावर कितीहि लिहिलें तरी तें अपुरेंच वाटणार आहे. या विषयांवर विस्तारानें लिहिण्याच्या मोहास शक्य तितक्या मर्यादा घालून त्यांच्यासंबंधीं शक्य तितक्या संक्षेपानें येथें विचार करण्याचें योजिलें आहे.

१ अभ्यासक्रम

कोणत्याहि शिक्षणपद्धतींचें यश किंवा अपयश हे त्या पद्धतींतील अभ्यासक्रमावरच मुख्यतः अवलंबून असतें. निरनिराळ्या स्वरांच्या मंजुळ मिलाफानें कर्णमनोहर संगीत निर्माण होतें. अभ्यासक्रमांत निरनिराळ्या कमीजास्त महत्त्वाच्या विषयांचा, योग्य प्रमाणांत समावेश करण्यानेंच उत्तम फलदायी शिक्षणपद्धतीचा पाया घातला जातो. अभ्यासक्रमाची योग्य ती आखणी करणें त्यामुळेंच फार महत्त्वाचें कार्य आहे.

अभ्यासक्रमाची रूपरेखा काढावयास बसण्यापूर्वी शिक्षणाचा हेतु काय हें समजणें अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणाचीं ध्येयें साध्य होण्यासाठीं ज्या अनेक साधनांचा आपण उपयोग करतों त्यापैकींच अभ्यासक्रम हें एक महत्त्वाचें साधन आहे. या साधनाचें स्वरूप निश्चितपणें ठरविण्यासाठीं ध्येयाचें चित्रहि आपल्या डोळ्यांसमोर सतत असणें अत्यंत जरूर आहे. या ध्येयाची चर्चा करून तें निश्चित ठरविल्याशिवाय आपणास साधनांच्या भलें बुरेपणाविषयीं आपलें मत बनवितां येणें अशक्य आहे.

शिक्षणाचा उद्देश:—शिक्षणाचा हेतु मनुष्याच्या मनाचा विकास करून त्याला जीवन अधिक सुखासमाधानानें घालविण्यास साहय करणें हा आहे. शिक्षणामुळें मनुष्याच्या अंगांतील दोषांचें निर्मूलन होऊन सद्गुणांचा विकास होण्यास अवसर मिळणें जरूर आहे. शिक्षणामुळें माणसांत अधिक माणुसकी आली पाहिजे. शिक्षणामुळें मनुष्य अधिक परमतसहिष्णु बनला पाहिजे. शिक्षणामुळें खुळ्या श्रद्धेच्या पोटीं जन्माला येणारें धर्मवेड नाहींसें होऊन प्रत्येक धर्माच्या तत्त्वाचा तुलनात्मक पद्धतीनें विचार करून त्यांच्यांतील चांगलेपणा ग्रहण करण्याची पात्रता बुद्धीला आली पाहिजे. मनुष्याच्या मनांतील कर्मठपणाचा काळोख शिक्षणाच्या प्रकाशकिरणांनीं नाहींसा झाला पाहिजे. पायापुरतें पहाण्याची स्वार्थी वृत्ति नाहींशी होऊन समाजासाठीं, देशासाठीं वाटेल तो त्याग करण्याची पवित्र भावना शिक्षणाच्या सहवासानें जन्माला आली पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मनुष्याच्या मनाला विशालत्व देऊन त्याला रोजच्या व्यवहारांत हरघडी उपयोगी पडण्याची पात्रता शिक्षणांत असणें अत्यंत जरूर आहे. स्पेन्सरच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे मनुष्याला पूर्णत्वानें जगण्यास (complete living) समर्थ करणें हें शिक्षणाचें ध्येय आहे. पडिक जमीनींत नानातऱ्हेचीं जंगली झुडपें, काटेकुटे वगैरे वाढलेले असतात, परंतु ती जमीन एखाद्या हुशार शेतकऱ्याच्या ताब्यांत गेली कीं थोडयाच दिवसांत तिचें सुंदर बागेंत रूपांतर होतें. त्याचप्रमाणें धर्मभोळेपणा, जात्याभिमान, स्वार्थीपणा वगैरे अनेक दोषांचे आगर बनलेला मनुष्य योग्य तऱ्हेच्या शिक्षणाच्या जादूनें भारला गेला कीं, सर्व दोष एकदम नाहींसे होऊन अनेक सद्गुणांच्या सुगंधानें त्याच्या मनाचें मंदीर दरवळून जाणें जरूर आहे. हा चमत्कार ज्या शिक्षणाला साधेल तेंच खरें शिक्षण !

हा उद्देश साध्य करण्यासाठीं मनुष्याला शिक्षणाच्या द्वारें ज्ञानप्राप्ति करून घ्यावयाची असते. ज्या ज्ञानामुळें मनुष्याला व्यवहारांत उपयोग होऊन त्याच्या मनाचाहि योग्य असा विकास होईल, असेंच ज्ञान करून देणें हें नमुनेदार शिक्षण पद्धतीचें कार्य आहे. मनुष्याच्या जीवनाचा विचार केल्यानंतर आपल्याला कांहीं विषयांचें ज्ञान महत्त्वाचें वाटेल व कांहीं ज्ञान कुचकामाचें वाटेल, म्हणजे मनुष्याच्या शिक्षणक्रमाची आखणी करतांना विषयाची निवड करावी लागेल व ही निवड त्या विषयाच्या महत्त्वाच्या मानानें करण्यांत येईल. ज्ञानाची कमीजास्त महत्त्वाच्या मानानें प्रतवारी लावावी लागेल. स्पेन्सरनें ही प्रतवारी खालीलप्रमाणें लावली आहे.

(अ) आत्मरक्षणास उपयोगी पडणाऱ्या ज्ञानास पहिलें मानाचें स्थान देणें जरूर आहे. आत्मरक्षण करणें हा प्रत्येक प्राणीमात्राचा उपजत धर्म—(instinct)च आहे. आत्मरक्षणास उपयोगी पडणाऱ्या अनेक क्रिया निसर्गानचें आपणास शिकविल्या आहेत. सूर्याचा प्रकाश डोळ्यांवर पडला कीं लहान मूलहि आपले डोळे मिटून घेतें. ही आत्मरक्षणाची क्रिया असते. पळतांना आपण पडूं नये म्हणून शरीराची कांहीं विशेष हालचाल स्वभावतःच करतों तीहि आत्मरणासाठींच असतें. याप्रमाणें कांहीं महत्त्वाच्या गोष्टींचें ज्ञान आपणास जरी निसर्गाच्या शिकवणीमुळें झालें असलें, तरी कांहीं ज्ञान आपणास शिक्षणाच्या द्वारेंहि करून घेतां येतें. प्राणहानीस कारण होणारे अनेक भयंकर रोग का होतात व त्यास प्रतिबंधक उपाय कोणते करावे हें ज्ञान आपणांस शिक्षणाच्या मार्गानें मिळूं शकतें व आत्मरक्षणास प्रत्यक्ष उपयोगी पडणाऱ्या विषयांचें हें ज्ञान देणें हें शिक्षणाचें पहिलें कर्तव्य आहे.

(ब) कांहीं गोष्टी आत्मरक्षणाच्या कार्यास अप्रत्यक्षपणें साह्य करतात. जगण्यासाठीं अन्न व कपडे आवश्यक आहेत. ज्या ज्ञानामुळें पोटभर अन्न व अंगभर कपडे आपणांस मिळवितां येतील असें ज्ञान देणें हें शिक्षणाचें दुसरें कर्तव्य आहे. हें ज्ञान नसलेले अनेक स्त्री—पुरुष अनेक हालअपेष्टा सहन करून अखेर मृत्युमुखीं पडतात हें आपण नेहमीं पहातोंच !

(क) आत्मरक्षणाची जबाबदारी आपणांस संभाळावी लागतेच, परंतु आत्मरक्षण करतांनाच आपणांस दुसऱ्याहि कांहीं लोकांचें रक्षण करण्याची जोखीम शिरावर घ्यावी लागते. नुकत्याच बाळंत झालेल्या बाईला स्वतःच्या प्रकृतीप्रमाणें नूतन बालकाचीहि निगा राखावी लागते. स्वतःच्या पोटाप्रमाणें

त्या मुलाच्या पोटाचाहि प्रश्न तिला सोडवावा लागतो. या प्रमाणें दुसऱ्याच्या रक्षणाची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्यांना ती जबाबदारी चांगल्या प्रकारें पार पाडतां यावी म्हणून योग्य त्या विषयांचें ज्ञान करून देणें हें शिक्षणाचें तिसरें कर्तव्य आहे. बालसंगोपनशास्त्र या दृष्टीनें अतिशय महत्त्वाचे आहे. हें कर्तव्य शिक्षणानें बजावलें नाहीं तर लोक अडाणी रहातात व त्यांच्या अज्ञानामुळें, अनेक अर्भकांना अकालीं मृत्युमुखीं पडावें लागतें. ज्या आई-बापांना या बाबतींत योग्य तऱ्हेचें शिक्षण मिळालें आहे ते आपल्या मुलांची योग्य प्रकारें काळजी घेतात व त्यामुळें त्यांचीं मुलें निरोगी, सशक्त व बुद्धिमान् निपजून त्यांचा व देशाचा फायदा होतो.

(ड) प्रत्येक मनुष्याला समाजाचा घटक या नात्यानेंहि कांहीं जबाबदारी संभाळावी लागते. प्रजासत्ताक राज्यपद्धतींत मतदान कस द्यावें, कोणाला द्यावें, हें ज्ञान प्रत्येक मनुष्याला असणें अगत्याचें आहे. त्याचप्रमाण समाजासाठीं कोणती वागणूक चांगली व कोणती वाईट हें प्रत्येक मनुष्याला समजणेंहि जरूर आहे. अशा अनेक महत्त्वाच्या बाबींचें ज्ञान देणें हें शिक्षणाचें चवथें कर्तव्य आहे.

(इ) जीवनांत कलेलाहि फार महत्त्वाचें स्थान आहे. पूर्णत्वानें जगावयाचें असेल तर मनुष्याला कलेचे उपासक व्हावें लागेल. कलाविहिन जीवन मरणापेक्षांहि अधिक भेसूर असतें. नीरस आयुष्य कंठणें कंटाळवाणें व त्रासाचें वाटतें. कलेमुळें मानवीजीवनांत वर्णनातीत अशा सुखाची भर पडते. या कलांचें ज्ञान देणें हें शिक्षणाचें पांचवें कर्तव्य आहे.

हीं पांचही कर्तव्यें योग्य तऱ्हेनें पाळलीं जातील अशीच विषयांची निवड करणें हें शिक्षणपद्धतीचें मुख्य काम आहे. ही निवड करतांना प्रत्येक मनुष्याच्या जीवनाचा प्रामुख्यानें विचार करावा लागेल. व्यवहारोपयोगी शिक्षण द्यावयाचें म्हणजे तें ज्या मनुष्याला द्यावयाचें त्याचा व्यवहार-धंदा काय आहे हें पाहून त्या धंद्याला उपयोगी पडणारें शिक्षण देण्याची तजवीज करावी लागेल. प्रत्येक मनुष्याच्या डोक्याचें माप घेऊन त्या डोक्याला नीट बसेल अशीच टोपी आपण निवडून काढतों तसेंच शिक्षणाचेंहि आहे. एका धंद्यांतील माणसाला जें ज्ञान महत्त्वाचें वाटेल तेंच ज्ञान दुसऱ्या धंद्यांतील मनुष्याला पूर्णपणें निरुपयोगी ठरेल. वैद्याचा धंदा करणाराला मनुष्याच्या देहाची रचना समजून घेणें महत्त्वाचें वाटेल तर मोटार चालविण्याचा पेशा

पत्करणाराला मोटारच्या रचनेची माहिती उपयुक्त ठरेल. शिंप्याचा धंदा करणाराला कापडावर कातर कशी चालवावी याचें ज्ञान उपयोगी ठरेल तर शेतीचा धंदा करणाराला जमीनीवर नांगर कसा चालवावा हें शिक्षण जिव्हाळ्याचें वाटेल. या तत्त्वाचा शिक्षणपद्धतींत अवलंब करतांना आपणास सर्वोपयोगी सामान्यज्ञान व ठराविक लोकांसच उपयोगी ठरणारें विशेष ज्ञान असा भेद करावा लागेल. रोग कां होतात, त्यांना प्रतिबंधक व निवारक उपाय कोणते करावेत, व्यायाम कोणता व कसा घ्यावा अशा तऱ्हेच्या विषयांचें ज्ञान सर्वच माणसांना महत्त्वाचें आहे. मनुष्य कोणत्याही धंद्यांतला, कोणत्याही ठिकाणीं रहाणारा असला तरी कांहीं ठराविक कारण झालें कीं ठराविक रोग त्याला होतात. कोंदट विहिरींतील कृमि पडलेलें पाणी कोणीहि प्याला कीं त्याला नारू होतो. रोज स्नान न करतां अस्वच्छपणानें मनुष्य राहिला कीं त्याला त्वचेचे रोग होतात. प्लेगच्या दूषित हवेंत गेला कीं मालकाप्रमाणें मजुराला, व्यापाऱ्याप्रमाणें भिकाऱ्याला, वकिलाप्रमाणें वडाऱ्याला प्लेग होण्याचा संभव निर्माण होतो. म्हणजे आरोग्यविषयक ज्ञान हें सर्व वर्गांना सामान्य स्वरूपाचें आहे. त्याचप्रमाणें केलेचें ज्ञानहि सर्व वर्गांना सामान्य स्वरूपाचेंच असणार! गायनकला, चित्रकला किंवा इतर कोणतीहि ललितकला घेतली तरी त्या कलेचीं मूलतत्त्वें समान स्वरूपाचींच असल्यामुळें त्यांचें ज्ञान एकाच ठशाचें रहाणार! मात्र या सामान्य विषयाचें ज्ञान निरनिराळ्या वर्गाला कांहीं कमीजास्त प्रमाणांत द्यावें लागेल.

निरनिराळ्या धंद्यांना उपयोगी पडणारें विशेष ज्ञान सर्वांनाच देऊन भागणार नाहीं. तें ज्ञान त्या त्या धंद्यांतील माणसांनाच द्यावें लागेल व मग शिकणाऱ्या लोकांचे धंदानिहाय असे गट पाडावे लागतील व या प्रत्येक गटासाठीं स्वतंत्र अभ्यासक्रम आखावा लागेल. शहरांतील धंदे करणारासाठीं स्वतंत्र अभ्यासक्रम व खेड्यांतील शेतकी किंवा तत्सम धंदे करणारासाठीं स्वतंत्र अभ्यासक्रम, नोकरी करणारासाठीं वेगळा अभ्यासक्रम, व व्यापार करणारासाठीं वेगळा अभ्यासक्रम, नोकरी करणारांतहि अबकारी खात्यांत नोकरी करणारासाठीं शिक्षण निराळें व शिक्षणखात्यांत नोकरी करणारासाठीं शिक्षण निराळें, याप्रमाणें आपणांस भिन्न भिन्न प्रकारचें, कमीजास्त फरकाचे शिक्षणक्रम आखावे लागतील व याप्रमाणें निरनिराळ्या प्रकारचें शिक्षण दिल्यानंतरच आपण व्यवहारोपयोगी खरें शिक्षण लोकांना दिलें असें म्हणतां

येईल. अशा तऱ्हेचें वर्गीकरण करून प्रत्येक वर्गाला रुचेल पचेल व उपयोगी टरेल असें शिक्षण देणें हें यशाची आशा करणाऱ्या, देशाची सर्वांगीण सुधारणा करण्याची महत्वाकांक्षा बाळगणाऱ्या, शिक्षणपद्धतीचें प्रधान कर्तव्य आहे.

शिक्षणपद्धति कशी असावी याची आपण तात्त्विक चर्चा केली. आपल्या हल्लींच्या शिक्षणपद्धतीला ही तात्त्विक कसोटी लावून ती बरोबर आहे किंवा नाहीं हें पहाणें अत्यंत जरूर आहे. कसोटी लावल्यानंतर आपली रूढपद्धति बरोबर कसाला उतरली तर आपण तीच पुढें चालवूं, पण ती कसोटीला बरोबर उतरली नाहीं तर आपणास ती बंद करावी लागेल, किंवा तींत इष्ट असे फेरबदल करावे लागतील.

हल्लींच्या आपल्या शिक्षणपद्धतींत अनेक दोष आहेत हें सर्वांनींच कबूल केलें आहे.* या पद्धतींत महत्त्वाचे दोष कोणते आहेत ते आपण थोडक्यांत पाहूं.

(१) हल्लींची आपली शिक्षणपद्धति एका कायम ठशाच्या स्वरूपाची आहे. निरनिराळ्या परिस्थितींतील व भिन्न भिन्न प्रकारच्या व्यवसायांतील लोकांच्या दैनंदिन जीवनाचा विचार करून त्या जीवनाला अधिक सुखसंपन्न करण्याचें सामर्थ्य किंवा लवचीकपणा आपल्या प्रचलीत शिक्षणपद्धतींत नाहीं. शहरांतील मुलें व खेड्यांतील मुलें एकाच शिक्षणक्रमाच्या भट्टींतून भाजून काढण्यांत येतात व त्यामुळें तीं दोन्ही मुलें भावी जीवनाच्या दृष्टीनें टाकाऊ व निरुपयोगी ठरतात.

(२) बुद्धीचा विकास करण्याचें महत्त्वाचें कार्य आपल्या हल्लींच्या शिक्षणपद्धतीच्या हातून साधलें जात नाहीं. आपण देतों तें शिक्षण घेतल्यामुळें नवीन पिढीची बुद्धि तेजस्वी होते किंवा नाहीं याचा कोणीच विचार करीत नाहीं. योग्य तऱ्हेच्या शिक्षणानें ज्याच्या बुद्धीला तीक्ष्णपणाचा तजेला आलेला आहे असा मनुष्य कोणत्याहि धंद्यांत पडला तरी तो यशस्वी झाल्यावांचून रहाणार नाहीं; परंतु हल्लींच्या आमच्या सदोष शिक्षणामुळें नोकरीच्या चाकोरींतून जाणारा, घोकून पास होणारा, दुबळ्या शरीरप्रकृतीचा व कमकुवत विचारशक्तीचा असा तत्त्वतः सुशिक्षित नसलेला पण आपण सुशिक्षित आहोंत अशी फुकाची घमेंड बाळगून इतर वर्गांकडे तिरस्काराच्या, तुच्छतेच्या नजरेनें पहाणारा एक वर्ग आम्ही तयार करीत आहोंत. हा वर्ग तयार करण्यासाठीं

* हारटॉग क. रि., पा. ६३.

आम्ही जो पैसा व जी शक्ती खर्च करीत आहोंत तो पाण्यांत जात असून देशाचें फार नुकसान होत आहे.

(३) हल्लींच्या शिक्षणपद्धतींत मनुष्याच्या मनाला सुसंस्कृत करण्याकडेच सर्व लक्ष पुरविण्यांत येत आहे. एका काळीं आध्यात्मिक विषयावरच भर देऊन भौतिकशास्त्राकडे पूर्णपणें दुर्लक्ष करण्यांत आलें होतें. आज आम्ही वाङ्मयी (literary) शिक्षणावरच सगळी भिस्त ठेऊन धंदे-शिक्षणाकडे पूर्ण दुर्लक्ष करीत आहोंत. मुलाची आवड काय आहे याचा विचार न करतां आम्ही त्यास सटरफटर अनेक विषय सक्तीनें शिकवीत आहोंत. निर्जीव लाकडावर हत्यार चालविण्यापूर्वी सुतार त्याच्या वळणाचा विचार करतो; परंतु आम्ही आमच्या शिक्षणाचें वाकस मुलाच्या मनाचा विचार न करतांच चालवीत आहोंत व त्यामुळें मुलांच्या मनाची ओढाताण व कुचंबणा होत आहे.

एकंदरींत आपली हल्लींची शिक्षणपद्धति परंपरेच्या अभिमानाला बळी पडून वागणारी आहे. या पद्धतीच्या शिक्षणामुळें मुलांच्या मनाचा विकास होत नाहीं, त्यांच्या स्वभावाला इष्ट असें वळण लागत नाहीं, त्यांच्या ठिकाणीं स्वतंत्र वाण्याची विचारशक्ती निर्माण होत नाहीं, लाथ मारूं तेथें पाणी काढूं अशी आत्मविश्वासाची धमक जन्माला येत नाहीं, पाश्चिमात्य लोकांप्रमाणें शोधकता उगम पावत नाहीं, परंपरेच्या चाकोरींतून बाहेर पडून नवीन क्षेत्रांत पदार्पण करण्याची वीर वृत्ति निपजत नाहीं. आमच्या सुशिक्षित समाजाला अन्यायाची चीड येत नाहीं व अन्याय डोळ्यांदेखत होत असतांहि त्याचा प्रतिकार करण्याची ईर्षा उत्पन्न होत नाहीं, देशापेक्षां नोकरीसाठीं मरणारेच आम्ही अधिक निर्माण केले आहेत. आमच्या शिक्षणामुळें 'देशासाठीं मी' ही उदार भावना निर्माण न होतां 'माझ्यासाठीं देश' ही आकुंचित व देशहित-विरोधी भावना प्रबल झाली आहे. या शिक्षणामुळें कमी शिकलेल्या अडाणी माणसाचें रक्षण करण्याची थोरवृत्ति सुशिक्षित वर्गांत निर्माण होण्याच्या ऐवजी इतर वर्गांच्या दुबळेपणाचा व अडाणीपणाचा फायदा घेऊन त्यांचें भक्षण करण्याची स्वार्थवृत्ति बळावली आहे. हल्लींची आमची नीरस व टाकाऊ अशी शिक्षणपद्धति आम्ही शक्य तितक्या लवकर बंद करणें अत्यंत जरूर आहे. आम्ही प्राथमिक, दुय्यम व उच्च शिक्षणाचा अभ्यासक्रम आमूलाग्र बदलून त्या ठिकाणीं वर

वर्णन केल्याप्रमाणें शिक्षणाच्या खऱ्या हेतूस पोषक असा अभ्यासक्रम आंखणें अत्यंत जरूर आहे.

प्राथमिक शाळा या भावी शिक्षणमंदिराचा पाया आहेत. त्यामुळें प्राथमिक शाळेंतील अभ्यासक्रम आखतांनाच आम्ही विशेष काळजी घेणें अत्यंत जरूर आहे. प्राथमिक शाळांतील शिक्षणक्रम म्हणजे शेतांतील पेरणीसारखा महत्त्वाचा आहे. एकदां वाईट बी पेरून गेल्यानंतर मग पुढें शेतकऱ्यांनीं कितीही काळजी घेतली तरी कांहीं उपयोग होत नाहीं त्याचप्रमाणें प्राथमिक शाळांत मुलांना योग्य शिक्षण देण्याची आम्ही जर जागरूकता दाखविली नाहीं तर मग दुय्यम किंवा उच्च शिक्षण देतांना आम्हीं शास्त्रोक्त अशी कितीहि खबरदारी घेतली तरी तिचा कांहीं उपयोग होणार नाहीं.

प्राथमिक शाळांतील अभ्यासक्रम आखतांना आम्ही कोणत्या मुलांसाठीं तो अभ्यासक्रम आहे याचा प्रथम विचार करून त्याची आखणी करणें जरूर आहे. शहरांतील पांढरपेशा वर्गांना योग्य असलेलें शिक्षणच आम्ही आतांपर्यंत खेड्यांतील काबाडकष्ट करणाऱ्या शेतकरी वर्गाच्या मुलांना दिल्यामुळें तीं मुलें श्रमाच्या कामाचा कंटाळा करणारीं, नोकरीसाठीं हपापलेलीं व अडाणी भाऊबंदाचा तिरस्कार करणारीं अशीं निपजलीं व त्यामुळें त्यांचें स्वतःचें, त्यांच्या पालकांचें व शेवटीं देशाचें नुकसान झालें. हा पुढचा शिक्षणक्रम आखतांना खेड्यांतील व शहरांतील मुलांसाठीं निरनिराळ्या प्रकारचा शिक्षणक्रम असणें अत्यंत जरूर आहे. शहरांत शेंकडा फक्त ११ लोक रहात असून शें. ८९ लोक खेड्यांत रहाणारे आहेत; परंतु शेंकडा ११ लोकांच्या सोयीचा शिक्षणक्रम शेंकडा ८९ लोकांवर आतांपर्यंत लादण्यांत आला यांचें कारण शिक्षणाचीं सूत्रें शेंकडा ११ असणाऱ्या शहरांतील लोकांच्या हातांत होतीं व ते लोक स्वतः पल्लीकडे पहावयास तयार नव्हते हें होय. 'शहरांसाठीं खेडीं आहेत' अशी त्यांची भावना होती व आहे आणि त्यामुळें खेड्यांचें नुकसान झालें.

खेड्यांतील शिक्षणक्रमः—खेड्यांतील प्राथमिक शाळांतील मुलांना कोणतें शिक्षण देण्यांत यावें याचा आतां विचार करूं. हा विचार करतांना (अ) वाङ्मयी शिक्षण (ब) आरोग्यविषयक शिक्षण (क) धंदेशिक्षण व (ड) कलात्मक शिक्षण असे अभ्यासक्रमाचे आपणांस चार पोटविभाग पाडतां येतील. या पोटविभागांत कोणत्या विषयांचा समावेश होतो हें आतां पाहूं.

(अ) वाङ्मयी शिक्षणांत लिहिणें, वाचणें, अंकगणित, तोंडचे हिशेब, भूमिति, इतिहास व भूगोल या विषयांचा स्थूलतः समावेश होतो. यांपैकीं कोणत्या विषयांवर किती भर द्यावा याचा खालीं विचार केला आहे.

(१) **लिहिणें-वाचणें**—खेड्यांतील लोकांना लिहितां वाचतां येणें अत्यंत जरूर आहे. प्रत्येक मनुष्याला चांगलें लिहितां वाचतां आलें तर त्याला अधिक वाचनाची गोडी लागून तो स्वतःच्या खाजगी वाचनानें आपल्या ज्ञानांत उत्तर आयुष्यांतही भर घालूं शकेल. प्राथमिक शाळेंत निदान पहिल्या चार इयत्ता होईपर्यंत या विषयाला हल्लीं देण्यांत येत आहे यापेक्षां अधिक प्राधान्य देण्यांत यावें. अगदीं बालवर्गांत भाषा प्रथम मुलांची मनोरंजन करीत शिकविण्यांत यावी व हें मनोरंजन लहान लहान गोष्टी सांगून करण्यांत यावें. या गोष्टींच्या ओघांत नवीन नवीन शब्द मुलांना शिकवून त्यांना प्रश्न विचारून वाक्य-रचनाहि शिकवितां येते. हल्लींची प्रश्नोत्तररूपानें शिकविण्याची पद्धत फार महत्त्वाची असून तिचा आमच्या शिक्षणपद्धतींत अधिकाधिक अवलंब करण्यांत येणें अत्यंत जरूर आहे. मुलें गोष्टींत रंगलीं म्हणजे त्यांना सांगितलेली गोष्ट सांगण्यास सांगावें म्हणजे त्यांना वाक्यरचना करून नवीन शब्दांचा उपयोग कसा करावा याचें आपोआप ज्ञान होऊं लागतें.

भाषा शिकविण्यासाठीं गोष्टींप्रमाणें गायनाचाही उपयोग करतां येतो. तसेंच वाचनाचाहि अधिक उपयोग करण्यांत यावा. बालवर्गांत लिहिण्यावर विशेष भर दिला नाहीं तरी चालण्यासारखें आहे. परंतु पुढील इयत्तांमधून उत्तरोत्तर अधिक वाचन व अधिक लेखन करून घेण्यांत यावें. या विषयाला अधिक प्राधान्य दिल्यानें शेतकरी वर्गांतील मुलें बाकीचे विषय विसरले तरी निदान लिहिणें—वाचणें विसरणार नाहींत.

लिहिण्यावाचण्याच्या प्रश्नाचा विचार करतानांच आपणास व्याकरण या विषयाचाहि विचार करावा लागेल. शेतकरी वर्गांतील मुलाला किमान चवथीपर्यंत शिक्षण देणें साक्षरतेच्या दृष्टीनें जरूर आहे. महात्मा गांधी यांचा प्रत्येक मुलाला इंग्रजी भाषा वगळून मॅट्रिक परीक्षेपर्यंतचा अभ्यासक्रम शिकविण्याचा विचार आहे. वर्धा येथील अखिल भारतीय शिक्षण परिषदेनें किमान सात वर्षें सक्तीचें मोफत शिक्षण द्यावें असा ठराव पास केला आहे. †

शिक्षणाची मर्यादा कांहीं ठरविली तरी निदान मराठी चवथी इयत्ता होई—

† Times of India, 25-10-37, p. II.

पर्यंत मुलांना व्याकरण शिकविण्याच्या भरीस पडूं नये, हेंच चांगलें. व्याकरण हा विषय फार किचकट व कंटाळवाणा आहे. शुद्ध कसें बोलावें व शुद्ध कसें लिहावें हें जरी व्याकरण शिकल्यानें समजणार असलें, तरी आतां नवीन पद्धतीनें भाषा शिकविणाऱ्या शिक्षकास प्रत्यक्ष व्याकरण न शिकवितांहि मुलांना शुद्ध बोलण्यास किंवा लिहिण्यास शिकविणें शक्य आहे. कर्ता, कर्म व क्रियापद या शब्दांशीं ओळख नसतांहि लहानमूल वाक्य पुरें करून बोलत असतें. 'आणि' 'व' वगैरे शब्द उभयान्वयी अव्ययें आहेत याची कल्पना न येतांहि अनेक माणसें त्यांचा बिनचूक उपयोग करीत असतात. मनुष्य प्रथम ऐकून अनुकरणानेंच भाषा बोलावयास शिकतो. सुशिक्षित कुटुंबांतील मुलें शुद्ध भाषा ऐकून शुद्ध बोलावयास शिकतात व अडाणी लोकांचीं मुलें अशुद्ध भाषा ऐकून तशीच भाषा बोलावयास लागतात. शिक्षकाच्या तोंडची भाषा ऐकून व पुस्तकें वाचून भाषा शिकणाऱ्या मुलांना व्याकरण न शिकतांहि शुद्ध भाषा बोलतां किंवा लिहितां येणें कठीण नाहीं. मुंबई सरकारनें जो नवीन अभ्यासक्रम तयार केला आहे त्यांत मराठी दुसरी व तिसरी या इयत्तांसहि व्याकरण विषय ठेवला आहे तो कमी करण्यांत यावा अशी आमची सूचना आहे व व्याकरण शिकविण्यासाठीं जो वेळ जाणार आहे त्याचा उपयोग अधिक वाचनासाठीं व लिहिण्यासाठीं खर्च करण्यांत यावा म्हणजे लिहिणें वाचणें अधिक खंबीर पायावर आधारलें जाईल. मराठी पांचवीपासून मग पुढें व्याकरण शिकविण्यास हरकत नाहीं.

या ठिकाणीं खेडवळ भाषेबद्दलहि दोन शब्द लिहिणें जरूर आहे. शहरांतील पांढरपेशावर्ग जी भाषा बोलतो तीच भाषा शुद्ध आहे अशी सर्वांची समजूत असून खेड्यांतील मुलांना तीच भाषा बोलावयास शिकविण्याचा आम्ही अट्टाहास करीत आहोंत. पुणेरी भाषा नगरी किंवा खानदेशी भाषेपेक्षां निराळी आहे. त्याचप्रमाणें शहरांतील भाषा खेड्यांतील भाषेपेक्षां निराळी आहे. शहरांतील भाषेंत नसलेले हजारों पारिभाषिक शब्द खेड्याच्या भाषेंत आहेत. हे शब्द आम्ही जगवून त्यांना आमच्या भाषेंत महत्त्वाचें स्थान देणें जरूर आहे. परंतु खेडयांतील मुलांनीं संस्कृतप्रचुर अशी नागरी भाषा बोलावी अशी सक्ती केल्यास खेडवळ भाषा कांहीं दिवसांनीं नाहींशी झाल्यावांचून रहाणार नाहीं. तरी इंग्लंडप्रमाणें आम्हीही खेडयांतील मुलांना त्यांच्या खेडवळ भाषेचा उपयोग करण्यास मोकळीक ठेवली पाहिजे; तरच ती भाषा जगेल.

(२) **अंकगणित, तोंडचे हिशेबः**—मराठी चौथी इयत्तेपर्यंत नित्यव्यवहारांत उपयोगी पडण्याइतका अंकगणिताचा अभ्यास होणें अत्यंत जरूर आहे. परंतु अंकगणिताचा मुख्य आधार म्हणजे उजळणी आहे. हल्लींच्या नवीन पद्धतीनें ज्या मुलांना शिकविण्यांत येतें त्या मुलांचे पाढे फारच कच्चे असतात व त्यामुळें त्यांचें अंकगणितहि फार कच्चे रहातें. घोकून घेण्याची पद्धत इतर बाबतींत वाईट व त्याज्य असली तरी त्या पद्धतीची, पाढ्यांच्या बाबतींत व तोंडच्या हिशोबाच्या रीतीच्या बाबतींत, शिफारस करावी असें वाटूं लागतें. साध्या हिशोबालासुद्धां हल्लीं कांहीं मुलें लांबलचक गुणाकार, भागाकार करूं लागतात. असा मुलगा जर दुकानांत मुसार माल विकण्यास बसविला तर त्याला जमाखर्चाच्या वह्यांना लागतात त्यापेक्षां अधिक कागद या हिशोबाच्या गुणाकार—भागाकारालाच लागतील व त्याचा सगळा वेळ गिऱ्हाईकांना माल देण्यांत जाण्यापेक्षां पहिल्या गिऱ्हाईकाचा हिशोब करण्यांतच निघून जाईल. गिऱ्हाइकांची गर्दी झाल्यानंतर काय गोंधळ होईल याची कल्पनाहि करतां येत नाहीं. खेड्यांतील मुलांना हें अंकगणित व तोंडचे हिशोब चांगले व झटपट येणें अत्यंत जरूर आहे. हल्लींहि एखादा व्ह. फा. ची परीक्षा पास झालेला मुलगा बापानें सांगितलेल्या बाजारच्या हिशोबासाठीं कागद--पेन्सील घेऊन आंकडेमोड करूं लागला कीं, सगळ्या लोकांच्या तो थट्टेचा विषय होऊन बसतो व त्यामुळें लोकांच्या मनांतून शिक्षणाचें महत्त्व साहजिक कमी होतें. पूर्वीच्या घोकण्याच्या पद्धतीचें पुनरुज्जीवन करावें लागलें तरी हरकत नाहीं परंतु अंकगणित व तोंडचे हिशोब खेड्यांतील मुलांना चांगले आले पाहिजेत.

अंकगणित व तोंडचे हिशोब खेड्यांतील मुलांना येणें जरूर आहे. त्यांच्या खालोखाल त्याला भूमितीच्या ज्ञानाचीहि जरूरी आहे. घर बांधतांना, पाट काढतांना, विहिरीचें थारोळें बांधतांना व पाण्याच्या मटारांना ढाळ देतांना त्याला उपयोगीं पडेल असेंच भूमितीचें ज्ञान त्याला देण्यांत यावें. अधिक खोल स्वरूपाच्या ज्ञानाची त्याला जरूरी नाहीं. हें शेतकीला उपयोगी असें भूमितीचें ज्ञानहि मुलांना शाळेंत बसून न देतां प्रत्यक्ष शेतांत नेऊन त्यांना देण्यांत यावें म्हणजे या ज्ञानाचा कसा उपयोग करावयाचा हेंहि त्यांना समजेल.

(३) **इतिहास व भूगोलः**—खेडयांतील मुलांना इतिहास विशेष शिकविला नाहीं तरी चालण्यासारखें आहे. आपल्या देशाच्या इतिहासांतील कांहीं

थोर पुरुषांच्या चरित्रांतील कांहीं महत्त्वाचे प्रसंग गोष्टीरूपानें सांगण्यांत यावे. सनावळीवर पूर्ण बहिष्कार घालण्यांत यावा, त्याचप्रमाणें लढाईंचीं वर्णनेंहि त्यांच्या डोक्यांत भरविण्याची जरूरी नाहीं. ऐतिहासिक कालांतील कोण पुरुष कधीं जन्मला व कधीं मेला याची बिनचूक नोंद करून काय फायदा होणार आहे? शेतकऱ्याच्या मुलाला ऐतिहासिक पुरुषाच्या जन्ममृत्यूपेक्षां कोणत्या धान्याची पेरणी कधीं करावी व कोणतें पीक कधीं काढावें हें ज्ञान अधिक महत्त्वाचें आहे. कोणत्या लढाईंत कोणीं कोणाचा पराभव केला व तो पराभव कां झाला याचीं कारणें घोकत बसण्यापेक्षां कोणत्या पिकाला कोणती कीड लागते व त्या किडीपासून पिकाचा बचाव कोणत्या उपायानें होऊं शकतो हें ज्ञान अधिक जिव्हाळ्याचें आहे! नंदकुमाराला क्लाईव्हनें खोटा कागद करून कसें फसविलें हें सांगण्यापेक्षां गांवांतील सावकार खोटे कागद करून दररोज शेतकऱ्यांना कसा फसवितो, ही माहिती अधिक उपयुक्त ठरेल. आठव्या हेन्रीच्या बायकांचीं नांवें घोकण्यापेक्षां देशांतील चालू चळवळींतील पुढाऱ्यांचीं नांवें अधिक स्फूर्तिदायक ठरतील.

जसें इतिहासाचें तसेंच भूगोलाचें. शेतीस उपयोगी अशीच त्यांस भौगोलिक माहिती देण्यांत यावी. गांवाजवळ डोंगर असल्यास तो दाखवून त्याला टेकडी, डोंगर यांतील फरक समजावून सांगावा. गांवास नदी असली तर तिच्या कांठावर बसून बोलण्याच्या ओघात नदी कशी उत्पन्न होते, तिचा ओघ कसा बदलत जातो, ती आटते का? तिला पूर कधीं येतो, वगैरे माहिती दिल्यास ती माहिती मुलें सहजासहज विसरणार नाहींत. पाण्याचा व पिकाचा काय संबंध आहे, पाणी कसें होतें, तें ओढ्यांतून नदीला व नदींतून समुद्राकडे कसें जातें व समुद्राचे ढग कसे होतात याबद्दल मुलांना, कंटाळवाणी न होईल अशी, उपयुक्त माहिती देतां येणें शक्य आहे. प्राथमिक शिक्षणाच्या आरंभींच्या अवस्थेंत मुलाचें गांव व त्याच्या आजूबाजूचा भाग यांचीच, तोंडी किंवा प्रत्यक्ष दाखवून, माहिती देण्यांत यावी व त्यानंतर हळके हळके तालुक्याची व जिल्ह्याची माहिती देण्यांत यावी. ही माहिती देतांना कोणती नदी कोणत्या डोंगरांतून निघून कोणत्या समुद्राला जाऊन मिळते व त्या नदीच्या कांठचीं गांवें यांची यादी जी मुलांकडून घोकून घेण्यांत येते ती पद्धत बंद करण्यांत येणें जरूर आहे. ही अशी यादी घोकून घेतल्यानंतर परीक्षेच्या वेळेखेरीज इतर वेळीं कधीं तिचा उपयोग होतो का? 'धुळें अम्म-

ळनेर पाचोरे या गांवांचीं नांवें समजून न घेतां घोकणारा मुलगा 'अम्मळ' हें एक गांव असून 'नेर' हें दुसरें गांव आहे असें सांगण्यासहि कमी करीत नाहीं. भूगोलाची घोकंपट्टी कशी चालते याचें हास्यास्पद स्वरूप कै० गडकरी यांनीं आपला 'सकाळचा अभ्यास' या नांवाच्या प्रहसनांत उत्तम तऱ्हेनें रंगविलें आहे. भूगोल हा विषय आमच्या शिक्षकाच्या हातांत सहारा वाळवंटासारखाच रूक्ष झाला असून या विषयाचें नांव घेतलें कीं अनेक मुलांच्या अंगांवर काटा येतो. प्राथमिक शाळांत या विषयाला कामापुरतेंच महत्त्व असावें व निदान मराठी चवथी इयत्ता होईपर्यंत साधारण जिल्ह्यांच्या पलीकडे विशेष माहिती देण्याचा प्रयत्न करण्यांत येऊं नये.

(ब) **आरोग्यविषयक शिक्षण:**— आत्मरक्षणाच्या दृष्टीनें आरोग्य-विषयक शिक्षणाचें फार महत्त्व आहे. हल्लीं या विषयाला बरेंच महत्त्व देण्यांत येत आहे ही समाधानाची गोष्ट आहे; परंतु पहिल्या चार इयत्तांत आरोग्यविषयक ज्ञानाची माहिती देतांना कांहीं स्वच्छ-तेच्या गोष्टी मुलांच्याकडून प्रत्यक्ष करून घेण्यांत याव्यात; नुसतें 'स्वच्छतेनें रहा' अशी मुलांच्या कानीं कर्कश ओरड करून भागणार नाहीं. शिक्षकानें आपल्या स्वत:च्या देखरेखीखालीं मुलांना हातपाय, दांत, डोळे धुण्यास सांगणें जरूर आहे. त्याचप्रमाणें त्यांचे गलिच्छ कपडेहि त्यांना आपल्या देखत धुण्यास सांगण्यास हरकत नाहीं. या बाबतींत विशेष विचार 'मुलें व शिक्षक' या प्रकरणांत केला आहेच. पुण्यांत सेनापती बापट यांनीं ज्याप्रमाणें शहर–स्वच्छतेची मोहीम, हातात खराटा घेऊन सुरू केली आहे, त्याचप्रमाणें खेडेगांवांतहि प्रौढ लोकांकडून, निदान प्रौढ मुलांकडून, शिक्षकाच्या देखरेखीखालीं दर आठ दिवसांला फेरी काढण्यास हरकत नाहीं व या फेरींत सामील होऊन प्रत्यक्ष काम करण्यानेंच मुलांना आरोग्याचें खरें शिक्षण मिळणार आहे. खेडेगांवांत नेहमीं दिसून येणारे नारूसारखे किंवा खरूज, गजकर्ण, नायटे, खवडे वगैरे त्वचेचे रोग कां होतात याचीहि माहिती मुलांना देण्यांत यावी. तसेंच मनुष्य भाजल्यानंतर, पाण्यांतून काढल्यानंतर, कुत्रा किंवा साप चावल्यास प्रथमोपचार कोणते करावेत याचीहि माहिती खेडयांतील मुलांना मिळणें जरूर आहे.

आरोग्यवर्धनासाठीं आरोग्यविषयक माहिती देणें जरूर आहे; त्याचप्रमाणें अभ्यासक्रमांत निरनिराळ्या खेळांचा समावेशही करणें जरूर आहे. या

खेळांच्या बाबतींत किंवा शारीरिक शिक्षणाच्या बाबतींत काय करावें याचा 'मुलें' या प्रकरणांत विस्तारानें विचार केला आहेच.

(क) **धंदे-शिक्षण:**—हल्लींच्या शिक्षणक्रमांत वाङ्मयशिक्षणाच्या प्रकारावरच विशेष जोर देण्यांत आला आहे. साक्षरतेचा प्रसार हें प्राथमिक शिक्षणाचें ध्येय आहे असेंहि समजण्यात येत आहे.¶ परंतु केवळ साक्षरता-प्रसार हें कांहीं शिक्षणाचें ध्येय नाहीं. मनुष्याच्या अंगांत जन्मतः बीजरूपानें असलेल्या अनेक सद्गुणांस अंकूर फुटून ते वाढीला लागणें, हें शिक्षणाचें खरें ध्येय आहे व या ध्येयाच्या दृष्टीनें वाङ्मयी शिक्षणाला फाजील महत्त्व देणें चूक आहे. हल्लीं जी साक्षरता समजण्यांत येते ती खरी साक्षरताच नव्हे. मनुष्यास लिहितां वाचतां आलें म्हणजे कार्य झालें असें नाहीं. साक्षरता हें ध्येय नसून स्त्रीपुरुषांना सुशिक्षित करण्याचें तें एक साधन आहे. महात्मा गांधी यांच्या कल्पनेप्रमाणें† मुलाच्या शिक्षणास सुरवात धुळाक्षरें शिकविण्यापासून होण्यापेक्षां त्याला एखादा उपयुक्त धंदा शिकवून करण्यांत येणें जरूर आहे. या शिकविण्यांत येणाऱ्या धंद्यापासून त्याला आरंभापासून थोडीफार कमाई करतां आली पाहिजे. मात्र हा धंदा एखाद्या निर्जीव यांत्रिक पद्धतीनें न शिकवितां त्याला प्रत्येक बाब कां व कशी याचें शास्त्रोक्त ज्ञान होणें जरूर आहे. निव्वळ पुस्तकी साक्षरतेवर भर न देतां स्पेन्सरनें सांगितल्याप्रमाणें जगण्यासाठीं, आत्मरक्षणासाठीं, अप्रत्यक्ष सहाय्य करणाऱ्या अन्न व वस्त्र वगैरे आवश्यक वस्तु मिळविण्याकरितां धंदेशिक्षणाची फारच जरूरी आहे.

या धंदेशिक्षणाचा आपणास दोन दृष्टीनें विचार करतां येईल. प्रत्येक मनुष्याला त्याचा पूर्वापारचा धंदा चांगल्या तऱ्हेनें करतां येणें जरूर आहे व हा धंदा चांगल्या प्रकारें करतां येण्यासाठीं त्याला त्या धंद्यातील विशेष ज्ञान

¶ ॲबॉटवुड क. रि. पा. ११. महात्मा गांधी, हरिजन ३१।६।३७.

† By education I mean all round drawing up out of the best in child and man body, mind and spirit. Literary not the end of education nor the beginning. It is only one of the means where by man and woman can be educated. Literary in itself is no education, I would therefore begin the child's eduction by teaching it a useful handicraft and enabling it to produec from the moment it begins its training. —Mahatma Gandhi. Haritan. 31–7–37.

करून देणें हें शिक्षणाचें कार्य आहे. हें कार्य साक्षरता येण्यासाठीं जें त्याला शिक्षण देण्यांत येईल त्या शिक्षणानें थोडेफार साधलें जाईल. कारण लिहिण्यावाचण्यास शिकलेला मनुष्य आपल्या धंद्यास उपयोगीं पडणारें वाङ्मय स्वतःच वाचून, स्वतःच्या धंदेविषयक ज्ञानांत भर घालूं शकेल. मात्र हें साक्षरतेचें ज्ञान देण्यासाठीं त्याला जें शिक्षण द्यावयाचें तें त्याला स्वतःचे परिस्थितीशी पूर्ण समरस करणारें असणें अत्यंत जरूर आहे. हल्लीं आपण खेड्यांतील मुलांना जें शिक्षण देतों तें त्याला खेड्यांतील जीवना विषयीं पूर्ण उदासीन बनवून त्याला शहराकडे उत्सुक नजरेनें पहाण्यास प्रवृत्त करतें व त्यामुळें शिक्षणानें तो अधिक सुखी होण्याऐवजीं तो अधिक कष्टी मात्र होतो व स्वतःचें व आपल्या पालकांचें आयुष्य दुःखमय करण्यास कारण होतो. खेड्यांतील जीवनास उत्तेजक व पोषक असा साक्षरतेसाठीं शिक्षणक्रम असल्यास खेड्यांतील लोकांच्या धंद्याला मदत होईल यांत कांहीं शंका नाहीं.

वर म्हटल्याप्रमाणें धंदेशिक्षण देतांना प्रत्येक मनुष्याला स्वतःचा धंदा चांगल्या प्रकारें करण्यासाठीं कांहीं अधिक ज्ञान त्याला देणें जरूर आहे. त्याच-प्रमाणें त्यास दुय्यम धंदेहि कांहीं येणें आवश्यक आहे. हें स्वतःच्या धंद्याचें व दुय्यम अगर जोडधंद्याचें शिक्षण त्याला कसें द्यावें याचा आतां विचार करूं.

शेतकी शिक्षण:—आपल्या देशांत सर्वांत मोठा वर्ग शेतीवर उपजी-विका करणारा आहे. या बहुसंख्य अशा शेतकरी वर्गाला चांगली शेती करण्यासाठीं उपयोगीं पडणारें ज्ञान द्यावें तितकें थोडें आहे. शेती कशी सुधारावी, ताली कशा घालाव्यांत, खत चांगलें कोणतें व वाईट कोणतें, कीड न लागण्यासाठीं प्रतिबंधक उपाय कोणते करावेत, बाजारभाव कधीं वाढतात व आपला माल चांगल्या किफायतीनें कसा विकावा, जनावरांची काळजी कशी घ्यावी, त्यांना कोणते रोग विशेष होतात व त्यावर प्रथमोपचार कोणते करावेत या व अशाच प्रकारच्या अनेक बाबींचें शिक्षण प्राथमिक शाळेंत मिळणें जरूर आहे. अशा तऱ्हेचें शिक्षण खेड्यांतील सर्व शाळांतून देण्यांत येणें जरूर आहे. बिगर शेतकरी वर्गाचीं कांहीं मुलें खेड्यांतील शाळांत असलीं तरी त्यांनाहि हें शिक्षण देण्यांत यावें, म्हणजे त्यांनाहि शेतकरी वर्गाच्या जीवनाविषयीं सहानुभूति वाटूं लागेल व शेतकरी वर्गाच्या मनाची रचना अधिक चांगल्या प्रकारें समजून, शेतकरी वर्गाशीं मोकळेपणानें वागण्यास मदत होईल. ज्या बिगर शेतकरी पालकांना

हें शिक्षण नको असेल त्यांना आपला मुलगा शिक्षणासाठीं शहरांत पाठविण्याची मोकळीक राहील. या मूठभर लोकांच्या सोयीसाठीं शेतकरीवर्गाला नागरी नमुन्याचें शिक्षण देऊन त्यांचें नुकसान करण्याचें धोरण आम्ही शक्य तितक्या लवकर सोडणें अत्यंत निकडीचें आहे.

आज शेतकरीवर्गाला शिक्षण देण्यासाठीं म्हणून सरकारनें कांहीं शेतकी शाळा चालविल्या आहेत परंतु या शाळा म्हणजे शेतकी शिक्षणाची थट्टाच आहे व या शाळांची संख्याहि फार अपुरी आहे, हें खालील तक्त्यावरून दिसून येईल.

शेतकी शाळांची व त्यांतील मुलांची संख्या दाखविणारा तक्ता नं. ३३

भाग	शाळांची संख्या	मुलांची संख्या			एकंदर
		इ. ५ वी.	इ. ६ वी.	इ. ७ वी.	
मुंबई भाग.	१४	२१६	१३१	१६०	५०७
मध्य ,,	२९	५८६	३००	३२५	१२८०
उत्तर ,,	१२	१८९	१३९	१४०	४६८
दक्षिण ,,	२९	३८०	२२६	२४७	८५३
सिंध.	४	३३	१७	२७	७७
एकंदर	८८	१४०४	८८३	८९८	३१८५

या शाळांची शेतकी समाजांत वाढती लोकप्रियता असल्याची सरकारी अधिकाऱ्यांनीं आपल्या अहवालांत ग्वाही दिलेली आहे;† परंतु मुंबई प्रांतांतील शेतकी शाळांची शेतकी कमिशननें पहाणी करून या शाळा कुचकामाच्या व अतिशय खर्चाच्या आहेत असा आपला कडक शब्दांत अभिप्राय दिला आहे.* या शाळा हल्लींच्या स्वरूपांत पुढें चालविणें अत्यंत चुकीचें आहे. आमच्या मतें शेतकी शिक्षणाबाबत खालील गोष्टी करणें जरूर आहे.

† मुं. शि. रि. ३५–३६ पा. ५०–५१. * शेतकी क. रि. पा. ५३५–३७.

(अ) प्राथमिक शिक्षणक्रमाच्या सुरवातीपासून मुलांना शेतीविषयक शिक्षण देण्याचें धोरण आखावें. बालवर्गांतील मुलांना गोष्टी सांगतांना किंवा त्यांना प्रश्न विचारतांना त्यांच्या आजूबाजूला दिसणाऱ्या परिस्थितीचा शक्यतों अधिक उपयोग करावा. त्याचप्रमाणें पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चवथ्या इयत्तेतील मुलांना वाढत्या प्रमाणांत कृषिक-जीवनाविषयीं माहिती देण्यांत यावी व त्यांच्याकडून शाळेंतील बाग किंवा खास जमीनींतिल कांहीं वाफ्यांतून साधीं पिकें करून घेण्यांत यावीं. त्यांना इतर शेतकऱ्यांच्या शेतांवर जें काम चाललें असेल, तें कामहि वरचेवर नेऊन दाखविण्यांत यावें व याप्रमाणें पहिल्या चार इयत्तांमध्यें शेतकी शिक्षणाचा पाया तयार करून पुढील इयत्तांमधून अधिक शिक्षण देऊन, वरच्या भिंतीचें काम करण्यास सुरवात करावी. म्हणजे इ. ५, ६ व ७ यांत त्यास थोडें अधिक शिक्षण देण्यांत यावें. या इयत्तांमधील मुलांना काढणी वगैरेचें कामहि शिकवावें व हें काम शिकवितांना शिक्षकांच्या देखरेखीखालीं त्यांनीं गांवांतील एखाद्या शेतकऱ्याच्या शेतांत मजुरीनें काम करण्यासहि हरकत नाहीं. शहरांतील कांहीं मुलें हल्लीं बँड वाजविण्याचें काम पैसे घेऊन करीत असतात व त्यांत त्यांना किफायतहि चांगली होते. याच तत्त्वावर पद्धतशीरपणें शेतकी करण्याचें शिक्षण मिळालेलीं मुलें शिक्षकाच्या देखरेखीखालीं कामाच्या हंगामांत मोलानें काम करूं लागलीं, तर इतर मजुरांनाहि त्यांचा कित्ता गिरवितां येईल व मुलांना रोज मिळून त्यांना शारिरिक कष्ट करण्याची संवय होईल. शेतकऱ्याचा मुलगा शिकला कीं शेतीला निरपयोगी होतो हा आक्षेपहि घेण्यास जागा रहाणार नाहीं. मुलांना मिळणाऱ्या वेतनामुळें शिक्षणाचा खर्च भागून तें महात्मा गांधी म्हणतात त्याप्रमाणें स्वयंपोषी होईल.

(ब) हल्लीं दुय्यम शिक्षणाच्या शाळेंत कोठेंहि शेतकीविषयक शिक्षण देण्याची सोय केलेली नाहीं. महात्मा गांधी म्हणतात त्याप्रमाणें किमान प्राथमिक अभ्यासक्रम मॅट्रिक (इंग्रजीविना) परीक्षेपर्यंत ठेवल्यास उत्तमच. परंतु यदाकदाचित् तसें करतां न आल्यास हल्लीं दुय्यम शाळांच्या अभ्यासक्रमांत वैकल्पिक विषय म्हणून शेतकी शिक्षणाचा समावेश करण्यांत यावा. अशा शाळा शेतकरी वर्गासाठीं मोठ्या गांवांतून काढण्यांत याव्यात. त्याचप्रमाणें शहरांतील दुय्यम शाळांतूनहि शेतकी विषय वैकल्पिक विषय म्हणून ठेवण्यांत यावा. याप्रमाणें योजना केल्यास प्राथमिक शाळांतील शेतकी शिक्षण घेऊन

तयार झालेला विद्यार्थी, घरचा बरा असला तर किंवा एखादी शिष्यवृत्ति मिळाली तर, पुढील अभ्यासक्रमासाठीं दुय्यम शाळेंत जाऊ शकेल व तेथील अभ्यासक्रम संपवून त्याला शक्य झाल्यास शेतकी कॉलेजमध्येंहि शेतकीच्या उच्च शिक्षणासाठीं प्रवेश मिळवितां येईल. याप्रमाणें शेतकी शिक्षणाचा अभ्यासक्रम आखल्यास आज शेतकी कॉलेजमध्यें मिळणारें शेतकीविषयक शिक्षण मुलांना प्राथमिक व दुय्यम शाळांमध्येंच देतां येईल व मग शेतकी कॉलेजचा संशोधनात्मक कार्यासाठीं उपयोग करतां येईल. शेतकीचें प्राथमिक व दुय्यम शिक्षण खेडयांतच देण्याची तजवीज केल्यानें शेतकरीवर्गास तें अधिक मार्गदर्शक होऊन, खात्यासहि नमुनेदार शेतासाठीं (model farm) फार खर्च येणार नाहीं. शहरांत फार महागाईची जमीन घेऊन तिचें 'मॉडेलफार्म' बनविण्याचा आंतबट्ट्याचा व्यवहार बंद होणें जरूर आहे.

(क) हल्लीं शेतीच्या विषयांची व्ह. फा. परीक्षा घेण्यांत येते, त्याचप्रमाणें दुय्यम शाळांत शेतीचा विषय ठेवल्यानंतर शेतकीची मॅट्रिक परीक्षाहि घेण्यांत यावी व ही परीक्षा पास होणारालाच शेतकी कॉलेजमध्यें प्रवेश मिळावा. व या परीक्षा पास होणाऱ्या विद्यार्थ्यांनाच खेडयांतील शिक्षकांच्या, तलाठयांच्या किंवा मुलकी खात्याच्या नोकऱ्या देण्यांत याव्यात. शेतकी शाळांत आपलीं मुलें पाठविण्यास आज कांहीं पालक नाखुष असतात, याचें एक कारण म्हणजे त्या मुलाला सरकारी नोकरी मिळण्याचा मार्ग बंद होतो हें होय;* परंतु वर सुचविल्याप्रमाणें तजवीज झाल्यास हा आक्षेपहि नाहींसा होईल.

दुय्यम धंदे:—शेतकी विषयाला प्राधान्य देणें जरूर असल्यामुळें त्याचा आपण वर विचार केला; परंतु नुसत्या शेतीवर अनेक लोकांची उपजीविका होऊं शकत नाहीं. कारण, अनेक लोकांच्या वांटयाला आलेल्या जमिनी फार लहान असतात. कांहीं ठिकाणीं पाऊस वेळेवर पडत नाहीं किंवा वाजवीपेक्षां जास्त पडून पिकांचें नुकसान होतें. त्याचप्रमाणें आपल्याकडे शेतकरी-वर्गाला बारा महिने काम नसतें व ज्या वेळीं काम नसतें, अशा वेळीं त्याला कांहीं दुसरा धंदा करतां आल्यास त्याला चार पैसे अधिक मिळवितां येतील व तसें झालें तर त्याची खालावलेली आर्थिक स्थिति सुधारून त्याच्या रहाणीचा दर्जा (standard of living) वाढेल.

* मु. शि. रि. १९३५-३६ पा ५१.

या सर्व दृष्टीनें विचार केल्यानंतर जोडधंद्याचें शिक्षण शेतकरीवर्गाला देण्याची तीव्र आवश्यकता मनाला पटूं लागते.

हें शिक्षण शेतकरी वर्गाला प्राथमिक शाळेंत असतांनाच देणें जरूर आहे. पाश्चिमात्य देशांत हे जोडधंदे प्राथमिक शाळांतच शिकविण्यांत येतात. त्याच-प्रमाणें आपल्याकडेहि करावें लागेल. खेड्यांतच नव्हे तर शहरांतील प्राथमिक शाळांतून खालील धंदे शिकवितां येण्यासारखे आहेत.

(१) **सूत काढणें व खादी विणणें**—महात्मा गांधी यांनीं या धंद्याला राष्ट्रीय महत्त्व दिलें आहे. शेतकऱ्यांच्या मुलांना शाळेंत हें काम करावयास लावल्यास २५ वर्षांच्या वरील मुलांमुलींस सरासरीनें ११ आणेपर्यंत निव्वळ फायदा मिळवितां येतो, असें साबरमती हरिजन आश्रमाचे प्रमुख श्री. नरहरी पारेख यांनीं आंकडे देऊन सिद्ध केलें आहे.† याप्रमाणें उद्योग प्राथमिक शाळांतील मुलांनीं केल्यास व सरासरी आठ आणे जरी प्रत्येक मुलामागें पडले तरी सालाला दर विद्यार्थ्यास रु. ६ प्रमाणें उत्पन्न येईल व त्यामुळें त्याच्या शिक्षणाप्रीत्यर्थ येणारा खर्च कमी होईल.

(२) **टोपली करणें व चटया विणणें**:—प्राथमिक शाळांतील कांहीं मुलांना हें कामहि करतां येण्यासारखें आहे. ज्या गांवांत संत्रीं मुसंबीचे किंवा इतर फळांचें बागाईत आहे, अशा गांवांना फळें परगांवीं पाठविण्यासाठीं करंडे लागतात. हे करंडे किंवा टोपल्या गांवांतील शाळेंतील मुलांनीं केल्यास त्या त्यांना स्वस्त पडून शाळेलाहि फायदा होईल. त्याचप्रमाणें मुलांना चटया किंवा नकशीचें विणकाम करतां येऊं लागलें, तर अनेक शाळांमधील ओल्या जागेंत मुलांना जे बसावें लागतें तें बसावें लागणार नाहीं. या चटया चांगल्या होऊ लागल्या तर त्यांना शहरांतहि गिऱ्हाईक मिळेल व शिक्षण स्वयंपोषी व्हावयास वेळ लागणार नाहीं. आपल्या मुलानें केलेले जिन्नस घरीं वापर-णाऱ्या पालकांनाहि शाळेंतील शिक्षणाबद्दल अभिमान व आपलेपणा वाटूं लागेल. याच तऱ्हेचें काथ्याचें विणकामहि शाळेंत शिकविण्यास हरकत नाहीं.

(३) **चऱ्हाटें व दोर करणें**:—शाळेंतील मुलांना हें कामहि चांगलें करतां येण्यासारखें आहे व शाळेंत दोर व चऱ्हाटें तयार होऊं लागलीं तर गांवच्या लोकांना फायदा होईल. शेतीच्या धंद्यास आनुषंगिक असाच हा धंदा आहे.

---

† हरिजन अंक ता. ४।९।३७.

(४) **कोंबड्यांचा धंदा:**—प्राथमिक शाळेंत मुलांना कोंबड्यांची जोपासना कशी करावी हें शिकविण्यास हरकत नाहीं. या विषयाची प्रत्यक्ष माहिती देण्यासाठीं प्रत्येक शाळेंत कांहीं कोंबड्या बाळगण्यासहि हरकत नाहीं. या कोंबड्यांचीं अंडीं शहरास पाठवून पैसे मिळवितां येतील किंवा निदान मधल्या फराळाला त्यांचा उपयोग होऊं शकेल. विष्णुशर्मा यानें राजपुत्रांना कबूतरांचा उपयोग करून शिक्षण कसें दिलें हें आपण मागें § पाहिलें आहेच. आज आपणास कोंबड्यांचा उपयोग करून मुलांना निदान अंकगणित व हिशोब शिकविणें शक्य होईल. निरनिराळ्या मुलांच्या ताब्यांत ठराविक कोंबड्या दिल्यानें तर त्यांचा व त्यांच्या अंड्यांचा हिशोब मुलांना ठेवावा लागेल. त्याचप्रमाणें कोंबड्यांना रोग कोणते होतात व त्यांवर औषधयोजना काय करावी यांचीही त्यांना माहिती होईल व त्या कोंबड्यांच्या नादानें ते शाळेंत अधिक वेळ घालवूं लागतील.

(५) **दुभत्याचा धंदा:**—कोंबड्यांच्या धंद्याप्रमाणें दुभत्याचा धंदा प्राथमिक शाळेंत सुरू करण्यास हरकत नाहीं. सरकारनें चराऊ रानावरील फी आतां उठविली आहे. या चराऊ रानाचा शाळेच्या जनावरांना फायदा होईल. त्याचप्रमाणें जवळ जंगलखातें असल्यास त्यांतहि शाळेच्या जनावरांना विशेष सवलत देण्यांत यावी. याप्रमाणें सवलती मिळाल्यानंतर प्रत्येक शाळेंत कांहीं म्हशी व गायी ठेवाव्यात. या जनावरांना चारणीसाठीं नेण्याचें काम मुलांच्यावर पाळीपाळीनें सोपवावें. या मुलांच्याकडे गांवांतील इतर जनावरें चारणीस नेण्याचें कांहीं काम दिल्यास आज जे पालक जनावरांच्या नांवांवर मुलांना शाळेंत पाठविण्यास तयार नाहींत ते आपलीं मुलें शाळेंत पाठवूं लागतील. दुभत्या जनावरांच्या चारापाण्याची व्यवस्था करणें, त्यांची धार काढणें, दूध विकणें किंवा दुधाचें दहीं वगैरे पदार्थ करणें, हीं कामें प्रौढ मुलांकडून करून घ्यावयास हरकत नाहीं. या जनावरांच्या दुधाचा उपयोग 'मुलें' या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें शाळेंतील मुलांसाठींहि करण्यास हरकत नाहीं. रोज कोणत्या जनावरानें किती दूध दिलें व त्या जनावरासाठीं खर्च किती आला, कोणतें आंबोण घातलें असतां दूध ज्यास्त निघालें किंवा कमी पडलें. तसेंच कोणत्या आंबोणामुळें दूध कसदार निघालें किंवा बिनकसाचें झालें वगैरे नित्योपयोगी माहिती गोळा करतां येईल व या माहितीचा गांवांतील इतर मंडळीनाही उपयोग होईल. हल्लीं गांवांतील दूध, दही, ताक, लोणी बाजा-

रांत जातें. निदान शाळेंतील जनावरांचें दूध जर मुलांच्या पोटांत गेलें तर त्यांच्या प्रकृतीवर इष्ट असा परिणाम होईल व मुलांनाहि व्यवहारपयोगी शिक्षण मिळून रोजच्या दुभत्याशीं हिशोब ठेवतांना अंकगणित चांगलें होईल.

(६) **सुतारकी व लोहारकी:**—मुलांना ह्या दोन धंद्यांचेंहि थोडें शिक्षण प्राथमिक शाळेंत देण्यास हरकत नाहीं; मात्र मुलगा निदान ९ वर्षांचा झाल्याशिवाय या धंद्यांत त्याला घालूं नये. कारण या धंद्यांत व विशेषतः सुतारकीच्या धंद्यांत तीक्ष्ण हत्यारांचा संबंध येत असल्यामुळें लहान मुलें आपल्या हातापायाला दुखापत करून घेण्याचा संभव आहे. परंतु प्रौढ मुलांना हें शिक्षण देण्यास अडचण नाहीं. या धंद्यांचें शिक्षण देतांना शेतकीला नेहमीं लागणारीं नांगर, कुळव वगैरे अवजरांची कशी दुरुस्ती करण्यांत यावी हें शिक्षण मुख्यतः देण्यांत यावें, म्हणजे या ज्ञानाचा मुलांना व पालकांनाहि चांगला उपयोग होईल.

या व अशाच तऱ्हेच्या अनेक धंद्यांचें प्राथमिक शाळांतील मुलांना शिक्षण देणें शक्य आहे. हें शिक्षण देतांना जो जादा खर्च येईल त्याचें काय करावें हा महत्त्वाचा प्रश्न आहे. नवीन धंदे-शिक्षण सुरू केल्यानंतर प्रथम कांहीं दिवस सामानाची नासधूस बरीच होईल, यांत कांहीं शंका नाहीं; परंतु कांहीं दिवसांनीं मुलें सरावल्यानंतर कांहीं विकण्यासारखा माल तयार होऊं लागेल. अर्थात् कसलेल्या कारागिराच्या हातून तयार होणाऱ्या मालाची सफाई या मालांत दिसणें शक्य नाहीं. परंतु मुलांच्या धंदेशिक्षणाला उत्तेजन देण्यासाठीं देशांतील स्वदेशीप्रेमी धनिकांनीं व सरकारनें हा माल विकत घेण्यास हरकत नाहीं. सरकारप्रमाणें स्थानिक संस्थांनाहि लागणारा माल मुलांच्याकडून तयार करून घेणें शक्य आहे. दर स्थानिक संस्थेला लागणारा लाकडी माल त्यांना आपल्या शाळांतील मुलांकडून तयार करून घेतां आला तर त्यांत खात्याचा व धंदेशिक्षणाचा फायदा होऊन या किफायतींतून शिक्षणाचा थोडाफार खर्चहि भागण्यासारखा आहे. या अशा धंदे शिक्षणापासून होणाऱ्या उत्पन्नाचा अंदाज कितीहि सहानुभूतीच्या सढळपणानें केला, तरी त्या उत्पन्नांतून शिक्षकाचा पगार भागविण्याची आशा सफल होणें शक्य नाहीं. जास्ती उत्पन्न काढण्याच्या नादीं शिक्षक लागल्यानंतर शाळेचें स्वरूप नाहींसें होऊन त्या संस्थेला फॅक्टरीचें अनिष्ट स्वरूप येण्याचाहे संभव आहे.

मुलांना शिक्षण देणें हा प्रधान हेतु असून उत्पन्न काढणें हा दुय्यम व गौण उद्देश आहे, हें आम्हीं विसरतां कामा नये.

हें धंदेशिक्षण कोणीं द्यावयाचें हा दुसरा प्रश्न आहे. इंग्लंडमध्यें या किरकोळ धंद्याचें (Handi Craft) शिक्षण देणारे खास शिक्षक आहेत व या शिक्षकांना हें शिक्षण देण्यासाठीं खास संस्थाहि आहेत. आमच्याकडे प्रथम अशा शिक्षकांचा पुरवठा करणें कठीण जाईल. परंतु शहरांतील कारागीर प्रथम बाहेरगांवीं पाठवून त्यांच्याकरवीं प्रत्येक गांवगन्ना असलेल्या सुतार-लोहाराला शिक्षण देतां येणें शक्य आहे. कांहीं दिवसानीं हे गांवोगावचे लोक तयार झाल्यानंतर त्यांचाहि गांवच्या शाळेंत उपयोग होईल. सरकारनें कायम नोकर म्हणून कांहीं चांगले कारागीर ठेवणें जरूर असून त्यांची फिरते शिक्षक म्हणून नेमणूक करतां येईल. एकदां हा गाडा चालू झाला म्हणजे आपोआप जादा शिक्षक पुरविण्याची व्यवस्था करतां येईल.

हा प्रयोग करतांना अनेक अडचणी पुढें येतील परंतु चिकाटीनें त्यांना तोंड देण्यानेंच त्या मागें हटतील व कायमच्या नाहींशा होतील.

(३) **कलात्मक शिक्षण:**—लहान मुलांना शिक्षणाची गोडी लागून त्यांचें मन शाळेंत रमेल, असें मनोरंजक शिक्षणहि त्यांना देणें जरूर आहे. या शिक्षणामुळें त्यांचें मनोरंजन होईल, येवढेंच नव्हे तर, त्यांच्या डोळ्याला, हाताला व मनालाहि एक विशेष चांगलें असें वळण लागेल. या दृष्टीनें संगीत, चित्रकला, मातीचीं चित्रें बनविणें वगैरे बाबींचा अभ्यासक्रमांत समावेश करतां येईल. संगीताचा कवायतीसाठींहि उपयोग होतो. संगीताच्या तालावर कवायत करणाऱ्या मुलांना व सामुदायिक संगीतांत भाग घेणाऱ्या मुलांना स्वरज्ञान होतें. चित्रकलेमुळें निरनिराळ्या रंगांच्या सूक्ष्म छटा समजून निसर्गाकडे नवीन दृष्टीनें मुलगा पाहूं लागतो. त्याचप्रमाणें मातीचा गोळा किंवा कागदाचा तुकडा हातांत घेऊन त्यापासून निरनिराळीं चित्रें किंवा आकृति तयार करण्यास शिकणाऱ्या मुलांना निरनिराळ्या वस्तूंच्या आकारांची व त्यांच्या प्रमाणशीरपणाची किंवा बेढबपणाची कल्पना येऊं लागते. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कलांच्या शिक्षणामुळें मुलांच्या डोळ्याला, सौंदर्य-ईक्षणाची, कानाला संगीतस्वादाची व मनाला कलाजन्य अशा वर्णनातीत सुख-प्रतीतीची संवय होते.

वाङ्मयी शिक्षण, आरोग्यविषयक शिक्षण, धंदेशिक्षण व कलात्मक शिक्षण यांचा अभ्यासक्रमांत कसा व किती प्रमाणांत समावेश करण्यांत यावा याचा आपण वर विचार केला आहे. या शिक्षणाचें प्रमाण मुलाच्या वयाबरोबर कमी जास्त होत जाईल यांत कांहीं शंका नाहीं. लहान मुलांना प्रथम मनोरंजक म्हणून कलात्मक शिक्षण अधिक द्यावें लागेल व मुलगा प्रौढ होऊन शारीरिक काम करण्यासारखा झाला म्हणजे त्याला धंदेशिक्षण वाढत्या प्रमाणांत द्यावें लागेल. मुलाच्या वाढत्या वयाबरोबर त्याच्या लिहिण्या-वाचण्याचा व आरोग्यविषयक शिक्षणाचा व्याप व दर्जाहि वाढवावा लागेल.

या अभ्यासक्रमाचें एक आवश्यक उपयोग म्हणूनच इतर कांहीं सामाजिक व रचनात्मक कार्यक्रमहि शिक्षकाला आखावे लागतील. या कार्यक्रमात शाळेंत कांहीं समारंभ घडवून आणून त्या ठिकाणीं मुलांच्या खेळाचे, नाट्याचे व पाठांतराचे प्रयोग दाखविणें, तसेंच मुलांना गांवच्या बाजारांत नेऊन तेथील व्यवहाराची माहिती देणें, गांवांत एखादी नाटक कंपनी किंवा सर्कस वगैरे आल्यास त्यांचे खेळ पहावयास जाणें, गांवांतील नैमित्तिक समारंभात मुलांच्या तर्फे पुढाकार घेऊन मुलांच्या हातून त्याची चोख व्यवस्था ठेवणें, नजिकच्या शहरास भेट देणें, विशेष समारंभाच्या वेळीं गांव शृंगारणें, किंवा घरास शृंगारणें वगैरे अनेक बाबींचा समावेश करतां येईल. या कार्यक्रमामुळें मुलाना समाजांत कसें वागावें व समाजाच्या कसें उपयोगीं पडावें याचें अनुभवानें ज्ञान मिळतें व त्याचा त्यांच्या बौद्धिक वाढीस उपयोग होतो.

अभ्यासक्रमाची आखणी करतांना मुलांना श्रमाचीं व कष्टाचीं कांहीं कामें करावीं लागतील याकडे लक्ष ठेवावें. विशेषत: खेडयांतील मुलांचें जीवन कष्टांतच जावयाचें असल्यामुळें श्रम करण्याची संवय त्यांना शाळेंत होणें जरूर आहे. हल्लींचा बैठा-शिक्षणक्रम श्रमाच्या बाबीला वाव देत नसल्यामुळें मुलाना कष्ट करण्याचा कंटाळा वाटतो व मग शिक्षणोत्तर तो शेतकरी पेशाच्या दृष्टीनें पूर्णपणें टाकाऊ होतो. मुलांच्याकडून शाळेंत किंवा शेतावर रोज कांहीं तास नियमानें कष्टाचीं कामें करून घेणें अगत्याचें आहे.

मुलींचा विशेष अभ्यासक्रम:—आतापर्यंत आपण मुलांच्या अभ्यास-

क्रमार्चींच चर्चा केली. आता मुलींच्या अभ्यासक्रमावद्दल थोडक्यांत विचार करूं.

मुलींना लिहितां वाचतां येणें अत्यंत जरूर आहे. त्याचप्रमाणें त्यांना अंकगणित व हिशोबहि येणें अगत्याचें आहे. गृहकृत्यांत जिचें जीवन जाणार आहे अशा मुलीला भूमिति न आली तरी चालेल. इतिहास म्हणून कांहीं थोर मातांचीं व त्यांच्या पराक्रमी मुलांचीं चरित्रें शिकवावीं. त्याचप्रमाणें तालुक्याच्या भूगोलापलीकडे जाण्याचें कारण नाहीं.

मुलींना आरोग्यशास्त्राचें शिक्षण अगत्याचें आहे. याच शिक्षणांत साधारण प्रौढ मुलींना बालसंगोपन-शास्त्रहि शिकविण्यांत यावें. तसेंच आपल्या नित्याच्या आहाराची व्यवस्था आरोग्याच्या दृष्टीनें कशी असावी, कोणत्या अन्नांत कोणतें पौष्टिक द्रव्य आहे याचीहि त्यांना माहिती द्यावी. कारण चूलघरांतही माहिती गेली तरच आमच्या आहारांत पौष्टिक द्रव्याचें योग्य प्रमाण राखलें जाईल.

मुलींना दुभत्याची व्यवस्था कशी करावी ह्याचेंहि शिक्षण द्यावें. त्यांना पाकशास्त्र शिकवावें. शिक्षणकाम व विशेषतः लहान मुलांचे कपडे कसे करावे हेंहि शिकवावें. त्याचप्रमाणें कपडे चांगले धुणें, कपड्यांना इस्तरी करणें, केस विंचरणें वगैरे हरघडी उपयोगीं पडणाऱ्या गोष्टीहि त्यांना शिकविणें जरूर आहे.

मुलींना चित्रकला, संगीत व लोकरीचें व मण्यांचें विणकाम शिकविण्यांत यावें.

शेतकऱ्यांच्या बायका शेतांत खुरपणीचें, मिरच्या, शेंगा तोडण्याचें काम करतात. शाळेंतील मुलींकडून शाळेच्या शेतावरील हें काम करून घेण्यास हरकत नाहीं. एकंदरीनें पुढील आयुष्यांत हरघडी उपयोगीं असे पडलें शिक्षण मुलींना प्राथमिक शाळांत मिळणें फार जरूर आहे.

मुलांमुलींना प्रथम कांहीं इयत्तांमध्यें सारखाच अभ्यासक्रम रहाण्याचा संभव आहे. या समान अभ्यासक्रमाच्या वर्गांचें शिक्षण मुलां-मुलींचें एकत्र व्हावयास हरकत नाहीं. मुली प्रौढ होऊं लागल्यानंतर कदाचित् त्यांचा अभ्यासक्रम मुलांच्या अभ्यासक्रमापेक्षां निराळा राहील, त्यावेळीं मात्र त्यांचे वर्ग निराळे असणें अपरिहार्य होईल. आरंभींचे कांहीं वर्ग एकत्र राहिल्यानें खर्चाची पुष्कळ बचत होईल.

धार्मिक व नीतिशिक्षण:—आपण आतांपर्यंत अनेक विषयांची अभ्यास-क्रमाच्या दृष्टीनें चर्चा केली. परंतु धार्मिक किंवा नीतिशिक्षणाबद्दल उल्लेखहि केला नाहीं. कारण धार्मिक शिक्षण देण्याचा प्रश्न अतिशय वादग्रस्त स्वरूपाचा आहे. इतर विषयांच्या आवश्यकतेबद्दल व प्रमाणांबद्दल निरनिराळ्या लोकांत ताबडतोब एकमत होण्याचा संभव आहे; परंतु धार्मिक शिक्षण किंवा नीति-शिक्षण याबद्दल तशी एकवाक्यता न होतां उलट, वादाचे वार उडण्याचा संभव.अधिक आहे. हिंदुस्थानांत अनेक धर्म व प्रत्येक धर्मांत अनेक पंथ आहेत. शाळेंत धर्माचें शिक्षण द्यावयाचें म्हटलें कीं, प्रत्येक धर्माचा किंवा पंथाचा अभिमानी आपल्या धर्माचें किंवा पंथाचें तट्टू पुढें सारण्याचा प्रयत्न करणार व मग एकप्रकारचें धार्मिक युद्धच सुरू होणार! पाश्चिमात्य देशांत एक ख्रिस्ती धर्मच असतांहि या धर्मांतील अनेक पंथांमध्यें एका काळीं धार्मिक शिक्षणाच्या बाबतींत निकराची लढत लागली व याचा शेवट प्रत्येक धर्मपंथानें आपल्या स्वतंत्र शाळा काढण्यांत झाला व अखेर सरकारनें शिक्षणाची जबाबदारी व त्यावरील हुकमत आपणाकडे घेतल्यानंतर या धार्मिक शिक्षणाच्या प्रश्नाला शाळेच्या आवारांतून बहिष्कृत करावें लागलें. एकधर्मी राष्ट्रांत जेथें ही स्थिति तेथें आपल्या देशांत काय होईल याची वाचकांनींच कल्पना करावी.

यावर कोणी धार्मिक शिक्षणाचे पुरस्कर्ते असें म्हणतील कीं, प्रत्येक धर्मा-साठीं जरूर तर स्वतंत्र शाळा काढा, परंतु शाळेंत धार्मिक शिक्षण देण्याची व्यवस्था करा! या म्हणण्यालाहि उत्तर देणें अवघड नाहीं. प्रत्येक धर्मासाठीं किंवा पंथासाठीं शाळा स्वतंत्र केल्यानंतरही अनेक अडचणी पुढें येतात.

पहिली अडचण खर्चाची येते व ती फार महत्त्वाची अडचण आहे. आजच स्पृश्यांसाठीं एक शाळा, अस्पृश्यांसाठीं एक शाळा व मुसलमानांसाठीं एक शाळा अशा तीन शाळा प्रत्येक गांवांत सुरू कराव्या लागतात व त्यामुळें ज्या ठिकाणीं एका जागेवर, एका शिक्षकावर भागलें असतें तेथें तीन स्वतंत्र जागा घ्याव्या लागून तीन निरनिराळे शिक्षक नेमावे लागतात. या तिन्ही शाळांना स्वतंत्र शिक्षणसाहित्य द्यावें लागतें तें निराळेंच! म्हणजे ज्या सामुग्री-वर तीन गांवांना चांगल्या शाळा देतां आल्या असत्या त्या शाळा आम्ही एकाच गावांत सुरू करतों. जसें शाळांच्या बाबतींत होतें तसेंच विहीरीच्या बाबतींत होत आहे. एका गांवाला भरपूर पाणी देणारी एक विहीर पुरे आहे. परंतु आमच्या धर्मामुळें एक स्पृश्यांसाठीं, एक महारांसाठीं, एक चांभारां-

साठीं व एक मांगांसाठीं अशा चार विहिरी प्रत्येक गांवांत कराव्या लागतात व त्याप्रमाणें एक रुपयाच्या ऐवजी चार रुपये आम्हाला खर्चावे लागतात. लिंगायत लोकांनीं किंवा जैन लोकांनीं आपल्या धर्मांच्या शिक्षणासाठीं स्वतंत्र शाळांची मागणी केली तर प्रत्येक गांवाला कमींत कमी पांच शाळा द्याव्या लागतील. या इतक्या शाळा देण्यासाठीं पैसा कोठून आणणार ?

दुसरी अडचण अशी कीं एका धर्मांतील लोक घेतले तरी त्या धर्माचें नांव सांगणाऱ्या सर्व लोकांची धर्मांबद्दल समान भावना नाहीं. हिंदुधर्माचेंच उदाहरण घेतलें तरी या धर्माची ही गाय पुरोहितवर्गाला, आंबोणाचा खर्चहि पडूं न देतां दुसऱ्याच्या कुरणांत चरून, नियमीतपणें पोटभर दूध देत आहे तर तीच अस्पृश्यांना आपल्या पायांखालीं हजारों वर्षें तुडवून आपल्या तीक्ष्ण नख्यांनीं त्यांना घायाळ करीत आहे. अशा स्थितींत धार्मिक शिक्षणाबाबत पुरोहितवर्गाचें व अपृश्यांच्या पुढाऱ्यांचें एकमत होण्याचा संभव आहे का? अस्पृश्य वर्ग सोडून दिले तरी पुढारलेल्या वर्गांतहि धर्माच्या स्वरूपाबद्दल एकवाक्यता कोठें दिसून येते ? एक म्हणतो वैदिक धर्म हाच आमचा धर्म, दुसरा म्हणतो स्मृतिप्रणीत धर्म हाच आमचा धर्म ! अशा मतभेदाच्या गलबल्यांत धार्मिक शिक्षण देणाराची तिरपीट उडाल्यावांचून खात्रीनें रहाणार नाहीं. हिंदुधर्माचा प्रमाणग्रंथहि नसल्यामुळें मोठी अडचण उत्पन्न होणार आहे. वेदांपासून तों परचुरे पुराणिक मंडळीच्या 'जर्मन बायांच्या' गाण्यापर्यंत सर्वच ग्रंथ धर्मग्रंथ या नांवावर आपला हक्क सांगू लागतात मग शाळेंत कोणत्या ग्रंथाला प्राधान्य देऊन शिकवावयाचें ?

खरें बोलावयाचें म्हणजे शाळेंत धार्मिक शिक्षण देण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं हल्लींच आमच्या लोकांच्या मनावर धर्माचें जें वाजवीपेक्षां जास्त दडपण आहे तें कमी करणारें शिक्षण आम्ही द्यावयास पाहिजे. विशेषतः हिंदुधर्माचा प्रत्येक मनुष्य सकाळीं उठल्यापासून तें रात्रीं झोंपेपर्यंत करावयाच्या प्रत्येक आचाराला धार्मिक क्रिया म्हणूनच समजत असतो. "ज्या त्या वस्तूमध्यें व कृत्यामध्यें धर्म घुसडल्यामुळें हिंदूलोकांमध्यें धर्मभोळेपणा वाढत जाऊन हिंदु समाजाचा कोंडमारा झाला आहे. आणि धर्माच्या बाकीच्या अनेक प्रकारच्या भाराखालीं तो पार गुदमरून चेंगरून गेला आहे. तेव्हां पहिल्यानें याच्यावरील बोजे एकीकडे सारले पाहिजेत."* शहरांतील

* गावगाडा पान २४९-५०

शिकलेले वर्ग धर्माच्या वजनाला बळी पडत नाहींत, परंतु खेडयांतील अडाणी समाज या धार्मिक बंडामुळें विवेकशून्य व फाजील सोशीक झाला आहे. अशा या वर्गांत जें आज आपणास अज्ञान दिसत आहे तें अज्ञानहि आपल्या सनातन धर्मांचेंच लाडकें अपत्य आहे. बहुजन समाजाला साक्षर करण्यासाठींच शिक्षण द्यावयाचें ना? ज्या धर्मामुळें अज्ञान जन्माला आलें त्या धर्माचा शिक्षणांत समावेश करणें म्हणजे विषावरील उताऱ्याच्या औषधांत पुन्हां थोडा मोरचुद मिसळण्यासारखें नाहीं का? बहुजनसमाजाच्या शैक्षणिकच नव्हे तर सर्वांगीण प्रगतीच्या मार्गांत आमचा धर्मच उभा आहे. आमचें हें विधान वाचून कपाळाच्या आठ्या चढविणारांनीं 'गांवगाडा' या सुप्रसिद्ध पुस्तकांतील 'सारासार' हें प्रकरण वाचावें. बहुजनसमाजाची प्रगति व्हावी असें ज्यांस प्रामाणिकपणें वाटत असेल त्यांनीं प्रथम त्याच्या मनावरील धर्माचा कैफ उतरण्यासाठीं प्रयत्न करणें जरूर आहे व हें कार्य आमच्या शिक्षणतज्ज्ञालाहि करावें लागेल.† हें तत्त्व मान्य केल्यानंतर निदान हिंदु धर्माच्या शिक्षणाचा प्रश्नच उद्भवूं शकत नाहीं.

---

† The people of India are on the whole preoccupied with religion to such an extent that it works more often as a set-back than as a motive for a high type of living. From the beginning of her history India has been 'notoriously religious.'.....The Hindu lives, moves and has his being in religion. He eats religiously, thinks religiously, bathes religiously, nay, sins religiously.... The Hindu conception of religion in its essence is tainted not a little with selfishness. The idea of religion as life, or religion as service, usually holds but little place in the Hindu mind.....satisfied with his lot in life, contended with what a heartless fate has measured out to him, the Hindu has no interest in life except to try to get out of it. The doctrine of Karma is fatalistic; it tells him that there is no use trying to be different from what his Karma has decreed physically, socially or economically; for suffer he must. The deadening effect of such popularly-held beliefs and ideas, wherever found, is pathetic.....To produce an interest in life, therefore, and to reject fatalism ought to be one of the chief concerns of the educator. —T. N. Jacob, p. 12-13.

इतर धर्मांचें बोलावयाचें म्हणजे धार्मिक शिक्षण शाळेंत दिल्यास, त्यामुळें धार्मिक भावना वाजवीपेक्षां जास्त बळकट होऊन त्यामुळें देशाच्या प्रगतीस अडथळे उत्पन्न होण्याचा संभव आहे. लोकांना शिकविण्यांत त्या व्यक्तीचा फायदा होऊन त्यामुळें देशाची प्रगती व्हावी, हिंदुस्थान एक राष्ट्र व्हावें, हें ध्येय आहे. ज्या शिक्षणामुळें हें ध्येय साध्य होण्यास मदत न होतां उलट, ध्येयापासून आम्ही दूरदूर जाणार आहोंत तें शिक्षण सरकारनें खर्च करून कां द्यावें ? ज्यांचें धर्मावरील प्रेम फार चिवट असेल अशा प्रत्येक धर्माच्या उपासकांनीं स्वतःच्या खाजगी खर्चानें धार्मिक शाळा खुशाल काढाव्यात; परंतु सरकारी पैशांवर चालणाऱ्या शाळांमध्यें धार्मिक शिक्षण देण्याची बंदी करण्यांत यावी.

नीति ही धर्म-वृक्षाच्या आधारानें जगणारी वेल आहे. निरनिराळ्या धर्मांच्या नीतिकल्पनांतहि त्या त्या धर्माप्रमाणें थोडाफार फरक आहे. त्यामुळें धर्माच्या शिक्षणाबद्दल जें म्हटलें तेंच नीतिशिक्षणाबद्दलहि म्हणतां येईल.

शाळेंत धर्मांचें शिक्षण द्यावयाचें असेल तर त्यासाठीं प्रत्येक व्यक्तीच्या बौद्धिक, मानसिक, आर्थिक प्रगतीस पोषक व राष्ट्राच्या एकीकरणास अनुकूल अशा राष्ट्रधर्माचें शिक्षण द्यावें. "आम्ही सर्व एका देशाचीं लेकरें आहोंत, सर्वांचा दर्जा सारखा आहे व राष्ट्राचें स्वातंत्र्यसंपादनासाठीं व ते मिळाल्यानंतर त्याच्या रक्षणासाठीं झगडणें, मरणें हें आमचें कर्तव्य आहे" अशा शिकवणीवर आधारलेल्या राष्ट्र-धर्माचें शिक्षण दिल्यानेंच प्रत्येक मनुष्याचें, वर्गाचें व देशाचें कल्याण होणार आहे.

खेड्यांतील शिक्षणासाठीं अभ्यासक्रम कसा असावा याबद्दल शक्य तितक्या विस्तारानें चर्चा केली. तपशीलाच्या बाबतींत मतभेद होण्याचा संभव आहे. म्हणून सूत्ररूपानें बोलावयाचें झालें तर "खेड्यांतील शिक्षण ग्रामीणांच्या जीवनावर आधारलेलें, त्या जीवनाशीं समरस होणारें व त्या जीवनांत अधिक चैतन्याची, अधिक सुखाची भर घालणारें" असलें पाहिजे.†

---

†The idea that education in rural areas should bear a close relationship to the daily lives of the people is but the recognition of the truth that the environment in which rural workers live in different from that of the towns. It is essential to the happiness and efficiency of children in the villages that this up- bringing

(पुढील पानावर पाहा.)

खेड्यांत द्यावयाच्या अभ्यासक्रमांत केवळ फरक करून आपला हेतु साधणार नाहीं. तो अभ्यासक्रम ज्या शिक्षकांमार्फत अमलांत आणला जाणार आहे त्या शिक्षकांनाहि आपण योग्य तऱ्हेचें शिक्षण देऊन आपल्या हेतूप्रमाणें अभ्यासक्रमाचा उपयोग करण्यास समर्थ केलें पाहिजे व या दृष्टीनें खेड्यांतील शिक्षकालाहि आम्हीं शहरांतील शिक्षकापेक्षां निराळें शिक्षण देणें जरूर आहे. शहरांतील बेकारीमुळें शिक्षकाच्या धंद्यांत पडणाऱ्या भाडोत्री (hirelings)‡ शिक्षकाकडून कितीहि चांगला अभ्यासक्रम आखला तरी त्याची योग्य प्रकारची अम्मलबजावणी केली जाणार नाहीं. शिक्षकाच्या मनोवृत्तींत व त्याचप्रमाणें त्या शिक्षकाच्या दृष्टिकोनांत इष्ट असा फेरबदल होणें अत्यंत अगत्याचें आहे.§ खेड्यांतील जीवनाविषयीं जिव्हाळ्याचा आपलेपणा असलेला शिक्षकच या अभ्यासक्रमाचा योग्य उपयोग करूं शकेल यांत कांहीं शंका नाहीं.

शाळेची वेळः—याप्रमाणें अभ्यासक्रम आखल्यानंतर शाळा कोणत्या वेळीं भरवावी हा प्रश्न पुढें येतो. खेड्यांतील लोकांच्यासाठीं ज्या शाळा उघडण्यांत येतात या शाळा कोणत्या वेळीं रोज भरविण्यांत याव्यात व किती वेळ भरविण्यांत याव्यात हें ठरवितांना खेड्यांतील लोकांची सोय-गैरसोय पहाणें अत्यंत जरूर आहे; ही खेड्यांतील लोकांची सोयगैरसोय पाहून शाळेची वेळ ठरविण्याचें तत्त्व हंटर कमिशननें§ मान्य केलें असून हिंदुस्थानसरकारच्या शिक्षणविषयक अहवालांतहि या तत्त्वाचा उच्चार करून त्याला अनुमति देण्यांत आली आहे.*

---

should be in harmony with their environment, and to this end it is most desirable that every element in the education they receive in their village schools should draw—strength and inspiration from the life of the country side.

—शेतकी क. रि. पा. ५१३.

‡ Mahatma Gandhi, Harijan, 16–10–37.

§ But mere changes in formal curricula produce little result unless a corresponding change takes place in the attitude of the teacher and of the person who supervises and guides the teacher.

—Hartog C. R. p. 63.

§पा. १४७. *Progress of Education in India 1927-32 I P. I.145.

शेतकरी समाजाला आपल्या मुलांची रोजच्या कामांत नेहमीं मदत लागते. मुलगा किंवा मुलगी शाळेंत जाऊ लागली म्हणजे ते कामाला उपयोगीं पडत नाहींत व त्यामुळें शेतकरी पालक आपल्या मुलांना शाळेंत घालण्यास नाखूष असतो व मुलामुलींना शाळेंत घातलें तरी याच घरच्या कामांमुळें तीं शाळेंत नियमीतपणें हजर राहूं शकत नाहीं व त्यामुळें कामाच्या हंगामाचें दिवसांत निदान एक शिक्षकी शाळेंतील हजेरी पार घसरून अनेक वेळ ती शाळा बंद करण्याचाहि प्रसंग येतो.

आमच्या मतें खेड्यांतील शाळा सकाळीं ७ ते ११ वाजेपर्यंत भरविण्यांत यावी. परंतु पहिल्या तीन निदान दोन इयत्तांतील मुलांना फक्त तीन तासच शाळेंत ठेवावें. आज अनेक ठिकाणीं लहान मुलांना वाजवीपेक्षां जास्त वेळ विनाकारण डांबून ठेवण्यांत येतें व त्यामुळें त्यांच्या मनावर व प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होतो. दुपारीं ११ वाजल्यापासून ६ वाजेपर्यंतची शाळेची हल्लींची पद्धत, आपल्या रहाणीच्या व जेवण्याच्या पद्धतीप्रमाणें आरोग्यास विघातक आहे व ही गोष्ट डॉ. व्ही. बी. गोखले, पुणें यांनीं अनेक पत्रकें काढून सप्रमाण सिद्ध केली आहे. सकाळची शाळा केल्यास दुपारची वेळ मुलांना हस्तव्यवसाय, उद्योगधंदे वगैरे श्रमाचीं कामें शिकविण्यासाठीं उपयोगीं पडेल किंवा मुलांना पालकांच्या हाताखालीं शेतांत कामाला जातां येईल. सकाळीं शाळा केल्यानंतर त्यांपैकीं शक्य तितका थोडा वेळ वाङ्मयी शिक्षणाकरितां खर्च करून बाकीचा वेळ आरोग्यविषयक शिक्षण देण्यासाठीं, खेळण्यासाठीं, कवायतीसाठीं व हस्तव्यवसायासाठीं खर्च करतां येईल. कामाच्या दिवसांत गांवकमिटीच्या विचारानें संध्याकाळीं शाळा भरविण्यासहि हरकत नाहीं. मात्र संध्याकाळच्या वेळीं दमून आलेल्या मुलांना कंटाळवाणें न होणारें व अधिक शीण न देणारें शिक्षण देण्यांत यावें.

२ क्रमिक पुस्तकें.

अभ्यासक्रमाचा विचार केल्यानंतर क्रमिक पुस्तकांचा विचार करणें क्रमप्राप्तच होतें. खेडयांतील जीवनास उत्तेजक असा अभ्यासक्रम तयार केल्यानंतर, त्या अभ्यासक्रमाच्या हेतूस अनुकूल अशीं क्रमिक पुस्तकेंहि तयार करणें जरूर आहे.

आज खेडयांतील मुलांच्या हातांत जीं पुस्तकें देण्यांत येतात त्यांपैकीं बहुतेक सर्व शहरांतील व विशेषतः पुढारलेल्या वर्गाच्या जीवनावर आधारलेलीं

दिसून येतात. भाजीभाकरी नित्य खाणाऱ्या मुलांनाः मुरलीधर * पुरी व दुधाची वाटी मागूं लागला कीं, त्याचा हेवा वाटूं लागतो. 'दादाचा वाढदिवस' § खेड्यांत कधीं साजरा होण्याचा प्रसंगच येत नाहीं. त्याचप्रमाणें खेड्यांतील लोकांची जत्रेला जाण्याची प्रवृत्ति कमी करणें जरूर आहे. खंडोबा, बहिरोबा यांच्या जत्रांसाठीं खेड्यांतील लोकांचा वेळ व वित्त खर्च होत असतांना त्यांना पुन्हां निर्मळच्या ¶ जत्रेचें वर्णन सांगून जत्रेपासून होणाऱ्या फायद्यांची यादी देणें योग्य नाहीं. हत्तींची वाटणी करणाऱ्या प्रधानाचें चातुर्य, हत्ती न पहाणाऱ्या मुलांना सांगण्यापेक्षां गांवांत नेहमीं उत्पन्न होणाऱ्या शेताच्या, जनावरांच्या वांटणीच्या प्रश्नाबाबत चातुर्य दाखविणाऱ्या एखाद्या गांवपंचाचा ‡ धडा अधिक उपयोगी नाहीं का होणार ? त्याचप्रमाणें एकमेकांच्या सहकार्यानें चोरी करणाऱ्या काळ्यापिवळ्याचा गोष्ट न सांगतां शेतींतील सहकार्याची एखादी चांगली गोष्ट सांगण्यास काय हरकत आहे ?

क्रमिक पुस्तकांतील असे अनेक धडे दाखवितां येतील कीं, ज्या धड्यांचा खेड्यांतील जीवनाशीं स्वप्नांतहि संबंध येत नाहीं. हल्लींच्या क्रमिक पुस्तकांत कांहीं चांगले धडेहि आहेत हें येथें नमूद करणें अगत्याचें आहे. अशा धड्यांपैकीं 'दोन † बिया,' 'घराची § स्वच्छता,' 'रस्त्यांतील + रहदारीचे नियम,' 'अन्नाची × जरुरी व त्याचे प्रकार' 'लोक ÷ भ्रम' 'अफूच्या सेवनापासून S घडणारे दुष्परिणाम,' 'पाणी व दूध हीं कां आणि कशीं △ स्वच्छ ठेवावीं' यांचा प्रामुख्यानें निर्देश करावयास हरकत नाहीं.

हल्लींच्या क्रमिक पुस्तकांपैकीं वाचना-(Reading) साठीं असलेल्या पुस्तकांत 'सामान्य विषय,' 'भूगोल वर्णन,' 'सृष्टिज्ञान व पदार्थवर्णन' असे सामान्यतः तीन भाग पाडलेले आहेत. चौथ्या पुस्तकापासून पुढील पुस्तकांत 'इतिहास' या विषयास एक स्वतंत्र दालन दिलें आहे. या भागांपैकीं भूगोल व सृष्टिज्ञान व पदार्थवर्णन या सदरांत हल्लीं दिलेले कांहीं धडे अतिशय चांगले असून त्यांच्यांत दिलेली माहिती शेतकरी वर्गाला खात्रीनें

---

*बालपुस्तक धडा ४. §बालपुस्तक धडा ९. ‡पुस्तक दुसरें धडा ४.
¶पुस्तक दुसरें धडा ६. †बालपुस्तक धडा १७, १८. §पु. २रें ध. ३५.
+पुस्तक २रें धडा ३६. ×पु. ४ थें.धडा ५. ÷पु ४ थे धडा १२, १३.
Sपुस्तक ४ थें धडा २८. △पुस्तक ४ थें धडा ४५.

उपयोगी ठरेल. मराठी चौथीपर्यंतच्या मुलांना या पुस्तकांत भूगोलविषयक दिलेली माहिती पुरेशी आहे. याचे जोडीला त्यांना त्यांच्या तालुक्याची ठोकळ माहिती दिली म्हणजे झालें.

परंतु आज प्रत्यक्ष शाळेंत जे धडे शिकविण्यांत येतात त्यांच्याकडे पाहिलें म्हणजे 'सामान्य विषय' या विभागांत येणाऱ्या कांहीं धड्यांपलीकडे मजलच जात नाहीं. दुसऱ्या व तिसऱ्या विभागांतील धडयांपैकीं बहुतेक एका धडयालाही हात लागत नाहीं. म्हणजे खरें उपयोगी धडे न शिकवितां काळ्यापिऱ्या व बादशहा आणि बिरबल यांच्या गोष्टींतच सगळा वेळ जातो. या पद्धतीला आळा बसणें जरूर आहे.

क्रमिक पुस्तकांच्या बाबतींत खालील सूचना करता येण्यासारख्या आहेत.

(अ) **शहरांतील मुलांसाठीं व खेड्यांतील मुलांसाठीं निरनिराळीं क्रमिक पुस्तकें तयार करण्यांत यावींत.** खेडयांसाठीं तयार करावयाच्या पुस्तकांत खेडयांत नित्य घडणाऱ्या गोष्टींचा आधार घेऊन उपयुक्त माहिती देण्याचें धोरण आखणें जरूर आहे. हें धोरण हंटर कमिशननें मान्य केलें असून त्यावर विशेष भरहि दिला आहे.‡ त्याचप्रमाणें हंटर कमिशननें नेमलेल्या मुंबई प्रांतिक कमेटीनेंहि या प्रश्नाला महत्त्व देऊन उपयुक्त सूचना केल्या. या सूचनांचा निर्देश करून हंटर कमिशननेंहि सरकारकडे या बाबतींत महत्त्वाची शिफारस केली.§

---

‡ It is urged that text books intended for primary schools should be specially prepared so as to supply the Indian ryat with such information as will be useful to him in his ordinary occupations and that they should be periodically revised with that objects. The matter is one of great importance." p. 146.

§ They (Provincial Committee) go on to recommend that short lessons, illustrative of actual events that have occured in the rural life of a peasant should be incorporated in the text-books.....The suggestion is one that deserves the consideration of every Local Government,.....There seem to be no doubt that village school would be much more effective of good to the masses of the people, if the text books looked more habitually to their daily life and wants. p. 147.

हंटर कमिशननें ही सूचना करून अर्ध शतक लोटलें तरी खेडयाच्या दृष्टीनें योग्य पुस्तकें तयार झालीं नाहींत, याचें कारण हीं क्रमिक पुस्तकें मंजूर करणाऱ्या कमिटीमध्यें शहरी जीवनाच्या चहात्यांचाच सगळा भरणा आहे हें होय. ज्यांना खेडयांतील जनतेचीं दुःखें माहीत नाहींत, ज्यांना रताळी जमीनींत येतात का झाडाला लागतात याची कल्पना नाहीं, ज्यांना शेतकरी रोज काय खातो, कसा रहातो, कशावर झोंपतो याचें अनुभवाचें ज्ञान नाहीं, ज्यांची सारी हयात शहरांत गेली आहे, अशा लोकांना शेतकऱ्यांच्या मुलांसाठीं लागणाऱ्या क्रमिक पुस्तकांत कोणते धडे असावेत याची कल्पना कशी येणार ? तलाठी याचीं कर्तव्यें कोणतीं आहेत, हक्कनोंदणीच्या उताऱ्यासाठीं त्यानें जादा पैसे मागणें बेकायदेशीर आहे, सरकारी अधिकारी हा शेतकऱ्याची सरबराई खाण्याकरतां—शेतकऱ्यांना दबविण्याकरितां—नेमला नसून जनतेची सेवा करण्यासाठीं नेमला आहे, पंचायतीचे अधिकार व तीपासून फायदे, सहकारी सोसायटी व तिच्यापासून होणारे फायदे-तोटे, लग्नासाठीं किंवा दिवसासाठीं जास्त खर्च करण्यामुळें होणारें भयंकर नुकसान, बालविवाहापासून होणारें नुकसान, वगैरे अनेक बाबींबद्दल उपयुक्त माहिती देऊन धडे तयार करणें जरूर आहे. व अशा तऱ्हेचे धडे तयार करतांना उपमा, अलंकार, दृष्टान्त, उदाहरणें खेडयांतील लोकांच्या परिचयाचीं असणें जरूर आहे. खेडयांतील मुलांसाठीं धडे कसे असावेत याची कल्पना असलेले लोक क्रमिक पुस्तकें मंजूर करणाऱ्या कमिटीवर असणेहि जरूर आहे. नुसते शहरी-छाप तज्ज्ञ गोळा करून हा प्रश्न सोडवितां येणार नाहीं ! तरी या कमिटीची लवकर पुनर्घटना करून खेडयांसाठीं योग्य अशीं क्रमिक पुस्तकें व इतर शालोपयोगी वाङ्मय निर्माण करण्याचा प्रश्न सरकारनें ताबडतोब हातीं घ्यावा.

(२) खेडयांतील शाळांसाठीं कशीं पुस्तकें असावींत याचा विचार केल्यानंतर तीं कोणीं प्रसिद्ध करावींत या प्रश्नाचा विचार करावा लागेल. हल्लीं वाचनाचीं पुस्तकें (Readers) हीं सरकारच्या शिक्षणखात्यामार्फत प्रसिद्ध करण्यांत येत असतात. बाकीच्या इतिहास, भूगोल, अंकगणित, बीजगणित, भूमिती, व्याकरण वगैरे विषयांची पुस्तकें निरनिराळ्या व्यक्ति व खाजगी संस्था प्रसिद्ध करीत असतात.

शाळेंतील अभ्यासक्रमांत समाविष्ट झालेल्या अनेक विषयांवर निरनिराळ्या लेखकांच्या पुस्तकांचें हल्लीं फारच भरमसाट असें पीक आलेलें आहे. खाजगी

फायद्याच्या आशेनें हीं पुस्तकें तयार करण्यांत येतात व निरनिराळ्या स्कूल-बोर्डांनीं तीं आपल्या क्षेत्रांत लागू करावीं म्हणून वशिलेबाजीला सुरवात होते. आपलें पुस्तक मुरू करण्यांत यावें म्हणून 'थोडाफार खर्च' आला तरी तो करण्याची लेखकांची व प्रकाशकांची तयारी असते. या प्रकारामुळें स्कूल-बोर्डाच्या सभासदांची नीतीमत्ता बिघडते व बिघडविण्यांत येते. क्रमिक पुस्तकें लावण्याच्या बाबतींत थेट विश्वविद्यालयांतील पंडितापासून ते स्कूल-बोर्डाच्या अडाणी अशिक्षित सभासदांपर्यंत अनेक लोक मोहाला बळी पडतात, असें म्हणावयास हरकत नाहीं.

क्रमिक पुस्तकांचा सुळसुळाट झाल्यामुळें वशिलेबाजीला व लाच खाण्याला पूर आला आहे व त्यामुळें वरचेवर क्रमिक पुस्तकें बदलण्यांत येतात. दहा मैलाला भाषा बदलते असें म्हणतात त्याचप्रमाणें हल्लीं शाळेशाळेला क्रमिक पुस्तकें भिन्न भिन्न असलेलीं दिसून येतात. इतकेंच नव्हे तर एकाच शाळेंत दरवर्षाकरितां नवीन क्रमिक पुस्तक असल्याचें अनुभवाला येतें.

या एकंदर प्रकारामुळें शहरांतील श्रीमंत पालकहि जेरीस येतो मग खेड्यां-तील गरीबांचें काय होत असेल याची कल्पनाच करावी ! आधीं भाराभार क्रमिक पुस्तकें व तींही, उथळ पुढाऱ्यांच्या मताप्रमाणें, नेहमीं बदलणारीं. त्यामुळें मुलगा एका शाळेंतून दुसऱ्या शाळेंत गेला कीं नवीन पुस्तकें त्याला लागतात. वडील मुलगा वरच्या इयत्तेंत गेला कीं त्याचीं पुस्तकें त्याच्या धाकट्या भावाला उपयोगीं पडत नाहींत. नापास होऊन त्याच इयत्तेंत रहाणाऱ्या मुलांनाहि अनेक वेळ नवीन पुस्तकें घ्यावीं लागतात. त्यामुळें मुलांची कुचंबणा होते.

क्रमिक पुस्तकें लावतांना पुस्तकाच्या उपयुक्ततेकडे लक्ष न देतां वशिले-बाजीमुळें जातीय भावना बळकट होते. ब्राह्मणांच्या हातांत सत्ता असली तर ब्राह्मण लेखकांचीं पुस्तकें सुरू होतात व ब्राह्मणेतरांच्या हातांत अधिकार असला तर ब्राह्मणेतरांचीं पुस्तकें मंजूर होतात. या अडचणीला तोंड देण्या-साठीं ब्राह्मण-ब्राह्मणेतर अशी लेखक-युग्में आतां तयार होऊं लागलीं आहेत. ब्राह्मणाकडे जातांना ब्राह्मण लेखकाचें नांव घ्यावयाचें व ब्राह्मणेतराकडे जातांना ब्राह्मणेतर लेखकांनें आपल्या जातीची जादु टाकावयाची !

या सर्व प्रकाराला आळा घालण्यासाठीं **सरकारनें क्रमिक पुस्तकें थोडीं पण चांगलीं तयार करून तीं स्वतः प्रसिद्ध करावींत** अशी आमची

सूचना आहे. हीं पुस्तकें तयार करतांना ज्यांच्याकडून चांगल्या सूचना येतील त्यांना योग्य तो मोबदलाहि द्यावा, परंतु पुस्तक प्रसिद्ध सरकारनेंच करावें. थोडीं पुस्तकें असलीं म्हणजे पालकांना खर्च कमी येईल. सरकारनें पुस्तक मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध केल्यास त्याला अधिक स्वस्त किंमतीला पुस्तकें देतां येतील व स्वस्त पुस्तकें देऊनहि जी किफायत राहील त्यामुळें शिक्षणावरील होणाऱ्या खर्चास मदत होईल. सर्वच शाळांमध्यें एकच पुस्तक असलें म्हणजे मुलांची व पालकांची, पुस्तक बदलल्यानें जी बौद्धिक व आर्थिक कुचंबणा होते तीही थांबेल, सभासदाच्या मनाला मोह पडणारें एक कारण नाहींसें होईल व वशीलेबाजी नाहींशी होऊन जातीय भावनेला आळा बसेल.

यदाकदाचित् सरकारला ही प्रसिद्धीची बाब आपल्या हातांत घेतां न आल्यास एका भाषेच्या अनेक स्कूल बोर्डांना आपसांत सहकार्य करून या सूचनेचा अवलंब करतां येणें शक्य आहे. व या प्रसिद्धीकरणासाठीं प्रत्येक स्कूल बोर्डाच्या शिक्षण–अधिकाऱ्यांचाहि फार उपयोग होईल व ही एक किफायतीचें सदर होईल.

या सूचनेप्रमाणें कांहीं खाजगी व्यक्तींचें नुकसान होईल याची आम्हांस जाणीव आहे. कांहीं आमच्या परिचयाच्या लेखकांचीं पुस्तकेंहि फार चांगलीं आहेत, हेंहि येथें कबूल करणें जरूर आहे. परंतु फायद्याच्या आशेनें जो उठतो तो पुस्तकें लिहूं लागतो व तीं सुरू करण्यासाठीं वाममार्गाचाहि अवलंब करतो; या प्रकाराला आळा बसणें जरूर आहे. सामुदायिक हिताचा विचार करतांना खाजगी व्यक्तीच्या वैयक्तिक नफानुकसानीचा विचार करून उपयोग नाहीं.

आतांपर्यंत खेडयांतील शाळांच्या दृष्टीनें निरनिराळ्या महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार केला. या प्रश्नाकडे जितकें लक्ष पुरवावयास पाहिजे होतें तितकें तें अद्यापपर्यंत पुरविण्यांत न आल्यामुळें, खेडुतांची सर्वतोपरी कुचंबणा होत असून शिकलेल्या मुलांना खेडयांतील गोष्टींचा तिटकारा वाटू लागला असून त्यांना शहरीवळणाची चटक लागूं लागली आहे. हा दोष घालविण्यासाठीं काय करावयास पाहिजे याच्यावर चर्चा केली आहे. शहरांतील शाळांतील अभ्यासक्रमहि बदलणें अत्यंत जरूर आहे. शहरांतील मुलांनाहि वाङ्मयी शिक्षण अधिक न देतां त्यांनाहि धंदेशिक्षण व इतर हस्तव्यवसाय अधिक प्रमाणांत शिकविणें जरूर आहे. शहरांतील हल्लींच्या शिक्षणामुळें मनाची उन्नति होते असें म्हटलें तरी शरीराची आबळ होते. त्याला

शारीरिक कष्ट करण्याचा कंटाळा येतो. व मीपणा वाढूं लागतो. हल्लींच्या शिक्षणपद्धतीचे दोष कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं, आपल्या आतांपर्यंत सरकारच्या रोषास पात्र झालेल्या, आमच्या देशाची स्थिति या ओजस्वी निबंधांत स्पष्टपणें दाखविले आहेत. त्या निबंधांतील खालील उतारे वाचनीय वाटतील.

" आमची अलीकडील विद्वत्ता म्हणून जी आम्ही येवढ्या डौलानें मिरवितों ती वस्तुतः पाहतां पाश्चात्य विद्येचा एक रजःकण आहे; तींत आमचें स्वतःचें बहुधा कांहींच नाहीं व आहे तेंहि प्रायः शब्दज्ञानात्मकच आहे. उद्यां जर आमचें सरकार आम्हांस सोडून गेलें तर तिला कोणी दीडदमडीलाही विचारील कीं नाहीं कोण जाणें ! इंग्रज लोक जर एकदम आमच्या देशांतून अंतर्धान पावले तर आमच्या बडय़ा विद्वानात कोणी रेल्वे एंजिन करणारा मिळेल किंवा तारायंत्र जुळवून देणारा मिळेल याची वानवाच वाटते ! त्याच-प्रमाणें शेकडों प्रकारचे कारागीर जे आमच्या देशांत आज शेंकडों वर्षें नांदत आले ते अलीकडे एकामागून एक जे नाहींसे होत गेले व चालले आहेत ते तरी पुनः उत्पन्न व्हावयाचे म्हणजे केवढी दुरापास्त गोष्ट आहे ! सारांश, जसा एखादा आयदोजी असतो व त्याला पाटावर बसवून ठेवून त्याचें सर्व कामकाज दुसऱ्यांनीं करावें, त्यासारखी आमची स्थिति दिवसेंदिवस होऊं पहात आहे. असें होतां होतां लवकरच काडीचाहि वकूब नाहीं असे आम्ही नादान होऊन जातों कीं काय कोण जाणें ! " " आमच्या देशांत अलीकडे विद्येचा फैलाव थोडा झाला आहे असें नाहीं; पण या विद्येच्या योगानें जें वास्तविक ज्ञान निष्पन्न व्हावें व जी मनाची थोरवी वाढावी त्यांतलें अजून कांहींच दृष्टीस पडूं लागलें नाहीं असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांतून इंग्रजी विद्या ही तर वस्तुतः पाहतां वाघिणीसारखी आहे; तिच्या दुधावर जो पोसला तो लेंचापेंचा कधींच निपजूं नये. उत्साह, धैर्य, अश्लाघ्यकर्मांचा तिरस्कार, स्वावलंबन इत्यादि उदात्त गुण वरील भाषेंतील ग्रंथांच्या अध्ययनापासून होणारे आहेत. पण आजपर्यंतच्या तऱ्हेवाईक शिक्षणपद्धतीनें म्हणा, अगर तितका संस्कार आमच्या ठायीं बिंबला नसल्यामुळें म्हणा, वरील गुणांचा उदय अद्याप तर कांहींच झालेला दिसत नाहीं. जिकडे पहावें तिकडे 'हांजी,' जी हां,' 'खुदावंत,' 'खावंद,' हाच श्ववृत्तीचा प्रकार दिसून येतो. यःकश्चित् मराठी कारकुनापासून तों म्युनिसिपल कमिशनर, कौन्सिलर,

दिवाणसाहेब, यांच्यापर्यंत एक मासला;— खावंदचरणारविंदी मिलिंदायमान होणारी सारी मिंधी मंडळी! बाकी सभेंत उभें राहून नुसतें मुखपांडित्य करायाला सांगा, त्यांत ज्याची त्याची तयारी; यंव करावें त्यंव करावें; चुटक्यांच्या मांडवाला किती उशीर! पण अंग मोडून मेहनत करण्याची पाळी येऊं द्या; किंवा पदरचा एकादा पैसा खर्च करण्याची मात्र वेळ यावी म्हणजे इसाबनीतींतील सांबराची अवस्था! कुत्र्याचा शब्द कांनीं पडतांच वरील सांबराची जशी गाळण व्हावयाची, त्याचप्रमाणें वरील अवसान घातकी वीरांचा आव!"

वरील उताऱ्यांत वर्णन केलेली परिस्थिति आजहो पहावयास मिळत नाहीं का? ही शोचनीय परावलंबी स्थिति नाहींशी होऊन शरीरानें व मनानें खंबीर, स्वावलंबी व स्वतःचें पोट भरण्यास समर्थ असे नागरीक तयार करावयाचे असतील, तर शहरांतील सर्वच अभ्यासक्रम आमूलाग्र बदलून त्यांत वाङ्मयापेक्षां उद्यमाला अधिक मानाचें स्थान देणें जरूर आहे. आजच्या शिक्षणामुळें शहर व खेडीं यांत एकमेकांविषयींच्या अविश्वासाचा पडदा उत्पन्न झाला आहे. तो पडदा नाहींसा करून त्यांच्यातील परकेपणाच्या जागीं स्नेहाचे, सहानुभूतीचे संबंध निर्माण करण्यासाठीं, शहरांतील अभ्यासक्रमहि ग्रामीण जीवनाला पोषकच असला पाहिजे व अशा तऱ्हेच्या नवीन व उत्तम फलदायी अशा अभ्यासक्रमाचा ओनामा प्राथमिक शाळेंतच केला पाहिजे.

परीक्षा—प्राथमिक शाळेंतील पहिल्या तीन इयत्तांमधील परीक्षा लखी न घेतां तोंडीच चांचणीच्या स्वरूपाची असावी. ही परीक्षा घेतांना मुलांना काय समजलें आहे हें पहावें. परीक्षेचें हें धोरण ठेवलें नाहीं तर केवळ पास होण्याच्या हेतूनें मुलांकडून, विषयाची उमज झाली किंवा नाहीं याचा विचार न करतां, घोकंपट्टी करून घेण्याकडे प्रवृत्ति होते. तीन इयत्ता झाल्यानंतर मग मुलांची कांहीं विषयांची लेखी व कांहीं विषयांची तोंडी परीक्षा घेण्यांत याव्यात. परीक्षेला हल्लीं जें यांत्रिक स्वरूप आलें आहे तें मात्र नाहींसें होणें अत्यंत जरूर आहे.

या विषयाची चर्चा बरीच लांबली असल्यामुळें लेखणी येथेंच थांबविणें उचित आहे!

प्रकरण सहावें

प्रौढांचें शिक्षण

"The sleepiness of the country–life is proverbial. When an inquiry was made as to the amount of interest taken by the inhabitants of one village in public affairs, one of them replied—apparently considering it an adequate answer—'Oxfordshire is an agricultural country!' Must agricultural district be inevitably sleepy? And is this sleepiness the cause or the effect of the nature of the industry? That the two usually do, though they need not necessarily, interact upon each other is the conclusion arrived at from a study of past and present conditions in the country."

—Rural Education, p. 165.

Our discussion of the system of primary education in India would be incomplete without an examination of the possibilities of attacking the immense problem of rural illiteracy by the short cut of instructing the adult cultivator. It is clear that while a universal system of rural education for children is obviously indispensable for the future, it cannot affect the present situation, and if it is not to be supplemented by a determined effort to spread adult education, many of the improvements in agriculture which we so earnestly desire to see must be postponed until a new generation has sprung up fitted by early tuition to reap the advantages we seek to place within their reach.

—Agricultural Commission Report, p. 529.

आपण आतांपर्यंत शाळेंत जाण्यास लायक असलेल्या मुलांमुलींच्या शिक्षणाचा विचार केला. परंतु देशांत साक्षरतेचा लवकर व अधिक प्रमाणावर प्रसार करावयाचा असेल तर केवळ लहान मुलांच्या शिक्षणाचाच विचार करून भागणार नाहीं. आपणास शक्य तितक्या लवकर व अनेक उपायांची योजना करून प्रौढांनाहि शिक्षण देण्याची तजवीज करावयास पाहिजे इतकेंच नव्हे, तर पालकांना शिकविल्यावांचून मुलांच्या शिक्षणाचें

पाऊल झपाट्यानें व इष्ट दिशेनें पुढें पडणें शक्य नाहीं. बागेचें सौंदर्य वाढविण्यासाठीं नुसत्या लहान रोपांचीच काळजी करून भागत नाहीं तर वाढलेल्या झाडांचीहि कापणी, खुरपणी करून त्यांनाहि व्यवस्थित रूप द्यावें लागतें.

प्रौढांच्या शिक्षणाचा विचार करतांना आपणांस त्यांत **निरक्षर प्रौढांचें शिक्षण व 'साक्षर प्रौढांचें शिक्षण'** असे पोटविभाग पाडावे लागतील.

निरक्षर प्रौढांचें शिक्षण:—निरक्षर जे प्रौढ लोक आहेत त्यांना शिक्षण देणें जरूर आहे. त्यांना शिक्षण दिल्यावांचून देशाची प्रगति लवकर होणार नाहीं, हें आपण पाहिलें आहेच. परंतु या वर्गाला शिक्षण देणें हें बरेंच विकट कार्य आहे. "पांच वर्षांच्या वर ज्यांचें वय आहे असे दहा लोक घेतले तर त्यांत नऊ लोक निरक्षर निघतात. या आपल्या प्रांतांतील १९ वर्षांच्या वरील वयाच्या लोकांची संख्या १०४६७१५० असून त्यांत निरक्षर लोक ९३०९९६८ म्हणजे शेंकडा ८९ आहेत. निरक्षर स्त्रीपुरुषांचें प्रमाण अनुक्रमें शें. ९८·२, व शें. ९०·२ इतकें आहे."*

निरक्षर प्रौढांची ही येवढी प्रचंड संख्या असतांहि त्यांना शिक्षण देण्यासाठीं—साक्षर करण्यासाठीं—केलेले प्रयत्न किती अल्प आहेत याची कल्पना यावी म्हणून खालीं प्रौढांच्या शिक्षणाच्या प्राथमिक संस्था व त्यांतील विद्यार्थ्यांची संख्या, यांचे आंकडे दिले आहेत. या संस्थांची व विद्यार्थ्यांची संख्या वाढण्याच्या ऐवजीं कशी घटत आहे हें दाखविण्यासाठी १९२१-२२ सालापासून निरनिराळ्या सालचे आंकडे दिले आहेत.

तक्ता नं. ३४

साल	संस्था	विद्यार्थी	साल	संस्था	विद्यार्थी
१९२१–२२	१६८	५२६९	१९३१–३२	१७६	६३३८
१९२६–२७	१९१	६४६९	१९३५–३६	११३	४१९३

* मुं. प्र. नि. (२७–३२) पा. २४३

या अशा प्रयत्नानें सर्व प्रौढ साक्षर होतील अशी अपेक्षा करणें म्हणजे टिटवीच्या चोचींनें समुद्र कोरडा होईल अशी अपेक्षा करण्यासारखेंच आहे!

निरक्षर प्रौढांना साक्षर करण्यासाठीं जास्त निकडीचे, अधिक चिकाटीचे व प्रचंड प्रमाणावर प्रयत्न होणें अत्यंत जरूर आहे. त्या बाबतींत खालीं कांहीं सूचना केल्या आहेत.

(१) **सक्तीचें तत्त्व**:--आतांपर्यंत प्रौढशिक्षणाचे जे प्रयत्न झाले ते ऐच्छिक तत्त्वावरच झाले. एखाद्या गांवांत रात्रीची शाळा खाजगी किंवा बोर्डाची काढण्यांत यावी व प्रौढ लोक शाळेंत येतील म्हणून त्यांची वाट पहात बसावें, असा प्रकार आतांपर्यंत चालू आहे. मुलांच्या शिक्षणाचें महत्त्व ज्यांना समजलें नाहीं असे पालक स्वतः शाळेंत कशाला येतील? प्रौढांच्या शिक्षणाविषयीच्या उदासीनतेमुळें कांहीं दिवस रात्रीं तेल जाळून तें तेल व शाळा काढणाराची आरंभींची उमेद संपुष्टांत येऊन शाळा लवकरच बंद पडते. रात्रींच्या शाळांबद्दल आपलेकडील प्रौढच उदासीन आहेत असें नाहीं. उत्तम शिक्षणाचा जेथें पुष्कळ प्रसार झाला आहे अशा इंग्लंडसारख्या देशांतहि आपणांस तोच प्रकार आढळून येतो.¶ लोकांच्या मर्जीवर शिक्षण घेणें सोपविल्यास गेल्या हजार वर्षांप्रमाणें पुढील हजार वर्षांतहि आपले हेतु सफल होणार नाहींत. लोकांचें अज्ञान ही राज्यकर्त्यांच्या, देशाच्या प्रगतीच्या मार्गांतील अडचण आहे व ही अडचण सक्तीनेंच दूर करणें जरूर आहे. इंग्लंडमध्यें निरक्षर असलेले प्रौढ मुळींच दिसत नाहींत. तिकडे प्राथमिक शाळांतून शिकून बाहेर पडलेल्या मुलांसाठीं प्राथमिक शिक्षण न विसरण्यासाठीं सायंकाळच्या शाळा (Evening Schools) आहेत. परंतु प्राथमिक शाळेंतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेले तरुणहि या सायंकाळच्या शाळांमध्यें येण्यास नाखुष असत. त्यामुळें या अशा तरुणांनीं सायंकाळच्या शाळांत अधिक प्रमाणांत येण्यासाठीं काय करावें याचा विचार करून सूचना करण्याबद्दल 'बोर्ड ऑफ एज्युकेशन'नें सन १९०७ सालीं सल्लागार-समिती-(Consultative Committee) ला विनंती केली व त्या विनंतीला मान देऊन सल्लागार-समितीनें या प्रश्नाबाबत, जर्मनी व स्वित्झलंड येथील प्रौढांच्या शिक्षणाची पहाणी करून, आपला विस्तृत अहवाल तयार केला. त्यांत प्रौढमुलांना दिवसाच्या व सायं-

¶ Rural Education, p. 163. ऑकलंड क रि. पा. १८७.

काळच्या शाळांत येण्याबद्दल सक्ती करावी, अशी शिफारस केली.* तिकडे प्रौढांना शिक्षण देण्यासाठीं दिवसाच्या व सायंकाळच्या अशा दोन प्रकारच्या शाळा आहेत व दिवसाच्या शाळेंत जाण्याबद्दल सक्ती करण्याचा अधिकार स्थानिक-संस्थांना देण्याची तरतूदहि १९२१ च्या शिक्षणाच्या कायद्याचें कलम ७६ ते ७८ नें करण्यात आली आहे.

शिकलेल्या प्रौढांवर सक्ती करणाऱ्या इंग्लंड देशाचें अनुकरण आपणांस निरक्षर प्रौढांच्या शिक्षणाच्या बाबतींत करण्यास हरकत नाहीं. पंधरा वर्षांच्या पुढील व चाळीस वर्षांच्या आंतील सर्व पुरुषांच्यावर रात्रीच्या शाळेंत हजर रहाण्याबद्दल सक्ती करण्यांत यावी. इंग्लंडमध्यें दर आठवड्यास निदान सहा तास प्रत्येकानें सायंकाळच्या शाळेंत गेलें पाहिजे असा नियम आहे.† आपणांकडेही असाच नियम करावयास हरकत नाहीं. पुरुषांप्रमाणें स्त्रियांसहि हा नियम लागू करण्यांत यावा.

साक्षर प्रौढांचें शिक्षणः—प्राथमिक शाळांतील मुलांना सक्तीचें तत्त्व लागू केल्यानंतर कमींत कमी पांच वर्षें त्यांना शिक्षण द्यावें लागेल. महात्मा गांधी यांच्या सूचनेप्रमाणें इंग्रजी भाषेखेरीज मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण हें किमान प्राथमिक शिक्षण ठरल्यास प्रत्येक मुलाला निदान दहा वर्षें शाळेंत सक्तीनें शिक्षण द्यावें लागेल. वर्धा शिक्षण-परिषदेनें किमान ७ वर्षांचा शिक्षणक्रम असावा असा ठराव केला आहे. पांच वर्षें पुरीं झाल्यानंतर मुलांच्या शिक्षणकालास सुरवात झाली तर पांच वर्षांचा अभ्यासक्रम आखल्यास तो दहा वर्षें पुरीं होईपर्यंत शाळेंत राहील व वर्धा परिषदेच्या योजनेप्रमाणें तो १२ वर्षें पुरीं होईपर्यंत शिक्षण घेईल. पांच वर्षांच्या शिक्षणक्रमानें जो साक्षरता प्राप्त होते ती फारशी टिकाऊ नसते. तो शिक्षणक्रम पुरा झाल्यानंतर मुलानें जर लेखन-वाचन विशेष केलें नाहीं तर तो मुलगा ५ वर्षांच्या अखेरीस **निरक्षरासारखाच** होतो असा तज्ज्ञ मंडळींचा अभिप्राय आहे. त्यामुळें अशा मुलांनाहि प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम झाल्यानंतर तें शिक्षण जिवंत ठेवण्यासाठीं कांहीं पुढें शिक्षण देणें जरूर आहे व पाश्चिमात्य देशांत हें असें शिक्षण देण्यासाठीं पुढील शिक्षणाच्या शाळा (Continuation school) जन्माला आल्या आहेत. या शाळांचे दोन प्रकार आहेत. एक दिवसाची शाळा (Day school) व दुसरी सायंकाळची शाळा (Evening school). ज्यांना कांहीं उद्योगधंदा

---

* ऑकलंड क. रि. पा. १६०–२३७. † मालकम क. रि. पा. २८

नाहीं अशा प्रौढांना दिवसाच्या शाळेंत जावें लागतें व ज्यांना दिवसा कांहीं रोजगार करावा लागतो अशांना सायंकाळच्या शाळेंत जावें लागतें. आपल्याकडेहि याप्रमाणें योजना करणें जरूर आहे. **निरक्षर प्रौढांप्रमाणें साक्षर प्रौढांनाहि सक्तीचें तत्त्व लागू करण्यांत यावें.** मात्र शिक्षणाचा काल दर आठवड्याला निरक्षर प्रौढांसाठीं नियोजित केलेल्या कालापेक्षां कमी असावा. तसेंच शेतकीच्या कामाच्या दिवसांत हे वर्ग बंद करण्यांत यावेत व ज्या दिवसांत शेतकरी मोकळा असतो अशा दिवसांत शेतकरी वर्गाला अधिक काळ शिक्षणासाठीं खर्च करण्यास भाग पाडण्यांत यावें. पंचवीस वर्षांच्या पुढील मानसाला दरसाल निदान ६० तास त्याने शिक्षण घेतलेंच पाहिजे असाहि नियमाचा निर्बंध घालावा, म्हणजे त्याची विशेष गैरसोय न होतां त्याला किमान काल शिक्षणासाठीं खर्च करतां येईल.

याप्रमाणें **प्रौढांच्या शाळेंत हजर राहून शिक्षण न घेणाऱ्या प्रौढांस शासन करण्याची कायद्यामध्यें तजवीज करण्यांत यावी.** हल्लीं आपल्या अंगणांत सार्वजनिक आरोग्याला विघातक होणारी घाण साचूं देणाराला शासन करण्यांत येतें. परंतु सार्वजनिक प्रगतीला बाधक होणारें घोर अज्ञान डोक्यांत पिढ्यान पिढ्या सांचूं देणाराला शिक्षा करण्यांत येत नाहीं. रोग जितका भयंकर तितका उपायहि जालीम असणें जरूर असतें. अडाणी निरक्षर मनुष्य हा एक गुन्हेगार आहे, असें समजून त्यास शाळेंतील 'हजरी'चा कायदा लागू करावा. याप्रमाणें केल्यास गुन्हेगार म्हणून आज ज्या कांहीं जातींना हजरीचे दाखले द्यावे लागतात ते द्यावे लागणार नाहींत; कारण त्यांना शिक्षण दिल्यानंतर 'गुन्हा करणें आपला धर्म आहे' ही खुळी कल्पनाच जगणार नाहीं.

शाळेंत जाऊन योग्य तऱ्हेचें शिक्षण घेणारास विशेष सवलती देण्यांत याव्यात. उलट, शाळेंत जाण्याचा कंटाळा करणारास पैशाच्या रूपानें कायद्यानें दंड करून त्यांच्या कांहीं तक्रारी असल्यास त्यांचाहि अधिकाऱ्यांनीं विचार करण्याचें नाकारावें. इंग्लंडमध्यें स्थानिक संस्थांनीं काढलेल्या रात्रीच्या किंवा दिवसाच्या शाळांत जाणाऱ्या प्रौढांनाच नोकरी मिळेल असा कांहीं मोठमोठ्या धंद्यांच्या चालकांनीं नियम केला आहे.‡ तशाच स्वरूपाचा नियम निदान शहरांत केल्यास मजूरवर्गांत साक्षरतेचा प्रसार व्हावयास मुळींच वेळ लागणार नाहीं.

---

‡ मालकम क. रि. पा. २१.

प्रौढशिक्षण सक्तीचें करण्याच्या मार्गांतील अडचणी:—प्रौढांनाहि शिक्षण सक्तीचें करावयाचें म्हटल्यानंतर अनेक अडचणींचा आपणांस विचार करावा लागेल. म्हणून कोणत्या अडचणी पुढें येतील व त्या नाहींशा करण्याकरतां काय करावें याचा विचार करूं.

(१) खर्चाची वाढ:—प्रौढांना शिक्षण सक्तीचें करावयाचें म्हटल्यानंतर तें मोफतहि करावें लागेल. शाळेंत जाण्यालायक वयाचीं मुलें शेंकडा १५ असतात हें आपण पाहिलें आहेच. पांच वर्षांच्या वरील व अकरा वर्षांच्या आंतील मुलांस हल्लीं आपण शाळेंत जाण्यास लायक वयाचा मुलगा असें समजतों, कारण किमान चवथीपर्यंत त्यानें शिक्षण घ्यावें असा आज आपला नियम आहे. शाळेंत जाण्याचें लहान मुलांचे हेंच वय पुढेंहि ठेवल्यास आपणांस ११ वयापासून तें ४५ वर्षांच्या उमरीच्या माणसापर्यंत सर्वांना प्रौढांचें शिक्षण देण्याची तजवीज करावी लागेल. खानेसुमारीच्या आंकडयांवरून १५ ते ५० वयाच्या माणसांचें लोकसंख्येंत शेंकडा प्रमाण मुंबई प्रांतांत ५१·२ असल्याचें दिसून येतें. १० ते ४५ वयापर्यंतच्या माणसांचें तेंच प्रमाण मानावयास हरकत नाहीं. यापैकीं शेंकडा दहा लोकांना तरी अजारीपण किंवा इतर कांहीं जरूरीच्या कारणासाठीं माफी द्यावी लागेल म्हणजे सक्तीचें तत्त्व लागूं करतां येण्यासारखीं फक्त शेंकडा ४० माणसें राहिलीं. त्यांपैकीं साधारणपणें निम्या स्त्रिया व निम्मे पुरुष असें प्रमाण पडेल. मुलांच्या प्राथमिक शाळांतील मुलांस आज कमींतकमी पांच तास शिक्षण देण्यांत येतें, त्यामुळें एका मुलाला जो खर्च पडतो त्याच खर्चांत दररोज एक तास याप्रमाणें प्रौढांना शिक्षण दिल्यास पांच माणसांना प्रौढ-शिक्षण देतां येईल. शाळेच्या जागेचा उपयोग केल्यास तीहि खर्चाची एक बाब कमी होईल म्हणजे सरकारला या शिक्षणासाठीं विशेष खर्च पडणार नाहीं असें स्थूल मानानें बोलावयास हरकत नाहीं.

हा जो खर्च येईल तो **सरकारनें व धनिक लोकांनींच** सोसला पाहिजे. मागें कै. सर विठ्ठलदास ठाकरसी यांनीं रात्रीच्या शाळांची सहकारी तत्त्वावर एक योजना केली होती व त्या योजनेप्रमाणें त्यांनीं एकंदर ४० रात्रींच्या शाळांसाठीं पैशाची सोय केली होती; परंतु सर विठ्ठलदास यांच्या अकालिक मृत्यूमुळें १९२४ सालीं ही योजना लयास गेली.*

प्राथमिक शिक्षणाच्या रात्रींच्या शाळांसाठीं दर माणसास दरसाल रु. ९

* २२-२१ पा. २०७.

प्रमाणें खर्च येतो. हा खर्चहि इतर प्रांतांपेक्षां जास्त आहे. तो काटकसरीनें कमी करतां येणें शक्य आहे. तो कमी केल्यानंतर सरकार, धनिक व खाजगी संस्था यांच्या सामुदायिक प्रयत्नानें प्रौढशिक्षणासाठीं येणाऱ्या जादा खर्चाचा बोजा झेपतां येणें शक्य आहे. खर्चाच्या प्रश्नावर जास्त जोर आज कांहीं मंडळी देण्याचा संभव आहे. परंतु तसा तो देणें योग्य होणार नाहीं. आज कांहीं जादा खर्च करावा लागला तरी एकंदर शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळें देशाची शैक्षणिक व पर्यायानें नैतिक व सामाजिक जी सुधारणा होईल व राजकारणालाहि जी मदत होईल त्यामुळें जादा खर्च म्हणजे सार्वजनिक काटकसरीचीच एक बाब होईल. †

(२) **शिक्षक व अधिकारी वर्ग:**—प्रौढांना सक्तीचें तत्त्व लागू केल्यानंतर त्यांना शिकविण्यासाठीं जादा शिक्षक व इतर अधिकारी लागतील. विशेषतः जादा शिक्षक कोठून आणावयाचे म्हणून कांहीं लोक प्रश्न विचारतील. हल्लीं ज्या अनेक रात्रींच्या शाळा आहेत, त्यांत शिकविण्याचें काम दिवसाच्या मुलांच्या शाळांतील शिक्षकच करीत आहेत. परंतु लहान मुलांनाच सक्तीचें तत्त्व लागू केल्यानंतर व अभ्यासक्रमांत मात्र योग्य ते फेरबदल केल्यानंतर लहान मुलांच्या शिक्षणाचें कार्य सुकर होईल यांत कांहीं शंका नाहीं व मग अशा शिक्षकांनाच रात्रीं शाळेंत एक तास शिकविण्याचें कार्य करावयास हरकत नाहीं. शेतकी कमिशननें आपल्या अहवालांत * दिवसाच्या शाळांतील शिक्षकांवर जास्त कामाचा बोजा पडेल अशा अर्थाचें आपलें मत दिलें आहे व रात्रींच्या प्रौढांच्या शाळांसाठीं स्वतंत्र शिक्षक व तपासनीस नेमावे लागतील असें सूचीत केलें आहे. निदान शिक्षकांच्या बाबतींत शेतकी कमिशनचें मत आम्हांला मान्य नाहीं. प्राथमिक शाळांतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या मुलांना त्या शिक्ष-

---

† We must not emphasise unduly the factor of cost believing as we do that an extention of compulsory education on sound lines would of great benefit to the country at large, we think that it might ultimately be of economic as well as social advantage to face even a high expenditure upon it.

—Malcolm Com. Rept., p. 26.

* पा. ५३०.

णाचे परिणाम जिवंत ठेवण्यासाठीं कांहीं शिक्षण जें द्यावयाचें तें शिक्षण देण्यासाठीं प्राथमिक शाळांतील शिक्षकांची योजना होणेंच अत्यंत जरूर आहे. म्हणजे प्राथमिक शिक्षणाचा व पुढील प्रौढावस्थेतील शिक्षणाचा जिव्हाळ्याचा संबंध राहील.§

प्राथमिक शाळांतील शिक्षकांप्रमाणें पांचवी, सहावी व सातव्या इयत्तांतील मुलांचाही या शिक्षणासाठीं उपयोग करतां येईल व हें शिक्षणाचें कार्य करतांना त्यांच्या स्वतःचेहि विषय चांगले होऊन त्यांना अध्यापनकलेची तोंडओळख करून घेतां येईल.

खाजगी संस्थांचा व स्वयंस्फूर्तीनें पुढे येणाऱ्या सेवक–सेविकांचाहि या कामीं उपयोग करून घेतां येईल. प्रो. भागवतांचें साक्षरता–प्रसारक–मंडळ, सेवासदन, श्री. अण्णासाहेब कर्वे यांचें महाराष्ट्रग्राम–प्राथमिक–शिक्षण–मंडळ अशा निरनिराळ्या संस्थांच्या सहकार्यानें हा प्रश्न सोडवितां येणें कठीण नाहीं. त्याचप्रमाणें सरकारी किंवा बिनसरकारी नोकरींतून सेवानिवृत्त झालेल्या मंडळींनाही हें काम हातीं घेतां येणें शक्य आहे. या वर्गांतून शिक्षकाचें काम करणारेच नव्हे तर तपासणीचें काम करणारे लायक लोकही मिळण्याचा संभव आहे. लोकांचें शिक्षण हा सर्वांच्याच कर्तव्याचा महत्त्वाचा भाग आहे अशी प्रत्येकाला जाणीव होणें जरूर असून तशी जाणीव सर्वांनाच होऊ लागली आहे हीं आनंदाची गोष्ट आहे.

(३) तिसरी अडचण अभ्यासक्रमासंबंधीं आहे. प्रौढांना शिक्षण देतांना त्यांना काय शिकवावें, किती शिकवावें व कसें शिकवावें हे प्रश्न पुढें येतात.

प्रौढांना लेखन, वाचन, हिशोब शिकविण्यांत यावे व त्यांच्या धंद्यांना उप-

---

§ So long as the Evening School system continues it is most desirable that close contact should be maintained with the Elementary School, particularly as a primary object is to continue and consolidate elementary education. To some extent this is secured by the fact that the Evening Schools are, particularly in the provinces, largely staffed by Elementary School teachers. On the ground of over-work this arrangement is not free from objection, but it does at least do something to guarantee continuity of instruction and interest.

—Malcolm Com. Rept. p. 38.

योगी पडेल अशी इतर माहिती त्यांना देण्यांत यावी. या शाळांतील शिक्षणक्रम हि शिकणाऱ्या माणसांच्या रोजच्या जीवनाशीं मिळता असावा व त्यांच्या परिचयाच्या उदाहरणांचा उपयोग करून त्यांना शिकविण्यांत यावें. थोर पुरुषांचीं चरित्रें, कांहीं स्फूर्तिदायक ऐतिहासिक प्रसंग व नित्योपयोगी भौगोलिक माहिती त्यांना सहज स्मरणांत ठेवतां येईल अशा तऱ्हेनें सांगण्यांत यावी. स्वतःचें व मुलांचें शरीर व कपडे स्वच्छ कसे ठेवावे याचेंहि त्यांना शिक्षण देण्यांत यावें. पालकांनाच स्वच्छतेचें आरोग्यदृष्ट्या महत्त्व समजल्यानंतर मुलांची स्वच्छता आपोआप राखली जाईल. आडांतील पाणीच स्वच्छ केल्यानंतर पोहऱ्यांतील पाण्याची निराळी काळजी घेण्याचें कारण नाहीं !

प्रौढांना शिक्षण देतांना ते कष्टाचीं कामें करून थकून भागून आले आहेत, हें विसरतां कामा नये. त्यामुळें शिक्षण देतांना त्यांना तें शक्य तितकें मनरंजन करीत देणें अत्यंत जरूर आहे. शिक्षण घेत असतांना शिकणाऱ्याच्या मनाला प्रफुल्लितपणा कसा येईल याचा विचार करणें जरूर असून त्यासाठीं शिक्षण देणें व करमणूक करणें हे दुहेरी हेतु साध्य होतील अशी शिक्षणाची साधनें उपयोगांत आणलीं पाहिजेत.

अशा साधनांचा विचार करतांना नवीन तऱ्हेची माहिती, धर्माचें खूळ न माजवितां कथाकीर्तनांच्या मार्गानें देतां येईल व त्यासाठीं कांहीं नवीन धर्तीच्या कथाकीर्तनाची रचना केली पाहिजे. त्याचप्रमाणें बोलपटांमुळें मरू घातलेल्या नाट्यकलेचा खेड्यांतील शिक्षणासाठीं उपयोग करणें अत्यंत जरूर असून त्यामुळें नाट्यकलेचा, बेकार नटांचा व शिक्षणाचाहि फायदा होईल. मात्र खेडयांतील लोकांना समजेल, उपयोगीं पडेल अशा भाषेंत सामाजिक व ऐतिहासिक नाट्यरचना करणें हातीं घ्यावें लागेल.

खेडयांतील लोकांना तमाशाची फार आवड असते हें महशूर आहे. लोकांच्या या आवडीचा शिक्षणकार्यासाठीं उपयोग करावयास हरकत नाहीं. लोकांच्या ह्या अभिरुचीचा उपयोग करून अनेक सत्यशोधकी जलशांनीं खेडयांतील लोकांत जागृति करण्याचें फारच उत्तम कार्य केलें आहे. या जलशांना चांगलें वळण देऊन त्यांचा शिक्षणकार्यासाठींहि उपयोग करण्यांत यावा.

ग्रामोफोन, मॅजिकलॅन्टर्न, बोलपट, व्याख्यानें वगैरे अनेक साधनांचाहि निर्देश करतां येण्यासारखा आहे.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे शिक्षण व करमणूक यांचें योग्य मिश्रण करून या प्रौढांचा अभ्यासक्रम आंखणें जरूर आहे.

(४) **पुस्तकें:**—प्रौढांना उपयोगीं पडतील अशीं स्वतंत्र क्रमिक पुस्तकेंही तयार करणें जरूर आहे. प्रौढांना वाचनाची गोडी लावणें हें त्या शिक्षणाचें कार्य आहे व हें कार्य योग्य तऱ्हेनें होण्यासाठीं चांगलीं पुस्तकें असणें अगत्याचें आहे. त्याचप्रमाणें विशेषतः शेतकरी वर्गास समजेल अशा भाषेंत लिहिलेलीं व त्यांना उपयुक्त माहिती देणारीं वर्तमानपत्रेंहि काढणें जरूर आहे; म्हणजे प्रौढांना वाचनाची चटक लागेल. याच कामासाठीं गांवांत एकादें पुस्तकालयहि असलें पाहिजे, किंवा फिरत्या वाचनालयाच्या द्वारें नवीं नवीं पुस्तकें पुरविण्यांत आलीं पाहिजेत.

प्रौढ स्त्रियांच्या बाबतींत येथें स्वतंत्र खुलासा करणें जरूर आहे. १६ वर्षांच्या पुढील व ४० वर्षांच्या आंतील सर्व स्त्रियांनाहि शिक्षण देण्यांत यावें. त्यांना शिक्षण देतांना लेखन, वाचन, शिवणकाम, आरोग्यशास्त्र, मुलांचें संगोपन, दुभत्यांची व्यवस्था, पाकशास्त्र वगैरे गृहोपयोगी विषय शिकविण्यांत यावे व हें शिक्षण देण्यासाठीं शहरांतील सेविकांची योजना करण्यांत यावी.

वर ज्या सूचना केल्या आहेत त्याप्रमाणें जर सरकारकडून लोकांच्या हार्दिक सहकार्यानें प्रौढशिक्षणाची योजना मुक्रर करण्यांत आली तर त्याचे दृश्य परिणाम थोडयाच दिवसांत दिसल्यावांचून रहाणार नाहींत.

प्रकरण सातवें

मदतीच्या शाळा

The introduction of that (grant-in-aid) system was necessitated by a conviction of the impossibility of Government alone doing all that must be done in order to provide adequate means for the education of the natives of India, and it was expected that the plan of thus drawing support from local sources, in addition to contributions from the state, would result in a far more rapid progress of education than would follow a mere increase of expenditure by the Government, while it possessed the additional advantage of fostering a spirit of relience upon local exertions and combination for local purposes, which was, of itself, of no mean importance to the well-being of a nation.

—Report of the Education Commission (1882) p. 152.

आपल्या या देशांत ब्रिटिश अम्मल सुरू होईपर्यंत ज्या शाळा चालविण्यांत येत असत त्या सर्व खाजगीच असत व त्या शाळांना सरकार किंवा गांवांतील लोक योग्य वाटेल ती मदत करीत असत, हें आपण पाहिलें आहे. इंग्रजांची राजवट सुरू झाल्यानंतर, त्यांनींही प्रथम खाजगी प्रयत्नाला आर्थिक मदत करूनच शिक्षणाला उत्तेजन दिलें. बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या हातांत शिक्षणाचीं सूत्रें असतांना त्यांनींहि कांहीं नियम करून, एखाद्या गांवचे लोकांना शाळा पाहिजे असल्यास त्यांनीं काय मदत करावी व सरकारनें काय व किती मदत करावी, याचें प्रमाण ठरवून दिलें.‡

१८५४ च्या खलित्यांतहि या मदतीच्या तत्त्वाचा विशेष पुरस्कार करून त्या तत्त्वाला अधिक व्यवस्थित रूप देण्याचा प्रयत्न करण्यांत आला. या खलित्याच्या वेळीं पाश्चिमात्य देशांतहि या मदतीच्या तत्त्वावरच शिक्षणप्रसार करण्यांत येत होता. निरनिराळ्या खाजगी व्यक्ति किंवा संस्था यांच्यामार्फत ठिकठिकाणीं शाळा चालविण्यांत येत असत. त्या शाळांतील शिक्षणपद्ध-

‡ E. R. II. 162.

तीची योग्य ती सुधारणा घडवून आणण्यासाठीं सरकार या मदतीच्या तत्त्वाचा उपयोग करीत असे. मदतीच्या शाळांची पद्धतशीर पहाणी करून त्या शाळांतील शिक्षक व शिक्षणाची पद्धति यांतील दोष दाखविण्यांत येत असत व हे दोष दूर करण्याचा प्रयत्न करणाऱ्या संस्थांनाच ठराविक प्रमाणांत सरकार मदत करीत असे. या पद्धतीमुळें सरकारला शिक्षणाप्रीत्यर्थ कमी खर्च येऊन स्थानिक लोकांच्या शैक्षणिक प्रयत्नाला, देखरेख व तपासणीच्या द्वारें, इष्ट असें वळण सरकारला देतां येत असे.

या पाश्चिमात्य देशांत रूढ असलेल्या पद्धतीचाच १८५४ च्या खलित्यांत अनुवाद करण्यांत आला. चालू शाळांची स्थिति सुधारणें, त्यांच्या संख्येंत वाढ करणें व या शाळांना योग्य तऱ्हेचें शिक्षण देणाऱ्या लायक शिक्षकांचा पुरवठा केला जाईल अशी परिस्थिति निर्माण करणें हें या मदतीच्या धोरणाचें ध्येय होतें. या धोरणावर १८५४ च्या खलित्यांत विशेष जोर देण्याचें कारण, हिंदुस्थानांतील अफाट जनतेला सर्वस्वीं सरकारी पैशानें शिक्षण देण्याच्या अशक्यतेची सरकारला जाणीव झाली, हें होय.

१८५४ च्या खलित्यांत घोषणा केल्याप्रमाणें प्रत्येक प्रांतांतील शिक्षणखात्यानें या मदतीच्या तत्त्वाबद्दल निरनिराळें, कमीजास्त सहानुभूतीचें धोरण आखलें. मद्रास व बंगालमध्यें एतद्देशीय शाळांनाच मदत देऊन त्यांच्यांत सर्व दृष्टीनें सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला तर उलट, मुंबई प्रांतांत खासगी शाळांकडे कानाडोळा करण्यांत येऊन सरकारी शाळाच ठिकठिकाणीं उघडण्यांचें व्रत अंगीकारण्यांत आलें. या व्रतामुळें खाजगी शाळांची संख्या कशी घटत गेली याचे आंकडे मागें दिले आहेत. मदतीसंबधींचे पहिले नियम मुंबई सरकारनें प्रथम ७।७।१८५८ रोजीं जाहीर केले.§

१९२३ च्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यांत व त्यानंतर सरकारनें प्राथमिक शिक्षणाच्या नियमांत 'मदत कोणत्या तत्त्वावर करण्यांत येईल.' या बद्दलच्या नियमांचा समावेश केला आहे.*

या सर्व कायद्याच्या कलमांची व नियमांची सविस्तर चर्चा करणें शक्य नाहीं. म्हणून शक्य तितक्या संक्षेपानें या प्रश्नाचा आतां विचार करूं.

---

§ E. R. II. p. 175.

* प्रा. शि. का. क. २, १६, १७,१८,१९. प्रा. शि. नि. ७९ ते ९३. परिशिष्ट.

सरकारची आजची आर्थिक परिस्थिति पाहिल्यानंतर, प्रत्येक खेडयाला सरकारी—म्हणजे स्थानिक संस्थेची—शाळा काढणें शक्य नाहीं. त्यामुळें यापुढेंहि या मदतीच्या तत्त्वावरच अवलंबून रहावें लागेल यांत कांहीं शंका नाहीं. ज्या भागांत किंवा ठिकाणीं सरकारी शाळा उघडणें शक्य नाहीं त्या ठिकाणीं खाजगी प्रयत्नानें चालणारी शाळा उघडण्यास उत्तेजन देण्यांत आलें पाहिजे व जसजसा सरकारी शाळांचा प्रसार अधिकाधिक होत जाइल, तसतशा या खाजगी शाळांची संख्या कमी होत जाईल.

खाजगी व्यक्ति व संस्था यांची मदत, शिक्षण सार्वत्रिक, सक्तीचें व मोफत केलें तर, कशी द्यावी याबद्दल मागें योग्य ठिकाणीं सूचना केल्या आहेतच. शिक्षण सक्तीचें व मोफत करण्यांत आलें तर सर्वच शाळा सरकारी म्हणून मानण्यांत याव्यात व लोकांच्या आर्थिक किंवा शारीरिक मदतीचा उपयोग या शाळांसाठींच करण्यांत यावा.

यदाकदाचित् शिक्षण सर्व ठिकाणीं सक्तीचें व मोफत करतां न आल्यास ज्या भागांत शिक्षण ऐच्छिक तत्त्वावर राहील, त्या ठिकाणीं खाजगी प्रयत्नानें निघणाऱ्या शाळांना सरकारी मदत देण्यांत यावी.

सरकारी शाळा काढण्यापेक्षां मदतीच्या शाळा काढणें कमी खर्चाचें आहे, असेंहि एक मत प्रतिपादन करण्यांत येतें. हल्लीं खात्याच्या शाळांतील खर्च फार वाढला आहे ही गोष्ट खरी आहे. खात्याच्या शाळांतील खर्च वाढल्यामुळें खाजगी संस्थामार्फत चालविण्यांत येणाऱ्या शाळांचा खर्च तुलनेनें कमी दिसतो. परंतु आम्ही मागें सुचविल्याप्रमाणें खात्याच्या शाळांवरील खर्चांत काटकसर केल्यास तो खर्च कमी होईल व मग खात्याच्या व खाजगी शाळांतील खर्चाच्या रकमेंतील फरक आपोआप कमी होईल.

हल्लीं अनेक ठिकाणीं लोकांना शाळा हव्याशा वाटूं लागल्या आहेत व शाळा बोर्डाकडून मिळाल्या नाहीं, म्हणजे एखाद्या शिकलेल्या पण बेकार माणसाची मदत घेऊन त्या ठिकाणीं शाळा सुरू करण्यांत येते व कांहीं दिवस शाळा चालल्यानंतर, बोर्डाकडे मदतीसाठीं मागणी करण्यांत येते व शाळा नियमाप्रमाणें चालविण्यांत येत असली तर त्या शाळेला मदतहि करण्यांत येते.

ज्या खाजगी शाळा काढण्यांत येतात त्यांना कशी मदत केली असतां सरकारी पैसे कमी खर्च होऊन, शिक्षणप्रसाराला व त्याचा दर्जा वाढविण्याला

उत्तेजन मिळेल हा मोठा वादाचा प्रश्न असून, आतांपर्यंत अनेक तत्त्वांवर मदत देण्याचें धोरण आखण्यांत आलें आहे. निरनिराळ्या प्रांतांत व निरनिराळ्या वेळीं भिन्न भिन्न पद्धतींचा अवलंब करून आर्थिक मदत देण्यांत आली. या भिन्न भिन्न पद्धतींचें थोडक्यांत अवलोकन करूं.

(अ) पगार-मदत-पद्धति (Salary Grant System) ही पद्धत मद्रास प्रांतांत विशेष रूढ होती. या पद्धतीप्रमाणें मदतीच्या शाळेंत जे शिक्षक असत त्यांची शैक्षणिक लायकी पाहून त्यांच्या पगाराच्या ठराविक हिश्या-येवढी रक्कम सरकारकडून मदत म्हणून देण्यांत येत असे. या पद्धतीमुळें शाळे-तील शिक्षकाची शैक्षणिक लायकी वाढण्यास मदत होत असे; कारण शिक्ष-कांची शैक्षणिक लायकी जितकी अधिक तितकी मदतीची रक्कमहि अधिक. या अधिक मदतीच्या आशेनें खाजगी शाळांचे चालक अधिक शैक्षणिक लायकीचे शिक्षक नोकरीस ठेवण्याचा नेहमीं प्रयत्न करीत. हा या पद्धतीपासून फायदा झाला तरी कांहीं दोषहि या पद्धतींत होतेच. शिक्षकांच्या पगारावर मदतीचें प्रमाण अवलंबून असल्यामुळें, चालक शाळेच्या निकालाविषयीं किंवा शिक्षणपद्धतींत सुधारणा घडवून आणण्याविषयीं पूर्ण बेफिकीर असत. तसेंच कांहीं चालक नेमलेल्या शिक्षकांचे पगार अधिक रक्कम मदत मिळावी म्हणून ते वस्तुतः देत त्यापेक्षां अधिक दाखवीत.

(ब) निकाल-मदत-पद्धति (System of Payment by results) या पद्धतीप्रमाणें मदतीच्या शाळांची सरकारी तपासनीस परीक्षा घेत व परी-क्षेंत पास होणाऱ्या मुलांच्या संख्येवर मदतीचें प्रमाण ठरविण्यांत येई. ही पद्धत विशेषतः मुंबई प्रांतांत अमलांत होती. या पद्धतीमुळें शाळेचे चालक मुलांना चांगले शिकवून तीं अधिक पास होतील याविषयीं दक्षता बाळगीत; परंतु या फायद्याबरोबर या पद्धतींत कांहीं दोषहि होते. परीक्षेचा निकाल तपास-नीसांच्या परीक्षेच्या पद्धतीवर, त्यांच्या स्वभावावर, परीक्षेच्या दिवशीं मुलें आजारी न पडण्यावर किंवा गोंधळून न जाण्यावर अवलंबून असे. या सर्व कारणांवर शाळेच्या चालकांची कांहीं हुकमत चालत नसे व त्यामुळें त्यांचा कांहीं दोष नसतांनाहि त्यांना आर्थिक नुकसान सोसावें लागत असे. तसेंच निकालावर ती मदत मिळणें अवलंबून असल्यामुळें, मुलें परीक्षेंत पास कशीं होतील याच विचारानें प्रेरित होऊन चालक घोकण्याच्या मार्गाला विशेष प्राधान्य देत व त्यामुळें शिकविण्याच्या पद्धतींत कृत्रिमपणा उत्पन्न होई.

(क) **मिश्र पद्धतः**—पगाराच्या प्रमाणावर मदतीचें प्रमाण अवलंबून ठेवल्यामुळें कांहीं दोष उत्पन्न झाले. तसेंच सर्वस्वीं निकालांच्या प्रमाणावर मदतीचें प्रमाण ठरविण्यांत येऊं लागल्यामुळेंहि कांहीं दोष जन्माला आले. या दोन्ही पद्धतींतील दोष नाहींसे करण्यासाठीं म्हणून त्या दोन्ही पद्धतींचें मिश्रण करण्यांत आलें, म्हणजे मदतीची कांहीं रक्कम शिक्षकाच्या शैक्षणिक लायकीचा विचार करून ठरविलेल्या पगाराचा ठराविक अंश म्हणून देण्यांत येऊं लागली व कांहीं रक्कम निकालाच्या प्रमाणावर ठरविण्यांत येऊ लागली. या पद्धतीचाहि विशेष अवलंब मद्रासमध्येंच करण्यांत येऊं लागला.

(ड) **मुदतबंदी मदतीची पद्धतिः**— (the system of fixed period grant) ही पद्धत बंगालमध्यें अमलांत होती. शाळेंतील शिक्षकांची व इतर नोकरवर्गाची संख्या व पगार, शाळेची जागा, शाळेची कार्यक्षमता व तिच्या आर्थिक गरजा, शाळा कोणत्या ठिकाणीं आहे वगैरे सर्व बाबींचा विचार करून ती मदतीची रक्कम कांहीं ठराविक कालाकरतां ठरविण्यांत येत असे. या पद्धतीमुळें शाळांच्या चालकांनीं आपल्या सर्व गरजा एकदां सांगितल्यानंतर त्यांना सरकारी अधिकाऱ्यांच्या दरसालच्या कसोशीच्या चौकशीचा त्रास होत नसे, किंवा मुलांच्या परीक्षेचे निकाल लागेपर्यंत मदतीची रक्कम मिळण्यासाठीं थांबावेंहि लागत नसे. त्याचप्रमाणें मिळणारी रक्कम ज्या ठिकाणी वास्तविकपणें जरूर आहे अशा कामासाठीं त्यांना खर्चहि करतां येत असे. या गुणाबरोबरच शाळांच्या चालकांना आपल्या गरजा किंवा स्थिति सांगतांना खोटी माहिती देण्याचा मोह उत्पन्न होत असे, हा या पद्धतींत मोठा दोष असे.

(इ) **हजर मुलांच्या संख्येवर मदतः**—बंगालमध्यें मुलींच्या शाळांत सरासरीनें हजर मुलींची संख्या पाहून त्या संख्येप्रमाणेंहि मदत करण्यांत येत असे. ही पद्धत शिक्षणाच्या आरंभावस्थेतच उपयोगीं पडणारी आहे. मदत देण्याच्या निरनिराळ्या पद्धतींच्या गुणदोषांचा विचार करून हंटर कमिशननें खालीलप्रमाणें शिफारशी केल्या.§

(१) मदत देतांना शाळा कोणत्या ठिकाणीं आहे याचा विचार करण्यांत यावा. शिक्षणांत मागासलेल्या भागांत शाळा असली तर अधिक प्रमाणांत मदत देण्यांत यावी.

---

§ हंटर क. रि. पा. ४१५.

(२) ज्या शाळा पालकांकडून मदत मिळून स्वावलंबी होऊं शकणार नाहींत अशा शाळांना म्हणजे मुलींच्या व मागासलेल्या व कनिष्ठ वर्गांच्यासाठीं असलेल्या शाळांना अधिक प्रमाणावर मदत देण्यांत यावी.

(३) ज्या शाळा फीच्या उत्पन्नामुळें स्वयंपोषक झाल्या आहेत व त्या ज्या भागांत आहेत त्या भागाची शैक्षणिक गरज कांहीं राहिली नसेल तर अशा शाळांना मदत देण्यांत येऊं नये.

(४) शाळांच्या एकंदर खर्चापैकीं निम्यापेक्षां अधिक रक्कम मदत म्हणून देण्यांत येऊं नये.

(५) या कमाल प्रमाणांत मदत फक्त मुलींच्या शाळा, प्राथमिक शाळा व नॉर्मल स्कूल्स यांनाच करण्यांत यावी.

हल्लीं मुंबई प्रांतांत* शाळांना मदत वर्गांत सरासरीनें जी हजर मुलें असतात, त्यांच्या संख्येवर दर मुलामागें ठराविक रकमेनें देण्यांत येते. मदतीच्या शाळांचे 'अ' व 'ब' याप्रमाणें दोन वर्ग करण्यांत आलेले आहेत. ज्या शाळेंत खात्याच्या शाळांतील शिक्षणाच्या दर्जाचें शिक्षण दिलें जातें त्यांना 'अ' वर्गाची मान्यता देण्यांत येते व ज्या शाळेंतील शिक्षणाचा दर्जा थोडा कमी प्रतीचा आहे त्या शाळेस 'ब' वर्गांत घालण्यांत येतें. 'अ' वर्गांतील शाळेला दर मुलामागें रु. १० पर्यंत मदत करण्यांत येते. त्या शाळेंत फी घेण्यांत येत नसेल तर दर विद्यार्थ्यास रु. १२ प्रमाणें मदत करण्यांत येते व 'ब' वर्गांतील शाळेस दर मुलामागें सरासरीनें ४ रु. पर्यंत मदत करण्यांत येते. हें मदतीचें प्रमाण निरनिराळ्या इयत्तांसाठीं कमी जास्त करण्याचाहि अधिकार आहे.

ही मदत स्कूलबोर्डमार्फत† ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर यांच्या शिफारशीप्रमाणें देण्यांत येते व ती देतांना या शाळेंतील पास होणाऱ्या मुलांच्या संख्येचाहि विचार करण्यांत येतो. ''

या हल्लींच्या पद्धतींत काय सुधारणा करतां येतील तें आतां पाहूं.

(१) हल्लीं दर मुलामागें मदतीचें जें प्रमाण आहे तें फार जास्त आहे, अशी आमची समजूत आहे. खात्यांच्या शाळांतील शिक्षणच फार महागाचें.

---

* प्रा. शि. वि. ८०-९१. † प्रा. नि. नं. ९०

झालेलें असल्यामुळें हें मदतीचें प्रमाण कमी वाटतें परंतु सार्वत्रिक साक्षरतेचा प्रसार करण्याचा विडा उचलणाऱ्या सरकारला या प्रमाणावर मदत करणें आर्थिक दृष्ट्या शक्य नाहीं. तरी खात्यांच्या शाळांतील खर्चाचें प्रमाण कमी करून हल्लीं असलेलें मदतीचें प्रमाणहि कमी करणें अपरिहार्य आहे.

(२) अ व ब हे शाळांचे दोन वर्ग आहेत ते कमी करण्यांत यावेत. शिक्षणाचा किमान दर्जा ठरवून त्या दर्जाचें शिक्षण देणाऱ्या सर्वच शाळा एकाच वर्गांत घालण्यांत याव्या. शिक्षणाचा दर्जा ठरवितांना स्थानिक परिस्थिति लक्ष्यांत घ्यावी व लोकांना रुचेल व पचेल असाच शिक्षणाचा दर्जा ठरविण्यांत यावा.

(३) शिक्षकाची किमान लायकी ठरविण्यांत यावी व त्या शिक्षकाची शैक्षणिक लायकी वाढविण्यासाठीं, खात्याच्या इतर शिक्षकांप्रमाणें त्यालाहि सभासम्मेलनें, उजळणी (Refresher) वर्गांस बोलविण्यांत यावें. शिक्षकांसाठीं असलेल्या फिरत्या वाचनालयांतील पुस्तकांचा त्यालाहि फायदा व्हावा.

(४) हल्लीं शाळांना मदत पैशाच्या रूपानेंच देण्यांत येते, परंतु आपणांस शाळा असावी म्हणून प्रयत्न करणारे अनेक गांवकरी शाळेंतील शिक्षकांस धान्य देण्यास तयार असतात. अशा मदतीचा उपयोग करण्यास हरकत नाहीं. पुणें जिल्ह्यांतील अनेक गावीं गांवकरी खाजगी शाळांना धान्याची मदत करतात. अर्थात् हें धान्याच्या रूपानें मिळणाऱ्या मदतीचें प्रमाण शिक्षकाची गरज पाहून ठरविण्यांत आलेलें असतें. या मदतीच्या जोडीला बोर्डाकडून शिक्षकाच्या किरकोळ खर्चाला पुरेल येवढी रक्कम, म्हणजे दरमहा रु. ५ प्रमाणें सालीना ६० रुपयेपर्यंत मदत देण्यांत येते व त्या धोरणावर अनेक शाळा उत्तम चालल्या आहेत. मात्र ही आर्थिक मदत एकदम शिक्षकाच्या स्वाधीन न करतां पंचकमिटीच्या हातीं देण्यांत येते व पंचकमिटीमार्फत शिक्षकाला रक्कम मिळते. बोर्डाकडून आलेली सबंध वर्षाची रक्कम घेऊन कांहीं शिक्षक बेपत्ता झाल्यामुळें अशी योजना करावी लागली.

(५) या शाळांतील शिक्षकांना दुसरीकडे चांगली नोकरी मिळाली कीं ते निघून जातात, तरी अशा शिक्षकांना कांहीं स्थैर्य प्राप्त होईल अशी तजवीज करणें जरूर आहे. हें स्थैर्य उत्पन्न होण्यासाठीं या शाळांतील शिक्षकांसाठींहि

एक प्रा. फंडाची योजना करण्यांत यावी व या शिक्षकाला जी रक्कम द्यावयाची त्या रकमेंतून कांहीं रक्कम कापून घेऊन ती या फंडांत टाकण्यांत यावी. कांहीं ठराविक काल ही शाळा चालविल्यानंतर बोर्डानेंहि शिक्षकाची रक्कम साचली असेल तेवढी आपली भर टाकावी. शिक्षक मध्येंच शाळा सोडून गेल्यास त्याची रक्कम बोर्डाच्या खातीं सामील करावी.

(६) खाजगी मदतीच्या शाळा चांगल्या प्रकारें चालविणाऱ्या शिक्षकांस बोर्डाच्या नोकरींत जागा झाल्यास प्रथम घेण्यांत यावें. म्हणजे या नोकरीच्या आशेनें अनेक लोक खाजगी शाळांसाठीं मिळूं शकतील व आज कोरेकरकरीत व अननुभवी लोक जे बोर्डाच्या नोकरींत भरले जातात त्या प्रकारालाहि आळा बसेल. मदतीच्या शाळांतील अशा लायक शिक्षकांचें एक स्वतंत्र रजिस्टर ठेवण्यांत यावें.

(७) खात्याच्या अधिकाऱ्यांनीं अशा शिक्षकांसाठीं अधिक सहानुभूतीचें धोरण ठेवावें. अशा शिक्षकांशीं खात्याच्या अधिकाऱ्यांचें सहानुभूतीचें धोरण नसतें, अशी तक्रार अनेक लोकांनीं हंटर कमिशनपुढें केली होती.* व आजही तीच तक्रार ऐकूं येते; तरी यापुढें या शिक्षकांना अधिक स्नेहानें वागविण्यांत यावें.

(८) निरनिराळ्या शिक्षकांनीं स्वतंत्रपणें शाळा चालविण्यापेक्षां अशा शाळा लोकांच्या व सरकारच्या मदतीनें चालविण्यासाठीं, कांहीं संस्था निघणें जरूर आहे व अशा संस्था निघाल्यास या शाळांत एकसूत्रीपणा येऊन कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल.

या सूचनांप्रमाणें व इतर ज्या सूचना करण्यांत येतील त्याही विचारांत घेऊन, या शाळांबद्दल सरकारनें जरूर ते नियम करणें इष्ट आहे. सर्वांनींच प्रयत्न केल्यास पूर्वीपासून शिक्षणदानाचें कार्य करणाऱ्या खाजगी शाळांची सुधारणा होऊन, शिक्षणप्रसाराच्या कार्यास बहुमोल मदत झाल्यावांचून खात्रीनें रहाणार नाहीं.

---

* हंटर क. रि. ४३०.

प्रकरण आठवें

शिक्षणकारभार व हुकमत

शैक्षणिक कारभारावरील सत्तेचें केंद्रस्थान वेळोवेळीं सारखें बदलत आलें आहे. हिंदुस्थानांत प्रजेला शिक्षण देण्याची जबाबदारी कंपनी सरकारनें ओळखल्यानंतर या देशांतील शिक्षणविषयक धोरण कंपनीचे सूत्रधारच, निरनिराळ्या प्रांतिक सरकारांना खलिते पाठवून किंवा सर्व प्रांतांच्या बाबतींत एकच खलिता हिंदुस्थान सरकारांत पाठवून, ठरवीत असत. ह्या खलित्यांत आखून दिलेल्या मार्गानें पुढें जाणें येवढेंच कार्य हिंदुस्थानसरकार अगर प्रांतिक सरकार करीत असे. कंपनीच्या सूत्रचालकांनीं वेळोवेळीं जे अनेक खलिते पाठविले त्यांत सन १८५४ चा खलिता महशूर असून, तोच हिंदुस्थानांतील शिक्षणमंदिराचा पाया आहे.

कंपनीच्या हातांतील राजसत्ता बादशाहाच्या हातीं गेल्यानंतर शिक्षणविषयक धोरण आखण्याची जबाबदारी साहजीकच भारतमंत्र्याकडे गेली. आपल्याकडे जबाबदारी आल्यानंतर, भारतमंत्र्यांनींहि ७-४-१८५९ चा खलिता पाठवून आपली शिक्षणविषयींची आस्था व्यक्त केली. थोडक्यांत बोलावयाचें म्हणजे शिक्षणाच्या कारभारावरील खरी हुकमत इंग्लंडहून चालविण्यांत येत असे व विलायत सरकारनें आखून दिलेल्या आराखड्यांत बारीक तपशिलाच्या बाबी तेवढ्या हिंदुस्थान सरकारच्या सल्ल्याप्रमाणें प्रांतिक सरकार करीत असे.

सन १८८० च्या सुमारास या स्थितींत अंतर पडून हिंदुस्थानांतील शिक्षणाची सर्वतोपरी जबाबदारी हिंदुस्थान सरकारावर टाकण्यांत आली. ही जबाबदारी आपल्याकडे येतांच, हिंदुस्थान सरकारनें हंटर साहेबाच्या अध्यक्षतेखालीं एक कमिशन नेमून शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेऊन, भविष्यकाळीं मार्गदर्शक होण्यासाठीं उपयुक्त सूचना मागविल्या. याप्रमाणें हिंदुस्थान सरकारच्या हातांत शिक्षणाचीं सूत्रें १९२० सालापर्यंत होतीं असें म्हणावयास हरकत नाहीं. हिंदुस्थान सरकारनें ठराव करून, पत्रकें काढून किंवा शिक्षणासंबंधीं परिषदा भरवून निरनिराळ्या प्रांतांना मार्गदर्शक होणारें धोरण आखावें व त्या धोरणाप्रमाणें प्रत्यक्ष कारभार प्रांतिक सरकारनें करावा असा या काळीं

सर्वत्र रिवाज होता. या कालांत प्रांतिक सरकारला आर्थिक मदत करण्याची जबाबदारीहि मध्यँवर्ति सरकारला संभाळावी लागे.

१९२१ सालीं मध्यवर्ती सरकारवरील ही जबाबदारी, शिक्षणखातें सोपीव होऊन, प्रांतांचें गळ्यांत टाकण्यांत आली. शिक्षणखातें सोपीव झाल्यामुळें कायदेमंडळास जबाबदार अशा दिवाणांच्या हातांत प्रांतांतील शिक्षणाचीं सूत्रें देण्यांत आलीं व हिंदुस्थान सरकारनें शिक्षणाच्या बाबतींत जवळ जवळ पूर्ण अधिकारसंन्यास केला असें म्हणावयास हरकत नाहीं.

मध्यवर्ति सरकाराकडून शिक्षणावरील खरा ताबा प्रांतिक सरकाराकडे जो आला, त्यामुळें एक महत्त्वाचा फायदा झाला. प्रांतिक मंत्री हा लोकांचा प्रतिनिधी असल्यामुळें प्रांतांतील शिक्षणपद्धतीशीं त्यांचा निकटचा व जिव्हाळ्याचा संबंध आल्याकारणानें, त्याला त्यांतील दोष पहाणें व ते तत्परतेनें ताबडतोब नाहींसे करणें अधिक शक्य झालें. प्रत्येक प्रांताच्या स्थानिक परिस्थितीस पचेलसे व स्थानिक गरजा दूर करण्याच्या दृष्टीनें, शिक्षणपद्धतींत कमी ज्यास्त फेरबदल करणेंहि सोपें झालें व त्यामुळें प्रत्येक प्रांताला आपल्या शिक्षणकारभारासंबंधीं आस्था व आपलेपणा वाटूं लागला.

या फायद्याप्रमाणें एक तोटाहि झाला. मध्यवर्ति सरकारच्या हातांत जोंपर्यंत सूत्रें होतीं तोंपर्यंत प्रत्येक प्रांतांतील शिक्षणपद्धति साधारणपणें एक छापाचीं होती; परंतु प्रत्येक प्रांताचा सवता सुभा होतांच, प्रांताप्रांताच्या विशिष्ट धोरणाप्रमाणें शिक्षणपद्धत तुटक स्वरूपाची होऊं लागली. शिक्षणाच्या प्रगतीच्या दृष्टीनें प्रत्येक प्रांतानें एकमेकांच्या पद्धतीचें परीक्षण करून चांगल्या गोष्टींची देवाण घेवाण करणें अत्यंत जरूर आहे. परंतु प्रत्येक प्रांत इतर प्रांतांशीं तुटकपणें फटकून वागूं लागल्यामुळें, शिक्षणपद्धतीला एकांगी स्वरूप येऊं लागलें.

हिंदुस्थान सरकारनें या भावी दुष्परिणामाची कल्पना करून या निरनिराळ्या प्रांतामध्यें मध्यस्थाचें काम करण्यासाठीं १९२१ सालीं मध्यवर्ति सल्लागारमंडळ (Central Advisory Board) हें अस्तित्वांत आणलें. या संस्थेमार्फत महत्त्वाची माहिती एकत्र गोळा करून व निरनिराळ्या प्रांतांतील शिक्षणविषयक अधिकारी व बिगरअधिकारी तज्ज्ञांच्या सभा-परिषदा भरवून, प्रांताप्रांतांत विचाराची व उपयुक्त माहितीची देवघेव घडवून आणण्याचा सरकारचा विचार होता. परंतु अनेक प्रांतांना प्राप्त झालेला पूर्ण अधिकार महत्त्वाचा वाटल्यामुळें 'हिंदुस्थान सरकारचा हा उद्योग म्हणजे आपल्या

अधिकारावरील अतिक्रमण आहे' असें वाटूं लागल्याकारणानें व काट-कसरीच्या सबबीवर, हें सल्लागार-मंडळ १९२३ सालीं रद्द करण्यांत आलें. प्रांतिक सरकारच्या शैक्षणिक कारभारावरील सरकारचें नियमन जवळ जवळ संपुष्टांत आलें व त्याप्रमाणें १९२२-२७ च्या पंचवार्षिक अहवालांत पान १५ वर कबुलीहि देण्यांत आली.

प्रांतिक शैक्षणिक कारभाराच्या बाबतींत मध्यवर्ति सरकारनें जी संन्यस्त वृत्ति पत्करलेली आहे, त्याबद्दल हारटॉग कमिटीनें आपली पूर्ण नापसंती व्यक्त केली आहे. "प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसाराचें ध्येय साध्य करण्याच्या बाबतींत मध्यवर्ति सरकारवर कोणतीच जबाबदारी असूं नये हें आम्हांस मान्य नाहीं.¶ निरनिराळ्या कायदेमंडळांच्या मतदारसंघांच्या शैक्षणिक लायकीसंबंधीं प्रत्यक्ष जबाबदारी मध्यवर्ति सरकारवर असून त्या दृष्टीनें शक्य तितक्या लवकर सर्व हिंदुस्थानांत सक्तीचें प्राथमिक शिक्षण सुरू होईल हें पहाण्याची जबाबदारी त्या सरकारवर आहे" असा§ हारटॉग कमिटीनें आपला असंदिग्ध शब्दांत अभिप्राय दिला आहे. त्याचप्रमाणें सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठीं जरूर तो खर्च करण्याची ज्या प्रांतांना कुवत नाहीं त्यांना आपल्या तिजोरींतून मदत करण्याची मध्यवर्ति सरकारनें व्यवस्था करणें जरूर आहे, असें निश्चयपूर्वक मत सदर कमिटीनें दिलें आहे.‡

शिक्षण-कारभाराचें यंत्र हल्लीं थोड्याफार वेगानें चालू आहे. त्याचे महत्त्वाचे भाग स्थूलमानानें पहातां चार आहेत; तें खालीं लिहिल्याप्रमाणें.

१. प्रांतिक शिक्षणखातें.
२. स्थानिक संस्था.
३. स्कूल-बोर्ड.
४. शिक्षण-कमिट्या.

या प्रत्येक भागाचें कार्य काय आहे व त्याचे परस्पर संबंध काय हें आतां पाहूं.

¶ पा. ३४६. § पा. २७८.

‡ The Imperial government should come to their aid and the government of India should not be divested of all power to make central grants to provincial governments for mass education. P. 278-9.

१ शिक्षणखातें

पूर्वीं मुंबई प्रांतांतील शिक्षणाचीं सूत्रें बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या हातांत कांहीं काल होतीं, हें आपण मागें पाहिलें आहे. १८५४ च्या खलित्याप्रमाणें १८५६ सालीं शिक्षणखातें (Department of Education) जन्माला आलें व त्या खात्याचा मुख्य म्हणून डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनची नेमणूक करण्यांत आली. आरंभीं ह्या खात्यांचीं तीन कर्तव्यें होतीं.[1] १ दिग्दर्शन (Direction) किंवा नियमन (Control) २. तपासणी (Inspection) आणि ३ शिक्षण (Instruction). हीं तिन्ही प्रकारचीं कामें करण्यासाठीं निरनिराळ्या दर्जाचा नोकरवर्ग या खात्यांत नेमण्यांत आला होता.

स्थापनेपासून तों १९२३ च्या प्राथमिक शिक्षणासंबंधींच्या कायद्याच्या कलम ४प्रमाणें निरनिराळ्या स्थानिक संस्थांनीं आपआपल्या हद्दींतील शिक्षणाचा प्रत्यक्ष ताबा घेईपर्यंत, ही तिन्हीं कामें या खात्यामार्फत प्रत्यक्षपणें होत असत. परंतु स्थानिक संस्थांनीं ताबा घेतल्यानंतर शिक्षण देण्याची (Instruction) पूर्ण जबाबदारी स्थानिक संस्थांकडे गेली. नाहीं म्हणावयास शिक्षकांना शिक्षण (Training) देण्याची जबाबदारी या खात्यावर राहिली. तपासणी–(Inspection) च्या कामापैकीं कांहीं जबाबदारी स्थानिक संस्थांवरच सोपविण्यांत आली व त्यांनींहि त्यासाठीं सुपर्वायझर्स नेमले. म्हणजे दिग्दर्शनाची (Direction) फक्त जबाबदारी या खात्याकडे पूर्णपणें राहून तपासणी (Inspection) व शिक्षण (Instruction) यांची अतिशय अल्प प्रमाणांत जबाबदारी या खात्याकडे राहिली.

या खात्याचा मुख्य 'डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन' या हुद्याचा अधिकारी आहे व १९१९ च्या सुधारणेच्या कायद्याप्रमाणें त्याला मुंबई प्रांतिक कायदेमंडळांत बसण्याचा अधिकार असे. मुंबई प्रांतांतील डायरेक्टर व दिवाणाचा चिटणीस (Secretary) अशा ज्या दोन जागा आहेत, त्यांपैकीं एक जागा कमी करून या दोन्ही जागांची कामगिरी एकाच अंधिकाऱ्यावर सोपविण्यांत यावी, अशी हारटॉग कमिटीनें १९२९ सालीं सूचना केली. अशी सूचना करण्याचें कारण कीं, हल्लीं शिक्षणविषयक प्रश्नाची चर्चा अनेकवार निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या कचेरींत होऊन एकच गोष्ट करण्या-

---

[1] हंटर क. रि. पा. ३१३.

साठीं विनाकारण वेळ व पैसा खर्च होतो. एखादें प्रकरण प्रथम उत्पन्न झाल्यानंतर त्याचा इन्स्पेक्टरच्या कचेरींत खल होतो. नंतर त्या प्रकरणाचा डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनच्या ऑफिसांतील मंडळी कीस काढून तें दिवाणाच्या मान्यतेसाठीं पुढें रवाना करतात; परंतु तेथेंहि दिवाणाच्या चिटणिसाच्या कचेरींत (Secretariat) त्याचा काथ्याकूट पुन्हां करण्यांत येतो. म्हणजे एकाच गोष्टीचा दुबार तिबार विचार करण्यांत येऊन वित्ताची व विचारांची उधळपट्टी करण्यांत येते.

यामुळें " डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनलाच स्वतंत्र न ठेवतां त्याला मंत्र्याच्या चिटणीसांचें काम देण्यांत यावें, म्हणजे हा दोष नाहींसा होईल" असा हारटॉग कमिटीनें आपला अभिप्राय दिला.* इतकेंच नव्हें तर, एकाच प्रकरणाचा दोन अधिकाऱ्यांनीं पृथक्पणें विचार करण्यामुळें त्या प्रकरणाच्या निवाड्याला जो हल्लीं विलंब लागतो, तोहि हारटॉग कमिटीची सूचना अमलांत आणल्यास, लागणार नाहीं. मध्यप्रांतांत डायरेक्टर हाच चिटणीस आहे व पंजाबमध्यें त्याला दुय्यम चिटणीस (Under Secretary) ही संज्ञा आहे व तेथें चिटणीस नसल्यामुळें, दिवाणातर्फे तोच सर्व हुकमावर सह्या करतो. या योजनेमुळें त्या दोन्ही प्रांतांत कार्यक्षमतेला बाध न येतां काटकसर होऊन पैसा व वेळ वाचतो व प्रकरणांचा तडकाफडकी निकाल लागतो.

हारटॉग कमिटीनंतर, मुंबई प्रांतापुरता, या प्रश्नाचा विचार पुनर्घटना कमिटीनें १९३२ सालीं करून हारटॉग कमिटीच्या सूचनेला विरोध केला. " शिक्षणखात्यांत तेंच काम जितकें निरानिराळ्या शाखांकडून दुबार करून घेण्यांत येतें तितकें सरकारच्या इतर खात्यांतून क्वचित् करून घेण्यांत येतें " असें कबुल करून, पुनर्घटना कमिटीनें या दोन जागांच्या एकीकरणाला केवळ तात्त्विक करणासाठीं विरोध केला. चिटणिसानें प्रत्यक्ष कारभार करणाऱ्या शाखेचे (Administrative Board) मुख्य होणें योग्य नाहीं असें कमिटीचें मत पडलें. डायरेक्टरला सेक्रेटरीएटमधील खुर्चीत जखडून ठेवल्यानंतर त्याची साहजिकच फिरती कमी होऊन शिक्षणसंस्थांशीं व अधिकाऱ्यांशीं (Executive officers) त्याचा असलेला प्रत्यक्ष संबंध कमी होईल, हें एक कारण या दोन जागांच्या एकीकरणाविरुद्ध पुढें

---

* पान २८६.

करण्यांत आलें. दुसरें महत्त्वाचें कारण असें देण्यांत आलें कीं, कमिटीच्या सूचनेप्रमाणें मुंबई सरकारचें अधिष्ठान मुंबई येथेंच कायम करण्यांत आल्यानंतर डायरेक्टरलाहि मग मुंबई येथें कायम वास्तव्य करावें लागेल व त्यामुळें त्याच्या खात्याच्या इतर महत्त्वाच्या पुण्यांत राहणाऱ्या शाखांशीं त्याचा संबंध सुटून नुकसान होईल.

या दोन कारणांसाठीं पुनर्घटना कमिटीनें या मिलाफाविरुद्ध मत देऊन काटकसर म्हणून सेक्रेटरीएटमधील शिक्षणशाखा डायरेक्टरच्या अधिकाराखालीं ठेवण्यांत यावी, म्हणजे काटकसर होऊन प्रकरणाचा निकाल लागण्यास दिरंगाई लागणार नाहीं, अशी सूचना केली; परंतु सरकारनें अद्याप हारटॉग कमिटीच्या अगर पुनर्घटना कमिटीच्या सूचनांचा मुळींच विचार केलेला नाहीं, असो.

शिक्षणखात्याचा स्थानिक संस्थांशीं कसा संबंध असतो याचा पुढें विचार केला आहे.

२ स्थानिकसंस्था (Local Authorities).

स्थानिक स्वराज्याला खरी सुरवात १८८२ सालीं मे महिन्यांत लॉर्ड रिपन हे व्हाइसरॉय असतांना हिंदुस्थान सरकारनें केलेल्या ठरावानें झाली, असें म्हणावयास हरकत नाहीं. त्या सालापूर्वी म्हणजे सन १८६९ मध्ये सरकारनें मुंबई प्रांतांत लोकलफंड वसूल करण्यासंबंधीं कायदा, आक्ट ३ सन १८६९, पास करून घेतला. त्याच कायद्यांत हा वसूल होणारा लोकलफंड शिक्षणासाठीं व आरोग्य–सुधारणेसाठीं कसा खर्च करावा हें ठरविण्यासाठीं व या फंडाची एकंदर व्यवस्था पहाण्यासाठीं स्थानिक कमिट्या (Local Committees) स्थापन करण्याची तरतूद करण्यांत आली होती. या कायद्याच्या कलम १ ते ५ मध्यें 'या कमिट्या कशा स्थापन कराव्या, त्यांची हद्द कशी ठरवावी, त्यांनीं कोणते नोकर नेमावे' वगैरेबद्दल योजना आंखून देण्यांत आली होती. परंतु पुढें १८८४ सालीं नं. १ चा विस्तृत कायदा लोकल बोर्डासंबंधीं पसार करण्यांत आल्यानंतर, १८६९ च्या तिसऱ्या कायद्यांतील १ ते २ कलमें रद्द करण्यांत आलीं. सन १९२३ सालीं जो नं. ६ चा, हल्लीं अमलांत असलेला, कायदा पास झाला, त्या कायद्याचें कलम २ नें सिंध लोकलफंड ॲक्ट १८६५, मुंबई लोकलफंड ॲक्ट १८६९ व मुंबई

लोकलबोर्ड्स् ॲक्ट १८८४ हे पूर्वीचे ॲक्ट रद्द करण्यांत आले. १९२३च्या या कायद्यांतहि गेल्या सतरा वर्षांत वेळोवेळीं अनेक दुरुस्त्या निरनिराळ्या कायद्यानें करण्यांत आल्या आहेत.

म्युनिसिपालिटीबद्दल पहिला कायदा नं. ६, १८७३ सालीं झाल्यानंतर नं. २ चा कायदा १८८४ सालांत पास करण्यांत आला व पुणें, मुंबई हीं शहरें वगळून इतर शहरांतून म्युनिसिपालिट्या स्थापन करण्यासंबंधीं कायदा नं. ३ चा १९०१ सालीं पास झाला. मुंबई शहराबद्दलचा कायदा १८८८ सालीं पास झाला.

मुंबई प्रांतांत १८८२ पूर्वी जीं लोकलफंड बोर्ड्स् व म्युनिसिपालिट्या होत्या त्यांचा मदतीच्या शाळांशीं प्रत्यक्ष मुळींच संबंध नसे. १८७३ च्या कायद्यानें म्युनिसिपालिट्यांना आपल्या उत्पन्नांतून शिक्षणाप्रीत्यर्थ खर्च करण्याची परवानगी असे. परंतु हंटर कमिशनच्या अहवालांत पान १५३ वर म्हटल्या-प्रमाणें सक्कर म्युनिसिपालिटीखेरीज मुंबई प्रांतांतील इतर म्युनिसिपालिट्यांनीं प्राथमिक शिक्षणाच्या कारभारांत प्रत्यक्ष भाग मुळींच घेतला नाहीं. बहुतेक म्युनिसिपालिट्या स्वतांवरील खर्चाची जबाबदारी प्रांतिक सरकारवर किंवा शेजारच्या जिल्हाबोर्डावर टाकून स्वतः कांहीं न करण्याचें व्रत स्वीकारीत.

या म्युनिसिपालिट्यांच्या विरुद्ध लोकलफंड बोर्डांची वागणूक असे. "प्राथमिक शिक्षण ज्या फंडावर विशेषतः अवलंबून असे त्या लोकलफंडाची व्यवस्था हीं बोर्डेंच पहात. ते आपल्या जमाखर्चाचीं अंदाजपत्रकें तयार करीत. स्वतांच्या मर्जीप्रमाणें शाळा अथवा वर्ग बंद करीत. फी किती द्यावी हें ठरवीत व त्यांच्या परवानगीवांचून खात्याची शाळा उघडतां येत नसे. प्रत्यक्ष अभ्यास क्रमांत ते ढवळाढवळ करीत नसत व शिक्षकांच्या नेमणुकाहि करीत नसत."[+] ही स्थिति १८८२ पूर्वीची झाली. त्या सालीं लॉर्ड रिपन साहेबांनीं स्थानिक स्वराज्याबाबत महत्त्वाचा ठराव करून आपलें सर्वसाधारण धोरण काय राहील हें जाहीर केलें. स्थानिकस्वराज्याचा उद्देश आपल्या स्थानिक गोष्टींची व्यवस्था कशी करावी याचें लोकांना शिक्षण देणें हा असून, स्थानिक संस्थांच्या कारभारावर वाजवीपेक्षां जास्त नियंत्रण न ठेवतां त्यांना चुका करून शिकण्याची व त्या चुकांपासून फायदा करून घेण्याची संधी देणें जरूर असल्याचें स्पष्ट करण्यांत आलें. हें मत पुढेंहि अनेक वेळां व्यक्त करण्यांत आलें. सन

[+] हंटर क. रि. पा. १५३

१९१८ च्या सुधारणेच्या अहवालांत (Reforms Report of 1918) स्थानिक संस्थांत शक्य तितकी अधिक हुकमत लोकांची असणें जरूर असून, त्यांना बाहेरील नियंत्रणापासून शक्य तितकें अधिक स्वातंत्र्य देणें जरूर आहे, असा अभिप्राय देण्यांत आला व आपल्या चुकांपासून फायदा करून घेण्याची बोर्डांना मोकळीक देणें हें सरकारमान्य धोरण असणें जरूर आहे असा अभिप्राय दण्यात आला.

आपल्या १९१८ सालच्या ठरावांत हिंदुस्थान सरकारनें म्युनिसिपल व रूरल बोर्डांत लोकांनीं निवडलेल्या लोकांचें बहुमत करावें; अल्पसंख्यांक लोकांना सरकारतर्फे नेमून प्रतिनिधित्व द्यावें; त्याचप्रमाणें ज्यांना अधिकारी म्हणून कामाचा अनुभव आहे, अशांना सल्लामसलत देण्यासाठीं मतदानाचा हक्क न देतां नेमावें व जे निवडणुकीला उभे राहणार नाहींत त्यांना कोऑप्ट करण्यांत यावें अशा सूचना केल्या. इतकेंच नव्हे, तर कर देणाऱ्या लोकांना खरें प्रतिनिधित्व देण्यासाठीं मतदानाचा हक्क अधिक व्यापक करावा अशीहि जोराची सूचना केली. तसेंच म्युनिसिपालिट्यांतील अध्यक्ष निवडण्यांत यावा व लोकल बोर्डाचा अध्यक्ष बिगर-सरकारी अधिकारी असावा या गोष्टीलाहि सरकारनें अनुकूलता दर्शविली.

सरकारच्या या कांहींशा उदार अशा धोरणाचा इष्ट असा परिणाम होऊन सन १९१९ चा सुधारणांचा कायदा पास झाल्यानंतर स्थानिक संस्थांना जादा अधिकार देणारे कायदे निरनिराळ्या प्रांतांत पास होऊन लोकांच्या राजकीय शिक्षणाला चांगलीच चालना मिळाली.

मुंबई प्रांतांत लोकल बोर्डांच्या बाबतींत लोकल बोर्ड्स ॲक्ट नं. ६ सन १९२३ चा व प्राथमिक शिक्षणाचा कायदा नं. ४ सन १९२३ चा हे फार महत्त्वाचे आहेत. लोकल बोर्डांची प्राथमिक शिक्षणाबाबतची जबाबदारी या दोन कायद्यांनीं नियमित केलेली आहे. लोकल बोर्ड ॲक्ट कलम ५० प्रमाणें 'प्राथमिक शिक्षण हें लोकल बोर्डाच्या अवश्य कर्तव्यांपैकीं एक कर्तव्य आहे' असें ठरविण्यांत आलें असून ही जबाबदारी पार पाडण्यासाठीं प्राथमिक शिक्षण कायदा कलम ३ प्रमाणें जिल्हा बोर्डास स्कूल बोर्डाची निवड करण्याचा अधिकार देण्यांत आलेला आहे. स्कूल बोर्डाच्या हातांत प्राथमिक शिक्षणाचा प्रत्यक्ष कारभार असला तरी त्यावर सर्वसाधारण हुकमत (General Control) जिल्हा बोर्डाचीच असते (कलम४). जिल्हा बोर्डाच्या सभासदांची संख्या किती

असावी, त्यांत सरकारनियुक्त किती असावेत, व कोणत्या मतदारसंघानें किती निवडावेत हें त्या बाबतींत नियम करून ठरविण्याचा अधिकार सरकारचा आहे. कलम ७५ प्रमाणें लोकल फंडांत कोणत्या बाबींपासूनच्या उत्पन्नाचा समावेश होतो याची यादी दिली असून कलम ८० मध्यें प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाची तरतूद करण्याची जबाबदारी लोकल बोर्डावर टाकली आहे.

म्युनिसिपालिट्यांच्या बाबतींत ॲक्ट १९०१ चा नं. ३ चा कायदा व १९२५ चा नं. १८ चा कायदा असे महत्त्वाचे आहेत. १९०१ चा कायदा साधारणपणें लहान म्युनिसिपालिट्यांना लागू असून, १९२५ चा कायदा पुणें, अहमदाबाद वगैरेसारख्या शहरांना लागू आहे. त्या कायद्याप्रमाणें स्थापन झालेल्या म्युनिसिपालिट्यांना बरोज म्युनिसिपालिटी असें म्हणतात. १९०१ च्या कायद्याच्या कलम ११ प्रमाणें म्युनिसिपालिटीच्या सभासदांची संख्या व त्यांतील लोकनियुक्त व सरकारनियुक्त सभासदांचें प्रमाण ठरविण्याचा हक्क सरकारचा आहे. त्याच कायद्याच्या कलम ५४ पोटकलम पी प्रमाणें प्राथमिक शाळा स्थापन करून त्यांचा योगक्षेम चालविण्याची जबाबदारी या म्युनिसिपालिट्यांवर टाकण्यांत आलेली आहे. १९२५ च्या कायद्याच्या कलम १० प्रमाणें बरोज म्युनिसिपालिट्यांच्या सभासदांची संख्या व सरकारनियुक्त व लोकनियुक्त सभासदांचें प्रमाण ठरविण्याचा हक्क सरकारचा असून कलम ६८ पोटकलम पी प्रमाणें प्राथमिक शाळा स्थापन करून चालविण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यांत आली आहे.

प्रत्येक स्थानिक संस्थेला (Local Autbority) एक स्कूलबोर्ड नेमावें लागतें. स्थानिक संस्था ही म्युनिसिपालिटी असली तर तिच्या स्कूल बोर्डांतील निवडावयाच्या सभासदांची संख्या सातांपेक्षां कमी व नवांपेक्षां अधिक असत नाहीं. स्थानिक संस्था ही जिल्हा लोकल बोर्ड असेल तर मग स्कूल बोर्डाच्या निवडावयाच्या सभासदांची संख्या नऊपेक्षां कमी व सोळांपेक्षां अधिक नसते. या सभासदांची निवड स्थानिक संस्थेच्या सभासदांनीं करावयाची असते. स्कूल बोर्डावर शिक्षणतज्ज्ञ, मागासलेले वर्ग, अस्पृश्य व स्त्रिया यांच्यासाठीं जागा राखून ठेवलेल्या असतात. स्थानिक संस्था जि. लो. बो. असेल तर स्थानिक संस्था नसलेल्या म्युनिसिपालिटयांच्या प्रतिनिधीसाठींहि जागा राखून ठेवलेली असते. या सर्व जागा स्थानिक संस्थेनें निवडणुकींनेंच भरावयाच्या असतात. शिक्षणतज्ज्ञ कोणास म्हणावयाचें, मागासलेले

वर्ग व अस्पृश्य या सदराखालीं कोणत्या जाती येतात, याचा खुलासा सरकारनें नियम करून केलेला आहे.

स्कूल बोर्डावर सरकारतर्फेहि कांहीं लोक नेमण्यांत येतात. परंतु या अशा नेमल्या जाणाऱ्या सभासदांची कमाल मर्यादा, स्थानिक संस्था ही म्युनिसिपालिटी असली तर तीन व लोकल बोर्ड असेल तर चार अशी ठरली आहे.

कांहीं लहान म्युनिसिपालिट्यांच्या अधिकारक्षेत्रांतील शाळांची व्यवस्था जिल्हा बोर्डामार्फतच करण्यांत येते. व अशा बिगर-स्थानिक संस्था (Non-local Authority) म्युनिसिपालिटींचा पाळीपाळीनें स्कूल बोर्डावर प्रतिनिधी निवडून घेण्यांत येतो.

स्कूल बोर्डाची मुदत स्थानिक संस्थेच्या आयुर्मानाइतकीच असते व स्थानिक संस्थेचें आयुष्य वाढल्यास स्कूल बोर्डाचेंहि आयुष्य वाढलें जातें.

स्कूल बोर्डाच्या सभासदांनीं आपल्यांतून चेअरमन, व्हाईस चेअरमन निवडावयाचे असतात. त्याचप्रमाणें स्कूल बोर्डाला एखादी पोटकमिटी, सभासद, पगारी अगर बिनपगारी अधिकारी यांच्याकडे आपल्या अधिकारापैकीं अगर कर्तव्यांपैकीं एखादा अधिकार अगर कर्तव्य सोपवितां येतें. मात्र अशा तऱ्हेनें ज्या कमिटीकडे अगर इसमाकडे अधिकार अगर कर्तव्य सोपविण्यांत आलें असेल, त्या पोटकमिटीला अगर इसमाला तो सोपविलेला अधिकार चालवितांना अगर सोपविलेल्या कर्तव्यांचें पालन करतांना, स्कूल बोर्ड वेळोवेळीं सूचना करील त्याप्रमाणें वागावें लागतें.

या स्थानिक संस्थांना सरकारच्या मान्यतेनें ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर नेमतां येतो. त्याचप्रमाणें या स्थानिक संस्था आपआपले तपासनीसही (Supervisors) नेमतात.

या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याप्रमाणें स्थानिक संस्थांच्या हातांत बरीच अधिकारसूत्रें आलीं आहेत, असें म्हणावयास हरकत नाहीं. या संस्था आपआपल्या स्कूल बोर्डामार्फत स्वतःच्या शाळा चालवितात, खाजगी शाळांना मान्यता देऊन मदत करतात. आपले शिक्षक अगर इतर तपासणी करणारा अगर कचेरींत काम करणारा अधिकारी व नोकरवर्ग नेमतात व सरकारकडून आर्थिक मदत होईल अशा व स्वतांच्या आर्थिक मगदुराप्रमाणें प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराच्या व विस्ताराच्या निरनिराळ्या योजना आखतात व त्यांची अम्मलबजावणी करतात.

याप्रमाणें प्राथमिक शिक्षणावरील बरीच मोठी सत्ता स्थानिक संस्थांच्या हातांत देण्यांत आलेली असली, तरी सरकारनें थोडा लगाम आपल्या हातांत ठेवला आहे. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरच्या नेमणुकीला सरकारची मान्यता लागते. शिक्षकांच्या पगाराच्या प्रमाणास मंजुरी लागते. एकंदर शिक्षकवर्गांत शिक्षित-शिक्षकाचें प्रमाण काय असावें हें सरकार ठरवितें. तसेंच शाळांतील अभ्यासक्रम सरकारच ठरवितें. प्राथमिक शिक्षणाच्या विस्ताराच्या योजनेला सरकारची मान्यता लागते व स्थानिक सरकारचे व स्कूल बोर्डाचे हिशेब सरकारकडून तपासले जातात. प्राथमिक शिक्षणाचा कायदा कलम २७ प्रमाणें अनेक बाबींसंबंधीं नियम करण्याचा अधिकार सरकारनें आपल्याकडे ठेवला असून, त्या कलमाच्या इतर पोट-कलमांप्रमाणें स्थानिक संस्थांना कांहीं बाबतींत नियम करण्याचा अधिकार देण्यांत आला असला, तरी या नियमांना सरकारची मंजुरी लागतेच.

मुंबई प्रांतांतील किंवा हिंदुस्थानांतील स्थानिक संस्थांच्या हातांत शिक्षणाचीं जीं सूत्रें दिलीं आहेत, तीं इंग्लंडमधील पद्धतीचें थोडें फार अनुकरण करूनच. प्राथमिक शिक्षण आपल्या हद्दींत सक्तीचें वाटल्यास करण्याची परवानगी देणारा कायदा इंग्लंडमध्यें १८७० सालीं पास करण्यांत आला. त्या कायद्याप्रमाणें प्राथमिक-शिक्षणाच्या शाळा ज्या भागांत मुळींच नव्हत्या किंवा कमी होत्या, त्या भागांत पुरेशा शाळा काढून त्या चालविण्यासाठीं स्कूल बोर्ड स्थापन करण्याची तरतूद करण्यांत आली. १८७० च्या कायद्याप्रमाणें या स्कूलबोर्डाचीं कार्यक्षेत्रें लंडन, बरोज व लंडनबरोजबाहेरील खेडीं (Parishes) ठरविण्यांत आलीं. त्याचप्रमाणें कांहीं भागांना स्वतंत्र स्कूलबोर्डें न देतां संयुक्त स्कूलबोर्डें देण्याचा व एखाद्या स्कूलबोर्डाला रद्द करून त्याच्याऐवजीं त्याचीं कामें करण्यासाठीं व करामधून खर्च वसूल करण्यासाठीं, इतर अधिकारी नेमण्याचा अधिकार देण्यांत आला. या व्यवस्थेप्रमाणें मोठ्या शहरांतील स्कूलबोर्डांनीं चांगलें कार्य करून दाखविलें, परंतु कांहीं स्कूलबोर्डें हीं लहान, गरीब व नालायक असल्यामुळें शिक्षण हें स्थानिक स्वराज्याच्या कर्तव्यांपैकींच एक कर्तव्य समजून, स्थानिक स्वराज्याच्या ताब्यांत देण्याची आवश्यकता वाटूं लागली. त्याप्रमाणें १८८० सालीं 'लोकल गव्हर्नमेंट ॲक्ट' पास करून 'कौन्टी कौन्सिल्स' स्थापन करण्यांत आलीं. १८९६ सालीं सर जॉन गोर्स्ट यांनीं शिक्षणाची बाब कौन्टी कौन्सिल व

कौन्टी बरोज यांच्या हातांत देण्यासाठी एक कायद्याचा मसुदा पुढें आणला परंतु तो ठराव नापास झाला.

१९०२ सालीं पास झालेल्या कायद्यानें १८७० सालीं अस्तित्वांत आलेलीं स्कूलबोर्डें रद्द करण्यांत आलीं व शिक्षणाची जबाबदारी नवीन एज्युकेशन ॲथॉरिटीज यांच्यावर सोंपविण्यांत आली. त्यानंतर १९०६ सालीं व त्यानंतर १९१८ पर्यंत अनेक वेळां या संस्था अधिक कार्यक्षम करण्यासाठीं कायद्यांत फेरबदल करण्यांत आले. १९१८ सालीं पास झालेला कायदा फार महत्त्वाचा असून, त्या कायद्यानें स्थानिक संस्थांवर राष्ट्रीय शिक्षणाची सोय व वाढ करण्याची जबाबदारी टाकण्यांत येऊन, तें ध्येय साधण्यासाठीं कशा योजना कराव्यात व त्यांच्या खर्चासाठीं पैशाची काय व्यवस्था करावी, याबद्दल निश्चित स्वरूपाची आंखणी करण्यांत आली व त्याचप्रमाणें मध्यवर्ती शिक्षणसंस्था (Central Education Board) व स्थानिक शिक्षणसंस्था यांचे परस्परांशीं संबंध कसे असावे याचाहि खुलासा करण्यांत आला.

१९०२ च्या कायद्याप्रमाणें लोकल एज्युकेशन ॲथॉरिटीला एज्युकेशन कमिटी नेमावी लागे. लोकल एज्युकेशन ॲथॉरिटीचे कर बसविण्याच्या व कर्ज काढण्याच्या अधिकारांखेरीज सर्व अधिकार (delegate) देण्यांत येत असत. या एज्युकेशन कमिटींत कौंटी कौन्सिलचे सभासदांपैकीं सभासदांची बहुसंख्या (majority) असे. त्याचप्रमाणें स्त्री-प्रतिनिधी व शिक्षणतज्ज्ञहि घ्यावा लागे. त्याचप्रमाणें निरनिराळ्या हितसंबंधांचे प्रतिनिधी कोऑप्ट करून घ्यावे लागतात.

वर जी माहिती दिली आहे त्यावरून एज्युकेशन कमिटी म्हणजे आपल्याकडील स्कूलबोर्डच असें म्हणावयास हरकत नाहीं व या दोन्ही संथांच्या घटनेंत व कार्याबाबत बरेंच साम्य आहे. या शिक्षणकमिट्या ज्या 'कौंटी कौन्सिल' अगर 'बरोजच्या'तर्फे नेमण्यांत येतात त्या लोकल एज्युकेशन ॲथॉरिटी असून त्यांचें साम्य आपल्या म्युनिसिपालिटया व लोकलबोर्डाशीं आहे. शहराला म्युनिसिपालिटी व बाहेर डिस्ट्रिक्ट लोकलबोर्ड त्याप्रमाणें इंग्लंडमध्येंहि अर्बन बरोज किंवा जिल्हे (District) व रूरल कौन्सिल किंवा जिल्हे (District) असा फरक करण्यांत आलेला आहे.

इंग्लंडमधील स्थानिक संस्था व विशेषतः मुंबई प्रांतांतील स्थानिक संस्था यांच्यामध्यें दोन महत्त्वाच्या बाबतींत फरक आहे. मुंबई प्रांतांतील स्थानिक संस्थांनीं

एखादी केलेली गोष्ट त्याच्या अधिकारक्षेत्रांत येते किंवा नाहीं हें सरकारच ठरवितें व सरकारचा निकाल स्थानिक संस्थेवर बहुश: बंधनकारक असतो. परंतु इंग्लंडमध्यें या वादाचा निकाल न्यायकोर्टाकडे सोपविण्यांत येतो. दुसरा फरक म्हणजे इंग्लंडमध्यें स्थानिक संस्थांवर सरकारचे प्रतिनिधी मुळींच नसतात, उलट, मुंबईप्रांतांत लोकलबोर्ड व म्युनिसिपालिट्या यांच्यावर सरकार-नियुक्त सभासद असतात. कदाचित् हा दुसरा फरक आतां नवीन राजवटींत नाहींसा होण्याचा संभव आहे.

शिक्षणखातें व स्थानिक संस्था—शिक्षणखात्याचें व प्राथमिक शिक्षणाच्या प्रत्यक्ष प्रसाराचें कार्य करणाऱ्या स्थानिक संस्थांचे संबंध कसे आहेत तें आतां पाहूं. पुढील विवेचनाच्या ओघांत शिक्षणखातें व सरकार हे शब्द एकाच अर्थी वापरण्यांत आले आहेत, हें वाचकांनीं लक्षांत ठेवणें जरूर आहे. शिक्षणमंत्री हा देशांतील शिक्षणाच्या बाबतींत कायदेमंडळाला जबाबदार असून तो आपली जबाबदारी शिक्षणखात्याच्या सहाय्यानें पार पाडीत असतो. म्हणजे शिक्षणखातें हें लोकनियुक्त मंत्र्याचें कार्य करण्याचें साधन आहे. इंग्लंडमध्येंहि पार्लमेंटला जबाबदार असणारा सचीव 'मध्यवर्ति शिक्षणमंडळा-(Central Board of education) चा अध्यक्ष असतो व हें मध्यवर्ति शिक्षणमंडळ स्थानिक शिक्षणसंस्थांवर कायद्यानें आंखून दिलेल्या क्षेत्रांत देखरेख करीत असतें.' मुंबईप्रांताप्रमाणें इंग्लंडमध्येंहि या स्थानिक शिक्षणसंस्थांना सरकारी मदत म्हणून जी आर्थिक मदत मिळते ती या खात्यामार्फत आपण जी मदत करतों ती योग्य प्रकारें खर्च केली जाते किंवा नाहीं हें पहाण्याची शिक्षणखात्यावर जबाबदारी असून मुंबई प्रांतांत सरकारतर्फे बोर्डाचे दरसाल हिशेब तपासले जातात त्याप्रमाणें इंग्लंडमध्येंहि शिक्षणखातें या बाबतींत डोळ्यांत तेल घालून पहाणी करतें. कांहीं कांहीं बाबतींत सरकारची मंजुरी घेण्याची अट घालून त्या त्या बाबतींत स्थानिक संस्थांच्या शिक्षणविषयक कारभाराला मर्यादा घातल्या आहेत, हें आपण मागें पाहिलेंच आहेच. त्याचप्रमाणें खात्याला कांहीं बाबतींत नियम करण्याचा कायद्यानें अधिकार देण्यांत आलेला असल्यामुळेंहि, स्थानिक संस्थांच्या कारभारावर खात्याला नियंत्रण करण्याची संधि मिळाली आहे. इंग्लंडमध्येंहि कायद्यानें स्थानिक संस्थांनीं कांहीं बाबतींत खात्याची मंजुरी घेतली पाहिजे असा लगाम

ठेवला असून, खात्याला कोणत्या बाबतींत नियमन करण्याचा अधिकार आहे, तेंहि स्पष्ट केलें आहे.‡

ज्या बाबतींत खात्याच्या हातांत लगाम ठेवले आहेत त्या बाबी वगळल्यानंतर ज्या गोष्टी स्थानिक शिक्षणसंस्थांना करण्याची पूर्ण मुभा आहे त्या गोष्टी करतांना इंग्लंडमधील शिक्षणखातें मुळींच, काडीइतकीही ढवळाढवळ करीत नाहीं. या दृष्टीनें पहातां इंग्लंडमधील स्थानिक शिक्षणसंस्थांना इतर देशांतील स्थानिक शिक्षणसंस्थांपेक्षां अधिक स्वातंत्र्य आहे § हें नमूद करणें जरूर आहे.

हंटर कमिशननें १८८३ सालीं आपल्या शिफारशी करतांना 'स्कूल बोर्डांना अधिक स्वातंत्र्य देणें जरूर असून सरकारी अधिकाऱ्यांना कोणत्या बाबतींत बोर्डाच्या कारभारांत हात घालतां येईल त्या बाबी स्पष्टपणें कायद्यानें नमूद करणें जरूर आहे' असें मत प्रतिपादन केलें होतें. स्कूल बोर्डाला शक्य तितके अधिक अधिकार देण्यांत यावेत अशी हंटर कमिशनची जोराची शिफारस होती;¶ परंतु ती शिफारस केल्यानंतर सुमारें ४० वर्षें गेलीं तरी त्या शिफारशीप्रमाणें कांहींच तजवीज करण्यांत आली नाहीं व त्यामुळें १९२३चा प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास होईपर्यंत शिक्षणाबाबत सर्व सत्ता खात्याच्याच हातांत केंद्रीभूत झाली होती.

१९२३ च्या कायदे-मंडळापुढें चर्चेसाठीं असतांना त्या वेळचे शिक्षणमंत्री रॅंगलर परांजपे यांनीं 'सदरचा कायदा पास करून स्थानिक संस्थांना शैक्षणिक स्वायत्ता (Educational Autonomy) देण्याचा सरकारचा हेतु आहे,' असें आपल्या भाषणांत सांगितलें. त्या कायद्याच्या कलमांचा विचार केल्यानंतर, व पूर्वीची परावलंबन स्थिति लक्षांत घेतल्यानंतर १९२३ च्या कायद्यानें पुष्कळच लांबचा पल्ला मारला आहे, हें कबूल करावें लागतें; परंतु त्या कायद्याची गेलीं १५ वर्षांची अम्मलबजावणी पहातां मन नाराज होतें. १९२३ च्या कायद्याप्रमाणें प्रत्येक स्थानिक संस्थेच्या अधिकारक्षेत्रांतील प्राथमिक शिक्षणाच्या विस्ताराची जबाबदारी त्या त्या स्थानिक संस्थेवर टाकण्याचा सरकारचा हेतु होता. इंग्लंडमध्यें स्थानिक-शिक्षण-संस्थांची आपल्या अधिकारक्षेत्रांत शिक्षणाच्या वाढीच्या योजना तयार करून या सरकारच्या मंजुरीसाठीं सादर कराव्या व त्या मंजूर करून सरकारनें त्या

---

‡ B. of E. p. 178. § B. of E. p. 177.

¶ हंटर क. रि. पा. १४१.

अमलांत आणण्यासाठीं द्रव्यसहाय करावें अशी जी प्रथा कायद्यानें अमलांत आली आहे त्याचें अनुकरण इकडेहि करण्यांत येऊन स्थानिक संस्थांनीं ऐच्छिक अगर सक्तीच्या तत्त्वावर शिक्षणवाढीसाठीं योजना तयार करून सरकारकडे पाठवाव्या व त्या सरकारनें मान्य केल्यानंतर कांहीं ठराविक प्रमाणांत सरकारनें त्या अमलांत आणण्यासाठीं आर्थिक मदत करावी अशी क़ायद्यानें तरतूद केली. परंतु अनेक स्थानिक संस्थांनीं त्याप्रमाणें योजना करून पाठविल्या असतांहि सरकारनें त्या आर्थिक अडचणीच्या सबबीवर मंजूर करण्याची टाळाटाळ केली आहे. १९२२ ते १९३६ पर्यंत मुंबई प्रांतांत शिक्षणाचें पाऊल किती पुढें पडलें व शाळांची व विद्यार्थ्यांची वाढ किती झाली हें आपण विस्तारानें मागें पाहिलें आहेच.

सरकारच्या या धोरणामुळें लोक प्रतिनिधींचें बहुमत असलेल्या स्थानिक संस्थांची मोठी केविलवाणी स्थिति झाली आहे. आपले प्रतिनिधी म्हणून शाळांसाठीं किंवा जादा प्रसारासाठीं निरनिराळ्या गांवचें लोक सारखी मागणी करीत असतात परंतु सरकार जादा खर्चाची मंजुरी देत नसल्यामुळें आहे या भांडवलावरच कसातरी भातुकलीचा संसार स्थानिक संस्थांना करावा लागतो व त्यासुळें लोकांत नानुष्की येते.

स्थानिक संस्थांच्या खात्यावर दुसरीकडूनहि एक घाला येतो. शाळांच्या कारभाराची जबाबदारी पूर्वी खात्याकडे होती ती स्थानिक संस्थांकडे गेल्यामुळें खात्यांतील तपासनीस (Inspector) व इतर अधिकारी हे केवळ टीका करण्याच्या दोघैक दृष्टीनेंच स्थानिक संस्थांच्या कारभाराकडे पहात आहेत, असें अनुभवानें वाटू लागलें, जबाबदारी असली म्हणजे दोष काढणारी लेखणी जबाबदारीच्या जाणिवेच्या पायबंदानें जखडलेली असते. परंतु जबाबदारी कांहीं नसतां नुसत्या तपासणीच्या निमितानें दोष काढण्याच्या मोहिमेवर बाहेर पडलेली पगारी सेना स्थानिक संस्थांना कसा जीव नकोसे करते याचा अनुभव स्थानिक संस्थांत असल्यावाचून येणार नाहीं. खात्याला स्थानिक संस्थांबद्दल आपलेपणाचा, सहानुभूतीचा ओलावा मुळींच नसतो, असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें, निदान तो फारच कमी प्रमाणांत असतो. लोक प्रतिनिधींना मार्गदर्शक होणारा सल्ला देण्याच्या ऐवजी त्यांच्यावर कठोर टीकेची आग

पाखडण्यांत येते व त्यामुळें खात्यांच्या अधिकाऱ्याकडे पहाण्याचा स्थानिक संस्थांचाहि कोन बदलतो.

खात्याच्या अधिकाऱ्यांचे हें स्नेहशून्यतेचें धोरण व्हावयास आणखी एक कारण आहे. हल्लीं बहुतेक जिल्हा बोर्डें व स्कूल बोर्डें शेतकरी वर्गाच्या प्रतिनिधींच्या हातांत गेलेलीं आहेत व त्यामुळें पूर्वी ज्या पुढारी वर्गाच्या—बिगर-शेतकरी समाजाच्या—हातांत सत्ता होती ती नाहींशी झाली आहे. 'कर देणारांच्या हातांत त्या कराची व्यवस्था करण्याचें कार्य असणें' हें तत्त्व प्रजासत्ताक राज्य-पद्धतीचा आत्मा आहे. जिल्हा बोर्ड्स व स्कूल बोर्ड्स हीं शेतकरी वर्गाच्या पैशावर चाललेलीं असल्यामुळें ती त्याच वर्गाच्या तंत्रानें चालणें जरूर आहे. शहरांत कर भरणारांच्या पैशावर म्युनिसिपालिटीचा कारभार चालतो. अशा म्युनिसिपालिटींत शहरशीं संबंध नसलेल्या खेडयांतील लोकांची गर्दी झाली तर 'आमच्या म्युनिसिपालिटींत या खेडवळांचें काय काम आहे' म्हणून आम्ही एकत्त हाकाटी करूं! शेतकरीवर्गाला स्थानिक-स्वराज्याची कल्पना नसल्यापुळें जिल्हा लोकल बोर्डाच्या अगर त्यांच्या स्कूल-बोर्डाच्या अधिकाराचीं सूत्रें आरंभीं कांहीं काल पुढारलेल्या बिगर शेतकरी-समाजाच्या हातांत होतीं. तीं सूत्रें शेतकरी वर्गांत जागृति होऊन, त्यानें न्याय्य रीतीनें आपल्या हातांत घेतांच प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या तत्त्वाचा राजकारणांत सतत जप करणाऱ्या वर्गांना वैषम्य कां वाटावे? अज्ञान हा सज्ञान झाल्यानंतर त्याच्या इस्टेटीचा हिशेब देतांना पालकाला वाईट वाटूं नये, हें तत्त्व चांगलें असलें तरी मनुष्यस्वभावाप्रमाणें त्याला वाईट वाटतेंच ना?

खात्याचे अधिकारी बहुतेक पुढारलेल्या वर्गाचे असल्यामुळें शेतकरी-वर्गाच्या हातांत गेलेला सत्तेचा ससा पहातांच त्यांना वाईट वाटतें व त्यामुळें त्या वर्गाला नालायक ठरविण्याच्या अंतस्थ हेतूनें त्यांच्या टीकेंत अधिक कडवटपणा उत्पन्न होतो. हें विधान वाचून कांहीं लोकांना राग येण्याचा संभव आहे. परंतु लेखकाला निरनिराळ्या जबाबदारीच्या जागेवर काम करतांना अधिकाऱ्यांच्या या वृत्तीचा जो अनुभव आला आहे त्या अनुभवाच्या आधारावरच, पूर्ण जबाबदारीनें, वरील विधान करण्यांत आलें आहे.

कारणें कांहींहि असलीं तरी स्थानिक संस्थांच्या हातांत पूर्णपणें दिलेल्या बाबींतहि ढवळाढवळ करण्याचा शिक्षणखात्यांतील कांहीं अधिकाऱ्यांचा खटपट चालू असते, यांत मात्र शंका नाहीं. आपल्या अधिकारांवर नियंत्रण

घालणाऱ्या या प्रयत्नाला विरोध करण्याकरितां स्थानिकसंस्थांचा बराच वेळ व शक्ती खर्च होते व अधिकारासाठीं होणाऱ्या या निकराँच्या झगड्यांत दोन्ही पक्षांना आपल्या खऱ्या कर्तव्याचा विसर पडून देशाचें नुकसान होतें.

स्थानिकसंस्थांच्या कारभाराच्या बाबतींत अनेक आक्षेप घेण्यांत येतात, त्यांचाहि येथें विचार करणें विषयास धरून होईल.

पहिला महत्त्वाचा आक्षेप असा कीं, "शिक्षणप्रसाराच्या मोहिमेचा आराखडा निश्चित न करतां नवीन शाळा सुरू करण्याची किंवा नवीन शाळांस मदत करण्याची घातुक प्रवृत्ति दिसून येत असून, त्यामुळें शाळा-शाळांमध्यें नुकसानकारक स्पर्धा सुरू होते व साहजिकच पैसा व प्रयत्न फुकट जातात."† या आक्षेपांत थोडेसें सत्य असलें तरी या दोषाची खरी जबाबदारी स्थानिक संस्थांपेक्षां सरकारावरच अधिक येते. सरकारनें सक्तीच्या तत्त्वाची अंमलबजावणी न केल्यामुळें अनेक शाळांना हजेरी कमी पडते व ती हजेरी नियमानें* घालून दिलेल्या प्रमाणाखालीं गेली कीं ती शाळा बंद करावी लागते. शाळा बंद केली नाहीं तर सरकार तिचा खर्च नामंजूर करते. अर्थात् ही बंद शाळा दुसरीकडे, जिकडे मागणी असेल तिकडे, बसी करावी लागते. अर्थात् ज्या ठिकाणीं ही शाळा बसी करण्यांत येईल त्या ठिकाणीं ही शाळा नवीन उघडली, असें म्हटलें तरी वस्तुतः बोर्डानें उगीच नवीन शाळा सुरू केली असें म्हणतां येणार नाहीं. जुन्या शाळा बंद पडल्यामुळें एकंदर शाळांच्या संख्येंत फेरबदल न होतां नवीन शाळा उघड-ण्याचा प्रसंग बोर्डावर येतो. ही नवीन शाळा मागणीप्रमाणें बोर्डानें उघडूं नये तर काय करावें? त्या शाळेच्या शिक्षकांची काय सोय करावयाची? १९२२ सालीं ज्या एकंदर शाळा होत्या त्या शाळांची संख्या १९३२ सालीं किती झाली हें आपण दुसरीकडे पाहिलें आहे. मुंबई प्रांतापुरताच विचार करावयाचा झाल्यास १९२२ सालीं एकंदर प्राथमिक शाळा १२६२२ होत्या व १९३२ सालीं त्यांची संख्या १३११० झाली म्हणजे एकंदर सरकारी बोर्डाच्या, मदतीच्या, बिनमदतीच्या अशा सर्व शाळांची एकंदर वाढ ४८८ झाली. १९२३ चा कायदा पास झाल्यानंतर प्राथमिक शिक्षणाची खरी सूत्रें स्कूल बोर्डाच्या ताब्यांत गेलीं. पुणें जिल्हा बोर्डानें सप्टेंबर १९२६ रोजीं शिक्षणाचा ताबा घेतला त्या वेळीं सरकारकडून बोर्डाच्या ताब्यांत सरकारी

† हारटॉग क. रि. पा. ३२४. * प्रा. शि. नि. ११२ (I) IV.

५७९ व मदतीच्या १११ मिळून ६९० शाळा मिळाल्या. आतां १९२७च्या मार्चअखेर बोर्डांच्या हद्दींत बोर्डाच्या ६२३ व मदतीच्या ११७ मिळून ७४० शाळा आहेत. म्हणजे सुमारें १० वर्षांच्या कालांत बोर्डानें फक्त ४४ नवीन किंवा जादा शाळा उघडल्या. हें प्रमाण आक्षेप घेण्याइतकें आहे काय?

हजेरीची सरासरी कमी पडली म्हणजे ती शाळा बंद करून दुसरीकडे वर्ग करावी लागते त्याला कांही उपाय नाहीं. सरकारनें सक्तीच्या तत्त्वाची अम्मलबजावणी केली तर हा असा प्रसंग येणार नाहीं. परंतु आर्थिक अडचणीच्या मामुली सबबीवर सरकार कांहीं करीत नाहीं, मग बोर्डानीं त्याला काय करावें?

सरकार नवीन योजना मंजूर करीत नाहीं, उलट, वाटेल तशी भरमसाट कपात लावून स्कूल बोर्डांची उपासमार करीत असतांना, वाढीची योजना काय करणार? असलेले शिपाईच उपासमारीनें दुर्बल झालेले असतांना मोहिमेची योजना कोणत्या सेनानायकाला करतां येणार आहे?

दुसरा आक्षेप कीं "स्थानिक संस्थांमधून जातवारीचें तत्त्व फार बोकाळलें आहे व याच तत्त्वावर शिक्षक व अधिकारी नेमण्यांत येतात." हल्ली शेतकीवर उपजीविका करणाऱ्या मागासलेल्या वर्गांना स्थानिक स्वराज्याच्या कारभारांत लक्ष घालण्याची बुद्धि होऊं लागली आहे हीं गोष्ट खरी आहे. ज्याचा पैसा त्यालाच त्या पैशाच्या व्ययावर अधिकार असणें जरूर असल्यामुळें शेतकरी वर्गाचें लोक स्थानिक स्वराज्याच्या कारभारांत लक्ष घालू लागले ही गोष्ट कोणाहि प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या खऱ्या उपासकास आनंददायक वाटली पाहिजे. परंतु एरवीं आनंददायक वाटणारी ही गोष्ट शेतकरी समाजांतील जागृतीमुळें ज्यांच्या हातून सत्ता गेली त्या वर्गांना वाईट वाटूं लागलीं असून या वर्गांत तोंडाचा व लेखणीचा उपयोग करणारी मंडळीं असल्यामुळें या आक्षेपाची विनाकारण धूळ उडविली जात आहे, असें म्हणावें लागतें. जातवारीच्या तत्त्वावर शिक्षकांची व इतर अधिकाऱ्यांची निवड करण्यांत येते असें वादाकरितां खरें मानलें तरी तसें करणें बरें कां वाईट याचा दुसरीकडे विचार केला आहेच. येथें सूत्ररूपानें थोडक्यांत बोलावयाचें म्हणजे, ज्या वर्गांचीं मुलें शिकावयाचीं त्याच वर्गांचे शिक्षक असले तर आपलेपणानें शिक्षण देतील. "हिंदी लोकांच्या पैशावर हिंदी अधिकाऱ्यांची नेमणूक केली पाहिजे व राज्यसूत्रें हिंदी लोकांच्या हातांतच असलीं पाहिजेत" या राजकारणांत गोड वाटणाऱ्या तत्त्वाचा

शेतकरी वर्गाच्या दृष्टीनें विचार केला कीं "शेतकरी वर्गाच्या पैशावर चालणाऱ्या शाळाखात्यांत शेतकरी वर्गांतील लोकांचा भरणा होऊन त्या खात्याचीं सूत्रें शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींच्याच हातांत असणें जरूर आहे" हें तत्त्वही योग्य वाटू लागतें.

या आक्षेपाला दुसरेंहि उत्तर आहे. मागासलेल्या वर्गाचे लोक जातिनिष्ठतेच्या तत्त्वावर नेमणुका करतात असे आक्षेप घेणारे बुद्धिवान लोक स्वतः काय करून आहेत? ज्या जातीच्या हातांत जी संस्था असेल त्या संस्थेंत इतर जातीच्या इसमास, तो पूर्ण लायक असला तरी, वाव मिळतो का? पारशी आपल्या गिरण्यांमधून पाराश्यांचीच वर्णी लावतात, ही ओरड आपण ऐकली नाहीं का? न्यायखात्यांत व रजिष्टर खात्यांत एका विशिष्ट जातीच्या लोकांचाच बेसुमार भरणा कशामुळें दिसून येतो? एखाद्या डिस्ट्रिक्ट कोर्टाचा क्लार्क ऑफ दि कोर्ट हा ज्या जातीचा असेल त्या जातीचाच भरणा कारकुनापासून पट्टेवाल्यापर्यंत अधिक झालेला कां दिसून येतो? शिकलेल्या वर्गांना जर हा जातिनिष्ठेचा आरोप लावतां येत नाहीं तर मग शेतकवर्गाच्या प्रतिनिधींनाच कां दोष देण्यांत यावा? गुजराथी गुजराथ्यांकरितां व दक्षिणी दक्षिण्यांकरितां हीं ओरड कां?

हातीं सत्ता आल्यानंतर शेतकरीवर्गाच्या मागासलेल्या जातीनी हा आक्षेप घेण्यासारखें कांहीं केलें आहे का हें आतां पाहूं व त्यासाठीं पुणें जिल्हाबोर्डाचें व स्कूलबोर्डाचें उदाहरण घेऊं.

पुणें जिल्हा लोकलबोर्डानें आपल्या हद्दींतील शिक्षणाचा ताबा १।९।२६ रोजीं घेतला. त्यापूर्वी शिक्षकांच्या नेमणुका खात्यामार्फतच होत असत. बोर्डानें शिक्षणाचा ताबा घेतल्यानंतर स्कूलबोर्डाचे अॅ. ऑफिसर व चेअरमन हे १९३१ पर्यंत पुढारलेल्या वर्गाचेच होते व शाळाबोर्डाची सत्ता त्याच्या हातांतच होती. १९३१ सालीं जुलै महिन्यापासून चेअरमन म्हणून मागासलेल्या वर्गांतील रा. वा. ग. जगताप हे निवडून आले व फेब्रुवारी १९३३ मध्यें मागासलेल्या वर्गांतील रा. गीते हे अॅ. ऑफिसर म्हणून काम करूं लागले. आतां पुणें जिल्हा स्कूलबोर्डाच्या हाताखालीं ताबा घेतला त्यावेळीं, रा. जगताप चेअरमन निवडून आल्यावेळीं व ३१।३।३७ रोजीं निरनिराळ्या वर्गांचे एकंदर शिक्षक किती व काय प्रमाणांत होते हें पाहूं व त्यासाठीं खालीं तक्ता दिला आहे.

तक्ता नं० ३५

	ब्राह्मण	मराठा	प्रार्थना समाज	जैन	इतर	एकंदर
१ ताबा धेतला त्यावेळीं शिक्षकांची संख्या व जातवारी.	६४७	३४६	६९	४५	७	११९४
शें. प्रमाण.	५८·०७	३१·०	६·२८	४·०३	·६२	१००·
२ जुलै १९३१ चे सुमारास असलेली शिक्षकांची संख्या व जातवारी.	७०४	४५१	६७	५१	५	१२७८
शें. प्रमाण.	५५·०८	३५·२९	५·२५	३·९९	३९	१००·
३ ता.३१।३।३७ रोजीं असलेली शिक्षकांची संख्या व त्यांची जातवारी.	६२८	४४७	६९	५५	१०	१२०९
शें. प्रमाण.	५१ ९४	३६·९७	५·७१	४·५५	·८३	१००·

या तक्त्यांत पुढारलेल्या वर्गाचे म्हणून जे शिक्षक दाखविले आहेत त्यांमध्यें शेंकडा ९५ पेक्षां अधिक भरणा एकाच जातीचा म्हणजे ब्राह्मणांचा आहे. शिक्षकांतील निरनिराळ्या जातींच्या शिक्षकांचें प्रमाण पाहिल्यानंतर आतां लोकसंख्येंत या निरनिराळ्या जातींचें प्रमाण काय आहे तें पाहूं.

चंदावरकर कमिटीनें आपल्या अहवालाचें पा. ७ वर १९२१ च्या खानेसुमारीवरून काढलेले जातवारीचे आंकडे दिले आहेत.

तक्ता नं० ३६

जात	शेंकडा	जात	शेंकडा
१ ब्राह्मण	४	३ मुसलमान	८
२ ब्राह्मणेतर हिंदु	८४	४ इतर	४

१९३१ च्या खानेसुमारीच्या अहवालांत पा. ४९४ वर जे आंकडे दिले आहेत, ते पहातां स्थूलमानानें निरनिराळ्या वर्गांचे किंवा जातींचे वरील प्रमाणच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

लोकसंस्थेंतील जातवारीचें प्रमाण व शिक्षकांतील जातवारीचें प्रमाण पाहिल्यानंतर लोकसंख्येंत शेंकडा ४ या प्रमाणांत असलेल्या वर्गाच्या शिक्षकांत शेंकडा ५० पेक्षां अधिक प्रमाण आहे व शेंकडा ९६ असलेल्या लोकांच्या वांट्याला शेंकडा ५० पेक्षांहि कमी जागा आल्या आहेत.

१९२६ सालीं ताबा घेतल्यानंतर पुढारलेल्या वर्गाचे चेअरमन व ॲ. ऑफिसर असतांना मागासलेले मुसलमान व इतर वर्गांचें शिक्षकांतील शेंकडा प्रमाण घटलें आहे व १९३१ नंतर शेतकरी वर्गाच्या हातांत तीच सत्ता आल्यानंतर या वर्गाचें शेंकडा प्रमाण वाढलें आहे. १९२६ पासून १९३७ पर्यंत पुढारलेल्या वर्गाचें शेंकडा प्रमाण फक्त ६·१३ नेंच घटलें आहे. यावरून शेतकरी वर्गाच्या सभासदांनीं आपल्या सत्तेचा दुरुपयोग केला असें म्हणतां येईल का? एका विशिष्ट वर्गाचीच चैन, बाकीच्या वर्गाच्या जिवावर चालावी असें म्हणणाऱ्या लोकांचें समाधान करणें शक्य नाहीं.

बोर्डाच्या ताब्यांत शाळा गेल्यापासून शिक्षणाचा दर्जा कमी झाला हा तिसरा आक्षेप आहे. या आक्षेपाचा खरा उगम 'गेलें तें चांगलें' असें जें मनुष्याला वाटतें त्या भावनेच्या पोटीं झाला आहे. मनुष्यप्राण्याला भूतकालाविषयीं कौतुक, वर्तमानकालाविषयीं नापसंती व भविष्य कालाविषयीं आशा वाटत असते. प्राथमिक शिक्षणच काय परंतु भूतकालीन प्रत्येक गोष्ट चांगली असें अनेक लोकांना वाटतें व त्यामुळें 'पूर्वी फार चांगलें होतें, आतां कांहीं राहिलें नाहीं' अशी त्यांची नेहमीं कुरकूर चाललेली असते. भूतकालांत

नारळाएवढे आंबे व आंब्याएवढीं बोरें झाडाला येत असत अशा समजुतीनें वर्तमानकालच्या आंब्यांना व बोरांना नांवें ठेवीत ते खाण्याची कांहीं लोकांना संवयच असते. प्राथमिक शिक्षणाप्रमाणें पूर्वीच्या काळचें इंग्रजी शिक्षणहि फार चांगलें होतें. पूर्वीच्या काळच्या तीन इयत्ता शिकलेल्या माणसाचें जें इंग्रजी असे तें आतां पदवीधराचें नसतें, असेंहि कांहीं लोक नेहमीं ओरडत असतात. परंतु या अशा कुरकुरीनें गांगरून जाण्याचें कांहींच कारण नाहीं. उलट, शिक्षणाच्या पद्धतींत अलीकडे ज्या सुधारणा झाल्या आहेत त्यामुळें पूर्वीच्या व आतांच्या शिकविण्याच्या प्रकारांत इष्ट असा बदल झाला आहे व या बदलाचा चांगला परिणाम डोळे उघडून पहाणारास दिसल्यावांचून रहात नाहीं.

हल्लीच्या बोर्डांच्या कारभाराबद्दल जे दोष मुख्यत्वें दाखविण्यांत येतात त्यांचा आम्ही थोडक्यांत परामर्ष घेतला आहे. परतु घेण्यांत येणाऱ्या आक्षेपांना आम्ही जीं उत्तरें दिलीं आहेत त्यांवरून आम्हाला बोर्डाचा कारभार पूर्णपणें निर्दोष वाटतो, अशी कोणी कल्पना केल्यास ती बरोबर होणार नाहीं. बोर्डाच्या कारभारांत पुष्कळच दोष आहेत. पहिला दोष म्हणजे बोर्डाच्या कामांत झालेला वशिलेबाजीचा सुळसुळाट ! कांहीं सभासदांना व कांहीं अधिकाऱ्यांना स्नेहीजनांची भीड पडते तर कांहीं सभासदांना व कांहीं अधिकाऱ्यांना रुपेरी नाण्यांची गळ पडते. कांहीं शिक्षक सभासदाकडे वशिला लावण्याच्या कामांत फारच तरबेज झालेले आहेत यांत कांहीं शंका नाहीं. एखाद्या सभासदाकडे वशिला लावावयाचा झाला म्हणजे ओळखीनें ओळख काढीत जाऊन अखेर त्या सभासदाला बिनतोड शह लावल्यावांचून ते रहात नाहींत. हा वशिला लावतांना तो सभासद कोणत्या धंद्यांत आहे, त्याच्या धंद्याच्या दृष्टीनें तो कोणावर अवलंबून आहे व कोणाचा शब्द मोडणें त्याला स्वतांला नुकसानीचें वाटण्याचा संभव आहे याचा दूरवर विचार करून त्या तशा जबरदस्त माणसाचा वशिला भिडविण्यांत येतो व तो भिडविल्यानंतर 'रामबाण' औषध दिल्याप्रमाणें हटकून गुण येतो. एखादा सभासद वकील असला तर त्याच्यावर मॅजिट्रेट सोडण्यांत येतो. एखादा सभासद आर्थिक अडचणींत असला तर त्याचा सावकारच किंवा, भावी सावकार होण्याची ज्याची पात्रता आहे, असा एखादा श्रीमंत मनुष्य गाठून त्याचा त्याला मोर्चा लावण्यांत येतो. सभासद धंद्यानें सरकारी इमारतीचा कॉन्ट्रॅक्टर असला कीं पब्लिक

वर्क्स डिपार्टमेंटमधला अधिकारी भीड घालण्यासाठीं पुढें करण्यांत येतो. अगदींच असा 'रामबाण वशिला' नाहीं मिळाला तर सभासदांचा जिवलग स्नेही गाठून त्याच्याकडे हें काम सोपविण्यांत येतें व तोही स्नेहाच्या जोरावर 'हात धरून हें काम करून घेतों' अशी खात्री देऊन या कामाला लागतो.

बोर्डाचे सभासद साधारणपणें विशेष न शिकलेले व मध्यम स्थितींतील असले तर त्यांनीं या वशिल्यास बळी पडणें साहजिक आहे; कारण त्यांच्या अंगांत असावा तितका नेटकपणा नसतो, असें म्हणतां येईल. परंतु बोर्डांत आलेले चांगले शिकलेले लोकहि ज्या वेळीं या वशिल्याला बळी पडून बोर्डाच्या हिताविरुद्ध एखादी गोष्ट करून घेण्याचा निकराचा आग्रह धरतात त्या वेळीं फार वाईट वाटतें. कमी शिकलेल्या सभासदाला वशिला लागला असला आणि त्यांनीं एखाद्या गोष्टीबद्दल आग्रह धरला तरी खंबीर मनाचा अध्यक्ष त्याला आग्रह सोडून देण्यास लावूं शकतो, किंवा त्याला चूप बसवूं शकतो. परंतु शिकलेला मनुष्य वशिल्याच्या पटकींनें पछाडला कीं त्याला दुरुस्त करणें मोठ्या धन्वंतऱ्यालाहि शक्य नसतें.

सभासद या वशिल्याला बळी पडतात याचें कारण त्यांच्या पैकींपुष्कळांच्या अंगीं सार्वजनिक कामाबद्दल जितकी कळकळ असावी तितकी नसते हें होय. सार्वजनिक कामांत चोखपणा असणें अतिशय जरूर आहे. खाजगी कामांत भिडेला मनुष्य बळी पडला तर त्याचें वैयक्तिक नुकसान होईल. परंतु सार्वजनिक जबाबदारी असणारा मनुष्य भिडेला बळी पडला तर समाजाचें नुकसान होतें आणि म्हणून सार्वजनिक कार्यांत भिडेला बळी पडतां कामा नये. परंतु लोकांची वागणूक मात्र याच्या उलट असते. खाजगी कामांत भीडमुर्वत न ठेवणारा सभासद सार्वजनिक कामांत अतिशय भिडस्त बनतो. मुलानें घरीं खिशांतून पैसा न विचारतां घेतला तर त्याच्या हाताला डाग देणारा रामशास्त्री प्रभुणे बोर्डाच्या शेकडों रुपयांचा अपहार करणाऱ्या शिक्षकाला, वशिल्याच्या जादूमुळें दयेचा सागर बनून, माफी करण्याबद्दल कंठशोष करूं लागतो. उपाशीं तडफडणारा अंधळा मनुष्य दिसला तर स्वतांच्या खिशांतील खोटा पैसाहि त्याला न देणारा कवडीचुंबक वशिल्यानें भारला गेला कीं, नालायक माणसाला भरमसाट बढती देण्याच्या कामीं उदार कर्ण बनतो.

वशिल्याच्या बाबतींत बोर्डाच्या सभासदांनी अतिशय कठोर मन ठेवणें जरूर आहे. एखाद्या शिक्षकावर अगर नोकरावर अन्याय होत असून जर

तो कोणीं नजरेस आणला व तो दूर करण्यासाठीं वशिला आला तर स्पष्टपणें वशिला लौवण्यासाठीं येणाऱ्या माणसाला खरी परिस्थिति समजाऊन सांगावी. पुष्कळ वेळां वशिल्यासाठीं येणाऱ्या गृहस्थांना खरी परिस्थिति माहीत नसते, उलट, त्याचा कांहींतरी गैरसमज करून देऊन त्याला वशिला लावण्यासाठीं उद्युक्त केलें जातें. अशा माणसाला खरी वस्तुस्थिति आपण सांगितली तर तो आपला आग्रह ताबडतोब सोडून देतो, असा या लेखकाचा अनेक वेळांचा अनुभव आहे. त्यानें आपला आग्रह सोडला नाहीं तरी आपली पवित्र जबाबदारी स्मरून सभासदानें खंबीर मनानें वागणें जरूर आहे व त्याशिवाय कारभारांत उच्च दर्जाची कार्यक्षमता उत्पन्न होणार नाहीं. प्रथम कांहीं वशिलेबाजांना नाखूष करावें लागलें तरी अखेर 'अमक्या सभासदाकडे वशिला लागत नाहीं' असा चहूकडे पुकारा झाला म्हणजे लोक त्याच्याकडे कमी येऊं लागतात व कांहीं कालानें त्याच्या मागचा ससेमिरा पूर्णपणें सुटतो.

केवळ स्नेहांच्या किंवा नातेवाईकांच्या शब्दाला मान देण्याच्या हेतूनें वागणाऱ्या सभासदाबद्दल हा विचार झाला. परंतु नाणें घेऊन काम करणाऱ्या सभासदाबद्दल काय म्हणतां येईल ? आपल्या उदरनिर्वाहाची सोय करण्यासाठीं बोर्डांत गेलेला सभासद हा जनतेचा एक शत्रूच आहे. कांहीं कांहीं बोर्डांतून अशा सभासदांचा बराच सुळसुळाट झाल्याचें दिसून येतें. विशेषतः असा सभासद बोर्डातील अधिकाराच्या जागेवर असल्यानंतर अतिशय धुमाकूळ उडवितो. बदलीला किती पैसे, बढतीला किती, ट्रेनिंग कॉलेजमध्यें निवड करण्यासाठीं किती, पोस्टाचा फायदा देण्यासाठीं किती, पहिल्या प्रथम नेमणूक करण्यासाठीं किती व क्रमिक पुस्तकें लागू करण्यासाठीं किती, असे दरच ठरविल्यासारखे असतात व गरीब गरजू लोक त्याप्रमाणें पैसे देऊन आपलें कामहि करून घेतात. एका स्कूल बोर्डाचे अध्यक्ष फिरतीवर जातांना बायकामुलें घेऊन जात असत व ठिकठिकाणीं त्यांच्या कुटुंबाला लुगडेचोळी घेऊन व मुलांना खाऊसाठीं रोख रक्कम देऊन शिक्षकांना त्यांची बोळवण करावी लागत असे. सभासद अप्रामाणिक असला तर सब-रजिष्ट्रारच्या जागेप्रमाणें तोहि भरभराट कमाई केल्यावांचून रहात नाहीं.

सभासद पैसेखाऊ असले म्हणजे अधिकाऱ्यांनाहि त्याचें अनुकरण करण्याचा मोह अनावर होतो व सभासद व अधिकारी हात पुढें करणारे असल्यानंतर बिचाऱ्या गरीब नोकरवर्गाचें पुरें दुर्दैव पुढें उभें राहिल्यासारखें होतें.

पोटाला चिमटा घेऊन व कच्चीं वच्चीं उपाशी ठेऊन त्यांना सभासदांच्या व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या चमचमीत सरबराईकरितां तयारी करावी लागते व अखेर नोकरवर्गाहि सादिलासाठीं अगर शाळागृहांच्या किरकोळ दुरुस्तीसाठीं आलेली रक्कम आपलीच समजून वागूं लागतो. म्हणजे बोर्डाच्या अध्यक्षाच्या किंवा सभासदाच्या अप्रामाणिकपणाच्या काटेरी व विषारी झुडुपाचीं मुळें हलके हलके अगदीं खालच्या नोकरवर्गापर्यंत जाऊन आर्थिक अनाचार वाढून सार्वजनिक हिताची मोठी होळी भडकली जाते.

हा दोष नाहींसा करण्यासाठीं लोकमत प्रखर बनविणें व असा एखादा सभासद किंवा अधिकारी सांपडल्यावर त्यावर कायदेशीर इलाज करून त्याला शासन करणें, असें दोनच उपाय आहेत. लोकमत प्रखर करणें प्रयासाचें व कालावधीचें होणारें काम असून गुन्हेगार दिसला तरी त्याची गुन्हेगारी शाबीत करणें कठीण असल्यामुळें त्याहि उपायाचा विशेष उपयोग होत नाहीं. लोकमत जागृत होत जाईल तसा तसा लाचखाऊ लोकांना थोडासा हात आखडता घ्यावा लागेल. बदलत्या काळाबरोबर या अशा लोकांच्या वागणुकींतहि बदल होईल या आशेवरच तूर्त तरी स्वस्थ बसणें जरूर आहे.

दुसरा महत्त्वाचा दोष म्हणजे बोर्डांत निवडून येणाऱ्या लोकांत कमी शिकलेल्या लोकांचा फार मोठा भरणा असतो हें होय. बोर्डें शहरांतील असोत नाहींतर शहराबाहेरचीं असोत अधिकारलालसेनें किंवा मानाच्या कल्पनेनें बोर्डांतून नाना प्रकार करून निवडून येण्यासाठीं उमेदवारांची एकच गर्दी उसळते. वास्तविक पहातां ज्या वर्गाच्या पैशावर हीं बोर्डें चालत असतात व ज्या विशेष वर्गांत शिक्षणाचा खरा प्रसार व्हावयाचा आहे अशा वर्गांतील, निदान अशा वर्गाविषयीं पूर्ण आपलेपणा असलेली व शिक्षणविषयासंबंधीं विचार करूं शकतील अशी मंडळीच निवडून येणें जरूर आहे. परंतु तसे होत नसल्यामुळें कमी शिकलेल्या या मंडळीकडून सहेतुकपणें किंवा अहेतुकपणें निरनिराळ्या नियमांची व शिक्षणविषयक तत्त्वांची पायमल्ली होत असते. अशावेळीं बोर्डाचा अध्यक्ष जर खरोखर आपल्या कामांत वाकबगार असला तर तो खंबीरपणानें वागून व लोकांना जरूर त्या गोष्टी समजावून सांगून निमयांच्या पायमल्लीचे प्रसंग टाळूं शकतो. परंतु तोहि अर्धवट शिकलेल्यापैकींच असला कीं मग गोंधळ उडून अधिकारीवर्ग शिरजोर झाल्यावांचून रहात नाहीं. एकेकाळीं बोर्डाचीं सूत्रें शिकलेल्या व पुढारलेल्या वर्गाच्याच हातांत होतीं. परंतु त्या वेळीं त्यानें

'मागासलेल्या वर्गाच्या शिक्षणाच्या दृष्टीनें विशेष कांहीं न करतां आपल्या वर्गाचाच विशेष फायदा करण्यासाठीं मिळालेल्या सत्तेचा उपयोग केला,' अशी मागासलेल्या वर्गाची भावना झाल्यामुळें 'अडाणी असला तरी आपला मनुष्य कारभारी असूं द्या' असें त्यांना वाटूं लागलें आहे. ह्या वाटण्यांत पुष्कळच तथ्य आहे. या भावनेमुळें थोडा घोटाळा उडूं पहात आहे. मागासलेल्या वर्गांपैकींच शिकलेल्या लोकांनाच अधिक भाव मिळाल्यास योग्य होईल. दुर्दैवानें मागासलेल्या वर्गांतील कांहीं शिकलेल्या लोकांनीं आपली वागणूक चांगली ठेवली नाहीं. खिसे भरण्यास सुरुवात केली. त्यामुळें अप्रामाणिक शिकलेल्या माणसापेक्षां प्रामाणिक कमी शिकलेला मनुष्य पुरवेल असें स्पष्ट म्हणणें भाग पडतें. दिवसेंदिवस बोर्डाचे सभासद म्हणून अधिक लायक लोक निवडून येऊं लागले आहेत व बोर्डाच्या कारभारांत चांगली सुधारणा होऊं लागली आहे, ही गोष्ट सरकारहि कबूल करूं लागलें आहे. १९२३ नंतर बोर्डाच्या हातांत अधिक सत्ता देण्यांत आली त्यावेळीं लोकांनीं चुका करीत करीत कारभार करण्यास शिकावें हा सरकारचा हेतु होताच व त्या हेतूप्रमाणें गेल्या दहा वर्षांच्या चुकांनीं लोकांना शहाणें करण्यास सुरुवात केली आहे, यांत मात्र कांहीं शंका नाहीं. आणखी थोडयाच दिवसांत बोर्डाचा गाडा उत्तम तऱ्हेनें चालूं लागेल अशी आनंददायक आशा करण्यास हरकत नाहीं.

पाहूं गेलें असतां इतर किरकोळ स्वरूपाचे अनेक दोष दिसून येतात. परंतु ते किरकोळ स्वरूपाचे असल्यामुळें त्यांचा येथें विचार करणें स्थलसंकोचास्तव शक्य नाहीं. त्यांचा नुसता नामनिर्देश करावयाचा म्हणजे मुख्य शिक्षणाधिकारी (Administrative Officer) याला नियमाप्रमाणें जे अधिकार दिले आहेत त्या अधिकारांच्या बजावणींत वेळोवेळीं ढवळाढवळ करणें, इतर तपासक (Supervisor) यांच्या वर, परीक्षा घेण्याचे बाबतींत विशिष्ट शिक्षकांना अनुकूल प्रतिकूल शेरे देण्याचे बाबतींत, आपलें वजन टाकण्याचा प्रयत्न करणें, सभासदांच्या कार्यकक्षेंत नसलेल्या बारीकसारीक तपशिलाच्या बाबतींत लक्ष घालण्याचा प्रयत्न करणें वगैरे दोष प्रत्येक बोर्डांत कमी अधिक प्रमाणांत दिसून येतातच. परंतु हलके हलके कारभारांत सुधारणा होऊन ते नाहींसें होतील अशी उमेद धरण्यास पुष्कळ जागा आहे.

पंचकमेटी:—प्रत्येक शाळेवर देखरेख करण्यासाठीं त्या गांवांतील

लोकांची एक कमिटी नेमण्यांत येते व त्या कमिटीची शाळेवर थोडीफार हुकमत चालते. म्हणजे शिक्षणखात्यावरील हुकमतीच्या बाबतींत मंत्री हे एक टोक म्हटलें तर गांवकमिटी ही दुसरें व अगदीं खालचें टोक म्हणावयास हरकत नाहीं.

बोर्ड ऑफ एज्युकेशननें १८४५ सालीं जे नियम तयार केले होते त्या नियमांत प्रथम आपणास या कमिटीचा उल्लेख सांपडतो. त्या नियमांपैकीं देशी शाळांसंबंधीं जे नियम आहेत त्यांत "बोर्ड ऑफ एज्यूकेशनेंन नेमलेलें शिक्षकानें देशी भाषेच्या शाळा प्रत्यक्ष स्थानिक कमिटीच्या देखरेखीखालीं व त्या भागा-(Division) च्या मुख्याच्या(Superintendent) नियंत्रणाखालीं चालवाव्यात असें म्हटलें आहे. म्हणजे आज ज्या कमिटीला आपण शाळा किंवा पंचकमिटी म्हणतो त्या कमिटीचा पूर्वी स्थानिक कमिटी असा निर्देश करण्यांत येत असे. १९२३ च्या कायद्याखालीं सरकारनें १९२४ सालीं जे नियम केले आहेत त्या नियमसंग्रहाच्या भाग सातमध्यें (नियम ९४ ते १०८) त्या कमिटीच्या घटनेचें व कार्याचें वर्णन करण्यांत आलें आहे. १८४५च्या नियमाप्रमाणें स्थानिक कमिटी पांच सभासदांची असे. हे पांचहि सभासदांची निवड त्या भागाचा मुख्याधिकारी (Superintendent)करीत असे व नंतर जर एखादी जागा रिकामी झाली तर ती जागा बाकीचे सभासद भरून काढीत असत. परंतु १९२४ च्या नियमाप्रमाणें ज्या गांवांत पंचायत स्थापन झाली आहे, त्या गांवांत या कमिटीची निवड पंचायतीनें करावयाची व ज्या गांवांत पंचायत स्थापन झालेली नाहीं त्या गांवांतील कमिटी स्कूल बोर्डानें निवडावयाची. या कमिटीचे सभासद तीनपेक्षां कमी व पांचपेक्षां अधिक असतां कामा नयेत. एखाद्या गांवांतील मुसलमानांची व अस्पृश्यांची प्रत्येकीं लोकसंख्या गांवांतील लोकसंख्येच्या शेंकडा १० प्रमाणापेक्षां अधिक असली तर या वर्गांचा प्रत्येकीं एक सभासद या कमिटयांवर निवडलाच पाहिजे व अशी निवड न केल्याचें दिसून आलें तर डिस्ट्रिक्ट बोर्डानें त्याप्रमाणें निवड करावी. पंचायत नसलेल्या ठिकाणीं स्थापन करावयाच्या कमिटीच्या सभासदांच्या संख्येची कमाल मर्यादा सात आहे. या कमिटयांचें आयुष्य मुख्य स्कूल कमिटींच्या आयुष्याइतकेंच असतें.

कमिटीचें कार्य:—नियम नं. ९७ मध्यें या कमिटयांच्या कर्तव्यांची खालीलप्रमाणें यादी दिली आहे.

(अ) स्कूल बोर्डाला शाळांसाठीं योग्य जागा मिळविण्यासाठीं मदत करणें.

(ब) हेडमास्तर किंवा स्थानिक संस्था ज्या वेळीं शाळागृह दुरुस्त करण्यास जबाबदार असेल तेव्हां त्या दुरुस्त्या करण्यास मदत करणें.

(क) आपल्या नियंत्रणाखाली असलेल्या सर्व शाळांना निदान महिन्यांतून एकवार भेट देणें.

(ड) शाळांचे रजिस्टर नीट टेवलें आहे किंवा नाहीं हें पहाणें. भेटीच्या वेळीं शाळेंत हजर असलेल्या मुलांची संख्या हजेरीपटावर मांडलेल्या मुलांच्या संख्येशीं जमते किंवा नाहीं हें पहाणें व एखादी चूक असल्यास त्याबद्दल स्कूल बोर्डाचे ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर यांस कळविणें.

(इ) शाळा उघडण्याच्या अगर बंद करण्याच्या बाबतींत अगर शिक्षकाच्या हजेरी बाबतींत कांहीं कसूर अगर अनिमितपणा होत असल्यास त्याबद्दल ॲ. ऑफिसरकडे वर्दी देणें.

(फ) शाळेची जागा सुस्थितींत व स्वच्छ ठेवली आहे किंवा नाहीं हें पहाणें या खेरीज नियम ९९ प्रमाणें शाळेंतील मुलांची व विशेषतः मागासलेल्या वर्गाच्या व अस्पृश्य वर्गाच्या मुलांची संख्या अधिक वाढेल अशी खटपट करण्याची जबाबदारी याच कमिटीवर टाकली आहे.

एखाद्या भागांत सक्तीच्या शिक्षणाचें तत्त्व लागू करण्यांत आल्यास तें तत्त्व पालकांना समजाऊन सांगणें. व स्कूल बोर्डानें सांगितल्यास गांवांतील शाळेंत जाण्यासारख्या मुलांची मोजदाद करणें व सक्तीच्या तत्त्वाची अम्मलबजावणी करण्यास मदत करणें, हें या कमिटीचेंच काम आहे.

या कमिटीचे सभासदाला शाळेला वाटेल तेव्हां भेटण्याचा अधिकार आहे. त्याला कांहीं कळविणें असल्यास कमिटीला कळविण्यांत येतें. परंतु अशा सभासदाला शिक्षकाला प्रत्यक्ष कांहीं हुकूम देतां येत नाहीं. मुख्य शिक्षक किरकोळ अगर इतर रजेवर निघाला असल्यास तें या कमिटीच्या अध्यक्षाला लेखी कळवावें लागतें. मुख्य मास्तर एकदम आजारी पडल्यास, किंवा कांहीं जरुरीच्या कारणासाठीं, कमिटीच्या अध्यक्षास मुख्य मास्तराला रजा देण्याचा अधिकार आहे. परंतु अशी रजा दिल्याबद्दल ॲ. ऑफिसरला ताबडतोब कळवावें लागतें. तसेंच एखादा शिक्षक रजेवांचून गैरहजर राहिल्यास तेंहि कमिटीनें ॲ. ऑफिसरला कळवावें लागतें.

शेतकी अगर शिक्षणखात्यांतील इतर सरकारी अधिकारी किंवा लोकल बोर्डाचा किंवा स्कूल बोर्डाचा कोणी सभासद अगर अधिकारी शाळेस भेट-ण्यांस आले असतां कमिटीचे सभासद व अध्यक्ष यांनीं शक्य तो हजर रहावें (नि. १०७) किंवा बिगररजेनें शाळेचा मुख्य शिक्षक रजेवर गेल्यामुळें गैरहजर असला किंवा त्याचा आकस्मिक मृत्यु झाला असतां शाळा व दप्तर आपल्या ताब्यांत घेण्यांचा कमिटीला अधिकार आहे. (नि. १०६). त्याच-प्रमाणें एक मुख्य शिक्षक बदलून जातेवेळीं त्याच्या ठिकाणीं आलेल्या दुसऱ्या मुख्य शिक्षकास शाळेचा ताबा देतांना त्या दोघांमध्यें कांहीं वाद उत्पन्न झाल्यास तो ताबा पंचकमिटी दोन किंवा अधिक सभासदांच्या व शक्य असल्यास मुख्य पंचाच्या समक्ष देण्यांत यावा व मग नावे यादी (Charge Sheet) वर हजर पंचांनीं योग्य तो शेरा मारावा. (नि. १०८).

शाळाकमिटी अगर पंचकमिटी यांच्या कर्तव्यासंबंधीं व अधिकारासंबंधी वर जी विस्तृत माहिती दिली आहे, त्यावरून एकंदर मूळ योजना किती चांगली आहे, याची वाचकांना कल्पना येईल. या नियमाप्रमाणें योजना करतांना स्थानिक लोकांनीं आपल्या गांवच्या शाळेच्या कारभारांत अस्था-पूर्वक अधिक लक्ष घालावें हा हेतु होता. गांवचे लोक शाळेच्या कामांत लक्ष घालून शिक्षकावर योग्य देखरेख करू लागल्यास त्या शाळेची चांगली प्रगति झाल्यावांचून रहाणार नाहीं. पाश्चिमात्य देशांत जी शाळांची सुधारणा आज आपणास झालेली दिसून येते ती स्थानिक लोक शाळांच्या कारभारात आस्था-पूर्वक लक्ष घालतात व शिक्षकावर योग्य देखरेख करून त्याला सर्वतोपरी मदत करतात त्यामुळें. परंतु दुर्दैवानें आपल्याकडे गांवकमिट्या पूर्णपणें शाळांच्या बाबतींत उदासीनच आहेत. ॲ. आफिसरला प्रत्येक शाळेंतील शाळामास्तर रोज काम करतो का दुसरें कांहीं करतो हें गांवकमिट्यांनीं कळविलें तर समजणार! परंतु गांवकमिट्याच जर झोप घेऊं लागल्या तर शिक्षकहि हलगर्जी बनल्यास काय आश्चर्य? एका गांवांतील शाळामास्तर सुमारें सहा महिने शाळा बंद ठेवून, दरमहा पगार मात्र घेत असे परंतु गांवच्या लोकांनीं अगर कमिटीनें त्याबद्दल कांहीं विचारपूस केली नाहीं. अखेर गांवास भेट देण्यास रावसाहेब मामलेदार गेले तेव्हां त्यांनीं शाळेबद्दल चौकशी केली त्यामुळें सर्व प्रकार उघडकीस आला. या अशा मास्तरलाहि माफी करा म्हणणारे सभासद स्कूल बोर्डांत निघालें हें दुसरें आश्चर्य! वशिले-

बाजीचा उपयोग केला गेल्यामुळें स्कूल-बोर्डानें या शिक्षकाला किरकोळ स्वरूपाचीच शिक्षा बहुमतानें केली. परंतु अखेर खात्याकडून जोराचा तडाखा येतांच मग त्याला नोकरीवरून कमी करण्यांत आलें. शाळामास्तरनें कांहीं हंगामी शाळागृहांची दुरुस्ती केल्यास त्या दुरुस्तीच्या बिलावर 'दुरुस्ती केली' म्हणून पंचांच्या सह्या लागतात. एका गांवच्या शिक्षकानें दुरुस्त्या वगैरे कांहीं न करता खोटीं बिलें तयार करून त्यावर थापा मारून पंचांच्या सह्या घेतल्या व बोर्डाकडून पैसे घेतले. शेवटीं ज्याला हें काम द्यावयाचें ठरलें होतें त्या मक्तेदारानेंच 'आपणास काम मिळालें नाहीं' अशी ओरड केली तेव्हां पंचकमिटीच्या सभासदांच्या सह्यांचा प्रकार उघडकीस आला.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आमच्या पंचकमिटींतिल सभासदांना आपल्या कर्तव्याची जाणिवच मुळीं झालेली नाहीं. याचें कारण पंचकमिटींत बहुतेक अडाणी व अशिक्षित लोकांचा फार भरणा असतो व त्यामुळें शिक्षकावर ते दाब ठेवण्याऐवजीं शिक्षकच त्यांच्यावर दाब ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो. उलट कांहीं पंच आपल्या अधिकाराच्या मर्यादा ओलांडून गांवांतील दुफळीच्या झगडयासाठीं अधिकाराचा उपयोग करतात व मग शिक्षकास 'भीक नको कुत्रा आवर' अशी स्थिति होते. म्हणजे कांहीं गांवांतील पंचकमिटया शिक्षकानें कांहीं केलें तरी कांही रिपोर्ट करीत नाहींत तर कांहीं दुफळीच्या गांवांत शिक्षक विरुद्ध फळीचा आहे, असा पंचकमिटीला संशय असल्यास त्या खोटया तक्रारीचा पाऊस पाडतात. हे दोन्ही प्रकार शाळेच्या हितास घातकच आहेत. या पंचमंडळीना त्यांच्या कर्तव्याची योग्य जाणीव देणें अत्यंत जरूर आहे व त्यासाठीं शाळाखात्याच्या प्रत्येक अधिकाऱ्यांनीं शाळेस भेट देतानां या पंच मंडळीना बोलवून त्यांच्यांशीं विचार विनिमय करणें अगत्याचे आहे. तसेंच शिक्षकांची संमेलनें भरवितांना या पंचमंडळीचीहि संमेलनें भरवून त्यांना उपदेशपर चार गोष्टी सांगून त्यांच्यांत कर्तव्यजागृति निर्माण केली पाहिजे.

याप्रमाणें शिक्षणखातें, स्थानिक सस्था, स्कूल बोर्डे व गांवकमिटया यांबद्दल आपण शक्य तितक्या विस्तारानें विचार करून त्यांत चांगले काय आहे व वाईट काय आहे यांची चर्चा केली. हे चारी घटक अतिशय महत्त्वाचे असून त्यांच्यांत योग्य सुधारणा झाल्यावांचून शिक्षणपद्धतीची सुधारणा होणें शक्य नाहीं. एकंदर जनतेंत शिक्षणाची प्रगति जशी होत जाईल तशी तशी

या चार घटकांतहि सुधारणा होत जाईल, सुधारणेवरोवर शिक्षणाचे पाऊलहि अधिक जोरानें पुढें पडत जाईल.

शिक्षण--कारभाराची पुनर्घटना:—आम्हीं आतांपर्यंत एकंदर शिक्षण-कारभाराचीं सूत्रें कोणाकोणाच्या हातांत आहेत यांचें विवेचन केलें व कांहीं आक्षेपांना उत्तरें देऊन आम्हांला जे दोष दिसतात, ते स्पष्टपणें दाखवून त्यांवर उपाययोजनाहि सुचविली. स्थानिक संस्थांत दोष आहेत हें कबूल केलें तरी हे दोष नाहींसे करतां येण्यासारखे आहेत. परंतु कांहीं लोक आतां या स्थानिकसंस्थाच नाहींशा कराव्यात असें जोरजोरानें प्रतिपादूं लागलें आहेत. रोग वरा होण्यासाठीं औषधाची गोळी देण्याऐवजीं अफूची गोळी देण्याचा हा प्रयत्न रोगी खलास झाल्यानंतर सत्तेचा वारस आपल्याकडे येईल या उतावीळ आशेनें करण्यांत येत आहे, असें कधीं कधीं वाटूं लागतें. ना. लट्टे यांनीं गेल्या कायदेमंडळांत अंदाजपत्रक सादर करतांना सर्व स्थानिक संस्थांवर बेदिक्कत नालायकीचा शिक्का मारला. ना. खेर यांनीं सरकारी अधिकाऱ्यांच्या एकतर्फी मतावर विश्वास टेवून शिक्षणविषयक चर्चेच्या वेळीं ना. लट्टे यांच्या सुरांत सूर मिळविला. नंतर या अधिकारी पुरुषांच्या या अनुकूल मताचा फायदा घेण्यासाठीं स्वतःला शिक्षणतज्ज्ञ म्हणविणाऱ्या कांहीं पंडितांनीं, महाराष्ट्र-शिक्षण-परिषद गेल्या महिन्यांत भरवून स्थानिक संस्थांवर टीकेचा मुसळधार पाऊस पाडला व शिक्षणाचीं सूत्रें स्थानिक संस्थांच्या हातांतून काढून घेण्यासाठीं एक योजनाहि शिक्षणमंत्रि ना. खेर यांना सादर केली. त्या योजनेच्या आतां विचार करूं.

या योजनेप्रमाणें स्थानिक संस्थांची शिक्षणकारभारावरील हुकमत कमी करून प्रत्येकीं १५ तें २० अशा खेड्यांचा एक गट करून, त्या गटांतील शाळांवर सुपरवायझरची हुकमत रहावी व या सुपरवायझर्सनीं जिल्हाधिकाऱ्याच्या हाताखालीं काम करावें. या जिल्हाधिकाऱ्यांना मदत करण्यासाठीं शिक्षणतज्ज्ञांचें एक सल्लागार मंडळ नेमून त्याच्या सल्लामसलतीनें ह्या जिल्हाधिकाऱ्यानें शिक्षणाचा गाडा चालवावयाचा आहे. हे जिल्हाधिकारी डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनच्या हुकमतीखालीं रहाणार आहेत. ‡

महाराष्ट्र-शिक्षण परिषदेच्या शिष्टमंडळानें आपल्या योजनेची ही रूपरेषा

‡ Times of India 9-10-37. p. 19.

ना. खेर यांच्यापुढें मांडली असून शिक्षणमंत्र्यांनीं 'आपली योजना लेखी सादर करा' असें शिष्ट मंडळास सांगितलें असून, त्या योजनेचा योग्य तो विचार करण्याचेंहि आश्वासन दिलें आहे.

स्थानिक संस्थांचा कारभार स्थानिक लोकांना करतां आला पाहिजे, हें लोकशाहीचें मूलभूत तत्त्व आहे व या तत्त्वाप्रमाणें लोकांना आपला कारभार चांगला करतां यावा म्हणून त्यांना योग्य तऱ्हेचें शिक्षण देणें हें सरकारचें व देशांतील पुढारलेल्या लोकांचें कर्तव्य आहे. या दृष्टीनें शिक्षणाचा कारभार लोकांच्या हातून पूर्णपणें काढून घेतल्यानंतर, तिजोरींत कर भरणाऱ्या शेतकरी समाजाला शैक्षणिक कारभाराचें शिक्षण देण्याची तजवीज या योजनेंत काय केली आहे ? देशांतील सत्ता सरकारी अधिकाऱ्यांच्या हातून काढून घेऊन लोकांच्या हातीं देणें हें राष्ट्रीय सभेचें ध्येय आहे. न्यायदानाचें कामहि याच हेतूनें गांवपंचायतीच्या स्वाधीन करण्याची तयारी चालली असतांना, शिक्षणाचीं सर्व सूत्रें लोकप्रतिनिधींच्या हातून काढून घेऊन जिल्हाधिकाऱ्यांच्या हातीं देणें, राष्ट्रसभेच्या धोरणाशीं विसंगत होणार नाहीं का ? स्थानिक संस्थांच्या हातून शिक्षकांना त्रास होतो असें म्हटलें तरी उद्यां या जिल्हाधिकाऱ्यांच्या हातांत सुलतानी सत्ता आल्यानंतर, सर्व शिक्षकांना रामराज्याचा अनुभव येणार आहे, अशी कोण हमी देऊं शकेल ? शिक्षकांना बोर्डाची हांजी हांजी करावी लागते म्हणून ता. २३।५।३७ रोजीं टिळक स्मारक मंदिरांत प्राथमिक शिक्षणावरील चक्री व्याख्यानाच्या वेळीं एका वक्त्यानें सांगितलें. त्या वक्त्याला त्या सभेचे अध्यक्ष प्रो. एम्. आर्. परांजपे यांनीं दिलेलें उत्तर खालीं उधृत केलें आहे.

' आतां शाळाबोर्ड झाल्यामुळें हांजी हांजी करण्याचा प्रसंग शिक्षकांवर आला असें आजच्या वक्त्यांनीं सांगितलें; परंतु हा प्रकार पूर्वीही होता. फरक एवढाच कीं, शाळा बोर्डाच्या अधिकाऱ्यांच्या ऐवजीं इन्स्पेक्टरची मर्जी संभाळावी लागत असे. लोकशाही सुरू झाली असतांना आपल्या देशांत दिसून येणारे दोष परदेशांत जेव्हां लोकशाही सत्ता सुरू झाली, तेव्हांहि दिसून येत होते," §

पूर्वीच्या काळीं इन्स्पेक्टरची हांजी हांजी करावी लागे. तें ' मोठेपण ' शाळा बोर्डांकडे गेल्यामुळें नाखूष झालेल्या अधिकाऱ्यांच्या तांड्याला खूष करण्यासाठीं तर ही महाराष्ट्र-शिक्षण-परिषदेची योजना नाहीं ना ?

---

§ लोकशक्ति ता. २५।५।३७ पा. ५

जिल्हाधिकाऱ्यांना सल्ला देण्यासाठीं तज्ज्ञ मंडळींचें सल्लागार मंडळ नेमण्यांत यावें असा या योजनेचा दुसरा भाग आहे. बहुजन समाजाचा या नागरी शिक्षण-तज्ज्ञांवर मुळींच विश्वास नाहीं, हें या तज्ज्ञांना सांगणें जरूर आहे. १८५४ सालापासून तों १९२३ पर्यंत या तज्ज्ञ मंडळींच्या हातांत शिक्षणाचीं सूत्रें असतांना त्यांनीं शेतकरी समाजासाठीं काय केलें ? चांगल्या पाकशास्त्र-प्रवीण अशा बल्लवांच्या हातांत स्वैपाकघराचा अधिकार दिल्यानंतर, मालक उपासमारीनें बेजार होऊन बल्लवच पहिवानाला डावलण्यासारखा फुगूं लागला, तर त्या बल्लवाविषयीं गैरविश्वास दाखविणें चूक होईल का ?

आम्ही तक्ता नं १४ पा. १६४ वर १९२१ सालीं व १९३१ सालीं निरनिराळ्या जातींत साक्षरता किती होती हे दाखविणारे आंकडे दिले आहेत. मराठा, आग्री वगैरे खेड्यांतील जातीमध्यें साक्षरांची संख्या दहा वर्षांत झपाट्यानें वाढलेली आपणांस दिसून येते. या वाढीचें कारण शाळाबोर्डाची सत्ता शेतकरी समाजाच्या पुढाऱ्यांच्या हातांत गेली हें होय. सेस शाळांवर देखरेख करण्याचें काम गांवकमिट्यांवर सोपविल्यानंतरहि त्या शाळांची लोकप्रियता वाढली हें आपण पहिलें आहेच.* तज्ज्ञ मंडळीच्या हातांत दुय्यम शिक्षणाचीं सूत्रें असल्यामुळें शेतकरी वर्गांत त्या शिक्षणाचें प्रमाण किती कमी आहे, हें आपण तक्ता नं. १४ पा. १६४ मध्यें इंग्रजी साक्षरांची संख्या पाहिली त्यावरून दिसून येईल.

शेतीची सुधारणा व्हावयाची असेल तर शेतकरी समाजाला त्यांच्या धंद्याला उपयुक्त असें शिक्षण देणें जरूर आहे. असें शेतकीतज्ज्ञ सर जॉन रसेल यांनीं आपल्या पहाणी पत्रकांत म्हटलें आहे.‡ शेतकरी वर्गाला कोणतें शिक्षण उपयोगी पडेल याची या शहरी शिक्क्याच्या तज्ज्ञांना कांहीं कल्पना आहे का ? आतांपर्यंत यांच्या तंत्रानें कारभार चालला, त्यामुळें शहरी लोकांना रुचलेलें वाङ्मयी शिक्षणच खेड्यांतील शेतकीवर उपजीविका करणाऱ्या लोकांना देण्यांत येऊन त्यांना त्यांच्या धंद्यास निरुपयोगी बनविलें. यापुढें पुन्हां शेतकरीवर्गाच्या शिक्षणाचीं सूत्रें सरकारी अधिकारी व शहरी पंडित यांच्या स्वाधीन करणें म्हणजे शेतकरीवर्गाला विष न देतां ठार करण्यासारखें आहे.

शेतकरी शिक्षणाचे तज्ज्ञ अद्याप जन्माला यावयाचे आहेत. शेतकरी

---

* मागें पा. १०८ ‡ Times of India 7-10-37 p. 9

वर्गाच्या हातांत शिक्षणाचीं सूत्रें ठेवल्यानेंच हे शेतकऱ्याच्या शिक्षणाचे तज्ज्ञ जन्माला येतील." हिंदुस्तानसरकारनें प्रांतावरील कराचे तज्ज्ञ म्हणून मि. चेंबर्स या गृहस्थाची नेमणूक केली. त्याबद्दल नापसंती व्यक्त करण्यासाठीं वरिष्ठ कायदेमंडळांतील राष्ट्रीय सभेच्या सभासदांनीं गेल्या अधिवेशनांत तहकुबीची सूचना आणली. त्या सूचनेवर भाषण करतांना राष्ट्रीय सभापक्षाचे पुढारी श्री. भुलाभाई देसाई यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें कीं ‡ "इंग्लंडमध्यें अनेक प्रश्नांबाबत वेळोवेळीं चुका करूनच तेथें आतां तज्ज्ञ मंडळी निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील लोकांनाही राज्यकारभाराचीं सूत्रें द्या म्हणजे तेही अनेक चुका करून अनुभवानें तज्ज्ञ मंडळी जन्माला आणतील." मुंबई हायकोर्टांत एका काळीं इंग्लिश कायदेपंडितांचा फार सुळसुळाट होता; परंतु त्यांची संख्या देशी कायदेपंडित निर्माण झाल्यामुळें फार घटली आहे. हेंहि श्री. देसाई यांनीं सांगितलें. खेडयांतील लोक नालायक आहेत म्हणून त्यांच्या हातची सत्ता काढून घेण्याचा सल्ला देणाऱ्या पुणेरी पंडितांना हिंदुस्थानांतील लोक नालायक आहेत असें म्हणणाऱ्या इंग्रज लोकांना श्री. भुलाभाई यांनीं जें उत्तर दिलें आहे त्याचा आम्ही आहेर करतों. "English men constantly remined them (Indians) of their inefficiency but never allowed them to acquire efficieney." इंग्रज तज्ज्ञांची जी हिंदुस्थानांतील लोकांशीं वागणूक आहे तीच शहरांतील शिक्षणतज्ज्ञांची खेडयांतील लोकांबद्दल वागणूक आहे. हिंदुस्थानांतील लोकांवर नालायकीचा शिक्का मारल्याशिवाय ज्याप्रमाणें विलायती विद्वानांचें फावणार नाहीं त्याप्रमाणेंच खेडयांतील लोकांना निरक्षर-नालायक-म्हटल्याशिवाय शहरी शहाण्यांची वर्णी लागणार नाहीं. दोन्ही विद्वानांच्या ओरडीचें मूळ त्यांच्या स्वार्थांत आहे, असें कोणीं म्हटल्यास तें फारसें चुकीचें होणार नाहीं.

कराचे पैसे देणाऱ्या शेतकरी वर्गाच्या प्रतिनिधींच्या हातांतच त्यांच्या शिक्षणाचीं सूत्रें असणें लोकशाहीच्या तत्त्वाप्रमाणें आवश्यक आहे. या प्रतिनिधींच्या

‡ Mr. Desai asked how the British people created experts. During the last 50 years the British by means of actual administration and by discovering their own blunders had created a genius like Mr. Chambers, but the speaker hoped that by the same process India might create not only a Mr. Chambers but even a Sir. James Grigg. [Times of India 7–10–37 P. 11

हातून कांहीं चुका होत असल्या तर त्या त्यांच्या नजरेस आणा, कारभार कसा करावा याचें त्यांना शिक्षण द्या ! पण त्यांच्या घरांतील सत्ता त्यांच्याच हातांत ठेवा. तज्ज्ञ मंडळांनीं शेतकरी वर्गाचा विश्वास संपादन करून शेतकरी वर्गाचे प्रतिनिधी म्हणून निवडून येण्याचा प्रयत्न करावा. राष्ट्रीय सभेच्या ठिकठिकाणच्या विजयानें, शेतकरीसमाज जातीचा विचार न करतां उमेदवाराच्या तत्त्वाचा विचार करून मतें देतो, हें सिद्ध केलें आहे. शेतकरी वर्गाचा शिक्षणाच्या कारभाराच्या बाबतींत असलेला मतदानाचा हक्क हिरावून घेऊन सरकारी मेहेरबानीनें तज्ज्ञ मंडळींचें एक कोंडाळें, सरकारी अधिकाऱ्यांच्या भोंवतीं फिरण्यासाठीं निर्माण करण्याची जी ही सूचना पुढें आली आहे, तिचा निवडणुकीच्या तत्त्वाचा पुरस्कार करणारा लोकशाहीचा प्रामाणिक उपासक निषेधच करील यांत कांहीं शंका नाहीं.

स्थानिक संस्थाची पुनर्घटना करावयाची असेल तर आम्ही खालीं सूचना केल्याप्रमाणें एखादी योजना अमलांत येणें अगत्याचें आहे.

(१) 'तपासणी' या प्रकरणांत ग्रामीण-शिक्षण-मंडळ व शहरी–शिक्षण–मंडळ ' अशा दोन मंडळांचा आम्हीं निर्देश केला आहे. खेड्यांतील शिक्षणाचीं सूत्रें या ग्रामीण-शिक्षण-मंडळाच्या हातांत असावीं व शहरांतील प्राथमिक शिक्षणाचा अधिकार शहरी शिक्षण-मंडळाकडे देण्यांत यावा. मुंबई इलाख्याचे भाषावार तीन भाग करण्यांत यावे व प्रत्येक भागास याप्रमाणें ग्रामीण व शहरी अशीं शिक्षणमंडळें स्वतंत्र असावींत. या शिक्षण-मंडळाच्या सभासदास शैक्षणिक लायकीची अट घालण्यांत यावी; व प्रत्येक जिल्हा बोर्ड व त्याचें स्कूल बोर्ड यांच्या सभासदांच्या मतानें दोन प्रतिनिधी ह्या मंडळावर निवडून देण्यांत यावेत म्हणजे सभासदांच्या लायकीप्रमाणें लोकप्रतिनिधित्वाची अटहि सांभाळली जाईल. मुंबई इलाख्यांत मराठी भाषा बोलणारे दहा जिल्हे आहेत या दहा जिल्ह्यांतील जिल्हा बोर्ड व त्यांचें शाळाबोर्ड यांच्या मार्फत प्रत्येक जिल्ह्यास दोन याप्रमाणें वीस सभासद निवडले जातील. या मंडळाकडे सर्व तपासनीस नेमण्याच्या अधिकार देण्यांत यावा. तपासनिसांमध्यें आज जो सरकारी तपासनीस व बोर्डाचा तपासनीस असा भेद आहे तो कमी करण्यांत यावा व सर्वच्च तपासनीस या मंडळामार्फत निवडले जावेत. मात्र या तपासनीसांमध्यें 'वरिष्ठ तपासनीस' व 'कनिष्ठ तपासनीस' असे दोन वर्ग करण्यांत यावेत. या वरिष्ठ तपासनीसांमधून ॲ. ऑफिसर निवडण्यांत यावेत.

ॲ. ऑफिसरची निवड ही या मंडळानेंच शाळाबोर्डाकडून आलेल्या नांवां-पैकीं एक नांव पसंत करून, करण्यांत यावी. वरिष्ठ तपासनीसास निरनिराळ्या जिल्ह्यांत बदलण्यांत यावे परंतु कनिष्ठ तपासनीसाची जिल्ह्याच्या बाहेर बदली करण्यांत येऊं नये. क्रमिक पुस्तकें तयार करणें, प्रसिद्ध करणें व अभ्यास-क्रमांत बदल करणें, या सर्व बाबी मंडळाकडेच सोपविण्यांत याव्यात. तसेंच शिक्षकाच्या बदल्या, नेमणुका करण्याच्या कामावरहि या मंडळाची देखरेख असावी. शिक्षकांच्या ट्रेनिंग संस्थाही या मंड-ळाच्या देखरेखीखालीं चालण्यास हरकत नाहीं. इंग्लंडमध्यें ज्याप्रमाणें शिक्षण-मंत्र्याला सल्ला देण्यासाठीं सल्लागार-समिति (Consultative Committee) आहे त्याप्रमाणें या मंडळास समजण्यास हरकत नाहीं. या मंडळा-वर खात्याचे अधिकारी सरकारतर्फे नेमण्यांत यावे व बाहेरचे शिक्षणतज्ज्ञ 'कोऑप्ट' करून घेण्यांत यावेत.

याप्रमाणें व्यवस्था केल्यास हल्लीं स्थानिक संस्थांच्या कारभारांत जे दोष दिसत आहेत ते कमी होऊन शिक्षणाची कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल.

(२) सरकारचे जे ठराव किंवा पत्रकें हल्लीं प्रसिद्ध होतात तीं बहुतेक इंग्रजी भाषेंतच प्रसिद्ध होतात व त्यामुळें मराठी भाषेंत ज्यांचें चांगलें शिक्षण झालें आहे पण ज्यांना इंग्रजी येत नाहीं अशा सभासदांचीहि कुचंबणा होऊन यामुळें इच्छा नसतांहि त्यांच्या हातून नियमांची किंवा सरकारी हुकुमांची अवमान्यता होते. यापुढें हे ठराव व पत्रकें ज्या त्या प्रांताच्या भाषेंत होण्यास हरकत नसावी. भाषावार जिल्ह्यांचे गट केल्यानंतर त्या गटापुरतीच निघ-णारीं पत्रकें (Circulars) हीं त्या गटाच्या भाषेंत प्रसिद्ध करण्यांत यावींत व तीं त्या गटाच्या शिक्षणमंडळाच्या विचारानें प्रसिद्ध करण्यांत यावींत. सर्व इलाख्याच्या उपयोगासाठीं एखादें पत्रक असल्यास तें हिंदीमध्यें प्रसिद्ध करण्यांत यावें म्हणजे सर्व सभासदांनाहि तें समजून त्यांना आपोआप हिंदीचें शिक्षण दिल्यासारखें होईल. इंग्रजी भाषेला वाजवीपेक्षां जास्त महत्त्व देण्यांत आल्या-मुळें देशी भाषांची व्यर्थ कुचंबणा होत आहे. आतां सर्व खात्यांचे मुख्य (Head) लोकनियुक्त असे मंत्रि आहेत. त्यांच्या अमदानींत देशी भाषेंत हुकूम काढण्यास कांहीं हरकत नाहीं. विलायत सरकारला सादर करावयाचे अहवाल खुशाल इंग्रजी भाषेंत लिहा परंतु शेंकडा नव्वदापेक्षां अधिक निरक्षर असलेल्या देशांत मातृभाषेंतूनच कारभार करा ! सर्व ज्ञान संस्कृतमध्यें ठेवून

आपलें वर्चस्व अबाधीत ठेवूं पहाणाऱ्या पुराणपंडितांच्या धोरणाचा अवलंब, इतरांस अवगत नसलेल्या इंग्रजी भाषेला फाजील महत्त्व देऊन, अर्वाचीन पंडितांनीं करूं नये एवढीच आमची विनंती आहे.

स्थानिक संस्थांतील लोक निरक्षर किंवा कमी शिकलेले म्हणून पुस्तकें लावतांना, नेमणुका करतांना, निवडून येण्यासाठीं अनेक वाम मार्गांचा अवलंब करतात असा आक्षेप घेणाऱ्या तज्ज्ञांनीं, विश्वविद्यालयाच्या आवारांत अनेक विद्वद्रत्नें काय गोंधळ माजवून राहिलीं आहेत याकडे प्रथम लक्ष द्यावें. विश्वविद्यालयांच्या कारभारांतील विविध प्रकाराचा सावळागोंधळ पाहिल्यानंतर शेतकरी वर्गाच्या रोगांची चिकित्सा करण्यास पुढें सरसावलेल्या या तज्ज्ञ मंडळींना 'वैद्यबुवा, आपण आपलीच प्रकृति सुधारा' असा सल्ला दिल्यावांचून रहावत नाहीं. सरस्वतीच्या या 'लडिवाळ बाळांना' सर्व गुन्हे माफ असले तर मग कांहीं म्हणणें नाहीं.

प्रकरण आठवें

उपसंहार

I am thankful to be guided by the knowledge of experts, and I bow to the decision of the great public for whom alone I write, whom alone I care to please, and in whose broad unbiassed judgment I place implicit trust...My conscience is my adviser, my audiance, and my judge. It bade me write as I have written, without evasion, without disguise.

—Win Wood Reade.

The Martyrdom of Man,p. X.

प्राथमिक शिक्षणाची बाब राष्ट्राच्या दृष्टीनें अतिशय जिव्हाळ्याची असल्यामुळें, बहुजन समाजाच्या दृष्टीनें जें स्पष्टपणें लिहावेसें वाटलें, तें कोणाच्याहि रागालोभाची पर्वा न करतां लिहिलें आहे. बहुजन समाजाला, शेतकरी समाजाला साक्षर करण्यासाठीं आतांपर्यंत कोणींच कळकळीनें प्रयत्न केले नाहींत व त्यामुळें देशाची सर्वतोपरी दुर्दशा झाल्याचें दिसून आलें. हिंदुस्थानच्या निरुपद्रवीपणाचा विचार केल्यानंतर, त्याला सांबराची उपमा द्यावी असें वाटतें. शहरांतील सुधारलेली जनता ही या सांबराच्या शिंगासारखी आहे. या शिंगांमुळें सांबराच्या सौंदर्यांत भर पडली आहे यांत कांहीं शंका नाहीं. खेडयांतील जनता ही त्या सांबराच्या पायासारखी आहे. हे पाय दिसायला वेडेविद्रे असल्यामुळें आतांपर्यंत त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यांत येऊन शोभिवंत व नखरेबाज दिसणाऱ्या शिंगांचेंच कौतुक करण्यांत आमचा सारा काळ गेला. परंतु परकीय सत्तेच्या शिकारी कुत्र्याच्या तावडींतून आपला स्वातंत्र्यरूपी प्राण वाचविण्यासाठीं या सांबराला अखेर हे पायच खरे उपयोगीं पडणार असल्यामुळें त्यांना खंबीर व अधिक बळकट करणें आमचें कर्तव्यच होतें. आपल्या शिंगांच्या सौंदर्याचें कौतुक करून पायांच्या निद्रूपपणाबद्दल हळहळणाऱ्या गोष्टींतील सांबराला प्रसंगांत पाय उपयोगीं पडले परंतु त्याचा घात झुडपांत गुंतून शिंगांनींच केला. पैशाच्या, नोकरीच्या मोहाला बळी पडून

शोभिवंत दिसणाऱ्या शिंगांनीं—कांहीं शहरी लोकांनींच—या देशाच्या स्वातंत्र्य-संगराच्या वेळीं दगा दिला आहे. तरी यापुढें 'कठीण समयीं कामास येणाऱ्या' पायांनाच अधिक सामर्थ्यवान् करण्याचा आम्ही प्रयत्न करणें जरूर आहे.

देशांतील निरनिराळे वर्ग हे एकमेकांला पूरक असे आहेत; परंतु आतां-पर्यंत कांहीं कांहीं वर्ग एकमेकांला मारकच झाले व त्यामुळें देश नुकसानींत आला. बहुजनसमाजाच्या शिक्षणाचा भूतकालांतील आढावा घेतांना, कांहीं वर्गांवद्दल कडक भाषा वापरावी लागली आहे, परंतु ती वापरण्यांत कोणा-लाहि दुखविण्याचा इरादा नाहीं. भूतकालाच्या अनुभवाचा तारा भविष्य-कालीं योग्य मार्ग दाखविण्यास उपयोगीं पडत असतो. मागें निरनिराळ्या वर्गांच्या हातून पायापुरते पहाण्याच्या स्वार्थी धोरणामुळें, कशा चुका झाल्या हें दाखविण्यांत, देशाचें अहित करणाऱ्या त्याच चुका भविष्यकालीं होऊं नयेत हीच सदिच्छा आहे. यापुढें देशांतील प्रत्येक वर्गानें, व्यक्तीनें देशांत हजारों वर्षें घर करून वसलेल्या व जनतेच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय प्रगतीस मारक होणाऱ्या, निरक्षरतेला हद्दपार करण्यासाठीं बद्धपरिकर होऊन आप-ल्याला प्रयत्नाची शिकस्त केली पाहिजे. पिसवा मारल्यानंतर प्लेग हटतो, त्याचप्रमाणें निरक्षरतेला देशाबाहेर पिटाळलें कीं, तिच्याबरोबर पारतंत्र्यहि बाहेर गेल्यावांचून रहाणार नाहीं. देशासाठीं तळमळणाऱ्या सर्व जातींच्या, वर्गांच्या, धर्मांच्या लोकांनीं, आपले खाजगी व किरकोळ मतभेद या वेळीं विसरून खेड्यांतील जनतेला शिक्षण देण्यासाठीं तयार होणें जरूर आहे. देशांतील सुशिक्षित समाजानें यापुढें तरी ही जबाबदारी स्वीकारणें इष्ट आहे. **"जनताशिक्षणाचा प्रचंड विषय आपणापुढें उभा आहे. सर्व भेदाभेद विसरून व बदलत्या काळाकडे लक्ष देऊन आपण जनताशिक्षणाच्या कार्याकडे शक्तिसर्वस्व खर्च केलें पाहिजे."† पद्वीचा उपयोग अशा राष्ट्रकार्यासाठीं झाला पाहिजे.** हे ना. खेर यांनीं टि. म. विद्यापिठाच्या सोळाव्या पदवीदान—समारंभाच्या वेळीं केलेल्या भाषणांतील उद्गार प्रत्येकानें स्मरणाच्या संदुकींत जतन करून ठेविले पाहिजेत. बाँबचे कारखाने काढण्यापेक्षां खेडयांत शाळा काढून, शहरांत 'क्रान्ति चिरायू' होवो अशा आरोळ्या ठोकण्यापेक्षां खेडयांतील जनतेची निरक्षरता अल्पायु ठरवून, परकीयांची सत्ता लवकर संपुष्टांत येईल हें आमच्या तरुणांनीं लक्षांत ठेवावें. बेकार म्हणून

† नवभारत १६।९।४७

उपसंहार

शहरांतील 'साब' लोकांच्या बुटांवर तजेला (Polish) चढविण्याचा पेशा पत्करण्यापेक्षां खेडयांतील लोकांच्या मनावर चढलेला अज्ञानाचा गंज, शिक्षणदानाच्या रसायनानें, नाहींसा करण्याचा प्रयत्न करण्यानेंच त्यांच्या व देशाच्या पोटाचा प्रश्न सुटणार आहे.

कोणाचेंही मन दुखविण्याचा हेतु नसतांना एखाद्या दुसऱ्या कठोर शब्दामुळें, कांहीं लोकांच्या मनाला यातना झाल्या असल्यास त्याबद्दल त्यांची क्षमा मागून व या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नाकडे देशांतील लहान थोर अशा सर्व लोकांचें लक्ष वेधून राष्ट्रसभा सरकारच्या हातून बहुजन समाजाला प्राथमिक शिक्षणाचा लवकर लाभ होतो, अशी प्रार्थना करून वाचकवृंदाची रजा घेतों.

परिशिष्ट

सूचनांचा सारांश

सक्तीचें व मोफत शिक्षण:—

१ शिक्षण मोफत व सक्तीचें सर्व इलाख्यांत करण्यांत यावें, खर्चाच्या अडचणीमुळें शिक्षण सर्वत्र मोफत व सक्तीचें करणें शक्य नसल्यास तें तत्त्व प्रथम खेड्यांत व विशेषतः लहान खेडयांत लागू करण्यांत यावें. पा. २११

२ इतर कांहीं अडचणींमुळें मुलांच्या शिक्षणाला सक्तीचें तत्त्व लागू करतां येत नसेल, तर निदान मुलींच्या व विशेषतः खेडयांतील मुलींच्या शिक्षणाला हें तत्त्व प्रथम व ताबडतोब लागू करण्यांत यावें. पा. १८५

३ यदाकदाचित् प्राथमिक शिक्षण पूर्णपणें सक्तीचें करणें सरकारला शक्य न झाल्यास व्यर्थ व्यय कमी करण्यासाठीं, मुलांना शाळेंत घातल्यानंतर त्यांचा ठराविक शिक्षणक्रम पुरा होण्यापूर्वी, त्याला शाळेंतून काढून घेणाऱ्या पालकांच्या घातक स्वातंत्र्याला आळा घालून, मुलाला किंवा मुलीला शाळेंत घातल्यानंतर त्यांचा ठराविक अभ्यासक्रम पुरा होईपर्यंत त्या मुलांना शाळेंतून काढून घेण्याची बंदी त्यांनीं करण्यांत यावी व योग्य कारणांवाचून मुलें काढून घेतल्यास त्यांना कडक शासन करण्यांत यावें. पा. २२८

शिक्षण व खर्च:—

१ शिक्षण सक्तीचें व मोफत सर्वत्र, विशेषत: खेडयांत करण्याचें ठरविल्यानंतर त्यासाठीं पैशाची सोय ' काटकसर ' व ' जादा उत्पन्न ' या दोन उपायांनीं करण्यांत यावी. पा. २२४.

२ प्रत्येक मुलाला प्राथमिक शिक्षण देतांना सरासरीनें हल्लीं जो खर्च येत आहे, तो फार जास्त आहे. सबब ' काटकसर ' करून हें खर्चाचें प्रमाण कमी करणें आवश्यक आहे. पा. २२२.

३ शिक्षणखात्यांतील अधिकाऱ्याचे व शिक्षकांचे पगार कमी करणें, शाळांच्या इमारतीसाठीं व त्यांच्या दुरुस्तीसाठीं खात्यानें खर्च करणें बंद करून त्यांची जबाबदारी नियम करून गांवकऱ्यांवर सोपविणें, निर्वेतन किंवा अल्प

वेतनावर काम करणारे सुशिक्षित पुरुष व स्त्रिया स्वंयस्फूर्तीच्या तत्त्वावर किंवा सक्तीनें मिळवून, त्यांचा शिक्षण प्रसारार्थ उपयोग करणें; दुबार पद्धतीचा उपयोग करणें, पन्नास वर्षें ज्यांच्या वयाला झालीं आहेत अशा अधिकाऱ्यांना व शिक्षकांना सेवानिवृत्त करून बचत करणें, हे काटकसरीचे मुख्य मार्ग आहेत. पा. २२२-२३.

४ शहरांतील शिक्षणाप्रीत्यर्थ होणारा सरकारी खर्च बंद करून त्याचा उपयोग खेड्यांतील प्राथमिक शिक्षणासाठीं करावा. पा. २२३.

५ महात्मा गांधींच्या सूचनेप्रमाणें मुलांना धंदेशिक्षण देऊन त्यापासून कांहीं उत्पन्न काढावें. पा. २२४.

६ चंदावरकर कमिटीनें सुचविलेले व इतर जादा कर बसवून शिक्षणासाठीं पैशाची अधिक सोय करावी. पा. २२४–२६

७ काटकसर करून व जादा कर बसवूनहि शिक्षण सक्तीचें व मोफत करण्यासाठीं पैशाचा तुटवडा पडूं लागला, तर हल्लींचें मद्यपान बंदीचें धोरण कांहीं काल तहकूब करून अबकारी उत्पन्न या कामासाठीं खर्च करावें. पा. २२६ -२८

८ सक्तीच्या प्रा. शिक्षणासाठीं जरूर तो खर्च कमी करण्याची ज्या प्रांतांना कुवत नाहीं, त्यांना आपल्या तिजोरींतून मदत करण्याची मध्यवर्ति सरकारनें व्यवस्था करावी. पा. ४६९

विद्यार्थी:—

१ प्रथम पालकांनाच स्वच्छतेचें व शिक्षणाचें महत्त्व पटवून देऊन, त्यांना स्वच्छतेनें रहावयास शिकवावें. पा. २४४

२ मुलांना स्वच्छ ठेवण्याबद्दल सांगितलें असतांहि त्यांना अस्वच्छ ठेवणाऱ्या पालकांना शासन करण्याची कायद्यानें तर्तूद करण्यांत यावी. पा. २४५

३ मुलांनाहि स्वच्छतेनें रहावयास शिकवावें व त्यासाठीं खेड्यांतील शाळांमध्यें, मुलांना प्रत्यक्ष हात, पाय, डोळे, दांत वगैरे धुण्यास सांगण्यासाठीं, साहित्य ठेवण्यांत यावें व त्यांचे कपडेहि धुऊन घेण्यांत यावे. पा. २४६

४ मुलांची वैद्यकीय तपासणी वरचेवर करण्यांत यावी व त्यासाठीं जरूर तो नोकरवर्ग ठेवण्यांत यावा व गरीब मुलांना मोफत औषध द्यावें. पा. २४६–२४८

५ मुलांना शाळेंतील मधल्या सुट्टींत कांहींतरी फराळासाठीं देण्यांत यावें. पा. २४८–२५३

६ मुलांच्या वयांच्या दृष्टीनें, प्रकृतीच्या दृष्टीनें व बौद्धिक दृष्टीनें वर्गीकरण करण्यांत यावें व त्यांच्या शिक्षणासाठीं व आरोग्यवर्धनासाठीं खास तजवीज करण्यांत यावी. पा. २५३–२५७

७ मुलांच्या शारीरिक शिक्षणाची तजवीज करण्यांत यावी व ही तजवीज करतांना प्रत्येक शाळेला खेळण्याचें मैदान, खेळण्याचें साहित्य पुरविण्याची व्यवस्था करावी. तसेंच खास व्यायाम-शिक्षक नेमून मुलांना व पालकांना व्यायामाची गोडी लागेल, असे खेळांचे सामने वगैरे करण्यांत यावेत. पा. २५७–२६१

८ खेडयांतील मुलांना शाळा फार लांब पडणार नाहीं, अशी शाळांची जाळीं विणणें फार जरूर आहे. विशेषतः लहान मुलांना शाळेसाठीं फार दूर जावें लागणार नाहीं, अशी तरतूद करणें अगत्याचें आहे. पा. २६१–६३.

९ गरीब स्थितींतील पालकांच्या मुलांना शिक्षणसाहित्य पुरवून, शिष्यवृत्त्या, व बक्षिसें देऊन आर्थिक मदत करणें जरूर आहे. पा. २६३–६६.

१० शेतकरी वर्गांतील शिकलेल्या तरुणांना नोकऱ्या देण्यांत याव्यात. पा. २६६–२७३.

११ लहान मुलांना शिक्षण देण्यासाठीं स्त्री-शिक्षक नेमण्यांत यावे. व स्त्री-शिक्षक न मिळाल्यास बालवर्गावर शिक्षणशास्त्राचा व विशेषतः मानसशास्त्राचा अभ्यास केलेले निवडक शिक्षक नेमण्यांत यावे. पा. २५४.

शिक्षकः—

१ व्ह. फा. परीक्षा पास न होतां शिक्षक म्हणून नेमण्याची जी सवलत आहे ती काढून घेण्यांत यावी. स्त्रियांच्या बाबतींत ही सवलत ठेवणें जरूर वाटल्यास अशा स्त्रीला अध्यापिका म्हणून नेमण्यापूर्वी, निदान दोन वर्षें एखाद्या मोठ्या शाळेस जोडून त्या ठिकाणीं चांगल्या हेडमास्तरच्या देखरेखीखालीं तिच्या सर्वसाधारण ज्ञानांत भर टाकील असें व शिक्षणशास्त्राचें शिक्षण तिला देण्यांत यावें. पा. ३०७.

२ व्ह. फा. परीक्षा पास झाला कीं तो शिक्षकाच्या कामास लायक असे मानण्याची जी हल्लीं प्रथा आहे, ती बंद करण्यांत यावी. व्ह. फा. परीक्षा

पास झाल्यानंतर, सुमारें १३ व्या वर्षापासून तों १८ व्या वर्षापर्यंत भावी शिक्षकाला विशेष शिक्षण देण्यांत यावें व त्यानंतर २१ वर्षापर्यंत त्याला शिक्षकाचें काम सांगून तो अनुभवानें लायक ठरला, तर त्याला शिक्षक म्हणून कायम करण्यांत यावें. पा. ३०८–३१२.

३ ट्रेनिंगसंस्थांतून मिळणारें शिक्षण अपुरें व असमाधानकारक आहे. आमच्याकडील ट्रेनिंग-संस्थांतून जे शिक्षणशास्त्राशिवाय अंकगणित, भाषा, इतिहास, भूगोल वगैरे विषय शिकविले जातात, तेच विषय दुय्यम शाळांमधून शिकविण्यांत येतात; तरी भावी शिक्षकाला हे विषय शिकविण्याची दुय्यम शाळांत सोय करावी व तें शिक्षण पुरें झाल्यानंतर, फक्त शिक्षणशास्त्राचें शिक्षण देण्यासाठीं ट्रेनिंग-संस्थांचा उपयोग करावा. पा. ३१२, ३१४–३१५.

४ शहरांत काम करणाऱ्या शिक्षकाला व खेड्यासाठीं तयार करावयाच्या शिक्षकाला भिन्न भिन्न प्रकारचें शिक्षण द्यावें. पा. ३१५--३१८.

५ खेड्यांत शिक्षकांचें काम करण्यासाठीं, शेतकऱ्यांविषयीं ज्यांना जिव्हाळा वाटतो व खेड्यांतील परिस्थितीशीं जे समरस होतील असे, शेतकरी वर्गांतील उमेदवार निवडावेत. पा. ३१८

६ शिक्षकांना ट्रेनिंगसंस्थामध्यें जें शिक्षण देण्यांत येतें, त्या शिक्षणाला उजळा देण्यासाठीं वेळोंवेळीं उजळणीवर्ग भरविण्यांत यावेत. पा. ३४९ फिरतीं वाचनालयें सुरू करण्यांत यावीं. पा. ३३१. शिक्षकांसाठीं पाक्षिक किंवा मासिक सुरू करण्यांत यावें. पा. ३३१ शिक्षकांच्या सभा, परिषदा व शिक्षणसप्ताह भरविण्यांत यावे. पा. ३३०

७ शिक्षकांचे पगार कमी करण्यांत यावेत. पा. ३४३

८ हजेरी अलावन्स बंद करण्यांत यावा. पा. ३४६

९ शिक्षकाच्या पत्नीला अध्यापिका करण्यांत यावें किंवा ती तितकी शिकलेली नसली, तर तीला दाईचें काम शिकविण्यांत यावें. पा. ३४८

१० शिक्षकांचे परस्पर संबंध स्नेहाचे असावेत. त्यांची विद्यार्थ्यांशीं वागणूक वात्सल्याची असावी व पालकांशीं सहकार्याचे संबंध असावेत व त्यासाठीं शिक्षक व पालक संघ काढण्यांत यावेत. पा. ३४९-३५६

११ शिक्षकांच्या अनेक अडचणींचा सहानुभूतीनें विचार करून त्या दूर करण्याचे प्रयत्न करण्यांत यावेत. पा. ३५६

तपासणी:—

१ शहरीशिक्षण व खेडयांतील शिक्षण असें वर्गीकरण करून, या दोन्ही क्षेत्रांसाठीं निरनिराळे तपासनीस नेमण्यांत यावेत. पा. ३६६

२ खेडयांतील शिक्षणाची तपासणी करणारे तपासनीस खेडयांतील वर्गातून निवडण्यांत यावे व त्यांना खास असें शिक्षण देण्यांत यावें. पा.३६७–८

३ ग्रामीणशिक्षणमंडळ व शहरी–शिक्षणमंडळ यांच्या मार्फत सर्व तपासनीस नेमण्यांत यावेत. हल्लीं सरकारी तपासनीस व स्थानिक संस्थांचे तपासनीस असे दोन प्रकारचे तपासनीस आहेत. त्यांऐवजीं वरिष्ठ तपासनीस व कनिष्ठ तपासनीस असे दोन वर्ग करून ते शिक्षणमंडळांमार्फत नेमण्यांत यावेत.
पा. ३६९, ५०१–२

४ औद्योगिक शिक्षणाची प्राथमिक शाळेंत सोय केल्यानंतर, त्या शिक्षणाची तपासणी करण्यासाठीं खास तपासनीस नेमावे. पा. ३६९

५ शिक्षणाची तपासणी करण्यासाठीं स्त्री तपासनीस नेमाव्यात. पा.३६९

६ तपासनीसानें फक्त दोष काढणें येवढेंच आपलें कर्तव्य आहे असें न मानतां, शिक्षकाच्या सहानुभूतीचा मार्गदर्शक या नात्यानें त्याला सल्ला मसलत द्यावी. तसेंच मुलांच्या आरोग्याकडे व स्वच्छतेकडेहि लक्ष परवून त्या बाबतींत शेरेबुकांत नोंद करावी. पा. ३७४–७७

७ शिक्षकांची व तपासनीसांची वरचेवर संमेलनें भरविण्यांत यावींत.
पा. ३७८

शाळागृहें:—

१ ज्या ज्या गांवाला शाळा आहेत त्या त्या गांवाला शाळेस सोयीस्कर अशी नवीन इमारत बांधण्याची योजना असणें अत्यंत जरूर आहे. या योजनेसाठीं सरकार, स्थानिक संस्था, धनिक लोक व गांवकरी यांचें सहकार्य होणें जरूर आहे. पा. ३८५

२ सरकारनें साध्या व कमी खर्चाच्या इमारतीचे नमुने करणें जरूर आहे. या इमारती दगडांच्या बांधावयाच्या किंवा विटांच्या बांधावयाच्या हें ठरविणें स्थानिक संस्था व गांवकरी यांच्यावर सोपविण्यांत यावें. पा. ३८६

३ इमारतीचे नमुने ठरवितांना त्यांत निरनिराळ्या वर्गासाठीं स्वतंत्र खोल्या, मुलांच्या वैद्यकीय तपासणीसाठीं एक खोली, मधल्या फराळासाठीं खोली,

शिक्षकांसाठीं कचेरीची खोली व मुलांना हातपाय धुण्यासाठीं न्हाणघर वगैरे सोयींचा विचार करावा. त्याचप्रमाणें सभागृह व शिक्षकांसाठीं रहाण्याची जागाहि शक्य असल्यास बांधण्यांत यावी. पा. ३९०–९४

४ देशांतील श्रीमंत मंडळींनीं शाळागृहांना मदत करण्याच्या कामीं आपल्या पैशाचा थोडा फार उपयोग करणें जरूर आहे. पा. ३८७

५ आपल्या गांवांतील शाळांसाठीं शाळागृहें पुरविण्याची व त्यांच्या वेळोवेळींच्या दुरुस्तीची जबाबदारी गांवकऱ्यांनीं पत्करणें जरूर आहे. नवीन शाळागृह बांधण्यासाठीं लागणारा दगड व लाकूड वगैरे माल सरकारानें शक्यतों पुरवावा व गांवकरी मंडळींनीं गांवांतील कारागिरांच्या मदतीनें व स्वतः मजुरांची व वहातुकीची मदत करावी. जो थोडा पैसा लागेल त्यापैकीं कांहीं सरकारनें द्यावा व बाकीचा गांवकऱ्यांनीं वर्गणी गोळा करून जमवावा. पा. ३८८–३९०

६ ज्या गांवांस धर्मशाळा आहेत त्या ठिकाणीं त्या धर्मशाळांचा, थोडा फेरबदल करून, शाळांसाठीं उपयोग करावा. पा. ३९४.

७ एखाद्या गांवांत शाळांसाठीं जागा नाहीं व गांवकऱ्यांनाहि शाळा बांधण्याची ऐपत नाहीं, अशा गांवीं धनिक लोकांनीं एक सामुदायिक भांडवलाची कंपनी काढून अशा गांवीं शाळा बांधून द्याव्या व स्थानिक-संस्थांनीं त्यांना त्या इमारतींचें भाडें द्यावें व ही योजना भाडें–खरेदी (Hire–Purchase) च्या धोरणावर असावी, म्हणजे योग्य किंमत देऊन ही इमारत विकत घेण्याची गांवकरी यांना किंवा स्थानिक-संस्थांना सवलत असावी. या योजनेमुळें हल्लीं बँकेंत बिनव्याजी पडलेल्या रकमांवर उत्पन्न मिळून खेड्यांनाहि चांगल्या इमारती शाळांसाठीं मिळतील. पा. ३९५–९६.

८ शाळास्वच्छतेचें काम मुलांच्याकडून करून घेण्यांत यावें. ज्या पालकांना आपल्या मुलांनीं शाळेंत स्वच्छतेचें काम जातीनें करूं नये असें वाटत असेल, त्यांच्याकडून जादा पैसे घेण्यांत यावे. या सूचनेमुळें मुलांना शारीरिक कामाची संवय लागून स्थानिक-संस्थांच्या खर्चांत बचत होईल. पा. ३९६–३९९.

शिक्षण--साहित्यः—

१ प्रत्येक शाळेला टेबल, खुर्ची, फळा, गोट्यांची चौकट, लहान किंवा मोठें कपाट, स्टूल वगैरे लाकडी सामान पुरविण्यांत यावें. हें सामान शक्य

तों निरनिराळ्या शाळांमध्यें धंदेशिक्षणासाठीं जे सुतारकीचे वर्ग सुरू करण्यांत येणार आहेत, त्या वर्गांतील मुलांकडून, सुतारकी शिक्षकाच्या देखरेखीखालीं करून घेण्यांत यावें. पा. ४००–४०३.

२ प्रत्येक शाळेस एक घड्याळ, नकाशे, चित्रें वगैरे जरूरीच्या वस्तु पुरविण्यांत याव्यात. खेड्यांतील शिक्षकास घड्याळदुरुस्तीचें शिक्षण देण्यांत यावें. खात्यानें शालोपयोगी चित्रें प्रसिद्ध करून सर्व शाळांना मोफत किंवा अल्प किंमतीला पुरवावीं. पा. ४०३–४०५.

३ शिक्षणसाहित्यांत बाजाची पेटी, तबला, फोनो, मॅजिक लँटर्न यांचा समावेश करून अशा वस्तु खात्यास पुरवितां न आल्यास गांवांतील धनिकांकडून मिळविण्याचा प्रयत्न करावा. पा ४०५–४०६.

४ प्रत्येक शाळेसाठीं एक पुस्तकालय असावें. मोठ्या शाळेंत वर्गनिहाय असे पुस्तकसंग्रह असावे व मुलांमध्यें वाचनाची गोडी वाढविण्यासाठीं पुस्तकें वाचण्याची चढाओढ लावून त्यासाठीं बक्षिसें ठेवावींत. सरकारनें बालकोपयोगी पुस्तकांच्या याद्या वरचेवर प्रसिद्ध कराव्या. पुस्तकें विकत घेण्यासाठीं सरकारनें, स्थानिक संस्थांनीं व धनिकांनीं मदत करावी.
पा. ४०६–४१०.

५ मुलांना वरचेवर प्रेक्षणीय व ऐतिहासिक महत्त्वाचीं स्थळें पहाण्यास नेत जावें. पा. ४११

अभ्यासक्रम, धंदेशिक्षण व क्रमिक पुस्तकें:—

१ मुलांना द्यावयाचें शिक्षण त्यांच्या जीवनाशीं मिळतें असणें जरूर असल्यामुळें कृषिप्रधान खेड्यांतील मुलांसाठीं व शहरांतील मुलांसाठीं भिन्न स्वरूपाचा अभ्यासक्रम आंखणें आवश्यक आहे. पा. ४१९.

२ खेड्यांतील मुलांना वाङ्मयी शिक्षण शक्य तितकें कमी देण्यांत यावें, मात्र लिहिणें, वाचणें, अंकगणित व हिशेब त्यांना चांगले येतील असें धोरण ठेवावें; इतिहास, भूगोल, व्याकरण या विषयांवर पहिल्या चार इयत्तांमध्यें विशेष भर देऊं नये. पा. ४२०–२३.

३ भाषा शिकवितांना संस्कृत–प्रचुर शहरी भाषा शिकविण्याचा अट्टाहास

न करतां खेडवळ भाषेंतील चांगले शब्द मरणार नाहींत याबद्दल खबरदारी घ्यावी. पा. ४२१.

४ मुलांना आरोग्यविषयक शिक्षण देण्यांत यावें व स्वच्छतेसंबंधीं कांहीं गोष्टी प्रत्यक्ष त्यांच्याकडून करून घेण्यांत याव्यात. पा. ४२४.

५ मुलांना निरनिराळ्या धंद्यांचें शिक्षण देण्यांत यावें व धंद्याचें शिक्षण देतांना थोडें उत्पन्न होईल याकडे लक्ष द्यावें; परंतु निव्वळ उत्पन्न काढण्याच्या नादीं लागून या धंदेशिक्षणाच्या शाळांचें फॅक्टरींत रूपांतर न करण्याबद्दल खबरदारी घ्यावी. पा. ४२५–४३३.

६ मुलांना मनोरंजन करणारें शिक्षण द्यावें व त्यासाठीं त्यांना गायन, चित्रकला वगैरे कला शिकवाव्यात. पा. ४३३.

७ मुलींना गृहोपयोगी गोष्टी शिकविणें जरूर आहे. पा. ४३४–४३६.

८ मुलांना शाळेंत धर्मशिक्षण व नीतिशिक्षण देण्याच्या भरीस पडूं नये. पा. ४३६

९ शाळेची वेळ खेडयांतील लोकांना सोयीस्कर व आरोग्यास पोषक अशी असावी. पा. ४४०

१० खेडयांतील शाळांसाठीं ग्रामीण जीवनावर आधारलेलीं स्वतंत्र क्रमिक पुस्तकें असावींत. पा. ४४१

११ सर्व क्रमिक पुस्तकें सरकारनें किंवा निरनिराळ्या शाळाबोर्डांनीं सहकार्यानें प्रसिद्ध करावींत. खाजगी लेखकांनीं लिहिलेलीं पुस्तकें बंद करण्यांत यावींत. पा. ४४४-४६

१२ शहरांतील मुलांसाठींहि निराळा अभ्यासक्रम आखणें जरूर आहे. पा. ४४६:४७

१३ परीक्षेचें यांत्रिक स्वरूप बदलण्यांत यावें. पा. ४४८

प्रौढांचें शिक्षण:—

१ साक्षर प्रौढ व निरक्षर प्रौढ असे दोन वर्ग पाडून त्यांच्या शिक्षणाची सोय करण्यांत यावी. पा. ४५०

२ निरक्षर प्रौढांपैकीं १५ वर्षांपुढील व ४० वर्षांच्या आंतील सर्व पुरुषां-

वर रात्रींच्या शाळेंत दर आठवड्यास ६ तास हजर रहाण्याबद्दल कायद्यानें सक्ती करण्यांत यावी. पा. ४५२

३ प्राथमिक शाळांतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या साक्षर लोकांनाहि, त्यांचें घेतलेलें शिक्षण जगविण्यासाठीं, वर्षांतून ६० तास रात्रींच्या शाळेंत हजर रहाण्याबद्दल सक्ती करण्यांत यावी. पा. ४५३

४ पुरुषांप्रमाणें प्रौढ स्त्रियांनाहि सक्तीचें तत्त्व लागू करण्यांत यावें. पा. ४५२

५ या सक्तीच्या तत्त्वाचा भंग करणारास शासन करण्यात यावें. पा. ४५३

६ प्रौढांच्या शिक्षणासाठीं स्वतंत्र अभ्यासक्रम आखून त्यांच्यासाठीं खास क्रमिक पुस्तकें तयार करण्यांत यावींत. पा. ४५६–४५८

७ प्रौढांना शिक्षण देण्यासाठीं कथा, कीर्तनें, नाट्य, जलसे, सिनेमा वगैरे साधनांचा उपयोग करावा. पा. ४५७

मदतीच्या शाळा:—

१ हल्लीं दर मुलामागें असलेलें मदतीचें प्रमाण जास्त आहे तें कमी करण्यांत यावें. पा. ४६४

२ अ व ब हे शाळांचे दोन वर्ग आहेत ते कमी करण्यांत यावे व शिक्षणाचा किमान दर्जा ठरवून त्या दर्जाचें शिक्षण देणाऱ्या सर्वच शाळा एका वर्गांत घालण्यांत याव्यात. पा. ४६५

३ मदतीच्या शाळांतील शिक्षकांची किमान लायकी ठरविण्यांत यावी. या शिक्षकांनाहि उजळणी-वर्गास हजर राहण्याची परवानगी देण्यांत यावी व त्यांनाहि शिक्षकांच्या सभा–सम्मेलनांस बोलवावें. पा. ४६५

४ मदतीच्या शाळांतील शिक्षकांस गांवकऱ्यांनीं धान्यरूपानें मदत द्यावी व सरकारनें पैशाच्या रूपानें मदत करावी. पा. ४६५

५ या शाळांतील शिक्षकांना स्थैर्य प्राप्त होण्यासाठीं त्यांच्याकरितां प्रॉ. फंडाची योजना करावी. पा. ४६५–४६६

६ मदतीच्या शाळांतील शिक्षकांच्या कामाच्या लायकीचें (शेऱ्यांचें) रजिस्टर ठेवून बोर्डाच्या खात्यांत शिक्षकाची जागा रिकामी झाली तर चांगल्या शिक्षकांस तेथें लागूं करून घेण्यांत यावे. पा. ४६६

७ खात्याच्या अधिकाऱ्यांनीं अशा शिक्षकांशीं अधिक सहानुभूतीनें वागावें. पा. ४६६

८ मदतीच्या शाळा चालविण्यासाठीं एखादी मध्यवर्ति संस्था काढण्यांत यावी. पा. ४६६

शिक्षणकारभार व हुकमत—

१ ग्रामीण–शिक्षण–मंडळ व नागरी–शिक्षण–मंडळ अशीं दोन मंडळें स्थापन करून त्यांच्या हातांत अनुक्रमें खेडयांतील व शहरांतील प्राथमिक शिक्षणाचीं सूत्रें देण्यांत यावींत. पा ५०१

२ या मंडळाकडे आपआपल्या क्षेत्रांतील शाळाबोर्डासाठीं तपासनीस नेमणें, क्रमिक पुस्तकें तयार करणें व तीं मंजूर करणें वगैरे जबाबदारीचीं कामें सोपविण्यांत यावींत. पा. ५०२

३ प्रांतांचे भाषावर गट करून खात्याचे हुकूम त्या गटांच्या भाषेंत किंवा हिंदीभाषेंत काढण्यांत यावेत. पा. ५०२



सूची

ॲडम ८३
–स्मिथ ९९

अध्ययन, जन्म १८

अध्यापन, जन्म १८
अन्योन्य अध्यापन ६९
शास्त्र ३१४,३१५

अनार्य
आर्यांशीं तुलना स्थिति, ११
जित वनले ११
मूळ रहिवासी, जिंकले गेले ६
वर्ग, शूद्र ४

अब्राह्मण वर्गाचीं वंडें १५

अमेरिका
कौन्टी ट्रेनिंग स्कूल्स ३२५
तपासक ३६७,३७१
पिण्याचें पाणी ३९३
फेडरल ब्यूरो ऑफ एज्युकेशन३६७
शहरें खेडीं फरक २४२, २४३, ३२५
शाळेचें सभागृह ३९३
शिक्षकाची निवड ३२२
शिक्षकाचें शिक्षण ३१२, ३१४, ३१८, ३२५
शिक्षण खातें ३७५
शेतकरी उदासीन ३५४

अरण्यक १५, २४

अर्वाचीन
काल ३
शिक्षण ७४
--विगरसरकारी प्रयत्न ७१

आर्य
अहंकार १२
एकवर्णी होते १८
जिताशीं वागणूक १२
तीन वर्ण, पेशापरत्वें ४
दोनवर्ण ३
युद्धकलेचें ज्ञान ११
ऱ्हासाचा पाया १२
शस्त्रांचा उपयोग ११
शिस्त ११
समाजरचना ७
समाजांतं विकृती १४

अलांवन्स
पोस्टाचा ३४७
प्रथमोपचारकाचा ३४७
रात्रीच्या शाळांचा ३४७
हजेरी ३३८, ३३९, ३४५

ऑकलंड लॉर्ड ९३,९४,१००

इंग्लंड
ऑक्सफर्ड शायर २४२, २४३
एज्युकेशन ॲक्ट, २४५
ट्रेनिंग कॉलेज ३०२,
तपासणी ३६२,३६९
द्विवर्ष शिक्षण विद्यालयें ३०३
धंदे शिक्षक ४३३

पाण्याची सोय ३९३
प्रौढांचें शिक्षण ४५१
बिगरशिक्षित शिक्षक २८९
मधला फराळ २५०-५१
मुलांची स्वच्छता २४५
मुलांचें आरोग्य २४८
मेडिकल ऑफिसर २४७
विश्वविद्यालयाची शिक्षणखातीं ३०३
वैद्यकीय तपासणी २४७
शहरें, खेडीं फरक २४२
शाळेचें सभागृह ३९३
शिक्षित शिक्षक २८९
शिक्षकांचें शिक्षण २९८,३१४,३२६
शिक्षण खर्चाची सोय १९९-२०३
सक्तीचें शिक्षण १८१ १९१,
हेल्थ व्हिजिटर २४७
उपाय–योजना २४४,३०४
ऋषि–आद्य कर्तव्य १८
एल्फिन्स्टन
मौंट स्टुअर्ट ७९,८५,९४,९९, १४८
लार्ड ९८, १६५
कमिशन
एज्युकेशन ११३,११४,११५,११७
शेतकी २१८,२३०
सायमन १२४,२१८
हंटर ११६,११७,१२३,१४२,१८०,
१९२,२१७,४६३,४६६,४६७
कमिटी
चंदावरकर १२१,१२४,१८०,१८१
पुनर्घटना १२४
हरटॉग ११६, १२४, १४३, १६०,
२१८, २१९, ४६९,४७०,४७१
हेस्केथ १२४
कर्झन लॉर्ड ११६
कर्म
प्रधान वर्गीकरण अहेतुक २०
विषयक शिकवणीचा परिणाम २०
कायदा ४७२, ४७३, ४७४, ४७५
कराराचा १०
काल
अर्वाचीन ३, ७४, १३५
प्राचीन ३, ३२, १२६
मध्य ३, ४४, १३१
कुंटे ३
कृषक
शूद्र पहा
कवश अहलुशा २२
क्षत्रिय
अनार्यांस लष्करी शिक्षण व सहकार्य
१३
आर्यत्व नाकबूल २३
दक्षिणेंत वसाहती १३
दक्षिणेवर मोहीम १३
दुय्यम दर्जाचे बनले ९
नित्यनैमित्तिक यज्ञ २०
पुरोहित, त्याचे ६
पोशाख ५
प्रार्थना ५, ६

ब्राह्मणापेक्षां कमी दर्जाचे यास कबुली७
मोकळीक १९
युवकानें जमदग्नीची मानहानि १५
राज्यसंपादन ४
–स्थापना ५
राहणी ५
–फेरबदलाचा परिणाम ५
विद्येची ताटातूट २३
वेदाध्ययन १८
वैभवकाल ६, ८
समजूत ५
सामाजिक दर्जा ५, ६
स्त्रिया ६
खर्च (शिक्षणाबद्दल)
कंपनी काळांतील १८८
काटकसर २२,२४
दर विद्यार्थ्यास २१९-१०
व्यर्थ व्यय २११-२२०
–कमी करण्याचे उपाय २२०,२२८, २२९, २३०
सोय २२१, २२७
खेडें
घरें ३८४
परिस्थिति २४१, २४३
मुलें, त्यांतील २४०
रोग २४०
स्थितीचें वर्णन त्यांतील २४२
खेर ना. २२१, ४९७, ५०५
गडकरी ४२४
गुरु
उदात्त रहाणीचा परिणाम ३६
कर्तव्य, अध्यापन ३४
गृहीं भोजन ३६
गृहीं शिक्षण ३४
जात, ब्राह्मण ३५
दक्षिणा ३४, ४४
योगक्षेम ३७, १८८
गोखले, ना. ११७, ११८, ११९, १४३,१६६,१८०, १८४, २०४, २२०, २३०
ग्रँट ८०, ८१, ८२, ९४
ग्रामीण शिक्षण मंडळ ३६९, ३७३, ५०१
चतुर्वर्ग–चिंतामणि २६, २७, २९
चंद्रगुप्त २३
जगन्नाथ शंकरशेट ९५
जर्व्हिस, कर्नल ९५
जातिभेद
उत्पत्ति १२
जन्मावर १४
देवांतहि १४
पाया ३, १३
जॉर्ज
पहिला. वध १६
पांचवा ११९
जोशी, रा. ब. १७९, १८७, १८४
टागोर, द्वारकानाथ ९०
ट्रेनिंग २७७

अभ्यासक्रम २९६
आक्षेप २९४ .
इंग्लंड ३०२
कॉलेज २७७
कौन्टी ट्रेनिंग स्कूल्स ३२४, ३२५
खेड्यांत ३२३, ३२४, ३२५
जातवारी प्रमाण २९३
निवड २९२, २९३
परीक्षा २९७
प्रवेश २९२
वसतिगृह २९६
वेतन २९५, ३१५
शिक्षण ३१२, ३१३
शिक्षणाचा हेतु ३१५
शेतकरी वर्गाच्या शिक्षकांसाठी ३२५

ट्रेव्हिलिन, सर १३९

ठराव
१८१४ चा ८३
१८२३ चा ८५
१८३५ चा ९३
१८५४ चा ९६, १०२, १०५, ११४, ११५, १४०, ४५९, ४६०, ४६७
१८५९ चा १०५, ४६७
१८७१ चा १९१, १९३
१८८२ चा ११४
१८८४ चा ११६
१९०४ चा ११६, ११७
१९१३ चा ११९

डंकन ७९, ८८
डलहौसी, लॉर्ड १४१
तक्ता नं.
१ १८२५ मधील मुंबई प्रांतांतील शिक्षणाची स्थिति ७२
२ सरकारी व मदतीच्या शाळांचें प्रमाण १०९
३ शिक्षणसंस्था व शिकणारांची संख्या १४९
४ लोकसंख्या विद्यार्थी प्रमाण १५०
५ शाळांची व मुलांची संख्या १५१
६ विद्यार्थ्यांचे पुरुषसंख्येशीं प्रमाण १५३
७ विद्यार्थिनींचें स्त्री संख्येशीं प्रमाण १५४
८ निरनिराळ्या धमाच्या विद्यार्थ्यांचें प्रमाण १५६
९ निरनिराळ्या जातींच्या विद्यार्थ्यांचें प्रमाण १५७
१० शाळा असलेल्या व नसलेल्या गांवांची संख्या १५९
११ प्राथमिक शाळांच्या क्षेत्रास सरासरी प्रमाण १६०
१२ प्रांतांतील साक्षरता प्रमाण १६२
१३ शहरांतील साक्षरांची संख्या १६३
१४ मातृभाषेंतील व इंग्रजी भाषेंतील साक्षरांचे प्रमाण १६४
१५ दर हजारी १५ वर्षांखालील विवाहितांची संख्या १७१

१६ दर हजारी स्त्रियांत ६ वर्षांच्या आंतील विवाहितांची संख्या १७१
१८ प्राथमिक शिक्षणासाठीं होणारा खर्च २०५
१९ निरनिराळ्या शिक्षणासाठीं होणारा खर्च २०७
२० निरनिराळ्या शाळांत दर विद्यार्थ्यास येणारा खर्च २०९
२१ निरनिराळ्या सालीं दर विद्यार्थ्यास आलेला खर्च २१०
२२ मुलांच्या संख्येंत व खर्चांत झालेली वाढी २१०
२३ निरनिराळ्या प्रांतांच्या दर विद्यार्थ्यामागें येणारा खर्च २१०
२४ सन १९२२ ते २७ मधील मुलांची गळती २१२-१३
२५ सन १९२७ ते ३२ मधील मुलांची गळती २१४-१५
२६ सन १८८२ च्या शिक्षकांच्या शिक्षणसंस्था व त्यांतील विद्यार्थी २८३
२७ सन १९३२ सालच्या शिक्षकांच्या शिक्षणसंस्था २८४-५
२८ शिक्षित व बिगरशिक्षित शिक्षकांचें प्रमाण २८७
२९ इंग्लंडमधील शिक्षित; बिगर शिक्षित शिक्षकांचें प्रमाण २८९
३० शिक्षकांच्या शिक्षणसंस्थांची कमी जास्त संख्या २९१
३१ निरनिराळ्या लायकीच्या शिक्षकांची संख्या ३०६
३२ निरनिराळ्या प्रांतांतील पगाराची सरासरी ३३६
३३ शेतकी शाळांची व त्यांतील विद्यार्थ्यांची संख्या ४२७
३४ प्रौढांच्या शाळांची व त्यांतील विद्यार्थ्यांची संख्या ४५०
३५ पुणें स्कूल बोर्डांतील निरनिराळ्या वर्गांच्या शिक्षकांची संख्या ४८६
३६ निरनिराळ्या जातींचे लोकसंख्येशीं प्रमाण ४८७

तपासणी

इंग्लंडमधील २४७
गांवठी शाळांची १०८
पूर्वेतिहास ३६२
मुलांची २४७
वैद्यकीय २४६, २४८, १२०
सरकारी त. चें महत्त्व ३६५

तपासनीस

आक्षेप ३६५, ३७०
आक्षेपास उत्तर ३७१
–उपाय ३७३, ३७५, ३७७
कार्य ३६४, ३७०, ३७१, ३७४
नेमणूक ३६९
पदवीधर ३६६
बुद्धिजीवि लोकांपैकीं ३६६
वागणूक ३७६
शाळेची पहाणी ३७६

संख्या ३६८
संमेलनें ३७८
सरकारी ३६४
सूचना ३६६, ३७२, ३७७
स्थानिक संस्थांचे ३७०
दुय्यम धंदे ४२९-३३
द्विवर्ष शिक्षण-विद्यालयें ३०३
धंदेशिक्षण खर्च २०८
धर्म
आचार्यांची मोर्चेबंदी व अपमतलबी नियम २१
आंदोलनाच्या अभ्यासाचें महत्त्व २
--प्राचीन आर्य ३
धर्मप्रसारक
साक्षरतेचे प्रयत्न २५
नॉर्मल
क्लासेस २७९
स्कूल २१२
नोकरी
कनिष्ठ वर्ग २६६
तलाठ्याची २६९
दुय्यम धंदा २७२
पट्टेवाल्याची २७०
पुढारलेले वर्ग २६८
शेतकरी वर्ग २६८
निग्रोध जातक १९
पगार ३३४-३४२
पटेल ना. १८०
पब्लिक इन्स्ट्रक्शन
जनरल कमेटी ऑफ् ८५
डायरेक्टर ऑफ् ८५, १०४, ११७ ४७१,
डिपार्टमेंट ८६, ४६९, ४७०-४७२,
परशुराम विरुद्ध क्षात्रिय १६
परांजपे, ना. ३३६, ३८८, ४८०,
परांजपे, म. रा. ४९८
परीक्षा
अर्वाचीन काळांतील ११३, ४४८
ट्रेनिंग कॉ. तील २९७
प्राचीन काळांतील ४२
पंचकमेटी ४९२-४९६
पालक
अडाणी २३६
गरीब ३३७
शासन २४५
शिकलेले २३५
शेतकरी वर्गांतील २३७
पिस्टोलोझी ३९९
पील १११
पुरातन धर्म
मानसिक गुलामगिरी २९
विरोधी चळवळीचे फायदे २८
पुरोहितवर्ग
अपमान क्षत्रियांकडून १२
क्षत्रियांवरील वजन ८
धार्मिक बाबतींत सल्ला ७
बलवान ७
श्रमणांचा छळ २४

मान राजाकडून ७
राजकीय बाबतींत महत्त्व नाहीं ७
राजकीय सत्तेचा उपयोग १५
विरुद्ध बंडें, क्षत्रियांचीं १५
वेदांचा अभ्यास, मक्तेदारी १९
सरदारास मदत ८
सेनानायकाशीं तुलना ७
स्वतंत्र वर्गाची निर्मिति १९

पुस्तकें
क्रमिक ४४१, ४४२, ४४३, ४४४
खेड्यांसाठीं ४०७
ग्रामीण वाङ्मय ४०८
द्रव्य ४०८
पुस्तकालयें ४०६
शिक्षकांसाठीं ४१०
वाचनाची चढाओढ ४१०
संग्रह मुलांसाठीं, वर्गांसाठीं ४१०
सूचना ४०८

पेरी, सर ८६, ९५, ९६, १०१, १६५

पेशवे व छत्रपती १६

पोपशाही, पायबंद २५

प्राकृत भाषा
शिक्षण देणारे २५
पाली ३१

प्राचीन काल ३
उच्च शिक्षण ३९
दुय्यम शिक्षण ४०
प्राथमिक शिक्षण ३८
धंदेशिक्षण ४०
धार्मिक शिक्षण ४१
लष्करी शिक्षण ४१
व्यापारी शिक्षण ४१
विद्या व बहुजनसमाज १४४
शारीरिक शिक्षण ४१
शिक्षणाचें स्वरूप ४०
शिक्षणपरिषदा ४०

प्रॉटेस्टंट धर्मसुधारक २५

प्राथमिक शिक्षण
खर्चावद्दल सरकारी धोरण १२३, १२४
पद्धत ३८, ३९
प्राचीन कालीन ३८
बुद्धकाळांतील ३८
विषय ३८, ४०
शाळा, स्थळ ३८
सोय १०६

प्रिन्सेप ८५, ८९, ९३

प्रेक्षणीय स्थळें पहाणें ४११

प्रौढांचें शिक्षण
सक्ती ४५१, ४५३
अडचणी ४५४
अभ्यासक्रम ४५६
इंग्लंड ४५१, ४५३
खर्च ४५४
निरक्षर ४५०
पुस्तकें ४५८
रात्रीच्या शाळा ४५१

शासन ४५३
शिक्षक व अधिकारी वर्ग ४५५
साक्षर ४५२
साधनें ४५७
स्त्रिया ४५२, ४५८
फुलें ८७, १३६, १६६, १८०
फॉरिश २७८
फी २६३
प्राचीन काळांतील ४२
फ्रामजी कोयाजी ९५
फ्रेजर ७९, ९६, ९७
फ्रोबेल, फ्रेड्रिच ३९९
बहुजन समाज
व प्राचीन विद्या १४४
विद्येचा प्रसार १४८
शिक्षण देण्याचे प्रयत्न २३
बक्षिसें २६६, ४१०.
बापट ४२४
बुद्धकाल १३
अपूर्व चैतन्य १७
हिंदुस्थानचें वैभव १७
बुद्धधर्माची उभारणी १५, २४
बुद्धधर्माची स्थापना १७
परदेशांत प्रवेश १७
प्राकृत भाषेचा उपयोग २४, ३१
ब्राह्मणधर्मास विरोध २४
शिक्षणाचा प्रसार २४, ३१, १४७,
सामान्य लोकांचा धर्म १७
संस्कृत भाषेचा त्याग २४
राजाश्रय २४
ऱ्हासाचा परिणाम २९
बुद्धि
मांद्याचा परिणाम २१
बेथून १३७, १४० १४१, १४२
बेंटींक लॉर्ड ९३
ब्राह्मण ४७
अहिंसावादी ९
क्षात्रियांचे आश्रित ७
नोकरचाकर यांचे ७
दर्जा क्षात्रियापेक्षां कमी ७
पृथूस गादी १६
मांसभक्षण ९
मिळकत ७
यज्ञाचे पुरोहित ते ७
युद्धकलानिपुण १९
राजकारणाचीं सूत्रें, ९
वर्चस्व १६
वेनाचा वध १६
शूद्रास नमस्कार १३
ब्राह्मण धर्माचा ऱ्हास १७
ब्रिटिश
सत्ताधिकारी व धर्मगुरु २२
भागवतधर्म
उदय २५
संतांचें कार्य २६, ३०
संस्कृत पंडितांचा विरोध २६
भाट, काव्यरचना ४
मदत

सूचि

आर्थिक मदत २६३
वैद्यकीय २४६, २४७, ३४७
मदतीच्या शाळा
मदतीच्या पद्धति ४६२-४६३
मधला फराळ
इंग्लंड २५०-५१
खर्च २५३
देखरेख २५३,
सूचना २५२
मध्यकाल
प्राकृत-शिक्षण ५१
भाषेचें अध्ययन ५२
मुसलमानांचें शिक्षण ४५
विषय ४५, ५०
शिकलेले राजे ४७, ४८, ४९
शिक्षणपद्धति ४९
संस्कृत-शिक्षण ५१
विद्येचें धार्मिक स्वरूप ५५
राजाश्रय शिक्षणास ५४
हिंदूंचे शिक्षण ५१
मनरो, सर थॉमस ८३, ९८, २७९
मंत्र
क्षत्रियांकडून रचना १८
सामर्थ्य ८
महंमद इब्राहीम मकवा ९५
महात्मा गांधी १८६, २२४, २२६, २७१, ४२०, ४२५, ४२८
महाभारत
कालचे वर्णव्यवस्थेचे नियम २७
ब्राह्मणक ३७
वेदपारंगे क्षत्रिय १९
शिक्षणांत उपयोग ३१०
मॅकेन्झी ९७, ९८, १००, १६५, १६७
मॉंटेसरी, मॅडम ३९९
मांस भक्षक ९
--मिश्रित भात ९
--कुत्र्याचें ९
मॉयरा लॉर्ड ८९
श्रीमंतांचीं २३४
अस्पृश्य वर्गांचीं २३६, २४१
कानिष्ठ वर्गांचीं २३४
खेड्यांतील २३६
परिस्थिती त्यांची २३४, २४१
बिगरशेतकरी वर्गाची २३६
मध्यम वर्गाची २३४
रहाणी २३९
वर्गीकरण २३४, २५३
मुलें
शेतकरी वर्गाची २३६
मूळ रहिवासी
क्षत्रियांचा झगडा ११
दस्यू ११
दास ११
मेकॉले, लॉर्ड ८१, ८५, ९०, ९१, ९३, १००, १६५, १६७, १९०
मेहगू ३९०

म्युनिसिपालिटी १९४, ३३५, ३३९, ३४४, ३७०, ३८४, ४७३, ४७५, ४७८

यज्ञ
कार्यांत शूद्रास बंदी १३
चलती १०
धार्मिकतेचें प्रमाण, यांतील ७
नित्यनैमित्तिक, क्षत्रिय २०
पुरोहिताचा मोठेपणा, व ८
प्रकार ७, १८
वैभवाचें प्रदर्शन ७
संस्था, जन्म ७, १८
समजूत लोकांची, याबद्दल १०
संस्थेवर हल्ला १५, २३

यादवी–परिणाम १६

युरोपियन–सत्तास्थापना १६

रसेल, सर जॉन ४९९

रानडे, रमाबाई १४०

राममोहन रॉय ७९, ९०, ९१

राष्ट्रीय सभा १८३, २२७, ५०६

रिपन, लॉर्ड ११६, ४७३

लट्टे, ना. ४९७

लेडी वुइल्सन् मॅटर्निटी असोसिएशन ३४८

लोकल-फंड–११०, १११, १९०, १९१, १९२, १९३

लोकलबोर्ड
ॲक्ट ४७४
तुरुस्ती ३९६
पगाराचें स्केल ३३९
पुस्तकालयें ४०८, ४०९
शाळांची जबाबदारी ३८२, ३८५, ३८६, ३९४, ३९५
स्कूलफंड १९४

वर्ग
कनिष्ठ २३४, २३६
पुढारलेले २६८
शेतकरी २३८

वर्गभेद
आर्यांतील, धर्मविभागावर १३
अनिष्ट परिणाम १५
उत्पत्ति १२

वर्ण ३

वॉरन हेस्टिंग्ज ७९, ८८, १८८,

वार्डन ९४, १३६, १३७, १४०

विद्या
व्यासंग सुटल्याचा परिणाम क्षात्रिय-वैश्यांवर २१

विप्र सत्तेचीं सूत्रें २०

विवाह
मिश्र, अनार्यांचे आर्यांशीं, उदाहरणें १२

विश्वविद्यालय
तक्षशिला १९, २४
नलंदा २४

वुइल्बर फोर्स ८०, ८२, ८३

वुइल्सन, डॉ. ७८, ८९

वुड, सर चार्लस ११५

बुलोची, सर जॉन, १०२
वेद
अध्ययन करण्याचें स्वातंत्र्य १८
अध्ययन व क्षात्रिय १८
अभ्यास, पुरोहितांची मक्तेदारी १९
अभ्यासास उत्तेजन २०
अभ्यासाचा काल ३३, ३४
अनभ्यासाचा परिणाम २०
शिक्षणाचा आधार १८
वेन १६
वेळ, शाळेची ४४०-४४१
वैश्य ४, ९
आर्यत्व नाकबूल २३
उत्पत्ति, वर्णांची ३
बदलत्या समाजांत स्थान ११
मान्यतेचें स्थान १६
यांवरील कर १०
--जुलूम १०
योगक्षेम ९
विद्येची ताटातूट २३
वेदाध्ययनाची मोकळीक १९
वेदविद्येचा अभ्यास १९
समानत्वाबद्दल महत्त्वाकांक्षा २०
सवलती १६
व्याज १०
व्यापार १०
व्यापारी १०
–मुलें, वेदांचा व कायद्यांचा अभ्यास १९
व्यापाराची स्थिति १०
शहरी शिक्षण-मंडळ-३६९, ३७३, ५०१
शंबूक २३
शाळा
गांवठी ३८१, ६४, १०७
–शिक्षण ६६, १०७
–अंतर-व्यवस्था ६६, ६७, ६८
–व कंपनी ८७
बाजार ७०
बोर्डाच्या १०८
मदत १०८
मदतीच्या १०८
मिशनरी ७६, ७७, ७८
मोकळ्या हवेंतील
म्युनिसिपल १०८
रात्रीच्या ३४७
वर्गीकरण ३८०
शेतकीची ३२४
सरकारी १०७, १०८
शाळागृहें ३८१-३९९
शाळा दुय्यम ३१५
वैद्यकीय तपासणी २४८
शिक्षकांच्या शिक्षणाची सोय ३१५
शेतकी शिक्षण ४२८
शाळा मोकळ्या हवेंतील
जाण्याची व्यवस्था २५५
विशेष बाबी २५५
वैद्यकीय तपासणी २५६

शाळा सोयीच्या २६१
योजना २६२
शिकवणी खाजगी ३४६
शिक्षक
अडचणी ३५६
उत्पन्नाचे झरे ३४६
कायम करणें ३०८
खेड्यांतील ६१६, ६१७, ३१८
गांवठी शाळेंतील ६५
छात्र २९९, ३०९, ३१०, ३११, ३१२
जन्मवारी ३४९
ट्रेन्ड
निवड ३१८
नेमणूक ३३२, ३३३
पगार ३३४, ६५
पत्नी ३४८
परस्पर संबंध ३५०
पाक्षिक ३३१
पालक व ३५३
पुढारलेल्या वर्गांतील ३२१
पुरुष
प्यूपील टीचर ३०१
बढती ३३२, ३३४
बदली ३५७
बिगरशिक्षित २८६
बुरसार ३०१
ब्राह्मण ३२०
मदतीच्या शाळेंतील
मासिक ३३१
योगक्षेम ३३४
वय ३०८
वशिलेबाजी
विद्यार्थी व ३५१
विद्याव्यासंग ३५५
शहरांतील ३१६
शाळा व ३४८
शिक्षण
शिक्षा ३३२, ३३४, ३५९
शिक्षित २८६
शेतकरी वर्गांतील
सभा ३३०
संघ ३५५
स्टुडंट टीचर २०१
स्त्री
स्वच्छता ३५२
शिक्षकाचें शिक्षण ११२
आरंभ २७८
इंग्लंड २८०-२८१, २९८, ३१३, ३१७
शि.ची उजळणी ३२७, ३२९
खर्च २८२
खेड्यांतील ३१५, ३२३
दुय्यम शाळांचा उपयोग ३१५
दोषदर्शन ३०४
नार्मल क्लासेस २७६
,, स्कूल्स २८०
बंगाल २८५

प्रगति २७८
मद्रास २८२
मध्यप्रांत २८६
मुंबई २७९, २९०
शहरांतील ३१५
संस्था २८५, २८६
सूचना ३१७

शिक्षण

अडचणी १६५- १७२
अनुकूल प्रतिकूल वृत्ती १७
अप्रत्यक्ष आत्मरक्षणोपयोगी ४०४
आत्मरक्षणोपयोगी ८१४
आधार विषय वेद १८
आरोग्य विषयक ४१९, ४२४, ४३५
आश्रम ३२
इंग्लंड मधील ८०
इतर देशांतील सक्तीचें १८१, १८२
उद्देश २७७, ४१३, ४१४, ४१७
उच्च ३९
ऐच्छीक कां सक्तीचें १७९
कलात्मक ४१५, ४१९, ४३३
कसें द्यावें १०३, १०४
कोणतें द्यावें ८८
कोणास द्यावें ९६
कंपनी सरकार व ८०, ८१
खर्चाची सोय १०९
गरजा २३४
गांवठी शाळेंतील ६६
ग्रामीण ३६६
गुरुगृहीं ३४
दुय्यम ३९
देणें राजाचें कर्तव्य ३७
धंदे ४१९, ४२५
धार्मिक ४३६, ३८
धार्मिक वाव ३२
ध्येय ३२७, २३३, २७७, ४२५
नीति ४३६, ४३९
पद्धतींतील दोष ४१७
पद्धतीचा पाया १८
प्रकार ४१
प्रसार ७१-७३
पार्लमेंट ८१, ८२, ८३
भाषा ९४
भाषा खेडवळ ४२१
भाषा पुणेरी ४२१
मतभेद ८८
महागाचे १२४, २०९
मोफत ३६, ३७, ४४, १०७, १२०, २६४
रक्षणोपयोगी ४१४-१५
राजाश्रय ४४
वय प्राचीन काळचें ३३
वय मध्य कालांतील ६३
व राजकारण १७५
व्यक्ति सुधारणा १७४
वाङ्मयी ४०९, ४२०
व्याकरण ४२०, ४२१
व्यावहारिक ५८

विषय ५९, ६४
विशेष ज्ञान देणारे ४०६
वेदांचे ३२
शहरी ३६६
शारीरिक २५७
शिक्षकाचे २७६, ४४१
शेतकी ४२६, ४२८
श्रीमंताचे ५६
सक्तीचे ३६, ११७, १२०, १२३, १२२, ६७९. १८५
सप्ताह ३३१
समाजोपयोगी ४१५
स्वच्छतेंचें २४४
स्वरूप २
सामान्य वर्गाचे ५६
सामान्य ज्ञान देणारे ४१६
साहित्य २६४
हेतु ३२

शिक्षण कारभार
पुनर्घटना ४९७, ५०१, ५०३

शिक्षणक्रम
खेड्यांतील शाळांचा ११७, ४१९ ते २९
प्रौढांचा ४५६
मुलींचा विशेष ४३४
रचनात्मक कार्यक्रम ४३४
विभागणी ११२
शिक्षकांचा २९६, ४४०

शिक्षणपद्धति
इतिहास २
हेतु, हिंदु ३३

शिक्षण शारीरिक
खेड्यांत २५८, २५९
खेळ २६०
खेळाचें पुस्तक २६०
गर्ल गाईड २६०
पटांगण २५९, २६०
प्रचारक २६१
प्रधान हेतु २५८
बायस्काऊट २६०
व्यायामाचा प्रचार २६१
शहरांत २५८, २५९
शिक्षक २६१

शिक्षण साहित्य ३९९
अमेरिका ४०२
इंग्लंड ४०२
किंमत ६३
खर्ची ४००, ४०१
गोष्यांची चौकट ४०२
घड्याळ ४०३
चित्रें ४१४, ४०५
टेबल
तबला ४०५
नकाशा ४०४, ६३
पियानो ४०५
पुस्तकालयें ४०६
फळा ४०१
फोनो ४०६

बाजाची पेटी ४१६
मध्यकालांतील ६०, ६१, ६२, ६३
मॅजिक लँटर्न
मेजे ४०२
रेडियो ४०६
लाकडी सामान ४१०
सिनेमा ४१६
स्टूल ४११

शिक्षा
विद्यार्थ्यांस ४४
शिक्षकास ३३४, ३५९

शिष्यवृत्ति २६५
प्राचीन काळांतिल ४२

शूद्र
अनार्याचा भरणा १०
अनार्याचा वर्ग ४, १०
आर्याशीं मिश्रविवाहाचीं उदाहरणें १२
उत्कर्ष १२
कनिष्ठ स्थान १२
धर्म २२
नोकरी हीन दर्जाची २२
ब्राह्मणाकडून नमस्कार १३
मान्यतेचें स्थान १६
यज्ञकर्मांत प्रतिबंध १२
वर्ग निर्माण झाला १२
वेदविद्येबद्दल शासन २३
व्याख्या ५२
शिक्षण २२
शेतकरी १३
सक्तीनें शिक्षण बंदी २३
सवलती १६
संघटना व संघशक्ति १३
संख्या २२
संस्कृत विद्या २२
सेवा धर्म पालन १२
स्वतंत्र वर्ग १२
स्थितींत व दर्जांत फरक १२

शेतकरी
उदासीनता शिक्षणविषयक २३९, ३५४
घरें त्यांचीं २४०
पालक
मुलें, वर्गांतील २३९

श्रमण
बुद्धभिक्षु २४

सरकार
व प्रौढांचें शिक्षण ४५४
व सक्तीचें शिक्षण १८३
शिक्षणास मदत १९६, १९७

सरदार घराणीं ६

संघ
शूद्र पहा

साक्षरता
प्रमाण १६२
वाढ १६१
व्याख्या १६२
शहरांतील १६३

साठे परांजपे योजना ३३७, ३३८

सामाजिक
सुपरवायझर तपासनीस पहा.
सुर्वे कमिटी २३८
स्कूलबोर्ड
अडमिनिस्ट्रेटिव्ह आफिसर ३३०, ३३४, ४६४, ४७६, ४७७, ४८५, ४८७
घटना ४७५, ४७६
तपासनीस ३७२, ३७६
पाक्षिक किंवा मासिक ३३१, ३३२ ४८३, ४८५
पुणें जिल्हा २९४,२९५,३१४, ३४५
पुस्तक प्रकाशन ४४६
बदली ३५६, ३६०, ३६१
शिक्षकाची नेमणूक ३१४, ३३२, ३३३
शिक्षणाचा कारभार ४७४
संघ ३३१
सरकारी तपासनीस ३६८
स्वातंत्र्य देणें जरूर ४८१
हिशोब ४७९
स्थानिक संस्था
अडचणी ४८१-८३
अधिकार काढून घेणें ३७२
आक्षेप २९५, ४८३, ४८८
आर्थिक स्थिति २१४
कारभाराचें स्वातंत्र्य ४८०
घटना ४७२ ४७९
जबाबदारी १९५, १९६, १९८
ट्रेनिंग शिफारशी २९३
तपासणी ३६५
तपासनीस ३७१
दोष ४८८, ४९२
व शिक्षणखातें ४७९, ४८१, ४८२,
स्त्रीशिक्षक २५४
स्त्री शिक्षण
अडचणी
पडदा १२७
बालविवाह १२७, १३०
बंगालमधील १३७, १३८
बिगरसरकारी प्रयत्न १३५
मुंबईतील १३५, १३६, १३७
मुसलमानांचे १३३
मद्रास १३८
व सक्ती १८४
विषय प्राचीन १२९, १३१
वेदांचें शिक्षण १२८
लोक विरोध १३८, १३९, १४०
सरकारी धोरण १४०
सामान्य वर्गाचे १३०
हिंदूचे १३०
स्पेन्सर ४०३, ४२५
स्वार्झ ७६. १८८
हर्ष राजा ३
हिंदुस्थान
ऐतिहासिक कालाचे तीन विभाग ३
हेरिंग्टन ८५
हेल्थ व्हिजिटर २४७


५५६८

REFBK-0005568